तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र

खंड १

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन

संपादक
वसु भारद्वाज



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन

खंड पहिला

१. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान
२. मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने

संपादक
वसु भारद्वाज

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन खंड १

➢ **संपादक :** डॉ. वसु भारद्वाज

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-०८-७

➢ **प्रथमावृत्ती :** २०२२

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक, पुणे - ४११००१.

➢ **किंमत : रुपये २६९/–**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्थापनेपासूनच ग्रंथवैविध्यांचा विचार करीत मराठी भाषकांना भाषेच्या चिंतनगंगोत्रीचा परिचय करून देण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यातूनच आजपर्यंत विविध ग्रंथ अभ्यासकांसमोर आणून भाषेला आणि मराठी संस्कृतीला समृद्ध करण्याचा अविरत प्रयत्न केला आहे. मराठी भाषेचा इतिहास तसा प्राचीन आहे. केवळ रंजनात्मक नव्हे तर सांस्कृतिक वैभवाची परंपरा सांभाळण्याचे उत्तरदायित्वही मराठी भाषेने निभावले आहे. संत साहित्य आणि इतिहासाने या वैभवाचा कळस उभारल्याचे आपल्या लक्षात येते. विश्वात्मक देवाशी संवाद करणाऱ्या संतमांदियाळीने मराठी भाषेतच तत्त्वज्ञानाचा ध्वज फडकावून भाषेला नवे कोंदण दिले आहे.

मराठी ग्रंथ प्रकाशनाच्या कालखंडामध्ये १८६४ ते १९४७ हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा असा मानला जातो. या कालखंडामध्ये प्रकाशित ग्रंथांचे वैविध्य पाहिले की विस्मय वाटतो. धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल, चरित्रे, आध्यात्म, भूगोल अशा विविध विषयांवरची ग्रंथसंपदा, नव-मुद्रणकाळाची सुतोवाच ठरली. भारतीय तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास हे केवळ शिखरदर्शनच होते. त्यासोबतच पाश्चात्य विश्वातील तत्त्ववेत्ते आणि नीतितत्त्वज्ञ यांचे विचारही मायमराठीच्या पोशाखात परिचित करून देण्याचे महत्त कर्म काही द्रष्ट्यांनी मोठ्या साक्षेपाने केले. तत्कालीन अभ्यासकांना एक मोठे दालन उघडे झाले, हे मात्र खरे ! पण अभ्यासक जरी सातत्याने तयार होत राहिले तरीही कालौघात ग्रंथ व्यवहार लुप्तप्राय होण्याच्या मार्गावर आला. दुर्मिळ आणि मौल्यवान संदर्भग्रंथांची वानवा दिसू लागली.

याच कारणाने काही महत्त्वाच्या पण दुर्मिळ ग्रंथांचा शोध घेऊन समकाळामध्ये ते संदर्भ उपलब्ध होण्यासाठी काही ग्रंथ पुनर्मुद्रणाचा प्रकल्प आपण हाती घेतला आहे. याच मालिकेमध्ये 'तत्त्वज्ञान आणि नीतिविषयक दुर्मिळ ग्रंथांचे संपादन व पुन:प्रकाशन' हाही एक प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये खंड पहिला हा 'पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन', खंड दुसरा हा 'तत्त्वज्ञान आणि नीति' तर खंड तिसरा हा 'नीतितत्त्वज्ञान, राजकीय आणि सामाजिक'हे तीन खंड संपादित करून वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. या खंडांच्या निमित्ताने केवळ भारतीय नव्हे तर जागतिक तत्त्वज्ञानाचा परामर्ष घेतला गेला आहे. अभ्यासकांसाठी एक मोठा संदर्भ उपलब्ध होत आहे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या गंगोत्रीची धारा ही अक्षय्य वाहणारी आहे. इथे या जागतिक प्रतिभेचा त्रिवेणी संगम आहे. या प्रतिभासंगमावर सुस्नात होऊन मनातील भेदांच्या किल्मिषांचा त्याग करून अभ्यासक आपल्या विचारांना विश्वात्मैक्याच्या दिशेने नेतील अशी अभिलाषा आहे.

(डॉ. सदानंद मोरे)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रस्तावना

भूमिका

मानवाच्या इतिहासाकडे पाहिले, तर एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की, मानवाचा इतिहास हा जीवसृष्टीतील इतर प्राण्यांप्रमाणे केवळ शरीराच्या आकारमानातील एकंदर बदलांचा नाहीय. तसेच हा इतिहास रहिवास आणि त्या रहिवासातील वनस्पती, प्राण्यांमधील सादप्रतिसादाचा किंवा वृद्धी विनाशाचा नाहीय. मानव निसर्गाचा एक घटक असला तरीही विचार आणि विचारांवर आधारित असलेले त्याचे वर्तन आणि त्या वर्तनातील परिवर्तन हे त्याच्या एकंदर अस्तित्वाचे वैशिष्ट्य आहे. इतर कुठल्याही प्राण्यांमध्ये अशा प्रकारचे विचार वा विचारांवर आधारित प्रतिसाद देण्याचे कार्य घडत असेल, असे वाटत नाही. माणूस आणि विचारांवर आधारित वर्तन यांच्यामध्ये एक अविभाज्य असे नाते आहे. पूर्णपणे सजग आयुष्य जगण्याचा प्रयत्न करणे, भोवतालामधील घटनांकडे सूक्ष्म दृष्टीने पाहणे, त्यातून काही शिकत व त्याला प्रतिसाद देत जगणे हे मानवाच्या जगण्याचे वैशिष्ट्य आहे. या जगण्यामध्ये केवळ अवलोकन, शिक्षण वा प्रतिसाद एवढ्याच गोष्टी असतात, असे मात्र नाही. निसर्ग व त्या अनुषंगाने असणारा भोवताल हा अनुकूल, प्रतिकूल अशा अनेक घटनांनी भरलेला असतो. त्यात पूर्ण जीवसृष्टीतील सर्व घटकांना प्रतिसाद देत स्वतःचे समायोजन करावे लागते. अशा अनेकविध इष्ट-अनिष्ट घटनांचे सूक्ष्म निरीक्षण मानवाच्या अभ्यासाला कारणीभूत ठरले असावे, हे नक्की! त्यातून मानवाच्या विचारांना अनेकविध आयाम लाभले असले तरीही सुनिश्चित अशी दिशाही लाभली आहे. इतर प्राण्यांच्या प्रतिसादामध्ये वैचारिकता अंशत: भासत असली तरीही मानवाइतकी ती सुस्पष्ट वा प्रगल्भ नाही. सविचार प्रतिसाद हे जीवनसृष्टीमध्ये केवळ प्रगत असलेल्या मानवाचे लक्षण आहे. जीवसृष्टीतील एकंदर उत्क्रांती ही मानवाच्या वैचारिक क्षमतेला केंद्रस्थानी ठेवून गणली जाते. ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल याने अगदी सुस्पष्टपणे 'मानव हा परिपूर्ण असल्याने इतर

प्राण्यांच्या अभ्यासाची तुलना त्याच्याशी करणे योग्य आहे,' असे म्हटले आहे. एवढेच काय; पण मानवाच्या समग्र अभ्यासासाठी 'मानवशास्त्र'[१] (Anthropology) ही संज्ञा वापरणारा तो पहिलाच विचारवंत होता. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये मानवशास्त्राचा अभ्यास तसा खिस्तपूर्व एक हजार वर्षे हॅनो याने सुरू केला आणि नंतर आलेल्या हेरोडोटस किंवा हिप्पोक्रेटिसने यामध्ये भर घातली. असे असले तरीही मानवशास्त्राविषयी ॲरिस्टॉटलपासून शास्त्रशुद्ध विचारमंथन सुरू झाले असे म्हणता येईल.

तरीही भोवतालातील एकंदर घटना आणि त्यापासून मिळणारी माहिती यामुळे मानवात मन, बुद्धी आणि चित्त यांचा विकास केव्हा झाला काही सांगता येणार नाही. आधुनिक विज्ञान कदाचित अशा प्रकारच्या प्रश्नांना निरर्थक म्हणून बाजूला सारेल. केवळ शारीरिक विशेषतः मेंदूचा विकास आणि नैसर्गिक समायोजनामध्ये मानवाचा प्रतिसाद या दोन गोष्टी विज्ञानाला महत्त्वाच्या वाटू शकतात; पण मनुष्याने सातत्याने सजग राहून संवेदना ग्रहण करणे, त्यावर चिंतन करून त्यांचा अर्थ लावणे, आपल्याकडच्या संग्रहित माहितीचे रूपांतरण ज्ञानात करणे आणि संभाव्य घटनेस प्रतिसाद देण्यासाठी बौद्धिक ज्ञानाधिष्ठित तयारी करणे या सरल प्रक्रियांमधून मनुष्याच्या चेतनेमध्ये मन, बुद्धी आणि चित्त यांचा विकास झाला असल्याचे नाकारता येत नाही. तशी विज्ञानाने अजून चित्ताला स्वीकृती दिली नाही, हा भाग वेगळा! मानवशास्त्राची म्हणजे मानवाच्या एकंदर अस्तित्वाच्या अभ्यासाची व्याप्ती तशी खूप मोठी आहे. पण कोणत्याही एका शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात झाली की. मग त्याचा उगम, इतिहास, व्याख्या, ध्येय वगैरे गोष्टींवर चर्चा सुरू होते. सुरुवातीला असे असले तरीही पुढे अभ्यासाची व्याप्ती वाढल्यानंतर त्याच्या उपशाखांची संख्या वाढते आणि काही कालांतराने या उपशाखा स्वतंत्र शास्त्र असल्याप्रमाणे स्वत:चे अस्तित्व सिद्ध करतात. मानवशास्त्राच्या अगदी सुरुवातीच्या काळात पुरातत्वविद्या, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र वगैरे अनेक उपशाखा स्वतंत्र शाखा म्हणून उदयाला आल्या. या सगळ्या शाखांचा अभ्यास मानव्यविद्या या नव्या मथळ्याखाली सुरू झालेला दिसतो.

या सगळ्या गोष्टींचा विचार करता भारतामध्ये अशा प्रकारचा मानवकेंद्रित अभ्यास बऱ्याच आधी सुरू झालेला होता, असे समजायला हरकत नाही. अगदीच सांगायचे झाले, तर मानवाच्या इतिहासामध्ये ख्रिस्तपूर्व काही सहस्त्रक वर्षे आधी वैदिक कालखंडामध्ये

---

१. 'मानवशास्त्र' या शास्त्राची निर्मिती मानवाच्या क्रियाशीलतेचा अभ्यास करण्यासाठी झाली. मानववंशशास्त्र अशी संज्ञा प्रथमत: डॉ. इरावती कर्वे यांनी रूढ केली. पुढे शास्त्र अभ्यासाच्या संकोचातून बाकीची शास्त्रे बाहेर पडली. मानसशास्त्रादी शास्त्रे स्वतंत्र शास्त्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. (संदर्भ : प्रस्तावना, भौतिकी मानवशास्त्र, लेखक प्रा. वि. श्री. कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८३)

वैदिक तत्त्वज्ञांनी मन आणि मानवी वर्तन यांचा विविधांगांनी अभ्यास केला होता, हे अगदी स्पष्ट आहे. मानवी मनाच्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्था असतात, त्या अवस्थांमधून त्याचे कार्य चालते.

देहाला अन्नाची व अनुकूल वातावरणाची गरज असते, तशीच मनालाही असते. मनाचा विकास म्हणजे जीवनाचा विकास हे वेदांमध्ये म्हटलेले आहे. त्या तुलनेत सामान्य आणि अपसामान्य अशा वर्तनांचा भारतीयांनी विचार केला होता, हे अगदी नक्की! मानवशास्त्राच्या बाबतीत बोलायचे झाले, तर भारतीय तत्त्वज्ञांनी मनुष्याच्या केवळ भोवतालाचाच विचार केला होता असे नव्हे, तर मनुष्याचे स्व-तंत्र व्यक्तित्व, त्याची शरीररचना आणि क्रियाशारीर, समाजमानस, लैंगिकता, अशा अनेकविध विचारांनी अभ्यास मांडला होता. उपनिषदांचा काळ हा तसा अजूनच प्रगल्भ होता. काळ असा शब्द वापरण्याचे कारण इतकेच की, उपनिषदांचा कर्ता कुणी एक नाही. ती एक विचारधारा आहे. ज्या विचारधारेवर केवळ कुणा एका मनुष्याचे वा त्याची विचारधारा मानणाऱ्यांचे जीवन परिपुष्ट होते असे नव्हे, तर संपूर्ण समाजावर त्याचे इप्सित परिणाम झाल्याचे दिसून येतात. उपनिषदांमध्ये भारतीय उपखंडातील मानवी विचारांचे प्रगत दर्शन घडून येते. शरीरासाठी आवश्यक घटक कोणते, अन्नमय, प्राणमयादी कोष, मानवाच्या भावभावना, मते, बुद्धी, सवयी, कौशल्य, ज्ञानविद्यादी गोष्टींवर प्रदीर्घ चर्चाही उपनिषदांमध्ये आढळते. दार्शनिकांचा काळ सुरू झाला, तसे या विचारांना अधिक मूल्य प्राप्त होत गेले, हे अगदी स्पष्ट आहे.

एकंदर जागतिक स्तरावरचा विचार करता मानवाच्या इतिहासामध्ये अशा प्रकारचा ऊहापोह अगदी प्राचीन काळापासून सुरू झाला होता, हे अधोरेखित आहे. त्यात आजच्या सन्मान्य प्रमाणानसार तरी भारतीय उपखंड हा सर्वात प्राचीन अशा विचारधारेचा दिसून येतो. भारतीय विचारखंडातील या विचारदर्शनाकडे पाहता आजमितीला मानवाविषयी सखोल चिंतन मांडणारी दुसरी कोणतीही विचारधारा या तुलनेत प्राचीन नाही, हे स्पष्ट आहे. अर्वाचीन काळात पाश्चात्त्यांनी उभे केलेले विचारविश्व हे केवळ वैचारिक विश्वालाच संपन्न करणारे राहिले नाही, तर त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भले मोठे परिवर्तन घडून आले. एकंदरच मानव प्रजात ही इतर जीवनसृष्टीच्या तुलनेत केवळ शारीरिक स्तरावरच नव्हे, तर वैचारिक स्तर, मानस स्तर या स्तरावरही उत्क्रांत झालेली दिसते. ज्याचा परिपाक म्हणून भाषा, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, इतिहास, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, खगोलशास्त्र अशा अनेक स्तरांवर मनुष्य सृष्टीमध्ये स्वतःचे अस्तित्व सिद्ध करून आहे. दुसऱ्या बाजूने पाहता संघर्ष, कलह, स्पर्धा, युद्धे, अशांतता, आक्रमण, अनारोग्य, अस्वास्थ्य या गोष्टी केवळ मानवामध्ये अनैसर्गिक रीतीने वाढलेल्या दिसून येतात. मानवाच्या आकांक्षांना आता सीमा राहिली नाही, अशी स्थिती झालेली दिसते. आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी मानवाचे पाऊल पृथ्वीबाहेर केव्हाच पडले आहे.

मानवी जीवन व्यवहाराचे हे सारे पैलू आहेत. याला आधुनिक विज्ञानाने सहमती दर्शवली आहे. उत्क्रांती तत्त्वांमध्ये हे सारे घडत गेले आणि मानवशास्त्रही त्यासोबतच विकसित होत गेले असे साधारणपणे दिसून येते. नाही तरी जगातील सारी मानवविचारकेंद्री शास्त्रे, दर्शने आणि विज्ञाने ही एक रात्रीतील शोधाची परिणती नव्हे. उत्क्रांतीच्या कुठल्याशा टप्प्याला केवळ मानवाचाच मेंदू अशा प्रकारे उन्नत का होऊ शकला, इतर जीवांचा का नाही? हे कुणी सांगू शकणार नाही. हे सारे मानवाच्या मेंदूचे कर्तृत्व आहे. मानवी मेंदूतील सेरेब्रल कॉर्टेक्स हा सर्वात उत्क्रांत भाग मानला जातो. मानवाच्या मानव प्रजाती म्हणून केल्या गेलेल्या सर्व उत्क्रांत कार्यांमध्ये या सेरेब्रल कॉर्टेक्सचा सहभाग सर्वात जास्त असतो. मानवाच्या मेंदूतील काही केंद्रे आणि प्रीफॉन्टल कॉर्टेक्स एकमेकांकडे संदेश पाठवण्याचे काम करतात. ही दुहेरी संदेशवहनाची कार्यपद्धती असते. मानवी बोधन आणि वर्तन या दोन्हीही क्रिया ही केंद्रे सुसंबद्ध करत असतात. त्यांच्यात एकसूत्रता ठेवतात. माणूस एकाच वेळी अनेक कार्य करू शकण्यामागचे कारण हेच असते. माणसाच्या सर्व शारीरिक क्रिया मेंदू सांभाळत असतो; पण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, हायर फंक्शन्स व एक्झिक्युटिव्ह फंक्शन्स ही मेंदूची कार्ये शास्त्रे व तत्त्वज्ञानाशी संबंधित आहेत. माणसाची जाणीव, भाषा, वाणी, वक्तृत्व, भास, भ्रम या साऱ्या गोष्टी हायर फंक्शन्समध्ये येतात, तर तर्कबुद्धीने विचार करणे, अवधान ठेवणे, कोणत्याही गोष्टींविषयी स्वतःची विचारप्रणाली तयार करणे, अमूर्त विचार करू शकणे, येणाऱ्या घटनांचे भान असणे, त्याबाबत निर्णय घेता येणे, माहिती साठवणे, योग्य वा अयोग्य प्रतिक्रिया होण्यावर नियंत्रण ठेवणे अशा सर्व क्रियांना एक्झिक्युटिव्ह फंक्शन्स म्हणतात. मानवाच्या मेंदूचा, विचाराने उन्नत होण्याचा, विविध शास्त्रे आणि तत्त्वज्ञानाकडे वळण्याचा संबंध तो असा आहे. संपूर्ण जीवसृष्टीमध्ये मानवाच्या मेंदूचे जैवविज्ञान हे जसे उत्क्रांतीच्या सिद्धांतावर सिद्ध करता येते. त्यामुळे आपसुकच शास्त्र आणि तत्त्वज्ञान हे मानवाच्या वाट्याला का, हेही सहज सिद्ध करता येते.

वेदकाळ : नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा उगम

उपलब्ध लेखनाच्या आधारे वेदकाळ मानव जीवनातील चिंतनाचा सर्वात प्राचीन कालखंड होता, असे मानण्यास काही हरकत नाही. वेदकालीन समाज खरेच नीतिशास्त्राची रचना करणारा, त्याचे पालन करणारा वा तत्त्वचिंतन करणारा होता का? अशी शंका अनेकांच्या मनामध्ये येऊ शकते. प्राचीन सभ्यतेचे काही संकेत आपण ऋग्वेदासारख्या सर्वात प्राचीन ग्रंथात पाहू शकतो. त्यातील काही मोजके उल्लेख पाहता आपण तत्कालीन समाज हा वैचारिकदृष्ट्या एका टप्प्याला पोहोचला होता, हे जाणून घेऊ शकतो. वेदकाळात असलेले अनेक उल्लेख म्हणजे कवच, लोखंडी द्वार, सोने वा लोहाची नाणी, सुसज्ज सेना, ढाल-तलवार, कारावास, हातकड्या, शंभर वल्ह्या असलेली नौका, लोखंडी पाय,

आंधळ्यास मिळू शकणारी दृष्टी, जुगार, शारीरिक संबंध वा व्यभिचार, कन्येस अलंकृत करणे, लाकडी पेटी, चाबूक, लगाम, अंकुश, सुई, कोष्टी, कुंभार, रथकार, सोनार, शेतकरी, तलावातील पाणी शिंपणे, नांगरादी उल्लेख तत्कालीन समाज आणि सामाजिक व्यवस्था व नैतिकतेची साधारण कल्पना देतात. या साऱ्या गोष्टींवरून वेदकालीन लोकव्यवहार व नीतीचे दर्शन होतेच. बहुधा प्रारंभीच्या कालखंडामध्ये सामाजिक स्तरावर नैतिकता जपण्यासाठी आणि नैसर्गिक शक्तीसामर्थ्यांसमोर नतमस्तक होण्यासाठीच देवता आणि त्यांचे पूजन अशी संकल्पना आली असावी. सत्य समाजामध्ये नांदावे, असत्य दूर व्हावे, छळकपटापासून सुटका व्हावी, प्रामाणिकपणे लोकव्यवहार व्हावेत, न्याय्य मार्गाचा अवलंब करून वर्तन असावे, समाज आणि विशेषतः राजा सद्गुणी असावा, हा त्यामागचा हेतू होता, हे अनेकदा स्पष्ट दिसून येते. मॅक्डोनाल्डने आपल्या 'वेदिक मायथॉलॉजी' या पुस्तकामध्ये अगदी स्पष्टच उल्लेख केला आहे की, 'सर्व वैदिक देवांचे शील व स्वभाव नीतिमय आहे. त्यांच्या अंगी सत्यत्व आणि कपट वा छद्माचा अभाव दाखविला आहे व ते प्रामाणिकपणा व न्यायपरायणता या सद्गुणांचे मित्र व पुरस्कर्ते असे वर्णिले आहेत[२]. अर्थात, असे असले तरीही वेद हे काही इतिहास ग्रंथ नव्हेत, तसेच वेदांतील देवतांची नावे म्हणजे कुणा व्यक्तीची नावे नव्हेत. मॅक्डोनॉल्डने 'वेदिक इंडेक्स मध्ये दिलेल्या सर्व पदांचे व वैदिक इतिहासाचे निराकरण करण्यात आलेले आहे. वेदांमध्ये जी नावे आहेत ती व्यक्तिविशेषांची नसून यौगिक पदे आहेत, हे स्वामी दयानंद सरस्वतींनी म्हटले आहे.

विशुद्ध ज्ञानाचा शोध घेण्याची अभीप्सा ही मानवाच्या चिंतनास कारणीभूत ठरली, असे समजण्यास काहीच हरकत नाही. समाज स्तरावर माणसाचे जीवन सुरू झाल्यानंतर खरे तर व्यक्तीसोबतच समाजाचा उत्कर्ष साधण्यासाठी नैतिकतेची आवश्यकता तेव्हाच्या मानवास पडली नसती तर नवल! त्यातूनच बहुधा समष्टीच्या शांतीची अर्थात विश्वकल्याणाची संकल्पना पुढे आली असावी. सारे काही ज्ञानरूप आहे, त्या ज्ञानरूपातूनच विश्व निर्माण झाले असावे आणि त्यातील सर्वोच्च शक्तीसोबत मानवाचे जीवन व्यतीत होताना मानवाने त्याच्याशी समर्पित राहिले पाहिजे या संकल्पनेतून साधना पद्धती विकसित झाली असावी. या साधनापद्धतीत मिळालेल्या असीम शांततेला विश्वकल्याणार्थ बनवण्यासाठी वेदांची निर्मिती झाली हे समजायला हरकत नाही. कारण वेदांतील कुठल्याही ऋचेचा कर्ता हा कर्ता नाहीय, तो द्रष्टा आहे. त्याने अनुभूत ज्ञानाला छंदबद्ध करण्याचे काम केलेले आहे; पण त्याला सत्य प्रकटनाचे वा ज्ञानस्वरूपाच्या अनुभूतीस विश्वकल्याणार्थ बनवण्याचे श्रेयही नको, इतका तो समर्पित असतो. 'ज्ञान असा प्रकाश आहे, जो मानवाच्या मन आणि मस्तिष्क

---

२. The Character of the Vedicgods is also moral. All the gods are 'true', 'not deceitful', being throughout the best friends and guardians of honesty and righteousness' (vedic mythology)

यांच्यातील अंधार नष्ट करतो, परमेश्वराने सृष्टीच्या आरंभी मानवाला मार्गदर्शन करण्यासाठी व त्याच्या कल्याणासाठी जो ज्ञानाचा प्रकाश दिलेला आहे, त्याचे नाव 'वेद' आहे.'[३] वेदांचा अर्थ ज्ञान आहे, हे स्पष्टच आहे. वेदांमध्ये ज्ञान आणि भाषा दोन्हीही आहेत. ईश्वराने केवळ ज्ञान दिले नाही, तर ते व्यक्त करण्याची भाषाही दिली आहे. कोणतीही भाषा विचारांशिवाय राहू शकणार नाही, तसेच विचारही भाषेखेरीज व्यक्त करता येणार नाही. मनात उत्पन्न होणारे विचार हे वाक्यस्वरूपाने भाषेत येतात. त्यामुळे मनुष्याला प्राप्त झालेल्या साधनोत्तर ज्ञानाचे भाषिक अवतरण म्हणून वेदांतील ऋचा मानल्या जातात. त्यासाठीच त्याचे कर्ते स्वतःला द्रष्टे मानतात. इतर माणसे अशा द्रष्ट्या ऋषींच्या अंत:करणात प्रविष्ट झालेल्या सत्याला जाणून घेतात आणि त्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत करतात[४], त्या सत्याची अनुभूती घेतात आणि इतरांपर्यंतही ही वेदांची भाषा अर्थात ज्ञान घेऊन जाण्याचे कार्य अर्थात् विश्वकल्याणार्थ कार्य करतात. ही वैदिक जीवनपद्धती आहे. त्याप्रमाणे व्यतीत केलेले जीवनही ज्ञानरूपात[५] परिणत होते, हा दृढ विश्वास आहे. मनुष्य जे ज्ञान प्राप्त करतो ते काळाने परिच्छिन्न असते; पण ईश्वर हा काळाच्या परिसीमेत येत नाही, तो ज्ञानाचा भांडार आहे, अर्थात, ज्ञानरूपच आहे. म्हणून ही ज्ञानसाधना ईश्वराशी म्हणजे सत् तत्त्वाशी अर्थात ज्ञानाशीच एकात्म होते.

वेदांपासून ही ज्ञानसाधना सुरू झाली ती पुढे एकेक टप्प्यावर प्रगल्भ होत गेली असे म्हणावे लागते. ऋग्वेद हे तसे विज्ञानकांड आहे. विज्ञानात गुण आणि गुणीचे वर्णन आणि विश्लेषण असते. जो गुणी व गुणीच्या ज्ञानाचे वर्णन करतो तो ऋक् आहे. ऋग्वेदाचे नाव तसे सार्थ आहे. यजुर्वेद कर्मप्रधान आहे. त्याचा अर्थ देवपूजा, संगतीकरण व दान असा आहे. अर्थात्, हे सारे क्रियात्मक बाबींचे विवेचन आहे. सामवेद तसे उपासनात्मक आहे. सा सर्वशक्ती परमेश्वर आहे आणि अम जीव आहे, त्या दोन्हींचे एकत्रीकरण तो साम आहे. हे समन्वयात्मक नाम आहे. अथर्ववेद ज्ञानकांड आहे. अथ अर्वाङ् अथर्वन् असे हे पद आहे. अर्थात जगातील पदार्थांमध्ये त्या ईश्वराची सत्ता वा वस्तुतत्त्व शोधल्यामुळे हा अथर्व आहे. अर्थात, या साऱ्या रचना अत्यंत विचारपूर्वक व सार्थ केलेल्या आहेत हे नक्की! मुळात वेद शब्द महत्त्वाचा आहे. 'वेद पद व्याकरणाने ज्ञानार्थक विद् धातू, लाभार्थक विद् धातू व सत्तात्मक विद् धातूने बनलेला आहे. त्यामुळे वेद हे ज्ञान आहे. ज्यामुळे श्रेष्ठ लाभ

---

३. ऋग्वेद प्रस्तावना, आचार्य वैजनाथ शास्त्री, अनुवादभाष्य : सौ. सविता ब. जोशी, प्रकाशक : आर्य समाज

४. 'यज्ञेन वाचः पदवीयमायन्तामन्वविन्दन्नृषिषु प्रविष्टाम् ।
तामाभृत्या व्यदधुः पुरुत्रा तां सप्त रेभा अभि सं नवन्ते ।। (ऋग्वेद १०/७१/३)

५. 'परिणामाची पराकाष्ठा आकाशात परिसमाप्त होते, त्याचप्रमाणे ज्ञानाची पराकाष्ठा एकमात्र सर्वज्ञ ईश्वरामध्ये समाप्त होते.'

होतोच, शिवाय त्याच्या विचाराने सत्ता स्थित होते. ज्ञानात विद्या प्राप्ती होते, लाभात धर्म, अर्थ, काम, मोक्ष येतात. विचार हा विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक व प्रेक्षात्मक असतो. सत्ता पदाने ईश्वर, जीव व प्रकृतीचा बोध होतो. ते वेदवर्णित आहेत. अनेक मंत्रदेवतांच्या रूपात त्यांचे व जगाचे वर्णन आहे. वेद ज्ञानाचे, मानव विचारांचे, जीवनाच्या महान प्राप्तीचे. सत्ताविषयकचे हे पद अर्थ मख्य वाच्य आहेत.[६]

थोडक्यात सांगायचे झाले तर वेद मानवाच्या जीवनाला काही आकार देऊ पाहतात. वेद हे ज्ञानरूप आहेत; पण केवळ ज्ञान आहे असे म्हणून होत नाही. कारण त्या ज्ञानाचा काही लाभ मानवास झाला पाहिजे आणि तोही चिरंतन लाभ झाला पाहिजे ही वेदांची इच्छा आहे. त्यासाठी त्या ज्ञानाचा अवलंब करून मानवी जीवनामध्ये वेद काही घडवू पाहत आहेत. पशुतुल्य अवस्थेपासून एका उन्नत जीवाच्या अवस्थेपर्यंत त्याची स्थिती जावी आणि आपण त्या पूर्णज्ञानाचा एक घटक आहोत, या दृढ भावनेने त्याच्या चित्तात रूपांतरण होऊन त्याने आपण पूर्ण असल्याची निरपेक्ष अनुभूती घ्यावी, अशी योजना आहे. म्हणून वेद मनुष्यास केवळ ज्ञान देत नाहीत, तर त्या ज्ञानाचा लाभ नेमका कसा होतो हेही स्पष्ट करतात. लाभ हे चारी पुरुषार्थाच्या आचरणाने येतात. वेदांतील ज्ञानाने बुद्धी प्रशिक्षित होते. निश्चयात्मक ज्ञानाने विवेक प्राप्त होतो. धर्मविचार हे बुद्धीसाठी आहेत. बुद्धी प्रशिक्षित झाली की, ती योग्य ते निर्णय घेऊ शकते. अर्थज्ञान व्यवहारासाठी असते. अर्थव्यवहार व्यवस्थित असले म्हणजे जीवन जगणे सुकर होते. सर्व गरजा भागवता येतात. म्हणून अर्थज्ञान हवे. काम देहाच्या गरजा पूर्ण करतात. भोग्य काय आणि अभोग्य काय हे कामाच्या ज्ञानाने समजते. म्हणून तेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि अशा पद्धतीने जीवनपद्धती ठेवली की, जीवास मोक्ष प्राप्त होतो. कारण ज्ञानविचार हे सत्ता स्थित होण्यास मदत करतात. सत्ता या पदाने ईश्वर म्हणजे काय, जीव म्हणजे काय आणि प्रकृती म्हणजे काय यांचा बोध होतो. अशाश्वत काय हे एकदा समजले की, शाश्वत स्थितीमध्ये साधक स्थिर होऊ लागतो. सत् तत्त्वाचे अंतरंगात स्थिर होणे म्हणजे सत्ता स्थिर होणे. म्हणून वेद सद्विद्येचा मूळ स्रोत आहे, अशी धारणा आहे.

पुरुषार्थाचे मानवी जीवनात मूल्य काय आहे. हे आपण पाहिले. पण केवळ एवढ्या विवेचनावर सर्व काही होते असे नाही. प्रत्यक्ष कृतीशिवाय काहीही होणे शक्य नाही. वेद कर्मवादी आहेत ते असे आहेत. म्हणून ज्ञान केवळ बाह्य वर्तनाचे, व्यवहाराचे किंवा नैतिकतेचे असते असे नाही, तर या शास्त्रांचा अभ्यास केल्याने जे ज्ञान प्राप्त होते त्यातून सद्विचारांची निर्मिती होते. त्याचे प्रयोजन केवळ धर्म, अर्थ, काम नव्हे तर मोक्षात आहे. पण आपल्याकडे सहसा शास्त्रांची उपेक्षा केली जाते. वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे,

---

६. ऋग्वेद प्रस्तावना, आचार्य वैजनाथ शास्त्री, अनुवादभाष्य : सौ. सविता ब. जोशी, प्रकाशक : आर्य समाज

वेदांगे, षड्दर्शने ही विचारांना एक उन्नत स्वरूप देत राहतात. त्यासाठी शास्त्रांचे अध्ययन आवश्यक मानले आहे. त्यामुळे वेद हे ज्ञान आहे, त्याच्या अध्यययाने श्रेष्ठ लाभ होतोच; पण केवळ धर्म, अर्थादी गोष्टींवर हे थांबत नाही. त्या ज्ञानाच्या विचाराने... ज्ञानात विद्या प्राप्ती झाल्यानंतर चिंतनाने सत्ता स्थित होते. कारण विचार हा विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक व प्रेक्षात्मक असतो. हे समजून घेतल्याशिवाय विद्येचे काय करायचे हे उलगडत नाही. कारण अर्थ, कामाच्या ज्ञानातून माणसाच्या गरजा पूर्ण होतात. धर्म विवेकज्ञान देईल, असे असताना पुनश्च ज्ञानविचार का? असा प्रश्न पडू शकतो; पण वेदद्रष्ट्या ऋषींनी वेदांना प्रसवले आहे. ते केवळ भौतिक स्तरावरच्या उन्नतीसाठी नव्हे, तर पारमार्थिक स्तरावरचे सर्वोच्च ध्येय त्या ज्ञानरूपाशी तादात्म्य प्राप्त करण्याचे आहे. म्हणून ज्ञानावर चिंतन आवश्यक आहे. भौतिक जगण्यातील ज्ञान हे पूर्वसुरींच्या आप्तांच्या आचरणातून प्राप्त होऊ शकते; पण मोक्षविषयक ज्ञानासाठी अर्थात अदृष्ट गोष्टींच्या विवेचनार्थ चिंतन आवश्यक आहे. कारण ते मोक्षज्ञानाचे विश्लेषण करते. त्यामळे नेमके मोक्ष कशाला म्हणायचे आणि तो कसा साधायचा हे समजते. त्याचे संश्लेषणही होते. कारण एकदा विश्लेषण झाले की, चित्त त्याप्रमाणे आकार धारण करू लागते आणि ते प्रेक्षात्मक असते म्हणजे विचारपूर्वक कृती केल्यास आकार धारण करू देणारे असते. त्यासाठी शास्त्राचे अध्ययन अत्यंत आवश्यक असते, असे शास्त्रकारांचे मत आहे. नवव्या, दहाव्या शतकात आलेल्या 'न्यायमंजरी'कार जयंत भट्टांनी तर 'शास्त्रानामवश्याध्येयत्वम्'[७] असे सांगून शास्त्राच्या अध्ययनाचे महत्त्व आपल्या वृत्तीत वर्णिलेले आहे. प्रत्येक शब्दाचे वा विधानाचे अगदी सरळ सरळ अर्थ तर असू शकत नाहीत. त्यातील अपरोक्ष ज्ञान[८] काय आहे हे चिंतनाने उलगडते आणि मगच साधकाला सत्याच्या दिशेने जाता येते, असे शास्त्राध्ययनाचे महत्त्व आहे. अर्थात, वेदद्रष्ट्या ऋषींनी हे सारे मानवाच्या केवळ अध्ययनार्थ केले नसून त्यास धर्मधारणा होऊन निःश्रेयस प्राप्त व्हावे यासाठी केलेले आहे.

वेदांचा हा कालखंड मानवाच्या चिंतनशीलतेची पहाट असतानाचा असला तरीही प्रगल्भ आहे. त्यामुळे वेद प्रसवापूर्वीचा अभ्यासक ऋषींचा सुप्त निशाकाल हा अशा विश्वकल्याणार्थ ज्ञानाच्या सर्जनशीलतेला पोषक असावा हे आपसूक सिद्ध होते. त्या निशाकालात अज्ञानाच्या तमात चाचपडताना सत्याचा उन्मेष चिंतनशील ऋषींना साधनेत कुठेतरी भासला असावा. साधनोत्तर त्याचे प्राथमिक स्तरावरचे दर्शनच त्यांना द्रष्टेपणा

---

७. (शास्त्रानामवश्याध्येयत्वम्) इह प्रेक्षापूर्वकारिणः पुरुषार्थसंपदमभिवाञ्छन्तः तत्साधनाधिगमोपायमन्तरेण तदवाप्तिममन्यमानाः तदुपायवगमनिमित्तमेव प्रथममन्वेषन्ते।... तस्मादस्मदादेः शास्त्रमेवाधिगन्तव्यम्। (शास्त्रविमर्शः, जयंतभट्टकृत न्यायमंजरी)

८. अनेक संशयोच्छेदि परोक्षार्थस्य दर्शकम्। सर्वस्य लोचनं शास्त्रं यस्य नास्त्यन्ध एव सः॥

देऊन गेले आणि मानवाच्या जगण्याला त्या नवोन्मेषाचा आकार देण्यासाठी त्यांनी वेदज्ञान प्रसवले असे समजायला हरकत नाही.

वेदातील सूक्तांचा आणि त्यात प्रकट विचारांचा एकंदर सारांश असा सांगता येईल की, वेदांमध्ये मानवाला केंद्रीभूत ठेवून सारे काही रचलेले आहे. मानवाच्या कल्याणासाठीच हे सारे आहे. याला आपण मानववंशशास्त्रीय विचारांची रचना म्हणू शकतो. त्याबरोबरच ईश्वर किंवा ज्ञानतत्त्व म्हणजे काय असे विश्वरचनावादी प्रश्नही वेदाने उपस्थित केलेले आहेत. वेदातील तत्त्वज्ञान तसे एकत्ववादी (Monism) आहे. ऋग्वेदाच्या १० मंडलातील १२९ वे सूक्त... नासदीय सूक्त याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करते. विश्वांतर्गत असलेल्या व्यवस्थेला ऋत् अशी संज्ञा वेदांमध्ये आहे. या ऋतातूनच सारे पुढचे व्यवस्थापन होते म्हणून नैतिकतेचा पहिला आधार सत्यास मानले आहे. सत्य, परोपकार, विश्वप्रेम, मैत्री, शौर्य, मार्दवादी गुणांचा अंगीकार व्यक्तीने करून समाजात वर्तन ठेवावे आणि ऋताच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग ठेवावा, अशी नैतिक आणि तात्त्विक जगण्याची संकल्पना आहे. याचा अर्थ मानववंशशास्त्रीय वा विश्वरचनावादी तत्त्वचिंतनासोबतच नीतितत्त्वज्ञानावरही मंथन सुरू झाल्याचे लक्षात येते. कदाचित हा काळ फारच प्राचीन असल्याने तत्कालीन नैतिक संकल्पना कालबाह्य झाल्या असे वाटत असले तरीही आधुनिक नैतिक मूल्यांशी त्यांची तुलना करता ते कालबाह्य नाहीत, हे लक्षात येते.

वेदांच्या उत्तरकाळामध्ये पुनश्च एकवार देवतावादांचा काळ सुरू झाल्यानंतर धार्मिक कर्मवादाने जोर धरला, तेव्हा धर्मविषयक विचारांना जास्त प्राधान्य दिल्याचे लक्षात येते. यज्ञकालखंडामध्ये विष्णू देवता विशेष प्रचलित आणि पूजनीय असल्याचे लक्षात येते. यज्ञो वै विष्णू... यज्ञ वा कर्म करणे हेच विष्णूचे स्वरूप मानले जाऊ लागले. ऋग्वेदकाळातील निसर्गशक्तींना देवतास्वरूप मानून उपासना करण्याच्या पद्धतीमुळे ऋषींच्या वृत्तीचे बहिर्मुख होणे स्वाभाविक होते; पण ब्राह्मणकालखंडामध्ये ती वृत्ती स्वतःच्या उपासनेच्या कर्मावर स्थिर झाली. ती जशी जशी अंतर्मुख होऊ लागली तसतशी उपनिषदांच्या वैचारिकतेकडे झुकू लागली, असे दिसते. यज्ञीय कर्मे ही बाह्यतः केली जात असली तरीही जी जिच्यासाठी केली जातात ती विश्वशक्ती मूलाधार आहे, हे लक्षात येऊ लागले आणि या विश्वशक्तीरूप परब्रह्माच्या शोधासाठी उपनिषदांचे विचारमंथन सुरू झाले. साधारण इसवीसनाच्या दीड-दोन हजार वर्षे आधी औपनिषदिक विचारांनी जोम धरलेला दिसून येतो. उपनिषदांच्या कालखंडाला विशुद्ध तत्त्वचिंतनाचा कालखंड म्हणावा असे ते आहे. तेव्हापासून उपनिषदांच्या आधीच्या कालखंडातील क्रियांना कर्मकांड आणि उपनिषदरूपी चिंतनाला ज्ञानकांड संबोधण्याची रीत सुरू झाली. उपनिषदांच्या अमृतधारांनी कर्मकांडांचा निषेध केला नाही. केवळ ज्ञानाशिवाय कर्मात परिपूर्णता नाही, हे सांगण्याचा मार्ग अवलंबल्याचे दिसून येते. उपनिषदांनी ज्ञानाची महती गायलेली आहे; पण हे ज्ञान बुद्धिगम्य नाही, हे

स्वानुभवगम्य आहे, स्वानुभूतिजन्य आहे. अर्थात कृतीचे मूल्यही आपसुकच अधोरेखित झाले. ज्ञान कर्म कृतार्थ करणारे ठरले. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, बृहदारण्य, तैत्तिरीय, ऐतरेय वगैरे उपनिषदांतून व्यक्ती, त्याचे भोग, कर्म, आत्मतत्त्व, परतत्त्व वा परमात्मतत्त्व, ब्रह्म, परब्रह्म, अपरब्रह्म, ब्रह्मात्म्यैक्य, मोक्ष वगैरे अनेक गोष्टींवर संवादरूपाने चर्चा आहे. संवादरूपाने चर्चा करण्याची औपनिषदिक रीत काय आणि पाश्चात्य तत्त्ववेत्ता प्लेटो याने लिहिलेली डॉयलॉगची रीत काय तशी सत्याच्या अन्वेषणासाठी आकलनसुलभ व जिज्ञासा तप्त करणारी वाटते. एकंदर मोक्ष वा निःश्रेयस वा अमृतत्त्व प्राप्ती हेच मानवाचे श्रेयस आहे. त्यासाठी प्रेयस वाटणारे जीवन नैतिकपूर्णतेकडे नेणारे जगावे याकडे साधारण उपनिषदांच्या नीतितत्त्वज्ञानाचा व धर्मतत्त्वज्ञानाचा ओढा दिसतो.

उपनिषदांचा कालखंड संपल्यानंतर साधारणपणे इसवीसन पूर्व एक हजार वर्षे भगवद्गीतेचा कालखंड दिसून येतो. गीता हे सर्व उपनिषदांचे सारतत्त्व आहे. अगदीच सांगायचे झाले तर गीतेची रचनाही औपनिषदिक प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये आहे. गीतेचा रोख मात्र कर्मसिद्धांत समजून घेऊन व्यक्तीने कर्म करताना फलाशा न ठेवता समर्पण बुद्धीने कर्म करून भक्तियुक्त अंत:करणाने ईशसाधना करावी, योगाच्या साहाय्याने इंद्रियांवर जय मिळवून मोक्षसुखाचा लाभ घ्यावा याकडे आहे. गीता मुळातच कर्माच्या निवडीमध्ये संभ्रम झाला म्हणून निर्माण झालेली आहे. गीता ही केवळ तत्त्वज्ञान नव्हे, तर नीतिशास्त्राचे यथोचित पोषण करणारी सर्व उपनिषदरूपी गायींची दुग्धधारा ठरली, जी विश्वातील विचारवंतांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय झाली. गीतेनंतरच्या कालखंडामध्ये विविध स्मृतिग्रंथांचा काळ सुरू झाल्याचे लक्षात येते. समाज आणि सामाजिक रचनेवर जास्त अंकुश ठेवण्यासाठी काही ग्रंथांची निर्मिती केली गेली, असे दिसून येते.

इसवीसनाच्या पाचशे ते तीनशे वर्षांच्या कालखंडामध्ये भारतीय उपखंडातच बौद्ध आणि जैन विचार समाजामध्ये रुजू लागले. पुढे स्वतंत्र धर्म म्हणून त्यांना स्वीकारण्यात आले. बौद्धावतार हा मानवाला त्याच्या दुःखापासून सुटका करण्यासाठी झाला असे मानण्यात येते. दुःख, दुःखाचे कारण, दुःखाचा निरोध आणि दुःखनिरोधाचा मार्ग हा चार आर्यसत्यावर बौद्ध धर्माची मांडणी केली गेली. त्यासाठी वेदविचारांना नाकारण्यात येऊन मनुष्यास केंद्रीभूत करण्यात आले. भगवान महावीर यांनी बुद्धांच्या समकाळातच जैन धर्माचे विचार पुढे आणले. तत्त्वज्ञान आणि व्यवहार या दोन्ही बाबतीत जैन वैदिक धर्माच्या जास्त जवळ आहे. कर्म, कर्माचे फळ, कर्ममूल वासना, वासनामूलक कर्मचक्रातून सुटका होण्यासाठी निर्वासन होणे या साऱ्या गोष्टी वैदिक धर्माप्रमाणेच आहेत. दोन्ही धर्मांच्या अभ्यासाकडे ज्ञानचक्षूने पाहणे गरजेचे आहे.

वैदिक धर्मामध्ये रामायण, महाभारतादी काव्य आणि इतिहासग्रंथांच्या रचनाही नीती आणि तत्त्वज्ञानाच्या पोषकतेसाठी झाल्याचे लक्षात येते. एकंदर सर्व लेखनाचा आणि

तत्त्वचिंतनाचा आकृतिबंध पाहता अगदी सर्वसामान्य माणसालाही आपल्या आयुष्यामध्ये धर्मजीवन कसे जगले पाहिजे, हे समजावे हा त्या मागचा हेतू आहे हे स्पष्ट होते. उपनिषदांच्या ज्ञानसत्राच्या अनुषंगाने षड्दर्शनांची झालेली रचनाही अगदी पूरक आहे. दार्शनिक ऊहापोह करण्यामागचा हेतूही न्यायमंजरीकार जयंत भट्टांच्या हेतूप्रमाणेच आहे. शास्त्रे ही केवळ वाचण्यासाठी वा पठनांसाठी नसतात, त्यांचे आचरण होणे गरजेचे असते. ते होण्यासाठी ते विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक आणि प्रेक्षात्मक आहे, हे समजून त्याचे अध्ययन व्हावे, ही अपेक्षा जागोजागी दिसून येते. उत्तरकाळामध्ये अनेकविध धार्मिक व तत्त्वचिंतनपर ग्रंथाची भर पडली असली. तरीही त्यांचा एकंदर कालखंड आणि विषयांची पुनरावृत्ती झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. महाभारतासारख्या ग्रंथलेखनानंतर एकंदर राजधर्म, राजाची कर्तव्ये, प्रजेची कर्तव्ये अशा अनेक गोष्टींची चर्चा सुरू झाल्याचे लक्षात येते. भीष्मयुधिष्ठीर संवाद वा विदुरनीतीसारखे आचारविचार स्पष्ट करणारे ग्रंथ या काळात निर्माण झाले. राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञान असे अगदीच आधुनिक नाव सुस्पष्टपणे देता येत नसले तरीही त्या दिशेने अनेक ग्रंथकारांचे विचार चालले होते हे लक्षात येते. साधारणपणे इसवीसनपूर्व ३२१ मध्ये झालेल्या चाणक्य अर्थात विष्णू शर्मा यांचे 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' अर्थात राजनीतिशास्त्र हेही तत्कालीन राजकीय आणि सामाजिक विचारवंतांच्या एकंदर मनोभूमीचे सुस्पष्ट दर्शन घडवणारे लेखन आहे. राजनीतिशास्त्र वा राज्यविवेकाची कल्पना भारतीय उपखंडाच्या तुलनेत पाश्चात्त्यांमध्ये मॅकियाव्हेलीनंतर जास्त जाणवते, हे विशेष आहे. एकंदरच मानवाच्या तत्त्वचिंतनाच्या इतिहासामध्ये भारतीय विचारवंताचे योगदान हे अभ्यासनीय आहे, यात शंका नाही. यानंतर पाश्चात्त्यांमध्ये जी तत्त्वविचारांची सुरुवात झाली ती मानवाच्या जगण्याशी केंद्रीभूत झाली, नवविज्ञानाच्या उदयास कारणभूत ठरली. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य तत्त्वचिंतनामधील काही वैशिष्ट्ये ही अगदी लक्षात घेण्यासारखी आहेत. पौर्वात्य अर्थात भारतीय तत्त्वज्ञान हे तत्कालीन मानवाचे लक्ष बाह्य सृष्टीतील विषयांकडे आकृष्ट झाल्याने निर्माण झाले, असे साधारणपणे मानण्यात येते. निसर्गातील विविध शक्तींच्या भयाने मानव प्रथमत: त्यांच्यासमोर नतमस्तक झाला. त्यानंतर त्या शक्तीपासून आपल्याला काही त्रास होऊ नये म्हणून त्यांना पूजण्याची एक परंपरा सुरू झाली.

पुढच्या काही काळानंतर मनुष्याने आपले जीवन त्या ईश्वराच्या वा ज्ञानशक्तीच्या अधीन राहून नैतिकदृष्ट्या व्यतीत केले, तर त्याला नैतिकपूर्णता प्राप्त होऊन त्या ईश्वरी तत्त्वाच्या परम सुखाचा लाभ होऊ शकतो, अशी साधारण दृष्टी होती हे दिसून येते. पुन्हा काही काळानंतर असे सर्वोच्च नैतिक जीवन जगणे म्हणजे धार्मिक जीवन जगणे हेच निःश्रेयस अशी संकल्पना लोकारूढ झाली. पुढे ब्राह्मण काळात बाह्य शक्ती, त्यामागचा ईश्वर यावरून ती कृतिप्रधानतेकडे वळली. यज्ञयाग, पूजापद्धती याकडे धर्मतत्त्वज्ञानाचा सक्रिय कल वाढला. निसर्गातील शक्तीखेरीज सर्वश्रेष्ठ अमूर्त शक्तींना प्राधान्य मिळू लागले. विशेषतः

विष्णू देवता... बहुधा आधी निर्गुण व मग सगुणात आली. 'यज्ञ वै विष्णू....' यज्ञ अर्थात साधनेसाठी कृती करणे म्हणजेच विष्णू अशी ती रूढ झाली. ब्राह्मण काळात अर्थात, यामुळे कर्मवाद वाढला.

पुढे आरण्यकानंतर आलेल्या उपनिषद काळात यातील काही आचरणाला कर्मकांड म्हटले जाऊ लागले हा भाग वेगळा असला तरीही त्यानंतर त्या कृतीचे इष्ट-अनिष्ट परिणाम साधकांवर काय होतात, याची चिकित्सा नक्कीच सुरू झाली असे दिसते. कारण त्यानंतर परमात्म तत्त्व असलेले परब्रह्म, जीव, त्यांचे तादात्म्य यावर विस्तृत चर्चेचा काळ सुरू झाला. निःश्रेयस, श्रेयस आणि प्रेयस यावर चर्चा सुरू झाली, तशी प्रत्येक कृतीमागचे हेतू तपासले जाऊ लागले. त्याचे मनुष्यावर होणारे परिणाम पाहून मन, बुद्धी, चित्त, चेतना, अचेतन, प्राण, अन्न, विज्ञान, आनंद वगैरे संकल्पना सुस्पष्टपणे आकाराला येऊ लागल्या. त्याचा एक इष्ट परिणाम म्हणून अंतरंग साधनेला एक मूल्य आले. केवळ निसर्गातील बाह्य शक्ती आणि त्यामागे उभे असलेले परमात्म तत्त्व ईश्वर वा ज्ञानतत्त्व यावरून सर्वात्मक असलेल्या ज्ञानतत्त्वावर चर्चा व साधना येऊन ठेपली. यातून विश्वात्मक भाव, विश्वकल्याण वगैरे विचारातून एक उत्तम नैतिक सामाजिक जीवन व धार्मिक जीवन कसे असावे, याचा विचार मांडला गेला. हजारो वर्षांच्या काळात रुजत गेलेले विचार आणि त्याप्रमाणे होत असलेले आचार या चाकोऱ्या पक्क्या करीत गेल्या. त्यातून प्रामाण्यवाद, रूढीवाद, कट्टरता, पंथवाद, जातिभेद वगैरे गोष्टी संस्कृतीच्या जतन प्रक्रियेमध्ये जन्माला येत गेल्या, हे खरे असले तरीही यामध्ये विशुद्ध तत्त्वचिंतन मात्र त्यापासून अबाधित राहिले. त्या तत्त्वचिंतनामध्ये या कुठल्याच गोष्टींना थारा मिळाला नाही. धर्मजीवन हे आश्रमव्यवस्थेतील पद्धतीशी निगडित राहिल्याने एकंदर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा विरागशील वा अनासक्तीचा होत गेला. त्यातून नवविचारांच्या बाबतीत काहीशी उपेक्षा आणि अस्वीकार्यता निर्माण झाली. केवळ जगण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वल्प गरजा भागवण्यासाठी उदरनिर्वाहार्थ केलेली कृती वा त्यातून प्राप्त गोष्टींवर ईश्वरदत्त म्हणून श्रद्धा ठेवून केलेली उपजीविका ही सारी विद्वानांची लक्षणे मानली गेली. परिणामी नवविचार आणि जीवन सुलभ व सुखकर जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व कर्मांपासून विद्वानांनी सुटका करून घेतली. भौतिकतेकडे पाठ फिरवल्यामुळे बाह्य जगाची त्या अर्थाने चिकित्सा संपली. त्यामुळे भौतिक विज्ञानातील संभाव्य शोधाकडे जाणारी वाट बंद होत गेली. मध्येच आलेल्या चार्वाक विचारांनी आणि बौद्ध, जैन या नास्तिक दर्शनांनी काही प्रमाणामध्ये मानवाची सुखदुःखे केंद्रस्थानी ठेवून जीवन पराङ्मुख झालेल्या समाजाला या प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला असला तरीही चार्वाक वगळता कुणाचे वैचारिक मूळ फारसे पक्के नव्हते.

बौद्ध आणि जैन हे दोन्हीही संन्यासधर्मावर वैदिकांपेक्षाही जास्त श्रद्धा ठेवून राहिले. किमान यतीधर्म हे वैदिक धर्माच्या आश्रमव्यवस्थेतील विद्वानांच्या निवडीचा अंतिम व

सर्वोच्च टप्पा तरी होता. जैन-बौद्धांत अहिंसेची आत्यंतिकताही होतीच. यमनियमांचे पक्के आचरणकवच सोबतीला होते. त्यामुळे बौद्ध वा जैनांपेक्षा वैदिक धर्म हा जास्त कर्मवादी ठरला. चार्वाकांची परंपरा कितीही भौतिक असली तरीही तिच्या रुजण्याची अपेक्षा करणे अशक्य असावे. कारण चार्वाक विचारांचा अग्निहोत्रादी यागांच्या विरोधासोबतच वेदासारख्या ज्ञानग्रंथालाही विरोध होता. मग भले कारणे काहीही असोत. वास्तविक भौतिक सुखासाठी केल्या जाणाऱ्या पर्जन्ययागासारख्या अनेक क्रियाकर्मात तथ्यांश काय आहे. त्यामुळे मानवाला खरोखरच भौतिक सुखे प्राप्त होऊ शकतील की नाही, यासारख्या अनेक गोष्टींविषयी जडवादी चार्वाक काही करू शकले असते; पण ते न करता सर्वच वैदिक विचारांना चार्वाक विरोध करीत सुटले. द्रष्ट्या ऋषींनी प्रसवलेल्या वेदांना नाकारण्यापलीकडे कुठलेही परिवर्तन चार्वाक करू शकले नाहीत. आपल्या विरोधी विचारांचे रूपांतरण पाश्चात्त्यांप्रमाणे आधुनिक विज्ञानाच्या अभ्यासामध्ये चार्वाकच काय कुणीही करू शकले नाही. वैदिक विचार अर्थात अबाधित राहिले, अभ्यास परंपराही बळकट होत गेली हे खरे असले तरीही चार्वाक विचारांची जडवादी केवळ परंपरा मात्र टिकून राहिली.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान : स्थित्यंतराचा पर्वकाळ

भारतीय उपखंडामध्ये मानवाच्या तत्त्वचिंतनाचे प्रहर सरत असतानाच पाश्चात्त्य तत्त्वविचारांनी मूळ धरल्याचे दिसून येते. सर्वप्रथम ग्रीकांमध्ये अशा विचारांचे मूळ पक्के झाले. ग्रीक विचारवंत थेल्स यांच्यापासून खरे तर तत्त्वचिंतनाला प्रारंभ झाला असे मानण्यात येते; परंतु तत्पूर्वीही काही विचारवंतांनी त्या दिशेकडे निर्देश करणारे लेखन केलेले असू शकते. केवळ उपलब्ध नाही म्हणून नाकारण्यात काही अर्थ नाही. थेल्सची परंपरा कशी, कोणती याबाबतचे विचारमंथन इथे अपेक्षित नाही. अथवा थेल्सच्या विचारसरणीवर नेमके परिणाम कुणाचे? ते केवळ पाश्चात्त्यांचे की पौर्वात्य विचारवंतांचे विचार तिकडेही गेले होते, या चर्चेला किमान तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात खरे तर काही मूल्य नाही. मुळात तत्त्वज्ञान ही मानवाच्या प्रगत होत जाणाऱ्या विचारांची एक अभिव्यक्ती असते. त्यामध्ये ठाम अशी सैद्धांतिक मांडणी नसते. क्वचित असली तरी अशी मांडणी गणित वा आधुनिक विज्ञानातील सिद्धांताप्रमाणे अंतिम नसते. त्याच्या खंडनमंडनाच्या प्रक्रिया चालच असतात. पौर्वात्य दर्शन वा पाश्चात्त्य दर्शन अशी विभिन्न आणि भेदात्मक मांडणी वरकरणी दिसत असली तरीही ती केवळ खंड वा राष्ट्र यांच्यापुरती मर्यादित असते, ती भाषा वा काळ यांनी परिछिन्न असू शकत नाही. त्यावर संपूर्ण मानव जातीचा तेवढाच अधिकार असतो. आपले पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाजूला ठेवून त्याकडे बघणे हे तत्त्वचिंतकाचे काम असते. त्यामुळे परंपरा नेमकी कुठून कुठे गेली, वा तिकडची इकडे कशी आली या चर्चेला किमान विश्वातील तत्त्वचिंतक तरी फारसे महत्त्व देत नाहीत. पाश्चात्त्य तत्त्वविचारांतून आधुनिक विज्ञानाच्या अभ्यासाची आणि

संशोधनाची दारे उघडायला सुरुवात झाली आहे. या कारणाने त्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यानंतर मानवाच्या ऐहिक जगण्यातील प्रश्न सुकर होणे सुरू झाले हे नक्की!

थेल्सपासून साधारणपणे ग्रीक देशामध्ये तत्त्वज्ञानाची परंपरा सुरू झाली, असे मानण्यात येते. प्रारंभी साधारणपणे विश्वरचनावादी तत्त्वविचारांना सुरुवात झाली. विश्वाचा आधार असलेल्या सत् तत्त्वाचे स्वरूप काय असावे, यापासून खरे तर थेल्सने मांडणी केलेली आहे. हे पाहता साधारणपणे विश्वभरातील तत्त्वचिंतकांना सृष्टीचे मूळ काय आहे, सत् तत्त्व आहे की नाही किंवा अंतिम वस्तुमात्र काय आहे, याविषयी साधारण चिकित्सा करण्यात नक्कीच रस होता. थेल्सनंतर आलेला ॲनॅक्झिमीनस वा ॲनॅक्झिमॅन्डर यांनीही विश्वामागे आधारद्रव्य असलेल्या सत् तत्त्वाचे स्वरूप जाणण्याचा प्रयत्न केला आहे.

पाश्चात्त्य विचारवंतांबद्दल एक कौतुकास्पद निरीक्षण असे नोंदवता येईल की, त्यांनी तत्त्वांना जाणण्याचा प्रयत्न बौद्धिक स्तरावर केला. बहुधा असे असल्याने बुद्धिनिष्ठता ही जास्त प्रमाणामध्ये वाढीस लागली. विविध मते आणि मतांतरांचा स्वीकार होऊ लागला व त्याचबरोबर तिकडे तत्त्वज्ञानाच्या उदयानंतर प्राथमिक कालखंडातच विविध विषयांचे असे बीजारोपण झाले की, त्याच्यामुळे विज्ञानाच्या विविध शाखांच्या संशोधनाला मार्ग मिळाला. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर पायथागोरसचे देता येईल. अगदी सुरुवातीला तो धार्मिक तत्त्ववेता म्हणून ओळखला गेला होता; पण पुढे त्याच्या राजकीय आणि नैतिक विचारांना समाजाभिमुख करण्याचे काम त्याने जास्त केले; पण एवढ्यावरच त्याची ओळख थांबत नाही. त्याची खरी ओळख ही भूमितीतील सिद्धांतामुळे झाली. अंकगणितातही त्याचे कार्य तसे लक्षणीयच राहिले. एवढेच काय; पण संगीतावरही त्याचे संशोधन होते. याचा अर्थ असा की, केवळ बुद्धिनिष्ठता ठेवल्याने विविध शास्त्रांच्या अभ्यासाकडे पाश्चात्त्य विचारवंत झुकू शकले. अंतिम सत् तत्त्व वा सद्वस्तू ही बुद्धिगम्य नाही, असे ठामपणे स्वीकारले असते, तर कदाचित बाह्य वस्तुजाताकडे चिकित्सेच्या दृष्टीने न पाहता अनुभूतीसाठी आंतरिक साधना करण्याकडे त्यांचा कल वाढला असता. बहुधा अंतिम सत् वा ज्ञान हे बुद्धिगम्य नाही हे स्वीकारल्यामुळे भारतीय तत्त्ववेत्ते आंतरिक साधनेला जास्त मूल्य देऊ पाहत होते. नेमका हा भेद भारतीय तत्त्वचिंतक आणि पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांमध्ये होता, असे मानावे लागेल. एका पायथागोरसमुळे अनेक शाखांच्या अभ्यासाची पाळेमुळे खोलवर रुजली गेली असे म्हणता येईल. हेरॅक्लिटससारखा विचारवंत हा अनित्यत्व आणि परिवर्तनावर आपले विचार मांडताना इतरांच्या अगदी विरोधी विचारधारा मांडत असतानाही त्याचा स्वीकार केला गेला ही बाब महत्त्वाची आहे. पारमिनाईडसचे विचार हे तसे भारतीय अद्वैत सिद्धांताच्या अगदी जवळचे वाटत असले तरीही त्याचे अद्वैत हे बुद्धिगम्य आहे. त्यामुळे तो विचार त्या काळामध्येच काय पण आजच्या काळातही तुलना व अभ्यास करण्याजोगा आहे. थोडक्यात, अद्वैत हा विषय बुद्धिगम्य आहे की नाही, यावर लगेच चर्चेला प्रारंभही झाला.

झिनो, एंपिडोकल्स वा डिमॉक्रिटस हे विचारवंत वेगवेगळ्या पद्धतीने अगदी विज्ञानाकडे झुकणारेच विचार मांडत होते हे अगदी सिद्ध होते. त्या काळात खगोलशास्त्र, परमाणू अशा अनेक गोष्टींवर अगदी प्राथमिक स्तरावर का होईना; पण अभ्यासपूर्ण मते मांडलेली आहेत.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान एका वेगळ्या वळणावर आले ते सॉक्रेटिसपासून...! सॉक्रेटिस हा तेव्हाचा क्रांतिकारक विचारवंत होता, हे मानावे लागते. केवळ विचारांना नाकारून वा धक्का देऊन भागणार नाही, तर सत्य नेमके काय आहे, हे जाणण्यासाठी त्यावर चिंतन करणे भाग आहे. हे त्याने स्वीकारले होते. त्यासाठी प्रश्न उपस्थित करणे आणि आलेल्या उत्तरावर प्रतिप्रश्न तयार करून पुढे जाण्याची एक अनोखी पद्धती सॉक्रेटिसने अवलंबिली. यालाच सॉक्रेटिसची 'संशय पद्धती' म्हणून ओळखले गेले. सततच्या चर्चेतून सारतत्त्वाकडे जाण्यासाठी विगमनाची आणि निगमनाची पद्धतीही बहधा त्याच्या काळातच जास्त प्रसिद्ध पावली. सॉक्रेटिसला आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली ही नोंद विशेष आहे.

सॉक्रेटिसपासून विशुद्ध तत्त्वचिंतन करणाऱ्या या पिढ्यांमध्ये संप्रदायांचा उदय झाला, असे आपण ठामपणे म्हणू शकतो. त्याचा शिष्य असलेल्या प्लेटोने सॉक्रेटिसच्या संवादाचे लेखन केले. प्लेटोचे डॉयलॉग्ज हे सॉक्रेटिसच्या आज उपलब्ध होऊ शकणाऱ्या तत्त्वज्ञानाचे मूल स्रोत... अन्यथा लिखित स्वरूपामध्ये आज ते उपलब्ध नसते. प्लेटोने पद्धतशीरपणे तत्त्वज्ञानाला एक दिशा दिली असे म्हटले तरी चालेल. सॉक्रेटिसपासून खरे तर सोफिस्टांना पद्धतशीरपणे विरोध करण्याची एक परंपरा सुरू झाली. आपल्या ज्ञानाची विक्री करून प्रसिद्धी मिळवण्याचा हव्यास असणाऱ्या सोफिस्टांची निंदा तेव्हा झाली; पण असे असले तरीही आजच्या घटकेला सोफिस्टांचाच आदर्श केवळ तत्त्वचिंतकांच्याच समोर आहे, असे नाही, तर सामान्य माणसेही सोफिस्टांप्रमाणे वागत असतात ही बाब अधोरेखित करावी अशी आहे.

सॉक्रेटिसनंतर प्लेटो हाच त्याचा शिष्य जास्त लोकाभिमुख झाला असला तरीही ॲन्टिस्थेनिस आणि ॲरिस्टिपस या दोघांचाही प्रामुख्याने उल्लेख करावा असे त्यांचे कार्य आहे. ॲन्टिस्थेनिस याने उपेक्षावाद मांडला तर ॲरिस्टिपस याने सुखवादाची मांडणी केली. एकाच विचारवंताच्या विचारांचे आकलन तीन शिष्यांना विभिन्न कसे होऊ शकते याचे प्लेटो, ॲन्टिस्थेनिस आणि ॲरिस्टिपस हे उत्तम उदाहरण आहे. त्यानंतर आलेला एपिक्युरियनवाद हाही एक प्रकारचा सुखवादच मानला जावा, असा होता. त्यावर डिमॉक्रिटसच्या अणुवादाचा बराच परिणाम होता, असे स्पष्ट जाणवते; पण ॲन्टिस्थेनिसच्या उपेक्षावादाची अगदी परिपूर्ण वाटावी अशी वैराग्यशील आवृत्ती झिनोने आपल्या स्टॉईकवादामध्ये आणली आहे. स्टॉईकांची विचारधारा ही बरीच वर्षे समाजमनावर गारूड घालत होती, हे अगदी स्पष्ट आहे. खिस्तपूर्व सुरू झालेली ही विचारधारा खिस्तोत्तर दोन-चारशे वर्षे समाजावर अधिराज्य गाजवत होती. याच परंपरेमध्ये स्थितप्रज्ञ असलेला सेनेका

आणि रोमन बादशहा मार्कस ऑरेलियसही होऊन गेला. स्टॉईकांचे विचारपर्व हे इतके समर्पित आणि तसे धार्मिक वाटणारे होते की, लोक त्याकडे आकर्षित होणे साहजिक होते; पण त्याच काळात आलेल्या ख्रिस्ती धर्माने स्टॉईकांचा आधार घेत आपले धर्मप्रसाराचे काम सुरू केले आणि पुढे स्टॉईकांना बाजूला सारले गेले. अर्थात, नीती तत्त्वज्ञानापेक्षाही धर्म तत्त्वज्ञानाचा पगडा जास्त बसू लागला.

मार्कस ऑरेलियसनंतर जवळपास सहस्रकभर धर्म आणि नीतितत्त्वज्ञानाचा पगडा पाश्चात्त्यांवर दिसून येतो. त्यानंतर आलेले सेक्स्टस, प्लॉटिनस वगळता सेंट ऑगस्टिन, थॉमस ॲक्विनसारखे ख्रिश्चन विचारवंत, अल किंदी, अल फरेबी, अल रजा, इब्न सिना, अल गजाली वगैरे मुस्लिम विचारवंत आणि इब्न गॅब्रिएल, अब्राहम इब्न दाऊदसारखे ज्यू विचारवंत हे आपापल्या धर्म विचार प्रसारार्थ कार्य करीत होते. त्याच्या अनुषंगाने त्यांनी मनुष्यमात्र आणि त्याचे जीवन यावर काही वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले असल्याचे फारसे आढळत नाही.

तेराव्या शतकापासून पुन्हा एकवार नवविचारांचे वारे वाहू लागल्याचे स्पष्टपणे दिसून येते आणि रॉजर बेकनसारखा विचारवंत दिसून येतो. तरीही लगेच धर्म आणि तत्त्वचिंतन यांची सरमिसळ झाल्याचीच अनेक चिन्हे दिसून येतात. खरे तर आधुनिक तत्त्वज्ञानाचा कालखंड सुरू झाल्यानंतर म्हणजे सोळाव्या शतकापासून मॅकिएव्हेलीसारखा राजकीय विचारवंत, थॉमस मूरसारखा मानवतावादी, ब्रुनोसारखा खगोलशास्त्राविषयी चिंतन करणारा विचारवंत यांचा काळ सुरू असतानाच फ्रान्सिस बेकन याने अनुभववादाची मांडणी सुरू केली आणि पाश्चात्त्य विचारदर्शनाने एक नवे स्वरूप धारण केले. रेने देकार्त, लायब्निज, स्पिनोझा, जॉन लॉक, बार्क्ली, ह्यूमसारख्यांनी विवेकवाद आणि अनुभववादाची परंपरा पुढे नेली. पुढे जेरेमी बेंथाम, कांटसारखे विचारवंत अठराव्या शतकाच्या उंबरठ्यावर झाले आणि आधुनिक विचारवंतांची परंपरा पुढे सुरू झाली. सतरा-अठराव्या शतकानंतर विविध विचारदर्शनांनी पाश्चात्त्य तत्त्वजगतामध्ये आपले नाव अजरामर केले ही बाब अधोरेखित करण्यासारखी आहे. मग तो चिद्वादी हेगेल असो, उपयुक्ततावादी जेम्स मिल वा जॉन स्टुअर्ट मिल असो. सोरेन कर्केगॉर्दपासून सुरू झालेले मानवाच्या अनिश्चित जीवनाबद्दलचे अस्तित्ववादी विचार पुढे फ्रेड्रीक नित्शे, जिआँ पॉल सार्त्र यांनी पुढे नेले तर हेगेलच्या चिद्वादाला संपूर्ण विरुद्ध स्वरूप देऊन कार्ल मार्क्सने उभा केलेला मार्क्सवाद हा जगभर सामाजिक आणि राजकीय चळवळीचा पाया ठरला. पाश्चात्त्य विचारवंतांची मानवाच्या जगण्याचे विभिन्न आयाम प्रकाशात आणणारी परंपरा लुडविग विटगेन्स्टाईन, कार्ल जॅस्पर्स वगैरेंनी पुढे नेली. एकंदर जागतिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भर घालण्याचे काम या विचारवंतांनी केले, एवढेच नव्हे तर त्यांच्या चिंतनामुळे आधुनिक विज्ञानाच्या पायाभरणीस प्रारंभ झाला.

हिपोक्रेटसनंतर मानवी शरीरविषयक अभ्यास सुरू झालेला असला तरीही ॲरिस्टॉटलनंतर विज्ञानविषयक विभिन्न विषयांना गती प्राप्त झालेली दिसते. गॅलिलियो वा ब्रुनोसारखे खगोलशास्त्रीय अभ्यासक तेव्हा होतेच; पण न्यूटनच्या प्रिंसिपिया या ग्रंथानंतर जवळपास दोन-चारशे वर्षे विज्ञानाच्या संशोधनाला आणि अभ्यासाला प्रचंड गती मिळाली. भौतिकशास्त्रातील महत्त्वाच्या संशोधनाला प्रारंभ झाला. डार्विनच्या उत्क्रांतीवादानंतर जीवशास्त्रीय संशोधनाला एक वेगळे वळण मिळाले. क्युरी दांपत्यानंतर भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र यांच्यातील परस्पर सहकार्य वाढीस लागले. एडिसननंतरची क्रांती हा वेगळा विषय ठरेल. आईन्स्टाईन, नील बोहर, राईट बंधू अशा अनेक शास्त्रज्ञांची नावे घेता येतील, ज्यांचे कार्य हे मानवजातीला वरदान ठरले आहे.

तत्त्वज्ञान या एका विषयातून अनेक विद्याशाखांचा जन्म झालेला असला तरीही विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यात काही साम्यभेद स्थळे आहेतच. सृष्टीमागचे रहस्य उलगडणे आणि मानवास सुख प्राप्त करून देणे हे दोन्हीचेही ध्येय असले तरीही दोन्हीचे मार्ग आणि सुखाच्या संकल्पना विभिन्न आहेत. सृष्टीमागे सत् तत्त्व वा ज्ञानतत्त्व आहे, हे जाणून घेणे हे मानवाचे लक्ष आहे, असे तत्त्वज्ञान सांगू शकते; पण विज्ञान केवळ तेच करीत नाही. सृष्टीमागचे रहस्य उलगडणे एवढेच नाही, तर त्याच्या आधारे मानवी जीवनातील समस्यांचे मूळ उलगडणे आणि उत्तर शोधून समस्यांचे निराकरण करून आयुष्य सुखकर करणे हे विज्ञानाचे लक्ष असते. त्यादृष्टीने अभ्यास, निरीक्षण, चिंतन, मनन, त्यानुसार योग्य प्रयोग, प्रयोगाचे निष्कर्ष व निष्कर्षावर आधारित उपाययोजना ही समाजातील कुठल्याही व्यक्तीसमोर भेदभाव न होऊ देता पोहोचवणे ही विज्ञानाची मानवी जीवनाभिमुख कार्यमहत्ता आहे. आपल्याला उपलब्ध झालेल्या ज्ञानाचे सामान्यीकरण करणे व सर्वांना त्या ज्ञानाच्या साहाय्याने अज्ञानमुक्त करणे हे ध्येय असते. मनुष्य रूढी आणि परंपरा पाळतो म्हणून संस्कृती टिकत असली तरीही चाकोरीबद्धता आणि नियमबद्धतेतून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धांतून त्याला सोडवून खरा ज्ञानमार्ग दाखवणारा व जीवन सुखकारक करणारा विज्ञान हा ज्ञानदीपस्तंभ असतो. त्यामुळे विज्ञानाची सर्वंकषता ही जास्त असते. शिवाय तत्त्वज्ञानापेक्षा विज्ञानाचा उपयोजित भाग हा सामान्यांना तसा आचरणासाठी सोपा असतो. त्यामुळे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे परस्परपूरक कार्य करीत असल्याप्रमाणे वाटतात.

अर्थात, अशा प्रकारच्या विज्ञान संशोधनाची सगळी दारे भारतीय उपखंडामध्ये बंद होती किंवा अजिबातच प्रयत्न झाले नाहीत असे नाही किंवा भारतीय दार्शनिकांचा त्यांना विरोध होता असेही नाही. भारतीय दर्शने ही मोक्षाभिमुख होती, याचा अर्थ ती पारलौकिक सुखापलीकडे दुसरे काहीही पाहत नव्हती, असा अर्थ नाही. जीवन चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी जे काही नैतिक मार्गाने शक्य आहे ते करावे. भौतिक जगण्याला न्याय देत मोक्षप्रद मार्गाने चालू लागावे हीच धारणा होती. भारतीय वेद आणि दर्शनकाळामध्येही

बाह्य जगताविषयी कुतूहल होते आणि त्यांच्या परीने त्यांनी सृष्टीतील अनेक गोष्टींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला होता हे अगदी सुस्पष्ट आहे. आधुनिक विज्ञानाची, अभ्यासाची पद्धती आणि प्रयोगपद्धती ही जास्त सुस्पष्ट व विश्वासार्ह आहे इतकेच! अगदीच वेदकाळात जरी डोकावून पाहिले तरीही बाह्य सृष्टीविषयीचे औत्सुक्य तत्कालीन विचारवंतांना होते हे दिसून येते. वेदांमध्ये काही मंत्र आहेत ते खगोलीय ज्ञानाचे सूचक आहेत. याखेरीज बीजगणित वा अंकगणित आणि भूमितीय ज्ञानाचेही सुस्पष्टपणे संकेत त्यात आहेत; पण हे सारे मानवाच्या विकसनशील काळातील असल्याने त्यात फार मोठ्या प्रमाणामध्ये भर पडली असावी असे वाटत नाही. भारतीय आयुर्वेद मात्र मानवाची शरीररचना वा क्रियाविज्ञानाचा सांगोपांग विचार करीत होते हे दिसून येते. चरक, सुश्रूत किंवा वाग्भट यांच्या कार्यावरून हे स्पष्ट दिसून येते. आयुर्वेदावरून तरी सृष्टीतील वनस्पती विषयांचे ज्ञान एका टप्प्यात पोहोचले होते आणि त्याचे उपायोजनही होत होते, हे सिद्ध होते. सतत प्रयोग करणाऱ्या नागार्जुनासारखे अनेक रसतज्ज्ञ म्हणजे रसायनशास्त्रज्ञ या भूमीत कार्यरत होते, असे म्हणायला हरकत नाही. इसवीसनाच्या पूर्व सहाशे वर्षे झालेला कणाद किमान मूलद्रव्याच्या अंतिम कणापर्यंत विचार मांडत होता ही नोंद घेणे आवश्यक आहे. आर्यभट्टांसारखा गणिती इसवीसनाच्या पाचव्या, सहाव्या शतकात होता. भास्कराचार्यांसारखा गणितीही बाराव्या शतकात होऊन गेला. सिद्धांतशिरोमणी, लीलावती, बीजगणित, गोलाध्यायसारखी प्रकरणे ही त्यांच्या गणिती प्रज्ञेची साक्ष देतात. एकंदर भारतीय तत्त्वचिंतकांपैकी सर्वचजण केवळ मोक्षाचाच विचार करून जीवनपराङ्मुखता दर्शवत होते असे काही नाही. काही प्रमाणामध्ये उपलब्ध साधनांच्या द्वारा त्यांचे विज्ञानविषयक कुतुहलावर उत्तर शोधण्यासाठी प्रयोग चालच होते. पण हे केवळ उपलब्ध साहित्याद्वारे मांडता येते असे नाही, तर शास्त्र, शिल्प, कला, संगीत, शरीराचा अभ्यास, आरोग्य, उपाययोजना यासारख्या अनेक आयामांद्वारे हे सिद्ध करता येते की, अगदी मूलभूत अशा प्रश्नांची उकल करण्यासाठी भारतीय मानस विज्ञानाच्या संशोधनाकडे वळले होते. गेल्या काही शतकांमध्ये पाश्चात्त्य देशांमध्ये आधुनिक विज्ञानाची पहाट झाली आणि ज्या वेगाने त्यातील संशोधनांचे आणि उपकरणांचे सामान्यीकरण झाले ते पाहता भारतीय उपखंडात अशा प्रकारचे विशुद्ध विज्ञानतत्त्वांवर कधी चिंतन झाले नसावे, असे वाटू लागते; पण ते तितकेसे योग्य नाही. भारतीय मानस हे अगदीच पारलौकिक सुखाचा विचार करीत राहिले हे काही खरे नाही. शिवाय गेल्या सहस्रकामध्ये आणि त्या आधीही देशाटन आणि इतर माध्यमातून ज्ञानाची देवाणघेवाण होतच राहिली. त्याचा एक परिपाक म्हणून आधुनिक विज्ञानामध्येही भारतीय उपखंडातील लोकांनी संशोधनात्मक कार्य केले तर भारतीय विचारधन जगभर तितक्याच आस्थेने स्वीकारले गेले.

महाराष्ट्रीय संत : विशुद्ध ज्ञान आणि नीतितत्त्वांचा विश्वकल्याणप्रद प्रवाह

गेल्या सहस्रकामध्ये संतांनी केलेल्या कार्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला नाही, तर महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन प्रवाहाची धारा खंडित केल्याप्रमाणे होईल. त्यामुळे आपल्या संतप्रवरांच्या कार्याचा लहानसा आढावा घेणे भाग आहे. महाराष्ट्रातील आद्य कवी मुकुंदराजांपासून ही विचारधारा सुरू होते आणि संत बहिणाबाईंपर्यंत येऊन ठेपते. मुकुंदराज ते बहिणाबाई यांच्यामधील सर्व संतांच्या कार्यांचा आढावा घेणे म्हणजे भागवत धर्माच्या कार्याचा आढावा घेणे आहे. काही जणांचे याविषयी दुमत असू शकेल की, महाराष्ट्रातील संतांनी जे कार्य केले ते तत्त्वज्ञान या विषयाच्या जवळपास तरी जाते किंवा नाही; पण असे काही नाही. महाराष्ट्रीय संत म्हणजे केवळ भक्ती असे गृहीत धरण्यात काही अर्थ नाही. संतांनी जे कार्य केले त्यामध्ये भक्तीसोबतच कर्म आणि ज्ञानमार्गाचाही उल्लेख होणे गरजेचे आहे. संतांनी केवळ भक्तीचे प्रतिपादन केले असे नाही, तर इतर मार्गांचाही यथायोग्य गौरव केला आहे. त्यासाठीच महाराष्ट्रातील संत काय म्हणतात ते पाहू.

भारतीय दार्शनिक साहित्यातील जे विविध विचारप्रवाह सर्वत्र पसरले, त्यातील अद्वैतवादाचा आणि विश्वकल्याणाचा फार मोठा परिणाम महाराष्ट्रात भागवत धर्म सांभाळणाऱ्या संतांच्या कार्यावर दिसून येतो. वेदप्रणीत तत्त्वज्ञान जवळपास सर्वच संतांना मान्य होते, असे दिसून येते. शिवाय संतांची समानतेची शिकवण ज्या अद्वैताच्या पायावर उभी होती तो श्रुतीमान्यच आहे. त्यामुळे मुळात संतांचे कार्य हे भारतीय तत्त्वचिंतकांच्याच मार्गाने जात होते, यात कुठलीही शंका नाही. मग तो संप्रदाय कुठलाही असो किंवा संत कुठल्याही संप्रदायाचा असो, त्याने कधी मानवाच्या कल्याणाचा हेतू मनात ठेवला नाही, असे नाही. मुकुंदराजांसारखा आद्य कवी हा विवेकसिंधू आणि परमामृतामध्ये हीच शिकवण देतो. वेदातील तत्त्वचिंतनाप्रमाणे विश्वामागे असणारे सत् तत्त्व वा ज्ञानतत्त्व हेच सर्वांठायी आहे ही धारणा अगदी मुकुंदराजांच्या विवेकसिंधूत आणि परमामृतातही दिसून येते. विवेकसिंधू[९]... जो मराठीतील आद्य काव्यग्रंथ मानला जातो त्यात पहिल्या प्रकरणात मुकुंदराज लिहितात, 'तू निर्गुण निर्विकार । निःसंगु निराकार । तुझीया स्वरूपाचा पार । नेणती ब्रह्मादिक ॥२॥ ... तूं सच्चिदानंदतनु । षड्भावविकारविहीनु । स्वप्रकाशें प्रकाशमानु । स्वसंवेद्य ॥४॥ ... वेदशास्त्राचा मथितार्थु । मराठीया होय फलितार्थु। तरी चतुरी परमार्थु । कां न घ्यावा ॥११॥ तर परमामृताच्या अगदी पहिल्याच प्रकरणामध्ये श्रीमुकुंदराज 'जैसा सर्व पटांमाजी येक तंतु । तैसा तूं विश्वी विश्वभरितु । सर्व व्यापुनी विरहितु । अलिप्त तूं ॥७॥' असे सातव्या ओवीमध्ये स्पष्ट म्हणतात. मराठी संतसाहित्यातील सुरुवातीच्या या दोन ग्रंथांतील ओव्यांवरून पुढील

---

९. विवेकसिंधू, संपादन : श्री. विष्णू कृष्ण आठल्ये, प्रकाशक : गजानन चिंतामण देव, गोंधळेकर छापखाना, इ.स. १९११

संत विचारांचा प्रवाह हा वेदप्रणीत तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रीय संकल्पनांनी प्रभावित होता, हे अगदी सुस्पष्टपणे दिसून येते. थोडक्यात सांगायचे झाले, तर संतमांदियाळीची अद्वैताची बैठक पक्की होतीच. अर्थात्, या अद्वैताकडे जाताना त्यांनी कर्माची कठोर परीक्षा केली होती. केवळ ईश्वरतत्त्वाला जाणणे हे मनुष्यमात्राचे जीवितकार्य नसून त्या जीवितार्थासाठी काही साधन करणेही तितकेच आवश्यक आहे, हे त्यांनी मान्य केले होते. कर्माची कठोर परीक्षा करण्यासाठी नैतिकतेचे अधिष्ठान पक्के असावे लागते. संतांनी नैतिकता आणि नैतिक जीवन याविषयीचे चिंतन स्वानुभवावर मांडले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांपासून ते थेट जगद्गुरू तुकोबारायांपर्यंत सर्वांनी व्यक्ती, व्यक्तीचे काम, कामातील नैतिकता, कर्म कोणते, अकर्म कोणते, त्याज्य कर्म कोणते याविषयी महत्त्वाचे तपशील आपल्या साहित्यामध्ये मांडले आहेत. मनुष्याने आपले कर्म नैतिकता पालन करूनच करावे, मग भलेही त्या मार्गावर चालताना त्याला दुःख सहन करावे लागले तरीही चालेल; पण इतरांना त्यामुळे दुःख पोहोचता कामा नये, अशा कठोर नैतिक वर्तनाची अपेक्षा संतांनी केली नसली तर नवल! वारकरी संप्रदायातील संतांनी केवळ नैतिकता शिकवली नाही, तर ती आचरणामध्ये कशी आणावी याचा वस्तुपाठ स्वतःच्या जीवनातून दाखवून दिला. म्हणून गेल्या सात-आठशे वर्षांपासून वारकरी संप्रदाय हा अगदी आजही सश्रद्धपणे आपले आचरण करीत आहे. ही जीवनपद्धती तशी प्रपंच व्यवस्थित करून देणारी असली तरी भक्तीच्या आधारामुळे समर्पित आहे. तिच्यात आसक्ती नाही. व्यवहार असला तरी त्यात दंभ नाही. ही पारमार्थिक जीवनाची रीत असली तरीही त्यात संसारचक्राकडे दुर्लक्ष नाही वा त्याचा त्यागही नाही. प्रपंच भोगाचा असला तरीही त्यात स्वार्थ नाही. त्यामुळे नैतिक जीवनाची सर्वोच्च स्थिती म्हणून त्या सृष्टीकर्त्या परमात्म्याचे अपरोक्ष ज्ञान आहे. त्याचेच सगुण साकार स्वरूप म्हणून पंढरीला दर्शनाला जाण्याची तळमळ अंतरंगामध्ये आहे. सोबत सोबत्यांना नेण्याची परंपरा आहे. ही परंपरा केवळ जतन केली जाते ती दर्शनाच्या स्वार्थाने नव्हे तर पायी जाता जाता 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।' अशी अनेक प्राणिमात्रांमध्ये तेच चैतन्य आहे. याचा अनुभव घेत जाणे आहे. विश्वात्मक भगवंताची प्रत्येक भूतमात्रात असलेली छाया ओळखत जाण्याची ही प्रात्यक्षिकाची जीवनपद्धती आहे. त्यातच विश्वकल्याण चिंतन करणे आणि सर्वांभूती दया व्यक्त करीत नैतिक जीवनाची इतिश्री करणे आहे. हे केवळ वारकरी संतांनी सांगितले असेही नाही. सर्व संप्रदायांचा अर्क असाच आहे. श्रीरामदासी संप्रदायाने समुदाय मेळवून कार्य उभे करण्यास सांगितले तेही यासाठी आहे. समर्थांनीही नैतिक जीवनाची उत्कट स्थिती आपल्या ग्रंथात वर्णिलेली आहे. जीवन कसे जगावे आणि विश्वातील प्रत्येक प्राणिमात्रात त्याच ईश्वराचा अंश आहे, हे कसे समजून घ्यावे हे संतांनी आपल्या आदर्श जीवनातील अनेक उदाहरणांवरून सिद्ध केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संतपरंपरा आणि संतांचे जीवन ही केवळ तत्त्वज्ञानाची चालती-बोलती पाठशाळाच नव्हती, तर धर्म,

धर्मातील तत्त्वज्ञान, धर्मातील नीतिशास्त्र, उन्नत नैतिक जीवन यांची ती प्रयोगशाळा होती. संतांचे वाङ्मय ही अशा जगण्याची एक संहिता मानली जाते. श्रीमुकुंदराजांचा विवेकसिंधू असो वा परमामृत, नामदेवांची गाथा असो वा ज्ञानदेवांची भावार्थदिपिका, अमृतानुभव, नाथांचे भले थोरले वाङ्मय असो वा तुकोबांची गाथा किंवा श्रीसमर्थांचा दासबोध असो वा एकवीस समासी वा मनाचे श्लोक ही सर्व धर्म जीवनाला व वेदप्रणीत सत्याचे जीवनात आविष्करण करणारी संपदा आहे हे निश्चित!

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र : मानवाच्या उन्नत विचारदर्शनाचा इतिहास

गेल्या काही सहस्रकांमध्ये मानवामध्ये झालेल्या वैचारिक उन्नतीचा इतिहास पाहणे म्हणजे तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा अभ्यास करणे होय. साधारणपणे उत्क्रांत मानवाचे लक्षण हे त्याच्या विचारांवर आधारित असलेल्या आचारांवरून स्पष्ट होते; पण असे असले तरीही काही मूलभूत भेद ध्यानी घेऊन याकडे बघणे श्रेयस्कर आहे आणि हे भेद तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र यातील आहेत. नीतिशास्त्र ही तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. नीतिशास्त्र हे मानवाच्या वर्तनाशी संबंधित असले तरीही ते मानसशास्त्र नाही. मानसशास्त्रात मनष्याच्या आचाराचा अभ्यास महत्त्वपूर्ण मानला जातो, तर नीतिशास्त्रामध्ये केवळ एक अभिव्यक्तीचे साधन म्हणून आचाराचा स्वीकार केला जातो. मानवी आचार हा नीतिशास्त्राचा अभ्यासविषय नसून त्या आचारावर दिलेला नीतिनिर्णय हा आहे. थोडक्यात, मानसशास्त्र म्हणजे मनुष्याच्या आचाराचा अभ्यास करणारे शास्त्र ठरेल, तर नीतिशास्त्र हे मनुष्याच्या आचारावर दिलेल्या नीतिनिर्णयाचे शास्त्र ठरेल. तसे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची कुठलीही सीमारेषा ठरवून दिलेली नाही. सृष्टीतल्या कुठल्याही गोष्टीवर केलेले सांगोपांग चिंतन हे तत्त्वज्ञान ठरू शकते. तत्त्वज्ञानातील कुठलेही सिद्धांत हे ठाम असू शकत नाहीत, तर वस्तुज्ञानाच्या परिपूर्ण अपेक्षेने केलेली ती केवळ मांडणी ठरते. कुठल्याशा वळणावरची खूण म्हणून एक सैद्धांतिक रचना कुणीतरी मांडलेली दिसते; पण याचा अर्थ तिथेच थांबावे, असे नाही, तर त्या वळणावरून पुढे जाणे हे त्या अभ्यासकाचे कर्तव्य ठरते.

विषयाच्या शिस्तबद्ध वर्गीकरणाच्या बाबतीत भारतीय तत्त्ववेत्ते फारसे लक्ष देत नाहीत, असे काहीसे आहे. वेद, ब्राह्मण ग्रंथ, आरण्यके, उपनिषदे, वेदांग, षड्दर्शने आणि त्यावर आधारित शास्त्रग्रंथ अशी सरळ सरळ मांडणी आहे. यामध्ये तत्त्वज्ञान, धर्म, नीतिशास्त्र अशी फार स्वतंत्रपणे मांडणी करण्याची गरज का वाटली नसावी, ही बाब विचार करण्याजोगी आहे. मुळात भारतीय उपखंडामध्ये तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र या दोन्ही गोष्टी सोबतच जन्माला आल्या आहेत. धर्मशास्त्र म्हटल्यावर नैतिक मांडणी हवीच म्हणून त्या अनुषंगाने नीतिशास्त्रही जन्माला आले. थोडक्यात, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांची सरमिसळ भारतीय उपखंडामध्ये झालेली आहे. ती इतकी नेमकेपणाने आणि तंतोतंत आहे की,

कुठल्याही दोन शास्त्रांमधील सीमारेषा सुस्पष्टपणे सांगता येत नाहीत. त्यामुळे भारतीय उपखंडामध्ये तत्त्वज्ञानाच्या अवकाशामध्ये या गोष्टी वेचून पाहाव्या लागतात. शिवाय भारतीय साधनपद्धती पाहता हे सारे त्यासाठीच केले असल्याची खात्री पटते.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान मात्र अगदी प्रारंभीच्या काळातच बहुआयामी राहिल्याने त्यामध्ये विभिन्न शाखा आणि त्यांची मांडणी अगदी स्पष्टपणे दिसून येते. ॲरिस्टॉटलने तत्त्वज्ञानाची पाच भागांमध्ये मांडणी केली आहे. .

अ. तर्कशास्त्र (Logic)

आ. तत्त्वमीमांसा (Metaphysics)

इ. भौतिकशास्त्र (Physics)

ई. नीतिशास्त्र (Ethics)

उ. सौंदर्यशास्त्र (Aesthetics)

ॲरिस्टॉटलनंतरच्या विचारवंतांनी भौतिकशास्त्राला त्यातून वगळले. आधुनिक तत्त्ववेत्ते मात्र तत्त्वज्ञानाच्या तीन शाखा मानल्या आहेत.

क. तत्त्वमीमांसा (Metaphysics)

ख. ज्ञानमीमांसा (Epistemology)

ग. मूल्यमीमांसा (Axiology)

क. तत्त्वमीमांसा (Metaphysics) :

तत्त्वमीमांसामध्ये मूलतत्त्वाचे विश्लेषण अपेक्षित असते. तत्त्व या शब्दातून सारी सृष्टी ज्यातून निर्माण झालेली असते त्या तत्त्वाचे विश्लेषण अपेक्षित असते. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये थेल्सला जनक मानले जाते. विश्वाचे आदिद्रव्य हे जल आहे, हे त्याने सांगितले. पण पुढे त्याच्या शिष्यांनी मात्र त्याचे खंडन केले असले तरीही या विषयावर चर्चेला सुरुवात झाल्याचे मूल्य मात्र टाळता येत नाही. विश्वाच्या मूलभूत अशा कारणद्रव्याविषयी मात्र चर्चा कायमच चालू राहिलेली आहे. भारतीय उपखंडात मात्र विश्वाचे आदिद्रव्य हे कायमच ईश्वरतत्त्व मानले गेल्याने मूलद्रव्याचे स्वरूप आध्यात्मिक आहे का असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. याखेरीज पदार्थ, मन, आत्मा, पुनर्जन्म आहे का, ईश्वर वगैरे गोष्टींवरही तत्त्वमीमांसेमध्ये चर्चा सतत झालेली आहे. पदार्थ आणि त्यांचे वर्गीकरण याबाबतीत वैशेषिक दर्शनाने चांगली मांडणी केली आहे जी अभ्यासनीय आहे.

ख. ज्ञानमीमांसा (Epistemology) :

ज्ञानमीमांसा हा तत्त्वज्ञानाचे दुसरे उपांग मानले जाते. याला ज्ञानाचे शास्त्र किंवा प्रमाणविज्ञानही मानले जाते. आधुनिक तत्त्वकाळामध्ये विचारवंतांकडून तत्त्वमीमांसेपेक्षा ज्ञानमीमांसेला जास्त महत्त्व दिले जाते. ज्ञानमीमांसेमध्ये विशुद्ध ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचा

स्रोत, ते बुद्धिगम्य आहे की नाही, ज्ञानाचे परीक्षण करून स्वीकार इत्यादी गोष्टी अभिप्रेत असतात. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये हा प्रश्न चर्चेत असतो की खरेच सत्य ज्ञान हे बुद्धी प्राप्त करू शकते की अनुभव प्राप्त करू शकतो ? बुद्धी समस्त ज्ञान प्राप्त करू शकते असे मानणारे बुद्धिवादी (Rationalist) आणि अनुभवाने समग्र ज्ञान प्राप्त होऊ शकते असे मानणारे अनुभववादी (Empiricist) म्हणून ओळखले जातात. मानवी ज्ञान कसे निर्माण होते, त्याच्या मर्यादा कोणकोणत्या आणि त्याचे परीक्षण कसे केले जावे, यावर ज्ञानमीमांसेमध्ये विचार केला जातो.

ग. मूल्यमीमांसा (Axiology) :

तत्त्वज्ञानामध्ये ज्ञानाचे मूल्यांकनही केले जाते. तीन प्रकारे मूल्यांकन केले जाते.

१. तार्किकदृष्ट्या मूल्य : याचा अभ्यास तर्कशास्त्रामध्ये (Logic) केला जातो.

२. नैतिकदृष्ट्या मूल्य : याचा अभ्यास नीतिशास्त्रामध्ये (Ethics) केला जातो.

३. सौंदर्यशास्त्रीय मूल्य : याचा अभ्यास सौंदर्यशास्त्रामध्ये (Aesthestics) केला जातो.

याखेरीज तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा आधुनिक अभ्यासकांनी निर्माण केलेल्या आहेत. ज्यामध्ये इतिहासाचे तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान, अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञान, धर्मांचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, भाषेचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान अगदीच काय पण विज्ञानाचेही तत्त्वज्ञान अभ्यासकांनी निर्माण केले. हे खरे असले तरीही मराठी भाषकांमध्ये तत्त्वज्ञान, धर्माचे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, ज्ञानमीमांसा याच गोष्टींना जास्तीत जास्त महत्त्व देण्यात आलेले आहे. आधुनिक विज्ञानाचा प्रसार सगळीकडे झाल्यानंतर तेही भारतीय उपखंडामध्ये स्वीकारले गेले आहे. महाराष्ट्रामध्येही गेल्या दीड-दोन दशकांमध्ये विज्ञान प्रसार आणि प्रचारही झालेला आहे. नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा विचार करता त्यावर गेल्या काही सहस्रकामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये लेखन झालेले आहे, हे मान्य करायला हवे. विशेषतः धर्म, धर्मांचे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र या विषयांवर गेल्या सहस्रकामध्ये महाराष्ट्रीय संतांनी जे कार्य केलं आहे, त्याला तोड नाही. महाराष्ट्रीय संतांचे वाङ्मय आजही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे हे विशेष! महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानावरील बहुतांशी ग्रंथ हे तसे मौखिकच राहिले. वेदवाङ्मयाचा एकंदर कालखंड बघता त्या काळामध्ये आधुनिक छपाई तंत्र नव्हते हे अगदी उघड आहे. इतका प्राचीन ठेवा जतन करणे ही बाब मौलिक आहे. अशा वेळी हस्तलिखिते तयार करणे हा एक पर्याय होता. तेराव्या शतकामध्ये विनाशाकडे गेलेल्या नालंदा विद्यापीठामध्ये लाखोच्या संख्येने हस्तलिखिते होती; पण त्याहीपूर्वी वेदवाङ्मयांना जतन करण्यासाठी मौखिक परंपरा हीच जास्त प्रभावी आणि विशुद्ध स्वरुपाची राहिली हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. बहुधा गायत्री, उष्णिक, अनुष्टुभ, त्रिष्टुभ वगैरे छंदांची रचना करण्याचा आणि त्याच रचनेमध्ये ऋचा लिहून त्या स्वरबद्धतेने मुखोद्गत करण्याचा हेतूही हाच असावा. शब्द, त्यातील हस्वदीर्घता, उदात्त,

अनुदात्त व स्वरित उच्चार वगैरे जशाला तसे पाठ करून वाङ्मय जतन करण्याची परंपरा जगात केवळ भारतामध्येच होती. आजही वेदवाङ्मयाच्या बाबतीत हीच परंपरा चालू आणि विश्वासार्ह मानली जाते. प्रारंभी मौखिक, मग हस्तलिखितांची परंपरा उभी राहिली असावी. आजही लाखो अशी हस्तलिखिते उपलब्ध आहेत ज्यांच्या अभ्यास करून ती प्रकाशात आणण्याची आवश्यकता आहे.

हस्तलिखितांची परंपरा भारतीय उपखंडात कधीपासून आहे हे कुणीही सांगू शकत नाही. महाराष्ट्रातही प्राचीन काळापासून मराठी हस्तलिखितांची परंपरा आहेच. मुकुंदराजांचा विवेकसिंधू किंवा महानुभावांचे ग्रंथ हे हस्तलिखित स्वरूपामध्ये आहेत. ज्ञानदेवांच्या ग्रंथाचे म्हणजे ज्ञानेश्वरीचे लेखन सच्चिदानंद बाबा यांनी शके १२१२ मध्ये म्हणजे इसवी सन १२९० मध्ये केल्याची नोंद आहे. शिवाय प्रती नकलण्याचीही नोंद आहेच. नाथांनी त्यानंतर शके १५०६ मध्ये म्हणजे साधारण इसवी सन १५८४ मध्ये ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत केल्याचीही नोंद आहे. नाथांनी ही शुद्ध प्रत तयार करण्यापूर्वी अनेक प्रती हाताळल्याची नोंद आहे. म्हणजे ज्ञानदेवांनंतर महाराष्ट्रामध्ये ज्ञानेश्वरीच्या बऱ्याच हस्तलिखित प्रती तयार झाल्या असाव्यात. नाथांच्या अफाट वाङ्मयाच्याही प्रती तयार झाल्या. मुद्रणाचे युग सुरू झाल्यानंतर ज्ञानेश्वरीची पहिली छापील आवृत्ती बाळशास्त्री जांभेकरांनी इसवी सन १८४५ मध्ये काढल्याची नोंद मिळते. पुढे सोहनी, कुंटे, तुकाराम तात्या, केरळकोकीळ, साखरे, माडगावकर, राजवाडे यांच्या प्रती या इसवी सन १८९० ते १९१० दरम्यान आल्या. वारकरी संप्रदायामध्ये आणि इतरही ठिकाणी ग्रंथांची पारायणे आणि प्रवचने सुरू झाली तेव्हा या प्रतींची संख्या वाढली असावी; पण हे सारे छपाई तंत्र अमेरिकन मिशनऱ्यांच्या प्रेसनंतर सुरू झाले. त्यांच्या पहिल्या छापखान्याची नोंद १८१३ इसवीसनाची आहे. बायबल आणि ख्रिस्ती धर्मप्रचाराचे साहित्य छापणे हा त्यांचा मूळ उद्देश होता. अर्थात् ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलाचे भाष्य छापण्याचा प्रयोगही त्यांनी केला होता, हा भाग वेगळा! १८३१ मध्ये गणपत कृष्णाजी पाटील यांनी मराठी छापखाना सुरू करून मराठी छपाईचा खरा प्रारंभ केला असे म्हणावे लागेल. तरीही धर्म आणि तत्त्वज्ञानपर पुस्तकाच्या आधुनिक छपाईस तसा बराच उशीर झाला म्हणावे लागते. बाळशास्त्री जांभेकरांनी आपले मराठी वृत्तपत्र 'दिग्दर्शन' हे १८३७ इसवीसनामध्ये काढल्याची नोंद मिळते आणि इसवी सन १८४५ मध्ये ज्ञानेश्वरीची प्रत काढली. म्हणजे दिग्दर्शनानंतर जवळपास आठ वर्षे ज्ञानेश्वरीच्या छपाईस लागले. हे फक्त एका ग्रंथाच्या बाबतीत सांगता येते. पण इतरही अनेक हस्तलिखिते आजही आहेत. नाथांच्या समकालीन असलेले दासोपंत यांचे वाङ्मयही मोठ्या प्रमाणावर होतं. त्यातील बरेचसे आता लुप्त आहे. समर्थ संप्रदायाच्या ग्रंथांच्या बाबतीत तर नेमका आकडा सांगता येण्यासारखा नाही. रामदासी मठातून संप्रदाय आणि इतरही ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती बनण्याचे कार्य हाती घेतले जात असे. तुकोबा आणि बहिणाबाईंचा गाथा आजही उपलब्ध

आहे, याचे कारण त्या प्रतीचे केलेले रक्षण आणि पुनर्मुद्रण हेच आहे. पण अशा हस्तलिखित प्रतींनाही एक मर्यादा होतीच. १९१० नंतर जास्तीत जास्त धार्मिक आणि तत्त्वज्ञानपर ग्रंथांच्या प्रती बाजारात अभ्यासकांसाठी उपलब्ध होऊ लागल्या आणि अभ्यासकांसाठी एक नवे दालन उघडले गेले. हे केवळ संत साहित्याच्या बाबतीतच घडले असे मात्र नव्हे. यावर पद्धतशीरपणे संशोधनाचा पायाही घातला गेला. महाभारताची शुद्ध आणि विश्वासार्ह अशी संपादित प्रत तयार करण्याचे कामही मराठी संशोधकांनी केलेले आहेच. महाभारताच्या नीळकंठी प्रतीचा शोध आणि त्यावरून एक विश्वासार्ह प्रत तयार करण्याचे काम कितीतरी वर्षे चालूच होते. अजूनही असे कार्य चालूच असते. पुण्याचे भांडारकर प्राच्यविद्या, भारत इतिहास संशोधन मंडळ. धुळ्याचे राजवाडे आणि सत्कार्योत्तेजक सभा, वाग्देवता मंदिराचे कार्य सर्वश्रुत आहे. धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात असे संशोधनात्मक कार्य विद्यापीठ पातळीवरही चालू असते.

गेल्या दीड-दोन शतकांमध्ये मात्र अशा प्रकारच्या कामाला जी गती प्राप्त झाली तिचा उल्लेख करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रामध्ये जरी अशा प्रकारच्या ग्रंथांची पुनर्मुद्रणे झाली वा नवनिर्मिती झाली असली तरीही ती मुख्यतः धार्मिक स्तरावरच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाची होती, हे प्रामुख्याने मान्य करावे लागते. तरीही पाश्चात्त्य विचारवंत आणि भारतीय तत्त्ववेत्ते यांच्या विचारांतील तुलनात्मक अभ्यास अनेकांनी अगदी ताकदीने मांडला असल्याची नोंद मिळते. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर लोकमान्यांचा गीतारहस्य हे एक आहे किंवा गुरुदेव रानड्यांचे अभ्यासपूर्ण लेखन आहे. याखेरीज अनेक ग्रंथ हे तौलनिक अभ्यास मांडणारे निर्माण झाले असले तरीही परिपूर्णपणे परिचय करून देणाऱ्या ग्रंथांची रचना होणे आवश्यक असते, हे जाणून महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या ग्रंथांची निर्मिती अभ्यासकांसाठी करण्यात आलेली आहे. विशेषतः नीतिशास्त्रावरच्या आणि धर्मशास्त्र... त्यातही दार्शनिक चिकित्सा करणाऱ्या पुस्तकांचा समावेश जास्त आहे. पाश्चात्त्य विचारवंतांची पुस्तकेही अभ्यासार्थ अनुवादली गेलेली आहेत.

यासाठी विशेषतः प्रयत्न कुणी केले असतील तर ते बडोद्याच्या महाराजा श्रीमंत श्रीसयाजीराव गायकवाडांनी केलेले आहेत. शिक्षण, धर्म आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे तसेही आवडते क्षेत्र होते. शिवाय अनेक आदेश हे लेखी स्वरूपात देण्याची त्यांची पद्धतही तेव्हाच्या राजघराण्यांच्या पद्धतीपेक्षा किंचित वेगळी होती. विचारांनी अत्यंत प्रागतिक आणि बुद्धिवादी असलेल्या सयाजीरावांची हीच कामाची पद्धती अत्यंत मोलाची ठरली. त्यांनी केलेल्या कामाची मोजदाद सहज करता येते. किमान पंचाहत्तर हजारांपेक्षा जास्त आदेश लेखी काढणारा हा किमान भारतातील एकमेव राजश्रेष्ठ असावा. त्यामुळे झाले काय की, त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे अतिशय सुलभ झाले. सयाजीरावांच्या हे लक्षात आले होते की, धर्म, तत्त्वज्ञान तसेच नीतिशास्त्रीय ग्रंथांसोबतच अनेक ग्रंथ हे प्रकाशित

होऊन सामान्यांच्या हाती गेले पाहिजेत. तसेच पाश्चात्त्य विचारवंतांचे विचारधनही मराठी भाषेमध्ये उपलब्ध असल्याशिवाय अभ्यासकांना वाचता येणार नाही. त्यासाठी त्यांनी श्रीसयाजी साहित्यमालेच्या माध्यमातून अनेक लेखकांना लेखनास प्रोत्साहन दिले, तसेच अनुवादकांकडून कित्येक पुस्तकांचा अनुवाद करवून घेतला. त्यातील जवळपास सर्व पुस्तके आता एक तर कालबाह्य आहेत वा जीर्णावस्थेत तरी आहेत. सयाजीरावांच्या निधनानंतर म्हणजे ६ फेब्रुवारी १९३९ नंतर मात्र या प्रकल्पाला मिळालेला एकमेव राजाश्रय नाहीसा झाला. पुन्हा असा विद्याप्रेमी, विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी राजा आपल्याला लाभला नाही, हे खरेच!

अशा अनेकविध ग्रंथप्रेमींच्या प्रयत्नातून काही महत्त्वाचे ग्रंथ हे अभ्यासकांना उपलब्ध होत गेले, तसेच अनुवादकांच्या माध्यमातून पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा परिचय होत गेला. तत्पूर्वी कुठल्याही पाश्चात्त्य विचारवंतांचे विचार मराठी भाषेमध्ये अनुवादित झालेले असतील असे वाटत नाही किंवा अगदीच सांगायचे झाले तर ब्रिटिशांच्या अमलाखाली असताना जेवढी पुस्तके इंग्रजीतून उपलब्ध होती त्यापेक्षा जास्त काही संदर्भासाठी नसावे. शिवाय इंग्रजी वा इतर भाषा शिकण्याची सोयही सर्वसामान्यांसाठी नसल्याने व आधुनिक शिक्षणाचा प्रसार नसल्याने जागतिक तत्त्वज्ञान वा विचार यांचा परिचय मराठी भाषकांना होत असेल असे काही वाटत नाही. आधुनिक छपाई यंत्रानंतर भारतामध्ये अशा प्रकारचा शिक्षण प्रसार वेगाने होऊ लागला, हे मान्य करायला काही हरकत नाही. शिवाय जागतिक विचारधन हाती आल्यानंतर भारतीय विद्वानांना तौलनिक अभ्यास करून आपल्या विचारांना पडताळून पाहता येऊ लागले. आपल्या सांस्कृतिक संचितामध्ये नवी भर पडली.

गेल्या शतकामध्ये मात्र काही प्रमाणामध्ये या परिश्रमाला किंचित ओहोटी लागली की काय अशी शंका येते. नवशिक्षणाचे वारे जरी महाराष्ट्रातून वाहू लागलेले असले तरीही शिक्षण हे केवळ चरितार्थाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले गेले. विद्याप्रेमी शिक्षक मंडळी हळूहळू कालौघात नष्ट होत गेली. पोटाची खळगी भरण्याचे साधन म्हणून शिक्षणाकडे जसे जसे पाहण्याची दृष्टी निर्माण होत गेली तसे तसे इंग्रजी शिक्षणाचे वारे वाहू लागले. संस्कृत भाषेला मृत भाषेचा दर्जा देण्यात आला. मानवाच्या इतिहासामध्ये ज्यांनी आद्य वाङ्मय निर्माण केले त्या वेदकर्त्या ऋषींना आणि विचारवंतांना वर्ण-जातीच्या वेष्टणात गुंडाळून बाजूला ठेवण्यात आले. इंग्रजी भाषा हीच केवळ आधुनिक जगामध्ये टिकेल आणि जो इंग्रजी शिकेल तोच जगात जगू शकेल अशा अभिनिवेशाने मराठीकडेही हेतूपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले. मग प्राचीन भाषांनी संपन्न असलेल्या आपल्या देशातील जागतिक आद्य वाङ्मयाकडे कोण पाहणार? बरे, इंग्रजी शिक्षण घेतले तरी तेही केवळ आर्थिक संपन्नता प्राप्त व्हावी यासाठी घेतले जावे. त्यामुळे आर्थिक संपन्नता हाच शिक्षणाचा केवळ निकष ठरला. मग इंग्रजी येत असूनही माणसामध्ये माणूसपण आणणाऱ्या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे

विचार वाचणार कोण? शिवाय मुळात ज्या मानवशास्त्रातून सारी शास्त्रे निर्माण झाली त्याचा कुणी विचारही करीत नाही अशी स्थिती निर्माण झाली. त्यामुळे अर्थातच तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासाचे निकष बदलले. परिणामी लिहिल्या जाणाऱ्या पुस्तकांची संख्या कमी झाली..

परंतु तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र हे मानवाचे भौतिक जीवनामध्येही प्रागतिकता आणणारे विषय आहेत, हे समजून घेतले पाहिजे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यांना कुठल्याही सीमारेषा नाहीत. मानवाच्या जगण्याच्या प्रत्येक क्षणाचे आणि त्याला पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे चिंतन हे तत्त्वज्ञानामध्ये रूपांतरित होऊ शकते. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र ही शास्त्रे नसून विचार करण्याच्या पद्धती आहेत, हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत हा याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे शक्य नाही आणि जोपर्यंत जीवनाभिमुख असणाऱ्या या विचारधनाचा परिचय होत नाही, तोपर्यंत त्याच्या जगण्याचा आशय त्याला गवसणे शक्य नाही. याच विचारातून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने इसवी सन १८६४ ते १९४७ या कालखंडातील काळाच्या ओघात नष्ट होत असलेल्या दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाचा प्रकल्प मराठी भाषकांसाठी आखला आहे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र या विषयांचा परिचय नव्याने होणे गरजेचे आहे. पाश्चात्त्य व भारतीय तत्त्वचिंतकांचा परिचय होणे आणि त्यांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचणे हे गरजेचे आहे. तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र म्हणजे केवळ क्लिष्ट वा ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून बसलेली शास्त्रे नसून पदोपदी पडणाऱ्या प्रश्नांना उत्तरे मिळवून देणारी शास्त्रे आहेत, हे समजावे हा त्यामागचा हेतू आहे. नीतिशास्त्र समजल्याशिवाय नैतिक जीवन म्हणजे काय, हे कसे समजावे आणि नैतिकतेचे अधिष्ठान आपल्या वर्तनात कसे यावे? याकरिता प्राचीन भारतीय व पाश्चात्त्य नीतितत्त्वापासून ते आधुनिक काळातील विद्वानांची नीतिशास्त्रांवरची मते समजावी, अशा ग्रंथांची निवड करण्यात आलेली आहे. तत्त्वज्ञान म्हणजे केवळ आदिभौतिक बाब नव्हे, तर जगण्याचेही तत्त्वज्ञान असते. नीतिशास्त्र हाही तत्त्वज्ञानाचाच भाग आहे. धर्माचे तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान असे तत्त्वचिंतनाचे विभिन्न विषय किमान सुशिक्षितांच्या दृष्टीस तरी पडावे हाच यामागचा हेतू आहे. विभिन्न तत्त्वज्ञानपर ग्रंथसंपदा तशी अफाट असली तरीही किमान तत्त्वज्ञान व नीतिशास्त्रची चौकट सामान्यांना समजावी व त्यांनी अभ्यासास उद्युक्त व्हावे ही अपेक्षा आहे. त्यासाठी काही महत्त्वाच्या ग्रंथांची निवड पुनर्मुद्रणासाठी करण्यात आलेली आहे.

संपादन करताना काही महत्त्वाच्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. मूळ लेखकांचे ग्रंथ वा त्यांनी केलेला अनुवाद हा जास्तीत जास्त त्यांच्या मूळ लेखनाप्रमाणेच ठेवण्यात आलेला आहे. तत्कालीन मराठी भाषेमध्ये उपयोगात आणलेले शब्द वा व्याख्या यांना तसेच ठेवण्यात आलेले आहे; परंतु त्या त्या जागी प्रचलित मराठी शब्दांची योजना काय आहे, हे टिपा देऊन सांगण्यात आलेले आहे किंवा काही ठिकाणी काही महत्त्वाच्या

अवतरणांचा समावेश टिपेमध्ये करण्यात आलेला आहे. काही जागतिक ग्रंथ हे केवळ दुर्लक्ष झालेले आहेत. त्यांच्या बाबतीत असे म्हणता येते की, त्या ग्रंथांचे मराठी अवतरण हेच काय ते अभ्यासार्थ उपयुक्त आहे. काही ग्रंथांचा अनुवाद होताना त्यातील बरेचसे लेखन हे संदर्भहीन वाटते. मूळ पुस्तकाचा लेखनाचा कालखंड, त्याचा अनुवादाचा कालखंड आणि अनुवादातील मराठी भाषेची उपयोजनाची पद्धती पाहता ते तसे वाटू शकते; पण त्या काळातील त्या पुस्तकांची व ज्ञानप्रसाराची गरज पाहता ते केलेले आहे, हे लक्षात येते. अशा वेळी ससंदर्भ टिपा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे ग्रंथ वाचताना त्यातील कालबाह्यता जाणवणार नाही.

प्रत्येक ग्रंथाचा समावेश करताना एक प्रदीर्घ प्रस्तावना देऊन त्याचा समावेश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच उपलब्ध ग्रंथांच्या आधारे त्या त्या तत्त्वज्ञांच्या कालातील धागे जोडण्याचा एक प्रयत्न केला आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान असो वा नीतिशास्त्र त्या त्या विषयाच्या लेखन काळातील विविध विचारांना जोडून घेत सलगता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मानवाच्या वैचारिक उत्क्रांतीच्या एका वळणाचे आपण शब्दश: का होईना; पण साक्षीदार होत आहोत, याची जाणीव होत आहे. प्रत्येक ग्रंथाचा परिचय हा त्यातील विचारवंतांच्या विचारांचे केवळ परिशीलन नसून त्यांच्या पर्वकाळात, समकाळात व उत्तरकाळातल्या घडलेल्या वैचारिक मंथनांचा आलेख आहे. तो सद्य:काळातील विचारांसोबत आणण्याचा आणि सद्यकालीन जीवनपद्धतीशी जोडून पाहण्याचा एक प्रयत्न आहे. हे करीत असताना विषयाचे वाचकांना आकलन सुलभतेने व्हावे, हा विचार मनात होताच. त्यासाठी अनेक ठिकाणी पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा सीमारेषा न आखता परस्पर तौलनिक संदर्भही दिलेले आहेत. भारतीय मानस विशेषतः मराठी मानस हे सश्रद्ध आणि आध्यात्मिक आहे; परंतु असे असले तरीही ते विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादीही आहे याची जाणीव ठेवून विविध संदर्भाची रचना केलेली आहे. महाराष्ट्रातील संतसाहित्य हा मराठी माणसाचा सांस्कृतिक आत्माच आहे, असे म्हणावे लागेल. शक्य तिथे त्यांच्या वचनांचा संदर्भ देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय तत्त्ववेत्ते काय म्हणतात, हे आकलन होण्यासाठी संतांचे संदर्भ या ओळखीच्या खुणा ठरतात, तर विशेषतः पाश्चात्त्य विचारवंतांचे विचार समजण्यासाठी उपनिषदादी संदर्भ हे जास्त वैचारिक स्पष्टता आणून देतात. त्यासाठी अनेकविध ग्रंथांतील संदर्भ देण्यात आले आहेत.

औद्योगिक क्रांतीनंतर गेल्या शतकभरामध्ये आमुलाग्र बदललेल्या जीवनपद्धतीने अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जीवितार्थाची नवी साधने उभी राहिली असली तरीही सामान्य माणसाच्या आयुष्यातील जगण्याची असोशी गेली हे वास्तव आहे. हाताचे काम यंत्रावर गेले, उत्पादनाचा वेग वाढला, तरीही माणसाला पोटासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून किंचितही सुटका झाली नाही, उलट जगण्याची स्पर्धा वाढली. त्याखेरीज गेल्या शतकभरातच साम्राज्य आणि शस्त्र अशा दोन स्पर्धाही निर्माण झाल्या. दोन महायुद्धेही

झाली. विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे का असा प्रश्न पडावा असे सुप्त युद्ध विविध पातळ्यांवर चालू आहे. आता शस्त्रांचे युद्ध तर चालू आहेच, त्याखेरीज मानवाच्या मानवी अस्तित्वावर 'खरेच हाही मानवच आहे का?' असा प्रश्न पडावा, असे वैचारिक युद्धही चालू आहे. उत्क्रांत मानवाचे लक्षण समजले जावे अशी व्यवस्थाच युद्धाचे कारण बनत आहे. धर्म व तत्त्वज्ञान हे शांततेसाठी की शांततेच्या विनाशासाठी हा प्रश्न पडत आहे. अशा वेळी खऱ्या वैचारिक विश्वाची ओळख सामान्य माणसाला होण्याची गरज आहे. त्याने नैतिकतेच्या प्रश्नावरून कुणावरही अगदी स्वतःवरही संशय व्यक्त करावा, अशी ही वेळ आहे. अत्यंत अस्थिर अशी जीवनपद्धती, राजकीय स्थिती, धर्म, नीती आणि तत्त्वज्ञानाच्या नावाखाली होत असलेली फसवणूक, कोसळत चाललेले सामाजिक स्वास्थ्य यामुळे माणसाला मानवी जगण्याची शाश्वतता वाटू नये अशी स्थिती आहे. अशा वेळी एकच उपाय तो म्हणजे जगण्याचे इप्सित काय, मूल्य काय हे जाणले जावे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा नेमका याच काळात परिचय होण्याची गरज आहे आणि हीच खरी या अभ्यासामागची प्रस्तुतताही आहे. वाचक यामागची ही भूमिका समजून घेतीलच. अभ्यासकही हे विचारधन पुढे घेऊन जातीलच.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा प्रकल्प हाती घेऊन अभ्यासकांना एक दालन खुले करून दिले आहे. संपादनाची जबाबदारी पार पाडताना अनेक विषयांच्या अभ्यासास उजाळा मिळाला. तुलनात्मक अभ्यास मांडताना बरेच काही शिकता आले. अर्थात, मूळ ग्रंथकारांच्या परिश्रमाच्या तुलनेत हे काही फार नाही. तरीही त्रयस्थपणे सारे काही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वाचक आणि अभ्यासक या ग्रंथाचा लाभ घेतील, अशी खात्री आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ही जबाबदारी माझ्याकडे सोपवली त्याबद्दल मंडळाचे माजी अध्यक्ष माननीय श्री. बाबा भांड सर, विद्यमान अध्यक्ष माननीय श्री. डॉ. सदानंद मोरे सर, मंडळाचे सचिव व सर्व सदस्य मंडळाचे आभार व्यक्त करतो.

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रपर या ग्रंथाचे सर्व खंड अभ्यासकांच्या संग्रहात असतील, अशी खात्री आहे.

- वसु भारद्वाज
ग-३५, ज्ञानेश्वर कॉलनी,
मध्यवर्ती परिसर, म. फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर. पिन-४१३ ७२२
भ्रमणध्वनी : ९८५०७७८९४८,
९४०४११३२१२

संपादकीय

तत्त्वज्ञान : समग्र अनुभवाचे शास्त्र

तत्त्वज्ञान म्हणजे नेमके काय आणि या विषयामध्ये नेमका कोणत्या गोष्टींचा अभ्यास होतो हा सामान्य माणसाला नेहमी पडणारा प्रश्न आहे. सहसा तत्त्वज्ञान म्हटले की, काहीतरी क्लिष्ट आणि अनाकलनीय असेल असे वाटू लागते. बऱ्याच जणांचा तर हाही गैरसमज असतो की, तत्त्वज्ञान म्हणजे जगण्यापलीकडे जाऊन स्वर्गनरकादी पारलौकिक किंवा काही तात्त्विक कठीण गोष्टी समजून घेण्याची काहीतरी बाब आहे; पण तसे काहीही नसते. तत्त्वज्ञान म्हणजे अगदीच सोप्या भाषेत सांगायचे झाले, तर तत्त्वासंबंधीचे ज्ञान! तत् चा म्हणजे ते, जे काही समोर आहे ते, अर्थात समग्र वस्तुजात! या तत्चा तत्पणा म्हणजे तत्त्व! जसे माणसाचे मनुष्यत्व किंवा गायीचे गोत्व असते तसे. या तत्चा सार असते ते तत्त्व! थोडक्यात, आपल्या भोवतालामध्ये जे काही आहे त्याचे सार काय, त्याचा अर्थ काय आणि समग्र वस्तुजाताचे वास्तव असे काही स्वरूप आहे काय, असेल तर ते नेमके कसे आणि कोणते, या समग्र अस्तित्वाचा अर्थ काय आहे, तात्पर्य काय, हे सारे प्रश्न तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अभ्यासावे असे असतात. थोडक्यात, तत्त्वज्ञान म्हणजे काही विश्वाबाहेरील गोष्टी समजून घेण्याचे शास्त्र नसून दृश्य जगात जगताना भोवतालासंदर्भात जगण्याचा आशय शोधणे आहे. तत्त्वज्ञानाच्या या क्षेत्रामध्ये केवळ भारतीयच नव्हे, तर पाश्चात्त्य जगातही विचारवंतांनी मोठे योगदान दिलेले आहे. ढोबळमानाने अध्ययन करताना, या विषयाचा परिचय करून घेताना सहसा पौर्वात्त्य तत्त्वज्ञान आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान असे निर्देशन केले जात असले आणि मांडणीतील तपशिलासह अनेक भेद असले तरीही अभ्यासाचे उद्दिष्ट मात्र मानवी अस्तित्व, जीव आणि जगत् यांच्यासापेक्ष सत्याचे यथार्थ दर्शन हेच आहे. मानवाच्या समग्र अनुभवराशीला एकत्रित करून त्याचा यथायोग्य परामर्श घेऊन

त्याच्या सारतत्त्वात पूर्णत्वाचा अनुभव घेणं हेच उद्दिष्ट असल्याने तत्त्वज्ञानाला मानवाच्या समग्र अनुभवाचे दर्शन घेणारे शास्त्र मानायला हरकत नाही. संस्कृत आणि हिंदीमध्येही तत्त्वज्ञानाला 'दर्शन' अशीच संज्ञा आहे. दर्शन या शब्दाची व्याख्या करताना 'दृश्यते अनेन इति... दर्शनः' ज्याद्वारे व्यक्तीला सत्याचे यथार्थ स्वरूप कळते ते दर्शन अशी केलेली आहे. तत्त्वज्ञान वा दर्शन हे दुसरे तिसरे काही नसून मानवी संवेदनेला प्रतिभेच्या गवाक्षातून होणारे सत्याचे यथार्थ दर्शन आहे.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा एकंदर परामर्श घेताना काही महत्त्वाच्या गोष्टींचा आढावा घेणे गरजेचे होऊन बसते. एकंदर तत्त्वज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन... सामान्य माणसाचा आणि अभ्यासकांचाही समजून घेणे हा एक वेगळा विषय होऊ शकतो. सामान्य माणूस सहसा या विषयाच्या अभ्यासाकडे न वळण्याचे कारण काय आहे हे आपण मागेच पाहिले आहे. अगदी विविध विषयांचे अभ्यासकही तत्त्वज्ञानाकडे वळताना जरा साशंक असल्याचे आढळतात. मुळात तत्त्वज्ञानाविषयी संशय असण्याचे कारणही समजून घेतले पाहिजे. तत्त्वज्ञान ही एक चिंतनपद्धती आहे, हे यामागचे मूळ कारण आहे आणि चिंतन कशासाठी करायचे हेही समजून घेता आले पाहिजे. तत्त्वज्ञान या विषयातील चिंतनाला ते अपूर्ण आणि शंकास्पद प्रतिपादन करते म्हणून टाळले जाते, हा महत्त्वाचा भाग यात आहे. परमार्थ ज्ञान हे केवळ अशक्य आहे, अशा प्रकारचे कुठलेही ज्ञान मानवी बुद्धीला होणेच शक्य नाही, हा या प्रतिपादनामागचा आविर्भाव आहे; पण एक महत्त्वाची बाब अशी आहे की, धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान याची अगदी निकट अशी सांगड एक पौर्वात्य अर्थात भारतीय दर्शने वगळता इतर कुठेही घातली जात नाही. पौर्वात्य दर्शनाचे ते वैशिष्ट्ये आहे की, इथे तत्त्वज्ञान आणि धर्म व नीतिशास्त्र या तिन्हीच्या सीमारेषा इतक्या धूसर आहेत की, नेमकं तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र यांची सांगड कशी व कुठे घातली गेलेली आहे, हे सांगताही येत नाही. नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञान तर एकमेकांपासून किंचितही विलग नाही, असे वाटू लागते; पण एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, मानवाचा मूळ स्वभाव हा असे तात्त्विक प्रश्न उभे करून त्याची उत्तरे शोधणे हाच आहे.

दार्शनिक अर्थात् तात्त्विक समस्या ही कितीही मोठी असो, माणूस त्यावर आपले मत व्यक्त केल्याशिवाय काही राहू शकत नाही, मग भलेही त्याच्या सांगण्यात दर्शनशास्त्रीय पारिभाषिक संज्ञांचा उपयोग असेल वा नसेल. या विश्वाच्या कोड्याविषयी तो बोलणारच, तो आस्तिक असेल तर ईश्वराविषयी मत मांडेल, नसेल तर ईश्वरीय सत्तेला नाकारण्यासाठी चार गोष्टी तो सांगणारच. अगदीच सांगायचे झाले तर एखाद्याची वृत्ती ही अगदीच मौजमजेची असली तरीही तो आपल्या जीवनातील सुखासीनतेविषयी काही ना काही तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न नक्कीच करणार. तत्त्वदर्शनाचे मूल्य आहे ते केवळ असे आहे.

तत्त्वज्ञान वा दर्शन म्हणजे काय आणि त्याचा अर्थ काय आहे हे आपण पाहिले. आता आपण तत्त्वज्ञानातून कोणकोणत्या गोष्टी साध्य होतात, हे पाहू.

१. तत्त्वज्ञान मानवाच्या समग्र अनुभवाचे दर्शन घडवते

केवळ विज्ञान हाच मानवाच्या अभ्यासाचा विषय असू शकतो, बाकीची शास्त्रे नसतात असे नाही. जीवशास्त्र जैविक स्तरावरचा प्रवास स्पष्ट करते व अर्थशास्त्र आर्थिक व्यवहाराचे विश्लेषण देते. अशा अनेक शास्त्रांचा समावेश मनुष्याच्या जगण्यामध्ये असतो; पण संबंध अनुभवराशीला एकत्रित करून त्याचे सुसंबद्ध व्यवस्थापन करण्याचे काम तत्त्वज्ञान करते. विल ड्युरंटने केलेली तत्त्वज्ञानाची व्याख्या अशीच आहे, 'आपल्या संपूर्ण अनुभवाचा अन्वय आणि अर्थ लावण्याचा प्रयत्न म्हणजे तत्त्वज्ञान...!' 'A study of experience as a whole or a portion of experience in relation to the whole.'

२. सुसंगतपणे अंतिम प्रश्न सोडण्याचा प्रयत्न करते

मानवाच्या समग्र अनुभवाचे दर्शन तत्त्वज्ञान हा विषय घेतो, असे म्हटल्यावर त्यामध्ये उपस्थित होणारे प्रश्न हे अंतिम आणि सर्वव्याप्त असणार हे अगदी उघड आहे. एक उदाहरण नेहमी दिले जाते की, पुढे जाण्यास अजिबात मार्ग नाही, अशा रस्त्याने पाठलाग केल्यास तोंड फिरवून मांजर पाठलाग करणाऱ्याच्या अंगावर येते. मानवाच्या जगण्यात असे अनेक प्रश्न असतात, ते सुटत नाहीत, तर अंगावर येतात. अशा प्रश्नांना अंतिम प्रश्न मानून त्यांच्याशी दोन हात करण्याचे सामर्थ्य या विषयात असते. हा असे प्रश्न सोडवण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न असतो.

३. इंद्रियांच्या अतीत असणाऱ्या विषयांचे चिंतन

सहसा अनुभवराशी म्हटले की, मानवाला विविध इंद्रियांनी येणारे अनुभव आपण गृहीत धरतो; पण अनेकदा असेही होते की, काही विषय हे इंद्रियांच्या अनुभव क्षमतेच्या कक्षेत येतच नाहीत. उदाहरणार्थ, आत्मतत्त्व हे काही इंद्रियांच्या अनुभवास येणारे तत्त्व मुळीच नव्हे, तसेच ईश्वरतत्त्व हेही काही मानवी इंद्रियांच्या कक्षेत येणारे नव्हे. इंद्रियगम्य विश्वाला केवळ आधारभूत मानल्या गेलेल्या अशा अंतिम सत्याचा अभ्यास या विषयामध्ये होतो. आठव्या शतकातील नागार्जुनाने तर असे म्हटले आहे की, इंद्रियांनी होणाऱ्या पदार्थांच्या ज्ञानास जर तत्त्व असे संबोधायचे असेल तर लहान मुलांनाही तत्त्ववेत्ता असे म्हणावे लागेल आणि तत्त्वज्ञान विषयाची गरजच काय? थोडक्यात, तत्त्वज्ञान हा इंद्रियातीत असलेल्या गोष्टींचाही अभ्यास आहे, असे स्वीकारावे लागते.

४. तत्त्वज्ञान म्हणजे संकल्पनांचे विश्लेषण

भारतीय तत्त्वज्ञान आणि काही प्रमाणामध्ये पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने अतीत तत्त्व स्वीकारलेले असले तरीही आधुनिक विचारवंतांच्या मते 'इंद्रियातीत वा अनुभवातीत' असे काहीही नाही. अनुभवाला येणाऱ्या संकल्पनांचे विश्लेषण करणे म्हणजेच तत्त्वचिंतन

होय. तत्त्वज्ञानाचे खरे काम हे विश्लेषणाचे असते हे मात्र खरे! सामाजिक वा राजकीय तत्त्वज्ञानाचे हेच वैशिष्ट्ये आहे. तिथे संकल्पनाचे विश्लेषण देणे अत्यंत आवश्यक होऊन बसते. नीतिविषयक संकल्पना वा सौंदर्यासारख्या संकल्पनांना मूलभूत मानण्यात येते, कारण त्यावर इतर संकल्पना आधारलेल्या असतात. अशा संकल्पनांचे विश्लेषण देणे हेही तत्त्वज्ञानाचे काम आहे.

५. विज्ञान सिद्धांतांचा समन्वय

हर्बर्ट स्पेन्सरसारख्या विचारवंताने अशा प्रकारचा प्रयत्न केला. अशा विचारास त्याने संश्लेषणात्मक व संकलनात्मक तत्त्वज्ञान (synthetic philosophy) असे नाव दिले. निरनिराळ्या विज्ञान शाखांतील अनेक सिद्धांतांचा समन्वय त्यात असावा, असे अनेकांचे म्हणणे आहे.

६. तत्त्वज्ञानात अभ्यास विषय हा महत्त्वाचा नसून विचार करण्याची पद्धत महत्त्वाची आहे

तत्त्वज्ञानात गृहीत असे काही धरलेले नसते. कुठल्याही गोष्टीची चिकित्सा करीत शक्य तितक्या जवळ जायचे हे त्याचे वैशिष्ट्ये असते. अशा वेळी आपल्याच चिकित्सा पद्धतीचीही चिकित्सा करायची, ही बाब महत्त्वाची असते. तत्त्वज्ञान म्हणजे विचार करण्याची रीत! सिद्धांतांचा संग्रह नव्हे.

७. तत्त्वज्ञान एकमत नसले तरीही तत्त्वांचे ज्ञान मात्र नक्कीच होते

तत्त्वज्ञान म्हणजे केवळ सिद्धांत स्थापना नव्हे. ती अखंड चालणारी प्रक्रिया आणि कृती आहे. कुठल्याही गोष्टीकडे बघण्याचे अनेक दृष्टिकोन असू शकतात, त्यामुळे दर्शनही बदलते. आपण दर्शन हा शब्द वापरतो, तो केवळ याचसाठी! जीवनाचे मूल्यांकन आपण जितक्या दृष्टिकोनातून करू शकू तितकी विभिन्न मते असू शकतात.

८. तत्त्वज्ञानाचे लाभ कोणते?

तत्त्वचिंतन करून आपल्या वृत्तींना विचारपूर्वक वळण लावता येते. तत्त्वज्ञानाशी परिचय असेल, तर माणसाचे सर्वच संदर्भ व्यापक होतात. अगदी स्वतःच्या दुःखाकडेही तो विश्वाच्या संदर्भाने पाहतो, हे महत्त्वाचे आहे. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्याला एक वैचारिक शिस्त लागते, ही बाब अधोरेखित करावी अशी आहे.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान : परिचय आणि विस्तार

श्री. दत्तात्रेय गोविंद केतकरलिखित पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, पुष्प पहिले आणि दुसरे, या पुस्तकाचा उद्देशही असाच पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाशी आपला परिचय करून देण्याचा आहे.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा आणि त्यातील विचारवंतांच्या चिंतनाचा परिचय करून घेताना त्याचा एकंदर आवाका... व्याप्ती आणि त्याचे तत्कालीन सामाजिक, राजकीय परिणाम रेखाटणे, तसेच उत्तरकालीन विचारवंतांच्या चिंतनावर झालेले परिणाम आणि एकंदर परिवर्तन रेखाटणे आवश्यक असते. दार्शनिक विचारधारांचा अभ्यास हा देश, काल आणि स्थितीचा दर्शक ठरतो. एवढेच नव्हे, तर मानवाच्या एकंदर वैचारिक प्रागतिकतेचे दर्शनही त्यातून घडते. प्रस्तुत पुस्तकामध्ये हे सारे लेखकाने अतिशय सोप्या शब्दांमध्ये साधले आहे, असे म्हणावे लागेल. पुष्प पहिले, ग्रीक आद्य तत्त्वज्ञ थेल्स आणि त्याचे शिष्य व पुष्प दोन, सॉक्रेटिस या दोन्ही भागांमध्ये एकंदर युरोपियन तत्त्वज्ञानाचा सांगोपांग परिचय होईल आणि त्यानुसार अभ्यासाचा पाया तयार होऊन त्याला पुढील दिशा मिळेल, असा लेखाजोखा मांडला आहे. त्याचा तुलनात्मक व संक्षिप्त आढावा घेतल्यास अध्ययनाला एक निश्चित अशी दिशा मिळेल.

प्राचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान कालखंड (इ. स. पू. ६२५ ते इ. स. ४७६) एवढ्यापुरते बोलायचे झाल्यास त्याचे दोन भाग सहज करता येतात. त्यातील पहिल्या भागाला ग्रीक तत्त्वज्ञान असे म्हणता येईल. याचा काळ साधारणपणे इ. स. पू. ६२५ ते इ. स. पू. ३२२ म्हणजे सुप्रसिद्ध विचारवंत ॲरिस्टॉटलच्या मृत्यूपर्यंतचा असा आहे. दुसरा भाग ग्रीकोरामन तत्त्वज्ञानाचा आहे. ज्याचा काळ इ. स. प. ३२२ ते इ. स.४७६ पर्यंत म्हणजे रोमचा पाडाव होईपर्यंतचा मानला जातो. यातील पहिल्या भागाचे पुनश्च तीन विभाग पाडता येतात. त्यातील पहिला कालखंड हा विश्वरचनावादी तत्त्वज्ञानाचा (Naturalistic philosophy) हा इ. स. पू. ६२५ ते इ. स. पू. ४८० असा आहे. दुसरा मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञानाचा (Anthropologic philosophy) हा इ. स. पू. ४८० ते इ. स. पू. ३९७ असा मानला जातो, तर तिसरा हा योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा (Systematic philosophy) हा इ. स. पू. ३९९ ते इ. स. पू. ३२२ असा गणला जातो.

दुसऱ्या ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाचेही ढोबळमानाने दोन भाग केले जाऊ शकतात. पहिला टप्पा आहे तो नीती तत्त्वज्ञानाचा (Ethical philosophy) ज्याचा कालखंड हा इ. स. पू. ३३२ ते इ. स.१०० असा आणि दुसरा टप्पा आहे तो धर्म तत्त्वज्ञानाचा (Religious philosophy) जो इ. स. १०० ते इ. स. ४७६ असा गणला जाऊ शकतो. प्रस्तुत पाश्चात्त्य तत्त्वज्ञान या ग्रंथामध्ये श्री. द. गो. केतकर यांनी सॉक्रेटिसच्या मृत्यूपर्यंत म्हणजे इ. स. पू. ३९९ इथपर्यंतचा काळ रेखाटला आहे, म्हणजे जवळ जवळ योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा (Systematic philosophy)... प्लेटोचा कालखंड सुरू होईपर्यंतचे विचारदर्शन त्यात आहे, अर्थात तत्त्वज्ञानाला अगदी सुव्यवस्थित स्वरूप येण्यास सुरुवात होत असतानाचाही कालखंड त्यात आहे. पुढील नीतिविषयक आणि धार्मिक तत्त्वज्ञानाचा काही भागही आपण दुसऱ्या ग्रंथात पाहणार आहोतच.

स्वरूप आणि सिद्धांत

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा परामर्श घेताना केतकरांनी विश्वरचनावादी आणि मानववंशवादी तत्त्वज्ञानाचा कालखंड या ग्रंथात रेखाटला आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य हे आहे की, आजपावेतो विविध शोधांच्या असीम अशा स्थितीला पोहोचलेल्या विज्ञानगंगेची धारा प्रवाहित करणारी गंगोत्री विश्वरचनावादी तत्त्वज्ञानामध्ये सर्वप्रथम दिसून येते. धर्म आणि धर्माचे स्वरूप साधारणपणे असेल तसे स्वीकारून वा त्याकडे दुर्लक्ष करीत वा नाकारत केवळ बाह्य वस्तुजाताकडे तत्त्वज्ञानाचे लक्ष केंद्रित झालेले दिसून येते. ही बाब पाश्चात्त्य देशामध्ये महत्त्वाची ठरली असे मानायला हरकत नाही. कारण विज्ञानाच्या शोधाने मानवाचे जीवन सुखकर, गतिमान आणि उन्नतही केले, हे मान्य करायला हरकत नाही. पाश्चात्त्य विचारधारेतील तत्त्वज्ञान हे तेव्हा भौतिक वास्तवाशी निगडित होते म्हणूनच आज तिकडील विज्ञान हे पराकोटीच्या उंचीवर पोहोचले आहे. याचा अर्थ असाही नव्हे की, भारतामध्ये अशा प्रकारचे विज्ञान नव्हते किंवा वैज्ञानिक विचार करणारी माणसे नव्हती, फक्त त्यावर संशोधनाच्या पद्धतीने विचार करण्याची पद्धत रूढ झालेली नव्हती. मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञानाचा विचार करताना सोफिस्टांपासून सुरुवात होते आणि साधारणपणे सोफिस्टांच्या समकालातच सॉक्रेटिसचं अवतरण झालेले होते. सोफिस्टांचा काळ हा तर्कवादी आणि वितंडवादी मानला जातो. सोफिस्टांमध्ये प्रोटॅगोरस, जॉर्जियस वगैरे विचारवंतांचा समावेश होता. अर्थात् सोफिस्टांचा काळ हा तसा तात्त्विकदृष्ट्या फार वाईट काळ असावा वा होता, असे नाही. सोफिस्टांच्या विचारशैलीमुळे तत्त्वज्ञान हे मानवकेंद्रित झाले असे म्हणता येईल. केतकरांनी सोफिस्टांचा आणि सॉक्रेटिसचा काळ हा समकालीन म्हणून एकत्रित मांडला आहे. सॉक्रेटिसवरही तो सोफिस्ट असल्याचा आरोप अनेकांनी केलाय हेही तितकेच खरे! केतकरांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आपण तसाच संक्षिप्त परिचय करून घेऊयात.

विश्वरचनावादी तत्त्वज्ञान (Naturalistic philosophy)

वास्तविक पाहता केतकरांनी असं ग्रंथाचं विभाजन केलेले नाहीय; पण क्रमशः या पद्धतीने समजून घेतल्यास एकंदर वैचारिक स्थित्यंतराचा कालखंड समजायला सोपा जातो. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या बाबतीत महत्त्वाची बाब सांगायची झाल्यास विश्वरचनावादी तत्त्वज्ञानाचा पहिला काळ हा जीवशास्त्राच्या आणि एकंदरच आधुनिक विज्ञानाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. हे विश्व कोठून निर्माण झाले असावे, या दृश्यमान असलेल्या भौतिक विश्वाचे मूळ स्वरूप काय आहे, हे चिंतनाच्या आधारे त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला. खरे तर पाश्चात्त्य काय; परंतु पौर्वात्य अगदी भारतीय दर्शनामध्येही तत्त्वचिंतकांनी हा विचार नक्कीच केला आहे. बाह्य जगतातील वस्तुजात, काळ, आणि जडविश्वात क्रमशः होणारा उद्भव व ऱ्हास हाच विचारवंतांच्या प्रतिभेला खरा संप्रेरक ठरत असावा. भारतीय दर्शनाचा विचार

केला तर ऋग्वेदातील नासदीय[१] सूक्त (ऋग्वेद, अ. ८, अ. ७ व १७) हे याचाच अदमास घेणारे आहे. एकंदर दृश्य जगत कसे निर्माण झाले. त्याचा कर्ता कोण तो कसा असावा. मानव त्याला कसा जाण शकेल याविषयीचे औत्सुक्य विचारवंतांमध्ये देशभाषास्थितीनिरपेक्ष आढळून येते. पाश्चात्त्य दर्शनातील या विश्वरचनावादी विचारांच्या कालखंडात आद्य ग्रीक विचारवंत थेल्स, ॲनॉक्झिमॅन्डर, ॲनॉक्झिमिनस व इतर विचारवंतांनी आपापले सिद्धांत मांडून त्यांना बळकटी आणण्याचा प्रयत्न केला आहे. भलेही उत्तरोत्तर काळात ही मते विस्तारत गेली अथवा खोडली गेली तरीही त्यांचे मूल्य मात्र कमी झाले नाही. वास्तविक या तत्त्ववेत्त्यांचे सिद्धांत हे सत्वादी (ontologistic), अद्वैती (monistic) असले तरी किंचित दुराग्रहीही (dogmatic) होते; पण तरीही त्याचे मूल्य त्यामुळे कमी मात्र होत नाही. ज्यांना मायलेशियन वा आयोनियन म्हणून ओळखले जाते, त्या थेल्स, ॲनॅक्झिमॅन्डर, ॲनॅक्झिमीनस यांचा समावेश यामध्ये होतो.

थेल्स यांच्या मते द्रव, घन आणि वायू या तिन्ही अवस्थांमध्ये विद्यमान असणारे जल हे तत्त्व हे सृष्टीचे आदिकारण समजावे. जल हे गतिशील व अवस्थेच्या बाबतीत परिवर्तनशील असल्याने तेच मूलतत्त्व समजावे, असे त्यांचे मत होते. या एका द्रव्यातून बाकी सृष्टीची निर्मिती झाली आहे, असे त्यांना वाटे. भारतीय दर्शनाचे अध्ययन झालेल्या अभ्यासकांना लगेचच पंचमहाभूतात्मक सृष्टीरचना आणि पंचीकरण स्मरण्याची शक्यता आहे; पण इथे पाश्चात्त्य विचारवंत केवळ भौतिक तत्त्वे म्हणून त्याकडे पाहत आहेत. ॲनॅक्झिमॅन्डरच्या मते मात्र ही सृष्टी ज्यातून निर्माण झाली व ज्यात विलीन होते ते काहीतरी अमर्याद, अनंत व गुणरहित असे असावे. हे वाचले की आपल्याला 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते, येन जातानि जीवन्ति यत् प्रयन्त्यभिसंविशन्ति...' हे उपनिषदातील वचन स्मरते; पण औपनिषदिक तत्त्वज्ञानाची सुस्पष्टता तेव्हा पाश्चात्त्य विचारांमध्ये नव्हती आणि तशी साम्यभेदाची पडताळणी करण्यात अर्थ नाही. फक्त ते अपरिमित, भेदहीन, अनंत, अव्यक्त आहे, त्याची सर्वव्यापकता (omnipresence) त्यातून व्यक्त केली इतकेच! केवळ असा उल्लेख केला म्हणून ॲनॅक्झिमॅन्डर वा इतर कुणी परब्रह्म तत्त्वाकडे निर्देश करतात असे नव्हे. नंतर आलेल्या ॲनॅक्सिमिनसने मात्र वायूतत्त्वाला आधारद्रव्य मानले. आयोनियन तत्त्ववेत्त्यांनी विश्वाचे आधारभूत मूलद्रव्य कसे असेल हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

पायथागोरस हा आयोनियन विचारवंत होता. राजकीय मतभेदामुळे देश सोडून गेलेला हा तसा अगदी सुरुवातीचा विचारवंत! जे पायथागोरसने केले ते उत्तरकालीन असलेल्या सॉक्रेटिसने का नाही केले, हा प्रश्न विचारवंतांच्या मनामध्ये येऊ शकतो; पण वैचारिक मतभेद असणे आणि केवळ मतभेदार्थ शिक्षा होणे हा मुलभूत फरक आहे. सॉक्रेटिसने सारं काही स्वीकारून शिक्षा भोगण्याचे ठरवले हे विशेष! पायथागोरस हा राजकीय, धार्मिक, नैतिक, विचारवंत जसा होता, तसाच तो उत्तम गणितज्ज्ञ आणि संगीताचा जाणताही होता,

हे ध्यानात ठेवायला हवे. विशेषतः संगीत आणि गणित या दोन्ही विषयांत तो नावाजलेला होता. भूमितीतील पायथागोरसचे सिद्धांत हे आजही प्रसिद्ध आहेत. अंकगणितातील त्याचे विचार हे समजून घेण्यासारखे आहेत. संख्येची एकतानता हीच अखिल विश्वाच्या निर्मितीचे मूलतत्व आहे, असा त्याचा सिद्धांत होता. मानवी शरीरालाही त्याने गणिताचे निकष लावले होते. शरीर व मन यांच्या एकतानतेवर माणसाचे स्वास्थ्य अवलंबून असते आणि रेचन जसे माणसाचे शरीर शुद्ध करते, तसे संगीतही मनाचे शुद्धीकरण करते, असे त्याचे म्हणणे होते.

वस्तूंचे सारतत्त्व म्हणजे संख्या आहे, असे त्याचे प्रतिपादन होते. याचा अर्थ सर्व पदार्थ संख्याच होत. म्हणून जे संख्येच्या बाबतीत सत्य आहे, तेच वस्तूंच्या बाबतीतही सत्य आहे आणि दोन वस्तूंच्या संबंधाबाबतही सत्य असते. संख्या सम किंवा विषम असतात. भौतिक जड सृष्टी ही पण संख्यात्मक आहे. भौतिक जगात अनेक वस्तू असतात, त्या काही शाश्वत नसतात, तर सतत त्यात बदल होत असतात; पण हे सारे परिवर्तन होत असतानाही त्यात काही न बदलणारे, स्थिर, नित्य, शाश्वत असे काहीतरी तत्त्व असेलच आणि ते तत्त्व... सद्वस्तू म्हणजे संख्या असली पाहिजे, यावर त्याचा ठाम विश्वास होता. पायथागोरसने असा विचार मांडला होता की, संख्यांच्या सर्व श्रेणीची एकता आणि सुसंवाद हा एक या 'विषम-सम' अंकामध्ये समाविष्ट होत असतो. विश्वात द्वंद्वाचा बाह्यतः कितीही विरोध दिसत असला तरीही त्यांच्यात एक प्रकारचा समतोल साधण्याची वृत्ती निसर्गत:च असते. ती वृत्ती त्या सर्वांना एकत्र सांधत असते. या निसर्गात जो नियमितपणा आणि सुव्यवस्था दिसून येते ती सर्व संख्येवरच आधारलेली असते. संख्यांना भौतिक विश्वात नक्कीच अस्तित्व आहे. पायथागोरसने संख्यांच्या साहाय्याने वस्तूचे निर्देशन करण्याचा प्रयत्नही केला आहे, त्याचे हे म्हणणे मात्र अस्ताव्यस्त, निराधार आणि तर्कहीन वाटते. म्हणजे एक संख्या ही बिंदू आहे, दोन म्हणजे रेषा, तीन म्हणजे समतल, चार म्हणजे अगदी ठाम वा पक्के, पाच म्हणजे भौतिक गुण, प्राणशक्ती वा चेतनता म्हणजेच सहा, अशा अनेक गोष्टी त्याने सांगितल्या. पायथागोरसच्या तत्त्वज्ञानाला त्यामुळे 'संख्या रहस्यवाद' (Number mystecism) असे म्हणतात, ते काही चुकीचे नाही. पायथागोरसने संगीताच्या बाबतीतही स्वतःचे मत असेच मांडले आहे. पायथागोरस तसा चिद्वादी होता, शरीर आणि मन यांच्यामध्ये सुसंवाद सांगणारा तो वेगळा विचारवंत होता. या दोन बाबी आणि त्याच्या संख्याशास्त्रीय पद्धतीचा प्लेटोच्या तत्त्वज्ञानावर प्रभाव दिसून येतो.

पायथागोरसची संगीतविषयक सृष्टी कशी होती यावर लेखकाने सांगोपांग विचार केला आहे, ही विशेष बाब आहे. शिवाय त्याची संगीताची दृष्टी उदाहरणासह स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे, हे या ग्रंथाचे वेगळे वैशिष्ट्ये मानावे लागेल. एक महत्त्वाची बाब पायथागोरसच्या बाबतीत अशी सांगता येईल की, तो केवळ तत्त्वज्ञ नसून राजनीतिज्ञही होता. त्याने पायथागोरियन संप्रदाय उभा केला होता. या संप्रदायाचा उद्देश केवळ धार्मिक

जीवन जगणे एवढाच नसून राजकीय वर्चस्व प्राप्त करून समाजाला दिशा देणे हाही होता. त्याचे पायथागोरियन धर्मसंघविषयक नियम वाचले म्हणजे त्याच्या कठोर आचरण संहितेची कल्पना येते. त्या धर्मसंघात कलाकौशल्यासोबतच शारीरिक तंदुरुस्ती, संगीत, चिकित्सापद्धती व गणित या विषयांचा अभ्यास करणेही अनिवार्य होते. गणित या विषयाला तत्त्वज्ञानासोबत जोडून गणितासह विचार करण्याची पद्धती त्याने रूढ केली. पायथागोरसनंतर प्लेटो, देकार्त, लायब्निज, रसेलसारख्यांनी तत्त्वज्ञानात गणिती ज्ञानाला प्राधान्यक्रम दिला आहे, हे विशेष! पूर्वकालीन तत्त्ववेत्त्याचा आत्यंतिक प्रभाव उत्तरकालीन तत्त्ववेत्त्यांवर पडून त्यांनी दार्शनिक नवोपलब्धी आणावी, ही बाब पायथागोरसच्या चिंतनाने साध्य झाली हे मान्य करावे लागेल. लेखकाने बऱ्याच गोष्टींचा उल्लेख केलेला असला तरी याबाबतीत समाविष्ट न झालेले काही मुद्दे अधोरेखित करावे असेही आहेत, ते पाहूयात...

रेने देकार्त (इ. स. १५९६ ते इ. स. १६५०) याने सत्यतेच्या कसोट्यांसाठी गणिताचा उपयोग तर केलाच, शिवाय विश्लेषणात्मक भूमितीचा शोधही लावला. स्पिनोझा (इ. स. १६३२ ते इ. स. १६७७) यांनी भूमितीय क्रियांना सरळ सरळ दार्शनिक क्रिया मानले. जगाची समस्या सोडवण्यासाठी त्याने भौमितिक पद्धतीचा स्वीकार केला. लायब्निज (इ. स. १६४६ ते इ. स. १७१६) याने त्याचा 'चिदणू तत्त्व सिद्धांत' (monads theory) मांडताना गणिताच्या सूत्रांच्या साहाय्याने (differential calculas) मांडला. याच गणिताच्या सूत्रबद्धतेचा उपयोग करून इम्यानुअल कांट (इ. स. १७२४ ते इ. स. १८०४) याने निर्णयशक्तीचे (judgement) विश्लेषणात्मक आणि संश्लेषणात्मक असे दोन विभाग केले. अगदी अलीकडे बर्टाण्ड रसेलने (इ. स. १८७२ ते इ. स. १९७०) तर गणिताला प्रतीकात्मक तर्कशास्त्रात रूपांतरित केले. विश्वात जे जे काही आहे त्याचे सारसूत्र केवळ संख्या आहे असे सांगणाऱ्या, स्वतंत्र संप्रदाय स्थापन करून काही सामाजिक परिवर्तन घडवू इच्छिणाऱ्या, राजकारणात काही प्रमाणात अपयश मिळवणाऱ्या पायथागोरसचा संख्या सिद्धांत अनेक विचारवंतांसोबतच प्लेटोनेही आपल्या प्रत्ययसिद्धांताच्या समर्थनार्थ स्वीकारला होता. काही बाबतीत पायथागोरसच्या गणितीय विचारांचा अतिरेक झाला आणि प्लेटोने त्याच्या गणिताच्या विचारांचा स्वीकार केल्याने त्याचे तत्त्वज्ञान मागे पडले हा आरोप स्वीकारूनही पायथागोरसचे योगदान विसरून चालणार नाही. पायथागोरसच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत काही प्रश्न मात्र उपस्थित केले जाऊ शकतात.

१. गणित, त्यातील अंक आणि दृश्य जगातील प्रत्येक वस्तुजात यांची सांगड घालणे खरेच शक्य आहे का?
२. तत्त्वज्ञानी विवेचन करू शकतो; पण राजकीय अट्टहास करू शकत नाही. जनमानसावर तत्त्वज्ञान लादणे शक्य आहे का?
३. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या परस्पर सामंजस्याने प्रशासनावर मजबूत पकड ठेवता

येऊ शकते, याचे अनेक दाखले आहेत; पण धर्मसत्ता हीच राजसत्ता बनून सार्वभौम प्रजासत्ताक निर्माण करू शकेल का? राष्ट्र प्रशासनार्थ लागणारा राजनीतिविवेक अर्थात राज्यविवेक[२] (reason of the state) हा अंतिम सत्याचा वा परतत्त्वाचा शोध घेणाऱ्या धर्मसत्तेकडून हाताळला जाऊ शकतो का?

४. व्यक्ती वा वर्ग यांच्या श्रेष्ठत्त्वाची संकल्पना विनाशक ठरते.

पायथागोरसच्या एकंदर कार्याचा झालेला दूरगामी परिणाम वाचकांनी ग्रंथ हाताळण्यापूर्वी समजून घेणे अनिवार्य आहे, म्हणून चर्चा मांडावीशी वाटते.

पायथागोरसनंतर केतकरांनी चर्चेसाठी विचारवंत घेतला आहे हिरॅक्लिटस! पण खरे तर कालखंड पाहता आधी झेनोफेनस येतो. झेनोफेनस हा एलियाटिक संप्रदायाचा दार्शनिक! त्या संप्रदायात मुख्यतः झेनोफेनस, पारमिनाईडस् व झेनो येतात. हिरॅक्लिटस व पार्मिनाईडस् हे समकालीन चिंतनविश्वात एकमेकांच्या तत्त्वचिंतनाविरुद्ध मत मांडत होते हे विशेष! हिरॅक्लिटस याला 'रडका तत्त्वज्ञानी' (weeping philosopher) म्हणून ओळखले जाते, ही बाब अनेकांना ठाऊक नसेल. कदाचित त्याच्या आयुष्यातील दारिद्र्य वा विपन्नावस्था त्याला कारणीभूत असेल असे आपल्याला वाटण्याची शक्यता आहे; पण ते काही कारण नाही. कारण तो गर्भश्रीमंत व उच्चशिक्षित असा होता. खऱ्या अर्थाने तो केवळ तत्त्वज्ञ होता, पण स्वतंत्रतेचा पुरस्कर्ता असूनही तो सामान्य माणसांना तुच्छ समजत असे. देशबांधवांविषयी त्याची मते फार चांगली नसत. गंभीर, संदिग्ध लेखनशैली आणि त्यातील दुर्बोधता यामुळे तो 'रडका' ठरला.

'जे सतत बदलणारे, परिवर्तनशील तेच फक्त सत्य असते. जे अविकारी व नित्य भासते ते मिथ्या असते. प्रत्येक वस्तू ही प्रतिक्षण बदलत जाते,' हा त्याच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य सिद्धांत! 'एका नदीत दुसऱ्यांदा पाऊल टाकता येत नाही. कारण दुसरे पाऊल टाकण्यापूर्वी पहिले पाणी वाहून गेलेले असते. केवळ परिवर्तन हेच नित्य असते...' हे जरा बौद्धांच्या 'सर्वं क्षणिक क्षणिकं...' प्रमाणे आहे. हिरॅक्लिटस अग्नी वा तेज यालाच मूलाधार तत्त्व मानतो. म्हणजे थेल्स जल, ॲनॅक्झिमॅन्डर असीम, ॲनॅक्सिमीनस वायू, पारथागोरस संख्या, तर हिरॅक्लिटस अग्नी मूलद्रव्य मानायचा. हाच अग्नी समग्र वस्तुजातामध्ये परिवर्तित होताना दिसतो, असे तो म्हणे. आपल्या तत्त्वज्ञानात 'संघर्ष, विरोध आणि समन्वय' (conflict, negation and synthesis) याला महत्त्व दिले. हे 'द्वंद्वात्मक पद्धती' (dilectic method) प्रमाणे आहे. स्वतः कार्ल मार्क्सने याचा उल्लेख हा 'द्वंद्वात्मक विचाराचा जनक' (father of dilectic method) असा केलाय यातच सारे काही आले. बौद्ध तत्त्वज्ञान आणि हिरॅक्लिटसचे काही विचार यात आत्यंतिक साम्य आहे, हे वाचकांनी ध्यानात घ्यायला हवे. 'परिवर्तन तिथे सापेक्षता' यासारखे विचार बौद्धातही आहेतच.

हिरॅक्लिटसची विचारधारा वाचण्यापूर्वी वाचकांनी एक बाब लक्षात ठेवावी की,

ज्याप्रमाणे विविध विरोधी विचारधारा पौर्वात्य तत्त्वज्ञानात आढळून येतात तशाच इथेही आहेत. समकाळात हे चर्चेच्या माध्यमातून सगळीकडे होतच असावे. ज्या काळात अनित्यत्व व परिवर्तनाचा सिद्धांत घेऊन हिरॅक्लिटस बोलत होता, त्याच काळात झेनोफेनस, पारमिनाईड हे अद्वैत सिद्धांत घेऊन आपापली मते मांडत होते, हेही स्मरणात असू द्यावे.

झेनोफेनस, पारमिनाईड हे दोघेही ईश्वरवादी होते. ईश्वरच सर्व विश्वाचे आदिकारण आहे, ते एकमेव, सर्वव्याप्त, अपरिवर्तनीय, अनादि, अनंत, निराकार, अंतर्यामी असलेले तत्त्व आहे हे अद्वैती सर्वेश्वरवादाचे सूत्र पाश्चात्त्य देशात प्रतिपादन करणाऱ्या एलियाटिक संप्रदायाचा झेनोफेनस हाच प्रमुख मानला जातो. त्याच वेळी 'अग्नीचा नाश म्हणजे वायू, वायूचा नाश म्हणजे पाणी आणि पाण्याचा नाश म्हणजे पृथ्वी...' अशी अग्नी विकारचक्रातून अस्थिर, अपरिवर्तनशील असलेली निर्मिती हिरॅक्लिटस सांगत होता. हे आपल्या 'तस्मात् आकाश, आकाशात वायू, वायोरग्निः' या औपनिषदिक विचारधारेप्रमाणे वाटत असले तरीही ते भिन्न आहे. शिवाय इथे हिरॅक्लिटसला अभिप्रेत केवळ अनित्यत्व, परिवर्तनीयता आहे, नित्य, कूटस्थ ईश्वरत्व नाही. आपल्याकडे आधारद्रव्य असलेले निर्गुण, निराकार, सर्वव्याप्त परब्रह्म तत्त्वच त्याच्या योगमायेने विकारल्यासारखे भासते. इथे शबलब्रह्म व माया किंवा अक्रिय परब्रह्म व अज्ञानमूलक अध्यास असलेली माया किंवा संवित्ती तत्त्व असलेले शिवशक्ती या तपशिलातील भेदात मी जात नाही. ते या ठिकाणी महत्त्वाचे नाहीय. फक्त अंतिम तत्त्व म्हणून सर्वव्याप्त, निर्गुण ईश्वरदत्त अद्वैत'म्हणून एलियाटिक[३] संप्रदायही मानत होता व त्यावर आचारधर्माची उभारणी करीत होता, हे महत्त्वाचे!

हिरॅक्लिटसच्या अनेक वचनांचा आणि व्यावहारिक नीतिपर वचनांचा अनुवाद लेखकाने अतिशय समर्पक शब्दात मांडला आहे, हे विशेष! हिरॅक्लिटसने विश्वाचे नियमन करणाऱ्या कायद्याविषयी प्रतिपादन केल्याचा सुस्पष्ट उल्लेख आहे. हे वाचल्यानंतर लगेच 'ऋत्' या विश्वाचे नियमन करणाऱ्या वैदिक संकल्पनेचे स्मरण होते.

झेनोफेनस आणि पारमिनाईड यांनी हिरॅक्लिटसच्या समकालात अगदी विरोधी असे तत्त्वज्ञान मांडले. आपल्याकडेही हे असे झालेले आहेच. ही प्राकृतिक गरज असते की काय कुणास ठाऊक? या परस्परविरोधी विचारांच्या समन्वयातूनच सत्याकडे जाण्याचा मार्ग गवसत असावा. पारमिनाईडने तर 'अंतिम सत्ता ही स्वतःच एकमेवाद्वितीय असते. तिचे रूपांतरण वा लोप होऊ शकत नाही, ती शाश्वत, नित्य राहते. केवळ तिचे असणे हेच तिचे सारलक्षण आहे. ती अविभाज्य, अखंड व परिपूर्ण असते. तिचे वर्णन शब्दात होत नाही. भौतिक सत्तेचे पूर्ण अस्तित्व तिच्यात सामावले आहे,' असा सिद्धांत मांडला. हे सारे पुनश्च 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते...' किंवा 'यथो वाचो निवर्तन्ते....।' प्रमाणे वाटू लागते. पारमिनाईडने 'खरी सत्ता (सत् ता) ही इंद्रियांना न समजता बुद्धीस समजते, ती इंद्रियांना अगम्य आहे. इंद्रियांना प्रतीत होणारे बाह्य जग भ्रामक, मिथ्या आहे,' असे मानले. या दृश्य

जगतामागे त्याचं आधारद्रव्य असलेली सत्ता हीच खरी आहे, असे मानले. पारमिनाईड व भारतीय विचारवंत यांत 'सत्ता ही बुद्धिगम्य आहे' या मुद्यावर मतभेद होऊ शकतो. भारतीय तत्त्वज्ञान त्यापलीकडे सत्याचे यथार्थ दर्शन मानते, अगदी संत साहित्यही 'मनबुद्धीअगोचर! न चले तर्काचा विचार । उलेख परेहुनि पर । या नाव ज्ञान ॥' (श्रीसमर्थ रामदासस्वामीकृत दासबोध दशक ५ समास ६ ओवी ४) असेच सांगते.

पारमिनाईड ज्या झेनोफेनसच्या अद्वैती मताचा आग्रही होता, त्या झेनोफेनसने सत्तास्वरूपाविषयी मत मांडताना 'ते कधीही उत्पन्न होणे शक्य नाही वा त्याचा विनाश होणेही शक्य नाही. मनुष्याला सृष्टी निर्माण होते वा तिचा नाश झाल्याचा भास होतो, ते केवळ मनाचा विकास म्हणून...' असे मत मांडले. हे जरासे भारतीय तत्त्वज्ञानातील 'अजातवादा'प्रमाणे वाटते. पारमिनाईडनेही भासाभासापलीकडे असणारी सत्य वस्तू प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. या चिद्वादाचे प्रतिपादन वेदविचार व केवलाद्वैतवादापर्यंत पोहोचत आहे, असे वाटत असले तरीही अगदीच 'ब्रह्मजिज्ञासेपर्यंत[४] पोहोचते, असे नाही.

विश्वाचे आदिकारण आणि परमात्म वा संवित्ती तत्त्व याबाबतीत वेदान्ती हे बरेच श्रेष्ठ आणि भाग्यवान आहेत, असे म्हणावेसे वाटते. वेदान्त मतात सखोलता तर आहे, शिवाय वेदान्ती जे शब्दप्रयोग करतात त्याच्या गुह्यतेची उकल केवळ बौद्धिक नसून अनुभूतीच्या स्तरावर होते. शब्दज्ञानाचे रूपांतरण चैतन्याच्या स्तरावर करीत त्याचा अपरोक्षानुभव घेत ज्ञानाचे विज्ञानात रूपांतरण करण्याची क्षमता त्यात आहे.

याच परंपरेतील झेनोचे प्रतिपादनही लेखकाने अतिशय सुलभ भाषेत मांडलेय हे लक्षात येते. झेनोविषयी सांगण्यासारखं फार काही नाही. तो तसा पारमिनाईडचा शिष्य होता. पूर्वकालीन मताला बळकटी आणण्याचे काम तो करीत होता. तो त्याच्या विरोधाभासी युक्तिवादा'साठी प्रसिद्ध आहे. त्यालाच 'झेनोचे विरोधाभासी युक्तिवाद' (zeno's paradoxes) म्हणून ओळखतात. त्याचे सविस्तर विश्लेषण लेखकाने पुस्तकात दिलेय. हे युक्तिवाद केवळ संभ्रमात पाडण्यासाठी नसून विरोधकांची मते खोडण्यासाठी असत. त्यामागोमाग आलेला मेलिससही हेच प्रतिपादन जोरकसपणे पुढे नेत होता, हे महत्त्वाचे!

त्यानंतरचा एंपिडोकल्स हा खर तर 'लोकशाहीचा उपासक' म्हणून ओळखला जायचा; पण किंचित गूढवाद वाढवणारा स्वभाव व प्रसिद्धीसाठी काहीतरी तंत्रमंत्र करण्याची वृत्ती त्याला असावी. ही बाबागिरी कुठे फार चालली नाही. केवळ तत्त्वज्ञान वा विश्वाचे मूलतत्त्व काय असावे, यावर एंपिडोकल्स थांबला नाही, तर पायथागोरस व पारमिनाईडच्या अनेक विचारांवर आपले मत व्यक्त करीत राहिला. अर्थात विश्वाची उत्पत्ती वा विलय होत नाही. पृथ्वी, आप, तेज, वायू हीच चार तत्त्वे अस्तित्त्वात आहेत, ती अभेद असली तरीही त्यांचे मिश्रण सृष्टीतील वस्तुजात घडवतात. ही चार तत्त्वे आणि प्रेम, मैत्री, स्नेह, विग्रह ही चार... अशा दोन शक्ती अविनाशी आहेत. त्यांच्या संमिश्रणातून विश्व निर्माण होते, असा

त्याचा अनेकत्वाचा सिद्धांत आहे. पारमिनाईडच्या तुलनेत एंपिडोकल्स हा विज्ञानाच्या जास्त जवळ होता, असे म्हणता येईल. त्याचे खगोलशास्त्रीय ज्ञान जास्त सखोल होते. ॲनॅक्झॅगोरस हाही एक वेगळा विचारवंत म्हणून त्याच्याकडे पाहावे लागेल. ॲनॅक्झॅगोरस हाही एंपिडोकल्सप्रमाणे विज्ञानात आणि तत्त्वज्ञानात रुची घेणारा असा होता. संपूर्ण परिवर्तन अशक्य आहे, कारण एक गुण दुसरा गुण होऊ शकत नाही. म्हणून केवळ परिवर्तनाचा त्याने स्वीकार केला होता. भोवतालामध्ये अनेक वस्तुजात असतात, केवळ चार वा काही मोजक्या तत्त्वांच्या आधारे त्यांचे विश्लेषण होऊ शकत नाही, द्रव्याचे असंख्य परमाणू त्याचे रूप, रंग, गुण ठरवतात, असे त्याचे म्हणणे होते. ही मांडणी खरं तर तत्त्वज्ञानापेक्षा विज्ञानाला जास्त जवळची आहे. विश्वातील सर्व हालचाली वा परिवर्तन यांना कारण असलेली शक्ती ही चिन्मय आणि अभौतिक आहे, तिला त्याने 'नाउस' (nous) असे नाव दिले. या नाउसलाच 'मन' असेही म्हटले आणि ते असीम असून, सर्वत्र... म्हणजे मनुष्य आणि प्राणिमात्रांमध्येही... एकरूप आहे, असे त्याचे प्रतिपादन होते. हे थोडेसे भारतीय तत्त्वज्ञानामध्ये काही ठिकाणी उल्लेखलेले विश्वमन आहे. सर्व पदार्थमात्रांचे विश्लेषण देताना तो अणुवादावर जरी येत असला तरीही वैशेषिक दर्शनाची सुस्पष्टता त्यात नाही, असे लेखकाने नोंदवले आहे. साधारणपणे मनुष्य भोवतालातील सृष्टिद्रव्ये आणि या सर्वांचा निर्माता असा सर्वशक्तिमान ईश्वर किंवा तशी शक्ती यांच्या मूळ संकल्पनांची उकल व त्यांचा परस्परसंबंध असा साधारण पाश्चात्त्य विचारवंतांचा वैचारिक आवाका दिसतो; पण पौर्वात्य विचारवंतांशी त्यांची तलना करण्यात फारसा उपयोग नाही कारण तेवढी सस्पष्टता त्यात नाही

पण पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये अगदी स्पष्टपणे परमाणूवादाची मांडणी ज्यांनी केली असे दोन विचारवंत ल्युसीपस आणि डिमॉक्रिटस हे लगेचच येतात. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानामध्ये ल्यूसीपसचे नाव परमाणूवादाचा प्रवर्तक म्हणून घेतले जाते. दोघेही अणुवादी होते. परमाणूविषयीचे त्याचे वेड बहुधा आपल्या कणादापेक्षा कांकणभरही कमी नसावे. तो जसा पदार्थ न बघता त्याच्या अणूविषयी चिंतन करायचा, तसाच ल्यूसीपसही असावा. त्याने अणू, त्याच्या स्थिती आणि गतीविषयीही भाकित करून ठेवली आहेत. ती कितपत बरोबर वा चूक हे पुढे भौतिकशास्त्र आणि अणुविज्ञानामध्ये अभ्यासले गेले आहेच; पण परमाणूंची सापेक्ष स्थिती बदलली की गती उत्पन्न होते, गती कमी तेथे त्यांची राहण्याची प्रवृत्ती होते, वगैरे तांत्रिक बाबी या चिंतनातून प्रसवलेल्या कल्पनांचा भाग आहे. या परमाणू आणि त्यांच्या गतीविषयक आत्यंतिक प्रतिपादनामध्ये आत्म्याचेही परमाणू गृहीत धरले आहेत. जडाव्यतिरिक्त कुठला आत्मा गृहीतच न धरल्याने आत्म्याच्या परमाणूविषयी चिंतन मांडता आले आहे. डिमॉक्रिटस हा तसा ल्युसीपसचाच शिष्य! डिमॉक्रिटसने ग्रंथरचनाही तेही भौतिकशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र या विषयांवर केलेली आहे,

हे विशेष आहे. त्या त्या विषयातील सिद्धांत हे पुढे तसेच कायम राहिले की बदलले, हा मुद्दा अजिबात महत्त्वाचा नाहीय. महत्त्व याला आहे की, आधुनिक विज्ञानयुगाचा पाया या काळात तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात घातला जात होता; आणि तसेही विज्ञान हे सतत बदलत जाणारे शास्त्र आहे. हिरॅक्लिटस हा जसा 'रडका तत्त्वज्ञानी' म्हणून ओळखला जात असे तसे डिमॉक्रिटसला 'हसरा तत्त्वज्ञानी' (laughing philosopher) म्हणून ओळखतात.

डिमॉक्रिटसच्या मते, असंख्य, अदृश्य अशा जडद्रव्य अणूंचे हे जग बनलेले आहे. हे अणू अत्यंत सूक्ष्म आहेत. आकार, वजन आणि रूपाच्या बाबतीत हे परस्पराहून भिन्न आहेत. अणू आणि त्याची गती यांचा अगदी व्यवच्छेदक संबंध आहे. अणू हा पदार्थाचा अविभाज्य घटक आहे, तो अविनाशी आहे. भौतिकदृष्ट्या अणूचे विभाजन करता येत नाही. सर्व अणू गुणांच्या दृष्टीने सारखेच असतात, त्याची निर्मिती करता येत नाही, ते अपरिवर्तनीय व अविनाशी आहेत. ते नित्य आहेत. त्यांच्यात स्वभावतः गती असल्याने संयोग व वियोग घडून येतो. प्रत्येक वस्तुमात्राचे कारण अणू असते; पण अणूला कोणतेही कारण असू शकत नाही. हे अणूविषयक त्याचं प्रतिपादन हे आधुनिक भौतिकशास्त्राप्रमाणेच बरेचसे आहे. डिमॉक्रिटसच्या बाबतीत सांगायचे म्हणजे त्याने आपली ज्ञानमीमांसा (epistemology) स्वतंत्रपणे प्रतिपादित केली हे विशेष आहे. अगदी मोजकी पण ससंदर्भ व अभ्यासपूर्ण माहिती लेखकाने दिली आहे, हे विशेष आहे.

मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञान (Anthropologic philosophy) व योजनाबद्ध तत्त्वज्ञान (Systematic philosophy)

या दोन्हींचाही आपण एकत्रितपणे विचार करणार आहोत. कारण पुस्तकात कुठल्याही पद्धतीने विभाजन केलेले आढळत नाही. मानववंशशास्त्रीय अर्थात मानवकेंद्री तत्त्वज्ञानाचा विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागते, ती म्हणजे यामध्ये सोफिस्टांची भूमिका ही तशी महत्त्वाची ठरली आहे. मग भलेही सोफिस्ट धिक्कारले गेले असतील; पण त्यांच्या मतांचा काही प्रमाणामध्ये स्वीकार केला गेला होता हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. एका बाजूला अत्यंत स्वार्थी, संधिसाधू आणि ढोंगी राजकारणी, सत्ताधारी असताना दुसऱ्या बाजूला मात्र सोफिस्टांनी तत्त्वचिंतनाच्या विचारधारेला दिशा देण्याचे आपले काम सुरू ठेवले होते, ही विशेष बाब आहे. कदाचित त्या काळामध्ये सोफिस्टांच्या विचारधारेची गरजही असावी. सोफिस्टांनी बुद्धिवाद आणि चिकित्सक दृष्टिकोनाचा पाया घातला. सोफिस्टांनी ज्या पद्धतीने तत्त्वविचारांचा केंद्रबिंदू हा 'विश्वाची आदिम तत्त्वे कोणती, सत्य काय व त्याचे स्वरूप काय, अंतिम पदार्थ कोणते', याऐवजी मानवाला केंद्रस्थानी ठेवून तत्त्वविचार करण्याची रीत निर्माण केली त्यावरून तरी त्यांची भूमिका ही यात महत्त्वाची ठरते. ही विचारधारा मानवाला केंद्रस्थानी ठेवून जरी असली तरीही हे तत्त्वज्ञान म्हणजे

कांट किंवा इतर विचारवंतांचा आधुनिक मानवतावाद नव्हे. आधुनिक मानवतावाद आणि मानववंशशास्त्रीय वा मानवकेंद्री तत्त्वज्ञानामध्ये बराच फरक आहे. मानवकेंद्री विचारधारा म्हणजे मानवाने प्राप्त केलेले ज्ञान, त्याचे आचार आणि त्याचा धर्म, त्याचे राजविवेकादी विषयांवर चिंतन मांडणे; आणि आधुनिक मानवतावादामध्ये केवळ ऐहिक जीवनातील माणूस हाच एकमेव चिंतनाचा विषय ठरू शकतो. मानवतावादाला आधुनिक युगामध्ये प्रगतिशील विचारधारा समजण्यात येते, तर मानवकेंद्री तत्त्वज्ञानाला मात्र पारंपरिक मानण्यात येते; आणि सोफिस्टांवर जे आरोप आहेत त्याची मूलभूत कारणेही बहुधा हीच आहेत. उदाहरणार्थ, प्रोटॅगोरसने देवदेवतांच्या बाबतीत म्हटले की, देवदेवता आहेत की नाहीत, हे सांगता येत नाही. कारण एक तर विषय अतिशय कठीण व प्रदीर्घ आहे आणि मानवाचं आयुष्य फार काही मोठे नाही. म्हणून देवदेवता नाकारण्यापेक्षा त्यांचे पूजन करावे, हे बरे! आता हे तत्त्वचिंतकाला न शोभणारे काम आहे. कुठल्याही गोष्टीचा प्रमाणरहित स्वीकार हेच सिद्ध करतो की, सोफिस्टांना भलेही देवदेवता मान्य नसतील; पण तेव्हाचा शासकवर्ग आणि धनाढ्य लोक मात्र त्या सर्व गोष्टी मानत. त्यांना नाकारून आपले विचार मांडणे शक्य नाही. म्हणून सोफिस्टांनी सरळ त्याचा स्वीकार करून आपले उद्देश पुढे नेण्याचा प्रयत्न केला. शिवाय युवकांना व्यवहारशिक्षण देण्याचा, त्यांना शासनात सन्माननीय पदावर बसवण्याचा आणि त्या पद्धतीने प्रशासन उभे करण्याचा महत्त्वाचा उद्देश सोफिस्टांचा होता. हे काम ते धन घेऊन करीत असत. म्हणन ज्ञानाची विक्री करणारे अशी हेटाळणीही सहन करावी लागली. सोफिस्टांना उपयुक्ततावादी (utilitarian) आणि व्यवहारिकतावादी (pragmatist) यामुळेच ठरवण्यात आले. म्हणजे एकीकडे स्वार्थलोलुप, ढोंगी, रूढीवादी असा सत्ताधारी वर्ग आणि दुसरीकडे त्यांच्या समर्थनार्थ असलेला उपयुक्ततावादी आणि व्यावहारिक तत्त्वविचार शिकवणारा सोफिस्टांचा धन कमावणारा वर्ग! यामध्ये सामान्य माणसाची जी संभ्रमाची अवस्था झाली असेल त्याची नेमकी स्थिती वर्णन न करताही समजू शकते किंवा सामान्य माणूस हा केवळ 'महाजनो येन गतः सः पंथः' न्यायाने वागत असल्याने तसाच बनण्याचीही शक्यता नाकारता येत नव्हते. अशावेळी सत्ताधाऱ्यांचा ढोंगाचा पडदा दूर करणं आणि सोफिस्टांचे अज्ञान दूर करणे यासाठी कुणी हवा होता. तो सॉक्रेटिसच्या रूपाने प्रकट झाला.

केतकरांनी यासाठी सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान अगदी जीवनवृत्तांतासहित रंगवले आहे. सॉक्रेटिस या नावाचे गारूड असे आहे की, तुम्ही त्याला स्वीकारा वा नाकारा फारसा फरक पडत नाही. कारण तुम्हाला त्याचे मोठेपण स्वीकारावे लागते. पाश्चात्त्य तत्त्वजगतामध्ये तरी सॉक्रेटिसपूर्व तत्त्वज्ञान आणि उत्तरकालीन तत्त्वज्ञान असे दोन भाग सहज करता येतात. मात्र सोफिस्टांचा बराच प्रभाव सॉक्रेटिसच्या काळात होता हे मान्य करतानाच आज सोफिस्टांची विचारपद्धती ही जास्त प्रमाणामध्ये अंगीकारली गेलेली आहे की काय, अशी शंका व्यक्त

करायला जागा आहे. कारण आज सोफिस्ट असण्याच्या वृत्तीचे सामान्यीकरण झालेले दिसत आहे आणि त्यात कुणाला काही वावगे वाटावे असे काहीही नाही.

सॉक्रेटिसचा जीवनवृत्तांत या मथळ्याखाली लेखकाने सॉक्रेटिसचे जीवनचरित्र घेतले आहे, तसेच शेवटची तीन प्रकरणे फिर्याद, सॉक्रेटिसचे आत्मसमर्पण आणि शेवट यामध्येही त्याच्या विषप्राशनापर्यंतच्या सर्व घटनांचा ऊहापोह केला आहे. लेखकाने मांडलेल्या सॉक्रेटिसच्या एकंदर चरित्रातून एक भारावलेपण अगदी स्पष्टपणे दिसून येते. आत्मसमर्पण आणि केवळ तत्त्वासाठी आपला देहत्याग करणे ही गोष्ट तशीही कुणालाही आकृष्ट करणारी आहेच. अर्थात् सॉक्रेटिसची उदात्तता आणि त्याची तत्त्वांवरील निष्ठाही या गोष्टीस प्रेरक आहे. शिवाय समाजामध्ये जेव्हा जेव्हा ढोंग प्राबल्याने जाणवू लागते, तेव्हा तेव्हा एखादा सॉक्रेटिस जन्माला येतच असतो, मग ते ढोंग कसलेही असो ते सर्वांसमोर प्रकट करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नक्की असते. सॉक्रेटिसच्या काळामध्ये समाजामध्ये अत्यंत ढोंगी आणि स्वार्थी लोकांची वाहवा होत होती, अशी माणसे सत्तेत होती, त्यांच्या हातात अधिकार होते; पण मुळात अज्ञान असताना अशाप्रकारे ढोंग लोकांमध्ये पसरले की, समाजही त्याच गोष्टीचं अनुकरण करतो. अशा अज्ञानमूलक प्रवृत्तीचं समर्थन करणारी विचारवंत मंडळीही असतील, तर समाजाने दुसरा आदर्श काय ठेवावा? जो हे करीत नाही, त्याला उलट शत्रू ठरवले जाते. अशावेळी त्याला मार्गातून दूर सारणे हे अशा ढोंगी लोकांना गरजेचे होऊन बसते. सॉक्रेटिसच्या बाबतीत तेच झाले, असे स्पष्टपणे दिसून आले. सॉक्रेटिसवर तरीही उत्तरकालीन विचारवंतांनी सोफिस्ट असण्याचा आरोप केला, त्याची कारणं बघायला मात्र हवीत.

सॉक्रेटिसची मूळ पद्धती ही समोरच्या समूहासोबत चर्चा करून निष्कर्ष काढण्याची होती. अशावेळी समोरच्याने पूर्वग्रहदूषित होऊन उत्तर देऊ नये म्हणून तो काही त्या विषयाची काहीही माहिती न देता त्याच्या प्रश्नांची उत्तरे त्याच्याकडून मिळवत त्या मुद्यावर आणत असे. अशाच प्रकारची सोफिस्टांचीही पद्धती होती. तेही समोरचा हव्या त्या मुद्यांवर यावा म्हणून चर्चा करीत असत. सॉक्रेटिसही सोफिस्ट होता, असा आरोप आहे तो यामुळेच आहे; पण त्याने सोफिस्टांच्या अनेक मतांचं खंडन केले आहे, शिवाय सॉक्रेटिसने कधी ज्ञानाची विक्री केल्याचा उल्लेखही नाही. त्यामुळे त्याला सोफिस्ट ठरवण्यात अर्थ नाही. सॉक्रेटिसच्या वादपद्धतीमधील एक मूलभूत बाब वाचकांनी अधोरेखित करून ठेवावी अशी आहे, ती म्हणजे सॉक्रेटिस स्वतःची विद्वत्ता सिद्ध करण्यासाठी विवाद निर्माण करीत नसे. उलट 'मला एक ठाम माहिती आहे की, मी अजिबात ज्ञानी नाही' हे त्याचे वाक्य असे. आपण बोलू, चर्चा करू आणि मग सत्यज्ञान काय ते पडताळून पाहू, ही त्याची समन्वयाची भूमिका असे. 'सत्यज्ञान म्हणून काही असेल, तर ते निर्विकल्प विचारांची स्थापना, हेच होय.' म्हणून प्रचलित कल्पनांमधील अज्ञान स्पष्ट करण्यासाठी तो प्रारंभी अज्ञान स्वीकारून

मग चर्चा प्रारंभ करी व शेवटी प्रतिपक्षाचे अज्ञान सिद्ध करी. सॉक्रेटिसच्या पद्धतीचा विचार करताना काही महत्त्वाची वैशिष्ट्ये दिसून येतात. सॉक्रेटिसची वादपद्धती समजून घेताना त्याचा उल्लेख आवश्यक आहे. सॉक्रेटिसने आपल्या पद्धतीमध्ये संशय पद्धत, निगमन व विगमन पद्धती आणि संभाषण व प्रश्नोत्तर या तीन गोष्टींचा वापर केला.

क. संशय पद्धत **(doubt method)**

सॉक्रेटिसला 'संशय पद्धतीचा जनक' (Father of doubt method) म्हटल्यास फार वावगे होणार नाही. समोरच्या व्यक्तीशी बोलताना तो संशय व्यक्त करीत असे. त्यातून त्याचे अज्ञान प्रकट करीत असे. मग समोरची व्यक्ती बोलू लागे. समोरच्या व्यक्तीकडून उत्तरे मिळवणे, त्यावर आपण विचार करणे, त्यालाही करायला लावणे आणि मग अंतिम निष्कर्षावर आणणे अशी त्याची संवादाची वैशिष्ट्ये होती. एक विचाराला दिशा देण्याचे साधन म्हणून त्याने संशय पद्धतीचा अवलंब केला. हा संशय म्हणजे रूढ अर्थाने संशय नव्हे, तर ज्ञान निरपेक्ष आहे की नाही याचे परीक्षण होय. इथे एका महत्त्वाच्या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे, ती म्हणजे सॉक्रेटिस प्रश्नोत्तराच्या वेळी स्वत: अडाणी आणि अज्ञानी असल्याची भूमिका घेत असे. कुणी उत्तर दिल्यास आणि अजूनही चर्चेची आवश्यकता असल्यास सॉक्रेटिस त्याच्या उत्तराने आनंद झाला असे दाखवत पुन्हा यातला काही भाग लक्षात येत नाही, असे दाखवत उपप्रश्न सुरू करीत असे. शेवटी प्रतिपक्षाच्या विचारांचा फोलपणा सिद्ध होई. यालाच 'सॉक्रेटिसची व्याजोक्ती' (socratic irony) असे संबोधले जाते; आणि मख्य म्हणजे 'तुमच्याकडून मला ज्ञान मिळवायचे आहे...' असे म्हणून तो त्याचेच अज्ञान जगजाहीर करीत असे. हा उपरोध वा प्रतारणा वा कपटनीती मानून अनेक जण केवळ दुखावले जात.

ख. निगमन आणि विगमन **(deduction and induction)**

निगमन म्हणजे सामान्याकडून विशिष्टाकडे विचार करण्याची प्रक्रिया आणि विगमन म्हणजे विशिष्टांकडून सामान्याकडे विचार करण्याची प्रक्रिया.

ग. संभाषण व प्रश्नोत्तर

विभिन्न व्यक्ती त्यांच्या प्रकृतीनुसार विभिन्न विचार मांडतात. त्यात काही सामान्य गोष्टी असू शकतात. या सर्वमान्य सामान्यावर कुणाचाही संशय असू शकणार नाही, याची त्याला खात्री असे.

या सर्व गोष्टीवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे सॉक्रेटिस कुणी पुस्तकी पंडित नव्हता, तर माणूस वाचणारा विचारवंत होता. ज्याच्या सत्यशोधनाची मदार ही मनुष्याच्या बुद्धीवर, सद्गुणांवर आणि त्याच्या निःशंक ज्ञान मिळविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या

प्रयत्नांवर अवलंबून होती. सत्यज्ञान ही सर्वोच्च शुभ बाब होय, हे मानणाऱ्यांपैकी तो एक होता. त्यासाठी त्याने सद्गुणांना ज्ञानाची प्रतिष्ठा दिली आहे. तो सद्गुणांना ज्ञान (virtue is knowledge) असे म्हणत असे. मानवी जीवनामध्ये ज्ञान हेच महत्त्वपूर्ण आहे, यावर त्याची पूर्ण श्रद्धा होती. दुर्गुणांना नाहीसे करण्यासाठी ज्ञान हवेच यावर तो ठाम होता. अर्थात् सद्गुण आणि ज्ञान यामध्ये त्याने ऐक्य व्यक्त केले आहे. ते एकमेवाद्वितीय आहे, त्यासाठी सद्गुणांची शिकवण गरजेची आहे, असे त्याचे ठाम मत होते. मनुष्य स्वत:हून कुठलाही प्रमाद करणार नाही; पण केवळ त्याला वाईट गोष्ट कोणती हे न समजल्यामुळे तो वाईट कर्मे करतो. जर सद्गुणांचा उदय झाला तर तो सत्कर्मे करील, यावर त्याचा विश्वास होता. सॉक्रेटिसने सांगितलेली नैतिक मूल्यांची शिकवण ही मौलिक असल्याने त्याला किंचितही स्वार्थी समजता येणे शक्य नाही. तो केवळ सदाचरणाची शिकवण देत होता आणि सत्याचा शोध सद्गुणांच्या साहाय्याने घेत होता. त्यासाठी समोरच्याशी संशय अर्थात् ज्ञानावर शंका व्यक्त करीत संवाद करण्याची आणि निष्पक्षपणे विकल्परहित ज्ञानावर पोहोचण्याची त्याची रीत होती असे म्हणावे लागेल. त्यामुळे सॉक्रेटिसला जे सोफिस्ट म्हटले जाते ते तितकेसे योग्य वाटत नाही.

केतकरांनी सॉक्रेटिस आणि सोफिस्ट व सॉक्रेटिसची मते या दोन प्रकरणांमध्ये बरीच पृष्ठे खर्च केली आहेत आणि सॉक्रेटिसच्या एकंदर ज्ञानमार्गाचे इतर मार्गाशी असणारे साधर्म्य वैधर्म्य समजून येण्यासाठी ते गरजेचेही आहे. सॉक्रेटिस आणि सोफिस्ट या प्रकरणातून काही महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट होतात. सॉक्रेटिसच्या कार्याचा गौरव का केला जातो, हे स्पष्ट होण्यासाठी त्याचा आढावा घेणे अत्यंत गरजेचे ठरते.

सोफिस्टांची विचारधारा ही देशाला रसातळाला नेणारी ठरली असती; पण सॉक्रेटिसच्या कार्यामुळे याला लगाम बसला, हे दस्तुरखुद्द सॉक्रेटिसच्या शिष्याचे म्हणजे प्लेटोचे प्रतिपादन आहे. सोफिस्ट हा शब्दही मुळातच निंदाजनक असल्याप्रमाणे वापरला जातो. खरे तर 'सोफिया' या शब्दाचा अर्थ 'प्रज्ञा' असा होतो म्हणून सोफिस्ट म्हणजे 'ज्ञानी' असा अर्थ आहे. संस्कृत व मराठीमध्ये एखाद्याला पंडित म्हणावे, तसे हे आहे. यावर लेखकाने विस्तृत चर्चा केलेली आहे. सॉक्रेटिसच्या काळामध्ये प्रोटॅगोरस, जार्जियास हे होतेच. सोलोन, पायथागोरस, थॅमीरस वगैरे अनेक लोक सोफिस्ट होते. प्रोटॅगोरस हा तर सोफिस्ट असल्याचा व्यवसायही करीत होता. थोडक्यात, हे वकिलीसारखे काम करीत होते. त्यासाठी त्यांना चांगली धनप्राप्ती होत असावी. प्लेटोने जी ज्ञानप्रदानामध्ये धनप्राप्तीची निंदा केलेली आहे ती बहुधा याच कारणामुळे असावी. प्लेटोने लिहिलेल्या संवादामध्ये त्याने सॉक्रेटिस आणि प्रोटॅगोरस यांच्यातील संवाद देऊन त्यात सॉक्रेटिसचे मोठेपण सिद्ध केले आहे. सॉक्रेटिसला त्याकाळी काही लोकांनी बहुधा सोफिस्ट म्हणून संबोधले आहे, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी बहुधा त्याने हे लिहिले असावे. एक वैशिष्ट्याची बाब म्हणजे थेल्सपासून

जी विविध विचारवंतांची विश्वोत्पत्तीविषयक प्रमेये तयार करण्याची अहमहमिका लागली होती, त्याऐवजी सोफिस्टांनी ती विचारधारा मानवकेंद्री केली होती. सॉक्रेटिसनेही भूमिती वा खगोलाचा अभ्यास हा जमिनीचे मोजमाप वा प्रवास दिशा ठरवणे एवढेच वगळता इतर अनावश्यक ठिकाणी टाळावा, असे स्पष्ट सांगितले होते. माणूस हाच विचारांचे केंद्र असला पाहिजे हे त्याचेही म्हणणे होते. म्हणून सॉक्रेटिस हा मानववंशशास्त्रीय वा मानवकेंद्री तत्त्वज्ञानाला जसा स्पर्श करणारा ठरला तसाच त्याच्यापासूनच योजनाबद्ध तत्त्वज्ञान या विषयाच्या अनुषंगाने चर्चा सुरू झाली असे म्हणता येईल.

सॉक्रेटिसविषयीची जी काही सारी माहिती आहे ती साधारणपणे एक तर ऐकीव तरी आहे किंवा प्लेटो वा इतर कुणीतरी लिहून ठेवलेल्या ग्रंथातून तरी घेतलेली आहे. प्लेटोने लिहिलेले जवळपास सर्व ग्रंथ हे संवादरूपाने आहेत. त्यातील तीन ग्रंथ... लायसिस, लॅचेस आणि कॅर्मिडस् हे ग्रंथ अनुक्रमे दोस्ती, धैर्य आणि संयमाशीसंबंधित आहेत. क्रिटो, ॲपालॉजी आणि युथ्रिफ्रोन हे सॉक्रेटिसच्या समर्थनार्थ प्लेटोचे संवादरूप ग्रंथ आहेत. बाकी लॉ, प्रोटॅगोरस, मेनो, फिडो, सिंफोसियम वगैरे बारा ग्रंथांतून काही ना काही प्रकाश तत्कालीन तत्त्वविश्वावर पडतो. एकंदर प्लेटोच्या अठरा ग्रंथांतून ग्रीक तत्त्वज्ञानाविषयीची आपली पक्की धारणा तयार होऊ शकते. खरे तर हा योजनाबद्ध तत्त्वज्ञानाच्या कालखंडाचा प्रारंभ आहे. इथून पुढे ॲरिस्टॉटलने त्याला खऱ्या अर्थाने सुव्यवस्थित रूप दिले असे म्हणता येईल. सॉक्रेटिसच्या ज्ञानमीमांसेवर या ग्रंथामध्ये लेखकाने विस्तृत चर्चा केली आहे; पण तरीही काही मुद्दे वाचकाने लक्षात घेणे आवश्यक आहेत.

सॉक्रेटिसच्या विचारांचा केंद्रबिंदू हा समजून घेतला, तर लेखकाने जी माहिती सॉक्रेटिस आणि सोफिस्ट व सॉक्रेटिसची मते या दोन प्रकरणांमध्ये दिलेली आहे ती आकलनात येईल.

सोफिस्ट आणि सॉक्रेटिस यांच्यामधील विचारांमध्ये महत्त्वाचे भेद आहेत ते साधारणपणे असे...

अ. सोफिस्टांनी या विश्वाच्या निर्मितीमागे कुठलेही प्रयोजन नसून ते क्रमश: यंत्रवत् विकसित झाले आहे, असे मानले आहे; पण सॉक्रेटिसने त्यामागे काही प्रयोजन असल्याचे मान्य केले आहे.

आ. सोफिस्ट सद्गुण एक कला मानतात, जी ज्ञानाद्वारे प्राप्त करता येऊ शकते. सॉक्रेटिस सद्गुणाला कला न मानता मनुष्यातील सामान्य गुण आहे, असे मानतो.

इ. ज्ञान व्यक्तिनिष्ठ आहे, असे सोफिस्ट मानायचे, तर सॉक्रेटिस ज्ञान सर्वव्याप्त आणि वस्तुनिष्ठ मानतो.

ई. सोफिस्ट सर्व वस्तुजाताला मनुष्यसापेक्ष मानतात, तर सॉक्रेटिस प्रयोजनसापेक्ष मानतो.

उ. नैतिकता ही व्यक्तिनिष्ठ आहे, असे सोफिस्टांना वाटते, तर सॉक्रेटिस सार्वभौम

मानतो, नैतिकता ही सर्वांसाठी सारखी असावी असे मानतो.

ऊ. सामाजिक नीतिनियमांना सोफिस्टांनी मानवकृत मानले आहे, तर सॉक्रेटिसने पारंपरिक नीतिनियमांना श्रेष्ठत्त्व दिले आहे. कायद्याचे पालन केलेच पाहिजे.

सॉक्रेटिसने विशुद्ध ज्ञानाविषयी मांडलेले मत म्हणजे त्याची ज्ञानमीमांसा आहे, असे समजण्यात येते. त्याविषयी काही गोष्टी ध्यानात ठेवणे गरजेचे आहे...

सॉक्रेटिसने ज्ञानाविषयी मांडलेले मत हे सोफिस्टांच्या ज्ञानमीमांसेवरची एक प्रतिक्रिया आहे, असे समजावे. सोफिस्टांना ज्ञान हे प्रत्यक्ष या एका प्रमाणावर आधारलेले वाटत होते. प्रत्येक व्यक्तीला आपले ज्ञान होते आणि तेही केवळ व्यक्तीच्या ज्ञानेंद्रियामार्फतच होते, ते ज्ञान विशेष आणि व्यक्तिगत असते असे त्यांचे ठाम मत होते. सॉक्रेटिसने ते सार्वभौम आणि वस्तुनिष्ठ मानले. सॉक्रेटिसने आपले संपूर्ण जीवन त्यासाठी व्यतीत केले असे म्हटले तरीही चालेल. महत्त्वाचे म्हणजे सॉक्रेटिसचा ज्ञानसिद्धांत हा तर्क आणि विश्लेषणावर आधारित आहे. समग्र ज्ञान हे प्रयत्नाशिवाय शक्य नाही, इंद्रियानुभव येत असतात; परंतु ज्ञानाचे सार्वभौमत्व हे महत्त्वपूर्ण आहे. वास्तव ज्ञान प्राप्त होण्यासाठी तर्काची आत्यंतिक आवश्यकता त्याने मांडली. तर्क या शब्दाने त्याला बुद्धीकडे निर्देश करायचा होता. केवळ बुद्धीच्या मदतीने विभिन्न व्यक्ती एका सामान्य निष्कर्षावर येऊ शकतात. वैचारिक भिन्नतेमध्येही ही एकता वा एकात्मभाव शक्य आहे. सामान्यपणे सर्व माणसांमध्ये विश्लेषण करण्याची क्षमता असते आणि ज्ञानाच्या सार्वभौम आणि यथार्थतेसाठी करावयाच्या प्रयत्नांमध्ये विश्लेषण आत्यंतिक आवश्यक असते. त्या आधारेच यथार्थ ज्ञान प्राप्त होऊ शकते, ही महत्त्वाची बाब सांगितली. त्याने आपल्या नैतिक सिद्धांतालाही ज्ञानाधिष्ठित बनवले. ज्ञानाची व्यावहारिक बाजूही त्याने गृहीत धरली. ज्ञान आणि व्यावहारिक जीवन यामध्ये एकरूपता हवी अन्यथा कुठल्याही ज्ञानाप्रमाणे आचरण करणे अशक्य आहे. यथार्थ ज्ञानासाठी ज्ञानाच्या विश्लेषणाला सॉक्रेटिसच्या ज्ञानमीमांसेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञान आणि सद्गुण यांचा अविच्छिन्न संबंध प्रतिपादित केला. मानवी जीवनाचा उद्देशच मुळात सद्गुणी होणे अर्थात नैतिक जीवन व्यतीत करणे होय. सॉक्रेटिसचा ज्ञानसिद्धांत केवळ तर्काधिष्ठित नव्हता, तर शुभ कर्माची ती आवश्यक अट आहे असे सांगितले. संपूर्ण समाज जर न्यायप्रिय हवा असेल, तर ज्ञान आणि सद्गुण हवेच. सत्कर्म करण्यासाठी ज्ञान एकमेव दीपस्तंभ आहे, असे तो मानत असे. याबाबतीत त्याचे दोन मुद्दे असे...

अ. - ज्ञान सर्वोत्तम शुभ आहे... (knowledge is highest good) हे गीतेतील 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' प्रमाणेच आहे. गीताही ज्ञानाला सर्वश्रेष्ठ मानतेच.

आ. - सद्गुण एकच आहे. (virtue is one)

केवळ विश्वाच्या आरंभी काय आणि कोणते द्रव्य होते, त्याचे स्वरूप काय? यावर विचार

करणाऱ्या विश्वरचनावादी तत्त्वज्ञानाच्या (Naturalistic philosophy) तत्त्वचिंतनावरून थेट मानव आणि मानवाला प्राप्त होऊ शकणारे विशुद्ध ज्ञान याकडे विचारधारा वळवणाऱ्या मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञानाचा (Anthropologic philosophy) हा भाग जरा वेगळी दिशा देणारा ठरला. इथूनच पुढे खरे तर पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाला सुव्यवस्थित स्वरूप लाभू लागले आणि 'योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा' (Systematic philosophy) जन्म झाला.

काही लेखनवैशिष्ट्ये

- पाश्चात्त्य तत्त्वज्ञानासारखा अतिशय क्लिष्ट असणारा विषय असूनही श्री. द. गो. केतकरांनी अतिशय सुलभ भाषेत ग्रंथ रचना केलेली आहे. हे भाषाकौशल्य आदर्श आणि वाखाणण्यासारखे आहे.
- तत्त्वज्ञान विषयातील अतिशय अवघड आणि समजण्यास कठीण मुद्दे सोप्या भाषेत मांडले आहेत.
- तत्त्ववेत्त्यांची जीवनशैली व एकंदर समकालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थितीचा अगदी पूर्णपणे अंदाज लेखनातून येतो. विचारांची दिशा ही साधारणपणे विज्ञानाचा वेध घेणारी आहे. त्यामुळे आधुनिक विज्ञान संशोधनाला लागणारे वैचारिक संचित त्यातून निर्माण होत गेलं.
- पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्राचा नि:शेष परामर्श घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे, ही बाब महत्त्वाची! पाश्चात्त्य तत्त्वचिंतनाचा कालखंड हा भारतीय वैदिक चिंतनाच्या परंपरेच्या तुलनेने उशिरा सुरू झालेला असला तरीही त्याचे मूल्य कमी न होता वाढले असे आधुनिक विज्ञानामध्ये झालेल्या संशोधनावरून म्हणावेसे वाटते.
- थेल्स ते सॉक्रेटिस आणि इतर विचारवंतांचे विचार केतकरांच्या सुलभ मराठीत लेखनात वाचताना असे लक्षात येते की, पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारविश्वाच्या अनुवादाची कामे ही गेल्या शतकाच्या आधीच व्यवस्थित झालेली असावी. केतकरांनी उपयोजन केलेल्या पारिभाषिक संज्ञा अद्यापही तशाच आहेत. त्यांची स्वीकार्यता आजही तितकीच आहे. मराठी प्रतिशब्दांचे समकालीन वा सद्यकालीन उपयोजनही तेच आहे. केतकरांनी लेखन करताना गुणलक्ष्यी व व्याप्तीलक्ष्यी पारिभाषिक संज्ञांचा उपयोग यथायोग्य केला आहे.
- **अभ्यासामागची प्रस्तुतता:** ग्रंथ जुना आणि कालबाह्य वाटत असला तरीही ज्ञानाचा स्रोत कधीच जीर्ण होत नाही, हे लक्षात घ्यावे. या अभ्यासाने सद्यकालीन अभ्यासकांच्या विचारविश्वात काही मुद्यांची भर पडणार आहे. त्यामुळे किमान काही मुद्दे विचारात घ्यावेत, त्यासाठी अभ्यास व्हावा. वैचारिक स्थित्यंतराचा परिचय करून घेणे, पाश्चात्त्य विज्ञानविश्वात घडामोडी घडवणाऱ्या पायाभूत

वैचारिक बैठकीला समजून घेणे गरजेचे आहे. अर्थात पाश्चात्त्य विचार आपल्या जनमान्य भाषेमध्ये अनुवादित होताना स्थळकाळसापेक्ष काही मर्यादा नक्कीच येतात. कोणतीही जिवंत विद्याशाखा ही अभ्यासकांकडून सातत्याने अभ्यासली जात असेल तर तिच्यात वृद्धी आणि विकार हे संभाव्य असतात. ते समजून घेऊन नवनवीन शब्दयोजना कराव्या लागतात. त्याशिवाय समानार्थी शब्दयोजना होत नाही. केतकरांनी तेव्हा ही बाब समजून जास्तीत जास्त सुलभ भाषेत हे काम केले आहे, जे आजही उपयुक्त आहे.

- पौर्वात्य आणि पाश्चात्त्य वैचारिक भेद हा महत्त्वाचा... त्याची पडताळणी या निमित्ताने करता येते.

अ. पाश्चात्त्य विचारसरणीने आधुनिक विज्ञानाची पायाभरणी झाली.

आ. मनुष्य आणि भोवताल यांचा सुसंबंध शोधताना मानवी अस्तित्वकेंद्री झाली.

इ. नीतिशास्त्राची पुनर्रचना झाली तरीही आधुनिक विज्ञानाने तीही नीतिशास्त्रीय मूल्ये नाकारली. परिणाम स्पष्ट झाला.

ई. तत्त्वज्ञानाने मानवी प्रश्न हाताळण्याच्या नादात सुखवाद आणि उपयुक्ततावाद यांचा अतिरेकी अर्थ लावला. आधुनिक विज्ञानात भौतिकवाद अधिक बोकाळला.

उ. आत्यंतिक बाह्य विषयाकडे, दृश्य जगताकडेच विचारांचे केंद्र सरकल्यामुळे तत्त्वचिंतनाकडून अनीतीकडे वाटचाल झाली.

ऊ. आत्मानुभूती किंवा अपरोक्ष ज्ञानासारख्या गोष्टींना पारलौकिक ठरवण्यात आले.

ए. बाह्य विश्व स्थिर नसूनही सत्याचा शोध विज्ञानाद्वारे दृश्य पदार्थातच लागेल हा आत्मगत दोष का मानला गेला नाही?

ऐ. पायथागोरसनंतर गणिताच्या क्षेत्रात क्रांती घडून आली. गणितविद्या भारतातही होती; परंतु गणित, त्याचे विविध क्षेत्रातील उपयोजन, विविध क्षेत्रांना लावले गेलेले गणिताचे निकष यामुळे इतर क्षेत्रात प्रागतिकतेचा विचार शक्य झाला. भारतात खगोल आणि काही व्यावहारिक क्षेत्रांना लावलेले गणिताचे निकष वगळता आधुनिक विज्ञानातील संशोधनाच्या अभावामुळे गणित संशोधनाच्या वाटा बंद होत गेल्या. उदाहरणार्थ : विमाने, क्षेपणास्त्रे आणि तत्संबंधी गणिती प्रमेये इत्यादी.

ओ. ज्ञानविक्री करणारे म्हणून सोफिस्टांची कितीही हेटाळणी झाली तरीही त्यांचा आणि त्यांच्या विचारांचा परिणाम दिसून येतो. सुखवाद व उपयुक्ततावादाच्या आत्यंतिक विचारांचा दूरगामी परिणाम दिसून येतो. विज्ञानशोध हे उपयुक्ततावादी, सुखवादी आणि आर्थिक मूल्य मिळवून देणारे ठरले.

औ. भौतिकतेकडे पाठ फिरवण्याची वृत्ती म्हणा वा आधुनिक विज्ञानाविषयीची अनास्था

व त्याची तत्त्वज्ञानाशी सहज न घालता आलेली सांगड म्हणा, भारतीय दर्शने ही परलोकवासी, गूढार्थ व गूढ शोधणारी, आत्मतत्त्वाकडे वळणारी ठरली.

अं. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आत्मानुभूतीच्या प्रांगणातून पाय काढून घेते. विशुद्ध तत्त्वचिंतनच महत्त्वाचे ठरले. त्यामुळे भारतीय तत्त्वविचार हे श्रद्धा, अंधश्रद्धा यांचा खेळ व केवळ धार्मिक ठरवण्यात आले.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या दालनामध्ये प्रवेश करण्यापूर्वी पायरीवर बसून हा विचार करायला हरकत नाही.

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने

पूर्वेतिहास

द. गो. केतकरांच्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, पुष्प एक व दोनमध्ये ग्रीक तत्त्वज्ञानाची विचारधारा, त्याची भूमिका, त्याचे तत्कालीन व उत्तरकालीन परिणाम यांचे आपण अवलोकन केले, तसेच सॉक्रेटिसच्या जीवनाचे आणि त्याच्या ज्ञानमीमांसेचे ओझरते दर्शन घेतले. सॉक्रेटिसच्या एकंदर कार्याकडे बघता सॉक्रेटिस पूर्वकालीन आणि सॉक्रेटिस उत्तरकालीन असे दोन भाग पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये झाले हे आपण मान्य करायला पाहिजे. सॉक्रेटिसपासून पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा (Systematic philosophy) कालखंड सुरू झाला. पुढे प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी त्याला मूर्त स्वरूप दिले असे समजण्यात येते. प्लेटो हा सॉक्रेटिसचा शिष्यच! पण केवळ प्लेटोच होता, असे समजण्यात काही अर्थ नाही. सॉक्रेटिसच्या विषप्राशनानंतर (३९९ इ. स. पू.) इतर शिष्यांनीही त्याच्या विचारांना पुढे नेण्याचे काम केले. काही शिष्यांनी सॉक्रेटिसचे विचार घेऊन नवे विचार तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये आणले. पुढे जाण्यापूर्वी या वैचारिक परंपरेविषयी जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे संक्रमणाचे बिंदू अधोरेखित होतील.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल : तत्त्वज्ञानाचे सुव्यवस्थापन

प्लेटो (इ. स. पू. ४२७-इ. स. पू. ३४७) हा सॉक्रेटिसचा शिष्य त्याच्याइतकाच विद्वत्मान्य झाला. तो केवळ तत्त्ववेत्ता होता असे समजणे काही योग्य नव्हे. एक साहित्यिक, कलाकार आणि अठरापेक्षा जास्त ग्रंथांचा लेखक असलेल्या प्लेटोला समजून घेणं म्हणजे अडीच हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाची दिशा आणि दशा दोन्हीही समजून घेण्यासारखे आहे. पार्मेनाईडने सत् आणि आभास (reality and appearance) यामध्ये अंतर मानले आहे. ज्यामध्ये सत् तत्त्व अंतिम तर गती, भेद निर्माण करणाऱ्या जड गोष्टींना आभास मानले आहे. हिरॅक्लिटस अगदी उलट गती आणि संभवतेला सत् तर स्थिरतेला आभास मानले आहे. प्लेटोने मात्र सत् आणि आभास यामध्ये सुस्पष्टपणे फरक मानला आहे. त्याने फक्त

'आयडिया' परमसत्य मानले असून, दृष्ट भौतिक वस्तू या आभासमात्र मानल्या आहेत. प्रत्यक्षाच्या माध्यमातून जे ज्ञान होते ते एका अर्थाने भासमान असते, असे मानले आहे. अर्थात पूर्वकालीन विचारवंतांच्या विचारांचा समन्वय प्लेटोच्या विचारधारेमध्ये दिसून येतो. सॉक्रेटिसची संवादशैली हीच प्लेटोची ग्रंथलेखनशैली होती. कोणत्याही निर्णय प्रक्रियेमध्ये संवादशैली उपयुक्त असते, असे त्याचे म्हणणे होते. स्वतः प्लेटोने त्या पद्धतीला 'द्वंद्वपद्धती' असे नाव दिलेले आहे. द्वंद्वपद्धती मनुष्याच्या बौद्धिक प्रतिभेचे अतिउच्च व क्रियाशील रूप आहे, असे प्लेटो म्हणे.

प्लेटोच्या समग्र तत्त्वज्ञानाची चर्चा इथे अभिप्रेत नाहीय. वैचारिक परिवर्तनातील वळणांचे अवलोकन तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने मोलाचे ठरते. प्लेटोची ज्ञानमीमांसा, त्याची 'आयडिया' म्हणजेच सारतत्त्व अर्थात सत् संकल्पना, शुभतत्त्व संकल्पना, ईश्वर वा काळकर्ता ईश्वरविषयक भूमिका इत्यादी विचारांचा दूरगामी परिणाम एकंदर तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रावर दिसून येतो. प्लेटोच्या विचारदर्शनातील काही प्रभावी मुद्दे अभ्यासकांनी स्मरणात ठेवणे आवश्यक आहे.

सॉक्रेटिसने ग्रंथलेखन केले नाही; पण सॉक्रेटिसच्या विचारांना शब्दबद्ध करण्याचे कार्य जर प्लेटोने केले नसते, तर त्याचे चिंतन कालौघात मौखिक परंपरेने किती व कसे शिल्लक राहिले असते? प्लेटोने सॉक्रेटिसचे विचार शब्दबद्ध करताना आपले विचारदर्शनही उभे केले. उत्तरकालीन अनेकांनी... अगदी सेंट ऑगस्टिन, सेंट थॉमस, इर्विन इत्यादींनी प्लेटोला आदर्श मानून मांडणी केलेली आहे. प्लेटोची सारतत्त्वाची संकल्पना डोळ्यांसमोर ठेवून अनेकांनी आपल्या ईश्वरविषयक सिद्धांताला मूर्त स्वरूप दिले आहे. प्लेटोनंतर दोन हजार वर्षांनंतर आलेल्या हेगेलनेही 'आयडिया' सत्य असल्याचे स्वीकारले आहे. यावरून प्लेटोच्या विचारांचे दूरगामी परिणाम दिसून येतात. विश्वाचे आकलन बौद्धिक स्तरावर होऊ शकते, असे मानणाऱ्या प्लेटोचे संपूर्ण दर्शन हे बौद्धिक होते. या ज्ञानाला इंद्रियप्रत्यक्ष ज्ञानाचा विषय न मानणारा प्लेटो अनुभवाचे स्वतंत्र महत्त्व स्वीकारत होता. प्लेटोचे दर्शन यथार्थवादी असले तरी भौतिकवादी मात्र नाही. ईश्वर[५] व मोक्ष तत्त्वज्ञानाच्या समर्थनाने तो अध्यात्मवादी ठरतो. अर्थात् यामागे सारतत्त्व विचारांचा प्रभाव आहेच. प्लेटोने आपल्या सारतत्त्वाच्या अनुषंगाने रिपब्लिक या ग्रंथात 'तत्त्वज्ञ राजा' (Philosopher king) ही संकल्पना विशद केली आहे. ज्याला सारतत्त्व अर्थात आयडियाचे तत्त्वज्ञान समजते, जो जीवनाचे प्रयोजन, साध्य काय आहे आणि त्याची मूल्ये जाणतो, असा माणूस उत्तम राज्य करेल, तो तत्त्वज्ञ राजा बनू शकतो असा राजविवेक त्याने मांडला. या आयडियाचा ख्रिश्चन विचारांवर त्याचा प्रभाव दिसून येतो, त्याचे कारण बहुधा हेच आहे. या वळणावरच प्लेटोचा शिष्य असलेला ॲरिस्टॉटल (इ. स. पू. ३८४ - इ. स. पू. ३२२) मात्र आयडियावर टीका

करताना प्लेटोची सारतत्त्वाची उपपत्ती नाकारतो. सत्यान्वेषणामध्ये केवळ शब्दप्रमाण वा आप्तवचन नाकारून अनुभूत प्रातिभ दर्शन निःसंकोच मांडावे म्हणून प्लेटोचा शिष्य असूनही ॲरिस्टॉटल आपली दार्शनिक भूमिका मांडण्यात संकोचला नाही...

ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाचा काळ हा विज्ञानाचा पाया दृढ करणारा होता हे त्याने विभिन्न विषयांवर केलेले लेखन पाहिले की स्पष्ट होते. त्याने तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, साहित्य वगैरे विषयांवर चारशे लहान-मोठे ग्रंथ[६] लिहिले असल्याची नोंद मिळते. दुर्दैवाने अनेक ग्रंथ उपलब्ध नाहीत. अत्यंत प्रतिभाशाली म्हणून त्याचा गौरव केला पाहिजे. ॲरिस्टॉटलची कारण संकल्पना, द्रव्य व आकार (Matter and Form), त्याची ईश्वरविषयक उपपत्ती वगैरे आजही अभ्यासली जातात. ईश्वर आहे तरी त्याला जगताचे कर्तृत्व नाही, तर तो जगताचा आकार ठरवतो, तो 'अचल चालक' (Unmoved mover) आहे, अशी ॲरिस्टॉटलची संकल्पना आहे. म्हणजे तो स्थिर आहे; पण वस्तुजाताला गती मात्र देतो. तो परिपूर्ण व समस्त कार्याचा जनक आहे. ते केवळ सारतत्त्व नसून सारतत्त्वाचेही सारतत्त्व आहे. ईश्वराची प्रचीती ही बुद्धीच्या साहाय्याने येऊ शकते, अशी बुद्धिगम्य ईश्वराची संकल्पना त्याने मांडली. ईश्वराचे अविचल स्वरूप त्याने मांडले म्हणून लगेच भारतीय दर्शनातील अक्रिय ब्रह्मासोबत त्याची तुलना करण्यात अर्थ नाही. कारण आपल्याकडे त्याविषयी बरीच मतमतांतरे आहेत. ॲरिस्टॉटलने मांडलेल्या संकल्पनानंतर पाश्चात्त्य देशामध्ये विज्ञान संशोधनाचे पायाभूत विचारधन तयार झाले, हे स्पष्ट आहे.

सॉक्रेटिसच्या चिंतनातून प्रकटलेल्या तत्त्वधारा
उपेक्षावाद (cynicism) आणि सुखवाद (cyrainicism)

सॉक्रेटिसच्या सद्गुणांच्या प्रतिपादनातून उपेक्षावादाचा (cynicism) उदय झाला. सॉक्रेटिसचा शिष्य असलेला ॲन्टिस्थेनिस हा या उपेक्षावादाचा पुरस्कर्ता मानला जातो. उपेक्षावाद म्हणजे केवळ वैराग्य असे आपण म्हणू शकतो. उपेक्षावादाची (cynicism) सुधारित आवृत्ती म्हणून आपण स्टॉईककडे बघू शकतो. त्यात काही मूलभूत बदल केलेले दिसतात. स्टोव्हाचा झेनो हा स्टॉईक विचारांचा पुरस्कर्ता असून, त्यानंतर अनेक विचारवंत होऊन गेलेले आहेत. हा सर्व इतिहास सॉक्रेटिसशी आणि त्याच्या विचारधारेशी जोडून घेऊन पुढे नेणे गरजेचे आहे. उपेक्षावाद (cynicism) आणि सुखवादी (cyrainicism) हे परस्परविरोधी विचारप्रवाह सॉक्रेटिसनंतर निर्माण झाले. एपिक्युरियन पंथ हा स्टॉईकविचार आणि सुखवाद (cyrainicism) यांची सुधारित आवृत्ती मानली जाते. प्रस्तुत 'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' या सिमियन बेंजमिन अनुवादित ग्रंथाचा मूळ कर्ता व नायक मार्कस ऑरेलियस हा मूळचा स्टॉईक होता. स्टॉईक विचारवंतांचा मूळ धागा हा

असा सॉक्रेटिसशी जुळतो. सॉक्रेटिसपासून निर्माण झालेली ही विचारधारा आहे, म्हणून सॉक्रेटिसचा उत्तरकालीन विचारपंथ म्हणून याकडे बघायला हरकत नाही.

सॉक्रेटिसचा शिष्य ॲन्टिस्थेनिस (इ. स. पू. ४४४-इ. स. पू. ३६८) हा उपेक्षावादाचा संस्थापक मानला जातो. त्याच्यासोबतच डायोजिनिसचाही उल्लेख मिळतो. ॲन्टिस्थेनिसने सॉक्रेटिसचे लौकिक जीवन अत्यंत आदर्श मानले. आपले कुटुंब, प्रपंच, संपत्ती याविषयी सॉक्रेटिसचे तटस्थ आणि अनासक्त असणे हे त्याला भावले. उपेक्षावादाचे मूळ तत्त्व हे असे आहे. उपेक्षावादाने 'सद्गुण हे ज्ञानावर आधारित आहेत, ज्ञान शिक्षणाचा विषय आहे म्हणून सद्गुणांचंही शिक्षण दिलं जाऊ शकते, सद्गुण एकच आहे' या सॉक्रेटिसच्या विचारांचा स्वीकार केला. ज्ञानाविषयी मौन पाळलं. मात्र सॉक्रेटिसच्या सद्‌गुणांचा वारसा पढे नेण्याचा प्रयत्न केला. खरा सद्गुण हा एक संन्यास, तपश्चर्या आहे, ज्यामध्ये भौतिक सुख, संपत्ती यांच्याविषयी उदासीनता, अनासक्ती हवी ही विचारधारा स्थितप्रज्ञ विचारांप्रमाणेच आहे. ॲन्टिस्थेनिसनंतर तीनशे चौसष्ट वर्षांनंतर स्टॉईक विचारवंत सेनेका (इ. स. पू. ४-इ. स. ६५) बहुधा याच स्थितप्रज्ञतेच्या विचारांनी झपाटलेला होता. सेनेकाची विचारधारा ही मात्र श्रीमद्भगवद्गीतेतील श्रीकृष्णांनी प्रतिपादलेल्या स्थितप्रज्ञ लक्षणांच्या जवळ जाते. उपेक्षावादाचा गहन परिणाम म्हणजे डायोजिनिस हा नि:संग होऊन भिक्षेवर चरितार्थ करी. त्याग, वैराग्य व वासनाजय ही उपेक्षावादा[७]ची त्रिसूत्री व सद्गुण एकमेव निःश्रेयस होते.

सुखवादी (cyrainicism) विचारांचा संस्थापक अरिस्टिपस (इ. स. पू. ४३५ - इ. स. पू. ३६६) हाही सॉक्रेटिसचाच शिष्य! 'सद्गुण हेच व्यक्तीचा विकास करू शकतात', या सॉक्रेटिस विधानाचा अर्थ त्याने 'सुखापेक्षा अजून मोठा कोणता लाभ असू शकतो?' असा लावला. अरिस्टिपसच्या विचारानुसार व्यक्तिनिष्ठ, क्षणिक व शारीरिक सुख हेच सर्वश्रेष्ठ नैतिक शुभ आहे. त्याच्या या सुखवादी विचारांवर ते शुभ व्यक्तिनिष्ठ की वस्तुनिष्ठ, क्षणिक की चिरंतन असते किंवा शारीरिक सुख हे अंतिम असते का वगैरे अनेक प्रश्न उपस्थित करता येण्यासारखे आहेत; पण हे दोन्ही संप्रदाय तसे वैचारिकदृष्ट्या परिपूर्ण तर नव्हेतच, केवळ सॉक्रेटिस चिंतनाचा अंश पुढे नेणारे आहेत. हे 'विश्वचि माझे घर...' असे मानणारे हे दोन्ही संप्रदाय परस्परविरुद्ध तत्त्वे मांडत होते, साम्य असेल तर ते दोघे सॉक्रेटिसचे शिष्य होते, एवढेच होते. स्थित्यंतराच्या काळामध्ये ही दोन मते वैचारिक वळणाचा भाग होता ही बाब अधोरेखित करावी अशी आहे. वैचारिक द्वंद्वकाळात स्थित्यंतरातून परिपक्वतेकडे नेणारा, दोन विभिन्न विचारांना सांधणारा विचार उपजावा हा प्राकृतिक उन्मेष असतो. त्यामुळेच पुढे उपेक्षावाद हा स्टॉईक विचारांत आणि सुखवाद हा एपिक्युरियन विचारांत परिपक्व झालेला दिसून येतो. गमतीची बाब ही की, एपिक्युरियन विचार मांडणारा एपिक्युरस आणि स्टॉईक विचार मांडणारा झिनो हे दोघेही समकालीन होते. म्हणजे तेव्हाच्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये विचारद्वंद्वाला बरीच जागा होती. असेच भारतीय दार्शनिक साहित्यामध्येही

आढळते.

एपिक्युरस (इ. स. पू. ३४१-२७०) आणि झिनो (इ. स. पू. ३३३-२६४) यांचा कालखंड तसा एकच असला तरीही वैचारिक भेद मात्र स्पष्ट आहे. एपिक्युरियनवाद हा एक प्रकारचा सुखवादच मानला जातो. जरी एपिक्युरस याने सुखवाद मानला तरीही तो क्षणिक आणि केवळ शारीरिक सुखाला अंतिम मानत नाही; परंतु त्याचा सुखवाद हा नकारात्मक आहे. मुख्य म्हणजे एपिक्युरस आणि डिमॉक्रिटस हे दोघे परिचित होते. एपिक्युरसच्या विचारांवर डिमॉक्रिटसच्या अणुवादाचाही परिणाम दिसून येतो. एपिक्युरसने धर्माचे वाटणारे भय, नियतीवाद, मानवी गरजा वगैरे गोष्टी दुःखाचे कारण आहेत असे मानले. त्यासाठी धर्म वगैरे गोष्टींपासून मुक्त होऊन आपण आपले जीवन स्वकर्मावर जगावे, असा त्यांचा 'आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार' असण्याच्या विचारावर ठाम विश्वास होता. एपिक्युरियन संप्रदाय हा पुनर्जन्म न मानणारा, मृत्यूसोबत सारे काही संपते. असे मानणारा होता. ईश्वर बहुधा अनेक आहेत. तेच माणसांच्या रूपाने वावरतात. संसार चक्र हे प्राकृतिक कारणवशात् चालते, त्यामागे दैवी शक्ती नाही. मात्र देवता अशा असल्या तरी त्यांचा मानवी जीवनाशी काही संबंध नाही, असे मानणारा होता. आपले तत्त्वज्ञान हे तर्कशास्त्र[८], पदार्थविज्ञान आणि नीतिशास्त्र या तीन शाखांमध्ये त्यांनी विभागले होते. सुखप्राप्ती हे मानवी जीवनाचे अंतिम साध्य आहे. दुःखे दुरिते आहेत. शारीरिक सुखापेक्षा मानसिक सुख श्रेष्ठ असते. गरजा वाढवणे निरर्थक आहे. केवळ स्वार्थात जगणे योग्य नव्हे हे एपिक्युरसचे विचार म्हणजेच संप्रदायविचार! बस, पुढे विस्तार नाही.

स्टॉईक विचारांचा प्रवर्तक झिनो हा मूळचा सायप्रस[९] चा! हा झिनो[१०] आणि पारमिनाईडचा शिष्य झेनो... जो परस्परविरोधी युक्तिवाद (zeno's paradoxes) मांडायचा..., हे दोन्ही वेगळे आहेत. स्टॉईक विचारधारा ही एपिक्युरियनपेक्षा सखोल आणि चिरंतन चालणारी अशी ठरली असे म्हणावे लागेल. एपिक्युरियननंतर फारसे कुणी त्याच्या विचारांना पुढे घेऊन जाऊ शकले नाही; पण स्टॉईक विचार मात्र पुढे गेले. झिनोनंतर त्याचे दोन अनुयायी क्लिंथीज (इ. स. पू. ३००-२२०) आणि ख्रिसीपस (इ. स. पू. २८०-२०७), सेनेका (इ. स. पू. ४-इ. स. ६५) एपिक्टेटस (इ. स. ५५-१३५), मार्कस ऑरेलियस (इ. स. १२१-१८०) अशी परंपरा सतत कार्य करीत राहिली. वैचारिक वळणाचा हा काळ ग्रीकोरोमन[११] तत्त्वज्ञानाच्या विकासाचा कालखंड मानला पाहिजे. एक वळण अगदी पूर्णपणे पार करून स्टॉईक विचार अगदी यशस्वीपणे जवळपास पाचशे वर्षे आपला प्रभाव जनमानसावर टाकतच होता. अजूनही स्टॉईकचे अभ्यासक स्टॉईकमधील तत्त्ववेत्त्यांच्या चिंतनाचा तुलनात्मक अभ्यास मांडताना दिसतच असतात.

स्टॉईक तत्त्वज्ञानाचा संक्षिप्त परिचय

स्टॉईक पंथाचे पदार्थविज्ञान

स्टॉईक तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू नेमका काय होता, हे प्रथम जाणले पाहिजे. त्याखेरीज मार्कस ऑरेलियसचे विचार समजणार नाहीत. तर्कशास्त्र, पदार्थविज्ञान आणि नीतिशास्त्र हे स्टॉईक तत्त्वज्ञानाचे प्रतिपाद्य विषय असले तरीही नीतिशास्त्र हा त्यांचा मूळ चिंतन विषय आहे. त्यांच्या मते, अभौतिक असे विश्वामध्ये काहीही नाही, सारे काही भौतिक आहे.... हे विश्वही अशाच भौतिक वस्तूंचे बनलेलं आहे. आता सारे काही भौतिक आहे, असे म्हटल्यावर मनुष्यास होणारी जाणीव, आत्मा व ईश्वर कसे आहेत, हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. स्टॉईक मतानुसार हे सारे भौतिकच आहे. मग या 'भौतिक सत्'चे स्वरूप काय आहे?

झिनोच्या म्हणण्यानुसार अंतिम सत् हे अग्नी आहे. हे हिरॅक्लिटसप्रमाणे मत आहे. हे अग्नितत्त्व परम ईश्वर आहे. मानवाच्या देहामध्ये जसा आत्मा. तसा अग्निस्वरूप ईश्वर विश्वरूपी कार्य निर्माण करतो. पूर्ण विश्व म्हणजे ईश्वरदेह आहे, मानवदेह हा त्यांचा अंश आहे. तो त्यातूनच निर्माण होतो आणि त्यातच विलीन होतो. आत्मा जसा देह व्यापून राहतो, त्याप्रमाणे ईश्वरही विश्व व्यापून आहे. तो विश्वात्मा आहे. हा झिनोचा 'सर्वेश्वरवाद' (pantheism) आहे. विश्वाचे नियंत्रण हे निरपेक्ष नियमाने होत असते. विश्वामध्ये केवळ नियमांचे साम्राज्य आहे, सारे काही नियमबद्ध आहे. याचा अर्थ असा की, मानवाच्या प्रत्येक कृती या त्याच नियमांनी बांधलेल्या असतात. स्टॉईक मतानुसार मानवाला जणू इच्छास्वातंत्र्य असे नाहीच; पण कुठलेही संकट आले आणि कसलाही प्रसंग असला तरीही दृढ निश्चयाने राहून आपली कृती करण्याचे स्वातंत्र्य मात्र मान्य केलेले आहे.

विश्वोत्पत्ती व विश्वलय क्रमशः होतच असतो. ईश्वरच आपल्या अग्निद्रव्याच्या साहाय्याने वायूत रूपांतरित होतो, मग जलात शेवटी पृथ्वीमध्ये रूपांतरित होत असतो. विलय होताना तीच प्रक्रिया क्रमश: उलट होत जाते व अंतिमत: सारे काही अग्नीमध्ये विलीन होते. स्टॉईक तत्त्वज्ञानातील भौतिक विज्ञान साधारण असे आहे.

स्टॉईक पंथाचे नीतिशास्त्र

स्टॉईक तत्त्वज्ञानामध्ये नीतिशास्त्र हे अतिशय महत्त्वाचे मानले गेले आहे. कारण विवेकता हे माणसाचे सार स्वरूपच आहे. त्यामुळे मनुष्याने निसर्ग नियमांना धरूनच जगले पाहिजे ही त्यांची मूळ शिकवण आहे. "Live according to nature" हे त्यांचे घोषवाक्य आहे. विवेकी जीवनकलेची शिकवण ते देतात. भावना व विकार या बाबी अविवेकी असून त्यावर मात करून जगावे, नैतिक जीवनाचे कठोरपणे पालन करावे, असे ते म्हणत. भावनांचे संवेग मनुष्याला मोहात पाडतातच; परंतु त्यांचे दमन करून आपण जगले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. ही बाब पूर्वकालीन असलेल्या ॲरिस्टॉटलनेही सांगितली

आहे; पण ॲरिस्टॉटलने भावनांचे दमन न करता केवळ बुद्धीद्वारे त्यावर नियंत्रण ठेवायला सांगितले आहे. इम्यान्युअल कांट (इ. स. वी. १७२४ - १८०४) यानेही हीच विचारधारा पुढे नेत भावनांवर कठोरपणे नियंत्रण ठेवायला सांगितले आहे. मात्र कांट नैतिक विचारांच्या बाबतीत जास्तच कठोर आहे. परिणाम न बघता वर्तन नैतिक नियमानुसारच निरपवाद हवे, असे कांटचे प्रतिपादन आहे. स्टॉईक तत्त्वज्ञानामध्येही ही कठोरता आहे. त्यांच्या नैतिक शिकवणीचा परिणाम म्हणजे अत्यंत कठोरपणे संन्यस्त जीवन जगणे होय. उपेक्षावादी (cynicism) संप्रदायाशी त्यांचे साम्य आहे ते असे...!

पण प्रत्येक स्थितीमध्ये भावविहीन होऊन जगणे काही सोपे नाही. केवळ बुद्धी आणि त्याआधारे उभा केलेला संकल्प यांच्या साहाय्याने जगणे म्हणजे तप आणि साक्षेप... अर्थात् कठोर परिश्रम! दृढसंकल्पी राहिल्याने ती व्यक्ती मानवी भावभावनांकडे उपेक्षेने पाहू शकते, ही तटस्थता म्हणजेच आनंद होय, ही त्यांची धारणा होती. ती भावविहिन तटस्थता म्हणजे सद्गुण आणि तोच आनंद! कर्माच्या बाबतीत स्टॉईक तत्त्वज्ञानाची भूमिकाही थोडी समजून घेणे आवश्यक आहे. कर्म चांगले वा वाईट असे काहीही नसते. कारण ते नैतिक संकल्पावर अवलंबून असते. स्टॉईकवादानुसार 'सद्गुण हा तुमच्या संकल्पाचा भाग आहे, कृतीचा नव्हे.[१२] (Virtue is a matter of will and not the deed) ही गोष्ट अधोरेखित करावी अशी आहे. ईश्वर सर्वव्याप्त आहे आणि मानव हा ईश्वराचा अंश आहे म्हणून मानवाने प्रकृतीनुरूप कार्य करावे, असे त्यांचे म्हणणे आहे. केवळ निसर्गाच्या नियमाने राहणे हेच मानवाचे आद्यकर्तव्य आहे. असे त्यांचे म्हणणे होते. राजकीय वा सामाजिक व्यवस्था या तशा नैसर्गिक नाहीत, म्हणून स्टॉईकमते त्यापासून दूर राहणे योग्य आहे. जर स्टॉईक मताचा माणूस राजकीय व सामाजिक स्तरावर कार्यरत असेल, तर तो त्याकडे विश्वबंधुत्वाचे कार्य म्हणून पाहत असतो. ईश्वर एकच आहे, ते एकाच ईश्वराने निर्मिलेले आणि एकाच नियमाने चालते. त्यामुळे सर्व मानव वेगवेगळे असले तरीही त्यांच्यातील सारतत्त्व मात्र एकच आहे. त्यामुळे ते एकाच विश्वातील समान नागरिक आहेत. स्टॉईकपैकी रोमचा एपिक्टेटस आणि मार्कस ऑरेलियस या दोघांनी विशेषत्वाने ही गोष्ट स्पष्ट केली आहे की, Man is a citizen of the world.

स्टॉईक पंथाची ज्ञानमीमांसा

स्टॉईक विचार हे अनुभववादी आहेत. स्टॉईक मतानुसार जन्मत: मनुष्याची पाटी कोरी असते. त्यांच्या मतानुसार मानवाचे मन जन्मतः अगदी कोरे असते, ज्यावर बाह्य आणि आंतरिक संस्कारांचे छापे उमटतात. हे छापे स्मृतीमध्ये प्रतिमांच्या स्वरूपामध्ये राहतात. या प्रतिमांचे संमिश्रण होऊन त्यामध्ये एक सुसंवाद निर्माण होऊन काही संकल्पना निर्माण होतात. याच अशा प्रतिमा संमिश्रणातून सद्गुण, शुभ, अशुभ इत्यादी संकल्पना रूढ

होतात; पण चेतनेच्या स्तरावर मात्र योग्य काय ते न्यायपूर्वक ठरवून मगच निश्चयात्मक ज्ञान ठरवले जाते. वैकल्पिक (disjunctive) आणि गृहितकल्पनात्मक वा हेतूफलाश्रित (hypothetical) या न्यायशास्त्रीय शब्दांचा प्रयोग प्रथमतः स्टाईकवाद्यांनी केला. त्यांच्या मतानुसार अनुमानाच्या आधारावर सत्याचा निश्चय करता येऊ शकतो. स्टॉईकवाद्यांच्या मतानुसार वस्तुजात या सत्य आहेत आणि संकल्पना या प्रतिमांच्या सघनीकरणाने तयार होतात; परंतु त्यांचे काही स्वतंत्र अस्तित्त्व नसते, तर त्या केवळ मानवी विचाराचे परिणत स्वरूप आहे.

स्टॉईक यांच्या मतानुसार असे असले तरीही संवेदना ना सत्य असतात ना असत्य! त्या केवळ त्याक्षणी येणाऱ्या वास्तविक अनुभूती असतात; पण प्रतिमा ही बाब पूर्णपणे वेगळी आहे. प्रतिमा या संवेदनभ्रमजन्य (hallusinatory image) असू शकतात किंवा भासमात्र (illusory image) असू शकतात. अशा प्रतिमांतून अशाही वस्तूंचा आभास होऊ शकतो ज्यांचा तिथे अभाव आहे वा अत्यंताभाव आहे; पण ज्ञान तेव्हाच होऊ शकते, जेव्हा आपण त्या प्रतिमानुरूप यथार्थ वस्तूंचा स्वीकार करण्यास तयार होऊ. अर्थात ज्ञानप्राप्ती किंवा त्याच्या सत्य वा असत्य असण्याची बाब ही मानवाच्या संकल्पशक्तीवर अवलंबून आहे. जर उमटलेली प्रतिमा सुस्पष्ट असेल आणि संकल्पशक्ती अर्थात इच्छाशक्ती त्याचा स्वीकार करण्यास भाग पाडत असेल, तर त्या सत्य आहेत, असे मानावे लागेल. मानवाच्या दृढ विश्वासा[१३] खेरीज अन्य कोणतीही गोष्ट ज्ञानाच्या पडताळणीसाठी योग्य असा निकष म्हणून वापरता येत नाही. भ्रम अथवा असत्य ज्ञान तेव्हाच असेल जेव्हा प्रतिमा सुस्पष्ट नसेल किंवा मानवाची संकल्पशक्ती निर्णय देत नसेल वा संघर्षाची स्थिती असेल. स्टॉईक मत त्यासाठी हाच उपाय सुचवते. वैकल्पिक आणि हेतूफलाश्रित न्यायवाक्यांचा उपयोग करणे योग्य आहे. 'जर असे असेल, तर हे नाही म्हणून ते असू शकते, हे अथवा ते...' अशा विकल्पाने त्याबाबतीत न्याय केला जाऊ शकेल; पण अशा न्यायिक प्रक्रियेने निश्चित ज्ञान प्राप्त होऊ शकते का? तर या बाबतीत अंतिमतः स्टॉईकवाद्यांचं असेही म्हणणे आहे की, ज्ञान केवळ संभाव्य बाब असू शकते.

स्टॉईक पंथाचे धर्मविचार

स्टॉईक हे अगदीच प्रार्थनावादी नसले तरीही धर्मविचारांच्या बाबतीत ते सकारात्मक आहेत. अगदीच संशयवादी[१४] वा एपिक्युरियनांप्रमाणे ते धर्माविरुद्ध नाहीत. विश्वाची बुद्धिगम्यता, ईश्वरत्व आणि सारे काही मानवाच्या कल्याणार्थच होत असते यावर त्यांचा विश्वास होता. बुद्धिस्वरूप ईश्वरामध्ये समर्पणभाव हा स्टॉईकवाद्याचा धर्महेतू होता. विश्वाचा सारा कारभार हा त्याच ईश्वराकडून चालतो. विश्वाच्या सुव्यवस्थापनाचा विचार करून आपणही सद्गुणांचा अवलंब करावा आणि त्या ईश्वरीय सुसूत्रबद्ध बुद्धीशी तादात्म्य प्राप्त

करावे, हा त्यांचा अंतिम हेतू होता. स्टॉईकवाद्यांचा या गोष्टींवर ठाम विश्वास होता की, विश्वाचा आधार असलेल्या त्या ईश्वराच्या बौद्धिक निर्णयातून अन्याय्य वा नियमांना डावलून होऊ शकेल, अशी एकही गोष्ट नाही. हे सारे काही त्याच्याच इच्छाशक्तीने चालते तर मग शुभ आणि अशुभ असे काय असेल?

शुभ आणि अशुभाच्या बाबतीत स्टॉईकांचे मत ठाम आहे. सृष्टीत काहीही अशुभ नसते वा शारीरिक स्तरावर काही अशुभ वा विकार नसतात, असे त्यांचे म्हणणे होते. अर्थात त्यांना महत्त्व देण्याची गरज नाही. कारण सद्गुणांचा संबंध हा मानवी संकल्पाशी आणि त्या व्यक्तीला पूर्णपणे विरक्त होण्यात मानला गेलाय. त्यामुळे शारीरिक कष्ट वा प्राकृतिक दुर्घटना यांच्याकडे फार लक्ष देण्याची गरजच नाही, त्या सद्गुणी माणसाला विचलित करू शकत नाहीत. कुठलीही गोष्ट त्यामुळे अशुभ नसतेच. अगदी मोठी प्राकृतिक घटना... भूकंप वा ज्वालामुखी वा पूर ही फार तर लोकसंख्या कमी करते त्यामुळे जे होते ते निसर्ग नियमाने होते. शुभ आणि अशुभ या दोन्ही परस्परपूरक आहेत. एक आहे म्हणून दुसरी घडते बाकी काही नाही.

ईश्वर जर त्याच्या बुद्धीने हे सारे निर्माण करीत असेल, तर मग ही दुःखे आणि दुरिते का? हा प्रश्न उपस्थित केला जाऊ शकतो. याला स्टॉईकवाद्यांनी दिलेले उत्तर असे आहे की, अशुभाने सुख वा दुःख होऊ शकते हा केवळ एक भाव आहे, बाकी काही नाही. सद्गुणी हा तर विरक्त आणि स्थितप्रज्ञ असतो, त्याला याची बाधा पोहोचू शकत नाही. सद्गुणांचा संकल्प हा दृढ असतो त्यामुळे कुठल्याही संकटाचा त्यावर परिणाम होऊ शकत नाही. संकट आले तर ती त्याच्या सद्गुणांची परीक्षा आहे, असे तो समजतो. त्यामुळे सद्गुणी व्हायचे की दुर्गुणी हे मानवाच्याच संकल्पावर अवलंबून आहे, त्याची निवड त्याने करावी. अर्थात इथे व्यक्तीस एवढी निवड करण्याचे आत्मस्वातंत्र्य ते मानतात हे दिसून येते.

काही मूलभूत बाबी अधोरेखित कराव्या, त्या अशा... स्टॉईकांनी सर्व गोष्टी अगदी ईश्वरादिही भौतिक मानल्या असल्या तरीही त्यामध्ये काही फारसे तथ्य नाही, ती मांडणी सदोष आहे हे लक्षात येते. ते स्वतः त्या भौतिक ईश्वराला बुद्धी, संकल्पशक्ती, कारुण्य, विश्वपालनाचे सामर्थ्य असल्याचे मानतात. यासाठी तो चेतन असणे तर गरजेचे आहे. ही मूलभूत अडचण लक्षात येते. आपल्या तत्त्वज्ञानाला ते कितीही उन्नत नीतिशास्त्र मानत असले तरीही त्यांची अंतिम आदर्श नैतिकता ही 'तटस्थता' आहे, ज्याला स्टॉईक संन्यस्त स्थिती मानतात. हा केवळ कठोर आचरणाचा भाग आहे. 'सृष्टी वा प्रकृतीनियमानुसारच जगा...' हे स्टॉईकांचे घोषवाक्यच आहे. ईश्वर हा विश्वव्यापी आहे, म्हणजेच विश्वच ईश्वर आहे. विश्व आणि ईश्वर दोन्हीही बुद्धिगम्य आहेत. मानव त्याचाच एक अंश आहे. त्यामुळे मानवाचे शुद्ध स्वरूप आहे त्याची तर्कातीत बौद्धिकता! अर्थात सद्गुणांनी प्राप्त एक स्थिती! म्हणून माणसाने आपल्या भावभावनांना बाजूला सारून केवळ बुद्धीनेच निर्णय घ्यावे.

अर्थात् स्टॉईक कर्तव्यवादी आहेत. बुद्धी सर्वांनाच असते म्हणून स्टॉईकांनी नैतिक व्यवहार सर्वांनी आचरणात आणावा, असे सांगितले आहे. निसर्ग अर्थात् प्रकृती आणि समाज दोन्हीही त्या वैश्विक ईश्वराच्या बुद्धीचे आविष्कार आहेत, म्हणून समाज, राजकारण यामध्ये बौद्धिकदृष्ट्या उच्च व्यक्तींनी कार्य करावे. राज्याप्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडावे. आपण या विश्वाचे नागरिक आहोत, म्हणून वैश्विक न्यायाने वागावे. मनुष्याने आपल्या गरजा अत्यंत कमी ठेवून जगावे. स्टॉईकांची एपिक्युरियन वगैरे मतांशी तुलना केली जाते; पण एपिक्युरियनांप्रमाणे 'केवळ निष्क्रियता' टाळून 'कर्मसंन्यासा'ला स्टॉईकांनी आपलेसे केले आहे, असे म्हणता येईल. अंतिम वैचारिक सार असा निघतो की, मानवाने गरजा कमी करून निसर्गाच्या नियमाने जगावे. बस! एकंदर स्टॉईक मूलभूत विचार आहेत ते असे...! हे आपण मार्कस ऑरेलियसच्या विचारांशी ताडून बघू शकतो.

मार्कस औरैलियस बादशहाची बोधवचने या पुस्तकाचा अनुवाद सिमियन बेंजमिन यांनी मराठीमध्ये केलेला आहे. खरे तर या पुस्तकाच्या अनुवादामागची भूमिका समजून घेणे गरजेचे आहे.

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने
(Meditations of Marcus Aurelius,
by Marcus Aurelius antoninus the Roman emperor)

सिमियन बेंजमिन अनुवादित 'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' याचा मूळ ग्रंथ 'मेडिटेशन्स ऑफ मार्कस ऑरेलियस' हा तसा कालखंडाचा विचार केला तर प्राचीन आहे. कारण मार्कस ऑरेलियसचा कालखंड इ. स. १२१ - १८० असा आहे. अगदीच तंतोतंत सांगायचे म्हणजे पुस्तकाच्या प्रारंभीच्या भागांत क्वाडी येथे लेखन केल्याचा उल्लेख आहे. क्वाडी येथील क्वाडी या रानटी जमातीचा पराभव त्याने इसवी सन १७१ मध्ये केल्याची नोंद आहे. म्हणजे ग्रंथलेखन साधारणपणे इसवी सन १७१ ते १८० याच कालखंडातील आहे, असे लक्षात येते. मूळ ग्रंथ या काळातील असला तरीही सिमियन बेंजमिन यांचा अनुवाद मात्र इसवी सन १८९३ मधील आहे. मूळ ग्रंथाचा हा स्वैर अनुवाद आहे, असे म्हटल्यास फार वावगे ठरणार नाही. कारण मूळ ग्रंथात बारा बुक्स म्हणजे थोडक्यात पुस्तिका आहेत. त्यात एकूण ४१७ उताऱ्यांचा समावेश केलेला आहे, तर अनुवादित ग्रंथामध्ये बारा पुस्तिकांमध्ये जवळजवळ ४८७ उताऱ्यांचा समावेश आहे. या उताऱ्यांच्या बाबतीत इंग्रजी आवृत्त्यांमध्येही एकमत नाहीय, हे नक्की! कारण अनेक संपादित प्रतींमध्ये संख्या कमी-जास्त असल्याची नोंद आहे. या खेरीज मूळ ग्रंथाशी तुलना करताना अजूनही काही भेद आहेत जे अनुवादकाची भमिका स्पष्ट करतात. मूळ पुस्तकाच्या कालखंडातील भाषा आणि अनुवादकाने उपयोजनामध्ये आणलेल्या भाषेमध्ये भेद आहेच, ते तितकेसे

महत्त्वाचे नाहीय; पण आपल्या अनुवादामध्ये अनुवादकाने जे काही संकेत केलेले आहेत ते मूळ विषयाशी फारसे संबंधित नाहीत. त्या ठिकाणी ती अनुवादकाची मते आहेत, असे समजायला हरकत नाही. तरीही 'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' या अनवादित ग्रंथातून स्टॉईक विचार वाचकांपर्यंत सहज पोहोचू शकतात. ही बाब महत्त्वाची आहे.

मार्कस ऑरेलियस ऑन्टोनिनस ऑगस्टस हा इसवी सनाच्या १६१ पासून त्याच्या मृत्यूपर्यंत रोमचा सम्राट होता. तो ऑन्टोनियस पायसचा भाचा, जावई आणि तसा दत्तक मुलगाही होता. मार्कस ऑरेलियस बादशहाच्या संक्षिप्त चरित्राची मांडणी अनुवादकाने पुस्तकाच्या प्रारंभी केलेली आहेच, त्यामुळे तो परिचय होईलच. तेव्हाची संतसत्पुरुषांची यादी बघता मार्कस ऑरेलियस हा अत्यंत महत्त्वाचा आणि गाजलेला स्टॉईक विचारवंत होता, असं एच. पी. ब्लावत्स्की[१५] यांनी म्हटले आहे. मूळ ग्रीक भाषेत असलेल्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद प्रथम १६३४ इसवीसनामध्ये मेरीक कॅसेबॉन यांनी 'द गोल्डन बुक ऑफ मार्कस ऑरेलियस 'या नावाने केल्याची नोंद मिळते. पुढे सतत विविध संपादित आवृत्त्या निघत गेल्या.

रोमन बादशहा मार्कस ऑरेलियसने खरे तर अशा पुस्तकाचे लेखन का केले असावे, असा एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कारण काही राजांचा अपवाद वगळता जगातील कुठल्याही राजाने सहसा अशा प्रकारचे लेखन केलेले नाही. पुस्तक लेखनामागची भूमिका आपल्या अनुवादामध्ये मांडताना सिमियन बेंजमिन यांनी हे लेखन केवळ स्मरणार्थ नोंदी ठेवलेल्या आहेत, असे सांगितले आहे. 'ही बोधवचने बादशहाने केवळ आपल्या स्वत:च्या आठवणीसाठी लिहिली होती. ती जगातील इतर लोकांनी वाचून शहाणे व्हावे, असा त्याचा इरादा नव्हता. निरनिराळ्या प्रसंगी जे विचार त्यास सुचले ते त्याने टिपून ठेवले...' असे अनुवादकाने स्पष्टपणे प्रस्तावनेमध्ये म्हटलेले आहे. वरकरणी पाहता ते तसेही असायला हरकत नाही. प्रारंभीचा लेखनाचा बाज पाहताना ते रोजनिशीप्रमाणे वाटते किंवा एखाद्या स्मरणवहीतील नोंदीप्रमाणे दिसते; पण एकेक प्रकरणातील उतारे वाचताना मात्र तसे ते जाणवत नाही. काही उतारे हे दीर्घ असून, कधी लघुनिबंधांप्रमाणे वाटतात. शिवाय शेवटच्या पुस्तकातील शेवटच्या उताऱ्याचा प्रारंभ 'हे मानव, या जगद्रूप महाविशाल राष्ट्रांतला तू रहिवासी आहेस[१६]' या वाक्यापासून आहे. मूळ ग्रंथामधील शेवटच्या उताऱ्याच्या सुरुवातीचा भाग काढून सिमियन बेंजमिन यांनी या मधल्या वाक्यापासून प्रारंभ केला आहे. त्यामुळे बादशहाने अगदी हेतूपूर्वक लेखन केलेले आहे. तेही स्वतःला स्मरण देण्यासाठी नव्हे, तर विश्वातील प्रत्येक मानवाने आपले तत्त्वज्ञान वाचावे, स्टॉईक विचार हे सर्वांपर्यंत पोहोचावेत हाच शुद्ध हेतू त्यामागे आहे. तसाही खरा विचारवंत-मग तो स्टॉईक का असेना-हा देशकालस्थितीशी फार बांधलेला नसतोच, तो विश्वकल्याणाच्या हेतूनेच काम करीत

असतो. त्याखेरीज स्वतःचे चरित्र वा लेखन लोकांसमोर आणावे, हाही हेतू त्यामागे दिसत नाही. कारण स्वतःच्या आयुष्याविषयी त्यामध्ये फारसे काही लिहिलेले नाही. रोमन साम्राज्य टिकवण्यासाठी करावा लागलेला संघर्ष व राज्यप्रशासनातील चढउतार याविषयी कठलेही भाष्य नाही. वा राज्य कसे आणि कोणत्या नियमांनी चालले पाहिजे, याविषयी मार्कसने काहीही लिहिलेले नाही. त्यामुळे रोमन साम्राज्याची राजनीती वा राज्यविवेक किंवा प्रशासकीय कौशल्ये याविषयी त्यात काहीही नाही. तसेही पाश्चात्त्य देशांमध्ये अशा प्रकारचा विचार हा फार उशिरा म्हणजे पंधराव्या शतकामध्ये सुस्पष्टपणे मांडला गेला असल्याची नोंद मिळते. राजनीतिविवेक हा अगदी व्यवस्थितपणे मॅकियाव्हेलीच्या (१४६९-१५२७ इसवी) 'प्रिन्स' वगैरे ग्रंथांच्या लेखनानंतर विशेष चर्चिला गेल्याची नोंद मिळते. त्या मानाने भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये कौटिल्याची नोंद आहेच. त्याहूनही प्राचीन विदुरनीती किंवा तत्सम ग्रंथ आहेत. शिवाय अगदी अलीकडच्या काळामध्ये रामचंद्रपंत अमात्यांचा आज्ञापत्र हा छोटा ग्रंथ शिवरायांच्या मराठा साम्राज्याच्या एकंदर राज्यप्रशासन प्रणालीची नोंद देतो; पण अशा प्रकारचा कुठलाही उल्लेख रोमन सम्राट असलेल्या मार्कस ऑरेलियसच्या लेखनामध्ये आढळत नाही. त्याला ते आवश्यक वाटलेले दिसत नाही. त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे तो ज्या विचारांचे प्रत्यक्ष अनुकरण आणि आचरण करीत होता, त्या स्टॉईक तत्त्वज्ञानाचा परिचय इतरांना करून देणे हे त्याला जास्त महत्त्वाचे वाटत होते ही बाब अधोरेखित करण्यासारखी आहे. पुस्तकांमध्ये ही बाब ठिकठिकाणी स्पष्टपणे दिसून येते.

मार्कस ऑरेलियसच्या बाबतीत सांगायचे झाले तर तो एक विरक्त असा पुरुष होता. राज्याचा सम्राट म्हणून सत्तेवर यावे, असा विचारही त्याने कधी केला नसावा. केवळ दत्तक पुत्र म्हणून नव्हे तर एक अनासक्त व न्यायप्रिय व्यक्ती म्हणून त्याला राज्याचा उत्तराधिकारी केले गेले असावे. ती जबाबदारी त्याने अगदी मृत्यूपर्यंत पार पाडल्याची नोंद प्रस्तावनेमध्ये आहे. मार्कसच्या वैराग्यशील जगण्याची विशेष नोंद दिली आहे. प्रचंड वैभव गाठीशी असताना आणि त्याचा उपभोग घेण्याची संधी असतानाही एखादी व्यक्ती वयाच्या बाराव्या वर्षापासून स्टॉईक तत्त्ववेत्त्यांप्रमाणे पेहराव करून अल्प भोजन घेऊन राहत असेल, तर ते वैराग्य खरेच मानावे लागेल. शिवाय झोपण्यासाठी राजवाड्यात बिछाना असताना केवळ लाकडी फळ्यांवर झोपणारा राजपुत्र हा गौतम बुद्धांप्रमाणे अनासक्त असला पाहिजे. शारीरिकदृष्ट्या सक्षम असूनही कुणावरही अत्याचार न करणारा आणि केवळ क्षमा करण्याची इच्छा ठेवणारा राजपुत्र हा नक्कीच विरक्त योगीच असू शकतो. त्याचे एकंदर पाहता सॉक्रेटिसचा शिष्य असलेल्या ॲन्टिस्थेनिसच्या विचारांपासून निर्माण झालेल्या उपेक्षावादाची (cynicism) पुढची आवृत्ती म्हणून आपण स्टॉईक तत्त्वज्ञानाकडे पाहू शकतो, हे लक्षात येते. अशा राजपुत्राच्या हाती सत्ता देणे म्हणजे प्लेटोच्या रिपब्लिक

ग्रंथातील 'तत्त्वज्ञ राजा'च्या (philosopher king) हाती सत्ता देणे होय. त्यातून राज्याचे आणि प्रजेचे भलेच होणार, याबाबत शंका घेण्याचे कारण काय?

पण हे सारे स्पष्ट असताना सिमियन बेंजमिन यांनी 'जगातील इतर लोकांनी वाचून शहाणे व्हावे, असा त्याचा इरादा नव्हता' असे का लिहिले असावे, याचाही विचार करावा लागेल; आणि मूळ पुस्तक वाचताना असा भ्रम होणे साहजिक आहे, हे आपल्या लक्षात येते.

एकंदर सर्व उतारे हे स्वतःला उद्देशून लिहिलेले आहेत. शिवाय पहिले पुस्तक हे जवळ जवळ स्वतःच्या अध्ययनाविषयी आणि संस्कारांविषयीच आहे. आपल्यावर कुणी, कसे व कोणते संस्कार केले याची बऱ्याच उताऱ्यांमध्ये त्याने नोंद दिलेली आहे. सुरुवातीला आजोबा, मग वडील, आई, पणजोबा वगैरेंकडून काय काय शिकलो हे सांगितले आहे, तसेच डायऑग्निटस, रस्टिकस, अपोलेनियस, सेक्स्टस, व्याकरणकार अलेक्झांडर, फ्रांटो, प्लेटो, मॅक्सिमस अशी अनेक लोकांची नावे पहिल्याच पुस्तकामध्ये घेऊन आपल्याला कुणाकडून काय काय शिकायला मिळालेले आहे. याचा कृतज्ञतापर्वक उल्लेख त्याने केलेला आहे. या प्रकरणावरून साधारण असा गैरसमज होऊ शकतो की, हे सारे त्याने आपण काय शिकलो हे स्मरणात राहावे म्हणून आणि त्या त्या व्यक्तीविषयी कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून लिहिलेले असावे. कदाचित हे पुस्तक केवळ इतर पुस्तके वाचून वा अध्ययन करून लिहिलेले आहे, असाही कुणाचा गैरसमज होऊ शकतो; पण ते तसे नसून चांगल्या शिक्षकांकडून हे शिकून आचरणात आणून मगच लिहिलेले आहे, हे सांगायचे आहे. म्हणजे स्टॉईक तत्त्वज्ञानाचा अभ्यास तर ग्रंथातून केलाच असणार; पण केवळ ग्रंथ नव्हे तर ज्यांनी त्याचा अनुभव घेतलेला आहे, अशांनी मला हे आचरण्यास सांगितले आहे आणि मी त्याचा अनुभव घेतला आहे, म्हणून तुम्हाला सांगत आहे हा भाव त्यामागे आहे. तुम्ही या आप्त पुरुषांचे ग्रंथ अभ्यासा आणि मग त्याप्रमाणे आचरण करा हेच त्याचे सांगणे आहे. असे आपल्याकडे आप्तवचन आणि आत्मप्रचीती[१७] साठी सांगितले जाते. शिवाय यातील पहिल्या पुस्तकामध्ये दोन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत, ज्यावरून आपण असे म्हणू शकतो की, हे लेखन केवळ स्मरणार्थ नोंदीपुरते नव्हते. त्यातला पहिला मुद्दा म्हणजे स्टॉईकांचा नीतिशास्त्रावर अतिशय जोर होता. त्यामुळे ज्या स्टॉईक विचारवंतांनी आणि इतरांनीही अगदी आदर्श नैतिक जीवन व्यतीत केले अशांचा उल्लेख त्याने करणे ही साहजिक बाब आहे. दुसरी गोष्ट, स्टॉईक हा शब्दही न उच्चारता केवळ आदर्श नैतिक वर्तन असे असावे, याविषयी सांगण्याचा त्याचा मानस आहे. म्हणून काही ठिकाणी त्याने इतरांचा निषेधही केलेला आहे. उदाहरण द्यायचे झाले, तर पहिल्याच पुस्तकातील सातव्या उताऱ्यामध्ये 'विद्येचा रिकामा डौल मिरवून दुसऱ्यांची स्पर्धा करू नये, लहान बोधपर भाषणे करू नये, लोकांस दाखविण्याकरिता मोठी परोपकाराची कृत्ये करितो, असे भासवू नये' वगैरे जो निषेध आहे तो सोफिस्टांचा आहे. अनुवादित पहिल्या पुस्तकातील सातव्या आणि सतराव्या

उताऱ्यामध्ये तसा स्पष्टपणे उल्लेख नसला, तरी मूळ पुस्तकात सोफिस्टांचा[१८] अगदी स्पष्ट उल्लेख मार्कसने केलेला आहेच. हा सोफिस्टांचा निषेध अनेकवार करण्यात आलेला आहे. तिसऱ्या पुस्तकातील पाचव्या उताऱ्यामध्येही सोफिस्टांना कोपरखळी दिली असल्याचे जाणवते. सोफिस्टांचा निषेध-मग तो सुस्पष्टपणे असो वा सांकेतिक शब्दांत असो- केलेला आहे. त्यामुळे मार्कसने हे स्वतःच्या स्मरणासाठी लेखन केलेले आहे, असे काही वाटत नाही. केवळ स्वतःला उद्देशून ते लेखन असल्याप्रमाणे भासते म्हणून सिमियन बेंजमिन यांना तसा संभ्रम झालेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनुवाद करताना बेंजमिन यांचे काही गोष्टींकडे अगदी पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते किंवा त्या गोष्टींना फारसे महत्त्व द्यावेसे वाटलेले नाही, हे अगदी स्पष्ट आहे. एक तर सोफिस्टांचा उल्लेख मूळ पुस्तकामध्ये अगदी स्पष्टपणे केलेला असतानाही बेंजमिन यांनी तो अनुवादात का टाळला हे काही समजत नाही. दुसरी महत्त्वाची बाब, अनुवादित पहिल्या पुस्तकात सहाव्या उताऱ्यामध्ये 'लहान वयामध्ये संवाद लिहावे' असे वाक्य आहे. हे वाक्य वाचताना तसेही विसंगत वाटते. इंग्रजीमध्ये 'मी तारुण्यात असताना त्या विषयावर संवाद लिहिले.[१९] या आशयाचा स्वतःच्या संवादशैलीतील लेखनाचा उल्लेख आहे. अनुवाद करताना आशय सरळ पोहोचावा म्हणून सुलभीकरणाच्या नादात असे होऊ शकते; पण ते विसंगत वाटते. अनुवादामध्ये अशा प्रकारच्या गफलती अनेक आहेत. अनेक अमराठी वा अप्रचलित मराठी शब्दांचा उपयोग अनुवादामध्ये केलेला आढळतो. ममताळू, मुकर्रर, इरादा अशा शब्दांचा प्रयोग, तसेच का की, अशा गैरमराठी शब्दप्रयोग अनेकवार करण्यात आलेला आहे. तो क्योंकी या हिंदी शब्दांवर बेतलेला वाटतो. अनुवादावर हिंदी उर्दूचा प्रभाव जाणवतो. अनुवाद करताना भारतीय दर्शनशास्त्रातील आणि मराठी संत साहित्यातील पारिभाषिक वा तात्त्विक शब्दांचा प्रयोगही अनेकदा केलेला आढळतो. उदाहरणार्थ, 'स्वसंवेद्य'प्रमाणे स्वयंवेद्य, बाऊ (इथे बागुलबुवा शब्द जास्त चपखल बसला असता), अडथळा वा विक्षेप याअर्थी योगदर्शनातील अंतराय आणि विप्लव यांसारखे शब्द, जाते याऐवजी सरळ चक्की, आलाप ऐवजी आलाफ, चिच्छक्ती असे अनेक शब्द वापरल्याचे लक्षात येते. तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांमधील पारिभाषिक संज्ञा या समानार्थी असतानाही त्या प्रतिशब्द म्हणून एकमेकांच्या जागी वा दुसऱ्या तत्त्वज्ञान शाखेत उपयोजनामध्ये आणता येतील असे काही नाही. त्यातील अर्थसंपृक्तता संदर्भानुरूप बदलू शकते. अनुवादकाने याबाबतीत विचारांती शब्दांची निवड करणे आवश्यक होऊन बसते. अन्यथा अर्थसाम्याचा आभास निर्माण होऊ शकतो. शिवाय त्या त्या शाखांतील अभिप्रेत अर्थ अभ्यासकांपर्यंत पोहोचणे कठीण होऊन बसते. सुरुवातीला 'स्टॉईकलोकांचे तत्त्वज्ञान' या लेखात धर्माविषयी विचार या उताऱ्यामध्ये स्टॉईक लोकांचे अवतरण आणि त्यांचे कार्य जणू महाराष्ट्रात झाल्याप्रमाणे लिहिले आहे. स्टॉईकांविषयी लिहिताना बेंजामिन यांनी लिहिले आहे...

“त्यांच्या नीतिविचारांचा पायाही सर्वस्वी सृष्टीगत ईश्वरी नियमावर असून, केवळ विवेकशद्ध असे. म्हणजे अर्थात तद्नुसार वर्तन ठेवल्याने देवाच्या आज्ञेप्रमाणे वागल्याचे श्रेय आले, असे ते म्हणत. सर्व मानवजाती हे एक राष्ट्र असून, प्रत्येक मानव या **महाराष्ट्रा**चा जानपद आहे. ही अत्यंत उदात्त कल्पना तरी त्यांना सुचण्याचे कारण इतकेच दिसते की, सर्व मानवांचा देवाशी निकट संबंध असून, एकाच विवेकरूप नियमाने ते बद्ध आहेत, असा त्यांचा दृढ समज असे.’’ या काही वाक्यांवरून महाराष्ट्रामध्ये एकात्मभाव रुजवण्यासाठी स्टॉईकांनी जीवाचे रान केल्याचा भास निर्माण होतो. बेंजमिन यांनी महाराष्ट्रीय संतांचे कार्य आणि भारतीय दार्शनिक साहित्य केवळ वाचले असल्याचा हा परिणाम असू शकतो हे लक्षात येते. ते फार सखोलपणे अभ्यासले वा आचरले असे वाटत नाही. केवळ स्टॉईक विचार आणि महाराष्ट्रीय संतांचे कार्य वा तत्त्वज्ञान यात काही साम्यस्थळे आहेत म्हणून असे मांडण्याचा प्रयत्न केला असावा, असे वाटते किंवा विश्व हेच एक महा राष्ट्र आहे, प्रत्येक मनुष्य त्याचा नागरिक आहे, अशा हेतूनेही लिहिले असावे; पण सारे संदिग्ध आहे. अशा प्रकारचा संदिग्ध वा संदर्भरहित उल्लेख करणे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाकडून खरे तर अपेक्षित नाही. प्रस्तावनेमध्येही त्यांनी भारतीय दर्शने, त्यातील विचारवंत, तसेच स्टॉईक विचार व विचारवंत यांचा उणेपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो फार अभ्यासपूर्ण वाटत नाही. शिवाय भारतीय दर्शनातील स्थितप्रज्ञता, अनासक्ती, वैराग्य, विश्वात्मैक्य, सर्वेश्वरभाव, कर्तव्य अशा विविध पारिभाषिक संज्ञांचा स्टॉईक विचारांशी तौलनिक अभ्यास मांडण्याची संधी असतानाही दोन्हीतील आशयसंपन्नता बाजूला ठेवून वैज्ञानिक सिद्धांत वा धर्मश्रद्धांची अकारण सांगड घालून काही अंशी दोन्हीही शास्त्रांना दोष देण्याचा प्रयत्न केला आहे. ते तसे लेखन का केले यामागे बरीच कारणे असू शकतात. ज्यामध्ये संपादनाचा अभाव हेही एक कारण असू शकते. शिवाय उपदेशपर खूप काही आहे, त्याचा अनुवाद करताना एतद्देशीय वाचकांना ते आपलेसे वाटले पाहिजे, हेही असे लिहिण्यामागचे कारण असू शकते; पण अशा काही राहून गेलेल्या त्रुटी असल्या तरीही एक मूल्यवान ग्रंथ मराठीमध्ये अनुवादित करण्याचे श्रेय बेंजमिन यांच्याकडून कुणी हिरावून घेऊ शकत नाही. कारण यातून मार्कस ऑरेलियसने आपल्या चिंतनातून मांडलेल्या स्टॉईक विचारांची प्रभा सुस्पष्टपणे जाणवते. अशा अनेक त्रुटी असल्या तरी स्टॉईक पंथांचे मूलभूत विचार आणि आचार हे वाचकांपर्यंत पोहोचण्यात कुठलाही अडथळा येत नाही, ही बाब अत्यंत समाधानकारक आहे. शिवाय इसवी सन १८९३ मध्ये बेंजमिन यांचा हा अनुवाद हाती येईपर्यंत तरी तत्पूर्वीच्या मराठी भाषक अभ्यासकांपर्यंत स्टॉईकांचे विचार पोहोचले असण्याची शक्यता वाटत नाही. शिवाय अधोरेखित करावी अशी बाब म्हणजे, दोन हजार वर्षांपूर्वी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या विश्वात रोमन कालखंडामध्ये नीति तत्त्वज्ञानाच्या (Ethical philosophy इ. स. पू. ३३२ ते इ. स. १००) व धर्म तत्वज्ञानाच्या (Religious Philosophy इ. स. १०० ते इ. स.

४७६) क्षेत्रामध्ये किती वैचारिक मंथन झाले होते याचा अदमास या पुस्तकावरून येतो. स्टॉईक, स्टॉईकांचे तत्त्वज्ञान, त्याचे स्वरूप व सिद्धांत, त्यांची वैचारिक पार्श्वभूमी, तत्कालीन धर्मविचार, धर्मधोरण व आचार, वैयक्तिक व सामाजिक जीवनशैली, व्यक्ती, समाज व राष्ट्रविचार, वैचारिक संघर्ष व सामंजस्य, एकात्मभाव व्यक्त करणारा विश्वमानवतावाद, नीतिशास्त्रीय संकल्पना, लेखन व साहित्यविचार, तत्त्वज्ञानपर लेखनाचे झालेले दूरगामी परिणाम, निर्माण झालेली परंपरा वगैरे अभ्यासाचा उपयोग भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्मविचारांचा तौलनिक अभ्यास करताना होऊ शकतो. बेंजमिन यांच्या अनुवादाचा पुढील शतकभरातील अभ्यासकांना झालेला उपयोग अमूल्य आहे. त्यामुळे एक प्राचीन अमूल्य ग्रंथ मराठीत आणल्याचे श्रेय त्यांच्याकडून कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

मार्कस ऑरेलियस प्रतिपादित स्टॉईकांचे तत्वज्ञान

'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' या सिमियन बेंजमिन अनुवादित पुस्तकामध्ये स्टॉईकांचे तत्त्वविचार कसे सुस्पष्टपणे दिसून येतात, यावर आपण जरा थोडक्यात प्रकाश टाकू. म्हणजे मार्कसने लिहिलेली बोधवचने ही तंतोतंत स्टॉईक विचारांचा प्रसार कसा करतात, हे आपल्याला पाहता येईल. आपण आधीच पाहिले की, स्टॉईकांचे तत्त्वज्ञान हे पदार्थविज्ञान, नीतिशास्त्र, ज्ञानमीमांसा व धर्मविचार स्पष्टपणे मांडत असले, तरीही मुख्यत्वेकरून नीतिशास्त्रावर स्टॉईकांचा जास्त जोर होता. मनुष्याचे वर्तन हे निसर्ग नियमानुसार नैतिक व विवेकपूर्ण असले की, तो विश्वातील ज्ञानतत्त्वाशी एकरूप होऊ शकतो, हा त्यांचा महत्त्वाचा सिद्धांत होता. मार्कसच्या लेखनातून आपण संक्षिप्तपणे त्याचा पडताळा घेऊ.

मार्कसच्या बोधवचनातील पदार्थ विज्ञान

मार्कसच्या बोधवचनांमध्ये पदोपदी एक गोष्ट अगदी ठामपणे मांडलेली आढळते ती म्हणजे बाह्य भौतिक विश्वाला खरेच अस्तित्व आहे. त्याने त्याची सतत दखल घेतलेली आहे; पण हे अस्तित्व अगदीच सातत्याने असेल असे काही नाही. सतत परिवर्तनशील असल्याने त्यामध्ये सतत काहीही टिकणारे नाहीय. परिवर्तन हे अगदी नित्य असल्याचे स्टॉईकांनी स्वीकारल्याचे मार्कसच्या लेखामधून दिसून येते. कदाचित परिवर्तन स्वीकारल्याचा एक आनुषंगिक परिणाम म्हणून की काय भौतिक पदार्थ हे भासमान असल्याचे स्वीकारावे लागले असल्याची नोंद मिळते. पुस्तक दुसऱ्यामध्ये पंधराव्या अर्थात मूळ इंग्रजी पुस्तकांतील तेराव्या उताऱ्यामध्ये सिनिक मताचा मॉनिमस याच्या 'हे सारे वस्तुजात भासमय आहे...' या वचनाचा उल्लेख केला आहे. हे प्रतिपादन करीत असतानाही भौतिक पदार्थांचे काहीतरी सारतत्त्व आहे, याकडे मात्र स्टॉईकांचे दुर्लक्ष झालेले नाहीय. ते आपल्या शब्दांमध्ये अगदी यथार्थपणे मार्कसने मांडलेले आहे. दुसऱ्या पुस्तकातील चौदाव्या उताऱ्यामध्ये तर अगदी

स्पष्टपणे 'मनुष्य मुकतो तो फक्त वर्तमान स्थितीच मुकतो, बाकी मुकण्यासारखे त्याच्याजवळ काहीही नाही,' असे स्पष्टपणे सांगितले आहे. अशाप्रकारे मर्त्यता अगदी स्पष्टपणे मान्य केली आहे, त्याचवेळेस चौथ्या पुस्तकामध्ये सारतत्त्वाविषयी सांगितले आहे. चौथ्या पुस्तकामध्ये व्यक्ती स्वतःला जीवरूप समजून दुःखी होते वा भौतिक गोष्टीत जास्त रमते, हे लक्षात ठेवून 'तू जो जीवमान आहेस तो केवळ अंशरूप आहेस आणि त्यापासून तू निर्माण झाला आहेस. त्यामध्ये तू अंती लीन होणार आहेस. म्हणजे अर्थात सर्व विश्वाची चिच्छक्ती म्हणून जी आहे तिशी, तुझे रूपांतर होऊन पुन्हा संयोग होईल.' ही चित् शक्ती अर्थात ज्ञानतत्त्व असलेला ईश्वर असून, त्याचाच अंश म्हणून जीव कार्य करीत असतो, पुन्हा त्यातच विलीन होतो, अशी त्यांची भौतिक वस्तुजाताबद्दलची उपपत्ती आहे. चौथ्या पुस्तकातच एका उताऱ्यामध्ये एपिक्टेटसच्या 'तू देहधारी केवळ लहानसा आत्मा आहे.' या वाक्याला स्थान दिले आहे. अर्थात् स्टॉईकांच्या भौतिक विश्वाच्या संकल्पनेप्रमाणे संपूर्ण जड भौतिक विश्वाचा मनुष्य एक अंश आहे; पण केवळ परिवर्तनामध्ये हे अस्तित्व नष्ट होत नाही, तर त्याचा विलय तत्त्वांमध्ये होत शेवटी अंतिम तत्त्वामध्ये ते विलीन होते अशी मांडणी केलेली आहे.

हिरॅक्लिटसने विश्वाचा मूलाधार द्रव्य म्हणून अग्नीस स्वीकारले आहे. त्याप्रमाणे स्टॉईकांनीही अग्नितत्त्वालाच अंतिम द्रव्य म्हणून स्वीकारले आहे. चौथ्या पुस्तकामध्येच सेहेचाळीसाव्या उताऱ्यामध्ये हिरॅक्लिटसच्याच शब्दांत तत्त्वांचा विसर्ग सांगितला आहे. त्यामध्ये समग्र पृथ्वी ही उदकामध्ये तर उदक वायूरूपात आणि वायूचा विनाश होत ते अग्निरूपात विलीन होते. पुन्हा चक्रनेमिक्रमाने पृथ्वी निर्माण व्हावयाची असल्यास उलट क्रमाने निर्माण होईल. मार्कसने हे सारे लिहून समग्र विश्वाचे नियमन विवेकाच्या साहाय्याने होत असते, त्याविरुद्ध मनुष्ये वागतात, असे सांगितले आहे. त्यामुळे स्टॉईकांच्या मूळ तत्त्वज्ञानाप्रमाणेच मार्कसच्याही भौतिक सत् विषयीच्या प्रतिपादनामध्ये किंचित संभ्रम जाणवतो. मार्कसच्या ग्रंथामध्ये भौतिक वस्तुजाताचा आणि मनुष्याच्या भौतिक देहाचा उल्लेख असला तरीही त्यामागे ज्ञानतत्त्व हे अंतिमत: आहेच, शिवाय ते चिच्छक्तीप्रमाणे असल्याचा उल्लेख आहे. बेंजमिन यांनी चिच्छक्तीचा उल्लेख केला असला तरीही मार्कस याच्या मते ती विश्वनिर्माण करू शकणारी वा तिच्यातच विश्वाला विलय होणारी अशी आहे. त्यामुळे भौतिक अशाश्वतता, क्षणभंगुरता एकीकडे तर त्याला आधार असलेले चित्शक्तीचे चिरंतन, शाश्वत असणे दुसरीकडे स्पष्टपणे जाणवते

मात्र यामध्येही सारे काही एकच आहे, एकाच तत्त्वापासून निर्माण झालेले आहे, दुसरे द्रव्य नाही, याचा उच्चार वारंवार झालेला दिसून येतो. मार्कसच्या पूर्ण लेखनामध्ये पदार्थविज्ञान डोकावते असे आहे.

मार्कसच्या बोधवचनातील नीतिशास्त्र

स्टॉईकांचा सर्वात जास्त नीतिशास्त्रावर भर आहे, हे आपण परिचयामध्येच पाहिले; पण स्टॉईक विचार मार्कसच्या लेखनामध्ये किती उतरले, याचा एक संक्षिप्त आढावा आपण घेऊयात "Live according to nature" हे खरे तर स्टॉईकांच्या नीतिशास्त्राचे घोषवाक्य आहे आणि मार्कसने केवळ आपल्या बोधवचनांमध्ये त्याचा प्रत्यय दिला असे नव्हे, तर आपले संपूर्ण आयुष्यच त्याने त्याप्रमाणे व्यतीत केले असे म्हटले, तरी फारसे वावगे ठरणार नाही. स्वत: मार्कसच्या चरित्रामध्ये अगदी बाराव्या वर्षापासून तो स्टॉईक तत्त्ववेत्त्यांप्रमाणे केवळ एक झगा घालून कमीत कमी गरजा ठेवून लाकडी फळ्यांवर झोपून आयुष्य काढत होता, हे चरित्रावरून अगदी स्पष्टपणे दिसून येते. त्याचे स्वतःचे वर्तन अगदी तंतोतंत तसे होते आणि निसर्गाप्रमाणे जगायचे म्हटल्यावर नेमके कसे जगायचे आणि कसे जगू नये याचा निश्चय करणे अत्यंत आवश्यक होऊन बसते. मार्कसने आपल्या बोधवचनांमध्ये पदोपदी विवेकाने जगण्याचे महत्त्व अगदी गांभिर्याने समजवले आहे, हे निश्चित! बोधवचनातील कित्येक वचने विवेकाचा पुनरुच्चार सातत्याने करीत असल्याचे लक्षात येते. त्याचे कारणही समर्पक आहे. मनुष्याने निसर्गाच्या नियमानुसार जगायचे असेल, तर निसर्गाची नियमन शक्ती ही स्वीकारलीच पाहिजे. शिवाय 'जे जे म्हणून देवांपासून प्राप्त होते ते सारे बऱ्यासाठीच आहे. दैवयोगाने जे प्राप्त होते ते निसर्गानुसारच असते आणि दैवी योजनेने घडणाऱ्या गोष्टींशीही त्यांचा अत्यंत निकट संबंध असतो. किंबहुना ते त्याचे कार्यच होय,' असे मार्कस स्वत: सांगतो. ते या विवेकाने आपले जीवन सुव्यवस्थित, कुठेही अतिरेक न होऊ देता, वा उत्तेजित न होता किंवा निसर्गाच्या प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन माणसाने काहीही करू नये, याच इच्छेने सांगतो. बलशाली ईश्वर व त्याची नियमनशक्ती याचे सारे कर्तृत्व विश्वासाठी योग्य असते आणि ते योग्य त्या पद्धतीने करते, हे स्वीकारून तद्नुसार आहे ते व घडेल ते स्वीकारत जगणे म्हणजे निसर्गानुसार जगणे होय. व्यक्तीने त्याला विरोधी कृत्य न करता त्यामध्ये स्वतःला सामावून घेणे गरजेचे आहे. मार्कसने सांगितलेली ही नियमन शक्ती म्हणजे विश्वाचा सर्व कार्यभार जिच्या नियमाने चालते ती देवाची वा ईश्वराची शक्ती होय! ही संकल्पना आपल्याला ऋग्वेदातील ऋताच्या[२०] संकल्पाप्रमाणे आहे, हे समजायला हरकत नाही.

मार्कसने त्या नियामक शक्तीचे तात्पुरते आणि सोयिस्कर असे विभाजन केले असल्याचे लक्षात येते. चौथ्या पुस्तकाच्या प्रारंभीच मार्कस विवेकाला सृष्टीच्या नियामक शक्तीचा अंश आहे, असे सांगतो. तो जेव्हा आपल्या 'स्व'भावाप्रमाणे कार्य करतो म्हणजे निसर्गानुवर्ती असतो तेव्हा भोवतालामध्ये घडणाऱ्या गोष्टींविषयी त्याच्या ठायी आदराची भावना असते, तो त्या 'सह-ज' म्हणून स्वीकारतो. शिवाय जे काही घडते व अनुभवास येते त्याच्या अनुकूल

त्याचे स्वरूपही बदलते. थोडक्यात काय, तर विवेकाने वागणे म्हणजे निसर्गाच्या नियमाच्या बाहेर न जाता त्याच्या अनुषंगाने वागणे होय. त्यामुळे मार्कसच्या मते विवेकाने वागणे हीच जीवनकला होय. भावना व विकास हे सारे काही क्षणापुरते आणि निसर्गानुसार घडलेल्या घटनेच्या प्रतिसादापुरते असते; पण विवेकाने त्याला दूर सारून पुढे जाणे हे सगळ्यात महत्त्वाचे! अगदी पहिल्या पुस्तकातच आठव्या उताऱ्यामध्ये मार्कसने 'विवेकाशिवाय कशावरही विश्वास ठेवू नये,' असे स्पष्टपणे सांगितले आहे. कोणत्याही वेदना झाल्या वा आपले बालक जरी गतप्राण झाले तरीही प्रसंगी वज्राप्रमाणे कठोर होऊन कार्य पार पाडावे. या कर्तव्याच्या बाबतीत मार्कसने कशाशीही तडजोड स्वीकारलेली नाहीय. अशावेळी मोहाचे प्रसंग येणार वा मनुष्याला वासनाही त्रास देणार; पण त्या सर्व गोष्टी दूर सारून मार्कस हा आपले कर्तव्य पार पाडण्यास सांगतो. अशावेळी निवड करताना उच्च नैतिक जीवनाची करावी, वेळ पडल्यास भावनांचे दमन करावे, हे त्याने स्पष्टपणे सांगितले आहे. कर्माच्या निवडीच्या बाबतीत कांटप्रमाणे वा गीतेप्रमाणे स्टॉईक विचार कठोर असल्याचे आपण मागेच पाहिले आहे. मार्कसच्या बाबतीत विचार केला, तरी तोही त्याच सूत्राप्रमाणे वागतो हे आपल्या लक्षात येईल.

सहाव्या पुस्तकातील दुसरा उतारा हा मार्कसच्या कर्तव्याच्या आज्ञेसाठीचा आदर्श उतारा मानता येईल, ज्यामध्ये त्याचे सारतत्त्व साठवलेले आहे. 'तू आपले कर्तव्यकर्म करीत जा, म्हणजे पुरे. मग तुला त्यापासून सुख होवो वा दुःख होवो. लोक तुझी निंदा करोत वा स्तुती करोत, मरण येवो किंवा दुसरे एखादे संकट येवो, त्याविषयी तू बेफिकीर राहा.' त्याच्यापुढे लगेच पाचव्या उताऱ्यामध्ये या वर्तनामागचे कारणही सांगून टाकले आहे, 'ज्या ज्ञानतत्त्वाकडून सर्व विश्वाचे नियमन होत आहे, त्यास स्वतःचा स्वभाव कळत आहे. त्याचप्रमाणे आपण काय करीत आहोत वा कोणत्या जड पदार्थांवर आपले कार्य होत आहे हेही त्यास ठाऊक आहे.' थोडक्यात सांगायचे झाले तर जे काही होते ते ज्ञानतत्त्वाच्या नियमनाने होत आहे. मग असं असेल, तर मनुष्यास इच्छास्वातंत्र्य[२१] तरी आहे की नाही? याचे उत्तर एवढेच की, समोर आलेल्या प्रसंगात तुम्ही तुमचे वर्तमान निसर्ग नियमानुसार योग्य पद्धतीने करण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला नक्की आहे. तेवढेच आपल्या हाती आहे. शिवाय महत्त्वाचे म्हणजे सारे काही नियामक शक्तीकडूनच होत असल्याने कर्माची निवड करण्याचा वा शुभअशुभाचा प्रश्न येतो कुठे? सारे काही त्याच शक्तीच्या हाती आहे. मनुष्याने उत्तम संकल्प करणे हे त्याच्या हाती आहे. विवेकाच्या साहाय्याने योग्य त्या कर्माची निवड करून कर्म करण्याचे स्वातंत्र्य मनुष्यास नक्की आहे . मार्कसने पहिल्याच पुस्तकाच्या आठव्या उताऱ्यामध्ये स्पष्ट सांगितले की, 'अपोलोनियसने मला असे पढविले की, मनुष्यास इच्छास्वातंत्र्य आहे, कोणतेही सत्कृत्य हाती घेतले असता ते अढळ निश्चयाने सिद्धीस न्यावे, आपल्या विवेकावाचून कशावरही एक पळभरसुद्धा भिस्त ठेवू नये...' विवेकाच्या

मदतीने योग्यायोग्याची निवड करून निसर्गाच्या नियमानुसार त्याच्या कार्यास अडथळा येणार नाही, अशा पद्धतीने करीत राहणे म्हणजेच उत्तम नैतिक जीवन जगणे होय.

असे नैतिक वर्तन ठेवले तर मनुष्यास ज्ञानतत्त्वाचा लाभ होऊ शकतो, हे स्पष्टपणे मार्कसने सांगितले आहे. पाचव्या पुस्तकातील पाचव्याच उताऱ्यामध्ये त्याने केवळ प्रयोजनमूल्य असलेल्या बुद्धीला फार महत्त्व नाही, हे अगदी ठासून सांगितले आहे. बुद्धिमत्ता कुशाग्र नसेल तरीही चालेल. त्याऐवजी जे करण्याकरिता निसर्गाने आपल्याला जन्माला घातले आहे ते करणे अनिवार्य आहे, असे त्याला वाटते. आपल्या अंगच्या सद्गुणांचा उत्तम विनियोग करावा, हेही त्याने सांगितले आहे. निष्कपट असणे, गांभीर्य, श्रमसहिष्णुता, सुखोपभोगाविषयी तिटकारा, दैवानुसार प्राप्त झालेल्या अंशाने तृप्त असणे, परोपकारी बुद्धी, ऐषारामाविषयी अप्रीती, क्षुल्लक गोष्टीत मन न घालणे, मनाचे औदार्य इत्यादी सुवृत्तींचा विकास मनुष्याच्या अंतःकरणात सहजी होऊ शकेल. याखेरीज सौजन्य, विनय, विवेक, सत्यशीलता, समता वृत्ती, महामनस्कता इत्यादी सद्गुणांशी परिचय झाला, तर त्यांचा पुन्हा कधीही त्याग करू नये. वैराग्य, अनासक्ती आणि अत्यल्प गरजांमध्ये जगणे हे मार्कसने अनेकवार सांगितले आहे. त्यासाठी मनुष्याने कष्टपूर्वक हे सद्गुण अंगी बाणवावे, असे मार्कस म्हणतो. विश्वातील सर्व वस्तुजाताशी निसर्गाने अगदी सुसंगतीने संबंध जुळवलेला आहे, त्यामुळे निसर्गाने नेमलेल्या गोष्टींचा मानवाने आनंदाने स्वीकार करावा, असे त्यास वाटते. मानव हा विश्वांतर्गत जड पदार्थांचा केवळ एक अत्यल्प अंश असून, विश्वाच्या अनंत काळाचा एक अंश मानवाच्या वाट्याला आलेला आहे. देवाने जर सर्व वस्तुजाताचे व्यापार आणि स्थिती नियत केली असेल, तर माणूस हा त्याच्या दृष्टीने क्षुल्लक आहे, असे मार्कस म्हणतो. ईश्वर सर्वव्याप्त असून, सारे काही त्याच्याच मर्जीने होते, हे त्याने स्वीकारल्याचे दिसून येते. शिवाय यामुळे विश्वातील समग्र वस्तुजाताप्रमाणे मानवही वेगळा भासत असला तरीही सारतत्त्व एकच आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. मार्कसचा सर्वेश्वरवाद आहे तो असा...!

मनुष्यास राज्यप्राप्ती जरी होते, तरी ती विश्वाच्या नियमनाने होते. त्यामुळे राज्यकारभार अतिशय प्रेमाने आणि ईश्वरी कार्य समजून करावा. पहिल्याच पुस्तकामध्ये अकराव्या उताऱ्यामध्ये फ्रांटोने मार्कसला केलेला उपदेश असा की, राजा जुलमी असेल, तर मत्सर, लपंडाव, ढोंग वाढते. तसे न करता न्यायाने वर्तावे अशी त्याची अपेक्षा आहे. स्वत: मार्कस तसा तत्त्वज्ञ राजाप्रमाणे न्यायप्रियतेने वागला असणार, हे खरे!

मार्कसच्या बोधवचनातील ज्ञानमीमांसा

स्टॉईक तत्त्वज्ञानामध्ये ज्ञानमीमांसेला स्वतंत्र अस्तित्व आहे. त्याचे तसे सबळ कारणही आहे. जोपर्यंत व्यक्ती जाणीवपूर्वक कृती करणार नाही, तोपर्यंत त्याच्या कृत्याला फारसा काही अर्थ नाही. अजाणतेपणी केलेली कृती म्हणजे एखाद्या अबोध प्राण्याने केलेल्या

कृतीसमान ती असेल. मानवाचे श्रेष्ठत्व हे आहे की, त्याला संस्काराचा आधार आहे. मुळात व्यक्ती जन्माला येताना कुठले संस्कार घेऊन येते वा नाही, हे काही सांगता येत नाही. जन्मानंतर त्याच्या भोवतालातील व्यक्ती, स्थिती, काळ यासापेक्ष ती वागत जाते. म्हणून जन्माला आल्यानंतर त्याची पाटी कोरी असते, त्यावर संस्कार करणे गरजेचे आहे. असे संस्काराचे असाधारण महत्त्व आहे, हे स्टॉईक विचारांनी स्वीकारले होते. जन्मत: माणसाची पाटी कोरी असते, त्यावर होणाऱ्या संस्काराच्या साहाय्याने... आंतरिक वा बाह्य संस्काराचे छापे उमटून विशिष्ट प्रतिमा माणसाच्या स्मृतीत तयार होतात, त्या प्रतिमांच्या साहाय्याने व्यक्ती आपले सारे जीवन बदलून ते निसर्गाच्या नियमानुसार जगण्यास योग्य बनवते. त्यासाठी मानवावर होणाऱ्या संस्काराचे मूल्य स्टॉईकांनी ओळखले होते. संस्कार करून स्टॉईक जीवन पद्धतीनुसार जगण्यास तयार करावे, तरच ती व्यक्ती निसर्गातील शक्तीच्या नियमानुसार कार्य करेल, अन्यथा विश्वातील इतर जीवांप्रमाणे ती जगत राहील. अर्थात् मानवात संस्काराला निश्चित जागा आहे. संस्कार करून सद्गुणांच्या प्रतिमा स्वतःच्या अंतरंगामध्ये उमटवण्याचे मूल्य मार्कसने चांगले जाणले होते, म्हणूनच बोधवचनाच्या पुस्तकाचा प्रारंभ करताना आधी आपल्यावर कुणाकुणाचे काय काय संस्कार झाले हेच पहिल्या पुस्तकामध्ये त्याने सांगितले आहे. त्याखेरीज पुढील अनेक पुस्तकांमध्ये विविध विचारवंतांकडून आपण काय काय शिकले पाहिजे, याविषयीही विचार मांडले आहेत. त्यातही पहिल्या पुस्तकामध्ये पहिल्या काही उताऱ्यांमध्ये आपल्या नैतिक जीवनाची उभारणी कशी आणि कोणामुळे झालेली आहे, हे सांगण्याची प्रामाणिक तळमळ त्याने दाखवली आहे. म्हणजे हे बोधवचनाचे पुस्तक मी केवळ काही पुस्तके वाचून लिहिलेले नसून स्वतःच्या आचरणातून सिद्ध झालेले तेवढेच ज्ञान मी तुम्हास देत आहे, अशी आत्मप्रचीतीची ग्वाही त्याने दिली आहे. या संस्कारातून जे ज्ञान चेतनेच्या स्तरावर होते त्यातील योग्य काय आणि अयोग्य काय ते ठरवन निश्चयात्मक ज्ञान कोणते ते ठरवावे. हे त्याचे म्हणणे आहे.

निश्चयात्मक ज्ञानाकडे जाताना केवळ संस्कारातील प्रतिमा उपयोगात येतील असे नाही, तर चेतनेच्या स्तरावर होणाऱ्या संवेदनांचे परीक्षण करून शुद्ध ज्ञान निश्चय करावा, असे जरी स्टॉईकांचे तत्त्वज्ञान असले तरीही हे करावे कसे, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. स्टॉईकांनी त्यावर अनुमानाचा शिक्का मारला आहे. विकल्पांचा विचार करून व हेतूफलाश्रित न्यायवाक्यांचा उपयोग करून अंतिम निर्णयाप्रत यावे, असा त्यांचा निश्चयात्मक ज्ञानाच्या बाबतीत दृष्टिकोन आहे. मार्कसने याविषयी आपल्या लेखनामध्ये काही उल्लेख केला आहे का, हे पडताळून पाहणे आवश्यक आहे.

अंतिम ज्ञानतत्त्व म्हणून मार्कसनेही देव अर्थात ईश्वरास स्वीकारल्याचे दिसते; पण ते काम नियामक तत्त्वाकडून होत आहे आणि ते नियामक तत्त्व निसर्गाच्या नियमाने चालते.

हा निसर्ग याच विश्वात अंतर्भूत असून, सारे सुव्यवस्थापन त्याच्याकडूनच होते. म्हणून अंतिम तत्त्वाच्या म्हणजे त्या शक्तीच्या साहाय्याने होत असेल, तर त्यालाच अंतिम ज्ञानतत्त्व म्हणून स्वीकारावे, असे मार्कस म्हणतो; पण हा निर्णय घेत असताना त्याने विकल्पाचा व हेतूफलाश्रित न्यायवाक्यांचा उपयोग कसा केला आहे, हे पाहण्यासारखे आहे. सहाव्या पुस्तकामध्ये दहाव्या उताऱ्यामध्ये (मूळ इंग्रजी पुस्तकातील आठव्या उताऱ्यामध्ये) मार्कसने विश्वाच्या निर्मितीच्या बाबतीत ते कोणी निर्माण केले, यावर पर्याय अर्थात विकल्प निर्माण करून मगच ईश्वरीय शक्तीस पूजनीय मानले आहे. बेंजामिन यांनी या उताऱ्याचा जास्तीत जास्त सुलभ अनुवाद करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् , त्याचा आशय महत्त्वाचा आहे.

हे विश्व एकतर काही तरी यदृच्छेने घोटाळा होऊन वस्तूंच्या परस्पर मिश्रणाने अस्तित्वांत आले असून, त्याचा प्रलयही या एकवटलेल्या वस्तूंची पुनः वाताहत होणार आहे किंवा त्याची घटना सुसंगत, सुव्यवस्थित आणि योजनाबद्ध अशी झाली आहे. जर पहिली कल्पना खरी असेल, तर मग अशा या घोटाळ्याच्या व यादृच्छिक वस्तुसंयोगाने उद्भवलेल्या जगामध्ये म्या का बरे राहण्याची वासना धरावी? आणि मी एकदाचा मातीस कसा मिळून जाईन या चिंतेपलीकडे दुसऱ्या कशाचीही का अपेक्षा करावी? चित्तास विनाकारण तळमळ तरी हा होऊ द्यावी? कारण काही केले तरी अंती मी पंचत्वास पावणारच; परंतु दुसरी कल्पना जर खरी असेल, तर मग ज्याच्या हातून विश्वाचे नियमन होत आहे त्या महाशक्तीस मी परमपूज्य मानीन आणि तिजवर मी पूर्ण भरवसा ठेवून स्वस्थ राहीन.[२२]

इथे विकल्प आणि हेतूफलश्रित विधानाचा उपयोग अगदी सुस्पष्टपणे केल्याच आढळते. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये त्यांनी केलेली मीमांसा आणि विधाने यांच्यात क्वचितच इतकी तंतोतंत एकरूपता आढळते. अंतिम ज्ञानतत्त्व म्हणून 'त्याला' स्वीकारतानाही मार्कसने मांडणी अगदी शुद्ध स्वरूपात केलेली आहे. हे भारतीय न्यायदर्शनातील परार्थानुमानाच्या पंचावयवी प्रकियेप्रमाणे विधानांची मांडणी शास्त्रशुद्धतेच्या निकषावर केल्याप्रमाणे वाटते.

सद्गुणांच्या संस्कारांवर मार्कसचा विश्वास दृढ का आहे, हे यावरून लक्षात येते. बाह्य वस्तुजात कितीही सत्य मानली तरीही ती भासमात्र आहे किंवा क्षणात परिवर्तन होऊन जाणारी आहे, हे त्याने लक्षात घेतले होते. सद्गुणांचे अवतरण झाल्यानंतर त्यावर दृढ विश्वास ठेवून विवेकाने कर्माची निवड करून ते सातत्याने करीत राहिल्याने सत्, सद्वस्तू याविषयीच्या प्रतिमांचे सघनीकरण होत राहते. जरी प्रतिमांना बाह्य अस्तित्व नसले तरीही व्यक्तीने ते स्वीकारल्यामुळे त्याच्या विचारांना एक उन्नत स्वरूप प्राप्त नक्कीच होते, संकल्पना दृढ होत जातात. केवळ निसर्गाच्या नियमानुसार जगणे हाच विवेक असल्याने आणि सहाव्या पुस्तकाच्या अगदी प्रारंभीच सांगितल्याप्रमाणे हे विश्व ज्या पदार्थाचे बनलेले आहे तो पदार्थ ज्ञानतत्त्व म्हणजे मानवाच्या अनुषंगाने विवेकाचा सर्वस्वी अंकित असल्यामुळे त्याची प्राप्ती तशी दूर नाही. व्यक्ती केवळ विवेकाने वागत राहिल्याने अंतिमतः त्याच्या भौतिकादी

तत्त्वांचा क्रमशः विसर्ग त्याच पदार्थात होऊ शकेल, अर्थात ज्ञानस्वरूप होऊ शकेल, हेच त्याला सांगायचे आहे. मार्कसची ज्ञानमीमांसा साधारणपणे अशी आहे.

मार्कसच्या बोधवचनातील धर्मविचार

मार्कसच्या धर्मविचारांमध्ये कसलीही गुंतागुंत नाही वा कसलेही कर्मकांड असण्याची शक्यता नाही. मुळात स्टॉईकांची विचारधारा ही बुद्धिगम्य असल्याने मार्कसचे धर्माचरण वा धर्मसंकल्पना या गोष्टी फार सुलभ आहेत. केवळ मुद्दा आहे तो सुलभीकरणासहित धार्मिक जीवन जगण्याचा...!

ते मात्र तितकेसे सोपे नाहीय. कारण स्टॉईकाचं जगणे हे उपेक्षावाद्यांइतकेच निरासक्त, वैराग्यसंपन्न, भोगरहित आहे. कुठलीही गरज न वाढू देता जगणे तितकेसे सोपे नसते. विशेषतः राजघराण्यातील व्यक्तीसाठी ते तितकेसे सुलभ नसतेच. राज्यकारभार चालवायचा, प्रशासनावर अंकुश ठेवायचा म्हणजे ते सारे करावे लागते. राजा हा संन्यासी असेल तर कारभारामध्ये शिस्त आणि कठोर शासनापेक्षाही क्षमाशीलता येण्याची शक्यता जास्त असते. मार्कस तर तसा बाराव्या वर्षीपासून संन्यस्त जीवन जगणाऱ्यांपैकी होता. कर्मयोगाने आणि अनासक्त विचारसरणीने आलेली सत्ता केवळ विश्वाचे कल्याण करावयाचे आणि निसर्गाच्या नियमानुसार कर्म करीत राहायचे म्हणून त्याने स्वीकारली हे अगदी सुस्पष्ट आहे. त्या प्रशासनाच्या काळामध्ये काय काय झाले, याविषयी बेंजमिन यांनी सुस्पष्टपणे कल्पना दिलेलीच आहे. राजसत्ता ही केवळ धर्मसत्तेतील एक कर्म म्हणून विवेकाने स्वीकारून अनासक्त विचाराने त्याने राज्यकारभार चालवला हे दिसून येते. शिवाय लेखनातही याचे दुवे ठिकठिकाणी आहेतच.

ईश्वरी शक्तीविषयी संपूर्ण समर्पण ठेवणे हे स्टॉईक धर्मविचारांचे आद्य ध्येय सर्व पुस्तकांमध्ये अगदी पदोपदी दिसून येते. संपूर्ण विश्व हे त्याच ज्ञानशक्तीच्या नियमनाने चालते. त्यामुळे सारे काही त्यातच आहे आणि तत्त्वांचा विसर्ग झाल्यानंतर त्यातच विलीन होणार, हा 'यथो वा इमानि भूतानि जायन्ते...' प्रमाणे उद्घोष लेखनामध्ये पदोपदी दिसून येतो. मार्कसच्या धर्मजिज्ञासेमध्ये कुठेही शुभाशुभ वा योग्यायोग्याच्या निर्णयाविषयी फार चिकित्सा केलेली नाहीच. विवेकाने योग्य काय ते स्वीकारावे, असे त्याचे म्हणणे आहे. मुळात अनिष्ट तत्त्व हे जड वा मनष्याच्या नियामक तत्त्वाचा भाग नसतेच, तर ते मनष्याच्या चित्तातील अनिष्ट कल्पनांमध्ये असते, त्यामुळे जड देहही पापी नव्हे, वा सृष्टीचा कारभार चालवणारे नियामक तत्त्वही नव्हे, तर मनुष्याच्या चित्तामध्ये या अनिष्ट संकल्पना दृढ बसल्याने तो तसे वर्तन करतो. म्हणून सद्गुणांसाठी कसोशीने प्रयत्न करून सारे जीवन धर्मजीवनात परिणत करून ते ईश्वराचे कार्य म्हणून करावे, हा सरळ विचार मार्कसच्या पुस्तकामध्ये दिसून येतो. जे काय इष्ट वा अनिष्ट वाटत असते ते देवच सर्व विश्वाच्या भल्यासाठीचा एक भाग म्हणून

करीत असतो हे अगदी स्पष्टपणे त्याने सांगितले आहे. त्यामुळे वाईटाचा फार विचार नको, ईश्वरी शक्ती त्यास पाहून घेईल, त्यात आपली ढवळाढवळ नको, त्याऐवजी देवाचे म्हणजे ज्ञानतत्त्वाचे साहचर्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठीच व्यक्तीचे पूर्ण समर्पण असावे. त्यावरच श्रद्धा असावी, असे त्याचे म्हणणे आहे. स्टॉईकांच्या धर्मतत्त्वांप्रमाणे वर्तन करून मार्कसने आपले ग्रंथलेखनाचे कार्य पूर्ण केले हे निश्चित!

मार्कसच्या बोधवचनात आढळणारी स्टॉईक पंथातील काही विचारवैशिष्ट्ये

- बोधवचनामध्ये पदार्थविचार, ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा, धर्मविचार वगैरे अनेक बाबींवर चर्चा केलेली असली तरीही मार्कसच्या लेखनाचा मूलाधार हा नीतिशास्त्रीय संकल्पनांचा आहे, हे अगदी स्पष्टपणे दिसून येते.
- विवेक, वैराग्य, सद्गुण, निसर्गाच्या नियमानुसार आचरण, धर्मश्रद्धा व समर्पण यांचा उल्लेख जागोजागी आहे.
- क्षणभंगुरता व नित्य परिवर्तनावर मार्कसचा दृढ विश्वास आहे, हे स्पष्टपणे दिसू येते.
- विश्वाच्या मागे उभा असलेला ईश्वर त्याच्या शक्तीने सारे काही करतो. त्याची चिच्छक्तीच सारं काही नियामक तत्त्वांच्या साहाय्याने करते, तीच निर्माण करते, आकाराला आणते, ठेवते, विकारवशता आणते आणि विनाशालाही नेते. सारे काही तिच्यातच घडत असते. भौतिक तत्त्वे वास्तवात असली तरीही नित्य नाहीत, ती भासमय वाटतात. त्यामुळे त्यांच्यातील तत्त्वांचा विनाश होतो तेव्हा तेही तिच्यातच विलीन होतात. विश्वात्मभाव अगदी दृढ आहे. त्यामुळे विश्वात्मा, विश्वमन, वैश्विक बुद्धी, विश्वसंवेदना यांचे उल्लेख आहेत.
- निसर्ग म्हणजे जणू ईश्वरच! म्हणून त्याच्या नियमाने जगणे म्हणजे विवेकाने योग्य कर्माची निवड करून ते कार्य करणे. मग ते निसर्गानुरूप होते.
- इष्ट, अनिष्ट, शुभ वा अशुभ असे काहीही नाही. ते जडात वा नियामक शक्तीमध्ये नसतेच, ते चित्तातील संकल्पनांमध्ये दडलेले असते. म्हणून सद्गुणांचे संस्कार आवश्यक आहेत. संस्कार चित्ताला नैसर्गिक स्थितीत आणण्यासाठी असतात. नीतिशास्त्र त्यासाठीच असते. कारण ते व्यक्तीच्या वर्तनास आकार देते.
- विवेकाचे अधिष्ठान अबाधित आहे.
- अंतिम तत्त्वास मार्कस 'ज्ञानतत्त्व' असे संबोधतो, त्याच्या विरुद्ध जाऊन मनुष्यास काहीही करता येत नसते. म्हणून त्याच्याच नियमाने वागावे मगच ती व्यक्ती न्यायी, विवेकी, धार्मिक ठरते. अन्यथा ते कसले अध्यात्म?
- मृत्यू म्हणजे तत्त्वांचं विसर्जन! वस्तुजाताचा विनाश म्हणजे त्यात पालट! त्याचा तिटकारा नको. उलट आपली वृत्ती सांभाळावी. कुवृत्तीरहित मृत्यू तो धन्य!

- मिथ्या कल्पनांचा त्याग करावा, वासनेचे दमन करावे लागले तर तेही करावे, तृष्णांचे निर्मूलन करावे, नियामक शक्तीसमोर नतमस्तक व्हावे.
- विश्व यादृच्छिक आहे की ईश्वरनिर्मित आहे या पर्यायांवर मार्कसने विचार केलेला आहे. यादृच्छिक असेल तर ते वस्तुजाताच्या गोंधळातून आपोआप निर्माण झालेले आहे, मग मी काहीही केले तरी होणार नाही; पण सुसंवादित्व निर्माण करीत ईश्वरापासून निर्माण झालेले असेल, तर मी त्यालाच शरण आहे.
- व्यक्तीच्या ठायीची चिच्छक्ती भ्रांत होण्याची चार कारणे सांगितली आहेत. १. अनावश्यक विचार, २. सामाजिक ऐक्यात घातक विचार, ३. दुटप्पी विचार वा भाषण, ४. हातून चुकून काही घडले तर स्वतःलाच दोष देणे.
- मनुष्याचे वर्तन नीट असावे म्हणून मार्कसने नऊ नियमही तयार केले आहेत. थोडक्यात, नीतिशास्त्रानुसार वर्तन आवश्यक आहे.
- निसर्गाची नियामक शक्ती, विवेक, सद्गुण या महत्त्वाच्या गोष्टीखेरीज अन्य अभ्यासाचा निषेध आहे.
- राजसत्ता वा समाजसत्ता या गोष्टी निसर्गाच्या प्रवाहाप्रमाणे नाहीत. त्यामुळे त्यात अडकण्यात अर्थ नाही; पण कार्य करावयाचे असल्यास विश्वाच्या शांततेसाठीच करावे.
- प्रत्येक जीवमान वस्तूची बीजरूप स्थिती ते आत्मप्राप्तीपर्यंत स्थिती काय असते, आत्मसंचारापासून आत्मविसर्जनापर्यंत काय फेरफार होत असतो; तिचे घटक अवयव कोणते असून अंतिम काळात तिचा विलय कोणत्या तत्त्वात करावा, यावर साधकाने विचार करावा. विश्वाचा अंतिम पदार्थ हिरॅक्लिटसप्रमाणे अग्नी मानलाय.
- मनुष्य हा या जगद्रूप राष्ट्राचा रहिवासी आहे.
- मार्कस ऑरेलियस लिखित व सिमियन बेंजमिन अनुवादित 'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' हाती घेण्यापूर्वी विषयाचा एवढा परिचय होणे आवश्यक आहे.

उपसंहार

द. गो केतकरलिखित **'पाश्चात्त्य तत्त्वज्ञान'** आणि सिमियन बेंजमिन लिखित **'मार्कस ऑरिलियस बादशहाची बोधवचने'** या दोन ग्रंथांच्या एकत्रीकरणाने आणि त्यांच्या अध्ययनाने पाश्चात्त्य तत्त्वजगातील साधारणपणे साडेसातशे ते आठशे वर्षांच्या कालखंडातील एकंदर वैचारिक स्थित्यंतराचा आलेख आपल्या हाती येतो. थेल्सपासून सुरू झालेली ही विचारधारा मार्कस ऑरेलियसपर्यंत येऊन ठेपते. आपण पाहिले की प्रारंभीच्या भागाला **'ग्रीक तत्त्वज्ञान'** असे संबोधण्यात येते. या भागाचा प्रारंभ इसवी सन

पूर्व ६२५ पासून मानण्यात येतो व इ.स.पू. ३२२ म्हणजे सुप्रसिद्ध विचारवंत ॲरिस्टॉटलच्या मृत्यूपर्यंत गृहीत धरण्यात येतो. त्यातील पहिला कालखंड हा विश्वरचनावादी तत्त्वज्ञान (Naturalistic philosophy इ.स.पू. ६२५ ते इ.स.पू. ४८०), दुसरा मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञान (Anthropologic philosophy इ.स.पू. ४८० ते इ.स.पू. ३९७) तर तिसरा योजनाबद्ध तत्त्वज्ञान (Systematic philosophy इ.स.पू. ३९९ ते इ.स.पू. ३२२) असा गणला जातो. दुसऱ्या भागाला **'ग्रीकोरोमन तत्त्वज्ञान'** असे संबोधले जाते; ज्याचा काळ इ.स.पू. ३२२ ते इ.स. ४७६ पर्यंत म्हणजे रोमचा पाडाव होईपर्यंतचा मानला जातो. ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाचेही ढोबळमानाने दोन भाग...नीति तत्त्वज्ञान (Ethical philosophy इ.स.पू. ३३२ ते इ.स. १००) धर्म तत्त्वज्ञानाचा (Religious philosophy इ.स. १०० ते इ.स.४७६) मानण्यात येतात.

या दोन ग्रंथांमध्ये आपण एकंदर पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या कालखंडातील (म्हणजे इ.स.पू. ६२५ ते इ.स. ४७६) थेल्स ते मार्कस ऑरेलियसपर्यंतचा काळ म्हणजे इ.स.प. ६२५ ते इ.स. १८० असा आठशे पाच वर्षांतील वैचारिक स्थित्यंतराचा आलेख काढला आहे. म्हणजे विश्वरचनावादी तत्त्वज्ञानाचा आरंभ ते थेट धर्म तत्त्वज्ञानाच्या काळापर्यंत एकंदर टप्पे आपण पाहिले आहेत. पहिल्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञान या ग्रंथामध्ये सॉक्रेटिसच्या अंतिम क्षणांपर्यंतचे रेखाटन आहे. अर्थात, प्लेटोचा काळही तेव्हाच सुरू झाला होता आणि लगेच ॲरिस्टॉटलचे विज्ञानकेंद्री तत्त्वज्ञानाचे युगही सुरू झालेच होते. म्हणजे तत्त्वज्ञानाला अगदी सुव्यवस्थित स्वरूप येण्यास सुरुवात होत असतानाचाही कालखंड यात आहे. तत्त्वज्ञानाला सुव्यवस्थित स्वरूप येत असताना नीतिविषयक आणि धार्मिक तत्त्वज्ञानाचा काळही सुरू होत होता. हे जरा अपेक्षितही आहे. विज्ञान आणि नीतिशास्त्र यांची सांगड म्हणावी तितकीशी पक्की नाही; पण जेव्हा जेव्हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये नीतिविषयक चर्चा सुरू होते, तेव्हा तेव्हा त्याच्या प्रवाहाची एक धारा धर्मविषयक तत्त्वज्ञानाच्या जवळ जाऊ लागते.

विश्वरचनावादी तत्त्ववेत्ता थेल्सपासून ही विचारधारा योजनाबद्ध तत्त्वज्ञानाकडे वळली आणि मग त्यानंतर ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाचा कालखंड सुरू झालेला आपण पाहिला. यामध्ये प्लेटो आणि ॲरिस्टॉटलचे योगदान अति महत्त्वाचे राहिले आहे. पूर्वसुरीचे सारे विचार शब्दरूप करून त्यांनी त्याला सुस्वरूप प्राप्त करून दिले. ॲन्टिस्थेनिस व ॲरिस्टिपस यांनी त्यानंतर एका वैचारिक पायावर आचारसंहिता निर्माण केली. सॉक्रेटिस हा सहजभाव व सहज वर्तन ठेवणारा होता. पण त्याच्या पाऊलखणांवर चालणे इतके सोपे नव्हते. याच कारणाने त्याच्या तत्त्वविचारांना नेमकेपणाने मांडण्याच्या प्रयत्नातून उपेक्षावाद (cynicism) आणि सुखवाद (cyrainicism) निर्माण झाला. हे तत्त्वविभाजन पुढील पिढ्यांच्या आचारासाठी कारणीभूत ठरले असे म्हणायला हरकत नाही. जीवनाकडे, जीवनातील यथार्थतेकडे बघण्याचा हा एक दृष्टिकोनच होता. जीवनाकडे उपेक्षेने पाहावे की

सुखोपभोगाच्या इच्छेने पाहावे हा एक प्रकारचा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील 'नयवाद'[२३]च होता. हे पर्यायी आणि स्वीकार्य विभाजन आचारसंहिता तयार करण्यासाठी महत्त्वाचे ठरले. ही तत्त्ववेत्ती मंडळी आपापल्या मतावर पुढे सतत ठाम राहिली, हा भाग यात महत्त्वाचा आहे. डायोजिनिससारखा उपेक्षावादी विचारवंत चक्क भिक्षा मागून राहिला ही बाब अधोरेखित करावी अशी आहे.

या तत्त्वविभाजनाव्यतिरिक्त पूर्वसुरींचा तत्त्वविचारांचं खऱ्या अर्थाने सुसंबद्धीकरण केले ते प्लेटोनंतर ॲरिस्टॉटलने! Metaphysics या संज्ञेचा प्रथम वापर त्यानेच केला. तत्त्वज्ञानाच्या जवळपास सर्वच विषयांना स्पर्श करून त्याचं सुसूत्रीकरण करणारा विचारवंत म्हणून ॲरिस्टॉटलकडे पाहावे लागते. त्याच्यानंतर ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ सुरू झाला. थिओफ्रेटस (३७१-२८७इ.स.पू.) हा पेरिटॅटेटिक संप्रदायाचा विचारंवत. हा आपला प्रभाव टाकत असतानाच एलिसच्या पायऱ्होने (३६०-२७०इ.स.प.) निखळ संशयवादाचा पाया रचला. लगोलग लॅप्पसकसच्या स्ट्रॅटोने (३४०-२६८इ.स.पू.) निरीश्वरवादी प्रतिपादन सुरू केले. एपिक्यूरस (३४१-२७०इ.स.पू.) याने अणुभौतिकवाद आणि सुखवादाची मांडणी सुरू केली. ॲरिस्टॉटलच्या सुसूत्रबद्ध मांडणीतून अशा वाटा फुटणे अगदी स्वाभाविक होते; आणि तेच झाले.

पायऱ्होने संशयवादी भूमिका मांडली. हा संशय म्हणजे सॉक्रेटिस वा देकार्तप्रमाणे संशयपद्धती (Method of doubt) नव्हती तर शुद्ध ज्ञानाच्या अपेक्षेने व्यक्त केलेला संशय होता. विशुद्ध ज्ञानतत्त्व खरेच असते का? जग आणि जगतातील वस्तू नेमक्या कशा आहेत याचा शोध घेता येईल; पण त्याचे खरे ज्ञान मात्र होऊ शकणार नाही, अशी ज्ञानाच्या बाबतीत संशयवादाने भूमिका व्यक्त केली. ज्ञानेंद्रिये ही विश्वासार्ह नाहीत व बुद्धीच्या साहाय्याने मांडण्यात आलेल्या ज्ञानाचे तेवढ्याच प्रभावीपणे खंडनही करता येते, म्हणून खरे ज्ञान अशक्य आहे असे त्यांनी सांगितले. पायऱ्होच्या काळातच आलेल्या टिमॉन (३२०-२३० इ.स.पू.), कार्ने अडस (२१४-१२९ इ.स.पू.), सिसेरो (१०६-४३ इ.स.पू.) यांनी हीच विचारधारा सातत्याने पुढे नेली. या संशयवादाचा परिणाम त्या काळखंडातील तत्कालीन विचारवंतांवर झालेला होता हे नक्की! ख्रिस्तपूर्व साधारणपणे साडेतीनशे वर्षे या विचारधारेचा एक परिणाम नक्कीच प्रभावाने असणार. या संशयवादी भूमिकेतूनच स्ट्रॅटोचा निरीश्वरवाद बाहेर येणं शक्य होतं. बहुधा आधुनिक विज्ञानाकडे आणि जडभौतिकवादाकडे वळणारे तत्त्वचिंतनाचे लेखन हे पुढे पाश्चात्त्य विज्ञानाच्या संशोधनाला बळकटी देणारे आणि पोषक ठरले असावे.

ॲरिस्टॉटलचे विविध तत्त्वविचारांचे सुसंबद्ध विकेंद्रीकरण, पायऱ्होने उभा केलेला संशयवाद, स्ट्रॅटोचा निरीश्वरवाद व एपिक्यूरसचा सुखवाद या सर्व बिंदूंना जोडणाऱ्या रेषांवरून तत्कालीन ग्रीकोरोमन तत्त्वविचारांची नेमकी दिशा स्पष्ट होते. या सर्व भूमिका मांडणाऱ्यांमध्ये

काही तत्त्वचिंतक वेगळेपणाने विचार करणारे असतातच. पदार्थाच्या यथार्थ ज्ञानाबद्दल वा अंतिम ज्ञानाच्या शक्यतेबद्दल निर्माण झालेला संशय, निरीश्वरवाद व सुखवाद मानवी नैतिकतेवर प्रश्न निर्माण करणारा ठरला नसता तरच नवल! अंतिम तत्त्व वा ईश्वर वा ज्ञानतत्त्व नाकारून केवळ भोगसुखावर आधारित जीवन... अगदी इंद्रिये व बुद्धी हे यथार्थ असे ज्ञान देऊ शकत नाही, हे स्वीकारूनही असे जीवन जगणे ही मानवी जीवनाची इतिश्री असू शकत नाही. कसलेही तत्त्वचिंतन नाकारणे आणि केवळ जड जगतातील एक घटक बनून राहणे म्हणजे मानवाने आपल्या पूर्व ज्ञानस्थितीला प्राप्त करणे नव्हे, तर पशूवत ज्ञानपूर्वतेची अर्थात अज्ञान व जडावस्थेची स्वीकार्यता आहे. म्हणून रोमन कालखंडाचा प्रारंभ होताना झिनोने मानवाच्या नैतिक प्रश्नांविषयी मूलचिंतन उभे करून स्टॉईक विचारधारा प्रतिपादन करायला सुरुवात केली. झिनो (इ.स.पू. ३३३-२६४) याने हे कार्य या संशयवाद व निरीश्वरवादाच्या समकाळातच सुरू केले होते, असे समजायला हरकत नाही. पुढे क्लिंथीज (इ.स.पू. ३००-२२०) आणि खिसीपस (इ.स.पू. २८०-२०७), सेनेका (इ.स.पू. ४-इ.स.६५), एपिक्टेटस (इ.स. ५५-१३५), मार्कस ऑरेलियस (इ.स. १२१-१८०) अशी विचारवंतांची मालिका या विचारांना परिपक्वता आणत होती. सेनेका हा त्या सहस्रकाच्या संक्रमण काळखंडावरचा ठळक बिंदू! सेनेकाचे बलिदान बहुधा सॉक्रेटिसप्रमाणे या सर्व विचारांना बळकटी देऊन गेले असावे. या ग्रीकोरोमन कालखंडामध्ये नैतिकता, नीतिपूर्ण जीवन व नैतिकपूर्ण भरपूर चर्चा झालेली असावी. त्याचाच एक परिणाम म्हणून स्टॉईक विचारवंतांचे लेखन बाहेर आले आणि धर्म तत्त्वज्ञानाला ठाम अशी पायाभूत विचारधाराही प्राप्त झाली, तर दुसऱ्या बाजूला निरीश्वरवादी तत्त्वज्ञान आणि सुखवाद हा विज्ञानाच्या क्षेत्राला पोषक ठरला. पाश्चात्त्य विचारविश्वामध्ये दोन्ही अंगे समसमान पुष्ट झाली, असे समजायला हरकत नाही.

नीतिशास्त्राच्या दृष्टीने या कालखंडाचा विचार करता मनुष्याच्या वैचारिक विश्वामध्ये आवश्यक ते परिवर्तन होण्यासाठी बराच ऊहापोह झाला असावा, हे किमान मार्कस ऑरेलियसच्या लेखनावरून तरी लक्षात येते. मनुष्याची नैतिक जाणीव ही काही एकाकी नसते तर त्यामध्ये इच्छा, संकल्प, हेतू, उद्दिष्टे असतातच. मार्कसच्या लेखनातून या साऱ्या गोष्टी स्पष्टपणे जाणवतात. शिवाय ही जाणीव केवळ व्यक्तिगत स्तरावरच राहावी, असे नाही तर त्याचे सामाजीकरण व्हावे आणि सर्वांचा आचार तसा व्हावा, ही इच्छाही स्पष्टपणे दिसून येते. स्टॉईकांनी नैतिकतेची केवळ व्याख्या केली वा काही निकष सिद्ध केले असे नाही तर त्याच्या आचारावरही भर दिला तसेच ती जीवनपद्धती आदर्श मानून त्याचे संपूर्ण जीवनात आविष्करण कसे करता येईल, यावरही संस्काराच्या माध्यमातून भर दिलेला आहे. साधारणपणे असे दिसून येते की याच कालखंडामध्ये उदय झालेला ख्रिस्ती धर्म लगेच धर्मप्रसाराला सहजी लागू शकला, कारण स्टॉईकांची पोषक आणि अनासक्त विचारधारा समाजामध्ये बऱ्यापैकी रुळत चालली असावी. सिमियन बेंजमिन यांनी ख्रिस्ती

धर्मप्रसारकांना मार्कसने मदतच केली याचा उल्लेख केलेला आहेच. पुढे योग्य तेवढा प्रसार झाल्यावर आणि राजसत्ता हाती आल्यावर सोयिस्करपणे स्टॉईकांना बाजूला सारून ख्रिस्त्यांनी त्याचे पुतळेही काढून टाकले हा भाग वेगळा!

धर्मसाधना आणि प्रचार होण्यासाठी ख्रिस्ती धर्मशास्त्र आणि नीतिशास्त्र यांची सांगड तेव्हा तात्पुरती का होईना घातली गेली तरीही धर्मसाधकांनी अगदीच नीतिशास्त्राला बाजूला सारले असेल असे म्हणवत नाही. कारण शेवटी नीतितत्त्वांच्या ज्ञानाकडे व्यावहारिक दृष्टिकोनातून न बघता साध्यरूप म्हणूनच पाहिले गेले. शिवाय या साऱ्या नीतिशास्त्रीय संकल्पना या केवळ धर्म साधनेसाठी पोषकच होत्या. इतकेच नव्हे, तर त्याचे सामान्यीकरण करणेही सोपे होते. शिवाय पूर्वापारपासून अनेक वैचारिक टप्प्यांतन विभिन्न वळणे घेत आलेले असल्याने त्यात एक सुसंबद्धता नक्कीच आलेली होती. हे सारे आपण मार्कसच्या बोधवचनांवरून पडताळून पाहू शकतो.

एकीकडे धर्मशास्त्र आणि दुसरीकडे नीतिशास्त्र या दोन्हींच्या चिंतनाची आणि आचाराची परंपरा बहुधा पाश्चात्त्यांमध्ये सोबतच विकसित होत गेलेली दिसून येते. मार्कस औरेलियसनंतर जवळपास एक हजार वर्ष विभिन्न विचारवंतांनी पाश्चात्त्य चिंतनाचे दालन समृद्ध केल्याचे दिसून येते. प्लोटिनस, लॅम्बीकस, प्रोक्लॅस, जॉन द स्कॉट, अल-फराबी अशी नवप्लेटोवाद्यांची पिढीच तयार झालेली दिसून येते. तसेच तत्त्वज्ञान क्षेत्रात मध्ययुगाचा कालखंड सुरू होता होता आलेला सेंट ऑगस्टिन, अल-किंडी, अल-रझी, इब्न सिना, अल-गजाली, अन्स्लेस अशी धर्म तत्त्ववेत्त्यांची मालिका थेट तेराव्या शतकातील थॉमस अक्विनसपर्यंत पाहायला मिळते. याच काळात इब्न गॅबिराल, अब्राहम इब्न दाऊद, मायमोनाईडसारखे ज्यू तत्त्ववेत्तेही भर घालतच होते. रॉजर बेकनसारखा अनुभववादी गणिती याच काळामध्ये तिकडे काम करीत होता, ही बाब लक्षात ठेवण्यासारखी आहे. ही सारी धर्म तत्त्वचिंतकांची मांदियाळी तिकडे तयार होत असतानाच आधुनिक विज्ञानाची पायाभरणीही तिकडे होत होती ही बाब महत्त्वाची आहे. पायथागोरस, एम्पिडोकल्सनंतरही विज्ञान आणि गणितातील मंडळी तिकडे आपापल्या परीने भर घालतच होती. इसवी सनापूर्वी तिसऱ्या चौथ्या शतकामध्ये जन्मलेले युक्लिड आणि आर्किमिडीज याची साक्ष देतात. त्यांनी उभारलेल्या वैचारिक पायावरच पुढे गॅलिलियो, न्यूटनसारखी पिढी सोळाव्यासतराव्या शतकामध्ये काम करू शकली. पाश्चात्त्यांमध्ये एकीकडे नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्र एकेक टप्पा पार करीत होते त्याचवेळेस आधुनिक विज्ञानाची परिपूर्ण अशी पायाभरणीही तयार होतच होती. त्याचा सुपरिणाम म्हणून जीवनात भौतिक संपन्नता आणि सुखासीनता येत गेली. आधुनिक शोधांमध्ये यंत्रयुगच जणू सुरू झाले. सुखवादी भूमिकांवर पुनर्विचार होऊन बहुतांचे बहुत सुख ही संकल्पना पुढे येत मानवतावादी विचारांना पुढे येण्यास अवसर मिळाला. अनुभववादाच्या उदयानंतर नीति आणि धर्म विचार यांच्यावर

मंथन होऊन पुढे आधुनिक विवेकवादाचा जन्म झाला, असे समजायला हरकत नाही. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये विचारप्रवाहांना बळकटी येत असतानाच एक प्रकारचा खुलेपणा आणि स्वीकार्यता वाढत राहिली, हे मान्य करायला हरकत नाही.

याच दरम्यान पूर्वेत काय होत होते, यावर विचार करणे अशक्य नसले तरीही सोपे नाही. कारण पूर्व अर्थात भारतीय उपखंडापुरता विचार करायचा झाल्यास तो इतिहास कालखंड आक्रमकांनी रक्तलांछित केलेला आहे. या विनाशाच्या उंबरठ्यावर उभा असतानाही विचारवंत जागाच असतो याची साक्ष देणारी तत्त्ववेत्ती मंडळी या काळात झाली. भारताच्या इतिहासामध्ये बौद्ध आणि जैनांचा उदय होऊनही वैदिक धर्मविचारांचे नवे सत्र सुरू झाले होते. जुन्याचा यत्किंचितही त्याग न करता पुनर्मांडणी आणि तीही सैद्धान्तिक पायावर उभी करून सर्वंकष व सामान्यीकरण करता यावी अशी कशी केली गेली, हेही अभ्यासण्यासारखे आहे. याच काळात भारतातही नीतिशास्त्र आणि धर्म तत्त्वज्ञानाचा विकास होतच होता.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या या कालखंडाचा अभ्यास करणे हे केवळ इतिहासामध्ये डोकावणे नव्हे, तर एका स्थळकाळविशिष्ट मानवी जीवनामध्ये घडलेल्या एका परिवर्तनाचा अभ्यास करणे आहे. एका विशिष्ट कालखंडामध्ये मानवाचे लक्ष हे विश्व कसे निर्माण झाले या प्रश्नाकडे लागते, त्याचवेळेस मानवाला केंद्रित ठेवून त्याच्या अस्तित्वाचाही विचार कसा केला गेला. हे पाहिले आहे. म्हणजे विश्वाच्या निर्मितीकडे वळलेले विचार हे मानवकेंद्री झाले. सोफिस्टांचा कल हा मनुष्याच्या अस्तित्वाचे महत्त्व सिद्ध करण्याकडे जास्त होता, असे म्हणावेसे वाटते. सॉक्रेटिसनंतर खऱ्या अर्थाने या तत्त्वसंघाताला आकार देण्याचा प्रयत्न केला गेला असे म्हणावे लागेल जेव्हा विविध विचारांमध्ये विकेंद्रीकरण झाले तेव्हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अनेकविध विचारप्रवाह आणि आचारप्रवाह वाहू लागले. एकीकडे नीति, धर्म तर दुसरीकडे विज्ञान, विकास सोबत काम करू लागले. पाश्चात्त्य विचारसरणीमधील खुलेपणा, स्वीकार्यता आणि निष्ठा हाही अतिशय महत्त्वाचा असा भाग लक्षात येतो. धर्म व नीतिशास्त्राची वाढ एकीकडे होत असली तरी नवविज्ञानाच्या चिंतनाला फारशी खीळ बसली नाही, हे महत्त्वाचे! सॉक्रेटिस, सेनेकाचे आत्मसमर्पण, गॅलिलियोचा छळ वा इतर घटना या धर्म, नीती वा विज्ञान यांच्या कार्याबद्दल वा हेतूबद्दल चर्चा घडवणाऱ्या ठरल्या असल्या तरीही परस्परविघातक ठरल्या नाही हे नक्की! विज्ञानाचे वा तत्त्वविज्ञान आणि शास्त्राचे वा राजसत्तेचे अस्तित्व तसे अबाधित राहिले हे म्हणता येईल. या साऱ्या घटनांचे त्रयस्थपणे अवलोकन करून आपल्या जीवनात त्यातील सारतत्त्व आणण्यासाठी प्रयत्न करणे हाच या अभ्यासामागचा हेतू असू शकतो.

विश्व कूस बदलू लागते तेव्हा पहिली जाग तत्त्वचिंतकाला येऊन तो सकळ विश्वाच्या उद्याच्या सांस्कृतिक उभारणीसाठी धर्म, नीती आणि तत्त्वज्ञानाची नवी मांडणी करण्याचे

काम हाती घेतो, हेच खरे!

संदर्भ

१. 'नासदासीनो सदासीत्तदानीं नासीद्रजो नो व्योमा परोयत् ।। किमावरीव: कुहकस्य शर्मन्नम्भः किमासीद्गहनं गभीरम् ।।' (ही सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी (असत्) शून्य आकाशही नव्हते, म्हणजे त्याचा व्यवहार नव्हता. (तदानीम्) सृष्टीच्या पूर्वी (सत्) प्रकृत्यात्मक अव्यक्त असे जे ह्या सृष्टीचे सत् संज्ञक प्रधान कारण, तेही (नो आसीत्) नव्हते...)

२. खरे तर पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये 'राजनीतिविवेक' हा मॅकियाव्हेलीनंतर (१४६९-१५२७ इसवी) विशेष चर्चिला गेला.

३. असे असले तरीही ते अद्वैत म्हणजे अगदी तंतोतंत भारतीय दर्शनाला अभिप्रेत असलेले परब्रह्म नव्हेच. ते अद्वैत म्हणजे ईश्वर असे त्याने मानले असले तरीही ते केवळ विश्वाचा आधार म्हणूनच, परब्रह्म वा संवित्ती तत्त्व या मांडणीचा सुस्पष्टपणा त्यातून अभिप्रेत नाही. म्हणून तशी पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांना अभिप्रेत असलेली अद्वैत वा ईश्वर ही संकल्पना तुलनेत सारखी नाही.

४. तिकडील शास्त्रे मानवाच्या अस्तित्वाचा विचार प्रामुख्याने करतात, इथपावेतो खरे तर धर्माचे तत्त्वज्ञान स्वतंत्रपणे मांडले गेले नसावे.

५. डेमिअर्ज नावाचा ईश्वर विश्वव्यवस्थापन करतो, हे त्याचं प्रतिपादन होतं. तसा तो प्रयोजनवादी ठरतो.

६. Physics, Metaphysics, Ethics, Politics, Poetics अशी त्याच्या ग्रंथांची नावे होती. Metaphysics ही संज्ञा प्रथमतः त्याने वापरली. निगमनात्मक तर्कशास्त्राचा पाया त्याने घातला. त्याला 'ॲरिस्टॉटलियन लॉजिक' असे म्हणतात.

७. असे असले आणि निःश्रेयस शब्द असला तरीही योग वा इतर भारतीय दर्शनांशी तुलना करण्यात अर्थ नाही. कारण मोक्षविषयक संकल्पना आणि साधना ही उपेक्षावादात भारतीय जीवनपद्धतीइतकी विकसित दिसत नाही. शिवाय यमनियम वा स्थितप्रज्ञता प्रतिपादन असले तरीही कर्माविषयी भारतीय दर्शन साक्षेपी आहेत, उपेक्षावादी नाही.

८. एपिक्युरसने त्याच्या तर्कशास्त्राला 'कॅनॉनिक' असे नाव दिले आहे.

९. झिनो अथेन्सला केवळ ग्रीक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी आला होता. काही वर्षे तिथे केलेल्या अध्ययनानंतर तिथल्या स्टोआपिसाईल नावाच्या इमारतीत त्याने शिष्यांना मार्गदर्शन करणे सुरू केले. त्याच्या शिष्यांना त्यावरून स्टॉईक असे संबोधण्यास सुरुवात झाली आणि तेच नाव संप्रदायास चिकटले. बहुधा तो ग्रीक

भाषेतला उच्चार असावा.

१०. अनेक ग्रंथांत नामसाम्य आहे, प्रस्तुत नाम सिमियन बेंजमिन यांच्या अनुवादाप्रमाणे...

११. प्राचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान कालखंड (इ. स. पू. ६२५ ते इ. स. ४७६) पहिला कालखंड 'ग्रीक तत्त्वज्ञान' (इ. स. पू. ६२५ ते इ. स. पू. ३२२), दुसरा कालखंड 'ग्रीकोरोमन तत्त्वज्ञान' (इ. स. पू. ३२२ ते इ. स. ४७६) पहिल्या 'ग्रीक तत्त्वज्ञान' कालखंडाचे तीन विभाग होतात. त्यातील पहिला कालखंड विश्वरचनावादी तत्त्वज्ञान (Naturalisticphilosophy इ. स. पू. ६२५ ते इ. स. पू. ४८०), दुसरा मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञान (Anthropologic philosophy इ. स. पू. ४८० ते इ. स. पू. ३९७), तर तिसरा हा योजनाबद्ध तत्त्वज्ञान (Systematic philosophy इ. स. पू. ३९९ ते. इ. स. पू. ३२२) असा गणला जातो. दुसऱ्या ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाचेही ढोबळमानाने दोन विभाग होतात. पहिला टप्पा आहे तो नीति तत्त्वज्ञानाचा (Ethical philosophy) ज्याचा कालखंड हा (इ. स. पू. ३३२ ते इ. स. १००) असा आणि दुसरा टप्पा धर्म तत्त्वज्ञानाचा (Religious philosophy) जो (इ. स. १०० ते इ. स. ४७६) असा गणला जाऊ शकतो. हा कालखंड साधारणपणे स्टॉईक तत्त्वज्ञानाचा उदय साधारणपण ग्रीकांच्या सुवर्णस्थितीच्या (Hellenistic era) काळात झाला. ज्यामध्ये केवळ तत्त्वज्ञान नव्हे तर शिल्पकला, साहित्य, संगीत, नाट्य सारे काही बहराला आले होते. या कालखंडापासून ते थेट रोमचा पाडाव होईपर्यंत हा उत्कर्ष सुरू होता. ज्यात स्टॉईक विचारही प्रचलित होत गेले. याच रोमन कालखंडामध्ये सेनेका, एपिक्टेटस आणि मार्कस ऑरेलियस होऊन गेले हे विशेष आहे.

१२. कांटही कर्माच्या बाबतीत असेच सांगतो. कांटच्या मते 'कर्तव्यभावनेतून प्रेरणा घेणाऱ्या कर्मालाच नि:शेष नैतिक मूल्य आहे,' म्हणून त्या कर्तव्यातच आत्मस्वातंत्र्य आहे. शिवाय निवड माझीच असल्याने ते माझेच असते. मुख्य म्हणजे श्रीमद्भगवद्गीताही हेच सांगते. गीतेच्या मते, बाह्य कर्म जड आहे. त्यात चांगले-वाईट, युक्तायुक्तता ही काही कर्माला चिकटत नाही किंवा कर्माइतकेच जड असलेल्या कर्मफलालाही चिकटत नाही. कर्माच्या मागे उभी असलेली निश्चयात्मिका बुद्धी हीच महत्त्वाची बाब आहे. समत्वबुद्धी असेल तर कर्माचे कौशल्य अंगी बाणते. हीच समत्वबुद्धी वा योग! योगः कर्मसु कौशलम्। कर्माच्या योग्य निवडीसोबतच फलाच्या बाबतीत अनासक्ती म्हणजेच कर्माचे कौशल्य!

१३. देकार्तने संशयपद्धतीही (method of doubt) याच पायावर उभी केलेली आहे. मी ज्या वस्तुजाताकडे पाहतो ती वस्तू मला जशी भासत आहे, तशीच ती असेल वा नसेलही! कदाचित त्या वस्तूचे स्वरूप हे भिन्न असूही शकते. त्यामुळे माझा जगाविषयीचा अनुभव हा पूर्णपणे निराधार वा भ्रमात्मक असू शकतो. जोपर्यंत मी पूर्णपणे निःसंशय होऊ शकत नाही तोपर्यंत मी त्याला यथार्थ मानू शकत नाही.

देकार्तचा संशय हा केवळ संशय नव्हे तर सखोल चिंतन आणि बुद्धीस पटेपर्यंतचा निकष आहे. पूर्ण विश्वास हेच त्याने सत्य मानले आहे.

१४. संशयवादाचा स्पष्ट उल्लेख करण्याचे कारण एवढेच की, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये स्टॉईक पंथाचा उदय होण्यापूर्वीच संशयवादाने अनेकांच्या विचारांना वेगळी दिशा दिलेली होती. संशयवाद आणि संशयपद्धती यामध्ये मूलभूत फरक आहे. संशयवादानुसार कोणत्याही प्रकारच्या ज्ञानाची शक्यता नाही. अगदी गॉर्जियसपासून अनेकांनी ज्ञानाच्या बाबतीत साशंकता निर्माण केलेली आहे. सोफिस्ट, सिनिक, प्लेटो, डिमॉक्रिटस, हिरॅक्लिटस, एपिक्युरियन यांनी इंद्रियज्ञानाला अविश्वसनीय मानले आहे. पायऱ्हो (इसवी पूर्व ३६५-२७५) याला पाश्चात्त्य संशयवादाचा जनक मानले जाते. पायऱ्होने अगदी स्पष्टपणे कुठल्याही ज्ञानाची शक्यता नाकारली. संशयपद्धती याचा अर्थ निश्चयात्मक ज्ञान होईपर्यंत प्रश्नाचा पाठपुरावा करणे इतकाच आहे.

१५. Blavatsky collected writings (THE ORIGIN OF MYSTERIES)

१६. “O man! as a citizen thou hast lived and conversed in this great city of the world...'

१७. 'नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदान्त श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेसहित ।।' समर्थकृत दासबोध, द. १ स. १ ओ. १५.

१८. मूळ इंग्रजी पुस्तकामध्ये चौथ्या (अनुवादित पुस्तकातील सातवा)... And then, that I did not fall into the ambition of ordinary sofists, either to write tracts concerning the common theorems, or to exhort men unto virtue and study of philosophy by public orations... आणि चौदाव्या (अनुवादित पुस्तकातील सतरावा)... And when I did first apply myself to philosophy, that I did not fall into the hands of some sofists, or spent my time either in reading the manifold volumes of ordinary philosophers, nor in practising my self in the solution of orguments and fallacies, nor dwelt upon the studies of the meteors and natural curiosities... या दोन उतागांमध्ये सोफिस्टांचा निषेध केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

१९. ... and that I did write dialogues in my youth...

२०. ऋग्वेदात विश्वांतर्गत व्यवस्थेला 'ऋत' असे संबोधले गेले आहे. ऋग्वेदातही प्रत्येक देवता एकेका शक्तीची द्योतक मानली तरीही त्या सर्व शक्ती एकाच आदिशक्तीतून

उगम पावलेल्या असणार, अन्यथा त्यांचे संतुलन कसे असेल? म्हणून ऋग्वेदाच्या उत्तर भागात 'विश्वेदेवाः' म्हणजे 'सर्वदेव' असा शब्दप्रयोग सुरू झाला. शिवाय निसर्गात जर नियमबद्धता आहे, निसर्गात जर एकविधता आहे, तर निसर्गाचा अध्यक्षही म्हणजे काही एकच असला पाहिजे, असा सहज निष्कर्ष काढता येतो. ऋताचा संरक्षक वरुण याच्या ठिकाणी कल्पिलेले न्याय, क्षमाशीलता वगैरे गुण हे एकेश्वरवादाकडे नेतात.

२१. याची तुलना भारतीय कर्मसिद्धांतातील 'क्रियामाण कर्मा' सोबत करता येईल. एकूणच मार्कस कर्मसिद्धांताच्या जवळ आहे.

२२. According to the nature... Either this universe is a mere confused mass and an intricate context of things, which shall in time be scattered and disposed again: or it is an union consisting of order and administered by providence. If the first... But if the latter be, then am not I religious in vain, then will I be quite and patient, and put my trust in Him, who is the Governor of all.

२३. नय म्हणजे अंश वा अंग किंवा पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय, नयो ज्ञातुरभिप्राय! वस्तूचे ज्ञान निरनिराळ्या नयांनी होऊ शकते, एक नय स्वीकारला तर बाकीच्या विचारांना त्यातून वगळायचे नाही. अनेक दृष्टीने एखाद्या गोष्टीकडे पाहिले जाऊ शकते.

❍❍❍

संपादकांचा परिचय

डॉ. वसु भारद्वाज

डॉ. वसु भारद्वाज हे वैद्यकीय व्यावसायिक असूनही त्यांनी पुणे विद्यापीठातून संस्कृत आणि तत्त्वज्ञान या विषयातून बी.ए., तर तत्त्वज्ञान या विषयातून एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे.

गेली तीस वर्षे लेखनक्षेत्रात असून विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके यांत स्तंभलेखन केलेले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध माध्यमांवर समाजचिंतन, अध्यात्म वगैरे विविध विषयांवर सातत्याने लेखन करीत आहेत. मार्मिक या व्यंगचित्रसाप्ताहिकात व लोकसत्ता या दैनिकामध्येही सातत्याने स्तंभलेखन, ललित साहित्यातही विशेष कार्य केलेले आहे. विविध दिवाळी अंक व मासिकांतून अनेक कथा व दीर्घकथा प्रकाशित झालेल्या आहेत.

वैद्यकीय क्षेत्र, ललित साहित्यातील जवळ जवळ वीस ग्रंथांचे इंग्रजीतून मराठीमध्ये अनुवाद. तसेच संत साहित्य व समीक्षा यासाठी विशेष लेखन!

स्वलिखित दहा पुस्तके प्रकाशित व अनेक प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. 'एणें वरें ज्ञानदेवो' हा संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या साहित्यावरील समीक्षाग्रंथ, शुनःशेप, उत्तंक आणि अष्टावक्रसारखा पौराणिक कथांचा संग्रह व सामाजिक आशयावर आधारित कादंबरी 'क्ष' ही पुस्तके विशेष उल्लेखनीय.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अनुवाद मिशनतर्फे तत्त्वज्ञान कोशावर सदस्य म्हणून काम केलेले आहे. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार, पद्मश्री विखे पाटील राज्य पुरस्कार, कै. व. दि. कुलकर्णी संतसाहित्य समीक्षा पुरस्काराव्यतिरिक्त अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित.

अनुक्रम

- पाश्चात्त्य तत्त्वज्ञान... ९५ ते ३१७
- मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने... ३१९ ते ५२३
- कठीण शब्दांचा कोश... ५२४ ते ५३८

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान

लेखक

के. प्रोफेसर दत्तात्रेय गोविंद केतकर, एम. ए.

दुय्यम संस्कृत अध्यापक, बडोदा कॉलेज

सॉक्रिटिस



अर्पण पत्र

श्रीमान महात्मा मोहनदास गांधी

यांस

त्यांचे ठायी वसत असलेली श्रेष्ठतम तत्त्वज्ञानदृष्टी त्यांनी स्वीकारलेले अहिंसात्मक ध्येय

त्यांचे नि:स्वार्थ राष्ट्रप्रेम

आणि त्यांचे ठायी वसत असलेली अपूर्व आत्मनिष्ठा

इत्यादी गुणांच्या अभिनंदनार्थ हा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा ग्रंथ

प्रकाशकाकडून

प्रेम व आदरपूर्वक त्यांचे चरणी अर्पण करण्यात येत आहे.

- प्रकाशक

श्री

विज्ञापना

आपल्या देशी भाषेच्या साहित्याची अभिवृद्धी करण्याच्या सद्हेतूतून विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराज साहेब श्री. सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल समशेर बहाद्दर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई., एलएल. डी. यांनी कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजातून 'श्री सयाजी साहित्य मालेतून' विविध विषयांवर पुस्तके तयार करण्यात येत असतात.

तद्नुसार 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञानमाला' या नावाचा हा ग्रंथ कै. दत्तात्रेय गोविंद केतकर, एम.ए., दुय्यम संस्कृत अध्यापक, बडोदा कॉलेज, बडोदे यांजकडून तयार करून उक्त मालेतील शिक्षणगुच्छात १९२ वे पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

भाषांतर शाखा,	**मं. र. मजमुदार**	**भा. का. भाटे**
विद्याधिकारी कचेरी	भा. मदतनीस	विद्याधिकारी,
बडोदे, ता. ५-४-३१		राज्य बडोदे

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने या मूळ पुस्तकाचे स्कॅन केलेले पहिले पान

श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल
समशेरबहादूर यांच्या आज्ञेनें तयार होणारी

महाराष्ट्र ग्रंथमाला.

ग्रंथ ४.

मार्कस ऑरेलियस बादशहाचीं बोधवचनें.

हें पुस्तक

'मेडिटेशन्स् आफ् मार्कस् ऑरेलियस'

नांवाच्या पुस्तकावरून

सिमियन बेंजमिन

यांनीं तयार केलें,

तें छापून-

मुंबई येथें
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

संवत १९४९, सन १८९३ इसवी.

(सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.)

ॲनॅक्झिमँडर

प्रकाशकाचे दोन शब्द

विद्याभिलाषी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहाद्दर यांच्या इच्छेस अनुसरून बडोदे राज्याच्या कौन्सिलने ता. ५ जानेवारी सन १९३१ रोजी केलेल्या ठरावान्वये बडोदे राज्याचे मेहेरबान विद्याधिकारी साहेब यांनी श्रीसयाजी साहित्यमालेपैकी मराठी साहित्य प्रकाशनाचे कार्य आमच्या मंडळीकडे सोपविले आहे, वगैरे हकीकत 'बालक-त्याची प्रकृति व संवर्धन' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सविस्तर कळविली आहेच. अर्थात, या हकीकतीचा येथे पुनरुच्चार करण्याची आता आवश्यकता नाही.

श्रीसयाजी साहित्यमालेत तयार असलेल्या १३ हस्तलिखित ग्रंथांपैकी पहिला ग्रंथ - कै. वासुदेव गोविंद आपटे कृत 'बालक- त्याची प्रकृति व संवर्धन' दोन महिन्यांपूर्वीच वाचकांच्या सेवेत आम्ही सादर केला आहे आणि आज हा दुसरा ग्रंथ सादर करीत आहोत. पहिल्या ग्रंथात बालकाची प्रकृती आणि त्याच्या उपजत बुद्धीचे संवर्धन कसे करावे, यासंबंधाने साधार व सोपपत्तिक विवेचन केले आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबवत्सल गृहस्थास ते पुस्तक विशेष उपयोगी असे झाले आहे, हे वेगळे सांगावयास नको. हल्लीचे हे पुस्तक तत्त्वज्ञान प्रतिपादनपर आहे. तत्त्वज्ञान हा विषय विशेष प्रौढ असून त्यात मानवी जीवाचे श्रेष्ठतम कर्तव्य दर्शविले आहे. तत्त्वज्ञानावर आमच्या आर्यऋषींनी फार परिश्रमपूर्वक अनेक ग्रंथ लिहिले आहेत व त्यातील तत्त्वे शोपेनहारसारख्या पाश्चात्त्य प्रसिद्ध जर्मन पंडितानेही मान्य केली आहेत.

आपल्या आर्यऋषींनी वेगवेगळ्या प्रसंगी प्रतिपादन केलेल्या अनेक तत्त्वज्ञानपर ग्रंथांपैकी उपनिषदे व ब्रह्मसूत्रभाष्य यासारखे कित्येक महत्त्वाचे ग्रंथ मराठी वाचकांच्या उपयोगार्थ श्रीमंत महाराजांच्या उदार आश्रयाखाली भाषांतररूपाने महाराष्ट्र ग्रंथमालेद्वारे पूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत, तसेच श्रीमंत महाराजांच्याच आश्रयाखाली स्थापन झालेल्या

आमच्या ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळींनी भाष्य व भाषांतरासह सान्वय-सार्थ-सटीक दशोपनिषदे, श्रीमद्भागवत, श्रीमद्भगवतद्गीता, योगवासिष्ठ, पंचदशी इत्यादी ग्रंथांद्वारे आपल्या आर्यऋषींनी प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली आहेच. आज या ग्रंथाद्वारे पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगी आपले तत्त्वज्ञान कशा प्रकारे प्रतिपादन केले आहे त्याची ओळख पटावी म्हणून हा 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञान माला' ग्रंथ वाचकांच्या सेवेत सादर करण्यात येत आहे.

हा ग्रंथ बडोदा कॉलेजातील संस्कृताचे दुय्यम प्रोफेसर कै. श्रीयुत दत्तात्रेय गोविंद केतकर, एम.ए. यांनी इंग्रजी ग्रंथाधारे तयार केला असून, तो श्रीसयाजी साहित्यमालेकरिता नेमलेल्या ग्रंथपरीक्षक मंडळींनी पसंत केला आहे आणि श्रीसयाजी साहित्यमालेचा १९२ वा ग्रंथ म्हणून आज प्रसिद्ध करण्यात येत आहे. या ग्रंथातील विषयांचे दोन भाग पाडले असून, त्यास पुष्प पहिले व पुष्प दुसरे, असे म्हटले आहे. पहिल्या भागात - ग्रीक आद्यतत्त्वज्ञ थेल्स व त्याचे शिष्य अनॅक्झिमँडर व अनॅक्झिमीनस; आणि पायथागोरस, हिरॅक्लीटस, झेनोफेनस, पारमिनाइड्स, झेनो, मेलीसस, एंपिडोकल्स, ॲनॅक्झगोरस, ल्युसीपस, डिमॉक्रीटस अशा तेरा तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानांचे सांगोपांग विवेचन आले आहे आणि दुसऱ्या भागात प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस यांच्या तत्त्वज्ञानाचा ऊहापोह त्यांच्या संपूर्ण चरित्रासह केला आहे.

ग्रीक तत्त्ववेत्त्यांत सॉक्रेटिसाचे जीवनचरित्र आणि त्याचे तत्त्वज्ञान अत्यंत श्रेष्ठ मानले आहे. त्याचे जीवनचरित्र आपणाकडील संतशिरोमणी तुकाराम महाराजांच्या चरित्रासारखे निःस्पृह व निःस्वार्थी असून, लोककल्याणाच्या कामी त्याने आपले जीवितसर्वस्व अर्पण केले. सॉक्रेटिसाचे तत्त्वज्ञान, त्याची भाषाशैली व वक्तत्व, त्याच्या उपशाने त्या काळी लोकांच्या मनावर झालेला परिणाम, संसारातील त्याचा जीवनक्रम आणि लोककल्याणार्थ त्याने अर्पण केलेले सर्वस्व इत्यादी गोष्टी वाचकांच्या मनावर परिणाम केल्यावाचून राहत नाहीत. सारांश, हा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा ग्रंथ तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या जिज्ञासू मराठी वाचकांस तर आदरभूत होईलच; परंतु सर्वसाधारण वाचकांसही तो मनोरंजक व बोधपर होईल, यात संशय नाही. आमचे महाराष्ट्रभाषाभिमानी प्रेमळ वाचक, श्रीमंत महाराज गायकवाड सरकार यांनी श्रीसाहित्यमालारूप लावलेल्या या वृक्षापासून उत्पन्न होणाऱ्या मनोहर ग्रंथरूपी पुष्पांचा व फलांचा यथेच्छ उपभोग घेऊन मालाकार श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या इच्छेचे चीज करतील, अशी आम्हास उमेद आहे.

मुंबई, ता. ५ एप्रिल,
सन १९३१

- दा.सां. यंदे
व्यवस्थापक, ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळी
राजप्रिय राज्यरत्न प्रो. माणिकराव
बडोदा

अनुक्रमणिका

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान - पुष्प १ ले

थेल्स व त्याचे शिष्य

१) प्रकरण पहिले	ग्रीक आद्यतत्त्वज्ञ थेल्स
	ॲनॅक्झिमँडर
	ॲनॅक्झिमीनस
२) प्रकरण दुसरे	पायथागोरस
३) प्रकरण तिसरे	हिरॅक्लीटस
४) प्रकरण चौथे	झेनोफेनस
	पारमिनाइड्स
	झेनो
	मेलीसस
५) प्रकरण पाचवे	माध्यमिक पंथ
	एंपिडोकल्स
	ॲनॅक्झॅगोरॅस
	ल्युसीपस
	डिमॉक्रीटस

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान - पुष्प दुसरे

सॉक्रेटिस

१) प्रकरण पहिले	सॉक्रेटिसचा जीवनवृत्तान्त
२) प्रकरण दुसरे	सॉक्रेटिसची वादपद्धती
३) प्रकरण तिसरे	सॉक्रेटिस व सोफिस्ट
४) प्रकरण चौथे	सॉक्रेटिसाची मते
५) प्रकरण पाचवे	फिर्याद
	सॉक्रेटिसचे आत्मसमर्थन
६) प्रकरण सहावे	शेवट
७) प्रकरण सातवे	उपसंहार

पायथागोरस

पुष्प १ ले

ग्रीक आद्य तत्त्वज्ञ

थेल्स



प्रकरण १ ले

ग्रीसमधील आद्यतम तत्त्वज्ञ थेल्स व त्याचे शिष्य

थेल्स

ग्रीसमधील सर्वांत प्राचीन तत्त्वज्ञ म्हणजे आयलिशिया येथील थेल्स हा आहे. सोलोन वगैरे जे एकंदर सात शहाणे पुरुष प्रसिद्ध आहेत त्यामध्येच थेल्सचीही गणना होते; परंतु या ज्ञानी पुरुषांहून थेल्सची योग्यता तत्त्वज्ञानदृष्ट्या अधिक समजली पाहिजे. हे पुरुष ज्ञानी व शहाणे म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांचे ज्ञान केवळ व्यावहारिक असे व त्यांची शहाणपणाची भाषणे म्हणजे उपदेशपर सूत्ररूप वाक्ये होत. 'आपल्या स्वत:ला ओळख', 'आलेली संधी दवडू नकोस', 'विश्वस्तपणा हा नाशाचा पूर्वगामी आहे' इत्यादिक सुप्रसिद्ध सूत्रवाक्यांवरून या शहाण्या पुरुषांचे शहाणपण कशा प्रकारचे असे, हे लक्षात येईल. मनुष्याला नित्य व्यवहारात ज्या विचारांची आवश्यकता असते ते विचार अल्प शब्दात ग्रथित करण्यातच त्यांचे काय ते कसब व मनुष्याला त्याच्या व्यवहारात निपुण करणे हाच त्यांचा हेत. ते स्वतः लोकव्यवहारातील जबाबदारीची कामे पाहणारेच होते. सोलोन हा स्पार्टाचा राजा होता व क्लिओब्युलस आणि पेरिअँडर हेही आपापल्या शहरातील सत्ताधारी होते. त्यापैकी थेल्स हाच अधिक महत्त्वाचा व तत्त्वज्ञ या संज्ञेला पात्र होय.

एशिया मायनरच्या पश्चिमेकडे ज्या कित्येक ग्रीक वसाहती होत्या त्या सर्वांस आयोनिया म्हणत व त्यामध्येच मायलीटस या नावाचे एक शहर आहे. ते क्रीटच्या लोकांनी वसविले होते. याच शहरी थेल्सचा जन्म ख्रि. पू. ६४० वर्षी झाला व तो ख्रि. पू. ५४८-४५ च्या सुमारास मरण पावला.

थेल्सविषयी आपणास फार थोडी माहिती मिळते. त्याचा कोणताही लिखित ग्रंथ नसल्यामुळे त्याजबद्दल इतरांनी जे उल्लेख केले आहेत त्याजवर आपणास अवलंबून राहावे लागते. त्याजविषयी कित्येक दंतकथा उपलब्ध आहेत. त्यावरून आपणास त्याची

विद्वत्ता व चातुर्य यांचे अनुमान करता येते. त्या वेळच्या भौतिकशास्त्रवेत्त्यांमध्ये थेल्सचा फार वर नंबर लागत असून, तो मोठा शोधक होता व हा त्याचा शोधकपणाच त्याला तत्त्वज्ञ करण्यास कारण झाला असला पाहिजे. इसापनीतीतील ताऱ्यांचे निरीक्षण करण्याच्या नादात विहिरीत पडणाऱ्या पंडिताची गोष्ट याच थेल्सविषयी आहे असे म्हणतात व त्यावरून त्याची व्यवहारज्ञानविमुखता दाखविण्यात येते. उलटपक्षी आपल्या उच्च ज्ञानाचा तो व्यवहारात कसा फायदा करून घेत असे याबद्दलही अशी गोष्ट प्रसिद्ध आहे की, पुढे हिंगणबेटांचा दुष्काळ पडेल हे त्याला आधीच कळले असल्यामुळे त्याने अगोदरच खूप हिंगणबेटे साठवून ठेवली व त्यामुळे त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही तेलाचा व्यापार करता आला नाही. अर्थात, त्याला पुष्कळ पैसा मिळाला व या रीतीने त्याने आपणास श्रीमंत होण्याची विद्या अवगत आहे हे एकवार जगाच्या निदर्शनास आणून दिले.

याशिवाय इतर काही दंतकथांवरून त्याची विद्वत्ता दिसून येते. हिरोडोटसने आपल्या इतिहासात अशी हकीगत दिली आहे की, ख्रि. पू. ५८५ वर्षी मे महिन्याच्या २८ तारखेस जे सूर्यग्रहण झाले, ते थेल्सने अगोदरच वर्तवून ठेवले होते. याच ग्रहणप्रसंगी लिडिआ व मीडिया येथील सैन्य परस्परांशी लढाई करण्यासाठी सिद्ध झाली असता, आकाशामध्ये एकदम सूर्य काळा ठिक्कर पडलेला पाहून हा आपल्या अघोर कृत्याच्या कोपामुळे ईश्वराने घडवून आणलेला उत्पाद आहे, असे वाटून ती भयचकित झाली व तशीच परत फिरली असे म्हणतात. या गोष्टीवरून थेल्सचे खगोल विज्ञान चांगले दिसून येते. पृथ्वीच्या वर्तुळाकृतीचे वगैरे शोध त्याला लागले नव्हते, हे त्याच्या मतांवरून उघडच आहे; परंतु इजिप्त व बाबिलोन येथील पद्धतीप्रमाणे त्याला ग्रहणे वगैरे वर्तविता येत असावी असे वाटते. त्यावेळी इजिप्त व बाबिलोन यांचा ग्रीक वसाहतीशी पुष्कळच संबंध असल्यामुळे हे सर्वथा शक्यच आहे. कदाचित बाबिलोनला न जाता लिडियामधील विद्वानांकडूनही त्याने ही विद्या प्राप्त करून घेतली असेल; परंतु त्याच्या इतके यश त्यावेळपर्यंत कोणाला आले नव्हते असे दिसते. भौतिकशास्त्रभिज्ञतेबद्दल थेल्सची एवढी ख्याती होती की, खुद्द लिडियाचा राजा क्रोसस याच्या दरबारात त्याची नेमणूक झाली होती व त्या राजाच्या विनाशाला कारण झालेल्या कॅपॅडोशियाच्या मोहिमेत तो हजर होता व त्यानेच त्या राजाकरिता हॅलिस नदीचा प्रवाह फिरविला, असे हिरोडोटसने लिहिले आहे. पारसीकांच्या जुलमातून आयोनियाची मुक्तता व्हावी या हेतूने टिॲसच्या नेतृत्वाखाली सर्व शहरांचा संघ घडवून आणण्याविषयी त्याने पुष्कळ खटपट केली; परंतु ती व्यर्थ गेली.

याशिवाय थेल्सची गणितज्ञ या नात्यानेही प्रसिद्धी आहे. ॲरिस्टॉटलचा शिष्य युडीमस (Eudemos) याने जो गणिताचा इतिहास लिहिला आहे, त्यामध्ये असा उल्लेख आहे की, थेल्सने प्रथम भूमितीविज्ञान ग्रीस देशात आणले. इजिप्त देशांमध्ये असताना त्याने तेथील लोकांची भू-मापनपद्धती पाहिली असेल; परंतु थेल्सला ही विद्या इजिप्तमधून मिळाली, असे

गृहीत धरले तरी त्याने त्या शास्त्रात घडवून आणलेली प्रगती आश्चर्यकारक व स्तुतीस पात्र आहे. इजिप्त देशामध्ये पिरॅमिड नावाचे जे त्रिकोणाकार मनोरे आहेत त्यांची सावली मोजून त्यांची उंची कशी काढावी व समुद्रावर दिसणाऱ्या दूरवरच्या जहाजांचे अंतर कसे काढावे हे त्यानेच इजिप्तमधील लोकांस शिकविले. एका त्रिकोणाच्या बाजू जर ३:४:५ या प्रमाणात असतील तर त्यात एक काटकोन असतो, एवढेच त्रिकोणमितीचे ज्ञान इजिप्त, बाबिलोन व इतर प्राच्य राष्ट्रे यांना होते. थेल्सने याच मूलभूत ज्ञानावर इतर सिद्धांत बांधले व त्याला शास्त्रीय स्वरूप दिले. निदान पायथागोरसच्या काळी गणितशास्त्राची जी स्थापना झाली, तिचा पाया थेल्सने स्थापित केला, असे म्हटले पाहिजे.

तत्त्वज्ञानामधील थेल्सची कामगिरी या सर्वांहून अधिक महत्त्वाची आहे. मनुष्य विचार करण्यास पात्र झाल्याबरोबर त्याचा प्रथम विचार या स्थूल सृष्टीविषयी असतो. स्थूल सृष्टी मनुष्याच्या बहिरिंद्रियांना सहजगत्या गोचर होत असल्यामुळे सूक्ष्म आंतरसृष्टीच्या व सूक्ष्मतम मनःसृष्टीच्या विवेचनाचे आधी स्थूल सृष्टीविषयीच मनुष्य विचार करू लागतो. प्राणाचा संचारक, मनाचा प्रेरक, बुद्धीचा नियामक यांजविषयी जिज्ञासा होण्याचीदेखील मनुष्याची तयारी नसते. त्याच्या आधी बाह्यचक्षूना दिसणारे पर्वत, नद्या, मेघ, वृक्ष, जीव इत्यादी विषयांतच त्याची मती गुंग होऊन जाते. मेघांचा गडगडाट व विजांचा कडकडाट, मुसळधार पर्जन्य व अप्रतिहत संचारी नद्या, अनाकलनीय दावाग्नी व प्रचंड ताप सविता इत्यादिकांविषयीच त्याच्या मनात प्रथम विचार उत्पन्न होतो. त्यांचे अकटोविकट स्वरूप पाहून मनुष्य भांबावून जातो, त्यावर आपल्या अनुभवाप्रमाणे निरनिराळे तर्क करतो व त्या त्या ठिकाणी विशिष्ट देवतांची स्थापना करतो. आपल्याकडील ऋग्वेदांतर्गत ऋचा किंवा दिसिऑड होमर यांची काव्ये, यामध्ये वर्णिलेल्या देवता अशा प्रसंगी निर्माण होतात व आपल्या भोवती होणाऱ्या आकांतापासून आपणास अपाय होऊ नये, झाल्यास फायदाच व्हावा म्हणून या देवतांचे स्तुतिस्तोत्र व यज्ञयाग प्रचारात येतात. मनुष्याच्या मनाला काही काळपर्यंत या उपपत्तीने समाधान वाटते; परंतु लवकरच त्याला आधी ही सृष्टी झाली तरी कशी, याचेच आश्चर्य वाटू लागते व सृष्टीच्या विविध भागांवरील अधिष्ठित देवतांचा अगर त्या त्या भागांचा विचार बाजूस पडून सृष्टीच्या कारणाची मीमांसा सुरू होते. इतकी विविध वस्तूंनी भरलेली सृष्टी कोणी व कशी निर्माण केली हा प्रश्न सोडविण्याचा मनुष्य प्रयत्न करू लागतो व त्याची येथवर प्रगती झाली म्हणजे मनुष्याने खऱ्या तत्त्वज्ञानात प्रवेश केला असे म्हटले पाहिजे.

थेल्सच्या वेळेस पाश्चात्त्य राष्ट्रांतील बुद्धिवान पुरुषांचा असा प्रयत्न चालू होता; परंतु या प्रश्नाला प्रथम उत्तर सुचविण्याचा मान थेल्सनेच पटकावला. थेल्सच्या मते या विविध सृष्टीच्या मुळाशी जल हे द्रव्य आहे. असे मत ठरविण्यास त्याच्या दृष्टीने कोणती कारणे असावीत हे नक्की सांगता येत नाही; पण थेल्सचा पट्टशिष्य ॲनॉक्झिमीनस याच्या

विवेचनावरून आपणास थेल्सच्या विचारक्रमाविषयी चांगलीच अटकळ बांधता येते. या सृष्टीमध्ये काही पदार्थ द्रवरूप आहेत व काही घनरूप आहेत; परंतु ही रूपे पाण्याचीच असली पाहिजेत. कारण एकच जल शैत्यातिरेकाने पाषाणासारखे कठीण व साधारणतः द्रवरूप असे असते. या सृष्टीतील जेवढे म्हणून घन पदार्थ आहेत, तेवढे सर्व गोठवलेल्या पाण्याचीच कमी-जास्त दृढतेमुळे झालेली रूपे आहेत. वृक्षलतांदिकांत तर सर्व पाण्याचेच स्वरूप भरले आहे. कारण पाणी घातले तर झाडे व वेली वाढतात व ते अजिबात दूर केल्यास वाळून जळून जातात. यावरून वृक्षलतादिक जलरूप होत हे उघड दिसत आहे. द्रवरूप पदार्थही पाण्यावाचून होत नसल्यामुळे तेही जलरूपच आहेत, असे म्हणता येईल. ज्याप्रमाणे पाणी अधिकाधिक गोठल्यामुळे याचे कठीण घनरूप पदार्थ झाले, त्याचप्रमाणे त्याची विरळता वाढता वाढता त्याचे हवेत पर्यवसान झाले असले पाहिजे. थेल्सच्या काळी व त्यानंतरही कित्येक दिवसपर्यंत हवा म्हणजे बाष्परूप जलच आहे, हा समज प्रचलित होता. धुके म्हणजे पाणीच नाही काय? तेच धुके निवळले म्हणजे हवा होते, मग हवा म्हणजे पाणीच नव्हे काय? हीच हवा आणखी विरळ झाली म्हणजे तिचे निळ्या आकाशात रूपांतर होते व आकाश हे असंख्य तारकादिकांना प्रकाश देते, त्याअर्थी ते अग्निस्वरूप असले पाहिजे; पण आकाश मुळात जलकारणक आहे त्याअर्थी अग्नीचेही मूळ कारण जलच असले पाहिजे.

अशा रीतीने जगतातील विविधता व घडामोड एका जलतत्त्वावर चाललेली आहे असे दिसते. या सिद्धांताच्या अनुरोधानेच थेल्सचे असे मत होते की, पृथ्वी ही एखाद्या सपाट ताटासारखी असून, समुद्रावर तरंगत आहे. ग्रीक लोक जलपर्यटनाचे विशेष शोकी असल्यामुळे, सर्व पृथ्वी म्हणजे एक बेट आहे, ही कल्पना त्यांना पसंत पडली असावी.

थेल्सच्या जलकारणवादाशी आपल्याकडील काही वर्णने जुळतात. ऋग्वेदातील दहाव्या मंडळाच्या ८२ व्या सूक्तात या सर्व विश्वाचा जनक व पालक कोण व आपाचा म्हणजे जलाचा पहिला गर्भ कोणता, असा प्रश्न विचारून विश्वकर्मा हा पाण्याचा गर्भ आहे, असे सांगितले आहे. जल हीच पहिली सृष्टी होती व त्यातील अंडांतून ब्रह्मदेव निर्माण झाला, असे मनुस्मृतीत वर्णन आहे. तथापि, सर्व सृष्टी ही थेल्सच्या मताने जितकी जलकारणिक दिसते, तितकी आपल्याकडील ग्रंथांमध्ये दिसत नाही. उपनिषदांमध्येही पंचमहाभूतांची एकापासून दुसऱ्याची अशी अनुक्रमशः उत्पत्ती झालेली सांगितली आहे व त्याप्रमाणे प्रार्थिव सृष्टीचे जल हे कारण आहे. 'अभ्धः पृथिवी। पृथिव्याः ओषधयः। ओषधीभ्योऽन्नम्। अन्नात्पुरुषः* या तेत्तीरीयोपनिषद्वाक्यांत पुरुषाला कारण जलच दाखविले आहे. छांदोग्योपनिषदातील ६

---

*अद्भ्यः पृथिवी | पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः । (तैत्तिरियोपनिषद/वल्ली १, अनुवाद १) +'अन्नमय ९ हि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति...' (मूळ पाठ असा आहे. छां. प्र. (अ) ६, खंड ५, श्लो. ४)

व्या प्रपाठकाच्या ५ व्या खंडात रक्त व प्राण हे जलाचेच अनुक्रमाने मध्यम व अणिष्ठ म्हणजे सूक्ष्मतम भाग आहेत असे सांगून 'अन्नमयं हि सोम्य मन: आपोमयः प्राण: तेजोमयी वाक्' असा सिद्धांत काढला आहे. येथेच अन्न हेही जल कारणक आहे, हे लक्षात घेतले म्हणजे मनुष्याचा प्राण व मन, रक्त व मांस ही सर्व जलापासूनच उत्पन्न झाली असे होते. या मतातील विचारसरणी थेल्सच्या मतातील विचारांशी जुळते. निदान त्यांचा मथितार्थ एकच आहे; परंतु थेल्सच्या मते हवा ही जलाचेच विरळ स्वरूप व तेज किंवा निळे आकाश हे विरळतम स्वरूप व म्हणून हवा व तेज ही जलकारणक असे आहे. हे आपल्या आद्यतम ग्रंथासही संमत नाही. सृष्टिविषयक विवेचनात प्रत्येक ठिकाणी आकाशापासून वायू, वायूपासून अग्नी, अग्नीपासून जल व जलापासून पृथ्वी असाच क्रम आढळतो.

थेल्सचा जलकारणवाद त्याच्याच बुद्धीला प्रथमतः गोचर झाला किंवा तो त्याला अधिक प्राचीन ज्ञानी पुरुषांकडून समजला हा वादग्रस्त प्रश्न आहे. त्यावेळच्या राष्ट्रांपैकी उच्च शास्त्रीय ज्ञान किंवा तत्त्वविचार यामध्ये ज्यांची बरीच प्रगती झाली होती, अशी राष्ट्रे युरोप खंडात तर मुळीच नव्हती व प्राच्य राष्ट्रांपैकी इजिप्त व बाबिलोन यामध्ये जरी अशा गोष्टींचा पुष्कळ विचार केलेला आढळतो, तरी तो थेल्सच्या शास्त्रज्ञानाला अगर तत्त्वविचाराला कारण झाला असे म्हणता येत नाही. थेल्सचे भूमिती, त्रिकोणमिती, इत्यादिकांतील सिद्धांत त्यापेक्षा अधिक परिणत असल्यामुळे इजिप्त व बाबिलोन यांमधील शास्त्रज्ञांचा व थेल्सचा समागम झाला असल्यास त्यापासून थेल्सला केवळ उपयुक्त सूचना मात्र मिळाली असेल, असे अनुमान होते. प्राच्य राष्ट्रांमध्ये ग्रीसच्या बरोबरीची किंवा त्याहूनही वरचढ व तितकीच किंवा त्याहूनही पुरातन अशी संस्कृती किंवा शास्त्रज्ञान म्हणजे हिंदुस्थानचेच होय. आता हिंदुस्थानचा आणि ग्रीसचा कोठे कोठे संबंध असला पाहिजे हे अगदी निःसंशय रीतीने सांगता येत नाही. तथापि, अगदी प्राचीन ग्रंथ विभागातूनही ज्याअर्थी पंचभूतात्मक सृष्टीची रचना आढळते, त्याअर्थी थेल्सची उपपत्ती व आर्यतत्त्वज्ञान यांचा अर्थाअर्थी काही संबंध नसावा असे वाटते.

थेल्सची उपपत्ती तत्त्वज्ञानदृष्ट्या आक्षेपरहित किंवा परिणत स्वरूपाची नाही, यात काही आश्चर्य नाही. थेल्सच्या विचारांचे मुख्य महत्त्व म्हणजे त्याने तत्त्वज्ञानाला सुरुवात केली हे आहे. सृष्टीचे कोडे उलगडावयाचे असल्यास पौराणिक कथांवरून ते साधणार नाही, तर त्याला पायाशुद्ध अशी शास्त्ररचनाच पाहिजे. देवांचे पौराणिक मातापितर आणि थेटिस व ओशिआनस यांचे पौराणिक स्वरूप झुगारून देऊन त्यांचे जलमय शुद्ध स्वरूप पुढे मांडण्याचे धारिष्ट्य थेल्सने केले, हाच त्याचा मोठेपणा होय. या जगताचे आदिकारण काय, हा प्रश्न विचारण्यातच त्याच्या तत्त्वज्ञानाची स्फूर्ती दिसून आली व याच प्रश्नाचे उत्तर हुडकून काढणे हा तत्त्वज्ञानाचा हेतू असल्यामळे, थेल्सला यरोपमधील आद्यतम तत्त्वज्ञ हे नाव मिळाले.

जगताचे आदिकारण जर एक, तर वस्तूंमध्ये वास्तविक भेद नाही असेच म्हटले पाहिजे. बरे, भेद नाही म्हणावा तर जल हे आदिकारण कशाचे? जल हे जलाचेच तर कारण नाही? याप्रमाणे या एकत्वाची व भिन्नत्वाची सांगड घालणे मोठे कठीण पडते. यापैकी हिरॉक्लिटसने भेदपक्ष स्वीकारला व पारमिनाइडसने ऐक्यपक्ष स्वीकारला. त्यांच्या मताचे विवेचन पुढे करावयाचेच आहे. सध्या थेल्सच्या शिष्यवर्गासंबंधी असलेली काही माहिती नमूद करून हे प्रकरण आटपू.

ॲनॅक्झिमँडर

ॲनॅक्झिमँडर हा थेल्सच्या शिष्यांतील सर्वांत प्रमुख होय. याच्या मतांविषयी आपणास अधिक विश्वसनीय माहिती मिळते. कारण याने स्वतः एक ग्रंथ लिहिलेला होता व तो पुष्कळ जुन्या लेखकांचा परिचित असल्याचे आढळून येते व त्यांनी दिलेल्या उताऱ्यांवरून मूळ ग्रंथाची बरीच चांगली कल्पना होते. या ग्रंथाविषयी आणखी एक गोष्ट लक्षात ठेवावयाची ती अशी की, ग्रीक भाषेमधील हाच पहिला गद्यग्रंथ होय. ॲनॅक्झिमँडरचा जन्म खुद्द मायलीटस येथेच ख्रि. पू. ६११-६१० च्या सुमारास झाला. त्याच्या बापाचे नाव प्रॅक्झीॲडिस असे होते. याची कित्येक मते थेल्सहून भिन्न होती; परंतु त्याला थेल्सच्या शिष्यवर्गातच घालतात. याचे कारण तो थेल्सचा मित्र असून त्याचे शिष्यत्व कबूल करी हे होय.

ॲनॅक्झिमँडरची प्रसिद्धी होण्यास त्याच्या मतांपेक्षा त्याचे शास्त्रीय शोध अधिक कारण झाले असावेत. एक वर्तुळाकार ताटली घेऊन त्याच्या मध्यभागी उभ्या केलेल्या लहानशा काठीच्या सावलीवरून वेळ समजण्याचे (Sun-dial) छाया-यंत्र नावाचे घड्याळ यानेच शोधून काढले म्हणून म्हणतात. याशिवाय एक घनगोल तयार करून सूर्याच्या कक्षेचा तिरपेपणा यानेच सिद्ध केला अशी प्रसिद्धी आहे. हे दोन शोध खरोखरच ॲनॅक्झिमँडरचे आहेत किंवा नाहीत याबद्दल संशय आहे; परंतु त्याजविषयीच्या खालील प्रसिद्धीस मात्र सर्वमान्यता आहे. अगदी पहिला भूगोलविषयक स्फुट ग्रंथ यानेच रचिला. त्यावेळच्या अनॅक्झिमँडरला माहीत असलेल्या भूभागांविषयी यात माहिती दिली होती. ॲनॅक्झिमँडरने केवळ भूगोलच रचला नाही, तर त्याच्या माहितीच्या आधारावर त्याने एक नकाशा तयार केला व युरोप खंडातील तोच पहिला नकाशा आहे. हा नकाशा प्रथमतः पितळी पत्र्यावर खोदलेला असावा व त्याने अज्ञ व असंस्कृत जनांना तर चकित करून सोडलेच असेल; परंतु विद्वानांच्या मनातही मोठे कौतुक उत्पन्न करून त्यांच्या जिज्ञासू मनात ज्ञानाची मोठीच भर टाकली असेल यात काही संशय नाही. ग्रीक लोकांच्या भूगोलशास्त्र प्रणेत्याचा मान याप्रमाणे ॲनॅक्झिमँडर याजकडेच येतो आणि ही एक गोष्टदेखील काही कमी महत्त्वाची नाही.

विश्वाच्या उत्पत्तीविषयी ॲनॅक्झिमँडर याचे असे मत होते की, त्याला मूळ कारण पाणी, अग्नी किंवा हवा हे एकच द्रव्य आहे, असे मानण्याची काही जरूर नाही. जेथून जग निर्माण

झाले व जेथे ते अखेर जाऊन मिळते ते काहीतरी 'अनंत' 'अव्यक्त' अशाच शब्दांनी दर्शविले पाहिजे. असे म्हणण्याचे कारणही स्पष्टच आहे. ॲनॅक्झिमँडर म्हणतो की, या जगात आपणास शीत व उष्ण, क्लिन्न व शुष्क, मृदू व कठोर अशा परस्परविरोधी व द्वंद्वात्मक वस्तू आढळतात. यावरून त्याची मूळची अवस्था म्हणजे या द्वंद्वाविरहित व त्या द्वंद्वापैकी कोणत्याही एकाने अनिर्दिष्ट अशीच असली पाहिजे आणि जगतातील सर्वच वस्तू व त्यांची नावे द्वंद्वात्मक असल्यामुळे या वस्तूला अव्यक्त किंवा अनिर्वाच्य असेच म्हटले पाहिजे. या ठिकाणी आपणास सांख्यमताची अगर वेदांतमताची आठवण झाल्यावाचून राहत नाही. अव्यक्त, अनिर्वाच्य, अनंत हे शब्द वापरता वापरताच ती मते मूर्तिमंत डोळ्यांपुढे उभी राहतात; परंतु ॲनॅक्झिमँडरच्या मतात त्यांचा स्पष्टपणा व त्यांचे उच्चत्व ही अद्याप आलेली नाहीत. इतक्या पुरातनकाळी स्पष्ट वा अस्पष्ट; पण त्याला एवढी मोठी गोष्ट प्रतीत झाली हे कमी आश्चर्य आहे काय? त्यावेळेस हे मत परिणत होऊन त्याला वेदान्त-मताची तोड आली नाही, ही निराळी गोष्ट आहे. ॲनॅक्झिमँडरच्या मते थेल्सची अशी चूक झाली की, विश्वाच्या उभारणीची जलोपपत्ती देताना त्याने एका क्लिन्नत्वपक्षाची अधिक तरफदारी केली व हा शुष्क पक्षावर अन्याय झाला.

विश्वाचे मूळ कारण शुष्क नाही व क्लिन्न नाही, मृदू नाही व कठोर नाही, शीत नाही व उष्णही नाही, तर मग ते अभावात्मकच असेल अशी कोणी कल्पना केल्यास ती चुकीची होईल. त्या अव्यक्तातून ही सृष्टी उत्पन्न झाली व ही विश्वोत्पादनशक्तीच अव्यक्त हे वस्त्वभावाहून निराळे आहे असे दाखविते.

सृष्टीची उत्पत्ती म्हणजे या अव्यक्तातील द्वंद्वांचा आविर्भाव असे म्हणता येईल. ॲनॅक्झिमँडरच्या मते निरनिराळ्या वस्तू आपापले घोडे पुढे ढकलून प्रथमतः अन्याय करतात व मग त्याची नुकसानभरपाई करून देतात व अशा रीतीने पुनरपि आपल्या मूळ अवस्थेला जातात. याचे एक उदाहरण असे घेता येईल की, अग्नी पाण्याच्या शीतलत्वावर चढाई करतो; पण असे करण्यात त्याची उष्णता कमी होते व याच क्रिया सारख्या चालू राहिल्या तर थोड्या वेळाने पाणी व अग्नी दोन्हीही नाहीशी होतात व सभोवार पसरलेल्या अव्यक्त अमृतात मिळून जातात (Immortal and indestructible surrounds all and directs all. To that, they return when they are destroyed of necessity for they suffer punishment and give satisfaction to one another for injustice - Anaximandr quoted by Aristotle). ॲनॅक्झिमँडरच्या मते आपल्याभोवती ज्या तत्त्वांचा गराडा आहे, त्या गराड्यामुळे अशा अनंत सृष्टी प्रतिक्षणी निर्माण होतात व प्रतिक्षणी विलय पावतात व म्हणून हे विश्व अनंत सृष्टिरूपी वेगवेगळ्या बुडबुड्यांनी भरले आहे, असे तो म्हणे व याच बुडबुड्यांना तो 'देव' ही संज्ञा लावी.

भूगोलाच्या रचनेविषयी व खगोलातील चमत्कारांबद्दल, ॲनॅक्झिमँडरची मते मोठी मजेदार आहेत व त्यामध्ये शास्त्रीय बुद्धी व अपरिणत उपपत्ती यांची मोठी चमत्कारिक भेसळ झाली आहे. त्याच्या मते पृथ्वीला आधार कोणाचा नसून ती पोकळीत झोके खात आहे. कारण अमुक एका बाजूलाच भिरकले जाण्यास तिला काही कारणच नाही. थेल्सच्या मते पृथ्वी ही एखाद्या ताटाच्या आकाराची होती. ॲनॅक्झिमँडरच्या मते ती एखाद्या वरवंट्याच्या अगर मृदंगाच्या आकाराची आहे. आपण तिच्या वरच्या भागावर राहतो; पण आपल्या खाली राहणारे दुसरेही लोक आहेत, असे त्याचे मत होते. यांनाच Antipodals किंवा परस्पराभिमुखपादलोक अशी संज्ञा लावतात.

खगोलविज्ञानविषयक मतात तर याहीपेक्षा अधिक चमत्कारिकपणा आढळतो. थेल्सच्या मते पृथ्वी स्थिर असे इतकेच; परंतु ग्रहणे, चंद्राची गती, क्रांतिवृत्त इत्यादिकांविषयीच्या त्याच्या कल्पना साधारण आजच्या कल्पनांशी मिळत्याच येणाऱ्या आहेत; परंतु ॲनक्झिमँडरची एतद्विषयक मते म्हणजे विशृंखळ कल्पनाशक्तीचे अचाट खेळ आहेत. त्याच्या मते पृथ्वीभोवती असलेल्या वातावरणाच्या सभोवार अग्नी पसरलेला आहे. वातावरणात जेथे जेथे भोके पडली आहेत, तेथे तेथे त्यापलीकडील जाळ आपणास दिसतो व आपण त्यांना तारे, सूर्य, चंद्र इत्यादी नावे ठेवतो. या छिद्रांची रचना अलगुजाच्या अगर मुरलीच्या छिद्रांसारखी किंवा भात्याच्या तोंडासारखी असते व त्यातून आपणास पलीकडील उजेड दिसतो. ज्यावेळेस ही छिद्रे बंद केली जातात त्या वेळेला ग्रहणे लागतात. सूर्याची कक्षा चंद्राच्या सत्तावीस पट मोठी आहे. सर्वांत उंच सूर्याची कक्षा, त्याच्या खाली चंद्राची, त्याच्या खाली ताऱ्यांची, अशी व्यवस्था आहे. चंद्राचा आकार पृथ्वीच्या एकोणीसपट मोठा आहे. त्याचा आकार व रचना एखाद्या पोकळ चाकासारखी असून, तो गरगर फिरत आहे व त्याच्या मध्यभागी जाळ आहे; परंतु या जाळाला बाहेर जाण्यास एकच द्वार आहे व हे द्वार बंद झाले म्हणजे चंद्रग्रहण होते. चंद्राचे चक्र आपणास ज्या छिद्रांतून दिसते, त्यातील काही छिद्रे बंद झाली म्हणजे चंद्राचे अर्धवर्तुळ किंवा कोर होते. यावरून चंद्राचा प्रकाश नाही, हे दिसून येते.

सूर्याच्या उन्हामुळे पाण्याची वाफ होते व या वाफेच्या विरळ थरात गती उत्पन्न होऊन वारा होतो. या वाफेमुळेच पृथ्वीवर ओलावा येतो व या वाफेतून होणारा वाराच एखाद्या मेघावर आदळला म्हणजे वीज निघते. फार काय, मनुष्येतर प्राण्यांची उत्पत्तीदेखील या वाफेतूनच झाली.

मनुष्याची उत्पती मात्र दुसऱ्या प्राण्यापासून झाली आणि हा प्राणी मासाच असावा, असा ॲनॅक्झिमँडरचा तर्क होता. स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादातील मूळ पायरी आपणास येथे आठवल्यावाचून राहत नाही. असा तर्क बसविण्यास ॲनॅक्झिमँडरने जे कारण दिले आहे तेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. तो म्हणतो की, इतर प्राण्यांमध्ये पिलांची एवढी काळजी

घ्यावी लागत नाही; परंतु मनुष्यप्राण्यात मात्र मुलांची जोपासना फार दिवस करावी लागते. सृष्टीच्या मुळापासून ही जोपासना अवश्य असती तर मनुष्यप्राणी इतके दिवस जगलाच नसता व ज्याअर्थी तो जगला, त्याअर्थी एवढी अवाढव्य जोपासना जेथे अनावश्यक होती अशा ठिकाणीच त्याचे मूळ असले पाहिजे व हे मूळ सुटल्यावर हे शिशुसंगोपनाचे घोंगडे मनुष्याच्या गळयात पडले असावे.

एकंदरीत पाहता ॲनॅक्झिमँडरची मते आज कितीही चमत्कारिक वाटली तरी तो मोठा शोधक, कल्पक व हुशार असून, थेल्सचा शिष्याग्रणी शोभण्यासारखा होता, यात काही संशय नाही. थेल्सचा जलकारणवाद सोडून त्याने अव्यक्त कारणवाद पुढे आणला खरा; पण त्याचाच एक शिष्य ॲनॅक्झिमीनस याने जलकारणवादच पुनः जोराने प्रतिपादन केला.

ॲनॅक्झिमीनस

ॲनॅक्झिमीनसचा जन्म ख्रि. पू. ५२८-५२४ या सुमारास झाला असावा, असे अपोलोडोरसच्या म्हणण्यावरून दिसते. तो ॲनॅक्झिमँडरचा मित्र आणि शिष्य होता व अयोनियावर पारसीकांचा अंमल सुरू होण्याच्या सुमारास तो वयात आलेला असावा. त्यानेही काही गद्यग्रंथ लिहिले असावेत, असे अनुमान काढण्यास जागा आहे. कारण त्याच्या नावावर चालत आलेला एक ग्रंथापशेष गद्यरूपच आहे. ॲनॅक्झिमीनसची बुद्धी ॲनॅक्झिमँडरच्या बुद्धीइतकी तीव्र किंवा कल्पक दिसत नाही. तथापि, त्याच्या उपपत्तीला जे महत्त्व आले आहे, ते एका तत्त्वाच्या सूचनेमुळे होय. हे तत्त्व म्हटले म्हणजे आकुंचन व प्रसरण होय. या तत्त्वांवरच मायलीटच्या तत्त्वज्ञांच्या मताची संगती लावता आली. आपण श्वासोच्छवास करताना जी हवा आत घेतो ती व धुके, दव किंवा पाणी या रूपाने दिसणारी हवाच जगताचे मूळ कारण आहे, असे तो प्रतिपादन करी व हे प्रतिपादन थेल्सच्या मतांशी अधिक जुळते येते. कारण पाणी हाच पदार्थ विरळ झाला म्हणजे हवा होते व आकुंचन पावला म्हणजे पृथ्वी होते, हा जो थेल्सच्या मतातील इत्यर्थ तो ॲनॅक्झिमीनसने या स्वरूपात जोराने पुढे मांडला. उलटपक्षी हवा ही निर्मर्याद असून त्यामध्ये अनंत सृष्टी आहेत, असे त्याचे मत ॲनॅक्झिमँडरच्या मताशी अधिक मिळते. याशिवाय ॲनॅक्झिमीनसच्या मतातील विशेष गुण म्हटला म्हणजे त्याने प्रथमतः 'पिंडब्रह्मांड' या नावाने आपल्या शास्त्रात प्रसिद्ध असलेला न्याय सुचविला, हा आहे. तो म्हणतो की, ज्याप्रमाणे आपला वायुरूप आत्मा-त्याच्या मते आत्मा वायुरूप होता-आपले शरीर धारण करतो, त्याप्रमाणेच सर्व सृष्टीचे शरीर धारण करण्याचे काम, त्याच्या आत्मस्थानी असणारा वायूच करीत असला पाहिजे. आपण ज्याप्रमाणे आपल्या भोवतालची हवा श्वासाद्वारे आत घेतो, त्याप्रमाणे सृष्टीही आपल्या भोवती पसरलेल्या निर्मर्याद वायूतून श्वासोच्छवासाने वायू ओढून घेते, असा त्याचा तर्क होता. यावरून 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' हा न्याय तर निष्पन्न होतोच; पण ॲनॅक्झिमीनसची

जीवात्मस्वरूपाची ओळख श्वासोच्छ्वासापर्यंत येऊन पोहोचली होती हीदेखील काही लहानसहान गोष्ट नाही. मनुष्याची बुद्धी अधिकाधिक व्यापक सिद्धांताचा अभ्यास करता करताच सूक्ष्म सूक्ष्म सिद्धांताकडेही कशी आपोआप वळत होती, हे यावरून आपणास दिसते.

ॲनॅक्झिमीनसची सृष्टीच्या रचनेविषयीची कल्पना मात्र किंचित प्रतिगामी दिसते. त्याच्या मताप्रमाणे पृथ्वी सपाट असून, ती एखाद्या झाडाच्या पानाप्रमाणे हवेवर तरंगत आहे. खगोलस्थ ग्रह व तारे हेही हवेत तरंगत असन. त्यांच्या कक्षा सरळ आहेत. परंतु स्वत: पृथ्वी एका बाजला वर उचलून दिलेली असल्यामुळे तिच्या उंच भागामागे गेलेले ग्रह किंवा तारे दिसत नाहीत. या ठिकाणी ॲनॅक्झिमीनसने सृष्टीच्या वक्रस्थितीविषयी जे अनुमान केले आहे, त्यालाच जर तिच्या घनवर्तुलाकृती ज्ञानाची जोड दिली तर पृथ्वीच्या ध्रुवदंडाच्या वक्रस्थितीचेच अनुमान निष्पन्न झाले असते; परंतु पृथ्वीच्या आकाराचे वास्तविक अनुमान अयोनियामध्ये अखेरपर्यंत कोणालाच झाले नाही. त्या शोधाचे यश अन्य ठिकाणीच जावयाचे होते.

आयोनियामधील धर्मपंथ

येथवर थेल्स व त्याच्या पंथांतील दोन प्रसिद्ध तत्त्वज्ञ यांजविषयी उपलब्ध तेवढी माहिती दिली. ख्रि. पू. ४९४ व्या वर्षी पारसिक लोकांनी मायलीटस शहराचा विध्वंस केला व त्याबरोबरच अयोनियातील संस्कृती व तत्त्वज्ञान याचाही अंत झाला. युरोपातील तत्त्वज्ञानाच्या इतिहासातील पहिला दुवा येथे सुटला; परंतु पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील प्राचीनतम मताची हकीगत पुरी करून त्याच्या पुढील मतांच्या विवरणाला सुरुवात करण्यापूर्वी अयोनियामध्ये याच काळी विशेष प्रसिद्धीस आलेल्या एका धर्मपंथाविषयी हकीकत दिली पाहिजे. हा धर्मग्रंथ फार जुना असून, त्याचा प्रस्थापक कोण हे माहीत नाही. त्यातील विशिष्ट आचार व मते ही ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहेत. कारण पुढे येणाऱ्या कित्येक तत्त्वज्ञांच्या रहस्यमय? गूढ (Mystic) मतांचे मूळ या धर्मपंथात आहे असे कित्येक इतिहास तज्ज्ञांचे मत आहे व इतक्या प्राचीन काळी काही व्यक्तींची बुद्धी इतकी प्रगमनशील झाली होती ती कशी, याची त्रोटक हकीगतही या ठिकाणी मोठी मनोरंजक होईल यात काही नवल नाही.

अयोनियन संस्कृतीचे व्यापकदृष्ट्या निरीक्षण केल्यास आपणास असे आढळून येते की, एकंदरीत तिचे स्वरूप ऐहिकविषयक (Secular) आहे. या ऐहिक विषयकत्वामुळे भौतिकशास्त्र संस्थापनेला विशेष उत्तेजन मिळाले, ही गोष्ट खरी; परंतु त्याबरोबरच पारलौकिक विचार व देवविषयक कल्पना, यांना मागे पाडून त्याबद्दलचे विचार अपरिपक्व दशेतच राहिले. ज्या ठिकाणी धर्माची वाढ होऊ लागली आहे, त्या ठिकाणी देव म्हणजे

एक पूजनीय, इच्छितफलद अशी विभूती आहे, ही भावना दृढ असते; परंतु होमरच्या 'ईलियड'मधील देव या कसास उतरत नाहीत. होमरची त्यांजविषयीची लिहिण्याची तऱ्हा नेहमी गंभीरपणाची आढळून येत नाही. त्याचे देव म्हणजे मनुष्याहून अधिक बळकट व अमर एवढेच. त्यांजमध्ये इतर महनीय गुण काहीही नाहीत. एवढेच नव्हे, तर त्यापैकी फार थोड्यांच्याच नावाने प्रत्यक्ष अवदाने देण्यात येत. अकिलीसला ज्यावेळी खरोखर मनापासून प्रार्थना करावयाची असेल, तेव्हा तो इडा किंवा ऑलिंपस येथील देवाची प्रार्थना न करता डोडोनाच्या झूजकडे वळतो, याचे कारण तरी हेच आहे. देवांविषयीची कल्पना अशी संकुचित असल्यामुळेच ॲनॅक्झिमँडरने आपल्या नानाविध सृष्टींना देव ही संज्ञा दिली. यावरून आयोनियन तत्त्वज्ञानाचे मूळ धर्मात आहे, असे सिद्ध न होता, ते धर्मनिरपेक्ष होते असेच म्हटले पाहिजे.

होमरच्या काव्यावरून झालेली देवांविषयीची संकुचित कल्पनाच या संज्ञेच्या मुळाशी आहे. त्याचे देव म्हणजे नीतीचे संरक्षक समजले जात; पण त्यांची स्वत:ची नीती म्हणजे जेमतेमच. त्यांचे अमानुषत्व म्हणजे त्यांचे अचाट सामर्थ्य व अमरत्व व या दोन गुणांची कल्पना करून मनुष्यांच्या पिढ्यांच्या पिढ्या वाळून कोळ झालेल्या पानांच्या ढिगांप्रमाणे मृत्युरूपी वायूच्या झपाट्याबरोबर वाहून जातात व पाठीमागे त्यांचा मागमूसही उरत नाही. मेलेल्या मनुष्यांबद्दल जिवंत माणसांना स्वप्ने पडतात किंवा त्यांना कोठे पाहिल्यासारखा भास होतो एवढेच, बाकी मृत मनुष्याचे काहीही शिल्लक राहत नाही. असे आहे तर मनुष्याने मर्त्य गोष्टींचाच विचार करून आपल्यापुरते पाहावे. आपणास सुख-दुःख देणारी देवता ही फार मत्सरी आहे आणि आपले डोके अधिक वर काढणारा मनुष्य तिला आवडत नाही, याकरिता मनुष्याने खावे, प्यावे, चैन करावी. एकच खबरदारी बाळगण्याची त्याला जरूरी आहे आणि ती कशाचाही अतिरेक न करण्याबद्दल होय. कारण अतिरिक्त विषयसेवनाने वीट उत्पन्न होतो, अतिरिक्त संपत्तीने गर्व चढतो व गर्वाने मनष्य आंधळा होऊन देवतेच्या कोपाची फळे भोगतो.

वरील प्रकारची मते साधारण सुखवस्तू माणसांना ठीक वाटतात व ती अयोनियामधील काही लोकांना बरी वाटली; परंतु साधारण जनसमाजाचे अशाने कसे समाधान होणार? त्याच्या धार्मिक प्रवृत्तीला काहीतरी शाश्वत समाधानाची सवड पाहिजे आणि अशी सवड होमरच्या देवतांच्या कल्पनात नव्हती. अशा प्रसंगी मनुष्याच्या मनाला समाधान व उत्साह देणारा एक धर्मपंथ डेलॉस येथे उदयाला आला. या पंथाचे लोक सूर्योपासक होते व ग्रीक भाषेतील सूर्यदेवतेचे एक स्वरूप जे Orphens यावरून या पंथाला Orphic Religion असे म्हणतात. या पंथामध्ये देवतासंचार अगर देवतासाक्षात्कार हा एक विशेष होता व पवित्र शास्त्राग्रंथांतून असलेली वचने याच साक्षात्कारात प्राप्त होणाऱ्या अनुभवाविषयी प्रतिपादक आहेत असे या धर्माचे मत होते. याशिवाय या धर्मातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यामध्ये

कोणालाही मज्जाव नव्हता. त्या पंथाची दीक्षा पत्करून व उमेदवारीचे नियम पाळून त्या धर्माचा स्वीकार करील त्याला तो धर्म खुला होता व त्याला स्वतः साक्षात्कारपात्र होता येईल असे त्या धर्माचे अभिवचन होते. या धर्माने प्रथमत: देव व मनुष्य यातील अनुल्लंघनीय वाटणारी मर्यादा काढून टाकली. ऑर्फिक लोकांच्या मताप्रमाणे मनुष्य म्हणजे अध:पतन पावलेला देवच असल्यामुळे, अनेक व्रतांच्या साह्याने आपली काया पवित्र करून त्याला आपले अमरत्व परत मिळविता येणे शक्य होते व साधू पुरुषांचे आत्मे अमरच असतात, असा या लोकांचा दृढ विश्वास होता. आत्मा हा जन्मापूर्वी होता व मरणानंतरही असतो. वास्तविक आपण ज्याला जीवित म्हणतो तेच त्याचे मरण आहे. कारण मनुष्याच्या, पशूच्या किंवा लतापत्रादिकांच्या आवरणात तो गुरफटलेला असतो आणि अत्युत्कृष्ट पावित्र्याने तो जन्मचक्रांतून सुटतो तेव्हाच तो खरा सुखी होतो.

या सर्व कल्पना अयोनियाला नवीनच होत्या. अयोनियाचा अंतकाळ फार त्वरित आल्यामुळे या कल्पनांना डेलॉस मध्येच राहावे लागले, नाहीतर या मताचा कदाचित लवकर फैलाव झाला असता. या मताचा मूळ उत्पादक कोण हे माहीत नाही. या मताविषयीची माहिती इटली व क्रीट येथे सापडलेल्या सुवर्णपटावरून मिळाली आहे. हिंदूंच्या तत्त्वज्ञानाशी व धर्ममतांशी इतके जुळते येणारे व ग्रीक लोकांच्या त्यावेळच्या विचारपरंपरेशी अगर राहणीशी अगदी विसदृश असलेले हे मत हिंदुस्थानांतूनच तिकडे गेले नसेल ना? ख्रि. पू. पाचशे-सहाशे वर्षांपेक्षाही अधिक जुन्या असलेल्या या मताला पूर्वीचा दुसरा आधार कोणचा असावा हे सांगता येत नाही.

❍❍❍

प्रकरण २ रे

पायथागोरस

आजपर्यंत जगात जे अत्यंत श्रेष्ठ पुरुष होऊन गेले त्यामध्येच पायथागोरसचीही गणना केली पाहिजे; परंतु थेल्सप्रमाणेच पायथागोरसनेही काही ग्रंथरचना केली नसल्यामुळे त्याच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या मतांपैकी प्रत्यक्ष त्याचीच अशी कोणती व त्याच्या शिष्यांनी विशेष स्वरूपाला चढविलेली कोणती, याचा निर्णय करणे कठीण आहे. पायथागोरसविषयी लिहिताना ॲरिस्टॉटलने जी सावधगिरी बाळगली आहे ती कदाचित या कारणाकरिताच असावी असा कित्येकांचा तर्क आहे. पायथागोरसच्या मतांचा उल्लेख करताना तो नेहमी 'पायथागोरियन म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुरुषांची मते' किंवा 'पायथागोरियनपैकी कित्येकांची मते' अशी भाषा वापरतो. विशिष्ट ग्रंथांच्या अभावामुळे थेल्स व पायथागोरस यांजबद्दल आढळणारी ही अनिश्चितता सॉक्रेटिसबद्दलही आढळून येते; परंतु प्लेटोच्या संवादांनी हा कमीपणा पुष्कळच भरून काढला असल्यामुळे आपणास सॉक्रेटिसबद्दल पुष्कळ माहिती मिळते; परंतु पायथागोरसबद्दल आपणास तितकी तपशीलवार माहिती मिळत नाही.

पायथागोरसने ग्रंथरचना केली नसल्यामुळे त्याच्या मतांविषयी थोडीशी अनिश्चितता असली तरी आपणास असे सामान्यतः म्हणता येईल की, पायथागोरसच्या अनुयायांनी झाले तरी मूळ त्याच्या असलेल्या मतांचाच संग्रह केला असला पाहिजे. साधारणतः एखाद्या मताचा उच्चपणा मूल प्रवर्तकावरच बहुधा अवलंबून असतो. बेकनेने म्हटल्याप्रमाणे प्राणी हे आपल्या मूलस्थानाच्या उंचीपेक्षा अधिक उंच चढत नाहीत. या सामान्य नियमाप्रमाणे पाहू गेल्यास पायथागोरसच्या पंथातील मतेही बहुतांशी पायथागोरसचीच होती, असे म्हणण्यास विशेष प्रत्यवाय नाही. काही विशेष मते मागून अस्तित्वात आली, असा बळकट पुरावाच असेल तेथे गोष्ट निराळी.

पायथागोरसच्या चरित्रक्रमाविषयीची हीच अनिश्चितता आहे. त्याजविषयी फार प्राचीन काळापासून पुष्कळ दंतकथा प्रसिद्ध आहेत आणि खुद्द ॲरिस्टॉटलच्या वेळी या दंतकथांचा विलक्षण सुळसुळाट असल्यामुळेच ॲरिस्टॉटलला पायथागोरसच्या पंथाविषयी निश्चयात्मक लिहिण्याचे धाडस झाले नाही. अशा प्रसंगी पायथागोरसचे अनुयायी अगर त्याच्या पुनरुज्जीवन प्रसंगीचे त्याचे भक्त यांच्या हकीगतीतील अतिशयोक्तीचा भाग वर्ज्य करून सारभूत तेवढीच हकीगत, विवेचक बुद्धीने संकलित करून पायथागोरसच्या चरित्राची व त्याच्या मतांची रूपरेषा आपणास दाखविता येईल व ती बहुतांशी वस्तुस्थितिनिदर्शकच होईल.

पायथागोरसचा जन्म सॅमॉस येथे ख्रि. पू. ५८० या साली झाला. त्याच्या बापाचे नाव नेसार्कस असे होते व तो एक श्रीमंत व्यापारी होता. कित्येकांच्या मते पायथागोरस हा प्रत्यक्ष अपोलोपासून झाला होता. पायथागोरसच्या बालपणाची व साधारणतः तरुणपणाची हकीगतदेखील आपणास विशेष ठाऊक नाही. तो वयात आल्याबरोबर जो सॅमॉस सोडून निघाला तो आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षाचे सुमारास परत आला. या सर्व काळातील त्याच्या आयुष्याचा व्यय अनियंत्रितपणे प्रवास करून ज्ञानसंपादन करण्यात व आपले स्वतःचे सिद्धांत बसविण्यात झाला. पायथागोरसने पुष्कळच प्रवास केला होता यात मुळीच संशय नाही. अरबस्थान, सिरिया, फेनिशिया, खाल्डिया, हिंदुस्थान इत्यादी देशांतील लोकांशी त्याने बराच परिचय करून घेतला होता. इजिप्तमध्ये तर त्याने पुष्कळच दिवस घालविले. तो इजिप्त किंवा मिसर देशात ख्रि. पू. ५६०-५४० च्या दरम्यान प्रवास करीत होता आणि या काळी मिसरदेश स्वतंत्र असून त्याच्या स्वतंत्र राजांपैकी शेवटचा राजा अमॅसिस (Amasis) राज्य करीत होता. ग्रीक लोकांच्या ढवळाढवळीचे अजून तेथील आचारविचारांवर संस्कार झाले नव्हते. व्यापाराच्या उद्देशाने आलेले धाडसी ग्रीक अगर भाडोत्री सैन्यात दाखल झालेले ग्रीक शिपाई याशिवाय मिसर देशात विदेशीय असे काहीच दिसू लागले नव्हते. अशा प्रसंगी पायथागोरसला इजिप्तमधील धर्माचे, आचारविचारांचे व रीतिरिवाजांचे शुद्ध स्वरूप पाहावयास मिळाले व त्याचा त्याने उत्तम उपयोग करून घेतला. त्याने कित्येक धर्माचार्यांच्या स्वत: मुलाखती घेतल्या व सामान्य जनांना अज्ञात असलेल्या पौराणिक कथा किंवा व्रते-वैकल्ये अगर रहस्यरूप सिद्धांत ही सर्व त्याने अवगत करून घेतली. एकंदरीत इजिप्त देशातील धर्मविचारांचा पायथागोरसच्या मनावर पुष्कळच परिणाम झाला व त्याच्या मतातील कित्येक गोष्टीचे मूळ मिसर देशातील विचारपरंपरेत सापडते.

ज्या पुरुषाने ज्ञानप्राप्तीसाठी परदेशातही प्रवास करून मोठ्या आस्थेने ज्ञानसंपादन केले, तो आपल्या जवळच्या लोकांच्या मतांची माहिती करून घेण्याविषयी कसा उदासीन राहील? त्यात सॅमॉस व मायलीटस यांचा संबंध तर फारच नजीकचा असल्यामुळे थेल्स व त्याचे शिष्य यांच्या मताची पायथागोरसला पूर्ण माहिती होती. पायथागोरसने ॲनॅक्झिमँडरचे

शिष्यत्वदेखील पत्करले होते, असा कित्येकांनी तर्क बांधला आहे व तो खरा असण्याचा बराच संभव आहे. ॲनॅक्झिमँडरची खगोलस्थ ज्योतीविषयीची कल्पनाच पायथागोरसच्या मतात परिणत झाली असे म्हटल्यास फारसे चुकणार नाही. याशिवाय सृष्टीविषयक उपपत्तीमध्ये आढळणारे अमर्यादिततेचे महत्त्व व या अमर्यादिततेची हवेशी सांगड, यांजवरून ॲनॅक्झिमीनसची ही मते किंचित सूचित होत असल्यामुळे, पायथागोरसच्या मायलीशियन मताशी झालेला संबंध बराच दृढ असावा, असे वाटते. त्याचप्रमाणे पायथागोरसची भूमितीविषयक मते व विशेषतः त्याच्याच नावावर प्रसिद्ध असलेला सिद्धांत यांचा उगम मतातच आहे, यात काही संशय नाही. या दृष्टीने पायथागोरसला थेल्सच्या मतापुढे स्थान देणे आम्हास बरे वाटले.

याखेरीज पायथागोरसला डेलॉस येथे प्रस्थापित झालेल्या ऑर्फिक धर्ममताची चांगलीच माहिती असली पाहिजे. कारण त्याच्या मताला त्या धर्मग्रंथातील मते चांगलीच जुळती येतात. हा सादृशविषयीचा ऊहापोह आपणास अग्रभागी करावयाचाच आहे. सबब सध्या एवढी सूचनाच पुरे आहे.

आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षांपर्यंतचा काळ ज्ञानसंपादनात घालवून पायथागोरस परत आपल्या जन्मभूमीस आला; परंतु तेथे आल्यावर पुढे त्याची हकीगत काय झाली हे सांगण्यापूर्वी पायथागोरसच्या मतांचे संकलित स्वरूप काय होते, ते आपण पाहू. कारण यानंतर पायथागोरसच्या मतांचा ठिकठिकाणी कितपत प्रसार झाला व कसा झाला आणि त्याचा शेवट कशात झाला, हेच आपणास पाहावयाचे आहे. पायथागोरसच्या मतांची संघटना याच ठिकाणी परिणत झाली असल्यामुळे येथेच तिचे स्वरूप वाचकांपुढे मांडणे अधिक चांगले होईल.

पायथागोरसच्या मतांत अनेक विषयांची गर्दी झालेली आहे. एवढेच नव्हे, तर त्या त्या विषयातील अनुभवावरून त्याने काढलेल्या सिद्धांताची गुंतागुंत झाली आहे व त्यामुळे एका विषयातील त्याचे शोध देत असताना दुसरा विषय टाळणे अशक्य आहे; परंतु इतर विषयांचा उल्लेख शक्य तितका कमी करून विषयवार त्याच्या मतांचा विचार करू.

पायथागोरसच्या वेळी ग्रीक लोकांमध्ये 'लायर' या नावाचे वीणेसारखे एक तंतुवाद्य प्रचारात होते. याला सात तारा जोडलेल्या असत व त्या खुंट्यांच्या साहाय्याने उंचस्वर किंवा नीचस्वर करता येत. स्वराचा उच्च-नीच भाव केवळ कर्णप्रत्ययावरूनच ठरविण्यात येई. या वाद्यातील तारांचे स्वर लावण्याची अशी रीती असे की, पहिल्याप्रथम कडेच्या म्हणजे नं. १ व नं. ७ या तारा संवादी करण्यात येत. येथे संवादी याचा अर्थ एकदम वाजविल्या असता कर्णमधुर लागणाऱ्या असा नसून एकामागून एक वाजविल्या असताना कर्णमधुर लागणाऱ्या असा आहे. या दोन तारा जुळल्या म्हणजे मधली नं. ४ ची तार व त्याच्यावरची नं. ३ ची तारही त्याचप्रमाणे लावण्यात येई. बाकी राहिलेल्या तीन तारांचे

स्वर कमी-जास्त करण्यात येत व ते ज्या मानाने कमी-जास्त केलेले असतील त्यामानाने त्या त्या स्वरसंयोगांना निरनिराळी संज्ञा येत असे. एकाच तारेचा स्वर जो कमी-अधिक येतो, तो तिच्या तरंगसंख्येच्या कमी-जास्त प्रमाणावर (number of vibrations) अवलंबून असतो, ही गोष्ट पायथागोरसला माहीत होती. ही तरंगसंख्या कमी-अधिक कशी होते हे दाखविण्यास अलीकडे जी साधने उपलब्ध आहेत, ती त्यावेळेस नव्हती. त्यामुळे तारेची लांबी एकच ठेवून या तरंगसंख्येचे प्रमाण कमी-जास्त झालेले पायथागोरसला दाखविता आले नाही; परंतु त्याने या प्रश्नाचा दुसऱ्या बाजूने विचार केला. तारेची तरंगसंख्या तिच्या लांबीच्या व्यस्त प्रमाणात असते हे त्याला ठाऊक झाले होते व म्हणून निरनिराळ्या स्वरांचे परस्पर प्रमाण दाखविण्यासाठी त्याने एक फिरता पडदा लावलेली एकतारी वापरली. या फिरत्या पडद्याच्या साहाय्याने त्याला सहज दाखविता आले, की सप्तकातील सर्व संवादी स्वरांचे परस्पर प्रमाण २:१, ३:२ आणि ४:३ असे होते. या सर्वांस एकाच छेदाचे रूप दिल्यास ते प्रमाण ६, ८, ९, १२ असे होईल आणि यांना अनुक्रमे आपल्या सप्तकातील नावे दिल्यास ती सा, म, प, सा अशी होतील. हा शोध पायथागोरसने आपल्या एकतारीवर फिरत्या पडद्याच्या साहाय्याने कसा काढला हे थोडक्यात दाखवू.

१. दुसऱ्या सप्तकातील षड्ज किंवा सा २ हा स्वर यावयाला तारेची जी लांबी धरली होती ती लांबी दुप्पट केली, तेव्हा पहिल्या सप्तकातील षड़ज किंवा सा हा स्वर आला. याचाच अर्थ दुसऱ्या सप्तकातील सा हा पहिल्याच्या दुप्पट असतो किंवा त्याचे परस्पर प्रमाण २:१ असे आहे. म्हणजे त्यांच्या तारांची लांबी २:१ व तरंगसंख्या १:२ अशी आहे.

२. दुसऱ्या सप्तकातील षड्जाच्या अगर सा २ च्या तारेच्या दीडपट लांबीची तार घेतली तर प्रथम सप्तकातील मध्यम स्वर आला. याचाच अर्थ त्यांचे प्रमाणे ३:२ असे झाले. म्हणजे सा २ च्या तारेची लांबी २ तर म ची लांबी ३ व म ची तरंग संख्या २ तर सा २ ची संख्या ३.

३. सा २ च्या लांबीपेक्षा ३/४ पट लांबीची तार घेतली तर पंचम होतो. याप्रमाणे आपणास मिळालेले ६, ८, ९, १२ हे आकडे सक्ष्म रीतीने पाह लागल्यास आपणास असे आढळून येते की, ८ व ९ ही संख्या ६ व १२ या संख्येची मध्यगामी (Mean) आहे. त्यापैकी ९ ही संख्या सहापेक्षा जितकी मोठी तितकीच बारापेक्षा कमी (कारण ९ =६+३ =१२-३) व हिला त्या दोन संख्यांचा गणितमध्य (Arithmetical mean) म्हणतात. ८ ही संख्या पहिल्याच्या जितक्या अंशांनी मोठी आहे तितकीच दुसरीच्या अंशांनी कमी आहे (कारण ८ =६+६/३ =१२-१ २/३) व यालाच संगीत-मध्य (Harmonic mean) म्हणतात.

हा सर्व विस्तार करण्याचा उद्देश एवढाच, की या संगीतातील शोधावरून पायथागोरसने सृष्टीविषयक उपपत्तीबद्दल काही तर्क काढले. मासलीटसचा तत्त्वज्ञानी ॲनॅक्झिमँडरच्या

मतांचे विवेचन करताना सांगण्यात आलेच आहे, की त्याच्या मते या जगात द्वंद्वे म्हणजे शीत-उष्ण, कठोर-मृदू इ. आहेत व त्यांची उपपत्ती लावताना आपणास तद्व्यतिरिक्त काहीतरी अव्यक्त असे कारण गृहीत धरले पाहिजे. या जगात या द्वंदांतील प्रत्येक मत दुसऱ्यावर स्वारी करते व अखेर दोन्हीही अव्यक्तात मिळतात. ॲनॅक्झिमँडरच्या या उपपत्तीवर पायथागोरसचे असे म्हणणे होते, की या द्वंदांपैकी प्रत्येक जण दुसऱ्यावर जुलूम करीत आहे. हे म्हटल्याबरोबर आपणास असे कबूल केले पाहिजे, की जेथे त्या दोघांचाही अंतर्भाव होईल, अशी कोणती तरी एक स्थिती असली पाहिजे. उच्च षड्ज व नीच षड्ज यांचा संगीतामध्ये अमुकच एका ठिकाणी येतो, असे आपणास गणिताने नक्की काढता येते. या संगीत मध्यात उच्च-नीच षड्जांचा बेमालूम मिलाफ झाला आहे. मग शीत, उष्ण, कठोर, मृदू या द्वंदाचाही असा एक मध्यबिंदू असला पाहिजे, की ज्या ठिकाणी त्या उभय कोटीनाही योग्य वाटा मिळून कोणालाच अन्याय भोगावा लागत नाही आणि जो सिद्धांत आपणास स्वरासारख्या सूक्ष्म गोष्टींतही प्रमाणबद्ध मांडता आला, तो त्यापेक्षा स्थूल विषयात का येऊ नये? पायथागोरसच्या मताप्रमाणे हा सिद्धांत मान्य केला म्हणजे त्यावरून सृष्टीची नवी उपपत्ती कशी होऊ लागते ती पाहा. थेल्सच्या मते जल हे एकच सृष्टीच्या मुळाशी आहे; पण त्याचा शिष्य ॲनॅक्झिमँडर याच्या मते काही एक अव्यक्तपण एकरूपच-सृष्टीच्या मुळाशी आहे; पण पायथागोरसचे मत असे दिसते, की सृष्टीचे कारण एकच असण्याची जरूरी काय? भिन्न-भिन्न स्वर जर एक सुस्वर निर्माण करू शकतात, तर भिन्न भिन्न तत्त्वे परस्परांच्या समेटाने सुसंगत सृष्टीची सुव्यवस्थित रचना का करू शकणार नाहीत? याच मुद्याची विशेष प्रचीती पाहण्यास योग्य शास्त्र म्हणजे वैद्यक होय.

वैद्यक

या विषयातही आपणास परस्परविरोधी गोष्टींचा संयोग करावा लागतो. शीतोष्णादिकांचा समधातपणा अगर संवाद अगर योग्य मिश्रण उत्पन्न करून शरीरस्वास्थ्य संपादणे हेच वैद्यकविद्येचे ध्येय आहे. प्लेटोच्या फिडो या नावाच्या संवादांत सिमियसने याच मतांचे थोडेसे दिग्दर्शन केले आहे. ज्याप्रमाणे एखाद्या तंतुवाद्यामध्ये निरनिराळ्या उंच-नीच स्वरांच्या तारा असतात आणि त्या उंच-नीच स्वरांचा योग्य मिलाफ अथवा संवाद झाला म्हणजे कर्णमधुर संगीत उत्पन्न होते; परंतु त्याच तारा बेसूर लागल्या म्हणजे कर्णकटू स्वर उत्पन्न होतात, त्याचप्रमाणे आपले शरीर हे शीत, उष्ण, शुष्क, क्लिन्न या तत्त्वांचे झालेले आहे. ही तत्त्वे जोपर्यंत संवादी असतील तोपर्यंत शरीर निरोगी असते व त्यांच्यांत बेसुरेलपणा उत्पन्न झाला म्हणजे शरीराला रोग झाला असे म्हणतात. बेसूर झालेल्या तंतुवाद्याच्या तारा कमी-जास्त चढवून ज्याप्रमाणे पुनः संवाद उत्पन्न करता येतो. त्याप्रमाणेच औषध सेवनाने शरीरातील तत्त्वांचा संवाद साधता येतो.

एकंदरीत पायथागोरसने आपले संगीतज्ञान जिकडे तिकडे लागू केले होते. ॲनॅक्झिमँडरच्या मते ग्रह व तारे हे गोल छिद्रे किंवा कड्यांप्रमाणे होते म्हणून सांगितलेच आहे. पायथागोरसने त्यांच्या गतीविषयी अशी कल्पना काढली, की त्यांची गती ही या संवादतत्त्वावरच चालली आहे. यासच इंग्रेजीमध्ये Harmony of the spheres किंवा विश्वाचे संवादितत्व असे म्हणतात व या कल्पनेचा उल्लेख ठिकठिकाणी आलेला असतो.

गणित

पायथागोरस हा मोठा गणिती म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचे असे म्हणणे होते की, सर्व पदार्थ म्हणजे निरनिराळ्या संख्याच होत. पायथागोरस संख्या या शब्दाचा अर्थ काय करीत असे हे ध्यानात घेतल्याशिवाय आपणास त्याचा अर्थ काय, हे ध्यानात येणार नाही व तो अर्थ लक्षात ठेवूनसुद्धा पायथागोरसच्या मतात काही अंशी गूढ राहतोच. असो. प्राचीन काळी संख्या मांडावयाची म्हणजे ठिपक्यांनी मांडीत असत व खेळावयाच्या फाशांवरील आकडे अद्यापही तसेच मांडलेले असतात. या पद्धतीप्रमाणे आकडे विशिष्ट तहेने मांडले तर निरनिराळ्या आकृती सिद्ध होतात व त्यावरून आपणास गणितातील सिद्धांत काढता येतात आणि या आकृतिविशेषांचे पायथागोरसच्या पंथात इतके महत्त्व होते, की टेट्राक्टिस म्हणून प्रसिद्ध असलेल्या आकृतीवर हात ठेवून शपथ घेण्याची त्याजमध्ये वहिवाट होती. या आकृतीमध्ये १० या अंकाचे महत्त्व दाखविले आहे.

कारण तो पहिले चार अनुक्रमांक मिळून झाला आहे. (१+२+३+४=१०) म्हणजे खालील



आकृती पुढे याच धोरणाने वाढविली तर १५, २१ इत्यादी बेरजा येतील. याप्रमाणे ३, ५, १०, १५, २१ इत्यादी बेरजांचे अवयव अशा विशिष्ट आकारात मांडता येत असल्यामुळे पायथागोरसने या संख्यांना त्रिकोणाकृती संख्या (Triangular numbers) असे नाव दिले आहे. याचप्रमाणे काही संख्यांना चौरस संख्या व काहींना लंबचतुष्कोन संख्या अशी नावे मिळाली होती.





वरील आकृतींकडे पाहिले तर आपणास असे दिसून येईल की, १ पासून विषम संख्यांची बेरीज केली तर सर्व चौरस संख्या येतात. यांनाच वर्गसंख्या म्हणता येईल व समसंख्या मिळवीत चालले तर दीर्घ चतुष्कोनसंख्या येतात. याशिवाय गणितशास्त्रासंबंधी त्याचे दुसरेही शोध आहेत. ज्याच्या दोन बाजू ३, ४, ५ या प्रमाणात आहेत, अशा त्रिकोणात नेहमी काटकोन असतो व त्यावरून सामान्यतः काटकोन त्रिकोणासंबंधी काही तर्क थेल्सने बांधले होते म्हणून पहिल्या प्रकरणात सांगितलेच आहे. काटकोन त्रिकोणाच्या काटकोनभुजांवरील चौरसांची बेरीज कर्णचौरसाबरोबर असते हे त्यावेळी काही उदाहरणांवरून माहीत होते; परंतु काटकोन त्रिकोणाचे निरनिराळे मासले पाहता पाहता पायथागोरसच्या दृष्टीने सर्वांगसुंदर असा समद्विभुज काटकोन त्रिकोण घेतला तर त्याचे भुज व कर्ण यांच्या लांबीचे निश्चित प्रमाण सांगता येत नाही. कारण गणिताने तो येणारा आकडा अप्रमेय अथवा अमित (incommensurable) आहे. याचप्रमाणे पायथागोरसला दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे घनवर्तुळाजवळ येणारा द्वादशपत्र घनपंचकोण (dodeca hedron) तयार करण्याबद्दल होय. आधी शुद्ध पंचकोन काढावयाचा म्हणजे एका दिलेल्या वर्तुळाची त्रिज्या (Medial section) नावाच्या बिंदूत छेदून तितकी लांबी घ्यावी लागते व नंतर घनपंचकोन बनविण्याचा विचार. ही मेडिकल सेक्शन (Medial section) ची लांबी अशीच अमेय आहे. हा घनपंचकोन तयार करण्यास पायथागोरसचे अनुयायी खालील आकृतीचा उपयोग करीत.



परंतु तो उपयोग कसा करीत हे आज आपणास ठाऊक नाही व प्रत्यक्ष पायथागोरसच्याही वेळी ते मोठे गूढच असले पाहिजे. पायथागोरसचे अनुयायी या आकृतीचा साधारण मुद्रेसारखाच उपयोग करीत व तिच्या गूढार्थकत्वावरून पुढे ही आकृती जादूटोण्याच्या कामात विशेष उपयुक्त समजली जात असे. उंबऱ्यावर ही आकृती काढलेली असेल, तर भूत-पिशाच त्या घरात शिरत नाहीत व नजरचुकीने शिरलीच तर ती अडकून पडतात. त्यांना या पंचकोनाचे उल्लंघन करून जाण्यास घरधन्याची परवानगी मिळवावी लागते व ही

परवानगी मिळविण्यासाठी ती त्याची मनधरणी करतात, त्याला नानाप्रकारच्या अद्भुतशक्ती व अद्भुतज्ञान देतात, असा लोकांचा समज होता व तो समज प्रसिद्ध जर्मन कवी व तत्त्ववेत्ता गअठ याच्या वेळीही रूढ होता. त्याने आपल्या फॉस्ट नामक रूपकात त्याचा उपयोग केला आहे.

पायथागोरसची संगीत, वैद्यक, गणित वगैरे विषयांतील मते काहीशी गूढपणामुळे, काहीशी दुर्गमत्वामुळे व काहीशी अपरिचितत्वामुळे मनोरंजक होत नाहीत. त्यासंबंधी विवेचन करण्याचा उद्देश इतकाच, की वाचकांस त्याच्या बुद्धिमत्तेच्या अष्टपैलूपणाची कल्पना यावी. असो आता आपण पायथागोरसच्या इतर मतांकडे वळू.

पायथागोरसचा आचारनियमनावर अतिशय तीव्र कटाक्ष होता. त्याच्या पंथामध्ये अखंड ब्रह्मचर्य, तपश्चरण, श्रद्धायुक्त ध्यानधारणा, सामाजिक धर्मबुद्धी इत्यादी गोष्टी तर अवश्य होत्याच; पण याशिवाय सामान्य आचरणाचेही सूक्ष्म निर्बंध घातलेले असत. त्यापैकी काही खाली दाखविले आहेत.

पातळ पदार्थ मोजण्याच्या मापावर बसू नये. उजेडामध्ये काळीज खाऊ नये, लोखंडाच्या सळयांनी अग्नी हलवू नये. उजेडामध्ये आरसा ठेवला असेल तर त्यामध्ये आपले तोंड पाहू नये. सकाळी उठल्याबरोबर अंथरूण नीट गुंडाळून ठेवावे व आपल्या शारीरस्पर्शाच्या खुणा त्याजवर राहू देऊ नयेत. पशुयज्ञ करू नये, ऊर्णावस्त्र घेऊ नये व वाटाणे खाऊ नयेत. मनुष्याने आपला आहार फार नियमित ठेवावा, एकंदरीत मांसाहार वर्ज्य करावा.

पायथागोरस आपले हे सर्व नियम प्रत्येक शिष्याला सारखेच लागू करीत असेल, असे दिसत नाही. कारण तो क्रोटन येथे गेल्यावर एका मिलो नामक मल्लविद्याविशारदाने त्याचे शिष्यत्व पत्करले होते व त्याला मांसाहार सर्वस्वी टाकून देणे अगदी अशक्य होते; परंतु असे काही अपवाद सोडले तर पायथागोरसचे आहार-विहाराबद्दल फार कडक निर्बंध असत, असे दिसते.

पायथागोरसचा पुनर्जन्मावर पूर्ण भरवसा होता. मनुष्याचा आत्मा अमर असून मरणप्रसंगी एका शरीरातून तो दुसऱ्या शरीरात जात असल्यामुळे तोच पुढे जिवंत आहे, असे म्हटले पाहिजे. एवढेच नव्हे तर या पुढील जन्मामध्येही त्याचेच कित्येक स्थूल गुणदेखील दृष्टीस पडतात, अशी पायथागोरसची समजूत असावी. एके दिवशी पायथागोरस रस्त्याने जात असता कोणी एकाने एका कुत्र्यास मारले व तो कुत्रा मोठ्याने किंचाळला. त्याबरोबर पायथागोरस त्या मनुष्याला म्हणाला, 'थांब, त्या कुत्र्याला मारू नकोस. कारण त्याच्या आवाजावरून हा माझा पूर्वजन्मातील एक स्नेही असावा, असे वाटते.'

ब्रह्मचर्य, नियमित आहार इत्यादीविषयी नियम, पुनर्जन्मावरील दृढ विश्वास याजविषयीची मूळकल्पना पायथागोरसला कोठून मिळाली असावी असा या ठिकाणी साहजिकच प्रश्न उभा राहतो आणि हा प्रश्न उत्पन्न होतो. यावरून त्या काळी खुद्द ग्रीस देशामध्ये अगर त्या

देशाच्या वसाहतीमध्ये हे ज्ञान प्रचलित नसावे, असे वाटते. मनुष्याच्या शरीराव्यतिरिक्त काही आत्मतत्त्व आहे ही कल्पनाच आधी फार थोड्या जणांना ठाऊक होती. मायलीटस शाखेतील ॲनॅक्झिमीनसला याबद्दल काही अस्पष्ट कल्पना असावी, असे पहिल्या प्रकरणात दाखविलेच आहे; परंतु त्या कल्पनेचे स्वरूप पाहता त्याचीच ही कालक्रमाने परिणती झाली असे म्हणता येत नाही. डेलॉस येथे प्रस्थापित झालेला ऑर्फिक धर्मच या कल्पनांच्या मुळाशी आहे, असे कित्येकांचे मत आहे; परंत ऑर्फिक धर्माचा उदयच एका अर्थी ग्रीक वसाहतीत अकस्मात उद्भूत झाला असल्यामळे त्याचे स्वतःचेच मूळ परदेशीय असणे संभवनीय आहे व म्हणून ऑर्फिक धर्म व पायथागोरिक मत या दोघांचेही एकच मूळ असून, ते प्राच्य राष्ट्रांच्या संस्कृतीमध्ये असले पाहिजे. इजिप्त व ग्रीस या देशांचा परस्पर संबंध विशेष असल्यामुळे इजिप्तमधून ही मते पायथागोरसने नेली असावीत, असे कोणास वाटेल; परंतु या मतांचा खुद्द इजिप्तमध्येच परिपोष झालेला नसल्यामुळे ते संभवनीय नाही. उलटपक्षी हिंदुस्थानातील प्राचीन ऋषींचे मतच याच्या मुळाशी असणे अधिक संभवनीय आहे. पायथागोरसच्या नावावर प्रसिद्ध असलेली बहुतेक सर्व मते ख्रि. पू. ६०० वर्षांच्याही पूर्वी हिंदुस्थानात प्रचलित होती व या अत्यंत साम्यामुळे त्यांचा संबंध असलाच पाहिजे असे वाटते व पायथागोरसचे पुनर्जन्मविषयक मत परकीय होते, अशी त्याच्या समकालीन लोकांचीच समजूत होती. या ऐतिहासिक पुराव्यामुळे हीच समजूत दृढ होते. कित्येक लेखकांना हिंदुस्थानच्या प्राचीनतम तत्त्वज्ञानाशी पायथागोरसचा जोडलेला हा संबंध न आवडून ते आर्फिक धर्मावरच अधिक जोर देतात; परंतु त्यांचा हा प्रयत्न व्यर्थ आहे. कारण आर्फिक धर्माचे मूळही अखेर हिंदुस्थानातच शोधावे लागेल. डायाक्डोनेल यांनी आपल्या संस्कृतवाङ्मयाच्या इतिहासात पायथागोरसचा व हिंदुशास्त्रज्ञांचा संबंध असल्याची गोष्ट नमूद केली आहे व हा संबंध जोडण्यास पायथागोरसलाच हिंदुस्थानात लांबवर यावयास नको होते. कारण त्याचे काळी पारसिकांच्या राज्यात पुष्कळ हिंदू पंडित आढळत व त्याजबरोबर पायथागोरससारख्या दीर्घप्रवास करणाराची मुलाखत होणे अगदी साहजिक आहे, असे सुचविले आहे. हिंदुस्थानातील आहारविहारांच्या नियमांच्या कडकपणाकडे नुसती नजर फिरविली व त्या नियमांची दीर्घपरंपरा लक्षात घेतली, म्हणजे आपणास असा संबंध असलाच पाहिजे, असे वाटते. हिंदू धर्मामध्ये आहारशुद्धी हा धर्मव्रतांचा व आध्यात्मिक उन्नतीचा पाया आहे. 'आहार शुद्धौ सत्तशुद्धिः सत्तशुद्धौ धृवा स्मृतिः स्मृतिलंभे सर्वग्रंथीनां विप्रमोक्षः* ही परंपरा छांदोग्योपनिषदालाही मान्य आहे (छां. ७. २६. २). पायथागोरसने हे सर्व नियम पाळण्यास सांगण्याचे कारणही त्याच्या मते मनुष्याची या नियमांनी शुद्धता सिद्ध होते, असेच होते.

---

* ...आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः स्मृतिलम्भे सर्वग्रन्थीनां विप्रमोक्षः' (तस्मै. मृदितकषायाय...) शुद्ध पाठ असा आहे

१. ..... the dependence of Pythagoras on Indian Philosophy and science certainly seems to have a high degree of probability. Almost all the doctrines ascribed to him, religious philosophical, mathematical were known in India in the sixth century B.C. The coincidences are so numerous that their cumulative force becomes considerable. The Transmigration theory, the Assumption of five elements, the Pythagorean theorm in Geometry, the Prohibition as to eating beans, the Religio-philosophical character of the Pythagorean fraternity, and the Mystical speculations of the Pythagorean school, all have their close parallels in ancient India. The doctrine of metempsychosis in the case of Pythagoras appears without any connection or explanatory background and was regarded by the Greeks as of foreign origin. He could not have derived it from Egypt, as it was not known to the ancient Egyptians. In spite, however of the later tradition, it seems impossible that Pythagoras should have made his way to India at so early a date, but he could quite well have met Indians in Persia.' (A.A.Macdonell: Sanskrit Literature.)

पुनर्जन्माच्या प्रश्नाविषयीही इतक्या प्राचीन काळी हिंदुस्थानाव्यतिरिक्त ऊहापोह झालेला आढळत नाही व म्हणून त्या बाबतीतही पायथागोरसची माहिती हिंदू पंडितांकडूनच मिळविलेली असावी, असे दिसते. पायथागोरसने आपण पुनर्जन्म का मानतो, याचे खुलासेवार विवरण कोठेही दिलेले नाही, नाहीतर त्याने योजिलेल्या विचारसरणीची पाहणी करून ती उपनिषदांतील विचारसरणीशी किती जुळते हे पाहण्यास सापडले असते.

हिंदुस्थान हे अशा कल्पनांचे मूळ स्थान मानले तरी त्या कल्पनांचे बी युरोपखंडामध्ये रुजविण्यास पायथागोरससारख्या तत्त्वज्ञाचीच जरूरी होती व विशेषतः त्या काळी प्रसार पावणाऱ्या निःशृंखल चैनबाजीला आळा घालण्यास पायथागोरसनेच सुरुवात केली हा त्याचा श्रेष्ठपणा होय यात संशय नाही. असो.

आपल्या वयाच्या ४० व्या वर्षापर्यंत ठिकठिकाणी प्रवास करून व वर निर्दिष्ट केलेली मते ठरवून पायथागोरस हा अखेर आपली जन्मभूमी सॅमॉस येथे परत आला. प्रवासाचे जिवापाड श्रम करून मिळविलेले हे विद्याबीज आपल्या जन्मभूमीत अंकुर धारण करून फोफावेल व आपल्या भव्य शाखाविस्तारांनी व शीतल गर्द छायेने सर्व जगताला आश्चर्यचकित व विगतश्रम करील, आपल्या जन्मभूमीचे महत्त्व वाढवील व आपणास यशोवैभव प्राप्त करून देईल, अशी पायथागोरसची मोठी उमेद होती; पण सॅमॉसला परत आल्यावर त्या आशेचा अगदी विरस झाला. आपल्या तारुण्यातील स्वातंत्र्यशाली सॅमॉस विलयाला जाऊन त्या

ठिकाणी पॉलीक्रेटिसच्या जुलमी राजसत्तेखाली वाकून गेल्यामुळे स्वतंत्र बाण्याच्या श्रेष्ठ व्यक्तींना अवकाशरहित झालेले सॅमॉस शहर पाहून पायथागोरसचा किती आशाभंग झाला असेल हे त्याचे त्याला माहीत. प्रसिद्ध इंग्रजी कवी गोल्डस्मिथ याच्या Deserted Village (डिझर्टेड व्हिलेज) नावाच्या काव्यातील उद्गारांप्रमाणेच उद्गार त्याच्या तोंडून निघाले असतील, यात काय आश्चर्य?

आपला मूळ बेत फसला म्हणून पायथागोरस स्वस्थ बसला नाही. कार्लाइलने सॉर्टररिसार्टस्मध्ये म्हटले आहे की, मिळविलेला पैसा खर्च करीपर्यंत खिसा जाळीत असतो व मिळविलेले ज्ञान दुसऱ्यास देईपर्यंत मनाला जाळीत असते. आपल्या ज्ञानबीजाचा प्रचंड वृक्ष आपल्या जन्मभूमीत झाला नाही तर त्याचे दुसरीकडे आरोपण करावे; पण ते ज्ञानबीज फुकट जाऊ देऊ नये, अशा हेतूने त्याने देशत्याग करण्याचा निश्चय केला. त्यावेळी अयोनिया व इटली येथील ग्रीक वसाहतीचा व्यापारानिमित्ताने पुष्कळच संबंध येत असे व ज्याचे अयोनियात जुळणार नाही तो इटलीकडे जाई. आपणास अशा प्रकारची आणखीही काही उदाहरणे सापडतील. असो. त्यावेळच्या इटलीमध्ये क्रोटन आणि सायबॅरिस ही सर्वांत प्राचीन व संपन्न शहरे होती व त्यापैकी क्रोटन या शहरी जाण्याचा पायथागोरसने बेत ठरविला. क्रोटन शहरच पायथागोरसच्या विशेष पसंतीस का उतरले हे सहज समजण्यासारखे आहे. क्रोटन येथील राजकीय परिस्थिती पायथागोरसच्या बेताला फार अनुकूल होती. क्रोटन वसले गेले त्यावेळच्या जमीनदारांच्या वारसातून निवडून काढलेल्या हजार सदस्यांच्या समितीकडे सर्व राज्यसत्ता होती व ही पद्धत पुष्कळशी प्रजाकीय (प्रजातंत्र) लोकसत्तेकडे झुकत असल्यामुळे, मतस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांना तेथे अधिक वाव होता. याखेरीज दुसऱ्या अनुकूल गोष्टी म्हणजे तेथील नागरिकांची सुदृढ शरीररचना व त्यावरून दिसून येणारे त्यांचे नियमित वर्तन व त्या ठिकाणच्या वैद्यकविद्येचा उत्कर्ष या होत आणि या गोष्टी परस्परसंबद्धच आहेत. वर दर्शविण्यात आलेच आहे, की शरीरातील तत्त्वांचा समतोलपणा राखणे हेच आरोग्याचे साधन आहे. ते मिळविण्यास आहारादिकांचा नियमितपणा हाच उपाय आहे, असे पायथागोरसचे मत होते व क्रोटन येथील प्रख्यात भिषग्वरांचे याबाबतीत त्याच्याशी एकमत होते. पूर्वी निर्दिष्ट केलेला क्रोटन पहिलवान मिलो याचा जावई डिमॉकिडीस हा पायथागोरस क्रोटनमध्ये आल्यावर औषधिक्रियेमध्ये व शस्त्रक्रियेमध्ये प्रवीण झाला व क्रोटन येथील दुसरा प्रसिद्ध वैद्य अल्केमेऑन याने तर आपले कित्येक ग्रंथ पायथागोरसच्या पंथातील प्रसिद्ध व्यक्तींना समर्पण केले होते.[१] यावरून पायथागोरस व क्रोटन येथील वैद्य यांची परस्परोपयोगिता व सहानुभूती चांगलीच व्यक्त होते.

---

1. Now the medical school of kroton, which is represented for us by Alkmaion, based its theory, on a very similar doctrine. According to him,

पुढील पानावर...

आपली वैद्यकसंबंधी मते अमलात आणली असता त्याचा उत्तम परिणाम क्रोटन येथील मल्ल करतील अशी त्याला आशा होती व या मल्लांच्या प्रख्यातीमुळेही पायथागोरसची क्रोटनला जाण्याची प्रवृत्ती झाली असावी. ऑलिंपियन खेळात क्रोटन येथील जवान नेहमी बक्षिसे मिळवून जात. यावरून क्रोटन हे पायथागोरसला आपणास उत्तम कार्यक्षेत्र आहे असे वाटणे अगदी साहजिक होते.

पायथागोरस क्रोटन येथे आल्याबरोबर त्याच्या वर्तनाने व शिक्षणाने क्रोटन येथे अद्भुत क्रांती घडवून आणली व खाजगी व सार्वजनिक जीवनात मोठीच सुधारणा केली. त्याच्या उपदेशाने राजकीय असंतोष दबला, विषयलंपटता नाहीशी झाली, चैनबाजी खालावली व सुंदर तरुणीदेखील आपले सुवर्णालंकार टाकून देऊन साधा पोशाख करू लागल्या. त्याच्या उपदेशाची तरुण पुरुषांच्या मनावर अशी छाप पडे, की त्याचे हे सामर्थ्य पाहून अधिकारी समितीने आपण होऊन त्याला पाचारण केले व स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या मिरवणुकीमध्ये त्याची पत्नी व कन्या यांना अग्रस्थान देण्यात आले. पायथागोरसच्या चरित्रकारांनी दिलेल्या वरील हकीगती काहीशा अतिशयोक्तिरूप आहेत असे समजले तरीदेखील एकंदरीत पायथागोरसला क्रोटन येथे पुष्कळच मानमान्यता मिळाली, यात संशय नाही आणि ही मानमान्यता केवळ एकट्या क्रोटन शहराच्याच नागरिकांकडून नव्हे, तर आसपासच्या इतर मोठमोठ्या शहरांतूनही मिळाली होती. पायथागोरसचे माहात्म्य क्रोटनमध्ये प्रतिदिवशी वाढत चालले होते हे खरे; पण या शीघ्रप्रगतीतच त्या त्या पंथाच्या विनाशकालाची पूर्व छटा दिसत होती, असे म्हटले तरी चालणार आहे. क्रोटनमधील सुमारे तीनशे धनिक गृहस्थ पायथागोरसचे शिष्य झाले व त्यांचे एक मंडळ जमले. पायथागोरसचे आहारविहाराचे व काही धर्मकर्माचे वगैरे नियम असल्यामुळे या मंडळातील मनुष्य अर्थातच इतरांपासून अगदी सहजगत्याच निवडून पडे व तितके त्याचे मंडळाशी निकटत्व अधिकाधिक दृढतर होई. या गोष्टीचा नैसर्गिक परिणाम असा झाला, की पायथागोरस पंथ हा मंडलांतवर्ती जनांशी अत्यंत स्नेहयुक्त; परंतु इतर जनसमाजापासून तुटक झाला. एवढेच नव्हे तर त्यांचा तुटकपणा त्यांच्या प्रेमळपणाइतकाच स्पष्ट व चिरस्थायी झाला. पायथागोरसच्या पंथात शिरलेल्या मनुष्याला साहजिकच असे वाटे, की मी माझ्या इतर देशबांधवांपेक्षा श्रेष्ठ आहे. आहारविहारांच्या नियमांनी मी माझे शरीर पवित्र करून घेतले आहे व माझे मन सृष्टीचे गूढ

---

health depended on the 'isonomy of the opposites in the body and disease was just the undue predominance of one or the other. We need not be surprised, then, to find that Alkmaion was intimately associated with the Pythagoreans and that he dedicated his medical treaties to some of the leading members of the society. (Burnet: Greek Philosophy Part I)

समजण्याइतके प्रगल्भ झाले आहे. या आत्मप्रतीतीचा आनुषंगिक परिणाम असा होई, की प्रत्येक पायथागोरियनला आपण जनसमाजाचे नेतृत्व पत्करावे, नव्हे ते नेतृत्व आपणाकडेच असणे सर्वथा योग्य. एवढेच काय; पण ते यदृच्छेने प्राप्त होत नसेल तर येनकेनप्रकारेण प्राप्त करून घेणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे, असे मनापासून वाटे. क्रोटन येथे राजकारणात हात घालावयाचा तर त्याला मार्ग म्हणजे हजार सदस्यांच्या समितीत प्रवेश करून घेणे, अगर त्या सदस्यांवर वजन पाडणे, हाच होता, हे खरे; पण याच मार्गानेही पायथागोरियन पंथाचे महत्त्व पुष्कळच वाढणे शक्य होते. पायथागोरसच्या अनुयायांमध्ये पुष्कळ धनिक होते म्हणून वर सांगितलेच आहे. या धनिक गृहस्थांमध्ये सदस्य होण्यास कायद्याने पात्र समजले जाणारे इसम असत आणि त्यांच्याद्वाराने हे राजकारणाचे सूत्र हलविले जाई. याच मार्गाचा सतत अवलंब होत होता. पायथागोरियन मंडळाला अगदी राजकीय संस्थेचेच स्वरूप आले व बाहेरून मोठी धर्मनिष्ठ, संयमशील, गूढतत्त्वान्वेषी दिसणारी; पण वस्तुतः राजसत्ताभिलाषी, परविद्वेषक, महत्त्वाकांक्षी मंडळी जनसमाजाच्या डोळ्यात खुपू लागली. पायथागोरसचा क्रोटन येथे जाण्याचा उद्देशच आपली सत्ता स्थापण्याचा होता, असे जे कित्येक लेखक विधान करतात ते निखालस खोटे आहे. पहिल्या प्रथम क्रोटन येथे येण्याचा पायथागोरसचा हेतू अगदी शुद्ध होता व त्याचे वैयक्तिक वर्तन शेवटपर्यंत शुद्धच होते. त्याच्या शिष्यवर्गाच्या दुर्वर्तनाचे फळ त्याला भोगावे लागले एवढे मात्र खरे. ते पुढे सॉक्रेटिसच्या चरित्रात दिसून येईलच. त्या माहात्म्याचा एखादा नियमबद्ध विशिष्ट पंथ नसताही केवळ अलकिबायडिससारख्या महत्त्वाकांक्षी पुरुषाचा व त्याचा स्नेहसंबंध होता एवढ्यावरूनदेखील त्याजवर लोक वृथारोप करण्यास चुकले नाहीत, मग सॉक्रेटिस हाच खुद्द एखाद्या राजकारस्थानी मंडळाचा नेता असून, अलकिबायडिस हा त्या मंडळाचा घटक असता, तर केवढा गहजब आधीच गुदरला असता, हे कोणालाही सांगता येईल. तसा अर्थाअर्थी संबंध न ठेवतादेखील सॉक्रेटिसला मृत्यूची शिक्षा भोगावी लागली ती लागलीच. पायथागोरसचा तर या क्रोटनमधील राजकारस्थानी पुरुषांशी निकटतम संबंध व तितकाच इतरांशी अलगपणा होता; मग त्याविरुद्ध लोकांची मने कलुषित झाली, यात काय आश्चर्य? तशातही आगीत तेल ओतण्यास सैतानाचे दूत अगदी हजर होते. किलन (Kylon) आणि निनन (Ninon) या व्यक्तींकडे हा अधिकार आला होता. किलनने पायथागोरियन पंथात प्रवेश करून घेण्याबद्दल बरीच खटपट केली; पण ती त्याच्या नीतिबाह्य वर्तनामुळे यशस्वी झाली नाही व त्यामुळे तो पायथागोरस व त्याचा पंथ यावर दातओठ खात होता. आजपर्यंत मुख्य समितीचे व पायथागोरियन पंथाचे बरेच सूत होते; परंतु या दुकलीच्या खटपटीने तेही नष्ट झाले व तेथेही द्वेषाग्नी भडकला. क्रोटन येथील सत्ता तेथील मूळच्या जमीनदारांच्या वंशजांकडे असे. कारण त्यांच्यामधूनच हजार सदस्यांची निवड होत असे; परंतु लोकसत्तेच्या वाढत्या लाटेपुढे अशा पद्धतीचा टिकाव लागणे अशक्य होते व म्हणून

ही पद्धती मोडून टाकून सर्व लोकांमधून हे सदस्य निवडून काढावेत व त्यांच्या समितीला म्हणजे वर्षभर नेमलेल्या कार्यकारी अधिकाऱ्यांना, वर्षअखेर त्यांच्या अधिकाराची मुदत संपल्यावर त्यांच्या कामाबद्दल जाब विचारता यावा व त्यांचे वर्तन दूषणीय वाटल्यास त्यांना जबर शिक्षाही देता यावी, असा एक ठराव समितीमध्ये आला होता. हा ठराव पास झाला तर पायथागोरियन पंथाचे राजकारणदृष्ट्या महत्त्व कमी होईल या भीतीने सर्व पायथागोरियन त्या ठरावाच्या विरुद्ध झाले. ही संधी साधून किलन आणि निनन यांनी पायथागोरियन लोकांवर मोठा भडिमार उडविला व त्यांजवर शिव्यांचा व आरोपांचा असा काही वर्षाव केला, की लोकांची अधिकारोत्सुक झालेली मने सर्वस्वी बिथरली आणि अपोलो देवाच्या देवळात (काही लेखकांच्या मते मायलोच्या वाड्यात) पायथागोरियन लोक आपल्या सभेसाठी जमले असता लोकांनी त्या देवळाला आग लावून दिली. त्या आगीच्या डोंबामध्ये बहुतेक पायथागोरियन जळून खाक झाले. काही प्रसंगावधानी जवान लोक मात्र सुटले; परंतु त्यांना लगेच परागंदा व्हावे लागले. याचप्रसंगी टरेटम्, मेटॅपोटम् वगैरे इतर शहरांतही असाच हाहाकार उडाला व अशा रीतीने पायथागोरसच्या मूळच्या पंथाची इतिश्री झाली.* खुद्द पायथागोरसविषयी निरनिराळे लोकापवाद आहेत. कोणी म्हणतात तो त्याच आगीत आपल्या शिष्यांबरोबर जळून गेला, कोणाच्या मते त्याचा आधीच अंत झाला होता, आणखी तिसऱ्या हकीगतीप्रमाणे तो वानप्रस्थ अथवा वनवासी होऊन चाळीस दिवसांच्या स्वीकृत उपोषणाने गतप्राण झाला. सिसेरोच्या काळी त्याची समाधीही मेटॅपोटममध्ये दाखविण्यात येत असे. तात्पर्यार्थ एवढाच, की या प्रसंगाने पायथागोरियन पंथ जवळ जवळ अस्तंगत झाला. पुष्कळ वर्षे लोटल्यावर पायथागोरसच्या अनुयायांचा पुन: मॅरनाग्रीशियाच्या त्याच भागात प्रवेश झाला व काही ठिकाणी त्यांना खरोखरी राजसत्तेत हात घालण्यास सापडला, ही गोष्ट खरी. तथापि, पायथागोरियन पंथ यादृष्टीने त्यांचे डोके पुनः कधीही वर आले नाही. वारा येईल तशी पाठ फिरवून तग धरून राहावयाचे व आपल्या भोवताली प्रचलित असलेल्या मतांशी आपली मते अत्यंत जुळतात असे दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा, हे यापुढे पायथागोरसच्या अनुयायांचे एक धोरणच पडून गेले.

पायथागोरसच्या या अनुयायांमध्ये पहिला गृहस्थ म्हणजे थॉब्सचा फिलोलॉस हा होय. त्याचा काळ ख्रि. पू. च्या शतकाचा शेवट असा दिला असता चालेल. दक्षिण इटलीमध्ये येणे विशेष धोक्याचे नाही असे पाहिल्यावर हा इटलीमध्ये गेला होता. याच्या काळी एंपिडोकल्सचे मत प्रचलित असून, ते आत्मसात करण्याची पायथागोरियन पंथाची धडपड चालली होती. तथापि, एंपिडोकल्सची मूलद्रव्ये म्हणजे खरोखर मूलद्रव्ये नव्हेत, असे त्यांचे

---

* राजसत्ता आणि धर्मसत्ता यांची सांगड अनेक ठिकाणी घातली गेलीय. त्याचसोबत धर्मसत्तेला दूर ठेवून सत्ता काबीज करण्याची षड्यंत्रेही झालेलीच आहेत. धर्मसत्तेतील वर्चस्ववाद याला जगभर कारणभूत दिसतो.

आग्रहाचे म्हणणे होते. प्लेटोने आपल्या ग्रंथामध्ये हे मत मोठ्या खुबीने सुचविले आहे. ही द्रव्ये अक्षरेच काय; पण शब्दाच्या अवयवयांसारखीही नाहीत, असे पायथागोरियन पंथाचे म्हणणे असल्याबद्दल त्याने उल्लेख केला आहे. (Timaeus).

ही मूलद्रव्ये संख्यारूप नसून संख्यासदृश आहेत, असे एक मत सांगण्यात येत असे; पण याचा खरा अर्थ काय, हे एक मोठे गूढच आहे. नंतरच्या पायथागोरियनांनाही या मताचा इत्यर्थ नीट कळत नसावा असे दिसते. फिलोलॉसचा एक विद्यार्थी युरीटॉस (Eurytos) या नावाचा होता. त्याने मनुष्याची संख्या २५० आहे हे दाखविण्यासाठी तितके निरनिराळ्या रंगाचे गारगोटीचे खडे घेऊन भिंतीवर मनुष्याची आकृती तयार करून दाखविल्याचे ॲरिस्टॉटलने सांगितले आहे. त्यावरून मूळच्या संदिग्ध मताची कशी ओढाताण होते हे चांगलेच प्रत्ययाला येते.

याशिवाय पायथागोरियन पंथातील एक महत्त्वाचा शोध म्हणजे पृथ्वी हा एक ग्रह आहे हा होय; परंतु त्याबरोबरच सूर्यमालेविषयीचे त्यांचे एकंदर मत पाहून मोठा चमत्कार वाटतो. त्यांच्या मते या मालेच्या मध्यभागी एक मोठा थोरला अग्नी आहे. हा अग्नी आपणास दिसणे शक्य नाही. कारण जसा चंद्र आपणाकडे एकच बाजू ठेवून आपणाभोवती फिरतो म्हणून आपणास त्याची दुसरी बाजू मुळीच दिसत नाही, त्याप्रमाणेच आपली व या मध्यवर्ती अग्नीची स्थिती आहे. त्याप्रमाणेच चंद्रग्रहण होण्यास पृथ्वीची सावली पुरेशी न वाटून की काय, एका पडपृथ्वीची योजना करण्यात आली होती. सूर्याचा प्रकाशही त्या मध्यवर्ती अग्नीपासून येतो, असे त्यांचे मत होते. आपल्या नुसत्या उघड्या डोळ्यांनी चंद्राविषयी स्पष्ट दिसणाऱ्या गोष्टीच सर्वत्र लागू करण्याच्या अट्टहासाचे हे फळ दिसते.

काही काही प्रसंगी मूळ गुरूचे मत किती दूर राहून भलतेच मत पुढे येते, याचाही एक मासला या पंथाच्या इतिहासामध्ये सापडतो. आत्मा हा देहाव्यतिरिक्त व देह नाश पावला तरी नाश न पावणारा व अमर आहे, असे पायथागोरसचे स्पष्ट मत होते; परंतु त्याच्या पुढील अनुयायांनी आत्मा हा शरीराचा सहधर्मी किंवा साधर्म्यगामी (attumement) आहे, अशी कल्पना केली व हे मत पुढे मांडण्यात फिलोलॉसचा एक शिष्य सिमिअस यानेच पुढाकार घेतला, ही आश्चर्याची गोष्ट आहे. आपल्या गुरूच्या मूळ शिकवणीकडे पूर्ण लक्ष न देता, परिस्थितीच्या ओघाबरोबर वाहून जाण्याचाच हा परिणाम असेल व या पंथामध्ये असे अनेक परिवर्त दृग्गोचर झाल्यामुळेच त्याजविषयी लिहिताना विख्यात ग्रंथकारांनीही संदिग्ध भाषा वापरली असेल, हे बरेच संभवनीय दिसते.

❍❍❍

प्रकरण ३ रे

हिरॅक्लीटस

पहिल्या प्रकरणामध्ये थेल्सच्या मतांचे दिग्दर्शन करीत असता सांगण्यात आलेच आहे, की जगताच्या आदिकारणाचा शोध करीत असताच भेदपक्ष व अभेदपक्ष असे दोन पक्ष पडतात. जगतातील पदार्थांविषयी विचार करीत असता त्यांच्यात प्रतिक्षणी विकार होत आहे, असे दाखवून आपले सिद्धांत बांधणारा भेदपक्ष होय. या पक्षाला जगताचे आदिकारण असे काही मान्य नसते असे नाही, तर अमुक एका प्रसंगी नानाविधसृष्टीविरहित अशी अवस्था होती व त्यातून नानाविधसृष्टी उत्पन्न झाली, असे त्यांचे मत नसून ही सृष्टीची नानाविधता स्वभावसिद्ध आहे, असे त्यांचे म्हणणे असते व या पक्षाला या कारणाकरिता भेदपक्ष किंवा वैकृतिकपक्ष असे नाव देता येईल. उलटपक्षी सृष्टीची एकविधताच प्रामुख्याने पुढे आणणारा पक्ष हा प्राकृतिक किंवा अभेद पक्ष होय. या दोन पक्षांपैकी पहिल्या पक्षाचा पुरस्कर्ता हिरॅक्लीटस होय.

हिरॅक्लीटसचा काळ झेनोफेनस व पारमिनाइड्स यांच्यामधील आहे. हिरॅक्लीटसच्या त्रोटक लेखात पायथागोरस व झेनोफेनस यांचा स्पष्ट उल्लेख आला आहे व पारमिनाइड्सच्या ग्रंथात हिरॅक्लीटसचा उल्लेख आलेला आहे. या कालानुक्रमानेच चालावयाचे तर आधी झेनोफेनसची व त्याच्या मतांची माहिती दिली पाहिजे; परंतु झेनोफनस व त्याच्या पंथांतील दुसरे तत्त्ववेत्ते यांची संगतवार हकीगत एकाच प्रकरणात दिलेली अधिक चांगली, असे वाटल्यावरून ती पुढील प्रकरणात दिली आहे. झेनोफेनसप्रमाणे हिरॅक्लीटसच्या मताची साक्षात् परंपरा पुढे जात नसल्यामुळे त्याची माहिती स्वतंत्रपणे देण्यास हरकत नाही.

वर दर्शविलेल्या कारणांमुळे हिरॅक्लीटसचा काळ साधारणपणे ख्रि. पू. ५३६-४७० असा देण्यात येतो. तो एफीसस येथील राहणारा असून, श्रीमंत घराण्यातील होता. त्याच्या घराण्यात एफीसस येथील एक धार्मिक उच्च पदवी वंशपरंपरा चालत असून हिरॅक्लीटसने

उदारबुद्धीने ती आपल्या भावाकडे सोपवली असे सांगतात. हिरॅक्लीटसला त्याच्या संस्थानातील लोकांकडून फारसे उत्तेजन मिळाले नसावे. कारण तो आपल्या संस्थान बांधवांवर फार रुष्ट झाला असावा, असे त्याच्या काही वाक्यांवरून दिसते. हर्मोडोरस या नावाचा त्याचा एक मित्र होता व त्याला एफीससमधून हद्दपारीची शिक्षा मिळाल्यामुळे या रुष्टतेला अधिक जोर मिळाला असावा असे वाटते. एफीससच्या लोकांना आपल्यामध्ये कोणी उत्कर्षास चढलेला खपत नसे. ज्याला उत्कर्षाची आवड असेल त्यास एफीसस सोडून इतरत्र जावे लागे. एफीससमध्ये एखाद्या मनुष्याला श्रेष्ठ पदवीस जाऊ देण्यापेक्षा, तो श्रेष्ठता संपादन करण्याजोग्या वयात येण्यापूर्वीच प्रत्येक मनुष्याला फाशी देऊन सर्व संस्थानाचा कारभार अप्रौढ व अननुभवी बालकांकडे सोपविणेदेखील एफीशियन लोक पसंत करतील असा त्याचा अभिप्राय होता. एफीससमध्ये दिवसेंदिवस प्रबळ होणाऱ्या लोकपक्षाच्या तो पहिल्यापासन विरुद्ध होता.

हिरॅक्लीटसच्या मनाचा आपल्या देशबांधवांविषयीचा हा कडवटपणाच इतरत्रही आढळून येतो. त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या तत्त्ववेत्त्यांविषयी अगर कवींविषयी तो कधीही विशेष आदरभाव किंवा प्रेम दाखवीत नसे. याला अपवाद म्हणजे इलीयड काव्याचा कर्ता एक होमरच होता. बाकीच्यांबद्दल येथून तेथून अनादरच. एका ठिकाणी तो हिसिऑड, झेनोफेनस, पायथागोरस इत्यादिकांची उदाहरणे देऊन लिहितो, की पुष्कळ विद्वत्ता असली म्हणून काही मनुष्य विचारी होत नाही. पायथागोरसने पुष्कळ धडपड केली; पण त्याचे पर्यवसान म्हणजे भाराभर विद्या व दोषयुक्त कला यांच्या प्रसारातच झाले.

हिरॅक्लीटसच्या चरित्राची निश्चित माहिती म्हणजे एवढीच; परंतु त्याच्या विचारांविषयची आपली माहिती, त्याचे त्रोटक लेख (Fragments) अद्याप पाहावयास मिळत असल्यामुळे, बरीच साधार व सांग आहे. आपल्या भोवतालच्या लोकांशी हिरॅक्लीटसचे कधीच न पटल्यामुळे त्याच्या विचारात जी एक निराशेची व दुःखाची छटा दृष्टोत्पत्तीस येई, त्यावरून त्याला 'रडका तत्त्वज्ञ' असे टोपण नाव देण्यात येते. या उदासपणापेक्षा त्याच्या लेखावशेषांचा विशेष गुण म्हटला म्हणजे त्यांचा संदिग्धपणा होय व या विशेषावरूनच त्याला गूढ (अव्यक्त) किंवा कृष्ण (तिमिर) अशीही उपपदे लावण्यात येत. त्याच्या शब्दरूपी

Fragments

16. Much leaming does not teach one to have understanding; else it would have taught Hesiod and Pythagoras and again Xenophanes and Heka, tatios. 17. Pythagoras son of Meusarchos prosecuted investigations more than any other man and (selecting these treatises) he made a wisdom to his own-much learning and bad art. (The quotations are from Firbanks).

सागरातील सुविचारमौक्तिके वेचून आणावयाची म्हटली तर डेल्फासच्या समुद्रातील पाणबुड्याच पाहिजे असे सॉक्रेटिस म्हणत असे. आपली लेखनपद्धती गूढ व रहस्यमय आहे, हे त्याचे त्याला कळत असे; पण सायबेल किंवा डेल्फीचा देव यांच्या आचरणावरून तो आपले समर्थन करी. आपल्या ११ व्या लेखावशेषांत तो म्हणतो, की डेल्फीचा देव हा बोलूनही दाखवीत नाही व लपवूनही ठेवीत नाही; तर केवळ चिन्हानेच दर्शवितो.[१] आणि त्याच्याच पुढच्या म्हणजे १२ व्या या अवशेषात तो म्हणतो, की अंगात देवाचा संचार झाल्यामुळे सायबेलही आपल्या गंभीर, अनलंकृत व नीरस शब्दांनीच हजारो वर्षांचे भाकीत सांगते.[२] हिरॅक्लीटसच्या मताचे नानाविध वस्तूंचे ज्ञान हे सत्यज्ञान नव्हे. सत्यज्ञान म्हणजे केवळ 'एक शब्द' आहे. हिरॅक्लीटस कसा गूढवादी आहे हे या एका उदाहरणावरूनदेखील दिसून येईल. हा 'एक शब्द' म्हणजे कोणता? या प्रश्नाचे आपण काही तऱ्हेने उत्तर देऊ शकू; परंतु ते उत्तर हुडकून काढल्यावर हिरॅक्लीटसचा मतलब असाच व एवढाच असा आपणास आग्रह धरता यावयाचा नाही. यावरूनच बर्नेटने हिरॅक्लीटसविषयी लिहिताना म्हटले आहे, की तो कोणत्याही साच्यात न मावण्याइतका मोठा आहे.[३]

हिरॅक्लीटसच्या एकंदर विचारसरणीवरून आपण अनुमान बांधले, तर हा 'एक शब्द' म्हणजे सृष्टीची अनियतता किंवा त्या अनियततेच्या मुळाशी असलेले अग्निद्रव्य असावा असे वाटते. हिरॅक्लीटसच्या मते या जगात शाश्वत असे काहीच नाही. त्यामध्ये नेहमी भरती ओहोटी (Flux and reflux) हे चालू आहे. मागे पहिल्या प्रकरणात ॲनॅक्झिमीनसच्या मताचे विवरण करताना या जगतातील विविधता घनीभवन व विरलभवन (Condensation and rarefaction) याने होत, असे त्याचे मत होते म्हणून सांगितले. त्या मतात व हिरॅक्लीटसच्या मतात फरक आहे. घनीभवनामध्ये पदार्थाची मर्यादा कायम ठेवून त्याचे घटकावयव मात्र अधिक करावयाचे असतात; परंतु भरतीमध्ये त्या पदार्थाचे दिक्परिमाण व घटकावयव परिमाणही बरोबरच वाढतात. या जगतामध्ये निश्चल एकरूप असे काही नाही. मनुष्याला एकाच नदीत दोनदा पाऊल घालता येणार नाही. कारण त्याचे दुसरे पाऊल पडण्यापर्वीच कितीतरी जुने पाणी वाहून जाऊन नवे आलेले असते व हाच क्रम अव्याहतपणे

---

1. The Lord (whose is the oracle) at Delphi neither speaks nor conceals but gives a sign.

2. And the sibyl with raving mouth, uttering words solemn, unadorned and unsweetened, reaches with her voice a thousand years because of the God in her.

3. He is much too big for our formulas.

(Burnett Greek Philosophy).

1Frag.41-42.

चाललेला असतो. आपले शरीरदेखील कोठे सारखे आहे? बालावस्थेमध्ये अतिशय अल्पाकार असलेला देह प्रथम वाढतो व तारुण्याचा बहर संपला म्हणजे पुनः सुकून जात जात अखेर नामशेष होतो. ही भरती-ओहोटी प्रतिक्षणी अव्याहतपणे चाललेली असल्यामुळे, क्षणापूर्वीचे आपले शरीरच आता आहे असे कसे म्हणता येईल? हिरॅक्लीटसच्या मते आत्मा हादेखील याला अपवादभूत नाही. त्याचे स्वरूपदेखील तरंगमयच आहे. मग क्षणापूर्वीचाच आत्मा आता कोठे राहिला? आपल्या इकडील नलोपाख्यानात अशी एक गोष्ट आहे, की दमयंतीच्या द्वितीय स्वयंवराची वार्ता मिळाल्यामुळे एका रात्रीत अयोध्येहून वैदर्भनगरीला जाण्यासाठी बाहूक वेशधारी नलाने निवडलेल्या घोड्यांच्या रथात बसून ऋतुपर्ण राजा जात होता. जाता जाता त्याचे उत्तरीय रथाखाली पडले; परंतु बाहुकाला रथ थांबविण्यास सांगतो तो ते कित्येक शेकडो योजने मागे राहिल्याचे त्याने सांगितले. सृष्टीचे गमन इतक्याच वेगाने होत आहे. प्रतिक्षणी तिचा मार्ग भिन्न आहे. वरील उदाहरणात रथ तरी एकरूप म्हणून धरला; पण वास्तविक पाहता तोदेखील कायम कुठे होता? जगात एकरूप काही नाही हे हिरॅक्लीटसचे तत्त्व त्याचे काळी लोकांस मोठे चमत्कारिकच वाटले. आपण प्रत्यक्ष त्या त्या वस्तू एकरूप असलेल्या पाहत असूनही त्या एकरूप नाहीत, असे म्हणणारा हा तत्त्ववेत्ता नसून कोणी वेडापीर आहे, अशीच त्यांची समजूत झाली. हिरॅक्लीटसची या मताबद्दल थट्टा करण्यासाठी त्याचा एक समकालीन एपिकारमॉस (Epicharmos) याने हाच युक्तिवाद सावकाराचे कर्ज न देण्यासाठी एक कर्जदार पुढे आणतो, असे दाखविले आहे. ज्याने कर्ज घेतले तो आता कोठे आहे व ज्याचे कर्ज घेतले तो तरी कायम नाहीच. सावकार क्षणिक, कर्जदार क्षणिक, कर्जही क्षणिक, मग कर्ज घेतले कोणी व ते द्यावे कोणी?

अशा रीतीने हिरॅक्लीटसचे मत प्रथमदर्शनी मोठे चमत्कारिक वाटते खरे; पण आधुनिक शास्त्रांचा त्याला पूर्ण पाठिंबा आहे, हे पाहून आपणास मोठे आश्चर्य वाटते. आपल्या बुद्धीच्या अलौकिकतेने जी गोष्ट हिरॅक्लीटसला इतक्या प्राचीन काळी अवगत झाली, तीच गोष्ट आज भौतिकशास्त्रानेही सिद्ध होत आहे. आपल्या स्थूल दृष्टीला एकरूप व निश्चय दिसणारा एखादा धोंडादेखील वास्तविक तसा नाही. प्रथमतः पृथ्वीवरील सर्व पदार्थांबरोबर तो पृथ्वीच्या दैनिक व सांवत्सरिक गतीमुळे अंतराळात सारखा फिरत आहे व याशिवाय त्याच्या घटकावयवांमध्ये केवढी हालचाल चाललेली असते याची आपणास कोठे कल्पना असते? आपल्या दृष्टीला एकरूप दिसणाऱ्या त्या पाषाणाचे घटक सारखे हलत असतात व तो पाषाण म्हणजे अनेक प्रकारच्या शक्तीचे तुमुल युद्ध सुरू असलेले रणक्षेत्रच असते. आपले शरीर आपणास स्थिर वाटते; पण ते तसे नाही. एका शास्त्रज्ञाने गणित करून असे ठरविले आहे, की सात वर्षांच्या अवधीत आपल्या शरीरातील प्रत्येक परमाणू बदलून त्याच्या जागी दुसरा परमाणू आलेला असतो. सारांश हिरॅक्लीटसचे मत सकृतदर्शनी कितीही चमत्कारिक वाटले, तरी ते आधुनिक शास्त्रांना मान्य झाले आहे व तत्त्वज्ञानविषयक चर्चेचे प्रसंगी त्याचा केव्हा ना केव्हा उल्लेख होणे अगदी अपरिहार्य होऊन बसले आहे.

जगामध्ये स्थिर व एकरूप असे जर काहीच नाही, तर आपणास त्या त्या वस्तू एकरूप कशा दिसतात? काल जो देवदत्त मला भेटला तो मला आज भेटल्यावर मी त्याला कसा ओळखतो? वास्तविक कालचा देवदत्त आज नाही व कालचा मीही आज नाही. मग ही ओळख पटते कशी? एका दिवसात फारसा फरक पडत नसेल म्हणून हे संभवनीय आहे, असे कोणी म्हणेल; परंतु कित्येक वर्षांनंतरही आपला बालमित्र देवदत्त आपणास पुन्हा भेटला तरी आपण त्याला 'सोऽयं देवदत्त:' तोच हा आमचा देवदत्त, असे ओळखीत नाही काय? मग ही ओळख स्वरूपैक्यामुळे पडत नाही म्हणावयाची तर तिला साधक असे दुसरे काय आहे?

या प्रश्नाचे हिरॅक्लिटस्ने असे उत्तर दिले आहे, की वास्तविक पाहता पदार्थ एकरूप नसताही ते एकरूपच आहेत, असा आपणास भास होतो आणि या ऐक्याभासाच्या मुळाशी नियमनैक्यता आहे. उदाहरण एखाद्या दिव्याची ज्योत आपणास एकसारखी आहे असे वाटते; परंतु खरे पाहिले तर त्या ज्योतीचे स्वरूप प्रतिक्षणी निरनिराळे आहे. प्रतिक्षणी तेलाचा व वातीचा नवा नवा अंश अग्नीशी संलग्न होऊन पूर्वीप्रमाणेच पेट घेत असतो; परंतु ही त्याची पेटण्याची क्रिया हुबेहूब पूर्वीप्रमाणेच होत असल्यामुळे, आपणास तीच क्रिया सारखी चालू आहे, असे वाटते. जितका द्रव्यांश तैलवर्तिरूपाने ती ज्वाला ग्रहण करते तितकाच कज्जलरूपाने बाहेर टाकते व यामुळे जणू काय एक परिवर्त पुरा होऊन आपणास ती क्रिया एकात्मक असल्याचा भास होतो. वास्तविक एकत्व पदार्थाचे नसून त्याच्या स्वरूप नियमनाचे आहे. हिरॅक्लीटसची ही कल्पनाही आधुनिक शास्त्रज्ञांना मान्य झालेली आहे.* हिरॅक्लीटसच्या बुद्धीची अलौकिकता आपणास या मतांवरूनच स्पष्टपणे दिसते. त्याच्या समकालीन लोकांना मात्र त्याची काही कल्पना झाली नाही व अज्ञजनांनाही आपली मते समजतील अशा सोप्या भाषेत ती प्रतिपादन करण्याचा हिरॅक्लीटसने कधी प्रयत्नही केला नाही.

हिरॅक्लीटसने दीपज्योतीचे उदाहरण घेतले आहे, ते केवळ दूरच्या सादृश्यावरूनच नव्हे, तर ते अगदी तंतोतंत सृष्टिव्यापाराला लागू आहे असे त्याचे मत होते म्हणून. त्याच्या मते सृष्टीच्या सर्व उलाढालींच्या मुळाशी अग्नी आहे. ज्याप्रमाणे अलंकार व सुवर्ण यांचे नेहमी एकमेकांत रूपांतर होत असते, त्याप्रमाणेच अग्नी व सृष्टपदार्थ यांचे एकमेकात रूपांतर होत आहे (Frag. 22) व म्हणून हिरॅक्लीटसचा 'एक शब्द' म्हणून जो वर सांगितला तो अग्नी हा शब्दही असणे संभवनीय आहे. हिरॅक्लीटसचे म्हणणे लक्षणात्मक किंवा आलंकारिक नसून ज्याप्रमाणे थेल्सला आपणास डोळ्यांनी दिसणारे पाणीच विविध सृष्टीच्या मुळाशी आहे, असे वाटत होते, त्याप्रमाणेच हिरॅक्लीटसला सृष्टीच्या मुळाशी अग्नी आहे असे वाटत असे. मनुष्याच्या आयुष्यातील जागृती, स्वप्न व मृत्यू या तीन अवस्था घेतल्या तर त्या अग्नी,

---

*हे सारे बौद्धांप्रमाणे वाटते.

जल व पृथ्वी यांजप्रमाणे आहेत. मनुष्य जागा असेल तोपर्यंत तो खराखुरा जिवंत आहे, म्हणून म्हणता येईल. कारण झोप ही जिवंतपणा व मृत्यू यांच्या दरम्यानची स्थिती आहे. मनुष्याच्या शरीरामध्ये जलतत्त्व अधिक झाले म्हणजे तो मृत्यू पावतो. याला अल्पप्रमाण पाहावयाचे असल्यास एखाद्या दारूबाजाची स्थिती घ्या. पुष्कळशी द्रवरूप दारू पोटात गेल्यामुळे तो झिंगून पडतो व ही अवस्था साधारणतः निद्रेसारखी आहे व निद्रा म्हणजे जीवन व मृत्यू यांच्या दरम्यानची अवस्था आहे. थोड्याशा द्रवरूप पदार्थाने जर मनुष्याची अवस्था मृत्यूच्या बाजूला कलते, तर तोच द्रवपदार्थ प्रमाणाधिक झाला म्हणजे त्याचा मृत्यूच येणार. मनुष्याच्या जीवनक्रमात ज्याप्रमाणे आपणास जागृती व स्वप्न ही एकामागून एक येताना आढळतात, त्याचप्रमाणे व्यापक सृष्टीतही दिवस व रात्र, उष्णकाळ व शीतकाल यांचे सारखे परिवर्तन सुरू आहे.

हिरॅक्लीटसच्या या एकंदर विचारसरणीवरून अग्नी हे एकच द्रव्य सृष्टीच्या मुळाशी कसे, हा प्रश्न सुटत नाही. या विवेचनात तर आपणास सृष्टीचमत्कारांची उपपत्ती लावण्यासाठी अग्नी, जल व पृथ्वी ही तीनही यथानुक्रमे जात येत आहेत, असे दिसते. हिरॅक्लीटसची आणखी अशीही कल्पना आहे की, अग्नीपासून पाण्याचे बाष्प होते व बाष्पापासून अग्नी होतो व हा त्यांचा अन्योन्योपकार सारखा चालू आहे. मग अग्नी हाच सर्वांच्या मुळाशी आहे हे म्हणण्याचा अर्थ काय असावा? हिरॅक्लीटसचे मत असे असावे, की सृष्ट स्थितीचा विचार करताना आपणास अग्नीसच महत्त्व दिले पाहिजे. कारण ज्याप्रमाणे मनुष्याची जागृती हीच अवस्था सर्वांत अधिक महत्त्वाची असून अग्निस्वरूप आहे, त्याप्रमाणे सृष्टीचे अस्तित्व हेच महत्त्वाचे आहे व ते अग्निप्रधान आहे. सृष्टीच्या अभावाची वेळ कल्पावयाचीच असल्यास ती कदाचित जलमय असेलही; पण अशी अवस्था संभवतच नाही. कारण सृष्टीची घडामोड प्रतिक्षणीच चाललेली असल्यामुळे असा एक काळच शक्य कोटीत मानात येत नाही, की त्या काळी सृष्टीची मोडच अस्तित्वात असेल व ज्याअर्थी अधिक जीवमानाचे पदार्थ कमी जीवमानाचे कारण धरणे अधिक सयुक्तिक आहे व अग्नी हा पाणी अगर पृथ्वी यापेक्षा अधिक चैतन्यमय असतो. त्याअर्थी, तोच मूलभूत असावा. जीवात्मा हाही अग्निस्वरूपच आहे व या जगताची सुरळीत व्यवस्था लावणारी अज्ञेय शक्ती ही जीवनमय व म्हणून ती अग्निस्वरूपच असली पाहिजे. सृष्टिस्थितीत मात्र या तीन पदार्थांचे परिवर्तन सारखे चालू आहे. अग्नीचे पाणी व पाण्याची पृथ्वी होणे हे जर नीचप्रवर्तन म्हटले तर त्याच्या उलट उच्चप्रवर्तन होय व हे उच्चनीच प्रवर्तन नेहमी सारखे व एकरूपानेच चालू असते, नव्हे एकरूपच असते (Frag. 69). प्रत्येक पदार्थाचे जणू काय दोन समसमान अंश असतात व एक अंश उच्च प्रवर्तनाकडे तर दुसरा नीच प्रवर्तनाकडे जात असतो व ही क्रिया प्रतिक्षणी सारखी चालत असल्यामुळे आपणास तो पदार्थ स्थिर आहे, असा भास होतो. दीपज्योती स्थिर दिसण्याचे कारण हेच, की प्रतिक्षणी जितक्या तेलवातीचा जाळ होतो तितकाच जाळ

धूर किंवा काजळाच्या रूपात जाऊन विझला जातो. म्हणजे दीपज्योतीचा प्रतिक्षणीचा अर्धा भाग म्हणजे धूम्ररूपाने जलस्वरूपप्रवण होणारा अग्नी व अर्धा भाग म्हणजे द्रवस्वरूपातून अग्निरूप झालेला अग्नी व ही बेरीज-वजाबाकी नेहमी सारखी असल्यामुळे दीपज्योती एकरूप भासते. सृष्टी म्हणजे एक चिरकालीन अग्नीच आहे (Frag 20) व त्याच्या अंशाचेही असेच उच्च-नीच प्रवर्तन चालू आहे. हिरॅक्लीटसच्या एकंदर लिहिण्याच्या पद्धतीवरून आपल्या शास्त्रातील त्रिवृत्करण किंवा पंचीकरण याप्रमाणेच त्याची सृष्टीची उपपत्ती असावी व आपल्या तत्त्वज्ञानामध्ये जसे तेज हे जल व पृथ्वी यांचे मूल कारण असूनही त्यांच्याशी त्रिवृत्करणाने मिश्र झाले आहे म्हणून वर्णन केले आहे, त्याप्रमाणेच हिरॅक्लीटसच्या अग्नीचा व जलपृथ्वीचा संयोग झाला आहे. त्रिवृत्करण पद्धतीत ज्याप्रमाणे वायू व आकाश या महाभूतांचा विचार करीत नाहीत त्याप्रमाणेच हिरॅक्लीटसही त्यांजविषयी विशेष विचार करीत नाही. छांदोग्योपनिषदामध्ये ९ व्या अध्यायात* यासंबंधाचे विवेचन आले आहे. जे जे रूप रोहित म्हणजे रक्तवर्ण असेल ते ते तेजाचे जे शुल्क किंवा पांढरे ते ते जलाचे व जे कृष्णवर्ण ते पृथ्वीचे, अशी अवस्था सांगून अग्नी, सूर्य, चंद्रमा, विद्युत इत्यादिकांमध्ये हीच रूपे दिसतात व म्हणून त्यांना स्वतंत्र अस्तित्व नसून तीन रूपे हेच काय ते सत्य असे प्रतिपादन केले आहे. हिरॅक्लीटसचे लिहिण्यात स्पष्टपणा नाही व त्याचे लेख त्रुटित असल्यामुळे त्यांची योग्य संगती लावणेही फार कठीण आहे; परंतु त्याचे मनात त्रिवृत्करणासारखीच काही कल्पना असावी असे वाटते. उदाहरणार्थ एकविसाव्या अवशेषात तो म्हणतो की, अग्नीचा पहिला विकार म्हणजे समुद्र होय. कारण या समुद्रामध्ये अर्धा भाग जमिनीचा व अर्धा भाग विद्युतरूप अग्नीचाच आहे; परंतु हिरॅक्लीटसने तेजस्तत्वालाच विशेष महत्त्व दिल्याने त्याची अग्निकारणवादी म्हणून ख्याती झाली. पृथ्वी व आप यांनाही मूळ कारण अग्नीच असल्यामुळे, पुढे त्रिवृत्करण साधण्यासही अग्नीच मूळ आहे व तीन द्रव्यांचे बेमालूम एकीकरण करण्यासही अग्नीचाच उपयोग झाला असला पाहिजे. तीन प्रकारचे धातू जर एक करावयाचे असतील, तर त्याला साधन अग्नीशिवाय काय आहे? या दृष्टीनेच अग्नी किंवा तेज याला अपरिमित महत्त्व असल्यामुळे त्याच तत्त्वाचा उपन्यास हिरॅक्लीटसने वारंवार केला आहे.

अग्नीचे सर्वांत शुद्धरूप म्हणजे सूर्य होय व हा अग्नी प्रतिदिवशी सकाळी पेटविला जातो व संध्याकाळी विझविला जातो; परंतु तो प्रतिदिवशी नवीनच असतो (Frag. 32). जर सूर्य नसता तर कायमचीच रात्र झाली असती (Frag 31). हिरॅक्लीटसला सूर्याच्या स्थिरत्वाचीही कल्पना नव्हती व पृथ्वीच्या वर्तुळाकृतीबद्दलही नव्हती. खगोलस्थ ज्योतीविषयी त्याची

---

* छांदोग्यात नववा अध्यायच नाही. हा अध्याय ६ श्लोक ६ वा आहे. 'यदु रोहितमिवाभूदिति तेजसस्तद्रूपमिति तद्विदाञ्चक्रुर्यदु शुक्लमिवाभूदित्यपाँ ९ रूपमिति तद्विदाञ्चक्रुर्थदु कृष्णमिवाभूदित्यन्नस्य रूपमिति तद्विदाञ्चक्रुः ॥६॥"

अशी समजूत होती, की पृथ्वीवरील उष्णबाष्प जाऊन जाऊन व ते परातीसारख्या अगर कढईसारख्या काही पात्रात साचून त्याचा तो अग्नी झाला आहे व ती पात्रे लहान-मोठी असल्यामुळे त्यांचा आकार निरनिराळा आहे. चंद्राचा आकार कमी-जास्त होण्याचे कारण त्यातील अग्नी, पात्र कलंडल्यामुळे कमी होतो हे असावे (Burnet: Greek Philosophy Part I).

हिरॅक्लीटसच्या पूर्वी ॲनॅक्झीमँडर याने निरनिराळी तत्त्वे एकमेकांच्या प्रदेशावर चालन जात आहेत व त्यांचा सारखा झगडा चालू आहे, असे सांगितले होते. हिरॅक्लीटस म्हणतो की, सर्व सृष्टपदार्थांची उत्पत्ती याच झगड्यामुळे झाली आहे. पृथ्वीला मारून अग्नी जन्माला येतो, अग्नी मेला म्हणजे वायू उत्पन्न होतो, वायूचा नाश तेच पाण्याचे उत्पत्तिस्थान आणि त्याचा नाश म्हणजेच पृथ्वीचा जन्म. सारांश अग्नीपासून पुनः अग्नीपर्यंत हे विकारचक्र सारखे चालले आहे (Frag. 25). होमर कवी अशी प्रार्थना करतो, की मनुष्य व देव यांजमधील परस्परांचा झगडा दूर व्हावा; पण हे मागणे चुकीचे आहे. कारण ते मान्य झाले तर सर्व सृष्टीच कोणीकडच्या कोणीकडे निघून जाईल (Frag. 43). झगडा हाच सर्व वस्तूंचे मूळ व सत्ताधारक आहे आणि त्यानेच काहींना देव तर काहींना मनुष्ये, काहींना स्वतंत्र तर काहींना गुलाम केले आहे (Frag. 44). परस्परविरोधी गोष्टींचा संयोगच सुखकर असतो. स्वरांच्या ओढाताणीनेच मोहक संगीत उत्पन्न होते (Frag. 46) व विरोधी संवेदनांनीच अनुकूल संवेदना सुखकर होतात. रोगाशिवाय आरोग्याची, क्षुधेशिवाय अन्नतृप्तीची व परिश्रमाशिवाय विसाव्याची गोडी नाही (Frag. 104). 'निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्यहि विशेषतः' हे कालिदासाचे वाक्य सर्वस्वी अनुभवसिद्धच आहे.

या जगतात स्थिर किंवा निश्चल असे काहीच नाही व ते तसे नाही हेच सर्वस्वी हितकारक आहे; परंतु वस्तू स्थिर व एकरूप नसताना त्या तशा भासतात याचे कारण त्यांच्या घटनेच्या मुळाशी आलेल्या नियमाची एकरूपता व शाश्वतता ही होय. हा नियम मात्र कोणालाही उल्लंघिता येत नाही. आपल्या वेदांतील वरुणाचे ऋत ज्याप्रमाणे अनुल्लंघनीय आहे, त्याचप्रमाणे हा हिरॅक्लीटसने वर्णन केलेला नियमही त्रिकालाबाधित आहे. हा कायदा देवांनीही केला नाही व तो मनुष्यांच्याही स्वाधीन नाही. तो पूर्वी होता, आज आहे व नेहमीच राहील (Frag. 20). प्रत्यक्ष सूर्यालाही आपली मर्यादा सोडून जाता येत नाही. कारण तो तसे करील तर न्यायाचे साथीदार इरिन्नीस त्याला हुडकून काढतीलच (Frag. 29). वरुणाचे हेर पृथ्वीवरील व इतर ठिकाणच्याही वस्तुजातांचे असेच अवलोकन करीत असतात.

जीवात्म्याच्या स्वरूपाविषयी हिरॅक्लीटसच्या लिहिण्यामध्ये थोडीशी असंगती दिसून येते. जागती, स्वप्न व मरण या तीन अवस्थांची अग्नी. जल व पथ्वी यांच्याशी केलेली तलना पाहिली तर जीवात्मा हा अग्निमय असावा, असे वाटते व याच विचाराला पोषक अशी दुसरी वाक्ये सापडतात. उदाहरणार्थ अवशेष ६८ यामध्ये आत्म्याचा मृत्यू म्हणजे

पाणी असे म्हटले आहे; परंतु त्याच अवशेषाच्या शेवटी जीवात्मा हा पाण्यापासून होतो, असे म्हटले आहे. जीव जर पाण्यापासून झाला तर पाणी त्याचे मरण कसे? जीव जलमय आहे हीच उपपत्ती धरली तर त्याला पोषक वाक्य म्हणजे अवशेष ७२. त्यात हिरॅक्लीटस लिहितो, की जीवाला आर्द्रता फार आवडते; पण पुनः ७४ व्यात तो म्हणतो, की सर्वांत उत्तम आत्मा म्हणजे कोरडा किंवा शुष्क आत्मा होय. हिरॅक्लीटसला अस्पष्टता व गूढपणा याबद्दल जी टोपण नावे मिळाली आहेत ती अगदी सार्थ आहेत. एवढे मात्र खरे, की आत्म्याच्या अपरिमितत्त्वाबद्दल त्याला मुळीच संशय नव्हता. कारण त्याच्या मते तुम्ही कोणत्याही मार्गाने गेलात तरी आत्म्याच्या अंतिम मर्यादा सापडणे अशक्य होते (Frag. 71). आत्मस्वरूपाच्या चर्चेमध्ये आरंभी आरंभी असा संदिग्धपणा असणे काहीसे अपरिहार्यच आहे. ॲनॅक्झिमीनसने तो वायुरूप ठरविला; पण त्या स्वरूपात तरी ओळखला, हे जसे त्याला भूषणावह झाले, त्याप्रमाणेच हिरॅक्लीटसने त्याचे अनंतत्व ओळखले एवढीच गोष्ट पुरे आहे. याशिवाय आत्मस्वरूपाविषयी हिरॅक्लीटसच्या दुसरा सिद्धांत म्हणजे मरणोत्तर आस्तिक्याविषयीचा होय. हिरॅक्लीटसच्या मते मरणोत्तर आत्मा नाहीसा होत नाही. मनुष्याने ज्याची कधीही अपेक्षा केली नाही असे काही अकल्पित त्याच्यापुढे उभे राहते (Frag. 122) आणि मग देवाला त्याला उठवावे लागते व मग तो जीवमान व मृत यांचा संरक्षक होतो (Frag. 123).

परमेश्वराच्या स्वरूपाविषयींची हिरॅक्लीटसची कल्पना फार उदात्त आहे. जगताचे नियमन करणारी शक्ती अग्नीप्रमाणे प्रकाशमय असावी हे खरे; परंतु त्याबरोबर ती शक्ती अत्यंत व्यापक व अपरिज्ञेय असल्यामुळे त्या शक्तीचे आपणास होणारे ज्ञान औपाधिकच असले पाहिजे. परमेश्वर म्हणजे दिवस व रात्र, शीतकाल व उष्णकाळ, संधी व विग्रह, तृप्ती व क्षुधा या दोन्हींमध्ये सारखीच आहे. तो निरनिराळी रूपे धारण करतो व त्या त्या रूपावरून त्याला लोक नावे ठेवतात. वास्तविक अग्नी एकच; परंतु तो निरनिराळ्या सुगंधी द्रव्यांशी संलग्न झाला म्हणजे लोक आपणास रुचेल ते नाव त्याला देतात (Frag. 36). परमेश्वराला सर्वच गोष्टी शुभ व सुंदर आहेत. मनुष्ये मात्र एकाला शुभ व एकाला अशुभ मानतात (Frag. 61). परमेश्वरापुढे मनुष्य म्हणजे एखादे अर्भक आहे (Frag. 97) जे कधीच अस्तंगत होत नाही. त्याच्या दृष्टीच्या टप्प्यामधून कोण कसा निसटेल? (Frag. 27).

हिरॅक्लीटस* च्या लेखावशेषांपैकी काही अवशेष नीतिपर आहेत. मनुष्याच्या मनाचा उच्छृखलपणा हा एखाद्या वणव्यापेक्षा अधिक अनर्थकारक असल्यामुळे तो आधी नाहीसा केला पाहिजे (Frag. 103). कारण मनोविकार जिंकणे हे मोठे कठीण काम आहे.

---

*हिरॅक्लीटसच्या लेखामध्ये अनेक फ्रॅगमेंटस् या तत्त्वचिंतनपर व नीतिशास्त्रपर आढळतात हे विशेष आहे. जीव आत्मा यावर तो चिंतन मांडतो, हे विशेष आहे. कारण त्याने अस्थिरतेला सत्य मानले आहे.

आत्म्याचा नाश झाला तरी तो पत्करून ते आपले हेतू पूर्ण करू पाहतात (Frag. 105). आपला मूर्खपणा झाकून ठेवणे फार चांगले; पण शिथिलतेच्या अगर गुंगीच्या प्रसंगी ते फार कठीण जाते (Frag. 108) म्हणून मनुष्याने आपले मन शिथिल होऊ देऊ नये व व्यसनात पडू नये. कारण आपले अज्ञान चव्हाट्यावर आणण्यापेक्षा ते छपविलेलेच बरे (Frag. 109). आपल्याकडील भर्तृहरीने म्हटलेच आहे की, 'विशेषतः सर्वविदां समाजे, विभूषणं मौनमपंडितानां.'

शील ही मनुष्याची संरक्षक देवता आहे (Frag. 121). मानाई पुरुष नेहमी सावधान असतात. आता इतके असूनही कित्येक लबाडी करतात; पण अखेर ते व त्यांचे साथीदार पकडले गेल्यावाचून राहत नाहीत (Frag. 118).

हिरॅक्लीटसच्या वेळेस, पहिल्या प्रकरणात सांगितलेल्या ऑर्फिक धर्माचे बरेच बंड माजलेले असावे. या धर्मात मूळचा पुष्कळसा चांगला भाग असला तरी त्यावर दांभिक व अवास्तव आचारांचे आवरण पडल्यामुळे तो लुप्त झाला होता. या प्रकारांना उद्देशून हिरॅक्लीटस लिहितो की, वास्तविक पाहता धर्मकृत्ये म्हणजे आत्मशुद्धीची साधने होत (Frag. 129); परंतु लोकांमध्ये धर्मकृत्याच्या नावावर विकल्या जाणाऱ्या गूढ क्रिया अत्यंत अपवित्रपणे आचरिल्या जातात (Frag. 125) आणि त्या आचरणांना देवाचे नाव नसते तर ती कृत्ये अत्यंत लाजिरवाणी झाली असती. देव काय किंवा नरक काय, उन्मत्त मनुष्यांना सारखीच (Frag. 127). पावित्र्य संपादन करावे म्हणून ते आपणास रक्ताने विटाळवून घेतात. जणू काय चिखलाने चिखल धुतला जाईल, अशी त्यांची अपेक्षा असते. असे आचरण जर कोणी व्यवहारात केले तर आपण त्यास मूर्ख म्हणू. हे लोक देव किंवा विभूती याच्या स्वरूपाचे खरे ज्ञान नसताना उगाच मूर्तीची पूजा करतात; पण हे मनुष्याऐवजी त्याच्या घराशी बोलण्याइतकेच वेडेपणाचे आहे (Frag. 130).

यश संपादण्याचा जवळचा मार्ग म्हणजे चांगुलपणा (Frag. 137) व ज्याची निष्कारण ख्याती झाली असेल त्याने आपले तोंड लपविलेलेच चांगले (Frag. 133). प्रगतीची भ्रामक समजूत ही प्रगतीला प्रतिबंधक आहे (Frag. 134). शिक्षण म्हणजे मनुष्याचा अपरसूर्य आहे (Frag. 135).

तत्त्वज्ञानातील दुसऱ्या एका महत्त्वाच्या मुद्याची प्रथमचिन्हे हिरॅक्लीटसच्या मतात प्रथम आढळतात. केवळ अज्ञ जनांच्या दृष्टीने पाहिले म्हणजे इंद्रियद्वारा आपणास ज्या वस्तू जशा दिसतात तशाच त्या खरोखर असतात; परंतु तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्या तशाच असतात असे नाही. यावरून सत्यज्ञान व आभासज्ञान यांचा भेद दाखविला पाहिजे. सर्व वस्तू एकरूप आहेत हे तत्त्व सत्य आहे म्हणून अंगीकारले जावे (Frag. 1). या सत्याच्या अनुरोधानेच सर्व चालले आहे; परंतु मनुष्यांना ते कळत नाही व कोणी सांगितलेले खपत नाही. जे लोक समजल्याशिवाय ऐकतात ते बहिरेच म्हणावयाचे, ते हजर असून गैरहजर (Frag.

3). सत्यज्ञान हे अनायासाने प्राप्त होणारे नाही. सोने शोधावयाचे म्हणजे पुष्कळ माती खणावी लागते, तेव्हा कोठे थोडेसे सोने हाती लागते (Frag. 8). कान व डोळे वास्तविक पाहता सत्यज्ञानाची साधने नाहीत (Frag. 4); पण त्यातल्या त्यात कानांपेक्षा डोळे अधिक सत्यवादी आहेत (Frag. 15). आपली 'चक्षुर्वैसत्यं' म्हण प्रसिद्धच आहे.

जर सर्व जगत् धूम्रमय असते, तर मात्र घ्राणेंद्रियच ज्ञान साधन झाले असते (Frag.37).

मूर्ख लोकांना सत्यज्ञानाची किंमत कळत नाही+ यात काही आश्चर्य नाही. गाढवाला सोन्याच्या राशीपेक्षा उकिरडाच अधिक आवडतो (Frag. 51). डुकराला चिखलच चांगला (Frag. 53). मनुष्य अनोळखी असला म्हणजे झाले, कुत्रा त्याजवर भुंकलाच (Frag. 115); पण माझ्या मताने जर एक मनुष्य खरा उत्तम असेल, तर तो हजारांच्या तोडीचा आहे (Frag. 113). मनुष्याच्या गैरविश्वासामुळेच दिव्य गोष्टींचे ज्ञान होत नाही (Frag. 116).

वरील सर्व उताऱ्यांमध्ये सत्यज्ञानाची आवश्यकता व मनुष्यामनुष्यांच्या ज्ञानातील फरक हा सुचविला गेला आहे हे खरे; पण इंद्रियजन्यज्ञान व विचारजन्यज्ञान हा भेद अद्याप हिरॅक्लीटसला सुचलेला नाही. त्याच्या मते ज्ञान म्हणजे बाहेरील व आतील अग्नीचे संवादित्व; परंतु हे संवादित्व होण्याला मार्ग म्हणजे इंद्रियेच असल्यामुळे एकाचे असत्यज्ञान दुसऱ्याच्या सत्यज्ञानाहून भिन्न कसे, हे दाखविण्यास त्याला मार्ग नाही. मनोव्यापार (thought) व इंद्रियव्यापार (perception) यांचा भेद अद्याप प्रकट झाला नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

हिरॅक्लीटसने केलेली तत्त्वज्ञानाची सेवा मोठी महत्त्वाची आहे, यात काहीच शंका नाही व त्याच्या मतांचा जो जो अधिक विचार करावा तो तो त्याचे महत्त्व अधिकाधिक वाटू लागते; परंतु त्याच्या मतांतील अत्यंत मोठा दोष म्हणजे त्याचा क्षणिकवाद अगर अस्थिरवाद होय. या जगतात शाश्वत असे काहीच नाही, ही कल्पनाच किती चमत्कारिक वाटते. या जगतात आपण तरी स्थिर आहोत काय? जर नसलो तर आपणास ज्ञान तरी कसे होते? इत्यादी विचार एकदम उद्भूत होतात. या जगतात शाश्वत असे काहीच नाही हे पाहून आपली स्थिती एखाद्या फुटलेल्या गलबतावरील खलाशांसारखी होते.

*हिरॅक्लीटसच्या मताने नानाविध वस्तूंचे नियमन करणारा कायदा एकरूप आहे खरा; पण हे नियमन म्हणजे तरी काय आहे? तो एक सृष्ट पदार्थच असेल, तर मग इतर सृष्ट पदार्थांप्रमाणे त्याचे नियमन करणारा दुसरा कोणी पाहिजे. हा कायदा करणारा परमेश्वर असून, तो मात्र शाश्वत आहे, असेही हिरॅक्लीटस स्पष्टपणे म्हणत नाही. बरे हा कायदा एक सृष्ट पदार्थ नाही म्हणावे तर त्याचा व सृष्ट पदार्थांचा संबंध तरी कसा येणार? व त्याने त्या सृष्ट पदार्थांचे नियमन तरी कसे होणार? आत्मा मरणानंतर असतो म्हणून हिरॅक्लीटस

+हे समर्थांच्या दासबोधाप्रमाणे वाटते.

*हे ऋग्वेदातील 'ऋत' संकल्पनेप्रमाणे आहे.

मानतो ते खरे; पण याचा अर्थ इतकाच की, मरणानंतर तो पुन: अग्निस्वरूप होतो व पुन: परिभ्रमणात सापडतो; पण एका मनुष्याचा आत्मा त्या स्थितीत दुसऱ्यापासून निराळा असत नाही. एवढेच नव्हे, तर त्या आत्म्याचे स्वरूपही कायम राहत नाही. हिरॅक्लीटसचे हे मत जवळजवळ क्षणिक विज्ञानवादी किंवा शून्यवादी बौद्धपंथातील मताप्रमाणे आहे; परंतु या मताने मनुष्याच्या मनाचे समाधान होत नाही. त्याला काहीतरी शाश्वत तत्त्वाचा आश्रय पाहिजे व त्या तत्त्वाचा व आपला काहीतरी दृढसंबंध पाहिजे.

हिरॅक्लीटसने क्षणित्वावर जोर देऊन व वैकृतिक* पक्ष स्वीकारून आपली मते पुढे मांडली व त्याची नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणजे स्थिरत्व मताचा व प्राकृतिक पक्षाचा अतिरेक अशी झाली. या मताचे पुरस्कर्ते व त्यांची मते यांजकडे आपणास आता वळावयाचे आहे.

❍❍❍

* वैकृतिक हा शब्द लेखकाचा सांख्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास स्पष्ट करतो. वैकृतिकमध्ये सतत विकार उद्भवून काही निर्माण होण्याचा संकेत आहे.

प्रकरण ४ थे

झेनोफेनस

झेनोफेनस हा मूळचा कोलोफनचा रहिवासी असून, तो पुढे इलिया येथे राहावयास गेला व तेथेच त्याने आपल्या मतांचा प्रसार केला. यावरून झेनोफेनसच्या मतांना व परंपरेला 'इलिया येथील पंथ' (The Eleatic School) असे नाव देण्यात आले आहे. झेनोफेनसचा जन्म कधी झाला याविषयी वादच आहे; परंतु तो साधारणतः खि. पू. ५८० या वर्षी झाला असावा, हे बरेच संभवनीय दिसते. अयोनियातील वसाहतीचे जे व पारसिकांचे जे मोठे युद्ध झाले, त्यावेळी झेनोफेनस फार तरुण होता, असे त्याच्याच लिहिण्यावरून दिसते. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षीच त्याला आपल्या जन्मभूमीचा त्याग करून सिसिलीची वाट सुधारावी लागली व तेथून पुढे इटलीमध्ये जाऊन तो इलिया येथे राहिला. ज्याप्रमाणे पायथागोरसला आपली जन्मभूमी सॅमॉस येथे राहणे बरे वाटले नाही व त्याने देशत्याग करून इक्षिण इटलीचा मार्ग सुधारला, त्याप्रमाणेच झेनोफेनसच्या मार्गातही काही अडचणी उपस्थित झाल्यामुळे त्यालाही देशत्याग करणे भाग पडले असावे.

याशिवाय पायथागोरसपेक्षा झेनोफेनसला देशत्याग करण्यास अधिक कारण म्हणजे त्याचा पेशा. झेनोफेनस हा एक कवी किंवा शाहीर होता व शाहिराच्या धंद्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहण्याची प्रवृत्ती होणे अगदी साहजिक दिसते. झेनोफेनस आपल्या वयाच्या ९२ व्या वर्षीदेखील कविता रचित असे व आपल्या कविता तो स्वतः गाऊन दाखवीत असे, असे म्हणतात. इलिया शहराच्या संस्थापन प्रसंगावर त्याने दीर्घवृत्तात्मक २००० कवितापंक्ती केल्या होत्या असे डायोजीनसचे म्हणणे आहे. अशा रीतीने नानाविध विषयांवर यथाप्रसंग प्रबंधरचना करणारा कवी आपल्या काव्याचा लौकिक वाढविण्यासाठी एका देशातून दुसऱ्या देशात जाणे अगदी साहजिक आहे. पारसिकांच्या स्वाऱ्यांमुळे अयोनियाची जी नासाडी झाली त्यामुळे याच्या काव्यप्रवृत्तीला अधिक उत्तेजन मिळाले असावे.

झेनोफेनस हा मुख्यतः कवी असूनही तत्त्वज्ञानाच्या इतिहासामध्ये त्याचे नाव चिरस्मरणीय होण्यास त्याच्या काव्यातील काही विशिष्ट विषयांना अनुलक्षून प्रकट केलेले विचार हे कारणीभूत झाले. एखाद्या नगराच्या संस्थापनेबद्दलच त्याने कविता रचल्या असत्या, रणांगणावर पडलेल्या वीरांचे यश गायले असते किंवा केवळ हृदय हलवून सोडणारे करुणरसभरित प्रसंग वर्णिले असते तर त्याची ख्याती केवळ कवी या नात्यानेच झाली असती; परंतु त्याच्या काव्यातील विषय म्हणजे परमेश्वराचे स्वरूप, सृष्टीची रचना, सामाजिक चालीरीती अशा प्रकारचे असल्यामुळे त्याचा संबंध प्रतिभामय काव्यापेक्षा बुद्धिगम्य तत्त्वज्ञानाकडेच अधिक येतो. झेनोफेनसने स्वतः ॲनॅक्झिमँडरचे शिष्यत्वही पत्करले होते व पायथागोरसशी तो समकालीन असून, या दोनही पुरुषांच्या मताविषयी झेनोफेनसने आपल्या ग्रंथावशेषांमध्ये उल्लेख केला आहे. याशिवाय झेनोफेनसचीच विचारपरंपरा पुढे पारमिनाइड्स, झेनो, मेलीसस् इत्यादिकांनी कमी-अधिक प्रमाणावर कायम ठेवून, तिला पूर्वी अवगत नसलेला कोटिक्रमाचा दुजोरा दिला व तर्कपद्धतीचे बीजारोपण केले. यामुळेही झेनोफेनसच्या मतांना अधिक महत्त्व आले आहे.

झेनोफेनसच्या मतातील पहिला अत्यंत महत्त्वाचा विषय म्हटला म्हणजे देव किंवा देवता यांचे स्वरूप हा आहे. होमर किंवा हिसिअड यांनी नाना प्रकारच्या देवदेवतांबद्दल विविध कथा रचल्या होत्या व या देवांचेच लोक भजन-पूजन करीत होते व त्यांना खूश करण्याकरिता त्यांना हविर्भाग देत होते. तत्त्वज्ञानाच्या अगदी प्रथमावस्थेतच अशा देवताविषयक कल्पनांचा व तत्त्वविचारांचा बेबनाव होतो, असे पहिल्या प्रकरणातच सांगण्यात आले आहे. थेल्सची मोठी कामगिरी म्हणजे ओशिआनस व थेटिस यांची देवतात्मकरूपे झुगारून देऊन त्यांच्या जागी नयनगोचर जलाची स्थापना करणे ही होय. झेनोफेनस हा या बाबीपुरता थेल्सच्या पंथाचा अनुयायी होता म्हणून म्हटले तरी चालेल. होमर आणि हिसिअड यांनी दिलेली देवाची कल्पना अत्यंत अपरिपूर्ण, एवढेच नव्हे तर काही काही प्रसंगी कुमार्गदर्शक आहे, असे झेनोफेनसचे म्हणणे आहे. 'ज्या गोष्टी मनुष्याने केल्या असता तो पापी व अनीतिमान होतो, त्याच अश्लाघ्य गोष्टी देव करतात, असे होमर व हिसिअड यांनी दाखविले आहे आणि अशा गोष्टी म्हणजे चोरी, व्यभिचार व विश्वासघात' (Fragment 7). दुसऱ्याची वस्तू चोरली असता देव जर गुन्हेगार ठरत नाही, परदारागमनासारखी पापे करूनही देव जर पतित होत नाही किंवा दुसऱ्याचा विश्वासघात करण्याचीही त्याला दिक्कत वाटत नाही, तर मग मनुष्याला मात्र कठीण निर्बंध का घालावे? आणि जर ते नियम मनुष्याला लागू करावयाचे तर देवानांही ते उल्लंघिल्याबद्दल शिक्षा का होऊ नये? आणि ते मनष्यापेक्षा अधिक बळकट आहेत एवढ्यावरच ते हे नियम मनष्यांवर लादीत असतील, तर ते नीतिबंधन नसून अत्यंत तिरस्करणीय असा जुलूम आहे. एवढेच नव्हे तर देवांना मर्त्यधर्म देणे हेही अनुचित आहे. वास्तविक पाहता देव एकच आहे व तोच सर्व मनुष्यांमध्ये व देवांमध्ये श्रेष्ठ

आहे आणि तो शरीराने किंवा मनाने मनुष्यांसारखा नाही (Frag.1); परंतु मनुष्य आपल्या कोत्या समजुतीने म्हणतो, की त्यांच्या प्रमाणेच देवही जन्माला येतो, वस्त्रप्रावरण घेतो व बोलतो-चालतो (Frag. 5). अशा रीतीने देवाला मर्त्यधर्मालंकृत करणे अगदी वेडेपणाचे आहे. 'जर कदाचित पशुंना हात असते व त्यांच्यामध्ये लेखनकलेचा प्रसार होऊन त्यांनी विविध कलाकुशलतेची कामे केली असती किंवा ग्रंथ रचले असते, तर त्यांनीही आपले देव आपणासारखेच कल्पिले असते. घोड्यांचा देव घोड्यांसारखा व पशुंचा पशूसारखा झाला असता' (Frag. 6). पण ही कल्पना खोटी आहे, असे आपणास पटते; परंतु मनुष्य स्वत: अशीच चूक करीत नाही काय? आपल्या स्वत: भोवतालची संकुचित परिस्थितीच लक्षात ठेवून तो देवाचे कल्पनाचित्र रंगवीत नाही काय? इथिओपियन लोक आपले देव काळे व नकटेच कल्पितात; तेच थ्रेस येथील लोक त्यांना तांबडे केस व निळे डोळे आहेत, अशी कल्पना करतात (Xenophanes Sayings). यावरून मनुष्याची देवाविषयीची सर्व कल्पना भ्रामक आहे व तो घोडा किंवा गाढव यासारखा नाही हे जितके खरे, तितकेच तो मनुष्यासारखा नाही, हे खरे आहे. अशा रीतीनेच विचारपरंपरा चालू केली, तर परमेश्वराच्या स्वरूपाचे सत्यज्ञान मनुष्याला केव्हाच होणे शक्य नाही. असे म्हणावे लागेल. परंतु झेनोफेनसच्या मताने ही इष्टापत्तीच आहे म्हटले तरी चालेल. 'आजपर्यंत असा एकही मनुष्य झाला नाही, की ज्याला मी देवासंबंधी अगर इतर वस्तुजातासंबंधी काय म्हणतो हे बरोबर समजेल व असा मनुष्य पुढेही होणे शक्य नाही. एवढेच नव्हे तर एखाद्या मनुष्याचे मत खरे असले तरी ते तसेच आहे असे त्याला खात्रीने सांगता येणार नाही. प्रत्येकाला केवळ ज्ञानाभास मात्र आहे.' (Frag. 14) 'मी तरी जे सांगतो ते जवळजवळ सत्यरूप असावे अशी माझी समजूत आहे एवढ्याचकरता.' (Frag. 15). 'प्रथमतः देवांनी मर्त्यांना आपल्या गोष्टी उघड करून दाखविल्या नाहीत. मनष्यांनी आपल्या प्रयत्नांनी अधिक जाणिल्या' (Frag. 16).

वर निर्दिष्ट केलेले झेनोफेनसचे विचार एखाद्या आधुनिक तत्त्वज्ञान्याला शोभतील असे आहेत. मनुष्याचे ज्ञान हे नेहमी एकदेशी असल्यामुळे निरपेक्षतेने सत्यज्ञानप्राप्तीची विरलता व म्हणूनच कोणत्याही गोष्टीविषयी मत बनवून घेण्यापूर्वी खबरदारी बाळगण्याची सूचना, ही आधुनिक काळालाही अत्यंत परिचित आहे. याशिवाय वरील विचारांमधील दिसून येणारी निसर्गधर्मश्रद्धा (Naturalism) हीही आधुनिक काळी परिचित आहे. झेनोफेनस हा होमर किंवा हिसिअडच्या देवांचे स्वरूप दोषमय आहे, असे दाखवून एका अत्यंत श्रेष्ठ देवाविषयी लिहितो असे म्हटले; परंतु त्यावरून झेनोफेनस हा एकेश्वरवादी होता असे समजू नये. 'तो सर्व देवांमध्ये श्रेष्ठ आहे' या म्हणण्यावरूनच इतर देवानांही झेनोफेनसच्याच मताने काही सापेक्ष सत्यता असली पाहिजे, असे दिसते. एखादा एकेश्वरवादी म्हणेल की, परमेश्वर हा सर्व सृष्टीचे सार आहे; परंतु झेनोफेनसच्या म्हणण्याचा तसा भावार्थ दिसत नाही. विश्व आणि

परमेश्वर यांजमध्ये त्याला फरकच वाटत नाही. हे विश्व म्हणजेच परमेश्वराचे अनंत व अखंड स्वरूप आहे.* आणि होमर हिसिअडसारख्या कवींनी निर्माण केलेले क्षुद्र देव विचाराच्या तीक्ष्ण प्रहारापुढे ढासळून जाऊन अखेर याच सृष्टीरूपात मिसळून जातात, हा झेनोफेनसच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे व त्याच्यानंतर पुष्कळ शतकांनी झालेल्या स्पिनोझाचेही मत जवळ जवळ असेच होते. देवादिकांची सृष्टिव्यापाराला काही जरूर नाही हे दाखविण्यासाठी झेनोफेनस त्या सृष्टिव्यापारांची नैसर्गिक उपपत्ती प्रतिपादतो. होमरने इरिस या नावाची एक इंद्रधनुष्याची अधिष्ठात्री देवता कल्पिली आहे; पण वास्तविक पाहता इंद्रधनुष्य म्हणजे चित्रविचित्र रंगाचा ढग आहे (Frag. 13). याचप्रमाणे चंद्रसूर्यादिक खगोलस्थ ज्योती या प्रकाशमान मेघच असले पाहिजेत व ज्याप्रमाणे ठिणग्या अंधारात चमकतात त्याचप्रमाणे हे प्रकाशमान मेघ रात्री चमकतात. या विश्वाची उत्पत्ती पाणी व पृथ्वी यांपासूनच झाली आहे (Frag. 8, 9, 10, 11).

वरील मतदिग्दर्शनावरून हे उघडच होते, की झेनोफेनेस हा थेल्सच्या मताचा अनुवाद करीत आहे व शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर तो पुराणप्रसिद्ध देवतांना पदच्युत करीत आहे; पण याचा अर्थ झेनोफेनसचा या शास्त्रीय उपपत्तीवर विश्वास होता असे नव्हे. मायलीटस येथे जे शास्त्रज्ञान प्रचलित होते, त्या शास्त्रज्ञानामध्ये झेनोफेनस हा फार मागासलेला होता, असेच म्हटले पाहिजे. ॲनॅक्झिमँडरचे त्याने शिष्यत्व पत्करले असूनदेखील तो असे म्हणतो, की पृथ्वीची वरची मर्यादा म्हणजे अगदी आपल्या पायाजवळ आहे; पण तिची अधोमर्यादा अज्ञात आहे, ती खाली निर्मर्यादच आहे (Frag. 12). म्हणूनच सूर्याला पृथ्वी खालून पुनः पूर्वेकडे यावयास मार्गच नाही व प्रत्यही आपणास दिसणारा सूर्य हा नेहमी नवानवाच असतो. यावरून झेनोफेनस भौतिकशास्त्रात त्या काळाच्या मानानेही किती मागासलेला होता हे उघड दिसते. त्याने थेल्स किंवा त्याचे शिष्य यांचा अनुवाद केला, तो केवळ येनकेनप्रकारेण होमर हिसिअडचे देवदेवतांसंबंधी मत पदच्युत करण्यापुरताच. मी दिलेली मते ही सत्यस्वरूप नसून सत्यसदृश आहेत असे त्याने सुचवून ठेवलेच आहे. वास्तविक पाहता सत्ता ही एकरूप व अचल आहे व ती नाना स्थळी जावी हेच अनुचित आहे, असे झेनोफेनसचे म्हणणे आहे (Frag. 4) व याच मतावर पुढे पारमिनाइड्स व झेनो यांनी आपले पांडित्य लढविले आहे. सृष्टी ही केवळ एकरूप म्हणजे सत्तारूप व अविकृत आहे. ॲनॅक्झिमँडरच्या मते सृष्टीच्या मुळाशी काही अव्यक्त व सत्तारूप वस्तू आहे हे खरे; पण हीच वस्तू पुढे व्यक्त स्वरूप धारण करते व नानाविध सृष्टीची रचना होते, अशी त्याची उपपत्ती आहे; परंतु झेनोफेनसच्या मते ही नानाविधता वस्तुगत नसून भ्रमात्मक आहे.** जे काही सत्तारूप आहे हे कधी उत्पन्नही होणे शक्य नाही व नाश पावणेही शक्य नाही. मनुष्याला सृष्टी किंवा नाश झाल्याचा भास

---

* अद्वैत संकल्पनेस समांतर कल्पना

** अजातवादाप्रमाणे मांडणी. भारतीय दार्शनिक.

होण्याचे कारण केवळ त्यांच्या मनाचा विकार होय. म्हणून सत्यवस्तू म्हणजे अविकार्य सत्ता होय.

येथपर्यंत झेनोफेनसच्या वरिष्ठ मतांचे दिग्दर्शन झाले; परंतु त्याच्या कामगिरीचा दुसरा भाग म्हणजे अयोनियात प्रचलित झालेल्या फाजील चैनबाजीला व छानछोकीला त्यावर कडक टीका करून आळा घालणे हा होय. अयोनियातील ग्रीक लोक, लिडिअन लोकांच्या संगतीने त्यांचा सर्व डामडौल व ख्यालीखुशाली शिकले होते व त्याचे उगमस्थान सार्डिस हे असून सॅमॉसच्या पॉलीक्रेट्सचा दरबार म्हणजे त्याचे आगर होते. ही ख्यालीखुशाली विशेष रानवटपणाची नव्हती; पण फार घातक होती व तीतील मुख्य दोष म्हणजे राष्ट्राला कमजोर व निरुत्साही करण्याची प्रवृत्ती हा होता. या परिस्थितीमध्ये ख्रि. पू. ६ व्या शतकाच्या अखेरीस एकदम परिवर्तन झाले व या परिवर्तनाचे निमित्तकारण म्हणजे अयोनियावर मीडस लोकांची झालेली स्वारी हे होय. या स्वारीबरोबर ग्रीक लोकांचे डोळे उघडले व आपला गमावलेला साधेपणा पुन: मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. पोशाखात व राहणीत अधिक साधेपणा पण करारीपणा यावा अशाबद्दल प्रयत्न सुरू झाले. झेनोफेनस हा याच चळवळीतील प्रमुख कवी होय. त्याच्या ग्रंथावशेषांमध्ये आपणास या चैनबाजीची निंदा केलेली आढळते. लिडिअन लोकांपासून अयोनियातील ग्रीक लोकांनी घातक चैनबाजी मात्र उचलली व हजारो लोक गुलाबी पोशाख घालून बाजारात हिंडू लागले. ते आपल्या सुगंधतैलविभूषित केशकलापांचे कौतुक करता करताच बेजार होत (Frag. 20). असे लोक काय पराक्रम करून दाखविणार व शत्रूपासून आपल्या देशबांधवांचे संरक्षण तरी कसे करणार? अशा ख्यालीखुशालीच्या लोकांना यथेच्छ जेवून दारू पिता पिता बोलण्याचा विषय म्हणजे तुम्ही कोण, कोणाचे, तुमचे वय काय? मीड्स लोकांनी या प्रांतावर स्वारी केली त्यावेळी तुमचे वय काय होते, हाच काय तो विषय (Frag. 17). त्यांना दुसरा गहन विषय समजणार कोठून? आपल्याला दारू प्यावयाची व यथास्थित मेजवानी झोडावयाची तर पहिल्या प्रथम म्हणावे एक देवाचे स्तोत्र, आपले आचरण चांगले ठेवण्याबद्दल बुद्धी दे म्हणून हवी तर प्रार्थना करावी आणि मग यथेच्छ हात मारून घ्यावा. दारू पिऊन झिंगल्यामुळे घरी जावयास गुलामाच्या मदतीची जरूर लागली नाही म्हणजे झाले (Frag. 21).

या ख्याली-खुशालीप्रमाणेच, केवळ शारीरिक सामर्थ्याचे स्तोम माजविणेही झेनोफेनसला मुळीच पसंत नव्हते. एखाद्या वीराने, कुस्ती, दौड किंवा इतर मर्दुमकीचे खेळ यामध्ये विजय मिळविला, एवढ्यावरच त्याला मोठा मान दिला जातो व जेथे तेथे त्याला अग्रस्थान देण्यात येते; पण ही मोठी चूक आहे, असे झेनोफेनसला वाटे. नुसत्या शारीरिक सामर्थ्याची काळजी वाहणारा इसम खेळांच्या सामन्यात बक्षीस जिंकून येईल; पण म्हणून त्याला एखाद्या शहराचा अगर संस्थानाचा कारभार चालविता येईल काय? त्याला बुद्धिमान पुरुषाचीच जरूरी आहे. अशा बुद्धिविशिष्ट पुरुषांवाचून देश समृद्ध होणार नाही.

तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या दृष्टीनेच विचार केल्यास झेनोफेनसची ही मते काही विशेष महत्त्वाची नाहीत. झेनोफेनसच्या शिष्यपरंपरेमध्ये प्रसृत झालेले मत म्हणजे वस्तूच्या अचळस्वरूपाबद्दलच होय व पुढील हकीगतीमध्ये आपणास या मताचे समर्थन कसे करण्यात आले हे पाहावयाचे आहे. हिरॅक्लीटसने सृष्टीचे चलस्वरूप प्रधानत्वाने पुढे आणून वैकृतिक पक्ष स्वीकारला व झेनोफेनसने त्याच्या उलट वस्तूचा अवलंब अविकृत स्वभाव पुढे मांडला. झेनोफेनसने हा पक्ष नुसता सुचवून दिला. त्याला कुशल कोटिक्रमाने सजविण्याचे काम त्याच्या शिष्यवर्गाने कसे केले त्याचीच हकीगत आपणास आता पाहावयाची आहे.

पारमिनाइड्स

पारमिनाइड्सचा जन्म खुद्द इलिया येथेच सुमारे ख्रि. पू. ५१५ यावर्षी झाला. त्याच्या वडिलांचे नाव पिरस (Pyres of Pyrrhes) असे असून, त्याचे कुटुंब श्रीमंत होते; परंतु पारमिनाइड्सने आपला सर्व काळ तत्त्वविचारांतच घालविला. त्याने इलिया शहराकरिता कायदे करून दिले असे कित्येकांचे म्हणणे आहे; परंतु या म्हणण्याला विशेषसा आधार नाही. त्याने काही कायदे तयार केले असल्यास ते इलिया संस्थानाच्या अंतर्गत व्यवस्थेसाठी होते, अगर काही विशिष्ट मंडळाच्या संघटनेसाठी होते, हाही प्रश्नच आहे. झेनोफेनसच्या तत्त्वविचारांची व्यवस्थित मांडणी करून त्याला रंगरूपास आणण्याबद्दलच विशेषत: पारमिनाइड्सची ख्याती आहे. पारमिनाइड्सने फार तरुणपणीच ग्रंथरचना करण्यास सुरुवात केली, असे दिसते. कारण त्याच्या ग्रंथात त्यालाच उद्देशून 'तरुण पुरुषा' असे संबोधन एका देवतेने वापरल्याचे त्याने दाखविले आहे. मागील प्रकरणात सांगण्यात आलेच आहे की पारमिनाइड्स हा हिरॅक्लीटसनंतर झाला असून, हिरॅक्लीटसची उपपत्ती खोडून काढणे हा पारमिनाइड्सचा एक हेतू होता व त्या धोरणाने त्याच्या ग्रंथामध्ये हिरॅक्लीटसविषयी उल्लेख सापडतो. पारमिनाइड्सचा तत्त्वविचारव्यासंग अगदी वृद्धापकाळापर्यंत चालू होता; तो आपल्या वयाच्या पासष्टाव्या वर्षी अथेन्स येथे गेला होता व त्यावेळी तरुण सॉक्रेटिसबरोबर त्याचा संवाद झाला असल्याविषयी प्लेटोने लिहिले आहे. अथेन्स येथील लोकांच्या दृष्टीस पडलेला जुन्यात जुना तत्त्वज्ञ म्हणजे पारमिनाइड्स हाच होय.

पारमिनाइड्सचा ग्रंथावशेष दीर्घवृत्तात्मक आहे. ही दीर्घवृत्तात्मक रचना तत्त्वविचारांना मोठीशी अनुकूल नाही व झेनोफेनसच्या काव्यात दिसून येणारे कवित्वही तीत नसल्यामुळे ती अगदीच अस्थानी असल्यासारखी वाटते. अमुक एका त-हेचे विचार पद्यात गुंफले गेले तरच ते चांगले, अशा अंधपरंपरात्मक भावनेनेच पारमिनाइड्सने वृत्तात्मक रचना केली असे दिसते. त्याच्या काव्यातील कल्पनाही फार रूढ आहे व पारमिनाइड्सच्या वेळीही ती फार प्रचलित असावी. कवी स्वतः स्वर्गात अगर नरकात जाऊन ज्ञान संपादन करून येतो, हा त्यातील मथितार्थ आहे व पारमिनाइड्सच्या ग्रंथानंतरची अशी सर्व प्रसिद्ध उदाहरणे म्हणजे प्लेटोचे फीड्स व इटालियन कवी डांटे यांचे प्याराडिझो ही होत.

पारमिनाइड्स आपल्या ग्रंथामध्ये अशी कल्पना करतो की, तो एका रथात बसून सर्व वस्तूंचे ज्ञान करून देणाऱ्या देवतेकडे चालला होता व सूर्यकिरणस्वरूपी कुमारिका त्याच्या मार्गदर्शक झाल्या होत्या. याच सूर्य कुमारिकांनी त्याचा रथ तमोमय प्रदेशातून तेजोमय प्रदेशात जाताना लागणाऱ्या दरवाजांजवळ आणला व त्याच्यासाठी न्यायदेवतेची विनवणी करून तो दरवाजा उघडविला व त्याचा रथ थेट देवतेपर्यंत पोचविला. देवतेने मोठ्या प्रेमाने त्याचे स्वागत केले व त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. कवी, आधीच तेजोमय व म्हणूनच सत्य अनुभवाला अनुकूल परिस्थितीत आलेला व त्यात अशा देवतेचा प्रत्यक्ष उपदेश, मग त्याचा फायदा किती झाला याचे काय वर्णन करावे! देवतेने उपदेशाची अमुक एक बाब म्हणजे शिल्लक ठेवली असे नाही.

सत्य काय व वस्तुस्वरूप काय, याची तिने फोड केली. जगतातील सत्य वाटणाऱ्या; पण वस्तुतः आभासात्मक उपपत्ती कोणत्या इत्यादी सर्व विषयांचा त्या देवतेने ऊहापोह केला व कवीला ज्ञाता करून सोडले.*

वरील लेखामध्ये पारमिनाइड्सने आपणास देवतेकडून ज्ञानप्राप्ती होऊन आपले स्थित्यंतर कसे झाले हे दर्शविले आहे; परंतु हे स्थित्यंतर निबीड अंधकारातून ठेचाळणाऱ्या मनुष्याला प्रकाशदर्शन किंवा गहन अरण्यात तृषाकुल होऊन वणवण फिरणाऱ्या प्रवाशाला एखाद्या अच्छोद सरोवराचे दर्शन अशाच स्वरूपाचे नसून, वास्तविक अंधकारमय प्रदेशातच असता भ्रामक व नाशकारक अशा भूतपिशाचांच्या दिवट्यांनी भुलविल्या जाणाऱ्या मनुष्याला सूर्यदर्शन व्हावे किंवा मृगजळाच्या आभासमय जलाकडे धाव मारता मारता थकल्या भागलेल्या प्रवाशास अमृतमय जलाचा पाऊस भेटावा, त्याप्रमाणे असावे असे भासते. देवतेकडून सत्यज्ञान प्राप्त होण्यापूर्वी लेखक निखालस अज्ञानीच होता, एवढेच नव्हे तर खोट्या तत्त्वज्ञानाने भ्रमिष्ट झालेला असला पाहिजे व या भ्रामक तत्त्वज्ञानाकडे पुन: न वळविण्याविषयी त्याने खबरदारी घ्यावी म्हणनच देवतेने खोट्यानाट्या मतांचा एवढा तपशीलवार उपन्यास केला असावा. पारमिनाइड्स हा प्रथमत: पायथागोरसचा अनुयायी होता व पुढे तो झेनोफेनसचा अनुयायी झाला. हे त्याचे मतांतर म्हणजेच देवतेचा कृपाप्रसाद असा पारमिनाइड्सचा मतलब असला पाहिजे. पारमिनाइड्स एका काळी पायथागोरसच्या पंथात असावा, या म्हणण्याला बराच पुरावा आहे. पायथागोरिक पंथातील आपला पहिला शिक्षक एमीनिअस (Ameinias) याचे स्मारक म्हणून त्याने एक समाधी बांधली असून, त्या समाधीवर जो मृत्युलेख आहे त्यावरूनच वरील संबंधाचा तर्क झाला आहे. स्टॅबोने दिलेल्या माहितीप्रमाणे पारमिनाइड्स व झेनो हे दोघेही पायथागोरियनच होते व आयांब्लिकॉसने (Iamblichos) सांभाळून ठेवलेल्या पायथागोरियनांच्या यादीतही पारमिनाइड्सचे नाव

---

* आपल्याकडे कठोपनिषदाची मांडणी बरीचशी अशी आहे. अर्थात् संदर्भ व प्रसंग वेगळे आहेत.

सापडते. पारमिनाइड्सने भ्रामक म्हणून जे मत देवतेकडून वदविले आहे, ते एखाद्या अज्ञ मनुष्याचे नसून साधकबाधक प्रमाणांचा विचार करून बसविलेले भासते; परंतु ते चुकलेले आहे, असे म्हणण्याचा रोख पारमिनाइड्सचा दिसतो. या सर्व गोष्टींना जुळते येण्यास एक पायथागोरियन मतच योग्य आहे.

याजवर कोणी असा आक्षेप घेतील, की जर पारमिनाइड्सला पायथागोरसचे मत इतके त्याज्य वाटत होते, तर त्याने एवढा काळजीपूर्वक त्याचा उपन्यास तरी कशाला केला? पण असा प्रश्न करणे म्हणजे वादविवादात्मक पद्धतीतील मर्माचे अज्ञान प्रकट करण्यासारखे आहे. पूर्वपक्षाच्या उठावाशिवाय सिद्धांताचे स्वरूप चांगले उमटत नाही व पूर्वस्थितीतील विपत्तीच्या भेसूर चित्राशिवाय उत्तरकालीन संपत्ती फिक्की वाटते. फार काय पण असा पूर्वपक्षाचा उपन्यास करण्याची ही पद्धतीही पायथागोरिक पंथात फार प्रचलित होती व याचे दर्शक म्हणून इंग्रजी भाषेतील Y या अक्षरासारखे एक अक्षर वापरण्याचा त्यावेळी रिवाज पडला होता. सत्यासत्याचा काही एक मार्ग साधारण असला तरी, असा एक बिंदू येतो, की जेथे त्या दोन मार्गांची फारकत पडते व एका मार्गाचा त्याग करून दुसऱ्या मार्गाकडे वळल्याशिवाय मनुष्याचा तरणोपाय नसतो. अशा या अडचणीच्या प्रसंगी आपण पायथागोरियन पंथाचा कायमचा त्याग करून सत्यमार्गाकडे वळलो हाच पारमिनाइड्सचा सांगण्याचा मतलब आहे.

अयोनियातील थेल्सच्या पंथातील विचारसरणी घ्या, हिरॅक्लीटसचा अग्निकारकवाद पाहा किंवा पायथागोरसची ही जगताची उपपत्ती काय होती याचा निष्कर्ष काढा, एकाच वस्तूची नानाविध रूपे होऊ शकतात हे त्यांना मान्य होते आणि या नानाविध अवस्थांची उदाहरणे जल, हिम, बाष्प अशी देण्यात येत होती. ॲनॅक्झिमीनसने पूर्वीच्या उपपत्तीलाच एक घनीभवन व विरलीभवन या कल्पनेची जोड दिली होती. या कल्पनेबरोबर दुसऱ्या काय गोष्टी गृहीत धराव्या लागतात याची ॲनॅक्झिमीनसलादेखील क्वचितच कल्पना असेल. घनीभवन व विरलीभवन यांची उपपत्ती लावण्यासाठी आपणास असे गृहीत धरले पाहिजे, की अखिल वस्तूंची मूळ घटक वस्तू अवकाश प्रचुर आहे व हाच अवकाश किंवा पोकळी कमी-जास्त झाल्यामुळे घनविरळ भाव उत्पन्न होईल; पण अशी पोकळ जागा मूळ घटकद्रव्यात आहे काय? या प्रश्नाचा अनक्झिमीनसने कधी विचारच केला नाही. हा विचार इतका सूक्ष्म आहे, की आजदेखील ही गोष्ट एकदम ध्यानात येण्यासारखी नाही. मग मनुष्याच्या अप्रगल्भ अवस्थेत ती त्याच्या नजरेतून निसटली यात काय आश्चर्य? पायथागोरियन लोकांनी याच विचारसरणीला एक आणखी पुस्ती जोडल्यामुळे हा प्रश्न अधिक पुढे आला असावा. त्यांनी अशी कल्पना केली होती, की या जगताच्या बाहेर हवेचा कोश आहे व या कोशातून हवा घेऊनच वस्तू दीर्घ होतात. हा विचार आल्याबरोबर साहजिकच असा प्रश्न उभा राहतो. की ही हवा राहण्यास त्या वस्तूत पोकळ जागा होती की काय?

या सर्व अडचणी ज्या मतात उपस्थित होत नाहीत असे मत म्हणजे झेनोफेनस याचे वस्तूच्या अचळ स्वरूपाविषयीचे होय; याच मताचा पारमिनाइड्स याने पुरस्कार केला आहे. झेनोफेनसच्या मतातील सर्व अस्पष्टपणा दूर सारून पारमिनाइडसने सर्व अयोनियातील मताला विरुद्ध असे आपले मत पुढे आणले. पायथागोरसच्या पंथामध्ये गणित विषयाचे अतोनात माहात्म्य होते हे आपण पाहिलेच आहे आणि गणित शास्त्रामध्ये जे जे विचारविषय ते ते भावमय असा संकेतच आहे. म्हणजे आपणाला ज्या गोष्टीचा विचार कळतो, तो विषय आपणास बुद्धीने आकलन करता येतो, तो विषय अस्तिपक्षीय आहे. म्हणजे तो विषय आहे असे म्हणावयास हरकत नाही. याच कल्पनेच्या आधारावर पारमिनाइड्सने आपली इमारत रचली आहे. तो प्रथमतः पायथागोरियन पंथातील होता, या म्हणण्यालाही या गोष्टीने बळकटीच येते. या मूळ कल्पनेला धरून पारमिनाइड्सचा असा सिद्धांत आहे, की अभाव हा पदार्थच नाही. कारण प्रत्येक विचार किंवा कल्पना ही भावात्मकच आहे व जे विचारगम्य तेच खरे. मग ज्या अभावाची भावरूप विचारला कल्पनाच करता येत नाही, तो अभाव सत्य कसा असेल? आपल्याकडेदेखील अभाव हा पदार्थ मानावा किंवा मानू नये, हा मोठा वाद आहे. वैशेषिकवादी* अभाव हा एक पदार्थ मानून त्याच्या पोटजाती वगैरेही पाडतात. वेदान्ती अभाव मानीत नाहीत. ते म्हणतात की, अभाव ही कल्पनाच खोटी आहे. कारण प्रत्येक अभाव हा भावरूपच आहे. तुम्ही ज्याला घटाभाव म्हणता तो काही एक प्रकारचा अभाव नसून भूतलाचे स्वरूप आहे. एखाद्याला अमूक एका ठिकाणी घडा नाही असे समजले म्हणजे काय? तर, तो ज्या ठिकाणी घडा पाहवयास गेला तेथे त्याला फक्त भुईच दिसली. सारांश, सर्व ज्ञान हे भावात्मकच आहे. पारमिनाइड्सची विचारसरणी एवढ्यापुरती अशीच आहे. अभाव म्हणून मुळी काही नाहीच आणि ज्याअर्थी अभाव नाही, त्याअर्थी मूळ वस्तू अमूक एका ठिकाणी नाही असे म्हणताच येत नाही. कारण अभाव हा पदार्थच सत्य नाही. मग जेथे अवकाश किंवा पोकळीच नाही, तेथे घनविरळभाव कसा शक्य होणार? वस्तू एकरूप व निरवकाश आहे. वेदान्तातील परब्रह्माची व्यापकता दाखविण्यासाठी ज्याप्रमाणे ते 'कृत्स्न' आहे, पूर्ण आहे, अवकाशरहित आहे, असे म्हटले आहे, त्याप्रमाणेच पारमिनाइड्सची मूळवस्तू कृत्स्न आहे.

वस्तू निरवकाश आहे तशीच जन्ममरणातीत आहे. वस्तू आहे या म्हणण्याचा अर्थ असा होतो. कारण वस्तू उत्पन्न झाली म्हणावे तर ती वस्तूचा भाव किंवा अभाव यापासून उत्पन्न झाली असावी; परंतु ज्याअर्थी अभाव हा पदार्थच नाही, त्याअर्थी ती अभावातून उत्पन्न झाली नाही. बरे, भावात्मक वस्तूंतून तिची उत्पत्ती झाली म्हणावे तर ती दुसरी भावात्मक वस्तू तिजशिवाय दुसरी असणार नाही. दुसरी म्हणावयाची झाल्यास या दोन वस्तूंमध्ये

---

*मूळ वैशेषिक सूत्रात अभाव पदार्थांचा समावेश नाही. 'धर्मविशेषप्रसूताद् द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवायानां । पदार्थानां साधर्म्यवैधर्म्याभ्यां तत्त्वज्ञानान्निःश्रेयसम् ।।' (प्रथम अध्याय, प्रथम आन्हिक श्लोक ४)

अवकाश पाहिजे; पण अवकाश म्हणजे अभाव व अभाव तर मान्यच नाही. तेव्हा वस्तू आहे याचाच अर्थ ती जन्ममरणातीत आहे.

याच मुद्यावरून वस्तू अविभाज्य, अचल व अमर्याद आहे, हे सिद्ध होते. कारण वस्तूची विभागणी करावयाची म्हणजे दोन भाग दूर करावयाचे; पण याचाच अर्थ त्याजमध्ये अवकाश निर्माण करावयाचा व अवकाश हा तर बुद्धिगम्य नाही व बुद्धिगम्य नाही ते सत्य नाही. वस्तू हलवायची म्हणजे पूर्वी नसेल तेथे ती न्यावयाची; पण वस्तूच्या अभावाची कल्पनाच कोणी करावी? आणि अशा अविभाज्य व अचल वस्तूची मर्यादा तरी कोणी घालावी? जेथे वस्तू संपली व पुढे नाहीशी झाली, तेथे त्याची मर्यादा घालावयाची; पण वस्तू तर नेहमी भावात्मकमय, मग मर्यादा कोठून येणार? यावरूनच वस्तूची कल्पना द्यावयाची तर ती घनवर्तुळासारखी आहे असे पारमिनाइड्सचे म्हणणे होते.

पारमिनाइड्सची एकंदर विचारसरणी मोठी परस्परविरोधी आहे. एकीकडे वस्तू निर्मर्याद आहे म्हणून तर म्हणावयाचे व दुसरीकडे ती घनवर्तुळाकृती आहे म्हणूनही आपणच प्रतिपादन करावयाचे.

पारमिनाइड्सच्या वस्तुस्वरूप दिग्दर्शनावर असा एक आक्षेप येऊ शकेल, की या जगात आम्हास दरक्षणी नानाविधता व स्थित्यंतर दिसत असता वस्तू अचल व कैवल्यरूप आहे असे म्हणावयाचे तरी कसे? पण याला उत्तर एवढेच, की आपणास जे जसे दिसते तसेच ते असेल तर तत्त्वज्ञानाची जरूर तरी काय? तत्त्वज्ञानाचे हेच मुख्य काम, की आपल्याला दिसणाऱ्या आभासाची छाननी करून सत्यवस्तू प्रकट करावी. आपणास भ्रमाने सृष्टीत नानाविधता दिसली म्हणून ती तशीच असली पाहिजे, असे थोडेच आहे?*

पारमिनाइड्सचे मत वेदांतील मतांशी फारच मिळते येते; परंतु यावरून त्याची बुद्धी आमच्या ब्रह्मविचारापर्यंत जाऊन पोहोचली होती, असे म्हणता येत नाही. अलीकडच्या पदार्थविज्ञानामध्ये ज्याला जड द्रव्य किंवा Matter म्हणतात, तेथपर्यंत त्याची प्रगती झाली होती. जड द्रव्याचे किंवा प्रकृतीचे पडदे दूर सरून त्याला औपनिषद पुरुषाचे अगर अक्षरस्वरूप ब्रह्माचे दर्शन झाले नव्हते. तथापि, पारमिनाइड्सची बुद्धी मोठीच सूक्ष्मदर्शनी यात काही संशय नाही. त्याचे मत जितके सूक्ष्म तितकेच समजावयास कठीण व त्यावर आक्षेप येणे त्यामुळेच फार सोपे. आपल्या गुरुवर येणाऱ्या आक्षेपांचे झेनो कसे खंडन करतो, हे आपण पाहिल्यास आपणास मोठे कौतुक वाटेल.

झेनो

झेनोचाही जन्म खुद्द इलिया येथेच झाला असून, त्याच्या बापाचे नाव टेल्युटॅगोरस (Telautagoras) असे होते. तो पारमिनाइड्सपेक्षा पंचवीस वर्षांनी लहान असून,

---

*हे मत जरा 'केवलाद्वैती' वाटते.

त्याचा पट्टशिष्य होता व त्यांचे परस्परांवरील प्रेम इतके उत्कट होते, की प्लेटोने झेनोला पारमिनाइड्सचा मुलगाच म्हटले आहे. ज्यावेळी पारमिनाइड्स अथेन्स येथे गेला, त्यावेळी झेनो हा त्याजबरोबर होता व त्याची उमर या सुमारास चाळीस वर्षांची होती, असे आपणास प्लेटोच्या म्हणण्यावरून समजते. प्रसिद्ध अथीनियन पेरिक्लिज याने झेनोचे संभाषण ऐकले होते व प्रसिद्ध सोफिस्ट प्रोटॅगोरस व झेनो यांचा वादविवादही झाला होता.

झेनो हा एका राजकीय कटात पकडला गेल्याबद्दलचा बराच लोकप्रवाद आहे; परंतु त्या सर्व प्रवादांमधील सामान्य भाग म्हणजे आपल्या कटवाल्या बांधवांच्या संरक्षणार्थ त्याने प्रकट केलेला निश्चय हाच आहे व त्यावरून आरंभापासूनची त्याची उदार व निश्चयी वृत्ती ही दिसून येते. झेनो अगदी तरुण असतानाच त्याने आपले लेख लिहिले व त्यांचा उल्लेख म्हणजे आपल्या गुरूवर येणारे आक्षेप दूर करावेत असा होता; परंतु हे साधण्याची झेनोची पद्धत म्हणजे पारमिनाइड्सच्या मतावरील आक्षेपांचे खंडण करणे अशी नसून, इतर मतांतील अडचणी दाखवून देणे ही आहे. अर्थात्च झेनोच्या म्हणण्याचे तात्पर्य असे की, पारमिनाइड्सचे मत अडचणीचे, एवढ्यावर त्याचा त्याग करून वस्तूंच्या नानाविधतेची तरफदारी कराल तरीदेखील तुम्हाला अनेक अडचणी आल्यावाचून राहणार नाहीत. दुसऱ्यांच्या मताच्या खोटेपणाबद्दल आपल्या मताची सत्यता दाखविण्याची ही पद्धत आपल्याकडे प्रचलित होती व ती साधारणतः कोठच्याही काळात असणारच. बौद्ध किंवा जैन हे श्रुतीप्रमाण मानीत नाहीत व वेदान्तवादी म्हणजे तर श्रुती हेच मुख्य प्रमाण मानून तद्नुकूल तेवढाच तर्क पत्करणारा, मग जेथे परस्परांची प्रमाणेच भिन्न आहेत, तेथे उभयताचा संवाद कसा व्हावा व वेदान्त मताचा विजय तरी कसा साधावा? ही अडचण दूर करण्यासाठी अशी योजना करावयाची, की वेदान्तमताचा मुळीच उपन्यास करावयाचा नाही. बौद्ध किंवा जैन मतांचाच पूर्वपक्ष करून त्यांना मान्य असलेल्या तर्कप्रमाणानेच तो सदोष आहे असे दाखवावयाचे व ज्याअर्थी वेदान्तमताखेरीज इतर सर्वांचा पक्ष खोटा आहे त्याअर्थी शिल्लक राहिलेला वेदान्त पक्षच खरा असला पाहिजे. तोही सत्य न म्हणावे तर जगात कोणताच पक्ष सत्य राहणार नाही; पण असे म्हणणे बुद्धीला पटण्यासारखे नाही. कारण सरतेशेवटी कोणतातरी एक पक्ष खरा असलाच पाहिजे.

झेनोची पद्धती म्हणजे याचप्रमाणे नानाविधता स्वीकारणाऱ्या पक्षाचा सदोषपणा दाखवून आपल्या पक्षाला बळकटी आणणे ही आहे. काही प्रसंगी झेनो आपल्याच एका म्हणण्याविरुद्ध दुसरा पक्ष मांडतो, यामुळे त्याला कोणी कोणी दुतोंड्या म्हणतात; पण झेनोला आपला पक्ष दाखवावयाचा नसून दुसऱ्याचा हाणून पाडावयाचा असल्यामुळे हा परस्परविरोध त्याला बाधक झाला नाही.

झेनो म्हणतो की, समजा आपण वस्तू नानाविध आहेत अशी तात्पुरती कल्पना करू. आता या वस्तूंची काहीएक ठराविक संख्या असली पाहिजे. त्याचप्रमाणे जर वस्तू नानाविध

आहेत तर कोठच्याही दोन वस्तूंच्या दरम्यान दुसऱ्या वस्तू पाहिजेत. कारण एका जोडीच्या दरम्यान दुसरा पदार्थ आहे व दुसऱ्या एखाद्या जोडीच्या मध्ये तो नाही, असे ठरविण्यास काहीच कारण नाही. मग जर प्रत्येक जोडीमध्ये एक तिसरा पदार्थ पाहिजेच, तर मग वस्तू अपरिमित आहेत असेच म्हटले पाहिजे. वस्तूंची नानाविधता पत्करली म्हणजे त्या अनंतही आहेत व सांतही आहेत, असे म्हणण्याची पाळी येते व ही तरी मोठी अडचणच नाही काय?

काल किंवा दिक इत्यादी पदार्थांचाही उपन्यास केला. तर आपणास अशाच अडचणी पडतात. वस्तूला राहावयास जर दिक् किंवा स्थळ पाहिजे, तर या स्थळाला राहावयास दुसरे स्थळ नको काय? बरे दिक म्हणजे केवळ शून्यरूप म्हणून वस्तू नव्हे असे म्हणावे, तर अवस्तूच्या ठिकाणी वस्तू कशी राहील? मग एका स्थळासाठी दूसरे स्थळ त्याच्यासाठी तिसरे अशी अनवस्थाच प्राप्त होत नाही काय? कालाचीही अशीच विल्हेवाट लावता येईल..

पायथागोरियन पंथातील लोक भूमितीचे सिद्धांत, अंकगणिताला किंवा व्यवहाराला लावू पाहत; पण तेही किती भ्रामक आहेत असे दाखविण्याकरिता झेनो म्हणतो, 'जर बिंदूला परिमाणच नाही तर अनेक परिमाण शून्य बिंदूपासून सपरिमाण रेषेची रचनाच होणार नाही. एका रेषेचे दोन भाग करता येतात, त्या भागाचे पुनः दोन भाग, त्या प्रत्येक भागाचे पुनः दोन भाग, अशी आपणास विभागणी करता आली पाहिजे. कारण बिंदूला परिमाणच नसल्यामुळे कितीही लहान भाग झाला तरी त्यात अनेक बिंदू आहेत, असेच म्हटले पाहिजे. अशा रीतीने प्रत्येक रेषेचे अनंत विभाग करता येतील व सर्वच रेषांचे विभाग अनंत असल्यामुळे एक रेषा मोठी व दुसरी लहान, असे म्हणताच यावयाचे नाही.'

जगतात एकच अचळ पदार्थ म्हटला म्हणजे गती अशक्य; पण आपणास पदार्थ गतिमान दिसत नाहीत काय? झेनो म्हणतो हा गतिपक्ष स्वीकाराल तरी अनवस्थाच प्राप्त होईल, ही गतीची अनवस्था त्याने चार प्रकारांनी दाखविली आहे. ते प्रकार असे :

(१) एक वस्तू एका बिंदूपासून दुसऱ्या एखाद्या दूरवरच्या बिंदूकडे जात आहे, अशी कल्पना केली, तर ते सबंध अंतर चालून जाण्याच्या आधी निम्मे अंतर चालून गेले पाहिजे. त्या निम्म्यापूर्वी त्याचे निम्मे अंतर, त्याच्यापूर्वी त्याचे निम्मे, अशा रीतीने अनंत विभाग पडतील व सांत काळात हे अनंत विभाग ओलांडताच येणार नाहीत. म्हणून एका पदार्थाची एका स्थळाहून दूसऱ्या स्थळी गती होते हे म्हणणे अडचणीचेच आहे.

(२) एखादे कासव अकिलीजच्या थोडेसे पुढे आहे व अकिलीज त्याला पकडण्याकरिता जलद जात आहे अशी कल्पना केली, तरी या ठिकाणी अकिलीज कधीच कासवाजवळ पोहोचणार नाही. कारण अकिलीजला प्रथमतः कासव पूर्वी ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी आले पाहिजे व तेवढ्याच वेळात कासवही थोडे तरी पुढे सरकणारच. सारांश, अकिलीज व कासव यांजमध्ये थोडे तरी अंतर अनंत कालपर्यंत राहणारच. म्हणून अकिलीज कासवाला पकडतो, हे संभवनीय नाही. झेनोचे हे कोडे अकिलीज व कासव याच नावाने प्रसिद्ध आहे.

(३) एखाद्या धनुष्यापासून सोडलेला बाण निशाणापर्यंत जातो, असे म्हणता येत नाही. कारण आपणास वाटेल तो जरी क्षण घेतला. तरी त्याक्षणी तो बाण बरोबर आपल्याच प्रमाणाची जागा व्यापून राहतो व याच अवस्थेला स्थिती (Rest) म्हणतात. याच रीतीने प्रत्येक क्षणी तो बाण स्थितिमान आहे असे सिद्ध होते. मग तो एकंदरीत गतिमान कसा होईल? स्थिती व गती यांचा परस्पर विचार असल्यामुळे अनंत स्थितीची बेरीजही काही गती होऊ शकणार नाही.

(४) अशी कल्पना करा की, अ, ब व क या तीन रेषा आहेत. त्यापैकी अ ही स्थिर असून, ब व क या परस्पर विरोधी दिशेने जात आहेत. अर्थात अशा वेळी ब ही रेषा अ मधील जितके बिंदू ओलांडून जाते, त्याच्या दुप्पट क मधील ओलांडील. कारण गती येथे दुहेरी आहे. मग क मध्ये एकंदर दुप्पट बिंदू व त्यांना ओलांडण्यास लागणारा वेळ एकेरी बिंदूंना ओलांडावयास लागणार तेवढाच.

सारांश, गतीचे अस्तित्व घटकाभर मान्य करून विचार पाहिल्यास त्याजमध्येही शतश: अडचणी येतात. मग वस्तू एकरूप आहे हा पारमिनाइड्सचा पक्ष का टाकावा? तोच खरा म्हणून स्वीकारण्यास हरकत नाही. कारण तो बुद्धीला अधिक पटतो.

झेनोचा उद्देश विवक्षित रीतीने आपल्या गुरूची तरफदारी करावयाची एवढाच असल्यामुळे, त्याचे विचार विशेषसे फळप्रद नाहीत. त्याची विशेष कामगिरी म्हणजे कोटिक्रम करण्याच्या पद्धतीचा पुरस्कार हाच होय. मनुष्याची बुद्धी अद्याप विचारपद्धतीच्या सूक्ष्म नियमांचे ग्रहण करण्यास समर्थ झाली नव्हती, अशा परिस्थितीमध्ये झेनोने आपल्या कोटिक्रमांनी त्या पद्धतीचा पाया घातला व याच पद्धतीचे तर्कशास्त्र हे परिणत स्वरूप आहे. एकंदर तत्त्वज्ञानाचा तर्कशास्त्र हा एक महत्त्वाचा भाग असल्यामुळे, अशा शास्त्राची पूर्वतयारी करण्याचे श्रेय मिळणे हे काही लहानसहान भाग्य नव्हे व ते भाग्य झेनोला मिळाले ही त्याची महनीयता आहे. त्याच्या कोटिक्रमातील चुका पुढे ॲरिस्टॉटलने वगैरे दाखवून दिल्या व आपणास आजही दाखविता येतील; परंतु या चुकांमुळे त्याचा मोठेपणा काही कमी होत नाही. विचाराच्या सूक्ष्म गुंतागुंती सोडविताना असा एखादा उपन्यास जोराने पुढे आणणे हेच प्रगतीचे मोठे साधन असते.

मेलीसस

मेलीसस हा मूळचा सॅमॉस येथील राहणारा असून, त्याच्या वडिलांचे नाव इथॅजीनस (Ithagenes) असे होते. तो झेनोपेक्षा वयाने जरा लहान होता. ख्रि. पू. ४४१ वर्षे अथेन्सविरुद्ध लढण्यासाठी सॅमॉसहून जे आरमार आले होते, त्यावर मेलीसस हा मुख्य अधिकारी होता. यावरून प्रचलित राजकारणामध्ये त्याचे केवढे अंग असले पाहिजे हे स्पष्टच होते व राजकारणी पुरुष म्हणून त्याची जी ख्याती आहे तिलाही पुष्टी येते. मेलीससने

पारमिनाइड्सचे शिष्यत्व पत्करले होते; परंतु त्याबरोबरच त्याने हिरॅक्लीटस व ॲनॅक्झिमीनस यांच्या मताचाही चांगला परिचय करून घेतला होता. पारसिकांच्या स्वाऱ्यांमुळे अयोनिया व इटली येथील लोकांचे जे अधिक संघटन झाले त्याचा परिणाम आपणास मेलीससच्या मतांमध्ये दृग्गोचर होतो.

झेनोने आपल्या गुरूची तरफदारी करण्यासाठी दुसऱ्यांच्या मतांतील अडचणी दाखविल्या; परंतु मेलीससच्या लेखावशेषांचे स्वरूप पारमिनाइड्सच्या मतांना पाठिंबा देणे एवढेच आहे. त्याचे बहुतेक शब्ददेखील थेट पारमिनाइड्ससारखेच आहेत व याच कारणाकरिता त्याचे येथे चर्वितचर्वण करण्याचे काही प्रयोजन नाही. मेलीससच्या विचारसरणीतील विशेष हाच की, सद्वस्तू ही घनगोल स्वरूप आहे असे पारमिनाइड्सचे मत टाकून, ती केवळ अनंत आहे, असेच तो म्हणतो. वस्तूला मर्यादा लावावयास शून्यता पाहिजे आणि शून्यता ही अस्तित्वातच नाही व म्हणूनच वस्तू केवळ अनंत आहे, तिच्यात घनविरळ भाव नाही, तिला गती नाही व विकार नाही. पारमिनाइड्सचे हेच म्हणणे होते व मेलीससने तेच अधिक जोरदार भाषेत पुढे मांडले. हा जोरदारपणा साधण्यासाठी त्याने आपल्या गुरूची दीर्घ वृत्तात्मक रचना टाकून गद्यामध्येच ग्रंथरचना केली, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

आपला पक्ष खरा असून, दुसऱ्या पक्षाचे म्हणणे खोटे असले पाहिजे हे दाखविण्यासाठी मेलीससने एक विशेष मुद्दा पुढे आणला आहे. तेवढा मात्र येथे देऊ. मेलीसस म्हणतो की, केवळ प्रतिपक्षाच्या मुरवतीखातर आपण आपल्या एकरूप सद्वस्तूखेरीज दुसरी सद्वस्तू आहे असे मानले, तरी आपणास हे कबूल करावे लागेल, की ही एक सद्वस्तू व पहिली उभय पक्षांना मान्य अशी सद्वस्तू या अगदी तंतोतंत सारख्याच असल्या पाहिजेत. नाहीतर त्या दोन्हीही सद्वस्तूच आहेत असे म्हणण्यास तरी आधार काय? बरे त्या दोन्ही अगदी सारख्या आहेत असे म्हटले, तर त्या एकमेकांपासून भिन्न आहेत, असे म्हणावयास तरी आधार काय? त्या दोन वस्तू एकमेकांपासून शून्यदेशाने तर काही विभक्त होऊ शकतच नाहीत. कारण शून्य प्रदेश हा मुळी अस्तित्वातच नाही व ज्या अर्थी प्रतिपक्षीयाने मानलेली प्रत्येक सद्वस्तू आमच्या सद्वस्तुबरहुकूम व अविभक्त असली पाहिजे, त्याअर्थी ती तिच्याशी एकरूपच असली पाहिजे. यावरून सद्वस्तू एक व अविभक्त आहे हे सिद्ध झाले. मेलीससच्या याच कल्पनेचा पुढे परमाणुवाद्यांनी काय उपयोग केला हे ओघाने कळेलच.

○○○

प्रकरण ५ वे

माध्यमिक पंथ

संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाच्या द्वारा किंवा साक्षात बुद्धिधर्मीय पंथांची ज्यांना ओळख आहे त्यांना, माध्यमिक पंथ हा शब्द फारच परिचयाचा वाटेल. बुद्धधर्माचे माध्यमिक, योगाचार, सौतांत्रिक व वैभाषिक असे चार पंथ आहेत. त्यापैकी माध्यमिक हा पंथ सर्वशून्यवादी आहे; परंतु प्रस्तुत प्रकरणात हा शब्द कोठल्याही रूढ अर्थाने वापरला नसून, त्याच्या मूळ अर्थानुसार घेतला आहे. दोन परस्परविरोधी तत्त्वांची एकवाक्यता करून उभय पक्षांचा समेट होईल असा मार्ग काढण्याचा या पंथामध्ये प्रयत्न झाला, म्हणून या पंथाला माध्यमिक पंथ (Mediators) असे नाव देण्यात आले आहे. पारमिनाइड्सच्या मताप्रमाणेच सर्व गोष्टी कबूल कराव्या तर मोठीच आपत्ती येऊन पडते. प्रत्यक्ष अनुभवामध्ये तर आपणास ठिकठिकाणी नानाविधता व गतिमत्ता दिसून येते, मग वस्तूच्या एकस्वरूपावरच भर देऊन आपण ही विविधता व गतिमत्ता कशी उकलावयाची? गतिमत्ता ही कल्पना काही पारमिनाइड्सला अगम्य नव्हती; पण सद्वस्तूशी तिची सांगड कशी घालता येईल हाच प्रश्न होता व पारमिनाइड्सने त्याचे स्पष्ट नकारार्थी उत्तर दिले होते. जगताच्या व्यवहाराने तत्त्वज्ञान बांधलेले नाही, ही गोष्ट खरी; परंतु नानाविधता व गतिमत्ता यांचा आभास होण्यास तरी कारण काय, याची योग्य उपपत्ती लावावयास नको काय?

उलटपक्षी ही अडचण दूर होण्यासाठी पारमिनाइड्सचा पक्ष अजिबात टाकून द्यावा, तर वस्तूच चंचलस्वरूप होऊन हिरॅक्लीटसच्या मतविवरणप्रसंगी दाखविल्याप्रमाणे अनिश्चितता व अस्थैर्य प्राप्त होऊ लागते. जगतात काहीच स्थिर नाही, काहीच शाश्वत नाही, काहीच एकरूप नाही, हे म्हणणेही समाधानकारक वाटत नाही. कालाच्या व स्थलाच्या प्रतिक्षणी पालटणाऱ्या ओघामध्येही आपणास काहीतरी शाश्वतता हृदयगोचर होत असते. सारांश, कोठलाही एकच पक्ष पत्करावयाचा म्हणून ठरविले तर मोठी अडचणीचीच वेळ

येऊन पडते; पण माध्यमिक पंथी आपणास असे विचारतील की एकाच पंथाला चिकटून राहिले पाहिजे, असा निर्बंध कशाला ठेवावा? उभय पक्षांमध्ये दिसणारे सत्यरूपसार ग्रहण करून वरील असार शब्द टाकून द्यावे. वस्तू एकविधही आहे व अनेकविधही आहे. ती शाश्वत आहे व अशाश्वतही आहे, स्थिर आहे व चंचल आहे. आता कोणास असे वाटेल, की हे बोलणे परस्परविरोधात्मक आहे; पण येथे खरा विरोध मुळीच नसून त्याचा आभास मात्र आहे. कारण एकविधता व अनेकविधता, शाश्वती व नाश यांची अधिकरणे किंवा आश्रयस्थाने निरनिराळी आहेत. ती कशी व कोणती याचेच मुख्यतः विवेचन करणे हे माध्यमिकांचे काम आहे. बाकीच्या विषयांचा विचार केवळ तदनुषंगाने मूळ सिद्धांताला अधिक पोषक म्हणूनच करावयाचा. या पंथातील पहिला तत्त्वज्ञ एंपिडोकल्स हा झाला.

एंपिडोकल्स

एंपिडोकल्स याचा जन्म सिसिलीमध्ये ॲगस (Akragas) या गावी ख्रि. पू. सुमारे ४९४ या वर्षी झाला. त्याच्या बापाचे नाव मेटन (Meton) असे असून त्याच्या आजाचे नाव एंपिडोकल्स असेच होते. आपल्या शहरामध्ये प्रबळ झालेल्या सरदारांच्या सत्तेविरुद्ध त्याने लोकपक्षाची बाजू उचलल्याचे सांगतात. या कारणामुळे त्याच्या लोकप्रियतेस सुरुवात झाली असावी; परंतु त्यामुळेच त्याला हद्दपारीची शिक्षा झाली होती व त्याने आपल्या आयुष्यातील पुष्कळ काळ ग्रीस देशामध्ये घालविला. पेरिक्लीसच्या वेळी अथेन्सची जी विलक्षण भरभराट झाली, तिचा त्याने प्रत्यक्ष अनुभव घेतला होता आणि थोरिऑई या नावाच्या ग्रीक वसाहतीत तो ख्रि. पू. ४४४-३ या वर्षी गेला असता प्रसिद्ध इतिहासलेखक हिरोडोटस व प्रख्यात सोफिस्ट प्रोटॅगोरस यांनी त्याला पाहिले होते. एंपिडोकल्स हा लोकप्रिय होता म्हणून वर सांगितलेच आहे. या लोकप्रियतेतच आपणास अलौकिक शक्ती प्राप्त झाली आहे, असे दाखवून त्या लोकप्रियतेचे विभूतिपूजेत रूपांतर करण्याचा स्वत: एंपिडोकल्सही प्रयत्न करीत असे. त्याचा विशेष परिचयाचा विषय म्हणजे वैद्यक व त्याच्या योगाने आतुर प्रकृतीच्या मनुष्याच्या शारीरिक स्थितीत एकाएकी जे फरक घडून येतात, त्यावरून हा अलौकिक सामर्थ्याचा आहे असा समज उभयपक्षी दृढतर झाला होता व आपण वाटेल ते करण्यास समर्थ आहो, अशी एंपिडोकल्सची कल्पना झाली होती. 'पिकांची नासाडी करणारे सोसाट्याचे वारे कसे थांबवावे व पुन: वाटेल तेव्हा कसे आणावे, काळ्याकुट्ट ढगांतून पर्जन्य कसा आणावा व उन्हाळ्याच्या प्रखर उष्म्याच्या वेळीही वृक्षसंगोपन करणारे निर्झर कसे खाली आणावेत? फार काय; पण नरकात गेलेल्या मृतांचेही पुनरुज्जीवन कसे घडवून आणावे, हे मी तुला शिकवीन' (Frag. 24). पायथागोरस मोठा गूढधर्मी खरा; पण एंपिडोकल्सची ही निःशृंखल वल्गना त्याच्यावर ताण करणारी होती. पायथागोरस हा किती झाला तरी गणिती व त्या शास्त्राचा त्याच्या एकंदर वर्तनावर बराच

परिणाम झाला होता; पण एंपिडोकल्स म्हणजे वैद्यविद्येचा अभिमानी व त्या कारणामुळे स्वभावगत उथळपणामुळे वल्गना करणारा, आपला मृत्यू कसा झाला हे कोणाला कळले नाही म्हणजे आपल्याला एक तहेचे देवत्व प्राप्त होईल, या भोळसर समजुतीने तो आपल्या मरणसमयी कोणीकडच्या कोणीकडे भटकत होता. कोणाचे म्हणणे आहे की, तो ग्रीसमध्येच मरण पावला; परंतु पुष्कळांचे असे म्हणणे आहे की, आपण अकल्पित रीतीने नाहीसे व्हावे म्हणून त्याने एटना ज्वालामुखी पर्वताच्या मुखामध्ये उडी टाकली. उडी टाकण्याच्या गर्दीत त्याचे एक पितळी चपात मागे राहिले व त्याच्या मरणाची खरी हकीगत षट्कर्णी झालीच! शास्त्रीय शोधाबद्दलची कळकळ व मनाचा उल्लूपणा यांचा असा चमत्कारिक घोटाळा होऊन बनलेला स्वभाव फारच क्वचित आढळेल. एंपिडोकल्स हा निरनिराळे जादूटोण्याचे किंवा मंत्रतंत्राचे प्रयोगही करीत असे व अशा एका प्रयोगाच्या वेळी आपण स्वत: हजर असल्याचे प्रसिद्ध सोफिस्ट गॉर्जिअस हा सांगत असे.

एंपिडोकल्समध्ये अगदी जादूच्याच तोडीची काही विद्या असेल, तर ती वाणीची मधुरता ही होय. या बाबतीत तो पारमिनाइड्सहून कितीतरी श्रेष्ठ होता. पारमिनाइड्सच्या अंगात प्रतिभा नसताना त्याने उगाच दीर्घवृत्तात्मक रचना करून कवित्वाचा डौल आणला; परंतु एंपिडोकल्स हा खरा कवी होता. अलंकारिक भाषा साधण्यामध्येही त्याचा हातखंडा असे व प्रसिद्ध सोफिस्ट गॉर्जिअस याला अलंकारिक या नात्याने पुढे जी प्रसिद्धी मिळाली, त्याचे पुष्कळसे श्रेय त्याचा गुरू एंपिडोकल्स यालाच दिले पाहिजे.

सत्यज्ञानप्राप्तीच्या मार्गातील अडचणी एंपिडोकल्सने दाखविल्या आहेत व त्यावरूनच सत्यज्ञानाची किंमत किती असली पाहिजे हे सुचविले आहे. 'मनुष्यांच्या इंद्रियांना ज्ञानप्राप्तीची फार थोडी साधने आहेत व अभ्यासी मनुष्यांच्या विचारांना कुंठित करण्यासाठी हजारो विघ्ने उभी आहेत. जीविताच्या एका भागाकडेच मनुष्याची नजर जाते व आपणास सर्व ज्ञान झाले असा त्याला भास होतो' (Frag. 2). आपले तत्त्वज्ञान मात्र सत्य आहे, असा अर्थातच एंपिडोकल्सचा निष्कर्ष आहे.

एंपिडोकल्सच्या मनावर पायथागोरसच्या मतांचा बराच परिणाम झालेला दिसतो. लॉरेल या लतांच्या पानांपासून अगदी अलिप्त असावे म्हणून जो त्याने उपदेश केला आहे (Frag. 440), त्यातील मतलब लक्षात येत नाही; परंतु त्याने वाटाण्याला स्पर्शदेखील न करण्याबद्दल जो कडक निर्बंध घातला आहे (Frag. 441) त्याचे मूळ पायथागोरसच्या नियमात आहे. याशिवाय पायथागोरसचे त्याला विशेष पटलेले मत म्हणजे पुनर्जन्म हे आहे. मनुष्याला नाना योनीतून व नाना स्थानांतून हिंडावे लागते, असे त्याचे मत दिसते. 'या जन्मापूर्वी मी एकदा कुमार, तर एकदा कुमारी, झाड, पक्षी, मासा इत्यादी होतो व या पृथ्वीवरील खुनी व क्रोधाची कृत्ये पाहून मला फार वाईट वाटले (Frag. 383 and 385). या कारणांकरिताच मनुष्याने हिंसा करू नये असे एंपिडोकल्स मोठ्या कळकळीने सांगतो.

'दुष्टपणाने हिंसा करण्याचे तुम्ही थांबवणार नाही काय? निष्काळजीपणाने तुम्ही एकमेकांस खाता हे तुमच्या कसे लक्षात येत नाही.' (Frag. 427). 'केवळ आकार बदलला म्हणजे बाप मुलाला व मुलगा बापाला, आई मुलीला व मुली आईला मारण्यास प्रवृत्त होतात व त्यांना प्राणहीन करून त्यांचे मांस खातात' (Frag. 430).

'अरेरे! ओठानेच मांस खाण्याचे नीच कृत्य करण्यापूर्वीच माझा प्राण गेला असता तर!' (Frag. 436). 'असे मांसाहारी प्राणी पुनः जन्माला येतात तेव्हा ते सिंह होतात व ते झाड झाले तर लॉरेल होतात, (Frag. 438) म्हणून लॉरेलला शिवू नये' (Frag. 440).

पारमिनाइड्सच्या मताने सद्वस्तू ही जन्ममरणातीत आहे. म्हणजे ती कधी उत्पन्न होत नाही व कधी नाशही पावत नाही व एवढ्यापुरती त्याची व एंपिडोकल्सची एकवाक्यता आहे; परंतु पारमिनाइड्सने त्यावरून गतिमत्तेची अशक्यता व निरुपयोगिता असल्याबद्दल जो निष्कर्ष काढला आहे तो एंपिडोकल्सला मान्य नाही. पारमिनाइड्सचे म्हणणे असे की, सद्वस्तू एकरूप असल्यामुळे व शून्यस्थळ अशक्य असल्यामुळे गती उत्पन्नच होणार नाही व कदाचित झाली असे गृहीत धरले तरी सद्वस्तु सर्व ठिकाणी एकरूपच असल्यामुळे ती गती असून नसून सारखीच ठरेल. या विरुद्ध एंपिडोकल्सचे असे म्हणणे आहे, की पारमिनाइड्सच्या म्हणण्याप्रमाणे सद्वस्तु जर एकरूप व एक संख्याक असती, तर अशी आपत्ती आली असती खरी; परंतु वस्तु जन्ममरणातीत असली तरी बहुविध व बहुसंख्याक आहे व म्हणूनच शून्यस्थलाच्या अभावीदेखील गती शक्य आहे. सद्वस्तूच्या समूहाचे घटक यांची परस्पर सापेक्ष स्थिती बदलल्यामुळे कार्यप्रवण गतिमत्ता उत्पन्न होते. एंपिडोकल्सचे म्हणणे उदाहरण घेऊन अधिक स्पष्ट करू. समजा की, एका खोलीमध्ये बरोबर वीसच माणसांना बसावयास जागा आहे, कोणालाही बाहेर जाता येत नाही किंवा कोणाला आतही येता येत नाही. अशा प्रसंगी त्यांच्यामध्ये गतिमत्ता काही अशक्य नाही. एक दुसऱ्याच्या जागेवर जातो आहे, तोच दुसरा तिसऱ्याच्या, तिसरा चौथ्याच्या अशा क्रमाने एका जागेची विल्हेवाट लागत गेली, तर त्या खोलीमध्ये केवढी तरी गती उत्पन्न होईल? बरे ही गतिमत्ता निरर्थकही नाही. याच उदाहरणामध्ये अशी कल्पना केली, की त्या खोलीला एक खिडकी आहे आणि त्या खिडकीतून निशाण मारावयाचे आहे, तर एखाद्या निशाणबाज मनुष्याला हळूहळू त्या खिडकीपर्यंत सरकून ते कार्य साधता येईल. या उदाहरणामध्ये ज्याप्रमाणे ती वीसही माणसे एकरूप नाहीत, त्याप्रमाणेच सद्वस्तूही एकरूप नाही, तर अनेकरूप व अनेकसंख्याक आहे आणि म्हणूनच गतिमत्ता शक्य व सार्थ आहे. असेच एक आधुनिक शास्त्रप्रयोगातील उदाहरण दिले तरी ते अस्थानी होणार नाही. सर्व बाजूंनी बंद अशा पाण्याने पूर्ण भरलेल्या भांड्याखाली आच लाविली असता, त्या भांड्यामध्ये जलशून्य मुळीच जागा नसताही गती उत्पन्न होते. या ठिकाणी गती उत्पन्न होण्यास आच हे एक कारण आहे, त्याप्रमाणेच सृष्टीमध्ये गतिमत्ता उत्पन्न होण्यास काय कारण आहे? या प्रश्नाचे उत्तर एंपिडोकल्सच्या

मताप्रमाणे पुढे येईलच. सध्या आपणास उदाहरणातून एखाद्या वस्तुसमूहाच्या घटकांची सापेक्ष स्थिती बदलली असता कशी गती उत्पन्न होते एवढेच पाहावयाचे आहे.

वस्तू बहुरूप व बहुसंख्याक आहे म्हणून म्हटले, तर ही रूपे किती व कोणती, हा पुढील प्रश्न आहे. वस्तू ही चतुःसंख्यांक आहे असे एंपिडोकल्सचे म्हणणे आहे. या वस्तुरूपांना तो 'वस्तुमुळे (Roots) असे नाव देतो. ही चार वस्तुमुळे म्हणजे पृथ्वी, आप, अग्नी व हवा अशी आहेत. पृथ्वीलाही एंपिडोकल्स मूळ द्रव्यात ढकलतो. यावरून तो थेल्सच्या काळाच्याही मागे पडत आहे व यादृष्टीने त्याची विचारसरणी मागासलेली आहे असे वाटेल; परंतु हवा किंवा वायू या मूलतत्त्वाची प्रतिष्ठा करण्यात त्याने शास्त्रीय ज्ञानामध्ये एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकले आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. या शोधाला मूळ प्रवृत्ती होण्यास कारण पारमिनाइड्सने प्रतिपादिलेली शून्यतेची अशक्यता हेही असावे. हवा म्हणजे अभावात्मक नसून भावरूप आहे हे एंपिडोकल्सने प्रथम सिद्ध केले एवढी गोष्ट खरी. हे सिद्ध करण्यास त्याने क्लिप्सिडा (Klepsydra) या नावाचे एक यंत्र उपयोगात आणले होते. या यंत्राची विशिष्ट रचना काय होती याची नक्की माहिती सापडत नाही; परंतु एंपिडोकल्सच्या त्रोटक लिहिण्यावरून साधारण अटकळ बांधावयाची म्हटल्यास आपणास त्याच्या या प्रयोगाची काहीशी कल्पना देता येईल. समजा की, आपण पितळेच्या किंवा प्रयोग अगदी सहज स्पष्ट दिसावा म्हणून काचेच्या दोन-चार अगदी सारख्या नळ्या घेतल्या व त्यांची टोके एका पातळीत येतील अशा त्या बांधल्या किंवा सांधल्या म्हणजे ती एक प्रकारची दोन-चार पुडे असलेली एकच नळी होईल. आता ही अनेक पुडांची नळी घेऊन त्याच्या एका बाजूची सर्व पुडे आपल्या हाताने किंवा बोटाने बंद करून ती नळी पाण्यात बुडवावी. आपण जोपर्यंत एका बाजूची तोंडे बंद केली आहेत, तोपर्यंत त्या पुडात दुसऱ्या टोकाने पाणी शिरणार नाही. कारण आतल्या पोकळीत हवा आहे व ती जोपर्यंत बाहेर गेली नाही, तोपर्यंत पाणी आत जाऊ शकणार नाही. जर हवा म्हणजे शून्यच असती तर पाणी शिरण्यास अडचण का पडावी? पण हवा तशी नाही. ती भावरूप आहे व म्हणूनच ती ज्या ठिकाणी आहे त्याच ठिकाणी पाण्याचा समावेश होऊ शकत नाही. आतील हवेचा दाब बाहेरच्या पाण्यावर पडून ते बाहेरच थांबविले जाते. आता आपण दुसऱ्या तोंडाकडील हात अगर बोटे उचलली तर हवेला निघून जाण्यास मार्ग मोकळा होतो व ती जसजशी निघून जाईल तसतशा प्रमाणाने पाणी पुडात येते. आपण जर एकाच पुडावरचे बोट उचलले तर तेवढ्याच पुडात पाणी येईल. यावरून हवा हा एक पाण्याइतकाच भावरूप पदार्थ आहे हे सिद्ध होत नाही काय? पुढे याच प्रयोगाची पुरवणी म्हणजे नळीची सर्व पुडे पाण्याने भरू द्यावी व मग आपल्या हाताने अगर बोटांनी नळीची वरची तोंडे अगदी गच्च झाकून नळी वर उचलावी. आपणास असे आढळून येईल, की जोपर्यंत वरील टोके गच्च झाकलेली आहेत, तोपर्यंत पुडातील पाणी खाली पडत नाही व जसजसे वरील आवरण कमी होईल, तसतसे पाणी निघून जाते. याचे कारण असे, की

या वर उचललेल्या नळीच्या भोवताली असलेली हवा त्या पुडांतून शिरण्याचा प्रयत्न करीत होती व वरची तोंडे बंद असल्यामुळे त्या हवेचा सर्व दाब खालील टोकांवर पडत होता. या दाबामुळे आतील पाणी थांबविण्यात येत होते; परंतु वरील तोंड मोकळे झाल्याबरोबर खालील दाब कमी झाला व पाणी निघून जाऊन पुनः पूर्ववत त्या पुडांमध्ये हवा भरली. हा किंवा असलाच प्रयोग म्हणजे प्रस्तुत काही एक नित्यपरिचयामुळे महत्त्वशून्य वाटणारी गोष्ट आहे; परंतु एंपिडोकल्सने त्यावेळी ती गोष्ट प्रथम स्पष्टपणे निदर्शनास आणली, ही त्याची मोठी महत्त्वाची कामगिरीच म्हणावयाची.

पृथ्वी, आप, तेज व वायू या स्वतंत्र व शाश्वत तत्त्वांच्या संमिश्रणाने सर्व सृष्टपदार्थ उत्पन्न झाले आहेत. अगदी लहानशा किड्यापासून ते हत्तीसारख्या अवाढव्य प्राण्यापर्यंत किंवा मनुष्यांपासून देवांपर्यंत सर्व याच द्रव्यांच्या मिश्रणापासून उत्पन्न झाले आहेत. एंपिडोकल्सने या ठिकाणी एका चित्रकाराचे उदाहरण घेतले आहे. ज्याप्रमाणे एखाद्या चिताऱ्याजवळ तीन-चारच विशिष्ट रंग असतात व त्या रंगाच्या कमी-जास्त प्रमाणात बनविलेल्या मिश्रणाने तो चितारी वाटेल त्या प्रकारची तसबीर खऱ्या पदार्थांशी बरोबर मिळेल, अशी बनवून देतो, त्याप्रमाणेच अपरिमित सृष्ट पदार्थांच्या मुळाशी वर सांगण्यात आलेली चार तत्त्वेच आहेत याबद्दल कोणी संशय मानू नये (Frag. 121). याच उदाहरणावरून आपल्या असेही लक्षात येईल, की वास्तविक पाहू जाता सृष्टपदार्थांना जन्मही नाही व मरणही नाही. चारही घटकद्रव्यांचा मिलाफ झाला म्हणजे उत्पत्तीचा भास होतो व तीच घटकद्रव्ये विभक्त झाली म्हणजे तो सृष्ट पदार्थ नाश पावला, असे आपण म्हणतो; परंतु वास्तविक पाहू जाता चार द्रव्यांशिवाय काहीच नाही व ती चार द्रव्ये विभक्त झाली म्हणून नष्ट होत नाहीत किंवा एकत्र झाली म्हणून वाढतही नाहीत. त्यांचे सान्निध्य-परानिध्य त्यांच्या परस्परसापेक्ष स्थितीच्या फेरबदलामुळे कार्यकारी होते. ज्याप्रमाणे तसबीर पुसली गेली तरी रंग नाहीसे होत नाहीत व ती काढली म्हणून वाढत नाहीत, त्याप्रमाणेच वस्तुमुळे ही वस्तूनिर्मितीच्या भरती-ओहोटीने अधिक किंवा न्यून होत नाहीत. त्यांची एकंदर गोळाबेरीज एकच असते. फक्त त्यांची परिस्थिती बदलते इतकेच (Frag. 36, 40, 45). जे वस्तुतः मुळात नाही, त्याजपासून सत्यवस्तूची उत्पत्ती होणे हे जितके अशक्य, तितकेच सत्यवस्तूचा सर्वथा नाश होणे अगदी अशक्य आहे. वस्तूंचे स्थान बदलो; पण त्या कोठेतरी असावयाच्याच (Frag. 48). अज्ञ मनुष्याला या सत्यज्ञानाची कल्पना येत नाही, त्याला आपण काय करावे?

सृष्ट पदार्थातील निरनिराळे पदार्थ घेऊन व त्यांचे पृथक्करण करून त्यात पृथ्वी, आप, तेज व वायू हीच तत्त्वे कशी आहेत हे दाखविण्याचा एंपिडोकल्सने फारसा प्रयत्न केलेला दिसत नाही. त्याचे ग्रंथावशेष हे अगदी अनुक्रमवार उपलब्ध नाहीत; त्यामुळे हे अत्यंत आवश्यक विवरण अनुपलब्ध ग्रंथावशेषात आले असावे, अशी कल्पना करण्यास जागा आहे. काही काही ठिकाणी असे काही विवरण सुचविल्यासारखे दिसते. दारू म्हणजे

झाडाच्या सालीखाली फेसाळलेले पाणीच होय (Frag. 221) किंवा पृथ्वी ही सर्व घन पदार्थांचा पाया आहे (96) इत्यादी स्थळे एंपिडोकल्सच्या विचारांचे दिग्दर्शन करण्यास पुरेशी आहेत. त्याप्रमाणे जळ किंवा वायू यांना काव्यमय नावे देऊन त्या त्या द्रव्यांच्याच सप्रमाण मिश्रणाने मनुष्याची हाडे व मांस निर्माण होतात, हे त्याने दाखविले आहे (Frag. 199, 203).

अशा रीतीने पारमिनाइड्सचा वस्तूच्या जन्ममरण राहित्याविषयी उपदेश स्वीकारूनदेखील व्यावहारिक जन्ममरणाची उपपत्ती दाखविता येते व गतिमत्तेची सुलभताही सिद्ध होते. कारण आता एकरूपत्व व नानाविधता, शाश्वतता व नाश यांचा विरोधच नाही. वस्तुमुळे सर्व ठिकाणी एकरूपच आहेत, त्यांची मिश्रणे मात्र नानाविध आहेत. वस्तुमुळे शाश्वतच आहेत. त्यांचे विशिष्ट समूह समूहरूपाने नाशवंत आहेत व याच कारणाकरिता या उभयतांमध्ये मुळीच विरोध नाही.

पारमिनाइड्सच्या विचारसरणीने प्राप्त होणारी एक आपत्ती अशा रीतीने टाळण्यात आली; परंतु या ठिकाणी पुन: असा प्रश्न शिल्लक राहिलाच, की मुळात ही गतिमत्ता उत्पन्न होण्यास प्रयोजन काय? गतिमत्ता शक्य असेल पण ती सुरू होण्यास प्रयोजन काय? काही तरी हेतूवाचून कोणतेच कार्य घडत नाही. मग या सृष्टीतील गतीच्या मुळाशी कोणता हेतू आहे? या प्रश्नाला एंपिडोकल्सने असे उत्तर दिले आहे, की या गतिमत्तेला कारण द्रव्यातील स्नेह (Love) किंवा द्वेष (Strife) हेच होय. द्रव्यातील परस्पर स्नेहामुळे ती एकत्र गोळा होतात व परस्पर द्वेषांमुळे त्यांचे मिश्रण नष्ट होऊन ती पुन: शुद्ध स्वरूपात परिवर्तन घडविण्यास प्रवृत्त होतात व या कारणाने दोन त-हेच्या गती प्रवृत्त होतात. याच गतींना अनुक्रमे मध्यबिंदुवर्ती (Centrifugal) व परिघवर्ती (Circumfugal) असे म्हणतात. ज्याप्रमाणे एखादा रोटीवाला पाण्यात कणीक मिसळतो व त्याचा तिंबून सुरेख गोळा बनवितो (Frag. 204) त्याचप्रमाणे या जगात परस्पर स्नेहाने संघटनात्मक कार्य होत आहे. आपल्याकडील वैशेषिक दर्शनामध्ये संग्रह म्हणजे संघटना याचे असाधारण कारण स्नेह हे सांगितले असून, स्नेह या शब्दाचा अनेक रूढ अर्थांपैकी प्रीती हाही एक अर्थ आहे, या गोष्टीची येथे आठवण झाल्यावाचून राहत नाही.

एपिडोकल्स लिहितो 'स्नेह व द्वेष पूर्वी होते व पुढेही राहतील. त्याव्यतिरिक्त कोठलाही बुद्धिगम्य काळ सापडणार नाही (Frag. 110); परंतु उलटपक्षी जेव्हा द्वेष सुरू होतो त्यावेळी घडून आलेली संघटना नाहीशी होते. फार काय पण आपणास ज्ञान होते तेही या स्नेहतत्त्वावरूनच होते. कारण आपण पृथ्वीनेच पृथ्वी पाहतो, पाण्यानेच पाणी, वायूनेच वायू व स्नेहद्वेषानेच स्नेहद्वेष अनुभवाला येतात' (Frag. 333).

या स्नेहद्वेषाच्या दोन लाटा आहेत, अशी एंपिडोकल्सची कल्पना आहे. पहिल्या प्रथम द्वेषाची लाट अगदी बाहेरच्या मर्यादेशी सुरू होते व ती आत आत जाता जाता अगदी

मध्यबिंदूपर्यंत जाते व नंतर पुनः स्नेहाची लाट उत्पन्न होऊन तीही थेट बाहेरपर्यंत येऊन पोहोचते. या दोन लाटांमुळे दोन प्रकारची व्यावहारिक उत्पत्ती व विनाश होतो. संघटित वस्तूंची विघटना करणे ही एक तऱ्हेने उत्पत्ती व एक तऱ्हेने विनाश व विघटित वस्तूंची संघटना करणे हेही उत्पत्ती-विनाशरूपच आहे. म्हणून उत्पत्ती व विनाश यांची ही लाट दोनदा उत्पन्न झाली म्हणजे एक परिवर्तन पुरे झाले असे म्हणावयाचे (Frag. 60, 74).

इतके विवरण झाल्यावरही असा एक प्रश्न शिल्लक राहतोच, की स्नेह आणि द्वेष यांचे तरी स्वरूप काय आहे? पृथ्वी, आप, तेज, वायू यांनी न बनविलेले असे ते एक स्वतंत्र घटकद्रव्य आहे, की काही निराळे आहे? शिवाय ते जडरूप आहे, की काही निराळे आहे? येथे हे लक्षात ठेविले पाहिजे, की एंपिडोकल्सच्या काळी अजड पदार्थाची कल्पना करण्याइतकी मनुष्याच्या मनाची तयारी झाली नव्हती. चारच वस्तुमुलांनी सर्व सृष्टीची उपपत्ती लागत नाही, गतीला मूळ हेतू म्हणून स्नेहद्वेषांचा उपन्यास करावा लागतो, अशी कल्पना करूनही अखेर एंपिडोकल्सने स्नेह व द्वेष यांना जडस्वरूपच बनविले आहे. फार काय ज्याला एंपिडोकल्स स्वत: बुद्धी किंवा Intelligence असे नाव देतो, त्याचे स्वरूप म्हणजे फुफ्फुसांच्या भोवतालचे रक्त हेच आहे असे त्याचे मत आहे (Frag. 327). एंपिडोकल्स हा वैद्यकविद्येत प्रवीण होता व म्हणून मनुष्याच्या शरीररचनेवरूनच त्याने सृष्टिरचनेची अस्पष्ट कल्पना केली आहे. एंपिडोकल्सनेच प्रथमत: रक्ताचे प्रवाह काळजापासून सर्व अवयवांकडे व पुनः परत काळजाकडे जातात याचा शोध लावला होता व या अपूर्व शोधाच्या प्रथमोत्साहात त्याच्याबरहुकूमच जगतातील घडामोडी होत आहेत, एवढे म्हणणेच पुरे आहे, असे त्याला वाटणे अगदी साहजिक आहे. ज्याप्रमाणे मनुष्याच्या श्वास व उच्छ्वास या क्रियांनी सर्व शरीरभर रक्ताचे प्रसरण सुरू होते, त्याप्रमाणेच स्नेहद्वेषरूपी श्वासोच्छ्वासाने जगतातील परिवर्तन चालू आहे एवढेच म्हणणे त्यावेळी अद्भुत होते. ज्याला आधुनिक शास्त्रामध्ये Force of attraction म्हणजे आकर्षणशक्ती व Force of repulsion म्हणजे विकर्षणशक्ती म्हणतात, त्याच्या शोधाकडे एंपिडोकल्सची प्रवृत्ती होती हेच महत्त्वाचे आहे. Matter म्हणजे जडद्रव्य व Force म्हणजे शक्ती यांचा भेद दाखवून शक्ती अमूर्त व अजड आहे, असे ठरविण्याइतकी एंपिडोकल्सच्या काळाची प्रगती झाली नव्हती.

त्याचप्रमाणे काही संघटना शक्य का व काही अशक्य का, याची एंपिडोकल्सला नीट उपपत्ती लावता आली नाही. 'पाण्याचे व दारूचे मिश्रण उत्तम होते. पण तेलाशी ते कधीच मिसळत नाही' (Frag. 284) व 'चकचकीत तागाच्या कापडावर शेंदरी रंग चांगला खुलतो' (Frag. 286) हा अनुभव कसा जुळवावयाचा येथे घोटाळा पडतो. पाण्याचा व दारूचा स्नेह आहे; परंतु त्याचा तेलाशी द्वेष आहे, एवढेच म्हणून चालत नाही. त्या त्या पदार्थांच्या शरीरछिद्रांमधील साम्य व वैषम्य हेच याचे कारण असावे, असा एक एंपिडोकल्सचा तर्क आहे.

सृष्टीतील नानाविध रचनांविषयीची एंपिडोकल्सची उपपत्ती अशीच अपूर्ण; पण मनोरंजक आहे. पुराणांतरी आपणास चमत्कारिक देहरचनांची वर्णने सापडतात. एखाद्याचा सर्व देह पुरुषाचा पण डोकेच तेवढे बैलाचे. कोणाला दोन डोकी, तर कोणाला चार हात, काही ठिकाणी अर्धी स्त्री आणि अर्धा पुरुष, तर काही ठिकाणी अर्धी स्त्री तर अर्धी नागीण. अशी जी वर्णने आहेत त्याची उपपत्ती एंपिडोकल्स अशी लावतो, की सृष्टीच्या आरंभी निरनिराळ्या प्राण्यांचे निरनिराळे अवयव अंतरिक्षामध्ये फिरत होते व केवळ सापेक्ष स्नेहाधिक्यामुळे चित्रविचित्र रचना झाली. म्हणजे एखाद्या मनुष्याच्या देहाला ताडाच्या शेंड्यापेक्षा बैलाचे डोके अधिक जवळचे म्हणून तेच त्याने उचलले, झाडाच्या फांद्यापेक्षा हात अधिक प्रिय म्हणून फांद्या टाळण्यासाठी एकाने हातच पत्करले. अशा रीतीची घालमेल होऊन विचित्र सृष्टिरचना झाली; परंतु कालक्रमाने ही घालमेल कमी होऊन तिला व्यवस्थित स्वरूप आले. मनुष्याच्या उत्क्रांतीची ही कल्पना मोठी मनोरंजक; परंतु अपरिपक्व व चमत्कारिक नाही काय?

पुरुष आणि स्त्री असा भेद होण्याचे कारण एंपिडोकल्स असे सांगतो की, 'गर्भाशयाच्या उष्णतर भागातून पुरुषाची उत्पत्ती होते व म्हणून ते अधिक कृष्णवर्ण, अधिक दणकट व केसाळ असतात' (Frag. 276); पण अगदी आरंभी स्त्री कशी झाली व तिला पुरुषांहून निराळी गर्भ रचना कशी झाली, याची काही यात उपपत्ती लागत नाही.

ज्या वेळेस निरनिराळी चार द्रव्ये पृथक झाली, त्यावेळी अग्नीने बराच गोलार्ध व्यापला व हवा खालच्या गोलार्धात गेली; परंतु या गतीमुळे सृष्टीच्या घनगोळाचा समतोलपणा बिघडून आकाशाची दैनंदिन गती सुरू झाली आणि याच गतीमुळे पृथ्वी मध्यभागी राहिली. जर अग्नी पुनः पुनः पृथ्वीखाली झाला नसता, तर पृथ्वी पडून गेली असती. या अग्निमय गोलार्धालाच दिवस म्हणतात आणि वायुमय गोलार्धाला रात्र असे नाव पडले आहे. याच अग्निमय गोलार्धातून पृथ्वीवर प्रकाश पडतो व ज्याप्रमाणे एखाद्या वर्तुळाकृती आरशावरून उन्हाचे सर्व किरण एका केंद्रात जमून त्यांचा तेजस्वी कवडसा होतो, त्याप्रमाणेच या पृथ्वीवर पडलेला तो प्रकाश ज्या केंद्रात मिळाला आहे त्यालाच सूर्य असे म्हणतात. या गोष्टीची उपपत्ती काय, हे एंपिडोकल्सच्या लिहिण्यात येत नाही. चंद्र हा मात्र परप्रकाशित असून एखाद्याच्या रथामागे फिरावे, त्याप्रमाणे पृथ्वीच्या भोवती तो फिरतो असे त्याचे म्हणणे आहे (Frag. 154). रात्री काळोख पडतो याचे कारण पृथ्वी अग्निमय गोलार्धाच्या आड येते हे होय (Frag. 160).

ज्या वेळेस ही पृथ्वी व हा समुद्र निर्माण झाला नव्हता, ज्यावेळी तेजस्वी सूर्य व अंधारी रात्र ही सारखीच अज्ञात होती, तेव्हा सर्व संवादात्मक (Harmoy) स्थळी, घनस्वरूप, ईश्वर निरतिशय शांततेचा आनंद भोगीत होता (Frag. 135). त्या परमेश्वराजवळ प्रत्यक्ष जाणे तर दूरच; पण तो आपल्या डोळ्यांच्याही टप्प्यात येत नाही. त्याला हात नाहीत,

पाय नाहीत. त्याचे स्वरूप म्हणजे पवित्र व अनिर्वाच्य मन हे आहे व हेच मन सर्व सृष्टीतून बाणासारखे संचार करीत आहे (Frag. 344). अमूर्त किंवा अजड अशा तत्त्वाची कल्पना करण्याइतकी तयारी न झाल्यामुळे एंपिडोकल्सच्या बुद्धीची धाव येथेच थांबली, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. परमेश्वराचे मूळ स्वरूप मात्र फार साधे असून, पुढे पुढे पशुहिंसा करून परमेश्वराला खुश करण्याचा सुरू झालेला प्रकार मात्र अत्यंत अनुचित आहे, असे एंपिडोकल्सचे मत होते.

ॲनॅक्झॅगोरॅस

तत्त्वज्ञानाच्या इतिहासामध्ये अथेन्सचे नाव प्रथम याच तत्त्वज्ञाच्या हकीगतीत येते. ॲनॅक्झॅगोरॅस हा मूळचा अयोनियामधील क्लिझोमिनी (Clazomenae) येथील राहणारा असून, त्याच्या वडिलांचे नाव हेगिसिबूलॉस (Hegesiboulos) असे होते. तो ख्रि. पू.च्या पाचव्या शतकाच्या मध्य भागाच्या सुमारास अथेन्समध्ये आला व पुढे सरासरी तीस वर्षेपर्यंत तेथेच होता. प्रख्यात अथीनिअन मुत्सद्दी पेरिक्लीज याजबरोबर त्याचा गाढ स्नेहसंबंध असून, त्याच्या बोलावण्यावरूनच ॲनॅक्झॅगोरॅस अथेन्सला गेला होता, असे कित्येकांचे म्हणणे आहे. अथेन्सच्या बौद्धिक उत्कर्षाचा पाया घालण्यास जी मंडळी कारणीभूत झाली त्यातच ॲनॅक्झॅगोरॅस होता, यात काही संशय नाही. प्रख्यात नाटककार युरिपाइडिज, अलौकिक इतिहासकार थ्युसिडायाडिस व सर्वमान्य सोफिस्ट प्रोटॅगोरॅस यांचा व ॲनॅक्झॅगोरॅसचा स्नेहसंबंध होता व त्यांच्याप्रमाणेच त्याची त्यावेळी ख्याती होती. ही एकच गोष्ट त्याच्या कार्याच्या महत्त्वाची साक्ष देत आहे. या नव्या विद्येचा प्रसार विशेषतः सरदार घराण्यातच अधिक झाला होता व लोकपक्ष आणि सरदारपक्ष यांच्या चुरशीत ॲनॅक्झॅगोरॅस हा विनाकारण बळी गेला. सृष्टीविषयी त्याने जी भौतिक उपपत्ती लावली व ग्रीक लोकांना अत्यंत प्रिय असलेल्या सूर्यदेवालाही एक लाल तापलेला लोखंडी गोळा ठरविले, त्यामुळे चिडून जाऊन त्यांनी ॲनॅक्झॅगोरॅसला शिक्षा केली असे कित्येकांचे म्हणणे आहे. कदाचित ॲनॅक्झॅगोरॅसची भौतिक उपपत्तीच या संकटाला कारण नसून त्याची काही विशेष आक्षेपार्ह भाषासरणीही झाली असेल असा तर्क केल्यास तोही पुष्कळ संभवनीय दिसतो. कारण त्याच वेळी डायागोरस (Diagoras) या नावाच्या एका नास्तिकाची चौकशी झाली. त्यावेळी अथीनियन लोकांचा विशेष कटाक्ष त्याच्या नास्तिकवादावर नसून त्याने ग्रीक देवता किंवा त्यांचे उत्सव यांविरुद्ध वापरलेल्या अश्लाघ्य भाषेवर होता. एखाद्यास देवाचे अस्तित्व मानावयाचे असल्यास मानावे किंवा मानू नये; परंतु सर्व समाजाला संमत असलेल्या देवदेवतांची अश्लाघ्य भाषेने निंदा करू नये, असा अथीनियन लोकांचा कटाक्ष दिसतो. ते कसेही असो, ॲनॅक्झॅगोरॅसवर फिर्याद होऊन त्याला बंदिवासात पडावे लागले व आपला प्राण वाचविण्यासाठी, पेरिक्लीजच्या साहाय्याने आपली मुक्तता करून घेऊन, त्याला लांबसॅकॉसला पळ काढावा लागला. पुढे तो काही दिवस लांबसॅकॉस येथेच राहिला

व तेथेही त्याने आपला पंथ स्थापन केला. तथापि, एकंदरीत ॲनॅक्झॅगोरॅसचा पुष्कळ काळ अथेन्समध्येच गेला असल्यामुळे अथेन्समधील सर्वांत अधिक जुना तत्त्वज्ञ तोच, असे म्हणण्यास काही हरकत नाही.

ॲनॅक्झॅगोरॅसच्या जन्मकाळाविषयी बराच वाद आहे. ॲरिस्टॉटलने एका ठिकाणी असे म्हटले आहे की, 'ॲनॅक्झॅगोरॅस हा एंपिडोकल्सपेक्षा मोठा होता; परंतु लिहिण्यामध्ये तो त्याच्या मागे होता.' या म्हणण्याचा अर्थ, त्याने एंपिडोकल्सनंतर लिहावयास सुरुवात केली; परंतु त्यावेळी त्याचे वय एंपिडोकल्सपेक्षा अधिक होते, असाच घ्यावयाचा किंवा तो एंपिडोकल्सच्या वयाने मोठा असूनदेखील त्याची लेखनशक्ती एंपिडोकल्सच्या शक्तीपेक्षा पुष्कळच कमी होती असा घ्यावयाचा, हे नक्की सांगता येत नाही. त्याचप्रमाणे त्याजवर झालेली फिर्याद कधी झाली हेही नक्की नाही. अथेन्स व स्पार्टा यांजमध्ये जे पेलॉपोनीससचे युद्ध सुरू झाले, त्याच्या आधी ही गोष्ट घडून आली असावी असा तर्क आहे. तथापि, या गोष्टीचा काळ बराच मागे नेण्यासही काही विशेष हरकत दिसत नाही. सॉक्रेटिसने ॲनॅक्झॅगोरॅसच्या मतांचा अनेकदा उल्लेख केला आहे व त्यापासून आपले समाधान झाले नाही म्हणून म्हटले आहे; परंतु प्लेटोने आपल्या संवादामध्ये त्याची व सॉक्रेटिसची भेट झाल्याचा कोठेच उल्लेख केला नाही. ॲनॅक्झॅगोरॅसचे मित्र व प्रख्यात सोफिस्ट प्रोटॅगोरॅस याजबरोबर सॉक्रेटिसचा झालेला संवाद प्लेटोने दिला आहे. यावरून ॲनॅक्झॅगोरॅसवर अधार्मिकतेबद्दल झालेली फिर्याद पूर्वीच झाली असून, सॉक्रेटिसच्या तरुणपणीदेखील तो स्वतः अथेन्समध्ये नसावा, केवळ त्याचे मत मात्र परंपरेने राहिले असावे, असे अनुमान करण्यास जागा आहे.

ॲनॅक्झगोरॅसचा व अथेन्सचा कितीही संबंध झाला तरी त्याने आपला अयोनियातील विशेष संस्कार कधीही सोडला नाही. अयोनियातील तत्त्वज्ञानाच्या पद्धतीला अनुसरून त्याने आपली ग्रंथरचना गद्यात केली ही तर महत्त्वाची गोष्ट आहेच; पण ॲनॅक्झिमीनसची सृष्टीरचनेसंबंधीची मतेदेखील त्याने सोडली नाहीत, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

एंपिडोकल्सने विविध सृष्टीच्या उत्पत्तीला आधारभूत अशी चार द्रव्ये मानली व त्यांना सन्मूले असे नाव दिले. ॲनॅक्झॅगोरॅसने ते वस्तूच्या मूळ घटकांना 'बीजे' असे नाव दिले आहे; परंतु एंपिडोकल्सची मूळ द्रव्ये व ॲनॅक्झॅगोरॅसची बीजे यामध्ये फार अंतर आहे. मनुष्याच्या शरीरातील हाडासारखा एक पदार्थ घेतला तर एंपिडोकल्सचे असे म्हणणे होते की, पृथ्वी, आप, तेज व वायू यांच्या विशिष्ट परिणामात झालेल्या एकीकरणाने हा पदार्थ तयार झाला आहे; परंतु ही कल्पना अनॅक्झगोरॅसला पसंत नव्हती. तो असे उदाहरण देतो, की मनुष्य अन्न व उदक यांचे सेवन करतो व त्यापासून त्याच्या अंगावर केस उगवतात, शरीरात रक्त वाढते व त्याची हाडे कणखर होतात. आता हे अन्नोदकाचेच परिवर्तन आहे म्हणावे तर ही गोष्टी मोठी कठीण आहे. एका वस्तूची दुसरी वस्तू कशी होईल? वस्तूचे

मूळ द्रव्ये म्हणून काही एंपिडोकल्स सांगतो, ते तरी आपले मूळ रूप काय म्हणून टाकील? (Frag. 10) यावरून एंपिडोकल्सची उपपत्ती पुरेशी होत नाही.

तर मग या विविध सृष्टीच्या उपपत्तीचा खरा मार्ग कोणता? व ॲनॅक्झॅगोरॅस ज्याला वस्तुबीजे म्हणतो, त्यांचे स्वरूप तरी काय? ॲनॅक्झॅगोरॅसचे असे मत आहे, की आपण जर मनुष्याच्या शरीरातील हाड व रक्त हे दोन पदार्थ घेतले व त्यांचे अगदी लहान लहान विभाग पाडीत गेलो व अशा रीतीने त्यांचे पृथक्करण करू लागलो, तर त्यांचे अनंत अवयव होतील; परंतु आपणास सरते शेवटी असे आढळून येईल, की हाडकाच्या प्रत्येक अंशात हाडकाचेच सर्व गुण अंशतः सापडतात व रक्ताच्या अंशात रक्ताचे गुण सापडतात. हाच नियम सर्व पदार्थांना लागू आहे. यावरून नानाविध व नानागुणक अशा पदार्थांच्या मुळाशी जे तितक्याच प्रकारचे व त्याच गुणाचे त्यांचे अंश आहेत, अशी ॲनॅक्झॅगोरॅसची कल्पना होती, त्या अंशांना त्याने वस्तुबीजे असे नाव दिले आहे. या नामकरणामध्ये कदाचित असाही गर्भित अर्थ असेल, की ज्याप्रमाणे एक वृक्ष दुसऱ्या वृक्षापासून जितका व ज्या गुणांमुळे भिन्न, तितकीच त्या त्या वृक्षांची बीजेही एकमेकांपासून तितकीच व त्याच गुणांमध्ये भिन्न असतात. त्याप्रमाणेच हे वस्त्वंश एकमेकांपासन भिन्न असतात. याच मताला गुणपरमाणुवाद किंवा Oualitative atomism असे नाव देतात. आपल्या इकडील वैशेषिक दर्शनामध्ये विशेष हा एक पदार्थ मानला आहे व त्यावरूनच त्याला वैशेषिक हे नाव पडले आहे. हे वैशेषिक दर्शन गुणपरमाणुवादी आहे असेच म्हटले पाहिजे. विशेष हा पदार्थ मानण्याची जरूर काय, असा प्रश्न उपस्थित झाला तर वैशेषिक असे म्हणतात, की आपण एक घट व एक पट अशा दोन वस्तू घेतल्या तर त्या एकमेकांपासून भिन्न आहेत, याचे कारण त्यांचे अवयव भिन्न आहेत; पण अशा रीतीनेच या अवयवांचेही अवयव पाडीत आपण पुढे गेलो तर सरतेशेवटी आपणास जे अविभाज्य सूक्ष्म वस्त्वंश सापडतात त्यासच परमाणू म्हणतात. पाश्चात्त्य राष्ट्रांतील परमाणुवादाचा उदय ॲनॅक्झॅगोरॅसपासून झाला व पुढे ल्युसीपसने त्याला अधिक स्पष्ट स्वरूप दिले, ही हकीगत याच भागात पुढे येणार आहे. वैशेषिक म्हणतात, की हे घटाचे मूळ परमाणू व पटाचे मूळ परमाणू हेही एकमेकांपासून भिन्न आहेत व ते ज्यामुळे भिन्न आहेत त्यालाच आम्ही विशेष असे म्हणतो. एका वस्तूची दुसऱ्या वस्तूपासून अत्यंत व्यावृत्ती होण्याचे कारण विशेष आहे. फार काय, एका घटाचे जे मूळ परमाणू तेही परस्पर भिन्नच आहेत आणि त्यांचा भिन्नपणाही त्या विशेषावरच अवलंबून आहे. ज्याअर्थी हे परमाणू अनेक आहेत, त्याअर्थी विशेषही अनंतच आहेत. ॲनॅक्झॅगोरॅसचेही असेच मत दिसते, की ते वैशेषिक दर्शनाइतके स्पष्ट मांडले गेलेले नाहीत, हे मात्र खरे.

ॲनॅक्झॅगोरॅसच्या मताप्रमाणे ही वस्तुबीजे अगदी भिन्न भिन्नधर्मीय आहेत अशी कल्पना केली, तर अशी एक अडचण उपस्थित होते, की विविध पदार्थांच्या उत्पत्तीचे कोडे

सुटल्यासारखे वाटते; पण सुटत नाही. हाडाचे व रक्ताचे अत्यंत सूक्ष्य अंश एकमेकांपासून भिन्न असावेत हे म्हणणे ठीक आहे; पण पुढे असा प्रश्न उपस्थित होतो, की अन्नपाण्यापासून रक्तमांसाची वृद्धी कशी होते किंवा हाडे बळकट कशी होतात? झाडाला पाणी घातले तर त्याला पाणी न फुटता पाने कशी फुटतात किंवा गायीला चारा घातला असता तिला दूध कसे येते? या पदार्थांमध्ये परस्पर साम्य तर काही दिसत नाही, मग ही सृष्टीतील विविध रचना या वस्तुबीजांमधून कशी व्हावयाची? यावर असे लक्षात ठेवावयाचे, की ॲनॅक्झॅगोरॅसच्या मते ही वस्तुबीजे अनंत आहेत एवढेच नव्हे तर सर्वगुणसंपन्न आहेत. जगतामध्ये जे जे गुण आहेत ते ते सर्व त्याच्या अत्यंत सूक्ष्म बीजांमध्येही आहेत. एक वस्तुबीज दुसऱ्यापासून छाटून दूर केलेले नाही असे जे तो म्हणतो त्याचा मथितार्थ हाच दिसतो. यावरून असा निष्कर्ष निघतो, की प्रत्येक वस्तू प्रत्येक दुसऱ्या वस्तूत अंशत: आहेच व त्यावरून विविधसृष्टीची रचना व भिन्नधर्मीय वाटणाऱ्या पदार्थांची उत्पत्ती शक्य आहे. वर घेतलेल्या उदाहरणाकडे पुनः वळून आपणास असे म्हणता येईल, की अन्नपाण्यापासून हाडे वाढतात याचे कारण अन्नपाण्यातही हाडांचा अंश असतो हेच होय. पाण्यात पाने व पानात पाणी हे अंशतः आहेच. दूध घेतले तरी त्यात गवताचा अंश आहेच व गवत तरी दुधाच्या अंशाशिवाय नाहीच. मग वस्तूचा अन्यथाभाव कसा होईल ही अडचण कशी उपस्थित होईल? आपल्याकडील वेदान्त ग्रंथामध्येही ही विचारसरणी काही काही ठिकाणी घेतली आहे. उदाहरणार्थ, श्रीरामानुजाचार्य आपल्या ग्रंथामध्ये, सर्वत्र सत्ख्याती म्हणजे सत्स्वरूप वस्तूचीच प्रतीती आहे हे सांगण्यासाठी ते म्हणतात, की सर्व वस्तू या एकाच द्रव्यांच्या त्रिवृत्करणाने सिद्ध झालेल्या असल्यामुळे प्रत्येक वस्तूत दुसरी प्रत्येक वस्तू आहेच, असे म्हणावयास हरकत नाही व म्हणूनच सर्व ठिकाणी सत्ख्याती आहे. उदाहरणार्थ चकचकणारी शिंपी पाहून ती चांदी आहे म्हणून मनुष्य उचलावयास जातो, त्या ठिकाणी त्याला नसणारी चांदी दिसली, की असलेली चांदी दिसली, असा प्रश्न येतो व निरनिराळ्या पंथाचे लोक त्याला निरनिराळी उत्तरे देतात; परंतु श्रीरामानुजाचार्य म्हणतात की, येथे जी चांदी त्या मनुष्याला दिसली ती खरीच चांदी आहे. कारण चांदीत शिंप आहे व शिंपेतही चांदी नाही, असे नाही. कदाचित अदृष्टवशाने मनुष्याला शुत्क्यंश मुळीच न दिसता रूप्यंश मात्र दिसतो व मनुष्याला ही चांदी आहे असे वाटते.

प्रत्येक वस्तूत दुसरी प्रत्येक वस्तू आहे असे म्हटले तर मग एक वस्तू दुसऱ्यापासून वेगळी आहे असे तरी कसे म्हणावयाचे? अन्नात हाडे व हाडात अन्न असेल तर एकाला अन्न का म्हणावयाचे व दुसऱ्याला हाड का म्हणावे? यावर ॲनॅक्झॅगोरॅसचे असे उत्तर आहे, की वस्तूमध्ये जो भाग अधिक असेल त्यावरून त्याचे नाव पडते. अन्नामध्ये अन्नाचा अंश अधिक आहे व हाडाचा फार थोडा आहे म्हणून त्याला अन्न म्हणतात. श्रीरामानुजानींही हेच उत्तर दिले आहे. शिंपीत रूपे असूनही तिला शिंप म्हणण्याचे कारण तरी हेच की, तिजमध्ये

शिंपीचा अंश अधिक आहे. या जगताच्या आरंभी जो एक अव्यवस्थित वस्तुबीजांचा ढीग होता, त्यामध्येही हवा किंवा अग्नी यांचेच आधिक्य असल्यामुळे त्याचे स्वरूपही अग्निमय किंवा वायुमय आहे असे भासणे अगदी स्वाभाविक आहे. ॲनॅक्झॅगोरॅस हा अयोनियन होता व म्हणून त्याचा मूळपासून ॲनॅक्झिमीनसकडे ओढा होता व एंपिडोकल्सच्या मताप्रमाणे हवा किंवा वायू हे एक स्वतंत्र तत्त्व झाल्यावरही आपल्या मूळ गुरूची एक त-हेची तरफदारी करण्याचाच या ठिकाणी ॲनॅक्झॅगोरॅसने प्रयत्न केला आहे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून ॲनॅक्झॅगोरॅसची गणना माध्यमिक पंथात (Mediators) का केली जाते हे लक्षात येईलच. त्याच्या मते वस्तुबीजे ही एकरूप म्हणजे अविकृतच आहे. फक्त त्यांच्या भिन्न भिन्न प्रमाणातील मिश्रणाने विविध सृष्टींची रचना झाली आहे व यातच पारमिनाइड्च्या व सृष्टिवाद्यांच्या मताचा समेट झाला आहे.

यापुढील विशेष महत्त्वाचा प्रश्न म्हणजे गतीचे मूळ कारण काय हा होय. एंपिडोकल्सने त्याचे उत्तर स्नेह व कलह असे दिले होते. ॲनॅक्झंगोरॅसचे मत याहून निराळे आहे. पारमिनाइड्सच्या विवेचनाने पदार्थांमध्ये स्वयंसिद्ध गती नाही हे सिद्ध झाले होते व म्हणन त्याजमध्ये गती उत्पन्न होण्यास काहीतरी आगंतुक कारण अवश्य हवे होते. सृष्टीमध्ये सभोवार नजर फिरविली असता असे आढळून येते, की त्याचे व्यापार अव्यवस्थित नसून अगदी रेखलेले आहेत. विशेषतः आकाशातील तारकापुंजांच्या गती परस्पर संवादी असून नियमबद्ध आहेत. पायथागोरसच्या मताप्रमाणे तर हे गोल एकाच तालावर फिरत आहेत. ॲनॅक्झॅगोरॅसहाही एक गणिती होता. अशी त्याची ख्याती असल्याचे कित्येक ग्रंथकार म्हणतात व पायथागोरसच्या मताची त्याला चांगली माहिती असावी हे अगदी साहजिकच आहे. आता जगातील सर्व गती जर काही नियमानुरूप असतील तर त्या नियमाचा किंवा कायद्याचा कोणीतरी कर्ता पाहिजेच व तो कर्ता बुद्धिगुणोपेत पाहिजे. असा बुद्धिगुणोपेत चालक ज्याप्रमाणे शरीरात त्याप्रमाणेच अखिल सृष्टीतही मनच आहे. त्याला ॲनॅक्ॅगोरॅसने नाऊस असे नाव दिले आहे. एका बाजूला सर्व जड वस्तू व दुसऱ्या बाजूला त्याहून अतिशय भिन्न व सर्वचालक असे मन, याप्रमाणे हे द्वैत स्थापन झाले. जड व अजड यांचे हे भिन्नत्व ॲनॅक्झॅगोरॅसने प्रथम पुढे मांडले. त्याच्या मते मनाला इतके स्वातंत्र्य आहे, की ते एकच असंमिश्र आहे. प्रत्येक पदार्थात दुसरी प्रत्येक वस्तु असते हा सामान्य नियम मनाला मात्र लाग नाही. मनाला मात्र स्वतंत्र अस्तित्व आहे. ते आपण होऊन ज्या पदार्थांशी मिसळेल तो पदार्थ सचेतन होतो व दुसरा अचेतनच राहतो. सृष्टीच्या नियमबद्धतेवरून त्याच्या मुळाशी बुद्धिरूप तत्त्व असावे असे अनुमान काढून परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध करणाऱ्या मताला Teleology बुद्धिमत्कर्तृकवाद असे नाव आहे व या मताचा मूळ पाया ॲनॅक्झॅगोरॅसच्या मतात आहे.

हे मन किंवा ही बुद्धी प्रथमतः चक्राकार गती उत्पन्न करते व त्यापासून इतर सर्व गती उत्पन्न होतात, असे ॲनॅक्झॅगोरॅसचे म्हणणे आहे. या मनालाच तो ईश्वर असे नाव देतो. यावरून तो खऱ्या दृष्टीने पूर्ण आस्तिक्यवादी आहे, असेच म्हटले पाहिजे. या मनाव्यतिरिक्त इतर वस्तूंना कोणी देव मानल्यास, ते त्याला न खपून तो झेनोफेनसप्रमाणेच त्याची टवाळी करी हे खरे व त्याच्या दृष्टीने अदेव असणारे कित्येक पदार्थ ग्रीक लोकांच्या मते देवच होते हेच त्याच्यावर आलेल्या नास्तिकत्वाच्या आरोपाचे मूळ आहे.

आपण एखाद्या नागमोडी रस्त्याच्या पहाडातून प्रवास करीत असलो तर पुष्कळ वेळा असे होते, की आपली मुक्कामाची जागा अगदी जवळ आलेली दिसते; परंतु लगेच रस्त्याला वाकण लागते व आपल्या नजरेसमोर दिसणाऱ्या त्या विश्रामस्थानाला पोहोचण्यास आपणास कित्येक मैल प्रवास करावा लागतो. तत्त्वशोधनामध्ये तरी हीच तऱ्हा आहे. आपणास क्षणभर असे वाटते, की या विश्वाचे कोडे उलगडले; पण पुनः पाहावे तो आपण अनिश्चिततेच्या नागमोडी रस्त्याने भटकता भटकता त्या प्रत्यक्ष सुखापासून कितीतरी वेळ लांबच रहातो. ॲनॅक्झॅगोरॅसने मन किंवा बुद्धी या अजड व स्वतंत्र तत्त्वाची स्थापना केल्याबरोबर क्षणभर असे वाटते, की आता विश्वाचे कोडे खास उलगडेल; पण पुनः पाहावे तो आपले परिभ्रमण कायमच. मनाचे स्वरूप काय, असा प्रश्न उपस्थित झाल्याबरोबर ॲनॅक्झॅगोरॅसची गडबड उडते व मन हे जड द्रव्याच्या सर्वांत सूक्ष्म अंशांनी बनलेले एक तहेचे द्रव्यरूप तत्त्व आहे असेच काहीतरी म्हणून त्याला वेळ मारून न्यावी लागते. या कारणाकरिताच सॉक्रेटिसने ॲनॅक्झॅगोरॅसचे मत असमाधानकारक आहे असे म्हटले आहे. सर्व भौतिक सृष्टीचे कोडे मनाच्या जोरावर त्यास उकलले आहे म्हणून मोठ्या आस्थेने जो ते पाहू जावे तो ते मनच अखेर भौतिक निघते. मग एवढ्या खटपटीचा उपयोग तरी काय? ॲनॅक्झॅगोरॅसचे मत सूचक या दृष्टीने मात्र अतिशय महत्त्वाचे आहे. त्या दिव्य बुद्धितत्त्वाची त्याला पूर्ण ओळख झाली नाही तरी त्याने ती अपूर्णत्वाने तरी ओळखली व पुढे मांडली हीच त्याची तत्त्वज्ञानविषयक मोठी सेवा होय.

चंद्र, सूर्य इत्यादी खगोलस्थ वस्तूंविषयी ॲनॅक्झॅगोरॅसची मते मोठी चमत्कारिक होती. चंद्र व सूर्य हे लाल तापलेले दगड किंवा लोखंडाचे गोळे आहेत, असे तो म्हणे व त्याजवर अधार्मिकतेचा आरोप येण्यास हेच त्याचे शब्द कारणीभूत झाले असावेत. कारण ग्रीक लोक सूर्याची पूजा करीत व सूर्य म्हणजे एक धोंडा किंवा लोखंडाचा गोळा, असे म्हणणे त्यांच्या दृष्टीने नास्तिकपणाचेच होते. ख्रि.पू. सुमारे ४६८ - ७ व्या वर्षी ग्रीस देशामध्ये एक मोठी उल्का पडली होती व या उल्काशिलेवरून ॲनॅक्झॅगोरॅसची अशी कल्पना होती, की असेच कित्येक दगड किंवा लोहगोळ पृथ्वीपासून विभक्त होऊन, गोफणीतून फेकलेल्या गोळ्याप्रमाणे पृथ्वीभोवती फिरत असावे, त्यापैकी सूर्य हा गोळा पेलोपोनिसस किंवा दक्षिण ग्रीस एवढा मोठा असावा, असे त्याचे अनुमान होते. चंद्र परप्रकाशित आहे, असेच त्याचे

मत होते. सूर्यग्रहण हे चंद्र, पृथ्वी व सूर्य यांजमध्ये आल्यामुळे होते हे त्याला कबूल होते; परंतु पृथ्वीचा घनगोल आकार त्याला मान्य नव्हता. या बाबतीत तो ॲनॅक्झिमीनसच्याच मताला चिकटून राहिला होता. पृथ्वी ताटलीसारखी आहे, अशाच मताचा त्याने स्वीकार केला होता. म्हणून चंद्रग्रहणाची उपपत्ती लावण्यासाठी त्याला आपणास अदृश्य अशा काही काळ्याकुट्ट वस्तूंच्या अंतरिक्षातील भ्रमणाची कल्पना पत्करावी लागली.

ल्युसीपस

ॲनॅक्झॅगोरॅस व ल्युसीपस यांजमध्ये गुरू-शिष्याचे नाते असल्याचा कोठेही उल्लेख नाही. ल्युसीपसचे जन्मस्थान मायलीटस किंवा इलिया याबद्दलही संशयच आहे. तथापि, तो इलिया येथील पंथाशी विशेष परिचित असून, त्याचा त्यातल्या त्यात झेनोशी विशेष संबंध होता; परंतु ल्युसीपसने इलियाटिक पंथालाच चिकटून न राहता एंपिडोकल्स व ॲनॅक्झॅगोरॅसप्रमाणेच दोन्ही पक्षांमध्ये एकत्र्हेची तडजोडच काढण्याचा प्रयत्न केला व म्हणून त्याचा विचार याच माध्यमिक पंथांच्या प्रकरणात करणे योग्य आहे.

ल्युसीपससंबंधी आपणास जवळ जवळ काहीच माहिती नाही, असे म्हटले तरी चालेल. एवढेच नव्हे तर, त्याच्या गुरूहूनही विशेष प्रसिद्ध शिष्य डिमॉक्रीटस याच्या मतांपासून त्याची मते किंवा ग्रंथावशेष निराळे काढण्यासही ॲरिस्टॉटल व थिओफ्रेस्टॉस यांचेच श्रम करणीभूत झाले आहेत.

एंपिडोकल्सने विविध सृष्टींची उभारणी चार मूलद्रव्यांवर आहे असे दाखविले व ॲनॅक्झॅगोरॅसने त्याच विविधतेचा नियमित चारच मूळ द्रव्यावर न ठेवता अनंत गुणपरमाणूवर रचला; परंतु ल्युसीपसचे मत या दोघांहूनही निराळेच आहे. तो म्हणतो की, वस्तू ही केवळ शरीर म्हणजे जडद्रव्य आहे व म्हणूनच तिजमध्ये गुण आहेत ही कल्पना फोल आहे. इतक्या पुरता तो इलियाटिक पंथाचा पूर्ण अनुयायी आहे; परंतु त्याच्या मते पारमिनाइड्स म्हणतो त्याप्रमाणे वस्तू एक नसून अनंत आहे आणि ही सृष्टीची अत्यंत सूक्ष्म अनंत रूपे म्हणजे परमाणू होत. मेलीससने असा एक मुद्दा पुढे आणला होता, की जर कदाचित आम्ही म्हणतो त्या विरहित दुसरी सद्वस्तू असेल तर ती हुबेहूब आमच्याच वस्तूसारखी असली पाहिजे व ती इतकी सारखी होईल, की दोन्हीमध्ये भेदच राहणार नाही. हा विचार पुढे मांडण्यात मेलीससचा हेतू विषमोपपत्ती (Reduction and absurdum) दाखविण्याचा होता; परंतु ल्युसीपसचे म्हणणे असे, की ही विषमोपपत्तीच होत नाही. वस्तू अनंत असूनही मेलीससच्या म्हणण्याप्रमाणे अडचण न येण्याचे कारण असे की, इलियाटिक पंथाची शून्य प्रदेशाभावाची कल्पना ल्युसीपस मुळीच मान्य करीत नाही. त्याचे म्हणणे असे, की शून्यस्थल व अभाव ही अगदी समानार्थक नाहीत. जगात शून्यस्थलाची कल्पना केलीच पाहिजे व याच शून्यस्थलाने वस्तूंची अनंत रूपे एकमेकांपासून विभक्त असल्यामुळे ती एकरूप होत नाहीत.

परमाणूंची सापेक्ष स्थिती पालटली म्हणजेच गती उत्पन्न होते. सर्व परमाणू सारख्याच आकाराचे नसल्यामुळे ही गती एकदा उत्पन्न झाली म्हणजे आकाराने मोठे असलेले परमाणू मध्यभागी जमा होतात व ज्यांचा आकार लहान आहे ते परमाणू परिघाच्या ठिकाणी जातात. असे होण्याचे कारण त्या परमाणूंचे वजन नव्हे. वजन हा गुण परमाणूंचा स्वभावसिद्ध नसून त्याच्या आनुषंगिक संख्याधिक्यावरून ठरणारा आहे. मोठे परमाणू मध्यभागी जमा होण्याचे कारण असे, की त्याचा आकार मोठा असल्यामुळे आघात-प्रत्याघाताला उघडा पाडणारा त्याचा पृष्ठभाग मोठा असतो व त्यामुळे त्या आघात-प्रत्याघाताचा परिणाम कमी तीव्र होतो व म्हणून जेथे गती कमी असेल तेथे राहण्याची त्याची साहजिकच प्रवृत्ती होते. परीघावर्ती गतीपेक्षा मध्यवर्ती गती लहान असल्यामुळे हे सर्व स्थूलपरमाणू मध्यभागी जमा होतात. ज्याप्रमाणे एखाद्या चाळणीच्या साहाय्याने जोंधळे, गहू, बाजरी ही धान्ये मिसळली असली तरी सहज वेगळी होतात किंवा ज्याप्रमाणे नदीच्या लाटांनी लांबोडे व वाटोळे दगड आपोआप एकत्र होतात, त्याप्रमाणेच हे स्थूल व सूक्ष्म परमाणू एकत्र होतात. ल्युसीपसच्या मतांमध्ये जगताची यांत्रिक उपपत्ती जवळजवळ पूर्णत्वाला गेली आहे. त्याचप्रमाणे त्याचा जडवादही अगदी उघड उघड व निर्धास्तपणे पुढे मांडलेला आहे. आत्मा म्हणून काही जडाव्यतिरिक्त वस्तू आहे, असे ल्युसीपस मुळीच मानीत नाही. आत्म्याचे परमाणू अतिशय सूक्ष्म असल्यामुळे त्यांची गती अतिशय तीव्र व वाऱ्यासारख्या आनुषंगिक कारणांवर अवलंबून नाही. डिमॉक्रीटसने याजबद्दल असा दृष्टांत दिला आहे. की ज्याप्रमाणे सूर्यकिरणात दृग्गोचर होणारे सूक्ष्म रजःकण वारा नसला तरी खाली -वर फिरत असतात त्याप्रमाणेच आत्म्याच्या परमाणूंची अवस्था आहे.

गतीच्या शक्याशक्यतेविषयी उपपत्ती लावणे हा मुद्दा जितका महत्त्वाचा आहे तितकाच त्या गतीचे मूळ कारण शोधून काढणे हा आहे. एंपिडोकल्सने राग, द्वेष या दुकलीची कल्पना करून त्याची उपपत्ती बांधली तर ॲनॅक्झॅगोरॅसने असामान्यरूप बुद्धीची स्थापना करून त्याची व्यवस्था लावली; परंतु ल्युसीपसच्या मते या गतीच्या कारणांचा शोधच करण्याची जरूर नाही. या जगतात गती ही मूळचीच आहे, ती गती थांबली तरच ती थांबण्यास काही कारण पाहिजे. सारांशी गतीची उपपत्ती लावण्याचे काही कारण नसून गतिनाश झाला तरच तयाची उपपत्ती लावली पाहिजे. ल्युसीपसच्या या विचारसरणीने निमित्तकारणरूप परमेश्वर, मन, राग, द्वेष इत्यादी कल्पनांना एकदम उच्चाटन मिळते. जगताचे रहाटगाडगे आपोआपच सारखे फिरत आहे. त्याला फिरवणारा म्हणून कोणी परमेश्वर नको किंवा त्यांच्या प्रवृत्तीला साधक म्हणून राग-द्वेषांचीही तिळमात्र जरूरी नाही.

जगताच्या रचनाविषयक बाबतीत ल्युसीपस हा ॲनॅक्झिमीनसच्याच मताला चिकटून होता एवढे सांगितले म्हणजे पुरे आहे. पृथ्वीचा पृष्ठभाग दक्षिण दिशेला कलता असल्याचे कारण मात्र ल्युसीपसने असे दिले आहे, की त्या भागातील उष्णतेने हवा विरळ झाल्यामुळे तिला पृथ्वीचे वजन न झेपल्यामुळे पृथ्वीचा दक्षिण गोलार्ध खाली झुकला.

पहिल्या प्रकरणांमध्ये थेल्सने जगताच्या आदिकारणाची व त्याच्या उपपत्तीविषयींची ज्या हेतूने पृच्छा केली होती त्या हेतूने त्या प्रश्नाचे उत्तर ल्युसीपसने दिले, असे म्हणण्यास हरकत नाही. निदान सध्या तरी मानवी ज्ञानाची मर्यादा पुढे जाणे शक्य नव्हते. ते साधण्यास आधी ज्ञान (Knowledge) व आचार (Conduct) या विषयांचाच ऊहापोह होणे अत्यंत आवश्यक होते व या मालेच्या द्वितीय पुष्पात याच विषयाचा यथावकाश विचार करावयाचा आहे. या विषयातील मध्यवर्ती विभूती म्हणजे प्रख्यात सॉक्रेटिस हीच होय; परंतु डिमॉक्रीटस त्याचा समकालीन असूनही ल्युसीपसचा शिष्य व म्हणूनच माध्यमिक पंथांत मोडणारा, यास्तव त्याजविषयी थोडक्यात माहिती देऊन हे प्रकरण आटोपू. प्रस्तुत पुष्पाचा उद्देश साधारणत: सॉक्रेटिसच्या काळापर्यंतचा तत्त्वज्ञानाचा इतिहास सांगणे हा असल्यामुळे, केवळ कालगणनेवरून पाहिले तर डिमॉक्रीटसला येथे स्थान मिळू शकत नाही; परंतु ल्युसीपसचा शिष्य या नात्याने त्याच्या मतांची माहिती देणे या ठिकाणीच विशेष सोयीचे वाटल्यावरून तसे करण्यात येत आहे.

डिमॉक्रीटस

डिमॉक्रीटसच्या कार्याची दिशा पुष्कळशी सॉक्रेटिसच्या कार्यासारखीच आहे. डिमॉक्रीटसचा नागरिक बंधू व प्रख्यात सोफिस्ट प्रोटॅगोरॅस याने ज्ञानाच्या शक्याशक्यतेविषयी जो प्रश्न उपस्थित केला होता व त्याजप्रमाणे इतर सोफिस्टांनीही आचारविषयक प्रश्नांची जी चर्चा सुरू केली होती, त्याला योग्य उत्तर देणे हा डिमॉक्रीटसचाही उद्देश होता. सॉक्रेटिसने स्वतः ग्रंथरचना मुळीच केली नाही म्हटले तरी चालेल. उलटपक्षी डिमॉक्रीटसची ग्रंथलेखनाबद्दल ख्याती आहे; परंतु डिमॉक्रीटस व त्याचे ग्रंथ याजविषयीची आपली माहिती अल्पच आहे. याचे कारण असे, की त्याने आपले सर्व ग्रंथ अँब्डेरा येथे लिहिले व अथेन्समध्ये त्यांना विशेषशी मान्यता मिळाली नाही. जर त्यांची अथेन्समध्ये चहा झाली असती तर प्लेटोच्या पीठात (Academy) त्यांचा खास संग्रह झाला असता, असे म्हणावयास हरकत नाही. ॲरिस्टॉटलला मात्र डिमॉक्रीटस व त्याचे ग्रंथ यांची बरीच माहिती होती. कारण त्याचा जन्म अयोनियाच्या उत्तर भागातच झाला होता व डिमॉक्रीटसचे ग्रंथ अथेन्समध्ये मान्य झाले नसले तरी त्याच्या ग्रंथांचे परिशीलन व त्याच्या मतांचा प्रसार अँबेडेरा, टिऑस इत्यादी ठिकाणी बराच काळपर्यंत सुरू होता. ग्रॅसीलसने डिमॉक्रीटसचे ग्रंथ एकत्र केले होते; परंतु या प्रयत्नांनाही यावे तसे फळ आले नाही. एपिक्युरिअन लोकांनी आपली काही मते डिमॉक्रीटसपासून उचलली होती व यादृष्टीने त्यांना या ग्रंथकाराचे विशेष महत्त्व वाटून, त्यांनी त्याच्या ग्रंथांचे जतन करावे; परंतु एपिक्युरियन लोक बहुधा शास्त्राभ्यासपराङ्मुख असत व डिमॉक्रीटसच्या मतांची माहिती पुरवून आपल्या मतातील नावीन्याचे श्रेय गमावणे हेही त्यांना कदाचित पसंत नसावे, असे दिसते.

सारांश, डिमॉक्रीटसच्या ग्रंथांबद्दलची माहिती फार तुटक आहे व त्याच्या चरित्राविषयीही आपणास काही विशेष माहिती नाही. त्याचा जन्म थ्रेसमध्ये ॲबडेरा येथे झाला. प्रख्यात सोफिस्ट प्रोटॅगोरस हाही याच गावचा असल्याबद्दल वर उल्लेख आलाच आहे. ॲबडेरा हे गाव त्याच्यातील लोकांच्या मंदपणाबद्दल प्रसिद्ध आहे; परंतु ज्या गावात प्रोटॅगोरॅस व डिमॉक्रीटससारखे बद्धिमान लोक निपजले, त्या गावावर मंदपणाचा शिक्का पडणे हे जरा चमत्कारिकच दिसते. असा ग्रह होण्यास कदाचित डिमॉक्रीटसचेच उद्गार कारणीभूत झाले असावेत. उलटपक्षी तेथील लोक आनंदी असावेत, असेही अनुमान होते. खुद्द डिमॉक्रीटस यालाच 'हास्यमुख तत्त्वज्ञ' (The laughing philosopher) असे टोपण नाव मिळाले होते.

डिमॉक्रीटसचा जन्मकाळ अनिश्चितच आहे. त्याने आपल्या एका ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, तो ग्रंथ ट्रॉय शहर पडल्यावर ७३० वर्षांनी लिहिला गेला; पण ट्रॉय शहर केव्हा पडले याचा वादच आहे व स्वतः डिमॉक्रीटसचे या बाबतीत काय मत होते ते आपणास ठाऊक नाही. त्यावेळी दोन-चार शक रूढ होते. दुसऱ्या एका ठिकाणी त्याने असे लिहिले आहे, की ॲनॅक्झॅगोरॅस वृद्ध असता तो तरुण होता; परंतु हे विधान फारच सामान्य असल्यामुळे त्यापासून तादृश फायदा होत नाही. एकंदरीत त्याचा काळ साधारणत: सॉक्रेटिसच्या काळाशी मिळता येतो, एवढी गोष्ट खरी.

डिमॉक्रीटस हा ल्युसीपसचा शिष्य होता; परंतु त्याची तत्त्वज्ञानविषयक जिज्ञासा व्यापक असल्यामुळे त्याने पायथागोरिक पंथातील मतांचा चांगला अभ्यास केला असून, त्याने कित्येक तत्पंथीय लोकांजवळून शिक्षण घेतल्याचे प्रसिद्ध आहे. याशिवाय पारमिनाइड्स, झेनो, ॲनॅक्झॅगोरॅस इत्यादींविषयी त्याच्या ग्रंथात जागजागी उल्लेख आहेत. डिमॉक्रीटस इजिप्त, अथेन्स वगैरे ठिकाणी प्रवास करून आल्याबद्दलही त्याच्या ग्रंथातील उल्लेख मात्र प्रक्षिप्त आहेत, असे विद्वानांचे मत आहे.

डिमॉक्रीटसचा जन्म निराळ्या काळी झाल्यामुळे त्याच्यापुढे पारमिनाइड्सला काय उत्तर द्यावे हा प्रश्न नसून, प्रोटॅगोरॅस व इतर सोफिस्ट यांनी उत्पन्न केलेल्या प्रश्नांचे काय उत्तर द्यावे हा होता. परमाणुवादाच्या बाबतीत सर्वस्वी ल्युसीपसचे व जगताच्या रचनेविषयी प्रधानतः ॲनॅक्झॅगोरॅसचे मत स्वीकारून त्याने ज्ञानाच्या शक्याशक्यतेविषयी किंवा आचारनियमांविषयी विचार करण्याकडे अधिक लक्ष देणे हे अगदी साहजिकच आहे.

डिमॉक्रीटसची ज्ञानमीमांसा

ल्युसीपसचे मत स्वीकारून डिमॉक्रीटसने संवेदनेची शुद्ध यांत्रिक उपपत्ती लावली आहे व या विषयांतील बारीकसारीक तपशील डिमॉक्रीटसनेच ठरविला, असे म्हणावयास काही हरकत नाही. त्याच्या मते इतर सर्व वस्तूंप्रमाणेच आत्माही परमाणूमयच असल्यामुळे

संवेदना म्हणजे बाहेरच्या परमाणूंचा आत्मपरमाणूंवर होणारा आघात होय व ज्ञानेंद्रिये ही केवळ या आघाताची द्वारे होत. आपल्या संवेदनेचा विषय म्हणजे वास्तविक स्वरूपातील बहिर्गत पदार्थ म्हणण्यापेक्षा त्याच्या पदार्थांचे प्रतिबिंब असते असेच म्हटले पाहिजे आणि म्हणूनच डोळ्यांतील बाहुलीला एवढे महत्त्व आहे. हे प्रतिबिंब अगदी वस्तुबरहुकूम मात्र नसते तर मध्यंतरी असणाऱ्या हवेमुळे त्याचे रूप अस्पष्ट होते. हीच मधील हवा अतिशय झाली-म्हणजे त्या वस्तूचे व आपले अंतर वाढले-म्हणजे ती वस्तू अगदी दिसेनाशीही होते. आपले चक्षुरिंद्रिय व दृष्टिविषय यांजमध्ये मुळीच हवा नसती तर आपणास आभाळावर रांगणारी मुंगीदेखील अगदी स्पष्ट दिसली असती. वस्तूंचे रंग निरनिराळे दिसण्याचे कारण त्याच्या पृष्ठभागाचा कठीणपणा अगर मऊपणा हेच आहे. शब्द श्रवणाची उपपत्तीही अशीच आहे. शब्द निनादित वस्तूपासून तत्सदृश आघातांनी युक्त असा जो परमाणुप्रवाह येतो त्याच्या योगाने आपणास शब्दज्ञान होते. याप्रमाणे साधारण: इतर संवेदनांचीही उपपत्ती आहे.

परंतु या संवेदना म्हणजेच ज्ञानाची इतिश्री नाही. ज्ञान हे द्विविध आहे. एक व्यभिचारी व एक सत्य. इंद्रियजन्य सर्व ज्ञान हे पहिल्या प्रकारचे म्हणजे व्यभिचारी ज्ञान आहे, असे डिमॉक्रीटसचे म्हणणे आहे व याच ठिकाणी त्याचा व प्रोटॅगोरसचा विरोध आहे. प्रोटॅगोरसचे असे म्हणणे की, सर्व संवेदना संवेत्त्याच्या (Sentient subject) दृष्टीने सत्यच आहेत व संवेदनांशिवाय ज्ञानाला दुसरा आधारच नसल्यामुळे सर्व निरनिराळी संवेदनात्मक ज्ञाने सत्यच आहेत. मध एकाला गोड लागतो म्हणून तो गोड हे जितके खरे, तितकेच तो दुसऱ्या कोणाला कडू लागतो म्हणून तो कडू हेही खरे आणि म्हणूनच सर्वसामान्य ज्ञानसिद्धांताची उभारणीच अशक्य आहे. या अडचणीतून डिमॉक्रीटसने काढलेला मार्ग, हा सॉक्रेटिसच्या मार्गासारखाच आहे.

ज्ञान हे द्विविध आहे म्हणून सांगितले; परंतु खरे पाहिले असता संवेदनात्मक ज्ञान हे ज्ञानच नव्हे. कारण त्या ज्ञानामध्ये संवेत्त्याच्या अंतरंगातील परमाणूशी जुळणारा परमाणू बाहेरील द्रव्यात मुळीच नसतो. या ठिकाणी डिमॉक्रीटसने आपले धोरण पारमिनाइड्सच्या मताबरहुकूमच ठेवले आहे. पारमिनाइड्सने असे स्पष्टच म्हटले होते की, रस, वर्ण, शब्द ही केवळ नावे मात्र आहेत. ल्युसीपसचेही मत असेच असेल; परंतु डिमॉक्रीटसच्या काळापर्यंत हा प्रश्नच फारसा पुढे आला नव्हता. प्रोटॅगोरॅसच्या आक्षेपामुळे त्याला रंग चढला व म्हणून डिमॉक्रीटसला त्याचे स्पष्ट शब्दांत उत्तर देणे जरूर होते. डिमॉक्रीटस म्हणतो की, केवळ सवयीमुळेच कडू व गोड, उष्ण व शीत, कृष्ण व गौर या कल्पना आल्या. मुळात पाहू गेले तर परमाणू व पोकळी याशिवाय काही नाही. खरोखर पाहिले तर या संवेदना जरी बहिर्गत पदार्थांमुळे उत्पन्न झाल्या असल्या तरीही त्याजपासून त्याच बहिर्गत पदार्थाबद्दलदेखील त्रिकालबाधित ज्ञान होत नाही. या कारणामुळेच आपणास एक वस्तू शरीरादिकांच्या भिन्न

भिन्न अवस्थांमुळे निरनिराळी भासते. सत्यज्ञानाचा हा मार्ग नाही. कारण सत्य हे फार खोल असते. सारांश संवेदनात्मक ज्ञान हे सत्यज्ञान नव्हे, सत्यज्ञान म्हणजे इंद्रियांच्या साह्यावाचून आत्म्याला होणारे ज्ञान होय.*

या सत्यज्ञानाचे स्वरूप काय व त्याच्या प्राप्तीची तऱ्हा कोणती हे पाहिले म्हणजे, मात्र डिमॉक्रीटसचे ज्ञान अद्यापही किती अपरिपक्व आहे हे लक्षात येते. डिमॉक्रीटसच्या मते आत्म्याचे परमाणू एकाच ठिकाणी जखडले गेलेले नसून सर्वतः संचारी आहेत व म्हणूनच त्यांचा व बहिर्गत परमाणूंचा संयोग घडून येऊ शकतो; परंतु ही सत्यज्ञानाची मीमांसा अगदी यांत्रिक पद्धतीचीच असून, तिच्या योगाने सत्य व व्यभिचारी ज्ञानामध्ये फारसे अंतर राहत नाही. सॉक्रेटिसने ज्याप्रमाणे इंद्रियव्यापार (sense) व मनोव्यापार (thought) यांचे स्पष्ट निसदृशत्व दाखविले, तसे डिमॉक्रीटस मानीत नाही आणि म्हणूनच तो आपल्या इंद्रियांना असे म्हणावयास लावतो की, "गरीब बिचाऱ्या मना, आम्हाला झुगारून देण्याची तुला शक्ती प्राप्त झाली, ती तरी आमच्यामुळेच."

डेमॉक्रीटसची आचारमीमांसा

डिमॉक्रीटसची आचारमीमांसा त्याच्या ज्ञानमीमांसेपेक्षाही अधिक मनोरंजक झाली असती; परंतु तीही आपणास अगदी पूर्णपणे ज्ञात नाही. तथापि, 'आनंदीपणा' या विषयावरचा त्याचा लेख प्रसिद्ध असून, सेनेका व प्लूटार्क यांनी त्याचा पुष्कळ उपयोग केला असल्यामुळे त्याचे बरेच अवशेष राहिले आहेत.

सुख हे अनुकूल व प्रतिकूल संवेदनांवर अवलंबून आहे**, हे या लेखातील प्रथम तत्त्व आहे व त्याचा मतलब असा की, मनुष्याला हे सुख मिळते त्याचे कारण बाह्य पदार्थ नव्हेत. 'सुख हे गुराच्या कळपात नाही किंवा सोन्यामध्येही नाही. आत्मा हेच सुखाचे स्थान आहे.' मनुष्याचे ध्येय म्हणजे शक्य तितके अधिक सुख मिळविणे व शक्य तितके परिश्रम टाळणे हे आहे खरे; परंतु त्यावरून इंद्रियलोलुपता हीच काही सुखाची सामग्री होत नाही. ज्याप्रमाणे संवेदना सत्यज्ञान नाही, त्याप्रमाणेच इंद्रियजन्य सुख हे खरे सुख नव्हे. एकतर ते फार अल्पकाळ टिकणारे असते व दुसरे त्याचे पुष्कळदा दुःखात परिवर्तन होते. मनुष्याने नश्वर गोष्टींवर आपले सुख अवलंबून ठेवले नाही तरच त्याला त्याची प्राप्ती होईल. आपल्याला जर खऱ्या सुखाची इच्छा असेल तर निरनिराळ्या सुखांची योग्य किंमत आपणास करता आली पाहिजे. उच्चतर सुखाची कल्पना नसल्यामुळेच मनुष्य फसतो व मग उगाच आपल्या दैवाच्या नावाने खडे फोडीत बसतो. सुखाची निवड करताना आपण संवाद अथवा समता ही तत्त्वे लक्षात धरावीत (ही तत्त्वे मूळची पायथागोरिक आहेत).

---

*सत्यज्ञान म्हणजे इंद्रियज्ञान नव्हे, हे एवढ्यापुरते भारतीय दर्शनांशी साम्य आहे.

** हे आपल्या योगदर्शनाप्रमाणे आहे

म्हणजे आपणास शरीरस्वास्थ्य म्हणजे आरोग्य व आत्मस्वास्थ्य म्हणजे सुख, याची प्राप्ती होईल. जो मनुष्य आत्मवस्तूकडे धावतो, तो दैवी सुखाला पात्र होतो. केवळ नश्वर शरीराला चिकटून राहणारा प्राणी मानवी सुखाच्याच जाळ्यात सापडतो.

सृष्टीच्या रचनेविषयी डिमॉक्रीटसने जे विचार दर्शविले आहेत, त्यावरून त्याच्या मनाचा कल सृष्टीच्या उपपत्तीकडेच अधिक होता व या कारणाकरिता त्याचा त्याच प्रकरणात विचार करणे योग्य असे वाटते. या बाबतीत त्याची मते अगदी मागसलेली होती. पृथ्वी ही त्याच्या दृष्टीने ताटलीसारखीच होती व ॲनॅक्झॉगोरॅसच्या मताप्रमाणेच त्याचेही मत असेच होते, की ती एखाद्या भांड्याच्या झाकणाप्रमाणे हवेत तरंगत आहे.

इलियाटिक पंथातील लेखकांप्रमाणेच वस्तूच्या असंविभक्तपणाविषयीही त्याने एका ठिकाणी विचार केला आहे. तो म्हणतो की, आपण एक प्रकारच्या घन पदार्थांचा कोनाचा बैठकीशी समांतर अशा रेषेत तुकडा पाडला, तर वरच्या तुकड्याची बैठक व खालच्या तुकड्याचे शिखर सारखे होईल का लहान-मोठे होईल? सारखे म्हणावे तर एकावरील एक वर्तुळाचा आकार सारखा झाल्यामुळे तो घन पदार्थ सिलिंडर होऊ लागेल, बरे लहान मोठे म्हणावे तर त्या कोनाचा भाग खडबडीत आहे, असे म्हणण्याची पाळी येईल. डिमॉक्रीटसच्या काळामुळे त्याची ही इतर विषयांवरील प्रवृत्ती फारशी प्रकट झाली नाही हे खरे; तथापि जी काही थोडी स्थळे आपणास सापडतात त्यावरून त्याचा मूळ ओढा चांगला प्रत्ययास येतो; परंतु आपणास आता या सृष्टीविषयक भानगडीतून जरा दुसरीकडेच वळावयाचे आहे. प्रस्तुत मालेच्या द्वितीय पुष्पामध्ये ज्ञानमीमांसा व आचारमीमांसा हेच विषय प्रामुख्याने यावयाचे आहेत. डिमॉक्रीटस हा सॉक्रेटिसच्या मागूनचा खरा; पण ल्युसीपसच्या संबंधामुळे त्याला एका त-हेने ग्रीक आद्या तत्त्वज्ञ व सॉक्रेटिस या दोन दुव्यांनी जुळविण्याचा मान मिळाला आहे.

○○○

पुष्प २ रे

सॉक्रेटिस जीवनवृत्तांताची रूपरेखा

प्रकरण १ ले

सॉक्रेटिसचा जीवनवृत्तांत

एकंदर तत्त्वज्ञानाच्या व विशेषत: पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ज्यांचे व्यक्तिविषयक चरित्र विशेष परिणामकारक वाटते. अशा सॉक्रेटिससारख्या विभूती फार थोड्या. साधारणतः कोठचेही तत्त्वज्ञान म्हटले म्हणजे त्याचा प्रचारक अथवा द्रष्टा हा महत्त्वाचा असतोच व तत्त्वज्ञानाचा विचार करीत असता आपणास त्याच्यासंबंधीही माहिती मिळवावी लागते; परंतु एवढे खरे की, त्याचे तत्त्वज्ञान हेच त्याच्या चरित्राहून अधिक महत्त्वाचे असते. आपल्या देशातील काही उदाहरणे द्यावयाची झाल्यास उपनिषत्कालीन याज्ञवल्क्यांच्या चरित्रापेक्षा त्याच्या तत्त्वज्ञानाचे अधिक महत्त्व आहे. महाभारतकार व्यास यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाभारतरूपाने प्रसृत होणारी त्यांची ज्ञाननदीच. ज्ञानेश्वरांच्या खाजगी गोष्टींपेक्षा त्यांची ज्ञानेश्वरीच अधिक लक्षात येते. याच्या उलट भगवान श्रीकृष्ण, बुद्ध, विद्यारण्य, तुकाराम इत्यादिकांचा जीवनक्रम हा त्यांच्या विशिष्ट मतांइतकाच मनोरंजक असतो. त्यांचे तत्त्वज्ञान व त्यांचे जीवन यांचा इतका बेमालूम मिलाफ झालेला असतो, की एकाशिवाय दुसऱ्याचे महत्त्वच लक्षात येत नाही. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासातही जर्मनी देशातील कॅटसारख्या तत्त्ववेत्त्याचे जीवन म्हणजे त्यांचे तत्त्वज्ञानच होय. सृष्टीच्या नियमित व्यापाराइतकेच नियमबद्ध व सहजतेने चालणारे त्यांचे जीवन कित्येक बाबतीत आदर्शभूत झाले तरी तितके मनोवेधक होत नाही; पण उलटपक्षी डेकार्ट, न्यूमन, सॉक्रेटिस यांची चरित्रे मोठी मनोरंजक व सूचक असतात. प्रत्येक मत हे एका विशिष्ट व्यक्तीकडून विशेष प्रसृत झाल्यामुळे त्या त्या व्यक्तीतील विशेष गुणावगुण व सुखदुःखप्रसंग ही लक्षात घेतली असता आपणास ते मत अधिक चांगले समजेल ही गोष्ट खरी; परंतु वर सांगितलेल्या पहिल्या प्रकारच्या तत्त्ववेत्त्यांच्या बाबतीत त्यांचे मत व त्यांचे चरित्र ही वृक्ष व त्याचे फळ याप्रमाणे असतात. ज्याप्रमाणे झाडाचे फळ त्याच्या शाखासमूहापासून भिन्न असते, त्याप्रमाणेच

त्यांचे तत्त्वज्ञान त्यांच्या चरित्रापासून भिन्न करता येते; परंतु दुसऱ्या प्रकारच्या तत्त्ववेत्त्यांचे मत म्हणजे सोमरसाप्रमाणे असते. रस काढून घेतल्यावर राहिलेला भाग दूर फेकून दिला तरी रसाची चव म्हणजे पानाचीच चव होय. आम्रवृक्षाची चव आम्रफळात नाही; पण सोमवल्लीची सर्व चव सोमरसात येते. काही तत्त्ववेत्त्यांचे मत याप्रमाणेच त्यांच्या चरित्रातून जणू काय पिळून काढल्यासारखे असते आणि सॉक्रेटिसच्या बाबतीत तर हे विशेषच अनुभवास येते. याचे विशेष कारण असे, की निरनिराळ्या लोकांना सारखीच पटतील अशी मते प्रसृत करणे एवढाच त्यांच्या जीवनवृत्तांतातील निष्कर्ष नसून, विचार व आचार यांना विशिष्ट वळण लावून, शील व विषयविवेचन यांची विशिष्ट पद्धती स्थापन करणे, हा त्यातील अधिक महत्त्वाचा भाग आहे आणि ही बाब गुरूशिष्यपरंपरेने अविकृत राहत नसून प्रत्येक ठिकाणी निरनिराळ्या त-हेने दृष्टिगोचर होणारी आहे. या कारणाकरिताच इतिहासातील अशा विभूतींच्या पूर्वचरित्राविषयी आपली एवढी मोठी जिज्ञासा असते. त्यांच्या बुद्धीची वाढ कशी झाली व सर्व जगावर आपली छाप बसविण्याइतकी परिणतावस्था तिला केव्हा प्राप्त झाली, हे कळण्याची आपणास अनिवार इच्छा असते. ही इच्छा तृप्त करण्यास लागणारी साधने मात्र नेहमीच उपलब्ध असत नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मोठेपणी सॉक्रेटिसचा जीवनक्रम कसा होता व त्याची मते कशी होती, याची आपणास अगदी तपशीलवार माहिती मिळते; परंतु त्याच्या चरित्राच्या पूर्वार्धाची माहिती तितकी तपशीलवार सापडत नाही. काही प्राचीन लेखकांच्या अर्धवट व केव्हा केव्हा अश्रद्धेय भासणाऱ्या विधानांशिवाय त्याला विशेषसा आधारही नसतो.

सॉक्रेटिसचा जन्म अथेन्समध्ये इ.स. पूर्वी ४६९ व्या वर्षी झाला व त्याच संस्थानातील न्यायाधीशीत त्याजवर फिर्याद होऊन त्याला इ. स. पूर्वी ३९९ व्या वर्षी विषप्राशनाची शिक्षा झाली. ही सत्तर वर्षे म्हणजे ग्रीसच्या इतिहासातील अत्यंत मनोरम भाग होय. पूर्वेकडील इराणी सत्तेच्या अमर्याद सामर्थ्यापुढे हार न खाता, स्वाभिमानाने, एकजुटीने, मर्दुमकीने, मॅरॅथॉन, थर्मापुली, प्लॅटिआ, सॅलॅमिस या ठिकाणी शत्रूचा धुव्वा उडवून ग्रीक संस्थानाचे नाव उज्ज्वल होऊ लागल्यापासून पेरिक्लिसच्या काळातील अप्रतिम राजकारणकुशलता निर्माण होईपर्यंतचा हा काळ मोठा महत्त्वाचा आहे व या कालातच सॉक्रेटिसचा जन्म झाल्यामुळे त्याला ग्रीक संस्कृतीच्या ऐन अमदानीतील सर्व संस्कार विशेषांचा फायदा मिळाला होता. त्याचा बाप सोफ्रोनिस्कस हा मूर्तिकार होता व सॉक्रेटिसने आरंभी हाच धंदा चालू ठेवला होता आणि अथेन्सच्या गोपुरांवर 'ग्रेसीस' या नावाच्या देवतांच्या वस्त्रविभूषित मूर्ती सॉक्रेटिसनेच तयार केल्या असल्याचे सांगतात; परंतु ही माहिती कितपत विश्वसनीय मानावी हा एक प्रश्न आहे. सॉक्रेटिसची टवाळी करण्याकरिता ॲरिस्टोफेनस याने रचलेल्या नाटकात व सॉक्रेटिसचे शिष्य झेनोफन व प्लेटो यांनी दिलेल्या हकीगतीत या कलेचा मुळीच उल्लेख नाही. यावरून असे अनुमान होते, की सॉक्रेटिसने मूर्तिकाराचा धंदा कधीच केला

नसावा किंवा केलाच असल्यास ॲरिस्टोफेनसचे नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वीच बंद केला असावा. सॉक्रेटिसच्या आईचे नाव फेनारिटे (Phaenarete) असे असून, ती सुईणीचा धंदा करीत असे. अशा रीतीने गरिबीच्या परिस्थितीत जन्म झाला असताही सॉक्रेटिसला ग्रीक संस्कृतीतील उत्कृष्ट विद्या प्राप्त करून घेता आली. त्यावेळी अथेन्स शहरात उच्चनीच भाव फारसा जोरात नसल्यामुळे अगदी गरीब मनुष्यालादेखील मोठ्यांच्या सहवासाने व त्या संस्थानात भरभराटीस आलेल्या कलांच्या अवलोकनाने पुष्कळ ज्ञान मिळविता येई.* यावरून सॉक्रेटिसचे शिक्षण सर्वांगसुंदर झाले असावे, असे आपणास अनुमान करता येते; परंतु त्याबद्दलची विश्वसनीय हकीगत फारच थोडी उपलब्ध आहे.

ग्रीक रिवाजाप्रमाणे प्रथमतः शारीरिक कसरत व संगीत यांचे ज्ञान करून घेतल्यावर सॉक्रेटिसने इतर शास्त्रांचे थोडेबहुत अवलोकन केले. भूमितीचे कठीण प्रश्न सोडविण्यात तो प्रवीण झाला होता व खगोल विज्ञानाचा त्याला परिचय होता. ही साधारणतः मध्यम वयाची हकीगत झाली. मोठेपणी त्याची व पुष्कळ प्रसिद्ध पुरुषांची गाठ पडल्यामुळे त्याचा तत्त्वज्ञानाकडे विशेष ओढा लागला असावा. उदाहरणार्थ त्या वेळच्या सोफिस्टांमधील अथवा पंडितांमधील प्रख्यात पंडित प्रोटॅगोरॅस, जॉर्जिअस व विशेषतः प्रॉडीकस यांच्याशी त्याचा बराच निकट संबंध होता. त्यांचे नाते अगदी तंतोतंत गुरूशिष्याचेच नसले तरी खुद्द सॉक्रेटिसच कित्येक वेळा त्यांचा गुरुस्थानी असल्याप्रमाणे उल्लेख करतो. यावरून त्यांच्या संभाषणादिकांचा सॉक्रेटिसवर बराच परिणाम झाला असावा. सॉक्रेटिस व हे विख्यात पंडित यांच्यामध्ये जे काहीसे साम्य दिसते व सॉक्रेटिस हा एक सोफिस्टच होता असा जो समज प्रचलित झालेला आढळतो. त्यावरून या अनमानाला अधिक बळकटी येते. पारमिनाइड्सचा आभासवाद, हिरॅक्लीटसचा अग्निकारणवाद, परमाणुकारणवाद्यांची मते, ॲनॅक्झॅगोरॅसचा भौतिकवाद व बहुतत्त्ववाद, याविषयी सॉक्रेटिसला माहिती होती असे अनुमान निघते. झेनो व पारमिनाइड्स यांच्याशी त्याचा प्रत्यक्ष परिचय होता किंवा नाही, ही गोष्ट संशयास्पदच आहे व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथभांडार त्याच्या वाचण्यात कितपत आले असेल याविषयी काहीच सांगता येत नाही. तथापि, त्याच्या संभाषणामधून येणाऱ्या कित्येक उल्लेखांवरून तो एकंदरीत बहुश्रुत होता एवढी एक गोष्ट मात्र नि:संशय सिद्ध होते.

सॉक्रेटिसने आरंभी आरंभी आपल्या बापाच्याच धंद्यास सरुवात केली असेल; परंतु लवकरच त्याचा कल नीती व तत्त्वज्ञान या विषयांकडे वळला व आपला परंपरागत धंदा न

---

* सॉक्रेटिसच्या काळी सोफिस्टस नावाचे लोक असत. त्यांनी प्रथम पद्धतशीर शिक्षणक्रमाचा पाया घातला; परंतु या शिक्षणक्रमापेक्षा सॉक्रेटिससारख्या तीव्र बुद्धीच्या पुरुषाला केवळ अवलोकनाने प्राप्त होणारे ज्ञानच अधिक होते. फार काय पण त्या वेळच्या सुधारणेच्या ओघात एखादा मनुष्य अगदी वाहून जाणे शक्य होते. सुधारणेची साधने त्यावेळी इतकी सुखसाध्य असत.

पत्करता, मनुष्याच्या अत्यंत हिताचे उपरिनिर्दिष्ट विषय यांजविषयी विचार करून ते विषय समाजास शिकविणे हे आपले कर्तव्य आहे, असे त्यास वाटू लागले. सॉक्रेटिस हा नेहमी एका 'डेमन'विषयी उल्लेख करीत असे. हा डेमन म्हणजे कोण व त्याचे स्वरूप काय, याची चर्चा पुढे करण्यात येईलच. सध्या एवढेच सांगावयाचे, की सॉक्रेटिसाचे मनात एखादी गोष्ट करावयाची असून, ती परिणामी हितकारक नसेल तर ती न करण्याविषयी आपणास एक कर्णपिशाच किंवा आंतरिक वाणी सुचविते, असे सॉक्रेटिसास वाटे व या अंतर्वर्ती शब्दास तो डेमन म्हणत असे. सॉक्रेटिसने केवळ आपल्या बापाचाच धंदा करीत रहावे, हे या डेमनला पसंत न पडून त्याने तशी सूचना केली असेल व सॉक्रेटिसचे एकंदर आयुष्य लवकरच निराळ्या वळणाला लागले असेल. कारण या डेमनचा प्रत्यय त्याला फार लहानपणीच आला होता, असे त्यानेच आपल्या भाषणात म्हटले आहे. आपला व्यक्तिविषयक धंदा सोडून सर्व जगताला नीतिज्ञान शिकवावयाचे तर मनुष्याची तशीच तयारी हवी. म्हणून सॉक्रेटिसने अपरंपार मेहनत घेतली असावी. त्याचा स्वभाव मोठेपणी फारच शांत होता; परंतु तो मूळचा फार तापट असून केवळ विचाराच्या जोरावर त्याने त्यात क्रांती घडवून आणली, असे म्हणतात. ही एकच गोष्ट त्याच्या निःसीम दृढनिश्चयाची साक्ष देत आहे. लोकांस नीतिज्ञान शिकविण्याचे व्रत ज्याला पत्करावयाचे असेल, त्याला आधी स्वतःचे मनोविकार आकलन करता आले पाहिजेत व ते स्वतःला साधल्याशिवाय लोकांना नीतिबोध शिकविण्याचा आव घालणे उपहास्यास्पद आहे, अशी खात्री झाल्यामुळेच सॉक्रेटिसने प्रथमतः आपल्या मनोविकारांवर विजय मिळविला. आपला हा विजय कितपत साधला हे पाहण्यास त्याला दैवयोगाने घरीच एक साधन होते. त्याची बायको झँटिपी ही मोठी खाष्ट बायको होती. ती त्याला नाना प्रकारच्या शिव्या देई. फार काय पण ती त्याजवर अतिशय रागावली तर भर रस्त्यात त्याचे कपडे फाडण्यापर्यंत तिची मजल जात असे. एकदा तर सॉक्रेटिसवर शिव्यांचा नुसता भडिमार करूनही समाधान न झाल्यामुळे तिने घाणेरड्या पाण्याने भरलेली घागर आणून सॉक्रेटिसच्या डोक्यावर ओतली; परंतु या प्रसंगानेही आपली स्वस्थता ढळू न देता सॉक्रेटिस नुसता हसत हसत म्हणाला, 'एवढी प्रचंड मेघगर्जना झाल्यावर थोडीफार तरी वृष्टी व्हावयाचीच.' आपल्या देशातील संतवर्य तुकाराम महाराज व सॉक्रेटिस यांचे या बाबतीत फार साम्य आहे. झँटिपीचा स्वभाव जिजाईसारखाच तापट; परंतु अंतःकरणात प्रेमळ असे व आपल्या नवऱ्याला वागविण्याचा प्रकारही दोघींचा एकच. तुकाराम महाराज आपली शांत वृत्ती चळू न देता आपल्या बायकोशी कसे वागत असत हे सांगण्याचे प्रकृत स्थळ नव्हे. त्याबद्दलच्या पष्कळ गोष्टी त्यांच्या चरित्रातून सापडतील. सॉक्रेटिसविषयी लिहीत असता आपल्या देशातील सत्पुरुषाविषयी स्मरण झाल्यावर त्याजविषयी एक-दोन शब्द लिहिल्यावाचून राहवेना म्हणून त्याचा उल्लेख केला. असो. अशा रीतीने सॉक्रेटिसला आपल्या शांतवृत्तीची कसोटी लावून घेण्याचे प्रसंग घरच्याघरीच वारंवार येत असत व तो

त्यांचा फायदा करून घेत असे. एवढेच नव्हे तर आपणास असा फायदा मिळावा म्हणून आपण होऊनच त्याने अशी खाष्ट बायको केली, असे सॉक्रेटिसने स्वतःच सांगितले आहे. झेनोफेनच्या बँक्वेट किंवा भोजन समारंभ या प्रकरणात सॉक्रेटिसच्या बायकोविषयी बोलणे निघाले असता तो म्हणतो की, 'अश्वारोहणात प्रावीण्य मिळविणारे नेहमी दांडग्या घोड्यांवर बसण्याचा अभ्यास ठेवतात, कारण जर त्यांना त्या मस्तवाल घोड्यांना ताब्यात ठेवता आले, तर इतर घोड्यांना सहजच ताब्यात ठेवता येईल. याच कारणाकरिता सर्व मानवजातीशी संबंध ठेवण्याची इच्छा असल्यामुळे मी मुद्दामच अशी बायको केली. कारण माझी अशी खात्री होती की, जर मी तिच्याशी वागण्यात शांतवृत्ती ठेवली तर मला इतर कोणाबरोबरही शांतवृत्तीने वागता येईल.' यावरून लोकांना नीतिज्ञान सांगण्यापूर्वी स्वत:ची तयारी सॉक्रेटिसने किती केली होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. मनुष्याचा स्वभाव मूळचाच शांत असला तरी त्यास मोठे कौतुक वाटते, मग तो स्वभाव केवळ दृढनिश्चयाने, पूर्वस्थितीच्या प्रतिकूलतेला न जुमानता सिद्ध करून घेतला असेल तर काय विचारावे?

याप्रमाणे सॉक्रेटिस हा पूर्ववयापासूनच शांतवृत्तीचा व तत्त्वज्ञानप्रवण होता. त्याच्या याच वृत्तींना अधिक चालन मिळून त्याच्या आयुष्याची दिशा कायम ठरण्यास एक प्रासंगिक गोष्ट कारण झाली. या गोष्टीचा उल्लेख त्याने आपल्या आत्मसमर्थनपर भाषणात केला आहे, तो पुढे येईल. कैरिफन (Chaerephon) नावाचा एक सॉक्रेटिसचा मित्र होता. तो काही कामानिमित्त डेल्फीला गेला होता. डेल्फी येथे अपोलो किंवा सूर्यदेव यांचे एक भव्य मंदिर होते. कोठल्याही गोष्टीचा संशय पडला तर, या देवळातील पुजारी किंवा पुजारिणी यांच्या अंगात देवाचा संचार झाला असता त्या संशयाचे निरसन करण्याकरिता त्यांना प्रश्न करण्यात येत असत व त्याला त्यांजकडून मिळालेले उत्तर प्रत्यक्ष देवानेच दिले असे मानण्यात येत असे व त्याची सत्यता सर्वमान्य असे. आपल्या इकडेही कोणाच्या अंगात आले असता त्यास प्रश्न विचारण्याची वहिवाट आहेच, तेव्हा या गोष्टीत आपणास चमत्कारिक असे काहीच वाटणार नाही. असो. कैरिफन याने असा प्रश्न केला की, 'सॉक्रेटिसपेक्षा अधिक शहाणा कोणी आहे काय?' या प्रश्नावरूनच हे सिद्ध होते की, सॉक्रेटिसची बुद्धिमत्ता ही कैरिफनच्या दृष्टीने अतिशय उच्च दर्जाची होती; पण ती अप्रतिम आहे किंवा नाही हाच त्याला संशय होता. यावरून डेल्फीच्या देवाला हा प्रश्न विचारण्यापूर्वी सॉक्रेटिस हा नीतिशास्त्रज्ञ म्हणून निदान त्याच्या मित्रांना तरी ठाऊक असला पाहिजे. असो. हा प्रश्न विचारल्यावर त्याला उत्तर नकारात्मकच आले. हे उत्तर ऐकून कैरिफनला आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नव्हते व सॉक्रेटिसला तरी ते अगदीच आश्चर्यकारक वाटले असेल, असे वाटत नाही; परंतु ते उत्तर ऐकून तो थोडासा बुचकळ्यात पडला, असे त्याच्याच भाषणात आले आहे खरे.

सॉक्रेटिस हे उत्तर ऐकून खरोखरच बुचकळ्यात पडला असेल किंवा त्याच्या उत्तरकालीन अज्ञानदर्शनाप्रमाणे वरील उक्ती ही एक त्याच्या भाषणातील लकब असो; पण एक गोष्ट

नि:संशय आहे, की त्याच्या आयुष्यक्रमाला एकरूप आणि निश्चित वळण देण्यास ही नूतन प्रतीती कारण झाली. आपली व आपल्या कुटुंबाची उदरपूर्ती केली म्हणजे आपले कर्तव्य संपले, असे न मानता अखिल मानवजातीला व विशेषत: आपल्या देशबांधवांना सदुपदेश करणे व तो उपदेश करण्यास आपणास अधिकार यावा म्हणून आपले वर्तन शुद्ध ठेवणे हे आपले कर्तव्य आहे, ही त्याची समजूत पूर्वीपासूनच झाली होती; परंतु आता तर प्रत्यक्ष देवाच्याच शब्दाने तो सर्व मानवजातीत शहाणा ठरल्यामुळे तेच त्याचे कर्तव्य हे निश्चित ठरले. कारण असे श्रेष्ठ पुरुष जर मानवजातीला सदुपदेश करण्याचे व्रत पत्करणार नाहीत, तर मग जगताच्या सुधारणेचा मुख्य आधारस्तंभच नाहीसा झाला म्हणावयाचा. शिवाय आपल्या गुरुत्वाच्या पात्रापात्रतेबद्दल सॉक्रेटिसला काही संशय असल्यास तोही नष्ट झाल्यामुळे तर सॉक्रेटिसला विशेषच स्फुरण चढले. त्याने लोकांना सदुपदेश देण्याचे व्रत कायमचे पत्करले आणि हे व्रत उत्तम रीतीने पार पडावे म्हणून इतर सर्व व्यासंगांना रजा देण्याचा सॉक्रेटिसने निश्चय केला. तो आधीच गरीब होता, तशातच लोककल्याणासाठी सर्व उद्योगधंदादेखील सोडावयाचा त्याचा विचार होता, मग अशा स्थितीत चालू संसार कसा हाकावयाचा? त्याची वडिलोपार्जित मालमिळकत फार थोडी होती व त्याच्या श्रीमंत मित्रांकडून त्याने एका शब्दानेही विनंती न करता केवळ यदृच्छेने मिळालेल्या भेटीपासून होणारी मदत अनिश्चित व अपुरी होती; परंतु केवळ दारिद्र्याला भिऊन परमेश्वराने आपल्यावर सोपवलेले कार्य टाकून द्यावयाचे नाही, हा विचारच सॉक्रेटिसच्या मनात अहर्निश जागृत होता. काय वाटेल तो प्रसंग येवो, परमेश्वराच्या स्फूर्तीने प्राप्त झालेले कर्तव्य बजावण्याकरिता तो सोसलाच पाहिजे, असा सॉक्रेटिसने दृढनिश्चय केला व त्या दृष्टीनेच आपला आयुष्यक्रम आखण्याची त्याने तयारी केली. त्याची संपत्ती अत्यंत मर्यादित होती व उच्चतम कर्तव्य टाकल्याशिवाय जर ती वाढणे शक्य नव्हते, तर ती संपत्ती वाढविण्याचा प्रयत्नच करावयाचा नाही व आहे तेवढी संपत्तीच जर वाढत्या गरजा भागविण्यास पुरेशी नसेल तरी गरजा वाढू देण्याचे तर दूरच राहो; परंतु त्या कमी करता करता अगदी संपुष्टात आणावयाच्या असा त्याने दृढनिश्चय केला. ज्याप्रमाणे देव हे गरजांच्या तडाख्यात सापडत नाहीत, त्याप्रमाणेच आपणही गरजांवर विजय मिळविण्याची तयारी केली पाहिजे. सॉक्रेटिस नुसता निश्चयच करून राहिला नाही, तर त्याने लगेच तो अमलात आणण्यास सुरुवात केली. सर्व ऋतूंत व सर्व प्रसंगी त्याने एकच व अगदी साधा पोशाख वापरण्याचे ठरविले, त्याने अनवाणीच चालण्याचा क्रम ठेवला आणि त्याने हा नियम सर्व ऋतूंत कडकपणे पाळला. फार काय; पण अथेन्सचा नागरिक या नात्याने पॉटीडियाच्या मोहिमेवर तो गेला असताना श्रेसमधील कडक थंडीच्या दिवसांत जिकडे तिकडे दंव पडलेले असताही त्याने आपला क्रम मुळीच बदलला नाही. याप्रमाणेच त्याने मिताहाराचा व साधेपणाचा नियम पत्करला. चांगली खडखडीत भूक लागली असता साधे अन्नच गोड लागते व एकदा थोडेसे खाल्ल्यावर

व क्षुधेचे पूर्णपणे निवारण झाल्यावर, उगाच पक्वान्न म्हणून, अगर रुचकर म्हणून अधिक अन्न खाणे अगदी अप्रशस्त आहे, असे त्याने ठरविले. ज्या मनुष्याला तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावयाचा आहे, त्याने अशा रीतीने शक्य तितक्या आपल्या गरजा कमी कराव्यात हे तर उघडच आहे; परंतु सॉक्रेटिसचे असे म्हणणे असे की, साधेपणा व नियमितपणा हा प्रत्येक अवस्थेतील पुरुषाला उपयुक्तच आहे. विशेषत: अथेन्ससारख्या संस्थानातील नागरिकांना तर तो अत्यंत आवश्यक होता, असे त्याचे म्हणणे असे. कारण, कोणता नागरिक देशाच्या अधिक उपयोगी पडेल व युद्धप्रसंगी अगर शांततेच्या काळी अधिक काम करू शकेल, असा प्रश्न केला असता आपणास सहजच दिसून येईल की, ज्यांनी आपल्या गरजा नियमित केल्या आहेत तोच आपल्या देशाची अधिक चांगली सेवा बजावू शकतो. ज्या शिपायाला प्रत्यक्ष रणांगणावरदेखील ऐषआराम सोडवत नाहीत व आपल्या जाम्यानिम्यात यत्किंचितही न्यूनता राहिली तर ज्याला आपला एक अवयवच तुटला असे वाटते, फार काय पण आपले नित्य आवडीचे पदार्थ असल्याशिवाय ज्याला अन्न रुचत नाही, तो मनुष्य काय मर्दुमकी बजावील? ज्या वेळेस जो प्रसंग येईल तो काढण्यात पटाईत असलेलाच मनुष्य रणशूर होण्यास योग्य. आपल्या इकडे मोगल व मराठे यांच्या इतिहासाकडे पाहिले तर हेच आढळून येते. बरे शांततेच्या काळीदेखील अशा नियमितपणाची जरूरच असते. शांततेच्या काळीदेखील ज्याला आपल्या शारीरिक सुखात यत्किंचित न्यून पडलेले सहन होत नाही, तो काय महत्त्वाची कामगिरी बजावील? गहन शास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल, महत्त्वाचे शोध लावावयाचे असतील, राज्यकारभारात प्रावीण्य संपादून लोकांच्या उपयोगी पडावयाचे असेल, तर शारीरिक सर्व आळस झाडून सुखाविषयी विशेषतः शारीरिक सुखाविषयी बेफिकीर राहिल्याशिवाय साधेल काय? तेव्हा सॉक्रेटिसचे म्हणणे एवढेच, की जर मनुष्याला एक उपयुक्त नागरिक व्हावयाचे असेल तर साधेपणा व नियमितपणा हा अवश्य पाहिजे. मग ज्याने लोकांस शहाणे करण्याचे व्रत पत्करले त्याजविषयी तर बोलावयासच नको. सॉक्रेटिसचा या साधेपणाबद्दल कित्येक वेळा उपहासही होत असे. अरिस्टोफेनस याच्या टारगट नाटकात सॉक्रेटिसची निंदा करताना त्याची साधी राहणी, साधेच जेवण, घाणेरडे व अपुरे वस्त्रप्रावरण, अनवाणीपणा आणि तोंडावरील कळाहीनपणा यांनी तो अगदी भिकारडा दिसे, असे म्हटले आहे; परंतु हा सर्व उपहास सॉक्रेटिस मोठ्या शांतवृत्तीने सहन करीत असे. आपला स्वतःचा उपहास सहन करण्याची सॉक्रेटिसची अगदी पक्की तयारीच झाली होती. सॉक्रेटिस अत्यंत प्रसिद्धीस आल्यावर ॲरिस्टॉफेनसने त्याची चेष्टा करण्याकरिता हे नाटक केले होते. त्याच्या प्रयोगाचे प्रसंगी तो स्वतः एकदा हजर होता व शेवटपर्यंत अगदी शांतवृत्तीने बसला होता म्हणून सांगतात. सारांश, लोकलज्जेचे भय सोडून सॉक्रेटिस नेहमी साधेपणानेच राहत असे.

याठिकाणी असे लक्षात ठेवले पाहिजे, की हा सॉक्रेटिसचा साधेपणा व सिनिक्स (Cynics) या नावाने पुढे प्रसिद्धीस आलेल्या लोकांची लोकविरुद्ध राहणी, यात फार अंतर आहे. सॉक्रेटिसच्या दृष्टीने नीती अगर तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासाला अगर शिक्षणाला साधेपणा हा विशेष अनुकूल आहे; परंतु सिनिक्स हे सर्वसुखाचे साधन हाच साधेपणा आहे, असे समजत. या समजुतीमधील फरक दाखविण्यास त्यांच्या आयुष्यक्रमातील फरकही पुरेसा होतो. आयुष्याचा साधेपणा किंवा निष्परिग्रहता याजवरच सर्वसुखकारणाचा आरोप करून Cynics नी आपल्या शरीराचे हाल हाल करणेदेखील मान्य केले, उलट सॉक्रेटिस हा सणावारासारख्या अगर उत्सवादिकांसारख्या प्रसंगी मद्याचेदेखील यथास्थित सेवन करी व अशा वेळी मद्य पिण्यातदेखील त्याची कोणी बरोबरी करू शकत नसे. इतके मद्य पिऊनदेखील त्याच्या अमलाने सॉक्रेटिस कधी गाफल होत नसे व याबद्दल त्याच्या मित्रांना अनेकवार अनुभवही आला होता. अशा समारंभाच्या प्रसंगी एकदम पुष्कळ मद्य न पिता ते हळूहळू व पुष्कळ प्यावे, असे त्याचे मत होते. कारण त्याच्यायोगाने एकदम पूर आल्याप्रमाणे सर्व मनोवृत्ती एकदम वाहून न जाता, त्याजवरून जणू काय हळूहळू उत्साहाच्या लाटांवर लाटा उसळतात. सारांश, अगदी कमी खाऊन किंवा अगदी अनावृत्त राहून, शरीर कृश, रोगट किंवा कमकुवत करणे आणि ते लोकसेवेस नालायक करणे, हे सॉक्रेटिसला मान्य नव्हते. स्वावलंबनाला व स्वाभिमानाला पोषक होईल अशा दृष्टीनेच आपण त्याचा स्वीकार करावा, ही त्याची खरी कल्पना होती. सिनिक्स लोकांबद्दल विस्ताराने लिहिण्याचा प्रसंग आला म्हणजे सॉक्रेटिसाचे मत केवळ अर्धवट समजल्यामुळे ते कसे घसरले हे दाखवू. सध्या सॉक्रेटिसच्या साधेपणातही काय विशेष होता हे सांगण्याकरिताच एवढा विस्तार केला.

लोकांना उपदेश करण्याचे व्रत पत्करल्यावर ते सॉक्रेटिसने असामान्य एकनिष्ठतेने चालविले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांबरोबर संभाषण करण्यावाचून त्याने कोणताच उद्योग केला नाही. त्याच्या विशिष्ट शिक्षण पद्धतीमुळे तो आपल्याकडे नेहमी अज्ञान पत्करीत असे व म्हणून तो स्वतःस कधी शिक्षक म्हणवीत नसे व सोफिस्ट लोकांसारखी विद्यालयेही त्याने काढली नाहीत. आपल्याला असलेले ज्ञान दुसऱ्यास देण्याचा सॉक्रेटिसचा मार्ग म्हणजे त्याजबरोबर संभाषण करणे. ते संभाषण अमक्या बरोबरच होईल असा कधीही नियम नसे. जो कोणी त्याच्याबरोबर बोलायला, त्याला प्रश्न करायला किंवा तो बोलेल ते ऐकण्याला तयार असेल त्याच्याबरोबर तो बोलणे सुरू करी, आपण या आपल्या आवडत्या व्यासंगावर किती प्रेम करतो, हे दाखविण्याकरिता सॉक्रेटिस म्हणत असे, की दुर्दैवाने आपले भाषण आपखुशीने ऐकण्यास कोणीच मिळाला नाही तर पैसे देऊनदेखील आपण तसा मनुष्य पैदा करू; परंतु असा प्रसंग त्याजवर कधीच आला नाही. त्याचे भाषण इतके आकर्षक असे, की त्याच्याभोवती लोकांची व विशेषतः तरुण लोकांची

नुसती भीड असे. त्याची बोलण्याची विशेष पद्धती व त्यातील विचारसरणी यांजबद्दल दुसऱ्या एखाद्या भागामध्ये सविस्तरपणे लिहावयाचे आहे, म्हणून सध्या त्याजविषयी विशेष न लिहिता एवढेच सांगतो, की ज्ञानाचा दंभ माजविणाऱ्या मोठमोठ्या लोकांचे अज्ञान उघड करून त्यांची तो फजिती करीत असता तेथे जमलेल्या मंडळीस एक आपली गंमतच वाटत असे व त्याच प्रसंगी अत्यंत महत्त्वाच्या विषयावर एकाएकी नवीन माहिती मिळत असल्यामळे तरुण मंडळीला सॉक्रेटिसचे भाषण फार आवडत असे व सॉक्रेटिसही ज्या ज्या ठिकाणी माणसांची गर्दी असण्याचा संभव त्या त्या ठिकाणी आपण होऊन जाई व आपल्या संभाषणास सुरुवात करी. सकाळी उठल्याबरोबर आधी लोकांच्या फिरावयास जाण्याच्या ठिकाणी, आखाड्यात आणि शाळांत तो जाई. त्याचप्रमाणे बाजार अगदी भरलेला असण्याच्या वेळी तेथे जाऊन तो निरनिराळ्या वखारीमधून हिंडे व सर्वांशी संभाषण करी. फार काय पण प्रसंगानुरोधाने त्याने वेश्यांबरोबर संभाषण करून त्यांच्या धंद्याविषयी प्रश्नोत्तरे करण्यातदेखील अनमान केले नाही. अस्पेशिया व थिओडोटे या नावाच्या वारांगनांबरोबर त्याचे संभाषण झाल्याचे प्रसिद्ध आहे. त्याच्या भाषणावर लुब्ध होऊन जे कोणी तो जाईल तिकडे जात, अशांची गणना लोक त्याच्या शिष्यांमध्ये करीत असत; परंतु असे नाते त्याने स्वत: कधीच मनामध्येही आणले नाही. अशा त्याच्या शिष्यांमध्ये अथेन्समधील रहिवाशीच असत असे नाही, तर मिगारा, थीबस, एलिस इत्यादी इतर संस्थानांतील लोकसद्धा केवळ त्याचे भाषण ऐकण्यास येत. या एका गोष्टीवरूनदेखील त्याचे संभाषण किती खुबीदार, मोहक व उपदेशक असेल याचा कोणालाही अदमास होईल.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांशी संभाषण करून त्यांच्या कल्पना सुधारण्यातच खरे लोककल्याण व खरी ईश्वरसेवा आहे, असा सॉक्रेटिसचा भरवसा होता. देशसेवा करण्याच्या इच्छेने तो राजकारणात का शिरला नाही, याचे कारण त्याने आपल्या आत्मसमर्थनात सांगितले आहे, ते पुढे येईलच; परंतु राजकारणाच्या विशेष उलाढालीत तो पडला नाही तरी अथेन्सचा नागरिक या नात्याने त्याजकडे येणारी कामगिरी चोख बजावण्यास तो कधीच चुकला नाही. पॉटीडिया, डेलियम, अफिपॉलिश वगैरे ठिकाणी झालेल्या युद्धात तो सामान्य शिपायांच्या नात्याने (As a hoplite.) हजर होता व तेथे त्याने आपले काम फार धैर्याने व विश्वासाने बजाविले होते. सॉक्रेटिसच्या मित्रांना त्याची कृत्ये स्तुतीस पात्र वाटावी हे साहजिकच आहे; परंतु या युद्धप्रसंगी त्याने दाखविलेल्या धैर्याची असामान्यता सोडून दिली तरी एकंदरीत तो नागरिकत्वाने प्राप्त होणारी आपली कर्तव्ये करण्यात कधीही चुकत नसे, हे यावरून सिद्ध होते. त्याचप्रमाणे एकदा तो सिनेट सभेचा अध्यक्ष असताना त्याला असामान्य मनोधैर्य दाखवून अन्यायाचा प्रतिकार करावा लागला; परंतु याशिवाय त्याचा राजकारणाशी फारसा संबंध आला नाही. आपण स्वतः सरदार होण्यापेक्षा अनेकांना सरदार करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे. यातच ग्लडस्टन साहेबांना भूषण वाटत

असे. त्याचप्रमाणे आपण स्वतः राजकारणी होण्यापेक्षा राजकारणी पुरुषांना अत्यंत अवश्य असलेली बुद्धिमत्ता लोकांत निर्माण करणे हेच अधिक भुषणावह आहे. असे सॉक्रेटिसचे मत होते व त्याप्रमाणे लोकांमध्ये मिसळून त्यांची सुधारणा करण्याकरिता आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षापर्यंत तो अहर्निश झटला.

या त्याच्या महनीय आचरणामुळे कित्येक लोकांवर त्याचे उपकार झाले व ते त्याजवर प्रेम करू लागले व कित्येक तर त्याच्या इतके भजनी लागले, की त्यांनी जवळजवळ आपली घरेदारेदेखील सोडली व ते नेहमी त्याच्याच भोवती राहू लागले; परंतु या मित्रांच्या बरोबरच सॉक्रेटिसने आपणास अनेक शत्रूही करून घेतले होते. ज्यांचे अज्ञान त्याने उघडकीस आणले होते व ज्यांची त्याने भरचव्हाट्यावर फजिती केली होती, त्या लोकांनी त्याजविरुद्ध कट केला व त्याजवर फिर्याद केली. या फिर्यादीत त्याला विष प्राशनाची शिक्षा झाली. या फिर्यादीच्या वेळी सॉक्रेटिसने कसे वर्तन ठेवले, तिचा असा प्रतिकूल निकाल का झाला, सॉक्रेटिसच्या मरणाचे वेळी काय काय प्रसंग घडले, त्याच्या मरणानंतर त्याजविषयी लोकमतांत काय फरक पडत गेला इत्यादिक गोष्टींचा विचार क्रमशः पुढे येईलच. त्याच्या आधी, या अल्प वृत्तांतात केवळ सूचित केलेल्या अनेक विषयांची विशेष माहिती देणे अवश्य आहे. सॉक्रेटिसच्या भाषण पद्धतीतील विशेष कोणता, त्याची विशिष्ट विषयांसंबंधी मते काय व तत्त्वज्ञानाच्या बाबतीत त्याने विशेष प्रगती काय घडवून आणली इत्यादी विषयांचा आधी सांगोपांग ऊहापोह करून मग आपण त्याच्यावर झालेल्या फिर्यादीच्या व त्यातच झालेल्या त्याच्या अंतकाळाच्या हकीगतीकडे वळू.

❍❍❍

प्रकरण २ रे

सॉक्रेटिसची वादपद्धती

सॉक्रेटिसने तत्त्वविचारात ज्याप्रमाणे मोठी क्रांती घडवून आणली, त्याप्रमाणेच वादपद्धतीतही त्याने मोठी भर टाकली. इलिया येथील पंथापैकी झेनोविषयी लिहिताना त्याच्या अनिष्टापत्तिरूप पद्धतीचे विवेचन करण्यात आलेच आहे. तत्त्वज्ञानाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग जो तर्कशास्त्र त्याचे बीजारोपण करण्याचा मान झेनोकडे येत आहे; परंतु या बीजाचा अंकुर अतिशय अपरिपक्व स्थितीत असता त्याची योग्य जोपासना करून त्याला परिणतावस्थेत आणण्याचे श्रेय सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांजकडे आहे. या नव्या काळात तर्कशास्त्राची जी प्रगती झाली त्याचे कारण त्या प्रगतीच्या मुळाशी असलेली खळबळ उत्पन्न करण्यात सॉक्रेटिसने आपला काळ घालविला आणि त्याच्या प्रयत्नाने झालेल्या जागृतीला या परिणतीचे श्रेय आहे. त्यातही आश्चर्याची गोष्ट हीच, की ॲरिस्टॉटलच्या नंतर तर्कशास्त्राची वाढ झाली असे म्हणण्यापेक्षा केवळ त्याची साफसुफी झाली असेच म्हणावे लागते. ज्याप्रमाणे एखाद्या वृक्षाच्या आडव्यातिडव्या फुटलेल्या शाखा छाटून त्याला थाटदार स्वरूप दिले किंवा त्याच्या ओबडधोबड दिसणाऱ्या मुळांभोवती सुंदर संगमरवरी पार बांधला, म्हणजे त्या वृक्षाची वाढ झाली असे म्हणता येत नाही, त्याचप्रमाणे तर्कशास्त्राच्या आधुनिक परिणतीचीही स्थिती आहे. ती खरी परिणती नसून केवळ साफसुफी आहे. उलटपक्षी सॉक्रेटिसपासून ॲरिस्टॉटलपर्यंतचा काळ पाहिला व त्यापूर्वीच्या काळातील तर्कशास्त्राचे स्वरूप ध्यानात आणले, तर एखाद्या अत्यल्प वटबीजापासून आपल्या दूरवर पसरलेल्या शाखाविस्तारांनी असंख्य पथिकांना व विविध विहंगमांना विश्रामस्थान झालेला प्रचंड वटवृक्षच निर्माण व्हावा, त्याप्रमाणे तर्कशास्त्राची वाढ झाल्याप्रमाणे वाटते. ॲरिस्टॉटलचा काळ आपणास इतका जुना असताही तो अगदी जवळचा असा भासतो व सॉक्रेटिसच्या पूर्वीचा काळ त्यापेक्षा एखाद्या शतकानेच जुना

असताही त्या दोन काल विभागांत केवढे तरी अंतर असावे असे वाटते. रथाचे घोडे अगदीच रेंगाळत चालले तर एखादा मैलही किती लांब वाटतो; पण उलटपक्षी ते मोठ्या वेगाने धावत चालले तर कित्येक योजनांचाही हिशोब राहत नाही, तशीच काहीशी ही स्थिती आहे.

तर्कशास्त्राची जशी जशी वाढ होत जाईल तशी तशी त्यातील परिभाषा अधिकाधिक निश्चित व रूढ होत जाते. भरतभूमीतील तर्कशास्त्राची वाढ फार प्राचीन काळी झाली व त्यामुळे ही परिभाषा ठरण्यापूर्वीचे बौद्धिक परिश्रम आपणास केवळ अनुमानगम्य आहेत. सात किंवा सोळा पदार्थ मानून त्यावर वैशेषिक व न्याय या भारतीय तर्कशास्त्राच्या दोन शाखांची उभारणी करण्यात आली आहे; परंतु हे सात किंवा सोळाच पदार्थ निश्चित होण्यापूर्वी जी काही बौद्धिक चळवळ सुरू असेल त्याची हकीगत आपणास पाहावयास सापडत नाही व या तर्कपद्धतीतील पदार्थाचे समर्थन करताना त्या त्या ग्रंथांतून जे वाद आढळतात, त्यावरून या खटाटोपाची साधारण कल्पना होते. पाश्चात्त्य देशातील तर्कशास्त्राच्या परिणतीला कारणभूत झालेल्या चळवळीचे स्वरूप आपणास याहून अधिक स्पष्ट दिसते व त्या चळवळीतील प्रधानत्वाचा मान सॉक्रेटिसकडे येत आहे. एकदा शास्त्राची परिभाषा ठरली म्हणजे ती नित्य व्यवहारातदेखील इतकी रूढ होते, की त्याचे साधारण अर्थ सामान्य मनुष्यालाही समजतात व तो ते पारिभाषिक शब्द सहज उपयोगातही आणतो. उदाहरणार्थ, जाती व व्यक्ती यांच्यासंबंधी आपण आज सहज कल्पना देऊ शकतो; परंतु जाती व व्यक्ती यांच्या व्याख्या ठरविणे हे किती कठीण काम आहे? ज्या व्याख्या समजण्यासही बुद्धीला चालना द्यावी लागते, त्या व्याख्या व्यवस्थित रीतीने सिद्ध करणे म्हणजे बुद्धीची अचाट कामगिरीच नव्हे काय? मनुष्याचे विचार जसजसे अधिक प्रगल्भ होतात, तसतसे या कार्याचे महत्त्व वाढत जाते. अव्यवस्थित पडलेल्या द्रव्यराशीतून सोने, मोती, हिरे एकीकडे निवडून काढण्यास विविध द्रव्यांची योग्य ओळख असावी लागते व मनुष्याच्या विचारांची सुसंगती लावण्यास व त्या विचाराची प्रगती योग्य दिशेनेच होईल अशी व्यवस्था करण्यास, याच पृथक्करणपद्धतीची (analytical process) आवश्यकता असते. सॉक्रेटिसने हीच पद्धती उचलली होती. मनुष्याच्या अनपेक्षित भाषणाचा लुबाडा उकलून त्यातील प्रत्येक धागा वेगळा केल्याशिवाय त्यांची योग्य संगती लावून उंची वस्त्राचा ताण कसा तयार करता येणार? यावरून सॉक्रेटिसच्या पद्धतीचे अगदी थोडक्यात स्वरूप म्हणजे आपल्या अव्यवस्थित विचारांचे सूक्ष्य धागे उचलून निश्चित मतांचे (Conceptions) प्रतिपादन करणे असे सांगता येईल.

या पद्धतीला अनुरूप असे सॉक्रेटिसच्या भाषणात तीन भाग असत व त्या प्रत्येक भागाचे योग्य महत्त्व पाहून त्यांचा तो प्रसंगानुसार उपयोग करी, त्यापैकी पहिला भाग म्हणजे आपल्या अज्ञानाची कबुली असे. जोपर्यंत मनुष्याला आपणास खरे ज्ञान असल्याचा अभिमान आहे, तोपर्यंत त्याला सत्यज्ञानाची प्राप्ती होणे शक्य नाही आणि त्यातही ज्या

ज्ञानाविषयी हा अभिमान बाळगावयाचा ते ज्ञानही अयथार्थ किंवा केवळ आभासमयच असेल तर हा वृथाभिमानाचा काटेरी वृक्ष समूळ उपटून काढल्याशिवाय त्या पुरुषाच्या मनोभूमिकेत सत्यज्ञानाचे बीजारोपण होणेच शक्य नाही. सॉक्रेटिसने आपल्या वादपद्धतीत हा भाग ठेवण्याचे एक महत्त्वाचे कारण असे, की त्याच्यावेळी सोफिस्ट या नावाचे जे पंडित असत ते सर्वज्ञतेचा मोठा डौल मिरवीत असत व प्रत्येक विषयातील आपले अज्ञान झाकण्यासाठी पोकळ शब्दावडंबर माजवीत असत. याचा साहजिक परिणाम असा होई, की त्या त्या विषयात पारंगतता मिळविण्याची इच्छा न धरता आपल्या अज्ञानावर पांघरूण घालण्याची शिताफीच जिकडे तिकडे बोकाळली. एखाद्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून सूक्ष्म बुद्धीने व दीर्घ विचाराने त्यातील मथितार्थ काढणे हे परिश्रमाचे काम असल्यामुळे सोफिस्ट लोक केवळ भपकेबाज शब्दलालित्यावरच वेळ मारून नेत. ज्ञानप्रगतीच्या मार्गातील हा जबरदस्त अडथळा दूर करावा हा सॉक्रेटिसचा मुख्य उद्देश होता व हा उद्देश साधावयाचा तर सोफिस्टांच्या पांडित्याचा भ्रमाचा भोपळा फोडणे अत्यंत आवश्यक होते. हे अज्ञानाचे भरपूर माप सोफिस्टांच्या पदरात पाडण्यासाठी सॉक्रेटिस आधी स्वतः अज्ञान पत्करी व माझ्यासारख्या अज्ञानाला तुमचे हे गूढ भाषण कळत नाही, तर मी आपला एक मूर्खपणाचा प्रश्न विचारतो त्याचे उत्तर द्या, अशा त-हेची प्रस्तावना करून आपल्या प्रश्न करण्याच्या हातोटीने तो त्यांना इतका पेचात आणी, की सरतेशेवटी त्यांना आपले अज्ञान कबूल करणे भाग पडे. अशा रीतीने सॉक्रेटिसची अज्ञानाची कबुली दुसऱ्याचे अज्ञान सिद्ध करण्यात उपयोगी पडे. यामुळे कित्येकांची अशी समजूत आहे की, सॉक्रेटिसने जाणून बुजूनच हे ढोंग पत्करले होते व ज्याप्रमाणे बूमरँग नावाचे हत्यार फेकणारा इसम प्रथम ते दुसरीकडेच फेकतो आहे असे दिसते. परंत अखेर ते हत्यार नेमके निशाणावर जाऊन लागते. त्याप्रमाणे सॉक्रेटिस स्वत: अज्ञान पत्करी ते केवळ आपल्या प्रतिपक्षाला अज्ञानी ठरविण्यापरतेच. असा या मताचा मथितार्थ आहे. सॉक्रेटिसच्या या वादपद्धतीने त्याच्या प्रतिपक्षीयांचे अज्ञान फार लवकर उघडकीस आणता येई हे खरे आहे; परंतु तेवढ्यावरून सॉक्रेटिस केवळ त्याच उद्देशाने हे सोंग पांघरी, असे सिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे आपण स्वत: अज्ञानच पत्करावयाचे व आपल्या प्रतिपक्षाला आपल्या कोटिक्रमाने अज्ञान कबूल करणे भाग पाडावयाचे. म्हणजे एक तहेने सत्य ज्ञानाचा असंभवच प्रतिपादण्यासारखे आहे, असाही कित्येकांचा आक्षेप आहे; परंतु सॉक्रेटिस सत्य ज्ञानाचा असंभव मानीत नसे, ही गोष्ट त्याच्या एकंदर चरित्रक्रमावरून सुस्पष्ट आहे. ज्याने आपले सर्व आयुष्य लोकांना सदुपदेश करण्यात घालविले, त्याला सत्यज्ञान संपादणे अशक्य वाटणे हे कधीतरी संभवते काय? मग सॉक्रेटिसच्या या अज्ञान प्रतिज्ञेची उपपत्ती काय, असा प्रश्न उभा राहतो. याला उत्तर म्हणजे एवढेच, की सॉक्रेटिसला ज्ञानविषयक मीमांसा म्हणजे एक अत्यंत गंभीर व अनंत विषय आहे असे वाटे व म्हणून आपले ज्ञान कितीही मोठे झाले तरी ते अल्पच असे

त्याला वाटे. याशिवाय त्याची दृढ समजूत होती, की सत्यज्ञान म्हणून जर काही असेल तर ते निर्विकल्प विचारांची (conceptions) स्थापना हेच होय व म्हणून जगात प्रचलित कल्पनांचा फोलपणा दाखविण्यासाठी तो प्रथम अज्ञान पत्करी व आपल्या प्रतिपक्षाचे अज्ञान स्पष्ट करी. एकाच ग्रंथकाराच्या किंवा तत्त्वज्ञाच्या लेखातील अथवा भाषणातील परस्पर विरोधी दिसणारे अंश दाखवून त्यांचे मत धुडकारून लावण्याची सोफिस्टांची रीतच असे. सॉक्रेटिस तीच पद्धती पत्करून परस्पर विरुद्ध मते प्रचलित करणाऱ्या भौतिक तत्त्वज्ञान्यांना खरे ज्ञानच झाले नाही, असे दाखवी व एवढ्यापुरते त्याचे व सोफिस्टांचे साम्य भासे; परंतु सोफिस्ट लोक ज्ञानासंभववाद पत्करून हे अज्ञान म्हणजे त्यांच्या ग्रंथातील एक महामंत्रच मानीत. उलटपक्षी सॉक्रेटिसच्या मते या अज्ञानासारखा मनुष्याचा दुसरा शत्रू नाही व त्याच्याशी झगडून त्याचा निःपात करणे हेच प्रत्येक मनुष्याचे श्रेष्ठ कर्तव्य आहे.

ज्या मनुष्याशी सॉक्रेटिसाला संभाषण करावयाचे असेल त्या मनुष्याला तो हळूहळू कसे प्रश्न विचारी व त्याला नकळत आपल्या मताप्रमाणे वठणीवर आणी, याची योग्य कल्पना यावी म्हणून काही सुप्रसिद्ध उदाहरणे घेऊन त्यांचे थोडेसे विवरण केल्यास ते अस्थानी होणार नाही.

युथीडिमस (Euthydemus) या नावाचा एक तरुण गृहस्थ होता. त्याने सुप्रसिद्ध कवी व सोफिस्ट यांच्या ग्रंथांचा मोठा संग्रह जमविला होता व या डौलातच त्याला असे वाटे, की मी अतिशय योग्यतेचा मनुष्य आहे. राजकारण काय, लोकानुरंजन काय, परराष्ट्रीय मसलती काय, जे वाटेल ते मला उत्तम साधेल व माझ्यासारखे दुसऱ्या कोणाला ते साधणार नाही. तो वयाने इतका लहान होता, की कोठल्याही हुद्याच्या जागेवर त्याची अद्यापि नेमणूक झाली नव्हती. तथापि, त्याला आपल्यासारखा ज्ञानवृद्ध कोणी नाही असा गर्व झाला होता. सॉक्रेटिसने त्याला गाठले व हळूहळू संभाषण सुरू करून त्याला जरा खुलविले. आपला राजकारणात शिरण्याचा बेत असल्याबद्दल त्याने सॉक्रेटिसजवळ कबूल केले. मनुष्य प्रामाणिक असल्याशिवाय त्याला राजकारणशास्त्र साधणार नाही, इत्यादी गोष्टी युथीडिमसने कबूल केल्या. नंतर सॉक्रेटिसने त्यास विचारले 'युथीडिमस, आपण प्रामाणिक आहात काय?' या प्रश्नाला अस्तिपक्षी उत्तर मिळाल्यावर सॉक्रेटिसने असा प्रश्न केला, की ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्याच्या कार्यावरून त्याच्या धंद्याचे अनुमान करतो, त्याप्रमाणे एखादा मनुष्य प्रामाणिक असल्याबद्दल आपणास अनुमान करता येईल काय? युथिडिमसच्या मते न्याय्य कृत्य करणारा मनुष्य प्रामाणिक असतो. त्यावर सॉक्रेटिस म्हणाला न्याय्य म्हणजे तरी काय? व अन्याय कृत्याचे तरी स्वरूप कोणते? समजा की, आपण न्याय पक्षात येणाऱ्या सर्व गोष्टी अ या सदरात घालावयाच्या व अन्याय पक्षात मोडणाऱ्या सर्व गोष्टी ब या सदरात घालावयाच्या असे ठरविले, तर खोटे बोलणे, फसविणे, एखाद्याला गुलाम करणे, बळजबरी करणे इत्यादी कृत्ये कोणत्या सदरात येतील? हा प्रश्न दिसावयास फार सोपा असल्यामुळे

युथीडिमसने चटकन उत्तर दिले, की या सर्व गोष्टी ब म्हणजे अन्याय्य याच सदरात येतील. युथीडिमसचे हे उत्तर चुकीचे आहे हे दाखविण्यासाठी सॉक्रेटिसने काही विवक्षित उदाहरणे देऊन विचारले, समज युथीडिमस, ज्यावेळी एखादा सेनापती आपल्या शत्रू सैन्याला फसवून फूस लावून अडचणीच्या जागी आणतो व मग एकदम उलट खाऊन त्यांचा धुव्वा उडवून देतो किंवा आपल्या शत्रूच्या प्रांतात स्वारी करून आपल्या संस्थानात घेऊन येतो किंवा प्रसंगविशेषी राजकारस्थानात खोटे बोलतो, त्यावेळी हे सर्व आचरण अन्याय्य होते का? या प्रश्नाला अस्तिपक्षी उत्तर देणे अशक्य आहे. कारण आपण अशा मनुष्याची सर्वत्र वाहवा झालेली पाहतो; परंतु युथीडिमस तितक्यात सावरावयाचा प्रयत्न करून म्हणाला, की ज्यावेळी या सर्व गोष्टी अन्याय्य आहेत असा निकाल दिला, त्यावेळी माझ्या मनात फक्त परस्परात स्नेहसंबंध असलेल्या मंडळीचा व्यवहाराच घोळत होता. आपल्या मित्रांशी खोटे बोलणे, त्यांना फसविणे इत्यादी सर्व अन्याय्य आहे. ही पहिल्या व्याख्येमध्ये एक सुधारणा झाली; पण एवढी सुधारणा तरी पुरी आहे काय? ही सुधारलेली व्याख्याही अद्याप सदोषच आहे व हे दाखविण्यासही आपणास कित्येक उदाहरणे देता येतील. सॉक्रेटिस म्हणतो की, ज्यावेळी एखादा सेनापती आपले सैनिक निरुत्साह झाले आहेत व केवळ त्यांच्या निरुत्साहामुळे कार्यनाश होत आहे असे पाहतो, अशावेळी त्यांना उत्साह यावा म्हणून मागून मोठी कुमक येत असल्याबद्दल निखालस खोटीच बातमी देतो, त्यावेळी तो अन्याय्य आचरण करतो काय? किंवा एखादे लहान मूल औषध घेत नाही असे पाहून त्याचा बाप ते त्याला शर्करावगुंठित करून देतो, त्यावेळी त्याची ही फसवणूक अन्यायाची व म्हणून शिक्षेस पात्र आहे काय? किंवा आपला एखादा मित्र वेडाच्या किंवा निराशेच्या लहरीमध्ये आपला स्वतःचा खून करून घेईल या भीतीने आपण त्याच्याजवळची तलवार गुपचूप किंवा जबरदस्तीने हिरावून घेतो, तेव्हा हे कृत्य अन्याय्य ठरेल काय? सारांश, खोटे बोलणे, फसवणे इत्यादी गोष्टी आपल्या मित्रमंडळीशी झालेल्या व्यवहारातही नेहमी पापरूप किंवा अन्याय्याच्या ठरत नाहीत. बरे, याच गोष्टीचा आपण पुढे विचार करू लागल्यास असे आढळते, की मनुष्याने नकळत आपल्या मित्राचे अकल्याण होण्याजोगे वर्तन केले, तरी त्याबद्दल आपण त्याला फारसा दोष देणार नाही; पण जर त्याने जाणून बुजून तसे वर्तन ठेवले, तर मात्र तो दोषास पात्र होतो.

याचप्रमाणे अन्य प्रसंगी लोकसत्ताक राज्य म्हणजे काय, हा प्रश्न प्रथम निघाला असता सॉक्रेटिस युथीडिमसला विचारतो, की लोक म्हणजे तरी कोण? युथीडिमस म्हणतो, लोक या शब्दाचा अर्थ गरीब लोक असा आहे. यावर असा प्रश्न येतो, की गरीब कोणाला म्हणावे व श्रीमंत कोणाला म्हणावे? युथीडिमसच्या मते, ज्यांच्याजवळ आपल्या गरजा भागून उरण्यासारखे साहित्यादिक असेल ते श्रीमंत व इतर गरीब; पण या उत्तरावर असा आक्षेप येतो, की कित्येक लोक सधन असूनही त्यांच्या वासना इतक्या विस्तृत असतात, की त्यांना

ते द्रव्य पुरत नाही. उलटपक्षी कित्येक धनहीन पुरुषही समाधानवृत्तीने असतात. मग एखाद्या राजालाही आपणास भिकारी म्हणून ठरविले पाहिजे व एखाद्या रंकालाही श्रीमान म्हटले पाहिजे..

शास्ता म्हणजे कोण? असा प्रश्न निघाल्यास त्याला सहज उत्तर असे देण्यात येते, की ज्याला हुकूम सोडण्याचा अधिकार आहे तोच शास्ता; पण जर विशिष्ट उदाहरणे घेतली तर जहाजाचे नेतृत्व कर्णधारालाच देण्यात येते व कोणी आजारी असल्यास एखाद्या भिषग्वराच्याच सल्ल्यानेच वागावे लागते. यावरून सिद्ध होते, की खरे शासितृत्व हुकूम सोडण्याच्या अधिकारात नसून ते त्या त्या प्रसंगी उपयोगी पडणाऱ्या ज्ञानात आहे.

युथिफ्रॉन या नावाचा एक भविष्यवादी अथेन्समध्ये राहत असे. पावित्र्य म्हणजे काय, या विषयावर सॉक्रेटिसचा त्याजबरोबर झालेला संवाद सुप्रसिद्ध आहे. खुद्द सॉक्रेटिसवर अपवित्रपणाबद्दल फिर्याद झालेली असता सर्व अथिनीअन लोकांच्या पावित्र्यविषयक कल्पना किती अपूर्ण व सदोष होत्या, हे स्पष्ट करण्यासाठी प्लेटोने या संवादाची रचना केली असावी. मिलीटसच्या अर्जावरून सॉक्रेटिसवर अपवित्र विचार प्रसृत केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. एकदा असा प्रसंग घडून आला की, किंग आर्कन म्हणून जो अधिकारी असे त्याच्या कचेरीच्या दरवाजाशीच सॉक्रेटिस व युथिफ्रॉन यांची गाठ पडली. युथिफ्रॉन हा एक फिर्याद दाखल करण्यासाठीच किंग आर्कनकडे जात होता. त्या फिर्यादीचे स्वरूप मोठेच चमत्कारिक होते. नॅक्झॉस येथे काही गुलाम युथिफ्रॉनच्या बापाच्या शेतावर काम करीत होते. त्यापैकी एकाने दारूच्या अमलामध्ये दुसऱ्या एका गुलामाला ठार केले. आता या खुनी गुलामाला काय शिक्षा करावी, हा प्रश्न होता. युथिफ्रॉनच्या बापाने त्या खुनी गुलामाचे हातपाय बांधून त्याला एका खंदकात टाकले व त्याला काय शिक्षा करावी या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी एक मनुष्य अथेन्सला पाठविला; परंतु तो मनुष्य अथेन्सहून परत येण्यापूर्वीच तो खुनी गुलाम मालकाच्या हलगर्जीपणामुळे मरण पावला. आता या मृत्यूबद्दल युथिफ्रॉनच्या बापाला जबाबदार धरून त्याला शिक्षा करावी किंवा नाही, हा नवीनच प्रश्न उपस्थित झाला. युथिफ्रॉनच्या कुटुंबात इतर सर्व मंडळीचे असे म्हणणे होते, की खुनी गुलामाला काही मुद्दाम जिवे मारण्यात आले नव्हते व केवळ हलगर्जीपणाने तो मृत्यू पावला असला तरी तो स्वतः खुनीच असल्यामुळे मृत्यूच्या शिक्षेला पात्रच होता. अर्थात, त्याजबद्दल कोणाला शिक्षा करण्याचे कारण नव्हते. स्वतः युथिफ्रॉनचे मत मात्र अगदी भिन्न होते. खून म्हणजे खूनच. मग तो कोणाचा असो व कसाही घडून आलेला असो. अशा अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. मग तो अपराधी आपला संबंधी का असेना. खुनी गुलामाच्या मृत्यूबद्दल न्याय व्हावा म्हणन युथिफ्रॉन आपल्या प्रत्यक्ष बापावर फिर्याद लावण्यास चालला होता व कुटुंबातील सर्व मंडळीच्या विरोधाला न जुमानता आपण हे मोठे पवित्र कर्तव्य करीत आहोत, असा त्याचा समज होता. एका बाजूला पवित्र

कर्तव्य कल्पनेची दिशाभूल होऊन प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्यावरच फिर्याद करणारा युथिफ्रॉन व दुसऱ्या बाजूला आपल्या प्रतिपक्षीयांबद्दलही शक्यतर चांगले विधान करू पाहणारा महानुभाव साधुस्वभाव सॉक्रेटिस अशांचा हा संवादयोग म्हणजेच अपूर्वच प्रसंग म्हणावयाचा.

युथिफ्रॉनची एकंदर हकीगत ऐकून सॉक्रेटिसला अतिशय आश्चर्य वाटले व त्याने युथिफ्रॉनला असा प्रश्न केला, की कसेही झाले तरी आपण स्वतःच्या बापावर फिर्याद करण्यात काही अपवित्र आचरण करीत आहो, अशी शंका आपल्या मनात उभी राहते किंवा नाही? युथिफ्रॉनला याबाबतीत संशयाचा लेशही नाही, असे दिसते. आपल्या त्रिकाळदर्शित्वाचा व धर्मरहस्य पारंगततेचा युथिफ्रॉनला मोठा अभिमान होता. त्याने आपले करणे अगदी तंतोतंत बरोबर आहे, अशी खात्री दिली. इतक्या बिकट प्रसंगीही जे ज्ञान युथिफ्रॉनला उपयोगी पडते व त्याला डगमगू देत नाही ते ज्ञान अलौकिकच असले पाहिजे, अशी त्याची स्तुती करून सॉक्रेटिस सुचवितो, की ज्याअर्थी त्याजवर अपवित्रपणाबद्दलच फिर्याद करण्यात आली आहे व ज्याअर्थी युथिफ्रॉनची पावित्र्यकल्पना अगदी निश्चित आहे, त्याअर्थी जर युथिफ्रॉनने आपले ज्ञान सॉक्रेटिसला शिकविले तर त्याचे मोठेच कार्य होणार आहे. सॉक्रेटिसला इतर सर्व तपशिलाची सध्याच काही जरूर नाही. त्याचा आपला एक साधा प्रश्न आहे. पवित्रता म्हणजे काय? किंवा पवित्र आचरण म्हणजे काय? 'मी ज्याप्रमाणे आचरण करतो त्याप्रमाणे आचरण करणे म्हणजेच पवित्रपणा' असा एक सामान्य शेरा मारून आपल्या कृतीला किती पौराणिक कथांतून आधार मिळतो हे युथिफ्रॉन दाखवितो. सॉक्रेटिसचे यावर म्हणणे इतकेच, की पौराणिक कथांवर त्याचा मोठासा विश्वास नव्हता व युथिफ्रॉनजवळून त्याचे देवतांविषयीचे सर्व ज्ञान संपादन करून घेण्यास अवकाश नव्हता, म्हणून ते भारूड बाजूला ठेवून युथिफ्रॉनने सर्व पवित्र आचरणांना सामान्यतः पावित्र्य कशामुळे येते ते सांगावे.

यावर युथिफ्रॉनचे उत्तर असे, की जे जे देवांना आवडते ते ते पवित्र. सॉक्रेटिसला आता योग्यसे उत्तर मिळाले. कारण आता त्याची पद्धतशीर छाननी सुरू झाली. जे जे देवांना प्रिय ते ते पवित्र हे ठीक दिसते; पण या व्याख्येचे अधिक स्पष्टीकरण करणे जरूर आहे. देवांना प्रिय म्हणजे एकसमयावच्छेदेकरून सर्व देवांना प्रिय, की एकेका देवाला, का काही देवांना प्रिय? कारण ज्याप्रमाणे मनुष्यांमध्ये मतभेद व रुचिभेद दृष्टीस पडतो, त्याचप्रमाणे देवांमध्येही असावयाचेच. त्यावर युथिफ्रॉनची अशी सुधारणा आहे, की सर्व देवांना प्रिय ते पवित्र.

यापुढे असा प्रश्न उपस्थित होतो, की आचरणाचे पावित्र्य हे देवांच्या प्रीतीचे कारण आहे की फळ आहे? म्हणजे काहीएक आचरण देवांना आवडते म्हणून ते पवित्र होते किंवा ते आचरण पवित्र असते व म्हणूनच देवांना आवडते? यावर उत्तर हेच, की जे आचरण पवित्र असते ते देवांना आवडते. युथिफ्रॉनच्या या म्हणण्यावरून हे स्पष्टच होते, की आचरणाचे पावित्र्य ही पूर्वीच सिद्ध झालेली गोष्ट आहे. त्या पावित्र्याचा एक आनुषंगिक परिणाम

म्हणजे देवांची प्रीती आहे व या कारणास्तवच पावित्र्याची व्याख्या करणे व त्याचे स्वरूप उकलवून दाखविणे, ही गोष्ट शिल्लकच राहिली. सॉक्रेटिसचा हा विचार विशद करण्यास एक उदाहरण घेऊ. हिरा आधी हिरा असतो व म्हणून संपत्तिमान लोक किंवा राजेरजवाडे त्याचा अलंकारात उपयोग करतात; पण म्हणून श्रीमंत लोकांकडून अलंकाररूपाने उपयोगात आणले जाणे हे काही हिऱ्याचे स्वरूप होत नाही. कारण जर एवढीच गोष्ट हिऱ्याला हिरेपणा देऊ शकती, तर सोने व मोती यांनाही हिरा हीच संज्ञा द्यावी लागली असती. देवांना ज्या कित्येक गोष्टी आवडतात त्यात पावित्र्य हीही एक आहे. याकरिता पावित्र्याची व्याख्या काही निराळ्या प्रकाराने करणे जरूर आहे. नाहीतर देवांना प्रिय ते पवित्र व जे पवित्र ते देवांना प्रिय, असा अन्योन्याश्रय किंवा वर्तलाकृती भ्रमण होणार.

यावर युथिफ्रॉनला उत्तर देणे फार अवघड वाटते व तो कबूल करतो, की जी जी म्हणून व्याख्या पुढे करावी ती ती चक्राकार भ्रमणच करू लागते. सॉक्रेटिस त्यावर असे विनोदाने म्हणतो, की त्याचा पूर्वज डीडलस याचे पुतळे असेच सरकत असत व ज्याअर्थी युथिफ्रॉनच्या व्याख्या तशाच फिरतात, त्याअर्थी त्या व्याख्यांच्या उभारणीमध्ये त्याचे डीडलससारखेच कौतुक केले पाहिजे. युथिफ्रॉनचे यावर असे प्रतिविनोदाचे भाषण आहे, की त्याच्या व्याख्या गरगर फिरवितो, तेव्हा त्याची करामत जबरदस्तच म्हणावयाची; परंतु हा विनोद सोडून सॉक्रेटिस युथिफ्रॉनला पुन: हाताशी धरतो व आपण त्याची व्याख्या ठरविण्यास मदत करू असे सांगून पावित्र्य व न्याय्यत्व ही एकच आहेत काय? असा प्रश्न करतो. यावर युथिफ्रॉनचे असे म्हणणे पडते, की न्याय्यत्व हे पावित्र्यापेक्षा अधिक व्यापक आहे. न्याय्यत्वाचा संबंध मनुष्यामनुष्यांतही येऊ शकतो; परंतु पावित्र्याचा संबंध केवळ देव व मनुष्य यांच्याशीच आहे. 'देवाविषयींच्या तत्परतेची न्याय्य बाब ती पवित्र' अशी कदाचित व्याख्या करता येईल; पण याठिकाणी सॉक्रेटिस असा प्रश्न विचारतो, की देवाविषयी तत्परता म्हणजे काय? घोड्याला खरारा वगैरे करण्यात अगर गुरे राखण्यात जी तत्परता असते तीच तत्परता या ठिकाणी समजावयाची काय? परंतु असे समजावे तर मोतद्दाराचे घोड्यावर किंवा गोपालकांचे गायीवर जसे उपकार होतात, तसे आपण देवांवर उपकार करतो काय? नाही. युथिफ्रॉन त्यावर अशी तोड सुचवितो, की गुलामाची धन्याच्या सेवेविषयी जी तत्परता, ती कदाचित या देवविषयक तत्परतेसारखी असू शकेल; पण गुलाम जसा धन्याच्या उपयोगी पडतो, तसा मनुष्य कोणत्या बाबतीत देवांच्या उपयोगी पडतो? युथिफ्रॉम हा आतापर्यंतच बराचसा घोटाळला आणि या बाबतीत नि:संशय सत्य गोष्ट सांगता येत नाही, अशी कबुली देऊन तो पुढे म्हणतो, ज्यावेळी आपले शब्द, प्रार्थना किंवा हाविर्भाव देव स्वीकारतात, तेव्हा आपण पवित्र आहोत असे समजावे व त्यापासून आपले व आपल्या कुटुंबाचे कल्याण होईल, अशी खात्री बाळगावी. उलटपक्षी देवांना त्याज्य वाटणाऱ्या वस्तूपासून नाशच प्राप्त व्हावयाचा. सॉक्रेटिसच्या मते या सर्व शब्दपांडित्याचा

मथितार्थ एवढाच, की पावित्र्य म्हणजे प्रार्थना व अवदानदान यांचे शास्त्र. बरे प्रार्थनेचे व यज्ञयागाचे शास्त्र म्हटले म्हणजे देवांच्या व आपल्या देवघेवीच्या व्यवहाराचे शास्त्रच झाले. आता मनुष्यांच्या गरजा देवांकडून पुरविल्या जातात, हे म्हणणे युक्त दिसते; पण देवांच्या कोणत्या गरजा मनुष्याकडून पुरविल्या जाणे शक्य आहे? युथिफ्रॉन म्हणतो की, मनुष्याच्या देवाला देणग्या म्हणजे केवळ संभावनारूप आहेत व म्हणूनच त्या देवांना ग्राह्य आहेत, तर मग त्या पावित्र्याच्या देणग्या त्यांना उपयुक्त किंवा प्रिय नाहीत काय? हाही प्रश्न अडचणीचाच आहे. तेव्हा युथिफ्रॉनला असे म्हणावे लागते की, या पावित्र्याच्या देणग्या देवांना अत्यंत प्रिय आहेत; पण पावित्र्याची अशी व्याख्या करणे म्हणजे थोड्या निराळ्या शब्दांनी देवांना जे प्रिय ते पवित्र, असे म्हणण्यासारखेच आहे व ही व्याख्या तर एकदा त्याज्य ठरविण्यात आली आहे. तेव्हा पावित्र्य म्हणजे काय याची मीमांसा पुनः सुरू केली पाहिजे. युथिफ्रॉनला या बाबतीत नक्की माहिती असलीच पाहिजे. कारण जर त्याचे ज्ञान लेचेपेचे असते, तर आपल्या स्वतःच्या बापावर फिर्याद करण्याचे त्याने कधीही धाष्टर्य केले नसते; पण तो सॉक्रेटिस जवळून मुद्दामच काहीतरी चोरून ठेवतो, असे त्याने करू नये म्हणून सॉक्रेटिस त्याची विनवणी करतो. युथिफ्रॉनची आता पुष्कळच खात्री झाली असल्यामुळे हा वाद लांबविण्याची त्याची तयारी नसणे अगदी साहजिकच आहे व म्हणून तो कामाची सबब सांगून निघून जातो.

लॅचेस या नावाच्या संवादामध्ये धैर्य या गुणाची व्याख्या काय, या प्रश्नाचा असाच ऊहापोह केला आहे. लॅचेसने सुचविलेल्या व्याख्यांची सदोषता वारंवार स्पष्ट करण्यात येते. पायदळ, घोडदळ, भालाईत, पटाईत इत्यादी निरनिराळ्या प्रकारच्या योद्धांच्या लढण्याच्या पद्धती वेगवेगळ्या व म्हणून त्यांच्या धैर्याचा नमुनाही वेगवेगळा. फार काय पण आपली आघाडी बिघडू न देणे किंवा आपण उभे असलेले ठिकाण न सोडणे, अशीही धैर्य या शब्दाची व्याख्या करता येत नाही. कारण एखादे वेळी आपली आघाडी मोडून पीछेहाट पत्करावयाची व शत्रूला पुष्कळसा अंगावर घेऊन मग उलट खावयाची, यातही धैर्य असू शकेल. त्याचप्रमाणे धैर्य हे काही नेहमी समरभूमीवरच प्रकट होणारे नाही. वादळ, रोगराई किंवा सांसारिक अडचणी, यांजमध्येही धैर्य दाखवावे लागते. राजकारणामध्ये तर धैर्याची जरूर विशेष असते. आपले मनोविकार जिंकणे हेही मोठे धैर्याचेच काम आहे. कदाचित, धैर्य म्हणजे सोशीकपणा असे म्हटले तर कित्येक प्रसंगी अगदी अप्रबुद्ध लोकही सोशीक असतात व हा त्यांचा सोशीकपणा केव्हा केव्हा त्यांच्या हीनपणाला कारण होतो. मग धैर्य म्हणजे सोशीकपणा म्हणावे तर धैर्य हा गुण जसा श्रेष्ठ, तसाच हीन आहे, असेच म्हणावे लागेल; पण हा वाग्विरोध अगदी अग्राह्य आहे.

लॅचेस हा स्वतः शूर आहे व त्याने अनेक प्रसंगी असामान्य धैर्य दाखविले आहे; परंतु धैर्य या शब्दाची त्याला व्याख्या मात्र करता येत नाही.

लिसिस याच्या संवादामध्ये मैत्री हा वादविषय आहे व त्यावरही असाच पुष्कळ खल होऊन मैत्रीचे स्वरूप अनिश्चित सोडण्यात आले आहे.

सॉक्रेटिस हा नेहमीच अशी प्रत्येक समजुतीची छाननी करीत असे व अशा त-हेने प्रत्येक विचाराचे सूक्ष्म धागे निरनिराळे काढणे, हा त्याच्या वादपद्धतीचा दुसरा महत्त्वाचा भाग असे. आपल्या विचारातील निरनिराळ्या कल्पना योग्य रीतीने स्पष्ट व्हाव्यात म्हणून तो अगदी नित्य व्यवहारातील गोष्टी घेई व त्यामुळे ज्या वस्तूंच्या स्वरूपाविषयी कोणास अपरिचय नाही अशा अनेक वस्तूंविषयींच्या अनुभवाने सामान्य सिद्धांतांचे किंचित दिग्दर्शन करणे त्यास सोपे पडे. सौंदर्य म्हणजे काय, असा प्रश्न निघाला असता. सुंदर स्त्री म्हणजे काय. सुंदर घोडा कोणता. सुंदर घडा कसा असतो, या प्रश्नांचे उत्तर घेतल्यावर त्यावरून एकंदरीत सौंदर्य कल्पनेची उभारणी करावयाची. ही पद्धती सोफिस्ट लोकांस फार अडचणीची वाटे हे खरे; कारण अगदी साध्या प्रश्नाला अगदी साधे उत्तर देणे म्हणजे त्यांना अगदीच अपरिचित गोष्ट होती व असे उत्तर देता देता ते अगदी सहज चकत; परंतु अशी ही प्रश्नोत्तरमाला मांडून त्यापासून जो एक सर्वसामान्यरूप निष्कर्ष निघेल तोच खरा व अशा भावनांची सिद्धी हाच या वादपद्धतीतील तिसरा व सर्वांत महत्त्वाचा भाग होय. निःसंदेह अशा उदाहरणातून नि:संशय असे सामान्य सिद्धांत काढणे या तर्कपद्धतीला इंग्रेजी भाषेमध्ये इंडक्शन (Induction) असे म्हणतात व अशा पूर्वी सिद्ध झालेल्या सिद्धांतावरून नवीन सिद्धांत काढणे या पद्धतीला डिडक्शन (Deduction) असे म्हणतात. आपल्याकडील तर्कशास्त्रामध्ये व्याप्तिज्ञान* हे पहिल्या प्रकारचे आहे व अनुमान हे दुसऱ्या प्रकारचे आहे. या दोन भागांमध्ये इंडक्शन (Induction) हा अधिक महत्त्वाचा भाग आहे. कारण दुसऱ्या भागाचे अस्तित्व सर्वस्वी त्याजवरच अवलंबून आहे. आपल्या तर्कशास्त्रातील नेहमीचे उदाहरण घेऊन त्याबद्दलची कल्पना थोडी स्पष्ट करू. एखाद्या पर्वतावरून धुराचे लोट निघताना आपण पाहिले म्हणजे आपण अनुमान करतो, की त्या पर्वतावर अग्नी असावा. या आपल्या निर्णयाला आधार म्हणजे दोन सिद्धांत. ज्या ज्या ठिकाणी धूर असतो, त्या त्या ठिकाणी अग्नी असतोच हा एक सिद्धांत व दुसरा पर्वतावर धूर निःसंशय आहे हा सिद्धांत. या अनुमानामध्ये धूर असणे (धूमत्व) याला हेतू असे म्हणतात. वरील दोन सिद्धांतांमध्ये पर्वतावर धूर आहे हा सिद्धांत किंवा तर्कशास्त्राच्या भाषेत म्हणावयाचे झाल्यास हेतूची पक्षधर्मता ही प्रत्यक्ष आहे; परंतु पहिला सिद्धांत सिद्ध झाल्याशिवाय, म्हणजे हेतू व साध्य (अग्नित्व) यांची व्याप्ती निश्चित झाल्याशिवाय, या ज्ञानाचा काही उपयोग नाही व ही व्याप्ती ठरविणे ती केवळ Induction नेच सिद्ध होणारी आहे. वरील उदाहरणामध्ये ज्या ज्या ठिकाणी धूर आहे, त्या त्या ठिकाणी अग्नी असतोच, असा सिद्धांत झाला. हा सिद्धांत ठरविण्यास काय काय खबरदारी ठेविली

---

* न्यायदर्शनात अनुमान तर्काधारासाठी वापरले गेले आहे. वास्तविक त्याची दोन अंगे सांगितली आहेत. 'अनुमानस्य द्वे अंगे व्याप्तिः पक्षधर्मताच ।' (२५, तर्कभाषा, केशवमित्र)

पाहिजे, हेतू हा काय काय गुणांनी युक्त पाहिजे, त्याचे दोष काय व त्याची आभासमय स्वरूपे कोणती, याचे आपल्या तर्कशास्त्रामध्ये विवरण केले आहे. ॲरिस्टॉटलचे तर्कशास्त्र व आपले तर्कशास्त्र याचे पुढे यथाकाळ सापेक्ष विवरण करण्याचा प्रसंग येईलच, त्यावेळी याचा विस्तार करावयाचाच आहे. सध्या लक्ष्यात ठेवावयाची गोष्ट म्हणजे इतकीच, की सामान्य सिद्धांत सिद्ध करण्याची Induction ची जी पद्धती, तिचा मूळ पाया सॉक्रेटिसने घातला. त्याची उदाहरणे घेण्याची पद्धती काही अगदी शास्त्रीय रीतीने ठरविली नव्हती, हे खरे आहे व त्याच्या प्रयत्नांनी या पद्धतीचे पूर्ण स्वरूप प्रकट झाले नाही हेही तितकेच खरे आहे. सॉक्रेटिसने जर काही महत्त्वाचे कार्य केले असेल, तर आपल्या पृथक्करण पद्धतीने त्या शास्त्राला सुरुवात करणे हेच होय. सॉक्रेटिस हा फार थोर पुरुष, यात काहीच शंका नाही; पण तो अतिशय श्रेष्ठ असला म्हणून त्याने प्रत्येक शास्त्राची पूर्तताच केली असली पाहिजे असा काही सिद्धांत नाही. ऐतिहासिक पुराव्याशिवाय असा सिद्धांत बांधणे तर अगदीच असमंजसपणाचे आहे. एखाद्या व्यक्तीचा मोठेपणा शास्त्राच्या पूर्णवाढीवर अवलंबून नसून त्याने केलेल्या प्रगतीपर कार्यावर आहे; परंतु ही गोष्टी लक्षात न घेता सॉक्रेटिसला अवास्तव श्रेय देण्याचाही कित्येकांनी प्रयत्न केला आहे व ज्या ठिकाणी ऐतिहासिक पुरावा पुरेसा मिळणार नाही, त्या ठिकाणी केवळ आपल्या कल्पनेचे खेळ लठविले आहेत. प्रोफेसर फेरिअर (Ferrier) व एक फ्रेंच लेखक फूले (Fouillee) यांनी याच मार्गाचा अवलंब केला आहे. प्रोफेसर फेरिअरचे असे म्हणणे आहे, की ऐतिहासिक सत्याचा अतिक्रम करणे हे वाईट आहे खरे; पण एखाद्या पुरातन तत्त्वज्ञाच्या मताचा त्याच्या लक्षातही न आलेला वर्ग प्रकट करणे, हे एकाअर्थी ऐतिहासिक सत्याचे स्पष्टीकरणच आहे.*

परंतु हा मार्ग म्हणजे गूढ रहस्यमय गोष्टींना लागू पडणारा असला तरी पूर्वग्रहांनी अदूषित अशा तत्त्वज्ञानविषयक अभ्यासाला अगदी निरुपयोगी आहे. सॉक्रेटिसची कामगिरी ही साधारणपणे पूर्वतयारीसारखी होती. त्याची योग्यता या गोष्टीने कमी होते, असे आम्हास मुळीच वाटत नाही.

उलटपक्षी कित्येकांचा सॉक्रेटिसच्या पद्धतीवर असा आक्षेप आहे, की ती पद्धती खरोखर पाहता विधायक नसून केवळ विध्वंसक मात्र आहे. सॉक्रेटिस हा दुसऱ्यांच्या मताचा अगदी कीस काढून त्याचा फोलपणा प्रकट करी; पण दुसऱ्याचे ज्ञान फोल ठरल्यावर आपले स्वतःचे म्हणून सांगण्यास त्याजवळ काही नव्हते, असे या पक्षाचे म्हणणे आहे. खुद्द सिसेरोचे असे मत आहे, की, सॉक्रेटिस आपल्या अज्ञानाची नेहमी जी कबुली देतो, ती केवळ ज्ञानाचा

---

* It is bad to violate the truth of history, but the truth of history is not violated, it is rather cleared up, when we evolve out of the opinions of an ancient philosopher more than the philosopher himself was consecious of these opinions containing. (Lectures and Philosophical Remains.)

असंभव दाखविण्यासाठीच आणि ज्या प्लेटोच्या संवादामध्ये सॉक्रटिसचे तत्त्वज्ञान ग्रथित झाले आहे, त्या संवादामध्ये विधायक असे काहीही नसून त्यामध्ये केवळ दुसऱ्याची मते ऐकून घेण्याचाच प्रकार आढळतो. अलीकडील लेखकांमध्ये ग्रोट या इतिहासकाराचे मत याहून किंचित निराळे आहे. त्याच्या मते सॉक्रेटिस व सोफिस्ट यांजमध्ये काही विशेष अंतर नाही व जे थोडे फार आहे ते केवळ गौणच. सोफिस्टांविषयी ग्रोटने जी तरफदारी केली आहे, तिजमध्ये पुष्कळ ग्राह्य अंश आहे व अंशाचा स्वीकार करून 'सॉक्रेटिस व सोफिस्ट' या प्रकरणामध्ये या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे, म्हणून सध्या हा प्रश्न बाजूला ठेवू. प्रस्तुत प्रकरणी सांगावयाची गोष्ट एवढीच, की ग्रोटच्या मताप्रमाणे म्हणावयाचे झाल्यास, प्रचलित मतांचा सदोषपणा दाखविण्यासाठी सॉक्रेटिस जो कोटिक्रम लढवितो, तो अगदी थेट सोफिस्टांच्या कोटिक्रमासारखाच आहे. दुसऱ्याच्या मताचा पाडाव करण्यास तो पूर्ण समर्थ आहे; परंतु ज्यावेळी आपले स्वतःचे मत सांगण्याचा प्रसंग येई त्यावेळी ही पद्धत झुगारून देऊन सॉक्रेटिस आपली मते केवळ अधिकाराच्या जोरावर लादावयास पाहतो. सारांश, दुसऱ्याच्या मतांची परीक्षा करण्याचा व स्वमत प्रस्थापनेचा सॉक्रटिसचा मार्ग परस्पर भिन्न आहे व त्यांचा एकमेकांचा अर्थाअर्थी काहीच संबंध नाही. सॉक्रेटिस स्वत:चे असे काहीच शिकवीत नाही, असे म्हणण्यापेक्षा तो जे शिकवतो ते शास्त्रशुद्ध रीतीने शिकवीत नाही, हे म्हणणे एका दृष्टीने जरा बरे वाटले तरी त्याने सॉक्रेटिसची वर्तणूक आक्षेपार्हच ठरते. म्हणन या आक्षेपांचा यथानक्रम विचार करू.

सॉक्रेटिस हा स्वतःचे असे काही शिकवीत नसे असे जरी गृहीत धरले, तरी त्याच्या बोलण्याचा एकंदर रोख ज्ञानाचा असंभव सिद्ध करण्यापेक्षा प्रचलित ज्ञानाची सदोषता दाखविण्याकडे होता. वर एका ठिकाणी सांगण्यात आलेच आहे, की सोफिस्ट हे, अज्ञान हेच तत्त्व धरून बसणार होते. सॉक्रेटिस हा अज्ञानासारखे वाईट दुसरे काही नाही असे समजून ज्ञानाची महती गाणारा आहे. झेलरने म्हटल्याप्रमाणे ज्ञानलालसा ही त्याच्या सर्व कृत्यांच्या मुळाशी होती व त्याच्या तत्त्वज्ञानातील मुख्य कल्पना होती. एवढी गोष्ट खरी की, त्याची सत्यज्ञानाबद्दलची कल्पना इतकी गंभीर होती की, आपणासदेखील ते ज्ञान आटोक्यात आणता येईल की नाही, याबद्दल त्याला शंका वाटे. पण त्या ज्ञानाचा लाभ झाला तरच खरा तरणोपाय आहे व प्रत्येक मनुष्याने त्याच ज्ञानाची कास धरली पाहिजे, हे त्याचे अगदी ठाम मत होते. याशिवाय सॉक्रेटिसचे स्वतःचे अशा उपदेशाविषयी बेफिकीर राहण्याचे कारण असे, की प्रत्येक मनुष्याला ज्ञान व्हावयाचे ते त्याच्या आंतरप्रयत्नानेच झाले पाहिजे, असे त्याचे मत होते. सॉक्रेटिससारख्याच्या संभाषणाने या आंतरप्रयत्नाला नवीन जीवन मिळाले म्हणजे झाले. आपल्या आत्मसमर्थनपर भाषणामध्ये सॉक्रेटिसने घोडा व गांधिलमाशी यांचे दिलेले उदाहरण मोठे मार्मिक आहे. ज्याप्रमाणे गांधिलमाशीच्या दंशाने घोडा आपला सर्व आळस झाडून भरधाव चालतो, त्याप्रमाणे सॉक्रेटिसाच्या भाषणाने श्रोत्यांच्या मनाचे

आलस्य झडून त्यांचे वास्तविक तेज प्रकट होण्याचा मार्ग खुला होई. घोड्याला जी शक्ती असते ती जशी गांधिलमाशीची नव्हे, त्याप्रमाणेच लोकांना उपयुक्त असणारे ज्ञान आपले नव्हे, अशी सॉक्रेटिसची समजूत होती. हीच कल्पना निराळ्या रीतीने मांडण्याकरिता सॉक्रेटिस असे म्हणत असे की, आपल्या आईप्रमाणे तोही एक तऱ्हेचा सुईणीचाच धंदा करी. अडलेल्या बाईची प्रसूती सुकर करणे, हे जसे शारीरिक सुईणपणाचे काम, त्याप्रमाणे मानसिक सुईणीचे काम म्हणजे सुविचारांची प्रसूती होण्यास अडथळा करणाऱ्या गोष्टी दूर करणे हेच आहे व हे काम शिताफीने कसे करावे हेच आपण जाणतो, असे सॉक्रेटिस म्हणे. विचार प्रसविण्याचे काम सॉक्रेटिसचे नसून प्रत्येक मनुष्याचे आहे. सॉक्रेटिसचा उपयोग तो प्रसव सुकर करण्यापुरताच.

सॉक्रेटिसच्या संभाषणाचा श्रोतृवृंदावर कसा परिणाम होत असे, याबद्दल मेनोने काढलेले उद्गार सुप्रसिद्धच आहेत. टॉपैडो या नावाच्या माशाला स्पर्श केला असता ज्याप्रमाणे जोराचे धक्के बसतात, त्याप्रमाणे सॉक्रेटिसच्या संभाषणाने मनाला जबरदस्त धक्के बसत. आपल्या ज्ञानाविषयीचा श्रोत्यांचा गर्व समूळ नष्ट होई व त्यांच्या ज्ञानसंशोधनास खरी सुरुवात होई. आता ही गोष्ट खरी, की ज्यांची ज्ञानतृष्णा बलवत्तर नव्हती, त्यांची ज्ञानशक्ती या हल्ल्याने जागृत होत नसे व ते कधीही आपल्या चुका सुधारून पुनः ज्ञानसंपादनाच्या मार्गाला लागत नसत; पण हा दोष सॉक्रेटिसचा किंवा त्याच्या वादपद्धतीचा नाही. सॉक्रेटिसच्या संभाषणाने ज्यांचा ज्ञानाभिमान झाडून टाकला; परंतु ज्यांची ज्ञानतृष्णा विलयाला गेली नाही व जे पुढे योग्य दिशेला लागून पदवीला चढले, अगर सुज्ञ झाले, अशा तरुण पुरुषांचीही उदाहरणे सापडतील. सॉक्रेटिसच्या वादपद्धतीच्या सयुक्तिकतेचे ते पुरेसे समर्थन आहे.

सॉक्रेटिसच्या काळी सदोष मतांचाच विलक्षण गलबला उडाला असल्यामुळे सॉक्रेटिसला त्या मतांचा निरास करण्याच्या मार्गालाच अधिक महत्त्व द्यावे लागले, ही गोष्ट खरी आहे; परंतु त्याने सत्यज्ञानाच्या कसोटीला उतरणारे आपले विचार कधी प्रकटच केले नाहीत किंवा केले असल्यास त्यांना इतर मतांना लावावयाची कसोटी लागू केली नाही, हे म्हणणे अगदी खोटे आहे. आम्हास ही गोष्ट कबूल आहे, की सॉक्रेटिसने विचार पद्धतीला लागणारे तर्कशास्त्र पूर्णत्वाला नेले नाही व त्याची Induction पद्धती अगदी सर्वांगसुंदर किंवा शास्त्रीयदृष्ट्या पूर्ण नाही; परंतु म्हणून त्याची विचार पद्धती शास्त्रविरुद्ध आहे असे मुळीच नाही. त्या पद्धतीलाही एक प्रकारची नियमबद्धता आहे व त्यातून निष्पन्न झालेली कसोटी सॉक्रेटिसने आपल्या ज्ञानालाही लावून दाखविली आहे. उदाहरणार्थ आपण झेनोफनने दिलेला एलिसचा हिपिअस व सॉक्रेटिस यांचा संवाद घेऊ. हिपिअसचे असे म्हणणे असे की, सॉक्रेटिस हा नेहमी दुसऱ्याला व्याख्या द्यावयास लावून त्याची टर उडवितो. त्यापेक्षा त्यानेच आधी व्याख्या द्यावी. व्याख्येचा विषय न्याय्य म्हणजे काय हा आहे. सॉक्रेटिसचे म्हणणे असे आहे, की तो जरी शब्दांनी न्याय्य वस्तूंची व्याख्या करीत

नसला, तरी आपल्या प्रत्यक्ष आचरणाने ते दाखवीत आहे व प्रत्यक्ष कृती ही शब्दांइतकीच किंबहुना जास्त विश्वसनीय आहे. सॉक्रेटिसने कधी कोणावर केवळ द्वेषबुद्धीने फिर्याद केली नाही, मित्रामित्रांमध्ये वितुष्ट पाडले नाही किंवा शांतता भंग करणारी बंडखोरीही प्रसृत केली नाही. मग त्याचे आचरण न्याय्य नाही काय? जे आचरण अन्याय्य नव्हे तेच न्याय्य, असे म्हणता येणार नाही काय?

हिपायसचे यावर असे म्हणणे आहे, की न्याय्य पथाने जाणारा मनुष्य काय करीत नाही हे सांगणे न्याय्य गोष्टींची व्याख्या करताना गौणभूतच मानले पाहिजे. न्याय्यवर्गामध्ये कोणती भावरूप कर्मे येतात याची कल्पना दिली पाहिजे. सॉक्रेटिस यावर असे उत्तर देतो, की कायद्याबरहुकूम वागणे म्हणजे न्याय्य होय. याचा साहजिक अर्थ असा होतो, की संस्थानचे कायदे पाळणे ही न्याय्य गोष्ट आहे; पण संस्थानचे कायदे तर वेळोवेळी बदलणारे आहेत, मग ते पाळणे न्याय्य कसे होईल? या आक्षेपावर सॉक्रेटिसचे असे उत्तर आहे, की शांततेच्या काळी तटबंदीचा उपयोग नाही, म्हणून युद्धकाळीही कोणी त्याची उपेक्षा करतो काय? एक कायदा सुधारून दुसरा केला म्हणजे काही पहिला कायदा खोटा होत नाही. कायद्याप्रमाणे वागणे हे मनुष्याला आपल्या सामाजिक व खाजगी आयुष्यक्रमात अतिशय सुखावह नाही काय? पण कायद्याची कल्पना केवळ संस्थानातील कायदे एवढीच नाही. जे कायदे कोठेही लिहिलेले नाहीत; पण ज्यांच्या सत्यत्वाची प्रतीती प्रतिक्षणी आढळून येत आहे व ज्यांचे उल्लंघन केले असता शिक्षा झाल्याशिवाय कधीही राहत नाही, असे कायदे नाहीत काय? अगम्य गमन किंवा अपेयपान केल्यास त्याची प्रतिफळे मनुष्याला येथेच भोगावी लागत नाहीत काय? या अव्यक्त व स्वयंवेद्य कायद्याचे प्रतिपालन करणे म्हणजेच न्याय्य आचरण होय.

या ठिकाणी आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे, की या दैविक कायद्याचा जेवढा भाग प्रकट होतो, तेवढ्याचाच मानवी कायद्यामध्ये अंतर्भाव होतो, अशी येथे कल्पना असल्यामुळे कदाचित असा प्रसंग येणे शक्य आहे, की एखाद्या मनुष्याची या दैवी कायद्यातच इतरांपेक्षा अधिक दूरवर दृष्टी पोहोचली असल्यामुळे, त्याचे वर्तन उच्च कायद्याबरहुकूम असताही ते गैरकायदा दिसेल व तो मनुष्य कायदा मोडतो व कायदा अक्षरक्ष: पाळतो, असे म्हणण्याचा प्रसंग येईल व असे उदाहरण म्हणजे खुद्द सॉक्रेटिसच होय. आपल्या संस्थानचा कायदा मोडून जीव वाचविण्यासाठी पळून जाण्याचे नाकारणारा क्रिटोतील सॉक्रेटिस व प्रचलित कायद्याला अमान्य असलेली मते प्रसृत करतानाही आपण निर्दोष असल्याबद्दल आत्मसमर्थन करणारा अपॉलॉजीमधील सॉक्रेटिस, या दोन चित्रांत कोणास काही विसंगती वाटल्यास ती केवळ आभासात्मकच आहे.

अशाच रीतीने आणखी काही उदाहरणे घेऊन सॉक्रेटिसच्या वादपद्धतीतील विधायकता स्पष्ट करता येईल. ॲरिस्टिपसबरोबर संभाषण करताना सॉक्रेटिसने सौंदर्य म्हणजे उपयुक्तता,

अशी व्याख्या केली आहे. अरिस्टिपसने यावर असा आक्षेप घेतला आहे, की नानावस्तू सुंदर म्हणून प्रसिद्ध असतात, तरीही त्या एकमेकांहून भिन्न असतात; पण यावर सॉक्रेटिसचे म्हणणे असे, की त्यांच्या उपयोगाची दिशा निरनिराळी असल्यामुळे त्या भिन्न भिन्न असणे अपरिहार्यच आहे. उत्तम धावणारा, उत्तम बॉक्सिंग खेळणारा असेलच असे नाही. आत्मसंरक्षण करण्यास उपयोगी पडणारी ढाल शत्रूवर प्रहार करण्यास उपयोगी पडणाऱ्या भाल्यासारखी कशी असेल? ज्या ज्या उद्दिष्ट कार्याकरिता जे जे उपयुक्त असेल, ते ते त्या कार्यदृष्टीने सुंदर व चांगलेच आहे. केरकचरा वाहण्याची पाटीही सुंदर व चांगली आहे व अगदी सोन्याचा भाला पण तोही वाईट आहे, असे त्यांच्या उपयोग किंवा अनुपयोग यावरून म्हणता येईल.

या ठिकाणी दिलेली सौंदर्याची उपपत्ती बरोबर असेल किंवा नसेल; पण ती अगदीच वेडेपणाची आहे किंवा त्यातील विचारदृष्टी अशास्त्रीय आहे असे म्हणता येणार नाही. सॉक्रेटिसच्या वादपद्धतीतील विधायकता मात्र या उदाहरणांवरून स्पष्ट होत आहे. याखेरीज सॉक्रटिसची निरनिराळ्या विषयांवरील जी जी निश्चित स्वरूपाची मते होती त्यावरून ही विधायकता अधिकच प्रकट होणार आहे व त्या मतांचा विचार एका स्वतंत्र प्रकरणातच करावयाचा आहे. त्याच्या आधी या प्रकरणामध्ये ज्यांना अनेक वार उल्लेख आला आहे. त्या सोफिस्टांविषयी योग्य ती माहिती नमूद करून सॉक्रेटिस व सोफिस्ट यांजमधील भिन्नपणाबद्दल विचार करू, मग सॉक्रेटिसाच्या मतांकडे वळू.

○○○

प्रकरण ३ रे

सॉक्रेटिस व सोफिस्ट

सॉक्रेटिसच्या चरित्रातील जे काही मोठे वादग्रस्त मुद्दे आहेत, त्यापैकीच सोफिस्ट या नावाने प्रसिद्ध असलेल्या लोकांचा व त्याचा संबंध काय होता. हा एक आहे व या विषयावर उपलब्ध झालेली माहिती संकलित करून या प्रश्नाचा विचार या भागामध्ये करावयाचा आहे.

इंग्रजी भाषेमध्ये सोफिस्ट हा शब्द उच्चारल्याबरोबर त्यात काहीतरी निंदाव्यंजक असावे असे वाटते. सोफिस्ट या शब्दाच्या दीर्घकाळपर्यंत रूढ झालेल्या अर्थामुळे त्याला हे निंदाव्यंजकत्व आलेले आहे. सॉक्रेटिसचा पट्टशिष्य प्लेटो याने आपल्या संवादामध्ये या सोफिस्टांची जी माहिती दिली आहे, त्यावरून हे सोफिस्ट म्हणजे एक देशाचा उपद्रवच होत व या उपद्रवाने सर्व ग्रीस देश व विशेषत: अथेन्स ग्रस्त होण्याच्या बेतात आले असता, केवळ सॉक्रेटिसच्या निःस्पृह शिकवणीने ग्रीस देश व अथेन्स त्या संकटातून बचावले, अशी प्लेटोची समजूत होती असे दिसते. ही गोष्ट देशाला अगर समाजाला अत्यंत हानिकारक आहे, अशी प्लेटोची समजूत होती, त्या गोष्टीचे वर्णन करताना त्याने नेहमी निंदाव्यंजक भाषा वापरावी व सोफिस्टांचा जेथे तेथे उपहास करावा, हे अगदी साहजिक आहे व त्याप्रमाणेच प्लेटोच्या ग्रंथांत आपणास आढळून येईल. प्लेटो जर मनापासून कोणाचा तिरस्कार करीत असेल तर तो सोफिस्ट लोकांचा व यामुळे त्याला आपल्या टीकेला ते अत्यंत पात्रच वाटत व त्या काळच्या परिस्थितीविषयी माहितीकरिता केवळ प्लेटोवर* अवलंबून राहणाऱ्या इतर लेखकांनी जर प्लेटोचीच पद्धती उचलली तर आश्चर्य कोणते? एवढेच नव्हे, तर ज्याप्रमाणे एखादी आश्चर्यकारक गोष्ट एकापासून दुसऱ्यास माहीत होता होता तीतील आश्चर्यकारकतेचा भाग प्रत्येक वेळी अधिक अधिक तिखट-मीठ

* प्लेटोच्या उत्तरकालीन असणाऱ्या स्टॉईकांनीही सोफिस्टांची निंदाच केली आहे.

लावून सांगण्यात आल्यामुळे सारखा वाढतच जातो व सरतेशेवटी त्या आश्चर्यकारकतेचे स्वरूप जवळ जवळ अशक्यतेपर्यंत जाते, त्याप्रमाणेच या सोफिस्टच्या निंदेला प्रतिक्षणी अधिकाधिक जोड मिळत जाऊन नुसते सोफिस्ट हे नाव उच्चारल्याबरोबर त्या सर्व निंदेचे स्मरण होऊन सोफिस्ट ही संज्ञाच निंदाव्यंजक ठरली आहे.

परंतु सोफिस्ट या शब्दाचा केवळ धात्वर्थ जर पाहू लागलो तर तो कुशल, चतुर, शहाणा असा आहे. संस्कृत अगर मराठी भाषेमध्ये 'पंडित' हा शब्द ज्याअर्थी वापरण्यात येतो त्या अर्थीच हा शब्द प्रथमत: वापरण्यात येत असे किंवा अलीकडे इंग्रजी भाषेच्या परिचयाने मराठीत रूढ होत चाललेला शब्द 'प्रोफेसर' हा सोफिस्ट शब्दाच्या तोडीचाच आहे. प्राचीन पंडित किंवा अर्वाचीन प्रोफेसर यांजप्रमाणे लोकांना शिकविणे हा या सोफिस्टांचा धंदा होता व याबद्दल ते पैसेही घेत. कदाचित हीच गोष्ट त्यांच्या निंदेला मूळ कारण झाली असेल. परंत आपणास त्याविषयी पुढे विचार करावयाचा असल्यामुळे सध्या त्याजविषयी अधिक न लिहिणे हेच बरे. वर सांगितल्याप्रमाणे सोफिस्ट म्हणजे बौद्धिक उत्कर्षामुळे प्रसिद्धीस आलेला व काही वेतन घेऊन आपल्या जवळचे ज्ञान दुसऱ्यास शिकविण्यास तयार असणारा मनुष्य असाच अर्थ त्या काळी ग्रीस देश किंवा अथेन्स शहर याजमध्ये होत असे किंवा नाही, हे अजमावून पाहण्यास आपणाजवळ साधन आहे. सोलोन आणि पायथागोरस हे सोफिस्ट म्हणूनच प्रसिद्ध होते. यमीरस हा चतुर शाहीर यालाही सोफिस्ट हीच संज्ञा मिळाली होती. फार कशाला ॲरिस्टोफेनस व एश्चीनीस हे तत्कालीन नाटककार खुद्द सॉक्रेटिसलादेखील सोफिस्टच म्हणतात. सॉक्रेटिसचे शिष्य ॲरिस्टिपस व ॲंटिस्थेनिस यांना अनुक्रमे ॲरिस्टॉटल व झेनोफन यांनी सोफिस्ट हेच उपपद दिले आहे. झेनोफनने तर एका ठिकाणी काही उपदेशपर ग्रंथात 'जुने कवी व सोफिस्ट यांचे लेख' असा उल्लेख केला आहे. सोफिस्ट लोकांची एवढी निंदा करणारा प्लेटो यालादेखील इसाक्रेटीस याने सोफिस्ट हेच टोपण नाव दिले आहे आणि अशा रीतीने विस्तारच करावयाचा म्हटल्यास आणखीही दहा-पाच तरी उल्लेख दाखविता येतील. सारांश, या सर्व आधारावरून सोफिस्ट ही संज्ञा मूळची फार व्यापक असून त्यामध्ये खुद्द सॉक्रेटिस, प्लेटो यांचाही अंतर्भाव होऊ शकतो व अशा व्यापक अर्थीच ती संज्ञा त्यावेळी वापरण्यात येत असे, असे दिसते.

आता प्लेटोने सोफिस्ट लोकांची जी टीका केली आहे, त्यामध्ये हा शब्द वरील अर्थाने तर लागू होत नाही. कारण तशा व्यापक अर्थाने तो घेतल्यास प्लेटो हा खुद्द आपल्या गुरूची व आपली स्वतःचीदेखील निंदा करून घेत आहे असे होते; पण हे अगदी अशक्य आहे. मनुष्य एकवेळ आपली स्वतःची निंदा करील; पण आपल्या गुरूची निंदा करण्यास तो एक मूर्ख तरी असला पाहिजे किंवा वेडा तरी झाला पाहिजे; परंतु प्लेटो हा मूर्ख किंवा वेडा यापैकी कोणीच नसून उलट मोठा शहाणा व विचारी तत्त्ववेत्ता आहे. बरे, सोफिस्ट या शब्दाचा हा व्यापक अर्थ प्लेटोच्या वेळी रूढ नसून तो पुढे रूढ झाला असे मानण्यासही

काही आधार नाही. ॲरिस्टोफेनस याचे 'Clouds' किंवा 'मेघमाला' हे नाटक सॉक्रेटिसच्या द्वेषाने भरले असेल; परंतु एश्चीनिस व सॉक्रेटिस यांचा तर असा संबंध नव्हता ना? मग तो नाटककारदेखील सॉक्रेटिसला सोफिस्टच का म्हणतो? आता सॉक्रेटिस सोफिस्ट असून प्लेटो सोफिस्टांवर टीका करीत असेल तर ते दोन पक्षीच संभवते. एक सॉक्रेटिस व्यापक अर्थानेही सोफिस्ट नव्हता असे म्हटले तर किंवा प्लेटोने सोफिस्टांची निंदा करताना तो शब्द संकुचित अर्थाने वापरला असला तर. यापैकी पहिला पक्ष तर सर्वस्वी असंभवनीयच. कारण आपला स्वतःचा गुरू कोणाला काही शिकवीतच नसे, हे म्हणणे परस्परविरोधी आहे. यावरून प्लेटोने सोफिस्ट हा शब्द काही संकुचित अर्थानेच वापरला असावा, हे अनुमान दृढ होते.

प्लेटोच्या मनातील हा संकुचित अर्थ काय असावा म्हणून पाहू लागल्यास असे आढळेल, की त्याने तो शब्द सॉक्रेटिसच्या पूर्वीच्या शिक्षकांना किंवा पंडितांना मात्र लावला आहे. सॉक्रेटिस हा लोकशिक्षक असला तरी सोफिस्टांपासून भिन्न होता, असे दाखविण्याचा प्लेटोचा उद्देश दिसतो. एक इतर सर्व सोफिस्ट आपल्या शिकवणीबद्दल पैसे घेत असत व सॉक्रेटिस मुळीच पैसे घेत नसे व प्लेटोच्या मताप्रमाणे दुसरा व अधिक महत्त्वाचा फरक म्हणजे सॉक्रेटिस जे ज्ञान शिकवी ते सत्यज्ञान होते आणि सोफिस्टांचे ज्ञान म्हणजे भ्रामक व असंबद्ध होते. सॉक्रेटिसच्या सत्यज्ञानापुढे सोफिस्टांचा ज्ञानदंभ टिकणे शक्य नव्हते, हे दाखविण्याकरिता प्लेटोने आपल्या 'संवादात' सॉक्रेटिस व प्रोटॅगोरस इत्यादिक सुप्रसिद्ध सोफिस्ट यांचा संवाद दिला आहे व त्यामध्ये सॉक्रेटिसचे वर्चस्व सिद्ध केले आहे. ॲरिस्टोफेनससारखे लोक सॉक्रेटिसला सोफिस्ट म्हणत असले तरी सोफिस्ट म्हणून नावाजलेल्या पंडितांच्या शिकवणीपेक्षा सॉक्रेटिसची शिकवण व विचार पद्धती ही किती भिन्न होती, हे दाखविण्याचा प्लेटोचा विचार असावा व हे दाखविताना सोफिस्टांची निंदा करणे त्याला अर्थातच प्राप्त होते.

स्वत: प्लेटोने सोफिस्टांची निंदा का केली, हे याप्रमाणे उघड आहे; परंतु या निंदेचेच पुढील ग्रंथकारांनी फाजील अनुकरण केल्यामुळे सोफिस्ट हे नावच अर्वाचीन वाङ्मयात बद्दू झाले आहे व या त्याच्या बदलौकिकाचे शिंतोडे काही दोषरहित शिक्षकांवरही उडाले आहेत. सॉक्रेटिसची महती गात असतानाही त्याच्या प्रतिपक्षीयांची अवास्तव निंदा करणे हे केव्हाही योग्य होणार नाही व म्हणून सोफिस्टाहून सॉक्रेटिस कसा भिन्न होता, हे दाखविण्यापूर्वी सोफिस्टाबद्दल अर्थात प्लेटोच्या संकुचित अर्थाने-काही माहिती देऊन प्लेटोने त्यांजविरुद्ध आणलेले आक्षेप कितपत खरे आहेत, याचा ऊहापोह करू म्हणजे सॉक्रेटिसचा व यांचा काय संबंध आहे हे ठरविता येईल. केवळ प्लेटोच्या आधारावर, सॉक्रेटिस हा सर्वस्वी सोफिस्टांहून भिन्न होता हे मत प्रचलित झाल्यानंतर त्याजविरुद्ध आपले मत पहिल्या प्रथम हेगेलने दिले व त्यापेक्षा किंचित निराळ्या रीतीचे उत्तर किंवा

विवेचन म्हणजे ग्रोट या इतिहासकाराचे. प्रस्तुत विवेचनात पुष्कळसा भाग या ग्रंथकाराच्या इतिहासातील हकीगतीचाच आधार घेऊन लिहिला आहे.

सॉक्रेटिसच्या आधी व सोफिस्ट लोकांच्याही पूर्वी अथेन्स येथील शिक्षण पद्धती फार संकुचित होती. शरीर सुधारण्याकरिता कसरत व मनास शिक्षण देण्यास संगीत किंवा छंदशास्त्र (Music) हेच काय ते दोन विषय तीमध्ये येत. आता येथे संगीत हा शब्द त्याच्या अलीकडील संकुचित अर्थाने न घेता व्यापक अर्थाने वापरण्यात येत असल्यामुळे हे शिक्षण प्रथमदर्शनी वाटते त्यापेक्षा अधिक व्यापक होत असे. भर्तृहरीच्या 'साहित्य-संगीत-कला' या त्रयींपैकी दोन विषयांचा अंतर्भाव एका संगीत शब्दातच केल्यास ते या शिक्षणाचे स्वरूप होईल. या संगीतविषयामध्ये सारंगी (Iyre) कशी वाजवावी, गाण्याला साथ कशी करावी हेच विषय नसून, कविता कशी वाचावी, कशी टेकावी व शब्दांचे उच्चार कसे करावेत, हेही महत्त्वाचे भाग असत. ग्रीक भाषेतील शब्द अधिक विस्तृत, विविधावयवी व विविधोच्चारण असल्यामुळे हे शब्दांचे उच्चार शिकण्याचे काम महत्त्वाचे व कठीण असे. हल्लीच्या काळी फक्त मराठी जाणणारा इसम इंग्रजी शिकू लागला म्हणजे त्याला इंग्रजी शब्दांचा उच्चार शिकून तो ध्यानात ठेवण्यास जितके श्रम पडतात, तितकेच ग्रीक लोकांना आपल्या भाषेतील शब्दोच्चार शिकणे अवघड जात असे. संगीत या विषयात आणखीही काही गोष्टींचा समावेश होत असे. मनुष्यांच्या कल्पना जसजशा वाढत चालल्या तसतशा त्या कल्पना व्यक्त करण्यास नवीन नवीन शब्द उपयोगात येऊ लागले व हे शब्द शिकविताना त्या कल्पना करण्याचे कामही या संगीत शिक्षकांवरच पडले व त्यायोगाने संगीत शिक्षकांचे ज्ञान विस्तृत झाले. असे होता होता ख्रिस्ती शकापूर्वी सुमारे पाचव्या शतकात अथेन्स येथील संगीत शिक्षक नुसत्या शब्दरचनेच्या अगर कवितावाचनाच्या विषयातच प्रवीण नसून त्यांना खगोलज्ञान, भूगोलविज्ञान व पदार्थविज्ञान याविषयी त्या काळी प्रचलित असलेली सर्व माहिती असे व हे विषयही ते शिकवीत असत आणि याशिवाय त्या काळी उद्भुत झालेल्या नवीन व महत्त्वाच्या सामान्य प्रश्नांचा ते ऊहापोह करीत तो निराळाच. या रीतीने संगीत विज्ञान हा शब्द व्यापक असे व संगीत शिक्षक म्हणून नावाजलेले लोक फार विद्वान असून त्यांचा मोठ्या, प्रसिद्ध व राजकारणकुशल पुरुषांशीदेखील संबंध असे. 'पायथोक्लेडीस व डेमन हे संगीत शिक्षक असून ते पेरिक्लिसचेही गुरू होते व डेमनला तर त्याच्या व पेरिक्लीसच्या प्रतिपक्षांच्या उठावणीने हद्दपारीचाही प्रसंग सोसावा लागला होता.

या परिस्थितीत संगीत विज्ञान व इतर विषय यातील विद्वत्तेमुळे प्रसिद्धीस आलेल्या पुरुषासच सोफिस्ट ही संज्ञा मिळाली. हे सोफिस्टही शिक्षकाचाच धंदा करीत. या ठिकाणी एक मुद्याची गोष्ट म्हणजे अशी, की हे सोफिस्ट काही अंशी संगीत शिक्षकांच्याचप्रमाणे असले तरी त्यांच्या शिक्षणाची एक विशिष्ट दिशा आखलेली होती आणि ती अथेन्समधील

विशिष्ट शासन पद्धतीमुळे अस्तित्वात आली होती. अथेन्स हे प्रजासत्ताक संस्थान होते. या राज्य पद्धतीत प्रत्येक वयात आलेला अथीनियन हा त्या सत्तेचा घटक असे. म्हणजे अथेन्समधील वयात आलेला प्रत्येक इसम त्या संस्थानातील कायदे करणाऱ्या व राज्य धोरण ठरविणाऱ्या सभेचा सभासद असे. यामुळे प्रत्येक मनुष्याला आपल्या गुणांवर मोठेपणा व सत्ता मिळविण्याची संधी असे व त्याप्रमाणे अगदी गरिबीतूनही राजकीय सत्तेपर्यंत ज्यांची मजल गेली असे पुरुष अथेन्सच्या इतिहासात आपणास सापडतील. मोठ्या हुद्याची जागा देणे न देणे हे सर्व लोकांच्या हातात असल्यामुळे लोकांचे मन वळविण्याची विद्या जी वक्तृत्व तिचे अशा ठिकाणी फार महत्त्व असते व राजकीय उलाढालीत पडण्याची ज्याला इच्छा असेल त्याला ते अवश्य साधावे लागते. अथेन्समधील प्रजासत्तेमुळे अशी उलाढाल करण्याची संधी साधारण योग्यतेच्या मनुष्यासही मिळे व म्हणून दिवसानुदिवस वक्तृत्वकलेला अधिक मान मिळू लागला व विशषत: श्रीमंत घराण्यात तर त्याचे अतिशय स्तोम माजले. याशिवाय या कलेला एवढे महत्त्व येण्याचे कारण असे, की त्यावेळी कोणावर फिर्याद वगैरे झाल्यास आपला बचाव करण्यासाठी त्याला स्वतःलाच भाषण करावे लागे. आपल्यातर्फे वकील देण्याची आधुनिक काळातील सवड त्यावेळी नव्हती. जर एखाद्याला नीट बोलता येत नसेल तर एखाद्या वाकबगार वक्त्याकडून भाषण लिहून घेऊन ते कोर्टात पाठ म्हणणे अशा प्रसंगी अवश्य होई आणि या योगाने वक्तृत्वात वाक्बगार असणाऱ्या माणसास महत्त्व येई. त्यातही अथेन्स येथील विशिष्ट परिस्थितीमुळे प्रत्येकास केव्हातरी कोर्टात जाण्याचा प्रसंग यावायचाच. मग अशा अडल्यावेळी एखाद्या वक्त्याची पायधरणी करण्याचा प्रसंग पत्करण्यापेक्षा आपण स्वतःच साधारण वक्तृत्वकलेची माहिती करून घेतलेली काय वाईट? अशा विचाराने प्रत्येक मनुष्य थोडे फार वक्तृत्व संपादन करीत असे. निदान आपणास सुसंबद्धपणे बोलता यावे, अशी तरी प्रत्येकाची इच्छा असे. वक्तृत्वाला सुसंबद्धता जशी अवश्य, त्याप्रमाणेच मोहकताही अवश्यच पाहिजे. आपले बोलणे ऐकून बहुजन समाज नुसता गार होऊन जावा व त्याने आपल्याच मतास दुजोरा द्यावा, अशी प्रत्येक मनुष्याची इच्छा असल्यामुळे ही सुसंबद्धता व ही मोहकता आपल्या भाषणात कशी आणावी, हा त्या काळी मोठ्या महत्त्वाचा विषय होता आणि सोफिस्ट लोकांनी विशेषत: हाच विषय हाती घेतला होता. 'अथेन्स संस्थानात विचार कसा करावा, बोलावे कसे, वागावे कसे, हे आपण शिकवितो, असा सोफिस्ट लोक बाणा बाळगीत असत.

या विशिष्ट परिस्थितीमुळेच इतर विषय मागे मागे पडत चालले. साधारणतः आपल्या भोवती सृष्टीत चाललेल्या घडामोडींचे गूढ उलगडणे हा तत्त्वज्ञानाचा विषय असतो व त्याप्रमाणे ग्रीक तत्त्वज्ञांनी आजपर्यंत विचार केला होता. सृष्टीत दिसणाऱ्या विविध वस्तूंच्या मुळाशी पाणी हे द्रव्य असावे, असा थेल्सचा सिद्धांत होता. ही विविधता अग्नी या एका द्रव्याने उत्पन्न झाली आहे, असा हिरॅक्लिटसचा सिद्धांत होता. जगतातील भेद

हा आभासमय आहे, असे पारमिनाइड्स याने प्रतिपादित केले होते. सष्टीत चालणारी सुव्यवस्था कधी एकतानतेच्या तत्त्वावर. तर कधी विषमतेच्या तत्त्वावर मांडण्यात येत होती. फार काय पण अगदी अलीकडे अतिशय उपयोगी व सूचक ठरलेला परमाणुवादही त्यावेळी माहीत होता; परंतु त्यावेळी त्याला अर्वाचीन काळातल्याप्रमाणे फलप्राप्ती मात्र झाली नाही. असे का व्हावे, ही मोठी आश्चर्याची तर गोष्ट खरीच; परंतु त्या काळी या गोष्टींनी मनुष्याचे मन वेधले गेले नाही एवढे खरे. सृष्टीतील कोडी उलगडण्यात व्यर्थ वेळ घालविण्यापेक्षा अधिक निश्चित अशा राजकारणाच्या उलाढाली करण्यातच मनुष्यांना अधिक हित वाटू लागले. सृष्टीच्या विविधतेच्या मुळाशी पाणी असो, की अग्नी असो किंवा परमाणू असोत. तिच्या मुळाशी जल आहे, या ज्ञानाने अथेन्समधील कायदे करणाऱ्या सभेचे बहुमत आपल्या बाजूचे करून घेण्यास साधन होणार होते काय? तर मग इसॉपच्या गोष्टीतील खगोल निरीक्षकाप्रमाणे आडात पडून आपले हसू करून घेण्यात काय अर्थ आहे? दुर्गम व अनिश्चित विषयांचा उगाच कीस काढीत बसण्यापेक्षा राजकारणातील सुगम व निश्चित फल देणाऱ्या प्रश्नांचाच ऊहापोह का करू नये? सारांश, मनुष्याने उपयुक्ततेच्या दृष्टीनेच शास्त्राचा अभ्यास करावा. आम्ही वर दर्शविलेली विचार पद्धती केवळ सोफिस्टांचीच नसून खुद्द सॉक्रेटिसचीही आहे. भूमिती किंवा खगोल विज्ञान यासारख्या शास्त्रांचा अभ्यास फार तर जमिनी मोजणे व गलबतांच्या प्रवासाची दिशा ठरविणे, याला आवश्यक तेवढाच करावा, असे सॉक्रेटिसचे मत होते. (The proper study of mankind is man) म्हणजे मनुष्याला अत्यंत विचारणीय असा विषय म्हणजे मनुष्यच आहे, असे सॉक्रेटिसचे मत होते. सॉक्रेटिसच्या या विचारपद्धतीबद्दल आम्हास अन्यत्र विवेचन करावयाचे आहे व त्या ठिकाणी त्या विचारसरणीतील व सोफिस्टांच्या विचारसरणीतील सूक्ष्म भेद व त्यामुळे होणारे महत्त्वाचे परिणाम, हेही स्पष्ट करण्यात येतील. सध्या सांगण्याचा मुद्दा एवढाच, की ही उपयुक्ततेची दृष्टी त्या काळी अगदी सामान्यच झाली होती व त्यामुळे लोकशिक्षणाचे विषय त्या दृष्टीनेच निवडण्यात येत असत. वक्तृत्व, भाषापटुत्व, व्यवहार नियम हे शिकविताना सर्वस्वीच फाटा मिळाला होता असे नाही; परंतु इतर विषय साधारणत: गौणच मानले जात असत.

यावरून सोफिस्ट लोक, त्या काळी प्रचलित असलेल्या व आवश्यक वाटणाऱ्या विषयातील नावाजलेले पंडित असून, ते ते विषय शिकविणारे होते असे झाले; परंतु केवळ याच मुद्यावर ते अनीतिमान होते किंवा दोषी होते, असे कसे ठरेल? या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आपण सध्याची आर्यावर्तातील स्थिती लक्षात आणू. आजकाल प्रचलित असलेली विद्या व प्राचीन काळापासून चालत आलेली विद्या, यात किती तफावत दृष्टीस पडते? प्राचीन काळचे ते चतुर्वेदी, त्रिवेदी, मीमांसक, षट्शास्त्री कोठे गेले, मस्तकावर जटाजूट व अंगावर वल्कले धारण करून अमुक इष्टीमध्ये अग्निकंडाच्या किती व कशा

विटा रचाव्यात. प्रत्येक प्रकारच्या यज्ञामध्ये विशिष्ट कुंडांचा आकार कसा असावा इत्यादिक विषयांची चर्चा करणारे ऋषी, ब्रह्मविचारांतच निमग्न झालेले तापसी व केवळ धर्माभ्यासात निमग्न असणारे वैखानस यांचे युग जाऊन आज कित्येक शतकेची शतके होऊन गेली; परंतु अगदी अलीकडेदेखील अवच्छिन्नावछेदकांच्या व घटपटाच्या खटपटीत चूर असणारे नैयायिक व मनोरमांत अध्ययन करून खफछटांतच निमग्न झालेले वैयाकरणी, दिवसानुदिवस मागे पडून आधुनिक पद्धतीने तयार झालेले पदवीधर पुढे आले नाहीत काय? न्याय व्याकरणांच्या शाळा ओस पडून इंग्रजी शाळा व कॉलेज जिकडे तिकडे गजबजून गेली नाहीत काय? सध्याच्या काळातील जरूरीप्रमाणे शिक्षणाचे विषय किंवा दिशा पालटत गेली नाही काय? आणि ती अशी पालटत गेली म्हणून अलीकडील प्रोफेसर म्हणजे अनीतिमान व पूर्वीचे ऋषी तेवढे नीतिमान असा सिद्धांत निघतो काय? ऋषी-मुनी हे अनेक बाबतीत अलीकडील विद्वान प्रोफेसरांपेक्षा श्रेष्ठ असतील; परंतु हे त्यांचे श्रेष्ठत्व नीतिमत्तेत नसून आत्मिक उन्नती. वैराग्य शांती इत्यादी गणांवर सिद्ध होणारे आहे. मनष्याच्या गरजा या कालानुसार बदलत जातात व त्याप्रमाणे मनुष्य आचरण करतो. असे आचरण निश्चयाने अनीतिमानच असेल असे नाही. सोफिस्टांचे आचरण किंवा उपदेश तसा होता किंवा नाही, हे अद्याप कायमचे ठरावयाचेच आहे. सध्या सांगावयाचे म्हणजे एवढेच, की सोफिस्ट लोकांनी मूळची पद्धती व मूळचे विषय सोडून आपली दिशा पालटली हाच केवळ त्यांचा दोष नव्हे आणि जर कदाचित हा त्यांचा दोष असलाच तर स्वतः सॉक्रेटिसही त्या दोषांतून मुक्त होत नाही. कारण त्याने तरी लोकांपुढे निरनिराळे विषय आणून पूर्वीच्या विचारपद्धतीत क्रांती घडवून आणली नाही काय?

सोफिस्टांच्या विरुद्ध प्लेटोचा एक महत्त्वाचा आक्षेप म्हणजे ते आपली विद्या शिकविण्याबद्दल पैसे घेत हा आहे आणि त्यातही अतिशय विद्वान म्हणून ज्यांची ख्याती असे, असे सोफिस्ट लोक आपल्या शिकवणीबद्दल अधिक पैसे मागत व त्यामुळे त्यांजजवळ शिकणे हे श्रीमंतांच्याच मुलांना परवडे; परंतु या वस्तुस्थितीचा लोकांच्या मनावर असा भ्रामक परिणाम होत असे, की सोफिस्ट जितका जितका अधिक विद्वान, तितका तितका तो श्रीमंत लोकांपुढे गोंडा घोळणारा असावयाचाच; परंतु हा समज सर्वस्वी चूक आहे. सोफिस्ट लोक कधीही श्रीमंतांच्या दारोदार भटकत फिरून त्यांचा आश्रय मागत नसत, तर उलट श्रीमंत लोकच अशा सोफिस्टांच्या टपणीवर राहत आणि कसेही करून वाटेल तो पैसा घेऊन त्याने आपल्या मुलास शिकवावे, अशी त्याला गळही घालीत सोफिस्ट लोक पैसे घेतात. ही गोष्ट स्वतः श्रीमंत लोकांनादेखील चमत्कारिक किंवा लांछनास्पद तर वाटत नसेच. परंत पैसे घेऊन का होईना. पण हे लोक आपणास बिनमोल विद्या शिकवितात याबद्दल त्यांना उलट मोठी कृतज्ञता वाटे. यावरून जर काही सिद्ध होत असेल तर ते सोफिस्ट लोकांचा हांजीपणा नसून त्यांचे अगाध ज्ञान व जनसमाजाची ते मिळविण्याची

उत्कंठा. सोफिस्ट लोक आपल्या विद्वत्तेच्या जोरावर जे पैसे मिळवीत ते पाहन मत्सरग्रस्त इतर पुरुषांनी किंवा कमी प्राप्ती होणाऱ्या त्यांच्या व्यवसायबंधूंनी वेळी अवेळी त्यांची निंदा केली तर त्यात मनुष्यस्वभावाविरुद्ध काय आहे? आपल्यास धंद्यात आपल्यापेक्षा वरचढ ठरणाऱ्या मनुष्याचे बारीकसारीक दोष काढून त्याचे अवंडबर माजविणे किंवा दुसऱ्याची श्रीमंती सहन न झाल्यामुळे ती श्रीमंती वाईट मार्गानेच मिळविली असली पाहिजे, असा सरसहा शेरा मारणे, ही मानवबुद्धीच्या क्षुद्रतेची उदाहरणे आहेत.

सॉक्रेटिस किंवा प्लेटो यांनी जरी सोफिस्टांची या मुद्यावर थोडीबहुत निंदा केली आहे, तरी ती मत्सरप्रेरित नाही, हे उघड आहे; परंतु त्यांजकडून हा आक्षेप येण्याचे कारण त्यांची भिन्नदृष्टी होय. सॉक्रेटिसचे असे म्हणणे असे, की गुरू व शिष्य यांचे नाते म्हणजे मित्रमित्रांतील अथवा प्रणयी युगलांतील प्रेमबंधनासारखेच आहे व या प्रेमबंधनाला द्रव्यदृष्टीचा किंचित स्पर्श होताच त्याचे पावित्र्य नष्ट होते. एकमेकांपासून होणाऱ्या आर्थिक लाभाकरिता एकमेकांवर प्रेम करणारे पुरुष ज्याप्रमाणे खरे मित्र नव्हेत किंवा पतीच्या संपत्तीस्तवच त्यावर प्रेम करणारी स्त्री खरी पतिव्रता नव्हे किंवा आपल्या श्वशुराकडून मिळणाऱ्या अपरंपार देणगीवरच लक्ष देऊन एखादी कन्या वरणारा पुरुष खरा प्रणयी नव्हे, त्याचप्रमाणे केवळ पैशाखातर शिष्यास विद्या देणारा मनुष्य खरा गुरूही नव्हे. गुरूने शिष्याजवळून पैसा घेतला म्हणजे तो त्याचा मिंधा होतो व हा मिंधेपणा म्हणजे एक प्रकारचे प्रच्छन्न दास्यच आहे. त्याच्या योगाने विशिष्ट मार्ग किंवा विशिष्ट विषय, अगर विशिष्ट व्यक्ती निवडून पत्करण्याचे गुरूचे स्वातंत्र्य नष्ट होते. शिष्य गुरूच्या तंत्राने वागण्याचे एकीकडे राहून त्याच्या पैशाने मिंधा झालेल्या गुरूसच त्याच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. आपल्याकडील प्रसिद्ध साधुवर्य रामदासस्वामी यांनी पैशांकरिता शिष्यांच्या मिंध्या झालेल्या गुरूंची निंदाच केली आहे. समर्थ म्हणतात, "एक द्रव्याचे विकिले। एक शिष्यांचे आंखिले। ऐसे दुराशेने केले। दीनरूप ॥२३॥ जें जें रुचे शिष्यां मनी। तैसीच करी मनधरणी। ऐसी कामना पापिणी। पडली गळा ॥२४॥ जो गुरु भीडसारू। तो अद्धमाहूनि अद्धम थोरू। चोरटा मैंद पामरू। द्रव्य भोंदू ॥२५ ॥ (दासबोध द. ५ स.२). समर्थांच्या निःस्पृह वाणीचा हा कोरडा सॉक्रेटिसच्या टीकेइतकाच जहाल आहे. असे भाडोत्री शिक्षक म्हणजे चोर, ठक, पामर, त्यांच्यामध्ये व यांच्यात काय सार असणार? सोफिस्ट लोक जर पैसे घेऊन विद्या शिकविणारे, तर मग तेही त्याच पदवीला सर्वथा योग्य ठरत नाहीत काय?

या टीकेविषयी विचार करताना प्रथम ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, की एखाद्या विशिष्ट अवस्थेपेक्षा उच्चतर अवस्था असली म्हणजे ती अवस्था कमी प्रतीची ठरली तरी अनीतियुक्त ठरत नाही. भाडोत्री शिक्षकांना नि:स्वार्थी शिक्षकांची सर येणार नाही व ते सद्गुरूपदाला नालायक आहेत, ही गोष्ट खरी असली तरी एवढ्यावरूनच ते नीतिबाह्य होत नाहीत. जगातील सर्व गोष्टी उच्च तत्त्वज्ञानाबरहुकूम चालत नाहीत व नीती हे व्यवहारसंबंधी शास्त्र

असल्यामुळे त्यात व्यवहाराला अनुसरूनच निर्णय करावा लागतो. आपल्या देशबांधवांच्या सेवेसाठी आपले सर्व जीवित वाहणाऱ्या पुरुषाची योग्यता, देशाची अल्पस्वल्प सेवा करणाराला किंवा देशहितासाठी थोडीशी पैशा-अडक्याची झीज सोसणाऱ्या मनुष्याला येणार नाही हे खास; पण यावरून ते पुरुष स्वत: अनीतिमान किंवा अनीतिप्रेरक कसे होऊ शकतील? त्यांच्या औदार्याची प्रत कमी धरा; पण काही झाले तरी ते औदार्यच. त्याला अनुदारपणा असे काही खास म्हणता येणार नाही. याप्रमाणेच सॉक्रेटिससारखे जनसमाजाचे निरपेक्ष शिक्षक सोफिस्टांहून अधिक श्रेष्ठ होते, हे कोणीही कबूल करील; परंतु त्यावरून त्यांची अनीतिमत्ता किंवा अनीतिप्रवर्तकता सिद्ध होत नाही. आपल्यापाशी असलेली विद्या शिकविण्याकरिता पैसा घेणे हे पापकर्म किंवा अनीतीचे कृत्य असा निर्बंध बांधल्यास दर महिन्यास लठ्ठ लठ्ठ पगार खाणाऱ्या आधुनिक शिक्षकास व प्रोफेसरास यमराजाच्या दरबारात जबरदस्त शिक्षा झाली पाहिजे आणि आजच्या सुधारलेल्या काळी त्यांची जगातही छी थू झाली पाहिजे; पण आजकालचा प्रकार तर त्याहून फार निराळा दिसतो; परंतु हा काय आजचाच प्रकार आहे? विद्याप्रदानाबद्दल काहीही मोबदला न मागणे, ही प्राचीन ऋषींची व कुलपतीची पद्धती असे खरी; परंतु विद्या संपूर्ण झाल्यानंतर गुरुदक्षिणा देणे हे शिष्याचे कर्तव्यकर्मच समजले जात नसे काय? आता पुष्कळ ठिकाणी केलेली सेवा मनात आणून गुरुजन अशा दक्षिणेविषयी फारसा आग्रह धरीत नसत, ही त्यांच्या औदार्याची व विरक्ततेची गोष्ट आहे; परंतु कोणी विशेष गुरुदक्षिणा घेतलीच तर ते पातक समजले जात असे काय? कालिदासाच्या रघुवंशात वरतंतूचा शिष्य कौत्स याची हकीगत आहे, ती आपण पाहिली तर आपणास काय आढळून येईल? कौत्साचा विद्याभ्यास पुरा झाल्यावर घरी जाण्यापूर्वी गुरूला दक्षिणा देऊन विद्याभ्यासाची सांगता व सफलता साधण्यासाठी कौत्साने आपल्या गुरूसच 'मी काय गुरुदक्षिणा देऊ' म्हणून प्रश्न केला. वरतंतू जात्या विरक्त व शिष्यवत्सल असल्यामुळे त्याने कौत्साच्या भक्तियुक्त शुश्रूषेचे अभिनंदन करून तीच आपणास पुरेशी दक्षिणा आहे, म्हणून वारंवार सांगितले; पण कौत्साने पुनः तोच प्रश्न केला. त्यावेळी किंचित्क्रोधाने वरतंतूने सांगितले, की प्रत्येक विद्येस एक कोटी याप्रमाणे चौदा विद्यांकरिता चौदा कोटी द्रव्य आणून द्यावे, तर ती योग्य गुरुदक्षिणा होईल. ही गुरुदक्षिणेची जबर रक्कम ऐकूनही गतधैर्य न होता कौत्स रघूकडे आला व विश्वजित नावाचा यज्ञ करून द्रव्यहीन बनलेल्या रघूने त्याला आश्वासन देऊन प्रत्यक्ष कुबेरावर हल्ला करण्याची तयारी केली. त्याप्रसंगी रघूच्या कोषात द्रव्याचा पाऊस पडला व कौत्साने तो द्रव्यनिधी शेकडो सांडणी व घोडे यांजवर लादून गुरुगृही नेला, अशी कथा रघुवंशाच्या पाचव्या सर्गात आहे. आता त्या गोष्टीत वरतंतूने कौत्साजवळ जी जबरदस्त गुरुदक्षिणा मागितली, त्याबद्दल त्याजवर कोणी अनीतिमत्तेचा आरोप केला आहे काय? ती रक्कम त्याने केवळ रागाने मागितली म्हणून तो दोष नाही म्हणावे तर तेही कठीण, कारण त्यात तर दोन दोष येतात. एक

तर क्रोध व दुसरा शिष्यद्रव्यादान. क्रोधाची एक जोड मिळाल्यामुळे दुसरा दोष नाही असे होईल तर क्रोधावेशात दुसऱ्याचा खून करणे हा तरी दोष का असावा? सारांश, विद्यकरिता मोबदला घेणे, ही गोष्ट आपल्या देशातही प्राचीन काळापासून अपरिचित नाही व ती पापकारकही काही मानण्यात येत नाही. आजकालच्या प्रोफेसरांना अगर शिक्षकांना त्या काळच्या ऋषींची सर येत नाही, याची पुष्कळ अन्य कारणे आहेत, त्याचा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे.

सोफिस्ट लोक द्रव्यासाठी जिज्ञासू मनुष्यास अडवून ठेवीत असतील व या कारणाकरिता मनुष्य आसन्नमरण झाला असताही आपली फी पिळून काढणाऱ्या वैद्याप्रमाणे अगर डॉक्टराप्रमाणे त्यांचे करणे किळसवाणे होत असेल, असे म्हणावे तर वस्तुस्थिती यापेक्षा निराळीच दृष्टीस पडते आणि या आमच्या म्हणण्याला आधार सोफिस्टांचा प्रतिपक्षी पेटो याच्याच ग्रंथात सापडतो. प्रोटॅगोरस (Protagoras) या नावाचा एक नामांकित सोफिस्ट होता व प्लेटोच्या एका संवादाचे नाव याच सोफिस्टाच्या नावावरून प्रोटॅगोरस असेच आहे. या संवादात विद्यार्थ्यांकडन विद्येचा मोबदला म्हणून पैसे घेण्यासंबंधी त्यांच्या परिपाठाविषयी तो म्हणतो 'विद्या शिकविण्यापूर्वी मी काहीच नक्की ठराव करीत नाही. विद्याभ्यास पुरा झाल्यावर विद्यार्थी मला सोडून जाऊ लागला म्हणजे त्याची परिस्थिती व त्याने विद्याभ्यासासाठी मजजवळ घालविलेला वेळ, याचा विचार करून मला योग्य दिसेल ती रक्कम मी त्याजजवळ मागतो. माझे मागणे गैरशिस्त आहे, असे त्यास वाटत असेल तर त्याने स्वतःच मजजवळ केलेल्या विद्याभ्यासापासून त्याला काय फायदा झाला व कोणत्या रकमेने त्या फायदाचा मोबदला केला जाईल, याचा विचार करावा व आपली रक्कम ठरवावी. मी तेवढीच घेऊन स्वतः समाधान मानीन, अशी सूट ठेवली आहे. याला अट म्हणजे एवढीच, की त्याने देवळात जाऊन आपला तसा प्रामाणिक विश्वास असल्याबद्दल शपथ व्हावी.' या प्रोटॅगोरॅसच्या भाषणात वर्णन केलेल्या पद्धतीइतकी उदार पद्धत क्वचितच आढळत असेल. त्यावरून त्याचा आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रामाणिकपणावर व स्वतः शिकविलेल्या विद्येच्या उपयुक्ततेवर केवढा विश्वास असे हे स्पष्ट होते आणि आपल्या विद्यार्थ्याने आपणाशी नेहमी कृतज्ञ असलेच पाहिजे, अशी साहजिक श्रद्धा असणे, यासारखे गुरूला दुसरे काय वेतन असेल? सॉक्रेटिसच्या दृष्टीने तर तेच केवळ वेतन होय; परंतु प्रोटॅगोरॅसची वरील हकीगत घेतली तरी त्यात अनीतिमत्तेची छटा मुळीच दृष्टीस पडत नाही व लोकांना अनीतिमार्गाला नेणाऱ्या पुरुषाचे त्यात लक्षण नाही हेही तितकेच निश्चित आहे.

सोफिस्ट लोकांची शिकवण हितकारक असे, की विपरीत असे, हे ध्यानात येण्यासाठी सोफिस्ट या नावाने प्रसिद्धीस आलेल्या काही व्यक्तींसंबंधी माहिती देऊ. सोफिस्ट लोक हेदेखील बहुधा तोंडी शिकविण्यातच अधिक तत्पर असल्यामुळे त्यांचे ग्रंथ विशेष नाहीत आणि जे आहेत तेही फारच त्रोटक. त्यामुळे आपणास त्यांजविषयी इतर ठिकाणाहून जी माहिती होते तीवरच पुष्कळदा अवलंबून राहावे लागते.

प्रॉडीकस या नावाचा जो एक विख्यात सोफिस्ट होऊन गेला त्याची 'हर्क्युलिसाची निवड' (Choice of Hercules) या नावाची गोष्ट प्रसिद्ध आहे. आपल्या देशातील भीम किंवा हनुमान यांच्यासारखी अचाट कृत्ये करणारा हा एक ग्रीक पौराणिक वीर आहे. वर सांगितलेल्या गोष्टीमध्ये अशी कल्पना केली आहे, की श्रम व सुख या देवता आपापल्यापरी हर्क्युलीसला उपदेश करून आपल्याकडे वळवू पाहत होत्या. एकीकडे जिवापाड परिश्रम करून अचाट शक्ती मिळविणे व देशातील विस्तीर्ण दलदलीचे प्रदेशही क्षणात कोरडे ठणठणीत करून देणे किंवा लोकांना उपद्रव देणाऱ्या राक्षसवजा क्रूर प्राण्यांना चुटकीसरशी गतप्राण करणे व अशा रीतीने लोकोत्तर शक्तीची कामे करून चिरकाल कीर्ती मिळविणे हे ध्येय होते, तर दुसरीकडे जिकडे पाहावे तिकडे आनंदच आनंद. सुग्रास अन्न, मृदुल शय्या, मोहक रमणी यांची या बाजूला नुसती गर्दी उडून गेली आहे. पहिल्या मार्गात अखेरीस होणारा शक्तिपात हे न्यून, तर दुसऱ्या मार्गात अखेरीस होणारा शक्तिपात हे न्यून. या दोन मार्गांपैकी कोणता मार्ग पत्करावा हा हर्क्युलीसपुढे प्रश्न पडला असता, त्याने पूर्ण विचारांती पहिलाच मार्ग पत्करला व म्हणूनच तो महनीय झाला, असा या गोष्टीचा शेवट आहे. त्याप्रमाणेच प्रत्येक मनुष्यानेही सुखलालसा झाडून लोककल्याणाची कामे करण्यास अत्यंत अवश्य असे सामर्थ्य कमवावे व अखंड कीर्ती मिळवावी, हा त्यातील उपदेश आहे. ही गोष्ट म्हणजे प्रॉडीकसच्या भाषणातील सर्वांत लोकप्रिय भाषण असे व तिच्या विवेचनप्रसंगी अधिक श्रोतृवृंद लोटत असे. आजदेखील आपणास ही गोष्ट वाचून अगर ऐकून जर मोठी मौज वाटते व त्यातील सदुपदेश करण्याची खुबी पाहून जर आल्हाद होतो, तर हर्क्युलीसशी ज्यांचा दृढ परिचय आहे, अशा ग्रीक श्रोत्यांची मने विशेषत: प्रॉडीकसच्या रसाळ वाणीने तीच गोष्ट सविस्तर ऐकल्यावर नुसती रंगून जात असतील, यात काय आश्चर्य? त्यातही गोष्टीतील मोहकतेपेक्षा त्यातील सदुपदेश किती बिनमोल आहे, हेच तत्त्व तत्त्ववेत्त्यांनी आजपर्यंत पुनः पुनः प्रतिपादन केले नाही काय? आम्हास या प्रसंगी प्रॉडीकसच्या उपदेशावरून दोन स्थळे आठवत आहेत. एक बायरन कवीतील दोन पंक्ती व दुसरे कठोपनिषदातील यमाचे वाक्य. लॉर्ड बायरन लिहितो :

I slept and found that life was beauty
I woke and found that life was duty.

'मी निद्रावश झालो व सर्व जग मला सौंदर्यमय भासले; परंतु जागा होऊन पाहतो तो ते कर्तव्यमयच झाले.'

या एका अत्यंत प्रतिभासंपन्न कवीच्या दोन पंक्तीत केवढा विस्तृत अर्थ भरला आहे! आम्हाला अधिक परिचयामुळे उपनिषदातील उतारा अधिकच बहारदार वाटतो. नचिकेताची परीक्षा करण्याकरिता त्याला निरनिराळ्या प्रकारची विलोकने दाखवूनही तो फसत नाही, असे पाहून यमराज मोठे खुश होत व त्याला शाबासकी देऊन म्हणतात .

'श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ सम्परित्य विविनक्ति धीरः।
श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते प्रेयो मन्दो योगक्षेमावृणीते।।
स त्वं प्रियान्प्रियरूपांश्च कामानभिध्यायन्नचिकेतोऽत्यस्राक्षीः।
नैतां सृङ्कां वित्तमयीभवाप्तो यस्यां मज्जन्ति बहवो मनुष्याः ।।'

'हितकर आणि प्रियकर असे दोन्हीही पक्ष मनुष्याकडे येतात. धीर वृत्तीचा मनुष्य त्यांची योग्य छाननी करून हितकर तेच पत्करतो; परंतु मंदबुद्धी पुरुष केवळ ऐहिक उत्कर्षापकर्षाकडे नजर देऊन प्रियकर तेच पत्करतो. बा नचिकेता, मोहक व प्रियकर अशा वस्तूंचा, सूक्ष्म परीक्षण करून तू त्याग केलास. वित्तमय शृंखलेमध्ये इतर लोकांसारखा तू अडकला गेला नाहीस तेव्हा तुझी धन्य.'

येथे घेतलेली जोडी जरी श्रेयस व प्रेयस ही असली व त्याचा रोख अधिक अध्यात्मपर जरी असला, तरी एकंदरीत त्यातील पद्धती व सदुपदेश यांशी प्रॉडीकसच्या गोष्टीची रचना मिळती येते. सुखपक्ष स्वीकारला तर सरतेशेवटी दुर्बलता मात्र कपाळी येते, हेच नचिकेताचेही म्हणणे आहे. यमाच्या देणगीचा अव्हेर करताना तो म्हणतो :

'श्वो भावा मर्त्यस्य यदन्तकैतत्सर्वेंद्रियाणां जरयन्ति तेजः ।'

'हे अंतका, जगतातील उपयोग मनुष्याची इंद्रिये क्षीणबलच करतात.'

सारांश, 'हर्क्युलीसची निवड' या गोष्टीतील उपदेशाची सत्यता व पद्धतीची मार्मिकता कोणालाही पटतील अशीच आहेत आणि यावरूनच आधुनिक लेखक प्रॉडीकसला सोफिस्ट लोकांतील अत्यंत निरुपद्रवी सोफिस्ट असे उपपद देत असतात, सोफिस्टांमध्ये तो एक अपवादभूत आहे, असे त्यांचे मत आहे. यास्तव प्रॉडीकसविषयी अधिक काही न लिहिता आपण दुसऱ्या सोफिस्टांकडे वळू. त्यातील मुख्य म्हणजे वर एकदा ज्याबद्दल उल्लेख आला आहे तो प्रोटॅगोरस हा होय. या सोफिस्टांबद्दल जर लोकांचा प्रतिकूल पूर्वग्रह नसता तर, केवळ प्लेटोने दिलेल्या हकीगतीवरून तो अनीतिमान होता किंवा नालायक शिक्षक होता, असे दिसत नाही. प्लेटोच्या प्रोटॅगोरॅस या नावाच्या संवादात याला अग्रस्थान देण्यात आले आहे. या ठिकाणी सॉक्रेटिसशी झालेल्या त्याच्या संवादात, त्याची नीतिमीमांसा निश्चित स्वरूपाची नव्हती, सॉक्रेटिसने काढलेल्या पुष्कळ संशयाचे त्याला निराकरण करता आले नाही व सॉक्रेटिसपुढे त्याचे वादपटुत्व अगदी लंगडे पडले, असे दाखविण्यात आले आहे. आपल्या कलाकौशल्याला अगर नीत्युपदेशाला मूळाधारभूत तत्त्वे कोणती, याचे अज्ञान असल्यामुळे शिक्षकाला जो कमीपणा येणे संभवनीय आहे, तो कमीपणा प्रोटॅगोरॅसमध्ये होता ही गोष्ट कबूल केली पाहिजे; परंतु हा आरोप एकट्या प्रोटॅगोरॅसवर येत नसून बहुतेक शिक्षकांवरही येण्यासारखा आहे. प्लेटोसारख्या एखाद्या वादपटूने प्राचीन व अर्वाचीन नावाजलेल्या शिक्षकांवर जर प्रश्नांचा सारखा भडिमार चालविला, तर त्यांची प्रोटॅगोरॅसइतकीच किंवा अधिकच धांदल उडेल व त्यांचे वैगुण्य उघडकीस येईल. नीतीची

मूलतत्त्वे आणि व्यावहारिक नीतिज्ञान किंवा साधारणतः कोणताही व्यवहार किंवा आचरण आणि त्याला आधारभूत नीती अगर शास्त्र, या उभयतांचे ज्ञान एकवटले तर तो शुभसंयोगच होय. अशा शुभसंयोगाचे कविजनही गोडवे गातील. त्याच्यायोगाने आपण शिकविलेला व्यवहार अगर आचरण याच्या सत्यत्वाविषयी संशय उत्पन्न झाला, तर तो फेडण्याचे साधन शिक्षकाजवळ जय्यत तयार असू शकते आणि म्हणून प्रत्येक शिक्षकाने आपल्या विषयाला मूलभूत असलेली तत्त्वे समजून घ्यावीत, असा जो प्लेटोचा कटाक्ष आहे तो बरोबर आहे; परंतु या गोष्टीचा विचार करून एखाद्या नावाजलेल्या शिक्षकाचे वैगुण्य दाखविताना तीन पक्ष संभवतात ते असे (१) आपण जे नीतिसिद्धांत सांगतो त्यांच्या मुळाशी अगदी खोल कोणती तत्त्वे आहेत हे त्याला माहिती नसेल, (२) किंवा त्याचा उपदेश हा खऱ्या मीमांसेने उत्तमापैकी ठरणार नाही, (३) किंवा त्याची शिकवण ही निखालस अनीतिकारक असेल. या तीन पक्षांपैकी प्लेटोच्या दृष्टीने प्रोटॅगोरस हा पहिल्या पक्षात येतो. त्याची शिकवण कमी दर्जाची होती, असे प्लेटोचे मत दिसत नाही व ती अनीतिकारक होती या म्हणण्यास तर प्लेटोमध्ये काहीच आधार नाही. एवढ्या विद्वान व नावाजलेल्या प्रतिपक्षाचे दोष दाखविताना त्यांचे गुणही पाहिले पाहिजेत. या सज्जनपणाच्या साधारण नियमाप्रमाणे प्लेटोने प्रोटॅगोरॅसचे काही गुणही दाखविले आहेत. उदाहरणार्थ, सद्गुण शिकवून येतात किंवा नाही, या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी प्रोटॅगोरॅसने एक कथा सांगितली आहे.

एकेकाळी सृष्टीमध्ये देव मात्र होते; परंतु मर्त्य प्राण्यांची उत्पत्ती झाली नव्हती. पुढे त्यांचीही निर्मिती होण्याची वेळ आल्यावर देवांनी पृथ्वी व अग्नी यांच्या अलौकिक संयोगाने पृथ्वीच्या गर्भात त्यांना निर्माण केले आणि त्यांना या भूमंडळावर धाडून देण्यापूर्वी त्यांना त्यांचे विशिष्ट गुणधर्म देऊन कार्यक्षम करण्याच्या कामावर प्रॉमीथियस व एपिमीथियस यांची नेमणूक झाली. या दोन देवांमध्ये परस्पर असा ठराव झाला, की एपिमीथियस याने आधी गुणविभागणी करावी व मग प्रॉमीथियस याने त्यातील न्यूनाधिक पाहावे. याप्रमाणे ठराव झाल्यावर एपिमीथियस आपल्या कामास निघाला व प्रथमतः तो जनावरे, पक्षी, कीटक इत्यादी प्राण्यांकडेच गेला. त्यांच्या देहादिकांची रचना लक्षात घेऊन त्यांना उपयोगी पडतील; परंतु दुसऱ्यास बाधक होणार नाहीत, असे गुण त्यांना देऊन प्रसंग विशेषी दुसऱ्यांकडून उपद्रव पोहोचू लागला तर आत्मसंरक्षण करता यावे, अशीही त्याने व्यवस्था केली. त्याचप्रमाणे कोणाचा देह अवजड तर मन कमकुवत, कोणाचे शरीर हलके तर हवेवर तरंगत राहण्याच्या शक्तीमुळे निर्भय, कोणाचे बळ कमी तर वेग जास्त, याप्रमाणे गुणांचा न्यूनाधिक भाव करून एकंदर गोळाबेरीज एकच येईल, अशी त्याने युक्ती योजिली. शीतवातादिकांपासून संरक्षण होण्यास जाड कातडी व लोकर, राहण्यास कोठे खोपी तर कोठे बिळे करण्याची करामत, भक्ष्यासाठी कोठे फळे तर कोठे मुळे व कोठे इतर प्राणी, अशी योजना करून व आपल्या कौशल्याची मनात मोठी तारीफ करीत एपिमीथियस पुढे चालला

व सरतेशेवटी मनुष्याजवळ आला आणि एकदम खजील झाला. कारण इतक्या वेळात त्याच्या जवळील गुणांची सर्व पुंजी संपून गेली व मनुष्यास द्यावयास त्याच्याजवळ काहीच शिल्लक उरले नाही. ही चूक लक्षात येऊन तो अगदी लज्जित झाला. इतक्यात प्रॉमीथियस हा पाहणी करीत करीत तेथे येऊन पोहोचला. इतर प्राण्यांची एपिमीथियस याने केलेली व्यवस्था पसंत होती; पण मनुष्यप्राण्याची व्यवस्था करण्यास काहीतरी तोड काढणे अवश्य झाले. कारण त्याचीही भूमंडळावर रवानगी करण्याची वेळ अगदी नजीकच येऊन पोहोचली होती. या अडचणीतून तोड काढण्याकरिता देवांची शस्त्रे वगैरे घडविणारा देव हिफेस्टस व विद्याधिष्ठात्री देवता अथिनी यांच्या कारखान्यांतून प्रॉमीथियस याने निरनिराळे हुन्नर व थोडासा अग्नी असा चोरून आणला आणि तो मनुष्याच्या स्वाधीन करून, आपल्या सर्व उणिवा भरून काढण्यास त्याला समर्थ केले व त्याची त्याने रवानगी करून दिली. अशा रीतीने आपली उपजीविका करून शरीरसंरक्षण करण्यास अवश्य ती विद्या मनुष्यास प्राप्त झाली. नीतिशास्त्र किंवा अनुशासन धर्म हे मात्र झूसच्या खास ताब्यात व जागत्या पहाऱ्यात असल्यामुळे, प्रॉमीथियसला चोरता आले नाहीत. म्हणून ते मात्र मनुष्यास मिळाले नाहीत. याप्रमाणे प्रॉमीथियस याने आपली व एपिमीथियसची बाजू राखण्याचा प्रयत्न केला; परंतु एपिमीथियसच्याच आचरटपणामुळे पुढे ही गोष्ट उघडकीस आली व प्रॉमीथियसला चोरीबद्दल शिक्षा झाली.

इकडे मनुष्याला दैविक शक्ती प्राप्त झाल्यामुळे, त्याने आपणाशी समान जे देव त्यांची पूजा करण्यास ठिकठिकाणी वेदी बांधल्या व परस्परांस आपले विचार कळविण्यासाठी भाषा शोधून काढली. तथापि, एकंदरीत त्यांची स्थिती मोठी हलाखीचीच होती. इतर प्राण्यांच्या मानाने तो अगदी हीनबळ होता व प्रतिक्षणी त्यांच्या जिवाला धोका होता त्यांना अन्नपाण्याची अगर आस्तरणावरणांची काही कमतरता नव्हती; परंतु दुसऱ्यापासून आपले संरक्षण कसे करावे हे त्यास कळेना. इतर प्राण्यांपासून आपला बचाव करावा म्हणून ते शहरातून एकत्र राहू लागले; परंतु तेथेही राज्यपद्धतिज्ञानाच्या व नीतितत्त्वांच्या अभावामुळे त्यांच्यात अनेक बखेडे पडले. तेव्हा झूसला असे भय पडले, की आपण मोठ्या प्रयासाने उत्पन्न केलेली ही मनुष्यजात समूळ नष्ट होणार! ही आपत्ती टळावी म्हणून त्याने हर्मीस या दूताला बोलावून त्याजबरोबर न्याय व आदर अथवा प्रेम ही मृत्युलोकी पाठविली. याप्रसंगी हर्मिसने विचारले, की मी ही देणगी सर्वांना देऊ की काही विवक्षित व्यक्तींनाच देऊ? या प्रश्नाला झूसने असे उत्तर दिले, की त्यांचा प्रसार सार्वत्रिक व्हावा. कारण असे झाल्याशिवाय मनुष्य समाजाची रचना व त्याला अवश्य अशी राहणी शक्य नाही. एवढेच नव्हे तर ज्या कोणाला न्याय व प्रेम नको असेल, अगर जो त्यांचा तिरस्कार करीत असेल, तो जगात राहण्यास पात्र नाही, असे समजून त्याला ठार करावे, असा कायदा करावयासही झूसने त्याला परवानगी दिली.

या सर्व कथेचे तात्पर्य एवढेच, की विविधहुन्नरांची विद्या ही केवळ चोरून आलेली होती व म्हणून तिचा सर्वच व्यापार चोरटा. ती दुसऱ्याला शिकवून येणे दुरापास्त; पण न्याय, प्रेम इत्यादी सद्गुण हे देवानेच मनुष्यांकडे मुद्दाम पाठविलेले असल्यामुळे त्यांचा व्यापार राजरोसपणे चालतो व म्हणूनच ते एकमेकांस शिकविता येतात व कमी-जास्त प्रमाणाने ते सर्वांमध्ये आढळतात. या कारणासाठीच जर कोठे सुतार कामासारख्या हुन्नराविषयी चर्चा चालली असेल तर तेथे भलत्यालाच मध्ये तोंड घालता येत नाही. कारण हुन्नर हा थोड्यांजवळ असतो, अशी कल्पना सर्वमान्य असल्यामुळे त्याविषयी काही ज्ञान नसता वादविवादात ढवळाढवळ करणारा मनुष्य उपहासास्पद होतो. तेच राजकारण किंवा नीती याविषयी पाहा. त्या बाबतीत काही चर्चा चालू असेल तर कोणालाही बोलावयास मुभा असते व एखाद्याची मते कितीही विचित्र असली तरी ती ऐकून घ्यावी लागतात. कारण न्याय, प्रेम इत्यादिक सद्गुण प्रत्येक मनुष्यात थोड्याबहुत अंशाने असतातच. सद्गुण शिकविता येतील किंवा नाही, या सॉक्रेटिसच्या प्रश्नाला कथारूपाने वरील उत्तर देऊन प्रोटॅगोरस काही सामान्य मुद्यांवर त्याच गोष्टीचे समर्थन करतो. ते मुद्देही बऱ्याच अंशी महत्त्वाचे असल्यामुळे त्यांचा किंचित विस्तार करू...

सद्गुण शिकविता येतात. हाच बहुजन समाजाचा विश्वास आहे. आणि एखाद्याच्या अंगात तो नाही, असे त्याचे त्यास वाटेल, तरी तसे कबूल करून उघड उघड बोलण्याचे धारिष्ट्य त्याच्याने क्वचितच करवेल. उदाहरणार्थ वादनकला, चित्रकला, शिल्प इत्यादी कला व न्याय, प्रामाणिकपणा, प्रेम इत्यादिक सद्गुण यांविषयी विचार करू लागले तर आपणास असे आढळून येईल, की एखाद्याने आपणास चांगले संगीत येत नसताना जर त्याची बढाई मारली तर तो मूर्ख ठरतो व त्याबद्दल त्याची कानउघाडणी होते. परंत तेच सद्गुणाविषयी पाहा. प्रत्येक मनष्याला मी प्रामाणिक आहे असेच वाटते व मी प्रामाणिक नाही असे जो म्हणेल तोच मूर्ख ठरून फजितखोर होतो. एखाद्याचा प्रामाणिकपणा कदाचित कमी-जास्त प्रमाणात असेल; पण तो अजिबात नाहीच, असे काही म्हणता येणार नाही. यालाच दुसरे प्रमाण असे की, मनुष्याच्या हातून काही नैतिक अपराध घडला असला तर त्याला शिक्षा देण्यात येते व या शिक्षा देण्याचा अर्थ सद्गुण हे मनुष्यात अभ्यासाने व उपदेशाने येणारे आहेत, असाच होत नाही काय? ज्याप्रमाणे एखादा पशू त्याच्या शेपटीवर कोणी पाय दिला असता त्यास मारावयास धावतो, तशीच केवळ मनुष्याची प्रवृत्ती दिसत नाही. त्याला अन्याय ही इतकी अमानुष गोष्ट वाटते, की ती त्याला सहन होत नाही. त्याचप्रमाणे ही शिक्षा देताना नुकसानभरपाई हाही उद्देश सर्वकाळ लागू होण्यासारखा नाही. एखाद्या चांगल्या मनुष्याचा दुसऱ्याने खून केला तर त्या खुनी मनुष्यास फाशी दिल्याने तो खून परत फिरतो काय? मग अशी शिक्षा करण्यात नीत्युपदेशाशिवाय काय उद्देश असावा? या शिक्षेपासून तोच खुनी मनुष्य काही धडा शिकणारा नाही व यदा कदाचित शिकण्याचा संभव

असला तरी कायद्याने प्राप्त होणारी शिक्षा त्याचे आयुष्यच संपुष्टात आणीत असल्यामुळे ते त्याला अशक्य होईल; परंतु एका खुनी मनुष्याला जबर शिक्षा झालेली पाहून इतर मनुष्यांना वचक बसतो व त्यामुळे खुनाचे अपराध कमी होतात. कोणाचा खून करू नये, ही गोष्ट जर मनुष्याला समजावून समजणारी नसेल, तर हा सर्व प्रकार अनुचितच ठरेल.

जसे शिक्षेचे तसेच बक्षिसांचे. सद्गुणांनां उत्तेजन देऊन त्यांची वाढ करावी हा त्यांचा उद्देश सद्गुण शिकवून येत नसते तर विफलच झाला असता.

मनुष्य प्राण्याचे नीतिशिक्षण अगदी बाळपणापासूनच सुरू होते. मुलावरील वात्सल्यामुळे आई-बाप किंवा वडील माणसे लहान मुलांना अल्पस्वल्प गोष्टीतदेखील तरबेज करण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात. मग सद्गुणांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीबद्दल त्यांच्याकडून हेळसांड होईल काय? मुलाला बोलता येऊ लागण्याची सुरुवात की, आई-बाप, भाऊ-बहिणी ही त्याला अमुक चांगले, तमुक वाईट हे शिकवीत असतात. फार काय पण मुलाला निजविताना म्हटल्या जाणाऱ्या ओव्यांतदेखील असा उपदेश आढळतो. मुलाला नीतिशिक्षण देण्याच्या आस्थेबद्दलच हे स्पष्ट लक्षण नव्हे काय? मूल जरा मोठे झाले म्हणजे आई-बापांना आणखी शिक्षकाचीही मदत घ्यावीशी वाटते व हे खर्चाचे काम असताही पत्करले जाते. शिक्षकांच्या शिकवणीपासून काहीच फायदा होत नसेल तर इतका पैसा खर्च करून शक्य तितका उत्तम शिक्षक मिळविण्याची पालकांनी खटपट केली असती काय? बरे, मनुष्य वयात आल्यावर तरी त्याचे शिक्षण संपते काय? देशाचे कायदे त्याला शिक्षण देऊन सुधारण्याचा पत्कर घेतात व हा कायद्याचा अंमल मनुष्याच्या अगदी मरणापर्यंत चालतो. यावरून मनुष्य हा जन्मल्यापासून मरेपर्यंत सारखा शिकतच असतो, असे म्हणता येणार नाही काय? व मनुष्याला शिकवून सद्गुणसंपन्न करता येत नसते तर हे सर्व अनाठायी ठरल्यामुळे थोड्या अनुभवांती तरी बंदच पडले नसते काय?

येथे कदाचित अशी शंका येईल, की सद्गुण जर शिकवून येणार आहेत व आई-बाप व वडील माणसे ते शिकविण्यात जर नेहमी तत्पर असणे साहजिक आहे, तर मग चांगल्या माणसांचीही मुले कधी कधी वाईट का निघतात? याला उत्तर एवढेच, की त्यात आश्चर्यकारक अथवा अस्वाभाविक असे काही नाही. कारण सद्गुण हा सामान्यनिधिभूत असून, प्रत्येक जण आपल्या सामर्थ्याप्रमाणे त्यातील भाग घेत असतो. आई-बाप किंवा वडील माणसे हीच केवळ त्या मुलांची शिक्षक राहत नाहीत. कारण जगातील सर्वच माणसे एकमेकांस सद्गुण शिकवितात किंवा निदान तसा प्रयत्न करतात. तेच एखादे कसब घ्या, त्यामध्ये प्रत्येक जण आपल्या प्रत्यक्ष विद्यार्थ्यापासूनदेखील काहीतरी लपवून ठेवावयास पाहतो. अत्यंत सद्गुणी माणसांची मुले तितकीच सद्गुणी का नसतात? याचे कारण वरील विवेचनात आले आहे. तथापि, समजूत पटण्यास आपण एक उदाहरण घेऊ. समजा की, प्रत्येकाला ज्याप्रमाणे न्याय, आदर इत्यादी गुण नसता समाजघटना होत नाही, त्याप्रमाणे

आज एक नियम असा झाला, की प्रत्येकाला मुरली वाजविता आली तरच असा समाज बनेल. आता या मुरली वाजविण्यासंबंधी काय प्रकार होतो पाहा. प्रत्येकाला थोडीफार मुरली वाजविता येणारच व ज्याला ती किंचित कमी येते असे एखाद्याला वाटेल, त्याला त्याजबद्दल उपदेश करावयाला तो अगदी एका पायावर तयारच. हल्ली ज्याप्रमाणे कोणी कोणापासून आपला प्रामाणिकपणा लपवू पाहत नाही, त्याप्रमाणेच आपली वादनकला कोणी लपविणार नाही व जो तो दुसऱ्याला तेच शिकवीत सुटेल. अशा परिस्थितीमध्ये एखाद्या मुरलीवादनात पटाईत असलेल्या मनुष्याचा मुलगा त्याच्यासारखाच होईल, असे सांगता येत नाही; परंतु तो त्या गुणाला अगदी पारखा होणार नाही, हे खास. सारांश, सद्गुणी माणसे आपल्या मुलांबाळांना कितीही शिकवीत असली तरी त्यांचे स्नेहीसोबती, त्यांचे शेजारीपाजारी, त्यांचे आप्तेष्ट, हेही त्यांना उपदेश करतातच आणि अशा उपदेशाच्या नुसत्या पुरामध्ये आपणास सुलभ व शक्य तोच भाग मनुष्य ग्रहण करतो व म्हणून तो आपल्या आई-बापांशी प्रसंगविशेषी विसदशसा भासतो; परंतु तो अगदी सद्गुणदीन असा नसतो. कारण त्याजपेक्षाही कनिष्ठ प्रतीच्या रानटी लोकांत तो मोठाच सद्गुणी ठरेल आणि म्हणूनच सद्गुण शिकविता येत नाही, हे म्हणणे खोटे आहे. उलट वर सांगितल्याप्रमाणे प्रत्येक मनुष्य दुसऱ्याला नेहमी शिकवीतच आहे. त्यात प्रोटॅगोरॅससारखा एखादा मनुष्य इतरांपेक्षा अधिक चांगले शिकवू शकतो एवढेच व त्याकरिताच त्याचा विशेष गौरव. नित्य व्यवहाराने मुलास समजू लागणारी मातृभाषा अमक्यानेच शिकविली असे म्हणता येणार नाही. तथापि, आपण त्या त्या भाषेतील पंडितांना ती अधिक चांगली शिकविता येते, याबद्दल मान देत नाही काय? माझी शिकवणूक उच्चतम नसेल; पण ती इतरांपेक्षा बरी आहे हे समाधानाला पुरेसे कारण आहे आणि माझी शिकवण अधिक चांगली आहे, हे विद्यार्थ्याला स्वानुभवाने कळल्याखेरीज मी त्याजवळून एक कपर्दिकही घेत नाही, हे महशूरच आहे.

वरील सर्व विषय प्रोटॅगोरॅसइतक्या मोहक शब्दांनी प्रतिपादन करीत होता, की त्याचे भाषण संपल्यावरदेखील सॉक्रेटिसच्या कानात तोच ध्वनी दुमदुमत होता व मृच्छकटिकातील चारुदत्ताप्रमाणे 'यत्सत्यं विरतेजवि गीतसमये गच्छामि शृण्वन्निव' अशी त्याचे खुद्द प्लेटोच्याच ग्रंथात वर्णन आहे. ही गोष्ट खरी, की वरील उपपत्ती सांगितल्यानंतर सॉक्रेटिसने आपल्या विशिष्ट पद्धतीप्रमाणे प्रश्नांचा भडिमार सुरू केला व त्याबरोबर प्रोटॅगोरस हा गोंधळून गेला. सद्गुण एक आहे की अनेक आहेत, ते ज्ञानस्वरूप आहेत की अज्ञानस्वरूप आहेत, या प्रश्नांची त्याला समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत; परंतु यावरून एकच गोष्ट निष्पन्न होते, की सॉक्रेटिस हा त्याच्यापेक्षा कोटिक्रम करण्यात अगर सद्गुणाच्या शुद्ध स्वरूपाचे सूक्ष्म व सूक्ष्मतर विवेचन करण्यात अधिक प्रवीण व म्हणून अधिक स्तुत्य होता; पण यावरून प्रोटॅगोरस एकंदरीत मूर्ख होता किंवा त्याची शिकवण अनीतिकारक होती, असा निष्कर्ष निघत नाही व खुद्द प्लेटोचेही तसे मत दिसत नाही.

प्रोटॅगोरॅसच्या शिक्षणाचे मुख्य स्वरूप म्हणजे आपल्या घरगुती गोष्टीत दूरदर्शीपणाने कसे वागावे आणि सर्व संस्थानाच्या हितासाठी समाजामध्ये कसे परिणामकारक भाषण करावे व उपयुक्त कार्य घडवून आणावे, हे होते. व्यापक व उपयुक्त अशा सामान्य शिक्षणाचे स्वरूप यापेक्षा कमी शब्दांत; पण तितकेच स्पष्ट व्यक्त करणे फार कठीण आहे; परंतु हे स्वरूप प्रोटॅगोरॅसने आखले आहे म्हणूनच ते कित्येकास दोषास्पद वाटते. वास्तविक पाहता सॉक्रेटिस किंवा त्यानंतरचा इसॉक्रेटिस यांचा शिक्षणक्रमही याच उद्देशाने ठरविलेला असे; परंतु सोफिस्टांचे सगळेच वाईट असा पूर्वग्रह करून घेतल्यावर प्रोटॅगोरसचे गुण दिसू नयेत, यात आश्चर्य काय? प्रोटॅगोरसच्या शिक्षणाचे स्वरूप तर अनीतिमान नव्हतेच; पण त्याने सद्गुणाविषयी जी उपपत्ती दिली आहे, त्यातदेखील आपणास पुष्कळ ग्राह्य भाग आढळेल. याच संवादात सॉक्रेटिस म्हणतो की, सद्गुण म्हणजे आपल्या सुखदुःखाचे बरोबर मोजमाप करणे होय; परंतु केवळ व्यक्तिविषयक सुखावर सद्गुणाची इमारत रचण्यापेक्षा सर्व समाजाचेच सुख ज्यावर अवलंबून असते, तो सद्गुणी असे प्रतिपादन करणे कमी प्रतीचे आहे काय? प्रोटॅगोरसच्या उपयुक्तता-दृष्टीची टकळी करून तीच दृष्टी किंचित निराळ्या शब्दांत सॉक्रेटिसकडून व्यक्त झाल्याबरोबर तिची स्तुती करणे, ही तरी एक मनुष्याच्या प्रेमांधतेचा मासलाच म्हणावयाचा!

असो. प्रोटॅगोरसबद्दल एवढी माहिती पुरे आहे. आता सोफिस्टांपैकी तिसरा हिपियस (एलिसचा) याजविषयी प्लेटोच्या ग्रंथांवरून काय माहिती कळते ती पाहू या. सोफिस्टाचा संबंध वरील प्रोटॅगोरॅसच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या संवादात व 'हिपियल मोठा व धाकटा' या संवादात आला आहे. हिपियसला आपण विविध विज्ञानात पारंगत असल्याबद्दल मोठा गर्व असे. खगोल विज्ञान, भूमिती व गणितही तो शिकवीत असे व या विषयांचे अध्ययन करण्याबद्दल तो विद्यार्थ्यांना जी सक्ती करी, तिजबद्दल प्रत्यक्ष प्रोटॅगोरॅसनेच त्याला दोष दिला आहे. तो स्वतः कवी, संगीतज्ञ व टीकाकार असे आणि नीती व राजकारण इत्यादी गहन विषयांवर व्याख्याने देऊन त्यावर ग्रंथरचना करी, एवढी त्याची स्मरणशक्ती दांडगी असे. याशिवाय त्याने वकिलातीतही पुष्कळ काम केले होते व सर्वांत अधिक महत्त्वाचे म्हणजे तो निरनिराळी कलाकुसरीची कामेदेखील करू शके हे होय. आपल्या अंगावरील सर्व कपडे व दागदागिने स्वत: तयार केल्याबद्दल तो सांगतो. सारांश, आपल्या गुणबाहुल्याच्या डौलात तो असल्यामुळे प्लेटोने त्याची यथास्थित चेष्टा केली आहे व सोफिस्टाची चेष्टा करावी तेवढी थोडी, असे म्हणणारांनीही प्लेटोने चेष्टेचा अतिरेक केला, असे म्हणण्याची पाळी आली आहे. एखाद्या मनुष्याला आपल्या विविधगुणांबद्दल डौल, अभिमान, गर्व असणे संभवनीय आहे; पण पुष्कळदा असा डौली मनुष्यही समाजाच्या मोठा उपयोगी पडतो व तो नेहमी दुर्गुणीच असतो असे नाही. प्लेटोनेदेखील हिपियसवर अनीतिमत्तेचा आरोप आणलेला

नाही. उलट हिपियस तयार करीत असलेल्या एका व्याख्यानाच्या रूपरेखेचे जे प्लेटोने वर्णन दिले आहे, त्यावरून हिपियसच्या शिक्षणाचे चांगले स्वरूपच पुढे येते. ट्रॉय शहर पडल्यावर निओटॉलीमस याने ग्रीक योद्ध्यांतील सर्वांत शहाणा जो नेस्टर, त्याला आपण पुढे कसे वागावे म्हणून प्रश्न केला असता नेस्टरने त्याला काय उपदेश केला व महत्त्वाकांक्षी तरुणाने आपले आयुष्य कसे घालवावे याजविषयी काय सामान्य नियम सांगितले, हे प्रतिपाद न करणे हा हिपियसच्या व्याख्यानाचा विषय आहे. नेस्टर आणि निओटॉलीमस या प्रख्यात गुरू-शिष्यांच्या जोडीचे नाव ऐकल्याबरोबरच हिपियसने त्यांच्या तोंडी घातलेला संवाद किती उच्च कल्पनांनी भरला असला पाहिजे हे समजते. नेस्टरची शिकवण ही अथेन्सच्या दृष्टीने फार उच्च किंवा अव्यवहार्य असेल; पण तेवढ्यावरून हिपियस अनीतिमान कसा ठरेल? सारांश, हिपियसचे व्याख्यान प्रॉडीकसच्या 'हर्युलीसची निवड' या गोष्टीच्या जोडीलाच बसण्यासारखे आहे व हिपियसही नीतिशिक्षक यादृष्टीने सर्वस्वीच उपहासास पात्र नाही. 'गॉर्गिअस' या नावाच्या प्लेटोच्या संवादातील खुद्द गॉर्गिअस हा एक नामांकित सोफिस्ट होता; परंतु वास्तविक पाहता त्याला ही पदवी योग्य नव्हती. त्याचा विषय म्हणजे भाषेतील अलंकार किंवा वाक्पाटव होते व म्हणून त्याला आलंकारिक हे नाव अधिक शोभते. गॉर्गिअस हा सिसिलीमधील लिआँटिनी शहराचा रहिवासी होता. ख्रिस्तापूर्वी ४२७ या वर्षी तो आपल्या शहरातर्फे वकील म्हणून प्रथम अथेन्स शहरी आला व या कारणास्तव त्याचा संबंध कालानुक्रमाने पाहता प्रोटॅगोरॅसनंतर येतो; परंतु यावरूनच त्याचे वय प्रोटॅगोरॅसपेक्षा कमी होते असे समजू नये. त्याने एंपिडोक्लिसच्या मतांचा अभ्यास केला होता व आपल्या वृद्धापकाळीदेखील थेसलीमधील लॅरीसा गावी एकांतवास करीत असता, तो त्या मतांचा उपदेशही करीत असे, असे दिसते; परंतु वर सांगितल्याप्रमाणे त्याची विशेष प्रसिद्धी तत्त्वज्ञ किंवा सोफिस्ट या नात्याने नसून ती आलंकारिक या नात्यानेच आहे. पेलॉपोनीससच्या युद्धाचा शेवट व पेरिक्लीसचा अंत, यामुळे अथेन्स येथील राजकारणांमध्ये जी गडबड उडाली होती आणि सामान्य लोकपक्ष व श्रीमानवर्ग यांजमध्ये जो बेबनाव सुरू झाला होता, त्यामुळे वक्तृत्व गुणाला विशेष तेजी होती व गॉर्गिअस हा सिसिली देशात उत्पन्न झालेल्या तत्सदृश प्रसंगी उदयास आलेल्या वक्तृत्वकलेत निष्णात असल्यामुळे त्याने ती पद्धती शिकविण्यास अथेन्स येथे सुरुवात केली. त्याची दृष्टांत देण्याची शैली, त्याच्या भाषणांतील अलंकारप्रचुरता व ललितपदविन्यास यांच्या योगाने अथेन्समध्ये एक वक्तृत्वाची नवीन लोकप्रिय तऱ्हा निघाली, असे म्हटल्यास हरकत नाही. सॉक्रेटिसचा गॉर्गिअसविरुद्ध हाच मुख्य आक्षेप आहे व तो गॉर्गिअसप्रमाणेच सर्व अलंकारिकांना लागू पडण्यासारखा आहे. आपल्या श्रोत्यांना सत्यज्ञान व्हावे म्हणून प्रयत्न करण्याचे बाजूस ठेवून त्यांच्या अज्ञानाचा उलट फायदा घेऊन त्यांच्या चंचल मनोवृत्ती अधिक उचंबळवणे किंवा तोंडदेखले स्तुतिस्तोत्र गाऊन त्यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवणे हेच असल्या वक्त्यांचे

कसब असल्यामुळे ते उपहासास्पद आहे, असे सॉक्रेटिसचे म्हणणे आहे. तथापि, एवढ्या एका गोष्टीवरूनच गॉर्गिअस हा अनीतिमान होता, असे होत नाही. त्याची एकंदर वर्तणूक मोठी उदारपणाची व सभ्यतेची दिसते व खह सॉक्रेटिसही त्याजबरोबर बोलताना आदरानेच बोलत आहे, असे वाटते. प्लेटोने गॉर्गिअसला इतक्या आदरबुद्धीने वागवावे हे पुष्कळ टीकाकारांना आश्चर्यकारक वाटते; परंतु त्याचा शांत स्वभाव, त्याचे विद्धत्व व वृद्धत्व ही लक्षात घेऊन व त्याचे शिक्षण निराळ्या दिशेचे असले तरी तो स्वत: अनीतिमान नव्हता. यामुळे सॉक्रेटिसही त्याजजवळ इतका आदराने वागला असावा, यात आश्चर्य काय?

त्याच संवादात पोलसबरोबर भाषण सुरू झाल्याबरोबर मात्र हा सारा रंग पालटतो. पोलस हाही गॉर्गिअसप्रमाणेच अलंकारिक लेखक व शिक्षक होता; परंतु तो एकंदरीत मोठा उर्मट असल्यामुळे त्याजबरोबर भाषण करताना सॉक्रेटिसनेही अतिशय तीक्ष्ण भाषा वापरली आहे. प्रस्तुत प्रसंगी पोलसने आपल्या स्वतःच्या, त्यावेळच्या प्रसिद्ध पुरुषांच्या व एकंदरीत अथीनियन लोकांच्या अभिरुचीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे व केवळ आपल्या कोटिक्रमाच्या जोरावर सॉक्रेटिसने आपले स्वतःचे म्हणणे त्याला कबूल करावयास लावले आहे; परंतु यास्थळी या सर्वांचा विचार करण्याची जरूरी नाही. पोलसची अभिरुची सॉक्रेटिसच्या अभिरुचीहून निराळी होती म्हणजे काही तो अनीतिमान होता, असे होत नाही. कारण रुचिवैचित्र्य व नीतिमत्ता यांचा काही असा निश्चित संबंध नाही. कालिदासाचे 'भिन्नरूचिर्हि लोकः' हे वाक्य सर्वांस अवगतच आहे.

याच संवादातील सॉक्रेटिसचा पुढील प्रतिपक्षी जो कॅलीक्लीस त्याची मते मोठी विघ्नकारक व समाजस्थितिविघातक आहेत यात काही संशय नाही. कॅलीक्लीसच्या मते सृष्टीचा कायदा व मनुष्यकृत कायदा यात मोठा भेद आहे. एवढेच नव्हे तर ते परस्पर विरुद्ध आहेत. सष्टीमध्ये पाहिले तर शारीरिक सामर्थ्य हेच अधिकाराचे मूळ कारण आहे (Might is right); परंतु समाजामध्ये पुष्कळ दुर्बल लोक एकत्र होऊन केवळ आपल्या मतलबासाठी एखाद्या सबळ मनुष्याला निर्बंध घालतात व तोही अज्ञानामुळे काही काळपर्यंत त्या निबंधाला बळी पडतो, हा कॅलीक्लीसच्या बोलण्याचा मथितार्थ आहे. रानटी अवस्थेमध्ये मनुष्यांमध्येही हाच नियम दृष्टोत्पत्तीसह येतो; परंतु सुधारलेल्या राष्ट्रांमध्येही हाच नियम लागू करू पाहणे व एकाकाळी अधिकतम समर्थ पुरुष एखाद्या जातीचा अधिपती होत असे म्हणून आजही केवळ शरीराने धिप्पाड व रीसासारखा क्रूर पुरुष जर देशाच्या गादीवर हक्क सांगू लागेल तर केवढा अनर्थपात होईल! सामाजिक जीवनातील सुखसमाधान व जीविताची शाश्वतता ही एका क्षणात नाहीशी होऊन मनुष्यसमाज म्हणजे हिंस्र श्वापदांचे एक भेसूर आगरच बनून जाईल व प्रतिक्षणी जाळपोळ, मारहाण यांचा एकच हलकल्लोळ उडेल. आजच्या सुधारलेल्या अवस्थेतीलही एखादा सामर्थ्योन्मत्त पुरुष पुढे सरसावतो व सर्व नीतिनियम किंवा कायदेकानून धाब्यावर बसवितो. तेव्हा केवढा अनर्थ होतो? मग

हीच पद्धती सर्वांनी स्वीकारली व भगवद्गीतेतील आसुरी वृत्ती हीच केवळ अस्तित्वात राहिली, तर मग त्या अनर्थ परंपरेचा काय हिशोब सांगावा? कॅलीक्लीसचे मत हे अतिशय अनर्थकारक व अनीतिप्रवण आहे व त्याबद्दल सॉक्रेटिसने त्याला फजीत केले व त्याची खरडपट्टी काढण्यात दयामाया ठेवली नाही, हे अत्यंत युक्तच होय; परंतु कॅलीक्लीसच्या मतावरून एकंदर सोफिस्टांना दूषण देणे बरोबर होणार नाही. कारण कॅलीक्लीस हा सोफिस्ट नव्हता व त्याची मते सोफिस्ट कधीही प्रतिपादित नसत. ज्यांचे स्वतःचे अस्तित्वच संघटित समाजस्थितीवर अवलंबून आहे, त्या आपल्या श्रोतृवृंदाची नाराजी करण्यापेक्षा त्यांची खुशामत साधण्याचाच ज्यांचा क्रम आहे आणि ज्यांचा श्रोतृवृंद लोकसत्ताक राज्यपद्धतीविरुद्ध काढलेल्या अल्पस्वल्प आक्षेपांनीही चिडून जाणारा आहे, तेच सोफिस्ट कॅलीक्लीसच्या मताचे उघड उघड प्रतिपादन करतील हे तर सर्वथा अशक्यच आहे.

प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' नावाच्या ग्रंथातील पहिल्या भागात थ्रॅसिमॅकसची म्हणून जी मते दिली आहेत, त्यांनाही वरील विवेचनच लागू पडते. थ्रॅसिमॅकस हाही विशेषतः अलंकारिक या नात्याने प्रसिद्ध होता व लोकांच्या आश्रयावरच त्याचेही जीवन अवलंबून असल्यामुळे प्लेटोने त्याच्या नावावर लादलेली मते त्याचीच असतील व असली तरी ती तो प्रतिपादन करीत असेल, हे शक्य नाही. थ्रॅसिमॅकसकडून उच्चारविलेली मते कॅलीक्लीसच्या मतांहून किंचित भिन्न आहेत. आहे हीच समाजस्थिती गृहीत धरून, त्यातील कायदे किंवा नीतिनियम यांची मीमांसा करावयाची असल्यास आपणास असे म्हणावे लागेल, की एखादा मनुष्य न्याय्य आचरण करतो ते त्याच्या स्वतःच्या फायद्याचे नसून, दुसऱ्याच्या फायद्याचे असते. आपल्या स्वतःच्याच फायद्यापुरते पाहिले तर मनुष्याला अन्यायाचरण करावेसे वाटेल; परंतु केवळ दुर्बळपणाने तो अधिक सामर्थ्यवान अशा राजसत्तेच्या अगर लोकसत्तेच्या कायद्यांना मान वाकवतो इत्यादिक मते जी या ठिकाणी सांगण्यात आली आहेत, त्यांना जे हिडीस स्वरूप येते ते कदाचित त्यांचे स्वरूपभूत नसून केवळ विवेचन पद्धतीनेही आले असावे. हीच मते पुन: ग्लॅकन आणि ॲडीमँटस यांनी पुढे आणली आहेत व सर्व समाजरचनेत जबरदस्त क्रांती घडवून आणल्याशिवाय त्यातील कित्येक दोष दूर करता येणार नाहीत. हे मत स्वत: प्लेटोचेही असल्यामुळे त्यालाही या मतांना सर्वस्वीच धुडकावून लावता येत नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

येथपर्यंत प्रख्यात सोफिस्टांविषयी काही माहिती देऊन त्यांच्या मतांचेही किंचित दिग्दर्शन करण्यात आले आहे. सोफिस्टांच्या काळी अथीनियम लोकांची नीतिमत्ता खरोखरच खालावली होती किंवा काय, याचा इतिहासाच्या साह्याने थोडासा विचार करू. अशी अनीतिमत्ता उत्पन्न झाली असली तरी तिचे कारण सोफिस्ट लोक नव्हेत हे वरील विवेचनावरून स्पष्टच होणार आहे; परंतु ही अनीतिमत्ता उत्पन्न झाली होती किंवा नाही, या प्रश्नाचेही अस्तिपक्षीच उत्तर मिळेल, असे नाही. ख्रिस्तापूर्वी ४८० वर्षांपासून तो

पेलॉपोनीससच्या युद्धाचा शेवट होईपर्यंतचा सरासरी ८० वर्षांचा इतिहास घेतला तर त्यांमध्ये आपणास अथेन्स येथील नीतिमत्ता खालावत गेली, असे म्हणता यावयाचे नाही. साधारणत: जे जुने ते चांगले, असा लोकांचा समज असल्यामुळे त्या काळाची नीतिमत्तेबद्दल मोठी स्तुती करण्यात येते; परंतु यावरून वस्तुस्थिती तशीच असेल असे निश्चयात्मक सांगता येत नाही. सॉक्रेटिसचा समकालीन ॲरिस्टोफेनस हा मागील काळाची स्तुती गाऊन त्याचवेळी सोफिस्टांच्या शिकवणीमुळे लोकांची नीतिमत्ता बिघडली असे म्हणतो व पुढे ख्रि. पू. ३५० व ३४० च्या दरम्यान इसोक्रेटिस हा आपल्या वृद्धापकाळी आपल्या स्वतःच्या काळातील लोकांची निंदा करून ॲरिस्टोफेनसच्या काळातील लोकांची स्तुती करतो. या दृष्टीने पाहिले तर मग ग्रीस देशातील नीतिमत्ता दर पिढीला खालावतच गेली असे म्हणावे लागेल, परंतु इतिहासाचा योग्य विचार केल्यास हा केवळ आभास आहे, असेच कबूल करावे लागेल. आपले पूर्वज चांगले या समजुतीने त्याचे शरीरही अतिशय धिप्पाड असावे, अशी कल्पना रूढ होते व शिवाजी महाराजांची तलवार आजच्या पिढीपैकी कोणाला उचलणारही नाही, अशी समजूत पडते; पण इतिहासात पाहावे तो महाराज अंगाने बळकट पण ठेंगू होते, असे वर्णन आढळते, इत्यादी गोष्टी वाचकांस परिचित असतीलच. हाच आभास नीतिमत्तेलाही लाग पडतो. ज्याप्रमाणे काही पिढ्यांत वास्तविक शारीरिक हास दष्टीस पडतो. त्याचप्रमाणे काही विशेष कारणांमुळे राष्ट्राची नीतिमत्ताही काही काळापर्यंत खालावते, ही गोष्ट खरी आहे; परंतु वरील त-हेच्या आभासाचा त्याग करून ऐतिहासिक पुराव्यांच्या सूक्ष्म अवलोकनाने या प्रश्नाचा निवाडा केला पाहिजे. साधारण कवींच्या, नाटककारांच्या अगर वक्त्यांच्या भाषणांवरच विश्वास ठेवून चालावयाचे नाही. या दृष्टीने अथेन्स येथील वस्तुस्थितीचे अवलोकन करू लागल्यास, आपणास तेथील नीतिमत्ता त्या काळात खालावलीच होती, असे म्हणता यावयाचे नाही. मॅरॅथॉन व थर्मापुली येथे पारसिक सैन्याचा धुव्वा उडवणाऱ्या वीरांचा व पेलॉपोनीससच्या युद्धात पराक्रम गाजविणाऱ्या योद्ध्यांचा काळ व परिस्थिती निराळी असली तरी, त्यांचे धैर्य, शौर्यादिक गुण सामान्यच होत. मॅरॅथॉनचा योद्धा मिल्टिॲडिस व पेलोपोनीसीयन युद्धातील अग्रणी पेरिक्लीज यांजमध्ये तुलनाच करू लागल्यास पेरिक्लीस हा खास कमी ठरणार नाही. पेलॉपोनीससच्या युद्धाच्या शेवटी शेवटी मेलिअन लोकांच्या कत्तलीसारखे क्रौर्य प्रसंग घडून आले व मिल्टिॲडिसच्या वेळी असे क्रौर्य कोठेही दिसून आले नाही, ही गोष्ट खरी; परंतु याला खरे कारण म्हणजे ज्या प्रसंगी अशा कृत्यांबद्दल मोह पडण्याचा संभवच कमी होता, हे आहे. त्या वेळचे लोक अधिक सदस्य होते, असा निष्कर्ष त्यावरून निघत नाही. याशिवाय उत्तरकालीन अथीनिअन लोकांचे इतर गुणही चांगले ध्यानात घेण्यासारखे आहेत. प्रथमतः चारशे व नंतर केवळ तीस सभासदांची जुलमी सत्ता प्रस्थापित झाली असता, त्याचा मोड करून पुनः लोकसत्तेचा उद्धार करणारे अथीनियन काही कमी पाणीदार म्हणता यावयाचे नाहीत. त्याचप्रमाणे लढाईकरिता प्रतिवर्षी जबरदस्त

कर भरावा लागत असतानादेखील संस्थानांच्या कायमच्या निधीला हात न लावण्याचा संकल्प चालविण्यात त्यांनी दाखविलेले आत्मसंयमन किंवा शत्रूवर जोराची चालही न करता किंवा अपमान सोसून तहही न करता त्यांना दमवून जेर करण्याची पेरिक्लीसची युक्ती यशस्वी करण्यासाठी त्यांनी दाखविलेली चिकाटी, ही त्यांच्या खालावलेल्या नीतिमत्तेची निदर्शक होऊ शकतील काय? अर्गिनुसी येथील लढाईत समुद्रातील प्रेते काढण्यात कसूर झाल्याबद्दल सहा सैन्याधिकाऱ्यांवर फिर्याद झाली होती, तीच फिर्याद ५० वर्षांपूर्वी झाली असती तर सॉक्रेटिससारखा मुख्य न्यायाधीश असूनदेखील त्यांचे प्राण वाचले असते काय? फार काय पण सॉक्रेटिससारखा मनुष्य त्या काळी अध्यक्षस्थानी आला, ही गोष्टदेखील त्या काळच्या चांगुलपणाचीच द्योतक आहे. पूर्वीच्या न्यायनिवाड्याच्या पद्धतीपेक्षा पुढील काळाची पद्धत अधिक चांगली झाली होती, हे निर्विवाद आहे व न्यायनिवाड्याची पद्धत अधिक चांगली होणे, हे सुधारणेचेच द्योतक आहे. निकियसच्या गुणांबद्दल फाजील आदरभाव बाळगल्यामुळेच सॅरॅक्यूज येथे पाठविलेल्या त्यांच्या आरमाराची व घरातीलच राज्यकारभाराचीही वाताहत झाली नाही काय? पण त्यावरूनच अथीनिअन लोक गुणांना लुब्ध होत, हे दिसत नाही काय? आणि गुणलोभ हा अनीतिमत्ता वाढल्याचे द्योतक आहे काय? सारांश, सोफिस्टांच्या वेळी अथेन्स येथील नीतिमत्ता बिघडली होती, असे म्हणता येत नाही. कदाचित, हा मुद्दा वादग्रस्त म्हणून सोडून दिला तरी वर दिलेल्या प्रॉडीकस व इतर प्रमुख सोफिस्ट यांच्या हकीगतीवरून व त्यांच्या शिकवणीच्या साधारण स्वरूपावरून त्यांचा कल नीतिमत्ता कमी करण्याकडे नव्हता असे स्पष्ट दिसते व अथेन्स येथील नीतिमत्ता बिघडली असल्यास तिचे कारण भिन्न असले पाहिजे, हे उघड आहे.

सरतेशेवटी सोफिस्टांच्या बाजूचा पुरावा आपणास असाही देता येईल, की त्यातील बहुतेक लोक अथेन्सचे रहिवासी नव्हते व असे असून, त्यांनी तेथे संपत्ती व लौकिक संपादन केला, ही एक गोष्टदेखील त्यांचे शिक्षण अथेन्सच्या लोकांना आपल्या हिताविरुद्ध वाटत नसे याची साक्ष देत आहे.

सोफिस्टांच्या दृष्टीने आपण विचार करून त्यातील प्रमुख म्हणून नावाजलेल्या पुरुषांची हकीगत पाहिली व सॉक्रेटिसलाही सोफिस्ट ही संज्ञा मिळाली होती, ही गोष्ट लक्षात घेतली, म्हणजे प्लेटोने त्याजवर एवढा कोरडा का उडविला किंवा खुद्द सॉक्रेटिसनेही त्यांची फजिती करण्याचे व्रत का पत्करले व त्यांच्या शिकवणीतील कोणता कमीपणा सॉक्रेटिसने भरून काढला, हे प्रश्न आपणापुढे उभे राहतात. सोफिस्टांचा उपदेश सर्वस्वी ग्राह्यच असल्यास सॉक्रेटिसने त्यांचे खंडण करण्याच्या भानगडीत न पडता केवळ त्याच आधारावर आपला विचार पुढे का चालविला आहे? त्यांच्यामध्ये गुणावगुणांचे मिश्रण असल्यामुळे अशी स्थिती झाली किंवा काय? याविषयी आता क्रमाक्रमाने विचार करावयाचा आहे.

पहिल्या प्रथम असा विचार करावयाचा, की एखाद्या पंथातील विशिष्ट व्यक्तीविषयी सामान्यतः बोलणे निराळे व त्या पंथाविषयी सामान्यतः बोलणे निराळे. ग्रोटच्या मते सोफिस्ट हा पंथच नव्हे. कारण त्यातील प्रमुख प्रमुख व्यक्तींमध्ये फारच मतभेद आढळून येत असत; परंतु ग्रोटचे हे म्हणणे बरोबर दिसत नाही. न्यायाधीश मंडळीत काही मतभेद झाला तरी त्यांचे न्यायाधीशत्व जसे अबाधितच असते किंवा राजकीय सुधारणांच्या साधनांच्या उत्कर्षापकर्षाविषयी भिन्न भिन्न मते असताही देशभक्तत्व जसे अबाधित राहते, त्याचप्रमाणे प्रोटॅगोरॅस, प्रॉडीकस, गॉर्गिअस इत्यादी सोफिस्टांचा परस्परात कितीही बेबनाव असला तरी त्यांना एका वर्गात घालण्यात काही विशेष हरकत नाही. कारण त्यांच्या विषमतेपेक्षा त्यांचे साम्यच अधिक महत्त्वाचे आहे आणि हे साम्य पैसे घेऊन शिकविणे हे होय. या सोफिस्टपंथातील प्रमुख पुरुषांविषयी प्लेटोचे मत बहूतकरून चांगलेच असावे. कारण त्याजबद्दलची सर्व चांगली माहिती आपणास त्यांच्या ग्रंथांवरून कळते व त्यांचे असे मत असण्यास योग्य कारण होते, हेही वरील सर्व हकीगतीवरूनच स्पष्ट होते; परंतु एखाद्या पंथातील प्रमुख लोक आक्षेपरहित ठरले म्हणून त्यांचे अनुयायीदेखील दोषमुक्त होतात काय? प्रोटॅगोरस हा विद्वान असेल, वक्तृत्व कलेत निष्णात असेल, राजकारणपटू असेल आणि या कारणास्तव त्याने स्वत: पैसे घेऊन शिकविणे हे अपायकारक होत नसेल, फार काय; पण पैसे देऊन त्याजजवळ शिकण्यासाठी मोठमोठ्या लोकांच्या उड्या पडत असतील; पण यावरून इतर सोफिस्ट त्याच दर्जाचे असत, असे दिसत नाही. सोफिस्टांच्या धंद्यातील मुख्य दोष म्हटला म्हणजे सर्वज्ञत्वाचा अभिमान हा होय. कारण ज्याने सर्वज्ञत्वाचा अभिमान सोडला, त्याची सोफिस्टगिरी बुडालीच म्हणून समजावे. अथेन्स शहरात विचार, उच्चार, आचार कसे ठेवावेत म्हणजे मनुष्याची नेहमी भरभराट होईल, हे शिकविण्याचा हे सोफिस्टलोक बाणा बाळगीत; पण थोडासा विचार केला असता हे काम त्यांच्या जिवाबाहेरचे होते, असे आढळून येईल. संस्थानाच्या घडामोडीत कोणती बाब समाविष्ट होत नाही? सैन्य, नौकानयन, वसूल, न्यायनिवाडा, अनार्गत व्यवस्था, शिक्षण, धर्म इत्यादी सर्व विषयांचा राजकारणी पुरुषांना अभ्यास करावा लागतो आणि या सर्व विषयांत एकाच मनुष्याला पारंगतता संपादन करणे अशक्य असल्यामुळे नित्यप्रसंगी एकेक मनुष्य एकच शाखा पाहतो. हिंडेनबुर्ग किंवा किचनेरसारखा सेनानी आरमारावरील सत्ता चालवू इच्छित नाही व नेल्सनसारख्या आरमारी योद्ध्याला वाटरलू जिंकता येत नाही. एखाद्या मोठ्या मॅक्समुल्लरला मेअर किंवा हायकोर्ट जज्ज नेमीत नाहीत किंवा एखादा विवेकानंद जमीन महसुलाचेही काम करताना आढळत नाही. सारांश, एखाद्या देशाच्या राज्यकारभाराच्या ज्या विशिष्ट बाबी आहेत त्यापैकी एखाद्या विषयातच मनुष्य निष्णात होण्याचा प्रयत्न करतो व त्या विषयात पारंगत होण्यातच त्याला आपले आयुष्य घालवावे लागते; पण या सोफिस्टांच्या वर्तणुकीकडे पाहावे तर काही निराळाच प्रकार आढळून येतो. लोकसभेपुढे येणाऱ्या विविध

विषयांवर चर्चा करून त्याजवर आपली छाप कशी बसवावी, हे शिकविण्याचा ते मक्ता घेत असत; परंतु लोकसभेपुढे येणाऱ्या विषयांचे त्यांचे स्वतःचे ज्ञान अर्थातच सरासरी असणार व आपले अज्ञान झाकून केवळ बऱ्या दिसतील अशा दोन गप्पा झोकूनच वेळ मारून नेण्याची त्यांची प्रवृत्ती असणार व तीच त्यांच्या शिष्यांत दिसून येणार हे उघड आहे. एखाद्या विषयाचे साधार व सोपपत्तिक सरळ विवेचन कसे करावे, हा त्याजपुढील मुद्दा नसून आपल्या ज्ञानप्रदर्शनाने लोकांस गार कसे करावे, हा त्यांचा उद्देश असे व या उद्देशाचा परिणाम लफंगेपणातच होई. आपल्या अज्ञानराशीवर वक्तृत्वकौशल्याची निव्वळ कल्हई करून त्याला रजतराशीच्या भावाने विकू पाहणे, हा लफंगेपणा नव्हे तर काय? आणि या सोफिस्टांच्या पद्धतीमुळे एका परावर मोर होऊ पाहणारे तरुण पुरुष अथेन्समध्ये पुष्कळदा सापडत आणि हा तरुणांचा अदूरदर्शीपणा व त्यांचे गुरू सोफिस्ट यांचे अज्ञान उघडकीस आणण्यास सॉक्रेटिस झटत असे. फार काय पण प्रसंगविशेषी त्यांची भीडभाड न धरता भर बाजारात त्यांची फजिती उडवून देई व याचकारणाने सोफिस्ट लोक त्याचा फार द्वेष करीत. सोफिस्टांच्या लंगड्या उपदेशाने दिशाभूल झालेल्या तरुणांचे उदाहरण पाहावयाचे असल्यास फार दूर जावयास नको. खुद्द प्लेटोचा ग्लाको या नावाचा एक धाकटा भाऊ होता. सोफिस्टांच्या शिकवणीमुळे तरुणांना अधिकार मिळवून, थेमिस्टोक्लिस, पेरिक्लीस यांजसारखे नाव गाजविण्याची जी अनिवार्य इच्छा त्यास होई त्याच इच्छेला तो बळी पडला व त्याचे वय केवळ वीस वर्षांचे असताही राजकारणात शिरण्याचे जे त्याला वेड लागले ते काही केल्या जाईना. त्याच्या मित्रमंडळीला व नातेवाईकांना मोठी भीती पडली, की हा अननुभवी व अर्धवट पोरगा अकाली राजकारणात शिरून कोठेतरी तोंडघशी पडेल व प्रसंगी त्याचा प्राणही जाण्याची पाळी येईल. ही गोष्ट सॉक्रेटिसच्या कानावर आली तेव्हा सॉक्रेटिसने ग्लाकोला गाठून त्याची समजूत पाडण्याचा निश्चय केला. ग्लाको हा तरतरीत व चांगला सद्गुणी मुलगा होता व त्यातही तो प्लेटोचा भाऊ म्हणून सॉक्रेटिसची त्याजवर फार ममता असे; परंतु सोफिस्टांच्या नादी लागल्यामुळे तो सॉक्रेटिसला फारसा भेटतच नसे; परंतु सॉक्रेटिसने त्याला एके दिवशी गाठलेच. सॉक्रेटिसची भाषण करण्याची शैलीच अशी काही मोहक होती. की त्याचे भाषण ऐकावयास कोणी एकदा उभा राहिला. की त्यास त्यात गोडी वाटावी व ज्याचे म्हणणे तो खोडून काढी त्यालादेखील प्रश्न विचारताना सॉक्रेटिस अशा झोकात ते विचारी, की तो अधिक जाळ्यातच सापडावा. ग्लाको तरुण असून आयतेस चढला आहे हे जाणून सॉक्रेटिसने त्याजबरोबर बोलताना प्रथम त्याची जरा स्तुती करून त्याला खुलविले व हळूहळू त्याचा मूर्खपणा त्याच्या नजरेस आणून दिला. सॉक्रेटिस म्हणाला, "ग्लाको, अथेन्सच्या लोकसत्ताक राज्याचा कारभार आपण पाहावा, अशी आपली इच्छा आहे, असे ऐकतो, ते खरे असेल तर मोठी आनंदाचीच गोष्ट म्हणावयाची. आपल्यासारखा सदाचरणी व तरतरीत मनुष्य राजकारणात शिरला तर

लोकांचा, आपल्या संबंध्यांचा, आपला स्वतःचा मोठा फायदा होईल यात तर संशयच नाही; पण आपल्या राजकारणपटुत्वाने असा मनुष्य या ॲटिका प्रांतालाच काय; पण सबंध ग्रीस देशाला किंवा त्याहीपेक्षा सबंध जगाला ललामभूत होईल, यात काही संशय नाही.” मनुष्य हा स्वभावतःच स्तुतिप्रिय असतो आणि ग्लाको हा तर एक अननुभवी तरुण. तो सॉक्रेटिसच्या मोहजालात अगदी गुरफटून गेला व एखाद्या नादलुब्ध हरणाप्रमाणे तटस्थ झाला. पुढे सॉक्रेटिस बोलू लागला, "ग्लाको, जर आपणास लोकसत्ताक संस्थानात अधिकार व प्रतिष्ठा मिळवावयाची आहे, तर आपणास लोकांच्या उपयोगी पडून त्यांचा काहीतरी फायदा करून दिला पाहिजे नाही काय?" ग्लाको म्हणाला, "होय"; परंतु पुढे सॉक्रेटिसने अशी लोकोपयोगाची कोणती बाब आपण प्रथम हाती घेणार, असा प्रश्न करताच तो घोटाळला व या त्याच्या घोटाळण्याचा फायदा घेऊन सॉक्रेटिसनेच त्याच्यातर्फे म्हणून सुचविले, की कदाचित संस्थानच्या लोकांस गबर करण्याचा त्याचा विचार असावा. हे उत्तर अर्थातच ग्लाकोला पसंत पडले. सॉक्रेटिस म्हणाला, तर मग या संस्थानात कोणत्या कारणाकरिता किती खर्च होतो व त्यापैकी कोणता खर्च कमी करता येण्यासारखा आहे, संस्थानाच्या एकंदर उत्पन्नाच्या बाबती कोणत्या व त्यापैकी कोणत्या बाबतीतील उत्पन्न लोकांना अधिक बोजा न वाटता वाढविता येईल. एखाद्या बाजूचा खर्च कमी करता आला नाही तर ती तूट भरून काढण्यास कोणत्या अन्य उपायांची योजना करावी; या प्रश्नांचा आपण विचार केलाच असेल. ग्लाकोला अर्थात आपले अज्ञानच कबूल करावे लागले. फार काय पण आपल्या संस्थानाचे एकंदर उत्पन्न किती व त्याचा खर्च किती, या ठोकळ रकमादेखील त्याला ठाऊक नव्हत्या. तथापि, ग्लाको हा धीर धरून म्हणाला, देशाचा गबर करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे शत्रूवर स्वारी करून लूट मिळवून आणणे हा तरी त्याला मोकळाच होता. सॉक्रेटिस म्हणाला, होय, ग्लाको, हा मार्ग आपणास मोकळा आहे खरा; पण एखाद्या शत्रूबरोबर लढाई जाहीर करण्यापूर्वी आपणास त्याचे बलाबल पाहिले पाहिजे व त्या लढाईपासून वास्तविक किती फायदा होण्यासारखा आहे, हेही पाहिले पाहिजे. आधी अथेन्सचे शत्रू किती, त्यात संपन्न किती व त्यापैकी संपन्न शत्रूचे जमिनीवर व समुद्रावर सैन्य व आरमार किती, या सर्वांची मोजदाद झाल्याशिवाय तर आपणास लढाई करावी किंवा नाही हे ठरविता येणार नाही. मग ग्लाको, आपल्या संस्थानचे एकंदर सैन्य किती, आपली जहाजे किती, आपल्या शत्रूची संपत्ती किती व त्यांचे सैन्य व जहाजे किती. याची आपणास बरोबर माहिती असेलच, त्यावाचन आपण राजकारणाच्या भानगडीत पडणारच नाही. ग्लाकोला आपले अज्ञान कबूल करावे लागले व नंतर सॉक्रेटिसने त्याच्या बुद्धीवर अशी गोष्ट ठसविली, की राजकारणात अत्यंत उपयोगी असणाऱ्या माहितीची जुळवाजुळव न करता जे त्यात पडतात, ते प्रतिष्ठा तर मिळवीत नाहीतच; पण केवळ उपहासाला मात्र पात्र होतात व देशाचे अकल्याणही घडवितात. शेवटी सॉक्रेटिस म्हणाला, ग्लाको, माझी

तुझ्यावर फार ममता आहे म्हणून मी तुला सांगतो, की सांभाळ, भलत्याच नादाला लागून आपल्याला व आपल्या देशाला फशी पाडू नकोस.

सॉक्रेटिसच्या या उपदेशाने ग्लाकोचे मन ताळ्यावर आले व पुष्कळ विषयांचा सांगोपांग अभ्यास करून नंतर तो दरबारात वागू लागला.

या गोष्टीवरून सोफिस्ट लोकांच्या शिकवणीने तरुण मनुष्य कसे उल्लू बनत, हे आढळून येते. वक्तृत्वाच्या साह्याने पुष्कळ गोष्टी साध्य होतात व त्यामुळे राजकारणात वक्तृत्वाची अतिशय गरज लागते ही गोष्ट खरी; पण म्हणून वक्तृत्वकलेचे एक-दोन धडे शिकले न शिकले तोच राजकारणपटू होऊ पाहणे म्हणजे किती उपहासास्पद व किती अनर्थकारक आहे? मनुष्याने राजकारणात पडू नये असे सॉक्रेटिसचे मुळीच म्हणणे नव्हते. तो स्वतः राजकारणात शिरला नाही ही गोष्ट खरी; पण म्हणून इतरांनी त्यात शिरू नये, असा काही तो उपदेश करीत नसे. त्याच्या उपदेशाचा मतलब एवढाच असे, की मनुष्याने राजकारणात पडावयाचेच तर विविध विषयांची यथायोग्य माहिती मिळवून नंतर ते पत्करावे. सोफिस्टांच्या नादी लागून अर्ध्या हळकुंडात पिवळे होऊ नये व हे सिद्ध करताना सोफिस्टांची निंदा करणे त्याला प्राप्तच होत असे व त्याचा परिणाम सोफिस्टांचा तीव्र द्वेष हा झाला.

आपली विद्या शिकविण्याबद्दल सोफिस्ट लोक पैसे घेत यासंबंधानेही त्याजवर थोडासा ठपका आल्यावाचून राहत नाही. प्रॉडीकस, प्रोटॅगोरस इत्यादिकांची विद्वत्ता मोठी होती म्हणून पांनी पैसे घेतले तरी कोणास विशेष आक्षेप घेता येण्यासारखा नव्हता फार काय पण योग्य विद्या प्राप्त करून दिल्यावर तसा मोबदला घेणे अगदी रास्त होते. आपल्याकडील गुरुदक्षिणेप्रमाणे त्यात वावगे काहीच नाही आणि त्यातही प्रोटॅगोरॅसची पैसे घेण्याची पद्धती फारच उदारतेची होती, हे कोणीही कबूल करील. शिकविण्याबद्दल पैसे घेतले एवढ्यावरूनच त्याला कोणी दोषी ठरविणार नाही. वर विवेचन केलेल्या सर्व गोष्टी कबल केल्या तरीसद्धा असा प्रश्न राहतोच. की इतर सोफिस्ट याबाबतीत त्याचे पूर्ण अनुकरण करीत असत काय? खरी विद्वत्ता असून विद्याविनिमय केला तर गोष्ट निराळी; परंतु आपल्या तुटपुंज्या ज्ञानालाच मोठा डामडौल चढवून ते ज्ञान बाजारात विकावयास काढणे व त्याची अवाच्या सवा किंमत सांगणे हे केव्हाही फसवेगिरीतच मोडणार आणि उपरिनिर्दिष्ट कित्येक प्रख्यात सोफिस्टांखेरीज इतर लोक याच सदरात येतात. 'सोफिस्ट' म्हणून जो प्लेटोचा संवाद आहे, त्यामध्ये सोफिस्टाचे स्वरूप काय, याबद्दल बरीच विस्तृत चर्चा केली आहे. थिओडोरस आणि थिॲइटिटस हे नेमल्यावेळी सॉक्रेटिसला भेटतात. त्यावेळी त्यांजबरोबर एक इलीशियातील पाहुणा येतो व तो तत्त्वज्ञ म्हणून नावाजलेला आहे, अशी त्याजविषयी माहिती सॉक्रेटिसास मिळाल्यामुळे सॉक्रेटिस त्यास विचारतो, 'आपण तत्त्वज्ञ आहात किंवा राजकारणी, सोफिस्ट? आपले लोक आपणास यापैकी एकाच कोणत्यातरी नावाने ओळखतात, की तीनही नावांनी?' या प्रश्नावरून सोफिस्ट म्हणजे कोण

याची चर्चा पाहुणा व थिॲइटिटस यांच्या संवादरूपाने केली आहे. सोफिस्ट म्हणजे गळाला आमिष लावून मासे पकडणारा कोळी किंवा गीतादिविलोकनाने हरिणांना पाशबद्ध करणारा फासेपारधी, लोकांची खुशामत करून सद्गुणांची विक्री करणारा व्यापारी, आपला विक्रीचा माल कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे आपल्याच बुद्धीतून निर्माण करणारा हुन्नरी, वादपटू असे म्हणता येईल. लोकांचे दुराग्रह दूर करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगात आहेच, असे म्हणवत नाही. कारण त्यांचे ज्ञान म्हणजे केवळ ज्ञानाभास आहे आणि केवळ ज्ञानदंभाने कोणाचे संशय दूर होत नाहीत व त्यांचे दुराग्रहही सुटत नाहीत.

वर जी सोफिस्टांच्या स्वरूपाची मीमांसा केली आहे, त्यावरून पैसा मिळविण्यासाठी ते ज्ञानीपणाचा मोठा आव आणत असत, हे उघड दिसते आणि असा ज्ञानदंभ माजवून पैसे उकळणाऱ्या मनुष्यास कोणीही नीचच समजेल. या ज्ञानाभावाबरोबरच अनिवार द्रव्यलोभ असला म्हणजे हे सोफिस्ट श्रीमंत लोकांचे खुशमस्करेच होत असतील यात काय आश्चर्य आहे? आपल्या ज्ञानाची बाजारात किंमत काय येईल, हाच सदोदित ज्यांचा विचार, त्यांच्या ठिकाणी खरी ज्ञाननिष्ठा असेल ही अपेक्षा करणे म्हणजे आपले रूप विकणाऱ्या वारांगनेच्या ठायी रूपवतीचे मोहक सौंदर्य असेलच अशी आशा बाळगण्यासारखे आहे. लोकांना खरे ज्ञान देऊन त्यांची उन्नती साधण्याची कला शिकविण्यापेक्षा त्यांना केवळ खुश करून वश करणे, हेच ज्याप्रमाणे सोफिस्टांच्या तालमीत तयार झालेल्या पुरुषाचे धोरण, त्याप्रमाणेच खुद्द सोफिस्टांचीही श्रीमंत लोकांना खरे ज्ञान शिकविण्यापेक्षा त्याजकडून पैसा उकळण्यावरच अधिक दृष्टी. मग त्यांनी श्रीमंत लोकांपुढे लांगूलचालनाचा प्रकार केल्यास काय नवल? प्रॉडिकस व प्रोटॅगोरस यांना हे लिहिणे लागू पडत नाही हे खरे; पण साधारण सोफिस्ट याच सदरात येत यात संशय नाही. आणि सॉक्रेटिस ज्ञानविक्रयाच्या विरुद्ध असण्याचे मुख्य कारण ही साधारण प्रवृत्तीच होय. एवढेच नव्हे तर हा ज्ञानविक्रय कधी-कधी अगदी अनीतिकारकही होई, यात संशय नाही. ॲरिस्टोफेनसच्या मते सॉक्रेटिस हा सोफिस्टच होता व सोफिस्टांची शिकवण कशी अनीतिकारक होती हे दाखविण्याकरिता आपल्या 'मेघमाला' (Clouds) या नाटकात एक प्रसंग सांगितला आहे. स्ट्रेपसिअडिस या नावाचा एक भला गृहस्थ आपल्या मुलाद्वारे कर्जबाजारी झाल्यामुळे अगदी भांबावून गेला होता, अशा वेळी आपल्या कर्जदारांना फसविण्यास काय युक्ती करावी म्हणून सल्ला घेण्यासाठी सोफिस्ट सॉक्रेटिस याजकडे गेला व त्याची विद्या शिकून तयार होण्यास त्याचे मथ्थड डोके नालायक ठरल्यावर त्याने आपल्या मुलासच ती विद्या संपादन करण्यास पाठविले. मुलाने ती विद्या फारच उत्तम संपादन केली. कारण त्याने कोर्टामध्ये आपल्या कर्जदारांना फसविले एवढेच नव्हे, तर नंतर बापालाही त्याच युक्तीने फसविले. सोफिस्टांची विद्या त्याच्या इतकी अंगवळणीच पडली! सॉक्रेटिस व सोफिस्ट यांच्यामध्ये असलेले महदंतर ॲरिस्टोफेनसच्या लक्षात न आल्यामुळे, त्याने येथे सॉक्रेटिसचीच सोफिस्ट म्हणून

टवाळी केली, ही गोष्ट निराळी; परंतु त्यावरून साधारणतः सोफिस्टांची वर्तणूक काही प्रसंगी तरी अशी होत असावी, असे दिसते. त्यांच्या या जीवोपजीवित्वाची चेष्टा करण्यासाठी ॲरिस्टोफेनस हा आपल्या 'विहंगम' (Birds) नामक नाटकात म्हणतो :

'Along the sycofantic shore,
And where the savage tribes adore
The waters of the clepsydra,
There dwells a nation stern and strong,
Armed with an enormous tongue,
Where with they smite and slay;
With their tongues they reap and sow,
And gather all the fruits that grow,
The vintage and the grain;
Gorgias is their chief of pride,
And many more there be beside
Of mickle might and main.
Good they never teach, nor show
But how to work men harm and woe,
Unrighteousness and wrong;
And hence the custom do the arise,
When beasts are slain in sacrifice,
We sever out the tongue.'

या उताऱ्यात गॉर्गिअसवर जे शिंतोडे उडविले आहेत ते खरे नव्हेत, हे मागे दाखविलेच आहे; परंतु सामान्यतः सोफिस्टांचा ज्ञानविक्रय अनीतिकारकच असे, यात संशय नाही.

ही क्रयविक्रयाची गोष्ट बाजूस ठेवली तरी सोफिस्टांच्या शिक्षणाचे स्वरूपदेखील हानिकारक होते, यात काही संशय नाही. प्रॉडीकसने दिलेली हर्क्यूलीसची गोष्ट, प्रोटॅगोरॅसची शिक्षणमीमांसा, हिपिअसचा नेस्टर व निओटॉलीमसमधील संवाद इत्यादी प्रकरणे अगदी निरुपद्रवी एवढेच नव्हे तर उपयुक्तही वाटतात खरी; परंतु सोफिस्टांच्या एकंदर विचारसरणीचे येथेच पर्यवसान होत नाही. प्रचलित नीतिनियम, आचारविचार, धर्मसंस्था इत्यादिकांविषयी चर्चा करताना त्यांची प्रवृत्ती उपकारक अगर साधक (Constructive) नसून ती नेहमी विध्वंसक (Destructive) मात्र असे. त्या वेळची परिस्थिती अशी होती, की प्रचलित रूढीच्या अगर कायदेकानूंच्या साहाय्याशिवाय त्रिकालाबाधित नीतिसिद्धांत बांधण्याइतकी

मनुष्याच्या बुद्धीची वाढ झाली नव्हती. अशा प्रसंगी प्रत्येक मनष्याच्या मनस्वातंत्र्याच्या मुद्यावर त्यांचे निराकरण करून दाखविणे हे मोठे अपायकारक होते. या निराकरणानंतर जर त्रिकालाबाधित सत्याचा उपन्यास करण्याची खबरदारी घेण्यात आली तर ठीक; परंतु सोफिस्टांची तशी कधीच प्रवृत्ती व योग्यताही नसे. या कारणांमुळे जनसमाजाचा असलेला आधार तोडून टाकून नवा आधार न देता त्यास अधांतरी लोंबकळत ठेवण्याचे पाप सोफिस्टांच्या शिरावर येते. एखाद्या कार्यातील दोष दाखवून त्याचा विध्वंस करणे फार सोपे आहे; परंतु तेच कार्य अधिक चांगले कसे करता येईल हे दाखविण्याची शक्ती असल्याशिवाय, आहे त्या कार्याचा विध्वंस करण्यास तरी हात घालू नये, हे शहाणपणाचे नव्हे काय? परंतु सोफिस्टांना एवढे कुठले धोरण! आपल्या जिव्हास्त्राच्या आघाताबरोबर केवढाले मनोरे जमीनदोस्त होत आहेत, इकडेच त्यांचे लक्ष! हे मनोरे पडता पडता खुद्द आपल्या डोक्यावरील मनोराही कोसळेल व मग आपणास स्वत:ला राहावयाला जागा राहणार नाही व नवा मनोरा बांधण्याची आपणास शक्ती नाही, या गोष्टी त्यांच्यासारख्यांच्या ध्यानात येत्या तर काय पाहिजे होते? पौराणिक कथांतील अगर प्रचलित कायद्यांतील नीती तुमच्या आडव्यातिडव्या प्रश्नांपुढे टिकत नसेल तर दुसरी चिरकालिक नीतितत्त्वे शोधून काढा; पण हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जनसमाजाला समाधानास असलेला आधार काढून टाकणे, हे वाईट नाही काय? सोफिस्टांची मते समाजव्यवस्थेला कशी बाधक असत याचे दिग्दर्शन करण्यासाठी प्रोटॅगोरस या विख्यात सोफिस्टाची दर्शनमीमांसा (Theory of perception) घेऊ. आपणास वस्तूंचे ज्ञान होते ते कसे? ती वस्तु आपल्या प्रतिकृतीचे तरंग चोहोकडे पसरते, आपल्या इंद्रियांवर त्या लाटांच्या आघाताने तत्सदृश विकार उत्पन्न होतो व त्या विकारांच्या मिश्रणाने जो काही तिसराच परिणाम दृष्टीस पडतो, त्यास आपण त्या वस्तूचे दर्शन म्हणतो. यावरून वस्तुदर्शन म्हणजे आपल्या इंद्रियानुरोधाने त्या वस्तूचा होणारा आभास होय. हा आभास व्यक्तिमात्राच्या ठिकाणी इंद्रियभेदांमुळे भिन्न असणार व म्हणून सर्वसंमत वस्तुदर्शन ही मिथ्या गोष्ट आहे. ज्याला जितके दिसते तितके तो पाहतो व त्याच्यापुरते ते खरे असते. सारांश, सत्य हे सार्वजनिक नसून व्यक्तिविषयक आहे. मनुष्य हा सर्व वस्तूंचे प्रमाण आहे (Man is the measure of all things) सत्य काय आणि असत्य काय, न्याय्य काय आणि अन्याय्य काय, याचा निवाडा करण्याचा त्यालाच अधिकार आहे.

सोफिस्टांतील प्रमुख व्यक्ती वरील मीमांसेचा दुरुपयोग करीत असतील, असे वाटत नाही खरे. परंत तिचा शेवट कशात होतो ते पाहा. जर सर्वसाधारण सत्य अगर सर्वसाधारणत: न्याय्य असे काहीच नाही, तर मग मी माझ्या सखासाठी दसऱ्याची वस्त घेण्यास मागे का पाहावे? त्याची वस्तू घेणे त्याला वाईट दिसेल; पण ते वस्तुतः तसेच आहे, याला प्रमाण काय? जर माझे सुख त्यामुळे साधत असेल तर मी ती खुशाल घ्यावी. कायद्याने मला शिक्षा करण्याचे काही प्रयोजन नाही. व्यक्तिविषयक सुखदुःख हेच जर चांगल्या-वाईटांचे प्रमाण,

तर न्याय्य म्हणविल्या जाणाऱ्या आचरणाने सर्वच लोक सुखी होतात, असे दिसत नाही. सदाचरणाच्या या भ्रामक समजुतीने वागणारा पुरुष बहुधा दुःखात आढळतो. तेव्हा ज्याला जे वाटेल ते त्याने करावे. सत्य, न्याय, नीती इत्यादी सब झूट आहे. कॅलीक्लीसने 'गार्गिअस' या संवादात हीच मते पुढे आणली आहेत व ती किती हानिकारक आहेत हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. वरील दर्शनमीमांसेचा हाच निष्कर्ष काढून त्याप्रमाणे सोफिस्ट लोक आचरण करीत नसत व तसे करण्याची त्यांची इच्छा असली तरी छाती नव्हती; परंतु त्यांची मते समाजरचनेला कशी विध्वंसक असत, हे यावरून दिसते.

वरील दर्शनमीमांसा ही समाजसंस्थेला प्रतिकूल आहे एवढेच नव्हे, तर त्यात मोठा दोषही आहे. प्रत्येक मनुष्याचे दर्शन निराळे असले म्हणजे सत्यदर्शन ही कल्पनाच खोटी कशी ठरेल. एकाच वस्तूबद्दल सर्प, भूमिभेद, जलपंक्ती इत्यादी आभास झाले म्हणून रज्जुदर्शन हे मिथ्या ठरते काय? किंवा प्रत्येक पुरुषाला आपल्या आवडीनिवडीप्रमाणे एक स्त्री सुंदर अगर कुरूप दिसली म्हणून खरे सौंदर्य ही कल्पनाच मिथ्या झाली काय? मनुष्यांच्या विविध दर्शनांना एकच मूलभूत आधार नाही काय? त्याचप्रमाणे मनुष्य हा सत्यासत्याचे, न्यायान्यायाचे, सदसदाचे आत्मपर्याय प्रमाण आहे तो कोणत्या दृष्टीने? त्याचा इतर सृष्टीशी काही संबंध नाही, इतर वस्तू त्याच्या सुखदुःख साधनाखेरीज इतर दृष्टीने असून नसून सारख्याच, असा काही याचा अर्थ नव्हे. सोफिस्टांनी व्यक्तिदृष्टीचा जो उपरिनिर्दिष्ट अतिरेक केला, त्याला सॉक्रेटिसने योग्य प्रसंगी व योग्य दृष्टीने आळा घातला व मागील कायदे किंवा रूढी याजवरच अवलंबून न राहताही, मनुष्याला सत्य व न्याय्य यांचे ज्ञान बुद्धिद्वारा करून घेता येते, हे त्याने सिद्ध करून दाखविले.

मागे कित्येक ठिकाणी सॉक्रेटिसची गणना सोफिस्टांमध्येच होई म्हणून सांगितले; परंतु वरील विवेचनावरून त्यांचे भिन्नत्व साधारण लक्षात येईल सॉक्रेटिस व सोफिस्ट हे भिन्न असताही ते एकच भासले याचे कारण त्यांचे काही बाबतीतील साम्य होय. आपल्याला इष्ट तेच उत्तर आपल्या प्रतिपक्षाकडून काढून घेण्याची कोटिक्रमपद्धती, प्रचलित गोष्टीविषयी निर्भीडपणे टीका करण्याची तयारी, वादपटुत्व, शिक्षणव्यासंग, भाषणाची मोहकता इत्यादी गुण दोघांनाही सामान्य होते; परंतु सॉक्रेटिस हा मोजके शब्द बोलणारा तर सोफिस्ट शब्दावडंबर माजविणारे. सॉक्रेटिसचे कार्य विधायक तर सोफिस्टांचे कार्य विध्वंसक. सॉक्रेटिस निःस्पृह तर सोफिस्ट धनलोभी. सॉक्रेटिस साधा तर सोफिस्ट डौली. सॉक्रेटिस नम्र पण ज्ञानी, तर सोफिस्ट वास्तविक पाहता किंचित; परंतु दांभिक व उर्मट इत्यादी भेदही महत्त्वाचे आहेत. त्या उभयतांना सोफिस्ट हा शब्द लावावयाचा तर तो या भेदाच्या अज्ञानाने किंवा ते दोघेही पंडित असत व काही बाबतीत सारखे असत, याच गोष्टीवर विशेष लक्ष देऊन लावता येईल.

सोफिस्टांची खरी योग्यता ऐतिहासिक दृष्टीची आहे. त्यांच्यामधील सर्व दोष लक्षात घेऊनदेखील, मनुष्याच्या विचारांत प्रगती घडवून आणण्यास ते कारणीभूत झाले हे आपणास कबूल केलेच पाहिजे. प्रचलित शिक्षणाची मर्यादा सर्व बाजूंनी वाढवून त्यांनी लोकांना आपल्या परिस्थितीचे निरीक्षण करण्यास उत्तम साधन करून दिले. रूढ झालेले कायदे किंवा आचारविचार जोपर्यंत केवळ अंधश्रद्धेने पाळण्यात येतात, तोपर्यंत वादविवाद, तंटेबखेडे कमी असतात खरे; पण या अंधश्रद्धेतच अधिक काळ गेल्यास प्रगतीचीही आशा व्यर्थ आहे. तेच कायदे व तेच आचारविचार, तीक्ष्ण कोटिक्रम व व्यापक विचार यांच्या भक्कम पायावर उभारले गेले म्हणजे त्यांजवरील आक्षेपनिरसन हे अगदी सुलभ होते व आक्षेपांच्या तीव्र आघातांनी ते स्वत: विरघळून न जाता, खडकाच्या प्रचंड सुळक्यावर आपटणाऱ्या लाटांप्रमाणे तेच उलट विदीर्ण होऊन जातात. या संधीकाळी कार्याचे दोन भाग करता येतात, एक प्रचलित कायदे अगर आचारविचार यांच्या अंधश्रद्धामूलक स्वरूपाचे उच्चाटन व दुसरा म्हणजे त्याचेच भक्कम पायावर व सुधारलेल्या स्वरूपात पुनःप्रस्थापन. यापैकी पहिला भाग सोफिस्टांनी उचलला व सॉक्रेटिसने दुसरा भाग सांभाळून त्याच्याच कार्याची पूर्तता केली.

❍❍❍

प्रकरण ४ थे

सॉक्रेटिसची मते

सॉक्रेटिस व सोफिस्ट या प्रकरणामध्ये एका ठिकाणी उल्लेख करण्यात आलाच आहे, की सॉक्रेटिसच्या काळी पंडित लोकांची व तत्त्ववेत्त्यांची दृष्टी भौतिक शास्त्रांकडून व्यवहारविषयक शास्त्रांकडे वळली होती व खुद्द सॉक्रेटिस त्याच विचाराचा होता. त्याच्या मते भौतिकशास्त्राच्या काथ्याकुटापेक्षा नीतिशास्त्राचा अभ्यासच मनुष्याला जास्त उपयोगी आहे. भौतिक विषयांमध्ये एकतर निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांची मते परस्परविरोधी होती व त्यामुळे कोणाचे म्हणणे खरे मानावे हे ठरविणेच आधी कठीण होते आणि यदा कदाचित एकाच तत्त्ववेत्त्याचे म्हणणे अधिक विश्वसनीय ठरले तरी त्यापासून जगाच्या व्यवहारामध्ये काय फरक पडणार आहे? जगाच्या मुळाशी असलेले तत्त्व एकरूप आहे, असे समजले असते म्हणजे जगतातील भेद, शत्रुमित्रभाव, संधिविग्रह हे बंद होणार होते काय? सारांश, जगातील व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले असता त्याचा काहीएक उपयोग नव्हता व या कारणाकरिताच सॉक्रेटिसने भौतिकशास्त्राभ्यासाची उपेक्षा केली. भौतिकशास्त्रविषयक काही गोष्टींचा सॉक्रेटिसाने आपले ईश्वरविषयक मत सिद्ध करण्यासाठी उपयोग केला आहे, त्याचा उल्लेख यथाक्रम येईलच. सध्या मुद्याची गोष्ट एवढीच, की थेल्स, हिरॅक्लिटस इत्यादी तत्त्ववेत्त्यांमध्ये व सॉक्रेटिसमध्ये हा अतिशय मोठा फरक आहे, की पहिल्या काळातील तत्त्ववेत्त्यांच्या दष्टीने भौतिकविषयक विचार म्हणजेच तत्त्वज्ञान. तर सॉक्रेटिसच्या मते त्याचा उपयोग अगदीच गौण. सॉक्रेटिसने त्याच्यापूर्वी झालेल्या तत्त्वज्ञाच्या मतांचा अभ्यास केला होता; परंतु त्याने त्याचे मुळीच समाधन झाले नाही. सर्व गोष्टींची योग्य उपपत्ती लावण्यासाठी त्यांनी सुचविलेल्या कल्पना अपुऱ्या ठरतात, असा त्याचा ग्रह होता व ॲनॅक्झंगोरॅसच्या उपपत्तीचा आपण किती आस्थेने अभ्यास केला; परंतु आपल्या आशेची किती निराशा झाली याचा त्याने स्पष्ट उल्लेखच केला आहे. सॉक्रेटिसचे असे म्हणणे असे की, कित्येक गोष्टी मानवी

बुद्धीला अनाकलनीयच आहेत व त्यांच्या शोधात घालविलेला वेळ व्यर्थच जाणार, म्हणून शहाण्या माणसाने भलत्याच नादी न लागता, आधी आपल्या भोवताली काय चालते ते पाहावे. सर्व विश्वाला कवटाळीत बसण्यापेक्षा मानवी गोष्टीचाच खोल विचार करावा. आधुनिक काळात अत्यंत महत्त्वाचे ठरलेले खगोलविज्ञानशास्त्र अशाच प्रकारचे शास्त्र आहे, अशी सॉक्रेटिसची समजूत होती. या शास्त्राचा अभ्यास मनुष्याने साधारण बेताबाताने केल्यास त्याचा उपयोग आहे. कारण ताऱ्यांच्या उदयास्तावरून ऋतुकाळ लक्षात येतात, रात्रीच्या वेळी खुष्कीने किंवा जलमार्गाने प्रवास करण्याऱ्यांना दिशा समजतात; परंतु आपल्या बुद्धीचा मर्यादितपणा लक्षात न घेता या शास्त्रात अनिरुद्ध संचार केला म्हणजे मनुष्य भलभलती मते बनविण्यात काळाचा अपव्यय करतो. सॉक्रेटिसपूर्वी जे तत्त्वज्ञ होऊन गेले त्यांची खगोलस्थ ज्योतिषविषयी जी मते प्रथम पुष्पात ग्रथित करण्यात आली आहेत, यावरून वरील कल्पनेची सत्यता लक्षात येईल. आधुनिक काळी या शास्त्राची जी वाढ झाली आहे, भविष्यकाळी घडणाऱ्या गोष्टी अचूकपणे वर्तविल्याचे जे प्रसंग दृष्टोत्पत्तीस येत आहेत व मनुष्याच्या बुद्धीला अनाकलनीय वाटणाऱ्या या विषयाचेच कसे सूक्ष्म आकलन होत चालले आहे, हे लक्षात आणले म्हणजे सॉक्रेटिसने त्याच शास्त्राला इतके निरुपयोगी ठरविलेले पाहून आश्चर्य वाटते; परंतु त्या वेळेपर्यंतच्या अनुभवाप्रमाणे पाहिल्यास सॉक्रेटिसचे म्हणणे खरे होते. भूमितीशास्त्रांचा उपयोग केवळ जमीन मोजण्यापुरताच, असे त्याचे मत होते. या शास्त्राचा निदान एवढा आनुषंगिक उपयोग तरी होता; परंतु तद्व्यतिरिक्त भौतिकशास्त्र म्हणजे परस्परविरुद्ध मतांचा गोंधळ व कालाचा नाश असेच उघड होते. याच कारणांमुळे लोकांचे लक्ष दिवसेंदिवस अधिक उपयुक्त विषयांकडे लागत होते व ते तसे लागावे अशाबद्दल सॉक्रेटिसचे समकालीन सोफिस्ट यांचीही खटपट होती; परंतु सॉक्रेटिस व सोफिस्ट यांची विचारसरणी येथपर्यंत एकसारखीच असली तरी त्यांचा यापुढील मार्ग भिन्न आहे. सोफिस्टांच्या दृष्टीने चिरंतन व निरपेक्ष असे सत्यसिद्धांत अशक्य असल्यामुळे त्यांनी शिकविलेल्या ज्ञानाचा अगर कुशल कोटिक्रमाचा सदुपयोग किंवा दुरुपयोग होणे हे सर्वस्वी व्यक्तिविषयक आवडनिवड किंवा लहर याजवरच अवलंबून राही. उलटपक्षी सॉक्रेटिसच्या मते सत्यसाधन हेच मनुष्याचे ध्येय आहे व त्याच्या नीतिविषयांना त्या सत्याचाच पाया आहे. या कारणाकरिताच सोफिस्टांच्या मतांची वाढ झाली म्हणजे ग्रीक तत्त्वज्ञानाचा नाश ठेवलेलाच; परंतु त्या काळी जर कोणाजवळ तत्त्वज्ञानविषयक सुधारणेचे व नवीन जीवनाचे खरे बीज असेल तर ते फक्त सॉक्रेटिसजवळच होते.

ज्याप्रमाणे राजकारणादिक इतर कित्येक विषयांचे शास्त्र आहे, त्याप्रमाणेच नीतीचे शास्त्र आहे व त्या शास्त्राच्या अनुरोधानेच नीतीची मीमांसा करून आचाराच्या शुद्धाशुद्धतेचा निर्णय ठरविला पाहिजे, असे सॉक्रेटिसचे मत होते व या नीतिशास्त्राच्या सिद्धीसाठीच सॉक्रेटिसने आपले सर्व आयुष्य खर्च केले म्हटले तरी चालेल. या नीतिशास्त्राचे ज्ञान मनुष्यास करून

द्यावयाचे म्हणजे त्याचे मन मोठे केले पाहिजे व त्याजवर बुद्धीचा प्रकाश पडला पाहिजे, या हेतूने त्याने आपण स्वत: अज्ञान पत्करलेसे दाखवून लोकांस सज्ञान करण्याचा प्रयत्न केला व या प्रयत्नाला आपल्या दृढ श्रद्धेने व्रताचे स्वरूप दिले.

सॉक्रेटिसच्या नीतिमीमांसेचे आद्यतत्त्व म्हणजे असे आहे, की ज्ञान हेच सद्गुणाचे कारण असून, ज्ञान हेच सद्गुणाचे स्वरूप आहे. ज्या मनुष्याला ज्ञान प्राप्त झाले तो सद्गुणी असलाच पाहिजे व जर कदाचित कोणी दुर्गुणी असेलच तर त्याच्या दुर्गुणाला त्याचे अज्ञानच कारण आहे. या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित होतो, की ज्ञान हे नेहमी विषयोपाधिक असल्यामुळे, ते सद्गुणाचे कारण आहे हे ठरविण्याबरोबरच हे ज्ञान कोणत्या विषयाबद्दल असले पाहिजे, याचाही निर्णय केला पाहिजे. सॉक्रेटिसच्या मते सर्व ज्ञान हे एकरूपच आहे; परंतु सत्यज्ञान व आभासमय ज्ञान किंवा भ्रमरूपज्ञान याजविषयीचा भेद दाखवून सत्यज्ञानाचे स्वरूप विशद केलेच पाहिजे. सद्गुणाला कारण असणाऱ्या ज्ञानाचा विषय काय, या प्रश्नाला सॉक्रेटिसचे उत्तर, 'हितकर किंवा उत्तम काय' या विषयाचे ज्ञान सद्गुणाचे मूळ आहे, असे आहे. ज्या मनुष्याला आपणास हितकर काय हे समजत नाही, तोच वाईट मार्गाला लागतो. एखाद्या व्यसनाच्या अधीन होणाऱ्या मनुष्याला आपण त्या व्यसनापासून आपल्यावर, आपल्या कुटुंबावर केवढा मोठा अनर्थ ओढवून आणीत आहोत याचे ज्ञान नसते, म्हणूनच तो त्या फंदात पडतो. क्षणिक सौख्योपभोगासाठी दरोडा घालून संपत्ती मिळविणाऱ्या दरोडेखोराला खरे सुखकर किंवा हितकर काय, कोणत्या मार्गाचा अवलंब केला असता आपणास खऱ्या सुखाची प्राप्ती होईल, याविषयी भ्रम पडल्यामुळेच तो लोकांची संपत्ती चोरावयास प्रवृत्त होतो व अखेर सुखप्राप्ती होण्याच्या बाजूसच राहून त्याला जिवास मुकण्याची पाळी येते. उलट पक्षी ज्या मनुष्याला सर्व गोष्टींचा विचार करून उत्तमाधम वस्तूंची निवड करता येते व निरनिराळ्या वस्तूंची योग्य किंमत अजमावता येते, तो मनुष्य नेहमी सद्गुणांकडेच प्रवृत्त होतो. या जगतामध्ये जे जे सद्गुणस्वरूप म्हणून नावाजलेले आहे, त्या ठिकाणी आपणास हेच आढळून येईल. परमेश्वराचा व आपला संबंध काय व त्या संबंधामुळे आपणास काय करणे हितकर आहे, हे ज्याला समजते, तो पुरुष धर्मनिष्ठ होतो. आपला व आपल्या देशबांधवांचा हितसंबंध कशात आहे, हे समजल्यामुळे मनुष्याचे वर्तन न्याय्य होते. हितकर व उदात्त वस्तूंचा वा गुणांचा संग्रह कसा करावा व घातकर वस्तूंचा त्याग कसा करावा, हे ज्ञान असल्यास मनुष्य धोरणी व समंजस होतो. आपणास पथ्यकर काय, हे समजल्यास मनुष्य बरा होतो व अजाणपणे कुपथ्याचे सेवन केल्यास मृत्युवश होतो. फार काय पण आपाततः अविचारमूलक वाटणारी धाडसाची कृत्येही याच ज्ञानावर अवलंबून असतात. समरांगणावर जिवाची पर्वा न करणारा मनुष्य बेभान होऊन व विचारशक्तीला फाटा देऊनच लढतो, असे कोणास सकृतदर्शनी वाटेल; परंतु योग्य विचारांती असे आढळून येईल, की या धाडसाच्या मुळाशीही निरनिराळ्या संकटांची योग्य किंमत ओळखून कोणते संकट पत्करणे हितकर

आहे, या विषयाचे ज्ञान हेच आहे. चिरकाल टिकणारे यश मलिन करण्यापेक्षा, केव्हातरी अवश्य येणारा व म्हणूनच समरांगणावर पाठ दाखविण्यासारखे लज्जास्पद कृत्य करूनही न टळणारा मृत्यू पत्करणेच आपणास अधिक श्रेयस्कर, अशी मनाची ठाम समजूत झालेला योद्धाच शत्रूशी निकराने लढून दिगंत कीर्ती मिळवितो. सारांश, कोठेही पाहा, हितकर वस्तूचे ज्ञान झाले, की त्याबरोबर सद्गुण आलाच व ते ज्ञान नसेल तर दुर्गुण ठेवलेलाच. कोणाही मनुष्याला आपले अहित व्हावे, आपला नाश व्हावा, असे वाटत नाही. आपण नेहमी थाटमाटात व सुखासमाधानात असावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे; परंतु हे सुखसमाधान खरोखर कशात आहे याचे ज्ञान न झाल्यामुळेच मनुष्य फशी पडतो.

या ठिकाणी दुसरा असा प्रश्न उद्भवतो, की हितकर किंवा उत्तम काय? या प्रश्नाचे उत्तर जर त्रिकालाबाधित असेल तर आपणास अमुक एक आचरण नीतिशुद्ध आहे किंवा नीतिबाह्य आहे, याचा सहज निर्णय करता येईल; परंतु अमुक एक गोष्ट हितकर किंवा उत्तम हा सिद्धांत सर्वमान्य आहे काय? खुद्द सॉक्रेटिसलाच हा प्रश्न विचारला असता तर त्याला त्याचे निश्चित उत्तर देता आले असते काय? आपणास एखादी चांगली वस्तू माहीत आहे काय, असा ॲरिस्टिपसचा प्रश्न आल्याबरोबर सॉक्रेटिस त्याला काय उत्तर देतो, हे पाहण्यासारखे आहे. सॉक्रेटिस ॲरिस्टिपसला एकामागून एक असे प्रश्न विचारतो, की आपणास एखादी चांगली वस्तू माहीत आहे काय? असे विचारण्यात त्याचा उद्देश ताप, डोळेदुखी, भूक इत्यादी प्रसंगी चांगले काय हे समजावून घेण्याचा होता काय? व या प्रश्नाचे नकारात्मक उत्तर आल्यावर सॉक्रेटिसचे असे प्रत्युत्तर असे, की जी वस्तू कोणत्याच कारणप्रसंगी चांगली नाही, ती कळण्यात काही अर्थही नाही व ती कळवून घेण्याचा त्याने कधी प्रयत्नही केला नाही.

या ठिकाणी चांगले किंवा हितकर म्हणजे काही निश्चित स्वरूपाचे नसून, ते नेहमी सापेक्ष व म्हणूनच प्रतिप्रसंगी निरनिराळ्या स्वरूपाचे आहे, असा निर्णय ठरतो व ज्या हितकर वस्तूच्या ज्ञानाने मनुष्य सद्गुणी व्हावयाचा त्या हितकर वस्तूचे स्वरूपच अनिश्चित असल्यामुळे नीतिनियमांनाही निश्चितपणा येणे शक्य नाही, असे वाटते. मनुष्याच्या विशिष्ट परिस्थितीला अमुक एक गोष्ट हितकर हे ठरविण्यास साधन तरी काय पाहावयाचे? मनुष्याचे हित पाहावयाचे ते तरी कोणत्या बाबतीत? त्याच्या शरीराचे स्वास्थ्य कशाने होईल हे पाहावयाचे, की त्याच्या मनाच्या स्वस्थतेकडे लक्ष द्यावयाचे? आणि या प्रश्नांचा निवाडा झाल्यावर नैतिक आचरणाची सर्वांत श्रेष्ठ कोटी कोणती हे पाहावयास पाहिजे व तद्नुरोधानेच साधारण कोटीचा विचार झाला पाहिजे. परिस्थितीप्रमाणे चांगले-वाईट ठरते, असे म्हटले तरी कोणच्या उच्च ध्येयांच्या अनुरोधाने या पायऱ्या ठरवावयाच्या हे पाहिले पाहिजे. नीतिमीमांसा हा विषय फार गहन आहे, त्यातील अत्यंत श्रेष्ठ कसोटी प्रत्येकाला समजण्यासारखी नाही व म्हणून सामान्यजनांना उपदेश करताना हे हितकर असेल त्याचे आचरण करण्यास सांगणे ठीक आहे; पण ज्यांचा असे विषय समजण्याचा अधिकार आहे,

त्यांना तरी काही स्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे व तसे स्पष्ट उत्तर सॉक्रेटिसच्या संभाषणात मिळत नाही. इतरांशी बोलताना त्याने तसे स्पष्ट उत्तर दिले नसते तरी चालले असते; परंतु ॲरिस्टिपससारख्या मनुष्यापासून ते लपविण्याचे काही कारण नव्हते. ॲरिस्टिपस हा मोठा बुद्धिमान व विचारी होता व सॉक्रेटिसच्या अनुयायीवर्गात त्याचा नंबर प्लेटो व युक्लिड यांच्या खालोखाल होता. मग पथ्यापथ्याचे तत्त्व इतके गूढ आहे काय, की ते ॲरिस्टिपससारख्यासही कळण्याजोगे नव्हते? तसे असेल तर इतरेजनांना त्याचा गंध तरी कोठून येणार व त्यांची संशयनिवृत्ती तरी कशी होणार? ॲरिस्टिपसची इच्छा सॉक्रेटिसाला शब्दांत पकडण्याची होती व म्हणून सॉक्रेटिसने अशी उडवाउडवी केली, असा यावर कित्येकांचा अभिप्राय आहे. उदाहरणार्थ, सॉक्रेटिसाने अन्न चांगले म्हणून म्हटले, की त्याच्याच पद्धतीचा अवलंब करून, अन्न घातक कसे हे दाखवावे, असा त्याचा बेत होता व हा बेत सॉक्रेटिसने हाणून पाडला.

केवळ वाद जिंकण्याच्या दृष्टीनेच पाहिले तर सॉक्रेटिसचे करणे बरोबर दिसेल; परंतु तत्त्वसंशोधनाला ही दृष्टी अपुरी आहे. मनुष्याचे कोठल्या बाबतीत हित साधावयाचे, ते कायमचे ठरल्याखेरीज नीतिमीमांसेला निश्चित स्वरूप येणे शक्य नाही.

मनुष्याच्या आचरणाचे ध्येय सुख आहे, हे मत ग्रीस देशात त्यावेळी प्रचलित होते व सॉक्रेटिसनेही कित्येक प्रसंगी जे सुखकर तेच चांगले असे ठरविले आहे; परंतु हा सॉक्रेटिसचा सुखवाद चार्वाकादिकांच्या सुखवादाहून फार भिन्न आहे. क्षणिक शारीरिक सुखासाठी मनुष्याने लोलुप होऊन आचरण करू नये, असे त्याचे मत आहे; पण याला कारणही हेच, की याच्यायोगाने मनुष्याच्या सुखाचा वाटा कमी होतो. कामलोलुप पुरुष आपल्या वासना तृप्त करण्याच्या फाजील नादी लागून आपल्या शरीराची खराबी करून घेतो व मग त्याला त्या सुखाचा आस्वाद घेणेही अशक्य होते. यास्तव मनुष्याला सुखाची इच्छा असेल तर त्याने नियमितच आचरण ठेवले पाहिजे. सॉक्रेटिसची सुखमय अवस्थेची कल्पना ही सामान्यजनांच्या सुखकल्पनेहून फारच निराळी आहे व त्याला सुखध्येयवादी म्हणावयाचे असेल तर त्या नावाचा अर्थ प्रत्येक वेळी मर्यादित करणेच भाग आहे.

याशिवाय दुसरी अशी गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, की सॉक्रेटिस हा प्रत्येक कृतीचा मनावर अथवा आत्म्यावर काय परिणाम होतो इकडे लक्ष देऊनच तिची किंमत ठरवितो. आपल्या ध्यानीमनी नसता केवळ दैवाच्या अनुकूलतेमुळे एखादी चांगली गोष्ट घडून येण्यापेक्षा ती स्वकष्टाने प्राप्त करून घेण्यातच मनुष्याचा अधिक फायदा आहे, असे त्याचे म्हणणे होते व हे केवळ सुख ध्येयाला फारसे अनुकूल नाही. सॉक्रेटिसच्या स्वतःच्या चरित्राचा व त्याच्या या सुखवादाचा अर्थ बरोबर न समजल्यामुळे, आलस्यामध्ये आकंठ बुडून गेलेल्या एपिक्युरिअन पंथांतील मनुष्यांच्या आयुक्रमाचा किंचित विचार केल्यास, आपणास या दोन सुख कल्पनांमध्ये किती अंतर आहे हे दिसून येईल. त्याचप्रमाणे सुख हे

सद्गुणाचे फळ आहे, कारण नव्हे, असे जे सॉक्रेटिसने कित्येक ठिकाणी म्हटले आहे, तेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. आचरणाचा चांगुलपणा आधीच ठरलेला असतो व त्यापासून खरी सुखप्राप्ती होते, असा या भाषणाचा मथितार्थ होतो.

यावरून एखाद्या कृत्याचा सुखकरपणा हा त्याच्या चांगुलपणाबद्दल खात्रीलायक पुरावा नाही. मग चांगले म्हणजे काय? हा प्रश्न शिल्लक राहतोच.

चांगले म्हणजे बुद्धीला पटणारे, अशी एक व्याख्या सॉक्रेटिसच्या भाषणांतून निघते. मनुष्याचा स्वभावच असा आहे, की त्याला चांगले तेच आवडते. मनुष्याच्या बुद्धीवर अज्ञानाचे पटल असल्यामुळे त्याला ही चांगली वस्तू दिसत नाही; पण त्याला एकदा सत्यज्ञान झाले म्हणजे त्याला आपल्या आचरणातील दोष दिसतात व कोणत्याही मनुष्याला आपण वाईट असावे, असे वाटत नसल्यामुळे तो ते टाकून देतो. या कल्पनेमध्येही अन्योन्याश्रयाचा मोठा दोष आहे. कारण सत्यज्ञान झाले तर चांगले काय हे समजणार व चांगले काय हे समजणे म्हणजेच सत्यज्ञान.

याखेरीज सॉक्रेटिसच्या नीतिमीमांसेतील दोष म्हणजे तिच्यातील एकांगीपणा किंवा अपुरेपणा हा आहे. मनुष्याच्या हातून काही विशिष्ट आचरण घडून येण्यास त्याची बुद्धी हे एक अत्यंत महत्त्वाचे कारण असते, ही गोष्ट खरी; परंतु सत्यवस्तूंचे नुसते ज्ञान झाल्याबरोबर मनुष्याच्या हातून लगेच तसे आचरण घडतेच असे नाही. मनुष्याचे मनोविकार व वासना यांचा मनुष्याच्या आचरणावर जबरदस्त ताबा चालतो व या गोष्टीची जणू काय सॉक्रेटिस यास आठवणच नाही असे भासते. सॉक्रेटिसच्या मनाची इतकी प्रगल्भावस्था झाली होती, की त्याला सत्यज्ञान होणे व त्याबरहुकूम आचरण घडणे हे अगदी एकरूपच झाले होते; परंतु ही अवस्था येण्यास मनुष्याला जे अविश्रांत परिश्रम करावे लागतात व त्या काळी बुद्धीचा व मनोविकारांचा जो भयंकर संग्राम सरू असतो. त्याची सॉक्रेटिसच्या योजनेमध्ये काहीच मोजदाद केलेली दिसत नाही. परंतु जगतातील अत्यंत दुःखकारक प्रसंग आपणास याच अंत:कलहाची साक्ष देत आहेत. चांगले काय, हे उपजतबुद्धीने म्हणा, उपदेशाने म्हणा किंवा अन्य कारणाने म्हणा; पण समजत असूनही मनुष्य आपले आचरण सुधारण्यास समर्थ होत नाही. ज्या अवस्थेला 'कळते पण वळत नाही' म्हणून म्हणावयाचे, ती अवस्था हीच. 'जाऊ नका रे विषयाटवीची वाट कठीण मोठी' हा उपदेश मनात येत असताही ज्यांना आपला कामविकार दाबता येत नाही, असे प्राणी असतातच. मद्यपानापासन होणारे अनर्थ समजत असनही मद्यापी मोहजालात अडकतो व अशा तऱ्हेची उदाहरणे पाहू लागल्यास ती हवी तेवढी सापडतील. ही तऱ्हा केवळ जडमूढांचीच नव्हे, तर मोठमोठ्या विचारी पुरुषांचीही अशीच स्थिती झाल्याचे आढळून येते. मोठमोठ्या ऋषीमुनींची तपश्चर्या भंग पावली त्याला कारण त्यांचे निग्रहाविषयीचे अज्ञान हेच पुरेसे कारण नाही. तुमचे ज्ञान हे खरे ज्ञानच नव्हे, असा शेरा मारूनही भागावयाचे नाही. 'बलवानिंद्रियग्राम: विद्वांसमपि कर्षति' या व्यास

महर्षींच्या वाक्यामध्ये अशा पुरुषांचा समावेश विद्वानांमध्येच केला आहे. मग ज्याला चांगले काय ते समजले त्यांच्या हातून ते घडेलच असा काही आपणास निश्चय सांगता येणार नाही. सॉक्रेटिसच्या नीतिमीमांसेचा एकांगीपणा येथेच दृष्टोत्पत्तीस येतो. मनुष्याची इच्छा सर्वस्वी समर्थ असती तर मग जगतात दुःखकारक प्रसंग घडूनच आले नसते. स्वतः सॉक्रेटिस हा अशा स्थितीतूनच उन्नत अवस्थेला गेला होता हे खरे; पण ज्यावेळी त्याने उपदेश केला, त्यावेळी त्याची स्वतःची तयारी विलक्षण झालेली असल्यामुळे त्याला या गोष्टींचा विसर पडला असावा. मनोविकार प्रबल झाले तरी त्यांना ताब्यात आणण्याचा मार्ग हाही ज्ञानावलंबीच आहे व म्हणून सॉक्रेटिसने केलेली मीमांसा चुकीची नाही, हे अगदी खरे. ती किंचित एकांगी आहे एवढेही त्याबरोबरच कबूल केले पाहिजे. प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनादेखील ही मीमांसा पुरेशी न वाटून त्यांनी आपली उपपत्ती निराळ्याच तत्त्वावर मांडली.

ज्याप्रमाणे व्याकरणाचे ग्रंथ होण्यापूर्वीही मनुष्ये शुद्ध भाषण करीत हे खरे आहे. त्याचप्रमाणे नीतिमीमांसेची व्यवस्थित मांडणी होण्यापूर्वी मनुष्याचे आचरणही शुद्धावस्थेत असणे शक्य आहे व सॉक्रेटिस हा अशा शुद्ध आचरणाचे जणू मूर्तिमंत स्वरूपच आहे. त्याची मीमांसा अपुरी असली तरी महत्त्वाची व सूचक आहे व या शास्त्राच्या प्रगतीला सॉक्रेटिसने जे साह्य केले ते असामान्य होते हे कोणीही कबूल करील. सामान्य आचरणाची नियममर्यादा लावणे हे जसे त्याच्या नीत्युपदेशाचे एक प्रधान अंग, त्याप्रमाणेच काही विशिष्ट सद्गुणांचे योग्य स्वरूप पुढे मांडून ते श्रोत्यांच्या मनावर ठसविणे हे त्याचे दुसरे अंग आहे व त्याच्या उपदेशातील हा भाग अधिक बोधप्रद व महत्त्वाचा आहे. असो. आपण त्या विषयाकडेच आता लक्ष देऊ.

सॉक्रेटिसचा अतिशय प्रीतीतला विषय म्हणजे स्वाभिमान व आत्मसंयमन या दोन गुणांवरच व्यक्तिविषयक योग्यतेची इमारत उभारली जाते. मनुष्याने आपण होऊन आपणाकडे अवास्तव हीनत्व पत्करू नये. कारण त्यायोगाने आपणा स्वतःविषयी आपला आदर कमी कमी होत जाऊन आपला उत्साह नष्ट होतो. या उपदेशाचे आचरण सॉक्रेटिसप्रमाणे इतर ठिकाणी क्वचितच सापडेल. आपल्या जिवावरचा प्रसंग आला असताही इतर लोकांप्रमाणे आपली बायका-पोरे न्याय सभेत आणून त्यांच्या दीनवाणीने न्यायाधीशाच्या मनात कीव उत्पन्न करण्याचा मार्ग त्याने पत्करला नाही. ज्या कृत्याने आपली मानहानी होते, ते कृत्य मनुष्याने प्राणान्तीही करू नये, हेच या आचरणाचे तात्पर्य आहे. आपला जीव बचावणे एवढेच ध्येय असेल तर रणभीरू मनुष्यासारखा शहाणा कोणीच नाही म्हणावयाचे; पण त्या रणभीरूची जगात कोण फजिती! आणि इतके करूनही मनुष्याला चिरंजीव होता येते काय? आपणास दुसऱ्याने मारल्याखेरीज आपण मरणारच नाही. अशी काही गोष्ट नाही. मग केवळ प्राण वाचविण्यासाठी मानहानी पत्करण्यापेक्षा जीव दिलेला काय वाईट! सारांश, मानधनत्व हे सर्व सद्गुणांना आधारभूत आहे.

या स्वाभिमानाचा अर्थ उर्मटपणा असा मात्र नव्हे. आपल्या स्वतःविषयीच्या आदराचे उद्धटपणात रूपांतर होऊ नये याबद्दल मनुष्याने नेहमी खबरदारी बाळगली पाहिजे व यासाठीच सॉक्रेटिसने याच स्वाभिमानाला विनयाची व सरळ वर्तनाची जोड दिली आहे. सॉक्रेटिसवर जर कोणी असा आक्षेप घेईल, की त्याने देशसेवा करण्यात जाणून बुजून हयगय केली तर त्याला तो मोठ्या अभिमानाने आपल्या कृत्यांची आठवण देईल. पॉटीडियाच्या रणमैदानावर गाजविलेले शौर्य, अर्गिनुसीच्या सेनापतीवर झालेल्या अन्याय्य फिर्यादीत केवळ सत्यासाठी बहुमतालाही न जुमानण्यात दाखविलेले धैर्य, एका निरपराधी मनुष्याला पकडून आणण्याचा, तीस अंमलदारांपैकी दोघांनी केलेला हुकूम धाब्यावर बसविण्यात त्याने देशसेवेसाठी केलेली प्राणाची बेपर्वाई इत्यादी प्रसंगांविषयी तो केव्हाही अभिमानपूर्वकच भाषण करी: परंतु तेच धैर्य म्हणजे काय? याची व्याख्या करण्याचा प्रसंग आला असताना तो आपले अज्ञान प्रांजळपणे कबूल करी (Laches पाहा). वादविवादामध्ये आपला पक्ष खोटा ठरल्यास तो टाकून देण्यासही मनुष्याने तयार असले पाहिजे. कारण सत्य हेच श्रेष्ठ आहे. काही काही प्रसंगी सॉक्रेटिस केवळ वाद जिंकण्याच्या भरीस पडून आपल्या मताविरुद्ध भाषण करतो, असे दिसते; परंतु त्याचे एकंदरीत वर्तन सरळपणाचेच असे, यात काही संशय नाही. आपण आपल्या प्रतिपक्षाप्रमाणेच सत्याचा शोध करणारे असून, आपल्या विरुद्ध बाजूकडील सत्यांश उचलून घेण्यास तत्पर असल्याबद्दल त्याला अभिवचन देता येई व ते त्याचे अभिवचन मनापासून दिलेले असे. सॉक्रेटिस वादविवाद करताना आपल्याकडे कमीपणा घेई, तो नेहमीच कावेबाजपणाचा नसे, तर विनयमूलकही असे. अपोलो देवाने त्यालाच सर्वांत शहाणा म्हणून ठरविल्यावर तो कसा बुचकळ्यात पडला व अखेरीस त्याने आपल्या शहाणपणाची काय उपपत्ती दिली. हे त्याच्या आत्मसमर्थनपर भाषणात आलेच आहे. परमेश्वराच्या ज्ञानापुढे मानवी ज्ञान म्हणजे क:पदार्थ. आपले अज्ञान पत्करणे हेच अशा प्रसंगी खरे ज्ञान व सॉक्रेटिस ही गोष्ट ओळखतो म्हणूनच तो ज्ञानी. ज्या मनुष्याला थोडे पण खरे ज्ञान झाले त्यालाच ज्ञानाची खरी अनंतता लक्षात येते व तो आश्चर्यचकित होऊन आपले ज्ञान हे काहीच नव्हे, असे कबूल करतो. ही ज्ञानाची अगाधता लक्षात आणूनच विख्यात तत्त्वद्रष्टा जो न्यूटन त्याने आपणाविषयी असे उद्गार काढले, की अनंत ज्ञानसागराच्या काठावरील गारगोट्यांशी खेळणारा मी एक मुलगा आहे. ज्या समुद्राच्या तळाला आजतागायत कोणताच बुडीद न लागल्यामुळे त्याला तळ तरी आहे की नाही, हाच प्रश्न आहे, त्या अनंत सागरापुढे गारगोटीची किंमत काय? मानवी ज्ञानाची मर्यादित स्थिती लक्षात आणून ज्या त-हेने न्यूटनने वरच्यासारखे उद्गार काढले, त्याच तऱ्हेची सॉक्रेटिसची अज्ञानाची कबुली आहे. आपणास जितके ज्ञान झाले आहे तितक्या ज्ञानाबद्दल खात्री बाळगावी, अभिमान बाळगावा व अशी खात्री सॉक्रेटिसलाही होती म्हणूनच त्याने लोकांस विशिष्ट गुणांचा उपदेश केला; परंतु आपणास ज्या गोष्टी अनाकलनीय आहेत किंवा अद्यापि

अज्ञात आहेत, त्याविषयी मनुष्याने वृथा अभिमानवश होऊन भलभलती विधाने करू नयेत. सत्यशोधनासाठी विनयाची कास धरणारा तत्त्वज्ञ व लोकांस सन्मार्गाला लावण्यासाठी दृढ श्रद्धेने व निश्चयपूर्वक उपदेश करणारा गुरू, असे हे सॉक्रेटिसच्या जीवनाचे बिनसंधी भाग आहेत, असे म्हटले तरी चालणार आहे. सारांश, मनुष्याने विनयाचा त्याग करू नये व आपलेपणाही सोडू नये.

अशा स्वतंत्र बाण्याने वागावयाचे असेल तर त्याला अत्यंत आवश्यक गुण म्हणजे निरपेक्षता हा आहे. सुखलोलुप मनुष्य हा नेहमी परवश असल्यामुळे त्याच्या हातून कोणतेच महत्त्वाचे कृत्य घडून येत नाही. देवांची अवस्था श्रेष्ठ असण्यास कारण म्हणजे त्यांची निरपेक्षता हीच आहे, असे सॉक्रेटिसचे म्हणणे होते व मनुष्याने आपल्या गरजा शक्य तेवढ्या कमी करून देवतुल्य व्हावे, हे त्याचे नेहमीच सांगणे असे. या विषयीचा थोडासा उल्लेख पहिल्या प्रकरणात केलाच आहे. सॉक्रेटिसइतकी साधी राहणी फारच क्वचित आढळून येईल; पण या साध्या राहणीचा उद्देश त्यापासून स्वातंत्र्य मिळावे, असा असे. अशी स्वतंत्र मनोवृत्ती नसताना केवळ लोकांना भुलविण्यासाठी एखाद्याने लक्तरे पांघरूण मोठा डौल आणला तर त्याच्या वस्त्रांच्या फटीतून त्याचे अज्ञान मात्र दृष्टोत्पत्तीस येते, असे तो बजावीत असे. त्याच्या निरपेक्षतेच्या मुळाशी ही स्वतंत्र वृत्तीच होती. सुख घ्यावयाचेच तर घ्यावे; परंतु तद्वश होऊ नये, हाच त्याचा कटाक्ष होता. पावित्र्यापेक्षा स्वातंत्र्य हाच त्याच्या निरपेक्षतेचा हेतू होता असे जे कित्येक लेखकांनी म्हटले आहे, ते खरे आहे. ख्रिश्चन धर्मानंतरची पापपुण्याची व तन्मूलक शुद्धाशुद्धतेची कल्पना ग्रीक लोकांच्या कल्पनेपेक्षा फार निराळी होती. एखाद्या अन्याय्य कृत्याच्या आचरणाने होणारे आनुषंगिक परिणामच अधिक महत्त्वाचे वाटत व दुर्गुण म्हणजे गैरमुत्सद्देगिरीची, अपमानास्पद अवस्थेची व परावलंबनाची जननी आहे, म्हणूनच तिचा मुख्यतः तिरस्कार होई..

मनुष्य कितीही स्वावलंबनी व निरपेक्ष झाला तरी त्याला आपले बहुतेक आयुष्य समाजामध्येच घालावयाचे असल्यामुळे त्याला काही सामाजिक गुणांचीही आवश्यकता आहे. अशा गुणांमध्ये स्नेह किंवा मैत्री या गुणाचा पहिला अधिकार आहे, असे म्हटले तरी चालेल. या मैत्रीविषयी सॉक्रेटिसने केलेले विवेचन फार बोधप्रद आहे. आपले कुटुंब, आपले मित्रमंडळ, आपले संस्थान यांजसंबंधीचे प्रेमपाश तोडून मनुष्याला आपला हेतू सिद्धीस नेता येणार नाही, तर त्यांचा योग्य उपयोग करून, त्यांचे महत्त्व समजून वागण्यातच त्याचे हित आहे, असे उपदेशप्रसंग झेनोफनने* अनेक वर्णिले आहेत. एका प्रसंगी सॉक्रेटिसचा वडील मुलगा लॅप्रोक्लीज हा आपल्या आईला काही दुरुत्तर बोलला. झँटिपी ही किती कर्कश स्वभावाची होती व इतके असूनही सॉक्रेटिस तिजबरोबर किती शांतपणाने वागे, याजविषयी

---

* झिनोफन म्हणजे झिनोफेनिस वा झेनो किंवा स्टॉईक झिनो नव्हे. झिनोफन (४२७-३५५ ख्रि. पू.) हा प्लेटोसमकालीन इतिहासकार होता.

पहिल्या प्रकरणात लिहिलेच आहे. आपली आई आपणाशी कितीही कठोरपणाने वागली तरी आपण कठोर होऊ नये, हा सॉक्रेटिसचा मुद्दा आहे. ज्या रम्य जगतामध्ये आपणास विविध मनोहर विषयांचा उपभोग घ्यावयास सापडतो, त्या जगतातून नाहीसे होणे म्हणजे मरणे, या गोष्टीसारखी भयप्रद गोष्ट दुसरी कोणतीही नाही असे सामान्य मनुष्यास वाटते. कारण या मरणशिक्षेच्या भयानेच मनुष्याच्या तीव्र कुविचारांनाही आळा बसतो. अशा रम्य जगतांमध्ये आपले येणे ज्या आई-बापांवर अवलंबून असते, त्यांजशी आपण कृतघ्न होणे हे फार वाईट आहे. कोणी म्हणतील की, आपली वासना तृप्त करून घेण्यासाठीच मनुष्य विवाह करतो व केवळ नाइलाज म्हणून अपत्यसंरक्षणाचे ओझे पत्करतो; परंतु हे म्हणणे अगदी चूक आहे. कारण पशुसामान्य वासनांची तृप्ती करण्याचे दुसरे सोपे व कमी खर्चाचे मार्ग असूनही मनुष्य जर विवाहबंधनाने आपणास जखडून घेतो, तर त्याचा उद्देश केवळ वासनातृप्तीपेक्षा अधिक असला पाहिजे. आपल्याकडील आर्य संस्कृतीच वाढलेल्या लोकांना तर सॉक्रेटिसचा हा विचार ताबडतोब पटेल. प्रजातंतूचा उच्छेद होऊ नये, पितरांचे ऋण फेडण्यासाठी व आपणास पुढे पिंडप्रदान देऊन स्वर्गद्वार मोकळे करण्यासाठी पुत्रप्राप्ती व्हावी, याच उद्देशाने मनुष्याने विवाहबंधनात पडावे, केवळ कामवासनेच्या तृप्तीसाठी नव्हे व ही भावना ज्याची सदैव जागृत राहील तो चांगला मनुष्य होय. सारांश, ज्यांना चांगल्या-वाईटाची किंवा भूतभविष्याची काही कल्पनाच नाही, असे जडमूढ सोडून दिले तरी समंजस माणसाची विवाहप्रवृत्ती केवळ वासनातृप्तीसाठी नाही.

आधी मूल जन्मास येईपर्यंतच मातेला किती कष्ट सोसावे लागतात व नंतर त्याच्या संगोपनाची काळजीही तिलाच ठेवावी लागते. ज्यावेळी त्याला आपले हित-अहित समजत नाही व सुखदुःख व्यक्त करता येत नाही, त्यावेळी आईलाच त्याची काळजी ठेवावी लागते. तो मोठा झाल्यावर त्याला योग्य शिक्षण देण्याचे काम पित्यावर येऊन पडते व श्रम किंवा पैसा याकडे न पाहता शक्य असल्यास आपणा स्वत:कडून किंवा निदान दुसऱ्या मनुष्याकडून तरी त्याला शिक्षण मिळण्याची व्यवस्था तो करतो. सारांश, अशाच सर्व बाबी आहेत, की ज्याच्या योगाने मनुष्य आपल्या आई-बापांचा उपकारबद्ध होतो.

झँटिपी ही जात्या फार कर्कश होती व म्हणूनच तिचे अनंत उपकार असले तरी तिची शिवीगाळ किंवा तोंडाळपणा असहनीय आहे, अशी आपल्या मुलाची तक्रार ऐकन सॉक्रेटिस त्यास म्हणतो, की तूदेखील लहानपणी वेळी-अवेळी रडण्याचा कोल्हाळ करून तिला असाच त्रास देत असशील. याशिवाय असा विचार करावयास पाहिजे, की जरी आपले आई-बाप आपणास काही दुरुत्तरे बोलले, तरी त्यांना आपले अहित व्हावे असे कधीच वाटत नसते. रंगभूमीवर दोघे नट एकमेकांना अचकट-विचकट बोलले तरी त्यांच्यामध्ये काही खाजगी द्वेष उत्पन्न होतो काय? नाही. कारण त्यांना ठाऊक असते, की ते भाषण केवळ नाटकी म्हणजे दाखविण्यापुरतेच होते. आई-बापाच्या जाज्वल्य क्रोधाखाली अशीच

प्रीती असते. मनुष्याला आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचीही जरूर लागते म्हणून तो थोडी फार घस सोसूनही त्यांना खुश ठेवण्याचा प्रयत्न करतो, मग त्याने आई-बापास खुश करण्यास किती झटले पाहिजे? आईबापांची अवज्ञा करण्यासारखे पाप नाही व ग्रीक कायद्यानेही त्याला मोठा दंड ठेवला आहे. कारण ज्याने आपल्या आई-बापांचा अपमान केला असेल त्याला कोठलाही मोठा अधिकार देऊ नये, असे त्यात ठरविले आहे. आई-बापांचा अपमान केल्याने मनुष्य अपवित्र होतो व त्याने केलेले यज्ञ किंवा दिलेली अवदाने देवाला मान्य होत नाहीत व जर अधिकाऱ्याने दिलेल्या अवदानांनी देव संतुष्ट झाले नाहीत, तर देशाचे कल्याण होत नाही, हे लक्षात आणूनच कायद्याने असा निर्बंध ठेवला आहे. याप्रमाणे उपदेश करून सॉक्रेटिसने लॅप्रोक्लसला ताळ्यावर आणले.

कौटुंबिक आयुष्यातील दुसरा महत्त्वाचा संबंध म्हणजे भावाभावांचा. सॉक्रेटिसच्या मते या संबंधात मनुष्याने कसे वागावे हे दाखविण्यासाठी झेनोफनने पुढील प्रसंग दाखविला आहे. सॉक्रेटिसच्या परिचयाचे कैरिफन व कैरिक्रेटिस या नावाचे दोन भाऊ होते. यापैकी कैरिफनची व वाचकांची थोडीशी ओळख आहेच. सॉक्रेटिसपेक्षा अधिक शहाणा कोणी आहे काय, म्हणून डेल्फी येथील देवाला ज्याने कौल लावला होता तोच कैरिफन हा असावा. या दोन भावांचे परस्पर वितुष्ट आल्याबद्दल सॉक्रेटिसने ऐकले होते. एके दिवशी सॉक्रेटिस व कैरिक्रेटिस यांची रस्त्यात गाठ पडली व सॉक्रेटिसचे संभाषण सुरू झाले. सॉक्रेटिसच्या म्हणण्याचा मुद्दा असा होता, की जगातील इतर मनुष्यांची संपत्ती आपणास मिळत नाही, म्हणून त्यांचा हेवा किंवा द्वेष करण्याऐवजी आपल्या वाट्यास जी काही दौलत आली असेल तीच समाजाच्या बंधनामुळे शांततेत उपभोगावयास सापडते, यातच आनंद मानतो, मग आपण आपल्या भावाचाच मत्सर का करावा? आपला भाऊच नसता तर त्याची संपत्ती आपणास मिळाली असती, असा नीच विचार आपल्या मनात यावा काय? आपल्याला भाऊ असणे हीच एका तऱ्हेची संपत्ती नाही काय? आपणास कोणी पाठीराखा आहे, या कारणाने आपणास आपल्या संपत्तीचा उपभोग अधिक निर्धास्तपणे घेता येत नाही काय? ज्या मनुष्याला भाऊ आहे त्याचा अपमान करण्यासदेखील लोक सहसा धजत नाहीत.

कैरिफ्रेटिसला हे सर्व कबूल आहे; परंतु जर आपला भाऊ सर्व जगाशी चांगला वागत असून, आपल्याशीच ताठ्याने वाग लागला, तर आपण तरी काय करणार? असा त्याचा प्रश्न आहे. सॉक्रेटिस आपल्या नेहमीच्या पद्धतीला अनुसरून म्हणतो, की असे समजा, की आपणाजवळ एक कुत्रा आहे, शेळयामेंढ्यांची राखण करण्यात तो मोठा पटाईत आहे, आपल्याबरोबर येणाऱ्या धनगराशी तो मोठ्या लडिवाळपणाने नाचतो, बागडतो हेही आपण पाहतो; परंतु आपण स्वतः त्याजजवळून जावयास लागलो तर तो गुरगुरतो, फुसकारतो व जवळही येत नाही, तर आपण अशा कुत्र्याला हुसकून देऊ का? किंवा त्याला आपलीही ओळख पटावी, त्याने आपणाजवळही लडिवाळपणाने यावे, असा प्रयत्न करू? आपल्या

भावाला खुश करण्यासाठी कैरिक्रेटिसला काही मोठी विद्याच अवगत करावयास नको. ही गोष्ट अगदी साधी आहे. ज्या मित्राने हव्यकव्यप्रसंगी आपणास जेवावयास बोलवावे अशी आपली इच्छा असते, त्याला आपण आधी आपल्या घरी तशा प्रसंगी बोलवावयाचा प्रघात पाडतो. सारांश, दुसऱ्याने आपणास जसे वागवावे अशी आपली इच्छा असेल, त्याप्रमाणे आपण त्याच्याशी वर्तणूक ठेवली पाहिजे. आपणच आपल्या भावाशी मोठ्या स्नेहाने वागलो, तर तो तरी ताठ्याने कसा वागेल? कैरिक्रेटिसला आपण सुरुवात करण्यात संकोच वाटत असला तरी तो त्याने टाकून दिला पाहिजे. पशुजातीमध्येदेखील एका रक्ताचे प्राणी अधिक प्रेमाने वागतात, मग मनुष्यांनी त्याजपेक्षाही अवनत व्हावे काय? ज्यांचा उपयोग वास्तविक परस्पर साहाय्य हा आहे, त्यांचा एकमेकांना आडकाठी करण्यात दुरुपयोग व्हावा काय? एका पायाने दुसऱ्या पायास आडवावे, हे दोघांच्याही फायद्याचे नाही. परमेश्वराने आपणास जसे दोन डोळे, दोन हात, दोन पाय इत्यादिक युगानुरूप अवयव दिल्यामुळे आपला मोठा कार्यभाग होतो व त्या त्या अवयवांकडून एकट्याने जे काम झाले नसते त्याच्याहून कितीतरी पट काम होते, त्याप्रमाणेच एका भावास दुसऱ्या भावाचे साह्य झाल्यास घडेल. फार काय; पण या अवयवांच्या जोडीपेक्षाही भावाभावांची जोडी अधिक कार्यक्षम होईल. कारण दोन डोळ्यांना, दोन हातांना, दोन पायांना परस्परांपासून भिन्नस्थळी राहूनही सहकारिता साधता येत नाही; पण स्नेहपाशांनी बद्ध झालेल्या भावांमध्ये कितीही अंतर असले तरी त्यांच्या सहकारितेच्या तो आड येऊ शकत नाही.

आपल्या स्वतःच्या कुटुंबापेक्षा अधिक विस्तृत कार्यक्षेत्रात उपयोगी पडणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मैत्री किंवा स्नेह हा होय. या विषयासंबंधीचे आपले विचार सॉक्रेटिसने निरनिराळ्या प्रसंगी व्यक्त केले आहेत. ज्याप्रमाणे पारमेनाईडस् व लॅचेस या संवादात अनुक्रमे नियमितपणा व धैर्य यांच्या स्वरूपाविषयी प्रश्न सुरू होऊन अखेर काही एक निर्णय न होताही त्या त्या गुणांविषयी सूचक विचार मात्र प्रदर्शित करण्यात आले आहेत, त्याचप्रमाणे लिसिस (Lysis) या संवादात मैत्री किंवा स्नेह म्हणजे काय, या प्रश्नाचा खल होऊन अनिश्चयातच त्याचा अंत होत आहे. मैत्रीविषयी काही सूचक कल्पना मात्र यातही आहेत. फीड्स व सिंपोसियम् या संवादात पुनः हाच विषय किंचित निराळ्या स्वरूपाने पुढे आला आहे; परंतु या संवादातील विचारात सॉक्रेटिसपेक्षा प्लेटोची मतेच अधिक दिग्दर्शित झाली आहेत, असे साधारणत: वाटते व म्हणून या ठिकाणी वरील संवादावर फारसा आधार ठेवता येत नाही. झेनोफनच्या पुस्तकात या विषयांवर त्याने तीन स्फुट लेख लिहिले आहेत, त्यातील विचार प्रस्तुत विवेचनाला विशेष आधारभूत आहे.

पायथागोरसच्या पंथाची हकीगत लिहिताना त्यातील पुरुषांच्या मतैक्यामुळे किंवा साधारणतः बौद्धिक परिश्रमांच्या साम्यामुळे कसे दृढ स्नेहसंबंध जुळून येत व पायथागोरसचा पंथ दिवसेंदिवस आपापल्यात किती दृढबद्ध व इतर समाजापासून किती अलग होई हे

दाखविलेच आहे. सॉक्रेटिसच्या भोवतीही अनुयायांची नेहमी गर्दी असे व त्याजबरोबर संभाषण करताना सॉक्रेटिस फारच प्रेमळपणाने वागे. सॉक्रेटिस आपल्या अनुयायांना कधीही आपले शिष्य म्हणवीत नसे, तर तो त्यांच्या साह्याने सत्यशोधन करण्याचा प्रयत्न करीत आहे, असे म्हणे व त्याप्रमाणे त्याची वागणूकही असे. त्याचप्रमाणे एखाद्या महंताच्या आठ्यतेला शोभण्यासारखे प्रवचन करण्याचा त्याचा प्रघात नसून बरोबरीची मित्रमंडळी एकमेकांशी मोकळ्या मनाने गप्पागोष्टी सांगतात त्याप्रमाणे केवळ संभाषण करीत असता असताच तत्त्वविषयक प्रश्नांची चर्चा होई. ही विशेष रीत परस्परांच्या स्नेहपोषणाला विशेषच अनुकूल असे. सॉक्रेटिस हा विशेष प्रेमळ असल्यामुळे त्याला ही पद्धती पसंत पडली किंवा त्या पद्धतीतील इतर गुणांवरूनच ती पसंत पडून तिचा आनुषंगिक परिणाम या स्नेहप्रवृत्तीत झाला हे सांगणे मोठे कठीण आहे. सॉक्रेटिसच्या वर्तनात तत्त्ववेत्ता व मित्र यांचे बेमालूम मिश्रण झाले आहे एवढे खरे. कारण अतिशय उच्च अशा तत्त्वांचा अभ्यास करताना त्याला आपल्या मित्रांची संगती सुटत नसे व स्नेहयुक्त संभाषणात तत्त्वविचारांवाचून दुसरा विचार होत नसे.*

ज्याची नैसर्गिक स्नेहप्रवृत्तीही इतकी जबरदस्त, त्याने त्या गुणांबद्दल मोठ्या आदराने बोलणे अगदीच साहजिक आणि त्यातही त्या गुणाची सहजसुंदरता त्यातच मिळाली. प्रेमळ मित्र म्हणजे एक अपूर्व ठेवा आहे व त्यासाठी आपण वाटेल ती झीज सोसण्यास तयार असले पाहिजे; पण इतके असूनही कित्येक लोक आपल्या मित्राची पर्वा करीत नाहीत, हे खरोखरच आश्चर्य नव्हे काय? लोक आपल्या गुलामांनाही अधिक चांगल्या रीतीने वागवतात व प्रत्यक्ष मित्रांविषयी उदासीनता पत्करतात, हे केवढे अज्ञान! त्यांच्या जमिनी पुष्कळ असल्या तरी त्यांची त्यांना तपशीलवार आठवण राहते; पण त्यांचे मित्र हातांबोटांवर मोजण्याइतकेच असूनदेखील त्यांना त्यांची विस्मृती होते, याला काय म्हणावे? कवी म्हणतात त्याप्रमाणे परमेश्वरच योग्य मित्रांची गाठ घालीत असला पाहिजे. कारण मित्रप्रेमामध्ये असेच काही दैविक तेज आहे; परंतु मनुष्य मात्र आपल्या अज्ञानाने त्याची ओळख धरीत नाही.

मित्रस्नेहाचा महिमा वर्णन करून चांगला मित्र कसा असावा याचेही त्याने विवरण केले आहे. मित्रस्नेहाचा उद्देश म्हणजे उभयताचे नैतिक हित, हाच असल्यामुळे त्या स्नेहाचे साधन

---

* The question can hardly be asked, which came first with him, which afterwards; whether friendship-needs made the philosophy of Socrates take the form of continuous dialogue or the need of common inquiry drew him towards all who felt the same want. It is his peculiarity and this it is which makes him the philosophic lover drawn by Plato-that he could neither in research dispense with association with others nor in friendly intercourse dispense with research. Zeller : Socrates and the Socratic schools.

सद्गुणी वर्तणूक, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची इच्छा व त्याजविषयी आदर, हे आहे. जर आपणास आपले हित साधावयाचे आहे, तर मैत्री संपादन करावयाची ती उत्तम माणसाचीच संपादिली पाहिजे आणि त्याला उपाय म्हणजे आपण त्याच्यासारखे होण्याचा प्रयत्न करावयाचा. 'समानशीलव्यसनेषु सख्यं' हे सुभाषित सुप्रसिद्धच आहे. पेरिक्लीससारख्या पुरुषाला लोकांचे प्रेम संपादन करता आले ते कशामुळे? लोककल्याणाची कामे करण्यास, लोकसेवेचे कष्ट उचलण्यास, आपण अगदी एका पायावर तयार आहोत, हे त्याने सिद्ध करून दाखविले व जो मनुष्य आपल्या हितासाठी झटत आहे असे आपल्या प्रत्ययास येते, तो मनुष्य आपणास सहजच प्रिय होतो. त्याचप्रमाणे दुसऱ्याची मैत्री संपादन करताना आपण त्याच्याजवळ नेहमी आदरपूर्वक भाषण करावे. सायरिन्स नावाच्या जलदेवतांना युलाइसिसला थांबवावयाचे होते, त्यावेळी त्यांनी जे भाषण केले म्हणून होमर कवी म्हणतो, ते असे : देवता म्हणाल्या, 'Oh stay! oh pride of Greece, Ulysses, stay' आपण दुसऱ्याशी आदराने बोललो म्हणजे त्याला आपणाविषयी संशय राहत नाही व आपण त्याची फजिती उडवू इच्छित नाही अशी खात्री झाल्यामुळे तोही आपल्याशी मोकळेपणाने वागतो. खुद्द सॉक्रेटिसच्या संभाषणात दुसऱ्यास खुश करून त्याला आपल्या मताकडे हळूहळू वळविल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत; परंतु दुसऱ्याशी आदराने वागावयाचे याचा अर्थ त्याच्या अंगी नसते गुण लादावयाचे असे नाही. आपल्या मित्राचीदेखील अवास्तव स्तुती करणे अगदी अयोग्य आहे, असेच सॉक्रेटिसचे म्हणणे आहे. तो क्रिटोब्यूलसला म्हणतो की, मला तुझी व दुसऱ्या कोणाची मैत्री जोडावयाची असली तरी मी तुझ्या अंगी नसलेले गुण तुजमध्ये आहेत असे कधीही म्हणणारा नाही. समजा की, क्रिटोब्यूलसच्या अंगी नाव चालविण्याचे कसब मुळीच नाही. तथापि, ते आहे अशी सॉक्रेटिसने त्याची अवास्तव स्तुती केली व ती ऐकून एखाद्याने खरोखरच क्रिटोब्यूलसच्या ताब्यात आपल्या जहाजाचे सुकाणू दिले, तर केवढा अनर्थ गुजरेल? राजकारणात तर याजपेक्षाही मोठा अनर्थ होईल. सारांश, दुसऱ्याचे योग्य गुण ओळखून त्याचे कौतुक करावे व दुर्गुणाबद्दल कानउघाडणी करावयाची तीही मोठ्या खुबीने करावी, हाच सॉक्रेटिसच्या म्हणण्याचा मथितार्थ.

चांगला मित्र म्हणजे तोच, की जो केवळ स्वार्थपरायण न होता आपल्या मित्राचे हित पाहतो, प्रसंग पडल्यास आपल्या मालमत्तेकडेही पाहत नाही व आपल्या मित्राच्या अभ्युदयामध्येच आनंद मानतो. तत्त्वज्ञानाची जशी जशी वाढ झाली त्या त्याप्रमाणे मैत्रीसारख्या प्रश्नांना फार गौण स्थान आले; परंतु सॉक्रेटिसच्या काळी हा विषय फार महत्त्वाचा समजला जात असे. त्या काळी तरुण व सुंदर मुलांवर प्रीती करण्याची एक टूमच निघाली होती. सॉक्रेटिसला या पद्धतीतील काही दोषांचा फारच तिटकारा असे; परंतु एकंदरीत त्याचे वर्तन व मत त्याला अनुकूलच होते.

सॉक्रेटिसच्या स्नेहसंबंधीच्या विवेचनात हा एक मोठा दोष आहे, की ते हितानहिताच्या अगदी हिशोबावर उभारल्यामुळे अगदीच बाजारी प्रेमासारखे भासते. सुखदु:खाच्या

हितानहिताच्या, फायद्या-तोट्याच्या केवळ बाह्य उपाधीवरच प्रेम अवलंबून नाही, असा अनुभव काय कमी प्रसंगी येतो? भवभूतीने म्हटल्याप्रमाणे 'व्यतिषजति पदार्थानान्तर:कोपि हेतुः। न खलू बहिरूपाधी प्रीतयः संश्रयन्ते' हेच खरे नव्हे काय? परस्पर विरुद्ध पक्षाच्या मताचे, आचारविचाराचे पुरुषही कित्येक प्रसंगी अनिवार्य व अलक्ष्य अशा बंधनांनी एकत्र ओढले जातात, यातील इंगित काय? इत्यादी विचार मनामध्ये उत्पन्न झाल्यावाचून राहत नाहीत. मनुष्यांच्या मनामध्ये जे साहजिक प्रेम दिसून येते, त्याला उपयुक्ततेच्या, शीलसाम्याच्या किंवा आनुषंगिक लाभाच्या योगाने पुष्कळदा मदत होते, ही गोष्ट खरी; परंतु हीच काही स्नेहसंबंधाची पूर्ण उपपत्ती नव्हे. त्याचप्रमाणे मैत्री असावयाची ती भिन्न लिंगीयांमध्ये विवाहविचारांशिवाय कोठपर्यंत जाऊ शकेल? स्नेहसंबंधाचे मूळ स्वारस्य लुप्त झाले तरी तो तसाच राखावा, की तोडावा व तोडावयाचा असल्यास कितपत तोडावा? स्नेहसंबंध कायम राहणारा आहे की भंगुर आहे? तो सारख्यातच जुळतो की परस्पर विरुद्ध भूमिकाही एकत्र करतो इत्यादी प्रश्नांचा सॉक्रेटिसने मुळीच ऊहापोह केला नाही. तत्त्वज्ञानाच्या परिपक्व स्थितीमध्ये या विषयाला गौण भाग आला तरी सामाजिकदृष्ट्या वरील प्रश्नांना बरेच महत्त्व असल्यामुळे त्याजवरील सॉक्रेटिसाचे विचार फार बोधप्रद झाले असते.

समाजात स्त्रियांचा दर्जा काय असावा, याबद्दलचे सॉक्रेटिसचे विचार त्याच्या वेळी प्रचलित असलेल्या मतांशी ताडून पाहता प्रागतिकच वाटतात; परंतु सध्याच्या सुधारणामय युगात ते अनुदार आहेत, असेही कोणास वाटण्याचा संभव आहे. स्त्रियांना बौद्धिक किंवा शारीरिक शिक्षण देऊ नये, असा काही त्याचा आग्रह नव्हता. उलट ते देण्याविषयी तो फार अनुकूल होता व स्त्रियांची बुद्धिमत्ता अगदीच अल्प नसते व प्रसंगविशेषी त्यांजपासूनही शिकण्यासारखे पुष्कळ असते, हे त्याने आपण स्वत: अस्पॅशिया, डायोंटिमा वगैरे स्त्रियांजवळही संवाद करून दाखविले; परंतु एकंदरीत स्त्रियांची विशेष कामगिरी म्हणजे अपत्योत्पत्ती व अपत्यसंगोपन हीच समजली पाहिजे, असे त्याचे म्हणणे आहे. यावरूनच झेलरने असे उद्गार काढले आहेत, की विवाहाविषयी बोलताना सॉक्रेटिस हा ॲस्पॅशियाचा मित्र म्हणून भाषण न करता झँटिपीचा नवरा या नात्यानेच बोलत आहे असे वाटते;* परंतु एकंदर स्त्रीसमाजाविषयी विचार करताना सॉक्रेटिसने केवळ पूर्वग्रहावरूनच मत दिले असेल हे संभवनीय दिसत नाही. झँटिपीची गोष्ट अगदी अपवाद म्हणून बाजूस ठेवूनही सॉक्रेटिसचे वरीलप्रमाणे मत होणे अशक्य नाही. आपल्या देशामध्येही हेच मत थोड्या फार भेदांनी प्रचलित होते व अद्यापही आहे. या मताविषयी औचित्यविचार करण्याचे हे स्थळ नसल्यामुळे, त्याविषयी विशेष चर्चा न करता आपण सॉक्रेटिसच्या दुसऱ्या मताकडे वळू.

---

* Ce still speaks of married life in terms more in keeping with the husband of Xanthippe, than with the friend of Aspcia. (Zeller : Socrates and the Socratic Schools.)

आपले कुटुंब किंवा मित्रमंडळ याजपेक्षाही समाज ही अधिक व्यापक संस्था असल्यामुळे, त्याजविषयीचे विचारही अधिक महत्त्वाचे आहेत व समाजाचे शासन कोणत्या रीतीने व्हावे हा त्यातील मुख्य प्रश्न आहे. जर मनुष्याला संघटित समाजामध्ये राहावयाचे असेल, तर त्याला शासित किंवा शास्ता या दोन वर्गांपैकी कोठल्यातरी एका वर्गात राहिलेच पाहिजे. यापैकी शासितवर्गातील लोकांचे पहिले कर्तव्य म्हणजे आपल्या संस्थानातील कायदे पाळणे हे आहे. संस्थानाचे कायदे पाळण्याचे इतके महत्त्व आहे की, न्याय्य काय, याचा विचार सुरू असताना सॉक्रेटिसने कायद्यास धरून असलेले वर्तन न्याय्य असा निर्णय दिला असल्याचे मागील एका प्रकरणात सांगितले आहे. स्वतः सॉक्रेटिसकडे कायद्याप्रमाणे जी जी कामे आली, ती ती त्याने चोख रीतीने बजावली व अखेर त्याच्या जिवावर बेतली असताही केवळ कायदा पाळण्याच्या हेतूने तुरुंगातून पळून जाण्याचे त्याने नाकारले. या ठिकाणी एवढे ध्यानात ठेवले पाहिजे, की स्वतः सॉक्रेटिसने कायदा पाळल्याची जितकी महत्त्वाची उदाहरणे आहेत, तितकीच ती मोडल्याचीही दाखविता येतील. आपल्या देशातील अधिकारी, आपण उपदेश करणे बंद ठेवावे म्हणून हुकूम करीत असता, तो आपण मान्य करणार नाही, असे त्याने त्यांच्या तोंडावर सांगितले व अशा अटीवर आपले जीवितसंरक्षण करण्यास आपण तयार नसल्याचे कळविले. या परस्पर विरुद्ध दिसणाऱ्या आचरणातील एक तत्त्व हेच, की ज्या ठिकाणी आपली सदसद्विवेकबुद्धी अगर ईश्वरी प्रेरणा आपणास अमुक एक कायदा अयोग्य आहे, असे सांगेल, ज्या ठिकाणी मानवी कायदा हा दैवी कायद्याचा विरोधी होईल, त्या ठिकाणी मानवी कायदा सोडून दैवी कायद्यासाठी मनुष्याने वाटेल ती झीज सोसण्यास तयार झाले पाहिजे; पण अशा प्रसंगीही केवळ शरीरसौख्याकडे पाहून मानवी कायदा टाळण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा धैर्याने त्याला तोंड दिले पाहिजे. अशा रीतीने अथेन्सपेक्षा कोणी अधिक श्रेष्ठ असेल तर तो देवच, बाकी सर्वांपेक्षा अथेन्स व त्याचे कायदे हाच काय तो मुख्य आधार.

ज्यांकडे नेहमी 'शासित' या वर्गातच राहण्याचे काम आले आहे त्यांना हा नियम झाला. परंतु शासनासंबंधीही आपणास तसाच विचार केला पाहिजे. पहिल्या प्रथम लोकांचा शास्ता होण्याचा अधिकार कोणाला आहे, याचा निर्णय झाला पाहिजे. सर्व सद्गुणांचे मूळ ज्याप्रमाणे ज्ञानात आहे. त्याप्रमाणे राजकारणातील कर्तबगारीचे मूळही ज्ञानात आहे. ज्या मनुष्याला खरोखर राजकीय विषयांचे खरे ज्ञान आहे, तोच सत्ता चालविण्यास योग्य आहे. त्यावेळी अथेन्समध्ये लोकसत्तात्मक राजपद्धती होती व लोकांनी निवडून दिलेल्या अधिकाऱ्यांकडे सर्व सत्ता असे; परंतु सॉक्रेटिसच्या मते ही पद्धती अगदी चुकलेली आहे. लोकांनी एखाद्या मनुष्याला आपण होऊन निवडून दिले किंवा त्याने लाचलुचपत देऊन आपणास निवडून घेतले, तर त्याला राजकारणातील ज्ञान नसल्यामुळे त्याची निवडणूक ही देशाच्या फायद्याची न होता उलट विघातक मात्र होणार. जर एखाद्या नावेला कर्णधार

पाहिजे असेल किंवा एखाद्या रोग्याला औषध योजना करावयास वैद्य हवा असेल, तर आपण ते काम करण्यास कोणाची बहुमताने निवड करतो? उलटपक्षी ज्याला नौकानयन किंवा औषधी यांचे ज्ञान असेल तोच मनुष्य अशा वेळी पुढे होऊन त्याचे म्हणणे इतरांनी मान्य करावे हाच योग्य मार्ग नाही काय? मग जी गोष्ट नौकानयनाची किंवा रोगचिकित्सेची, तीच राजकारणाचीही आहे. अमुक एक मनुष्य अधिकारावर निवडून आला, एवढ्यावरच काही त्याची योग्यता ठरत नाही.

सॉक्रेटिसचे हे सर्व म्हणणे ठीक आहे; परंतु पुढे प्रश्न असा येतो, की सॉक्रेटिस ज्या माणसांच्या हाती सत्ता असावी असे म्हणतो, त्या माणसांच्याच हातात ती यावी अशाबद्दल त्याची काय योजना होती? सॉक्रेटिसने अशी काहीच योजना सुचविली नसल्यामुळे त्याच्या वरील मतात सत्यांश असूनही अतिशय गैरसमज मात्र होतो. सॉक्रेटिस हा एक बौद्धिक अभिजनसत्तेचा (Intellectual Aristocracy) पुरस्कर्ता आहे व या बुद्धिमत्सत्तेची स्थापना इतर विशिष्ट पक्षाच्या सत्तेप्रमाणे केवळ जुलूम जबरदस्तीवरच होणार असा साहजिक समज होतो. अथेन्समध्ये तीस अंमलदारांच्या सत्तेसारखी जी सत्ता काही प्रसंगी निर्माण झाली होती, त्याप्रमाणेच ही एक निराळ्या नावाची, पण सारख्याच अनर्थाची एक शासन पद्धती आहे, असा लोकांचा समज होणे अपरिहार्य आहे. सॉक्रेटिसच्या विरुद्ध जी फिर्याद झाली तिच्या मुळाशी असा काहीतरी गैरसमजच असावा, असे अनुमान करण्यास काहीही हरकत नाही. सॉक्रेटिस हा त्याच्या दृष्टीने अनधिकारी पुरुषांना राजकारणात न शिरण्याविषयी उपदेश करी व उलट त्याच्या मित्रांपैकी कित्येकांना त्याच राजकारणात शिरण्याबद्दल आग्रहही करी. यावरून लोकांचा सहजच असा समज होई, की सॉक्रेटिसला सर्व सत्ता एका विवक्षित पक्षाच्याच हाती असावी, असे वाटते व त्याच दृष्टीने त्याच्या अनेक खटपटी सुरू आहेत...

बुद्धिविशिष्ट पुरुषांकडे श्रेष्ठत्व देण्याविषयी किंवा ते बुद्धिविशिष्ट पुरुषांनी आपणाकडे घेण्याविषयी सोफिस्टांचाही कटाक्ष होता; पण या ठिकाणीही सॉक्रेटिस व सोफिस्ट यांच्या विचारसरणीत फार अंतर आहे. त्याच्या मते राजकीय सत्तेचे ध्येय व्यक्तिविषयक उत्कर्ष नसून समाजहित हे आहे, तद्रूप शिक्षण म्हणजे कौशल्य नसून सत्यज्ञान आहे आणि आपल्या ध्येयसिद्धीचे साधन मोहक भाषण नसून सत्यज्ञानाची मीमांसा हे आहे. सॉक्रेटिसला ज्ञान हवे ते राज्य सुधारण्याचे; परंतु सोफिस्टांचा सर्व डोळा त्याच्या अधिकार सूत्रांवर!*

---

* For him, the aim of politics was not the power of the individual, but the well-being of the community, the object of training was not to acquire personal dexterity, but to attain truth; the means of culture was not the art of persuation but the science of what is. Socrates aimed at a knowledge by means of which the state might be reformed, the Sophists at one by which it might be governed. Zeller : Socrates and the Socratic Schools.

सॉक्रेटिसच्या मतांमध्ये सृष्टिविषयक प्रश्नांच्या ऊहापोहाला विशेष महत्त्व नाही. त्याचा मुख्य भर नैतिक प्रश्नांवरच असे, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे; परंतु भौतिक सृष्टिविषयीचा सॉक्रेटिसने एका विशिष्ट दृष्टीने मात्र विचार केलेला आढळतो. प्रथम पुष्पातील माध्यमिक पंथाचा ॲनॅक्झॅगोरॅस, याजविषयी लिहिताना त्याने बुद्धिमत्कर्तृत्ववादाचा (किंवा teleology चा) पाया घातला म्हणून म्हटले आहे; परंतु ॲनॅक्झॅगोरॅसच्या मतामध्ये सृष्टिविषयक विविध विचारांची इतकी खिचडी झाली आहे, की त्यांमध्ये याच मताला प्रामुख्य आलेले दिसत नाही व या कारणामुळेच प्रस्तुत मताच्या जनकत्वाचा मान सॉक्रेटिसकडे देण्यात येतो. प्रत्येक वस्तूविषयी विचार करताना त्या वस्तूचा मनुष्याला उपयोग काय, या प्रश्नाची चर्चा करण्याचा सॉक्रेटिसचा अभ्यासच असल्यामुळे सृष्टीविषयी विचार करतानाही तिचा मनुष्याच्या हिताशी संबंध काय, याच प्रश्नाचा सॉक्रेटिसने प्रमुखत्वाने विचार केला आहे व तिची अत्यंत उपयुक्तता दाखवून, ज्याअर्थी मनुष्य कोठचेही उपयुक्त काम बुद्धीशिवाय करू शकत नाही, त्याअर्थी हा सृष्टिरूप उपयुक्त व्यापारही कोणातरी बुद्धिविशिष्ट पुरुषाकडूनच होत असला पाहिजे, असे अनुमान काढले आहे. सृष्टीची सर्व रचना केवळ मनुष्याच्या हिताकडे नजर देऊन केली आहे असे दाखविण्यासाठी सॉक्रेटिसने पुष्कळ गोष्टी पुढे आणल्या आहेत. मनुष्याला हवा, पाणी, उजेड, उष्णता यांची किती जरूरी आहे व हे पाहून त्यांचा विपुल संग्रह मनुष्याला अगदी फुकट देण्यात आला आहे. मनुष्याला कदाचित हा दिवसाचा प्रकाश पुरेसा होणार नाही, त्याला रात्रीही थोडाफार तरी उजेड असावा म्हणून चंद्र व तारे यांची किती उत्कृष्ट सोय करण्यात आली आहे. आपले पोषणच नव्हे तर आपली अगदी चैन चालावी म्हणून पृथ्वीमध्ये किती विविध पदार्थांना उत्पन्न करण्याची शक्ती ठेवली आहे? ही नाना तहेची फळे व धान्ये पिकावी म्हणून ऋतूंची रचना तरी किती खुबीने साधली आहे? हिवाळ्यात फुलणारी फुले व पिकणारी फळे आपणास मिळावी म्हणून सूर्य दक्षिणेकडे झुकत जातो; पण जर तो अगदीच दक्षिणेच्या टोकाला निघून जाईल तर उत्तर प्रदेशातील आपणासारखे लोक थंडीने मरून जातील, म्हणून तो पुन: उत्तरेकडे परत फिरतो व वसंतादिक ऋतूंच्या फलपुष्पांनी आपणास सुखी केल्यावर, आपणास त्याच्या उष्णतेची बाधा होऊ नये म्हणून पुनः दक्षिणेकडे वळतो. केवळ जमिनीपासून उत्पन्न होणारे पदार्थ मनुष्याच्या सुखाला कमी पडतील असे वाटून इतर प्राण्यांचीदेखील मनुष्याच्या सुखासाठी योजना करण्यात आली आहे. गायी, म्हशी इत्यादी प्राण्यांपासून त्याला दूध मिळते व एका दुधापासूनच कितीतरी पदार्थ बनतात. घोड्यासारखा प्राणी मनुष्याला स्वार होऊन इकडे तिकडे फिरावयाला, गाड्या ओढण्याला व लढाईलाही उपयोगी पडतो. अशी यादीच देऊ लागले तर कोठवर तरी लांबेल.

या जगात पुष्कळ सुखकारक वस्तू असल्या; परंतु त्यांचा उपभोग घेण्यास मनुष्याला जर साधनच नसते तर काय फायदा? पण मनुष्याला उत्कृष्ट व उपभोगक्षम अशी इंद्रिये

कशी देण्यात आली आहेत व त्याची शरीररचना तरी किती शिताफीने केली आहे? जगात सुखदर्शक अशा अनंत वस्तू असूनही आपणास त्या पाहण्यास डोळेच नसते तर त्यांचा काय उपयोग होता? आणि या डोळ्यांची रचना तरी किती कौशल्याची आहे? हे इंद्रिय फार नाजूक आहे व त्याचे नीट जतन व्हावे म्हणून केवढी व्यवस्था! त्याचे रक्षण व्हावे म्हणून त्याच्यापुढे पापण्यांचे जाड पडदे लावले व त्याच्या व्यापाराला त्याने प्रतिबंध होऊ नये म्हणून डोळा उपयोगात यावयाचा असेल त्यावेळीच त्या वर जाव्या व झोपेच्या वेळी किंवा डोळ्यास विश्रांती हवी असेल त्यावेळी त्या मिटाव्या, अशी योजना झाली. डोळ्यांत धूळ जाऊन तो बिघडू नये म्हणून त्याला पापण्यांच्या केसांची जाळी लावली व कपाळावरील घाम एकदम डोळ्यांत शिरेल या भीतीने भुवईचा सुंदर बांध बांधला. सुखदर्शन वस्तूंच्या दर्शनलाभासाठी जशी डोळ्यांची रचना तशीच रसोपभोगासाठी जिव्हेचीही तरतूद करण्यात आली. श्रवणसुखासाठी कान केले आणि त्यातही किती सुबक रचना केली. सुगंध घेण्यास घ्राणेंद्रिय सज्ज करून ठेवली. ही व अशीच सर्व अवयवांचीही गोष्ट आहे पाहा. त्यातही या अवयवांची ठेवणही किती कुशलतेची आहे. आपण जे खाणार ते आपल्या डोळ्यांना दिसावे व नाकाला त्याचा वास यावा व अशा रीतीने आपणास त्या अन्नातील गुणदोष स्पष्टपणे दिसून त्याची ग्राह्याग्राह्यता ठरावी व ते अन्न अग्राह्य असल्यास वेळीच त्याचा प्रतिकार व्हावा म्हणूनच तोंडाची जागा नाक व डोळे यांच्या खाली नेमण्यात आली. पशूना दोन पायांवर चालता येत नाही; पण मनुष्यांना येते व त्यामुळे त्यांचा केवढा तरी फायदा होतो. या रीतीने त्यांची उंची वाढल्यामुळे त्यांना दूरच्या वस्तू दिसतात, आपले संरक्षण अधिक चांगले करता येते व याच योजनेमुळे पुढील दोन पायांऐवजी दोन हात झाल्यामुळे केवढी तरी अचाट कामे सहज सिद्ध होतात. इतकेही असून जर मनुष्याला बुद्धीच नसती तर काय उपयोग होणार होता? पण ही उणीव दूर करावी म्हणून त्यानेच मनुष्याला बुद्धिसंपन्न केले, त्याच्यामध्ये अपत्यप्रेमासारखे चिरस्थायी कोमल मनोविकार उत्पन्न केले आणि त्यांना भाषा उत्पन्न करून ती वापरण्याची कल्पकता दिली. असेच वर्णन करून सांगू लागल्यास त्याचा अंतच लागणार नाही. इतके झाल्यावरही मनुष्याच्या सुखयोजनेत काही कमतरता राहील तर, त्याला भर म्हणून पुढे काय होणार, हे देवतासंचाराने आधीच कळावयाचीही सोय झाली.

या जगतातील कुशलतेची व उपयुक्ततेची ही सर्व व्यवस्था पाहून दोनच गोष्टी सिद्ध होतात. एकतर या जगताचा कोणीतरी मोठा बुद्धिमान जनक व पालक असला पाहिजे व दुसरी गोष्ट अशी की, या जगत्कर्त्याचे मनुष्यप्राण्यांवर अतिशय प्रेम असले पाहिजे. या सर्व मतातील सॉक्रेटिसची विचारसरणी शास्त्रशुद्ध तर्कावर रचलेली नाही ही गोष्ट खरी; परंतु ज्याप्रमाणे त्याच्या नीतिमीमांसेत काही दोष असूनही त्याला त्या शास्त्राचा पाया घालण्याचा मोठा मान मिळाला, त्याप्रमाणेच या बुद्धिकर्तृकवादांतही त्याचे नाव अग्रस्थानी

पडले आहे व तत्त्वज्ञानाच्या उत्कर्षानंतरही या मतामध्ये कितीतरी ग्राह्यांश भरलेला आहे. ज्या मताने सॉक्रेटिसपासून मिलपर्यंत सरासरी दोन हजार वर्षेपर्यंत लोकांच्या मनावर परिणाम केला, ते मत महत्त्वाचेच असले पाहिजे हे कोणासही सकृद्दर्शनीच समजण्यासारखे आहे. केवळ तर्कास प्रतितर्क व उदाहरणास प्रत्युदाहरण दाखवू लागल्यास सॉक्रेटिसच्या या मताशी पुष्कळच वितंडवाद घालता येईल. उदाहरणार्थ एखादा वादी असे म्हणू शकेल, की जर आकाशातील तारे बुद्धिमत्कर्तृक असते तर त्यांची अशी बेडौल मांडणी न होता काहीतरी विवक्षित आकारात किंवा नक्षीतच त्यांची ठेवण व्हावयास पाहिजे होती व मनुष्यप्राण्याच्या सुखाकरिताच सर्व गोष्टी व्हावयाच्या असल्या तर त्याला अतिशय त्रास देणारे व प्रसंगविशेषी प्राणांतक होणारे प्राणीच जन्मास आले नसते. अशाच रीतीने दुसऱ्या बाजूकडेही तर्क व उदाहरणे यांचा संग्रह होईल. या दोन्ही पक्षातील सबल निर्बल कोणता हे ठरविण्याचे प्रकृतस्थळ नव्हे. सध्या आपणास सॉक्रेटिसच्या मतांचीच विशेष ओळख करून घ्यावयाची आहे. खुद्द सॉक्रेटिसला हे जगत् सुव्यवस्थित व सुखावह आहे असेच वाटले व त्यावरून त्याने त्याचे कर्तृत्व बुद्धियुक्त व परम दयाळू अशा परमेश्वराकडेच आहे असे ठरविले. या मतातील दुसरा मोठा दोष म्हणजे मनुष्याला सर्व सृष्टीच्या मध्य स्थानी मानणे हा आहे. आपली पृथ्वी स्थिर असून तिच्या भोवती शुक्रादिक ग्रह, सूर्यादि ज्योतिर्गण व अनंत तारकापुंज नियमितपणे प्रदक्षिणा घालीत जात आहेत, हे ज्योतिषशास्त्रातील प्राचीन मत ज्याप्रमाणे सर्व सृष्टीत केवळ उपेक्षा ठरणाऱ्या एकाच गोलाला अवास्तव महत्त्व देऊन पुढे मांडण्यात आले, त्याचप्रमाणे सॉक्रेटिसच्या या मतात अनंत सृष्टीमध्ये एखाद्या क्षुद्र कीटकाप्रमाणे वावरणाऱ्या मनुष्यप्राण्याला अवास्तव महत्त्व देऊन सर्व सृष्टी जणू काय त्याचीच मनधरणी करावयासाठी उत्पन्न झाली आहे असे दाखविण्यात आले आहे. जगतातील मनुष्यांची आजची स्थिती पाहिली तर सर्व जग केवळ त्याच्या सुखाकरिता आहे हे म्हणणे आत्मप्रत्ययाच्या विरुद्ध आहे. सृष्टीत मनुष्य इतका क्षुद्र भासत असून त्याला असामान्य महत्त्व आहे. कारण त्याजमध्ये अत्युच्च शक्ती बीजरूपाने वास करीत असून तिचा विकास झाल्यास तो जगताच्या चालकाशी एकरूप होतो, 'पशुकी होत पन्हय्या, नरका कच्छु नहि होय। नर करनी करे तो नरका नारायण होय,' या मतात व सॉक्रेटिसच्या विचारसरणीत फार अंतर आहे. तथापि, हा प्रश्न सध्या बाजूला सारून आपण सॉक्रेटिसच्या मताकडेच वळू.

हे जगत् इतके सुव्यवस्थित आहे, त्याअर्थी त्याचा कर्ता ईश्वर हा बुद्धिगुणोपेत असला पाहिजे व ही सष्टिव्यवस्था मनष्याला इतकी सखकर आहे त्याअर्थी तो मोठा दयाळू असला पाहिजे. एवढे अनुमान झाल्यावर पुढे असा प्रश्न येतो की, हा देव एकच आहे की असे अनेक देव असून ज्याप्रमाणे पुष्कळ बुद्धिमान लोक एकत्र होऊन एखादे उपयुक्त कार्य करतात, त्याप्रमाणे त्यांनी ही सृष्टी उत्पन्न केली आहे? सॉक्रेटिस हा भिन्न भिन्न प्रसंगी

एकेश्वर व अनेकेश्वर मतांना अनुकूल अशी भाषा वापरतो. ज्या ज्या प्रसंगी त्याने अनेक देवांचा उल्लेख केला आहे, त्या त्या प्रसंगी त्याच्या मनात प्रचलित अनेक देवांविषयी बोलावयाचे असावे असे वाटते. आपल्या देशांमध्ये ज्याप्रमाणे अगदी वेदकालांपासून आजपर्यंत इंद्रचंद्रवरुणादिक अनेक देवता रूढ आहेत, त्याप्रमाणेच सॉक्रेटिसच्या काळी अनेक देवता रूढ असून त्यांची पूजाअर्चा होत असे. सॉक्रेटिस काही ठिकाणी एकाच ईश्वराविषयी उल्लेख करीत असला तरी तदंशभूत किंवा त्याचे प्रतिनिधीभूत म्हणून इतर देवांविषयी आदर व भक्ती बाळगणे हे काही वावगे नाही. या बाबतीत हिंदूधर्म व ग्रीकधर्म यांचे फार साम्य आहे. निरनिराळ्या देवता प्रचलित असताही त्यांचे एकत्व दाखविणारी वाक्ये वेदांतूनही आढळतात. एकाच सद्वस्तूला विप्र म्हणजे ज्ञातेपुरुष निरनिराळी नावे देतात. एकाच अग्नीला यम, मातरिश्वा अशी नावे देतात, असे वचन ऋग्वेदातही आहे. सॉक्रेटिसच्या मतांतही एकदेववाद व बहुदेववाद यांचा असाच बेमालूम मिलाफ झालेला आहे. देवाच्या निरनिराळ्या विभूतींचेच वर्णन करावयाचे असल्यास सॉक्रेटिस त्यावेळच्याच रूढ कल्पनांप्रमाणे वागे; परंतु अत्यंत श्रेष्ठ अशा एकाच ईश्वराचे स्वरूप सांगावयाचे झाल्यास तो या जगताच्या बुद्धिस्थानी अगर आत्मस्थानी आहे असे तो म्हणे व त्याच स्वरूपलक्षणांवरून तो परमेश्वराविषयींच्या आणखी काही कल्पना कशा सिद्ध होतात हे दाखवी. देव आहे, तर तो आम्हास दिसत का नाही? असा कोणी आक्षेप घेतल्यास, त्याला सॉक्रेटिसचे असे उत्तर असे की, ज्याप्रमाणे आपणास मनुष्याचा आत्मा किंवा बुद्धी दिसत नाही; परंतु ती बुद्धी किंवा तो आत्मा आहे असेच आपणास म्हणावे लागते, त्याप्रमाणेच परमेश्वर दिसला नाही तरी तो आहे असेच म्हटले पाहिजे. सर्व विश्व हे शरीर असून परमेश्वर किंवा ब्रह्म, शरीरी अगर आत्मा आहे, हा विचार आपल्या शास्त्रासही पसंत असून, त्यावरूनच ब्रह्ममीमांसेलाच शारीरिकमीमांसा ही संज्ञा पडली आहे. असो. ज्याप्रमाणे आत्मा अदृश्य आहे, त्याप्रमाणेच परमात्माही अदृश्यच आहे. ज्याप्रमाणे आत्मा हा सर्व शरीरात भरलेला आहे, त्याप्रमाणेच देवही या विश्वात सर्वत्र भरलेला आहे. आत्म्याची हुकमत शरीरावर चालते; परमेश्वर सर्व विश्वावर सत्ता चालवतो. आत्म्याला शरीरबंधनासारखी तीव्र उपाधी असताही जर त्याला भूत, भविष्य, वर्तमान गोष्टींचा विचार करता येतो, नानाविध वस्तूंविषयी तर्क बांधता येतो व अचाट कार्ये करता येतात तर परमेश्वराचे ज्ञान, परमेश्वराचे कर्तृत्व अगाध, अनंत असावे हे साहजिकच आहे. ज्याप्रमाणे वारा अदृश्य असूनही त्याचे कार्य दिसते, त्याप्रमाणे देव अदृश्य असूनही आपणावरील त्याच्या प्रेमाचा व अगाध ज्ञानाचा थोडासा प्रत्यय आपणास प्रसंगविशेषी येतो. जो बिकट प्रश्न आपणास सुटत नाही, तो प्रश्न डेल्फीच्या देवाला कौल लावून आपणास सोडवून घेता येतो व असा हा देवतासंचार म्हणजे देवाच्या अस्तित्वाबद्दल व दयाशीलत्वाबद्दल अल्पसा पुरावाच आहे, असे सॉक्रेटिसचे मत होते.

आपल्या व्यक्तिविषयक अनुभवाच्या दृष्टीने सॉक्रेटिस कधी-कधी आपणास वेळोवेळी होणाऱ्या दृष्टांताचाही उल्लेख करतो. अगदी लहानपणापासून डेमनचा साक्षात्कार होत असे, या गोष्टीचा उल्लेख सॉक्रेटिसबरोबर संभाषण करताना इतरांच्या व त्याच्या स्वतःच्याही भाषणात येतो. हा डेमन कोण, त्याचे स्वरूप काय इत्यादी प्रश्न सॉक्रेटिसच्या चरित्रात महत्त्वाचे आहेत व याच ठिकाणी त्यांचा थोडासा विचार करणे जरूर आहे. कित्येकांच्या मते हा डेमन व त्यांची सूचना म्हणजे केवळ सद्सद्विवेकबुद्धी व तिचा व्यापार होय. ज्या ठिकाणी एखादी गोष्ट चांगली अगर वाईट आहे असे आपल्या अंतःस्थ बुद्धीला वाटते; परंतु त्याबद्दल योग्य कारणे देता येत नाहीत, त्या ठिकाणी आपणास याच सद्सद्विवेकबुद्धीच्या अस्फुट व्यापारावर हवाला द्यावा लागतो. सॉक्रेटिसचा डेमन* व त्याची सूचना अशाच प्रकारची आहे, असा त्यांच्या मताचा निष्कर्ष आहे. ही उपपत्ती साधारण बरी दिसते; परंतु ती खरी धरून चालण्यास अशी एक अडचण आहे, की सॉक्रेटिस इतरांचे ठिकाणी या प्रकाराची शक्यता मानताना आढळत नाही. जर डेमन व त्याची सूचना म्हणजे सदसद्विवेकबुद्धी व तिची सूचना असेल, तर प्रत्येक मनुष्याला या द्वाराने आपल्या पुढील बिकट प्रश्नांचा निर्णय करता येईल; परंतु सॉक्रेटिस आपल्या मित्रांना अशा प्रसंगी देवाला कौल लावण्याचा उपदेश करीत असे व आपण स्वत: मात्र केवळ याच सूचनेवर अवलंबून राही. यावरून हा प्रकार सर्वमान्य बुद्धीचा नसून विशेष साक्षात्काराचाच असला पाहिजे, असे दिसते.

कित्येक लेखक म्हणतात, की हा साक्षात्कार म्हणजे एक तऱ्हेचा वेडाचा झटका किंवा वायूची लहरच होता; परंतु सॉक्रेटिस हा अगदी पूर्णपणे भानावर असताना व अत्यंत महत्त्वाच्या बाबीत ज्या गोष्टीवर अवलंबून असे, त्या गोष्टीला वेडाची अगर वायूची लहर म्हणणे म्हणजे मोठेच चमत्कारिक आहे. सॉक्रेटिसच्या चरित्राचे किंचित अवलोकन केले तरी आपणास त्याचा धीमेपणा व विचारीपणा चांगला प्रत्ययाला येतो. असा पुरुष केवळ वेडाच्या लहरीवर अवलंबून राही हे म्हणणे शोभण्यासारखे तरी आहे काय? मग ही वेडाची अगर वाताची लहर सॉक्रेटिसकडे जात नसून या लेखकावरच कृपाप्रसाद करीत असल्यास नकळे!

या साक्षात्काराविषयी बोलताना सॉक्रेटिस नेहमी गंभीरपणा पत्करीत नाही ही गोष्ट खरी. तथापि, हा साक्षात्कार म्हणजे एक दैविक स्फूर्ती असल्याबद्दल त्याची स्वतःची खात्री होती व त्याप्रमाणेच तो आपले आचरण करण्यास कधीही चुकत नसे, ही गोष्ट अगदी खरी आहे. हा साक्षात्कार त्याला अगदी अल्पस्वल्प बाबतीतही होई हेही खरे; परंतु तो अत्यंत महत्त्वाच्या बाबतीतही होई व तितक्याच दृढ श्रद्धेने पाळला जाई, हे लक्षात ठेवले

---

*डेमन म्हणजे सद्सद्विवेकबद्धी ही उपपत्ती केवळ सॉक्रेटिस बद्धिनिष्ठ होता, हे सिद्ध करण्यासाठी आहे. वास्तविक त्याचे वर्तन सरल व डोळस श्रद्धायुक्त होते.

पाहिजे. आपल्या फिर्यादीच्या वेळेस अगोदरपासून भाषण तयार न करण्यास त्याने या साक्षात्कारांचाच हवाला दिला आहे. हा साक्षात्कार विधायक नसून निषेधक असे; परंतु जेथे निषेध नसेल तेथे त्याची अनुकूलता आहे, असेच धरून चालण्यास हरकत नव्हती. परमेश्वरीय साक्षात्काराचा हा अनुभव सॉक्रेटिसला येत असून आपणास येत नाही, असे कोणी म्हटल्यास सॉक्रेटिस डेल्फीच्या देवासारख्या देवांच्या साक्षात्कारावर हवाला देई. यावरून हा डेमनचा साक्षात्कार म्हणजे आपल्या अगदी बाल्यापासून आपणावर देवाची मर्जी असल्याची खूण आहे, असेच सॉक्रेटिसला वाटत असावे, असे सिद्ध होते.

वर दर्शविलेल्या अनेक विचारांनी सॉक्रेटिस परमेश्वराचे अस्तित्व कसे सिद्ध करी व त्याचे अदृश्यत्व, सर्वसमर्थत्व, सर्वस्थानवर्तित्व, दयाळुत्व इत्यादिकांविषयी कशी अनुमाने बसवी याचे दिग्दर्शन होईल. यापुढील दुसरा प्रश्न म्हणजे परमेश्वराच्या उपासनेविषयी होय. ज्याअर्थी परमेश्वर आपणावर एवढी दया करतो व आपल्या हितासाठी एवढी योजना करतो, त्याअर्थी आपणासही आपली कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. कारण अकृतज्ञतेसारखे दुसरे निंद्य काहीच नाही. ही कृतज्ञता व्यक्त करण्याचा मार्ग म्हणजे उपासना, प्रार्थना, यज्ञयाग वगैरे होत, असे सॉक्रेटिस म्हणतो. ही उपासना करताना आपापल्या देशाच्या रूढीला अनुसरून मनुष्याने वागावे व देशातील कायद्यांनी किंवा रूढींनी जी जी धार्मिक कर्मे आपणास प्राप्त आहेत ती ती चोख रीतीने बजवावी. अशा नियमबद्ध वर्तनाचे उत्कृष्ट उदाहरण खुद्द सॉक्रेटिसनेच घालून दिले होते व अथीनियन कायद्याप्रमाणे व रूढीप्रमाणे प्राप्त होणारी सर्व कर्मे तो योग्यरीतीने करीत असे. अगदी मरता मरतादेखील तो या विधींना विसरला नाही, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

परमेश्वराची प्रार्थना करून त्याजजवळ आपण काही विशिष्ट वस्तूची याचना करू नये, बाह्य सुखोपभोगांची तर मुळीच याचना करू नये, तर आपले कल्याण ज्यात असेल तेच देवाने द्यावे, असे मोघमच मागणे मागावे, असे सॉक्रेटिसचे मत होते. आपले खरे कल्याण कशात आहे हे आपणापेक्षा देवालाच अधिक चांगले समजते, म्हणून आपण आपले हित त्याजवरच सोपवावे. आपल्या भ्रांतिरूप ज्ञानाने आपण अहितकर वस्तूंची याचना करून फशी पडण्याचाच संभव अधिक म्हणून देवावरच विश्वास टाकावा. आम्हास या ठिकाणी कौषीतकि ब्राह्मणोपनिषदातील प्रतर्दनाच्या आचरणाची आठवण झाल्याखेरीज राहत नाही. या लोकी असामान्य पराक्रम गाजविल्यामळे ज्यावेळी प्रतर्दन इंद्रलोकांत गेला, त्यावेळी इंद्राने त्याला 'वर माग' असे म्हणताच त्याने इंद्रावरच सर्व हवाला दिला व 'महाराज आपणास जो वर मनुष्याला अत्यंत हितकर आहे असे वाटत असेल, तोच वर मला द्यावा,' असे भाषण केले व त्यामुळेच त्याला इंद्राकडून सत्यज्ञानाचा उपदेश मिळाला.

हिंदू धर्मातील विचारांशी अगदी तंतोतंत जुळणारा सॉक्रेटिसचा दुसरा विचार म्हणजे, यज्ञयागाच्या अगर अवदानादिकांच्या सापेक्ष योग्यतेविषयीचा एखाद्या यज्ञाची अगर

दानाची किंमत यजमानाच्या अगर दात्याच्या अंत:करणस्थ श्रद्धेवर अवलंबून आहे, बाह्य साधनसामग्री भरपूर असूनही एखाद्या यज्ञाची किंमत अगदी हलकी ठरेल व अगदी अल्प सामग्रीत केलेली पूजाही श्रद्धेच्या व भक्तीच्या उत्कर्षामुळे बिनमोल ठरेल. हे तत्त्व दाखविण्यासाठी आपल्या वाङ्मयामध्ये कितीतरी सुप्रसिद्ध पौराणिक गोष्टी आहेत. विदुराच्या कण्या, सुदाम्याचे पोहे, द्रौपदीच्या थाळीतील एकच भाजीचे पान, या गोष्टी आपल्याकडील आबालवृद्धांना ठाऊकच आहेत व त्यातील तत्त्वच सॉक्रेटिसनेही मान्य करून पुढे मांडले आहे. मनुष्याने दृढ श्रद्धेने व उत्कट भक्तीने, आपल्या अनुकूलतेप्रमाणे परमेश्वराची सेवा करावी, म्हणजे त्यातच परमेश्वराची प्रसन्नता आहे.

मनुष्याच्या आत्म्यामध्ये दैवी शक्ती आहे, अशी सॉक्रेटिसची दृढ भावना होती. हा जीवात्मा अमर आहे किंवा नाही, याविषयी सॉक्रेटिसचे काय मत होते, ते पाहू. मनुष्य मेल्यावरही त्याचा आत्मा परलोकी असतो अशाबद्दल ग्रीक लोकांमध्ये फार जुन्या काळापासून समजूत चालू होती. मृतांकरिता यज्ञ करणे, गवतावर रक्त ओतणे, मृताला दिलेले बळी जाळणे इत्यादी गोष्टींविषयी होमर कवीच्या काव्यात उल्लेख नाहीत. तथापि, ग्रीक लोकांमध्ये या चाली रूढ होत्या, असे सुप्रसिद्ध मॅक्समुल्लर यांचे म्हणणे आहे. होमरनंतरचे कवी पिंडर, इस्फिलस, सोफोक्लीज यांच्या ग्रंथांमध्ये या समजुतीचा अधिक स्पष्ट उल्लेख आहे. मरणानंतरही आत्म्याला परलोकात अस्तित्व असून, त्याला आपल्या कृतकर्मांची सुखदुःखात्मक फळे तेथे भोगावी लागतात, आपल्या पूर्वीच्या शत्रुमित्रांविषयीचे, त्याचे रागद्वेषादी विकार तेथेही कायम असतात. इत्यादी मतांचा त्या त्या ग्रंथकाराच्या वेळी ग्रीक जनसमाजामध्ये बराच प्रसार झाला असावा, असे वाटते. सारांश, सॉक्रेटिसच्या पूर्वी व त्याच्या काळी लोकांमध्ये परलोकाविषयीच्या काही कल्पना रूढ होत्या; परंतु त्यांना बुद्धीच्या किंवा तर्कशास्त्राच्या जोरावर प्रस्थापित करण्याचा अद्यापि प्रयत्न झाला नव्हता.

या प्रश्नाविषयी खुद्द सॉक्रेटिसचे मत काय होते हे नि:संशय सांगणे मोठे कठीण काम आहे. या विषयाचा विशेष ऊहापोह प्लेटोच्या फीडो नामक संवादात आहे; परंतु या अप्रतिम संवादातील कोणता भाग प्लेटोचा* व कोणता खुद्द सॉक्रेटिसचा हे ठरविणे फार कठीण आहे. प्लेटोच्या संवादामध्ये अमुक एक संवाद किंवा संवादांश सॉक्रेटिसचीच मते दाखविणारे व बाकीचे भाग प्लेटोची मते देणारे, असा कायमचा निकाल करणे दुरापास्त आहे. सॉक्रेटिसचा स्वतःचा असा एकही ग्रंथ नाही, की ज्यातील प्रमेयांशी प्लेटोच्या संवादातील प्रमेये ताडून पाहता येतील आणि यावरून त्यांचा असॉक्रेटिक व सॉक्रेटिक असा स्पष्ट भेद पाडता येईल. अशा प्रसंगी प्लेटोच्या माहितीची सत्यासत्यता ठरविण्यास

---

* सॉक्रेटिसचे चरित्र. त्याचे वर्तन व उपदेश आणि इतर समकालीनांनी सॉक्रेटिसविषयी व्यक्त केलेली मते हे पाहता प्लेटोच्या कुठल्याही संवादाचे समीक्षण होणे गरजेचे आहे. त्यासाठी पद्धतशीरपणे अभ्यासक मंडळी तयार केली गेली पाहिजे.

झेनोफनचा ग्रंथ उपयोगी पडतो; परंतु आत्म्याच्या अमरत्वाविषयी झेनोफेनने कोठेही विवेचन केलेले आढळत नाही. त्याच्या सायरस नामक कथानकात सायरस याने आपल्या पुत्रास मरते वेळी जो उपदेश केला आहे, त्यामध्ये मात्र आत्म्याच्या अमरत्वाविषयी विचार प्रकट केले आहेत व ते विचार प्लेटोच्या 'फीडो'तील विचारांशी जुळतात. या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित होतो, की सॉक्रेटिसचा चांगुलपणा दाखवून त्याची निर्दोषता सिद्ध करण्यासाठी झेनोफनने सॉक्रेटिसचे विविध उपयुक्त विषयांवरील जे संस्मरणीय विचार एकत्र केले, त्यामध्ये अमरत्वाविषयी काहीही विचार न करता एका कल्पित कादंबरीच्या कथानकातच ते गुंफले. सॉक्रेटिसची आत्म्याच्या अमरत्वाविषयीची कल्पना झेनोफनला अज्ञात असून, ती त्याला अन्य मार्गाने अगर स्वतःच्या बुद्धीनेच कळली होती म्हणून ती त्याने आपल्या कथानकात गोवली काय? पण तसेच असेल तर प्लेटोच्या विचारांशी त्याचे विचार इतके जुळतात ही आश्चर्याचीच गोष्ट नव्हे काय? प्लेटोशी किंवा सॉक्रेटिसशी ज्याचा काहीही संबंध पोहोचत नाही अशा एखाद्या लेखकाच्या ग्रंथात हे विचार सापडले किंवा भारतीय उपनिषदासारख्या प्राचीन ग्रंथात प्राचीन ग्रंथत तत्सदृश विचार दिसले तर गोष्ट निराळी; पण एकाच गुरूच्या दोन शिष्यांत जेव्हा इतके विचारसाम्य आढळते, त्यावेळी त्या साम्याचे बीज त्यांच्या सहाध्यायीपणात व त्यांच्या गुरूच्याच विचारात असावे, असे वाटणे अगदी अपरिहार्य आहे. झेनोफनने या प्रश्नाचा 'सॉक्रेटिसच्या आठवणी' (Memorabilia) मध्ये उल्लेख न करण्याचे कारण असे देता येईल. की हा विषय सामान्य लोकांच्या दृष्टीने गहन आहे व म्हणून सॉक्रेटिसचा निरुपद्रवीपणा सिद्ध करण्यास त्याचा फारसा उपयोग नाही. एखादा मनुष्य आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास ठेवीत असला म्हणजे तो अन्याय्य उपदेश करणारच नाही, असे काही सिद्ध होत नाही. त्याचा निरुपद्रवीपणा दाखविण्यास त्याच्या उपदेशातील सामान्य नीतीचा भागच अधिक स्पष्टपणे पुढे आणला पाहिजे. या कारणासाठी झेनोफनने या प्रश्नावरील विचारांची उपेक्षाच केली असेल; परंतु हे विचार त्याच्यासारख्या तत्त्ववेत्त्याला अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे मनात सारखे घोळणे अगदी साहजिक होते व त्याचा परिणाम सायरसने मरणसमयी आपल्या पुत्रास केलेला उपदेश हा असावा. उलटपक्षी प्लेटोचा उद्देश सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान ग्रथित करण्याचाच असल्यामळे त्याला कोणताच प्रश्न सोडता येण्याजोगा नव्हता.

याच गोष्टीची दुसरी उपपत्ती अशी लावता येईल, की सॉक्रेटिसची आत्म्याच्या अमरत्वाविषयीची कल्पना झेनोफनला तिच्या परिणत स्वरूपात कधीही ऐकावयास सापडली नसेल. सॉक्रेटिसच्या अंतकाळापूर्वीच झेनोफन हा धाकट्या सायरसबरोबरच्या सैन्यात सामील होऊन पारसिक देशातील मोहिमेवर गेला होता व तो सॉक्रेटिसच्या मृत्यूनंतर अथेन्सला आला व तेथील परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे जो एकदा अथेन्स सोडून गेला तो कित्येक वर्षेपर्यंत कधीही परत आला नाही. त्याला झालेली हद्दपारीची शिक्षा मागाहून रद्द

करण्यात आली होती; पण या बदललेल्या परिस्थितीचाही त्याने उपयोग केल्याचे दिसत नाही. सॉक्रेटिसचे अमरत्वाविषयीचे विचार जर त्याच्या मरणकालीच अधिक परिणत झाले असतील तर झेनोफनचे व प्लेटोचे वर्णन यात विरोधच नाही असे म्हणण्यास काही हरकत नाही.

सॉक्रेटिसचे काही विचार अपरिणत असून, त्यांचाच परिपोष करून प्लेटोने फीडो या संवादाची रचना केली असेल, हे शक्य आहे; परंतु हा परिपोष करतानाही प्लेटोने सॉक्रेटिसच्या विचारांची मूळ रूपरेषा अगदीच टाकली असण्याचा संभव नाही. जे विचार खुद्द प्लेटोचेच असा विद्वज्जनांचा अभिप्राय झाला आहे, ते विचार मूळ आधार धरून फीडोतील विचारसरणी आखली आहे; परंतु या संवादात आपणास शुद्ध सॉक्रेटिसचे विचार न दिसता ते प्लेटोच्या बुद्धिरूपी विशिष्ट वर्णगोलकातून संक्रांत स्वरूपात दिसत आहेत, ही एक सावधगिरीची कल्पना बाळगून फीडोचा विचार केला व अशा रीतीने गाळून आलेली प्रमेये दुसऱ्या सॉक्रेटिस म्हणून ठरलेल्या संवादांशी ताडून पाहिली, म्हणजे आपणास खुद्द सॉक्रेटिसचे मत पुष्कळ अंशी बरोबर रीतीने समजले असे म्हणण्यास हरकत नाही.

वरील फीडो या संवादात ग्रीक कवी इव्हेनस (Evenus) याजवरून भाषण सुरू होऊन सॉक्रेटिसने असा सिद्धांत सांगितला, की खरा तत्त्वज्ञानी हा नेहमी मरणाला तयार असतो; परंतु तो आत्महत्या मात्र करीत नाही. कारण तसे करणे अन्यायाचे आहे. आत्महत्या न करून घेण्याचे कारण असे, की ज्याप्रमाणे एखाद्या कैद्याला तुरुंगाचे दार फोडून जाण्याचा अधिकार नाही, त्याचप्रमाणे परमेश्वराने आपणास ज्या देहरूपी कारागृहात टाकले आहे, त्याचा बलात्काराने त्याग करणे हा एक गुन्हा आहे. दुसरे कारण असे, की मनुष्य परमेश्वरनिर्मित असल्यामुळे त्याचा आहे व आत्महत्या करणे म्हणजे परमेश्वरी सत्ता झुगारून देण्यासारखे आहे. या ठिकाणी कोणी असा प्रश्न विचारेल, की जर आपण देवांच्या अधिकाराखाली आहो तर तत्त्वज्ञान्याने मरणाची इच्छा तरी का करावी किंवा तयारी तरी का ठेवावी? सॉक्रेटिस यावर उत्तर देतो, की मरणाने मनुष्य एका देवापेक्षा अधिक चांगले असे दुसरे देव एका मित्रमंडळापेक्षा अधिक प्रेमळ मित्रमंडळ ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी जातो म्हणून त्याला वाईट वाटण्याचे कारण नसते. शिवाय सत्यज्ञानाला शरीर हे एक मोठी अडचण असल्यामुळे आत्म्याला निःशरीर होणे आवडते. तत्त्वज्ञाचा आत्मा त्याच्या जीवितकाळीदेखील शरीराकडे दुर्लक्ष करून आपला व त्याचा संबंध शिथिल करू पाहतो, मग तोच अनिष्ट संबंध कायमचाच तुटत असेल तर त्याला दु:ख वाटण्यापेक्षा आनंद वाटावा हे साहजिकच आहे.

या ठिकाणी असा प्रश्न येतो, की शरीराचा परित्याग केल्याबरोबर आत्मा हा धुरासारखा हवेत मिसळून जाऊन नाहीसा होणार नाही म्हणून कशावरून? या प्रश्नाला उत्तर म्हणून सॉक्रेटिस प्रथमतः जुन्या ऑर्फिक मताचा हवाला देतो. या ऑर्फिक मताविषयीचे दिग्दर्शन

पहिल्या पुष्पातील पहिल्या प्रकरणामध्ये केले आहे. मेलेल्या मनुष्यांचे आत्मे पाताळामध्ये जातात व सध्या जीवमान असलेल्यांचे आत्मे तेथूनच येतात, असा त्या मताचा इत्यर्थ आहे. याच मताला पोषक असा सामान्य सिद्धांत हाच, की परस्परविरुद्ध गोष्टींची एकमेकांपासूनच उत्पत्ती होत असते. जागृतीतून सुषुप्ती व सुषुप्तीतून जागृती. मोठेपणातून लहानपण व तसेच उलट लहानपणातून मोठेपण व त्याचप्रमाणे जननातून मरण व मरणातून जनन हाच उत्पतीमार्ग ठरलेला आहे. सध्याचे जीवमान प्राणी मृत्युविषयांतून येऊन शेवटी पुन: मृत्यूमध्ये प्रवेश करतील, तरच सृष्टिचक्राचा एक फेरा बरोबर पुरा होईल.

आत्म्याच्या पूर्वकालीन अस्तित्वाविषयी दुसरे प्रमाण म्हणजे ज्ञानाची स्मृतिरूपता हे होय. मनुष्याचे सर्व ज्ञान हे स्मृतिरूप आहे. त्याला काही शिकविणे म्हणजे त्याच्या ज्ञानावर आलेले विस्मृतीचे पटल दूर करणे इतकेच व ज्याअर्थी अशी स्मृती ज्ञानमूलक आहे, त्याअर्थी ते ज्ञान ज्याकाळी संपादन झाले त्या काळी आत्मा असलाच पाहिजे. यावरून आत्म्याचे पूर्वकालीन अस्तित्व सिद्धच झाले. या जन्मी आपण ज्याविषयाचा कधीही अभ्यास केला नाही, त्या विषयातही आपणास काहीसे ज्ञान असते याचे एक प्रमाण, मेनो व फीडो या संवादात सारखेच दिले आहे. एखाद्या अगदी निरक्षर माणसापुढे आपण एखादी भूमितीची आकृती धरली, तर त्याला त्या विषयातील थोडेसे अस्पष्ट, संदिग्ध ज्ञान आहे, असे आपणास आढळून येईल. याशिवाय मनुष्याच्या मतामध्ये ज्या काही शुद्ध कल्पना असतात त्यावरूनही या पूर्वकालीन ज्ञानाचे अनुमान करता येते. आपणास अगदी सारखे असे दोन पदार्थ कधीही आढळत नाहीत. तथापि, त्या दोन पदार्थांच्या सारखेपणाची कल्पना याच विशुद्ध साम्यकल्पनेवर अवलंबून आहे व ज्याप्रमाणे वस्तूच्या परिमितत्त्वापूर्वी परिमाण अस्तित्वात असावे लागते, त्याप्रमाणेच ज्या साम्यकल्पनेने हे सापेक्ष साम्य मोजावयाचे, तिजविषयीही आपणास पूर्वीच ज्ञान पाहिजे व ही कल्पना सध्याच कोणी दिली नसल्यामुळे पूर्वकालीन असावी.

वरील मुद्यांवर आत्म्याचे प्रागस्तित्व कबूल केले तरी त्याचे उत्तरकालीन अस्तित्व संदिग्धच राहते. मरणानंतर आत्मा धुरासारखा नाहीसा होत नसेल कशावरून? त्यातही मरणकाली जर मोठा वारा सुटला असेल तर हा संभव अधिकच. या वादाला प्रत्युत्तर म्हणजे पूर्वी एकदा दिलेले-विरुद्धजनन पद्धती-हे होय. त्याप्रमाणे मृत्यूमागून पुनः जीवन असेलच पाहिजे. मृत्यूकाळी काही विनाश पावत असेलच तर ते मर्त्य शरीर; पण आत्मा दैविक अंशाचा असल्यामुळे नाश पावत नाही. हे मर्त्य शरीरदेखील मसाल्यात ठेवले तर कितीतरी दिवस टिकते, मग दैविक अंशाचा आत्मा त्याजपेक्षा अधिक टिकू नये काय? शरीराच्या उपाधीमुळे तो आत्मा इंद्रियविषयक वस्तूंमध्येच गुरफटला, तो कदाचित हीन जातीच्या प्राण्यामध्ये प्रवेश करीत असेल व ज्यांनी उच्च तत्त्वज्ञान न समजता; पण नीतिशुद्ध वर्तन ठेवले ते बऱ्या प्राण्यांच्या जन्माला जात असतील; पण ज्या मनुष्याला खऱ्या तत्त्वज्ञानाचा

लाभ झाला, त्या मनुष्याचा आत्मा मनोविकाराच्या तम:पटलातून व या शरीरात त्याला खिळवून टाकणाऱ्या सुखदुःख कल्पनातून मोकळा झाला.

सॉक्रेटिसच्या ऐहिक आयुष्यातील आज शेवटचाच दिवस आहे व विषाचा पेला देण्याची वेळ जवळ जवळ येत चालली आहे. अशा वेळी त्याजबरोबर जास्त वाद करण्याची कोणास इच्छा होऊ नये, हे साहजिकच आहे; पण या शंकांबद्दल सॉक्रेटिसला मोठे आश्चर्य वाटते. तो मरावयाचा असला तरी त्याची इच्छा राजहंसासारखी शेवटपर्यंत सुस्वर गायन गात गात मरण्याची आहे. ज्याने आपले सर्व आयुष्य तत्त्वविचारात घालविले, त्याचा अंतकाळ तत्त्वविचार करीत असता असताच व्हावा हे अत्यंत उचित. या बाबतीत आपणास नि:संशय असा निर्णय लावता आला नाही तरी निदान बद्धीला सर्वांत अधिक ग्राह्य कोणते मत पटते, हे तरी आपणास सांगता येईलच.

सॉक्रेटिसच्या या भाषणाने जरा धीर येऊन सिमियस आणि सीब्स हे आपापल्या शंका पुढे मांडतात व सॉक्रेटिस त्यांचे निवारण करतो. सिमियसचे म्हणणे असे, की आत्मा अमूर्त व अशरीर आहे म्हणून तो मूर्त शरीराच्या नाशामुळे नाश पावत नाही, असे सांगण्यात आले आहे; परंतु आत्मा म्हणजे शरीराची एकतानता (Harmony) नव्हे काय? आणि ज्याप्रमाणे सारंगीची एकतानता अमूर्त असूनही सारंगी नंतर विनाश पावते त्याप्रमाणेच शरीरनाशानंतर आत्माही नष्ट होईल.

यावर सॉक्रेटिसचे असे उत्तर आहे, की आत्म्याला या शरीराची एकतानता म्हणणे चुकीचे आहे. कारण एकतानता ही सारंगीनंतर येणारी आहे; परंतु आत्मा हा शरीरानंतर येणारा नाही. कारण आत्म्याचे पूर्वकालीन अस्तित्व विशुद्ध कल्पनादिकांवरून वर दाखविलेच आहे. याशिवाय दुसरे असे, की आत्मा हा शरीराची एकतानता असती तर जड मनोविकार एकीकडे ओढतात व आत्मा दुसरीकडे ओढतो, असा प्रकारचा आढळला नसता.

सीब्सचे म्हणणे असे, की एका शरीरापेक्षा किंवा कित्येक शरीरांपेक्षा आत्मा जास्त टिकणारा आहे, असे कबूल केले तरी तेवढ्यानेच भागत नाही. जितकी म्हणून शरीरे शक्य असतील तितक्यांच्या नाशानंतरही आत्मा शिल्लकच राहतो, असे दाखविले पाहिजे, नाहीतर आजपर्यंतच्या अनेक शरीरांचा नाश झाला तरी कायम राहिलेला आत्मा प्रस्तुत शरीराचा नाश होण्यापूर्वीच मरणार नाही म्हणून कशावरून? उदाहरणार्थ एखादा कोष्टी एका अगर अनेक वस्त्रांचा विनाश झाला तरी नाश पावत नाही, ही गोष्ट खरी; पण सरते शेवटी त्यानेच विणलेले एखादे वस्त्र फाटून जाण्यापूर्वीच त्याचा अंत झालेला आपण पाहत नाही काय? मग प्रस्तुतच्या शरीरविनाशाबरोबर किंवा त्याच्याही पूर्वी आत्मा मरणार नाहीच म्हणून कशावरून?

एकंदरीत हा प्रश्न मोठा बिकट आहे, यात काही संशय नाही. तथापि, त्याचे थोडक्यात असे उत्तर देता येईल, की परस्परविरोधी गुण एकत्र राहू शकत नाहीत. पूर्वी परस्परविरुद्ध

गुणधर्माच्या पदार्थांची एकमेकांपासून उत्पत्ती होत असल्याबद्दल सांगितले; पण सध्याचे हे तत्त्व गुणयुक्त विशिष्टांबद्दलचे नसून त्या गुणांबद्दल व त्या गुणांशी अयुतसिद्धी पदार्थांविषयीचे आहे, हे लक्षात ठेवावे. उष्णता आणि शैत्य ही एकत्र राहू शकत नाहीत, एवढेच नव्हे तर उष्णतेपासून कधीही विभक्त न होणारा अग्नी व शैत्यापासून असंविभक्त जळ यांचेही एका ठिकाणी अस्तित्व असणे शक्य नाही. त्याचप्रमाणे जीवन व मरण हे एकत्र राहू शकत नाहीत व एखाद्या अनिष्ट मनुष्यास टाळावयासाठी आपण दुसरीकडे निघून जातो, त्याप्रमाणेच मरण आले असे पाहताच आत्मा एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरात जात असावा हे संभवनीय दिसते.

प्लेटोच्या काचेतून दिसणारे सॉक्रेटिसचे विचारबिंब वरील तहेचे आहे. यात सॉक्रेटिसचे काही बीजभूत विचार प्लेटोने आपल्या विशिष्ट मतांनी खुलवून लिहिले असावेत. विशुद्ध कल्पनांचे अस्तित्व, सर्वज्ञानाचे स्मृतिरूपत्व इत्यादी कल्पना सॉक्रेटिसच्या इतर ठिकाणच्या भाषणात अत्यंत अस्फुट आहेत. आत्म्याच्या अमरत्वाविषयी बोलतानाही अन्यत्र ठिकाणी सॉक्रेटिस फारच सावधगिरीने व संदिग्धपणे बोलतो असे आपणास आढळते. खुद्द प्लेटोनेच लिहिलेल्या दुसऱ्या संवादातील उतारे आपणास हा संदिग्धपणा चांगला प्रत्ययास आणून देतात. सॉक्रेटिसवरील फिर्यादीचा प्रतिकूल निकाल लागल्यावर सॉक्रेटिसने जे शेवटी भाषण केले आहे, त्यात मरण हे कदाचित स्वप्नशून्य निद्रेसारखे असेल, कदाचित पूर्वकालीन महानमहान पुरुषांनी गजबजलेल्या परलोकात प्रवेश करण्यासारखे असेल व या दोहोंपैकी काहीही असले तरी श्रेयस्करच आहे, असे दाखविले आहे. सदर प्रसंगी सॉक्रेटिसने आपले काही विचार मुद्दाम दडपून ठेवणे अगदीच अशक्य आहे व त्यावरून सॉक्रेटिसचे आत्म्याच्या अमरत्वाविषयीचे मत बुद्धीच्या कसोटीस उतरलेले नसून केवळ श्रद्धारूप असावे व हा प्रश्न मानवबुद्धीला अगम्य अशा क्षेत्रातील आहे, अशीच सॉक्रेटिसची समजूत असावी. झेनोफनने मरणोन्मुख सायरसच्या भाषणात असाच काहीसा संदिग्धपणा धरला आहे.* खुद्द फीडोमध्येही स्वर्गनरकादिकांचे वर्णन करून त्याजविषयी फारसा आग्रह न दाखविता

---

* In Plato's Apology, at a moment when the suppression of his beliefs can leant be supposed, he expressed himself on this question with much doubt and caution. Herewith agrees so well the language used by the dying cyrus in Xenophon, that we may safely assume that Socrates considered the soul's existence after death to be indeed probable, without however pretending to any certain knowledge on the point. It was accepted by him as an article of faith, the intellectual ground for which belonged to those problems which surpass man's capacities.

(Zeller : Socrates and the Socratic Schools.)

असेच काहीतरी खरे असावे. असा जो सॉक्रेटिसच्या भाषणात शेरा आहे, त्यातही याच संदिग्धपणाची छटा आहे.

आत्म्याच्या अमरत्वाविषयीचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे व त्याजविषयी निरनिराळ्या तत्त्वज्ञांविषयीची हकीगत लिहिताना थोडे फार विवेचन करावे लागेल. या प्रश्नाच्या उत्तराची जी परंपरा दृष्टीस पडते तीमध्ये मनुष्याच्या विचारांचा विकास कसकसा झाला हे दृष्टोत्पत्तीस येते. हिंदू तत्त्वज्ञानामध्ये आत्म्याच्या अमरत्वाविषयी पुष्कळ ठिकाणी विवरण केले आहे, त्याची व पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या विचारसरणीची तुलना केल्यास तीही मोठी मनोरंजक होईल; परंतु सध्याच त्या विषयात न शिरता सॉक्रेटिसच्या मतदिग्दर्शनाचे हे प्रकरण येथेच आटोपून त्याच्या चरित्रनाटकातील शेवटच्या अंकाकडे वळू.

○○○

प्रकरण ५ वे

फिर्याद

आपल्या देशबांधवांचे अज्ञान दूर करण्याचे व्रत पत्करल्यापासून सॉक्रेटिसने आमरण त्याप्रमाणेच आचरण केले. ॲरिस्टोफेनसचे नाटक ख्रि. पू. ४२३ या वर्षी लिहिले गेले. त्यावेळी सॉक्रेटिस चांगलाच प्रसिद्धीस आला होता व त्यावरून आपल्या मरणापूर्वी सॉक्रेटिस हा कमीत-कमी तीस वर्षेपर्यंत तरी उघडपणे लोकांस उपदेश करीत असे, असे सिद्ध होते. इतक्या दीर्घ कालपर्यंत त्याचा क्रम अव्याहत व उघडपणे सुरू असता अगदी त्याच्या वृद्धापकाळी त्याजवर एकदम गहजब गुदरावा व त्याला देहान्त शासनाची शिक्षा व्हावी, हे मोठे चमत्कारिक वाटते. अथेन्समध्ये निरनिराळ्या पक्षांची चुरस सुरू असता सॉक्रेटिस हा त्यापासून अगदी अलिप्त होता. देशातील प्रचलित कायद्याप्रमाणे त्याच्या वाटणीस येणारी कामे त्याने वेळोवेळी योग्य रीतीने बजावली होती व या शेवटच्या गहजबापूर्वी त्याजवर कोर्टाची पायरी चढण्याचा कधीच प्रसंग आला नव्हता. आपल्या देशबांधवांच्या कल्याणासाठी एवढी मेहनत घेणारा साधुवृत्तिपुरुष, अशा दुष्ट शिक्षेला पात्र व्हावा, ही मोठी विलक्षणच गोष्ट होय; पण सकृद्दर्शनी विलक्षण वाटणारी ही गोष्ट अथेन्समध्ये प्रत्यक्ष घडून आली. या प्रसंगाची उपपत्ती लागून, त्यावेळच्या सॉक्रेटिसच्या बाणेदार वर्तनाचे वर्णन करणे हा प्रस्तुत प्रकरणाचा विषय आहे.

सॉक्रेटिसच्या वादपद्धतीचा विचार केला असता आपल्या सहजच लक्षात येते, की या पद्धतीने लोकांचे प्रेम संपादन होण्यापेक्षा दृढमूल द्वेषच अस्तित्वात येणे, अधिक स्वाभाविक आहे. आपल्या प्रतिपक्षाला त्याचे अज्ञान कबूल करावयाला लावणे, हा सॉक्रेटिसचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा व तो सिद्ध करण्यासाठी सॉक्रेटिस कोणाचीही भीड-मर्यादा धरीत नसे. आपल्याशी बोलणारा इसम मोठा पंडित म्हणून नावाजलेला आहे किंवा तो कवी आहे, अधिकारी आहे, राजकारणी आहे, असे पाहून काही गम खाणे तर दूरच राहिले.

परंतु याच कारणाकरिता त्यांचे अज्ञान प्रथम उघड केले पाहिजे व इतर जनांच्या मनातील त्याजविषयीचा भ्रामक आदर दूर केला पाहिजे व त्यांनाही जागे केले पाहिजे, या विचाराने सॉक्रेटिस त्याजवर हल्ला करी. सत्याच्याच दृष्टीने पाहिले तर सॉक्रेटिसचे हे करणे अत्यंत योग्य होते व ज्या काही पुरुषांनी आपले अज्ञान पाहून पुनः सत्यज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करून त्यात यश मिळविले असेल असे पुरुष सॉक्रेटिसच्या या भ्रमनिरसनाबद्दल त्याचे शतशः धन्यवाद गात असतील, यात काही संशय नाही; परंतु ज्ञानाविषयीची इतकी निःसीम लालसा बाळगून मानापमानाचा प्रश्न बाजूस ठेवणारा मनुष्य विरळाच. सामान्यत्वेकरून मनुष्याला आपले अज्ञान उघड झाले आणि तेही चारचौघांत उघड झाले तर आवडत नाही. ज्यावेळी आपण एखाद्या गोष्टीचे ज्ञान प्राप्त झाले असे समजून आनंदात किंवा आढ्यतेत असतो, त्याच वेळेस दुसरा कोणी आपल्या ज्ञानाची फटफजिती करू लागला तर मनुष्य संतापून जातो. त्यातही सॉक्रेटिसच्या पद्धतीप्रमाणे हा सर्व प्रकार अगदी भररस्त्यात चालावयाचा. एखाद्या मनुष्याला अगदी एकीकडे घेऊन त्याचा दोष दाखविला तर त्याला तितके वाईट वाटत नाही; परंतु त्याच्या बरोबरीची किंवा त्यातही त्याच्या हाताखालची मंडळी हजर असताना त्याचा फजितवाडा उडविला तर त्याला त्याची मोठी चीड येते. आपले जे दोष दाखविले गेले ते खरे आहेत, की खोटे आहेत, याची कसून चौकशी करण्याची बुद्धी होण्याऐवजी भर चव्हाट्यावर आपल्या बुद्धीची अब्रू घेणाऱ्या पुरुषाचाही आपणास केव्हा एकदा पाणउतारा करावयास सापडेल, अगर तो केव्हा कैचीत सापडेल व आपणही त्याला गयावया करताना पाहू, असे होऊन जाते. आपला दोष दाखवून आपला प्रगतिमार्ग खुला केला म्हणन त्याचे आभार मानण्याची गोष्ट तर दरच: पण त्याच्या छिद्रान्वेषीपणामळे आपल्याला खाली मान घालावी लागली म्हणून त्याला पाण्यात पाहण्याची प्रवृत्तीच साहजिक अधिक, त्याचे मित्रत्व संपादून अगर त्याचे शिष्यत्व पत्करून आपले ज्ञान सुधारण्याची गोष्ट स्वप्नातही येणे दुर्लभ. त्याला कसा एकदा ठेचू किंवा तुडवू हीच द्वेषमय वांछा स्वाभाविक.

त्यातही एखादा सामान्यच मनुष्य असेल तर त्याची इज्जत ती किती किमतीची व त्याचा द्वेषही काय उपयोगाचा! परंतु सॉक्रेटिस ज्या लोकांची अब्रू घेई व त्यांच्या बुद्धीचा फोलपणा चव्हाट्यावर आणी, ते संस्थानात नावाजलेले पुरुष असत. त्यांना आपली इभ्रत कमी झाली म्हणून अधिक त्वेष यावा हे साहजिकच आहे व ते नावाजलेले व अधिकारी पुरुष असल्यामुळे त्यांचा द्वेष त्यांना उगवून घेणे अगदी सुलभ होते.

याशिवाय असे लक्षात घेतले पाहिजे, की सॉक्रेटिस हा व्याख्यान देत नसून केवळ संवाद करीत असल्यामुळे, या अज्ञानप्रदर्शनाला व्यक्तिविषयक द्वेषाचे स्वरूप अधिकच येई. एखादा वक्ता श्रोतृसमुदायातील काही व्यक्तींचेच दोष दाखवीत असला तरी त्याला नामनिर्देश न करता मोघमपणे बोलता येते व त्यामुळे त्याने अमुक एक व्यक्तीचाच अपमान केला असे स्पष्ट म्हणता येत नाही; परंतु जेव्हा तो एकाच व्यक्तीशी बोलतो तेव्हा त्याने

दुसऱ्याचे अज्ञानादिक दोष दाखविले तर हा अपमान अधिक स्पष्टपणे दिसतो. तसेच एखाद्या व्याख्यानात वक्तृत्वाच्या ओघामध्ये कित्येक गोष्टी संपादिल्या जातात. ज्या ठिकाणी गती एकाच दिशेने असेल त्या ठिकाणी संभ्रम निदान फार होत नाही; पण परस्परविरुद्ध दिशेला जाणाऱ्या गतिमान वस्तूंचा संघर्ष झाला म्हणजे आवाज होतो व प्रसंगी ठिणग्याही पडतात. व्याख्यानात व वादविवादातही हाच फरक दृष्टोत्पत्तीस येतो. वक्ता एकटाच बोलत असतो व प्रत्युत्तराची आडकाठी वारंवार न आल्यामुळे त्याचा जोर तितका वाढत नाही; पण वादविवादच सुरू झाला म्हणजे शब्दाला प्रतिशब्द, कोटीस प्रतिकोटी असा प्रकार वाढता वाढता इतका होतो, की त्या संघर्षात द्वेषाग्नीच्या ठिणग्याच पडतात. दुसऱ्याशी बोलताना सॉक्रेटिस नेहमी शांतवृत्ती ठेवी हे खरे; परंतु परन्यून दाखविण्याच्या या पद्धतीतील साहजिक दोष अगदीच टाळणे त्याला शक्य नव्हते व त्याच्या खोचदार भाषणांचा अनिष्ट परिणाम होणे अनिवार्य होते.

मोठमोठ्या व प्रसिद्ध व्यक्तीवर सॉक्रेटिस जी टीका करी, त्याचा अनिष्ट परिणाम खास घडून येईल, असे भविष्य ॲनिटसने पूर्वीच करून ठेवले होते. 'मेनो' या संवादात सद्गुण शिकवून येतात किंवा नाहीत, याजवरून बोलणे चालले असता, मेनोला सद्गुणी व्हावयाचे असेल तर त्याने मोठमोठ्या राजकारस्थानी पुरुषांकडे जावे, असा ॲनिटसचा सल्ला पडतो. सॉक्रेटिसचा यावर असा आक्षेप आहे, की हे थेमिस्टोक्लिस, पेरिक्लीस इत्यादी पुरुष सद्गुण शिकविण्यास समर्थ असते तर त्यांनी आपल्या मुलांना खास शहाणे केले असते; परंतु त्यांचे मुलगे पाहावे तर कुस्तीत किंवा घोड्यावर बसण्यात मात्र पटाईत. बाकी सद्गुणांच्या नावाने शून्यच. ॲनिटसला आपण राजकारस्थानी असल्याबद्दल अभिमान होता व आपल्या आवडत्या राजकारणी पुरुषांची निंदा त्याला सहन न होऊन तो सॉक्रेटिसला म्हणतो, 'सॉक्रेटिस, दुसऱ्याची निंदा करण्यास तू नेहमी एका पायावर तयार असतोस; पण माझे ऐकशील तर सांभाळ, बहुतकरून असे कोठलेही शहर नाही, की जेथे एखाद्याचे कल्याण करण्यापेक्षा त्याचे नुकसान करणे अधिक सोपे जाणार नाही. निदान अथेन्समध्ये तरी ही स्थिती आहे, हे तुला ठाऊक असलेच पाहिजे' (Meno). सॉक्रेटिसवर फिर्याद करणारांपैकी ॲनिटस हा एक असल्यामुळे वरील भाषणाला विशेष महत्त्व आले आहे. ॲनिटसने खरोखरच अशी सूचना केली होती किंवा नाही याबद्दल संशय असला तरी सॉक्रेटिसच्या टीकाप्रचुर भाषणाचा अनिष्ट परिणाम होत असे, हे प्लेटोलाही कबूल असल्यासारखेच दिसते.

ॲनिटसने सॉक्रेटिसचा द्वेष करण्यास आणखीही एक विशेष कारण झाले होते. ॲनिटसचा धंदा म्हणजे कमाविलेली कातडी विकणे हा होता. त्याच्या मुलाला सॉक्रेटिसच्या संवादामध्ये गोडी लागली होती व त्याची हुशारी पाहून त्याने कातडी विकण्याचाच धंदा करू नये, अशी सॉक्रेटिसची सूचना होती. नुकत्याच झालेल्या राजकीय उलाढालीमध्ये

ॲनिटसला बरीच झीज सोसावी लागली होती व तो आपल्या मुलाने आपणास मदत करून पुन: दौलत सावरावी म्हणून निकड लावीत होता. आपला मुलगा सॉक्रेटिसच्या शिकवणीमुळे बिघडला व आपले ऐकेनासे झाला असे वाटून ॲनिटसचा द्वेष भडकला असल्यास त्यात नवल करण्यासारखे काहीच नाही. सॉक्रेटिस हा माझ्या मुलासारख्या दुसऱ्याही अनेक मुलांना बिघडवीत असेल तर त्याला एकदा चांगलाच वठणीवर आणावा असा ॲनिटसचा विचार होऊन त्याने सॉक्रेटिसवर फिर्याद केली असेल. कित्येकांचा तर असा तर्क आहे, की सॉक्रेटिसच्या निंदेने ओतप्रोत भरलेले 'मेघमाला' नावाचे विनोदी नाटक लिहिण्यास ॲरिस्टोफेनसला ॲनिटसकडूनच प्रेरणा मिळाली होती व पुढे मिलीटसला फिर्याद करण्यासही त्यानेच सल्ला दिला असावा.

सारांश, सॉक्रेटिसने आपल्या टीकास्त्राने अनेक शत्रू उत्पन्न केले होते व जरी त्यांची संख्या प्रथम प्रथम क्षुल्लक वाटली असली तरी हळूहळू हा शत्रुपक्ष बळावत जाऊन तोच अखेर विजयी झाला, असे म्हटले पाहिजे. सॉक्रेटिसच्या आत्मसमर्थनपर भाषणातही याच प्राचीन व दृढमूल द्वेषाची अधिक भीती असल्याचे व्यक्त झाले आहे.

सॉक्रेटिसवरील फिर्यादीला खाजगी द्वेष कारण झाला हे काही अंशी खरे मानले तरी तेवढ्यानेच सर्व प्रसंगाची उपपत्ती लागत नाही. सॉक्रेटिसवरील फिर्याद जर केवळ खाजगी द्वेषामुळेच झाली असेल तर ती आधीच का झाली नाही, हे सांगता येत नाही. खाजगी द्वेषाला काही राजकीय गोष्टीची जोड मिळाल्यामुळेच या फिर्यादीला काही स्वरूप आले. या राजकीय उलाढाली काय झाल्या त्यांचे स्वरूप संक्षेपतः सांगावयाचेच आहे. केवळ खाजगी द्वेष अशा अकल्पित रीतीने फळास आला असता हे संभवत नाही. सॉक्रेटिसविषयी लोकांची मते दुर्ग्रहदूषित झाली नसती तर सॉक्रेटिसच्या मरणोत्तर सहा वर्षांनी त्याच्या समर्थनासाठी एक ग्रंथ लिहिण्याची झेनोफनला स्फूर्तीच झाली नसती. सारांश, या फिर्यादीच्या मुळात केवळ व्यक्तिद्वेष नसून काही दीर्घकालिक दुर्ग्रह असले पाहिजेत, हे उघड आहे.

अशा अनेक दुर्ग्रहांपैकी पहिला मोठा दुर्ग्रह म्हणजे सॉक्रेटिस हा सोफिस्ट आहे, हा होय. आम्ही एका स्वतंत्र प्रकरणामध्ये सॉक्रेटिस व सोफिस्ट यांजमधील भेद स्पष्ट करून दाखविला आहे व वेळोवेळी त्याजविषयी अन्यत्रही उल्लेख केला आहे, त्यावरून सॉक्रेटिस व सोफिस्ट हे एक नव्हेत, हे स्पष्ट दिसेल; परंतु जी गोष्ट आज स्पष्टशी वाटते ती त्यावेळी तशी नव्हती. या दुर्ग्रहालाच सॉक्रेटिस हा भौतिक शास्त्राभ्यासी आहे, या समजुतीचीही जोड मिळाली व या उभयविध स्वरूपाचे ऐक्य करून ॲरिस्टोफेनसने त्याची भूमिका रंगभूमीवर आणली होती. ॲरिस्टोफेनसने 'मेघमाला' हे नाटक केवळ व्यक्तिद्वेषानेच लिहिले हे म्हणणे अतिशय धाष्टर्याचे होईल. खुद्द प्लेटोच्या 'सिंपोसियम' या संवादावरून पाहिले तर ॲरिस्टोफेनस हा सॉक्रेटिसचा कट्टर शत्रू होता, असे दिसत नाही. मग असे असून त्याने सॉक्रेटिसवर निंदेचा असा भडिमार का केला? व ही निंदाही एकाच नाटकात नव्हे, तर 'मेघमाला' या नाटकानंतर

अठरा वर्षांनी लिहिलेल्या 'दर्दुर' (Frogs) या नाटकातही सॉक्रेटिसवर तसाच आरोप केला आहे. यावरून हे स्पष्ट होते, की ॲरिस्टोफेनसच्या मनातील अढी ही अल्पस्वल्प कारणाने उत्पन्न झालेली नव्हती. आपल्या देशाचे कल्याण करण्याच्या बुद्धीनेच त्याने सॉक्रेटिसवर टीका केली. सॉक्रेटिसचा चांगुलपणा आपणास जसा आता स्पष्ट दिसतो तसा त्या काळी तो नव्हता. उलटपक्षी त्याचे सोफिस्ट लोकांशी जे साम्य होते तेच प्रामुख्याने पुढे येऊन प्रचलित गैरसमजाला अधिक उत्तेजन मिळे. सॉक्रेटिस अज्ञान पत्करतो म्हणजे ज्ञानाची शक्यताच नाकारतो. एखाद्या प्रश्नाच्या दोन्ही बाजू दाखवितो म्हणजे चांगले ते वाईट व वाईट ते चांगले, कसे दाखवावे हे शिकवितो. ज्या मनुष्याला अक्कल आहे तोच खरा गुरू असे म्हणतो, याचा अर्थ सॉक्रेटिसचे वचन पाळण्यासाठी आई-बापांची अवज्ञा करण्यास फूस देतो, अशा रीतीचा गैरसमज होणे अपरिहार्य होते. सोफिस्टांची विचारपरंपरा देशहिताला विघातक असल्यामुळे खुद्द ॲनिटस त्यांचा किती द्वेष करी, याचा मासला प्लेटोच्या मेनोमध्येही आलाच आहे.

याच्याच जोडीचा जो भौतिकशास्त्रवादित्वाबद्दलचा दुर्ग्रह त्याजविषयी अधिक काही लिहावयास नको. वास्तविक जी विचारसरणी ॲनॅक्झॅगोरॅसची होती तीच सॉक्रेटिसच्या नावावर लादली गेली होती व या नजरचुकीबद्दल सॉक्रेटिस आपल्या भाषणात मिलीटसला बजावीत आहे.

सॉक्रेटिसच्या मतांचे दिग्दर्शन करताना मागील एका प्रकरणात असे दाखविण्यात आलेच आहे, की त्याची राजकीय मते त्यावेळच्या प्रचलित मतांहून फार भिन्न व अथेन्स येथील लोकसत्तात्मक पद्धतीशी विरुद्ध होती. सर्व राजकीय सत्ता ज्ञात्यांच्या ताब्यात असावी. असे त्यांचे म्हणणे होते. ती सत्ता काही निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हातात असणे अगदी वाईट आहे, असे त्याचे मत होते व या पद्धतीची तो चेष्टाही करी. नौका कोणी चालवावी, रोग्याला औषध कोणी द्यावे, याविषयी मते घेऊन ठराव करणे व त्याप्रमाणे वागणे हे जसे मूर्खपणाचे, तसेच सर्व लोकांतून बहुमताने सत्ताधीश निवडणे हेही मूर्खपणाचे आहे, असे तो बिनदिक्कत म्हणे. सॉक्रेटिसची ही कल्पना अभिजनसत्ता किंवा नियतसत्ता (Oligarchy) या कल्पनेसारखीच आहे व अथेन्समधील लोक तर या दोन्ही पद्धतीचा अत्यंत तिटकारा करीत असत व या मतांचा प्रवर्तक म्हणून सॉक्रेटिसचे वर्तन आक्षेपार्ह वाटत होते. त्यातही हा मुद्दा विशेष पुढे येण्यास कारण अथेन्समधील त्यावेळच्या राजकीय उलाढाली झाल्या. सुमारे एक पिढीपर्यंत पेलॉपोनीशियन युद्धात लढून लढून अथेन्समधील लोकसत्ता अगदी क्षीण झाली होती व सरतेशेवटी तिला पराजय पत्करून स्पार्टाने नेमलेल्या तीस अंमलदारांच्या जुलमाखाली मान वाकवावी लागली. या तीस अंमलदारांनी जो कहर गुदरविला त्याची साक्ष ग्रीक इतिहास देत आहे. चौकशीवाचून देहान्तशासनाच्या शिक्षा झाल्या, परकीय शिपायांचा अथेन्सवर पहारा बसला व लोकांना निःशस्त्र करण्यात आले.

जुलमी सत्ताधाऱ्यांना जी जी म्हणून अनन्वित कृत्ये करता येणे शक्य आहे ती ती कृत्ये करून व करवून या तीस जुलमी अंमलदारांनी अथेन्समधील लोकांची मने पिळवटून काढली होती. अशा या संकटस्थितीतून थ्रॅसिब्यूलसच्या शौर्याने अथेन्स नुकतेच सुरक्षित बाहेर पडले होते व लोकसत्तेचा खुरटलेला किंवा जळून गेलेला वृक्ष पुनः टवटवीत दिसू लागला होता. ज्या महनीय देशभक्तांनी या राजकारणामध्ये महत्त्वाचा कार्यभाग घेतला होता, त्यापैकीच ॲनिटस हाही एक असून त्याने या कामी पुष्कळच झीज पत्करली होती. अशा प्रसंगी जी एक साहजिक प्रातिगतिक लाट उसळली, तीही सॉक्रेटिसच्या फिर्यादीला अंशतः कारण झाली. जे जे अभिजनसत्ताप्रवर्तक किंवा नियतसत्तानुकूल असेल ते ते चिरडून टाकावे, असे लोकांना वाटत असताच त्याजपुढे सॉक्रेटिसची लोकसत्ता प्रतिकूल मते आली, तर त्या मतांना व त्यांचा प्रवर्तक जो सॉक्रेटिस त्याला बुडवून टाकावे, अशी लोकांची इच्छा होणे साहजिक आहे. ॲनिटसच्या मनात सॉक्रेटिसबद्दल खाजगी द्वेष होताच, मग देशभक्तीसारख्या महनीय गुणांच्या नावाखाली आपला खाजगी सूड उगवून घेण्याची संधी तो कसा दवडील? व त्याचे म्हणणे काही अंशी खरे असल्यामुळे लोकांना तरी तो लबाड आहे असे कसे वाटेल? ज्या मनुष्याने एवढा स्वार्थत्याग करून संस्थानाचा बचाव करण्यास उदारबुद्धीने मदत केली, तो पुरुष कारणाशिवाय कोणावर आरोप करणार नाही, सॉक्रेटिसची मतेच मोठी घातक आहेत, त्याचे बुद्धिमानाचे राज्य म्हणजे तीस अंमलदारांसारखीच एक देशविघातक संस्था व अशा दुष्टमतांचा प्रवर्तक म्हणजे एक प्राणदंडाला योग्य असा अपराधी, असे लोकांचे मत होणे अगदी साहजिक आहे.

सॉक्रेटिसचा क्रिटियस, झेनोफन, अलकिबायडिस इत्यादी पुरुषांशी असलेला संबंध म्हणजे या द्वेषाग्नीत घृताचा वर्षावच. सॉक्रेटिस हा कधी स्वतः राजकारणात शिरला नाही व अधिकाराच्या जागा मिळविण्यासाठी त्याने कधी खटपट केली नाही हे खरे; परंतु आपल्या मित्रांपैकी जे कोणी राजसत्तेला योग्य त्यांना राजकारणात शिरण्याविषयी तो उपदेश करी व त्याला अयोग्य वाटत त्यांना त्यापासून परावृत्तही करी. अर्थात्, ज्या मनुष्याला सॉक्रेटिसने राजकारणात शिरण्याचा सल्ला दिला असा मनुष्य जे जे करील ते ते सॉक्रेटिसच्या मनाला अनुकूल किंवा त्याच्या शिकवणीचेच फळ, असेच लोकांस वाटणार. सॉक्रेटिसच्या अशा मित्रांपैकी क्रिटियस हा एक असून, तो तीस अंमलदारांपैकी एक असता त्याने केलेल्या अत्याचारांची स्मृती त्यावेळी अगदी ताजी होती व अशा दुष्ट व नीच मनुष्याचा सॉक्रेटिस गुरू, मग तोही तसाच दुष्ट असला पाहिजे, या समजुतीने क्रिटियसच्या जुलमांतून सुटलेल्या लोकांनी त्याच्या गुरूवर सूड उगवून घ्यावा हे रास्तच आहे. 'शिष्यापराधे गुरोर्दंडः' ही म्हण अशाच प्रकारे कित्येक प्रसंगी आचारात आली आहे. बरे, लोकसत्तेच्या डोळ्यात सलणारा व सॉक्रेटिसच्या शिष्यात मोडणारा क्रिटियस एकटाच होता काय? झेनोफन आणि च्यारमिडीस यांनाही त्यांच्या स्पार्टावरील प्रीतिस्तव अथेन्समधून हद्दपारीची शिक्षा झालीच

होती व सॉक्रेटिसवरील फिर्यादीच्या प्रसंगी ते हद्दपारच होते. अलकिबाइडिस हा काही लोकसत्तेच्या विरुद्ध नव्हता; पण त्याने दुसऱ्या बाजूच्या अतिरेकाने, त्याच्या हद्दपारीनंतर केलेल्या देशद्रोहाने, एकंदर दुर्गुणी वर्तनाने आपले नाव बद्द करून घेतले होते व याबद्दलचाही दोष सॉक्रटिसकडे 'गुरू' या नात्याने येत होता. सॉक्रेटिसविरुद्ध लोकांस चिथविताना त्याचे प्रतिपक्षी हीच उदाहरणे दाखवून सॉक्रेटिसच्या शिक्षणाचा परिणाम काय आहे, तो प्रत्यक्ष पाहा, म्हणून सांगत असतील. ज्या वृक्षाला अत्यंत विषमय फळे येतात, तो वृक्षच विषमय पाहिजे व त्याला समूळ उपटून काढल्याशिवाय स्वस्थता होणे शक्य नाही, असा ते लोकांना उपदेश करीत असत.

सॉक्रेटिसवर येणारा हा आक्षेप अगदी वृथा होता, असे म्हटले पाहिजे. क्रिटियस किंवा अलकिबायडिस सॉक्रेटिसकडे येत ते बहुतकरून त्याच्या वादविवादातील कोट्या शिकावयास येत. हे दोघेही पुरुष अतिशय महत्त्वाकांक्षी असल्यामुळे जनसमूहावर छाप बसविण्याची विद्या अवगत करण्याची त्यांची जबरदस्त इच्छा होती व ती पूर्ण होण्यास सॉक्रेटिसच्या संगतीचा उपयोग होईल, अशी कल्पना झाल्यामुळे ते त्याजकडे येत. त्यांची खरी मते किंवा खऱ्या आकांक्षा फार निराळ्या असत व प्रसंगविशेषी त्यांचा मोठा विरोधही येत असे. क्रिटियसच्या बाबतीत तर हा विरोध फारच स्पष्ट आहे. क्रिटियस हा तीस जुलमी अंमलदारांपैकी एक असता त्याने व दुसऱ्या एका अधिकाऱ्याने सॉक्रेटिसला आपल्यासमोर बोलावून आणून उपदेश करणे बंद करण्याबद्दल हुकूम दिला होता. सॉक्रेटिसने सॅलॅमिसहून लिऑन या नावाच्या मनुष्याला फूस लावून आणावे व त्या अंमलदारांच्या स्वाधीन करावे, असाही हुकूम फर्माविला होता. सॉक्रेटिसने यापैकी पहिल्या हुकमाच्या नुसत्या चिंधड्या उडविल्या व दुसऱ्या हुकमाला धाब्यावर बसविले. जर क्रिटियसच्या मनात सॉक्रेटिसबद्दल आदर असता, फार काय पण त्याच्या अत्युत्कट दृढनिश्चयाची स्पष्ट कल्पना असती, तरी त्याने असा प्रसंग घडू दिला नसता. मग सॉक्रेटिसला 'गुरू' म्हणून मोठा मान देण्याचे तर बाजूलाच राहिले. सॉक्रेटिसने त्यावेळी अगदी जिवावर उदार होऊनच त्या जुलमी हुकमाला दाद दिली नाही. क्रिटियस आपला शिष्यच आहे, तेव्हा आपणास फारसा त्रास पोहोचणार नाही, अशी अपेक्षा करण्यास त्याला पुरेशी कारणे खास नव्हती.

अलकिबायडिसच्या बाबतीतही हा विरोध स्पष्ट होता. अलकिबायडिस तरुण होता, सुंदर होता, मोहक होता व सॉक्रेटिसचे त्याजवर प्रेम होते, यात काही संशय नाही; परंतु अलकिबायडिसच्या उच्छृखल मनोवृत्तीला, फाजील महत्त्वाकांक्षेला त्याने फूस तर दिलीच नाही; पण उलट याबद्दल त्याची निर्भर्त्सना करून त्याच्या डोळ्यात अंजन घालण्याचे सामर्थ्य व धारिष्ट्य एका सॉक्रेटिसलाच असे. सॉक्रेटिसचा आपणावर फार वचक आहे याचे खुद्द अलकिबायडिसलाच वैषम्य वाटू लागे व तो त्यापासून शक्य तितका दूर राहण्याचा प्रयत्न करी. त्याच्या मोहक भाषणाला आपण बळी पडलो तर जन्मभर त्याच्या पायाशी

तत्त्वज्ञानाचा अभ्यास करता करताच आपले केस पांढरे होतील, जगातील मौज किंवा अधिकार यांचा आपणास लाभ होणार नाही, अशी त्याला भीती वाटे. फार काय पण सॉक्रेटिस मरेल तर फार उत्तम असेही त्याला वाटे. तो मेला तर आपणास वाईट वाटेल हेही लगेच आठवून अलकिबायडिस मोठा भांबावून जात असे.*

प्लेटोच्या 'सिंपोसियम'मधील अलकिबायडिसच्या वरील उद्गारांना ऐतिहासिक महत्त्व नाही, असे गृहीत धरून चालले तरीही त्याच्या व सॉक्रेटिसच्या संबंधाविषयी स्वतः प्लेटोचे मत त्यात दृग्गोचर होत असल्यामुळे त्यास फार महत्त्व आहे. अलकिबायडिस किंवा क्रिटिपस जर नेहमी सॉक्रेटिसजवळ राहून व त्याच्या मताप्रमाणे वागूनही बिघडले असते तर तो दोषार्ह ठरला असता; पण वस्तुस्थिती याहून अगदीच निराळी होती. पूर्वग्रहदूषित शत्रूपक्षाला या गोष्टी न समजाव्यात व समजल्या तरी त्या त्यांनी छपवाव्या व त्या तशा छपल्या जाव्यात हे साहजिक आहे. कारण सॉक्रेटिसची काही राजकीय मते अशा दुर्ग्रहाला अनुकूल आहेत, हे वर लिहिलेच आहे.

सॉक्रेटिसविषयी अशा त-हेचे दुर्ग्रह होणे हे इतके अपरिहार्य होते, की त्याजवर अखेर खटला झाला, हे मुळीच आश्चर्यकारक नसून तो होण्यास इतका कालावधी लागला हेच आश्चर्य आहे. असे प्रसिद्ध इतिहासकार 'ग्रोट' यांचे मत आहे. सॉक्रेटिसची राजकारणविषयक किंवा धर्मविषयक काहीही मते असली तरी त्याची स्वतःची प्रत्यक्ष कृती अगदीच

---

* But this Marsyas has often brought me to such a pass, that I have felt as if I could hardly endure the life which I am leading and I am conscious that if I did not shut my ears against him and fly as from the voice of the siren, my fate would be like that of others - he would transfix me and I should grow old sitting at his feet. For he makes me confess that I ought not to live as I do, neglecting the wants of my own soul and busying myself with the concerns of the Athenians; therefore I hold my ears and tear myself away from him. And he is the only person who ever made me ashamed, which you might think not to be in my nature, and there is no one else who does the same. For I know that I cannot answer him or say that I ought not to do as he bids, but when I leave his presence, the love of popularity gets the better of me. And, therefore I run away and fly from him and when I see him I am ashmed of what I have confessed to him. Many a time, have I wished that he were dead and yet I know that I should be much more sorry than glad, if he wre to die : so that I am at my wit's end.

Plato: Symposium (Jowett)

अनाक्षेपार्ह होती व प्रत्यक्ष कृतीवाचून केवळ विचार हे कायद्याने शिक्षेस पात्र नसल्यामुळे सॉक्रेटिसला सवड मिळाली असावी किंवा व्यक्तिस्वातंत्र्याची चहा करणाऱ्या अथीनियन लोकांना सॉक्रेटिसलाही मतस्वातंत्र्य असलेच पाहिजे, असे वाटून त्यांनी तिकडे जाणूनबुजून कानाडोळा केला असावा. तीस अंमलदारांची सत्ता झुगारल्यावर जी उलट लाट फिरली त्यावेळी मात्र हे विचार सामर्थ्यशून्य झाले असावेत.

या किंवा अशाच काही कारणांनी सॉक्रेटिसवर फिर्याद दाखल झाली खरी. इ. स. पूर्वी ३९९ व्या वर्षी मिलीटस, ॲनिटस व लिकॉन या तिघांनी मिळून सॉक्रेटिसवर फिर्याद केली व कायद्याप्रमाणे एक आरोपपत्रक 'किंग आर्कन' म्हणून जो अधिकारी असे त्याच्या कचेरीत दाखल केले. मिलीटस हा एक कवी होता. ॲनिटस हा लोकपक्षीय पुढारी होता व लिकॉन हा एक अप्रसिद्ध वक्ता होता. आरोपपत्रकात असे लिहिले होते की, 'सॉक्रेटिस हा गुन्हेगार आहे. कारण तो शहराला पूज्य असलेल्या देवांची पूजा करीत नाही; परंतु आपल्याच पदरच्या नव्या देवता काढतो व शिवाय तरुणांची मने बिघडवितो. या अपराधाला योग्य शिक्षा म्हणजे देहान्त शासन.'

ज्यावेळी अशी फिर्याद झाली, त्यावेळी तिचा नि:संशय प्रतिकूलच निकाल होईल, असे सॉक्रेटिसच्या मित्रांनाही वाटले नसावे. सॉक्रेटिसला स्वतः मात्र असे खास वाटले होते, की आपणास शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही. तथापि, त्याने आपले समर्थन करण्याची काहीच तयारी चालविली नाही. उलट युथिफ्रोमधील हकीगत पाहता ही फिर्याद दाखल झाल्यानंतरही सॉक्रेटिसचा नित्यक्रम अबाधित चालला होता, असे दिसते. त्यावेळी अथेन्समध्ये अशी चाल असे, की ज्यावर फिर्याद झाली असेल त्याने स्वत: भाषण करून आपली बाजू पुढे मांडावी. अशा प्रसंगी लोक आपण स्वतः भाषणे लिहून पाठ करीत किंवा आपणास न साधल्यास दुसऱ्याकडून एखादे सुंदर भाषण लिहून आणून तेच पाठ करून बोलण्याचा प्रघात असे. सॉक्रेटिसवर फिर्याद झाली तरी तो या बाबतीत अगदी स्वस्थ होता. त्याचा एक मित्र हार्मोजिनीस त्याजकडे येऊन त्याला असे न करता काहीतरी भाषण तयार करण्याविषयी सांगू लागला. तेव्हा तो म्हणाला, 'मी आजपर्यंत जे निर्दोष व न्याय्य आचारण केले तीच माझी आत्मसमर्थनाची पूर्वतयारी आहे. इतके असूनही मी कदाचित एखादे भाषण तयार करवून ठेवले असते; परंतु एकदा मी तशी जुळवाजुळव करू लागलो असता, मला नेहमीच्या अंतःसाक्षात्काराने कळविले, की असे करू नकोस. परमेश्वराच्या दृष्टीने मी अधिक जगण्यापेक्षा मरणेच बरे असे असावे. नाहीतर अशी सूचना मला मिळाली नसती. आजपर्यंत मी मोठ्या समाधानात दिवस घालविले. कारण माझ्या नैतिक प्रगतीची जाणीव व स्नेही मंडळींचा अकृत्रिम लोभ, यांनी मला आनंद दिला. आता कदाचित माझी इंद्रिये शिथिल होतील, माझी बुद्धी मंद होईल व माझे आयुष्य मला अगदी असह्य होईल. उलटपक्षी, जर मला आताची मरणाची शिक्षा झाली तर ती अन्यायाची असल्यामुळे, मजकडे काही एक दोष न येता माझी कीर्ती वाढेल.'

याप्रमाणे आपल्या मनाचा निश्चय करून सॉक्रेटिसने भाषणाची पूर्वतयारी केली नाही. आपला नेहमीचा साधेपणा कायम ठेवून केवळ सत्य प्रतिपादन करावयाचे असा त्याचा बेत होता. फिर्यादी पक्षाकडून कशी कशी भाषणे करण्यात आली याविषयी आपणास काही माहिती नाही; पण सॉक्रेटिसविषयी लोकांची मने दुर्ग्रहदूषित होण्यास जी कारणे मागे दिग्दर्शित केली आहेत, त्यांजवर जोर देऊन त्यांनी आपली बाजू पुढे मांडली असावी. त्यांचा पुरावा झाल्यावर सॉक्रेटिसची बोलावयाची पाळी आली, त्यावेळी त्याने जे भाषण केले ते प्लेटोने 'ॲपॉलजी' या नावाने लिहून प्रसिद्ध केले. या भाषणात प्लेटोने वस्तुस्थितीला धरून ऐतिहासिक अंशच अधिक सांभाळून ठेवला असल्यामुळे पुढे सॉक्रेटिसचे हेच सबंध भाषण थोडाफार फरक करून दिले आहे. झेलरने या भाषणाचे असे वर्णन केले आहे, की ज्याप्रमाणे एखादा अपराधी गयावया करतो, त्याप्रमाणे त्या भाषणात मुळीच वर्तन नसून, ज्याप्रमाणे एखादा मध्यस्थ केवळ सत्य प्रतिपादनाने भ्रमनिरास करण्याचा यत्न करतो. अगर एखादा देशभक्त त्याला अविचाराने शिक्षा होत असेल तर गंभीर सूचना देतो, त्याप्रमाणे सॉक्रेटिसचे वर्तन होते. फिर्यादीचे अज्ञान त्यांना कबूल करावयास लावावे व त्यांनी केलेले आरोप या टीकेने उडवून टाकावेत, हीच त्याची इच्छा आहे. कोर्टाची अगदी बेअदबी होईल, अशी त्याने भाषा वापरली नाही. हे खरे. परंतु त्यांच्या निकालाविषयीची बेपर्वा त्यात स्पष्ट आहे. परमेश्वराच्या प्रेरणेने प्राप्त झालेले कर्तव्यकर्म प्राणान्तीही सोडवायचे नाही, हा निश्चय त्यामध्ये उत्कटतेने दिसून येतो.

सॉक्रेटिसचे आत्मसमर्थन

सॉक्रेटिस म्हणाला, अथीनिअन देशबंधूंनो,

मजवर आरोप ठेवणाऱ्यांच्या भाषणाचा आपणावर काय परिणाम झाला असेल हे मला सांगता येत नाही; पण त्यांचे भाषण इतके परिणामकारक झाले, की माझे आत्मभान नाहीसे

---

* The language is not that of a criminal, wishing to save his life, but that of an impartial arbiter - who would dispel erroneous notions by a simple setting forth of the truth or of a patriot warning against wrong doing and overhaste. He seeks to convince the accuser of his ignorance, to refute the accusation by criticism. At the same time, dignity and principle are never so far fotgotten as to address the judges in terms of entreaty. Their sentence is not feared, whatever it may be. He stands in the service of God and is determined to keep his post in the face of every danger. No commands shall make him faithless to his higher calling or prevent him from obeying God rather than the Athenians.

(Zeller : Socrates and the Socratic schools.)

झाले. तथापि, त्यांच्या भाषणात एक अक्षरदेखील खरे नाही; परंतु त्यांच्या असत्य भाषणात एक विधान मला फारच आश्चर्यकारक वाटले. माझ्या वक्तृत्वप्रवाहात वाहून न जाण्याची आपण खबरदारी घ्यावी, असे त्यांचे म्हणणे आहे. मी बोलावयास सुरुवात केल्याबरोबर माझ्या वक्तृत्वहीनतेची आपणास खात्री पटण्यासारखी असल्यामुळे व या गोष्टीबद्दल त्यांचीही खात्री असल्यामुळे तर मला हे विधान अत्यंत लज्जास्पद वाटते. आता वक्तृत्व म्हणजे सत्याचे सामर्थ्य असाच जर त्यांच्या मनातील अर्थ असेल, तर मात्र मी खास मोठा वक्ता आहे; परंतु माझ्या वक्तत्वाची सरणी त्यांच्या सरणीपेक्षा किती भिन्न आहे! असो. माझा सांगण्याचा मुद्दा एवढाच की त्यांनी जरी मुळीच सत्यभाषण केले नसले तरी मी जे जे सांगणार, ते ते सर्वस्वी सत्य आहे; परंतु त्यांच्या पद्धतीप्रमाणे मी ते अलंकारिक भाषेत ललितपदन्यासांनी सांगणार नाही. स्वयंस्फूर्तीने मला जे शब्द किंवा मुद्दे सुचतील त्यांचाच मी उपयोग करीन. कारण माझ्या पक्षाच्या न्याय्यत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. माझ्या वयाच्या पुरुषाने आपल्यापुढे एखाद्या होतकरू पण शिकाऊ वक्त्याप्रमाणे भाषण करणे हे अनुचित होय आणि मी तसे करण्याची आपण अपेक्षा बाळगू नये. याकरिता मला आपणास एवढीच विनंती करावयाची, की माझी बाजू आपणापुढे मांडताना जर मी माझ्या नेहमीच्या सरावाप्रमाणे बाजारात अगर सराफकट्ट्यात किंवा इतरत्र प्रचारात असलेले शब्द वापरले, तर आपण आश्चर्यचकित होऊन केवळ याच कारणाकरिता माझ्या भाषणास अडथळा आणू नये. आता माझी उमर सत्तर वर्षांवर आली असून, कोर्टाची पायरी चढण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळे, कोर्टाची भाषा ही मला अगदी परकी आहे. म्हणून जणू काय मी एखादा परदेशीय मनुष्य असून, आपल्या देशातील रिवाजाप्रमाणे व आपल्याच मातृभाषेत बोलत आहे, असे समजून आपण मला क्षमा करावी. ही माझी विनंती गैरवाजवी आहे काय? माझी पद्धत चांगली आहे किंवा नाही, याचा विचारच सोडून द्या व मी म्हणतो ते खरे आहे किंवा नाही, इकडे सर्व लक्ष द्या. वक्त्याने सत्यभाषण करावे व न्यायाधीशाने न्यायाने निवाडा द्यावा.

माझ्यावर यापूर्वीच जे जुने आरोप लादण्यात आले आहेत, त्यांजविषयी व ते आरोप ठेवणारांविषयी आधी बोलून मग मी प्रस्तुतच्या आरोपांकडे व फिर्यादीकडे वळेन. कारण यापूर्वीच कित्येकांनी मजवर खोटे आरोप लादले आहेत आणि हे आरोप पुष्कळ वर्षांचे असल्यामुळे प्रस्तुतच्या खटल्यातील वादी ॲनिटस व त्याचे साथीदार याजपेक्षा मला त्यांची अधिक भीती वाटत आहे. कारण ॲनिटस व त्याचे साथीदार हे भयंकर असले तरी त्याजपेक्षा हे जुने वादी अधिक भयंकर आहेत. तुम्ही सर्व जेव्हा अज्ञ बालके होता तेव्हाच त्यांनी तुमचे कान भरले आहेत. त्यांच्या मते सॉक्रेटिस हा कोणी आत्मसंभावित पंडित असून, आकाशपाताळातील वस्तूंची उठाठेव करणारा व असत्य वस्तूही सत्यस्वरूप आहेत, असे भासविणारा आहे. माझ्याविरुद्ध अशी कंडी ज्यांनी पिकविली त्यांचीच मला

आज विशेष भीती वाटत आहे. अशी कंडी ऐकून कोणाचाही असा समज होतो, की अशा नसत्या उठाठेवी करणाऱ्या मनुष्याचा साहजिकच देवांवर विश्वास नसावा. दुसरे असे की, हे वादी पुष्कळ असून, मी एकटा आहे, त्यांचे आरोप जुने असून तुम्ही बाल किंवा तरुण असताना तुमच्या कोवळ्या मनावर त्यांचा अधिक परिणाम झाला असल्यामुळे, माझे बोलणे तुम्हास कदाचित तितके रुचणार नाही, हेही संभवनीय आहे आणि त्यावेळी वरील आरोपांना कोणीच उत्तर न दिल्यामुळे त्यांचा एकतर्फी निकाल होऊनही गेला आहे आणि सर्वांत मोठी अडचण म्हणजे हीच, की हा आरोप लादणाऱ्यांची नावानिशी मला देता येणार नाही. फार झाले तर एखाद्या* विनोदी नाटककाराचे मी नाव सांगू शकेन. या सर्व लोकांनी मत्सराने व द्वेषाने आपली मने कलुषित करून घेऊन तुमचीही मने दूषित केली आहेत आणि या वर्गातील कोणालाही मला आज कोर्टात बोलावून त्याची फेरतपासणी करता येत नसल्यामुळे आत्मसमर्थनाकरता मी त्यांना सवाल करणे म्हणजे केवळ छायेशी वाग्युद्ध करण्यासारखेच आहे. सारांश. माझ्या सांगण्याप्रमाणे मजविरुद्ध जुने व नवे. असे दोन तऱ्हेचे वादी आहेत असे समजून त्यांपैकी प्रथमच्या वादींना आधी उत्तर देणे हेच अधिक प्रशस्त आहे, असे आपणास वाटेल. कारण त्यांनी मजवर केलेले आरोप फार पूर्वीचे व पुष्कळदा उच्चारलेले आहेत.

असो. मला माझा पक्ष आपणापुढे मांडला पाहिजे व पुष्कळ काळापर्यंत रूढ झालेली निंदा अल्पावकाशात दूर केली पाहिजे. मला यश येणे हे माझ्या व तुमच्या हिताचे असेल किंवा माझ्या पक्षाला अनुकूल असेल तर तसे होईल. हे काम सुकर नाही हे मला ठाऊक आहे आणि म्हणून यशापयशाचा भार देवावर सोपवून मी कायद्याप्रमाणे माझा पक्ष आपणापुढे मांडीत आहे.

प्रथमत: ज्या आरोपाच्या जोरावर वादी मिलीटस याने मजवर फिर्याद केली आहे, तो निंदामूलक आरोप मी आपणास सांगतो. माझ्या विरुद्ध कंड्या पिकविणारे जणू काय फिर्यादी आहेत, अशी कल्पना करून मी त्यांची कैफियत सादर करतो. ते म्हणतात, 'सॉक्रेटिस हा एक विचित्र पापकर्मा आहे. स्वर्गमृत्युपाताळातील गोष्टींची उठाठेव करून, वाईट असेल तेच चांगलेसे भासवून, आपली मते सर्वत्र प्रसृत करतो.' हे माझ्यावरील आरोपाचे सामान्य स्वरूप आहे व ॲरिस्टोफेनसच्या प्रहसनामध्ये आपण हेच वारंवार पाहिले आहे. त्या प्रहसनामध्ये एक सॉक्रेटिस म्हणून पात्र दाखविले आहे. हा सॉक्रेटिस 'मी हवेवर चालतो' इत्यादी बालिश भाषणे करीत हिंडणारा आहे आणि मला मुळीच अवगत नाहीत, असे त्याच्या भाषणाचे विषय आहेत. भौतिकशास्त्राचा अभ्यास करणारांची निंदा करण्याचा माझा हेतू नाही; परंतु मिलीटसला मजवर असा आरोप लादणे शक्य असते तर

---

* हा विनोदी नाटककार म्हणजे 'Clouds' किंवा 'मेघमाला' या हास्यरसप्रचुर व सॉक्रेटिसच्या निंदेने ओतप्रोत भरलेल्या नाटकाचा कर्ता, ॲरिस्टोफोनस हा होय.

त्याजबद्दल मला खरोखरच वाईट वाटले असते; परंतु अथीनिअन बंधूंनो, खरे पाहिले असता भौतिकशास्त्रातील विशृंखल विचारांशी मला काही एक कर्तव्य नाही. मी बोलतो ते सत्य आहे याबद्दल येथे जमलेल्यांपैकी कित्येक जण साक्ष देतील. ज्यांनी माझे भाषण ऐकिले असेल त्यांनी निःपक्षपातबुद्धीने आपले मत आपल्या शेजारच्यांना सांगावे... तुम्ही त्यांचे उत्तर ऐकतच आहा आणि माझ्या आरोपातील या भागाच्या स्वरूपावरूनदेखील आपणास इतर भागातील सत्यतेविषयी सहजच प्रचीती येईल.

मी शिक्षक असून पैसे घेतो हे म्हणणे तितकेच निराधार व असत्य आहे. तथापि, जर एखाद्या मनुष्याच्या जवळ त्याच्या जातिबांधवांना शिकविण्यासारखेच काही असेल तर ते शिकविण्याबद्दल पैसे मिळविणे हे मी उलट भूषणास्पदच समजतो. लिओटियमचा गॉर्गिअस, सिऑसचा प्रॉडीकस आणि इलिसचा हिपायस हे शहरोशहरी हिंडत जातात व प्रत्येक ठिकाणी तरुण मंडळी आपल्या देशबांधवांकडून फुकट मिळणारे शिक्षण सोडून त्यांजजवळ शिकावयास जातात आणि त्यांना पैसे देतात. एवढेच नव्हे तर पैसे देऊन तरी असे शिक्षण मिळविण्याची संधी दिल्याबद्दल ते त्यांचे आभार मानतात. हल्लीच अथेन्समध्ये पेरिआचा एक तत्त्वज्ञानी आला आहे. त्याजविषयीची मला माहिती लागण्याचे कारण असे झाले, की हिपोनिकसचा मुलगा कॅलिअस हा मला भेटला. त्याने सोफिस्ट लोकांच्या पायी पाण्यासारखा पैसा खर्च केला होता. कॅलिअसला मुलगे आहेत हे मला ठाऊक होते, म्हणून मी म्हटले 'कॅलिअस, जर तुझी मुले म्हणजे आपली शिंगरे किंवा वासरे असती, तर त्यांना कोणाच्या देखरेखीखाली ठेवावयाचे हा प्रश्नच पडला नसता. एखाद्या रिंगमास्तराच्या किंवा शेतकऱ्याच्या हवाली त्यांना करून दिले असते म्हणजे त्यांनी त्यांच्या गणांचा पूर्ण विकास घडवून आणला असता. परंतु ज्याअर्थी तुझी मुले म्हणजे मनुष्यच आहेत, त्याअर्थी तू त्यांना कोणाच्या हवाली करणार आहेस? ज्याला राजकीय आणि नैतिक सद्गुणाचे बरोबर ज्ञान आहे असा कोणी आपल्या परिचयाचा आहे काय? कारण आपणास पुत्र असल्यामुळे आपण या गोष्टीचा विचार केलाच असेल.' कॅलिअसने यावेळी एव्हेनसचे नाव सुचविले व तो पाच मिने* फी घेतो म्हणून सांगितले. मी मनात म्हटले 'खरोखरच एव्हेनसजवळ एवढे सत्यज्ञान असेल व तो ते एवढ्या थोड्या मोबदल्यातच देत असेल तर तो मोठा भाग्यवानच म्हटला पाहिजे! माझे एवढे भाग्य असते तर मी तर चळूनच गेलो असतो; पण खरी गोष्ट कबूल करावयाची म्हणजे मजजवळ तसे ज्ञानच नाही.'

अथीनिअन देशबंधूंनो, आपणापैकी कोणी कदाचित म्हणेल की, 'सॉक्रेटिस, तू म्हणतोस ते सर्व खरे; पण मग तुझ्यावर आलेल्या या आरोपाचे मूळ तरी कशात आहे? तुझे वर्तन तसेच चमत्कारिक असले पाहिजे. जर तुझी वर्तणूक इतरांप्रमाणेच असती तर तुझ्याविरुद्ध

---

* मिना (Mina) हे एक ग्रीस देशातील नाणे होते व त्याची किंमत ४० पौंड किंवा सध्याच्या मानाने ६० रु. होईल.

ही ओरड झालीच नसती. तर त्याच्या मुळाशी काय आहे ते सांग म्हणजे या प्रश्नाचा उतावीळपणाने निकाल लावण्याचा दोष आमच्यावर येणार नाही.' आपणापैकी कोणी असे म्हटल्यास ते योग्यच होणार आहे व म्हणून मला शहाणा ही पदवी मिळूनदेखील माझे नाव बद्द का झाले याचे कारण थोडक्यात सांगतो, तिकडे लक्ष द्या. हा सर्व केवळ थट्टेचा प्रकार आहे, असे आपणांपैकी कोणास वाटेल; पण मी खरे तेच सांगतो, माझी शहाणपणाबद्दल जी एवढी ख्याती झाली आहे ती माझ्या एका विशिष्ट ज्ञानाबद्दल झाली आहे आणि हे ज्ञान म्हणजे मनुष्याच्या बुद्धीला अगम्य असलेले ज्ञान होय आणि असे ज्ञान मला आहे, हे मी कबूल करतो; परंतु मी ज्यांविषयी बोलत आहे, त्यांचे ज्ञान म्हणजे मनुष्यांना अगम्य आहे व त्याचे ज्ञान मलाच नसल्यामुळे हे अतिबौद्धिक ज्ञान काय, याची मला कल्पना देता येणार नाही व मला ही गोष्ट माहीत आहे असे कोणी म्हणत असेल तर ती चूक आहे. मी काहीतरी भ्रमिष्टासारखा बकतो आहे, असे समजून आपण मला व्यत्यय आणू नका. कारण मी म्हणतो याला साक्ष प्रत्यक्ष डेल्फीचा देवच आहे आणि मी शहाणा आहे किंवा नाही व असल्यास कशा प्रकारचा आहे, हे त्याजकडूनच आपणास कळेल. माझा जुना दोस्त कैरिफन हा आपल्या परिचयाचाच आहे. कारण आपल्याबरोबर तो हद्दपार झाला होता व आपणाबरोबरच तो परत स्वदेशी आला. असो. कैरिफन हा प्रत्येक गोष्टीत मोठा नादी असे. तो डेल्फीला गेला व मोठ्या धिटाईने त्याने प्रश्न केला, की सॉक्रेटिसपेक्षा कोणी अधिक शहाणा आहे काय? आणि तेथील अतीन्द्रियवादिनीने उत्तर दिले 'कोणी नाही.' कैरिफन आज हयात नाही; पण त्याचा भाऊ येथे कोर्टात हजर आहे. तो माझ्या म्हणण्यास दुजोरा देईलच.

ही एवढी कुळकथा सांगण्याचे कारण काय, माझे नाव बद्द होण्याचे कारण काय, हे तुम्हास समजविण्याकरिता मी हे सांगत आहे. जेव्हा मी देवाचे हे उत्तर ऐकले, तेव्हा मी मोठ्या घोटाळ्यात पडलो. देवाच्या उत्तराचा अर्थ तरी काय आणि हे कोडे सुटणार तरी कसे? मी खरोखर सर्वांत शहाणा म्हणावे तर मला शहाणपण तर मुळीच नाही. मग मला सर्वांत शहाणा म्हणण्यात देवाचा काय हेतू असावा? देव तर कधी खोटे बोलतच नाही. कारण तो देवच. पुष्कळ विचार केल्यावर हा प्रश्न सोडविण्याची मला एक युक्ती सुचली. जर मजपेक्षा अधिक शहाणा असा इसम मी शोधून काढला तर त्या उदाहरणाच्या जोरावर मला देवाचे म्हणणे खोटे ठरविता येईल. कारण मग मी देवाला असे म्हणू शकेन की, 'हा पाहा माझ्यापेक्षा शहाणा मनुष्य, मग मी सर्वांत शहाणा कसा?' हा विचार ठरल्यावर मी एका शहाणपणाबद्दल विख्यात असलेल्या मनुष्याची गाठ घेतली. त्याचे नाव सांगण्याची काही जरूर नाही; पण तो आपणास राजकारणी म्हणवीत असे, एवढे मात्र मी सांगतो. त्याच्याशी संभाषण केल्यावर मला साहजिकच असे वाटले, की जरी लोक त्याला शहाणा म्हणत व तोही आपल्या शहाणपणाची अधिकच प्रौढी मिरवी, तथापि वास्तविक काही तो शहाणा

नाही आणि ही गोष्ट त्याला समजावून देण्याचा मी प्रयत्न केला; पण याचा परिणाम एवढाच झाला, की तो व तेथे हजर असलेले इतर काही लोकही माझा द्वेष करू लागले. असो, मी तेथून निघून गेलो व माझ्याशीच विचार केला, की खरोखर सुंदर व चांगल्या वस्तूच्या ज्ञानाभावात तो गृहस्थ व मी सारखेच असलो तरी, माझी स्थिती त्याच्या स्थितीपेक्षा जरा बरी होती. कारण तो खरोखर अज्ञानी असून आपणास ज्ञानी मानीत होता; परंतु मला काही माहीत नसले तरी मला माझ्या अज्ञानाची जाणीव आहे, हे खास. यादृष्टीने मी त्याच्यापेक्षा काहीसा श्रेष्ठ दिसतो खरा. यानंतर त्याहीपेक्षा अधिक प्रसिद्ध पुरुषाकडे मी गेलो. त्या ठिकाणी मला तोच अनुभव आला व शत्रूपक्ष अधिक वाढला.

अशा रीतीने एकामागून एक शत्रू निर्माण होत गेले. मला या गोष्टीची जाणीव होती व याबद्दल मला वाईटही वाटत होते; पण माझा उपाय काय? परमेश्वराच्या शब्दांचा प्रथम विचार केला पाहिजे. जो मनुष्य शहाणासा वाटेल त्याजकडे जाऊन मला देवाच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट करून घेतलाच पाहिजे होता. अथीनिअन देशबंधूंनो, मी शपथपुरस्सर-छेः सत्यभाषणाच्या समर्थनाला शपथेची काय जरूर. मी आपणास खरोखर सांगतो, मला असा अनुभव आला, की जे लोक सर्वांत अधिक प्रसिद्ध व मान्य ते सर्वांत मूर्ख व त्याजपेक्षा कमी मान्य असलेले लोकच त्यांच्यापेक्षा बरे; परंतु हे सर्व हर्क्युलियन (भगीरथ) प्रयत्न करूनही सरतेशेवटी मला परमेश्वराचे म्हणणे आक्षेपणीय नाही, हेच कबूल करावे लागले. राजकारणी पुरुषांची परीक्षा झाल्यावर मी सर्व तऱ्हेच्या कवींकडे गेलो व या ठिकाणी तरी मला माझा कमीपणा कबूल करावा लागेल, अशी माझी समजूत होती. त्या त्या कवीच्या ग्रंथातील निवडक उतारे घेऊन मी त्यांच्याकडे गेलो व त्यांचा अर्थ त्यांना विचारला. मला वाटले होते, की या बाबतीत तरी मला शिकण्यासारखे त्याजजवळ काही असेल; पण मला खरोखर अनुभव काय आला हे मी सांगितल्यावर तुम्हास तो विश्वसनीय वाटेल की नाही कोण जाणे? मला वाटते तेथे हजर असलेला प्रत्येक इसम त्याच्याच काव्याची त्याजपेक्षा अधिक चांगली फोड करून सांगत. त्यावेळी मला प्रत्यय आला, की कवी आपली काव्ये शहाणपणाच्या जोरावर लिहीत नसून एक प्रकारच्या प्रतिभेने व स्फूर्तीनेच लिहितात. या बाबतीत त्यांचे अंगात देवतासंचार झाला असता भविष्य सांगणाऱ्यांशी साम्य असते. ते पष्कळ चांगल्या गोष्टी बोलतात. पण त्या त्यांच्या त्यांना समजत नाहीत आणि मला आढळून आले, की कवीची स्थिती जवळ जवळ तशीच असते; परंतु मला असे दिसले, की केवळ या प्रतिभेच्या जोरावर ते कवी आपणास सर्व विषयांत अप्रतिम शहाणे समजत; परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. यामुळे मी त्यांनाही सोडून निघालो व ज्या अज्ञानाच्या जाणिवेमुळे मी राजकारणी पुरुषांपेक्षा श्रेष्ठ, त्याच कारणास्तव मी या कवींपेक्षाही श्रेष्ठ अशी माझी समजूत झाली.

सरते शेवटी मी कारागिरांकडे गेलो. मला असे वाटत होते, की मला काहीच ज्ञान नव्हते; पण त्यांना कितीतरी चांगल्या गोष्टी अवगत होत्या आणि माझी ही समजतूत काही अगदी

चूक नव्हती. मला माहीत नाहीत अशा पुष्कळ गोष्टी ठाऊक असल्यामुळे तितक्यापुरते ते माझ्याहून श्रेष्ठ होते; परंतु मला असे आढळून आले, की हे कारागीरही कवीप्रमाणेच भ्रमात होते. आपण चांगले कारागीर आहोत तेव्हा आपणास (तत्त्वज्ञानासारखे) गहन विषयही येतातच, अशा भ्रमरूप अज्ञानाने त्यांचे ज्ञान आवृत् झाले होते आणि म्हणून मी देवाच्या वतीने आपणास प्रश्न केला, की त्यांचे ज्ञानही नाही व अज्ञानही नाही, अशी माझी स्थिती बरी किंवा त्यांची बरी? आणि मी देवाच्याच पक्षाला अनुकूल उत्तर दिले आणि माझीच स्थिती अधिक बरी असे ठरविले.

या माझ्या चौकस बुद्धीने मला मी अतिशय भयंकर आणि तीव्र शत्रू उत्पन्न करून घेतले आहेत आणि पुष्कळसे लोकापवाद यामुळेच उत्पन्न झाले आहेत. लोक मला शहाणा म्हणतात याचे कारण एवढेच, की इतरांमध्ये जो गुण नाही म्हणून मी दाखवितो, तो गुण मजमध्ये आहे, अशी ते आपली समजूत करून घेतात; परंतु अथीनिअन बंधूंनो, खरी गोष्ट म्हणजे एक ईश्वरच केवळ शहाणा आहे व आपल्या उत्तराने एवढेच दाखविण्याची त्याची इच्छा आहे, की मानवी ज्ञान हे फार कोते व म्हणून कवडीमोल आहे. माझ्याविषयी विशेषतः काही सांगावयाचे नसून केवळ उदाहरण म्हणून माझे नाव दिले आहे. देवाच्या भाषणाचा आशय निराळ्या शब्दांत सांगावयाचा म्हटला तर असा होईल, की जो सॉक्रेटिसप्रमाणे आपले ज्ञान क:पदार्थ आहे असे मानील तोच खरा ज्ञानी होय आणि या कारणाकरिताच मी परमेश्वराची आज्ञा शिरसावंद्य मानून जो कोणी नागरिक अथवा परकीय शहाणपणाची छाननी करतो व जर तो शहाणा नसेल तर देवाच्या वाक्याचे सत्यत्व राखण्याकरिता मी तो शहाणा नाही, हे त्याला दाखवितो. या उद्योगातच नेहमी चूर असल्यामुळे मला इतर कोणाचेही सार्वजनिक किंवा व्यक्तिविषयकही काम करता येत नाही आणि या देवावरील श्रद्धेचा एक आनुषंगिक परिणाम असा झाला आहे, की मी भिकारी आहे.

याशिवाय दुसरी गोष्ट अशी, की ज्यांना बरेचसे रिकामपण असते अशी श्रीमंतांची मुले स्वेच्छेने मजभोवती जमतात. ज्ञानाचा दंभ माजविणाऱ्या लोकांचे अज्ञान मी कसे उघड करून दाखवितो ते पाहणे त्यांना आवडते व पुष्कळदा ते स्वत: माझे अनुकरण करतात व त्यांना कोणी ज्ञानाचा दंभ माजविणारे भेटल्यास ते त्यांची माझ्या धोरणावर उलट तपासणी करतात व त्यांचे अज्ञान बाहेर काढतात. अशा रीतीने त्यांच्या कचाट्यात सापडलेली मंडळी त्यांच्यावर रागवावयाचे टाकन मजवरच रागवतात. 'हा हलकट सॉक्रेटिस. तरुणांना कुमार्गगामी करणारा..' अशा रीतीने ते बोलू लागल्यास जर कोणी विचारले की, 'अहो! सॉक्रेटिस काय वाईट आचरण करतो किंवा शिकवितो?' तर त्यांना त्याचे नीट उत्तर देता येत नाही; परंतु आपण गोंधळलो असे दिसू नये म्हणून साधारणत: तत्त्वज्ञान्यावर केव्हाही लादता येतील असे 'तयार' आरोप घेऊन ते मजवर लादतात. ते आरोप म्हणजे स्वर्गापवर्गाची उठाठेव, निरीश्वरता व वस्तुविपर्यास. त्यांच्या द्वेषाचे खरे कारण जे आत्मप्रतिष्ठानिरसन ते

त्यांना कबूल करावेसे वाटत नाही. हे माझे प्रतिपक्षी महत्त्वाकांक्षी, खटपटी, पाताळयंत्री व बोलके असल्यामुळे त्यांनी आपल्या दीर्घ व तीक्ष्ण निंदाप्रचुर भाषणांनी आपले कान आधीच विषमय करून टाकले आहेत. या फिर्यादीतील वादी मिलीटस, ॲनिटस आणि लिकॉन हे मजविरुद्ध उठण्याला हेच खरे कारण आहे. मिलीटस हा कवींच्या, ॲनिटस राजकारणी पुरुषांच्या व कारागिरांच्या व लिकॉन हा अलंकारिकांच्या वतीने माझ्यावर दावा करीत आहेत. मी प्रथमच सांगितले आहे, की एवढ्या आरोपांचे एका क्षणार्धात निरसन करणे अशक्य आहे. तथापि, मी आपणास सांगितली ही वस्तुस्थिती आहे. मी आपणापासून काही लपविलेले नाही व काही दांभिकपणाने आपल्यापुढे मांडलेही नाही. मी इतका उघड व स्पष्ट बोलतो याबद्दल ते माझा द्वेष करतात हे मी जाणून आहे; पण यावरूनच मी बोलतो ते सत्य आहे, असे सिद्ध होत नाही काय? माझ्याविरुद्ध आपला गैरसमज होण्याचे हेच कारण आहे, असे आपणास केव्हातरी खास आढळून येईल.

माझ्यावर आरोप करणाऱ्या पहिल्या वर्गाबद्दल मला आत्मसंरक्षणार्थ जे सांगावयाचे ते मी सांगितले. आता मी दुसऱ्या वर्गातील वादीकडे वळतो. त्यांमधील मुख्य म्हणजे आपणा स्वत:ला सज्जन व देशभक्त म्हणविणारा मिलीटस आहे. यांच्या आरोपापासूनही मला माझे रक्षण केले पाहिजे. त्यांच्या कैफियतीचा सारांश असा : सॉक्रेटिस हा पापकर्मी आहे व तो तरुण मंडळींना बिघडवितो. तो संस्थानच्या देवांवर विश्वास ठेवत नाही व त्याने आपलेच काही नवीन देव काढले आहेत. आता आपण या आरोपातील निरनिराळे भाग घेऊन त्याचा विचार करू. मिलीटस म्हणतो, की मी पापकर्मी असून तरुणांना बिघडवतो; परंतु अथीनियन बंधूंनो, वास्तविक मिलीटस हाच उलट पापाचरणी आहे. कारण वास्तविक तो गांभीर्याचा आव आणीत आहे व ज्या विषयात त्याला काही गम्य नाही, अशा विषयांवरील दांभिक प्रेमाने तो वाटेल त्याजवर फिर्याद आणावयास तयार आहे. मी म्हणतो ते खरे आहे किंवा नाही. याचा प्रत्यय मी तुम्हास आताच आणून देतो.

“मिलीटस, मी तुला विचारतो, की तरुण मंडळीच्या सुधारणेविषयी तू पुष्कळच विचार करीत असशील?"

"होय"

“तर मग मिलीटस तरुण मंडळीस सुधारणाराचे नाव कार्टाला सांग पाहू. कारण ज्याअर्थी तू त्यांना बिघडविणाऱ्या मला शोधून काढून मजवर फिर्याद करण्याचे देखील श्रम घेतलेस, त्याअर्थी तुला माझ्यापेक्षा अगदी विरुद्ध असा तरुणजनांचा सुधारकही ठाऊक असेलच. मग तो कोण, हे सांग पाहू? मिलीटस, लक्षात ठेव, की तुझा माझ्या प्रश्नाला उत्तर देता येत नाही म्हणून तू मौन स्वीकारले आहेस; पण ही खरोखर लाजिरवाणी गोष्ट असून, मी आता म्हटले त्याचीच प्रचीती आणीत नाहीस काय? बोल, बोल तरुण मंडळींना सुधारणारा कोण?"

"कायदेकानू."

"पण, भल्या गृहस्था, हा माझ्या प्रश्नाचा मुद्दा नाही. प्रथम मला सांग की, कायदेकानू कोणाला अधिक समजतात?"

"सॉक्रेटिस, येथे हजर असलेल्या न्यायाधीशांना."

"तर मग मिलीटस, तुझे असे म्हणणे आहे काय, की ते तरुणमंडळींना शिकविण्यास व सुधारण्यास समर्थ आहेत?"

"अर्थातच"

"काय, सर्वजण का त्यातील काहीच?"

"सर्वजण."

"अरे वा! तर मोठी आनंदाची बातमी आहे. समाजसुधारकांची गर्दीच उसळली म्हणावयाची! पण येथे जमलेल्या इतर लोकांविषयी तुझे काय म्हणणे आहे? ते तरुण समाज सुधारतात का?"

"होय, तेदेखील."

"आणि सिनेटर्स?"

"होय, तेदेखील तरुणांना सुधारतात."

"पण कदाचित साधारण समितीचे सभासद त्यांना बिघडवीत असतील का तेही त्यांना सुधारतातच?"

"तेही त्यांना सुधारतात."

"तर मग माझ्याशिवाय प्रत्येक अथीनियन त्यांना सुधारतो व मीच केवळ बिघडवितो, असे का तुझे म्हणणे?"

"माझे हेच अक्षरश: म्हणणे आहे."

"तुझे म्हणणे खरे असेल तर मोठेच दुर्भाग्य म्हणावयाचे; पण मिलीटस, मला असे सांग, की घोड्यांच्या बाबतीतील तुझा अनुभव कसा आहे? एक मनुष्य त्याला बिघडवतो व सर्व जग त्याला सुधारते काय? याच्या विरुद्ध गोष्टच खरी नाही काय? एखाद्या रिंगमास्तरासारखा विरळ मनुष्यच त्यांना सुधारतो व ज्या ज्या इतरांचा घोड्यांशी संबंध येतो तेच त्यांना बिघडवितात, असे नाही काय? जसे घोड्यांचे तसेच इतर प्राण्यांचेही नाही काय?"

"होय, ते असेच आहे."

"मग ते तुला किंवा ॲनिटसला पटो किंवा न पटो; पण जर तरुण मंडळींना बिघडविणारा एकच असून, जगातील बाकी सर्व मंडळी सुधारणारीच असेल तर मोठे भाग्यच म्हणावयाचे; पण व मजवर स्वतःच्या आणलेल्या आरोपासंबंधीच्या अज्ञानाने सिद्ध करीत आहेस."

'याशिवाय, मिलीटस मी तुला असे विचारतो, की एखाद्याला वाईट लोकांमध्ये राहणे आवडेल का चांगल्या लोकांमध्ये? हा प्रश्न तर अगदीच साधा आहे. चांगले लोक आपल्या शेजाऱ्यांवर उपकार करतात व वाईट लोक त्यांना पीडा देतात नाही काय?"

"नि:संशय"

"आणि असा एखादा मनुष्य आहे काय, की ज्याला आपल्या शेजाऱ्याने आपणावर उपकार करण्यापेक्षा आपणास इजा केलेलीच अधिक आवडेल? सांग, सांग कायद्याप्रमाणे तुला उत्तर दिलेच पाहिजे. कोणाही मनुष्याला आपणास इजा करून घेण्याची हौस असते का?"

"नि:संशय नाही."

"आता तरुण मनुष्यांना बिघडवून अनीतिप्रवण करण्याविषयी तू मजवर आरोप ठेवतोस, त्यावेळी मी ते जाणूनबुजून करतो, असे का तुझे म्हणणे?"

"होय जाणूनबुजून..."

"पण तू आताच कबूल केलेस, की चांगली माणसे आपल्या शेजाऱ्यांचे चांगले करतात व वाईट माणसे अकल्याण करतात, तर मग हे सत्य तुला मात्र अगदी अल्पवयात केवळ श्रेष्ठतर बुद्धीच्या जोरावर समजू लागले आणि माझी वृद्धावस्था झाली असूनदेखील मी इतका अज्ञानी व मठ्ठ आहे काय, की मला एवढेदेखील समजू नये, की ज्या मनुष्याच्या सन्निध मला राहावयाचे आहे तो बिघडला असल्यास माझे अकल्याणच करील! पण तू आपला म्हणतोसच, की मी त्याला जाणूनबुजून बिघडवितो. तू काय वाटेल ते म्हणशील; पण माझा किंवा इतरांचा त्यावर कसा विश्वास बसावा? याकरिता खरी गोष्ट अशी असली पाहिजे, की मी एकतर तरुणांना बिघडवीतच नाही आणि या दोनही पक्षी तुजकडे खोटेपणा येतो. कारण जर माझा अपराध अज्ञानमूलक असेल तर कायदा अशा अपराधास दंड्य समजत नाही. मला एकीकडे घेऊन दोन समजुतीच्या गोष्टी सांगणे, हे तुझे कर्तव्य होते. कारण जी गोष्ट मी केवळ अज्ञानाने करीत होतो, ती गोष्ट मी योग्य उपदेशाअंती खास खास टाकली असती; पण मजजवळ बोलण्यासारखे किंवा मला शिकविण्यासारखे मात्र तुजजवळ काही नव्हते आणि आता मात्र तू मला कोर्टात ओढले आहेस. कोर्ट हे शिक्षणमंदिर नसून दंडस्थान मात्र आहे."

"अथीनिअन बंधूंनो, मजवर आणलेल्या आरोपाच्या बाबतीत मिलीटस बेफिकीर व निष्काळजी आहे, हे आता तुम्हालाही पटलेच. तथापि, मिलीटस, मी तरुण मनुष्यांना कोणत्या बाबतीत बिघडवतो असे तुला वाटते? मला वाटते, माझ्या आरोपपत्रकावरून पाहता मी त्यांना संस्थानात मान्य असलेले देव न मानण्याविषयी व त्याबद्दल दुसरेच देव अगर देवदूत मानण्याविषयी शिकवितो, असा तुझा अर्थ असावा. तरुणांना हेच धडे देऊन मी बिघडवितो असे तुझे म्हणणे."

"होय, होय, तेच."

"तर मग ज्या देवांविषयी आपण बोलत आहोत त्याच देवांना स्मरून आपले म्हणणे अधिक स्पष्ट करून सांग. कारण तुझ्या म्हणण्याचा भावार्थ अजून माझ्या लक्षात येत नाही. मी लोकांना कोठल्यातरी देवांवर विश्वास ठेवण्यास सांगतो, तेव्हा मी पक्का नास्तिकवादी

नाही व तू मजवर हा आरोप ठेवीत नाहीस, तर मी सांगतो ते देव व संस्थानाला मान्य असलेले देव एक नाहीत एवढाच तुझा आरोप? का मी पक्का नास्तिक आहे असा?"

"तू पक्का नास्तिक आहे असा."

"वाहवा! तर मग मिलीटस, इतर लोकांप्रमाणे मी सूर्यचंद्रादिकांतील देवत्व मानीत नाही, असे का तुझे म्हणणे?"

"न्यायाधीश महाराज, मी सांगतो हा खास त्यांचे देवत्व मानीत नाही. कारण सूर्य हा एक दगड आहे व चंद्र हा पार्थिव आहे, असेच हा म्हणतो."

"मिलीटस, तू ॲनॅक्झॅगोरॅसवर आरोप करीत आहेस, असे मला भासते आहे. कारण तू म्हणतोस ही मते ॲनॅक्झॅगोरॅसच्या ग्रंथात भरलेली आहेत ही गोष्ट न्यायाधीशांना माहीत नसण्याइतके ते निरक्षर आहेत, अशी तुझी समजूत असल्यास ती चुकीची आहे. केवळ एखाद्या* ड्राक्मावर पाहावयास मिळणाऱ्या** नाटकांतून बहुधा सॉक्रेटिसच्या नावावर हीच मते लादण्यात आली आहेत आणि खरोखरच सॉक्रेटीस या मतांचा जनक असेल तर खुशाल त्यांनी तिकिटाचे पैसे भरून सॉक्रेटिसच्या उपहासाची मौज करावी. असो. तर मग मिलीटस, तुला असे नक्की वाटते ना, की मी कोणत्याही देवावर विश्वास ठेवीत नाही."

"मी परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो, की तू कोणत्याही देवावर विश्वास ठेवीत नाहीस."

"या तुझ्या भाषणावर दुसरा कोणी विश्वास ठेवणार नाहीच; पण तुझा स्वत:चादेखील त्याच्यावर विश्वास नाहीच, अशी माझी जवळ जवळ खात्री आहे. देशबंधूंनो, मला असे वाटते, की मिलीटसने माझे आरोपपत्र केवळ हलकटपणाने किंवा तारुण्याच्या गुर्मीने विशृंखल होऊन लिहिले आहे. जणू काय माझी परीक्षाच पाहण्याकरिता त्याने त्यातच एक कोडे घातले नाही काय? माझा हा हास्यकारक विरोध शहाणा म्हणविणारा सॉक्रेटिस हुडकून काढतो का मीच त्याला व इतरांना फसवतो ते पाहू या, असाच त्याचा विचार असावा. कारण त्याच्या आरोपपत्रकांतच सॉक्रेटिस देवावर विश्वास ठेवीत नाही व ठेवतो, असेही आहे आणि हे काही गंभीर भाषणाचे लक्षण नव्हे.

देशबंधूंनो, मिलीटसच्या बोलण्यातील विरोध उघडकीस आणण्यास तुम्ही मला मदत करा व मिलीटसला माझ्या प्रश्नांची उत्तरे देऊ द्या व मी माझ्या नित्यक्रमानेच बोललो तर आपण मध्ये व्यत्यय आणू नका.

"मिलीटस, एखाद्याने मानवीय वस्तूंवर विश्वास ठेवावा; पण मानवांवर ठेवू नये, हे शक्य आहे काय?... बंधूंनो, मी विचारलेल्या प्रश्नांची त्याला उत्तरे देऊ द्या. दरवेळी नुसता गलका उडवून देण्यात काही अर्थ नाही. एखाद्या मनुष्याचा शिलेदारीवर विश्वास

---

* डाक्मा हे एक ग्रीसचे नाणे आहे. त्याची किंमत एक फ्रैंक, ९ १/२ पेन्स किंवा ९ १/२ आणे होईल.

** हा उल्लेख ॲरिस्टोफेनस किंवा यूरिपाइडीज याच्या नाटकासंबंधी आहे.

असावा; पण घोड्यांवर नसावा, मुरलीवादनावर असावा; पण मुरलीवादकांवर नसावा, हे शक्य आहे काय? नाही, महाराज हे शक्य नाही. तू उत्तर देण्याचे टाळीत असलास तर मीच तुझ्यावाटचे उत्तर देतो. हे कधीच शक्य नाही. आता एका प्रश्नाचे मात्र उत्तर दे. एखाद्या मनुष्याची अतिभौतिक किंवा दैविक कार्यकर्त्यांवर श्रद्धा असावी; पण देवयोनिविशेषांवर किंवा देवावर नसावी, हे शक्य आहे काय?''

''नाही.''

"कोर्टाच्या साह्याने मी तुजकडून इतके तरी वदविले हे तरी मोठे भाग्यच म्हणावयाचे; पण मिलीटस, आरोपपत्रकात तर त शपथेवर म्हणतोस, की मी दैविक कार्यकर्त्यांवर श्रद्धा ठेवतो. ते दैविक कार्यकर्ते जुने असोत वा नवे असोत, एवढे तर खरे ना, की तुझ्या कैफियतीप्रमाणे मी कोणत्या तरी दैविक कार्यकर्त्यांवर श्रद्धा ठेवतो आणि माझा जर दैविक कार्यकर्त्यांवर विश्वास असेल तर मला देवयोनिविशेषांवर विश्वास ठेवल्यावाचून सुटका आहे काय? तू उत्तर देत नाहीस यावरूनच तुला हे कबूल आहे, असे दिसते. आता देवयोनिविशेष म्हणजे देवच किंवा देवपुत्र नव्हेत काय?"

"होय, असेच."

''आणि तुझ्या भाषणातील हास्यकारक विरोध म्हणून मी जो म्हणतो तो हाच. देवयोनिविशेष अगर देवदूत हे देवच. मग प्रथमतः तू माझी देवावर श्रद्धा नाही म्हणून म्हणतोस व लगेच ज्याअर्थी माझा देवयोनिविशेषांवर विश्वास आहे त्याअर्थी देवावरही आहे असे होते; हेही तुझ्याच बोलण्यावरून निघते. कारण जर देवयोनिविशेष हे देवांना अप्सरा अगर इतर असदृश कार्यांपासून झालेली अपत्ये, तर देवयोनिविशेषांवर श्रद्धा ठेवूनही देवांविषयी नास्तिकभाव बाळगणे कोणत्या मनुष्याला शक्य आहे? खेचरांचे अस्तित्व कबूल करून घोडे किंवा गाढवे यांच्या अस्तित्वावर विश्वास नाही, असे म्हणण्यासारखेच तुझे भाषण आहे. मिलीटस, अशा तऱ्हेची अर्थहीन शब्दयोजना केवळ माझी परीक्षा करण्याकरताच तू केली असावीस. माझ्यावर आरोप ठेवण्यास असे सत्यस्वरूप दुसरे काहीच नसल्यामुळे तू हे शब्द आरोपपत्रकात घुसडून दिलेस, असे मला वाटते; परंतु अल्पतम ज्ञान असलेल्या मनुष्याचीदेखील अशी समजूत करून देता यावयाची नाही, की एखाद्याचा अलौकिक व दैविक विभूतींवर विश्वास आहे; परंतु देवांवर. देवयोनीवर किंवा स्वर्गस्थ वीरपरुषांवर विश्वास नाही."

''मिलीटसने आणलेल्या आरोपाविरुद्ध झाले हे बोलणे पुष्कळ झाले. यापेक्षा अधिक खोल चर्चा करण्याचे काहीही कारण नाही. मी मजवर किती जणांचा द्वेष ओढवून घेतला आहे हे मी चांगले जाणतो व जर कदाचित माझा नाश झाला तर त्याला कारण मिलीटस किंवा ॲनिटस नसून पुष्कळ साधुपुरुषांच्या भूतकालीन व भविष्यकालीन नाशाला कारण

असलेला लोकांचा मत्सर व निंदा हेच त्याचे मळ कारण आहे व लोकनिंदेला माझा बळी काही शेवटलाच ठरणार नाही.

कोणी म्हटले 'सॉक्रेटिस, ज्याच्या योगाने तुजवर अकाली मृत्यू ओढवत आहे, अशा आयुष्यक्रमाची तुला लाज वाटत नाही काय?' अशा प्रश्नास उत्तर म्हणून मला असे सांगता येईल, की जर मनुष्यामध्ये काही सार असेल तर त्याने मरणाचा हिशोब बाळगता कामा नये. आपण करतो हे चांगले आहे किंवा नाही. सारांश, आपण चांगले आहोत किंवा नाहीत हे पाहण्यापुरतीच त्याने खबरदारी घ्यावी; परंतु तुमच्याच म्हणण्याप्रमाणे पाहू लागले तर ट्रॉय येथील लढाईत कामास आलेले वीरही कुचकामाचे ठरतील व अपमान सहन करण्यापेक्षा कसल्याही संकटास न जुमानणारा थेटिसचा मुलगा अकिलीज हा तर सर्वांतच कमी प्रतीचा ठरेल. हेक्टरला मारण्याविषयी अकिलीज अगदी उत्सुक झाला असता, त्याची आई थेटीस त्याजजवळ येऊन म्हणाली, 'जर तू पंट्रोक्लसच्या मरणाचा सूड उगविण्यासाठी हेक्टरचा जीव घेशील तर तूही मरशील. हेक्टर मेल्यावर तुजवरच मरणाची पाळी येणार आहे.' ही सूचना ऐकूनदेखील आपल्या मित्राच्या निधनाबद्दल सूड न घेतल्यामुळे अपमानात खितपत पडण्यापेक्षा अकिलीजने संकट व मरणच पत्करले. 'समुद्रात उभ्या असलेल्या या ग्रीक जहाजांच्या पुढे हास्यास्पद व भूमिभारभूत होण्यापेक्षा मी शत्रूवर सूड उगविलेलाच चांगला' असे त्याने उत्तर केले. त्यावेळी अकिलीजने संकटाचा अथवा मृत्यूचा विचार केला काय? एकदा आपली जागा आपण मुकरर केल्यावर किंवा एखाद्या अधिकाऱ्याकडून नियुक्त केली गेल्यानंतर संकटसमयीदेखील आपणास तीच जागा सांभाळून राहावयास नको काय? अशा वेळी जिवाची पर्वा न करता स्वाभिमानाचीच पर्वा धरावी हेच म्हणणे खरे आहे.

देशबंधूंनो, पॉटीडिया, अँफिपॉलिस आणि डेलियम येथील लढाईच्या प्रसंगी तुम्ही निवडलेल्या सेनाधिपतींनी मला जी जागा नेमून दिली होती, त्या जागी मी प्रत्यक्ष मरणाला तोंड देण्यात इतरांना हार गेलो नाही, तर मग आता प्रत्यक्ष परमेश्वरच मला तत्त्वज्ञान्याच्या जागेवर नेमून माझे व इतरांचे परीक्षण करण्याचे काम मजकडे सोपवीत आहे, अशी माझी दृढ समजूत झाली असता मी मरणाच्या अगर इतर संकटाच्या भीतीने माघार घेईन काय? जर असे होईल तर मग मात्र मी देवाचे अस्तित्व मानीत नाही व मी वास्तविक शहाणा नसून शहाणा म्हणवून घेण्यात प्रत्यक्ष अपोलोची आज्ञा मोडतो, असा मजवर खरोखर आरोप येईल. मरणाची भीती म्हणजे केवळ ज्ञानाचा दंभ होय; ते काही खरे ज्ञान नव्हे. कारण त्यात अविज्ञेय वस्तूंचे ज्ञान गृहीत धरले जाते. कारण जे मरण सर्वांना इतके कष्टतम वाटते. ते सुखतम कशावरून नसेल हे कोणास कळले आहे काय? अविज्ञात गोष्टी ज्ञात असल्याबद्दल दंभ माजविणे ही अज्ञानाची सीमाच नाही काय? या बाबतीतच माझी वागणूक इतरांपेक्षा भिन्न असल्यामुळे मला शहाणा म्हणता येईल. कारण मला परलोकांविषयी ज्ञान नाही तर मी त्या ज्ञानाचे सोंगही आणीत नाही; परंतु मला हे निश्चित ठाऊक आहे, की आपल्यापेक्षा श्रेष्ठ

अधिकाऱ्याची-मग तो मानवी अधिकारी असो, की परमेश्वर असो-आज्ञा मोडणे हे पापमय व लांछनास्पद आहे आणि संभवनीय सुखाला भिण्याऐवजी निश्चित पापालाच टाळण्याचा मी अटोकाट प्रयत्न करीन. ॲनिटसच्या बोलण्यावर आपला मुळीच विश्वास बसत नसून मजवर फिर्याद करण्याचेच कारण नव्हते, अशी आपली समजूत होईल तर फारच उत्तम. कदाचित मी अपराधी आहे व मला मोकळे सोडले तर माझ्या उपदेशाने तुमची मुलेबाळे बिघडतील; परंतु ॲनिटसने सुचविलेली मृत्यूची शिक्षा फार जबर होईल, अशा समजुतीने आपण मजला अशी सूचना कराल, की सॉक्रेटिस, यावेळी ॲनिटसचे काही न ऐकता आम्ही तुला सोडून देतो; पण अशा अटीवर, की तू आपला हा विचारक्रम व परीक्षणमार्ग सोडून दिला पाहिजे आणि जर तुला असेच वर्तन करताना पकडण्यात आले तर मात्र तुला प्राणदंडाची शिक्षा भोगावी लागेल, तर मी त्यास असे उत्तर देतो, की अथीनिअन बंधूंनो, माझ्या मनात तुमच्याविषयी आदर व प्रीती ही दोन्हीही आहेत; परंतु तुमची आज्ञा पाळण्यापेक्षा मी परमेश्वराचीच आज्ञा पाळीन आणि जोपर्यंत माझ्या जिवात जीव आहे व शरीरात प्राण आहे, तोपर्यंत मी तत्त्वज्ञान शिकविण्यास किंवा ते अमलात आणण्यास कधीही कमी करणार नाही. मला जो कोणी मनुष्य भेटेल त्याला समजुतीच्या दोन गोष्टी सांगून मी म्हणेल, "सद्गृहस्था, अथेन्ससारख्या सुप्रसिद्ध, बलिष्ठ आणि बुद्धिविशिष्ट संस्थानातील तू एक नागरिक आहेस. पैसा, मानमरातब व कीर्ती यांचा हव्यास बाळगून तू आपल्या आध्यात्मिक उन्नतीविषयी व सत्याविषयी एवढा निष्काळजी व अज्ञानी आहेस याबद्दल तुला काहीच लाज वाटत नाही काय?" जर तो गृहस्थ म्हणेल की, "होय, पण मी त्या बाबतीत योग्य ती खबरदारी घेत आहे," तर मी त्याला एवढ्यावरच सोडीत नाही, त्याला उलटसुलट प्रश्न विचारून विचारून जर माझी खात्री झाली, की त्याजमध्ये काही सद्गुण नाही; परंतु तो त्याची बढाई मात्र मारीत आहे, तर मोठ्या गोष्टीची हेळसांड करून लहान सहान गोष्टींनाच अधिक महत्त्व देण्याबद्दल मी त्याची चांगली खरडपट्टी काढतो. मला भेटणारा इसम वृद्ध असो की तरुण, स्वदेशीय असो की परदेशीय- माझा स्वदेशीय असेल तर देशबंधू म्हणून विशेषत: त्याला मी हेच प्रश्न पुनः पुनः विचारतो. कारण मला परमेश्वराची तशी आज्ञाच आहे आणि माझ्या या परमेश्वरसेवेइतके दुसरे कशानेही देशाचे कल्याण आजपर्यंत झालेले नाही. कारण मी दुसरा काही धंदाच करीत नाही. आपल्या शरीराची अथवा संपत्तीची काळजी करण्याचे आधी प्रथमतः महत्त्वाच्या आत्मिक उन्नतीची काळजी बाळगावी, हे मी आबालवृद्धांना शिकवीत फिरतो. मी तुम्हाला सांगतो, की सद्गुण हा पैशाने कमविला जात नाही; पण सद्गुणाने पैसाच काय; परंतु मनुष्याच्या खाजगी अगर सार्वजनिक कल्याणाच्या सर्वच गोष्टी सिद्ध होतात. माझे शिकवणे काय ते एवढेच आणि जर ते तरुणांना अपायकारक असेल तर मी उपद्व्यापी खास आहे. जर कोणी हे माझे शिकवणे नाही म्हणून म्हणेल, तर तो साफ लबाड आहे. याकरिता देशबंधूंनो, काय तो आपल्या मताचा निश्चय करा व ॲनिटसचे म्हणणे मान्य करून मला अपराधी ठरवा, अगर ते अमान्य करून मला निर्दोषी ठरवा; पण एवढे मात्र खास, की तुम्ही कोणताही मार्ग

पत्करलात तरी मी माझा क्रम सोडणार नाही. मग त्यात मला एकदाच काय. पण शतश: मरण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर"

"देशबंधूंनो, ऐका, गडबड करू नका. तुमचा माझा असा ठराव झाला नाही काय, की माझे बोलणे तुम्ही शेवटपर्यंत ऐकून घ्यावे? मला आता जे सांगावयाचे आहे ते ऐकून तुम्ही चकितच व्हाल व माझ्या विरुद्ध एकच ओरड कराल; पण माझी खात्री आहे, की मी सांगतो हे तुमच्या कल्याणाचे आहे, म्हणून शांतपणे ऐका. आपण हे खूप लक्षात ठेवा, की माझ्यासारख्या मनुष्याला आपण जिवानिशी मारलेत तर त्यात माझ्यापेक्षा आपलेच अकल्याण अधिक आहे. मिलीटस काय किंवा ॲनिटस काय, ते माझे अकल्याण करू शकत नाहीत. कारण दुष्ट मनुष्याला आपल्यापेक्षा श्रेष्ठ मनुष्याचे नुकसान करताच येत नाही. ॲनिटससारख्याला फार तर त्याचा जीव घेता येईल किंवा त्याला हद्दपार करता येईल किंवा त्याचे नागरिकत्वाचे हक्क काढून घेता येतील; परंतु हे करणे म्हणजे त्याचे अकल्याण साधणे आहे, असे जर त्याला किंवा इतरांना वाटत असेल तर ते चूक आहे. कारण ॲनिटसप्रमाणे दुसऱ्याचा अन्यायाने जीव घेण्यापासून होणारे अकल्याण हे त्याच्या कितीतरी पट मोठे आहे."

"देशबंधूंनो, मी हे भाषण करीत आहे ते मजकरिता नव्हे तर तुमच्याकरिता आहे. देवाने एक देणगी म्हणून मला तुमच्यामध्ये पाठविले आणि तुम्ही मला दोषी ठरवलेत तर तो देवाचाच अपराध होईल व हे पाप तुमच्या हातून घडू नये, हाच माझा उद्देश आहे. जर तुम्ही मला मारलेत तर माझ्यामागे माझे व्रत चालविण्यास दुसरा कोणीही मिळणार नाही. मी एक आपली गावंढळ उपमा देतो, ज्याप्रमाणे एखाद्या धष्टपुष्ट व स्थूलपणामुळे मंद झालेल्या घोड्याला दंश देऊन चालावयास लावण्याला गोमाशीची जरूर असते, त्याप्रमाणेच संस्थानाला माझी जरूर असून, मला परमेश्वरानेच आपणाकडे पाठविले आहे आणि या संस्थानरूपी अश्वावर मी दंशासारखा दिवसभर भटकतो आणि तुमची मने वळवतो किंवा तुमची खरडपट्टी काढतो. तुम्हाला माझ्यासारखा दुसरा कोणी सापडणार नाही, म्हणून तुम्ही माझा प्राण वाचवावा, असा मी तुम्हाला सल्ला देतो. झोपेतून एकाएकी उठविलेल्या माणसाप्रमाणे तुम्ही सध्या अगदी चिडून गेला आहात आणि ॲनिटसने सुचविल्याप्रमाणे मला चिरडून टाकल्यावर राहिलेले आयुष्य तरी स्वस्थ निद्रेत घालविता येईल असे आपणास वाटत असेल. यात व्यत्यय म्हणजे परमेश्वराने माझ्यासारखाच कोणी दंश पाठविला तरच होणार. मला परमेश्वराने कनवाळूपणाने तुमच्याकडे पाठविले या म्हणण्याला प्रत्यंतर हेच, की जर मी इतर सामान्य जनांप्रमाणे असतो तर इतकी वर्षे माझा उद्योगधंदा सोडून व त्याजमुळे होणाऱ्या नुकसानीकडे दुर्लक्ष करून तुमच्या भानगडीत पडलोच नसतो व प्रत्येक मनुष्याला पित्याच्या किंवा ज्येष्ठ भ्रात्याच्या वात्सल्याने प्रेरित होऊन सद्गुणांविषयी काळजी वाहण्यास शिकविलेच नसते. कारण हे मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे. हा उपदेश करण्यात जर

माझा काही फायदा असला किंवा मला त्याबद्दल पैसे मिळत असते तर गोष्ट निराळी; परंतु माझ्यावर फिर्याद करणारांनादेखील मी उपदेश करण्याबद्दल लोकांकडून पैसे मिळवितो अगर उकळतो असे म्हणण्याची छाती नाही व त्या म्हणण्याला कोणी साक्षीदारही नाही; परंतु माझ्या बाजूचा खात्रीलायक साक्षीदार म्हणजे माझे दारिद्र्य...!

एखाद्याला कदाचित आश्चर्य वाटेल, की मी खाजगी रीतीने लोकांना उपदेश करीत व त्यांच्या कामाकडे लक्ष देत फिरतो, मग सार्वजनिक रीतीने संस्थानच्या कामात उपदेश करण्यास मी पुढे का येत नाही? मी तुम्हाला त्याचे कारण सांगतो. तुम्ही मला पुष्कळ प्रसंगी एका अंतःप्रवृत्तीविषयी किंवा दैववाणीविषयी बोलताना ऐकले असेल. ही दैवी वाणी म्हणजेच मिलीटसच्या आरोपपत्रकातील उपहासाचा विषय होय. ही दैवी वाणी म्हणजे एक तऱ्हेचा धनी आहे व मला तो लहानपणापासून ऐकू येतो व त्याच्या योगाने मला एखादे कृत्य करण्याविषयी आज्ञा होत नसून एखादे कृत्य न करण्याविषयी मात्र सूचना होते आणि याच कारणामुळे मी राजकारणात पडण्याचे टाळले आणि हे फार चांगले झाले, असे मला वाटते. कारण, देशबंधूंनो, जर मी राजकारणात पडलो असतो तर यापूर्वीच जिवाला मुकलो असतो व त्याच्या योगाने तुमचे व माझे कोणाचेच कल्याण झाले नसते. मी तुम्हास स्पष्ट काय ते सांगतो म्हणून रागावू नका; पण खरी गोष्ट अशी आहे, की तुम्हाबरोबर किंवा कोठल्याही समुदायाबरोबर लढाईवर जाऊनही ज्याला संस्थानात प्रचलित असलेल्या अनेक अनीतिपर व गैरकायदेशीर गोष्टींशी विरोध करावयाचा आहे तो मनुष्य फार वेळ जगणार नाही. सत्याकरिता झगडणाऱ्या मनुष्याला अल्पकालपर्यंत जरी जगण्याची इच्छा असली तर सार्वजनिक आयुष्यापेक्षा खाजगी आयुष्यक्रमच पत्करला पाहिजे.

मी म्हणतो याचे प्रत्यंतर शब्दांपेक्षा कृतीनेच अधिक देता येईल व कृती ही शब्दांपेक्षा आपणास अधिक मान्य आहे. मी माझ्या आयुष्यातीलच एक गोष्ट आपणास सांगतो. त्यावरूनच आपली खात्री होईल, की मरणाच्या भीतीने मी कधी अन्याय्य गोष्टीपुढे मान वाकविली नसती व माझ्या ताठरपणामुळे मजवर मृत्यू ओढावला असता. ती हकीगतही न्यायासंबंधीच आहे व आपणास रुचणारी नसली तरी खरी आहे. देशबंधूंनो, आजपर्यंत मी एकदाच सीनेटर या हुद्याच्या जागेवर होतो. अर्गिनुसीच्या लढाईनंतर प्रेते लवकर उचलल्याबद्दल सैन्याधिकाऱ्यांवर जो खटला चालला होता, त्यात माझ्या जातीला अध्यक्षत्वाचा मान होता. त्यांची चौकशी एकत्र करणे हे कायदेविरुद्ध होते व मागून आपणासही ते पटेल; पण त्यावेळी सर्व न्यायाधीशांमध्ये या गैरकायदा वर्तणुकीविरुद्ध मत देणारा फक्त मी एकटा होतो. त्या वेळच्या वक्त्यांनी मला पकडण्याचा व मजविरुद्ध खटला चालविण्याचा केवढा धाक घातला होता व तुम्हीही त्यावेळी केवढी ओरड घातलीत; पण मीही त्याचवेळी निश्चय केला, की माझे म्हणणे न्यायाला अनुसरून असता केवळ कारागृहवास किंवा मरण यांच्या भीतीने माघार घेण्यापेक्षा जे संकट येईल ते पुरवले. ही

झाली लोकसत्तेच्या वेळची हकीगत. आपल्या येथे तीस जुलमी सरदारांची सत्ता चालू असता, त्यांनी मला व आणखी चारचौघांना मीनार कचेरीत बोलावून नेले व सॅलमिसहून लिऑनला घेऊन येण्याचा त्यांनी आम्हास हुकूम फर्माविला. यात लिऑनला ठार करण्याचा त्यांचा बेत होता व आपल्या दुष्टकृत्यांत शक्य तितके इतरानांही गुरफटविण्याकरिता ते कसे विचित्र हुकूम सोडीत याचा हा एक मासला होता व त्यावेळी मी शब्दानेच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीने असे सिद्ध करून दाखविले, की मी मरणाला काडीचीही भीक घालीत नव्हतो. माझ्या हातून कोणताही वाईट किंवा अन्यायाची गोष्ट घडू नये, ही माझी एकच इच्छा होती आणि त्या तीस सरदारांच्या सामर्थ्याने भिऊन जाऊन मी पापकर्म केले नाही. मीनार कचेरी सोडून निघाल्यावर मजबरोबरच्या इतरांनी सॅलॅमिसहून लिऑनला आणले; पण मी मात्र सरळ घरी परतलो. त्याचवेळी माझा जीव जावयाचा; परंतु त्यांची जुलमी सत्ता लवकरच नष्ट झाल्यामुळे तो वाचला आणि मी त्यावेळी काय भाषण केले हे माहीत असलेले पुष्कळ लोक आहेत.

तर मग, जर मी राजकारणात पडलो असतो व प्रामाणिकपणे मी नेहमी न्यायाची व सत्याचीच कड घेतली असती, तर मी इतकी वर्षे जगलो असतो, असे तुम्हाला वाटते काय? मीच काय; पण दुसरा कोणीही जगला नसता; परंतु एकंदरीत पाहता माझे खाजगी वर्तन हे माझ्या सार्वजनिक वर्तनाप्रमाणेच होते व माझे शिष्य म्हणून संबोधिल्या जाणाऱ्यांची मनधरणी मी कधीही केली नाही. खरोखर म्हटले म्हणजे माझे शिष्य असे कोणीच नाहीत; परंतु मी माझे व्रत चालवीत असता जो कोणी आबालवृद्ध येईल त्याला मज्जाव नसते. या संभाषणाबद्दल मी काही फी पण घेत नाही. श्रीमंत किंवा गरीब कोणीही मजकडे यावे व मला प्रश्नोत्तरे करावीत किंवा माझे म्हणणे ऐकावे व जर तो चांगला अथवा वाईट निघाला तर त्याचे श्रेय किंवा दोष मजकडे येत नाही. कारण मी त्याला शिकविण्याचा केव्हाच बाणा बाळगीत नाही आणि जर कोणी असे म्हणत असेल, की सर्व जगाने न ऐकलेला एखादा कानमंत्र मी त्यास एकांतात सांगितला तर त्याचे म्हणणे सपशेल खोटे आहे.

तुम्ही विचाराल, की तुजबरोबर वादविवाद करण्यात इतरांना एवढी हौस का वाटते? परंतु मी त्याचे उत्तर पूर्वीच दिले आहे. ज्ञानाची आढ्यता मिरविणारांची उलटसुलट तपासणी मोठी गमतीची असल्यामुळे ती त्यांना आवडते आणि हे काम मला परमेश्वराच्या आज्ञेनेच करावे लागत आहे व ती आज्ञा म्हणजे दैवीसंचार, दैवीसाक्षात्कार इत्यादी अनेक मार्गांनी स्पष्ट झाली आहे आणि ही जर परमेश्वराची आज्ञा नसेल तर ती क्षणार्धात खोटी ठरेल. मी जर खरोखर तरुणांना नादी लावून बिघडविणारा असेन, तर ज्यांना मी त्यांच्या तरुणपणी मिथ्योपदेश केला असे वाटत असेल, त्यांनी पुढे यावे व मजवर फिर्याद करून आपला सूड उगवावा किंवा त्यांना पुढे येण्यास लाज वाटत असेल तर त्यांच्या वडिलांनी, भावांनी किंवा इतर नातेवाईकांनी पुढे येऊन माझ्या उपदेशामुळेच त्यांच्या कुटुंबाचे काय नुकसान झाले ते

सांगावे. हीच त्यांची वेळ आहे व त्यापैकी येथे काही जण हजरही आहेत. माझ्या बरोबरचा क्रिटो, त्याचा मुलगा क्रिटोब्युलस इत्यादी कित्येक जण येथे हजर आहेत. यापैकी काही जणांना मिलीटसने साक्षीदार म्हणून आणावयास पाहिजे होते व अजून त्याची तशी इच्छा असेल तर तसे करण्यास माझी काहीएक हरकत नाही आणि माझ्यासारखा त्याचेजवळ पुरावा असेल तर त्याला तो पुढे आणू द्या; परंतु देशबंधूंनो वस्तुस्थिती त्याच्या अगदी उलट आहे. मिलीटस व ॲनिटस म्हणतात, की मी तरुणांना बिघडविणारा आहे; परंतु येथे जमलेली एवढी मंडळी माझ्याच बाजूने साक्ष देण्यास तयार आहेत. माझ्या बाजूने साक्ष देणारे म्हणजे मी बिघडविलेले तरुणच असे असते तर ते आक्षेपार्ह दिसले असते; पण त्यांचे न बिघडलेले वडील नातेवाईकही माझ्याच बाजूला आहेत. माझ्या बाजूनेच त्यांचा न्याय किंवा सत्य याखेरीज काय हेतू असणे शक्य आहे? त्यांना पूर्णपणे माहीत आहे, की मी बोलतो ते खरे आहे व मिलीटसच लबाड आहे.''

''देशबंधूंनो, माझे समर्थन मला केवळ या किंवा अशाच शब्दांनी करता येईल. आपल्या स्वत:वर असाच किंवा यापेक्षा अत्यंत सौम्य स्वरूपाचा खटला चालू असतादेखील, आपण डोळ्यांत अश्रू आणून न्यायाधीशांची कशी मनधरणी केली, आपली बायका-पोरे व इष्टमित्र यांना कोर्टापुढे कसे आणले व कशी करुणा भाकली, हे आठवून माझा प्रत्यक्ष जीव जाण्याचा प्रसंग आला असताही मी त्यापैकी काहीच करीत नाही, म्हणून आपणापैकी एखाद्यास माझा फार राग येईल आणि या विरोधानेच चिडून जाऊन तो कदाचित मजविरुद्ध आपले मत देईल. असा कोणी आपणामध्ये आहेच, असे माझे म्हणणे नाही: पण जर असेल तर त्याला माझे उत्तर एवढेच की, बाबा रे, मीही इतरांसारखा हाडामांसाचा मनुष्यच आहे. होमर म्हणतो त्याप्रमाणे मी काही दगडाचा किंवा लाकडाचा नाही. मलाही कुटुंब आहे. तीन मुलगे आहेत. एक अगदी वयात आला असून, दुसरे दोघे लहान आहेत; पण मी त्यापैकी कोणालाही येथे आणून माझ्या सुटकेची मागणी करू इच्छित नाही. याचे कारण आत्मश्लाघा किंवा तुमच्याविषयी अनादर नव्हे. मी मरणाला भितो किंवा नाही, हा प्रश्नच निराळा. केवळ सर्वसाधारण समजुतीच्या दृष्टीनेदेखील अशी वर्तणूक मला, तुम्हाला व सर्व संस्थानाला लाजिरवाणी आहे. माझ्यासारख्या वयोवृद्धाने व शहाणपणासाठी नावाजलेल्या मनुष्याने आपलीच अवनती करून घेऊ नये. मी इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे हे म्हणणे खरे आहे किंवा नाही, ही गोष्ट निराळी; पण जगाची अशी समजूत झाल्यासारखी दिसते खरी आणि जर कदाचित शहाणपण, धैर्य किंवा इतर सद्गुण यांमध्ये प्रसिद्धीस आलेला कोणताही पुरुष आपलाच अपमान करून घेत असेल, तर ती किती लाजिरवाणी गोष्ट आहे? चांगल्या प्रसिद्धीस आलेली माणसेदेखील देहान्त शासनाची शिक्षा झाली असता किती चमत्कारिक वर्तन करतात. हे मी पाहिले आहे. जण काय आपण मेलो तर आपणास मोठेच संकट पडेल व आपण परवानगी दिलीत तर ते अमर होतील अशीच त्यांची समजूत झाली असावी;

परंतु असली थोर माणसे म्हणजे देशाचे कलंकभूत होत आणि जर यदाकदाचित एखाद्या परक्या गृहस्थाने त्यांची वर्तणूक पाहिली असती तर अथेन्स येथील अत्यंत मान्य पुरुष, स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ नसतात असे त्याने म्हटले असते. माझे म्हणणे असे आहे, की आम्हांपैकी जे कोणी अब्रूदार असतील त्यांनी असे वर्तन करू नये व आपण त्यांना करू देऊ नये. उलट तुम्ही असे दर्शविले पाहिजे, की आणीबाणीच्या प्रसंगी आपल्या बायका-मुलांना पुढे करून शोकमय प्रसंग उभा करून आपल्या शहराची इज्जत घालविणाऱ्या पुरुषाला शांतवृत्ती धारण करणाऱ्या पुरुषापेक्षाही तुम्ही अधिकच दंडाई समजता."

"सामान्य मताची गोष्ट बाजूला ठेवली तरी, न्यायाधीशाला योग्य ती माहिती देऊन त्याची खात्री करण्याचे सोडून त्याची विनवणी करून आपली मुक्तता मिळवू पाहणे, हे चुकीचे आहे. कारण न्यायाधीशाचे काम म्हणजे न्याय देणे आहे, बक्षीस देणे नव्हे आणि त्याने अशी शपथ वाहिली असते, की मी कायद्याप्रमाणे न्याय देईन. त्याला आपल्या मर्जीनुरूप न्याय द्यावयाचा नसतो आणि म्हणून आम्ही तुमची मनधरणी करू नये व तुम्ही ती करू देऊ नये. कारण तसे करणे हे वचनभंगाइतकेच पापकारक आहे. त्यामध्ये पावित्र्याचा लवलेशही नाही. मग जे मी पापमय समजतो तेच मी करीन, अशी आपण अपेक्षा बाळगू नका व ज्याअर्थी याप्रसंगी मिलीटसने मजवर अपवित्रतेचा आरोप आणला आहे, त्याअर्थी आता तर ते अगदीच अप्रयोजक होईल कारण जर मी माझ्या मोहक बोलण्याने आपणास आपल्या शपथेचा विसर पाडू पाहीन. तर मी तुम्हास नास्तिक बनविण्याचाच प्रयत्न करीत आहे, असे होईल आणि अशा रीतीने माझे संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत असतानाच मी माझ्या आरोपाला कबुलीजबाब दिला असे होईल; पण खरी स्थिती तशी नाही. माझ्या फिर्यादीपेक्षाही माझी देवावरील श्रद्धा दृढतर व उच्चतर आहे आणि म्हणून परमेश्वरावर पूर्ण हवाला ठेवून तुम्हाला माझ्या व तुमच्या दृष्टीने योग्य वाटेल तो निकाल तम्ही द्यावा. असे मी आपणास सांगतो."

सॉक्रेटिसचे वरील भाषण वाचल्यावर कोणाही शहाण्या मनुष्यास असे वाटणार नाही, की त्याने असे भाषण केले नसते तर बरे झाले असते. त्या भाषणात अभिव्यक्त होणारी उच्चव्रतभावना, मरणाविषयी बेपर्वा व परमेश्वरावरील दृढश्रद्धा, ही अलौकिक आहे व या गुणाकरिताच सॉक्रेटिस ही विभूती पूज्य झाली आहे; परंतु ज्या उद्देशाने आरोपी भाषण करतो, त्या उद्देशाला मात्र या भाषणामध्ये जाणूनबुजून उच्चाटन देण्यात आले आहे. आपणास शिक्षा होऊ नये, एवढाच एक उद्देश मनात ठेवून न्यायाधीशाची करुणा भाकणे किंवा आपणा पोराबाळांविषयी त्यांच्या मनात दया उत्पन्न करणे, ही तर गोष्ट दूरच; पण सॉक्रेटिसच्या भाषणात एक प्रकारचा उद्दामपणा दिसून येत होता व हा प्रसंग अथेन्स येथील न्यायसभेला अगदीच नवीन होता. नामांकित वक्ते, राजकारस्थानी योद्धे यांजवर असा प्रसंग आला असता, त्यांनीही केवळ प्राणाच्या आशेने केलेली आत्मस्तुती व लांगुलचालन

उपभोगण्यास सोकावलेल्या अथेनीयन न्यायाधीशांना या भाषणाची मोठी चीड आली असेल हे साहजिकच आहे व प्लेटोने सॉक्रेटिसच्या भाषणात जी अधुनमधून काही वाक्ये घातली आहेत, त्यावरून असे वाटते, की हे भाषण चालू असताना ते बंद करण्यासाठी त्यांनी पुष्कळच ओरड केली असावी; परंतु सॉक्रेटिसने त्यांच्या विरोधास न जुमानता ते भाषण शेवटपर्यंत रेटले. हे भाषण करताना सॉक्रेटिसच्या मनात न्यायाधीशाचे मन वळविण्याची कल्पना नसून, जणू काय तो भावी पिढ्यांकरिताच आपले भाषण करीत आहे, असे वाटते.

असे उदात्त प्रसंग क्वचितच पाहावयास सापडतात; पण जे जेथे असतील तेथे महनीयच आहेत. ग्रोटने असे म्हटले आहे, की सॉक्रेटिसच्या फिर्यादी पक्षाने त्याचे जेवढे नुकसान केले असेल तेवढे त्याच्या एकट्या भाषणाने केले. ही गोष्ट खरी आहे; परंतु असे मानी वर्तन ठेवून सॉक्रेटिसला शिक्षा झालेलीच पत्करली. आपले सत्त्व दवडून राखलेले अल्प जीवित त्याला मुळीच शोभले नसते. या भाषणाचा अर्थातच न्यायाधीशांवर फार अनिष्ट परिणाम झाला व ज्यावेळी त्यांची मते घेण्यात आली त्यावेळी बहुमताने सॉक्रेटिस दोषी आहे, असा निकाल देण्यात आला. त्यातल्या त्यात आश्चर्य करण्यासारखी गोष्ट हीच, की दोन्ही बाजूंमध्ये फारच थोड्या मतांचा फरक होता. या संबंधाचा नक्की आकडा काय याविषयी वाद आहे; परंतु एकंदरीत हे बहुमत फार अल्पसंख्याक होते, ही गोष्ट खरी.

सॉक्रेटिस हा दोषी ठरला; परंतु त्याला काय शिक्षा द्यावी हे अद्याप ठरवायचे होते. अथेन्समध्ये त्यावेळी अशी पद्धती होती, की फिर्यादी पक्षाने आपणास योग्य वाटेल ती शिक्षा सुचवावी; परंतु आरोपीलाही त्याऐवजी दुसरी काही अल्प शिक्षा सुचविण्याची सवड असे व अशा दोन्ही सूचना आल्यावर न्यायाधीशसभा त्यापैकी एक शिक्षा मुक्रर करी. सॉक्रेटिसला त्याच्या अपराधाबद्दल देहान्त शासन झाले पाहिजे, अशी फिर्यादी पक्षाची मागणी होती व अथीनियन अदालतीच्या नियमाप्रमाणे सॉक्रेटिस दोषी ठरल्यावर त्याऐवजी त्याने दुसरी काही शिक्षा सुचवावयाची होती; पण या प्रसंगीही सॉक्रेटिसने आपला मानीपणा मुळी बाजूस सारला नाही. आपल्या शत्रूपक्षाने सुचविलेल्या शिक्षेऐवजी दुसरी शिक्षा सुचविणे म्हणजे एक त-हेने आपला अन्याय कबूल करण्यासारखेच आहे व असा खोटेपणा पत्करण्यास सॉक्रेटिस मुळीच तयार नव्हता. आपण दोषी ठरल्याबद्दल मुळीच आश्चर्य व्यक्त न करता असा ठराव अत्यल्प बहुमताने झाला याबद्दलच विस्मय दाखवून व कदाचित एकटाच मिलीटस फिर्यादी असता तर त्याच्या बाजूला एक पंचमांश मते न पडल्यामुळे त्यालाच जबरदस्त दंड भरावा लागला असता असा शेरा मारून तो म्हणाला, "माझ्या विरुद्ध पक्षाने मरणाची शिक्षा सुचविली आहे आणि अथीनियन बंधूंनो, त्याऐवजी मी दुसरे काय सुचवावे? अर्थात, जे मला योग्य तेच आणि मला काय योग्य आहे? ज्या मनुष्याने सामान्य मनुष्यांच्या द्रव्यविषयक किंवा अधिकारविषयक आकांक्षा तुच्छ मानून केवळ खाजगी आयुष्य पत्करून तरुण मनुष्यांना सदुपदेश करण्याचे महत्कार्य केले, अशा मनुष्याचे

योग्य बक्षीस काय आहे? कदाचित, प्रिटेनियममध्ये संस्थानाच्या खर्चाने त्याची बडदास्त ठेवली तर साजेल. तुम्ही हा मान ऑलिपस येथील विजयी खेळाडूंना देता; पण अशा खेळाडूंपेक्षा माझ्यासारख्या दारिद्र्यपीडिताला त्याची अधिक जरूर आहे आणि मजविषयी माझे प्रामाणिक मत विचाराल तर मला तीच शिक्षा योग्य आहे.

तुम्हास कदाचित असे वाटेल, की मी तुमचा उपमर्द करीत आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. मी आजपर्यंत कोणाचेही नुकसान केले नाही. माझ्या निरपराधीपणाबद्दल तुमची एका दिवसात खात्री होणे शक्य नाही. इतर ठिकाणच्या कायद्याप्रमाणे मृत्युदंडाची शिक्षा होणारी फिर्याद पुष्कळ दिवस चालवावी असा येथे निर्बंध असता तर ते कदाचित शक्य झाले असते; परंतु केवळ एका दिवसात दीर्घकालीक पूर्वदुर्ग्रह नष्ट करणे शक्य नाही. तथापि, मी ज्याअर्थी कोणाचे नुकसान केले नाही, त्याअर्थी मी माझेही नुकसान करू इच्छित नाही. आपण म्हणता, की मी काही शिक्षा सुचवावी; पण इतकी तरी आपल्या दोषाची कबुली मी का द्यावी? मरणाच्या शिक्षेला मी भितो म्हणून? छे छे! मरण चांगले की वाईट हे मला ठाऊक नाही, तर मग जी दुसरी शिक्षा वाईट आहे, अशी माझी खात्री आहे, अशी शिक्षा मी काय म्हणून सुचवू? मी जन्मभर तुरुंगवास तरी काय म्हणून पत्करावा? व जरी मी मोठा थोरला भुर्दंड भरण्याची शिक्षा सुचविली तरी मजजवळ मुळीच पैसा नसल्यामुळे तुरुंगवासच पत्करावा लागणार. कदाचित, मी हद्दपारीची शिक्षा सुचवीन, असे आपल्या मनात असेल; पण जर माझा उपदेश खुद्द माझ्या जन्मभूमीत मला निर्विघ्नपणे चालविता आला नाही, तर दुसरीकडे ते कसे साधेल? प्रत्येक ठिकाणी प्रस्तुतसारखाच प्रसंग येईल व जीवितलंपटता बाळगल्यास मला माझ्या वृद्धापकाळीदेखील देशोदेशी वणवण करीत भटकण्याचा प्रसंग येईल.

आपण कदाचित असे म्हणाल की, मी दुसऱ्या देशात जाऊन मूकवृत्ती धारण करावी म्हणजे मला कोणी त्रास देणार नाही; पण देशबंधूंनो ते अशक्य आहे. माझे उत्तर तुम्हास पटणे फार कठीण आहे, हे खरे. असे मौनव्रत पत्करणे देवाच्या आज्ञेविरुद्ध आहे, असे मी म्हटले तर तुमचा माझ्या भाषणावर मुळीच विश्वास बसणार नाही व दुसऱ्यांच्या दोषांचे आविष्कारण करून सद्गुणाविषयी चर्चा करणे हेच सर्वथा हितावह आहे असे मी म्हटल्यास ते तर तुम्हास त्याहून पटणार नाही. पण मी म्हणतो हे नि:संशय खरे आहे. माझ्याजवळ पैसा असता तर मी काही दंड सुचविला असता; पण मी दरिद्री आहे. कदाचित मला एक मिना दंड देता येईल तर मी तोच दंड सुचवितो. माझा मित्र प्लेटो, क्रिटो, क्रिटोब्युलस व अपॉलोडोरस म्हणतात, की मी तीस मिने दंड सुचवावा, म्हणून मी तो दंड सुचवितो व त्या रकमेसाठी तेच लायक जामीन आहेत."

सॉक्रेटिसच्या पक्षाला जी काही थोडी फार अनुकूलता होती, तीही या भाषणाने पार नाहीशी झाली. प्रिटेनियनमध्ये सरकारी खर्चाने बडदास्त ठेवणे, हा अथेन्स शहरातील

सर्वांत श्रेष्ठ मान समजला जात असे आणि आपणास तोच योग्य आहे, असे सॉक्रेटिसने सुचविलेले पाहून न्यायाधिकाऱ्यांचे पित्त खवळून गेले असेल व यापूर्वी ज्यांनी सॉक्रेटिस निर्दोषी आहे म्हणून मत दिले होते त्यांनाही आता पश्चात्ताप वाटला असेल. अशा रीतीने त्याला काहीशी अनुकूल असलेली मंडळीही संतापून गेली व त्याला देहान्त शिक्षेचाच हुकूम फर्मविण्यात आला. सॉक्रेटिसने दुसरे काही एक न बोलता तीस मिने हा दंड सुचविला असता, तरीदेखील आरंभी त्याला प्रतिकूल असलेल्या न्यायाधिकाऱ्यांनी ती शिक्षा कबूल केली असती. सॉक्रेटिसचे भाषण ऐकून प्लेटो, क्रिटो इत्यादिकांनाही फार वाईट वाटले असेल; परंतु सॉक्रेटिसच्या दृढ निश्चयापुढे त्यांचे काही चालण्याजोगे नव्हते.

मरणाची शिक्षा फर्माविल्यावर शेवटचे दोन शब्द बोलतानाही सॉक्रेटिसने आपला पीळ कायमच ठेवला. आपण त्यांना रुचणारे मार्ग पत्करीत नाही म्हणूनच आपणास शिक्षा होत आहे, हे व्यक्त करून सॉक्रेटिस स्पष्ट म्हणाला, की त्याच्या पश्चात् त्याची शहाणा म्हणून कीर्ती होऊन न्यायाधिकारीच लोकनिंदेला पात्र होतील. मानहानी करून मरण टाळण्याचे पुष्कळ मार्ग आहेत. शत्रू पाठलाग करू लागला तर शरण जाऊन जीव वाचविता येतो व प्रत्येक प्रसंगी मरण टाळण्याचा असा क्षुद्र मार्ग असतोच; पण खरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मरण कसे टाळता येईल हा नसून अपवित्रपणा कसा टाळता येईल हा आहे. मरण आणि पाप यामध्ये मरण हे अधिक मंदगती आहे. मी वृद्ध असल्यामुळे मला भरभर धावता येत नाही म्हणून मरणानेच मला पकडले. माझे शत्रू तरुण आहेत तर ते पापाच्या कब्जात सापडले आहेत. परमेश्वरी नेमानेमच तसा दिसतो. माझे प्रतिस्पर्धी आणखी काही दिवस थांबते तर मी निसर्गनियमाने आपोआपच मरण पावलो असतो; पण प्रस्तुत प्रसंगाने त्यांनी अपयश मात्र संपादन केले.

मरणाच्या वेळी मनुष्याला भविष्यज्ञान होते, यावरून मी आपणास असे बजावतो, की आपणास या पापाचे जबर प्रायश्चित्त लवकरच भोगावे लागेल. माझ्यापेक्षा तरुण व अविचारी टीकाकार तुमच्यावर टीकेचा यथेच्छ भडिमार करतील. आपणावर टीका करणाऱ्या मनुष्याच्या तडाख्यातून सुटावयाचे असेल तर त्याला मारून काय उपयोग? आपले दुर्गुण टाकणे हा एकच योग्य उपाय आहे.

जे न्यायाधिकारी मला अनुकूल असून, मी दोषमुक्त व्हावे म्हणून म्हणत होते, त्यास माझे शेवटचे सांगणे एवढेच आहे, की सध्या मजवर जो प्रसंग आला आहे, तो माझ्या हिताचाच असला पाहिजे. कारण जो अंतःसाक्षात्कार मी काही अयोग्य गोष्ट करू लागल्यास नेहमी अटकाव करतो, त्या अंत:साक्षात्काराने आज माझ्या कोणत्याही कृत्याला बंदी केली नाही व त्यावरून असा निष्कर्ष निघतो, की झाले हेच उत्तम झाले असले पाहिजे. दुसऱ्या एका दृष्टीने आपण विचार केला तरी हेच दिसून येणार आहे. मरण म्हणजे एकतर वेदनाशून्य स्थिती असेल किंवा काही लोक म्हणतात त्याप्रमाणे परलोकगमन असेल. यापैकी पहिला

पक्ष खरा धरला, तरी स्वप्नहीन सुषुप्तीप्रमाणे मरण म्हणजे एक अर्मर्याद सुखच म्हटले पाहिजे. कारण मग सर्व काल हा अनंत पण एकरूप रात्रीसारखा होईल. या जगात आपण चौकशीच केली तर आपणास आढळून येईल, की अगदी काही स्वप्ने न पडता जी गाढ झोप लागेल ती रात्र आपण फार सुखाची अशी मानतो. अशा सुखमय रात्री फारच थोड्या असतात. म्हणूनच मी म्हणतो, की मृत्यू हा स्वप्नहीन दीर्घकालिक निद्रा असेल तर त्यात माझा फायदाच आहे. कदाचित दुसरा पक्ष खरा असला तरीही फारच उत्तम आहे. त्या ठिकाणच्या स्वर्गीय न्यायाधीशांची मी भेट घेईन. तेथे मला पुरातन योद्धे व पुरातन कवी भेटतील. माझे सत्यसंशोधनाचे काम तेथे ठीक चालेल. मी त्या प्रसिद्ध पुरुषांना प्रश्न करून त्यांच्या ज्ञानाची छाननी करीन व कोण खरा शहाणा व कोण ढोंगी हे उघड करीन. वाहवा! यामध्ये केवढा तरी आनंद आहे! केवळ दुसऱ्यास प्रश्न विचारण्याबद्दल तेथे काही फिर्याद होत नसेल. कारण एक तर तेथील रहिवासी आपणहून अधिक सुखी आहेत व ते अमरही असले पाहिजेत (व म्हणूनच देहान्त शासन हे तेथे शक्य नाही). मृत्यूचा अर्थ हाच असेल तर मी पुन: पुन: मरण्यास तयार असले पाहिजे. याकरिता सर्व दुःख दूर सारा, मला मृत्यू येत आहे तो परमेश्वराच्या योजनेनेच येत आहे व म्हणूनच मी माझ्यावर फिर्याद करणारांचा किंवा मला शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशांचा राग मानीत नाही. त्यांचा मूळ उद्देश मात्र माझे हित करण्याचा नव्हता व त्याबद्दलच मी त्यांना फारतर थोडासा दोष देईन. तथापि, त्याजजवळही मला एक मागणे मागावयाचे आहे. ज्यावेळी माझी मुले मोठी होतील त्यावेळी ती सद्गुणसंपादन करण्यापेक्षा संपत्तीचीच हाव बाळगू लागली किंवा त्यांच्या अंगी नसलेल्या विद्वत्तेचा किंवा सद्गुणांचा दंभ माजवू लागली, तर ज्या प्रमाणे मी तुम्हास त्रास दिला त्या प्रमाणेच तुम्ही त्यांनाही द्यावा व त्यांना ताळ्यावर आणावे आणि आपण असे केलेत म्हणजे आपले माझ्याजवळ व माझ्या मुलांजवळ न्याय्य वर्तन झाले, असे मी समजेन.

"आता वेळ भरत आली आहे. आपणास निरनिराळ्या वाटांनी जावयाचे आहे आणि मला मरावयास जावयाचे आहे. तुम्हास जिवंत राहावयास जावयाचे आहे; परंतु या दोहोंपैकी अधिक चांगले कोणते हे एक त्या परमेश्वरालाच ठाऊक."

हे भाषण झाल्यावर लगेच सॉक्रेटिसाला कारागृहात नेण्यात आले.

❍❍❍

प्रकरण ६ वे

शेवट

सामान्य मनुष्याच्या अनुभवावरून बोलावयाचे झाल्यास आपणास असे म्हटले पाहिजे, की ज्या गोष्टी तडकाफडकी होऊन जातात, त्या दुःखदायक असल्या तरी मनुष्य त्याला धैर्याने तोंड देऊ शकतो; परंतु दीर्घकालपर्यंत मनाचा धीर राहणे हे असामान्य मनुष्यालाच साधणार. जुलमी सत्तेविरुद्ध बंड केल्यामुळे एखाद्या देशभक्ताला फाशीची अगर तोफेच्या तोंडी देण्याची शिक्षा झाली तर ती भोगणे त्याला फारसे अवघड वाटत नाही; परंतु आपल्या साथीदारांची नावे फोडण्यासाठी म्हणून जर त्याजवर हाल-अपेष्टांचे प्रयोग होऊ लागले, तर त्याची सत्त्वच्युती होण्याची फारच मोठी भीती असते. वास्तविक दोन्ही ठिकाणी मरण हेच डोळ्यापुढे दिसणार; पण एका ठिकाणी ते झटकन येते व दुसऱ्या ठिकाणी ते एकसारखे डोकावत असते; पण पुढे मात्र होत नाही. त्याचा तो भयप्रद देखावा मात्र अत्युत्कटतेने पुढे येतो; परंतु त्याची सर्वदुःखहारिणी किंवा निदान सध्यापुरती स्मृतिहारिणी मगरमिठी येऊन पडत नाही. प्रत्यक्ष मरणापेक्षा या मरणचिंतनाचे स्वरूप फारच भयंकर आहे व अशा प्रसंगीही जो पुरुष यत्किंचितही डगमगत नाही, ज्याच्या हृदयाची स्थिरता अणुमात्र कमी होत नाही, ज्याची उल्हसित वृत्ती व परमेश्वरावरील दृढश्रद्धा कंप पावत नाही, तो पुरुषच खरा अलौकिक व संयमी म्हटला पाहिजे.

सॉक्रेटिस याही दिव्यातून तावून सुलाखून अगदी शुद्धस्वरूप बाहेर पडला, ही मोठी कौतुक करण्याजोगी गोष्ट आहे. त्यावेळी दरवर्षी अथेन्समधून डेलॉस येथील अपोलो देवाला पूजा बांधण्यासाठी एक जहाज रवाना होत असे व ते जहाज अथेन्सहून निघाल्यापासून परत येईपर्यंत सरकारी हुकमाने कोणालाही मृत्यूची शिक्षा देणे हे अपवित्रपणाचे समजण्यात येत असे. सॉक्रेटिसवरील खटल्याच्या आदल्या दिवशीच हे जहाज डेलॉसला जाण्यासाठी रवाना झाले होते, म्हणून ते परत येईपर्यंत सॉक्रेटिसला सरासरी तीस दिवसपर्यंत तुरुंगात

शृंखलाबद्ध स्थितीत राहावे लागले. त्यातल्या त्यात सुखाची गोष्ट म्हणजे एवढीच, की त्याच्या मित्रमंडळींना त्याला भेटावयाची सदर परवानगी असे व ते दिवसभर त्याच्या जवळच असत. या दीर्घकाळात सॉक्रेटिसने आपल्यावर कोसळणाऱ्या संकटाबद्दल एकही दुःखोद्गार काढला नाही. आपणावर प्रसंग आला आहे हा संकटाचाच नव्हे, कदाचित सुखाचाच असेल ही त्याची भावना इतकी जागृत होती, की त्याची उल्हसित वृत्ती किंवा तत्त्वविचाराची आवड मुळीसुद्धा कमी झाली नाही. ज्या वेळेस सॉक्रेटिसला मरणाची शिक्षा देण्याचा हुकूम करण्यात आला, त्यावेळी त्याचा मित्र व शिष्य अपोलोडोरस हा त्याजजवळ जाऊन म्हणाला, तुम्ही अगदी निरपराधी असून, मरता याबद्दल मला फार वाईट वाटते. यावर सॉक्रेटिसने हसून एवढेच उत्तर केले, की तर मग मी अपराधी असून मरावे अशी तुझी इच्छा आहे काय? या प्रश्नामध्ये जो उल्हास व बेफिकीरपणा दिसून येतो, तोच उल्हास व बेफिकीरपणा त्याच्या तुरुंगातील वर्तनामध्ये दिसून आला.

सामान्य जनांच्या चित्तवृत्ती व्यथित करणारी मरणकल्पनेची टोचणी त्याने टाळली हे तर खरेच; पण सॉक्रेटिसची एका अन्य मोहाबद्दल परीक्षा व्हावयाची होती. सॉक्रेटिससारख्या महात्म्याने केवळ अन्याय्य शिक्षेला बळी पडावे, हे त्याच्या मित्रमंडळींना तर पसंत नव्हतेच; पण इतर ठिकाणच्या कित्येक लोकांनाही ते पसंत नव्हते. त्यांच्या मनात सॉक्रेटिसविषयी फार आदर असे व त्याचा प्राण वाचविण्यासाठी वाटेल ती मदत करण्यास ते तयार होते. सॉक्रेटिसजवळ ही गोष्ट काढण्यास कोणी योग्य मनुष्य असल्यास तो वयोवृद्ध क्रिटोच होता. त्याने सॉक्रेटिसला ही गोष्ट कशी सुचविली व सॉक्रेटिसने त्यावर काय उत्तर केले हे प्लेटोने आपल्या क्रिटो नामक संवादात सांगितले आहे.

सॉक्रेटिसच्या मृत्यूची पताकाच असे ते डेलॉसला गेलेले जहाज अथेन्सच्या अगदी जवळ आल्याची वर्दी येऊन पोहोचली होती. ते जहाज खुद्द अथेन्सला येण्यास आता फार तर एक दीड दिवसाचा अवकाश होता. सॉक्रेटिसची सुटका करावयाची असल्यास जे करणे असेल ते ताबडतोब केले पाहिजे, अशी वेळ येऊन ठेपली होती. क्रिटो हा मोठ्या पहाटेस उठला व तुरुंगात सॉक्रेटिसकडे गेला. क्रीटो हा त्याजकडे नेहमीच जात असल्यामुळे त्याला कोणीही अटकाव केला नाही. क्रीटो सॉक्रेटिसच्या खोलीत जाऊ पाहतो तो तो गाढ निजलेला! या मनुष्याला मरणाची शिक्षा होण्याच्या अगदोर इतकी स्वस्थ झोप येते, तो एकतर मृत्पिंडच असला पाहिजे किंवा सॉक्रेटिससारखा संयमी महात्मा तरी पाहिजे. सॉक्रेटिस जागा झाल्यावर क्रिटोने त्याला गलबताच्या आगमनाची वर्दी दिली. सॉक्रेटिसलाही याच बाबतीत एक स्वप्न पडले असल्याबद्दल त्याने सांगितले. एक उज्ज्वल वेशधारी सुंदर स्त्री त्याला दिसली व होमरच्या एका पंक्तीने तिने त्याला तीन दिवसांनी तू परलोकी येशील, अशी सूचना दिली होती. मरणाला न डगमगता त्याची मार्गप्रतीक्षा करीत असणारा सॉक्रेटिस व त्याच्या मरणाविषयक कल्पनेनेच व्यथित होणारा क्रिटो, असे हे चित्र

मोठे संस्मरणीय आहे. 'पण सॉक्रेटिस मरणारच का?' हा विचार क्रिटोच्या मनात येत होता. सॉक्रेटिसने मनात आणले तर त्याची सुटका होणे शक्य आहे, मग ती त्याने का करून घेऊ नये? क्रिटोने सरते शेवटी त्याजजवळ ही गोष्ट काढली.

जर यावेळी सॉक्रेटिसची सुटका करण्यात आली नाही तर जग त्याच्या मित्रमंडळींना दोष देईल. क्रिटोजवळ पैसा होता व तो त्याने खर्च केला असता तर सॉक्रेटिस सुटला असता; परंतु आपल्या मित्राचा प्राण वाचविण्यासाठी क्रिटोने काहीही केले नाही, अशीच लोक त्याला नावे ठेवतील. आपल्याकरिता नाही तर निदान आपल्या मित्रमंडळीच्या अब्रूकरिता तरी त्याने निसटून जाण्याच्या बेताला आपली संमती द्यावी. सॉक्रेटिसला कदाचित असे भय वाटण्याचा संभव होता, की मी निसटून गेल्यास माझ्या मित्रांना उलट त्रास होईल, म्हणून त्याला क्रिटोने बजाविले, की एकतर त्याचे मित्र त्याच्यासाठी वाटेल ती झीज सोसण्यास तयार होते व दुसरे असे की थोडाफार पैसा खर्च केला तर सॉक्रेटिसला बिनबोभाट निसटून जाणे शक्य होते. क्रिटो तर आपला सर्व पैसा खर्च करण्यास तयार होताच; पण थीब्सचा राहणारा सिमिथस व सॅमॉसचा रहिवासी सीब्स व इतर कित्येक जण या कामी वाटेल तितका पैसा खर्च करण्यास तयार होते. ज्यावेळी सॉक्रेटिसने कोर्टात भाषण केले, त्यावेळी हद्दपारीची शिक्षा न पत्करण्याचे त्याचे असे कारण दाखविले होते, की ज्या मनुष्याचा त्याचे देशबांधव किंवा संस्थानबांधव तिरस्कार करतात, त्याला दुसरेही मान देणार नाहीत, उलट त्याचा छळच करतील; परंतु क्रिटोचे असे म्हणणे होते, की जर सॉक्रेटिस थेसली प्रांतासारख्या ठिकाणी गेला तर लोक तेथे त्याचा आदरसत्कारच करतील. मग अशा रीतीने आपला प्राण वाचण्याचा संभव असता सॉक्रेटिसने मुद्दाम मरण अंगावर ओढून घ्यावे काय? बरे, सॉक्रेटिस काही अगदी एकटा फटिंग नव्हता. त्याला मुले होती. मग त्यांना जाणूनबुजून पोरके करण्याचे पाप त्याने पत्करणे योग्य होते काय? सारांश, सॉक्रेटिसने निसटून जावे हेच कित्येक बाजूंनी योग्य होते. अडचण जर काही असेल तर त्याचा निश्चय होण्याचीच.

क्रिटोचे वरील प्रकारचे सर्व भाषण सॉक्रेटिसने अगदी संथपणे ऐकून घेतले व मग तो पुढे बोलू लागला. क्रिटोची तत्परता ही अतिशय स्तुत्य होती हे खरे; पण ज्या तत्परतेचा विषय अन्याय्य. ती तत्परता तितकीच अश्लाघ्य ठरणार. यासाठी क्रिटो सांगतो त्याप्रमाणे वागणे योग्य आहे किंवा नाही, हे आधी पाहिले पाहिजे. जर तसे वागणे योग्य नसेल तर केवळ बहुतजनसमाज तसे म्हणतो ही सबब पुरेशी होणार नाही. फार काय पण बहुजनसमाजाच्या धाकाला अगर त्याने केलेल्या शिक्षांना भीक घालणेदेखील योग्य होणार नाही. सॉक्रेटिसने व दुसऱ्याही अधिकारसंपन्न पुरुषांनी हे तत्त्व अनेकवार सांगितले आहे, की कित्येक पुरुषांची मते अवश्य विचारणीय असतात व कित्येकांची नसतात. उदाहरणार्थ, एकदोघा शहाण्यांची मते शेकडो मूर्खाच्या मतांपेक्षा अधिक मानार्ह असतात. सॉक्रेटिसने व इतर थोर पुरुषांनी प्रतिपादिलेला हा नियम सॉक्रेटिसला शिक्षा झाली या आकस्मिक गोष्टीमुळे बदलला आहे

काय? क्रिटो हा या ठिकाणी तटस्थ आहे. कारण हा प्रश्न त्याच्या स्वतःच्या मरणाचा नाही व म्हणून या प्रश्नाचे उत्तर त्यालाच अधिक चांगले देता येईल.

सॉक्रेटिसच्या या वरील मुद्याला रुकार देणे क्रिटोला भागच आहे. या पुढील प्रश्न म्हणजे ज्या थोड्या लोकांचे आपण ऐकावयाचे ते कोण असावेत? जर एखाद्या मनुष्याला आपली शरीरसुधारणा करावयाची असेल तर तो भराभर अननुभवी लोकांचे म्हणणे न ऐकता एखाद्याच तज्ज्ञ मनुष्याचा सल्ला घेतो व आपले आहारविहारादिक त्याप्रमाणे नियमित करतो व त्याचे हे करणे बरोबर आहे असेच आपण कबूल करतो. मग केवळ शरीर सुधारणेबद्दल जी गोष्ट खरी, ती न्याय्यान्याय्य गोष्टींचा निर्णय करतानाही आपणास लक्षात घेतली पाहिजे. या ठिकाणी आपल्या शरीरापेक्षाही श्रेष्ठ अशा मनाच्या अगर आत्म्याच्या उत्कर्षाचा प्रश्न असल्यामुळे आपणास विशेष सावध राहिले पाहिजे व म्हणूनच केवळ लोक म्हणतात एवढ्यासाठी एखादी गोष्ट करणे अयुक्त आहे.

मनुष्याने जाणूनबुजून वाईट कृत्य करू नये. फार काय पण दुसऱ्याचा सूड उगविण्यासाठीदेखील अन्याय्य कृत्य करू नये. कारण जे वाईट ते अहितकारकच, मग ते कोणत्याही परिस्थितीत घडो. सॉक्रेटिसने या मताचे अनेकवार प्रतिपादन केले होते. आताच ती मते टाकून देणे म्हणजे सर्वच पोरखेळ होणार, सबब सॉक्रेटिसला ती मते मान्य केलीच पाहिजेत. क्रिटोलाही ती मान्य आहेत, मग आता पुढील प्रश्न हा, की अथीनियन लोकांनी केलेल्या हुकमाच्या विरुद्ध तुरुंगातून निसटून जाणे न्यायाचे आहे किंवा नाही. ते जर अन्याय्य असेल तर लोकनिंदा, मुलाबाळांचा पोरकेपणा, मरणाची व्यथा, या सर्व गोष्टींचा विचार बाजूसच सारला पाहिजे. मुख्य पाहावयाचे म्हणजे मरणाचे आनुषंगिक परिणाम न पाहता ते टाळण्यात कोणाचा अन्याय होतो आहे किंवा काय हे पाहिले पाहिजे. या प्रश्नाचाच क्रिटोला अन्य रीतीने विचार करावयाचा असेल तर घटकाभर आपण असे समजू, की त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागावयाचे ठरवून सॉक्रेटिस पळून जाण्याच्यापाहिजे तर सुटून जाण्याच्या म्हणा-तयारीला लागला व तो काय करणार हे पाहून संस्थानाचे कायदेकानू त्याजपुढे मूर्तिमंत उभे राहिले व त्याला विचारू लागले, की सॉक्रेटिस, हे तू काय करीत आहेस? सर्व लोकांनी मान्य केलेल्या कायद्यांचा हुकूम मोडणे तुला योग्य आहे काय? जर तुझ्याप्रमाणे सर्वच जण कायद्याने केलेले हुकूम मोडू लागले, तर समाजव्यवस्था तरी शांततेने व सुरळीत चालेल काय? तू असे म्हणशील, की कायद्याने मला अन्याय्य शिक्षा केली म्हणून मी तो मोडतो, तर त्यावर आम्ही तुला असे विचारतो, की तुझा आमचा असा कधी करार झाला होता काय, की तुला आमच्या विरुद्ध अशी काय तक्रार आणता येणार आहे, की ज्याच्या योगाने तुझ्या या वर्तमानकृत्याचे समर्थन होऊ शकेल? तुझा सर्व जन्मच सर्वस्वी आम्हावर अवलंबून नाही काय? तुझ्या आई-बापांनी ज्या कायद्याप्रमाणे लग्न केले व ज्या कायद्यामुळे तू जगात निर्माण झालास, ते विवाहाचे कायदे तुला मान्य नाहीत काय? ज्या कायद्याने

तुला शिक्षण देणे तुझ्या पित्याला भाग पडले ते शिक्षणविषयक कायदे तू मानीत नाहीस काय? तुझ्या बापजाद्याप्रमाणे तूही आमचे एक अपत्य किंवा एक गुलाम नाहीस काय? तू आमच्याशी मुलाच्या नात्याने वागावेस व आमचा उपमर्द करू नयेस, हे योग्य नाही काय? जर एखाद्या बापाने रागाच्या आवेशात आपल्या मुलाला मारले, तर मुलाने बापास उलटून मारावे ती नीती आहे काय? व ही त्याची कृतज्ञताबुद्धी आहे काय? मग आई-बापांपेक्षाही आपला देश व त्याच्या सुस्थितीला अवश्य असणारे कायदे हे अधिक पूज्य आहेत, ही गोष्ट तुझ्यासारख्या तत्त्वज्ञान्यालाही समजू नये काय? आपले आई-बाप आपणावर रागावले तरी त्यांचा उपमर्द न करता ते करतील ती शिक्षा निमूटपणे सोसणे हे जर अत्यंत अवश्य, तर कायद्याने केलेला हुकूम कितीही दुःखदायक असला तरी तो शब्दशः पाळणे त्याहीपेक्षा शतपट आवश्यक नाही काय?

इतकेच नव्हे. सॉक्रेटिस, आम्ही तुला जन्म दिला, लहानाचा मोठा केला, तरीही तुला आमच्या कह्यांत राहणे पसंत नसेल तर तुला तशी मोकळीक होती. तू जेव्हा वयात आलास त्यावेळी आपली सर्व चीजवस्तू घेऊन सुरक्षितपणे व राजरोसपणे तुला वाटेल तेथे जाता आले असते. अशा रीतीने एखादा मनुष्य एक संस्थान सोडून दुसरीकडे जावयाला लागला तर त्याला कोणत्याच कायद्याची आडकाठी नाही; पण सॉक्रेटिस तू तसे केले नाहीस. तुला हे संस्थानच फार आवडले. इतर लोक प्रवासाच्या निमित्ताने तरी बाहेर जातात; पण तुझे या संस्थानावरील प्रेम इतके जबरदस्त, की तू त्याला सोडून क्वचितच राहिलास. संस्थानाच्याच वतीने पॉटीडियासारख्या ठिकाणी लढावयास किंवा अगदी क्वचित प्रसंगी कॉरिथला शर्यती पाहावयास गेला असशील तेवढाच, नाहीतर अगदी आंधळ्यापांगळ्यांप्रमाणे तू आपणास या संस्थानात डांबून ठेवलेस. तुला इतर संस्थानांविषयी व तेथील कायदेकानूंविषयी माहिती नव्हती असेही नाही; पण इतके असूनही ज्याअर्थी तू येथेच राहिलास त्याअर्थी तुझी आमच्यावर प्रीती होती व आमची आज्ञा पाळण्याची तू जाणूनबुजून कबुली दिली होतीस, असे म्हणावयास काय हरकत आहे?

कदाचित तू असे म्हणशील, की माझ्यावर अशी अन्याय्य फिर्याद होईपर्यंत माझी तुमच्यावर प्रीती होती; पण मजवर हा गहजब गुदरल्यापासून ती उडून गेली. तर आम्ही तुला असे विचारतो, की ज्यावेळी तुला मरणाव्यतिरिक्त दुसरी काही शिक्षा सुचविण्याचा कोर्टाचा हुकूम झाला होता, त्याच वेळेस तू हद्दपारीची शिक्षा का सुचविली नाहीस? ती शिक्षा तू सुचविली असतीस तर कदाचित ती न्यायाधिकाऱ्यांनी मान्य केली असती व मग तुला राजरोसपणे दुसरीकडे जाता आले असते; परंतु त्यावेळी तुला हद्दपारीपेक्षा मरणच बरे वाटले; मग आता कायद्याविरुद्ध पळून जाण्याची इच्छा का करतोस?

आमचा उपमर्द करून तू पळून गेलास तर तुझ्या मित्रांना हद्दपारीची शिक्षा होईल, त्यांची संपत्ती सरकारजमा होईल, ही तर आपत्ती आहेच; पण तू जाशील तरी कुठे हा प्रश्नच नाही

का? तू जर मिगारा किंवा थीब्ससारख्या सुसंघटित संस्थानामध्ये गेलास, तर तेथील लोक तुला आपला शत्रूच समजतील, कारण ज्याने एका संस्थानाचे कायदे बिनदिक्कत मोडले, तो दुसऱ्या संस्थानाचे व तेही परकीय संस्थानाचे कायदे मोडील हे उघड आहे व असा कायदे मोडणारा पुरुष तरुण मुलांना बिघडविणारा आहे, हेही त्यावरून ओघानेच प्राप्त होईल, तर मग सद्गुणी संस्थाने सोडून तू दुर्गुणाने बुजबुजलेल्या संस्थानांकडे वळशील काय? अशाच अटीवर केवळ कसे तरी जीवित कंठणे तुला शोभते काय? का तू आपला निर्लज्जपणाने त्या चांगल्या संस्थानातच जाशील? पण असा गेलासच तर तू तेथे सद्गुण, समाजसुस्थिती, न्याय इत्यादी विषयांवर अवाक्षर तरी काढू शकशील काय? क्रिटोचे थेसलीमध्ये काही मित्र आहेत, त्याजकडे तू गेलास तर साधेलसे वाटते खरे. कारण आजकाल थेसलीमध्ये मोठीच अंदाधुंदी माजली आहे; परंतु हे तरी किती दिवस चालेल? जोपर्यंत तू तेथे नवीन आहेस, तुझ्या निसटून येण्याच्या कृत्यातील वैचित्र्य जोपर्यंत कायम आहे, तुझ्या वेशांतरादिकांतील गमती जोपर्यंत विनोदकारक आहेत, तोपर्यंत तुला तेथे चांगला आश्रय मिळेल; पण या गोष्टी लवकरच शिळ्या व बेचव होतील आणि मग तुला केवळ गोळाभर अन्न मिळविण्यासाठी सगळ्यांची हांजी हांजी करून राहावे लागेल. मग तुझे उदात्त विचार कोठे जातील?

आपल्या मुलाबाळांच्या कल्याणासाठी तू हा अश्लाघ्य मार्ग पत्करतोस म्हणून म्हणावे, तर आम्ही असे विचारतो, की आपल्या मुलांना थेसलीमध्ये नेऊन त्यांचा अथेन्सच्या नागरिकत्वाचा हक्क बुडविण्याचा का तुझा विचार आहे? त्यांच्यावर तू उपकार करणार तो हाच काय? तू थेसली प्रांतात जिवंत असलाच तरच तुझे मित्र येथे त्यांची अधिक काळजी घेतील, असे तुला वाटत असेल, तर हा तुझा भ्रम आहे. जे तुझे खरे मित्र आहेत ते, त थेसलीमध्ये असलास काय किंवा परलोकात असलास काय, आपले कर्तव्य करावयास कधीही चुकणार नाहीत.

याकरिता सॉक्रेटिस, आमचे ऐक. तू अविचाराने वागलास तर या लोकी तुझे, तुझ्या मित्रांचे, तुझ्या मुलाबाळांचे कल्याण होणार नाहीच. उलट तू या लोकांत असशील तेथपर्यंत या विश्वासघाताबद्दल आम्ही तुझा तिरस्कारच करू; पण तू परलोकी गेल्यावर आमचे बांधव जे तेथील कायदे तेही तुझा, आमचा शत्रू या नात्याने तिरस्कार करतील. तू आता मेलास तर तुजकडे पाप येत नाही, तू सत्याचरणासाठी बळी पडतो असेच होत आहे. म्हणून क्रिटोचे ऐकू नकोस.

क्रिटो, माझ्या कानांमध्ये हाच ध्वनी सारखा दुमदुमून राहिला आहे व त्याने मला दुसरे कोणचेही भाषण ऐकूच येत नाही. यास्तव तू जा व मला परमेश्वर धाडील तिकडे जाऊ दे.

क्रिटोच्या संवादातील वरील विचार वाचून, ज्या सॉक्रेटिसची न्यायनिष्ठा एवढी जबरदस्त व ज्याची समवृत्ती एवढी निश्चित, तो त्रिवार धन्य होय असेच वाटते.

सॉक्रेटिसच्या ऐहिक आयुष्यातील शेवटच्या दिवसाची हकीगत प्लेटोच्या फीडो या संवादांत आली आहे. त्या दिवशी प्लेटो हा स्वतः आजारी असल्यामुळे तुरुंगात सॉक्रेटिसला भेटावयास गेला नव्हता; परंतु सॉक्रेटिसची इतर सर्व मित्रमंडळी व परगावाहून सॉक्रेटिसचे शेवटचे दोन शब्द ऐकण्याच्या औत्सुक्याने आलेले प्रसिद्ध पाहुणे वगैरे मंडळी त्या दिवशी पहाटेच्याच सुमारास तुरुंगाजवळ आली. सॉक्रेटिसकडे नित्य येण्याचा त्यांचा क्रमच असे. सॉक्रेटिसचा इन्साफ ज्या कोर्टात झाला ती कोर्टाची जागा अगदी नजीकच होती, त्या ठिकाणी ही मंडळी उजाडताच एकत्र जमत व तुरुंगाचे दार उघडल्याबरोबर सॉक्रेटिसकडे जात. डेलॉसहून जहाज परत आल्याची बातमी त्यांना आदल्या दिवशी संध्याकाळीच समजली होती व आपणास आता सॉक्रेटिसचे दर्शन पुनः होणार नाही व त्याच्या अमृतमधुर वाणीचा लाभ आपणास पुन: मिळणार नाही, या विचाराने व्यथित झालेली त्याची स्नेही मंडळी त्या दिवशी रोजच्यापेक्षाही लवकरच जमली होती. तुरुंगावरील अधिकाऱ्याने नित्याप्रमाणे दार उघडले; पण एकदम त्यांना आत येऊ दिले नाही. अथेन्समधील अकरा अधिकाऱ्यांचे मंडळ सॉक्रेटिसकडे गेले असून, त्याच्या बेड्या काढण्याचा व त्याला आजच विषप्राशन केले पाहिजे, अशी सूचना देण्याचा कार्यक्रम सुरू होता. हे काम आटोपल्यानंतर सॉक्रेटिसच्या मित्रमंडळींना आत घेण्यात आले.

सॉक्रेटिस आपल्या बिछान्यावर पडला असून, त्याच्या पायातील बेड्या काढण्यात आल्या होत्या. त्याची बायको झँटिपी ही आपल्या मुलाला घेऊन त्याच्याजवळच बसली होती. सॉक्रेटिसच्या मित्रमंडळींना आत येताना पाहून ती मोठ्याने आक्रोश करीत म्हणाली, 'तुमच्या व यांच्या संभाषणाचा आज शेवटचा प्रसंग आहे.' तिचा तो आक्रोश ऐकून सॉक्रेटिस म्हणाला, 'क्रिटो, तुझ्या माणसांपैकी कोणाबरोबर तरी हिला घरी पोहोचवून दे.' क्रिटोने त्याप्रमाणे व्यवस्था केली व झँटिपी रडत ओरडत व ऊर बडवीतच तेथून निघून गेली. नंतर सॉक्रेटिस उठून बसला व आपले पाय चोळीत चोळीत म्हणाला, सुख म्हणून ज्याला नाव देतात ती वस्तू किती चमत्कारिक आहे व त्याच्या दुःखाशी असलेला संबंध तरी किती चमत्कारिक आहे? त्यापैकी दोन्हीही एकाच काळी एकत्र नसतात; पण एखाद्या मनुष्याने एकाचा पाठलाग केला, की दुसरे त्याच्या पाठीस लागलेच म्हणून समजावे. त्यांची शरीरे दोन आहेत; पण डोके जणू एकच आहे. इसापला जर या जोडीची आठवण झाली असती तर त्याने अशी काहीतरी गोष्ट लिहिली असती. देवाला सुख व दुःख यांचे भांडणच मिटविता येईना म्हणून सरतेशेवटी त्याने त्यांची डोकी एकत्र बांधून एकजीव करून टाकली आणि या कारणामुळेच एक जाईल तिथे दुसरेही धावते. माझाच अनुभव पाहा. बेड्या घातल्यामुळे मला पूर्वी दुःख झाले तर आता त्या काढल्यामुळे सुख झाले.

हे भाषण ऐकून सीब्स म्हणाला, सॉक्रेटिस आपण इसापबद्दल गोष्ट काढली, हे बरे झाले. मला कित्येक जणांनी विचारले व सुप्रसिद्ध कवी इव्हेनस याने तर नुकते परवाच विचारले,

की सॉक्रेटिसने आजपर्यंत कवितेची एकही पंक्ती लिहिली नाही, असे असून आता तुरुंगात तो काय म्हणून इसापच्या गोष्टींचे कवितेत रूपांतर करीत आहे? त्याने अपोलो देवावर एक स्तोत्रही केले आहे म्हणतात! इव्हेनस मला पुन: भेटला तर तो पुन: मला असेच विचारील- तर आपली इच्छा असल्यास मी त्याला काय सांगावे, ते मला कळवा.

सॉक्रेटिस म्हणाला, सीब्स तुला तो भेटला तर त्याला सांग, की त्याच्याशी स्पर्धा करण्याची माझी मुळीच इच्छा नाही व त्याच्याशी स्पर्धा करणे काही सोपे नाही. इसापच्या गोष्टीवर कविता करण्यात माझा हेतू एवढाच, की मला निरनिराळ्या वेळी एकाच अर्थाचे स्वप्न पडे व त्यात मला संगीतरचना करण्याबद्दल आज्ञा होत असे. मला असे वाटे, की तत्त्वज्ञान हेच सर्व श्रेष्ठ संगीत होय व त्याची रचना तर मी नित्य करीतच आहे. ज्याप्रमाणे एखाद्या शर्यतीच्या वेळी प्रेक्षक लोक आधीच धावत असणाऱ्या मनुष्याला अधिक जोराने धावण्यास प्रोत्साहन देतात, त्याप्रमाणेच मला ही आज्ञा होत आहे, असा मी अर्थ केला; परंतु मला याबद्दल असा संशय होता, की या आज्ञेत संगीत शब्द रूढअर्थीच तर वापरला नसेल ना? या संशयामुळे येणाऱ्या अस्वस्थतेतून सुटण्यासाठी सूर्यदेवाच्या सणामळे मला मिळालेल्या फरसतीचा मी फायदा घेतला. प्रथमत: त्या देवावरच मी एक स्तोत्र रचले; परंतु कवीचे काम म्हणजे केवळ शब्दरचना करावयाची नसून काहीतरी गोष्ट किंवा कथा जुळविण्याचेही आहे. मला तर काही गोष्ट जुळविता येतच नाही तेव्हा आयत्या इसापच्या गोष्टी घेऊन मी त्यावरच कविता करण्यास आरंभ केला. सीब्स, ही हकीगत इव्हेनसला सांग आणि त्याला म्हणावे, की तू शहाणा असशील तर माझ्या मागून ये. मला तर आज गेलेच पाहिजे, असा अथीनियन लोकांचा हुकूमच झाला आहे. सिमीयसची व इव्हेनसची चांगली ओळख होती व त्यावरून त्याने कळविले, की इव्हेनसला हा सॉक्रेटिसचा उपदेश मुळीच रुचणार नाही. सॉक्रेटिसचा त्यावर असा प्रश्न आहे, की इव्हेनस हा तत्त्वज्ञानी आहे ना, मग त्याने मरणाला का भ्यावे.

यावरून अमरत्वाचा प्रश्न निघाला व त्यावर विस्तृत चर्चा झाली. या संवादातील मतांचे दिग्दर्शन मागील एका प्रकरणी करण्यात आलेच आहे. सध्या त्या मतांचे पृथक्करण करण्याचा किंवा त्यावरून सुचणाऱ्या इतर साधकबाधक प्रमाणांचा विचार न करता आम्हास एवढेच सुचवावयाचे आहे, की मरणाच्या दारात उभ्या असलेल्या सॉक्रेटिसने हा विषय चर्चेला घेऊन त्याचे इतके समत्वबुद्धीने विवेचन करावे, हीच गोष्ट मोठी उपदेशक व आश्चर्यकारक आहे. सॉक्रेटिसने योजलेलीच उपमा येथे योग्य आहे. ज्याप्रमाणे एखादा हंस आपल्या मरणाच्या वेळी अधिकच सुस्वर गायन करतो त्याप्रमाणे सॉक्रेटिसची ही वर्तणूक होती. ज्याने आपले सर्व आयुष्य तत्त्वचिंतनाच्या स्वर्गीय संगीत लहरीत घालविले त्याने स्वर्गात जाता जाता त्याच संगीताची रागपरिवाहिणी लकेर मारीत, विश्वजनांना मोहित करावे यात काय नवल? नवल हेच की असे राजहंसप्रकृती पुरुष या जगतात जन्माला येतात व पृथ्वीपेक्षा श्रेष्ठ भूमीची

जणू साक्षच देतात. या संवादासारखे मोहक वाङ्मयखाद्य क्वचितच मिळावयाचे व याचमुळे सर्व सहृदय लोकांची अंत:करणे या प्रसंगाने हलवून सोडली आहेत.*

हंसाचे दशदिशांना मोहित करणारे संगीत चालू असताच त्याच्या अमृतमधुर आलापांनीही न द्रवणारे मरण त्याला गाठीत असते व क्षणोक्षणी त्याचा आवाज अधिक खोल खोल जात असतो. सॉक्रेटिसचे बोलणे असेच सारखे चालू राहिले तरी चालेल, म्हणून सर्व श्रोते स्तब्ध झाले होते; पण निघृण काळाचा ओघ तसाच चालला होता व अखेर त्याने विष प्यावयाची वेळ झाल्याची सूचना केलीच. आपल्या प्रेताला बायकांनी स्नान घालण्यापेक्षा आपण विषप्राशनापूर्वीच स्नान करावे, असा सॉक्रेटिसचा हेत होता. म्हणन तो स्नानास जावयासाठी उठू लागला. त्यावेळी क्रिटोने विचारले, सॉक्रेटिस, आपल्या मुलाबाळांविषयी अगर इतर काही गोष्टींविषयी आम्हास काही सूचना करावयाच्या आहेत काय? सॉक्रेटिसने म्हटले. की, तुम्ही नीटपणे वागलात म्हणजे त्यात सर्व आले.

क्रिटोने विचारिले, 'आपणास मूठमाती कशी द्यावयाची?'

सॉक्रेटिस म्हणाला, 'तुम्हाला वाटेल तशी; पण मग मला आधी पकडून ठेवले पाहिजे हो!' नंतर तो इतर मंडळीकडे वळला व हसत हसत म्हणाला, तुमच्याशी संभाषण करणारा व आपल्या भाषणाची संगती लावणारा जो (अंतर्वर्ती जीव) तोच सॉक्रेटिस, अशी मला क्रिटोची समजूत घालता येत नाही. त्याला वाटते थोड्या वेळाने आपल्यापुढे पडणारे प्रेत म्हणजेच सॉक्रेटिस आणि म्हणून तो मला विचारतो, की तुम्हाला मूठमाती कशी द्यावी. मी एकदा विष प्यालो म्हणजे पुण्यवंतांच्या आनंदमय लोकी जाईन असे दाखवून, मी तुमचे व माझे समाधान करण्याचा यत्न केला; पण क्रिटोवर माझ्या शब्दांचा काहीच परिणाम झाला नाही, असे दिसते. याकरिता आता तुम्ही मजसाठी क्रिटोप्रमाणेच जामीन राहिले पाहिजे. जामीनकीची बाब मात्र फार निराळी आहे. क्रिटो मजबद्दल कोर्टात जसा जामीन राहिला होता, की सॉक्रेटिस तुरुंगातून पळून जाणार नाही; पण आता तुम्ही मजसाठी क्रिटोला जामीनकी

---

* But the picture which the dialogue presents of the temper and state of mind of Socrates, during the last hours of his life, is one of immortal beauty and interest, exihiliting his screne and even playful equanimity amidst the uncontrollable emotions of his surrounding friends the genuine unforced persuasion, governing both his words and his acts, of what he had pronounced before the Dikasta, that the sentence of Death was no calamity to him and the unabated maintenance of that earnest interest in the improvement of man and society, which had for so many years formed both his paramount motive and his active occupation. Grote: History of Greece.

द्या, की मी विष प्यायल्यावर खास येथे राहणार नाही. याच्या योगाने माझे प्रेत जळताना अगर गाडताना पाहून त्याला तितके वाईट वाटणार नाही. माझ्या दुर्दैवाकरिता म्हणून क्रिटोने दुःख करावे किंवा मला त्याने पुरले म्हणून म्हणावे, हेच मला पसंत नाही. असले अपशब्द मोठे वाईट असून, ते आत्म्यालाही विटाळतात. याकरिता क्रिटो, आपला शोक आवर व माझ्या शरीराला पुरावयाचे आहे, असे म्हणून त्याची शिरस्त्याप्रमाणे विल्हेवाट लाव.

इतके बोलून तो उठला व स्नान करावयास गेला. त्याची मित्रमंडळी बाहेरच बसली होती व एखाद्या आसन्नमरण पित्याच्या रुग्णशय्येवर आपल्या भावी पोरकेपणाची हृदयभेदी चित्रे काढता काढता म्लानवदन झालेल्या अर्भकांप्रमाणे त्यांची तोंडे उतरून गेली होती. सॉक्रेटिसचे स्नान झाल्यावर त्याने आपणास भेटावयास आलेल्या मुलांची व घरच्या बायका-माणसांची गाठ घेऊन काय निरवानिरव करावयाची ती करून तो पुन: आपल्या मित्रमंडळीत येऊन बसला. आता जवळजवळ सूर्यास्ताची वेळ झाली होती. थोड्या वेळाने तुरुंगावरील अधिकारी सॉक्रेटिसकडे आला. आपण सॉक्रेटिसला विष देणार; पण ते हुकमाचे ताबेदार म्हणून देणार. ही काही आपल्या इच्छेची गोष्ट नव्हे व म्हणूनच त्या कृत्याचा दोषही त्याचा नाही. इतर अज्ञ जन विष घेतेवेळी त्यालाच शिव्या देतात; पण सॉक्रेटिस खास तसे करणार नाही, इत्यादी भाषण बोलता बोलता तो एकदम मागे वळला व ढळढळा रडू लागला. हा अधिकारी सॉक्रेटिस तुरुंगात आल्यापासून त्याच्याशी फार चांगल्या रीतीने वागत असे व त्याजकडे नेहमी येत असे. त्याच्या सध्याच्या वर्तनावरून त्याचा मायाळू स्वभाव चांगलाच दिसत होता. सॉक्रेटिसने त्याची तारीफ करून त्याच्या सांगण्याप्रमाणे चाकरास विष तयार करण्याची सूचना करण्यास क्रिटोला सांगितले. क्रिटो म्हणाला, अजून सूर्य पुष्कळ वर आहे व कित्येक लोक मरणाच्या दिवशी या काळी शक्य तितकी चैन करीत असतात व विष पिण्यास शक्य तितका विलंब करतात, हे मी पाहिले आहे. मग आताच एवढी घाई का?

सॉक्रेटिस म्हणाला, क्रिटो, ज्यांना असा विलंब करण्यात काही फायदा आहे असे वाटत असेल त्यांची गोष्ट निराळी; पण मला त्यात काहीच अर्थ वाटत नाही. जे जीवित परकीय झाले ते वाचविण्याची धडपड कशाला? चल तर उगाच आडकाठी करू नकोस.

क्रिटोने त्या चाकराला खूण केली व तो बाहेर गेला आणि थोड्या वेळाने विषाचा पेला घेऊन आत आला. त्यावेळी त्याजबरोबर तुरुंगावरील अधिकारीही होता. सॉक्रेटिसने त्याला म्हटले, गड्या, तू यातील अगदी दर्दीच आहेस, तर मला कसकसे करावयाचे ते सांग. तो म्हणाला, काही नाही. आपण फक्त पाय जड पडेपर्यंत फिरत राहा व मग स्वस्थ पडा म्हणजे झाले. आपल्यावर विषाचा परिणाम होईल. इतके म्हणून त्याने तो पेला सॉक्रेटिसकडे केला व सॉक्रेटिसने तो अगदी सहज लीलेने घेतला. त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर विषादाची अगर भयाची एक छटादेखील दिसली नाही. आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्या गड्याकडे अगदी टक लावून पाहत त्याने विचारले, काय रे, या विषातले थोडे विष देवाच्या नावाने

जमिनीवर टाकण्यास हरकत आहे काय? तो म्हणाला, महाराज, आम्ही फक्त एका माणसास पुरेल एवढेच विष तयार करतो. सॉक्रेटिस म्हणाला, ठीक आहे. तथापि, माझा हा परलोकाचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून मी देवाची प्रार्थना केलीच पाहिजे. तथास्तु. इतके म्हणून सॉक्रेटिसने तो विषाचा पेला तोंडाला लावला व मोठ्या आनंदाने व उत्सुकतेने त्यातील विष पिऊन टाकले.

इतका वेळ त्याच्या मित्रमंडळींनी पुष्कळ अवसान धरले होते; पण तो विष प्यायला हे पाहून त्यांचा धीर सुटला व त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. क्रिटोला आपला दुःखावेग आवरेना म्हणून तो बाहेर निघून गेला. इतका वेळ आपोलोडोरस सारखा स्फुदतच होता; परंतु आता तर त्याने मोठ्याने किंकाळीच फोडली. सॉक्रेटिस मात्र अगदी निर्विकार होता. ती आरोळी ऐकून तो म्हणाला, हे काय? अशा रीतीने काही गैरवर्तणूक होऊ नये म्हणून तर मी बायकामाणसांना मघाच लावून दिले. मनुष्याने मरताना अगदी शांत असावे असे मी ऐकले आहे, तर शांत व्हा.

हे त्याचे भाषण ऐकून त्याची मित्रमंडळी स्तब्ध झाली. त्याचे फिरणे चाललेच होते. लवकरच त्याचे पाय जड पडले व तो पूर्वसूचनेप्रमाणे अंथरुणावर उताणा निजला. त्याला विष देणारा गडी पुनः पुनः त्याचे पाय पाही व ते चेपून त्याला आपणास काही कळते काय म्हणून विचारी. हलके हलके पाय व मांड्या बधिर झाल्या. सॉक्रेटिसने स्वतः त्याचा अनुभव घेतला व याच क्रमाने अंतःकरणापर्यंत गेले की आटोपले, असे म्हणून त्याने आपल्या अंगावर पांघरूण घेतले. त्याच्या नाभीपर्यंत बधिरता गेली असेल अशा सुमारास त्याने आपल्या तोंडावरचे पांघरूण काढले व तो क्रिटोला म्हणाला, क्रिटो, एक्लॉपियसला एक कोंबडा बळी द्यावयाचा राहिला आहे, तेवढा दे. यानंतर सॉक्रेटिस काही एक बोलला नाही. थोड्या वेळाने काही बारीक आवाज ऐकू आला. त्याचे पांघरूण काढून पाहतात तो त्याचे डोळे थिजले होते.

अशा रीतीने हा पुरुषसूर्य अस्तंगत झाला व ही दुःखदायक गोष्ट पाहूनच की काय, सूर्यही अस्ताला गेला! सॉक्रेटिसला सुखरूप आपल्या पुत्राच्या नगरीत पोहोचविण्यासाठीही तो गेला असेल, नाही कोणी म्हणावे? तसेच काहीतरी असावे. कारण सॉक्रेटिसच्या सुखरूपतेबद्दल त्याची पक्की खात्री नसती तर तो पुनः दुसऱ्या दिवशी हसतमुखाने प्राचीच्या मंदिरात संचार करताना कसा दिसला असता?

❍❍❍

प्रकरण ७ वे

उपसंहार

ज्या प्रचंड वृक्षाच्या आश्रयाने कित्येक वर्षेपर्यंत आपण राहिलो, त्यावर आपली घरटी बांधली, आपल्या मुलाबाळांचे संगोपन केले, त्याच वृक्षावर कुन्हाडीचे प्राणघातक प्रहार पडू लागले म्हणजे त्या पक्ष्यांना, त्यांची मर्जी असो वा नसो, तेथून आपले बिऱ्हाड हलवावेच लागते. सॉक्रेटिसला देहान्त शासन झाल्यानंतर त्याच्या आवडत्या शिष्यांची व स्नेही मंडळींची हीच अवस्था झाली. सॉक्रेटिसला शिक्षा झाली एवढ्यावरच हे प्रकरण न थांबता, कदाचित आपणावरही भयंकर प्रसंग येतील, त्याच्या आधीच सावध झालेले बरे, म्हणून प्लेटो वगैरे मंडळी अथेन्स शहर सोडून मैगारा संस्थानात गेली व तेथे युक्लीडच्या घरी राहिली. युरोपायडिस हा नाटककार मात्र अथेन्समध्येच राहिला व त्याने एका करुणरसप्रधान नाटकामध्ये पालामिदीन या नावाखाली सॉक्रेटिसची भूमिका रंगविली व अथीनियन लोकांची कानउघाडणी केली, असे काही लेखकांचे म्हणणे आहे. कित्येकांच्या मते युरिपायडिस हा सॉक्रेटिसच्याही आधीच मरण पावला असल्यामुळे ही गोष्ट शक्य नाही. ही वादभूत गोष्ट सोडून दिली तरी, एकंदरीत सॉक्रेटिसच्या अनुयायांना त्याच्या मरणानंतर बरीच वर्षे हालअपेष्टेत काढावी लागली हे खरे आहे.

कित्येक लेखकांचे असे म्हणणे आहे, की सॉक्रेटिसला शिक्षा झाल्यावर कित्येक दिवसांनी अथेन्समधील लोकांना फार पश्चात्ताप झाला. सॉक्रेटिसचे न्यायानुवर्तित्व, लोकहितविषयक तत्परता, निःस्वार्थीपणा, उपदेशातील अखंडता, ही ध्यानात येऊन त्यांना फार वाईट वाटले. त्याजवर आरोप करणारांना कोर्टातून बोलावणे आले व मिलीटसला देहान्त शासनाची व दुसऱ्यास हद्दपारीची शिक्षा झाली. प्लूटार्क लिहितो, की सॉक्रेटिसच्या मरणाला जे जे कोणी साक्षात या परंपरेने कारण झाले होते, त्यांचा अथीनियन लोक अगदी विटाळ मानू लागले व या समाजबाह्यत्वामुळे ते इतके त्रासले, की त्यांनी आत्महत्या केली. अथीनियन लोकांनी

सॉक्रेटिसच्या शत्रूचे पारिपत्य केले, एवढेच नाही तर त्याची एक मूर्ती तयार करून ती एका प्रसिद्ध ठिकाणी लावण्यात आली व हळूहळू देवाप्रमाणे मान मिळू लागला.

ही गोष्ट ग्रोट वगैरे इतिहासकार खरी मानीत नाहीत. सॉक्रेटिसच्या निधनानंतर सहा वर्षांनी झेनोफनने आपल्या गुरूच्या समर्थनार्थ मेमोरॅबिलिया किंवा आठवणी, हा ग्रंथ लिहिला, त्यावरून सॉक्रेटिसबद्दलचे अथीनियन लोकांचे दुर्ग्रह त्यावेळपर्यंत मुळीच कमी झाले नव्हते हे उघड आहे. फार काय; पण या नंतर सरासरी पन्नास वर्षांनीदेखील एसचीनस या वक्त्याने आपल्या भाषणात असे म्हटले आहे, की सॉक्रेटिस हा सोफिस्ट असल्यामुळे त्याला ठार मारण्यात आले. यावरून सॉक्रेटिसबद्दलचा अथीनियन लोकांचा दुर्ग्रह फार वेळपर्यंत टिकला, असेच म्हटले पाहिजे. सॉक्रेटिसचा पट्टशिष्य म्हणून नावाजलेला प्लेटो आपल्या गुरूच्या मरणानंतर दहा वर्षेपर्यंत बाहेर भटकत होता व नंतर परत अथेन्सला आला, यावरूनही वरील अनुमानालाच अधिक बळकटी येते. सरतेशेवटी सॉक्रेटिसच्या विचारांचे पुनः अथेन्समध्ये आरोहण झाले. एवढेच नव्हे तर 'उत्खात प्रतिरोपित' कलमाप्रमाणे ते बहुफल झाले, ही गोष्ट निराळी. सॉक्रेटिसच्या उदात्त मरण प्रसंगानेच त्याच्या तत्त्वज्ञानाचा अखेर जय झाला. मानवी मनाचा मोठेपणा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव, श्रद्धेचा विकास व अंत:करणाचा उल्हास यांचे ते अकृत्रिम संघटन होते. ज्या प्रसंगाने आज आपली अंतःकरणे इतकी थरथरतात त्या प्रसंगाबद्दल सॉक्रेटिसच्या शिष्यांना काय वाटत असेल! आपल्या गुरूविषयीची त्यांची श्रद्धा, त्यांचे अनुकरण करण्याची तीव्र इच्छा व त्याच्या उपदेशावरील विश्वास हा या प्रसंगाने द्विगुणित झाला असेल. सॉक्रेटिसने आपल्या मरणाने काही नवीन तत्त्व शिकविले नाही हे खरे. पण त्याचा परिणाम मात्र सकर केला व आधीच बीजारोपण झालेल्या शेताचा फलसमृद्धिकाळ जवळ आणला. या पिकाची हकीगत म्हणजेच प्लेटो, ॲरिस्टॉटल व सॉक्रेटिक पंथ यांचा इतिहास होय व तो यापुढील ग्रंथाचा विषय आहे.

खरा श्रेष्ठ पुरुष कोण, याविषयी लिहिताना साधुवर्य तुकाराम म्हणतात, 'हिरा ठेविता ऐरणी। वाचे फोडितां जो घणीं ।। तोचि मोल पावे खरा । ऐरणीचा होय चुरा ।।' संतश्रेष्ठ तुकारामांचे हे वचन सॉक्रेटिसला पूर्ण लागू आहे. सॉक्रेटिसचे झालेले हाल व सरतेशेवटी त्याच्या मरणोत्तर त्याच्या मतांना मिळालेला मान, या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन आपल्याकडील आद्य संतांच्या चरित्राची आठवण होते. जगतावर उपकार करण्यासाठी आलेल्या संतांचा जगाकडून पहिल्या प्रथम छळ व्हावयाचाच हा साधक नियमच दिसतो. आमचे कडील संतांना त्यांच्या जिवंतपणीच मिळाले व सॉक्रेटिसला ते मरणोत्तर मिळाले. आमच्याकडील संतचरित्रात, विष प्राशनादिकासारख्या प्रसंगानंतरही त्यांची शरीरे परमेश्वर सामर्थ्याने दृढ राहिली. सॉक्रेटिसने तशी कधी इच्छाच केली नाही, इत्यादिक भेद हे फार गौण आहेत. एकंदरीत सॉक्रेटिस ही विभूती कोणच्याही देशाला भूषणभूत होण्यासारखीच आहे.

खुद्द युरोपखंडाच्याच इतिहासाकडे पाहिले तर सॉक्रेटिसला देवदूत ख्रिस्ताचा पूर्वगामी म्हणण्याची वहिवाट आहे. या दोन चरित्रांमध्येही असेच महत्त्वाचे व मनोरंजक साम्य आहे. दोघेही आपल्या देशबांधवांकरिता झटले, दोघांचाही आपल्या काळी प्रचलित असलेल्या कल्पनांपैकी चांगल्या अंशावर दृढ विश्वास होता व त्याच अंशाला त्यांनी प्राधान्य दिले; पण दोन्ही प्रसंगीही त्यांच्या विरुद्ध काहूर माजविण्यात आले व दोघांनाही आपल्या परमेश्वरीय संदेशाची पूर्तता, मरण पत्करूनच केली. देवदूत खिस्ताचे शरीर पुनः सचेतन झाले, असा भाविक लोकांचा समज आहे. सॉक्रेटिसबद्दल तशी काही कल्पना नाही; परंतु प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या काळी त्याच्या तत्त्वविचारांचा जो उत्कर्ष झाला, तेच त्याचे खरे व अधिक महत्त्वाचे पुनरुत्थान होय.

○○○

मार्कस ऑरेलियस बादशहाची

बोधवचने

लेखक

सिमियन बेंजमिन

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने या मूळ पुस्तकाचे स्कॅन केलेले पहिले पान

श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल
समशेरबहादूर यांच्या आज्ञेनें तयार होणारी

महाराष्ट्र ग्रंथमाला.

ग्रंथ ४.

मार्कस ऑरेलियस बादशहाचीं बोधवचनें.

हें पुस्तक

'मेडिटेशन्स् आफ् मार्कस् ऑरेलियस'

नांवाच्या पुस्तकावरून

सिमियन बेंजमिन

यांनीं तयार केलें,

तें हांक-

मुंबई येथें
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

संवत १९४९, सन १८९३ इसवी.

(सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.)

प्रस्तावना

प्लेटोने आपल्या 'प्रजासत्ताक राज्यव्यवस्था' नामक प्रसिद्ध ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, तत्त्ववेत्त्या पुरुषांच्या हाती राज्यसूत्रे आल्यावाचून, त्याचप्रमाणे या जगातील राजांच्या आचरणाचे नियमन तत्त्वविचारानुसार झाल्यावाचून, सारांश राजवैभव आणि ज्ञान यांचे एकाच पुरुषाचे ठायी वास्तव्य झाल्याविना राज्यांतील अनिष्ट प्रकार बंद होऊन जनांस सुस्थिती कधीही प्राप्त व्हावयाची नाही. याच ग्रंथात आणखी एके स्थली तो म्हणतो की, 'ज्या राज्याची सूत्रे वागविणाऱ्यांस लोकांवर सत्ता चालविण्याचे मनापासून आवडत नसते व जी ते निरूपायास्तव चालवितात, ते राज्य उत्कृष्ट रीतीने चालेल; परंतु जेथल्या राज्याधिकाऱ्यांस लोकनियंतृत्व आपल्या हाती असावे, अशी पराकाष्ठेची हौस असते, ते राज्य अत्यंत वाईट रीतीने चालेल.' या दोन वचनात या महा पंडिताने राज्यव्यवस्था शहाणपणाने व सुयंत्रपणे चालण्यास दोन गोष्टींची आवश्यकता प्रतिपादिली आहे. एक अशी की, राज्य चालविणारा तत्त्ववेत्ता असावा आणि दुसरी अशी की, त्याने ते राज्य नाखुशीने चालवावे. कारण त्यास राज्यसत्तेपेक्षा तत्त्वज्ञान विशेष आवडले पाहिजे. या दोन्ही लक्षणांनी युक्त असा राज्यकर्ता कधीतरी व कोठेतरी निर्माण होईल, असेसुद्धा प्लेटोला खुद्द वाटले नसेल; परंतु असा राजर्षी रोमन लोकांत उत्पन्न झाला. जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासात दुसरा राजा याच्या बरोबरीने बसवायला कोणीही झाला नाही. मार्कस ऑरेलियस नामक अत्यंत विख्यात रोमन बादशहाच्या अंगी प्लेटोच्या वचनात सांगितलेली दोन्ही लक्षणे पूर्णपणे आढळतात. हा राजा तत्त्वविचारात असून, राज्याधिकार चालविण्यातही दक्ष होता. त्यास राजमंदिरातील वैभवापेक्षा एकांत स्थळी राहून विद्याव्यासंगात गढून जाणे विशेष आवडत असे. तो युद्धकलेत निष्णात असूनही त्यास मोठमोठाले समरप्रसंग करून प्राप्त होणाऱ्या कीर्तीपेक्षा स्वराज्यात शांती राहून नानाविध सुखवर्धक कलांचा उत्कर्ष व्हावा हे इष्ट वाटे.

अशा या अलौकिक महापुरुषाची थोडीशी माहिती व्हावी आणि त्याने एखादा बोधपर ग्रंथ केला असल्यास त्याचे एकवार तरी वाचन घडावे, अशी उत्कंठा कोणाच्या चित्तांत उद्भवणार नाही बरे? तेव्हा अशा या महाकीर्तिमान पाश्चात्त्य राजर्षांचे थोडेसे वृत्त व त्याच्या एका सर्वप्रसिद्ध ग्रंथाचे भाषांतर महाराष्ट्रजनांस वाचावयास मिळावे या अत्यंत स्तुत्य हेतूने श्री. सयाजीराव महाराज गायकवाड सरकार यांनी मला इ. स. १८९१ च्या डिसेंबर महिन्यात एतद्विषयक एक ग्रंथ देऊन त्याचे मराठीत भाषांतर करण्याची आज्ञा केली. ही आज्ञा शिरसावंद्य करून त्या कामास मी लागलो. त्याचे हे प्राकृत फल होय.

मार्कस ऑरेलियस बादशहाचे चरित्र आजला फारसे उपलब्ध नाही. जे थोडेसे सापडले, ते वाचकास सादर केले आहे. त्याच्या वचन समूहाचे भाषांतर इंग्रजीत दोघांनी केले आहे. त्यात लाँगनामक एका प्राचीन भाषाभिज्ञाने केलेले विद्वन्मान्य आहे. त्याचाच मुख्य आधार धरून पुढील भाषांतर केले आहे. दुसरे भाषांतर मुळी जेरमी कॉलिअरनामक एका गृहस्थाने केले असून, त्याची सुधारलेली आवृत्ती ॲलिस झीमर्न नावाच्या एका बाईने काढली आहे. हे भाषांतर शब्दश: नसून केवळ सारांश रूप आहे. बादशहाने ही वचने वेळोवेळी आत्मपरीक्षण करून केवळ स्वतःच्या उपयोगासाठी टांचून ठेविली असल्यामुळे ती अगदी त्रोटक सूत्ररूप आहेत. कित्येक तर बरीच दुर्बोधही आहेत. अशा स्थली आम्हास या दुसऱ्या भाषांतराचा बराच उपयोग झाला.

मार्कस ऑरेलियस बादशहाच्या प्रस्तुत पुस्तकासंबंधाने वाचकांस इतकी एक गोष्ट येथे कळविली पाहिजे की, या त्याच्या पुस्तकात विसंगतपणा, विरोध, द्विरुक्ती, अज्ञानमूलक व खोटे समज, मनुष्य स्वभावाविरुद्ध अशक्य व असंभवनीय प्रकार इत्यादी गोष्टी ठिकठिकाणी आढळतात. हे त्या वेळच्या स्टोइक तत्त्वज्ञान पद्धतीचेच दोष होत. तथापि हे दोष खेरीज करून पाहिले असता बाकी बहुतेक वचने मननपूर्वक वाचल्यास ती अत्यंत बोधपर, मनुष्याच्या ठायी शहाणपण व खरा मनुष्यपणा आणणारी, त्याला नम्र करणारी, नीत्याचरणात त्याचे पाऊल स्थिर राखणारी, मनुष्यामनुष्यात खरे प्रेम उत्पन्न करणारी आणि कित्येक तर हव्या तेवढ्या ऐश्वर्याची क्षुद्रता गर्विष्ठाच्या ठायी भासविणारी, मनुष्याची व त्याच्या व्यवसायाप्रीत्यर्थ होणाऱ्या अप्रयोजक हव्यास व अट्टहास यांची व्यर्थता भासवून त्याचे अंत:करण द्रववून अगदी सद्गदित करणारी, त्यास गहिवर आणणारी केवळ अमोल्य अप्रतिम अशी आहेत, असे दिसून येईल.

वर सांगितल्याप्रमाणे मूळ ग्रंथात अनेक दोष असले तरी त्यांजवरून त्या काळचे ज्ञान, विचारसरणी व इतर गोष्टी आपणास कळतात या करिता ते सारे या मराठी पस्तकात तसेच ठेवून त्या अज्ञानमूलक प्रकारावर ठिकठिकाणी टिपा देऊन त्यांतील चुका दाखविल्या आहेत. असे करण्याचा मुख्य उद्देश बादशहाच्या वचनाचे खरे स्वरूप वाचकांच्या लक्षात येऊन त्यातील दोष कळावे आणि जुन्या काळचे श्रममूलक समज त्यांच्या अंगी जडू नयेत, हा होय.

आता बादशहा स्टोइक मताचा असल्यामुळे त्या तत्त्वज्ञानाच्या अनुरोधाने ही वचने त्याने लिहिली आहेत. तेव्हा त्या वचनांचे यथार्थ ज्ञान होण्यास त्या तत्त्वज्ञानाच्या, मुख्य मुख्य सिद्धांतांची माहिती वाचकांस अगोदर होणे अवश्य आहे, असे जाणून आम्ही प्रथमतः स्टोइक तत्त्वज्ञानाचे संक्षेपत: निरूपण केले आहे. ते आम्ही मुख्यतः झेलरनामक एका प्रसिद्ध पाश्चात्त्य पंडितकृत ग्रंथाच्या आधाराने केले आहे. मूळ इंग्रजी भाषांतरकाराने दिलेले तत्त्वज्ञान अगदीच अपुरे असून, पद्धतवार नसल्यामुळे आम्हास या दुसऱ्या ग्रंथाचे साहाय्य घ्यावे लागले. आता हे तत्त्वज्ञान निरूपण कित्येकांस फारच लांचबलचक वाटून कदाचित कंटाळवाणेही वाटेल; परंतु ते असे साद्यंत दिल्यावाचून मार्कस ऑरेलियस बादशहाची बरीच बोधवचने चांगलीशी समजणार नाहीत असे स्वानुभवावरून आम्हास कळले. म्हणून हा उपोद्धातरूप लेख एवढा वाढविला आहे. त्याचप्रमाणे पुढील बोधवचनांत व तत्त्वज्ञानात ज्या प्रसिद्ध पुरुषांचा उल्लेख झाला आहे त्यांची संक्षिप्त माहिती 'परिशिष्ट' रूपाने शेवटी जोडली आहे. आता प्राकृत ग्रंथाच्या भाषेविषयी येथे थोडेसे लिहिणे इष्ट दिसते. श्री. महाराजांची अशी सूचना होती की, हे पुस्तक सामान्य जनांसही समजावे याकरिता सोप्या भाषेत लिहावे. याप्रमाणे वागण्यास आम्ही आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न केला आहे. तथापि पुष्कळ ठिकाणी कठीण शब्दांचा उपयोग करणे भाग पडले आहे. याचे कारण असे की, बादशहाच्या बहुतेक वचनांत तत्त्वविचारांचे निरूपण आहे. तेव्हा त्यांची सार्थ प्रतिभा मराठी भाषेत उतरण्यास प्रौढ भाषेचा उपयोग केल्यावाचून गत्यंतर नाही. शिवाय स्टोइक तत्त्वज्ञान म्हणून जे लिहिले आहे ते तर तत्त्वविचार निरूपणच आहे. सोप्या भाषेत त्याचे निरूपण करू गेल्यास अर्थहानी होऊन खरा तत्त्वबोध होणे नाही. पुन: या वचनातला बोध केवळ प्रौढ बुद्धीच्या जनांसच समजण्यासारखा व ग्राह्य वाटण्यासारखा आहे. यास्तव ज्याच्या विचारांस थोडीबहुत प्रगल्भता आली आहे, त्यांनीच ही वचने वाचण्याजोगी आहेत. आणखी असे की, जे कठीण शब्द योजले आहेत ते तरी फारसे अपरिचित आहेत असेही नाही. ज्यांचे लक्ष मराठी भाषेतील अनेक विषयांवरील ग्रंथ वाचण्याकडे लागले आहे त्यास यात फारसे काही कठीण वाटावयाचे नाही. शिवाय पुस्तकाच्या शेवटी कठीण शब्दांचा कोश दिला आहे. त्यावरून सामान्य वाचकांस फार चांगली मदत होईल अशी आशा आहे.

असो, आता शेवटी, ज्या स्वजनकल्याण इच्छिणाऱ्या सुज्ञ महाराजांच्या कृपेने ही अल्पशी महाराष्ट्र जनसेवा मजकडून घडण्याचा दुसरा योग आला, त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून प्रस्तावना येथे पुरी करितो.

मुंबई, ता. ३ री माहे **- सिमियन बेंजमिन**
एप्रिल इ. स. १८९३

अनुक्रम

१. प्रस्तावना ३२३
२. मार्कस ऑरेलियस बादशहाचे चरित्र ३२९
३. उपोद्धात-स्टोइक लोकांचे तत्त्वज्ञान ३४१
सृष्टीशास्त्र
१. मूलभूत सिद्धांत ३४४
२. विश्वाचा क्रम, स्वरूप आणि व्यवस्था ३४६
३. विवेकहीन निसर्ग ३४८
४. मानव ३४९
नीतिशास्त्र-
१. नीतिविषयक विचार ३५१
२. नीतीचे स्वरूप ३५४
३. प्रज्ञपुरुष ३५७
४ नीतिविचारात व्यवहारसंबंधाने झालेला फेरफार ३५९
५. व्यवहार-धर्मविचार. उपसंहार ३६२
४. मार्कस औरैलियस बादशहाची बोधवचने
पुस्तक पहिले ३८३
पुस्तक दुसरे ३९२

पुस्तक तिसरे ४००
पुस्तक चौथे ४०८
पुस्तक पाचवे ४२१
पुस्तक सहावे..... ४३३
पुस्तक सातवे ४४५
पुस्तक आठवे..... ४५९
पुस्तक नववे..... ४७२
पुस्तक दहावे ४८३
पुस्तक अकरावे ४९४
पुस्तक बारावे ५०४
५. परिशिष्ट..... ५१२
६. कठीण शब्दांचा कोश ५२४

मार्कस ऑरेलियस बादशहाचे चरित्र

युरोप खंडात प्राचीन काळात ग्रीस व रोम येथील लोक सभोवतालच्या बहुतेक राष्ट्रांहून फारच सुधारलेले असत. पुढे ग्रीस देशाचे वैभव व स्वातंत्र्य नष्ट होऊन रोमचे वर्चस्व सर्वत्र झाले. रोमन लोकांनी क्रमाक्रमाने जवळपासचे मुलूख काबीज करून आपल्या राज्याचा विस्तार पूर्वेस आशिया खंडातील तुर्की लोकांच्या प्रांतापासून तो पश्चिमेस ब्रिटिश, फ्रेंच इत्यादी लोकांच्या मुलखांपर्यंत केला. सीझरनामक एक मोठा पराक्रमी, बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी पुरुष रोमन लोकांमध्ये उत्पन्न होईपर्यंत त्यांचे राज्य निव्वळ प्रजासत्ताक होते; परंतु पुढे लष्करी लोकांचे प्राबल्य माजून वाटेल त्यास ते बादशहा करू लागले. यामुळे चोहोकडे एकसारखी धामधूम चालू असे. शिवाय राज्याचा विस्तार फारच वाढल्यामुळे लढाया व दंगेधोपे यावाचून रोमन लोकांचा दिवस सुना जात नसे. यामुळे तर लष्करी लोकांचे वर्चस्व वाढत गेले.

अशा गडबडीच्या काळात आमच्या चरित्रनायकाचा जन्म इ. स. १२१ मध्ये एप्रिल महिन्याच्या २६ व्या तारखेस रोमनगरीत झाला. त्याच्या बापाचे नाव अनिअस वेरस असे होते. तो प्रीटर म्हणजे न्यायाधीश होऊन मरण पावला. त्यावेळेस मार्कस ऑरेलियस अगदी लहान होता. त्याच्या आईचे नाव डामिशिआ काल्विला असे असून, ती एका प्राचीन राजकुळात[१] जन्मली होती असे सांगतात. त्याचप्रमाणे अनिअस वेरसही दुसऱ्या एका प्राचीन राजकुळात जन्म पावला होता.

मार्कस ऑरेलियस याच्या जन्मकाळी हेड्रिअन नामेकरून रोमन लोकांचा बादशहा होता. याला मार्कस ऑरेलियसच्या आंगचे सात्त्विक गुण, तो केवळ सहा वर्षांचा असताच दिसून आले. याचे मनोहर बालमुख पाहिले म्हणजे त्याच्या हृदयातील दुष्ट वासनांचा तत्काळ लोप होत असे, असा एके ठिकाणी लेख आहे. हेड्रिअन बादशहास पुत्रसंतान नव्हते. यास्तव

त्याने आपण रोग व कष्ट यांनी अगदी जर्जर झालो आहो, असे पाहून सिओनिअस कामोडस नामक एका मनुष्यास दत्तक घेतले. या मनुष्याच्या अंगी काही एक योग्यता नव्हती. मात्र, तो दिसण्यास फार सुंदर होता; परंतु हा दत्तकपुत्र दत्तविधानानंतर एका वर्षाने मरण पावला. त्या वेळी हेड्रिअन आजारामुळे बिछान्यावर पडून होता. तेथे त्याने आपल्या मंत्रिमंडळास बोलावून आणून सांगितले की, आरिअस ॲन्टोनिनस पायस यास माझा दत्तकपुत्र समजून माझ्या मागे त्यास गादीवर बसवा. असे सांगतात की, या वेळी मार्कस ऑरेलियस हा वयाने मोठा असता तर हेड्रिअन याने त्यासच दत्तक घेतले असते. त्यासमयी तो अवघा सतरा वर्षांचा होता. ॲन्टोनिनस पायस यास तरी त्याने अशा अटीवर दत्तक घेतले होते की, त्याने स्वत: मार्कस ऑरेलियस यास व पूर्वीचा मयत दत्तक जो सिओनिअस याच्या मुलास दत्तक घ्यावे. या करारास अनुसरून ॲन्टोनिनस पायस याने त्यास दत्तक घेतले. याप्रमाणे मार्कस ऑरेलियस केवळ अल्प वयाचा असताच त्याला आपण एका मोठ्या प्रचंड राज्याचे मालक होणार हे ठाऊक होते. असे असताही त्याच्या वृत्तीत तिळमात्र फरक पडला नाही हे मोठे नवल होय. त्याच्या ठिकाणी दुसरा एखादा मुलगा असता तर तो उद्दाम, हूड, गर्विष्ठ, विलासी, आळशी असा निपजला असता; परंतु त्यास बाळपणापासून उत्कृष्ट शिक्षण मिळाले असल्याकारणाने त्याच्या सात्त्विकच वृत्तीत मुळीच चलबिचल झाली नाही.

ऑरेलियसचा बाप लहानपणीच मरण पावल्यामुळे त्याचे पालनपोषण व शिक्षण काही काळपर्यंत त्याचा आजा जो वेरस याच्या देखरेखीखाली झाले. हा वेरस तरी काही लहानसान मनुष्य नव्हता, तो रोमनगरीत तीन वेळा कान्सल[२] झाला होता. मार्कस ऑरेलियस याने आपल्या बोधवचनात त्याजविषयीची कृतज्ञता अगदी प्रथमारंभीच प्रदर्शित[३] केली आहे. त्याला लहानपणी कोणत्याही शाळेत न पाठविता घरीच मोठमोठे शिक्षक ठेवून त्याजकडून विद्यादिकांचा अभ्यास करविला. हा आपणावर आपल्या आजाचा व पणजाचा मोठा अनुग्रह झाला असे त्याने पहिल्या पुस्तकाच्या चौथ्या बोधवचनात सांगितले आहे. कारण त्या वेळी रोमनगरीत सर्वत्र अनाचार माजून तरुण जनांची नीती बहुतकरून बिघडलेली असे. अशा कुसंगतीचा योग त्यास त्याच्या पालकांनी घडू दिला नाही, हा त्यांचा त्याजवर मोठा उपकारच झाला. त्या काळच्या अत्यंत प्रसिद्ध विद्वानांची योजना त्याच्या शिक्षणासाठी केली होती. अशा विख्यात अध्यापकांच्या शिक्षणाचा लाभ दुसऱ्या कोणाही राजास आजपर्यंत प्राप्त झाला नाही आणि असा परम विनीत, नम्र, कृतज्ञ, मेहनती व निर्दोषी राजशिष्य कोणाही गुरूस अद्यापि मिळालेला नाही. बादशहाने आपल्या गुरूविषयीची आदरबुद्धी व कृतज्ञत्वबुद्धी यांचे दिग्दर्शन आपल्या बोधवचनांच्या प्रथम पुस्तकात विपुल केले आहे. या प्रथम पुस्तकांतील वचने क्वाडी नामक एका रानवट जातीशी लढाई करण्यात गुंतला असता त्याने लिहिल्याचा त्या पुस्तकाच्या शेवटी उल्लेख आहे. तेव्हा त्याने ती बऱ्याच उतारवयात लिहिली होती असे सिद्ध होते. कारण त्याने क्वाडी लोकांचा पराजय इ. स. १७४ व्या वर्षी

केला असा इतिहास आहे. यावरून त्याच्या चित्तांत आपल्या गुरूविषयीचे प्रेम व कृतज्ञता ही किती दृढ वसत होती हे स्पष्ट होते.

त्याने प्रथमत: काव्य, अलंकार व वक्तृत्व यांचे अध्ययन केले. त्या वेळी तरुण जनांच्या शिक्षणाचे विषय म्हटले म्हणजे एवढेच असत; परंतु या विषयात त्याने आपले मन फार दिवस घातले नाही. तो अकरा-बारा वर्षांचा असता त्याची डायोग्निटस नामक एका स्टोइक मतवाद्याशी ओळख झाली. त्याने त्याला आपले तत्त्वज्ञान शिकविण्यास आरंभ केला. या ज्ञानाची गोडी त्यास इतकी लागली की, त्याने त्याचा अभ्यास मोठ्या उत्साहाने व मेहनतीने चालविला. केवळ अकरा-बारा वर्षांचा असताच त्याने स्टोइक तत्त्वज्ञांचा पेहराव धारण करून त्यांच्यासारखाच खाण्यापिण्यात वगैरे अगदी नेमस्तपणा ठेवला. तो इतका की, तेणेकरून त्याची प्रकृतीसुद्धा क्षीण झाली. असे सांगतात की, तो नुसत्या फळ्यांवर निजत असे. ते त्याच्या आईला अगदी आवडले नाही. तिने त्यास त्या फळ्यांवर कातडे तरी घालावयास सांगितले! याप्रमाणे अमर्याद वैभव व हवा तो ऐषआराम अनुकूल असता अगदी अल्पवयातच त्याचा त्यास वीट यावा हे केवढे नवल! परंतु या व्रतस्थपणाबद्दल तो कधीही दिमाख मिरवीत नसे. त्याचे आपल्या मित्रांशी मोठे रहसाळीचे वर्तन असे. त्याची मुखश्री सदा अत्यंत गंभीर व शांत असून, उल्हासयुक्त असे. हेडिअन बादशहाने वर सांगितल्याप्रमाणे त्यास ॲन्टोनिनस पायस याच्या मागून गादीवर बसविण्याची योजना करून ठेवली नसती, तर त्याने आपले खरे आयुष्य केवळ विरक्तपणात घालविले असते. स्टोइक तत्त्वज्ञानाची राजपदारूढ होण्यास तर मनाई नाहीच; परंतु उलटी त्याची अशी अनुज्ञाही आहे की, अनुकूल असल्यास राज्यपद स्वीकारून आपल्या तत्त्वविचारांचा होईल तेवढा पुरस्कार करावा.[४] या अनुज्ञेप्रमाणे त्याने स्वतः वर्तन केले, हे साहजिक आहे.

असो. त्याचा दुसरा स्टोइक शिक्षक सेक्सटस हा होता. हा प्रसिद्ध महाग्रंथकार प्लुटार्क याचा नातू होय. या शिक्षकाकडून तो काय शिकला याचे दिग्दर्शन पहिल्या पुस्तकातील नवव्या वचनात त्याने केले आहे. यानंतरचा त्याचा या विषयातील शिक्षक जुनिअर रस्टिकस नामेकरून एक मोठा पराक्रमी तत्त्वज्ञानी होता. हा मोठा व्यवहारकुशल असून, यावर मार्कस ऑरेलियस याचा फारच लोभ होता. तो बादशहा झाल्यावर आपल्या या गुरूस जेव्हा तेव्हा मसलत विचारीत असे. दत्तक पित्याच्या घरी तो राहवयास गेला असता तेथे पायस बादशहाने त्याची स्टोइक तत्त्वज्ञानात विशेष गती व्हावी म्हणून अपॉलोनियस नामक एका स्टोइक तत्त्वज्ञास बोलावून आणून दरबारी ठेवून घेतले. यावरून पाहता त्याच्या दत्तक पित्यासही त्याने चालविलेला तत्त्वज्ञानाचा अभ्यास संमत होता, असे दिसते.

मार्कस् ऑरेलियस फक्त तत्त्वज्ञानाचाच अभ्यास करून राहिला नाही. त्याने त्या वेळच्या कायद्यांतही प्रावीण्य मिळविले. कारण कायद्यांचे ज्ञान राजास उत्तम प्रकारचे असल्यावाचून त्याकाळी मुळीच चालत नसे. त्याचप्रमाणे त्याने त्या काळच्या युद्धकलेचाही अभ्यास

चांगला केला होता. कुस्ती, दांडपट्टा, दौड, मृगया इत्यादी अंगमेहनतीची व कसरतीची कामे त्यास चांगली येत असत. सारांश काय की, या राजाचे सर्व प्रकारचे शिक्षण उत्तम रीतीने झाले होते. जो जो विषय तो शिके त्या त्या विषयाचा अभ्यास तो अगदी मन लावून करीत असे. त्यामुळे त्याचे शिक्षक त्यास फारच चाहत असत. ते त्याला अगदी मनापासून शिकवीत. या त्यांच्या ऋणाचा बादशहा अनेक प्रकारे उतराई झाला. तो अधिकारारूढ होताच त्याने त्यांची त्यांच्या योग्यतेप्रमाणे संभावना करून कित्येकांस दरबारातील मोठमोठी कामे दिली. या सर्व गोष्टींपेक्षा त्यांच्या ऋणाची विशेष चांगली फेड म्हटली म्हणजे त्याने आपले केवळ उतार वय होईपर्यंतही त्यांची आठवण राखून त्यांच्याविषयीची कृतज्ञता आपल्या बोधवचनांच्या प्रथम पुस्तकात दर्शित केल्यामुळे त्यांची नावे अगदी अमर करून सोडली, ही होय. हेड्रिअन बादशहा मरण पावल्यावर मार्कस ऑरेलियस हा आपला दत्तक पिता जो ॲन्टोनिनस पायस त्याच्यापाशी राहावयास आला. हा ॲन्टोनिनस पायस बादशहा मोठा राजकार्यदक्ष असून, नीतिमान व गुणज्ञ होता. याच्याविषयी मार्कस ऑरेलियस याने जो प्रथम पुस्तकाच्या सोळाव्या वचनात व सहाव्या पुस्तकाच्या तिसाव्या वचनात उल्लेख केला आहे, तो सर्वस्वी यथार्थ आहे. या दत्तक पिता-पुत्राचे अकृत्रिम प्रेम अगदी अखेरपर्यंत अढळ होते. ते इतके की, खरे पिता-पुत्रसुद्धा परस्परांवर एवढे प्रेम करणार नाहीत. दत्तक विधानानंतर मार्कस ऑरेलियस आपल्या दत्तक पित्याच्याच घरी राहू लागला, हे वर सांगितलेच आहे. ते एकमेकांस क्षणभरसुद्धा विसंबत नसत. त्यांनी एकंदर सुमारे तेवीस वर्षे एकत्र काढली. तेवढ्या अवकाशात पिता-पुत्राचा वियोग अवघा दोन दिवस काय तो झाला होता. एवढ्या काळात त्यांच्या हृदयात परस्परांविषयी संशय तिळप्रायही कधी आला नाही. मार्कस ऑरेलियस आपल्या दत्तक पित्यास राज्यकारभारामध्ये पुष्कळ साहाय्य करीत असे. इ. स. १३९ साली पायस बादशहाने आपल्या या गुणवान दत्तक पुत्रास सीझर असा किताब देऊन आपल्या राज्यकारभारामध्ये प्रविष्ट केले. त्यावेळी तो अवघा १८ वर्षांचा होता; पण त्याची बुद्धिमत्ता व सुजाणता एवढी होती की. त्याने आपल्या दत्तक पित्याची आपणावर कधीही इतराजी होऊ दिली नाही. ॲन्टोनिनस पायस यानेही त्यास वेळोवेळी मोठमोठ्या मानाच्या पदव्या देऊन त्याच्या गुणांची आपल्याकडून होईल तेवढी बूज केली. या दत्तक पित्याचा आपल्या पुत्रावर केवढा विश्वास होता याचे एक उदाहरण येथे देतो. मार्कस ऑरेलियसची आई एकवेळ देवाची प्रार्थना करीत होती. तिजकडे बोट दाखवून एका नीचवृत्ती आश्रिताने पायस बादशहास म्हटले की, ती कसली प्रार्थना करीत आहे, कळले? ती देवापाशी असे मागते आहे की, तुमचा मृत्यू लवकर होऊन आपल्या पुत्रास गादी मिळावी. हे त्या दुष्टाचे म्हणणे त्याने मुळीच मनास आणिले नाही, तोच दुसरा कोणी असता तर भलतेच काहीतरी करिता.

ॲन्टोनिनस पायस इ.स. १६१ सालच्या मार्च महिन्यात मरण पावला. त्यावेळी

मंत्रिमंडळाचा मार्कस ऑरेलियस यास असा आग्रह पडला की, त्याने सर्व राज्यकारभार आपल्या एकट्याच्याच हाती घ्यावा; परंतु हेड्रिअनच्या सांगण्यावरून ॲन्टोनिनस पायस बादशहाने सिओनिअस कॉमोडस याचा पुत्र जो विरस त्यासही दत्तक घेतले होते. तेव्हा मूळ संकेताप्रमाणे मार्कस ऑरेलियस व हा विरस अशा दोघांनाही राज्यपदारूढ व्हावे असे जरी होते तरी मार्कस ऑरेलियस याने प्रथम राज्य चालवून त्याच्या पश्चात विरसने ते चालवावे अशी व्यवस्था सदरहू मंत्रिमंडळाच्या मनातून करण्याचे होते, असे दिसते. तथापि मार्कस ऑरेलियस यास ही गोष्ट न आवडून त्याने आपल्या त्या दत्तक बंधूसही आपल्याबरोबर राज्यपदावर घेतले. याप्रमाणे एकाच वेळी दोन बादशहा गादीवर बसलेले पाहण्याचा योग रोमन लोकांस हा पहिल्यानेच आला.

हा विरस मोठा दुराचारी व महामूर्ख होता, तरी तो आपल्या दत्तक बंधूस फार मानीत असे. त्याच्या हुकमाबाहेर तो बहुत करून वागत नसे. आपण एवढ्या उच्च पदावर जे चढलो ते केवळ आपल्या दत्तक बंधूच्या अनुग्रहावरूनच होय, हे तो पूर्णपणे जाणत असे. ऑरेलियसने त्यास आपल्या बरोबरीचा अधिकार देण्याचे मुख्य कारण असे होते की, रोमन लोकांच्या इतिहासातला तो काळ मोठा धामधुमीचा असल्यामुळे लष्कराची व्यवस्था नीट राखून ते वागविण्याची धमक व हुशारी हे गुण त्या काळच्या बादशहांत असणे इष्ट असे. ऑरेलियस याचे लक्ष ज्ञानसंपादनाकडेच विशेषकरून लागले असल्यामळे आपल्या अंगात हे गण चांगल्या प्रकारे वसत नाहीत हे तो जाणत असे. विरस हा अंगमेहनतीच्या व कसरतीच्या कामात नेहमी त्याच्याहून वरचढ असे. यावरून तो सेनापतीचे काम करण्यास चांगला लायक आहे असे समजून त्याचे साहाय्य आपणास पुष्कळ होईल, असा त्याचा अदमास होता; परंतु हा त्याचा अदमास अगदी चुकला. विरसच्या हाती सेनेची व्यवस्था आल्यावर त्यास ऑलियसची सुसंगती अंतरली आणि त्याच्या आचरणावरचा सर्व दाब नाहीसा झाला आपल्या दत्तक बंधूच्या नजरेपासून दूर होताच तो ऐषाराम व विषयोपभोग यामध्ये नि:शंकपणे मग्न होऊन आपल्या मोठ्या जबाबदारीच्या कामास अगदी नालायक होऊन गेला.

हे दोघे गादीवर बसल्यानंतर लवकरच पार्थिआ प्रांतांतील लोकांशी[५] रोमन लोकांचे युद्ध जुंपले. विरस यास सैन्य देऊन तिकडे रवाना केले; परंतु त्याच्या हातून काही एक झाले नाही. या मोहिमेत तुर्कस्थानातील आर्मिनिया वगैरे प्रांतात रोमन लोकांनी जो पराक्रम केल्याचा इतिहास आहे, तो केवळ विरसच्या हाताखालच्या सरदारांनी केला, तरी पण तो पूर्वेकडून परत आल्यावर त्यास ऑरेलियस बादशहा वाजतगाजत नगरात घेऊन आला. रोमन लोकांनी याप्रसंगी पूर्वेकडून एका रोगाची साथ आणली. त्या साथीने रोम नगरीतील व इटालीतील पुष्कळ लोकांचा संहार झाला.

यानंतर इटालीच्या उत्तरेस आल्पस पर्वताच्या पलीकडल्या बाजूस असणाऱ्या रानटी

लोकांनी इटलीत प्रवेश करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांस तसे न करू देण्याच्या दगदगीत ऑरेलियस बादशहाच्या कारकीर्दीचे बहुतेक दिवस गेले. या ऐनप्रसंगी विरस एकाएकी, इ. स. १६९ साली मरण पावला. कित्येक दुष्ट वृत्तीच्या लोकांनी त्यावेळी अशी कंडी पिकविली होती की, विरसच्या आकस्मिक मृत्यूस बादशहा ऑरेलियस कारण झाला; परंतु ही कंडी अगदी निराधार होती. अशा मोठ्या मनाच्या व परम दयाळू बादशहाकडून अशी गोष्ट कदापि घडणे नाही. त्याने विरसचा व आपला विशेष निकट स्नेह व्हावा म्हणून आपली मुलगी त्यास बायको करून दिली होती. अस्तु, यापुढे सर्व राज्यकारभार अर्थात मार्कस ऑरेलियस याने स्वतः एकट्यानेच चालविला.

या रानटी लोकांशी लढाया करण्यात गुंतला असता बादशहा कार्नन्टम शहरी तीन वर्षे होता. हे शहर डॅन्यूब नदीच्या तीरी आहे. पुढील बोधवचनाचे दुसरे पुस्तक त्याने या शहरी असता लिहिले, असा उल्लेख त्या पुस्तकाच्या शेवटी केला आहे. यावेळी बादशहा मार्कोमानी नावाच्या रानटी लोकांशी लढत होता. या लोकांस त्याने पानोनिया येथून हाकलून दिले आणि डॅन्यूब नदी उतरून ते पार जात असता त्यांचा अगदी नाश करून टाकला. याच मोहिमेत बादशहाने इ. स. १७४ मध्ये क्वाडीनामक एका दुसऱ्या रानटी लोकांचा अगदी पराभव केला. या क्वाडी लोकांशी लढत असता बादशहाने आपल्या बोधवचनांचे पहिले पुस्तक लिहिले, असा त्या पुस्तकाच्या शेवटी उल्लेख आहे.

इ. स. १७५ मध्ये अविडिअस कॅसिअस नामक एका मोठ्या हुशार व शूर रोमन सेनापतीने बंड केले. या सेनापतीच्या हाती आशियामधील रोमन लोकांचे सगळे सैन्य होते. याने रोमन बादशहाची ताबेदारी झुगारून देऊन स्वतःस आगस्टस् हा किताब घेतला; परंतु त्याच्या हाताखालच्या एका अंमलदाराला त्याचा हा शिरजोरपणा न साहून त्याने त्याचे डोके उडविले. यामुळे बंडाचा शेवट झाला. या सरदाराच्या बंडाचे वर्तमान बादशहाच्या कानी येताच तो त्याचे पारिपत्य करण्यास निघाला; परंतु पुढे त्याचा खून झालेला ऐकून तो मागे परतला. या बंडखोर सरदाराने फक्त तीन-चार महिनेच आपला बादशाही अंमल चालविला. मार्कस ऑरेलियस बादशहाविषयी सर्व रोमन लोकांच्या हृदयात एवढी पूज्य बुद्धी व प्रेम ही वसत होती की, त्या बंडखोर सरदाराच्या हाताखालचे लोकच त्याच्यावर बिथरून त्याच्या नाशास कारण झाले. या सरदाराचे डोके जेव्हा बादशहाकडे आणले, तेव्हा त्यास ते पाहून मोठा खेद झाला आणि ज्याने त्याचा खून केला होता त्याच्या त्या कृत्याबद्दल त्याने मुळीच संतोष दर्शविला नाही. मग त्यास इनाम कोठचे? त्याचा असा मानस होता की, त्याला पकडून आणून त्याच्या गुन्ह्याबद्दल त्यास क्षमा करून सोडून द्यावे. कारण त्या सरदारावर बादशहाची फारच मर्जी होती. त्याने आपल्या मंत्रिमंडळाला पत्र पाठवून अशी शिफारस केली की, त्यांनी कॅसिअसच्या कुटुंबाच्या वाटेस मुळीच जाऊ नये. त्याच्या त्या घोर गुन्ह्याबद्दल तो बळी पडला आहे, तेवढा पुरे. आणखी कोणाच्या जिवास

त्याबद्दल धक्का लागणे उचित नव्हे. हे पत्र मंत्रिमंडळात वाचले तेव्हा सर्वांस अत्यंत हर्ष होऊन त्यांनी बादशहाचा जयजयकार केला.

पुढे बादशहा त्या बंडास सामील असलेल्या लोकांच्या मुलखातून गेला, तेव्हा त्याने त्यांस कोणत्याही प्रकारचा कठोरपणा किंवा इतराजी दाखविली नाही. त्यांस त्याने पूर्णपणे क्षमा केली. तो सिरिआमध्ये गेला असता कॅसिअसचा इतर लोकांशी झालेला पत्रव्यवहार त्यांच्या हाती आला. तो त्याने उदार मने करून तात्काळ जाळून टाकला. अशी अलौकिक क्षमावृत्ती जगाच्या इतिहासात आजपर्यंत फारच थोड्या राजांनी दर्शविली असेल.

याप्रमाणे बादशहा बंडखोर लोकांच्या मुलखातून स्थिरस्थावर करीत चालला असता त्याची प्रिय पत्नी जी फास्टिना ती एकाएकी टारस पर्वताच्या खोऱ्यांत मृत्यू पावली. कोणी असे सांगतात की, या स्त्रीचे वर्तन अत्यंत गैर होते; आणि हे सर्व बादशहास ठाऊक असून, तो त्याजकडे कानाडोळा करीत असे. उभयतांचे परस्परांवर मुळीच प्रेम नव्हते. हा लोकापवाद त्या काळच्या स्थितीस अगदी अनुरूप असाच आहे. दुष्ट वृत्ती मनुष्याच्या लोकांच्या दुर्वर्तनाबद्दलच्या कसल्याही दंतकथेवर लागलीच विश्वास बसून ते ती चोहोकडे पसरीत सुटतात. मग तीत वास्तविकपणे काही तथ्य असो वा नसो. फास्टिना हिचे वर्तन बादशहाची तिजवर गैरमर्जी होण्याइतके वाईट नव्हते, असे म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. बादशहाची तिजवर प्रीती होती, असे त्याच्या बोधवचनांच्या पहिल्या पुस्तकातील सतराव्या वचनात एके ठिकाणी जो तिजविषयी उल्लेख केला आहे, त्यावरून स्पष्ट होते. हिजपासून बादशहास अकरा मुले झाली. त्यापैकी कमॉडस हा मुलगा त्याच्या मागून गादीवर बसला.

या बादशहाच्या कारकीर्दीत घडलेल्या आणखी एका गोष्टीचा उल्लेख येथे करणे इष्ट दिसते. ती गोष्ट कोणती म्हणाल, तर ख्रिस्ती लोकांचा त्याच्या वेळी जो छळ झाला त्याच्या संबंधाची होय. हा छळ मुख्यतः दोन वेळा झाला. पहिला स्मर्ना[६] येथे इ. स. १६७ मध्ये झाला व दुसरा लिऑन[७] व वियना येथे इ. स. १७७ मध्ये झाला. असे सांगतात की, हा छळ बादशहाच्या शिक्कामोर्तबानिशी सुटलेल्या हुकमावरून झाला. ही गोष्ट खरी आहे; परंतु हिजबद्दल बादशहास फारसे दोषी ठरविता येत नाही. असे हुकूम ट्रेजन बादशहाच्या वेळेपासून निरनिराळ्या प्रांतांतील अंमलदारांस देण्याचा परिपाठ पडला होता. हेड्रिअन व पायस् या बादशहांनासुद्धा असे हुकूम वारंवार देणे प्राप्त झाले होते. तेव्हा या मागच्या रीतीस अनुसरून वागणे बादशहास नाप्राप्त होते. राज्यकारभाराच्या कोणत्याही प्रकरणात पूर्वपरंपरा सोडून त्या वेळच्या रोमन बादशहास मुळीच वागता येत नसे. त्याचे मंत्रिमंडळ जसा सल्ला देई त्याप्रमाणे त्यास हरएक प्रकरणाचा निकाल करावा लागे. पनः ख्रिस्ती लोकांचा त्यावेळी जो छळ झाला. तो तरी विनाकारण झाला असे नाही. त्या वेळचे ख्रिस्ती लोक आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व इतर लोकांच्या मनावर ठसविण्याकरिता पुष्कळ अनन्वित कर्मे करीत असत. ते त्यावेळच्या इतर धर्मांची विटंबना उघडपणे करीत असत. त्यांच्या धर्माचारांची ते वाटेल

तशी अवहेलना करीत आणि आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व मोठ्या दिमाखाने मिरवीत. या त्यांच्या वर्तनांचा इतर लोकांस अतिशय संताप येणे साहजिक होते. शिवाय ख्रिस्ती लोकांचे हाडवैरी जे ज्यू लोक त्यांचीही वस्ती रोमन लोकांच्या ताब्यातील मुलखांत पुष्कळ होती. हे इतर धर्माचे लोक रोमन अधिकाऱ्यांकडे ख्रिस्ती लोकांच्या उद्धट आचरणाच्या कागाळ्या नेहमी नेत. आपणास न्याय मिळावा म्हणून ते त्यांच्यापाशी एकसारखा गिल्ला करून सोडीत. तेव्हा त्या अधिकाऱ्यास काहीतरी तजवीज करणे भाग पडे. याकरिता ही आपली अडचण बादशहास कळवून ते त्यांजकडून हुकूम मागवीत. त्या हुकमान्वये ते ख्रिस्ती लोकांस एक तर आपला धर्म सोडून द्या किंवा मरणास तयार व्हा, असे सांगत. ज्या ख्रिस्ती लोकांत स्वधर्माभिमान अतिशयीत बाणलेला असे, ते मरणास तयार होत. आणखी असे की, इतर धर्माचे लोक त्यांस नास्तिक मानीत आणि रोमन राज्यात त्यांचे वास्तव्य असल्यामुळे राज्यावर मोठमोठी संकटे येत आहेत असे ते म्हणत. ही भोळी समजूत जिकडे तिकडे इतकी पसरली होती की, जो तो ख्रिस्ती मनुष्याचा अत्यंत द्वेष करीत असे. त्याचप्रमाणे रोमन अधिकाऱ्यांनाही वाटे की, ज्यापक्षी कायद्याने विहित केलेल्या धर्माचारांची हे ख्रिस्ती लोक विडंबना करितात त्यापक्षी त्यांचा होईल तेवढा संहारच करणे न्याय्य होय. याप्रमाणे प्रजाजन व राज्यकारभार चालविणारे अधिकारी या उभयतांस ख्रिस्ती लोक मोठी भयंकर माणसे वाटत. तेव्हा त्यावेळच्या बादशहांनी त्यांच्याविरुद्ध आपल्या समजुतीप्रमाणे व मंत्र्यांच्या सल्ल्याप्रमाणे हुकूम सोडले.

असो. तेव्हा सांगण्याचा सारांश काय की, बादशहास ख्रिस्ती लोकांच्या छळाबद्दल फारसा दोष देता येत नाही. मोठमोठ्या ख्रिस्ती पंडितांनीही त्यास याबद्दल दोष दिलेला आढळत नाही. उलट, साधेल तेवढ्या प्रसंगी त्याने ख्रिस्ती लोकांस होणाऱ्या शासनाचे स्वरूप बरेच सौम्य केले, याबद्दल त्याची ते तारीफच करतात. बादशहास ही गोष्ट मुळीच आवडत नसे याला एक प्रमाण असे सांगतात की, त्याच्या वेळी रोमनगरीत पुष्कळ खिस्ती लोक होते, तरी त्यांचा तेथे छळ झाला नाही. जो काही त्यांचा छळ झाला तो तुर्कस्थान, फ्रान्स अशा दूरदूरच्या ठिकाणी झाला; परंतु बादशहाचे या ख्रिस्ती लोकांच्या संबंधाचे वास्तविक मत काय होते, हे चांगलेसे कळत नाही. त्याजविषयी उल्लेख त्याने आपल्या बोधवचनांच्या अकराव्या पुस्तकातील तिसऱ्या वचनात केला आहे. तेथे त्याने त्यांच्या दुराग्रहाबद्दल व जीविताच्या बेपर्वाईबद्दल निषेध केला आहे.

इ. स. १७७ साली बादशहास पुनः उत्तरेकडे सैन्य घेऊन जावे लागले. या मोहिमेस निघण्याच्या वेळी रोमनगरीतील मुख्य मुख्य लोकांनी त्यास अशी विनंती केली की, आपण जाण्यापूर्वी नगरीतील लोकांस थोडासा बोध करावा. याचे कारण उघडच होते की, लढाईवरून बादशहा सुखरूप परत येईलच, असा भरवसा नव्हता. तेव्हा अशा सुज्ञ व दयाळू पुरुषाचे शेवटचे बोधाचे दोन शब्द ऐकण्याची उत्कट इच्छा त्यांस होणे साहजिक होते.

बादशहाने त्यांच्या या विनंतीस मान देऊन त्यांस तीन दिवस तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने दिली.

याही मोहिमेत बादशहा विजयी झाला. त्याने जर्मनीतील रानटी लोकांचा इ. स. १७९ साली अगदी पराभव केला. या मोहिमेवरून तो रोमनगरीस परत आला नाही. तो लढायांच्या वगैरे दगदगीमुळे व पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे असा एकसारखा प्रवास करून अगदी मेटाकुटीस आला होता. शिवाय त्याच्या पाठीची चिंता अशी कधीच गेली नाही व त्याला एकही दिवस सुखाचा गेला नाही. यामुळे त्याची प्रकृती अगदी क्षीण झाली होती. वियता येथे असता त्यास एक स्पर्शसंचारी रोग झाला. या रोगात त्याचा इ.स. १८० मध्ये शेवट झाला. अंतकाळी त्याचा पुत्र जो कमोडस् तो त्याच्या जवळ होता. असे सांगतात की, बादशहाचे प्रेत जाळून त्याची राख रोमनगरीस आणली. रोमन लोकांनी त्यास आपल्या उपास्य देवतांत सामील केले. जे अत्यंत पराक्रमी पुरुष रोमन लोकांचे वैभव व सत्ता वाढविण्यास कारण होत असत, त्यास ते देवतांप्रमाणे मानून त्यांच्या मूर्ती करून पूजीत असत. मार्कस बादशहाची मूर्ती रोमन लोकांच्या घरोघर दुसऱ्या उपास्य देवतांबरोबर मांडलेली असे. त्याच्या पुत्राने त्याच्या स्मरणार्थ एक स्तंभ उभारला असून, त्यावर बादशहाने केलेल्या पराक्रमाचे सचित्र वर्णन केले आहे. या स्तंभावर काही काळपर्यंत बादशहाचा पुतळा मांडलेला होता; परंतु पुढे रोमनगरीत ख्रिस्ती धर्माचे वर्चस्व होऊन पोपाचा अधिकार सुरू झाला, त्यावेळी तो पुतळा तेथून कोणी केव्हा काढून टाकला ते कळले नाही. त्या जागी पुढे सेन्ट पॉलनामक ख्रिस्ती साधूचा धातुमय पुतळा पाचव्या सेक्टस् पोपाने ठेवला.

येथवर आम्हास जी प्रस्तुत चरित्र नायकाच्या संबंधाची हकीकत सापडली तिचे संक्षेपतः निरूपण केले. त्यावरून त्याच्या एकंदर स्वभावाचे वगैरे थोडेसे ज्ञान वाचकांस झालेच असेल. त्याच्याविषयीची माहितीच मुळी आजला फार थोडी उपलब्ध आहे. यास्तव त्याच्या आंगच्या निरनिराळ्या गुणांची दर्शक अशी त्याच्या हातून घडलेली कृत्ये फारशी सांगता येत नाहीत. बादशहाने आपले चरित्र आपल्या हाताने लिहून ठेवले होते, असे म्हणतात; परंतु ते आज उपलब्ध नाही. ते असते तर त्याच्याविषयी आणखी पुष्कळ गोष्टी कळल्या असत्या, तरी त्या काळाच्या इतिहासाचे ज्ञान ज्यांना म्हणून आहे, त्यांचे असे मत आहे की, त्याच्या इतका निर्दोष आचरणाचा राजा आजपर्यंत भूतलावर मुळीच झाला नाही. अमर्याद संपत्ती, अपार वैभव, अद्वितीय सत्ता, पाहिजे तो ऐषाराम यांची पूर्णपणे अनुकूलता असता त्याने आपले सारे आयुष्य एखाद्या विरक्ताप्रमाणे घालविले. विरक्त मनुष्यात आणि त्याच्यात भेद मिळून इतकाच की, विरक्त मनुष्यास या संसाराचा वीट येऊन व सर्व मनुष्य जातीचा कंटाळा किंवा तिरस्कार त्याच्या चित्तात उत्पन्न होऊन तो गिरिकुहरामध्ये जाऊन वास करतो आणि सर्व प्रकारच्या ऐहिक सुखाचा परित्याग करतो. असे करण्यात त्याचा मुख्य हेतू इतकाच असतो की, आपल्या चित्ताची शुद्धता राहून आपल्या नित्याचरणास हरकत येऊ नये; परंतु

असे करण्यात त्याने मोठासा पुरुषार्थ केला असे होत नाही. जनांत राहून प्राप्त झालेल्या मोहास वश न होता जो आपले आचरण शुद्ध राखतो आणि आपल्या बांधवांच्या हरएक प्रकारे उपयोगी पडतो तोच खरा सत्पुरुष.[८] ऑरेलियस बादशहास असंख्य मोहप्रसंग आले असतील. तितक्या सर्वांतून पार पडून त्याने आपली नीती शेवटपर्यंत शुद्ध राखली आणि आपल्या बांधवांच्या उपयोगी पडण्याच्याच केवळ इराद्याने राज्यसूत्रे हाती घेऊन ती वीस वर्षेपर्यंत मोठ्या दक्षतेने, हुशारीने व सौजन्याने वागविली आणि साऱ्या जगास असे दाखवून दिले की, सर्वदा तत्त्वविचारांत गढलेला व संसारातील नानाविध सुखांच्या आस्वादाविषयी बिलकूल लोलुप नसलेला मनुष्यही व्यवहारातील अत्यंत जबाबदारीचे काम जे राज्य चालविण्याचे तेही बरेच निर्दोषपणे चालवू शकतो. येथे कोणी अशी शंका घेईल की, अशा साधू पुरुषाने लढाया करून मनुष्यघात करणे उचित नव्हते. या शंकेचे समाधान असे आहे की, बादशहाने ज्या एकंदर लढाया केल्या त्या नवे देश काबीज करण्याच्या इराद्याने मुळीच केल्या नाहीत. त्याचे जे मुलुख आपल्या ताब्यात होते तेथील लोकांवर परकीयांचे हल्ले होऊन त्यांच्या सुखाचा व शांतीचा नाश न व्हावा म्हणून निरुपाय होऊन त्यास हाती शस्त्र घ्यावे लागले. लढाई करणे त्याला मुळीच आवडत नसे. म्हणूनच त्याने आपल्या दत्तक बंधूच्या हाती सर्व सेनेची व्यवस्था प्रारंभीच दिली होती.

ऑरेलियस बादशहाच्या एकंदर स्वभावाचे वर्णन करण्याचे येथे फारसे प्रयोजन आहे असे वाटत नाही. त्याच्या प्रथम पुस्तकात जो त्याने आपल्या शिक्षणाचा वृत्तांत दिला आहे त्यावरून त्याचे स्वरूप बऱ्याच अंशी दिसून येते. त्यात सांगितलेल्या सर्व गोष्टींच्या शिक्षणाचा प्रत्यय त्याच्या आचरणात विपुल आला आहे. त्याने जे निरनिराळे गुण निरनिराळ्या माणसांकडून शिकल्याचे तेथे लिहिले आहे, ते खरे आहे. ते सर्व गुण त्याच्या ठायी होते. हे पहिल्या पुस्तकाचे त्याचे स्वशिक्षण निरूपण कोणास डौलाचे वाटेल; परंतु ते त्याने आपल्या उतारवयात आपल्या आठवणीसाठीच केवळ लिहिले असल्यामुळेच हा दोष त्यावर लागू होत नाही. एकंदरीत सारांश काय, की ज्या कोणास मार्कस ऑरेलियसच्या स्वभावाची वगैरे माहिती हवी असेल त्याने त्यांचे पहिले पुस्तक मननपूर्वक वाचावे म्हणजे झाले. त्याचे निरूपण येथे केले असता पुनरुक्ती होईल, म्हणून ते देत नाही.

शेवटी त्याच्या पुढील बोधवचनांच्या संबंधाने थोडेसे सांगून हा लेख आटपतो. ही बोधवचने बादशहाने केवळ आपल्या स्वत:च्या आठवणींसाठी लिहिली होती. ती जगातील इतर लोकांनी वाचून शहाणे व्हावे असा त्याचा इरादा नव्हता. निरनिराळ्या प्रसंगी जे विचार त्यास सुचले ते त्याने टिपून ठेवले. म्हणूनच त्यात पुष्कळसा विसंगतपणा व पुनरुक्तीही वाचकांस आढळतील. कोणताही विवक्षित विषय घेऊन त्यावर ऊहापोहपूर्वक लिहिण्याचा प्रयत्न त्याने या बोधवचनात कोठेही केलेला नाही. यामुळे एका वचनाचा दुसऱ्या वचनाशी फार करून संबंध आढळत नाही. प्रत्येक वचनाचा व कोठे कोठे तर एका

वचनातील निरनिराळ्या विधानांचा विषय अगदी स्वतंत्र आहे. हे झाले बोधवचनांच्या एकंदर स्वरूपाविषयी. आता त्यातील बोधाचा एकंदर इत्यर्थ काय आहे, हे येथे सांगणे इष्ट होते; परंतु ते येथे निराळे न सांगता स्टोइक लोकांच्या तत्त्वविचाराचे व नीतिविचारांचे संक्षिप्त निरूपण पुढील प्रकरणात (उपोद्धातांत) केले आहे, त्यावर हवाला देऊन हे चरित्र कथन येथे पुरे करतो.

संदर्भ :

१. ख्रिस्ती शकापूर्वी पाचव्या शतकापर्यंत रोमनगरीत राजसत्ता होती. ती या काळानंतर नाहीशी होऊन ज्युलियस सीझराच्या वेळपर्यंत तेथे प्रजासत्ताक राज्य होते.
२. रोमनगरीतील अत्युच्च प्रतीच्या न्यायाधीशास हे अभिधान असे. याची निवड लोकमते होत असून, तो त्या हुद्यावर केवळ एक वर्ष राहत असे.
३. पुस्तक १ ले, वचन १ ले पाहा.
४. स्टोइक लोकांचे तत्त्वज्ञान पाहा.
५. हा प्रांत कास्पियन समुद्राच्या आग्नेयीस आहे. येथल्या लोकांस पादाक्रांत करण्याचे रोमन लोकांनी पुष्कळ वेळा प्रयत्न केले; परंतु ते कधीही परतंत्र झाले नाहीत. पुढे इराणी लोकांनी त्यास अंकित करून सोडले.
६. ही आशियातील तर्कस्थानची राजधानी होय. त्यावेळी हा प्रांत रोमन लोकांच्या ताब्यात होता.
७. हे शहर फ्रान्सच्या दक्षिणभागी आहे. फ्रान्स देशही त्यावेळी रामन लोकांच्या अमलात होता.
८. सॉक्रेटिस प्लेटो वगैरेंनी मांडलेली 'तत्त्वज्ञराजा' Philosopher King ही संकल्पना प्रत्ययास येत होती.

उपोद्घात

स्टोइक लोकांचे तत्त्वज्ञान

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने महाराष्ट्र वाचकांस नीट समजण्याकरिता ती ज्या तत्त्वविचारपद्धतीस अनुसरून लिहिली आहेत, तिचे स्वरूप येथे संक्षेपाने सांगणे उचित दिसते. असे केल्याने एका पाश्चिमात्त्य तत्त्वविचारपद्धतीचे सहजी ज्ञान होऊन या देशात प्रचलित असलेल्या कित्येक तत्त्वविचारांशी तिचे कितपत साम्य आहे, तेही थोडेसे कळून येईल. दुसरे असे की, या तत्त्वविचारांत जे दोष आधुनिक तत्त्वज्ञदृष्टीने आहेत त्यांचाही निर्देश प्रसंगोपात्त झाल्याने सामान्यजनांस होणाऱ्या कित्येक भ्रमांचा निरास होईल. हा निर्देश आम्ही टिपांच्याद्वारे करण्याचे योजिले आहे. यास्तव वाचक या टिपांकडे दुर्लक्ष करणार नाहीत अशी आशा आहे.

ही तत्त्वविचारपद्धती स्टोइक लोकांची होय. ग्रीस देशामध्ये प्राचीन काळी ज्या निरनिराळ्या तत्त्वविचारपद्धती क्रमाक्रमाने प्रचलित झाल्या, त्यातल्या शेवटलीत स्टोइक लोकांच्या तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव इतिहासवेत्त्यांनी केला आहे. या देशामध्ये जसे न्यायसांख्यादी षड्दर्शने[१] प्रणीत करणारे जैमिनीकपिलादी महामुनी प्राचीन काळी निर्माण झाले होते, तद्वतच ग्रीस देशामध्ये थेलीज, पायथागोरस, सॉक्रेटिस, प्लेटो, झिनो वगैरे तत्त्वज्ञपुरुष उत्पन्न झाले होते. आता ते आर्यदर्शनकार व ग्रीकदर्शनकार यामध्ये एक मोठा भेद असा आहे की, या विश्वाचे स्वरूप जाणण्याच्या प्रयत्नांत आपल्या बुद्धीचाच केवळ उपयोग करून काय समजेल ते लोकांस सांगण्याचा निश्चय जसा ग्रीक तत्त्वज्ञांचा दिसतो तसा आर्यतत्त्वज्ञांचा फारसा दिसत नाही. आर्यतत्त्वज्ञ वेदादी ग्रंथांस ईश्वरप्रणीत कल्पून तद्विरुद्ध विचारसरणी निषिद्ध मानीत. येणेकरून त्यांच्या बुद्धीचा व्यापार अनिरुद्धपणे चालत नसे. थेलीजप्रभृती बहुतेक ग्रीक तत्त्वज्ञांनी व आपापल्या काळच्या अप्रबुद्ध जनांच्या

धर्मसमजुतीस अगदी झुगारून देऊन स्वबुद्धिसामर्थ्यानेच काय कळेल तेवढे सत्य मानण्यात त्यांस कृतार्थता वाटे. हा निस्सीम सत्य प्रीतीचा बाणा जोपर्यंत तत्त्वजिज्ञासू जनांमध्ये कायम होता, तोपर्यंत युरोपात नाव घेण्यासारखे महाविचारी पुरुष निर्माण झाले; आणि अजूनही क्वचित कोठे तिकडे झळकताहेत, तेही अशाच वृत्तीचे आहेत. असो. आता आपला मुख्य विषय जो स्टोइक तत्त्वज्ञानस्वरूप निरूपणाचा त्याजकडे वळू.

या तत्त्वज्ञानाचा प्रथम प्रवर्तक झिनो नामेकरून एक विद्वान पुरुष होता. हा मूळचा सायप्रस नामक भूमध्य समुद्रातील एका बेटातला राहणारा असून, प्लेटो वगैरे ग्रीक तत्वज्ञांचे काही ग्रंथ त्याला वाचावयास मिळाल्यावरून तो अथेन्स येथे ख्रिस्ती शकापूर्वी ३२० व्यावर्षी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावयास आला. तेथल्या निरनिराळ्या तत्त्वविचारपद्धतींचा सुमारे वीस वर्षांपर्यंत मोठ्या मेहनतीने अभ्यास करून पुढे आपले स्वतःचे विचार लोकांस सांगण्यास त्याने आरंभ केला. हे शिकविण्याचे काम तो स्टोआपिसाईल नामक आथेन्स येथील एका इमारतीत करीत असल्यावरून त्याच्या छात्र वर्गास स्टोइक हे नाव पडले. झिनोच्या शिष्यवर्गात क्लिअन्थीस आणि क्रिसिपस हे प्रसिद्ध आहेत.

झिनोप्रभृती आद्य स्टोइकमतवाद्यांचे विचार काय होते, ते स्पष्टपणे सांगता येत नाही. कारण त्यांचे लेख फारसे उपलब्ध नसून जे आहेत ते अगदी त्रोटक व दुर्बोध आहेत. रोमन बादशाहीच्या वेळी मात्र जे सेनेका, एपिक्टेटस, मार्कस ऑरेलियस, हेराक्लिटस* आदीकरून स्टोइकमतवादी झाले, त्यांचे सबंध लेख अद्यापपावेतो सर्वभक्षक काळाच्या तडाख्यातून उरले आहेत; परंतु या लेखांच्या साहाय्याने स्टोइक तत्त्वज्ञानाचे वास्तविक स्वरूप कळण्यासारखे नाही. कारण सेनेका आदीकरून रोमन बादशाहीतल्या स्टोइक लोकांचे संघटन इतर मतवाद्यांशी झाल्यामुळे त्यांच्या मूळच्या विचारात बराच फरक पडला होता. तरी पण स्टोइक तत्त्वज्ञानाचे सामान्य स्वरूप त्यांच्या लेखात बरेच दिसून येत आहे. त्याच्या निरूपणास आपण आता लाग.

१. प्रथमारंभी स्टोइक तत्त्वविचारपद्धती इतर ग्रीक तत्त्वविचारपद्धतीहन कोणत्या विशेष लक्षणांनी भिन्न आहे ते सांगू. ही विशेष लक्षणे त्यात तीन प्रकारची आहेत. पहिले विश्लेषण असे आहे की, स्टोइक लोकांच्या मते सर्व तत्त्वज्ञानाचा रोख केवळ व्यवहाराकडे असावा आणि हा सारा व्यवहार विवेकशुद्ध असावा. निसर्गानुसरण हा त्यांच्या समग्र तत्त्वज्ञानाचा पाया होय. त्यांच्या मताप्रमाणे तत्त्वज्ञानाचे वास्तविक काम म्हटले म्हणजे मनुष्यास नीतिमान करणे हे होय. तत्त्वज्ञान म्हणजे नित्याचरणरूप एक मोठी कलाच होय. सारांश, हे साक्षात्

---

*हेराक्लिटसच्या नावाच्या बाबतीत अनुवादकास संभ्रम झालेला दिसतो. हेराक्लिटस (५३५-४७५ ख्रि.पू.) हा झेनोकेन (५७०-४८० ख्रि.पू.)चा समकालीन. इलियाचा झेनो (४९०-४३०ख्रि.पू.) हाही काही काळ समकालीन; पण स्टॉईक मताचा झिनो हा (३३३-२६४ख्रि.पू.) समकालीन नव्हे.

नीती शिक्षणच समजावयाचे. आता नीती शिक्षण अभ्यासाने साध्य होणारे असल्याकारणाने तत्त्वज्ञान नित्याभ्यासरूपही समजले पाहिजे. याप्रमाणे पाहता या तत्त्वज्ञानाचे भाग-विभाग म्हटले म्हणजे निरनिराळे सद्‌गुण हेच होत. यास्तव सर्व विचार आणि शोध जे करावयाचे. त्यांचा केवळ नीतीशीच संबंध असला पाहिजे. सृष्टिशास्त्र जे त्यास इतके महत्त्वाचे वाटत असे त्याचा तरी अभ्यास करावयाचा तो इतक्याचसाठी की, तेणेकरून बरे काय, वाईट काय, कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते या गोष्टींचे मनुष्यास स्पष्ट ज्ञान व्हावे. यावरून पाहता स्टोइक लोकांचे तत्त्वज्ञान केवळ नीतिशास्त्ररूप होय. इतर तत्कालीन तत्त्वविचारी जनांप्रमाणे ते तर्कशास्त्र व सृष्टिशास्त्र यांचे साहाय्य घेत; पण त्या शास्त्रांच्या संबंधाने त्यांनी काही विशेष शोध केल्याचे दिसत नाही. नीतिविषयक विचार मात्र त्यांचे इतरांहून पुष्कळ अंशी भिन्न आहेत. त्यांचे निरूपण पुढे योग्य स्थळी करू.

२. त्यांच्या तत्त्वविचारपद्धतीचे दुसरे विशेष लक्षण असे आहे की, तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने मनुष्याकडून सदाचार घडावा. आता सदाचार म्हणजे विवेकशुद्ध आचरण होय आणि विवेकशुद्ध आचरण तेच होय की, जे मानवी निसर्गास व मानवेतर सृष्टीच्या निसर्गास अनुसरून असते. तेव्हा अर्थात् सदाचरण म्हटले म्हणजे मनुष्याची जी कृत्ये एकंदर विश्वाच्या सामान्य व्यवस्थेच्या अनुरोधाने असतात, तद्रूपच होय. हा असा सदाचार, मनुष्याच्या हातून चांगल्या प्रकारे घडण्यासाठी त्याने विश्वाचे नियम आणि व्यवस्था यांचे ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे. ज्ञानावाचून नित्याचरण अशक्य होय. फार काय पण सदाचरण सत्यज्ञानाचा अपर पर्यायच आहे, असे ते समजत. सदाचरण तेच ज्ञान होय आणि दुराचरण तेच अज्ञान होय, असा त्यांचा दृढ विश्वास असे.[२]

३. त्यांच्या तत्त्वज्ञानाचे तिसरे विशेष लक्षण असे आहे की, सद्गुणप्राप्ती व सद्वर्तन यांनी प्राप्त होणारे सुख हाच जरी त्यांचा मुख्य उद्देश होता, तरी शास्त्रीय ज्ञानाच्याच योगाने हा उद्देश सिद्ध होण्यासारखा आहे, असे ते समजत. आता ज्या शास्त्रीय ज्ञानाचे विषय मनुष्याचे जीवित, नीती आणि व्यवहार असत, ते त्यास विशेष अगत्याचे वाटे. तर्कशास्त्राचा उपयोग ते समजत की, त्याच्या योगाने सत्यासत्य निर्णय होतो. एखाद्या शहरास जितपत तटबंदीचा उपयोग होतो तितपत त्याचा उपयोग तत्त्वविचारात आहे, असे ते म्हणत. म्हणूनच त्यांची भाषा बहुतकरून अगदी रुक्ष व साधी असे. सृष्टिशास्त्राचा अभ्यास जो त्यांना इतका आवश्यक वाटे, त्याचे मुख्य कारण असे की, त्यांच्या साहाय्याने विश्वाची व्यवस्था आणि रचना ही कळून देवाच्या स्वरूपाचा बोध होतो आणि हा बोध झाल्याविना बरे काय, वाईट काय वगैरे विषयांचे परिज्ञान होणे अशक्य आहे, असे ते समजत.

स्टोइक लोकांच्या मते तत्त्वज्ञानाचे विभाग तीन होत. ते तर्कशास्त्र, सृष्टिशास्त्र व नीतिशास्त्र हे होत. तर्कशास्त्रविषयक त्यांचे विचार ॲरिस्टॉटलनामक जो महातत्त्वज्ञानी ग्रीस देशात होऊन गेला, त्याच्या विचाराहून फारसे भिन्न नव्हते, इतके येथे सांगितले म्हणजे पुरे.

त्यांच्या त्या विचारांचा विशेष खुलासेवार निर्देश महाराष्ट्र* वाचकांस दुर्बोध वाटण्यासारखा असल्यामुळे तो येथे करीत बसत नाही राहिलेल्या दोन विभागांचा विचार यथाक्रम करू

सृष्टिशास्त्र

स्टोइक लोकांनी सृष्टिशास्त्राचे एकंदर चार विभाग केले आहेत. पहिल्या विभागात मूलभूत सिद्धांताचे निरूपण येते. दुसऱ्यांत सृष्टीचा क्रम, स्वरूप आणि व्यवस्था यांचा विचार आहे. तिसऱ्यात विवेकहीन निसर्गाचे विवेचन केले आहे आणि चौथ्यात मनुष्याविषयी विवरण केले आहे.

१. मूलभूत सिद्धांत

ज्या मूलभूत सिद्धांतांच्या योगाने स्टोइक तत्त्वज्ञान इतरांहून भिन्नत्व पावले आहे, ते एकंदर तीनच आहेत. पहिला सिद्धांत असा की, सर्व ज्ञेय वस्तू जडस्वरूप आहेत. दुसरा सिद्धांत असा की, सर्व जगत् चलस्वरूप आहे[३] आणि तिसरा सिद्धांत असा की, सर्व विश्व देवरूप आहे[४]. या तिन्ही सिद्धांतांचे थोडक्यात निरूपण करू..

पहिला सिद्धांत - स्टोइक लोकांचे असे मत होते की, ज्या वस्तूंस आकारादी गुण आहेत त्याच फक्त अस्तित्वात आहेत. त्याव्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. निरवयव, निराकार वस्तूंच्या अस्तित्वाचे विधान केवळ काही विशेष गोष्टींच्या संबंधाने करता येते. या मताप्रमाणे ज्या गोष्टी सामान्यतः लोक निराकार मानतात, त्या ते साकार मानीत. उदाहरणार्थ, आत्मा व देव यांस ते अवयवी समजत. पदार्थांचे गुणधर्मही ते साकार म्हणत. एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाहून भिन्न दिसतो याविषयी त्यांची कल्पना अशी होती की, प्रत्येक पदार्थाच्या अंतर्यामी काही वायूचे प्रवाह आहेत; ते वस्तूच्या मध्यावरून बाह्य पृष्ठभागापर्यंत प्रसृत होऊन पुनः पूर्वस्थानी स्तिमित होतात. येणेकरून निरनिराळ्या वस्तूंच्या ठायी निरनिराळे गुण दृष्टोत्पत्तीस येतात[५]. ही वायुप्रवाहाची कल्पना मानसिक धर्मासही ते लावीत. सद्गुण व दुर्गुण ते साकार मानीत. त्याचप्रमाणे कल्याण, सत्य, मनोवृत्ती, वासना, कल्पना, विचार, अनुमाने ही सर्व ते साकार समजत. यावरून हे स्पष्ट होते की, निराकार वस्तू मुळी अस्तित्वात असणेच शक्य नाही, असा त्यांच्या बुद्धीचा निश्चय झाला होता.[६]

दुसरा सिद्धांत - वर सांगितल्याप्रमाणे सर्व काही जडस्वरूप आहे असे जरी ते समजत, तरी हे सारे विश्व पदार्थांतर्गत गुणधर्मांच्या अंतःस्थ व्यापारांनीच अस्तित्वात आले आहे, असे त्यांस वाटत नसे. त्यांच्या प्रथम सिद्धांतांतील जडवादाच्या अनुरोधाने पाहता त्यांचा असा सिद्धांत होणे साहजिक होते; परंतु पदार्थ व शक्ती** ही परस्पर भिन्न असून, त्यांच्या

---

*महाराष्ट्र वाचक म्हणजे मराठी भाषा जाणणारे वाचक...ही अनुवादकाची शब्दरचना आहे.

**शक्तिरूप मान्य म्हणजे जडाच्या सिद्धांताला स्वमतानेच छेद दिला गेला.

संयोगाने हे विश्व निर्माण झाले आहे, असे त्यांचे मत होते. सर्व वस्तुजाताची प्रकृती जो पदार्थ, तो तिच्या एकंदर गुणधर्माव्यतिरिक्त पाहिला असता अत्यंत निश्चल व जड असून, त्याच्यावर पाहिजे तो व्यापार सहज होण्यासारखा असतो; म्हणजे अर्थात, त्यास पाहिजे ते रूप किंवा गुण देता येतो. तो स्वत: कोणताही व्यापार करण्यास समर्थ नसतो. अशा या अत्यंत जड, निःसत्त्व पदार्थास जी नानाविध रूपे प्राप्त झाली आहेत, ती केवळ गुणधर्माच्या योगाने. हे गुणधर्म म्हटले म्हणजे प्रत्येक वस्तूच्या ठायी जे वायूप्रवाह सतत चालू आहेत त्यामुळे उत्पन्न झालेले आहेत. आता हे प्रवाह चालू ठेवण्यास काहीतरी बाह्य शक्तींची आवश्यकता आहे. तिजवांचून ते चालू राहणे नाहीत. तेव्हा सर्व वस्तूंचे आदिकारण ही शक्ती होय. हे आदिकरण सर्वशक्त असून, अनन्य आहे. आणि पदार्थ स्वत: केवळ निश्चल असून एकच आहे. आदिकारणास अनन्य म्हणण्याचे कारण ते असे सांगत की, हे जे जगत् आपण पाहत आहोत ते नीटनेटके व सुव्यवस्थित आहे. यास्तव त्याचे एकाच अद्वितीय शक्तीकडून नियमन होत असले पाहिजे. आणखी ज्याअर्थी सर्व व्यापारक्षम वस्तू साकार असतात, त्याअर्थी हे आदिकारणही साकारच असले पाहिजे. पुनः सर्व गुणधर्म वायुरूप किंवा अग्निरूप तत्त्वाच्या योगाने जर उद्भवत असतात, तर मग ही महाशक्तीच तेवढी निराळ्या रीतीने का उद्भवावी? प्रत्येक वस्तूचे पोषण आणि वृद्धी, जीवन आणि चलनवलन यांचा संबंध उष्णतेशी असतो. प्रत्येक वस्तूच्या ठायी कमी-जास्त मानाने उष्णता असते आणि जी गोष्ट एखाद्या वस्तूच्या निरनिराळ्या भागास लागू असते ती त्या सर्व वस्तूसही लागू असावयाची. या सिद्धांताप्रमाणे पाहता उष्णता किंवा अग्नी यांच्या शक्तीमुळे सर्व विश्वाची उत्पत्ती व स्थिती झाली आहे, हे उघड आहे. या अग्निरूप शक्तीस ते सर्व विश्वाचा आत्मा कल्पून ती केवळ ज्ञानस्वरूप, दयामय व कल्याणकारी आहे असे ते मानीत[७]. सारांश, या शक्तीस ते ईश्वर म्हणत विश्वाचा नियामक अंश तो हाच. याच अंशापासून विश्वातील इतर नानाविध शक्ती उद्भवल्या आहेत. तेव्हा एकंदरीत इत्यर्थ म्हणून इतकाच की, या विश्वाच्या मुळाशी जड पदार्थ आणि देव हेच होत; परंतु ही देवाची कल्पना स्टोइक लोकांची काही विलक्षणच होती. ते त्यांस कधी अग्नी म्हणत, कधी इथर म्हणत आणि कधी तर हवेचा प्रवाहही म्हणत. हा असा देव सर्व बऱ्या-वाईट वस्तूंच्या ठायी आहे. ते त्यास जगताचा आत्मा, चित्त किंवा विवेक म्हणत. सर्व वस्तूंचा उगम त्याजपासून आहे, तो वस्तूंच्या निरनिराळ्या घटक अंशांचा संयोगसाधक आहे. तो सर्व विश्वाचा नियंता आहे. निसर्ग, दैव हे शब्दही त्याचेच पर्याय होत. तो पूर्णस्वरूप, निर्विकार, दयामय व सर्वज्ञ असा आहे. सारांश काय की, स्टोइक लोकांच्या मते जड पदार्थ आणि देव यांच्यामध्ये मूळचा काही भेद नाही. कारण देव[८] म्हणजे जर पदार्थांत चालू असणारा वायूचा प्रवाह होय, तर मग त्यांच्यात व इतर पदार्थांत भेद तो कसचा? ते असे म्हणत की, प्रत्येक दृश्य वस्तू आद्य अग्निरूप जो देव त्याजपासून क्रमाक्रमाने उद्भवली आहे आणि अंती प्रलय होऊन पुन्हा सर्व काही वस्तुजात त्याच्याच ठायी लीन होणार.

तिसरा सिद्धांत - वरील निरूपणावरून हे सहज लक्षात येणारे आहे की, जगत्* आणि ईश्वर ही परस्पर भिन्न आहेत, असे स्टोइक लोक मानीत नसत. जगत म्हणजे सर्व वस्तूंचा समुच्चय होय आणि हा वस्तुसमुच्चय मुळारंभी देवाच्या ठायी स्थित होता. हा देव सर्व विश्वप्रकृतीरूप असून, उत्पादकशक्तीही आहे. या शक्तीच्या योगाने वस्तूस निरनिराळी स्वरूपे प्राप्त झाली आहेत. आदिशक्ती, आदिअग्नी, आदिविवेक एतद्रूप ईश्वर होय. या आदिशक्तीपासून उद्भवणाऱ्या वस्तू केवळ पर्यायाने ईश्वरस्वरूप होत. यास्तव ईश्वर जो मुळी विश्वस्वरूप होता त्यास आता विश्वाचा नियामक अंश, विश्वात्मा, सर्वव्यापी, अग्नी किंवा वायू म्हटले असता चालेल. प्रत्येक प्रलयाच्या वेळी हा सर्व पसारा अनन्य देवाच्या ठायी लीन होऊन सर्व द्वैतभाव नष्ट होईल.

२. विश्वाचा क्रम, स्वरूप आणि व्यवस्था विश्वाची उत्पत्ती -

आद्यअग्नी प्रारंभी वायूरूप पावतो, मग त्यास आर्द्ररूप प्राप्त होते. या आर्द्र अंशातून काही भाग खाली पडून पृथ्वीरूप पावतो. आणखी काही भागाचे उदक होते. काही भागाचे बाष्पीभवन होऊन हवा उत्पन्न होते. या हवेतही पुन: अग्नीचा उद्भव होतो. याप्रमाणे पृथ्वी, आप, तेज व वायू या चार[९] तत्त्वांच्या ठायी फेरफार होऊन हे विश्व निर्माण झाले[१०] असून, त्या सर्वांचा मध्य पृथ्वी होय.[११] या तत्त्वांपैकी तेजतत्त्व जगताचा आत्मा होय आणि या तत्त्वाची पुढील अवस्था जी आर्द्रत्वाची, ती जड पदार्थरूप जाणावी.

जगाचा अंत - पदार्थ आणि शक्ती यांच्या भिन्नत्वास जर आदि आहे, तर अंतही असला पाहिजे. या विश्वाच्या अंतसमयी मोठा प्रलयाग्नी भडकून सर्व काही विलय पावून पूर्वीचे शुद्ध दैवी स्वरूप त्यास प्राप्त होईल. म्हणजे अर्थात आद्य अग्नी काय तो कायम राहील. हे आद्यस्वरूप त्यास जगदुत्पत्ती क्रमाच्या उलट क्रम होऊन प्राप्त होईल.

जगताचा पुनरुद्भव - वर सांगितल्याप्रमाणे विश्व पूर्वीचे अद्वितीय, अभिन्न स्वरूप पावते न पावते तोच जगदुत्पत्तीस सुरुवात व्हावयाची. हे नवे विश्व पूर्वीच्या विश्वाशी सर्व प्रकारे इतके सदृश असावयाचे की, पूर्वीची एकूण एक माणसे व वस्तू पुन्हा उत्पन्न होऊन प्रत्येक गोष्ट पूर्ववत घडावयाची. उदाहरणार्थ, सॉक्रेटिस हा पुनः पूर्ववत ग्रीस देशामध्ये निर्माण होऊन तो जनांस नीतिबोध करील आणि त्यास पुन: मेलिटस आणि ॲनिटस हे शत्रू उत्पन्न होऊन त्याच्यावर खोटा आरोप करून त्यास न्यायाधीशापुढे आणतील. हे न्यायाधीशही त्यास पुनः विषप्रयोगाची शिक्षा करतील. एकंदरीत काय की, देव आणि जगत यांच्या या इतिहासाची पुनरावृत्ती पुनः पुनः होत राहील आणि हे कालचक्र सदैव अविरतपणे फिरते राहील.

जगताची व्यवस्था - आतापर्यंत विश्वाच्या उत्पत्ती-विनाशाविषयी जे सांगितले आहे त्यावरून हे उघड होते की, सर्व चराचर वस्तूंची शाश्वती मुळीच नाही. सर्व काही विश्वक्रमाच्या

---

*हे अभेदवादाप्रमाणे आहे.

झपाट्यात सापडले असून, एकाच नियमाने बद्ध झाले आहे. कधी न बदलणाऱ्या अशा कार्यकारणसंबंधाच्या योगाने सर्व वस्तूंचा उद्भव झाला आहे. आज अस्तित्वात असणारे व पुढे येणारे सगळे काही नियत व निश्चित आहे. यासच कोणी दैव किंवा भवितव्यता म्हणतात. दैव आणि विश्वाचा विवेक[१२] ही काही भिन्न नव्हेत. या विश्वाच्या विवेकासच जगदुत्पादकशक्ती म्हणावे.

विश्वस्वरूप - विश्वातील एकंदर वस्तू व व्यापार एकाच दैवी शक्तीपासून उगम पावत असल्याकारणाने विश्वाच्या निरनिराळ्या अंशांचा परस्पर संबंध निश्चित असून. ते गुणधर्मादिकांच्या संबंधाने पूर्णस्वरूप आहेत. शिवाय आद्यपदार्थ व आद्यशक्ती ही एकच असल्यामुळे विश्वही एकरूपच होय. विश्वाच्या एकंदर अंशांचा परस्परांशी दृढ स्नेह आहे. जगातील एकंदर वस्तू काही ना काही उद्देशाने* निर्माण झाल्या आहेत. स्टोइक लोकांच्या मते प्रत्येक वस्तू दुसऱ्या कोणत्यातरी वस्तूच्या उपयोगासाठी निर्माण झाली आहे. वनस्पतीचा उपयोग प्राण्यांस होतो आणि प्राण्यांचा उपयोग माणसांस होतो. हे जगत्, देव व मनुष्य यांसाठी उत्पन्न झाले आहे आणि देव व मनुष्ये परस्परांसाठी अस्तित्वात आली आहेत. मनुष्य निर्माण होण्याचा हेतू एवढाच आहे की, त्याने या विश्वाचे चिंतन व अनुकरण करावे. त्याला महत्त्व जे आले आहे ते फक्त तो विश्वाचा एक अंश आहे म्हणून. पूर्णस्वरूप असे एक विश्वच होय आणि त्याच्या कल्याणाची[१३] सिद्धी हाच काय तो एक अनन्य हेतू समजावा..

नीतिदृष्ट्या विश्वस्वरूप - हे विश्व पूर्णस्वरूप आहे असे स्टोइक लोक मानीत असल्यामुळे त्यात आढळणाऱ्या अनिष्ट प्रकारांची मीमांसा त्यांस करणे फार जड जाई. जगतात अनिष्ट का आहे या प्रश्नाचे उत्तर ते असे देत की, निसर्गाच्या नियमित व्यक्तिमात्राचे कल्याण साध्य नाही, तर समग्र विश्वाचे आहे; आणि एकंदर विश्वाच्या पूर्णत्व सिद्धीस व्यक्तिशः अपूर्णत्व असणे अवश्य होय.

या प्रकरणी मुख्य तीन प्रश्नांचा उलगडा झाला पाहिजे. पहिला प्रश्न शारीरिक अनिष्टासंबंधाचा, दुसरा मानसिक अनिष्टाविषयींचा आणि तिसरा नित्याचरण व बाह्यस्थिती यांच्या परस्पर संबंधाचा.

शारीरिक अनिष्ट - या अनिष्टाच्या संबंधाने स्टोइक लोक अगदी बेफिकीर असत. ते ते मुळी अनिष्टच समजत नसत[१४] या मुद्याचा विशेष खुलासा त्यांच्या नीतिस्वरूप कथनात होईल. रोग वगैरे शरीरास घडणाऱ्या विपत्ती, निसर्गसिद्ध कारणपरंपरेचे परिणाम असल्यामुळे त्या अनिवार्य होत आणि त्यात निसर्गाचा काहीतरी निश्चित हेतू[१५] आहे.

मानसिक अनिष्ट - जगामध्ये जी एवढी अनाचार प्रवृत्ती दृष्टीस पडते तिचे कारण ते असे सांगत की, मनुष्य स्वतंत्र बुद्धीचा असून, त्याच्या ठायी नानाविध वासना आहेत. त्यामुळे त्याजकडून अनन्वित कर्म घडते. मनुष्याचा स्वभाव निर्दोष राखण्याचे देवाच्या हाती नाही

---

*विश्वनिर्मिती ही प्रयोजनमूल्यासहित

आणि शिवाय चांगल्याबरोबर वाईटही जगात असणे अवश्य आहे. हे वाईट अखेरीस देव बदलून चांगले करणार आहे, असे ते म्हणत; परंतु वास्तविक पाहता जर हे सारे विश्व त्यांच्या मते कधी न फिरणाऱ्या नियमान्वये कार्यकारण परंपरा अस्तित्वात येऊन निर्माण झाले, तर त्यातील एकूण एक गोष्टही तन्मूलकच असली पाहिजे. या विवरणावरून पाहता जगातील एकंदर अनिष्टाचे उत्पादकत्व देवाच्या ठायी आणावे लागते. मनुष्य त्याचा जबाबदार होऊ शकत नाही; परंतु असे मानण्याने देवांच्या इतर गुणांस विरोध घडतो, म्हणून ते वरच्या गोष्टींना समाधान देते.

नीतिमत्ता आणि सुख यांचा संबंध - आता तिसरा प्रश्न असा आहे की, जे नीतिमान असतात ते सारे सुखी असतात काय? अर्थात् नीती आणि सुख यांचा निकट संबंध आहे काय? या प्रश्नाचे उत्तर त्यास नाही असे देता येत नसे. कारण ते असे मानीत की, जगातील एकंदर व्यवस्था सुखपरिणामी आहे; परंतु त्यांच्या मतास सर्वथा विरुद्ध अशा गोष्टी जगात अगणित दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, नीतिमान लोकांस नाना विपत्ती भोगाव्या लागतात आणि दुर्गुणी मनुष्यांची पुष्कळ वेळा अनेक प्रकारे सुस्थिती व चैन असते. हे असे का, ते त्यांनी सांगणे अवश्य होते; परंतु या प्रश्नाचे नीटसे उत्तर त्यांस देता येत नसे. काहीतरी उडवाउडवीचा प्रकार करून ते वेळ मारून नेत असत. ते असे म्हणत की, सद्गुणी मनुष्यास वास्तविक विपत्ती अशी कधीही प्राप्त व्हावयाची नाही आणि दुराचारी मनुष्यास खरा सुखानुभवही कधी घडावयाचा नाही. जी वरवरून विपत्तीशी दिसते ती एक तर सृष्टिक्रमानुसार प्राप्त झाली आहे; आणि दुसरे असे की, तिच्या योगेकरून काही सद्गुणांस अभ्यास घडून ते विकास पावतात, असे शहाण्या मनुष्याने ध्यानात आणावे. जे काही आपणास घडत आहे ते नीट विचार करून पाहता आपले कल्याण करणारेच आहे, असे दिसून येईल. नीती बिघडून प्राप्त झालेली कोणतीही गोष्ट अपेक्षणीय नव्हे.

३. विवेकहीन निसर्ग*

सर्व वस्तूंची प्रकृती जडस्वरूप असून, तिची विभाज्यता अमर्याद आहे. सर्व वस्तूंत सतत पालट होत आहे. अवकाशात स्थलांतर होत असले म्हणजे त्यास गती म्हणावयाची. आद्यगती ती हीच होय. पदार्थ जी जागा व्यापून असतो तीसच ते अवकाश म्हणत. अवकाश व पोकळी यात ते भेद मानीत. पोकळी विश्वात कोठेही आढळून येत नाही. विश्वापलीकडे मात्र ती अमर्याद आहे. यावरून पाहता अवकाश जड पदार्थाप्रमाणेच मर्यादित समजावयाचा. काळाविषयीही त्यांची कल्पना अशीच होती. पदार्थाच्या गतीचे दीर्घत्व तोच काळ होय.

तत्वे - प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे ग्रीक तत्त्ववेत्त्यांप्रमाणे स्टोइक चार महाभूते मानीत. आर्य लोक आकाश म्हणून जे तत्त्व मानीत ते त्यास संमत नव्हते, हे मागे सांगितलेच आहे.

---

* विश्वनिर्मितीमागे प्रयोजनमूल्य आहे हे म्हटल्यावर निसर्गाची विवेकहीनता जरा आंतरिक विरोधाची वाटते.

या तत्त्वांची स्थिती त्यांच्या विरलत्वाच्या किंवा घनत्वाच्या अनुरोधाने आहे, असे ते प्रतिपादित.[१६] अग्नी (तेज) आणि वायू हे हलके आहेत. पृथ्वी आणि उदक ही जड आहेत. म्हणून अग्नी आणि वायू विश्वाच्या मध्यापासून दूर आहेत आणि पृथ्वी व उदक मध्ये आहेत. तेव्हा एकंदर विश्वाचे थर चार : पहिला अग्नीचा, दुसरा वायूचा, तिसरा उदकाचा आणि चौथा पृथ्वीचा. या विश्वरूप महागोलाच्या परिघाशी असलेल्या अग्नीस इथर म्हणावयाचे. याच्या अत्यंत दूरच्या अंशास झिनो स्वर्ग म्हणत असे.

विश्वरचना - विश्वाच्या मध्यस्थानी पृथ्वीगोल स्थित आहे. त्याच्या सभोवती उदकाचा विस्तार आहे, त्याच्यावर वातावरण आहे. हे तीन थर मिळून सर्व विश्वाचा गर्भ झाला असून तो निश्चल आहे. हा गर्भाच्या सभोवार इथर आत अडकविलेल्या तारांगणासह परिभ्रमण करीत आहे. जगताचा अंतर्गर्भ जड पदार्थाने गच्च भरला आहे. त्यात रिता ठाव असा बिलकूल नाही. ताऱ्यांविषयी स्टोइक लोकांची अशी कल्पना होती की, ते जिवंत विवेकी दैवी विभूती आहेत.[१७] का तर त्यांच्या गती आणि कक्षा नियमित असून, त्यांचे घटकांशही उच्च प्रतीचे आहेत. पृथ्वीच्या ठायीसुद्धा चालक आत्मा आहे. एरव्ही वृक्षांस जीवन व ताऱ्यांस पोषक द्रव्याचा पुरवठा जो तिजपासून मिळत आहे तो मिळताना ताऱ्यांच्या पोषणाविषयी त्यांची अशी कल्पना होती की, पृथ्वीपासून निघणाऱ्या वाफांनी ताऱ्यांचे पोषण होते! विश्वाचे अभिन्नत्व पृथ्वीच्या एकंदर भागात विद्यमान असणाऱ्या आत्म्याच्या अद्वितीयत्वावर अवलंबून आहे.

सर्व नैसर्गिक वस्तूचे विभाग त्यांच्या मते चार होत. एक निरिंद्रिय वस्तूंचा, दुसरा उद्भिजकोटीचा, तिसरा प्राणीकोटीचा आणि चौथा विवेकी प्राण्यांचा. पहिल्या विभागाचे स्वरूप एवढेच की, त्याचे निरनिराळे परमाणू एकत्र संघटित असतात. दुसऱ्या विभागातल्या वस्तूंत वृद्धी पावण्याचा गुण असतो; तिसरा विभाग जो प्राण्यांचा, त्यांच्या ठायी आत्मा असतो आणि चौथ्या वर्गातल्या प्राण्यांच्या ठायी विवेकयुक्त आत्मा असतो.[१८]

४. मानव

ज्या वस्तूंस अस्तित्व आहे त्या सर्व जडस्वरूप आहेत, असा स्टोइक लोकांचा एक मूलभूत सिद्धांत असल्याकारणाने त्यांचे मानव स्वरूपाविषयीचे विचारही अशाच धोरणाचे असावयाचे, हे उघड आहे. मनुष्याची सर्व कर्मे काही चालकशक्तींच्या योगाने होत असतात आणि या चालकशक्ती एका आद्याशक्तीपासून उद्भवलेल्या आहेत, असा त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळे आत्म्याचे अनन्यत्व आणि चलस्वरूप ही त्यांस अभिमत असणे साहजिक होते. हा आत्मा ते साकार व विवेकी आहे असे म्हणत.[१९] याची प्रमाणे ते अशी देत की, ज्याचा शरीरावर परिणाम होतो आणि ज्यावर शरीराचा परिणाम होतो, त्याचप्रमाणे जो शरीराशी संयोग पावतो व कालेकरून* त्यापासून विभक्त होतो, जो जडस्वरूप असलाच

*काळमानानुरूप

पाहिजे. दुसरे प्रमाण असे की, ज्यास काही परिमाण म्हणून असते, ते सारे साकार असले पाहिजे. आत्म्याचा ज्यापक्षी शरीरांत सर्वत्र संचार आहे[२०] त्यापक्षी त्यास परिमिती असलीच पाहिजे, म्हणन तो साकार होय. त्यांच्या मते आत्मा म्हणजे केवळ अग्नी होय. कधी कधी ते त्यास उष्ण प्राणवायू म्हणत. जसा विश्वात्मा सर्वगामी असून, समग्र विश्वाचे एकत्व कायम राखणारा आहे, तसाच हा प्राणवायूही सर्व देहांत फैलावलेला असून, निरनिराळ्या अवयवांचा संधायक (संबंध जुळविणारा) होय. या उष्णश्वास वायूचे रुधिरांतून निघणाऱ्या वाफांनी पोषण होते, असे ते मानीत. त्याचप्रमाणे चित्त म्हणजे केवळ अग्निरूप श्वास* होय, असा त्यांचा समज होता.

आत्म्याच्या उत्पत्तीविषयी त्यांची अशी कल्पना होती की, त्यांचा एक अंश प्राणी बीजावस्थेत असताच त्यास प्राप्त होतो. गर्भाशयामध्ये या अंशाचा विकास होऊन त्यास वनस्पत्यंतर्गत आत्म्याचे स्वरूप प्राप्त होते. पुढे जन्म पावल्यावर क्रमाक्रमाने त्यास प्राण्यांच्या ठायीच्या आत्म्याचे स्वरूप बाह्य वायूच्या योगाने प्राप्त होते. आत्म्याचे अधिष्ठान छातीत आहे असे ते मानीत.[२१] कारण ते म्हणत की, प्राणवायू व उष्ण रुधिर ही छातीत असून, विचार प्रगट करण्याचे साधन जी वाणी तिचाही उद्भव छातीतूनच होत असतो.[२२] या हृदयस्थ मध्यवर्ती अधिष्ठानापासून आत्म्याचे निरनिराळे अंश वायू प्रवाहाच्या रूपाने देहाच्या निरनिराळ्या अवयवांत संचार करतात.[२३] हे असे अंश एकंदर सात आहेत, असे ते मानीत. त्या शिवाय सर्वांचा नियामक जो विवेकरूप अंश तो निराळाच. हे सात अंश म्हटले म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये, प्रजोत्पादनाची शक्ती आणि वाणी हे होत. स्टोइक लोकांच्या मते विवेक हीच आद्यशक्ती होय, बाकीच्या शक्ती अंशरूप असून, या आद्यशक्तीपासून उत्पन्न झाल्या आहेत. वृत्ती आणि वासना यांचाही उगम या आद्यशक्तीपासूनच आहे, असे ते कल्पित. सारांश, ही विवेकरूप शक्तीच काय ती मनुष्याच्या व्यक्तिनिष्ठत्वाचे कारण आहे. म्हणजे अर्थात इच्छायोगाने त्यास स्वतंत्र स्थिती प्राप्त झाली आहे.

विश्वात्म्याचा प्रत्यगात्मा अंशरूप आहे. मानवाचा आत्मा विश्वात्म्याचा इतरांप्रमाणे केवळ अंशरूपच नाही, तर तो विवेकयुक्त असल्याकारणाने त्याचा देवाशी विशेष संबंध आहे. हा संबंध, मनुष्य जसजसा आपल्या ठायीचा दैवी अंश जो विवेक त्याचा उपयोग अधिकाधिक करतो, तसतसा विशेष निकट होत जातो. याच कारणास्तव मानवाच्या आत्म्यास नियतीरूप जो देवाचा नियम त्यापासून मुळीच सुटका नाही. आत्मा स्वतंत्र असून, विश्वक्रमापासून अलग आहे, असे मानणे हा केवळ भ्रम आहे. मनुष्याच्या ठायीची जी कर्तृत्वप्रेरक इच्छा किंवा बुद्धी, तिचा उद्भव कधी न पालटणाऱ्या कार्यकारण परंपरेने झाला आहे. तिला विवक्षित स्वरूप, कोणती कारणे घडून प्राप्त होते, हे आम्हा मानवास कळणे शक्य नाही.[२४] तिचे स्वातंत्र्य काय ते इतक्याच पुरते असते की, तिच्या स्वतःच्या

* हे वर्णन आपल्या प्राण तत्त्वाप्रमाणे वाटते.

निसर्गानुसार तिचे व्यापार चालतात. बाह्य कारणांचा तिजवर काही एक प्रभाव चालत नाही. हा प्रत्यगात्मा जगत्प्रलयाच्या वेळी विश्वात्म्याच्या ठायी लीन होईल.

आत्मा अमर नाही असे ते म्हणत; परंतु हा देह सोडल्यावर आत्म्यास पुष्कळ काळपर्यंत कोठे तरी दुसऱ्या अवस्थेत राहावे लागते, असा त्यांचा समज होता.[२५]

नीतिविषयक विचार

तर्कशास्त्र व सृष्टिशास्त्र यापेक्षा नीतिशास्त्राकडे स्टोइक लोकांचे विशेष लक्ष असे. मागे सांगितलेच आहे की, त्यांच्या तत्त्वविचारांत केवळ नीतीलाच प्राधान्य असून, दुसऱ्या दोन शास्त्रांचे जे अध्ययन करावयाचे ते नीतिशास्त्रज्ञानास बुद्धी योग्य व्हावी म्हणून. यास्तव नीतिशास्त्रावरील त्यांचे विचार आज पुष्कळ उपलब्ध आहेत; परंतु हे विचार निरनिराळ्या स्टोइक लोकांनी निरनिराळ्या प्रकारे प्रकट केले असल्यामुळे व कित्येक त्यांचे विचार तर परस्पर विरोधीही असल्यामुळे त्यांचे येथे नीट निरूपण करणे बहुतेक अशक्य आहे. पुनः त्यांच्या एतद्विषयक प्रतिपादनात कोणत्याही प्रकारची म्हणण्यासारखी व्यवस्था नसल्याकारणाने त्यांच्या विचारांचे व्यवस्थित विवेचनही अशक्य होय. यास्तव पुढील निरूपणात अभिज्ञ वाचकांस पुष्कळ व्यंगता आढळून येण्यासारखी आहे. तथापि त्यांच्या मुख्य मुख्य विचारांचे दिक्प्रदर्शन होईल तितके स्पष्टपणे केले आहे. ते वाचक मननपर्वक वाचतील अशी उमेद आहे. कारण स्टोइक लोकांचे नीतिविषयक विचार स्पष्टपणे कळल्याने पढील बोधवचने त्यास नीट समजणार आहेत.

प्रथमत: नीतिविषयक त्यांच्या सामान्य विचारांचे विवेचन करू. हे करताना तत्त्वदृष्टीने त्यांचे नीतीचे विचार कसे काय आहेत हे सांगून मग व्यवहारासाठी या तात्त्विक विचारांत कोणकोणते फेरफार ते करीत त्याचे दिग्दर्शन करू. आता नीतीसंबंधी त्यांच्या तात्त्विक विचारांचा ऊहापोह करताना मुख्य तीन गोष्टींचा उल्लेख केला म्हणजे पुरे. पहिली गोष्ट-परम कल्याण, दुसरी सद्गुणाचे स्वरूप, तिसरी प्रज्ञपुरुषाचे लक्षण.

१. परम कल्याणाचे स्वरूप -

सॉक्रेटिसाच्या वेळेपासून मनुष्याच्या जन्माच्या सार्थक्याविषयी विचार करताना नीतिशास्त्रवेत्ते कल्याण म्हणजे काय व परम कल्याणात कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो याचे निरूपण करीत आले आहेत. स्टोइक लोकांच्या मते कल्याण काय ते विवेकशुद्ध आचरणात म्हणजे अर्थात नीत्याचरणात आहे. प्रत्येक प्राण्याचा मूळचा नैसर्गिक कल स्वसंरक्षण व स्वसुखप्राप्ती याजकडे आहे. यावरून हे उघड होते की, ज्या गोष्टी त्याच्या निसर्गास अनुरूप असतात, त्यांच्याच पाठीस तो लागतो आणि असल्याच गोष्टींचा त्यास काही ना काही उपयोग असावयाचा म्हणून निसर्गानुसार[२६] जेवढे काही आहे तेवढे सारे परमकल्याणरूप होय; परंतु जे विश्वक्रमास अनुसरून नसेल ते कोणत्याही व्यक्तीच्या

निसर्गासही अनुसरून नसावयाचे; आणि ज्ञानी व विवेकी प्राण्यांच्या संबंधाने पाहता हा जो निसर्गाचा सर्वसाधारण नियम आहे. त्याच्या परिज्ञानाने म्हणजे अर्थात विवेकशुद्ध ज्ञानाने जे प्राप्त होईल ते त्यास कल्याणप्रद होय. कोणती गोष्ट निसर्गानुसार आहे हे पाहताना प्राण्यांच्या वास्तविक स्वरूपाचा विचार करणे अवश्य होय. मानवाचे वास्तविक स्वरूप केवळ विवेकरूप होय. सारांश, जगताच्या सार्वत्रिक क्रमानुसार विवेकशुद्ध जीवनक्रम ठेवण्यातच परमकल्याण किंवा सदाचरण आहे. सद्गुण व कल्याण ही दोन नव्हेत.[२७] सुख म्हणून जे काही आहे ते सारे केवळ सदाचरणातच आहे. एकंदरीत काय की, सुख आणि सदाचरण, कल्याण आणि कर्तव्य, उपयुक्त आणि विवेकशुद्ध हे शब्द परस्परांचे पर्याय होत असे म्हटले असता चालेल. म्हणजे अर्थात त्यांनी ज्या गोष्टींचा बोध होतो त्या एकरूप होत. सदाचरणाव्यतिरिक्त कल्याणप्रद असे काही नाही; आणि सदाचरणात अनिष्ट असे काही एक नसावयाचे.

२. बरे आणि वाईट -

सामान्य प्रचारातला व बहुतेक तत्त्ववेत्त्यांनी मानलेला बऱ्यावाईटांतला तारतम्यभाव स्टोइक लोकांस संमत नव्हता. बऱ्याचे निरनिराळे पर्याय त्यांस कबूल नसत. कल्याणप्रद गोष्टींमध्ये ते देहाच्या सुस्थितीची किंवा बाह्य अनुकूल स्थितीची, किंबहुना मानसिक इष्ट गुणधर्माचीही गणना करीत नसत. त्यांच्या मते कल्याणप्रद असे तेच होय की, ज्याची योग्यता अगदी स्वतःसिद्ध[२८] असून, कधीही कमी-जास्त व्हावयाची नाही. कल्याण व अकल्याण यात जो भेद आहे त्यात तारतम्याचा विचार बिलकूल येत नाही. ती परस्परांपासून अत्यंत विप्रकृष्ट होत. त्यांची मुळी जातीच भिन्न होय. जे निरपेक्षत्वे करून कल्याणप्रद नव्हे ते कदापि कल्याणप्रद मानू नये. त्याचप्रमाणे जे स्वतःसिद्धपणे अकल्याण नव्हे ते इतर गोष्टींच्या संसर्गाने तसे होणे नाही. या उभय प्रकारांखेरीज इतर सर्व गोष्टी कल्याणकारकही नव्हेत व अकल्याणकारकही नव्हेत, तर याची गणना उदासीन वर्गात करावयाची. मग त्यापासून आपल्या स्थितीत कोणत्याही प्रकारचा पालट घडत असला तरी चिंता नाही. आरोग्य, संपत्ती, मान, किंबहुना जीवितही ते कल्याणप्रद मानीत नसत. त्याचप्रमाणे यांच्या उलट प्रकार जे रोग, दारिद्र्य, अपमान व मृत्यू हेही ते अनिष्ट मानीत नसत. या उभय प्रकारच्या गोष्टींच्या संबंधाने मनुष्याने उदासीन राहावे, असे ते म्हणत. त्यांच्या मते ज्या गोष्टींच्या योगाने मनुष्याचा नीतीकडे कल न होता उलट ज्यांच्या प्राप्तीसाठी कधी कधी नीतिभ्रष्टही व्हावे लागते, त्यांचा मनुष्यांच्या कल्याणाशी कदापि संबंध नसावयाचा.[२९] सदाचरणाने जर मनुष्य सुखी झाला असता, तर तो अगदी पूर्णपणे व निरपेक्षपणे झाला पाहिजे. कारण सर्व प्रकारे सुखी नव्हे त्यास सुखी म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे मनुष्याच्या हाती नाही. अशा एखाद्या गोष्टीने त्याच्या सुखास अंतराय घडला असता सदाचरणाची तेवढी योग्यता कमी

झाली म्हणून समजावे; आणि येणेकरून चित्ताचे अढळ स्वास्थ्य मानवास कदापि प्राप्त होणे नाही आणि चित्त निरंतर स्वस्थ असल्यावाचून सुखानुभव घडणे अशक्य![३०]

३. आनंद आणि कल्याण -

आनंदप्राप्ती स्टोइक लोकांस कल्याणकारक वाटत नसे. जे केवळ आनंदप्राप्तीच जीविताचा अंतिम व अत्युच्च हेतू समजतात ते सदाचरणास अगदी हलके मानतात असे म्हणण्यास हरकत नाही. जे आनंदप्राप्तीसच कल्याण समजतात ते कल्याणाचे वास्तविक स्वरूप काय व सदाचरणाची अद्वितीय योग्यता काय ते उमजत नाहीत. ते मानवाच्या कृत्याचा विचार करीत नाहीत, तर त्यांच्या वृत्तींचाच फक्त करतात.[३१] अशा समजुतीच्या मनुष्यांच्या मते विवेकी प्राण्याने ज्यात काही एक विवेक नाही अशा गोष्टींच्या पाठीस लागावे असे होते. वस्तुतः पाहता सद्गुणातच आनंदाचाही अंतर्भाव होतो. सदाचरणात एक विशेष प्रकारचे समाधान प्राप्त होऊन चित्त निरंतर आनंदयुक्त व शांत राहते. यावरून पाहता केवळ प्रज्ञपुरुषासच सत्य व शाश्वत अशा आनंदाचा अनुभव घडतो. आता सदाचरण आनंदप्राप्तीच्या हेतूने मात्र करता कामा नये, तर ते करीत असता स्वाभाविकपणे आपोआप आनंदानुभव घडावा. नाही तर सद्गुणाची स्वतःसिद्ध योग्यता कमी होते.

आता येथे हे एक लक्षात वागविले पाहिजे की, आनंद आणि नीती यांचे समानाधिकरण्य असलेच पाहिजे असे नाही. कारण आनंद आणि नीती यांचा अर्थाअर्थी काही एक संबंध नाही. कधी कधी आनंदप्राप्ती अनीतीनेही होते आणि नित्याचरणात पुष्कळ संकटे आणि विपत्ती ही खास होतात. अत्यंत दुष्ट मनुष्याससुद्धा आनंदानुभव घडतो. नीती केवळ सत्पुरुषांच्या ठायी आढळते. सदाचारी पुरुष गंभीर, धीर, शांत असा असतो. आनंदप्राप्तीच्या पाठीस लागलेला मनुष्य नीच, दुर्बल, असतो. आनंद जो आहे तो केवळ कृत्याचा परिणाम असतो, त्यास हेतू म्हणता येत नाही. नित्याचरणाचे बक्षीस केवळ सत्कृत्य करण्यातच आहे; आणि दुराचाराबद्दलचे शासनही दुष्कृत्यातच आहे. कारण उघडच आहे की, सदाचार निसर्गानुसार आहे व दुराचार निसर्गाविरुद्ध आहे. विवेकशुद्ध आत्मनिग्रहच केवळ कल्याणकारक होय. येणेकरून मनुष्य सर्व बाह्योपाधींपासून विलग राहून स्वतंत्र व अंतर्यामी तृप्त असतो.

४. कल्याणाचे स्वरूप -

सदाचारी पुरुषाचे सुख अभावरूप असते, भावरूप नसते. ते चित्ताचे स्वातंत्र्य व शांती यातच असते, सद्वर्तनाने प्राप्त होणाऱ्या आनंदात नसते. मनाचे अस्वास्थ्य तीच विपत्ती आणि स्वास्थ्य तेच सुख होय. ज्याचे भय आणि चिंता यापासून धैर्याच्या योगाने रक्षण होते; आणि मनोनिग्रहाच्या योगेकरून इंद्रियांची सुखे आणि वासना यापासून निवृत्ती होते, त्याच्या सुखात न्यूनता कोठून असणार? जो वैभवावर अवलंबून न राहता केवळ स्वत:वरच अवलंबून राहतो तो निखालसपणे सुखी का नसावा? चित्ताच्या अस्वास्थ्यापासून विमुक्त

राहणे हा अधिकार केवळ प्रज्ञपुरुषाचाच होय. तत्त्वज्ञानाचा उपयोग मिळून इतकाच की, आपले जीवन निर्भयपणे होऊन संसारातील नानाविध निवंतांपासून आपणास काही एक पीडा होत नाही. सारांश काय की, स्टोइक लोकांच्या मते सर्व उपाधीपासून मुक्ती, स्वकल्याणाविषयी निश्चयात्मक खात्री आणि मनोनिग्रह यातच सदाचारी मनुष्यास सुख प्राप्त होते.

५. परमकल्याण केवळ नियमरूप होय -

जगताची साधारण व्यवस्था ज्यापक्षी कल्याणाच्या हेतूने झाली आहे. त्यापक्षी मानवास कल्याण केवळ सृष्टिनियमरूप वाटले पाहिजे. आता हा नियम म्हटला म्हणजे, ज्याअर्थी केवळ त्याच्या निसर्गाचाच नियम होय, त्याअर्थी कल्याण जे आहे ते मनुष्याच्या नैसर्गिक इच्छेचा विषय झाले. यावरून पाहता कल्याण आणि सृष्टिनियम ही एकरूप होत. आणखी असे की, स्टोइक लोकांच्या मते विश्वाचे नियमन विवेकाकडून (ज्ञानतत्त्वाकडून) होत असल्याकारणाने विवेक हाच विश्वाचा सर्वसाधारण नियम होय. तेव्हा अर्थात् नीतिनियमाचे अनुसरण प्रत्येक विवेकी प्राण्याकडून अवश्य घडले पाहिजे. ज्यास नित्याचरण हे आपले परम कर्तव्य वाटत नाही त्या मनुष्यास विवेकी म्हणता येत नाही. नीतिनियमाचे अनुवर्तन करणे हे मानवनिसर्गास केवळ अनुसरून आहे. सारांश काय की, सदाचाररूप कल्याणाच्या प्राप्त्यर्थ झटणे हा मनुष्याच्या नैसर्गिक इच्छेचा विषय होय आणि दुराचाररूप जे अकल्याण त्याचा त्याच्या निसर्गाशी अत्यंत विरोध आहे.

नीतीचे स्वरूप

वृत्तीचे स्वरूप -

वर सांगितलेली स्थिती जो केवळ विवेकी मनुष्य आहे त्याच्या ठायी आढळावयाची; परंतु मनुष्य नेहमी शुद्धविवेकयुक्त नसतो. त्याच्या ठायी जशा विवेकशुद्ध वृत्ती असतात, त्याचप्रमाणे विवेकास विरुद्ध अशाही वृत्ती असतात.* तो मूळचा सदाचारी नसतो, तर तो आपल्या वृत्तीचे दमन करून सदाचारी होतो. वृत्ती किंवा वासना ही विवेक व निसर्ग याविरुद्ध मनाची धाव होय. सर्व वृत्ती विचारदोषाने उद्भवतात. कल्याण कोणते व अकल्याण कोणते याच्या निर्णयात घडलेल्या दोषांमुळे त्यांचा प्रादुर्भाव होतो. यास्तव त्यास भासमय कल्पना किंवा भासमय समजुती म्हटले असता चालेल. उदाहरणार्थ, द्रव्यलोभ म्हणजे अर्थात् पैक्याच्या योग्यतेविषयी झालेला खोटा समज होय. त्याचप्रमाणे भीती ही भविष्यकाळी घडणाऱ्या गोष्टींविषयी असत्कल्पना होय. या वृत्ती आपल्या स्वाधीनच्या आहेत. कोणत्याही गोष्टीविषयी आपल्या झालेल्या समजाप्रमाणे वागणे किंवा न वागणे हे आपल्या हाती आहे.

---

*कदाचित प्रारंभीचा काळ असल्याने असेल स्टॉईकांची विवेकाची मांडणी ढोबळ वाटते.

तेव्हा अर्थात या वृत्तीचा आपल्याठायी विकास होऊ देणे किंवा न देणे हे आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. या वृत्तीचे दमन करण्यास फक्त खरे ज्ञान होऊनच पुरे नाही. तर त्यास मनोनिग्रहाचीही आवश्यकता आहे.

वृत्तीचे प्रकार -

वृत्तीचा उद्भव केवळ कल्पनांवर अवलंबून असल्या कारणाने जितक्या प्रकारच्या असत् कल्पना तितके त्यांचे प्रकार संभवतात. हे प्रकार एकंदर चार आहेत. ते येणेप्रमाणे :

१. कल्याणाच्या स्वरूपाविषयी विवेकाविरुद्ध समजूत असल्यामुळे विद्यमान वस्तूंच्या संबंधाने आनंद उत्पन्न होतो.
२. भविष्यकालीन वस्तूंच्या संबंधाने असत्य समजूत असली म्हणजे वासना उत्पन्न होते.
३. विद्यमान कालीच्या अनिष्टाबदल सदोष समजूत असल्यामुळे चिंता उत्पन्न होते.
४. आणि पुढे घडणाऱ्या अनिष्टाविषयी भीती उत्पन्न होते.

या वृत्ती चतुष्ट्याचे आणखी भाग विभाग स्टोइक लोकांनी केले आहेत. त्यांच्या मते असद्वृत्तीचे स्वरूप मिळून इतकेच की, त्यांच्या योगेकरून चित्ताच्या नैसर्गिक शांत स्थितीचा नाश होतो. त्या असवृत्ती विवेकाविरुद्ध असल्यामुळे आत्म्याच्या शक्तीस व्याघात होतो आणि या वृत्ती वेळोवेळी उद्भवल्याने त्या आत्म्याच्या सततच्या रुजा होतात. म्हणून स्टोइक लोक म्हणतात की, त्यांचे अगदी निर्मूलन करून टाकावे. असे जो करील त्याच्याच ठायी सत्यनीतीचे वास्तव्य होईल. या वृत्ती निसर्गाविरुद्ध व रोगरूप असल्याकारणाने प्रज्ञपुरुष त्यापासून सर्व प्रकारे निर्मुक्त असला पाहिजे.[३२] प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे तत्त्ववेत्त्यांचे म्हणणे असे की, या वृत्ती आपल्या कह्यात ठेवाव्या, त्यांच्या अगदी स्वाधीन होऊन जाऊ नये. हे म्हणणे स्टोइक लोकांस मुळीच संमत नसे. ते म्हणत की, अनिष्ट गोष्ट जी आहे ती अगदी अल्पप्रमाणे राहू दिली तरी ती अनिष्टच की नाही? जे सदोष असून, विवेकाविरुद्ध आहे ते अगदी अल्पप्रमाणानेसुद्धा राहू देणे कदापि इष्ट नव्हे. वृत्ती ज्या आहेत त्या कोणत्याही स्थितीमध्ये पाहिल्या तरी दोषरूप आहेत. त्या उपयोगी असत्या तर मग जे गैरशिस्त आहे ते नीतिविकासास आवश्यक होय, असे म्हणावे लागते. यास्तव वृत्तींचा नि:शेषपणे उच्छेद करावा हेच नित्याचरणास अनकल होय. सारांश काय की प्रज्ञपुरुष अगदी वृत्तिहीन असला पाहिजे. त्यास इजा झाली तरी ती तो अनिष्ट मानीत नसल्यामुळे तिजपासून त्यास पीडा होणे नाही व भीतीही वाटणे नाही. त्याची लोक निंदा करतील; परंतु तिजमुळे त्याचे काही एक नुकसान होणे नाही किंवा त्यास कमीपणा येणे नाही. मानापमानास त्याच्या चित्तांत ठाव नसल्याकारणाने त्यास अभिमानाचा गंधही नसतो. तो क्रोधास कधी वश होत नाही. या विवेकविरूद्ध वृत्तीचा धैर्य किंवा रास्त गोष्टीचे मंडन यात तो मुळीच उपयोग करीत नाही. त्यास कोणाचीही कीव येत नाही व दुर्वर्तन त्यास बिलकूल क्षम्य वाटत नाही. कारण जे दुःख

त्यास स्वतः अनिष्टसे वाटत नाही, त्याजबद्दल त्यास दुसऱ्याची का म्हणून कीव येईल? ज्या ऐषारामीच्या गोष्टी त्यास अगदी निषिद्धशा वाटतात, त्या तो इतरांस कशा बरे अनुभवू देईल? सारांश काय की, ज्या गोष्टींबद्दल शासन होणे हा न्याय आहे, त्याजबद्दल क्षमा करण्याकडे स्टोइक प्रज्ञपुरुषाची मुळीच प्रवृत्ती होणे नाही.

नीतीची कल्पना विधिनिषेधरूपलक्षण -

आतापर्यंत जे विवेचन केले आहे त्यावरून नीतीचे निषेधरूपलक्षण सिद्ध होते. म्हणजे अर्थात वृत्तीचे निर्मूलन केल्याने नीतीचे एक अंग प्राप्त होते. आता नीतीचे विधिरूप लक्षण काय आहे ते पाहू. त्यांची सत्कृत्याची कल्पना लक्षात आणली असता सृष्टीच्या सर्वसाधारण नियमास अनुसरून वागण्यातच नीती आहे, असे होते आणि या नित्याचरणाचे साधन पाहता विवेकशुद्ध मनोनिग्रह हेच होय. कोणीकडूनही पाहिले तरी नीती आणि विवेक ही एकरूप होत. नीती म्हणजे सुव्यवस्थित विवेक होय. या नीतीची अंगे दोन. एक आचाराचे व दुसरे विचाराचे. सर्व विवेकशुद्ध आचाराच्या मुळाशी सत्यज्ञान आहे. नैसर्गिक सदाचारप्रवृत्ती किंवा अभ्यासप्राप्त सदाचारप्रवृत्ती त्यास बिलकूल संमत नाही. सॉक्रेटिसाप्रमाणे त्यांचे असे मत होते की, नीती म्हणजे ज्ञान होय आणि अनीती म्हणजे अज्ञान होय. यास्तव ते जनास नीती शिकण्याविषयी बोध करीत; परंतु नुसत्या ज्ञानप्राप्तीने ते तृप्त नसत. ते म्हणत की, ज्ञानाचा उपयोग काय तो विवेकशुद्ध आचरणापुरता आहे. यावरून पाहता नीती म्हणजे विचार आणि आचार यांचे संमेलन होय. बुद्धीचा विषय जे ज्ञान त्याजवर सर्व आचाराचा पाया असणे उचित होय आणि ज्ञानाचा हेतू मिळून इतकाच की, तेणेकरून सदाचारप्रवृत्ती उत्पन्न व्हावी. सर्व आचाराची उत्पत्ती इच्छेच्या प्रेरणेने होत असते खरी; परंतु ही इच्छा आणि ज्ञान ही अभिन्न होत असे स्टोइक लोक समजत. ज्ञान व नीती यांत अभेद असून, ती आत्म्याचे गुण होत. शुद्धविवेकयुक्त आत्म्याचे हे एक लक्षण आहे.

नीतीचे निरनिराळे प्रकार -

वरील निरूपणावरून हे उघड झाले की, सर्व नीतीचा उगम ज्ञानात आहे. आता हे ज्ञान म्हणजे अर्थात सर्व मानवी व दैवी वस्तूंचे होय. या ज्ञानरूप उगमापासून मुख्य चार सद्गुण उद्भवतात असे प्लेटोप्रमाणे स्टोइक लोकांचेही मत होते. ते सद्गुण हे होत. बुद्धी, धैर्य, न्याय आणि मनोनिग्रह[३३] बुद्धीचा उपयोग बरे काय, वाईट काय व कोणती गोष्ट या दोन्ही वर्गात येत नाही, हे जाणणे होय. धैर्य म्हणजे भीती कोणत्या गोष्टीची बाळगावी आणि कोणत्या गोष्टीची बाळगू नये आणि कोणत्या गोष्टींविषयी उदासीन राहावे हे जाणणे होय. किंवा या गुणाचे दुसऱ्या रीतीने असे लक्षण करता येते की, धैर्य म्हणजे विवेकाच्या नियमाप्रमाणे अगदी निर्भयपणे वागणे होय. म्हणजे अर्थात् यात धाडस आणि सहनशीलता यांचा अंतर्भाव होतो. न्याय म्हणजे जे ज्याचे असेल ते त्याला देण्याचे समजणे होय. मनोनिग्रह म्हणजे कोणत्या

गोष्टीची निवड करावी, कोणती गोष्ट टाळावी आणि कोणत्या गोष्टीविषयी उदासीन राहावे हे जाणणे होय. त्याचप्रमाणे मुख्य दोषांचेही लक्षण ते अज्ञानाने करीत.

सद्गुणांचा अन्योन्य संबंध -

सर्व सद्गुणांचा हेतू मिळून एकच होय. आता हे खरे की, हा हेतू ते गुण निरनिराळ्या प्रकारे सिद्ध करतात. या गुणांच्या प्रादुर्भावास मनाची नीतिविषयक प्रवृत्ती ही समानच असावी लागते. या गुणांचा परस्पर संबंध इतका निकट असतो की, त्यातल्या एखाद्या गुणात काही व्यंगता आली किंवा तो नष्ट झाला असता सर्व नीतिमत्ता नाहीशी होते. आणखी असे की, निरनिराळ्या गुणांचा मूळ हेतू जरी निराळा असला तरी ते शेवटी मिलाफ पावतात. कारण की त्यांची भिन्न हेतूसिद्धी परस्परांच्या साहाय्यावाचून होणे नाही. यास्तव कोणताही नीतीचा विभाग इतर विभागांपासून विलग करता येत नाही. जेथे एक सद्गुण असतो तेथे इतरही असतातच; आणि जेथे एक दोष असतो तेथे सर्व काही दोषमय असते.[३४] प्रत्येक सत्कृत्यामध्ये सर्व सद्गुणांचा अंतर्भाव होतो. कारण ज्या नीतिमत्तारूप मनाच्या अवस्थेपासून ते कृत्य उद्भवते तीत इतर सर्व सद्गुणांचा समावेश अवश्य झाला पाहिजे. नीती किंवा अनीती जी काही आहे ती केवळ बुद्धीवर अवलंबून आहे. कोणतीही गोष्ट करण्याविषयी एक वेळ बुद्धी झाली म्हणजे पुरे, मग ती हातून घडो किंवा न घडो; ती घडल्याप्रमाणेच समजावयाची. दुष्ट वासना अंतर्यामी उद्भवल्यानेच मनुष्य दोषी होतो, मग तिची प्रत्यक्ष तृप्ती त्याच्या हातून घडो न घडो. कोणतेही कृत्य जे नीतीचे म्हणावयाचे ते फक्त स्वतःसिद्धपणे कल्याणप्रद असून, पुरत नाही, तर ते सद्बुद्धीनेही झाले पाहिजे.[३५]

नीतीचे एकरूपत्व -

नीती जी आहे ती अखंड आहे. ती अंशतः अंगी असणे संभवत नाही. ती एक तर पूर्णपणे अंगी असावयाची किंवा मुळीच नसावयाची. ज्याच्या चित्ती सद्धेतू वसत असून, बऱ्या-वाईटाचे ज्यास वास्तविक ज्ञान होते, तो नीतिमान समजावा. ज्यांच्या ठायी ही दोन्ही नसतील तो नीतिमान नव्हे. येथे तारतम्याचा मुळीच विचार करावयाचा नाही. नीतिमत्तेत वृद्धी किंवा क्षय संभवत नाही आणि सदाचार व दुराचार यांच्यामधली अवस्था मुळीच शक्य नाही. यास्तव सत्कर्म जे आहे ते सर्वथा प्रशंसनीय होय आणि असत्कर्म सर्वथा दूषणीय होय.

प्रज्ञपुरुष

ज्ञान आणि मूढता -

वरील ऊहापोहावरून हे सिद्ध होते की, सर्व मनुष्यजातीचे वर्ग स्टोइक लोकांच्या मते दोन, एक सदाचारी जनांचा व दुसरा दुराचारी जनांचा. या वर्गात तारतम्याचा विचार मुळीच

करावयाचा नाही. ज्याच्या ठायी नीतिमत्ता असते त्याच्या ठायी ती पूर्णपणे असावयाची आणि ज्याच्या ठायी ती नसते त्याच्या ठायी ती निखालसपणे नसावयाची. यास ते असा दृष्टांत देत असत की, जो पाण्याखाली हातभर बुडालेला असतो तो पाचशे हात खाली गेलेल्या माणसाप्रमाणेच बुडून मरावयाचा. जो आज आंधळा असून, उद्या डोळस व्हावयाचा आहे तो आजन्म आंधळा राहणाऱ्या मनुष्याहून जास्त पाहू शकतो अशातली काही गोष्ट नाही. एकंदरीत काय की, स्टोइक लोकांच्या मते सर्व मनुष्य जातीचे वर्ग दोन, एक प्रज्ञ जनांचा आणि दुसरा मूढ जनांचा. प्रज्ञ पुरुषाच्या ठायी मूढता कसली ती मुळीच नसावयाची आणि मूढ मनुष्यात ज्ञानाचा मुळीच अभाव असावयाचा. प्रज्ञपुरुष सर्व दोषांपासून व श्रमांपासून विमुक्त असतो. तो जे काही करतो ते सारे रास्त असते. सर्व नीतिमत्ता त्याच्या ठायी वसत असते. मूढ मनुष्याकडून काही एक योग्य प्रकारे वर्तन घडावयाचे नाही, त्याच्या अंगी सर्व प्रकारची दुराचार प्रवृत्ती असते. त्याला वास्तवज्ञान नसते. तो अगदी उद्धत, आवेशी, निष्ठुर आणि कृतघ्न असतो. प्रज्ञपुरुष अत्यंत निर्दोष असून, सर्व वासना व निवंता यापासून निर्मुक्त असतो. तो सर्व प्रकारे सुखी असतो. मूळ मनुष्य जो आहे तो वेडा होय. कारण ज्यास आत्मज्ञान झाले नाही किंवा आपले हिताहित कशात आहे हे ज्यास कळत नाही तो वेडाच समजावयाचा.

दुराचारमग्नतेची सार्वत्रिक व्याप्ती -

स्टोइक लोकांच्या मते जी काही नीती किंवा ज्ञान आहे ते त्यांच्या विचारपद्धतीच्या अनुयायी जनांतच, इतरांत नाही. ते म्हणत की, बहुतेक मनुष्यजाती मूढ आहे आणि मूढ जन तेवढे सर्व जर निखालस दुराचारी समजावयाचे तर मग सर्व मनुष्यजाती त्यांस दुराचारात मग्न झाली आहे असे दिसल्यास काही नवल नाही. या अशा दुर्वृत्त लोकसमूहात क्वचित कोणी एखादा सत्पुरुष निपजतो. बाकी साऱ्या मानवांचे आयुष्य दुराचारात जात आहे. आम्ही सर्व कमी-जास्त मानाने दुराचारमग्न आहोत आणि या अशा स्थितीत आम्ही देहान्त होईपर्यंत खितपत राहणार आहोत. एक दुसऱ्यास दुराचारप्रवृत्त करीत आहे आणि दुराचारी मनुष्यांची संख्या एवढी मोठी आहे की, कोणी स्वसुधारणा करू म्हणेल तर त्यांच्यापुढे त्याचे काही एक चालावयाचे नाही.

दुराचारनिवृत्ती -

याप्रमाणे दोन्ही मानसिक अवस्था परस्परांपासून अत्यंत विसदृश असल्याकारणाने एकीतून दुसरीत हळूहळू बदल होऊन जाणे अर्थात् अशक्य होय. मूढता आणि दुराचार यांपासून ज्ञान आणि सदाचार याप्रत गती होत असली तरी एकातून दुसऱ्यात वास्तविक गती व्हावयाची ती एकाएकी निमिषमात्रांत होणार. मनुष्याची सदाचाराप्रत गती होईपर्यंत तो मूढावस्थेत आहे म्हणावयाचा आणि तो प्रज्ञ झाला असता प्रारंभी त्याला त्या पालटलेल्या

स्थितीचे भानही नसते. हा चित्तांत घडणारा फेरफार इतका त्वरित होतो; आणि दोन्ही अवस्थांमध्ये सादृश्य इतके कमी असते की, त्याला आपल्या ठायी फेरफार कसा घडतो हे काही कळत नाही. या पालटलेल्या स्थितीचे भान त्यास पुढे त्या स्थितीस अनुरूप अशी कर्मे हातून घडू लागली म्हणजे होते. या त्यांच्या नीतिविषयक विचारांवरून पाहता प्रत्येक व्यक्तीचे बरे-वाईट सर्व काही सृष्टिनियमांवर निखालसपणे अवलंबून आहे; परंतु या विचाराचा व्यवहारात उपयोग करताना त्यात त्यांस पुष्कळ पालट करावा लागला आहे; आणि प्रत्येक व्यक्तीस आपापल्यापरी काहीतरी करता येण्यासारखे आहे, असे त्यांनी प्रतिपादिले आहे. या त्यांच्या विचारपद्धतीत झालेल्या फेरफारांचे थोडेसे दिग्दर्शन येथे करू.

त्यांच्या नीतिविचारांत व्यवहारदृष्ट्या झालेला फेरफार

इष्ट व त्याज्य वस्तू -

त्यांच्या नीतिविषयक विचारांवरून पाहता जगात कल्याण काय ते सदाचारात आहे आणि सर्व अकल्याण दुराचारात आहे. या त्यांच्या सिद्धांतामुळे त्यास व्यवहारात पुष्कळ अडचणी येऊ लागल्या. शिवाय, सामान्य लोकांच्या समजुतीसही हा विचार पुष्कळ विरुद्ध होता. सदाचार कल्याणप्रद का म्हणून त्यास कोणी विचारले असता ते म्हणत की, जे निसर्गास अनुसरून असते तेच कल्याणप्रद होय आणि विवेकशुद्ध आचरणाशिवाय दुसरे काही एक निसर्गानुसार नाही. येथे विवेकशुद्ध आचरण म्हणजे सदाचार हे कोणाला सांगावयास नको. हा त्यांचा सिद्धांत सर्वथा निर्दोष नव्हे, हे त्यांनीच पुढे त्यात केलेल्या फेरफारावरून उघड होते. स्टोइक लोकांच्या मते स्वसंरक्षणाकडे प्राण्याची नैसर्गिक प्रवृत्ती होते. या प्रवृत्तीच्या अनुरोधाने आपल्या जीविताचे रक्षण व वर्धन होत असते. यास्तव शरीरसंबंधाच्या कल्याणप्रद गोष्टींचा व व्यापारांचा निसर्गानुसार गोष्टीत समावेश करणे त्यास नाप्राप्त होते. देहाचे आरोग्य, इंद्रियांचा योग्य उपयोग इत्यादी गोष्टी या वर्गातल्या होत. दुसरे असे की, बाह्य वस्तूंत स्वतःसिद्ध असा काही उपयुक्ततेच्या संबंधाचा भिन्न भाव नसल्यास त्यांची विवेकशुद्ध निवड होणे अशक्य होय. तेव्हा हा भिन्नभाव त्यास मान्य करावा लागे. आणखी एक असा फेरफार त्यांच्या विचारात झालेला होता की, जे मुळारंभी निसर्गानुसार असते ते म्हणजे पूर्णस्वरूप व कल्याणप्रद असे असावयाचेच असे ते मानीत नसत. मनुष्य प्रारंभी दुराचारी असतो खरा; परंतु एक वेळ त्याला नीतिनियमांचे ज्ञान झाले म्हणजे पुरे. मग तो देहादिकांची पर्वा करणार नाही. त्यांचा उपयोग त्यास, नीती व विवेक यांच्या वृद्धीस जितपत ती साधनीभूत आहेत, तितपत वाटेल, विशेष वाटणार नाही.

गौण प्रतीच्या कल्याणप्रद गोष्टी -

ही वर सांगितलेली स्थिती शक्य असे म्हणता येत नाही. यात असे होते की, एक वेळ सर्व कर्तृत्वाचा रोख निसर्गानुसार गोष्टींच्या प्राप्तीकडे असला पाहिजे असे मानावयाचे आणि

पुनः म्हणावयाचे की, जे निसर्गानुसार आहे त्याची पर्वा करू नये. हा मोठा विरोध आहे. आणखी असे म्हणावयाचे की, निसर्गानुसार गोष्टीत नेहमी कल्याण असतेच असे नाही, तर विवेकशुद्ध निवड करून निसर्गानुसार गोष्टींचा स्वीकार करावा. हाही एक जबरदस्त विरोध होय. या विरोधास्तव स्टोइक लोकांस असे मानणे प्राप्त झाले की, जेणेकरून देहाची सुस्थिती कायम राहण्यासारखी असते. त्याचा काहीतरी साक्षात उपयोग आहे खरा; आणि जेथे तेणेकरून विशेष उच्च प्रतीच्या कल्याणास अंतराय येत नाही तेथे ते इष्ट आहे म्हणून समजावे. अशा उपयुक्त गोष्टींचा समावेश ते शाश्वत कल्याणाच्या गोष्टीत करीत नसत. त्यास ते गौण प्रतीच्या कल्याणप्रद गोष्टी म्हणत.

ज्याविषयी उदासीन राहावयाचे त्या गोष्टी -

बहुतेक बाह्य गोष्टीविषयी मनुष्याने उदासीन राहावे असे ते म्हणत, तरी पण या गोष्टींत तारतम्य विचार नसावा असे ते म्हणत नसत. त्यात असलेला भिन्नभाव त्यांस संमत होता. या उदासीन गोष्टींचे ते तीन वर्ग करीत. १. पहिल्या वर्गात ज्या गोष्टी नीतिदृष्ट्या कल्याणकारक किंवा अकल्याणकारक नव्हेत, तरी ज्या काही विशेष उपयोगाच्या आहेत त्यांचा समावेश होतो. २. दुसऱ्या वर्गात ज्या गोष्टी स्वतः सिद्धपणे किंवा उच्च प्रतीच्या उद्देशाच्या संबंधाने पाहता निसर्गाविरुद्ध आणि नुकसानकारक असतात त्यांचा अंतर्भाव होतो; आणि ३. तिसऱ्या वर्गात ज्यापासून अर्थाअर्थी काही उपयोग किंवा अपकार होण्यासारखा नसतो त्या सर्व गोष्टींची गणना होते. पहिल्या वर्गात बुद्धी, चातुर्य, नीतिप्रवणता इत्यादी मानसिक गुणधर्म, सौंदर्य, शक्ती, आरोग्य, जीवित इत्यादी शारीरिक गोष्टी, संपत्ती, मान, कुलीनता, सोयरीधायरी इत्यादी बाह्य गोष्टीही येतात. दुसऱ्या वर्गात एतद्विरुद्ध गोष्टी मोडतात आणि तिसऱ्या वर्गात ज्या गोष्टींचा आपणास काही उपयोगही वाटत नाही किंवा अपकार वाटत नसल्यामुळे त्यांच्या संबंधाची आवड निवड आपणास करता येत नाही त्या साऱ्यांस घालतात. उदाहरणार्थ एखाद्याच्या डोकीवर जी केसांची संख्या आहे ती सम आहे की विषम आहे. एखादा कागदाचा मळकट तुकडा मी उचलावा की तो जागच्या जागी राहू द्यावा, कोणाचे देणे देताना मी पेटीतल्या सर्व सारख्याच असणाऱ्या नाण्यांतले कोणते उचलावे इत्यादी प्रकार या वर्गातले होत.

विरोध -

ज्या गोष्टी नीतिदृष्ट्या नेहमी कल्याणप्रदच असतात, त्या कोणत्याही स्थितीत उपयोगाच्या व आवश्यक असतात; परंतु नीतिदृष्ट्या ज्यांविषयी आपण उदासीनच राहिले पाहिजे, त्यांतल्या अत्युतम गोष्टीसुद्धा कित्येक प्रसंगी अगदी अकल्याणकारक होतात आणि त्यांपैकी कित्येक अत्यंत अनिष्ट मानलेल्या गोष्टी काही स्थितीमध्ये उपयोगाच्या होतात. उदाहरणार्थ आजार, दारिद्र्य वगैरे ही कधी कधी कल्याणकारक होतात; परंतु

या त्यांच्या वर्गीकरणामुळे त्यांच्या नीतीसंबंधी तात्त्विक विचारात विरोध येतो. कारण कल्याणकारक व अकल्याणकारक अशा दोन वर्गांमध्ये आणखी तिसरा संदेहात्मक वर्ग ते कल्पितात असे होते. वास्तविक पाहता या तिसऱ्या वर्गास मुळी त्यांच्या नीती विचारांत अवकाशच नसावा. सारांश काय की. आपल्या तत्त्वविचारांचा व्यवहारात उपयोग करताना आपल्या मूळ सिद्धांतास अगदी विरुद्ध अशा कित्येक गोष्टी त्यास मान्य कराव्या लागल्या, हे साहजिक आहे.

कर्तव्यविचार -

मनुष्याचे वास्तविक कर्तव्य म्हटले म्हणजे विवेकशुद्ध आचरण होय. हे विवेकशुद्ध आचरण शुद्ध हेतूने केले असता कल्याणप्रद होते. कर्तव्य म्हणजे केवळ सद्वर्तन होय. कल्याण आणि विवेक हे कर्तव्य शब्दाचे अपर पर्याय होत. हा झाला तात्त्विक विचार. व्यवहारात ते कर्तव्याचा दुसरा एक गौण प्रकार मानीत. या वर्गात जे इष्ट असून, कल्याणप्रद असते त्याचा अंतर्भाव होतो. यावरून पाहता कर्तव्याचे दोन वर्ग झाले. एका वर्गातली कर्तव्ये शाश्वत व कधी न बदलणारी असून, ती केल्यावाचून गती नाही. दुसऱ्या वर्गातली कर्तव्ये जरूर पडेल तशी करावी. ही कर्तव्ये कित्येक गोष्टींचे संपादन व अव्हेर करणे जसजसे अगत्य पडेल तसतशी उद्भवतात. या प्रकारच्या कर्तव्यास प्रासंगिक कर्तव्ये म्हटले असता चालेल.

क्षम्य वृत्ती -

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे स्टोइक लोकांनी आपल्या अत्यंत कठोर तत्त्वविचारास व्यावहारिक स्वरूप देण्याचा प्रयत्न करताना आणखी एक गोष्ट कबूल केली आहे ती ही की, त्यांच्या तत्त्वविचारांच्या अनुरोधाने पाहता सर्व सुखदुःखविषयक वृत्तीचे निःशेष निर्मूलन केले पाहिजे. या अशा वृत्तीहीनतेस ते "विरक्तता" म्हणतात. अशी विरक्तता ज्याच्या अंगी पूर्णपणे विकास पावेल तोच धन्य होय, अशी त्यांची समजत असे; परंतु व्यवहारामध्ये या त्यांच्या समजुतीत बराच पालट झालेला दिसतो. हा पालट दोन प्रकारे दृष्टोत्पत्तीस येतो. एक असा की, ज्या कित्येक वृत्ती ते निषिद्ध मानीत त्याच निराळ्या नावाने त्यांस संमत असत. दुसरा असा की, जरी ते वृत्ती निषिद्ध मानीत तरी काही मनोभाव त्यांस इष्ट वाटत. पहिल्या प्रकाराचे उदाहरण असे आहे की, प्रज्ञपुरुषास पीडा होते व कित्येक गोष्टींच्या संबंधाने तो अगदी उदास राहत नाही. तसेच मनुष्याने सर्व मनोभावापासून निर्मुक्त राहावे असे नाही, तर त्यास वश होऊन मात्र जाऊ नये इतकेच, असा त्यांचा अभिप्राय असे. आता दुसऱ्या प्रकाराचे उदाहरण असे की, काही विवेकशुद्ध मनोभाव आहेत. ते वृत्तीहून सर्वथा भिन्न आहेत आणि ते केवळ प्रज्ञपुरुषातच आढळावयाचे. या अशा मनोभावाचा विकास अवश्य झाला पाहिजे, असे ते मानीत.

प्रज्ञपुरुषाचा अभाव -

आपण सांगता तसा प्रज्ञपुरुष व्यवहारात कोठे असल्यास दाखवा असे स्टोइक लोकांस म्हटले असता ते गोंधळून जात. कारण त्यांनी सांगितलेल्या लक्षणांचा प्रज्ञपुरुष समग्र मनुष्य जातीच्या इतिहासातही सापडणे कठीण. स्टोइक लोकांचेही उद्गार अशाच अर्थाने आहेत. त्यांच्या मते सॉक्रेटिस, डायॉजिनीस, ॲन्टिस्थेनीस इत्यादी महापुरुषही पूर्णपणे नीतिमान नव्हते, तर ते केवळ नीतिमार्गानुवर्ती होते. अशी जर वास्तविक स्थिती आहे, तर मग मनुष्य जातीचे प्रज्ञ व मूढ असे दोन वर्ग करण्यात काय अर्थ आहे? या जगात प्रज्ञ तर कोणीच नाही. तेव्हा अर्थात सर्व मनुष्यजाती मूठ वर्गातली होय. शिवाय त्यांचा सिद्धांत जो की, सर्व मूढ जन सारखेच मूढ होत व सारे प्रज्ञपुरुष सारखेच प्रज्ञ होत, तो सहसा सत्य नव्हे.

उन्नती -

हा या सिद्धांताचा सदोषपणा स्टोइक लोकांच्या नजरेस येऊन व्यवहारामध्ये तो त्यांस पालटावा लागला. यास्तव वाईट लोकांत कमी-जास्त वाईटपणा असतो व चांगल्या लोकांतही कमी-जास्त चांगुलपणा असतो आणि मनुष्याची हळूहळू सुधारणा होत जाऊन तो प्रज्ञपुरुषाच्या स्थितीप्रत पावतो, असे ते मानीत. जर मनुष्य सर्व वृत्तींपासून मुक्त होऊन आपली सर्व कर्तव्ये योग्य प्रकारे बजावू लागला, कोणत्या गोष्टी आपणास आवश्यक आहेत हे जर त्यास कळू लागले आणि या अशा स्थितीपासून तो पतित होण्याची जर त्यास भीती नसली, तर तो प्रज्ञपुरुषाच्या स्थितीस पोहोचला म्हणून समजावे. मग त्याच्या ठायी अनुभव नसला किंवा त्यास त्या स्थितीची प्रतिती घडली नाही, तरी चिंता नाही, असे ते प्रतिपादित. कारण ते म्हणत की, कालमर्यादेच्या दीर्घत्वाने सुखवृद्धी होत नाही आणि प्रज्ञपुरुषासही प्रथमतः आपल्या प्रज्ञत्वाविषयीचे भान नसते. आता प्रज्ञपुरुष स्वस्थितीपासून च्युत होण्याचे भय आहे किंवा कसे याविषयी स्टोइक लोकांत मतभेद होता. कोणी म्हणत की, पूर्ण सदाचारी पुरुष कदापि भ्रष्ट होणे नाही आणि काहीकांचे मत असे की, तो सन्मार्गभ्रष्ट होण्याचा संभव आहे.

व्यवहार -

आतापर्यंत जे विवेचन झाले ते केवळ त्यांच्या नीतिविषयक सिद्धांताचे झाले. व्यवहारामध्ये या सिद्धांताचा उपयोग कसा काय करावयाचा याचे निरूपणही येथे करणे उचित दिसते. कारण स्टोइक लोकांच्या सर्व नीतिविषयक विचारांचा कटाक्ष व्यवहाराकडे असे. त्यांच्या मते मनुष्याचा एकंदर आयुष्यक्रम नीतिनियमांनी पूर्णपणे बद्ध असावा. यास्तव व्यवहारातील मुख्य मुख्य गोष्टीस त्यांनी आपले नीतिसिद्धांत लावले आहेत. असे केल्यामुळे त्यांच्या बहुतेक सिद्धांताचा कठोरपणा जाऊन त्यात पुष्कळ फेरफार झाला आहे. असो. आता त्यांच्या व्यवहारनीतीचा विचार करताना प्रथमतः व्यक्तिविषयक नीतीचे

स्वरूप सांगू, नंतर सामाजिक नीतीचे दिग्दर्शन करू आणि शेवटी मनुष्याचा एकंदर विश्वाशी कसा काय संबंध त्यांनी कल्पिला होता, ते पाहू.

व्यक्तिमहात्म्य -

स्टोइक लोक व्यक्तिनिष्ठ, नित्याचरण व कर्तव्यविचार यांच्याकडे विशेष लक्ष देत. सौख्य काय ते मनुष्याच्या अंतःस्थितीवरच अवलंबून आहे. बाह्योपाधीपासून त्यास बिलकूल अंतराय होणे नाही, असा ज्याअर्थी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ सिद्धांत असे, त्याअर्थी त्यांनी मनुष्याच्या नैतिक आचरणाचा प्रधानत्वेकरून विचार करणे साहजिक होते. मानवी समाजाचा जो विचार त्यांनी केला आहे तो केवळ प्रत्येक व्यक्तीचा समाजाशी काहीतरी नैतिक संबंध असतो म्हणून. हा असा व्यक्तिनिष्ठ कर्तव्यविचार स्टोइक लोकांनी पुष्कळपणी केला आहे. तो येथे विशेष तपशीलवार देणे इष्ट दिसत नाही.

याप्रकरणी आणखी अशी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे की, त्यांच्या नीतिविचारान्वये अंतर्बाह्य गोष्टीत मोठा भिन्न भाव असून, केवळ अंतर्यामीच्याच काय त्या गोष्टी आवश्यक होत. बाह्य गोष्टींविषयी मनुष्याने निखालसपणे उदासीन राहावे असे असल्यामुळे त्याचप्रमाणे सद्धेतूंव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीही मातब्बरी नाही आणि सर्व गोष्टींपासून मनुष्याने अगदी स्वतंत्र व अलिप्त राहावे, असे असल्यामुळे त्यांच्या या तत्त्वविचारात मनातील विचारानुरूप इंद्रियद्वारा होणाऱ्या कृतीस मुळीच अवकाश नसे. इंद्रियाकडून होणाऱ्या कर्माचा ते फारसा विचार करीत नसत. सर्व कृतींचे प्रेरक जे मन त्याच्याच व्यापारांकडे ते विशेष लक्ष देत. या त्यांच्या मतामुळे पुष्कळ गोष्टींच्या निर्णयात घोटाळा उत्पन्न होत असे. ज्या गोष्टीत मनुष्याचा हेतू स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येत नसे, अशा गोष्टींच्या नैतिक स्वरूपाविषयी काही एक निर्णय त्यास देता आला नाही म्हणजे त्यांची गणना ते उदासीन वर्गात करीत असत.

समाजसंबंध -

जरी व्यक्तिमहात्म्य त्यास विशेष वाटत असे तरी मनुष्यामनुष्यामधले संबंधही त्यांस महत्त्वाचे वाटत. ते असे म्हणत की, मनुष्य जसजसा अधिकाधिक नीतिमान होत जातो तसतसा त्याचा समाजाकडे विशेष ओढा होत जातो. विवेक आणि तत्प्रेरित इच्छा यांच्या पलीकडे अपेक्षणीय काही नाही, असे प्रतिपादन करून ते मनुष्याचा बाह्य जगाशी मुळीच संबंध नाही, असे कंठरवाने म्हणत. तेव्हा अर्थात इतर जनांशीही त्यांचा संबंध नसावा, असे होते; परंतु व्यक्तिस्वातंत्र्याच्या विधानावरूनच समाजव्यवस्था त्यास संमत होती असे उन्नत होते आणि त्याबरोबर प्रत्येक व्यक्तीने आपल्या इष्ट हेतूची सिद्धी एकीकडे ठेवून आधी सामाजिक हित साधण्यास तत्पर असावे असे ठरते. कारण उघडच आहे की, विवेकशुद्ध आचार विचार म्हटला म्हणजे तो सार्वत्रिक नियमास अनुसरून असला पाहिजे आणि हा सार्वत्रिक नियम सर्व विवेकी प्राण्यांस समान आहे. यास्तव सर्व विवेकी प्राण्यांचा वर्तनहेतू

एकच असून, ते एकाच नियमाने बद्ध होत. सर्वांनी स्वतःस एकमेकांचे निकटसंबंधी समजले पाहिजे. तस्मात् मनुष्याने स्वत:पुरता विचार करून राहू नये, तर त्याने समाजाचाही अवश्य विचार करावा. समाज करून राहण्याची वांच्छा जी आहे तिचा उद्भव विवेकशक्तीतच आहे. या विवेकाच्या योगेकरून त्यास असे वाटू लागते की, आपण मनुष्यजातीरूप प्रचंड कुटुंबातील एक व्यक्तीच आहोत म्हणून या कुटुंबाच्या कल्याणासाठी झटावे, केवळ आपल्या कल्याणाचाच तेवढा विचार करून राहू नये. ज्या वस्तू परस्परसदृश असतात त्यांचा ओढा परस्परांकडे असणे स्वाभाविक आहे. सर्व मानवी प्राण्यांच्या ठायींची विवेकशक्ती जी आहे ती समानच असल्याकारणाने मनुष्य परस्परांशी अत्यंत निकट स्नेहाने बद्ध आहेत, हे उघड आहे. विवेकयुक्त व्यक्तीच्या ठायी या सजातीयत्वाची प्रतीती झाली म्हणजे मग तिच्या ठायी समाजस्थितीची स्पृहा सहजी उद्भुत होते. सारांश काय की, सर्व मानव विवेकाचे दास असल्याकारणाने त्यांचा सत्क्रम म्हटला म्हणजे एकच होय आणि ते एकाच नियमाने बद्ध होत. या नियमानुसार त्यांच्याकडून वर्तन घडले म्हणजेच ते सार्वत्रिक सौख्याचे संपादक होतात. दुसरे असे की, इतर सर्व काही विवेकी प्राण्यांसाठी अस्तित्वात आले आहे आणि विवेकी प्राणी परस्परांच्या हितासाठी निर्माण झाले आहेत. यास्तव त्यांचे सामाजिक संबंध केवळ निसर्गसिद्ध होत. न्याय्य वर्तन जे करावयाचे ते मानवेतर प्राण्यांशी संभवत नाही व ते स्वतःशीही साध्य नव्हे,[३६] तर ते इतर मनुष्यांशीच करता येण्याजोगे आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या व्यक्तींनी एकजूट करून परस्परांच्या साहाय्याने उद्योग केल्यावाचून निसर्ग कह्यात येणे नाही. कोणी जर म्हणेल की, मी आपला एकटाच काय होईल तो प्रयत्न करीन, तर तो त्याचा प्रयत्न अगदी निष्फळ आहे, असे त्याच्या अनुभवास लागलीच येईल.

मार्कस ऑरेलियस याची जी पुढे बोधवचने दिली आहेत त्यामध्ये विवेकी प्राण्यांच्या परस्परसंबंधाचे विधान जागोजाग आढळेल.

न्याय आणि दया -

आपले सहचर जे इतर मानव त्यांच्याशी वर्तन करताना मुख्य दोन कर्तव्यांकडे लक्ष दिले पाहिजे. एक त्यांच्याशी न्यायाने वागले पाहिजे आणि दुसरे त्यांच्यावर दया केली पाहिजे. या उभय कर्तव्यांचा विचार त्यांच्या मूळ सिद्धांतानुसार त्यांनी केला असल्याकारणाने त्या कर्तव्यास अत्यंत परस्पर विसदृश्य स्वरूप प्राप्त झाले आहे. एकपक्षी ते असे म्हणतात की, प्रज्ञपुरुषाने अगदी न्यायशुद्ध वर्तन ठेवावे. असे करताना कोणाची दया करू नये व कोणत्याही वावग्या गोष्टीकडे कानाडोळा करू नये. या त्यांच्या मतामुळे त्यांच्या नीतिशास्त्रपद्धतीस अत्यंत कठोर व निष्ठुरपणाचे स्वरूप आले आहे. दुसऱ्या पक्षी सर्व मनुष्यजाती नैसर्गिक स्नेहसंबंधाने बद्ध झाली आहे, असे त्यांचे मत असल्यामुळे दानधर्म, परोपकार, सौम्यपणा, लीनता, परहितबुद्धी, सहनशीलता इत्यादी गोष्टी अत्यंत इष्ट व परम कर्तव्य समजत.

मित्रत्व -

सर्व मनुष्ये जरी एकमेकांच्या सहवासाने राहावी असा निसर्गाचा हेतू आहे तरी त्यांना आपला विवेकरूप निसर्ग आणि स्वजीवित सार्थक्य यांचे परिज्ञान झालेले असते. तेच मुख्यत्वेकरून एकमेकांच्या सहवासाने राहताना दिसतात. म्हणजे अर्थात हा सहवास प्रज्ञपरुषांचाच संभवतो. जे प्रज्ञ असून नीतिमान असतात ते परस्परांचे मित्र होत. कारण उघडच आहे की, जीवितविषयक समजुती त्यांच्या समानच असतात आणि त्यांच्या ठायी परस्पर सद्वर्तनाविषयी प्रेम वाटत असते. प्रज्ञपुरुषाच्या प्रत्येक कृत्याने इतर सर्व प्रज्ञपुरुषांस सुख होते. उदाहरणार्थ, एका प्रज्ञपुरुषाने विवेकशुद्धरीतीने नुसते आपले एक बोट हलविले असता जगातील एकंदर प्रज्ञपुरुषांस काहीतरी सुख प्राप्त होतेच होते. सारांश काय की, खरे मित्रत्व असे प्रज्ञपुरुषांचेच संभवते. याच कारणास्तव मित्रत्वाची स्टोइक लोकांनी कल्याणप्रद गोष्टींत गणना केली आहे; परंतु ते ज्या गोष्टी बाह्यतः कल्याणप्रद असतात त्यापैकी एक होय. यास्तव त्याच्या संपादनार्थ मनुष्यास बाह्य जगावर काहीसे अवलंबून राहावे लागते. अंतर्यामीच्या मनोवृत्तीवरच जरी ते अवलंबून असते तरी ते ज्यांच्याविषयी उद्भवते ते कोठेतरी बाह्य जगात अस्तित्वात असणे अवश्य होय. दुसरे असे की, तेणेकरून परस्पर संबंध आवश्यक होतो. एरवी मित्रत्वच मुळी शक्य नाही. म्हणून ते बाह्य आचरणात व्यक्त होणे अवश्य होय. यावरून पाहता व्यक्तिमात्राच्या निखालस स्वातंत्र्यास बराच व्याघात होतो.

कुटुंब आणि राज्य -

प्रज्ञपुरुषांचे जे परस्परमित्रत्व तेवढ्यापुरतीच फक्त समाजस्थिती संभवते, असा स्टोइक लोकांचा समज नव्हता. ते म्हणत की, न्याय व नियम यांच्या योगेकरून सुयंत्रपणे चाललेल्या समाजात आपल्या सहचरांच्या सहवासाने राहण्यासाठी मनुष्य ज्याअर्थी निर्माण झाला आहे त्याअर्थी त्यांस राजकीय व्यवस्थेपासून कसे विलग राहता येईल? नित्याचरण जे आहे ते केवळ विचारतरंगात मग्न होण्यात जर संभवत नाही, तर मग लौकिकात वागून लोककल्याणाचे वर्धन व अनिष्ट प्रकारांचे निर्मूलन करण्याची संधी व्यर्थ दवडण्यास कोण तयार होईल? लौकिक कायदे जे आहेत त्यांच्या योगाने लोकहित वाढते आणि जानपदांचे सर्वप्रकारे रक्षण होते. त्याचप्रमाणे त्यांच्या योगेकरून मनुष्यमात्राचे नित्याचरण व सौख्य वाढते, तर मग त्यास प्रज्ञपुरुष चांगले व कल्याणप्रद म्हणणार नाही काय? अशीच गोष्ट विवाहसंबंधाचीही आहे. मनुष्याने गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून अवश्य राहावे असे ते म्हणत.

आता राज्यव्यवस्थेच्या संबंधाने स्टोइक लोकांचे विचार फारसे ठाम झालेले नव्हते, तरी पण इंग्लंडातील हल्लीच्या अधिकारत्रयात्मक राज्यव्यवस्थेसारखा काहीतरी प्रकार असावा

असे ते म्हणत. प्रज्ञपुरुषास राजा होण्याची संधी आल्यास त्याने तिचा अव्हेर करू नये, असे त्यांचे मत होते. त्याला स्वतःला राज्याधिकार प्राप्त होण्यासारखा नसला तरी चांगल्या राजांच्या दरबारी राहून त्यास योग्य सल्लामसलत देण्यास नेहमी तयार असावे, असे त्यांचे मत होते. तरी प्रज्ञपुरुषाने याप्रमाणे केवळ एकाच राष्ट्रापुरता विचार करू नये. त्याने या पृथ्वीतलावरील एकंदर मनुष्ये आपले बांधव समजून एकंदर जगद्रूप राष्ट्रातील आपण रहिवासी आहोत,* असे पक्के ध्यानात बाळगावे. आणखी असे की, मनुष्याने नेहमी उद्योगी असावे हे जसे त्याचे कर्तव्य आहे, तसेच त्याने आपल्या बुद्ध्यादी मानसिक शक्तींचा नेहमी विकास व विनियोग करीत असावे, म्हणजे अर्थात तत्त्वविचारांची त्याने सदोदित उपस्थिती ठेवावी.

जगद्रूपराष्ट्राचे जानपदत्व -

स्टोइक लोकांच्या पूर्वी प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे मोठमोठे तत्त्ववेत्ते जरी होऊन गेले होते, तरी सर्व ग्रीक लोकांस साधारण जो परराष्ट्राविषयींचा द्वेष, तो त्यांच्या अंतर्यामींचा समूळ नष्ट झाला नव्हता. त्यांचे विचार फक्त आपल्या राष्ट्रापुरतेच असत. हा परराष्ट्राविषयींचा द्वेषभाव किंवा दुजाभाव स्टोइक लोकांच्या ठायी मात्र आढळत नाही. त्यांच्या मते शहाण्या मनुष्याने एकाच राष्ट्रविशेषास चिकटून राहून अर्थ नाही, तर सर्व जगत् त्याने एकराष्ट्र आहे असे मानावे. ते म्हणत की, सर्व मानवांच्या ठायी वसणाऱ्या समान विवेकास्तव जर समाजघटना आवश्यक झाली आहे, तर मग ही समाजघटना एका विवक्षित राष्ट्रापुरतीच का म्हणून मानावी? आमचा संबंध काही मनुष्यांशी मात्र निकट आहे, इतरांशी नाही असे कल्पिण्यास काय आधार आहे? वास्तविक पाहता सर्व मनुष्यांच्या ठायीचा विवेक समान असल्याकारणाने त्यांचा परस्पर संबंध सारखाच निकट आहे. सर्व मानव मिळून एकच जनसमूह होय. कारण त्यास एकाच निसर्गाने निर्माण केले असून, त्यांची घटकतत्त्वे व जीवितहेतू हीही समानच होत. यास्तव मनुष्य म्हणून जेवढा तेवढा आमच्या परोपकार बुद्धीचा विषय होय. मग मो कोणीही व कोठलाही असो. मनुष्य कसाही असला तरी इतर मनुष्यांच्या प्रेमास व न्यायवर्तनास तो पात्रच असतो. सर्व मनुष्यांस आपण जगद्रूप एका महाराष्ट्राचे** जानपद आहोत असे वाटण्यासाठी अहर्निश झटले पाहिजे. एकएका राष्ट्राचे हित साधण्यापुरते कायदेकानू किंवा राज्यपद्धती सुरू करण्याच्या खटपटीत पडण्यात हंशील नाही, तर आपण एका कुटुंबातील असून, आपणास विवेकाने वागले पाहिजे, अशी समजूत सार्वलौकिक करण्याविषयी झटावे. मनुष्य या बाह्य जगावरून दृष्टी काढून आपले अंतर्याम

---

*अशी विश्वकल्याणार्थ इच्छा प्रत्येक सत्पुरुषात आढळते हे नक्की!

**सुस्पष्टपणे महा राष्ट्र वा बृहद्राष्ट्र असा उल्लेख नसल्याने स्टॉईकांनी महाराष्ट्रात कार्य उभे केल्याचा आभास होतो.

तपासून पाहील, तर त्यास असे स्पष्ट दिसेल की, सर्व मानव तेवढे येथून तेथून सारखेच असून, आपण विश्वाशी अगदी अभिन्न आहोत आणि विश्वाचा जो निसर्ग व अंतिम हेतू तोच आपला होय.

मानव आणि निसर्गक्रम -

मनुष्याच्या विवेकाशी सदृश असा शुद्ध व पूर्णस्वरूप विवेक अखिल विश्वाचे नियमन करीत आहे आणि मानवाने आपले वर्तन विवेकशुद्ध ठेवून तो इतरांच्या ठायी असलेला ओळखावा हे जसे त्याचे कर्तव्य आहे, तसेच आपला विवेक समग्र विश्वविवेकाचा व सृष्टिक्रमाचा अंकित करणे हेही त्याचे कर्तव्य होय. मनुष्याने सर्व प्रकारे विश्वक्रमावर भार टाकून स्वस्थ व्हावे. जे जे म्हणून काही व्यक्तिश: दृष्टोत्पत्तीस येत आहे ते सारे सर्वसाधारण कार्यकारण परंपरेमुळे संभवले आहे आणि एकंदर कार्यकारणसंबंध विश्वनियमानुसार आहे. तेव्हा या अशा महाप्रचंड सृष्टिक्रमास सर्वस्वी शरण जाण्याखेरीज गती नाही.[३७] ही स्थिती जरी अपरिहार्य आहे तरी ती नुकसानकारक नव्हे. कारण ज्या सृष्टिनियमास आपण वश होणार आहोत तो केवळ विवेकरूपच होय. सर्व स्थितीमध्ये आपण दैवावर अवलंबून राहणे भाग आहे. हा दैवावलंब प्रज्ञपुरुषाकडून निसर्गतःच होतो. त्यास त्यात काही कष्ट होत नाहीत. सारांश; सौख्य व स्वातंत्र्य ही प्राप्त होण्याचा मार्ग मिळून इतकाच की, जे निसर्गतः प्राप्त होईल त्याहून अधिकाची अपेक्षा करू नये[३८] अशा रीतीने सर्व भार निसर्गावर टाकला असता चित्तास स्वास्थ्य व सौख्यही प्राप्त होतात. ही निसर्गाधीनता, सौम्यपणा, मित्रत्व, कर्तव्यबुद्धी आणि निसर्गानुसार जीवितक्रम ही एवढी ज्याला साध्य झाली तो सदाचारी झाला अशी स्टोइक लोकांची समजूत होती.

आत्महत्या -

कित्येक वेळा असा दैवयोग येतो की, मनुष्य अगदी दुर्वह स्थितीमध्ये पडतो. असे झाले असता त्याने आत्महत्या करावी.[३९] प्रज्ञपुरुष वाटेल तेव्हा देहत्याग करण्यास तयार असतो. बाह्योपाधीपासून स्वतंत्र राहण्याचा हा एक उपायच होय. या मताप्रमाणे मुख्य मुख्य स्टोइक तत्त्वज्ञान्यांनी वर्तन केले आहे. झिनो, क्लिअन्थिस, ॲन्टिपेटर, केटो वगैरे स्टोइक तत्त्वज्ञान्यांनी आत्महत्या केली आहे. याप्रमाणे स्वप्राणनाश करण्याचे एकच कारण स्टोइक लोकांच्या मते समर्पक होय ते हेच की, आपल्या स्वाधीन नसणाऱ्या स्थितीमुळे जीवितधारण असह्य होते तेव्हा प्राणत्याग करावा. सेनिकाच्या मते तर आपल्या आयुष्यक्रमात थोडीशी चलबिचल होऊन चित्ताची शांती नष्ट झाली असता देहत्याग करण्यास हरकत नाही. वृद्धावस्थेत येणारी अशक्तता, असाध्य रोग, मानसिक शक्तींचा हास, उत्कट दारिद्र्य, दुष्ट राजाचा जुलूम इत्यादी ज्या गोष्टी आपल्या हातच्या नव्हेत, त्या प्राप्त झाल्या असता मनुष्याने खुशाल देहत्याग करावा. दुसऱ्या एका स्टोइक तत्त्वज्ञाच्या मते मनुष्याने आत्मघात करण्यास

पुढील पाच कारणांपैकी कोणतेही एक पुरे. ती कारणे ही - १. आपल्या देशासाठी प्राणाची आहुती देणे अवश्य झाले असता, २. अनन्वित कर्म करणे अपरिहार्यत्वेकरून भाग पडले असता, ३. अत्यंत दुःसह दारिद्र्य आले असता, ४. निरंतरची रुजा पाठीस लागली असता; आणि ५. मानसिक शक्तींचा हास होऊ लागला असता. एकंदरीत काय की, स्टोइक लोकांना जन्म व मृत्यू ही इतर बाह्य गोष्टींप्रमाणेच तुच्छ वाटत. सेनेका म्हणतो की, तत्त्वज्ञ जो आहे तो मृत्यूचा स्वीकार; प्रवासास निघताना जसे एखादे तारू पाहावे किंवा राहावयास एखादे घर पाहावे त्याप्रमाणे करतो. भोजन आटोपले असता उठणे व समय आला असता जीवित त्याग करणे, यात तो काही एक भेद मानीत नाही. जीर्ण झालेल्या वस्त्रांचा जसा त्याग करावा तद्वत तो कोणत्याही प्रकारे नालायक ठरलेल्या देहाचा परित्याग करतो.

आता येथे त्यास असे विचारणे आहे की, जीविताविषयी असे उदासीन राहणे शक्य आहे काय? आणि कधी न फिरणाऱ्या सृष्टिनियमानुसार प्राप्त झालेल्या स्थितीचा याप्रमाणे अव्हेर करणे, हे सर्व भार विश्वक्रमावर टाकून स्वस्थ राहावे, असा जो बोध ते करतात त्यांस विरुद्ध नाही काय? या दोन्ही प्रश्नांचे उत्तर त्यांस नीटसे देता येणार नाही. हा विरोध उत्पन्न होण्याचे कारण उघडच आहे की, एकपक्षी ते व्यक्तिस्वातंत्र्याचे प्रतिपादन करीत आणि दुसऱ्यापक्षी सष्टिक्रमाधीन मनष्य सर्वस्वी आहे असे म्हणत. या दोन्ही गोष्टी परस्पर विरुद्ध आहेत हे उघड सृष्टिक्रमाधीन मनुष्य सर्वस्वी आहे असे म्हणत. आहे.

धर्मसंबंधी विचार

स्टोइक लोकांचे तत्त्वविचार जे आतापर्यंत सांगितले त्यावरून वाचकांच्या एक गोष्ट लक्षात आलीच असेल की, त्यांच्या सर्व विचारांस केवळ धर्मस्वरूप* आले होते. त्यांच्या पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांप्रमाणे ते धर्मविचारांचा. तत्त्वविचारांत अव्हेर करीत नसत. सर्व विश्व एका देवापासन उद्भवले असून, ते शेवटी त्याच्याच ठायी लीन होणार हा त्यांचा सिद्धांत पूर्वीच सांगितला आहे. त्याचप्रमाणे हा देव सर्व चराचराचे नियमन कधी न पालटणाऱ्या नियमाने करीत असून, त्याचा प्रभाव सर्वत्र दिसत आहे, असे ते प्रतिपादित. शिवाय त्यांच्या नीतिविचारांचा पायाही सर्वस्वी सृष्टिगत ईश्वरी नियमांवर असून, केवळ विवेकशुद्ध असे. म्हणजे अर्थात तद्नुसार वर्तन ठेवल्याने देवाच्या आज्ञेप्रमाणे वागल्याचे श्रेय आले, असे ते म्हणत. सर्व मानवजाती हे एक राष्ट्र असून, प्रत्येक मानव या महाराष्ट्राचा जानपद आहे. ही अत्यंत उदात्त कल्पना तरी त्यांना सुचण्याचे कारण इतकेच दिसते की, सर्व मानवांचा देवाशी निकट संबंध असून, एकाच विवेकरूप नियमाने ते बद्ध आहेत, असा त्यांचा दृढ समज

---

*स्टोइकांचा काळ सरकत असतानाच ख्रिस्ताचा उदय होऊन तिकडे ख्रिस्ती धर्म फोफावला असे म्हणता येईल की त्यासाठी आवश्यक असलेली धर्मनीतीची पूर्वतयारी स्टोइकच करीत होते.

असे. या सर्व गोष्टींवरून पाहता त्यांची तत्त्वविचारपद्धती केवळ धर्मविचारपद्धतीरूप होय. त्यांच्या वेळेच्या सुमारास ग्रीक व रोमन लोकांत ज्ञानाचा विशेष फैलाव झाल्याकारणाने प्राचीन वेडगळ धर्मपद्धतीवरून ज्या सुशिक्षित लोकांचा विश्वास उडत चालला होता त्यांस या स्टोइक लोकांच्या विचारात पुष्कळ ग्राह्यांश आहे असे वाटून त्यांनी त्याचा स्वीकार केला. स्टोइक लोकांच्या वेळी जे धर्मविचार प्रचलित होते, ते त्यांस जरी मुळीच संमत नसत तरी त्यावरून सामान्य लोकांची श्रद्धा उडणे त्यास हिताचे वाटत नसे. ते म्हणत की, देवाच्या भीतीने मनुष्य आपले आचरण चांगले ठेवतो,[४०] तरी पण देवासाठी मंदिरे बांधणे व त्यांची मोठ्या थाटामाटाने पूजाअर्चा करणे त्यांस अत्यंत निषिद्ध वाटत असे. देवाच्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेणे व चित्त शुद्ध ठेवणे यातच खरी ईश्वरभक्ती आहे असे ते म्हणत. देवाची प्रार्थना करण्यात काही एक अर्थ नाही. कारण देव नेहमी दयामय असल्यामुळे त्यास आमच्या सर्व गरजा कळत आहेत. आपले आचरण शुद्ध ठेवले म्हणजे पुरे, दुसरे काही एक करावयाला नको. मोठमोठाले यज्ञयाग, व्रते, उद्यापने वगैरे धर्माचारांच्या खटपटीत मनुष्याने पडण्याची मुळीच गरज नाही.

देवांचे अनेकत्व -

सर्व विश्वाचा आत्मा असा जरी एकच देव आहे, तरी त्याच्यापासून आणखी दुसऱ्या दैवी विभूती उत्पन्न होणे साहजिक आहे. हे देव अर्थात बहुतेक अंशी मानवाप्रमाणेच असून, त्यांच्यासारखेच अल्पायुषी होते. शाश्वत आणि अनाद्यनंत असा एकच देव होय. त्यांच्या मते आकाशाच्या ठायी जे असंख्य देदीप्यमान तारे दिसतात ते सारे देव होत. प्लेटोचेही मत असेच होते. ताऱ्यास देव म्हणण्याचे कारण ते असे सांगत की, ते तेज:पुंज आहेत इतकेच नव्हे, तर त्यांच्या गती अगदी नियमित असून, त्यांचे घटकावयव अत्यंत शुद्ध तत्त्वांचे आहेत आणि तितक्या प्रमाणाने त्यांच्या ठायी ज्ञानतत्त्वाचाही अंश विशेष आहे. त्याचप्रमाणे वर्षे, ऋतू, महिने यास ते देवरूप मानून पूज्य मानीत असत. वायू, अग्नी, पाणी, पृथ्वी यांसही ते देव मानीत. प्राचीन काळी होऊन गेलेले महापुरुषही त्यांस देवासमान वाटत. एकंदरीत काय की, जेवढ्या म्हणून नैसर्गिक शक्ती व व्यापार त्यांस कल्याणप्रद वाटले त्यांस ते देव म्हणत.

मरणोत्तर आत्म्याची काय स्थिती होते, ते ते निश्चयाने काही एक सांगत नसत. इतके मात्र ते म्हणत की, महाप्रलयाच्या वेळी सर्व काही विश्वात्म्याच्या ठायी लीन होणार. त्यावरून उघड होते की, आत्म्याचे अमरत्व त्यास संमत नव्हते.

उपसंहार -

येथवर स्टोइक लोकांच्या तत्त्वविचारांचे, नीतिविचारांचे व धर्मविचारांचे संक्षेपतः निरूपण केले. हे मननपूर्वक वाचले असता मार्कस ऑरेलियसची बोधवचने समजण्यास फारशी अडचण पडेल असे वाटत नाही. ज्या काळी ही स्टोइक लोकांची मते ग्रीस प्रदेशात प्रथमत: प्रचारात आली तो काळ त्या देशाच्या अगदी नष्टचर्याचा होता. मेसिडीनियाचे महापराक्रमी

बादशहा जे फिलिप आणि अलेक्झांडर यांनी ग्रीस देशाचे स्वातंत्र्य नष्ट केल्यामुळे ग्रीक लोकांच्या ठायीचे बहुतेक उत्तम गुण जात चालले होते. पुढे रोमन लोकांनी तो देश काबीज केला तेव्हा तर त्यांच्या सर्व वैभवाचा अंत झाला. याप्रमाणे ग्रीक लोक परवशतारूप महागर्तेमध्ये बहुतेक अक्षयीचे खितपत पडले असता त्यांचा उद्धार करण्याचा प्रयत्न प्रारंभी सांगितलेला, स्टोइक मताचा प्रथम प्रवर्तक झिनो याने केला. आपल्या काळच्या लोकांची अनाचारापासून व दास्यत्वापासून मुक्तता करण्याचा त्याने एक नवाच उपाय योजला तो हाच की, बाह्य संकटे व विपत्ती आपणास टाळता न आली तरी चित्ताची अक्षय व अढळ शांती ते शुद्ध झाल्याने प्राप्त होईल आणि मग मनुष्य बाह्योपाधीस मुळीच जुमानणार नाही. दुसरे असे की, तत्त्वविचाराचा मुख्य हेतू जो या विश्वाच्या रहाटीसंबंधाने उद्भवणाऱ्या नानाविध गूढ प्रश्नांचे समाधान करण्याचा, तो स्टोइक लोकांच्या वेळेपर्यंत चांगलासा साध्य झाला नसून पुढेही तो साध्य होणे कठीण आहे, असे ध्यानात आणून केवळ मनुष्याच्या सदाचरणापुरता तत्त्वविचार करावा म्हणजे पुरे, असे झिनो आणि त्याचे अनुयायी यांस वाटले. हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे व्यावहारिक स्वरूप लोकांस विशेष पसंत पडून त्यांचे अनुयायी पुष्कळ मोठमोठे बुद्धिवान लोक झाले. वर सांगितल्याप्रमाणे रोमन लोकांनी ग्रीस देश काबीज केल्यावर स्टोइक लोकांचा संबंध रोमन लोकांशी पुष्कळ झाला. रोमन लोकांतही त्या वेळी चोहोकडे पुष्कळ अनाचार माजला होता आणि ज्याला म्हणून आपल्या राष्ट्राची स्थिती चांगली व्हावी असे वाटे त्यास हा अनाचार कसा मोडेल याची रात्रंदिवस काळजी असे. पुढे स्टोइक लोकांची मते त्यांस ऐकावयास व पाहावयास मिळाल्यावर त्यास असे वाटणे साहजिक होते की, लोकांस दुराचारापासून परावृत्त करण्यास या मतांच्या प्रसारासारखा दुसरा चांगलासा उपाय नाही. म्हणूनच रोमन लोकांत या मतांचे लोक पुष्कळ झाले. मार्कस ऑरेलियस बादशहाला जे स्टोइक मतांचे ज्ञान झाले ते अशाच लोकांकडून होय, हे त्याच्या चरित्रावरून व्यक्त होतच आहे. शिवाय या मतांचा रोमन बादशाहीत चोहोकडे प्रसार होत चालला असता ख्रिस्ती धर्माचे अनुयायी स्वमतांचा उपदेश रोमन लोकांना मोठ्या जारीने करीत होते. त्यांनी या स्टोइक लोकांच्या नीतिविषयक बऱ्याच मतांचा स्वीकार केलेला दिसतो. खुद्द येशू ख्रिस्त मिसर देशात असता त्यास स्टोइक मतवाद्यांचे विचार पुष्कळ ऐकावयास मिळाल्यावरून त्याचीही तशीच वृत्ती झाली होती. त्याचे चरित्र आणि झिनो, क्लिआन्थीस, सेनिका वगैरे स्टोइक तत्त्वज्ञांची चरित्रे यामध्ये फारसा फरक दिसत नाही. सारांश काय की, स्टोइक मतांचा खिस्ती धर्मावर पुष्कळ परिणाम झालेला आहे.

स्टोइक तत्त्वविचारपद्धतीच्या संबंधाने शेवटी अशी एक गोष्ट सांगावयाची की, या पद्धतीचे पौर्वात्य व त्यातून मुख्यतः आर्य विचारपद्धतीशी* बरेच साम्य आहे. अलेक्झांडर

---

*झिनोविषयी फारशी माहिती सुस्पष्टपणे दिली नाही. आर्यपेक्षा 'वैदिक धर्मपद्धतीशी' असे वाक्य व्यवस्थित झाले असते.

बादशहाने इराण, मिसर व हिंदुस्थान इत्यादी देशांवर स्वाऱ्या केल्या. तेव्हा त्याच्या लष्कराबरोबर पुष्कळ ग्रीक पंडित होते, हे ते इतिहासप्रसिद्ध आहे. पुन: बादशहा स्वत: ॲरिस्टॉटलनामक महा ग्रीक पंडितांचा शिष्य असल्याकारणाने त्याला स्वतःलाही विद्येचा दर्द होता. या गुणास्तव तो जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने विद्वान लोक हुडकून काढून त्यांचा चांगला आदर केला व कित्येकांस तर आपल्याबरोबर तो घेऊनही गेला, असा इतिहास आहे. यामुळे निरनिराळ्या देशाच्या तत्त्वविचारांचे एकीकरण अथेन्स येथे होण्यास मार्ग झाला. या एकीकरणाचे फळ प्रथमतः स्टोइक मतांच्या रूपाने प्रकट झाले. कारण ॲरिस्टॉटलच्या नंतर नाव घेण्यासारखा तत्त्ववेत्ता ग्रीस देशात झिनोच झाला. झिनोनंतर कोणी मोठासा तत्त्ववेत्ता तेथे झाला नाही. जे झाले ते बहतेक सर्व त्याचेच अनुयायी झाले. पुढे तर ग्रीक देशाचे सर्व वैभव आटोपून रोमनगरी सर्व विद्यांचे मुख्य पीठ झाली. याच सुमारास मार्कस ऑरेलियस हा होऊन गेला. त्याच्या मनावर या स्टोइक मतांचा केवढा अंमल झाला होता हे त्याच्या चरित्रावरून व बोधवचनांवरून स्पष्ट होतच आहे. तात्पर्य काय की, खुद्द राजदरबारातही ज्या मतास अनुयायी मिळाले त्याचा प्रभाव सामान्य जनांवर केवढा झाला असला पाहिजे, हे येथे कोणालाही सांगावयास नको.

संदर्भ :

१. ही न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदान्त होत. यास षडशास्त्रे म्हणजे सहा शास्त्रे असेही म्हणतात. यांचे प्रणेते अथवा उत्पादक अनुक्रमे गौतम किंवा अक्षपाद, कणाद किंवा कानभक्ष, कपिल, पतंजली, जैमिनी व बादरायण व्यास हे होत.

२. हा त्यांचा विश्वास भ्रममूलक आहे असे त्याच्यानंतर झालेल्या बहुतेक नीतिशास्त्रप्रणेत्यांनी दाखविले आहे. केवळ अमूक एक गोष्ट नीतीची आहे किंवा अनीतीची आहे एवढे स्पष्टपणे कळल्यानेच मनुष्याकडून नित्याचरण घडत नाही, तर त्यास मनोनिग्रह आणि अभ्याससातत्य इत्यादी इतर गोष्टींचे साहाय्य लागत असते. ते केवळ ज्ञानाने प्राप्त होणारे नव्हे.

३. आमचा जगत् शब्दही याच सिद्धांताचा सूचक आहे. 'गच्छति तत् जगत्' (म्हणजे, जे चालत आहे ते जगत्) अशी त्याची व्युत्पत्ती आहे.

४. आमच्या वेदान्त्यांचीही कल्पना अशीच आहे; परंतु स्टोइक लोकांची देवाच्या स्वरूपाची कल्पना केवळ जडरूप होती. वेदान्त्यांच्या मते परब्रह्म निराकार, निर्गुण, निर्विकार असे आहे.

५. आधुनिक तत्त्ववेत्त्यांच्या मते परमाणुसंघ, स्नेहाकर्षणादी काही विवक्षित शक्तींच्या योगाने झाले असल्याकारणाने व विशिष्टगुरुत्व, विशिष्ट उष्णता इत्यादी इत्यादिकांच्या योगाने त्यांस भिन्न स्वरूप प्राप्त झाले आहे. ही स्टोइक लोकांची

वायू प्रवाहाची कल्पना, पदार्थ विज्ञानसंमत अशा परमाणूंच्या ठायींच्या ज्या व मध्योसारिणी मध्याभिगामिनी नामक दोन गती त्यांशी सदृश होय.

६. ही केवळ त्यांची भ्रांती होती. आता एवढे खरे की, मानसिक व्यापार जसे कित्येकांच्या मते केवळ अमूर्त होत, तसे ते वास्तविक नव्हेत. आधुनिक जीवनेंद्रिय शास्त्राच्या साहाय्याने मानसिकशास्त्राचे शोध करणारे बेन स्पेन्सर पाश्चात्य तत्त्वज्ञ असे प्रतिपादन करतात की, देहात मज्जातंतूची जी व्यवस्था आहे. तिचे जे व्यापार तेच मनोव्यापार होत. तिचा ज्या प्राण्यांमध्ये जितका अधिक विकास होतो तितक्या मानाने त्याची मानसिक उन्नती झालेली साधारणतः आढळते.

७. आधुनिक तत्त्वज्ञांच्या मते जगद्व्यापारात ज्या निरनिराळ्या शक्ती अनुभवास येतात त्यांचा उगम एकाच शक्तीपासून झाला आहे. हर्बर्ट स्पेन्सर यांचे तर असे म्हणणे आहे की, ही शक्ती आणि जड पदार्थ ही परस्परांहून नसून तिसऱ्याच एका वस्तूपासून उद्भवली आहेत. ही तिसरी वस्तू काय आहे त्याचे ज्ञान मानवांस अगम्य होय. या वस्तूस दयामय, सर्वज्ञ इत्यादी विशेषणे देण्यात काही अर्थ नाही. तिच्या ठायी आरोपित केलेल्या गुणांची प्रतीती मानवास कधीही होणे नाही.

८. कित्येक आर्य तत्त्ववेत्ते यांस प्रकृती आणि पुरुष म्हणतात.

९. आमच्या आर्य तत्त्वज्ञांच्या मते ही तत्त्वे पाच आहेत. ते आणखी एक आकाशतत्त्व जास्त मानीत. ही ग्रीक व आर्य तत्त्वज्ञांची तत्त्वांची कल्पना अलीकडील रसायनशास्त्रात ज्यांची अगदी अल्पमात्र गती झाली आहे, त्यांससुद्धा अत्यंत असत्य आहे असे कळण्यासारखे आहे. रसायनशास्त्राच्या शोधावरून असे निर्विवाद सिद्ध झाले आहे की, या भूतलावर आज कमीत कमी पासष्ट तत्त्वे आहेत. जी पृथ्वी पूर्वी एकतत्त्व मानली जात असे ती पुष्कळ तत्त्वांच्या परस्पर मिश्रणाने सिद्ध झाली आहे, असे निर्विवाद स्थापित झाले आहे. त्याचप्रमाणे उदक जे पूर्वी एकतत्त्व मानले असे, त्याचे पृथक्करण करून ते आर्द्रवायू व प्राणवायू अशा दोन तत्त्वांचे बनले आहे, असे ठरविले आहे. वातावरणातला वायू, जो पूर्वी स्वतंत्र मानत असत त्यातही प्राणवायू व नत्रवायू अशी दोन तत्त्वे आहेत, असे सप्रयोगांनी सिद्ध केले आहे. तेज हे स्वतंत्र तत्त्व आहे किंवा कसे याविषयी वादच आहे. पुष्कळांच्या मते तेज म्हणून काही स्वतंत्र वस्तू नसावी, असे आहे. आकाश जे दिसते ते तर मुळी काहीच नाही, तर तो केवळ वातावरणाचा रंग होय.

१०. विश्वाच्या उत्पत्तीविषयी अप्रबुद्ध जनांनी आजपर्यंत पुष्कळ प्रकारचे तर्क केले आहेत. प्राचीन तत्त्ववेत्ते व धर्मवत्ते यांस ज्या कल्पना सुचल्या त्या ज्यांनी लोकांमध्ये बेलाशक प्रवृत्त केल्या. पण त्या साऱ्या निराधार होत. आधनिक यथार्थज्ञानाच्या साहाय्याने शास्त्रज्ञांनी जी कल्पना सयुक्तिक म्हणन मानली आहे. तिचे येथे थोडक्यात

निरूपण करतो. प्रारंभी सर्व विश्व केवळ धूममय होते. या धूमाचा अवशेष अजूनही आकाशात दृग्गोचर होतो. या धूमास क्रमाक्रमाने परमाणुगत मध्योत्सारिणी व मध्यभिगामिनी नामक शक्तिद्वयांच्या योगाने गती प्राप्त होऊन त्याचे लहान मोठे पुंज झाले. हे निरनिराळे पुंज गुरुत्वाकर्षण शक्तिस्तव परस्परांस आकर्षिते झाले, आणि निरनिराळे धूमपुंजसमूह अस्तित्वात आले. यांची साधारणतः हल्ली दिसणाऱ्या धूमकेतूप्रमाणे आकृती प्रारंभी बनली. ह्या धूमकेतूत फेरफार होऊन त्यास ताऱ्यांचे रूप आले. हल्लीचे तारे आणि आमचा सूर्य हे पूर्वी धूमकेतूच्या अवस्थेतच होते; आणि हल्ली दिसणारे धूमकेतू ही कालांतराने ताऱ्याचे रूप पावतील. आता आपल्या सूर्याभोवती फिरणाऱ्या ग्रहगणाची उत्पत्ती अशी झाली आहे की, हा प्रचंड धूममय सूर्यगोल स्वतःच्या सभोवती फिरत असल्याच्या योगाने त्याच्या पृष्ठभागाचा काही भाग अलग होऊन त्याचे कडे झाले. या कड्यास पुढे क्रमाक्रमाने गोलरूप प्राप्त होऊन ते सूर्याभोवती फिरू लागले. अशी कडी वेळोवेळी सूर्यापासून सुटून त्यांचे हे पृथ्वी, गुरु, शुक्र वगैरे ग्रह झाले आहेत. या ग्रहांपैकी जे मोठे होते, त्यांच्यापासूनही अशीच कडी निघून त्यांचे उपग्रह झाले आहेत. चंद्र हा आमच्या पृथ्वीपासून निघालेले एक कडेच होय. ही कडी मूळारंभी कशी असतात याची प्रचीती पाहिजे असल्यास शनीच्या सभोवार सध्या असणारी कडी पाहावी. आता हे सारे ग्रह प्रथम तेजःपुंज होते; परंतु पुढे हळूहळू त्यांची उष्णता नष्ट होऊन त्यांचा स्वयंप्रकाश नाहीसा झाला. आमच्या पृथ्वीचा पृष्ठभाग थंड होऊन तो प्राणी वस्तीलायक होण्यास लक्षावधी वर्षे लागली आहेत. हल्लीही तिची उष्णता एकसारखी कमी होत आहे. यावरून शास्त्रज्ञ लोक असे अनुमान करीत आहेत की आमची पृथ्वी कालेकरून प्राणिजीवनास अयोग्य अशी होईल आणि शेवटी शेवटी सूर्यात पडून भस्मसात होईल! पण हा प्रलय आणखी लक्षगणित वर्षांनी प्राप्त व्हावयाचा.

११. ही कल्पना युरोपात गॅलिलिओ, कोपर्निकस वगैरे ज्योतिषशास्त्रवेत्ते निर्माण होईपर्यंत कायम होती आणि आमच्या इकडे तर बहुतेक जुन्या शास्त्री-पुराणिकांत ती अजून आहे. आधुनिक ज्योतिषशास्त्राच्या अनुरोधाने पाहता पृथ्वी हा सूर्यासभोवती फिरणारा एक लहानसा ग्रह आहे. आकाशात जे अनंत तारे दृग्गोचर होत आहेत तेवढे निरनिराळे सूर्य होत. आमचा सूर्य आपल्या बुध-गुरू मंगलादी ग्रहांसह सर्व विश्वाशी तोलून पाहिला असता एखाद्या प्रचंड वालुकामय प्रदेशातील वाळूच्या एका कणाप्रमाणे आहे.

१२. हा शब्द वाचकांस जरा घोटाळ्याचा वाटेल; पण तो येथे योजल्यावाचून गती नाही. स्टोइक लोकांच्या सर्व तत्त्वज्ञानाचा हा केवळ मूलाधारभूतच आहे. याचा पर्याय म्हटला म्हणजे ज्ञानतत्त्व होय. आर्यतत्त्ववेत्त्यांच्या मते हे ज्ञानतत्त्व सर्व वस्तुजातात

स्थित आहे. विवेक ही ज्ञानानंतरची मनाची अवस्था आहे. आता या कल्पनेवर असा आक्षेप आधुनिक तत्त्वज्ञांनी घेतला आहे की, ज्ञान व विवेक हे मनाचे धर्म आहेत आणि मन जे आहे ते फक्त प्राणिकोटीमध्ये कमी जास्त मानाने दृष्टोत्पत्तीस येते. त्याचा उद्भव, विकास व क्षय ही प्राणिशरीराच्या निरनिराळ्या स्थितीवर अवलंबून असतात. शिवाय ज्ञान किंवा विवेक ही प्राणी देहाव्यतिरिक्त अस्तित्वात असणे मानवाच्या अनुभवास सर्वथा विरुद्ध होय. यास्तव विश्वाचा विवेक किंवा ज्ञानतत्त्व हे सर्व विश्व एक मोठा प्रचंड प्राणी आहे, असे ठरल्यावाचून संभवत नाही.

१३. विश्वाचे कल्याण कसे काय होणार याविषयी स्टोइक लोक काही एक सांगत नसत. उत्क्रांतिमतवाद्यांच्या मते हे जगत् सुधारत चालले आहे. यास्तव प्रत्येक व्यक्तीने आपल्या अंगच्या योग्य शक्तीचा विकास व विनियोग करावा एवढेच त्याचे कर्तव्य होय.

१४. बापड्या स्टोइक लोकांना ठाऊक नव्हते की, देहाच्या सुस्थितीवर मनाची सुस्थिती अवलंबून असते आणि मनाच्या सुस्थितीवाचून नित्याचरण चांगलेसे घडणे नाही.

१५. निसर्ग म्हणन काहीतरी मनोव्यापारयुक्त शक्ती आहे असे स्टोइक लोक कल्पित. देव आणि निसर्ग यात ते अभेद मानीत; परंतु देहावाचून मनोव्यापार संभवत नाहीत, या संबंधाचा उल्लेख मागे एका टिपेत आला आहे.

१६. ही कल्पना अगदी खोटी आहे. आधुनिक पदार्थविज्ञानावरून असे कळते की, पृथ्वीच्या गर्भात जसजसे खाली जावे तसतशी उष्णता वाढत जाते. यास्तव तिच्या पोटात जी द्रव्ये आहेत ती अत्यंत विरलावस्थेत असली पाहिजेत. त्याचप्रमाणे या पृथ्वीगोलासारखे वरवरून निवालेले गोल इतर तारकरूप सूर्यासभोवती सहस्रशः परिभ्रमण करीत असतील. शिवाय आपल्या या सूर्यासभोवती फिरणारे गुरू, मंगळ वगैरे ग्रह आमच्या पृथ्वीप्रमाणेच घनावस्थेत असून, कित्येक तिच्याहून पुष्कळ मोठे आहेत.

१७. ताऱ्यांच्या स्वरूपाची ही कल्पना आमच्या आर्यांच्या कल्पनेसारखीच होय; परंतु ती अगदी खोटी आहे. आमच्या पृथ्वीची जी घटकतत्त्वे आहेत तीच बहुतेक त्यांची असून ते केवळ धूममय आहेत. आमची पृथ्वीही याच अवस्थेत एक वेळ होती. तिच्या पृष्ठभागाची उष्णता बरीच कमी झाल्यामुळे तिला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. (१० व्या क्रमांकाची विश्वाच्या उत्पत्तीच्या संबंधाची टीप पाहा.)

१८. मानवेतर प्राण्यांच्या ठायी विवेकयुक्त आत्मा (विचार करण्याची शक्ती) नाही अशी जी स्टोइक लोकांची कल्पना होती ती सर्वथा सत्य नव्हे. कारण निरनिराळ्या प्राण्यांत निरनिराळ्या प्रमाणाने विवक दिसून येतो, असे प्राणिशास्त्रवेत्ते सांगतात. आता एवढे खरे की, मनुष्याच्या ठायी त्या शक्तीचा विकास इतर प्राण्यांहून विशेष झाला आहे;

परंतु अगदी रानटी स्थितीतला मनुष्य आणि स्पेन्सरासारखा अत्यंत बुद्धिवान मनुष्य यांच्यामध्ये जितका बुद्धिमत्तेच्या संबंधाने फरक दिसून येतो तितका रानटी मनुष्य आणि ओरँग ओटॅग नामक पुच्छहीन वानरात दिसून येत नाही.

१९. देवच मुळी ज्यापक्षी साकार त्यापक्षी त्यापासून उद्भवलेला जो आत्मा तोही साकार मानणे साहजिक होते. आता या आत्मस्वरूपाच्या संबंधाने पहिला प्रश्न असा आहे की, आत्मा विवेकमय असतो म्हणजे काय? विवेक ही मनाची शक्ती आणि तिची वृद्धी किंवा क्षय देहाच्या सुस्थितीवर अवलंबून आहे. मन म्हणून तरी काही स्वतंत्र व्यक्ती देहात आहे असे मानण्यास काही प्रमाण नाही. या प्रकरणी डॉ. बेन यांचे मानसशास्त्रावरील ग्रंथ पाहण्यासारखे आहेत. त्यातूनही विशेषत: 'शरीर व मन यांचा संबंध' या नावाचा त्यांनी केलेला ग्रंथ वाचला असता या वादात पुष्कळ मदत होण्यासारखी आहे. एकंदर वादाचा इत्यर्थ मिळून इतकाच आहे की, जे जे गुण आत्म्याचे म्हणून सामान्य लोक मानतात ते केवळ मनाचे होत; आणि मनोव्यापारांचा देहाच्या स्थितीशी सर्वस्वी संबंध आहे. देहातील मज्जातंतूंची जी व्यवस्था आहे तिचा मनोव्यापाराशी अत्यंत निकट संबंध असून, मनोव्यापार म्हणजे मज्जातंतूंचेच व्यापार होत, असे सिद्ध करण्याकडे आधुनिक मानसशास्त्रवेत्त्यांची प्रवृत्ती आहे.

२०. आत्म्याचा शरीरात सर्वत्र संचार आहे अशी जी स्टोइक लोकांची व आर्यांचीही कल्पना होती ती अगदी निराधार आहे. शरीरातील एकंदर व्यापाराचे नियमन मज्जातंतूंच्या योगेकरून होते. या सर्व मज्जांचे नियमन पाठीच्या कण्यात व डोक्यात असलेल्या मज्जेकडून होते. शरीराच्या एकंदर भागात चालक व ज्ञानवाहक असे दोन प्रकारचे मज्जातंतू असतात. ते बहुतेक विजेच्या वेगाने डोक्यात बातमी पोहोचवून निरनिराळ्या प्रसंगास योग्य प्रकारचे व्यापार भिन्नभिन्न अवयवांकडून घडवितात. ही मज्जातंतूची शरीरस्थ अवस्था बिचाऱ्या स्टोइक लोकांच्या वेळी ठाऊक झाली नसल्यामुळे ते भ्रमात पडून आत्म्याचा सर्व शरीरात संचार आहे असे त्यांनी विधान केले. तेव्हा अलीकडील शोधाप्रमाणे त्यांच्या या साकार आत्म्यास मज्जातंतू व्यापार म्हणण्यास फारसा प्रत्यवाय दिसत नाही.

२१. वेदान्त्यांचीही कल्पना अशीच आहे, तरी ती सर्वथा मिथ्या होय. सर्व मनोव्यापारांचे अधिष्ठान मेंदूत आहे असा आधुनिक शास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे. आत्म्याचे स्थान छातीत आहे, असे मानण्याचे कारण असे दिसते की, सर्व जीवनाचे आधारभूत हे रुधीर त्याचे अभिसरण करणारा मुख्य अवयव जे हृद ते येथे असून, त्याचे सतत स्फुरण होत असते. (असं वेदान्तात स्पष्टपणे म्हटलेले नाहीये.)

२२. वाचेचा उद्भव येथून मुळीच होत नाही, तर तो गळयाच्या वर जे वाचेचे इंद्रिय म्हणून आहे त्यातून होतो.

२३. हृदयापासून रक्तवाहिन्या निघाल्या असून, त्यातून सर्व शरीरास रक्त पोहोचते. त्यात वायुप्रवाह मुळीच नाही; परंतु प्राणोत्क्रमणानंतर त्या बहुतेक रिकाम्या असतात. त्यामुळे प्राचीन काळाच्या लोकांचा असा समज झाला की, त्यात जिवंतपणी वायू संचार करतो. तथापि प्रथमत: गेलन याने त्या लोकांची ही चूक दाखवून दिली. तेव्हापासून हा प्राचीन काळचा भ्रममूलक समज नाहीसा झाला आहे.

२४. ही मनोव्यापारांविषयीची स्टोइक लोकांची कल्पना भ्रममूलक होय. मनुष्याच्या कर्तृत्वप्रेरक इच्छेत जो नेहमी फेरफार होत असतो त्याची पुष्कळ कारणे आपणास निश्चितपणे सांगता येण्यासारखी आहेत, असा आधुनिक मानसशास्त्रवेत्त्यांचा सिद्धांत झाला आहे. लॉक, जेम्स मिल्ल, जॉन स्टुअर्ट मिल्ल, मि. हर्बर्ट स्पेन्सर, डॉ. बेन इत्यादी मानसशास्त्रप्रणेत्यांचे ग्रंथ या सिद्धांताचे प्रतिपादक आहेत. मनाचे एकंदर व्यापार बाह्य सृष्टी व आनुवंशिक संस्कार यांच्या योगाने उद्भवत आहेत, हे मत अजूनही कित्येक स्वतउद्भुतप्रेरणावादींस संमत नाही, तरी पण या भ्रामक मताचे प्रतिपादक उत्तरोत्तर कमी होत चालले आहेत.

२५. आतापर्यंतच्या टिपांवरून वाचकांच्या ध्यानात आलेच असेल की, आत्मा म्हणून काहीतरी देहामध्ये वास करीत असते, असे निश्चयाने सांगता येत नाही. मग तो देह सोडून जातो व दुसऱ्या कोठेतरी वास करतो असे तरी कसे खास म्हणवेल? कित्येक देहात्मवाद्याचे असे म्हणणे आहे की, जर मनोव्यापाररूप आत्म्याची देहावसानानंतर स्वतंत्र स्थिती संभवते तर बहुतेक तितक्याच महत्त्वाचा जो शरीरातील पचनव्यापार तोही कोणीतरी स्वतंत्र व्यक्ती असून देहविसर्जनानंतर कोठेतरी राहिला पाहिजे, असे म्हणावे लागते. त्याचे या प्रकरणी असे मत आहे की, जरी जीविताच्या संभवाच्या व स्वरूपाच्या संबंधाने आपणास अजून निश्चयात्मकपणे काही कळलेले नाही, तरी घड्याळाच्या चक्रांची वगैरे योग्य प्रकारे रचना झाली असता जसे ते चालू होते तद्वत ही प्राणी शरीराची रचना विशेष प्रकारे झाली असता ते जीवमान होते असे म्हणण्यास बाध नाही. घड्याळ जे बंद पडते ते जसे काही रचना विस्कटल्यामुळे तसेच देहामध्येही जीवनास प्रतिकूल असा काहीतरी फेरफार होऊन देहाचे व्यापार बंद होतात. आतून कोणी जात नाही किंवा कोणी त्यात प्रवेश करीत नाही. या सिद्धांताच्या मंडनाकडे आधुनिक तत्त्वज्ञांची प्रवृत्ती आहे.

२६. या सिद्धांतावर स्टोइक लोकांच्या सर्व नीतीचा पाया आहे, असे म्हटले असता चालेल; परंतु निसर्ग म्हणजे काय याचा खलासा त्यांनी कोठेही केलेला आढळत नाही. वस्तूच्या ठायी असणाऱ्या गुणधर्मानसार तिच्या स्वतःच्या व ज्या इतर वस्तूंशी तिचा संबंध घडतो त्यांच्या स्वरूपात जो पालट होतो त्यास निसर्ग म्हणण्याचा त्यांचा कल दिसतो. स्वेच्छपणे व्यापार करणारे प्राणी व मानवसुद्धा स्वनिसर्गानुसार

वर्तन करतात. किंबहुना मनुष्याच्या ज्या व्यापारास कृत्रिम म्हणण्याचा साधारणतः परिपाठ आहे, ते व्यापारसुद्धा स्टोइक लोकांच्या मते नैसर्गिक होत; परंतु येथे विरोध असा आहे की, समग्र वस्तूंचे निसर्ग परस्परांशी सुसंबद्ध असून, एकाच सार्वत्रिक उद्देशाचे साधक आहेत असे जे स्टोइक लोकांचे म्हणणे आहे ते व्यवहार पाहता सत्य आहे असे भासत नाही. उदाहरणार्थ, व्याघ्रादी हिंस्र पशुंचा निसर्ग हरिणादी सौम्यवृत्ती प्राण्यांच्या निसर्गास व्याघात करणारा भासतो आणि मनुष्य तर जसजसा इतर सर्व वस्तुजाताचा निसर्ग आपल्या कह्यात आणून इष्ट वस्तूंचे संपादन व अनिष्ट वस्तूंचे निर्दालन करीत आहे, तसतसा त्यास अधिकाधिक सुखानुभव घडत आहे. फार कशाला, त्याच्या स्वतःच्याच वन्य स्थितीतल्या निसर्गाचे जसजसे तो दमन करत चालला आहे तसतसा तो समाजस्थितीस अधिकाधिक लायक होत चालला आहे आणि तितक्या मानाने त्यास सौख्य व दीर्घायुष्यही प्राप्त होत आहेत. सारांश काय की, सर्व निसर्ग एकरूपच असता तर त्यात असा प्रचंड विरोध आढळता ना. येथे कोणी असे म्हणेल की, विवेकशुद्ध निसर्ग जो आहे तोच फक्त कल्याणप्रद होय. हे म्हणणे काहीसे सयुक्तिक दिसते खरे. तथापि अशाने वर सांगितलेला विरोध तिळप्रायही कमी होत नाही. हे जर खरे आहे तर ज्या वस्तूंच्या ठायी हा विवेक नसेल त्या साऱ्यांचा निसर्ग योग्य प्रकारचा नव्हे असे होते. मग समग्र विश्वाचा जो निसर्ग तद्नुसार वर्तन ठेवावे म्हणून जे स्टोइक लोक म्हणत त्याचा अर्थ काय? विश्वातील मानव खेरीज करून इतर सर्व वस्तूंत मुळी विवेकच नाही आणि मानवांपैकीही तो केवळ प्रज्ञपुरुषांत पूर्णत्वेकरून वसत असतो असे ते प्रतिपादित; परंतु हे प्रज्ञपुरुष जगात कोठेही आढळणे नाही, असे तेच म्हणत. मग नित्याचरणाचे नियमन करताना निसर्गानुसार वर्तन ठेवावे, या त्यांच्या विधानात स्वारस्य ते काय? दुसरे असे की, आधुनिक मानसशास्त्रवेत्त्यांच्या मते विवेक आणि निसर्ग यांचे मनुष्य हृदयात नेहमी युद्ध चालले आहे. मनुष्याच्या ठायी अशा पुष्कळ नैसर्गिक प्रवृत्ती आनुवंशिक संस्कारामुळे व इतर अपरिहार्य बाह्य संबंधांमुळे उद्भवलेल्या असतात, की त्याचे दमन व नियमन झाल्यावाचून कल्याण कसले ते मनुष्यास प्राप्त होणे नाही. तेव्हा निसर्गानुसार जेवढे आहे तेवढे सारे परम कल्याणरूप होय, या विधानात म्हणण्यासारखे तथ्य नाही. या प्रकरणी जॉन स्टुअर्ट मिल यांचा 'नेचर' नामक निबंध वाचण्यासारखा आहे.

२७. असे मानल्याने कार्यकारणसंबंधाचा विचारच मुळी लोपला समजावयाचा. सदाचरणाचा इतर सर्व प्रकारच्या आचरणाप्रमाणे देहावर परिणाम अवश्य घडला पाहिजे. कोणत्याही आचरणास सत् किंवा असत् जे म्हणावयाचे ते त्याच्या परिणामावरून होय, असा आधुनिक नीतिशास्त्रवेत्त्यांचा निर्विवाद सिद्धांत झाला

आहे. निसर्गानुसार जेवढे आहे तेवढे सत् असे जे स्टोइक लोकांचे म्हणणे होते, त्यावर प्रश्न असा आहे की, निसर्गानुसार आचरणास सत् म्हणण्याचे कारण काय? त्याचा शरीरावर व मनावर काहीतरी परिणाम घडतोच की नाही? मग तो वाईट प्रकारचा परिणाम घडला असता त्यास कोणी सत् म्हणतात काय?

२८. या जगातील सर्व वस्तू एकमेकांच्या संसर्गाने असल्याकारणाने परस्परांचा परस्परांवर काही ना काहीतरी परिणाम होतच आहे. शिवाय प्रत्येक वस्तूचे गुणधर्म व बाह्य जगाच्या संबंधाने असणारी तिची स्थिती व काल ही इतर वस्तूंच्याहून भिन्न असल्याकारणाने तिचे दुसऱ्यावर होणारे परिणाम व बाह्य जगाचे तिजवर होणारे परिणाम अद्वितीय असावयाचे. या सिद्धांताप्रमाणे पाहता जगात विलक्षण वैचित्र्य असून, स्वत:सिद्ध व निरपेक्ष असे काही एक नाही हे सिद्ध आहे. तस्मात सदाचरणाची योग्यता स्वतःसिद्ध आहे, या विधानात काही एक जीव नाही.

२९. हे म्हणणे सर्वथा सत्य नव्हे. बहुतेक नीतिशास्त्रवेत्त्यांचा याच्या उलट सिद्धांत आहे. मनुष्याच्या आचरणावर या गोष्टींचा पुष्कळ प्रकारे परिणाम होत असतो, हे थोडासा विचार केला असता कोणासही कळणारे आहे.

३०. अशा प्रकारचा सुखानुभव कधीही प्राप्त होणे नाही व तो इष्टही नव्हे. एकाच स्थितीमध्ये मनुष्य अविरतपणे असला तर त्यास त्या स्थितीचे भानही उरत नाही, हे प्रमाणसिद्ध आहे आणि जेथे भान नाही तेथे सुख कशाचे? यास्तव निरंतरचे स्वास्थ्य चित्तास प्राप्त झाल्याने ते स्वास्थ्य आहे असेच मळी वाटणे नाही. मग ते सौख्यकारक कसे म्हणावे? दुसरी एक गोष्ट येथे अशी लक्षात ठेवली पाहिजे की, मनुष्याची उन्नतावस्था चित्ताच्या व्यापारात आहे. त्याच्या सतत स्वास्थ्यात नाही. उलट ज्याप्रमाणे मेंदूस सतत चेतना झाल्याने त्यास मोठी इजा होऊन उन्माद प्राप्त होतो तद्वत सतत स्वास्थ्यानेही त्यास मोठी इजा होऊन तो केवळ शिथिल होऊन बुद्धिव्यापार मंद होतील.

३१. मनुष्याच्या हातून घडणाया व्यापारांचा किंवा त्याच्यावर बाह्य सृष्टीच्या घडणाऱ्या व्यापाराचा त्याच्या मनावर काहीच परिणाम होत नाही असे कोण म्हणेल? सर्व बऱ्या-वाईट व्यापारांचा उगम मनुष्याच्या इच्छेत आहे. ही इच्छा देहास घडणाऱ्या सुख-दुःखाच्या अनुभवाने व विचाराने प्रेरित होते हे निर्विवाद आहे आणि सर्व वृत्तींचा उद्भव सुख-दुःखात आहे. याकरिता वृत्तींचा तर अवश्य विचार झाला पाहिजे.

३२. या असत मानलेल्या वृत्तीचे नि:शेष निर्मलन करण्याचा बोध सर्वथा हितकारी नव्हे. त्या फार तर उद्दाम होऊ देऊ नयेत. त्यांचे योग्य प्रकारे दमन व नियमन केले म्हणजे पुरे. त्या हृदयातून अगदी काढून टाकल्या असता मनुष्याचे जीवित केवळ कष्टमय होऊन त्याची लवकरच इतिश्री होईल.

३३. हे वर्गीकरण अलीकडील नीतिशास्त्रवेत्त्यास सयुक्तिक वाटणार नाही.

३४. ही समजूत कोणाही विचारी मनुष्यास खरी वाटणारी नव्हे. एखाद्याच्या ठायी मद्य, अफू, गांजा वगैरे कैफी पदार्थांचे सेवन करण्याचा दुर्गुण नसला तरी तो अप्रामाणिक, मत्सरी, खुनशी, वेश्यागामी असू शकेल. त्याचप्रमाणे याच्या उलट प्रकार समजावा.

३५. या म्हणण्यात काही तथ्य नाही. सदाचरणाची मनुष्यास नसती इच्छा होऊन काय उपयोग? अशी इच्छा अत्यंत दराचारी मनष्याससद्धा वेळोवेळी होते; परंत मनोनिग्रहाभावास्तव त्याच्या हातन अनन्वित कर्मे होतात. केवळ सत्कर्मेच्छा झाल्याने सत्कर्माच्या परिणामाचा अनुभव कोणासही घडणे नाही हे निर्विवाद आहे आणि परिणामानुभवावाचून कोणत्याही गोष्टीस सत् किंवा असत् कसे म्हणता येईल?

३६. ही स्टोइक लोकांची न्यायबुद्धीची मर्यादा अगदी संकुचित होय. मानवेतर प्राण्याशी व त्याचप्रमाणे मनुष्याने आपल्या स्वतःशी न्यायाने वागू नये. अथवा तसे वागता येणे नाही ही समजूत खोटी व अन्यायाची आहे. ज्या पश्चादी प्राण्यांस आपण आपल्या कामी लावून आमच्या संसारात अनेक प्रकारे त्याजकडून साहाय्य घेतो त्याचे योग्य प्रकारे संगोपन न करणे हा अन्याय होय आणि त्यांची योग्य प्रकारे जोपासना करून त्यांच्याकडून शक्तीबाहेर काम करून न घेणे, त्यास पोटभर अन्न देणे, त्यास एखादा रोग झाला असता जपणे, हे न्याय्य होय. शिवाय मनुष्य केवळ जिव्हेच्या स्वादासाठी जो नित्यशः लक्षावधी प्राण्यांचा संहार करीत आहे तो कोण विचारी पुरुष न्याय्य म्हणेल? मेंढरे, गुरे वगैरे गरीब साबळ्या जनावरांचा इतर अनेक प्रकारे मनुष्यास उपयोग होत असता त्याच्या मांसाची लालसा करणे हे किती कृतघ्नत्वाचे दर्शक आहे बरे? या मांस भक्षणावाचून मनुष्याचे चालावयाचे नाही काय? या प्रश्नाचे उत्तर पाश्चिमात्य देशांतील मांसाहारनिषेधक मंडळ्या, मोठमोठ्या शेकडो वैद्यांच्या साहाय्याने 'होय' असे आज तीस-चाळीस वर्षे एकसारखे मोठ्या अट्टहासाने देत आहेत. शिवाय मनुष्याचे मांसाहाराशिवाय काही अडले तरी काय हरकत आहे. मनुष्यास त्याच्या कुटुंबातील माणसांप्रमाणे उपयोगी पडणारे त्याचे सुख वृद्धिंगत करणारे, त्याच्यावर ममता करणारे आपल्या कष्टाच्या योगेकरून त्याचे पालनपोषण करणाऱ्या अशा जनावरांचा वध करणे म्हणजे अन्यायाची केवळ परमावधी होय. हे अमानुष कृत्य न्यायीपणाचे आहे असे दाखविण्यास जगात एकही योग्य कारण सापडावयाचे नाही. वास्तविक पाहता मनष्यातन मांसाहार नाहीसा झाला असता त्याच्याठायी खरा मनुष्यपणा येऊन तो अधिक नम्र अधिक प्रेमळ, अधिक न्यायी, अधिक निरोगी व अधिक बुद्धिमान होऊन तो खरा सुखी होईल. असो. आता मनुष्यास आपल्या स्वत:च्या संबंधाने न्याय बुद्धीचा कसा काय उपयोग होतो ते

पाहू. मनुष्याच्या सर्व आचरणाचे मूलाधारभूत जे शरीर त्याची सुस्थिती राहणे इष्ट होय; परंतु कित्येक लोक देहाला काय करावयाचे आहे? ते नाशवंत आहे, ते मृत्तिका आहे, असे म्हणून त्याची योग्य प्रकारे जोपासना करीत नाहीत. त्याचप्रमाणे हल्लीचे सुशिक्षित लोक देह क्षणभंगूर आहे वगैरे जरी समजत नाहीत तरी अमके काम त्वरित आटोपले पाहिजे, तमका हेतू सिद्धीस नेला पाहिजे, याकरिता खाणे, पिणे, व्यायाम, निद्रा इत्यादी आरोग्याच्या पुष्कळ नियमांचे ते उल्लंघन करतात. त्यामुळे ते रोगादिकांनी त्रास पावून निर्बल व अल्पायू होतात. अशाने त्यांच्या हातून सत्कर्मे म्हणण्यासारखी होत नाहीत, हे काही चांगले नाही. तेव्हा आपल्या शरीराची स्थिती चांगली राहून आपण दीर्घायू जेणेकरून होऊ ते अवश्य आचरिले पाहिजे. या संबंधाची हेळसांड करणे मोठा अन्याय होय. तेव्हा सारांश काय की, स्टोइक लोकांच्या टीकाविषयक मतामुळे या जगाचे आजपर्यंत पुष्कळ नुकसान झाले आहे. यास्तव ते सर्वथा प्रशस्त नव्हे.

३७. मनुष्याने असे हताश व हतवीर्य होऊन जाण्यात काही एक अर्थ नाही. या दैववादामुळे जगाचे आजपर्यंत पष्कळ नकसान झाले आहे. आपणास सष्टिक्रमाचे जसजसे यथार्थ ज्ञान होत चालले आहे तसतसा निसर्ग आपल्या अमलात येत चालला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. निरनिराळ्या शास्त्रांच्या विकासाने कार्यकारण संबंधाचे ज्ञान वाढून अनुकूल कारणघटना व प्रतिकूल कार्यनिवृत्ती करण्याचे सामर्थ्य मनुष्यास उत्तरोत्तर अधिकाधिक प्राप्त होत आहे आणि ही सामर्थ्यवृद्धी कधीही विराम पावण्याचा संभव नाही. यास्तव मनुष्याने हताश होऊन न जाता शास्त्रीय ज्ञानाची प्राप्ती व वृद्धी याजकडे आपल्या काळाचा व शक्तीचा विनियोग करावा.

३८. याप्रमाणे मनुष्य वागू लागल्यास त्याची सर्व प्रकारची उन्नती खुंटलीच म्हणून समजावी. आपली स्थिती होईल तितकी सुधारण्याचा मानवाचा कृतसंकल्प झाल्यावाचून त्याच्या ठायी खरा जोम व उत्साह येत नाही आणि ज्याच्या अंगी ही दोन्ही नसतात त्याचे जीवित केवळ कष्टमय होते. तो समाजात असून नसून सारखाच. कारण ज्यास स्वोन्नतीची आकांक्षा नसते त्याच्या ठायी आपल्या समाजाच्या उन्नतीची कल्पनाही उद्भवणे अशक्य होय.

३९. येथे मात्र त्यांच्या तत्त्वविचारांची कमाल झाली. कोणतीही स्थिती आपणास दुर्वह झाली असता आत्महत्या करण्यात काही एक पुरुषार्थ नाही. अशा स्थितीमध्ये मनुष्याने धैर्य धरून ती प्राप्त होण्याची कारणे कोणती, याचा तलास करावा आणि जी आपणास टाळता येण्यासारखी असतील ती हरप्रयत्नाने टाळण्यास सदा उद्युक्त असावे. आपले प्रयत्न फसले तरी आपल्या मागून येणाऱ्या लोकांस आपणास प्राप्त झालेला अनुभव आयताच मिळून आणखी पढे कसे काय प्रयत्न करावे याचे त्यास

ज्ञान होईल. हा काही लहानसान फायदा नव्हे. या अशा फायद्यास मानव जातीस मुकविण्यासारखे अनीतीचे काम दुसरे क्वचितच असेल.

४०. हा समाज मनुष्याच्या प्रत्यक्ष अनुभवास अगदी विरुद्ध आहे. कां की, अत्यंत श्रद्धाळू अशा लक्षावधी पुरुषांकडून दुराचरण घडत असल्याचे दाखले प्रत्येक मनुष्यास पावलोपावली येत आहेत. वास्तविक पाहता मनुष्याकडून जे थोडेबहुत सदाचरण घडत आहे ते लोकापवादभीती, राजदंडभीती, स्वमनाची भीती, रोगांची भीती यामुळे होय. शिवाय सदाचरणापासून होणाऱ्या हिताचे स्पष्ट ज्ञान मनुष्यास होऊन तद्नुसार वर्तण्याचा बालाभ्यास पाहिजे. तेव्हा या वास्तविक उपायांचा व साधनांचा योग्य प्रसार करून मनुष्यास सन्मार्गवर्ती करण्यात खरे हित आहे. केवळ कल्पनामय व कदापि प्रत्यक्ष न होणाऱ्या समजुतींवर नीतीचा पाया राहू दिल्याने मनुष्य जातीचे खरे हित होणे नाही. हे जाणूनच आजपर्यंत पाश्चिमात्य राष्ट्रांत झालेल्या बहुतेक नीतिशास्त्रवेत्त्यांनी नीतीचा पाया धर्म खेरीज करून दुसऱ्या कशावर तरी रचण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सर्वात उपयुक्ततारूप जो पाया बेन्डॅम, मिल्ल, स्पेन्सर इत्यादी तत्त्ववेत्त्यांनी स्थापला आहे कशास्त्रीय ज्ञानास अनुसरून असून सर्व प्रकारे शद्ध आहे. त्यातनही आंग्लभमीस किंबहना सर्व पृथ्वीस भषणभत असा तत्त्वज्ञशिखामणी जो हर्बर्ट स्पेन्सर त्याची तर अशी प्रतिज्ञा आहे की, या सत्य व कधी न ढळणाऱ्या अशा खंबीर व शास्त्रशुद्ध पायावर नीतीरूप मंदिराची उभारणी करण्याकरिता माझ्या सर्व सामर्थ्याने झटण्याविषयी मजकडून कदापि कसर होणार नाही. यासाठीच हे माझे तत्त्वज्ञानावरील आजपर्यंतचे परिश्रम होत, असा संकल्प प्रत्येक तत्त्वविचारी जनाकडून होणे उचित होय. स्टोइक लोकांकडून ही गोष्ट चुकल्याने याचे फार वाईट वाटते.

मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने

पुस्तक पहिले

१. माझा आजा जो विरस[१] त्याजपासून मी सदाचार व आत्मसंयमनही शिकलो.

२. माझ्या पित्याचा[२] लौकिक आणि आठवण याजवरून मी विनय आणि मर्दुमकीही शिकलो.

३. माझ्या मातेपासून[३] मी धर्मनिष्ठा व परोपकारही शिकलो, आणखी मी तिजपासून कुकर्मापासूनच नव्हे, तर कुविचारांपासूनही कसे दूर राहावे ते शिकलो. त्याचप्रमाणे श्रीमंताच्या डामडौलाचे वारेही लागू न देता अगदी साध्या रीतीने राहावयास तिने मला शिकविले.

४. माझ्या पणज्याने[४] मला सार्वजनिक शाळांमध्ये न पाठविता घरी चांगले शिक्षक ठेवून मला पढविले, याजबद्दल मी त्याचा आभारी आहे आणि विद्येच्या कामी खर्च करण्यात हात अगदी सढळ ठेवावा, हे मला त्याजकडून कळले.

५. शर्यती, कुस्त्या, दांडपट्टे इत्यादी कोणत्याही प्रजेच्या खेळात सामील होऊ नये अथवा त्यातील लोकास साहाय्य करू नये, हे मी माझ्या शिक्षकापासून शिकलो. तसेच कधी न थकता सतत श्रम करण्याची सवय करावी, फार वस्तूंची गरज ठेवू नये, स्वत:च्या हातांनी काही ना काही नेहमी करत असावे, दुसऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करू नये आणि चहाडाचे सांगणे मनास आणू नये वगैरे गोष्टीही मी त्याजपासूनच शिकलो.

६. डायआग्निटस[५] याजपासून मी असा बोध घेतला की, क्षुल्लक गोष्टींमध्ये मन घालू नये, अद्भुत चमत्कार करणारे पंचाक्षरी व गारोडी यांचे मंत्रतंत्र व भुतेखेते काढण्याचे सामर्थ्य याजवर भरवसा ठेवू नये, लावे पक्षी झुंजविण्याकरिता पाळू नयेत[६] आणि अशाच इतर अप्रयोजक गोष्टींच्या फंदात मुळीच पडू नये. हरएक इसमास पाहिजे ते विचार प्रगट करण्याची पूर्ण मोकळीक द्यावी, तत्त्वविचारांचे ज्ञान चांगले संपादावे, लहान वयामध्ये

संवाद लिहावेत[७] आणि ग्रीक लोकांमध्ये जे शारीरिक व मानसिक शिक्षणाचे प्रकार असतात त्यांचा स्वीकार करावा.[८]

७. रस्टिकसकडून[९] मला असे समजले की, माझ्या स्वभावात सुधारणा होऊन त्यास चांगले वळण मिळाले पाहिजे. आणखी मी त्याजपासून असे शिकलो की, विद्येचा[१०] रिकामा डौल मिरवून दुसऱ्याशी स्पर्धा करू नये. काल्पनिक विषयांवर लेख लिहू नयेत, लहान लहान बोधपर भाषणे करू नयेत; आपण मोठे व्रतस्थ आहोत किंवा लोकांस दाखविण्याकरिता मोठी परोपकाराची कृत्ये करतो, असे भासवू नये. अलंकार, काव्य व डौलाचे लिहिणे यापासून दूर असावे. बाहेरील पोषाखाने घरात इकडून तिकडे हिंडू नये व दुसऱ्या अशाच कोणत्याही गोष्टी करू नयेत. आपली पत्रे साध्या भाषेत लिहावीत. कोणी आपणास वाईट शब्द बोलला असता किंवा काही आपले नुकसान केले असता जर तो पुढे पुन्हा सख्य करण्यास तयार असेल, तर आपण लागलीच समज घेऊन शांत व्हावे. कोणतेही पुस्तक वाचावयाचे ते फार चांगले चित्त देऊन वाचावे आणि ते वरवरून समजल्याने तृप्त होऊ नये. जे मोठमोठ्या गप्पा झोकतात त्यांच्या बोलण्यास रुकार देऊ नये.

८. आपोलोनियसाने[११] मला असे पढविले की, मनुष्यास इच्छास्वातंत्र्य आहे. कोणतेही सत्कृत्य हाती घेतले असता ते अढळ निश्चयाने सिद्धीस न्यावे. आपल्या विवेकावाचून दुसऱ्या कशावरही एक पळभरसुद्धा भिस्त ठेवू नये. कोणत्याही प्रकारच्या तीव्र वेदना झाल्या असता किंवा आपले प्रिय बालक गतप्राण झाले असता, किंबहुना एखादे पुष्कळ दिवसांचे दुखणे आपणास लागले असता न डगमगता चित्ताची नेहमी समता राखावी. प्रसंग पडेल तसे वज्राप्रमाणे कठीण आणि मेणाप्रमाणे मऊ कसे व्हावे हे मी त्याच्या नेहमीच्या डोळ्यादेखतच्या वर्तनावरून शिकलो. शिष्य कितीही जडबद्धी किंवा हूड असला तरी त्याला शिकविण्याचा त्यास बिलकूल त्रास नसे. त्याची विद्वत्ता फार मोठी असून, गहन तत्त्वविचारांची फोड करून सांगण्याचे कौशल्य त्याच्या ठायी इतके असता त्याचा त्यास मुळीच गर्व वाटत नसे. इतकेच नव्हे तर ते आपल्या अंगाचे गुण अगदी क्षुल्लक समजे. मित्रांनी केलेल्या उपकारांचा स्वीकार, स्वतःचा कमीपणा न होऊ देता व कृतघ्नतेचा दोष अंगी न लागू देता कसा करावा हे मी त्यापासून शिकलो.

९. सेक्स्टस[१२] कडून मी असे शिकलो की, नेहमी परोपकारबुद्धी अंगी वागवावी, कुटुंबाचे पितृवत पालन करावे, निसर्गानुसार वर्तन ठेवावे, अंगी गांभीर्य तर असावे; पण वृथा डौल नसावा. आपल्या मित्रांचे हित जेणेकरून होईल ते मोठ्या आस्थेने करावे. अज्ञानी किंवा अविचारी लोकांचा तिटकारा करू नये. सेक्स्टस स्वतः सर्वांशी गोडीगुलाबीने वागे, म्हणून त्याच्याशी बोलण्या-चालण्यात जो आनंद वाटे तसा आनंद कोणी आपली खुशामत केली असताही वाटू नये. त्याचा स्वभाव इतका गोड होता तरी त्याच्याशी ज्याचा संबंध घडे त्याच्या ठायी त्याजविषयी अत्यंत आदराची बुद्धी वसे. आयुष्य क्रमणास अत्यावश्यक

नियमांचा शोध लावून त्याची स्पष्ट व पद्धतवार व्यवस्था लावण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी वसत होते. क्रोध वगैरे मनोविकारास तो कधीही वश होत नसे, तो अत्यंत विरक्त असून, ममताळू असे, तो जी लोकांवर कृपा करी तिचा तो नसता आव घालत नसे. त्याचे ज्ञान मोठे होते; पण त्याचा डौल तो बिलकूल मिरवीत नसे.

१०. प्रसिद्ध व्याकरणशास्त्रज्ञ जो अलेक्झांडर[१३] त्यापासून मी असे शिकलो की, कोणाचे दोष काढू नयेत. कोणी एखादा शब्द किंवा वाक्य बोलावे तसे व्याकरणशुद्ध न बोलला तर त्याजबद्दल त्याचा निषेध करू नये; परंतु त्यास उत्तर देताना किंवा त्याच्या बोलण्याचा अभिप्राय आपणास संमत आहे असे दर्शविताना तेच वाक्य आपण अशा खुबीने योजावे की, त्याची चुकी त्यास सहज समजावी.

११. फ्रॉन्टो[१४] पासून मला असे समजले की, राजा जुलमी असला[१५] म्हणजे मत्सर, लपंडाव व ढोंग यांचा प्रादुर्भाव होतो आणि आम्हापैकी जे कित्येक आपणास महाजन[१६] म्हणवितात त्यांच्या ठायी प्रायः वात्सल्य कमीच वास करते.

१२. प्लेटोचा अनुयायी जो अलेक्झांडर त्याजपासून मी असे शिकलो की, आपणास फुरसत नाही, असे वारंवार कोणास विनाकारण सांगू नये अथवा पत्रात लिहू नये. त्याचप्रमाणे ज्यांच्या सहचार्याने[१७] आपण राहत असतो त्यांच्यासंबंधाची जी कर्तव्ये आपण अवश्य केली पाहिजेत त्यांजविषयीची हेळसांड आपल्याकडून झाली असता ती दुसरी काहीतरी जरूरीची कामे करावयाची होती म्हणून झाली अशी सबब जेव्हा तेव्हा सांगू नये.

१३. केटुलस[१८] कडून मी असे शिकलो की, आपल्या मित्राने आपला एकदा दोष काढला असता त्याचा अनादर करू नये. मग तो दोष त्याने काही कारणावाचून का काढला असेना आणि त्याचा आपल्याविषयी पुन्हा अनुकूल ग्रह होईल असे करण्यास झटावे. आपल्या शिक्षकांची नेहमी स्तुती करावी आणि आपल्या मुलांवर मनापासून प्रीती करावी.

१४. माझा भाऊ सेवरस[१९] याजकडन मी असे शिकलो की. आपल्या नातलगांवर प्रीती करावी, सत्य आणि न्याय याजविषयी मनात प्रेम वागवावे. केटो, डायकन, ब्रूटस इत्यादी महापुरुषांच्या चरित्रांचे व लेखांचे ज्ञान मला त्याजकडून प्राप्त झाले. त्यापासून मी आणखी असे शिकलो की, राज्यरिती अशी असावी की, तीत सर्वांस एकच कायदा असावा, सर्वांस सारखेच हक्क देऊन आपले विचार प्रगट करण्याची मोकळीकही सर्वांस सारखीच द्यावी आणि प्रजाजनास देववेल तितके जास्त स्वातंत्र्य द्यावे. तत्त्वविचारांवर नेहमी अढळ प्रेम असावे, लोकांचे बरे करण्याची बुद्धी मनात वसावी, परोपकार करण्यास सदा तत्पर असावे, चित्तांत नेहमी सदाशा बाळगाव्यात, आपल्या मित्रांचे आपल्यावर निष्कपट प्रेम आहे असे मानून वर्तावे. या सेवरसाच्या ठायी मी आणखी असा एक गुण पाहिला की, ज्याला तो दोषी समजत असे त्याजविषयीचे ते आपले मत तो बिलकूल छपवीत नसे आणि त्याची आवडनिवड स्पष्ट असे, तिजविषयी त्याच्या मित्रास मुळीच भ्रांती नसे.

१५. मॅक्झीमस[२०] कडून मी असा बोध घेतला की, नेहमी आत्मसंयमन करावे, कशाच्याही मोहाने आड वाटेस जाऊ नये, सर्व स्थितीमध्ये किंबहुना आजारामध्येही आनंदवृत्ती असावे, आपले आचरण असे ठेवावे की, तेणेकरून आपण सर्वांस प्रिय होऊन आणखी आपल्याविषयी त्यांच्या मनात आदराची बुद्धी उत्पन्न व्हावी आणि जे जे आपणास करणे प्राप्त होईल ते सर्व कुरकुर न करता किंवा न त्रासता करावे. मी असे पाही की, त्याला जसे वाटे तसे तो बोलतो आणि जे काही तो करतो त्यात त्याचा दुष्ट उद्देश मुळीच नसतो, असा त्याजविषयी लोकांचा अभिप्राय असे. कोणतीही गोष्ट पाहून त्याला आश्चर्य किंवा नवल कधीही वाटत नसे. कोणतेही कृत्य करताना तो विनाकारण घाई मुळीच करीत नसे किंवा ते आजचे उद्यावरही टाकीत नसे. तो कधी गोंधळून जात नसे किंवा खिन्न होत नसे. आपणास झालेला संताप छपविण्याकरिता तो कधी हसत नसे, त्याचप्रमाणे तो कधी क्रोध किंवा संशय या वृत्तीस वश होत नसे. परोपकाराची कृत्ये करण्याचा त्याचा नित्याचा परिपाठ असे. तो सदा क्षमाशील असून, असत्यवाणी त्याच्या मुखावाटे कधीही येत नसे. त्याच्या आचरणावरून असे दिसे की, तो जात्याच सन्मार्गवर्ती आहे. कृत्रिम उपायांनी त्याच्यात ती सुधारणा झालेली नव्हे. मी आणखी असे पाही की, मॅक्झीमस आपला तिरस्कार करतो असे कोणासही वाटत नसे. त्याचप्रमाणे त्याच्याहून आपण चांगले मनुष्य आहोत असे कोणास क्षणभरसुद्धा भासत नसे. लोकांस सुख होईल अशा रीतीने हास्यविनोद करण्याच्या कलेमध्येही तो निपुण होता.

१६. माझ्या पित्याच्या[२१] ठायी मी पुढील गुण पाहिले. त्याचा स्वभाव गरीब असे, त्याने योग्य विचार करून कोणतीही गोष्ट करण्याचा एखादा निश्चय केला असता तो कालत्रयीही फिरत नसे. लोक ज्यास मानाच्या गोष्टी समजतात त्याजविषयी त्यास वृथा भूषण वाटत नसे. कोणतेही काम हाती घेतले असता ते सतत अविश्रांत श्रमाने तडीस नेण्याचा त्यास हव्यास असे. जनसमूहाच्या कल्याणाची एखादी गोष्ट कोणी सुचवीत असल्यास तो ऐकण्यास सदा तत्पर असे. प्रत्येक मनुष्याची त्याच्या योग्यतेनुरूप बूज करण्यास त्याच्या हातून तिळप्रायही कसर होत नसे. अनेक कार्यप्रवृत्तीच्या व कार्यनिवृत्तीच्या प्रसंगापासून उद्भवणारे अनुभवज्ञान त्यांच्या ठायी पुष्कळ होते. इतर जानपदांसारखेच तो आपणास लेखी. आपल्या मित्रांनी आपल्या पंक्तीत बसून जेवलेच पाहिजे किंवा स्वत: बाहेर स्वारीस गेला असता त्यांनी आपल्याबरोबर आलेच पाहिजे, असा त्याचा मुळीच आग्रह नसे. बरे कोणी जरूरीच्या कामामुळे त्याच्याबरोबर नच गेला तर त्याजविषयी त्यास जरासुद्धा वाईट वाटत नसे. त्याच्यावर त्याची पूर्वीप्रमाणेच मर्जी राही. कोणत्याही गोष्टीचा विचार कर्तव्य असता तिची नीट चौकशी करण्याचा त्याचा परिपाठ असे

आणि तिचे बाह्य स्वरूप पाहूनच तो तृप्त होत नसे, तर तिचा पुरा शोध लागेपर्यंत तो तिचा पिच्छा सोडीत नसे. आपले मित्र राखण्याविषयी तो सदा तत्पर असे. त्यांचा त्यास

सहसा कंटाळा येत नसे; परंतु त्यांजवर फाजील लोभही नसे. तो सर्वप्रसंगी संतुष्ट व आनंदी असे. तो मोठा दूरदृष्टी असून, पुढे घडणाऱ्या अत्यंत क्षुल्लक गोष्टींच्याही तयारीस तो अगोदरपासूनच लागत असे. कोणी त्यांची स्तुती किंवा खुशामत करू लागल्यास तो त्याला तत्काळ मनाई करी. राज्यकारभार चालविण्यास ज्या गोष्टींचे अगत्य लागते त्याजकडे त्याचे सदा लक्ष असे. तो खजिन्यातील पैक्यांचा व्यय फार हात राखून करीत असे. या त्याच्या वर्तणुकीबद्दल कोणी त्यास दोष लावला असता तो निमूटपणे सोशी. देवाविषयी त्याच्या मनात भोळा भाव वसत नसे. लोकास इनामे वगैरे देऊन किंवा इतर कोणत्याही प्रकारे त्यांस संतुष्ट करून लोकाराधना करणे त्यास आवडत नसे. सर्व गोष्टींमध्ये तो थंड व दृढनिश्चयी असे. हलके विचार किंवा हलकी कामे यापासून तो दूर असे. त्यास अपूर्व गोष्टींचा नाद नसे. ज्या गोष्टी प्राणयात्रा सुखाने चालविण्यास साधनीभूत असून, ज्यांची ऐश्वर्यामुळे हवी तितकी अनुकूलता असे त्यांचा उपयोग तो खुशाल घेत असे. असे करण्यात तो दिमाख किंवा ढोंग मुळीच दाखवीत नसे. त्याला कोणी वावदूक, बहुभाषी किंवा पांडित्य मिरविणारा म्हणत नसे. तो पक्का विचाराचा व निर्दोष असून, त्याला खुशामत मुळीच आवडत नाही आणि आपला स्वतःचा किंवा इतरांचा कारभार चालविण्यात तो मोठा दक्ष आहे, असे सर्व लोक कबूल करीत. खऱ्या तत्त्वज्ञ पुरुषाचा तो चांगला मान राखीत असे; परंतु जे तत्त्वज्ञतेचे नसते ढोंग करीत, त्यास तो दोष लावीत नसे; पण त्यांच्या सांगण्यावरही तो सहसा भरवसा ठेवून वागत नसे. त्याचे बोलणे चालणे साधे असून, तो लोकांस तेव्हाच प्रिय होऊन जाई, नसता डौल घालून तो लोकांची मने दुखवीत नसे. आपल्या देहाचे आरोग्य राखण्याविषयी तो नेहमी काळजी घेत असे; परंतु त्यावरून त्यास आपल्या जीविताची अतोनात आवड आहे, असे भासत नसे किंवा आपले शरीर चांगले पिळदार दिसावे, असाही शौक त्यास नव्हता. तर जेणेकरून शरीराची विनाकारण हयगय न होता ते निकोप राहील ते तो करीत असे. याप्रमाणे तो आपल्या प्रकृतीकडे लक्ष पुरवीत असल्याकारणाने त्याला वैद्याकडून औषधोपचार करून घेण्याची कधीही गरज पडली नाही. एखाद्याच्या अंगी वक्तृत्वादी अलौकिक शक्ती किंवा कायदे, नीती वगैरेचे विशेष ज्ञान आहे, असे आढळल्यास त्याचा हेवा न करता तो त्याचे वर्चस्व कबूल करीत असे. अशा लोकांस तो आपल्याकडून होईल तेवढे उत्तेजन देऊन त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांचा लौकिक वाढेल असे करीत असे. आपल्या देशाच्या चालीरीतींप्रमाणे तो नित्य वर्तत असे; पण हे त्याचे वर्तन अगदी साहजिक आहे असे वाटे. त्याचे तो स्तोम बिलकूल माजवीत नसे. याला नव्या नव्या गोष्टींची फारशी आवड नसून त्याची वृत्ती चंचल नव्हती. त्याच त्याच ठिकाणी राहण्याचा अथवा त्याच त्याच गोष्टी करीत राहण्याचा त्याला कंटाळा कसला तो मुळीच वाटत नसे, उलटे त्यात त्याला सुखच वाटे. त्याला कपाळशूळाची व्यथा जबरदस्त होती. ती त्याला एखादे वेळी होऊन किंचित बरा होताच तो आपले नित्याचे काम पुन: मोठ्या हुशारीने व उत्साहाने करू लागे.

त्याच्या गुप्त गोष्टी अशा फारच थोड्या असत आणि त्या तरी राज प्रकरणातल्या. लोकांस तमाशे[२२] दाखविणे, सार्वजनिक इमारती बांधणे व लोकांस देणग्या वगैरे देणे यांच्या संबंधाने तो बरीच काटकसर करीत असे. कारण त्याचे लक्ष नेहमी स्वकर्तव्याकडे असे. आपल्या हातून घडणाऱ्या कृत्यांबद्दल होणाऱ्या लौकिकाचा त्यास अभिलाष नसे. भलत्याच वेळी स्नान करण्याचा त्यास नाद नसे. त्याला इमारती बांधण्याचा शौक नसे. त्याचप्रमाणे स्वतःचे खाणेपिणे किंवा वस्त्रप्रावरण कसलेही असले तरी त्यास चालत असे. त्याचा स्वभाव मुळीच कडक नसून त्याचा राग तेव्हाच शांत होत असे आणि रागाच्या आवेशात त्याच्या हातून कधीही अनन्वित कर्म होत नसे. त्याची वृत्ती नेहमी शांत असे. हरएक गोष्टीचा तपास तो गडबड किंवा घाई मुळीच न करता व्यवस्थितपणे व मोठ्या उत्साहाने करीत असे आणि ज्या गोष्टीचा परित्याग मनुष्याकडून सहसा होणे नाही त्यापासून दूर राहण्याचे सामर्थ्य व ज्या गोष्टीचा उपभोग अमर्याद घेण्याकडे मनुष्याचा नेहमी कल असावयाचा त्या गोष्टींचे परिमित सेवन करण्यास अवश्य लागणारा मनोनिग्रह हा जसा साक्रेटिसाच्या ठायी होता म्हणतात, तद्वत तो या माझ्या पित्याच्या ठायी होता..

१७. मला चांगले आजे, चांगली मातापितरे, चांगली बहीण, चांगले शिक्षक, चांगले सोबती, चांगले नातलग, चांगले मित्र, सारांश बहुतेक सर्व काही मला चांगले प्राप्त झाल्याबद्दल मी देवाचा ऋणी आहे. त्याचप्रमाणे या माझ्या संबंधीजनांची मानखंडना वगैरे करण्याचा प्रसंग मला आला नाही, हाही मजवर त्या देवाचा अनुग्रह झाला असे मी समजतो. कारण माझा स्वभाव जात्या असा होता की, प्रसंग आला असता तर असली अनिष्ट गोष्ट मजकडून सहज घडती; परंतु त्या देवाच्या कृपेने असला प्रसंग घडून येऊन माझ्या स्वभावाची पारख झाली नाही. त्याच्या प्रसादाने मला माझ्या ज्वानीचे चांगले रक्षण करता येऊन योग्य काळापूर्वी आपल्या वीर्याचा विनियोग करण्याचा मोह मला पडला नाही. इतकेच नव्हे तर मला माझे ब्रह्मचर्य योग्य काळापलीकडेही चालविता आले. त्याच्या प्रसादाने अशा राज्यकर्त्याच्या व पित्याच्या कह्यात मी आलो की त्याने माझ्या ठायीचा सर्व अभिमान नाहीसा करून मला असे दाखवून दिले की, मनुष्यास राजमंदिरात लवाजमा, भरजरी पोशाख, मशाली वगैरे थाटमाटावाचूनही राहता येते. तेथे एखाद्या साधारण मनुष्याप्रमाणे राहता येण्यास त्यास काही फारशी अडचण पडणार नाही. अशा पद्धतीने राहिल्याने मन हलके होण्यास किंवा प्रजेच्या हितासाठी राजाने ज्या गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत त्यापासून पराङ्मुख होण्यास काही एक कारण दिसत नाही. देवाच्या कृपेने मला जो बंधू[२३] मिळाला होता त्याची नीतिमत्ता अशी होती की, ती पाहून मला माझ्या वर्तनास जपण्याची बुद्धी झाली. या माझ्या बंधूच्या ठायी मजविषयी जे प्रेम व आदरही होता तो पाहून मला फार संतोष होई. देवाच्या प्रसादाने माझी मुले वेडीविद्री किंवा कुरूप नव्हती. अलंकारशास्त्र, काव्य इत्यादी विषयात मी फारसा प्रवीण झालो नाही, याजबद्दल मी देवाचा

आभारी आहे. कारण जर का या विषयात माझी थोडीबहुत गती झाली असती, तर त्या विषयांच्या अभ्यासात मी पूर्णपणे गुंतून गेलो असतो. ज्यांनी माझा लहानपणी सांभाळ केला होता त्यांस त्यांच्या मनोरथाप्रमाणे मी देवाच्या दयेने चांगल्या योग्यतेस लवकरच चढविले. या उत्कर्षाची आशा करीत मी त्यांस फार दिवस ठेवले नाही. याचे कारण उघडच होते की, त्यांचे उमेदीचे दिवस निघून गेल्यावर त्यास मजकडून होणाऱ्या बढतीचा सुखानुभव चांगला घडला नसता. देवाच्या कृपेने मला आपॉलोनिअस रस्टिकस, मेक्झीमस अशा महापुरुषांच्या चरित्रांची व लेखांची ओळख झाली. त्यांच्या दयेने निसर्गानुसार कसे वर्तावे याचे स्पष्ट ज्ञान होऊन आपल्या जीविताचे सार्थक्य कसे करावे ते मला कळले. सारांश काय की, देवाकडून प्राप्त झालेल्या देणग्या, साहाय्य व प्रेरणा यांच्या अनुकूलतेने निसर्गानुसार वागण्यास मला कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय आला नाही. आता या माझ्या कर्तव्यात जी मजकडून कसर होत आहे ती माझ्या स्वतःच्याच अपराधामुळे किंवा देवाच्या प्रत्यक्ष अनुज्ञाप्रमाणे न वर्तल्यामुळे होय. माझा आयुष्यक्रम असा दगदगीचा असता माझे शरीर क्षीण झाले नाही, मी एक वेळ विषयासक्त झालो असता ती माझी आसक्ती लवकरच नाहीशी झाली, याजबद्दल मी देवाचा आभारी आहे. रस्टिकसविषयीचे प्रेम जरी एक-दोन वेळा माझ्या अंत:करणातून चळले होते, तरी पण मजकडून अनुताप होण्यासारखे काही वाईट घडले नाही, हा त्या देवाचा मजवर प्रसाद समजावयाचा. माझी आई अल्पवयातच मरण पावली खरी; पण तिने आपले शेवटचे दिवस माझ्याबरोबर घालविले, याजबद्दल मी देवाचा आभारी आहे. एखाद्या मनुष्याची निवंता पाहून त्यास मदत करण्याचे माझ्या मनात आले असता ते करण्याचे सामर्थ्य मला नव्हते असे कधीही झाले नाही, तसेच दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा करण्याचा प्रसंग मला कधीही आला नाही. अगदी हुकमात वागणारी प्रेमळ व साधी अशी पत्नी मला मिळाली. माझ्या मुलांना शिकविण्यास हवे तितके चांगले शिक्षण मिळण्याची मला पंचाईत पडली नाही. मला तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याची इच्छा उत्पन्न झाली असता एखाद्या वावदुकाशी[२४] माझी गाठ पडली नाही. इतिहासग्रंथाच्या वाचनात तर्कशास्त्रांतील अनुमान प्रमाणाच्या खटपटीत किंवा आकाशस्थ नक्षत्रे, तारे इत्यादिकांच्या अवलोकनात किंवा शोधात मी आपला वेळ गमाविला नाही. या सर्व गोष्टी देवांच्या व दैवाच्या अनुकूलतेने घडल्या.[२५]

हे पुस्तक ग्रानुआ[२६] येथे क्वाडी[२७] लोकांमध्ये असता लिहिले असे.

संदर्भ :

१. त्याच्या आजाचे नाव आनिअस विरस असे होते.

२. त्याच्या बापाचे नावही आनिअस विरस होते.

३. त्याच्या आईचे नाव डॉमिशिआ कालविला असे होते. तीस लसिलाही म्हणत.

४. हा बादशहाचे आईचा आजा जो क्याटिलिअस विरस तो असावा.

५. हा मार्कस ऑरेलियस बादशहाचा एक शिक्षक असावा असे म्हणतात.

६. आमच्या इकडे जसे कोंबडे किंवा एडके झुंजविण्याकरिता पाळण्याची चाल आहे, त्याचप्रमाणे रोमन लोकांमध्ये हे पक्षी पाळण्याची चाल होती.

७. हा अनुवाद किंचित वेगळा वाटतो. 'मी तारुण्यात असतानाच लेखन केले' असा हवा.

८. ग्रीक लोकांमध्ये मुलांच्या अंगात लहानपणापासूनच तकवा, जोम, सोशिकपणा इत्यादी मर्दुमकीचे गुण येण्याकरिता त्यांचे निजणे, बसणे, आहारविहार इत्यादिकांचे नियमन केलेले असे. रावापासून रंकापर्यंत सर्वांना आपल्या मुलास असे शिक्षण द्यावे लागे.

९. हा एक स्टोइक तत्त्ववेत्ता होता. यास बादशहा फार मानीत असे आणि वेळोवेळी त्यास मसलत विचारीत असे.

१०. हा सोफिस्टांचा सुप्त धिक्कारच आहे.

११. हा कालसीस गावचा रहिवासी असून पायस बादशहाच्या वेळी रोम शहरी आला. हा बादशहाचा एक अध्यापक होता. हा पक्का स्टोइक होता.

१२. हा किरोनियाचा रहिवासी असून, प्ल्यूटार्कचा नातू होता.

१३. हा फिरजीआ नामक ठिकाणचा रहिवासी असून, मोठा वैयाकरण होता. त्याने होमर कवीच्या काव्यावर टीका केली आहे.

१४. कार्नेलियस फ्रांटो हा अलंकारशास्त्रज्ञ होता. याचा बादशहावर मोठा लोभ असे. उभयतांचा काही पत्रव्यवहार प्रसिद्ध झालेला अजून उपलब्ध आहे.

१५. आशय एवढाच की राजा उत्तम, तत्त्वज्ञ असावा.

१६. रोमन लोकांमध्ये लोकांचे दोन मोठे वर्ग असत. एका वर्गास प्याट्रिशियन म्हणत. या शब्दाचा योगिक अर्थ वडील असा होतो. या वर्गात सगळे बडे लोक मोडत. दुसऱ्या वर्गास प्लेबीअन म्हणत. यात सर्वसामान्य लोकांचा समावेश होत असे.

१७. साहचर्याने वा सहकार्याने

१८. हा एक स्टोइक तत्त्ववेत्ता होता.

१९. हा काही बादशहाचा सख्खा भाऊ नहे. तो त्याचा चुलत भाऊ असावा असे कित्येकांचे मत आहे.

२०. क्लाउडीस मॅक्झीमस हा एक स्टोइक तत्त्ववेत्ता होता. यास मार्कसच्या पूर्वीचा बादशहा जो अन्टोनिनस पायस तोही फार मानीत असे. हा पूर्ण सदाचारी होता अशी याची ख्याती आहे.

२१. हा बादशहाचा दत्तक पिता जो अन्टोनिअस पायस तो होय. याच्या मागून मार्कस गादीवर बसला.

२२. रोमन बादशहा लोकाराधना करण्यासाठी लोकास वेळोवेळी मोठे तमाशे वगैरे दाखवीत असत.

२३. बादशहास सहोदर बंधू मुळीच नव्हता. हा जो बंधूचा उल्लेख आहे तो विरसविषयी आहे. पायस बादशहाने या दोघांसही दत्तक घेतल्यामुळे हा त्याचा बंधू झाला.

२४. इथंही सोफिस्टांचा निषेध आहे.

२५. इतिहास, न्यायशास्त्र, खगोलविद्या अशा अत्यंत उपयुक्त व महत्त्वाच्या विषयांचे अवलोकन व शोध करण्यात मार्कस ऑरेलियस याने आपला वेळ गमावला नाही. याबद्दल तो देवाचे व दैवाचे उपकार मानतो ! मनुष्याचे जे काही एकदा एक प्रकारचे समज होतात, तेच तो किती गोड मानून वसतो याचे हे एक मोठे उदाहरण आहे. वास्तविक पाहता असल्या अत्यंत उपयुक्त विषयांचे ज्ञान न झाल्यास मनुष्याने खेदच मानला पाहिजे.

२६. ग्रानुआ ही एक ड्यान्यूब नदीस मिळणारी लहानशी नदी आहे.

२७. बोहिविया व मोरेविआ नामक जर्मनीतील प्रांताच्या दक्षिणेस हे लोक राहत असत. या लोकांवर बादशहाने स्वारी केली होती.

सारांश टीप : या पुस्तकातून आपले शिक्षण, संस्कार, विचारांची दिशा, आयुष्याची दिशा व महत्त्वाचे अभ्यासविषय यावर चिंतन आहे. इतरांविषयी आदरभाव ठेवून मगच संयमाने टिका केली आहे.

❍❍❍

पुस्तक दुसरे

१. प्रातःकाळी आपणाशी प्रथमारंभी असा विचार करावा की, लुडबुडे, कृतघ्न, गर्विष्ठ, ठकबाज, मत्सरी, एकलकोंडे अशा मनुष्याशी माझी गाठ पडेल. बरे काय व वाईट काय याच्या अज्ञानामुळे हे सर्व दुर्गुण त्यांच्या ठायी वसताहेत; परंतु चांगल्याचे स्वरूप मनोरम आहे आणि वाईटाचे स्वरूप किळस आणणारे आहे, हे मला समजून आले आहे. त्याचप्रमाणे ज्याचे वर्तन गैर आहे त्याचा स्वभाव आणि माझा स्वभाव हे सजातीय आहेत. हा सजातीयतपणा केवळ हाडामांसाचाच नव्हे, तर त्याच्या माझ्या ठायीचे ज्ञानतत्त्व व दैवी अंशही एकच आहेत, हे मला कळत आहे. अशा मनुष्यापासून माझे काही एक नुकसान व्हावयाचे नाही. कारण जे निंद्य आहे त्याचा मजवर मुळीच अंमल चालावयाचा नाही. तेव्हा माझ्या बंधुजनांवर म्या रागावू नये किंवा त्यांचा द्वेष करू नये, हे उचित होय. कारण हात, पाय, पापण्या, दातांच्या वरच्या-खालच्या रांगा इत्यादी अवयवद्वंद्वाप्रमाणे एकमेकांच्या साहाय्याने उद्योग करण्याकरिता आम्ही निर्माण झालो आहोत. तेव्हा परस्पराविरुद्ध वर्तन करणे हे स्वभावाविरुद्ध आहे आणि एकमेकांच्या त्रासाने एकमेकांपासून दूर होणे हे परस्परांविरुद्ध वर्तन करणे होय[१].

२. मी जो काही आहे तो थोडेसे मांस, श्वास व नियामक अंश यांचा बनलो आहे. तेव्हा याविषयी व्यर्थ जिज्ञासा धरून ग्रंथ चाळण्यात काय अर्थ आहे? ते द्या फेकून[२]. त्यांच्या अवलोकनाने आपले मन व्यग्र करून घेऊ नका. याबद्दल वास्तव ज्ञान तुम्हास होणे नाही. आपण केव्हा मरू याचा नियम नाही, असे ध्यानात वागवून या देहाचा तिरस्कार करा[३]. हा देह हाडांचा पिंजरा, शिरा, धमन्या, मज्जा इत्यादिकांचे जाळे होय. हा आपला श्वास तरी केवळ वायुरूप आहे, तो श्वासोच्छवासाने आत-बाहेर जाऊन प्रतिक्षणी पालटत आहे. तिसरा भाग जो नियामक अंश तो मात्र प्रधान होय. हा आपला प्रधान अंश कोणत्याही

गोष्टीचा अगदी गुलाम करून सोडू नको. कोणत्याही प्रकारच्या मोहपाशांनी बद्ध होऊन अनन्वित कर्मे करण्यास उद्युक्त होऊ नको. आपल्या सध्याच्या स्थितीविषयी अस्वस्थ होऊ नको किंवा भावी स्थितीची चिंता वाहू नको.

३. जे जे म्हणून देवांपासून प्राप्त होते ते सारे बऱ्यासाठीच आहे.[४] दैवयोगानेही जे प्राप्त होते ते निसर्गानुसारच असते आणि दैवी योजनेने घडणाऱ्या गोष्टींशीही त्यांचा अत्यंत निकट संबंध असतो. किंबहुना ते त्यांचे कार्यच होय. सर्व वस्तूंचा उगम येथूनच आहे, याशिवाय भवितव्यताही आहे. आणखी ज्या विश्वाचा तू एक अंश आहेस, त्या अखिल विश्वाचे कल्याण म्हणून काही आहे. समग्र निसर्गाच्या स्वभावेकरून जे प्राप्त होते आणि जे निसर्गाची राहटी कायम राखण्यास साधनीभूत होते ते निसर्गाच्या हरएक अंशास कल्याणप्रद असलेच पाहिजे. आता या विश्वाचे संरक्षण जसे तत्त्वांच्या फेरफाराने होते, तसेच ते त्या तत्त्वांच्या मिश्रणाने बनलेल्या वस्तुजातात फेरबदल होऊनही होते. एवढे तत्त्वज्ञान तुला पुरे आहे. तद्नुसार तुझी मते कायमची होऊ दे. चित्ताची कोणत्याही प्रकारे तळमळ न होता, आनंदाने, खऱ्या भावाने व देवांचे मनोभावे आभार मानून तुला देहत्याग करणे असेल, तर ग्रंथावलोकनाचा धौशा सोडून दे.

४. या गोष्टींचा विचार तू किती वेळ दिरंगाईवर टाकला आहेस त्याचे स्मरण कर. त्याचप्रमाणे असा विचार करण्याची देवाच्या अनुग्रहाने तुला वेळोवेळी संधी आली असता, तिचा तू काही एक उपयोग करीत नाहीस याचीही आठवण कर. आता तरी तू उमज की, तू विश्वाचा एक अंश असून, विश्वनियंत्यापासून तुझे अस्तित्व उद्भवले आहे. तुझे आयुष्य मर्यादित आहे. त्याचा विनियोग जर तू आपल्या मनातील भ्रमजालांचा उच्छेद करण्याकडे करणार नाहीस, तर ते संपून तुझाही अवतार आटपेल. तुला ते पुन: प्राप्त व्हावयाचे नाही.

५. आपण रोमन आहो[५] हा विचार तू आपल्या मनात सतत वागीव आणि जे काही तू हाती घेशील ते पूर्णपणे अकृत्रिम गांभीर्याने, मोठ्या प्रीतीने, स्वतंत्रपणे व न्यायाने करीत जा. या योग्य वृत्तीस विघातक अशा कोणत्याही कल्पना मनात येऊ देऊ नको. विवेक जे काही सांगेल त्याजकडे दुर्लक्ष न करता किंवा त्याचा अव्हेर न करता, त्याचप्रमाणे ढोंग, अहंममता, प्राप्तस्थितीविषयी असंतोष इत्यादी असद्वृत्तीस वश न होता आपल्या आयुष्यक्रमातील हर एक गोष्ट शेवटली समजून जर ती करीत राहशील तर तू सर्व चिंतेपासून मुक्त होशील. देवांप्रमाणे शांततेने आयुष्यक्रमण करण्यास किती थोड्या गोष्टीचे संपादन पुरते हे तू पाहतच आहेस. या एवढ्या गोष्टी आपल्या हातून झाल्या म्हणजे मग देवास आणखी कशाचीही अपेक्षा नाही.

६. हे माझ्या आत्म्या, तू आपले अकल्याण करून घेत आहेस, तू आपला नाश करून घेत आहेस. आपली उन्नती करून घेण्यास तुला इतःपर अवकाश मिळणे नाही, तर त्वरा कर, हे जीवित क्षणभंगुर आहे. तू आपणा स्वतःस ओळखून आपली योग्यता जाणत नाहीस.

आणि आपले सर्व सुख इतर आत्म्यांच्या आश्रयाने प्राप्त होणारे आहे, असे तू व्यर्थ मानतोस.

७. या बाह्य जगामध्ये ज्या गोष्टी तुला अवचित घडतील त्यांनी तुझे चित्त व्यग्र होऊ देऊ नको. नेहमी काहीतरी नवे व कल्याणप्रद असे शिकण्याकडे आपल्या काळाचा व्यय कर. मनाची चंचलता सोड; परंतु त्यातही अशी सावधगिरी ठेव की, ज्या खटपटीत काही एक निष्पन्न व्हावयाचे नाही आणि जिवास मात्र व्यर्थ दगदग केल्याचा त्रास व्हावयाचा, असली खटपट करण्यात मुळीच अर्थ नाही. कोणता तरी सदुद्देश मनापुढे ठेवून त्याच्या सिद्धीकडे आपल्या सर्व आचारांचा व विचारांचा रोख असावा.

८. दुसऱ्यांच्या मनात काय वागत आहे हे न पाहिल्याने मनुष्यास असुख प्राप्त झाल्याचा प्रयत्न क्वचितच येतो; परंतु जो आपल्या मनोव्यापाराचे अवलोकन करीत नाही तो अवश्य असुखी असला पाहिजे.

९. अखिल विश्वाचा स्वभाव काय, आपला स्वतःचा स्वभाव काय, या दोहोंचा परस्पर संबंध काय, आपण त्या अखिल विश्वाचा कोणत्या प्रकारचा अंश आहोत आणि ज्या निसर्गाचा आपण अंश आहोत तद्नुसार एखादी गोष्ट करण्यास किंवा बोलून दाखविण्यास आपणाला कोणाकडूनही अंतराय होत नाही, हे तू अहर्निश मनात वागीव.

१०. **थिओफ्रेस्टस**[६] नामक तत्त्ववेत्त्याने निरनिराळ्या कुकर्मांची तुलना मनुष्याच्या साधारण समजुतीनुसार करून असे म्हटले आहे की, क्रोधवश होऊन केलेल्या अपराधांपेक्षा लोभास गुंतून केलेले अपराध विशेष निंद्य होत. कारण क्रोधाने संतप्त झालेल्या मनुष्याचा विवेक सुटतो तो त्यास काहीतरी दुःख झाल्यामुळे नाइलाज होऊन सुटतो. अशा स्थितीत त्यास देहभान न राहून त्याच्याकडून नीतिनियमांचे उल्लंघन होते; परंतु जो लोभवश होऊन असत्कर्मास प्रवृत्त होतो तो त्याची सुखाशा अनावर होते म्हणून. येथे त्याचा मनोनिग्रह अगदी ढिला पडून नामर्दपणाची व निंद्य अशी कृत्ये त्याच्या हातून घडतात. हे स्पष्ट आहे की, एखाद्या मनुष्याची कोणीतरी प्रथम आगळीक केली असता त्यास दःख होऊन तो रागावतो हे मनुष्य स्वभावास पुष्कळ अंशी अनुरूप आहे; परंतु ज्यास लोभ सुटून काहीतरी वाईट काम करण्याची बुद्धी होते त्याचे ते करणे फारच निंद्य होय.

११. तुला मृत्यू प्राप्त होण्याचा संभव प्रतिक्षणी आहे. तस्मात् आपल्या एकंदर आचारविचारांचे नियमन, ही गोष्ट मनात नित्य वागवून करीत जा. आता मनुष्यदेह सोडून जाण्याबद्दल देव असल्यास मुळीच भीती बाळगावयास नको. कारण ते तुझे अकल्याण करणार नाहीत; परंतु ते जर मुळीच अस्तित्वात नसतील किंवा ते कोठेतरी असून, त्यांचा मनुष्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसेल, तर जेथे देव नाहीत किंवा दैवी योजना नाही अशा विश्वात राहून तुला काय करावयाचे आहे; परंतु वास्तविक पाहाल, तर देव अस्तित्वात असून, ते मनुष्याची काळजी घेत असतात आणि त्यांनी वास्तविक अनर्थामध्ये न पडण्याची सर्व साधने मनुष्याच्या हाती ठेवली आहेत. आता इतर जी संकटेशी आपणास भासतात ती

जर खरोखरीच अनर्थावह असती तर ती टाळण्याचे सामर्थ्य त्यांनी मनष्यास दिले असते. ज्याच्या योगाने मनष्याची नीती बिघडत नाही, त्याच्यापायी त्याच्या जीवितातच का बिघाड व्हावा? या गोष्टीचे निवारण किंवा सुधारणा निसर्गाकडून झालेली दिसत नाही. याचे कारण त्याच्या ठायीचे अज्ञान नव्हे. बरे, ज्ञान असून त्यास सामर्थ्य नाही म्हणावे, तर तेही संभवत नाही. त्याचप्रमाणे सज्जनास व दुर्जनास सरसकट बरे-वाईट घडावे अशी चुकी निसर्गाकडून सामर्थ्य किंवा युक्ती नसल्यामुळे होण्याची शक्यता दिसत नाही. जन्ममरण, मानापमान, सुख-दुःख ही द्वंद्वे चांगल्यास व वाईटास सारखीच घडतात. वस्तुतः पाहता ही अशी आहेत की, त्यामुळे आपल्या नीतीत काही एक बरा-वाईट फेरबदल होण्यासारखा नाही म्हणून ती इष्टही नव्हेत आणि अनिष्टही नव्हेत.

१२. आपण ज्या वस्तू पाहतो त्या सर्व किती लवकर नष्ट होताहेत बरे! विश्वातून त्यांची प्रकृतीच नष्ट होऊन राहत नाही, तर कालेकरून त्यांची स्मृतीही नाहीशी होते. या आपल्या इंद्रियास ज्या वस्तू गोचर होतात त्यांचे स्वरूप कसे काय आहे ते पाहा. विशेष करून त्या वस्तू सुखलाभास्तव मोहक वाटतात किंवा दुःखमूलक असल्यामुळे भयावह वाटतात. अथवा ज्या कीर्तिप्रद असल्याविषयी लोकांचा समज असतो, त्या साऱ्या असार, तुच्छ, हीन, नश्वर आणि - जड अशा आहेत. हे सर्व मानवाने आपल्या ज्ञानबलेकरून समजावे. ज्या लोकांच्या समजुतीवर व मतांवर आपला लौकिक अवलंबून असतो, ते कोणत्या प्रकारचे लोक आहेत ते पाहावे. त्याचप्रमाणे मृत्यूचे वास्तविक स्वरूप ओळखावे. या मृत्यूचा स्वतंत्रपणे विचार करून तद्रुषंगाने ज्या निरनिराळ्या गोष्टी मनापुढे येतात, त्या साऱ्यांचे खुलासेवार व विविक्त मनन केले असता, असे समजून येईल की, ही जी मनुष्यास मोठी भयंकर गोष्ट वाटते ती केवळ एक सृष्टीचा व्यापारविशेष होय. तेव्हा या नैसर्गिक व्यापाराविषयी मनात जो भीती वागवील तो बालक समजावयाचा; परंतु हा शुद्ध सृष्टिव्यापारच नव्हे, तर तो निसर्गाच्या हेतूचा संपादकही आहे. मनुष्याचा देवाशी किती निकट संबंध आहे, याचाही विचार अवश्य करावा.

१३. जो मनुष्य सत्याचा शोध करण्याच्या हव्यासाने चोहोकडे भ्रमण करीत सुटतो, किंवा दुसरा असाच काहीतरी व्यर्थ अटाट करण्यात कालक्षेप करतो, त्याचप्रमाणे जो आपल्या शेजाऱ्यांच्या मनाची स्थिती तर्काने जाणण्याचा प्रयत्न करतो; परंतु आपल्या ठायीचा दैवी अंश वंद्य मानून त्याची जोपासना मनापासून करीत नाही, त्या मनुष्याइतका हतभाग्य दुसरा कोणीही नाही. आता या दैवी अंशाची जोपासना जी करावयाची ती अशी की. त्यास क्रोधादी मनोविकारांचा व अविवेकाचा मळ लवमात्रही लागू देऊ नये आणि देव व मनुष्य याजपासून जे काही प्राप्त होईल त्याजबद्दल त्याच्या ठायी असंतोष उत्पन्न होऊ देऊ नये. कारण देवापासून ज्या गोष्टी प्राप्त होतात त्या उत्तमच असल्यामुळे त्याजविषयी आपल्या मनात पूज्यबुद्धी असावी आणि मनुष्यापासून ज्या गोष्टी आपणास घडतात त्याही आपणास

प्रियच वाटल्या पाहिजेत, कारण ते आमचे सजातीय बंधू आहेत. कधी कधी मनुष्यापासून प्राप्त होणाऱ्या कित्येक गोष्टींबद्दल आपणास त्याची कीव येणे योग्य आहे. कारण या गोष्टी बऱ्या-वाईटाचे त्यास ज्ञान नसते म्हणून घडतात. ही त्यांच्या ठायीची उणीव आंधळ्यास जसे पांढरे-काळे ओळखण्याची शक्ती नसते तद्वतच समजावी.

१४. तू कितीही वर्षे जरी वाचलास तरी तू हे पक्के ध्यानात ठेव की, मनुष्य जो जीवितास मुकणार, तो त्याचे सध्या जे जीवित आहे त्यासच; आणि आता ज्या जीवितास तो मुकणार त्याहून आणखी दुसरे जीवित त्यास प्राप्त होणे नाही. यावरून पाहता जीवित कितीही दीर्घ किंवा अल्प असले तरी ते सारखेच समजावयाचे. कारण जे नाश पावते ते जरी सर्वांस सारखे नसले तरी वर्तमान स्थिती सर्वांस सारखीच आहे. म्हणून जे गत झाले ते केवळ एका निमिषाप्रमाणे भासते. भूतकालीन किंवा भविष्यकालीन वस्तू मनुष्यास अंतरल्या असे सहसा म्हणवत नाही. कारण जे मनुष्यापाशीच मुळी नाही ते त्यापासून कोणी कसे हिरावून घेऊ शकेल? तेव्हा तू या पुढील दोन्ही गोष्टी ध्यानात ठेव : एक अशी की, सर्व वस्तुजात अनादिकालापासून एक स्वरूप असून, ते चक्राकृती भ्रमण पावत आहे. यास्तव त्याच त्याच वस्तू मनुष्य शंभर वर्षे, दोनशे वर्षे, किंबहुना अनंत कालपर्यंत पाहत राहिला तरी सारखेच; भेद कसला तो बिलकूल नाही. दुसरी गोष्ट अशी की, दीर्घायुषी व अल्पायुषी या उभयतांचा तोटा मिळून सारखाच होतो. कारण हे जर खरे आहे की, मनुष्यास वर्तमान स्थितीच काय ती आहे आणि जी वस्तू त्याजपाशी नाही तिला तो मुकण्याचीही शक्यता नाही, तर मग मनुष्य जो मुकतो म्हणावयाचा तो वर्तमान स्थितीसच.

१५. सिनिक मताचा मानिमस[७] नामे एक तत्त्ववेत्ता जे म्हणत असे की, हे सारे वस्तुजात भासमय आहे, ते काही अंशी खरे आहे. त्यातले खरे इंगित मात्र मनुष्याने ध्यानात आणले पाहिजे.

१६. मनुष्याचा आत्मा अनेक प्रकारे आपले नुकसान करून घेतो. पहिला प्रकार असा की, विश्वरूप विराट देहावर तो एखाद्या व्रणाप्रमाणे किंवा टेंगळाप्रमाणे होतो. याचे कारण असे की, निसर्गात घडणाऱ्या कोणत्याही गोष्टीने खेद पावणे म्हणजे तेवढ्या अंशाने आपणास निसर्गाहून भिन्न मानणे होय आणि हे तर उघडच आहे की. एकंदर गोष्टीचे बीज निसर्गाच्या कोणत्यातरी एका भागामध्ये अंतर्भत झालेले असते. दूसरा नकसानीचा प्रकार असा की, तो एखाद्या मनुष्याचा द्वेष करतो; किंवा त्याला मारण्याच्या वगैरे उद्देशाने त्याजवर धावून जातो. असे वर्तन जो क्रोधवश होतो त्याजकडून घडते. तिसरा प्रकार असा की, सुखाच्या आशेने किंवा दुःखाच्या भीतीने त्याच्या ठायी चलबिचल होते. चौथा प्रकार असा की, नसती बतावणी करून काही बोलणे किंवा करणे ते तो मनापासून आणि खऱ्या भावाने करीत नाही. पाचवा प्रकार असा की, तो कोणतेही स्वतःचे कृत्य किंवा व्यापार काहीतरी उद्देश मनापुढे ठेवून करीत नाही आणि आपण काय करीत आहोत याचा पुरा विचारही करीत नाही. कारण

कोणतीही अत्यंत क्षुल्लक गोष्ट करावयाची असली तरी ती काहीतरी उद्देशाने करणे उचित आहे; आणि विवेकी प्राणी जो मनुष्य त्याच्या आचरणाचा उद्देश म्हणजे विवेक व अत्यंत पुरातन राजनीतीने विहित केलेल्या नियमांच्या अनुरोधाने आपले वर्तन ठेवणे हा होय.

१७. मनुष्याचे जीवित अगदी थोडा काळ टिकणारे असून, ते ज्या वस्तूचे बनले आहे ती वस्तू अत्यंत चल आहे. त्याची जाणीव मंद आहे आणि सर्व शरीराची रचना विगलित होण्यास पात्र आहे. आत्मा हा केवळ एक नित्य भ्रमण पावणारा भोवराच आहे. भाग्याचा तर भरवसा नाही आणि कीर्ती म्हणाल, तर ती विवेकशून्य आहे. ती योग्य मनुष्यासच नेहमी प्राप्त होईल असा नियम नाही. सारांश काय की, शरीराच्या संबंधाच्या म्हणून जेवढ्या गोष्टी आहेत तेवढ्या साऱ्या एखाद्या वाहत्या नाल्याप्रमाणे आहेत आणि ज्या गोष्टी आत्म्याच्या म्हणून समजतात त्या सगळ्या स्वप्नवत असून, केवळ भासमय आहेत. जीवित हा एक घनघोर संग्राम आहे किंवा तो एक प्रवासच आहे, असे म्हटले तरी चालेल. देहावसानानंतर जी कीर्ती होते ती मानवास काय होय? तिचे त्यास भानही उरत नाही. म्हणून ती झाली न झाली सारखीच. मग तर मनुष्याबरोबरच काय बरे येणार? त्याच्याबरोबर तत्त्वज्ञानावाचून दुसरे काही एक यावयाचे नाही. तेव्हा ते साध्य होण्यासाठी काय करावयाचे ते ऐका. आपल्या ठायीच्या दैवी अंशास कोणत्याही प्रकारचा उपाय किंवा त्रास होऊ देऊ नका. त्यास दुःखामुळे भय किंवा सुखामुळे मोह पडू देऊ नका. कोणतेही कृत्य सदुद्देशावाचून अथवा खोट्या भावाने करू नका. दुसऱ्याच्या आशेवर राहू नका. जेथून आपण आलो आहोत तेथूनच सर्व काही प्राप्त होत आहे, असा विचार करून जे जे काही आपणास घडेल किंवा आपल्या नशिबाने प्राप्त होईल त्याचा स्वीकार संतोषाने करा[८] आणि शेवटी मरणास आनंदाने तयार असा. कारण मृत्यू म्हणजे ज्या तत्त्वांच्या संमिश्रणाने आपण बनलो आहोत, ती केवळ निरनिराळी होणे होय[९]; परंतु एक तत्त्व पालटून त्यास दुसऱ्या तत्त्वाचे स्वरूप प्राप्त झाल्याने जर तत्त्वास काही एक उपाय घडत नाही, तर मग शेवटी ती सर्व तत्त्वे बदलून एकमेकांपासून विलग झाल्याबद्दल मनुष्यास का म्हणून भीती वाटावी बरे? कारण हा निसर्गक्रमच आहे. आणि जे निसर्गानुसार घडत असते ते कदापि वाईट नव्हे.[१०]

हे पुस्तक कार्ननटम[११]मध्ये असता लिहिले.

संदर्भ :

१. द्वेष तर कोणाचाच करू नये. तथापि दुर्जनापासून आपले काही एक नुकसान व्हावयाचे नाही हा समज घातक आहे. याकरिता अशा मनुष्यापासून राहवेल तितके दूर राहणे हे योग्य होय, तरी पण त्याच्या सुधारणुकीविषयी सतत झटत असावे हा आपला धर्म होय. त्याजबद्दल कदापि उदासीन राहू नये किंवा त्याच्या सुधारणेविषयी निराश होऊ नये.

२. आपली देहरचना व इंद्रियव्यापार यांच्या शोधावरून शारीर, इंद्रियविज्ञान, तुलनादर्शकशारीर, विकृतेंद्रियविज्ञान इत्यादी मोठ्या महत्त्वाची अनेक शास्त्रे निर्माण झाली आहेत आणि त्याजमुळे मनुष्यमात्राच्या सुखवर्धनास पुष्कळ साहाय्य झाले आहे. असे असताना अशा ज्ञानप्राप्तीविषयी व्यर्थ जिज्ञासा धरू नये, असले ग्रंथ फेकून द्यावे, हे म्हणणे योग्य नव्हे.

३. आपण कधी मरू याचा नेम नाही, हे खरे असले तरी देहाचा तिरस्कार करणे सुज्ञास मुळीच शोभत नाही. आरोग्यादी अनेक शास्त्रांचा विकास व फैलावा उत्तरोत्तर वाढत गेल्याच्या योगाने मनुष्याविषयी दिवसानूदिवस अधिकाधिक शाश्वती होत चालली आहे आणि असाच क्रम पुढे सतत बराच काळपर्यंत चालला तर या शाश्वतीचे प्रमाण जास्त वाढेल; परंतु वरील उपदेशाप्रमाणे निराश होऊन देहाचा तिरस्कार केला असता आयुष्याची मुळीच शाश्वती उरणार नाही. फार काय, आता जी कोठे थोडीशी आहे तीही दिवसानुदिवस नाहीशी होत जाईल. अशाच प्रकारचा खोटा व घातक उपदेश आमच्या देशातील अनेक धर्माच्या जनांनी करून देशाचा कसा सत्यानाश केला आहे हे आम्ही प्रत्यक्ष पाहतो आहोत. हे जग मिथ्या आहे, ते केवळ मायारूप आहे, रज्जूसर्पवत, भासमय आहे, देह केवळ पाण्याचा बुडबुडा आहे इत्यादी. मिथ्या गोष्टी लोकांच्या भोळ्या मनात भरवून त्यास विरक्त केले आणि जगातील प्रत्यक्ष सुखाला त्यास अंतरवून काल्पनिक सुखाची खोटी लालूच दाखवून त्यास वेडावून सोडले.

४. विद्युत्पात, पूर, वादळे, धरणीकंप, नाना तहेच्या रोगराई वगैरे अनिष्ट गोष्टी या कल्पनेप्रमाणे देवापासूनच घडतात; परंतु त्या अत्यंत अनिष्टकारक आहेत. तेव्हा जे म्हणून काही घडते ते सारे मनुष्यास कल्याणप्रद आहे, हे विधान खोटे आहे. वास्तविक पाहता देव जे काही करतो म्हणून म्हणतात, त्याच्या आड मनुष्यास सतत येऊन घडणाऱ्या गोष्टीस प्रतिबंध करून किंवा त्याचा ओघ पालटून नाशापासून आपले रक्षण करून घ्यावे लागते. यास उदाहरण मोठमोठ्या इमारतीचे विद्युत्पातापासून लोखंडाच्या तारेच्या योगाने आता कसे रक्षण करता येते हे सर्वास विदित आहेच. साधारण अशीच धारणा आपल्याकडेही आहे.

५. रोमन बादशाहीमध्ये रोमन हे अभिधान मोठे सन्मानसूचक असे. ते ज्यास प्राप्त होई त्याचे इतरांवर बरेच वर्चस्व असे. त्यास सर्व नमून वागत. आपल्या इकडे ब्राह्मण व क्षत्रिय यांचाही असाच दरारा पूर्वी होता.

६. थिओक्रेटस - (३७१-२८७)

७. ॲन्टिस्थेनिस ह्या सॉक्रेटिस शिष्याने स्थापन केलेला उपेक्षावाद वा सिनिसीज्मचा हा विचारवंत.

८. असे कधीही करू नये, तर जे घडत आहे त्याने मनुष्याचे सुखवर्धन होणारे आहे किंवा कसे याचा विचार करावा. ते सुखावह असल्यास बरे, नाही तर त्याचा प्रतिकार करावा हे विचारी मनुष्यास योग्य आहे. नशिबावर हवाला टाकून कधी कल्याण होणे नाही. नशिबावर अवलंबून राहणारी राष्ट्र, कुटुंबे, व्यक्ती ही नाशच पावणार, तर सदुद्योगावर अवलंबून राहणेच हिताचे होय.

९. शरीराच्या इंद्रियांचे व्यापार बंद होणे हा मृत्यू होय, असा सांप्रतच्या शास्त्रवेत्त्यांचा सिद्धांत आहे. शरीराची तत्त्वे निराळी होण्याला मरणानंतर बराच कालावधी लागतो.

१०. हा समज अस्वाभाविक होय. ज्या रोगाने मृत्यू प्राप्त होतो त्यामुळे कमी जास्त मानाने मनुष्यास वेदना झाल्याच पाहिजेत. मूर्च्छाच येऊन मनुष्य पडला तर त्यास काहीच वेदना होणार नाहीत; परंतु तोच जर त्यास धनुर्वात झाला तर त्यास फार वेदना सोसाव्या लागतील. वेदना होणे हे तरी निसर्गानसारच आहे. याकरिता वेदना भीतिदायक नाहीत हे म्हणणे केवळ भ्रममूलकच होय.

११. हे एक शहर होते. ते ड्यान्युप नदीच्या दक्षिण तीरावर वियेना शहराच्या पूर्वेस ३० मैलांवर होते. बादशहा मार्कोमानी लोकांशी लढत असता या शहरी तीन वर्षे होता असे म्हणतात.

सारांश टीप : या पुस्तकात शक्यतो सद्विचार व आचार यांचा उल्लेख केला आहे. सदाचाराविषयी आर्जव आहे. त्यात कठोर आज्ञा नाही व हे स्वसंस्कारार्थ लिहिलेले दिसत असले तरी वाचकांकडून सद्वर्तनाची अपेक्षा आहे.

○○○

पुस्तक तिसरे

१. आपले आयुष्य नेहमी क्षय पावत असून, हमेशा कमी कमी शेष राहत चालले आहे. इतकेच नव्हे, तर मनुष्य कितीही दीर्घकाळपर्यंत जगला तरी त्याची बुद्धी वस्तुज्ञानास क्षम अशी सदोदित राहून दैवी व मानवी ज्ञान संपादण्यास जेणेकरून साहाय्य होते अशी जी विचारशक्ती ती तरी कायम राहीलच असे खास सांगता येत नाही. कारण बुद्धीला चळ होऊ लागला असता क्षुधा, तृषा, खेद इत्यादी जे शरीरव्यापार त्यास काही एक प्रतिबंध व्हावयाचा नाही; परंतु तेणेकरून आपल्या जीविताचे सार्थक करण्याचे व आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावण्याचे सामर्थ्य अगदी नष्ट होते. त्याचप्रमाणे दृश्य वस्तूत भेदाभेद पाहणे, मनुष्याने येथील प्राणयात्रा आटोपून इहलोक त्याग करण्याची वेळ आली आहे किंवा नाही, या व अशा दुसऱ्या ज्या ज्या म्हणून गोष्टींचा निर्णय पूर्ण विकास पावलेल्या विवेकावर अवलंबून असतो त्यांचे परिज्ञान मानवाला होण्याचे साधन, बुद्धिभ्रंश झाला असता राहत नाही. तेव्हा तात्पर्य[१] काय की, आपण आपले कर्तव्य करण्याच्या संबंधाने त्वरा करावयाची ती प्रतिक्षणी मृत्यू समीप येत चालला आहे, म्हणूनच नव्हे, तर तो प्राप्त होण्यापूर्वी पुष्कळ काळ बुद्धीस भ्रंश होऊन वस्तुज्ञान होण्याची अडचण पडण्याचा संभव आहे म्हणून.

२ आपण आणखी नित्य असे पाहावे की सृष्टिक्रमानुसार निर्माण झालेल्या वस्तूंच्या अनुषंगाने ज्या गोष्टी घडतात, त्यात काही ना काहीतरी सुखकारक व चित्तवेधक असे असते. यास उदाहरण असे पाहा की, भाकर भाजली असता तिच्यावरचे काही भाग फुटलेले असतात. हे असे फुटावे म्हणून जरी भाकरी भाजणाराचा उद्देश नसतो तरी ते काही अंशी सुंदर दिसून क्षुधेचे उद्दीपनही करतात. दुसरा दाखला असा की, अंजिरे चांगली पिकली असता ती फुटून उघडतात, तेव्हा ती किती बरे सुरेख दिसतात? त्याचप्रमाणे धान्याची खाली लवलेली कणसे, सिंहाच्या भुवया, रानडुकराच्या तोंडावाटे निघणारा फेस वगैरे

दुसऱ्या पुष्कळ वस्तू निरनिराळ्या पाहिल्या असता जरी त्या इतक्या सुरेख दिसत नाहीत, तरी त्या निसर्गसिद्ध वस्तूंच्या अनुषंगाने असल्याकारणाने त्या त्यास शोभादायक होऊन चित्तास आनंदवितात. तेव्हा या विश्वात उत्पन्न झालेल्या वस्तुजाताचे वास्तव स्वरूप जाणण्याची शक्ती मनुष्याच्या ठायी असल्यास हर एक वस्तूच्या अनुषंगाने असणाऱ्या गोष्टी त्यास रमणीय वाटल्यावाचून राहणार नाहीत आणि म्हणूनच चिताऱ्याने किंवा मूर्तिकाराने काढलेल्या वनपशुंच्या चित्रांचे जबडे पाहून जशी त्यास मौज वाटते तद्वतच रानात संचार करणाऱ्या खऱ्याखुऱ्या हिंसक पशुंचे जबडे पाहूनही त्यास आनंद होणे साहजिक आहे. त्याचप्रमाणे वृद्ध स्त्री-पुरुषांच्या ठायीची परिपक्वता व सुरेखपणा ही त्यास दिसतील. तरुण जनांचे मनोरम रूप, तो कामवासनादी विकारविरहित अशा दृष्टीने पाहील. सारांश काय की, अशा प्रकारच्या गोष्टी प्रत्येक माणसास मनोरम वाटणे नाही. ज्यास निसर्गाचा व तद्वत व्यापारांचा खरा व दृढ परिचय घडला आहे त्यासच त्या तशा वाटतील.

३. हिपोक्रेटीस याने पुष्कळ लोकांचे रोग बरे केले; पण आपण स्वतःच शेवटी आजारी पडून मरण पावला. खाल्डियातील ज्योतिषांनी पुष्कळ लोकांच्या मृत्यूचे भविष्य केले आणि शेवटी स्वतःही मृत्युमुखी पडलेच. आलेक्झांडर, पाम्पीयस, सीझर इत्यादी महावीरांनी मोठमोठ्या नगरांचा समूळ नाश करून व हजारो-लाखो सैनिकांचा चुराडा करून शेवटी आपणही जीव सोडून गेले. हिराक्रिटस याने हे सर्व विश्व अग्नी प्रलयाने नाश पावणार आहे, अशाबद्दल अनेक तर्क करून शेवटी आपण स्वतः पोटात पुष्कळ पाण्याचा प्रवेश होऊन चिखलाने अगदी माखून जाऊन गतप्राण झाला. या सर्व गोष्टींचा अर्थ काय बरे? या जीवितरूपी नौकेत आरोहण करून बरेच प्रयाण करून तू आता तीरास प्राप्त झाला आहेस, तर तीतून बाहेर ये. आता हे जीवित सुटून जर तुला दुसरे जीवित प्राप्त होणार असेल, तर त्याजबद्दल चिंता करण्याची गरज नाही. कारण देवाच्या कृपेने ते सुयंत्र चालेल; परंतु हे जीवित आटोपल्यावर पुढील शुद्धीच मुळी नाहीशी झाल्यास सुखदुःखाच्या विकारांपासून तू मुक्त होऊन देहबंधनापासून सुटशील. कारण देह हा पार्थिव असून जडस्वरूप आहे; परंतु त्यातून मुक्त होणारा चित्स्वरूपी असून देवांश आहे.

४. जेणेकरून सार्वजनिक हित होण्याचा संभव आहे अशा गोष्टींचा विचार करण्याच्या प्रसंगाव्यतिरिक्त इतरांच्या संबंधाने विचार करण्यात आपल्या आयुष्याचा अपव्यय करू नको. अमुक मनुष्य काय करीत आहे, ते तो तसे का करीत आहे, तो काय बोलत आहे, त्याचे विचार किंवा बेत काय चालले आहेत इत्यादी गोष्टींचा विचार करण्यात गुंतून गेल्याने स्वत:च्या ठायीच्या नियामक शक्तीपासून म्हणजे विवेकापासून आपण भ्रष्ट होतो आणि दुसरे काहीतरी उपयुक्त काम करण्याची संधी आपण व्यर्थ दवडतो. म्हणून ज्यात काही एक अर्थ किंवा उद्देश नाही, अशा गोष्टीच्या विचारास आपल्या मनात बिलकूल येऊ देऊ नये. त्यातूनही विशेषतः फाजील चौकसपणा व द्वेषबुद्धी यास तर बिलकूल थारा देता कामा नये.

तू नेहमी अशा गोष्टींचा विचार करण्याची सवय करावी की, कोणी तुला तुझ्या मनात या वेळी काय चालले आहे म्हणून विचारले असता अमुक अमुक चालले आहे, असे काही एक न चोरता स्पष्टपणे तुला सांगता यावे. याप्रमाणे सांगताना तुझ्या बोलण्यावरून असे उघड व्हावे की, तुझे मन साफ व उदार असून, समाज करून राहणाऱ्या प्राण्यास असावे तसे ते अनुरूप आहे. आणखी त्यावरून असे दिसावे की, तुला इंद्रियादिकांच्या सौख्याची मुळीच पर्वा नसून, तुझ्या ठायी कोणाही विषयी द्वेषमत्सरादी कुवृत्ती वागत नाहीत. सारांश जे उघड बोलून दाखविले असता त्याची तुला लाज वाटेल असले काही एक तुझ्या मनात कदापि येऊ देऊ नको. ज्या मनुष्याच्या मनाची अशी इष्ट स्थिती होऊन जो सुसंगतीचा अविलंबे अंगीकार करतो तो देवाचा सेवक समजावयाचा. तो आपल्या ठायीच्या दैवी अंशाचा उपयोग करतो; येणेकरून त्यास सुखोपभोगापासून विकार होत नाही. दुःखानुभवाने त्यास काही एक इजा होत नाही. कोणी त्याची अवमानना केली असता त्याचे त्यास काही एक वाटत नाही. कोणाचे नुकसान करण्याची बुद्धी त्यास होत नाही. तो नेहमी सत्पक्षाचाच अभिमान धरतो. कोणत्याही कुवासनेचा त्याच्या मनावर अंमल चालत नाही. तो केवळ न्यायमूर्तीच असतो. जे जे म्हणून त्यास प्राप्त होईल ते ते आपणास केवळ नेमलेले आहे असे मानून त्याचा जीवेभावे तो स्वीकार करील आणि केवळ लौकिक कल्याणासाठी अगत्य पडल्यावाचून तो दूसरा काय करतो, काय बोलतो किंवा काय विचार करतो याजकडे तो मुळीच लक्ष देत नाही. कारण ज्या गोष्टींशी आपला अत्यंत निकट संबंध आहे त्याच गोष्टींचा विचार तो करतो. सर्व चराचर विश्वातील ज्या वस्तू आपणास प्राप्त झाल्या आहेत त्याचेच फक्त तो मनन करून आपले आचरण निर्मळ ठेवतो आणि जे आपणास प्राप्त झाले आहे ते चांगले आहे, अशी तो आपल्या मनाची समजूत करून घेतो. कारण तो असे समजतो की, आपले जे नशीब आहे ते आपल्याबरोबर नेहमी राहते, ते आपणास कदापि सोडून जात नाही. तो असे नेहमी ध्यानात वागवितो की, प्रत्येक विवेकी प्राणी आपला सजातीय बंधू आहे आणि सर्व मनुष्यजातीच्या कल्याणाची काळजी वाहणे हे मनुष्यस्वभावास अनुसरून आहे[३]. जो मनुष्य निसर्गानुसार निश्चितपणे वागतो त्याच्याच मताचा तो अवलंब करतो. सगळ्यांच्या मताकडे तो लक्ष देत नाही; परंतु जे निसर्गानुसार वागत नसतील, ते घरीदारी, दिवसारात्री कसे वागतात, त्यांचा स्वभाव कसा काय आहे, त्यांच्या हातून कोणत्या वाईट लोकांच्या संगतीने दुराचरण होते इत्यादी गोष्टी तो जाणतो. म्हणून अशा मनुष्यांनी केलेल्या स्तुतीची तो पर्वा मुळीच करीत नाही.

५. कोणताही उद्योग करावयाचा तो त्वां नाखुशीने, सार्वजनिक हिताकडे लक्ष दिल्यावाचून, चांगला विचार केल्यावाचून किंवा मोहवश होऊन करू नको. आपले विचार प्रकट करताना अलंकारिक भाषेचा मुद्दाम ओढूनताणून उपयोग करू नको[४]. बहुभाषीपणा टाकून दे. एकाच वेळी अनेक कार्ये हाती घेऊ नको. तुझ्या ठायी जो दैवी अंश आहे तो

सांगेल तसे वर्तन ठेव. आपल्या मर्दुमकीस व पोक्त वयास अनुरूप असा सदोदित वाग आणि हर एक राजकीय प्रकरणात वागताना मी रोमन असून, स्वदेशाचे कल्याण करण्याच्याच उद्देशाने राज्यकारभार चालविला पाहिजे असे ध्यानात ठेव. समरांगणातला योद्धा जसा वरिष्ठाचा हुकूम होताच आपल्या जिवाची आहुती देण्यास सिद्ध होतो तद्वत् त्वां आपले कर्तव्यकर्म करावयास सदा तत्पर असावे आणि युद्धप्रसंग आटोपल्यावर तो योद्धा जसा आपले काम सोडून घरी बसण्यास राजी असतो, त्याप्रमाणे त्वा आपल्या अधिकाराचा त्याग करण्यास सदा तयार असावे. नेहमी आनंदवृत्ती राहा. इतरांकडून साहाय्य किंवा शांती प्राप्त होण्याची अपेक्षा क्षणमात्रही करू नको. सारांश, मनुष्याने नेहमी आपल्या पायावर उभे राहण्यास झटावे, दुसऱ्याच्या आश्रयाची आशा करू नये.

६. मानवी जीविताच्या ठायी न्याय, सत्य, संयम, धैर्य इत्यादी सद्वृत्तीहून किंवा या वृत्तीच्या साहाय्याने सुविवेकानुसार आपल्या हातून घडणाऱ्या गोष्टीचे चित्तास जे समाधान वाटते त्याहून, किंवा जी स्थिती आपणास स्वेच्छेने नव्हे तर निसर्गानुसार प्राप्त झाली आहे, तीत समाधान मानून राहिल्याने जो एक प्रकारचा चित्तास आनंद होतो त्याहून विशेष चांगली अशी एखादी गोष्ट आढळल्यास तिचा त्वा जीवेभावे स्वीकार करून तिजपासून होणाऱ्या सुखाचा अनुभव खुशाल घे; परंतु तुझ्या ठायी जो दैवी अंश आहे, की ज्याच्या योगाने तृष्णांचे दमन होते, ज्याच्या साहाय्याने मनास होणाऱ्या सर्व भावनांचे सूक्ष्म परीक्षण होते, जो महासाधू सॉक्रेटीस याने म्हटल्याप्रमाणे इंद्रियविषयजन्य मोहापासून अलिप्त राहिला आहे आणि जो देवांचा सर्व प्रकारे अंकित होऊन मनुष्यजातीच्या कल्याणाची केवळ चिंता वाहतो, त्याहून जरकरिता तुला काही एक चांगले वाटत नसून हर एक वस्तू त्यापेक्षा लहान व कमी योग्यतेची वाटत असेल, तर आपल्या हृदयात त्याजहून दुसऱ्या कशासही थारा देऊ नको. कारण अन्य वस्तूकडे तुझे चित्त वळले असता जी वस्तू तुझे वास्तविक चित्त आहे तिजकडे तुझे दुर्लक्ष होऊन तिची खरी योग्यता तुझ्या ध्यानात येण्यास अंतराय होईल. लोकस्फीती, सत्ता, सुखोपभोग इत्यादी गोष्टींच्या पायी जे विवेकाच्या व व्यवहाराच्या दृष्टीने पाहता कल्याणप्रद आहे त्यास व्याघात व्हावा, हे काही रास्त नव्हे. कारण या गोष्टी वस्तुतः पाहता कितीही अप्रयोजक असल्या तरी त्यांचा मनुष्याच्या मनावर सहज पगडा बसून तो सन्मार्गापासून च्युत होतो, तर त्वा हर प्रयत्न करून कशाचीही पर्वा न करता जे विशेष प्रकारे चांगले असेल त्याची निवड करून ते स्वीकार. आता चांगली गोष्ट कोणती म्हणशील तर जीपासून काहीतरी वास्तविक कल्याण होते ती. याकरिता तुझ्यासारख्या विवेकी प्राण्यास ज्या गोष्टीने हित होईल तिचा अंगीकार कर; परंतु एखाद्या गोष्टीने फक्त तुझ्या जड देहासच उपयोग होण्यासारखा असेल, अशा गोष्टीचे खरे स्वरूप स्पष्ट बोलून दाखीव आणि या आपल्या मताचे प्रतिपादन सौम्यपणे करण्यास डगमगू नको. मात्र हा वस्तुस्वरूपनिर्णय करावयाचा तो विवेकशुद्ध पद्धतीने कर.

७. ज्या गोष्टीमुळे तुला आपले वचन मोडण्याचा प्रसंग येईल. जेणेकरून तुझा मानभंग होऊन कोणत्याही मनुष्याचा द्वेष करण्यास तू प्रवृत्त होशील, जेणेकरून इतरांविषयी तुझ्या मनात संशय येऊन आणि शिव्याशाप द्यावे असे तुला वाटेल, जेणेकरून ढोंगीपणाची वर्तणूक ठेवावी लागून दुसऱ्यापासून गुप्त ठेवाव्या लागणाऱ्या गोष्टींची लालसा तुझ्या चित्तात उद्भवेल अशी कोणतीही गोष्ट कल्याणप्रद आहे, असे तू कधीही मानू नको. आपली बुद्धी आणि विवेक ही ज्यास इतर सर्व वस्तूंहून उत्तम वाटतात, त्याच्या हातून काही एक भयंकर कृत्य घडत नसल्यामुळे त्यास उद्वेग पावण्यास मुळीच कारण नसते आणि त्यास एकांतवासाची किंवा पुष्कळ लोकांच्या समागमाचीही अपेक्षा नसते. त्यातूनही सगळ्यात मुख्य गोष्ट ही की, तो मरणाच्या प्राप्तीची इच्छा करीत नाही किंवा ते प्राप्त होण्याचा समय आला असता ते टाळण्याचा तो प्रयत्नही करीत नाही. हा आपला आत्मा देहाच्या बंधनात अल्पकाळ असो किंवा दीर्घकाळ असो, त्याची त्याला बिलकूल पर्वा नाही. याक्षणी त्यास मृत्यू प्राप्त झाला असता त्यास तो एखाद्या व्यवस्थितपणे व सभ्यपणे करण्यासारख्या कामास जसे तयार व्हावे त्याप्रमाणे तयार होईल. त्याच्या सर्व आयुष्यक्रमात त्यास चिंता म्हणून इतकीच राहील की, आपण बुद्धिमान प्राणी असून आपण शांतिमय समाजातील एक व्यक्ती आहोत. तेव्हा या दोन्ही स्थितीस अनुकूल अशा हर एक गोष्टीपासून पराङ्मुख करणारे विचार आपल्या हृदयात येऊ देता उपयोगी नाही.

८. ज्याचे मन सुशिक्षेच्या योगाने शुद्ध झाले आहे, त्याच्या ठायी तुला कोणताही अमंगळ किंवा अपवित्र प्रकार आढळणार नाही. कारण ते सर्व विकारापासून मुक्त झालेले असते. त्याजवर मृत्यूचा घाला केव्हाही पडला असता त्याचे जीवित अपूर्ण नसते. म्हणजे अर्थात त्याच्या जीविताचे सार्थक्य कधीच होऊन चुकलेले असते. शिवाय तो परावलंबी किंवा परवश नसून कशाशीही लोभमोहादी वृत्तींनी अत्यंत बद्ध झालेला नसतो, बरे तो त्यापासून अगदी अलिप्त असतो असेही नाही. जे सदोष असल्यामुळे छपवावे लागते असे काहीही त्याच्या ठायी आढळावयाचे नाही.

९. ज्या मानसिक शक्तीच्या साहाय्याने कोणत्याही गोष्टीविषयी बरे वाईट मत देण्यास आपण समर्थ होतो त्या शक्तीस अत्यंत पूज्य मान. निसर्गाशी आणि विवेकी प्राणी जो मानव त्याच्या स्थितिरीतीशी अत्यंत विसंगत असे एखादे मत तुझ्या नियामक अंशाच्या ठायी उद्भवणे किंवा न उद्भवणे हे या शक्तीवर सर्वस्वी अवलंबून आहे. या शक्तीच्या अनुकूलतेने विचार न करता कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्याची घातक सवय तीपासन मनष्य मक्त होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे तिच्या साहाय्याने मनुष्य इतर मानवांशी स्नेहाने वागून देवाच्या आज्ञेप्रमाणे वर्तन करतो.

१०. तात्पर्य काय की, इतर सर्व गोष्टींचा त्याग करून या ज्या थोड्याशा गोष्टी सांगितल्या आहेत त्यांचा स्वीकार कर आणि असे लक्षात ठेव की. मनष्याचे जीवित काय

ते वर्तमानकाळापरते आहे, म्हणजे अर्थात चालता क्षण काय तो तुझा आहे आणि इतर सर्व आयुष्याचा भाग एकतर गतकालीन आहे किंवा भविष्यकालीन असून, केवळ अनिश्चित आहे. तेव्हा मनुष्याचे वास्तविक जीवित अत्यंत अल्प असून, त्याने व्यापलेला पृथ्वीचा अंशही अत्यल्प आहे. देहत्यागानंतर उरणारी कीर्ती ही अल्पकालिक आहे आणि तीही बिचाऱ्या मनुष्यांच्या एकामागून एक येणाऱ्या पिढ्यांच्या आधाराने चालणार; पण ही माणसेही लवकरच मरणारी असून, त्यास त्या कीर्तिमान माणसाचे प्रत्यक्ष ज्ञान नसल्यामुळे ती त्याची कीर्ती थोडा वेळसुद्धा राहणे मुष्कील.

११. वर ज्या गोष्टी सांगितल्या त्याशिवाय आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली आहे, ती अशी - जी जी गोष्ट तुजपुढे येईल तिच्या स्वरूपाचा निश्चय किंवा तिची व्याख्या त्वा आपल्या बुद्धीप्रमाणे करावी. म्हणजे तुला तिचे वास्तविक स्वरूप काय आहे, तीत खरे तथ्य काय आहे व एकंदरीने पाहता ती कशी काय आहे इत्यादी प्रकार तुला स्पष्टपणे कळून तिला वास्तविक नाव काय द्यावे, ज्या दुसऱ्या गोष्टींच्या संयोगाने ती बनली असेल त्या निरनिराळ्या गोष्टीस काय नावे देता येतील हेही चांगले समजेल. कारण तुझ्या आयुष्यक्रमात जी जी गोष्ट तुजपुढे विचारास येईल तिची पद्धतवारीने व खरी खरी शहानिशा व परीक्षण करण्याने जशी मनास उन्नती प्राप्त होते तशी दुसऱ्या कशानेही होत नाही. अशा प्रकारे वस्तुमात्राकडे पाहताना नेहमी एकंदर विश्वस्वरूपाचा विचार मनात आणून प्रत्येक वस्तूचा काय उपयोग होत आहे, एकंदर विश्वाशी हर एक वस्तूचा कोणता संबंध आहे, तिचा मनुष्याच्या बऱ्यावाईटाशी काय संबंध आहे. कारण मनुष्य हा या पृथ्वीरूप महानगरीतील रहिवासी असून, इतर सर्व नगरे या महानगरातील केवळ निरनिराळ्या कुटुंबासारखी समजावयाची, त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तूचे स्वरूप काय, तिचे घटकावयव कोणते, तिचा जो आपणास अनुभव घडत आहे तो कोठवर राहणार व तिच्या संबंधाने आपल्या ठायी कोणती वृत्ती असावयास पाहिजे, उदाहरणार्थ सौम्यता, मर्दुमकी, सत्य, विश्वास, ऋजुपणा, समाधान इत्यादी वृत्तीपैकी कोणत्या वृत्तीचा ती विषय आहे वगैरे गोष्टींचा नित्य विचार करावा. सारांश, हर एक प्रसंगी मनुष्याने असे म्हणावे की, ही गोष्ट देवापासून प्राप्त झाली आहे. ती माझ्या नशिबीच होती किंवा ही केवळ यदृच्छायोगेंकरून घडली आहे किंवा ती आपल्याच एखाद्या सजातीयाकडून घडली असल्यास ती त्यास आपल्या स्वभावानुसार कसे वर्तावे याचे ज्ञान नसल्यामुळे त्याजकडून ती घडली आहे असे मानावे. मला या गोष्टी कळतात म्हणून मी त्याच्याशी बंधुत्व, परोपकार बुद्धी व न्याय यांच्या नैसर्गिक नियमानुसार वर्तन करीन; परंतु ज्या गोष्टींच्या संबंधाने म्या उदासीन राहावे, असे आहे त्यांच्या वास्तविक योग्यतेचा निश्चय करण्यास म्या झटावे.

१२. जी जी गोष्ट तू हाती घेशील ती करताना सद्विवेकाचा अवलंब त्वा मोठ्या गंभीरतेने, परम उत्साहाने व अत्यंत शांत चित्ताने करावा. आपल्या बुद्धीस कोणत्याही गोष्टीने मोह होऊ

न देता आपला दैवी अंश सदोदित शद्ध राखावा. तो असा की, तो पाहिजे तेव्हा सोडण्याचा समय आला असता काही एक हरकत वाटू नये. म्हणजे अर्थात देहावसानाचा प्रसंग केव्हाही प्राप्त झाला असता मनाची स्थिती अशी असावी की, कृत कर्माचा अनुताप किंवा खेद यास त्यात मुळीच वाव नसावा किंवा कर्तव्यकर्म न केल्याची हुरहुर लागलेली नसावी. ही एवढी गोष्ट त्वा करीत राहून कशाचीही आशा किंवा भय न बाळगता निसर्गानुसार आपल्या हातून घडणाऱ्या व्यापारात समाधान मानल्यास व प्रत्येक शब्द उच्चारावयाचा तो दृढ सत्यनिष्ठेने बिलकूल न डगमगता उच्चारिल्यास तू इहलोकी सुखाने नांदशील. या तुझ्या आचरणास अंतराय करण्यास कोणाही मनुष्याची ताकद नाही.

१३. ज्याप्रमाणे वैद्य लोकांपाशी प्रसंग पडला असता उपयोगी पडणारी शस्त्रसामग्री सदा जय्यत असते, तद्वत हर एक मानवी व दैवी गोष्ट नीटपणे समजण्यास व अत्यंत क्षुल्लकही गोष्ट करताना दैवी व मानवी गोष्टींचा संबंध कोणत्या प्रकारे निकट जुळलेला आहे त्याची आठवण करून देण्यास साधनीभूत असे सिद्धांत तुला अवश्य अवगत असले पाहिजेत. कारण मनुष्याच्या संबंधाची कोणतीही गोष्ट करताना दैवी गोष्टीचा विचार मनात वागत असल्यावाचून ती तुला नीट करता यावयाची नाही. त्याचप्रमाणे कोणतीही देवाच्या संबंधाची गोष्ट करताना मानवी संबंधाचे ज्ञानही आवश्यक होय, हे नीट लक्षात ठेव.

१४. वाटेल तिकडे विनाकारण भटकत राहू नको. कारण तुला आपल्या स्वतःच्या चरित्राची टिपणे, प्राचीन रोमन लोकांचे पराक्रम व जी पुस्तके तू म्हातारपणी वाचावयासाठी म्हणून राखून ठेवली आहेत त्यातले निवडक वेचे वाचण्यास तुला सवड मिळणार नाही. तेव्हा ज्या गोष्टी आपल्या आयुष्यक्रमात करण्याचे त्वां योजिले आहे त्या करण्याची त्वरा कर. व्यर्थ अशा पाशात गुरफटून जाऊ नको. स्वहिताची तुला पर्वा असल्यास ते साधण्याच्या प्रयत्नास, अंगी सामर्थ्य आहे तोपर्यंत लाग.

१५. चोरी करणे, शिवणे, विकत घेणे, शांत राहणे, आपले कर्तव्य कर्म जाणणे इत्यादी शब्दांचे अर्थ किती होतात हे लोकांस कळत नाही. कारण हे चर्मचक्षूंनी कळणारे नव्हे. त्यास निराळीच दृष्टी लागते.

१६. आता देह, आत्मा आणि बुद्धी याविषयी म्हणाल, तर सर्व प्रकारच्या भावना होणे हा देहाचा धर्म आहे. नाना प्रकारच्या तृष्णांचा आत्म्याशी संबंध आहे आणि बुद्धीचा तात्त्विक सिद्धांताशी संबंध आहे. वस्तूच्या दृश्य स्वरूपाचे भान मानवेतर प्राण्यांसही होते. तृष्णारूप पाशांनी बद्ध होऊन जाणे हा धर्म वन्यपशूचा तर आहेच; परंतु फलारीस, निरो अशांसारख्या केवळ सुखाभिलाषी मनुष्यांचीही तशीच स्थिती होती. ज्या वस्तू वरवरून सोयीच्या दिसतात त्या दाखवून देण्यापुरताच बुद्धीचा उपयोग म्हटला असता ज्यांची देवावर श्रद्धा नसून जे आपल्या देशाशी दगा करतात आणि जे एकांती अनन्वित कर्मे आचरितात त्यांजकडूनही तो होतो. तेव्हा याप्रमाणे काही गोष्ट सर्वांस सामान्य असता सत्पुरुषाच्याच ठायी कोणत्या

गोष्टी आढळावयाच्या त्या सांगतो. सत्पुरुष जो आहे त्यास जे जे म्हणून काही घडत असते व जे जे त्याच्या नशिबी नेमलेले असते त्याजविषयी त्यास संतोष व समाधान वाटत असते. आपल्या ठायीचा दैवी अंश तो सहसा भ्रष्ट होऊ देत नाही. नाना कल्पनातरंगांनी त्यास व्यग्रता प्राप्त होऊ न देता तो तो अंश शांत राखतो आणि त्याच्या अनुरोधाने नित्य वागतो. तो सत्याचा कधीही अपलाप करीत नसून त्याचे वर्तन सदैव न्यायास अनुसरून असते. कोणी मनुष्याने त्यास म्हटले की, तू साध्या सविनय व समाधानवृत्तीने आयुष्य क्रमीत नाहीस, तर त्याजबद्दल त्यास त्याचा राग येत नाही किंवा तो आपल्या मोक्षप्राप्तीच्या सत्पथांपासून मुळीच भ्रष्ट होत नाही. हा मोक्ष ज्यास साधणे असेल त्याने शुद्ध व शांत होऊन या जीविताचा त्याग करण्यास सदा तत्पर असावे आणि आपला जो दैवयोग असेल त्याचा पूर्ण समाधानाने स्वीकार करावा.

संदर्भ :

१. मनष्य जन्माचे खरे मूल्य.
२. जे जे आपणास प्राप्त होईल ते ते कोणी नेमलेलेच आहे असे मानून ते निमूटपणे स्वीकारावे हे म्हणणे अत्यंत घातक आहे. अशा प्रकारच्या विचाराबद्दल दुसऱ्या पुस्तकाच्या १७ व्या कलमातील पहिल्या टिपेत (म्हणजे मागच्या प्रकरणातील ८ नंबरचा संदर्भ) लिहिले आहे ते पाहावे.
३. निर्मळ आचरणसंहिता हवी.
४. या उताऱ्यातही सोफिस्टांना टोमणा आहे.

सारांश टीप : सॉक्रेटिस आणि इतर महापुरुषांविषयी आदरभाव व्यक्त केलेला आहे. मानवी जीवनाचे मूल्य अधोरेखित केले आहे. जीवन बुद्धिनिष्ठ व विवेकनिष्ठ असावे, भावनेसोबत वाहून जाऊ नये.

○○○

पुस्तक चौथे

१. आपल्या अंतर्यामीचा नियामक अंश जो विवेक तो निसर्गानुवर्ती असतो तेव्हा त्याच्या ठायी नित्य घडणाऱ्या गोष्टींविषयी इतकी आदराची बुद्धी वसत असते की, जे म्हणून शक्य व अनुभवास आलेले असते तद्नुकूल त्याचे स्वरूप बनते. त्यास म्हणजे जड पदार्थांचे साहाय्य पाहिजेच असे नाही[१]; परंतु त्याचा नेमलेला व्यापार काही विशेष स्थितीच्या अनुरोधाने होत असतो. ज्या जड वस्तूचा त्यास व्याघात होत असतो, त्याचाच विनियोग तो नियामक अंश आपल्या व्यापारात करतो. कसा, तर ज्याप्रमाणे अग्नी आत घातलेल्या पदार्थास जाळून टाकतो त्याप्रमाणे. हाच पदार्थ एखाद्या लहानशा दिव्यावर पडला असता तो त्यास विझवितो; परंतु अग्नी मोठा असतो तेव्हा तो त्यात घातलेल्या पदार्थास व्यापून जाळून टाकतो आणि या पेटणाऱ्या पदार्थाच्याच साहाय्याने त्याच्या ज्वाला उंचावर पोहोचतात.

२. कोणतीही गोष्ट हेतूवाचून करू नये आणि ती करताना तीस लागणाऱ्या कलेचे पूर्ण ज्ञान कर्त्यास अवगत असावे.[२]

३. मनुष्यास खेड्यापाड्यात, समुद्रतीरी किंवा डोंगरपठारीत निवासाची एकांत स्थले असावीशी वाटतात. तुलाही अशा स्थलांचा फार नाद आहे; परंतु हे अत्यंत सामान्य प्रकारच्या मनुष्याचे लक्षण आहे. तुझी गोष्ट अशी नाही. तुला वाटेल तेव्हा आपल्या अंतर्यामी लीन होऊन सर्व बाह्य संबंधापासून अलिप्त होण्याचे सामर्थ्य आहे. कारण आपल्या आत्म्याच्या ठायी लीन होण्यात जसे स्वास्थ्य व निर्घोरपणा आहे, तसे दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या एकांतवासात नाही. मात्र असे लीन होणाराचे विचार असे असावयास पाहिजेत की, त्याचे अंतर्दृष्टीने अवलोकन घडताच, तत्काल चित्तास पूर्ण शांती प्राप्त व्हावी. आता या शांतीचे स्वरूप काय म्हणून पुसाल तर मनाची सुस्थिती झाली म्हणजे तीच शांती होय. याहून दुसरी शांती नाही, हे खास समजावे. यास्तव सदोदित अशा आत्मिक एकांताचा

अवलंब करून आपल्या चित्ताचे संशोधन कर. ज्या सिद्धांताचे अवलंबन तुला करावयाचे ते संक्षिप्त व मूलभूत असावे. म्हणजे ते असे असावे की, त्यांचे मनन करताच तुझ्या आत्म्याची पूर्ण शुद्धी होऊन ऐहिक संसारातील हर एक गोष्टीविषयी तुझ्या मनात वेळोवेळी उत्पन्न होणाऱ्या असमाधानापासून तुझी मुक्ती व्हावी. नीट विचार करशील तर तुझ्या हृदयात कोणत्याही गोष्टीविषयी असमाधान उत्पन्न होण्यास बिलकूल कारण नाही. मनुष्याचा वाईटपणा तुझ्या असमाधानाचे कारण असल्यास असा एक सिद्धांत ध्यानात आण की, मनुष्यरूप विवेकी प्राणी हे एकमेकाच्या हितास्तव अस्तित्वात आले असून, ते जिवंत राहणे हे न्यायास अनुसरून आहे. मनुष्याकडून जे गैरवर्तन घडते त्यास त्याचा काही एक इलाज नसतो. शिवाय असा विचार कर की, कैक मनुष्ये परस्परांशी द्वेष, मत्सर, कलहादी करून मृत्यूच्या स्वाधीन होऊन भस्मसात झाली आहेत. या गोष्टी लक्षात आणून त्वां स्वस्थ व्हावे; परंतु कदाचित या विश्वातील ज्या गोष्टी तुझ्या वाट्यास आल्या आहेत त्याविषयी तू अतृप्त असशील असे असल्यास पुढील विचार मनात आण, तो हाच की, एक तर या विश्व योजना आहे किंवा ते यदृच्छायोगेकरून परमाणूसंघ होऊन घडले आहे. इतक्यानेही समाधान होणार नाही. तर हे जगत् एक मोठे राष्ट्रच आहे, असे ज्या युक्तींनी तत्त्वज्ञ सिद्ध करतात त्या ध्यानात आण आणि स्वस्थ हो; परंतु जड वस्तूंचा संबंध अद्यापि सुटत नाही म्हणून जर तू अस्वस्थ असशील, तर तुझे चित्त जड वस्तूंपासून अलिप्त होऊन त्यास स्वसामर्थ्याची ओळख पटली असता ते जड वस्तूपासून उद्भवणाऱ्या लहान-मोठ्या भावनातरंगांनी मुळी विकारच पावणार नाही. शिवाय सुखदुःखाच्या स्वरूपाविषयी जे त्वां ऐकून मान्यही केले आहे त्याचे स्मरण कर आणि स्वस्थ चित्त हो; परंतु तू कदाचित कीर्तीच्या आशेमुळे कष्ट पावत असशील, असे असल्यास प्रत्येक गोष्टीचा किती लवकर विसर पडतो ते पाहा. त्याचप्रमाणे वर्तमानकाळाच्या पूर्वी व पश्चात् काळ किती अमर्याद आहे व लोकस्तुती किती पोकळ आहे याचा विचार कर. आणखी जे आपली स्तुती करितातसे दिसतात त्यांची बुद्धी किती चंचळ असते व त्यांचे तारतम्य ज्ञानही किती कोते असते आणि त्यातूनही ही जी आपली कीर्ती होते ती किती संकुचित व मर्यादित स्थलापुरती पसरलेली असते इत्यादी गोष्टीचा विचार करून स्वस्थ हो. कारण ही पृथ्वी सर्व विश्वाशी ताडून पाहता केवळ बिंदुमात्र आहे. या बिंदूमध्ये मुझे वसतिस्थान कोठे कानाकोपऱ्यात असेल कोण जाणे. अशा अत्यंत सूक्ष्म स्थळी लोकतरी कितीसे असणार? बरे, त्यातूनही जे त्यापैकी आपली स्तुती करणार त्यांचा स्वभाव तरी कसा काय असेल याचा निश्चय कोणाला करवेल?

तेव्हा, शेवटी सांगावयाची गोष्ट एवढीच की, या आपल्या स्वतःच्या मालकीच्या चित्तरूप अवकाशात लीन होऊन कोणत्याही प्रकारे ते व्यग्र होऊ न देता सर्व गोष्टींपासून अलिप्त राहा आणि विश्वातील अखिल वस्तूंकडे पाहताना मी मानवी प्राणी या जगद्रूप नगरीचा रहिवासी असून, मला एक वेळ मरणे आहे असे लक्षात वागीव[३]; परंतु आणखी दोन गोष्टी तुझ्या

चित्तांत सदैव राहिल्या पाहिजेत. त्या कोणत्या त्या सांगतो, ऐक. एक गोष्ट अशी की, जड वस्तूंचा आत्म्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क नसतो. कारण त्या बाह्य असून अचल होत. तेव्हा चित्तास जे विकार होतात ते अंतःस्थ समजुतीमुळेच. दुसरी गोष्ट अशी की, तू ज्या या वस्तू पाहत आहेस त्या साऱ्या क्षणात बदलून नाश पावणाऱ्या आहेत. या अशा फेरफारांचा तुला जातीने किती अनुभव आहे याचे सतत मनन कर. सारांश, हे विश्व चलस्वरूप असून, जीवित केवळ मानीव पसारा आहे, हे उमज.

४. जर आम्हा मानवांच्या ठायीचे बुद्धितत्त्व सामान्य आहे, तर मग ज्या विचारास्तव आम्ही विचारी प्राणी बनलो आहोत, तोही सर्वांस साधारण आहे आणि अमुक एक गोष्ट कर किंवा करू नको, असे सांगणारा जो विवेक तोही सर्वांस सामान्य झाला. म्हणून आम्ही सर्व एकाच नियमाने बद्ध आहोत, असे म्हणावयास काही एक प्रत्यवाय नाही. यावरून पाहता आम्ही सर्व मानव एकमेकांचे देशबांधव झालो. मग सर्व जगत् हे एक राष्ट्रच आहे[४] असे मानण्यास काय हरकत आहे? कारण या जगद्रूप राष्ट्राव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या एकाच राष्ट्रातील ही सर्व मानवजाती रहिवासी आहे असे कसे म्हणता येईल बरे? याच सर्वसाधारण राष्ट्रांतून आपणास बुद्धी, विवेक व वर्तननियम ही प्राप्त झाली आहेत असे मानल्यावाचून गती नाही. ज्याप्रमाणे माझा पार्थिव अंश काही विशेष जमिनीतून मला प्राप्त झाला आहे, ज्याप्रमाणे उदकाचा अंश दुसऱ्या एका तत्त्वांतून प्राप्त झाला आहे आणि ज्याप्रमाणे तेजाचा अंश आणखी एका तत्त्वापासून प्राप्त झाला आहे, त्याचप्रमाणे बुद्धीचा अंश अशाच एका तत्त्वापासून मजला प्राप्त झाला आहे. कारण उघडच आहे की, अभावापासून भावरूप वस्तू निर्माण व्हावयाची नाही आणि भावरूप वस्तू[५] अभावाप्रतही कदापि पावावयाची नाही.

५. मरण हे जननाप्रमाणेच निसर्गाचा एक गूढ व्यापार आहे. याची मीमांसा मिळून इतकीच की, जनन म्हटले म्हणजे काही विवक्षित तत्त्वांचा संयोग होय आणि मरण म्हटले म्हणजे त्याच तत्त्वांचा वियोग समजावयाचा. तेव्हा या गोष्टीमध्ये मानवास भय किंवा लज्जा मानण्यासारखे काही एक नाही. कारण या गोष्टी विवेकी मानवाच्या स्वभावास किंवा देहादिकांच्या हेतुशुद्ध रचनेस मुळीच विरुद्ध नाहीत.

६. या गोष्टी मानवाच्या हातून घडणे हे स्वाभाविक असून, अगत्याचेही आहे. अशा गोष्टी आपणास घडू न देण्याविषयी मनुष्याने इच्छिणे म्हणजे अंजिराच्या वृक्षात रस असू नये असे इच्छिण्यासारखेच आहे. तेव्हा हे निश्चयाने लक्षात ठेव की, अगदी थोड्या काळातच तुला मरण येऊन लवकरच तुझे नावही मागे उरणार नाही.

७. आपल्या ठायीच्या मानीव गोष्टींचा त्याग कर म्हणजे तुला 'माझे नुकसान झाले' अशी कुरकुर करण्याची बिलकूल गरज उरणार नाही. ही कुरकुर नाहीशी झाली असता नुकसान मुळी उरतच नाही.

८. मनुष्य मूळचा आहे त्याहून वाईट ज्या गोष्टींनी होत नाही त्याच गोष्टींमुळे त्याच्या जीवितात बिघाड होण्याचा मुळीच संभव नसतो आणि तिजपासून त्यास अंतर्बाह्य काही एक इजा होत नाही.

९. सर्व विश्वाचे कल्याण जेणेकरून होते तेच, तुला जी एखादी गोष्ट अपायकारकशी वाटते ती घडण्यास कारणीभूत होते. तेव्हा विचार करून पाहता तिचा अपकारकपणा कोठे राहिला?

१०. जे काही घडत आहे ते न्यायाने घडत आहे आणि जर तू सूक्ष्म रीतीने अवलोकन करशील तर तुला ते तसेच आहेसे आढळून येईल. केवळ कार्यकारणपरंपरेने ज्या गोष्टी नित्य घडत आहेत त्यापुरताच हा नियम आहे असे समजू नको, तर सर्व चराचर विश्वातील व्यापार न्यायतत्त्वाने युक्त आहेत. यावरून पाहता हर एक गोष्ट जी या विश्वात घडत आहे तिला विधात्याने काही ना काहीतरी उपयोग म्हणून लावून दिला आहे, हे सिद्ध होते. याकरिता जे जे काही तुला करावयाचे ते हा विचार चित्तात वागवून करीत जा. तो विचार हाच की आपल्या सर्व व्यापाराचा परिणाम सर्व विश्वाच्या कल्याणास साधनीभूत होईल, असा असावा आणि मनुष्याचा चांगुलपणा म्हणून जो काही आहे त्यास ते व्यापार अनुरूप असावे.

११. जो तुझे नुकसान करतो किंवा करण्याची निदान इच्छा तरी धरतो त्याचा वस्तुमात्राविषयीचा जसा समज झालेला असतो तसा तुझा कदापि होऊ देऊ नको. तू त्याचे सत्यस्वरूप दृष्टीपुढे नित्य ठेव.

१२. मनुष्याने पुढील दोन नियमान्वये वर्तण्यास सदैव तत्पर असावे. एक नियम असा की, आपल्या ठायीचा नियामक अंश जो विवेक तो ज्या गोष्टी मनुष्यमात्राच्या हिताच्या म्हणून सांगेल त्याच फक्त करीत असावे. दुसरा नियम असा की, कोणी तुला खरा मार्ग दाखवून भ्रांतिमय विचारांपासून मुक्त करीत असेल, तर लागलीच आपले खोटे समज पालटण्यास तयार असावे; परंत हा असा मतांचा पालट नीट खात्री झाल्यावाचन करू नये[६] आणि तो करताना आपले आचरण विशेष न्याय्य किंवा सार्वजनिक हित वाढविणारे असे होण्याचा संभव आहे किंवा कसे ते नीट विचार करून पाहावे. केवळ मौजेखातर किंवा लौकिकासाठी म्हणून मतांतर करणे चांगले नव्हे.

१३. तुझ्या ठायी विवेक आहे ना? मग त्याचा उपयोग का करीत नाहीस बरे! कारण एवढ्या विवेकाचे काम नीट चालल्यास मग तुला दुसऱ्या कशाचीही अपेक्षा उरणार नाही.

१४. तू जो जीवमान आहेस तो केवळ अंशरूप आहेस[७] आणि ज्यापासून तू निर्माण झाला आहेस, त्यामध्ये तू अति लीन होणार आहेस. म्हणजे अर्थात सर्व विश्वाची इच्छाशक्ती म्हणून जी आहे तिशी, तुझे रूपांतर होऊन पुन्हा संयोग होईल.

१५. एकाच वेदीवर जसे होमद्रव्याचे परमाणू एका मागून एक पतन पावतात. तद्वत या विश्वाची राहटी आहे. तिजविषयी हर्षविषाद मानण्याचे किमपि प्रयोजन नाही.

१६. तू आपल्या सत्य सिद्धांतांचे अवलंबन करून विवेकास परमपूज्य मानशील, तर तू ज्यास आज एखाद्या पशूप्रमाणे किंवा वानराप्रमाणे भासत आहेस, त्यास अगदी अल्प अवकाशामध्ये देवाप्रमाणे वाटशील[८].

१७. आपणास हजारो वर्षे जगावयाचे आहे अशा समजुतीने वागू नको. मृत्यूचा तुजवर केव्हा घाला पडेल याचा नेम नाही. यास्तव जोपर्यंत तुझ्या देहात प्राण असून, तुला चांगले होण्याचे सामर्थ्य आहे तोपर्यंत अंगी चांगुलपणा आणण्याचा प्रयत्न कर.

१८. आपल्या शेजाऱ्याचे म्हणणे, आचार किंवा विचार काय आहेत, याची चौकशी न करता स्वतःचे आचरण न्याय्य व शुद्ध कसे होईल याचीच ज्यास नेहमी चिंता असते त्याच्या पाठीचा पुष्कळ त्रास चुकतो. अगेथान याने म्हटल्याप्रमाणे इतरांच्या दुराचारांकडे बघू नको, तर सन्मानाने नीट चाल. आड वाटेस जरासुद्धा पाऊल टाकू नको.

१९. आपल्या पाठीमागे आपली कीर्ती उरावी अशी उत्कट इच्छा ज्यास वाटत असते. तो असा विचार करीत नाही की, ज्याला ज्याला म्हणून त्याची आठवण राहणार आहे तो स्वतःही लवकरच मरण पावणार आहे. बरे त्यांच्यामागून जे येतील त्यांचीही तीच गती. असे होता होता शेवटी त्यांच्याविषयीची सर्व आठवण अगदी बुजून जाते; परंतु क्षणभर अशी कल्पना करू की, ज्याला त्याची आठवण राहणार ते अमर असून, त्याची आठवणही अमर राहील. असे झाले तरी मृत मनुष्यास त्यापासून काय फायदा? किंवा जे त्याच्या मागे जिवंत राहणार त्यांस तरी त्यापासून काय हित?[९]

२०. जे जे म्हणून काही कोणत्या ना कोणत्या प्रकारे तरी सुंदर असते ते जात्याच सुंदर असते आणि त्याचा शेवटी लयही स्वतःच्या ठायीच होतो. त्याचा स्तुतीशी अर्थाअर्थी काहीएक संबंध नसतो. तेव्हा एखाद्या वस्तूची वाखाणणी झाल्याने तीत बरा-वाईट काही एक फरक होत नाही. सामान्य लोक ज्यास सुंदर म्हणतात, त्या वस्तूविषयीही हाच विचार समजावा. उदाहरणार्थ मोठमोठाल्या हवेल्या घ्या किंवा कलाकौशल्याची नाजूक कामे घ्या. जे जात्याच सुंदर असते त्यास दुसऱ्या कशाचीही अपेक्षा नसते. सत्य, न्याय, परोपकार, विनय इत्यादी सद्‌वृत्ती वाखाणणीने विशेष सुंदर होतात किंवा अवहेलनेने विशेष वाईट होतात अशांतला मुळीच अर्थ नाही. हिरे, माणके, सोने, हस्तिदंत, फुले वगैरे पदार्थ स्तुती न केल्यास कधी बिघडल्याचा कोणास अनुभव आहे काय?

२१. आता कोणी असा प्रश्न करील की, आत्मे अमर राहतात म्हणावे तर त्यांचे हवेच्या तत्त्वांमध्ये अनादिकालपर्यंत अस्तित्व कसे राहते. यास उत्तर अगदी थोडे आहे. असे पाहा की, आज एवढ्या काळापासून जमिनीमध्ये जी प्रेते पुरलेली आहेत त्या सर्वांचा पृथ्वीमध्ये कसा बरे समावेश झाला आहे? या प्रश्नाचे उत्तर कोणीही असे देईल की, जमिनीत पुरलेली प्रेते सडून त्यांच्या घटकतत्त्वांचे पृथक्करण होऊन नव्या नव्या प्रेतांस नेहमी जागा होत असते, अशीच गोष्ट आत्म्यांचीही आहे. देहावसान झाल्यानंतर आत्मे हवेत उत्सर्ग पावतात.

तेथे ते काही वेळ राहून त्यांचे पृथक्करण होते आणि पुढे त्यास तेजस्वरूप प्राप्त होऊन ते विश्वाच्या चिच्छक्तीमध्ये पुनः लीन होतात. याप्रमाणे हवेत येऊन राहणाऱ्या नव्या नव्या आत्म्यास अवकाश मिळतो. एवढेच उत्तर आत्मा देहावसानानंतर राहतो कसा या प्रश्नाचे देता येईल.[१०] हा विचार झाला फक्त जमिनीत पुरलेल्या प्रेतांचा; परंतु जे प्राणी आमच्या किंवा इतर प्राण्यांच्या खाण्यात येत आहेत त्यांच्या देहांची वाट काय होते? याचा विचारही अवश्य केला पाहिजे. कारण अशा प्रकारे दुसऱ्या प्राण्यांच्या पोटात पचल्या जाणाऱ्या प्राण्यांची संख्या काही थोडीथोडकी नाही. आता हा विचार तरी फारसा कठीण आहे असे नाही. अशा प्रकारे दुसऱ्यांच्या जठरात पचन पावणाऱ्या प्राण्यांच्या देहाचे, भक्षक प्राण्याच्या रक्तादिकांमध्ये संमेलन होऊन त्यांचा उत्सर्ग पृथ्वी, तेज, वायू इत्यादी तत्त्वांमध्येच अंती होतो.

या एकंदर विषयाचा सत्यनिर्णय म्हणून इतकाच की, सर्व विश्वाचे विभाग काय ते दोन. एक जड वस्तूंचा आणि दुसरा हे चराचर विश्व. जेणेकरून भिन्न भिन्न आकार पावले आहे त्याचा. (पुस्तक ७ वे कलम २९ पाहा)

२२. विनाकारण भ्रांतिजालात गुरफटून जाऊ नको. जी जी गोष्ट तू करशील तीत न्यायास अनुसरून वाग आणि कोणत्याही गोष्टीचे ज्ञान करून घेताना आपल्या बुद्धीची आकलनशक्ती चांगली साफ राख. म्हणजे अर्थात् हर एक गोष्टीचे खरे निश्चित ज्ञान प्राप्त करून घेण्यास आळस करू नको.

२३. हे विश्वा, जे जे म्हणून काही तुझ्या स्वभावास अनुसरून आहे त्या सर्वांचा मजशीही अविरोध आहे. जे काही तुझ्या नियमानुसार योग्य काळी घडत आहे ते मला उशिरा किंवा लवकर प्राप्त झाले असे मी सहसा म्हणणार नाही. हे निसर्गा, तुझ्या ऋतुक्रमाप्रमाणे जे मला प्राप्त होईल, ते सारे मी परिपक्व फलाप्रमाणे मानीन. तुजपासून अखिल वस्तुजातीचा उगम असून, त्यांची स्थिती आणि लय ही तुझ्याठायीच आहेत.

२४. तुजला शांतीची अपेक्षा असेल तर अगदी थोड्या गोष्टीत आपले मन घाल. जेवढ्या गोष्टी आवश्यक असतील तेवढ्याच करावयाच्या आणि आपण विवेकी प्राणी असून, एकमेकांच्या सहवासाने राहणारे आहोत हे तत्त्व ध्यानात वागवून त्यास अनुकूल अशा गोष्टी आपणास करणे आहे, असा विचार करावा. अशाने ज्या गोष्टी करावयाच्या त्या चांगल्या होऊन आणखी व्यर्थ दगदगही कमीच पडते. शिवाय अनावश्यक गोष्टीत कालक्षेप मुळीच न झाल्यामुळे विश्रांतीही बरीच मिळते. तेव्हा एकंदरीत काय की, प्रत्येक गोष्ट करताना ती आवश्यक आहे काय, याचा निश्चय प्रथम करावा. इतकेच नव्हे तर अनावश्यक विचारांचा मनातसुद्धा प्रवेश होऊ देता कामा नये. कारण उघडच आहे की, अनावश्यक विचारांमुळे अनावश्यक आचारांकडे सहजी प्रवृत्ती व्हावयाची.

२५. या अखिल विश्वातील स्वतःस प्राप्त झालेल्या अंशानेच तृप्त असून, स्वतःच्या न्याय्य आचरणाने आणि परोपकारी स्वभावाने पूर्ण समाधान पावणारा असा जो सत्पुरुष त्याच्या चरित्राचे आपल्याकडून होईल तेवढे अनुसरण करण्याचा प्रयत्न करावा.

२६. प्रत्येक गोष्टीच्या दोन्ही बाजू पाहाव्यात. विनाकारण चित्तास संताप करून घेऊ नको. आपले आचरण अगदी साधे सरळ ठेव. तुझे कोणी नुकसान केल्यास असा विचार कर की, तो असे करण्याने स्वतःचेच नुकसान करीत आहे. तुला कोणतीही बरीवाईट गोष्ट घडल्यास असे ध्यानात आण की, या विश्वात जे जे म्हणून काही घडत आहे ते सारे प्रारंभापासूनच ठरलेले व योजलेले असल्याकारणाने याजबद्दल हर्षविषाद मानण्यास मुळी अवकाशच उरत नाही. एकंदरीत काय की, तुझे जीवित अत्यल्प आहे. तस्मात् आपल्या वर्तमान स्थितीचा विवेक व न्याय यांच्या साहाय्याने चांगला उपयोग करून घे आणि विश्रांतीसमयी सर्व प्रकारच्या अनियमित आहार विहारांपासून दूर राहा.

२७. एक तर या विश्वात चांगली व्यवस्था असावी, अगर काहीतरी घोटाळा यदृच्छेने एकत्र झाला असावा; परंतु हा सारा पसारा आहे तर खरा. आता असा विचार कर की, काही व्यवस्था तुझ्या ठायी मात्र विद्यमान असावी आणि ती अखिल विश्वात नसावी हे संभवते तरी कसे? सर्व वस्तू परस्परांपासून अत्यंत विलग असून, त्या कशातरी एकमेकात मिसळून सुव्यवस्थित स्वरूप पावल्या असे कोण म्हणेल?

२८. मनुष्याचे स्वभाव निरनिराळे आहेत. त्यातले काही येथे सांगतो. घातक, नामर्दपणाचा, हट्टी, पशुतुल्य, बालिश, मूर्खपणाचा, ढोंगी, फटकळ, कपटी, जुलमी इत्यादी होत.

२९. ज्याला या विश्वात काय आहे ते ठाऊक नाही, त्यास जर नवखा मनुष्य म्हणावयाचे तर मग ज्यास विश्वात काय चालले आहे ते कळत नाही त्यासही नवखा म्हणण्यास काय हरकत आहे? अशा मनुष्यास सामाजिक बंधने झुगारून देऊन समाजापासून तुटून उच्छृंखलपणे वागणाऱ्या मनुष्याची उपमा द्यावयाची. जो मनुष्य आपले ज्ञानचक्षू उघडून पाहत नाही त्यास अंध म्हणावयाचे. जीवनास लागणाऱ्या सर्व चिजांसाठी ज्यास दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते त्या ज्यास स्वकष्टाने प्राप्त होत नाहीत, अशा मनुष्यास दरिद्री म्हणावे. ज्या गोष्टी मनुष्यास घडतात त्याविषयी असंतुष्ट होऊन सर्वसाधारण निसर्गापासून त्याने आपणास विलग मानल्यास तो या विश्वरूप विराट देहावर एखाद्या टेंगळाप्रमाणे समजावयाचा. वस्तुतः त्याने असा विचार करावयास पाहिजे की, ज्या निसर्गाने आपणास निर्माण केले आहे त्याच निसर्गापासून आपणाला अप्रिय वाटणाऱ्या वस्तूंचा उद्भव आहे.

३०. कित्येक तत्त्वविचारी पुरुष असे झाले आहेत की, त्यांस अंगभर वस्त्रही मिळत नसे. कित्येकास तर वाचावयास धड एखादा ग्रंथही मिळू नये, अशी त्यांची स्थिती होती. काही जणांस मध्यान्हीची पंचाईत असे; परंतु त्यांचे आचरण नेहमी विवेकशुद्ध असे. काही

जणांची विद्वत्ता प्रचंड असूनही त्यांचा चरितार्थही चालण्याची मुष्कील असे; परंतु त्यांचे आचरण कधीही विवेकभ्रष्ट झाले नाही.

३१. ज्या कलेचा त्वां अभ्यास केला असेल ती कला अत्यंत प्रिय मानून समाधान पाव आणि आपले असे जे काही असेल त्याचा भार देवांवर सर्व भावे टाकून शेष राहिलेले जीवित घालीव. कोणत्याही मनुष्यावर जुलूम करू नको किंवा कोणाचाही मिंधा गुलाम होऊन जाऊ नको.

३२. निरनिराळ्या काळच्या लोकस्थितीचा विचार करून मनुष्याचे जीवित किती क्षणभंगुर आहे हे नीट ध्यानात आण. प्रत्येक काळी बहुतकरून तू पुढील स्थिती पाहशील. काही लोक विवाह करून प्रजोत्पत्ती करताहेत, काही लोक आजारी पडून मरताहेत, काही जण लढाया लढताहेत, कोणी मेजवान्या करून मजा मारताहेत, कोणी व्यापारउदीम करताहेत, कोणी नांगरणी, पेरणी करताहेत, कोणी दुसऱ्याची हांजीहांजी करताहेत, कोणी गर्वाने ताठून गेले आहेत, कोणी दुसऱ्याविषयी मनात वहीम बाळगून फंदफितूर करताहेत, कोणी आपल्या शत्रूचा घात इच्छित आहेत, कोणी चालू स्थितीविषयी कुरकुर करीत आहेत, कोणी परस्परांवर प्रीती करण्यास दंग झाले आहेत, कोणी अर्थसंचय करण्याच्या खटपटीत चूर होऊन गेले आहेत, कोणी आपणास मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळाव्या म्हणून प्रयत्न करीत आहेत, कोणी तर राज्यपद प्राप्तीविषयी झटत आहेत. याप्रमाणे नानाविध व्यवहारांमध्ये लोक निमग्न झालेले असतात; परंतु इतक्या सर्वांपैकी कोणी अमर झाले आहेत काय? नाहीत. सर्व मृत्युमुखी पडले आहेत. ही स्थिती एकाच काळाची किंवा एकाच स्थळाची नव्हे, तर सर्व काळी व सर्व स्थळी हाच अनुभव आला आहे. मोठमोठे बेत करणारे व पराक्रम करणारे केव्हाच पार धुळीस मिळून गेले आहेत. त्यातूनही मुख्यत्वेकरून जे अप्रयोजक गोष्टीत आपले मन घालतात आणि आपल्या स्वभावास अनुसरून अशा ज्या गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत त्याविषयी जे हेळसांड करतात त्यांचा विचार कर. येथेही एक गोष्ट जरूर लक्षात ठेवली पाहिजे की, प्रत्येक गोष्टीकडे ज्या मानाने तू लक्ष देशील त्या मानाने तीत महत्त्व व फायदा आहे. यास्तव अगदी अवश्य तेवढ्या थोड्याशा गोष्टींकडे लक्ष दिले असता तुझ्या चित्तास असमाधान होणार नाही.

३३. असे पाहा की, जे शब्द एका काळी लोकांच्या अगदी परिचयातले होते ते आता जुनाट होऊन बहुतेक उपयोगातूनही गेले आहेत. अशीच गत पुरातनकाळी प्रसिद्धीस आलेल्या पुरुषांच्या नावाची झाली आहे. कॅमिलस, लिओनेटस वगैरे कीर्तिमान पुरुषांची नावे आता जुनी होऊन गेली आहेत. अशीच स्थिती काही काळाने सिपिओ, केटो, आगस्टस्, हेड्रिअन, ॲन्टोनिनस इत्यादी अलीकडील महाविख्यात पुरुषांचीही व्हावयाची. कारण या विश्वात सर्व वस्त क्षणात नाहीतशा होऊन केवळ नामशेष मात्र होत आहेत आणि पुढे लवकरच त्यांजविषयी पूर्ण विस्मृती होत आहे. ही स्थिती साधारण मनुष्याचीच

होते असे नव्हे, तर ज्यांनी मोठमोठाले पराक्रम करून जगास अगदी थक्क करून सोडले आहे अशा महाकीर्तिमान पुरुषांचीही अवस्था हीच आहे. सामान्य लोकांचे तर देहावसान होताच त्यांचा येथला संसार आटपतो. त्यांचे कोणी नावही मागे काढीत नाही. बरे कोणाची आठवण अगदी अक्षय राहिली समजा; पण तिचा उपयोग काय? काही एक नाही असे आहे. त्यापेक्षा आपण कोणत्या गोष्टीविषयी विशेष आस्थेने खटपट करावी म्हणाल, तर सांगतो ऐका. आपले विचार न्याय्य असावेत, कृती समाजस्थितीस अनुकूल अशी असावी. असत्य वाणी कधीही मुखावाटे निघू देऊ नये आणि जे जे काही घडत आहे ते सारे आवश्यक व नेहमीचेच असून, एकाच तत्त्वापासून व उगमापासून प्राप्त होत आहे, असे ध्यानात आणून त्याचा आनंदाने स्वीकार करावा.

३४. आपल्या दैवावर सर्वस्वी भरवसा ठेव. त्याच्या योगेकरून जी काही स्थिती तुला प्राप्त होईल तिचा तू मुकाट्याने अंगीकार कर.

३५. ज्याविषयी आठवण ठेवावयाची ते व जे आठवण ठेवणार ते, ही दोन्ही क्षणभंगुर आहेत.

३६. असे सतत पाहत जा की, ज्या सर्व काही गोष्टी घडत आहेत, त्या पूर्वीच्यात फेरफार होऊन घडत आहेत. आणखी असा विचार चित्तांत वागीव की, निसर्गास जर कोणती गोष्ट आवडत असेल तर ती हीच की, असलेल्या वस्तूत पालट करून नव्या तशाच निर्माण कराव्यात, यावरून पाहता जे जे म्हणून आज अस्तित्वात आहे ते सारे पुढील वस्तूंचे बीज आहे असे उघड होते. असा वास्तविक प्रकार असता जमिनीत किंवा मातेच्या उदरात असलेल्या बीजापलीकडे तुझा विचारच जात नाही, हे केवळ अज्ञान होय.

३७. तू केव्हा मरशील याचा नेम नाही. असे असता तुझ्या वर्तनात अजून साधेपणा येत नाही, तुझ्या चित्ताची तळमळ जात नाही, बाह्य वस्तूंकडून आपणास इजा होईल अशा विषयीची शंका तुझ्या हृदयातून अद्यापि निघाली नाही, तुझ्या अंतःकरणात अद्यापि सर्वाविषयी ममता वागू लागली नाही, न्याय्य रीतीने वर्तण्यातच फक्त आपल्या बुद्धीचा विनियोग तुजकडून होऊ लागला नाही, हे काही चांगले नव्हे.

३८. मनुष्यमात्राच्या व त्यातूनही प्रबुद्ध पुरुषांच्या वर्तनाचे नियमन कोणत्या तत्त्वांनी होत आहे याचा तपास कर. ते कोणत्या गोष्टींचा अव्हेर करतात व कोणतीचा अंगीकार करतात हे नीट पाहा.

३९. तुला जे अनिष्ट असे वाटते ते अल्प मनुष्याच्या नियामक तत्त्वांमध्ये असत नाही आणि जड देहाच्या फेरफारामध्ये व रूपांतरामध्येही ते असत नाही, तर मग जे तुला अनिष्ट वाटते ते कोठून? याचे समाधान असे आहे की, चित्ताच्या ज्या अंशामध्ये अनिष्ट गोष्टींविषयी कल्पना उद्भवतात त्यात त्याचा उगम आहे, तर या अंशाकडून अशा प्रकारच्या कल्पना होऊ न दिल्यास सर्व काही ठीक होईल. हे शरीर छिन्नभिन्न झाले किंवा जळून पोळून गेले

किंवा ते कुजून सडून गेले तरी अशा गोष्टींविषयीच्या भावना ज्या चिदांशामध्ये उद्भवतात, तो स्थिर निश्चल राखावा. म्हणजे अर्थात असा विचार मनात आणावा की, जे सज्जनास व दुर्जनासही सारखेच घडते, ते बरे किंवा वाईट आहे असे म्हणवत नाही. कारण उघडच आहे की, जो निसर्गाविरुद्ध वागतो त्यास व जो निसर्गानुसार वागतो त्यास या उभयतांसही जे सारखेच घडते ते निसर्गानुसारही नव्हे किंवा निसर्गाविरुद्धही नव्हे.

४०. हे विश्व एक चैतन्यविशिष्ट प्रचंड वस्तू असून, त्याची घटना एकाच पदार्थापासून झाली आहे व त्याचा आत्माही एकच आहे. तेव्हा सर्व गोष्टींचा संबंध या विश्वरूप विशाल प्राण्याशी कसा काय आहे, त्याच्या निरनिराळ्या चलनवलनाबरोबर कशा असंख्य गोष्टी घडत आहेत, हर एक गोष्टीचा एकंदर गोष्टींशी कसा काय कार्यकारण संबंध आहे आणि सर्व चराचर वस्तुजाताचे व्यापार कसे एकमेकांशी कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे सलग्न आहेत, इत्यादी गोष्टींचे चांगले अवलोकन कर.

४१. एपिक्टेटस म्हणत असे त्याप्रमाणे तू देहधारी केवळ लहानसा आत्मा आहेस.

४२. या विश्वातील समग्र वस्तुजातात फेरफार झाल्यास काही एक अनिष्ट नाही आणि असा फेरफार झाल्याच्या योगाने कोणतीही वस्तू अस्तित्वात आल्याने त्यांत काही इष्टानिष्ट मानण्यासारखेही नाही.

४३. काल हा एक घडणाऱ्या गोष्टींचा बनलेला नद असून, त्याच्या प्रवाहाचा वेग प्रचंड आहे. कारण एखादी वस्तू दृष्टीस पडली न पडली तो ती नजरेआड होऊन तिच्या जागी दुसरी येते आणि काही वेळाने तीही निघून जाते, असा प्रकार अगदी अप्रतिहतपणे चालला आहे.

४४. मनुष्यास जी जी गोष्ट घडत आहे ती वसंत ऋतूत फुलणाऱ्या गुलाबाच्या फुलाप्रमाणे किंवा ग्रीष्म ऋतूत परिपक्व होणाऱ्या एखाद्या फलाप्रमाणे चांगली परिचित आहे. रोग, मृत्यू, निंदा, लबाडी वगैरे ज्या गोष्टींनी मूर्खास हर्ष किंवा विषाद वाटतो त्या साऱ्या मनुष्याच्या चांगल्या परिचयातल्या गोष्टी आहेत.

४५. या निसर्गात ज्या गोष्टी एकामागून एक घडत आहेत त्यांचा कार्यकारणसंबंध सुव्यवस्थित आहे. ही जी एक वस्तुसंघाची दुसऱ्या वस्तुसंघाशी कार्यकारण परंपरेने सांगड जुळलेली आहे ती केवळ तशी अवश्य असली पाहिजे म्हणूनच नव्हे, तर ती विचारपूर्वक जुळलेली आहे; आणि ज्या अर्थी सर्व गोष्टींचा परस्परांशी सुसंगत संबंध जुळलेला आहे त्याअर्थी कालक्रमानुसार अस्तित्वात येणाऱ्या गोष्टींची कार्यकारण परंपराच फक्त दृष्टोत्पत्तीस येत नाही, तर त्यांचा परम विस्मयावह संबंधही दृष्टिगोचर होतो.

४६. हेराक्लिटस जे सांगे ते चांगले ध्यानात ठेव. तो म्हणे की, या पृथ्वीचा मृत्यू म्हटला म्हणजे तिला उदकरूप प्राप्त होणे हा होय. या उदकाचे मरण वायुरूप पावून व्हावयाचे आणि वायूचा नाश अग्नीरूप पावून व्हावयाचा आणि पुन्हा पृथ्वी निर्माण होताना यांच्या क्रमाच्या उलट व्यवस्था व्हावयाची.[११] आपण जो मार्ग स्वीकारला आहे तो आपणास

कोणीकडे नेईल याचा विचार करण्याचे विस्मरण मनुष्यास वारंवार होते. त्याचप्रमाणे ज्या विवेकावाचून आपले क्षणभरही चालावयाचे नाही; फार तर काय; पण ज्या या विवेकाच्याच योगाने समग्र विश्वाचे नियमन होत आहे, त्याच्याविरुद्ध मनुष्ये नेहमी वागतात. ज्या वस्तूंशी त्यांचा नेहमीचा परिचय आहे. त्या वस्त त्यांस विलक्षण भासतात. एखाद्या निद्रिताप्रमाणे आपण बोलता चालता उपयोगी नाही, तर नेहमी सावध व हुशार असावे. त्याचप्रमाणे पितृपुत्रपरंपरेने समजलेल्या गोष्टींप्रमाणेच बोलण्यात किंवा वागण्यात काही एक अर्थ नाही, तर त्या गोष्टींचा सत्यासत्यत्वाचा निश्चय विवेकाच्या साहाय्याने करावा.

४७. जर तुला कोणी एखाद्या देवाने सांगितले की, तू उद्या किंवा परवा मरशील, तर त्याजबद्दल तुला फिकीर करण्याची काही एक गरज नाही. ही फिकीर कोणाला? तर जो अत्यंत नीच स्वभावाचा माणूस आहे त्याला. वास्तविक पाहता मरण केव्हाही आले तरी सारखेच. मग ते उद्या प्राप्त होवो किंवा मरणाच्या इच्छेस येईल तेवढ्या वर्षांनी होवो.

४८. किती मोठमोठाले वैद्य, रोगी माणसांच्या प्रकृती पाहून पाहून व चिकित्सा करून करून शेवटी स्वतः मरण पावले आहेत? किती फलज्योतिषी दुसऱ्यांच्या मरणाचे मोठ्या आढ्यतेने भविष्य करून व किती तत्त्ववेत्ते मृत्यूवर किंवा आत्म्याच्या अमरत्वावर वाद-प्रतिवाद करून शेवटी पंचतत्त्वास मिळाले आहेत? किती वीर हजारो सैनिकांचा संहार करून आणि किती जुलमी राजे स्वत: केवळ अमर आहोत अशाच जणू काय भावनेने इतर मानवावर पराकाष्ठेच्या उद्धतपणाने सत्ता चालवून शेवटी मृत्युमुखी पडले आहेत आणि त्याचप्रमाणे हेलिस, पाम्पी व हरक्लेनम इत्यादी असंख्य अत्यंत प्रसिद्ध नगरे अगदी धुळीस मिळून त्यांचा आज नायनाट झाला आहे. या गोष्टींचा विचार कर. तुझ्याच माहितीतली किती माणसे एका मागून एक विलयास गेली आहेत बरे? एक मनुष्य दुसऱ्या मृत मनुष्यास पुरून घरी येतो तो तो स्वतः आजारी पडून गतप्राण होतो आणि त्यास दुसराच पुरावयास जातो! हे सगळे किती अल्पकाळात घडते बरे? सारांश काय की, मानवाच्या संबंधाच्या एकंदर गोष्टी किती क्षणभंगुर व क्षुल्लक आहेत ते नेहमी ध्यानात आण. काल जो प्राणधारण करून होता त्याची उद्या केव्हा राखरांगोळी होऊन जाईल याचा नेम नाही. यास्तव हे क्षणभंगुर जीवित त्वा निसर्गानुसार वर्तन ठेवून घालवावे हे बरे? आणि ज्याप्रमाणे परिपक्व झालेले फळ वृक्षापासून मुकाट्याने पतन पावते तद्वत त्वाही प्राणयात्रा पूर्ण समाधान वृत्तीने समय येताच आटपावी आणि ज्या निसर्गापासून आपला उद्भव झाला त्याचे कल्याण चिंतावे व ज्या स्थलादी स्थितीमध्ये आपली प्राणयात्रा झाली तिचे आभार मानावेत.

४९. जसे भूशिर समुद्राच्या मोठमोठ्या लाटा एकसारख्या येऊन आदळत असता स्थिर उभे राहून प्रकोप पावलेल्या आसमंतात भागींच्या उदकास शांत करते, तद्वत त्वां आपल्या आयुष्यक्रमात वृत्ती धारण करावी.[१२]

अमुक एक गोष्ट घडली म्हणून मी मोठा दुर्दैवी आहे असे कदापि मानू नको, तर उलट असे मान की, ती गोष्ट घडली तरी मला आज काही एक इजा झाली नाही आणि पुढे काय होईल याची तर भीती बाळगण्याची मला गरज नाही. तेव्हा मी एकंदरीत सुखी खरा. असली गोष्ट ज्याला त्याला घडण्याचा संभव आहे; परंतु प्रत्येकजण मजप्रमाणे इजेपासून सुटला नसता. तेव्हा अशाप्रसंगी अमुक एक मनुष्यास इजा झाली म्हणून ते त्याचे दुर्दैव आणि मला झाली नाही म्हणून ते माझे सुदैव असे मानण्यात काय अर्थ आहे? आता येथे प्रश्न असा आहे की, जे मनुष्याच्या निसर्गानुसार घडत आहे ते सर्वदा त्याचे दुर्दैव समजावयाचे काय? मनुष्याच्या ठायी आढळणाऱ्या निसर्गाच्या इच्छेविरुद्ध जी गोष्ट नाही ती त्याच्या निसर्गाविरुद्ध आहे, असे कोण म्हणेल? आता तुला तर निसर्गाची इच्छा काय आहे ते ठाऊक आहे. तुला जी काही गोष्ट घडेल तिजमुळे तुला न्यायी, उदार, संयमी, दीर्घदर्शी, अविचारमूलक व असत्य कल्पनांनी व्यामोह न पावणारा असा होण्यास प्रत्यवाय येण्यासारखा आहे काय? त्याचप्रमाणे विनय, स्वातंत्र्य इत्यादी ज्या गोष्टींच्या योगाने मनुष्याच्या निसर्गास अनुरूप असे सर्व काही प्राप्त होते, त्या गोष्टीस तिजमुळे अंतराय येईल काय? नाही. तर मग त्या गोष्टीविषयी चिंता करण्याचे काय प्रयोजन? एकंदरीत काय की, ज्या ज्या प्रसंगी तुला खेद प्राप्त होईल त्या प्रसंगी हे पुढील तत्त्व ध्यानात वागीव. अमूक एक गोष्ट प्रतिकूल आहे म्हणून ती संकटरूप नव्हे, तर ती दिलदारपणे सहन करता येणे हे मोठे भाग्य आहे.

५०. मृत्यू अगदी तुच्छ वाटावा असे मनातून असल्यास जे आपल्या जीवास अतिशयित जपून पुष्कळ वर्षेपर्यंत जगले त्यांची स्थिती समजून घ्यावी, म्हणजे बरीच मदत होईल. अशा जीवितप्रिय लोकांना एकंदरीत फायदा काय झाला म्हणाल, तर ते अल्पायू लोकांपेक्षा अधिक दिवस जगले. दुसरा काही एक नाही. त्यांनी आपल्या हयातीत मेलेल्या पुष्कळ लोकांस गाडून शेवटी आपण स्वतःही कोठेतरी एखाद्या थडग्याखाली देह ठेविते झाले. सारांश काय की, जनन आणि मृत्यू याच्यामधील अवकाश अत्यल्प आहे. हा अवकाश किती कष्टाने, कोणत्या प्रकारच्या लोकांच्या संगतीने, किती दुर्बळ देहात घालवावयाचा याचा विचार कर. यास्तव जीवित म्हणजे काही मोठी मोलाची चीज आहे असे मानू नको. तुझ्या पश्चात किती अनंतकाळ लोटून गेला आहे व पुढेही किती अमर्याद काळ यावयाचा आहे बरे? अशा अपरिमित अवकाशामध्ये जो तीन दिवस जगतो त्यामध्ये आणि जो तीन पिढ्या जगतो त्यामध्ये कितीसे अंतर असणार?[१३]

५१. नेहमी अगदी थोड्या पल्ल्याचा मार्ग स्वीकारावा. कारण थोड्या लांबणीचा मार्गच स्वाभाविक असून, हिताचा असतो. अत्यंत परिपक्व विवेकाच्या अनुरोधाने प्रत्येक गोष्ट बोलावी किंवा करावी. असे शुद्ध हेतूपूर्वक आचरण असल्याने मनुष्य सर्व त्रास, कलह, लबाडी आणि दिमाख यांपासून मुक्त होतो.

संदर्भ :

१. अवश्य पाहिजे. इतकेच नव्हे तर जड पदार्थांचा व्यापारच तो होय.
२. याची तुलना आपण समर्थांच्या अभ्यासें प्रकट व्हावे, नाही तरी झाकोंन असावें'शी करू शकतो.
३. वर्तनात हे स्मरण असू दे,
४. विश्वकल्याणवादाचे बरेच उतारे मिळतील.
५. सत्कार्यवादाप्रमाणे वाटते,
६. दोन नियम -१. विवेकाने वर्ताव, कारण तो नियामक अंश आहे. २. भ्रांती दूर होत असेल तर लगेच करून घ्यावी,
७. जीव कशाचाच अंश नाही. देहव्यापारसमुच्चयाला हे एक नाव आहे.
८. मनुष्य + विवेक-देव, मनुष्य-विवेक-पशु.
९. वास्तविक पाहता आठवण राहावी या हेतूने वागू नये. योग्य, हितावह, कल्याणकारक असे आपले आचरण असावे. मग आठवण राहो वा न राहो. त्यात काही फारसे नाही; परंतु असे वागल्याने आठवण राहीलच. आता मेलेल्या मनुष्यास त्यापासून फायदा व्हावा ही इच्छा सदोष होय. जिवंतास लाभ झाला म्हणजे पुरे.
१०. यातील प्रश्न आणि उत्तर ही दोन्ही केवळ अज्ञानमूलक आहेत. आत्मा हे काय आहे याबद्दल उपोद्धातातल्या १९ आणि २० क्रमांकाच्या टिपांत खुलासा केला आहे.
११. हिरॅक्लीटसचा तत्वविसर्ग,
१२. तटस्थ
१३. हे म्हणणे श्रीमान व दरिद्री, महाविद्वान व अक्षरशत्रु, सद्गुणी व दुर्गुणी, निरोगी व महारोगी, शहाणा व वेड लागलेला यात कितीसे अंतर आहे असे विचारण्यासारखे अयू झाल्याने तो दीर्घ काळच्या अनुभवाने अधिकाधिक सुज्ञ होतो आणि जनहिताची कामे करण्यास त्यास अवकाश जास्त सापडतो. आता ज्याला दुष्कर्मातच आपले आयुष्य वेचावयाचे असेल तो तीन पिढ्या जगला काय आणि तीन दिवस किंवा तीन घटका जगला काय अथवा मुळीच जन्मला नाही तरी सारखेच. ते तरी कोणाला? फक्त त्याला स्वत:ला. ज्या समूहात असा दुष्ट मनुष्य जन्म घेतो त्याचे तो नुकसानच करतो.

सारांश टीप : विवेकावर आधारित आहे असं समजायला हरकत नाही. वर्तन व विवेक यांची सांगड घातलेली आहे. साधकाने इतरांकडे लक्ष न देता स्वतःचं आयुष्य विवेकाधिष्ठित कसं करता येईल याकडे लक्ष द्यावे. त्यासाठी विवेक व्यवहार यांची सांगड घालून भ्रांतीयुक्त ज्ञानातून सुटका करून घ्यावी. विवेकाने शाश्वत व अशाश्वत समजून घ्यावे.

○○○

पुस्तक पाचवे

प्रात:काळी उठल्यावर तुझी वृत्ती बेदील झाली असता असा विचार मनात आण की, मानवी प्राण्यास उचित असे कर्तव्य मला आज करावयाचे आहे. तेव्हा ज्या गोष्टी केल्यावाचून चालावयाचेच नाही आणि ज्या करण्याकरिता तू अस्तित्वात आला आहेस, त्या गोष्टी करू जाता त्वा असमाधानी का व्हावे? गुरगटून पांघरूण घेऊन बिछान्यावर लोळत राहण्यास तू निर्माण झाला नाही. आता असे करण्यात तुला सुख वाटेल खरे; परंतु केवळ सुखोपभोग घेत राहून उद्योगधंदा काही एक करावयाचा नाही असे तू मनातसुद्धा आणू नको. कारण पाहा की, लहान लहान झाडे आणि पक्षी, मुंग्या, कोळी, मधमाशा इत्यादी प्राणी आपापल्यापरीने उद्योग करून या विश्वाचे निरनिराळे भाग[१] सुव्यवस्थित करीत आहेत, असे असता तूच एकटा आपले कर्तव्य करण्यास नाराज का म्हणून असावे बरे? तर ही वृत्ती सोडून देऊन तुझ्या स्वभावास अनुरूप असा उद्योग करण्यास सत्वर लाग. आता हा उद्योग म्हणजे एकसारखा करीत राहावयाचे असे नाही. काही विश्रांती घेणे आवश्यक आहे; परंतु ती नियमित प्रमाणाने घेतली पाहिजे. निसर्गाने खाणेपिणे वगैरे गोष्टींस काही मर्यादा लावून दिली आहे. तू या मर्यादेचे उल्लंघन वारंवार करीत आहेस, हे काही चांगले नव्हे. पाहा बरे, तू एखादा उद्योग हाती घेतला असता तो तू आपल्या शक्तिपलीकडे करण्यास कधीही समर्थ होत नाहीस. अशीच गोष्ट आहार-विहाराचीही असावयास पाहिजे; परंतु हा नियम आम्हा मानवांकडून पाळला जात नाही. तू स्वतःवर प्रीती करीत नाहीस, करितास तर तुजकडून आपला निसर्ग आणि त्याची इच्छा यांचा अनादर होता ना. एखाद्या मनुष्यास एखाद्या कलेविषयी नाद असला म्हणजे तीत अगदी गळून जाऊन खाण्यापिण्याचीही तो वेळेस पर्वा करीत नाही व कितीही थकवा आला तरी त्यास जुमानीत नाही. असा जर साधारण अनुभव आहे, तर मग तू अशा त्या नादी मनुष्यापेक्षा आपल्या निसर्गास कमी लेखतोस असे होते. कारण असे पाहा

की, मनुष्यास एखाद्या गोष्टीचा अतिशयीत छंद लागला म्हणजे ती अगदी पुरी करण्याकडे त्याचे सारे लक्ष लागते. आहार, निद्रा वगैरे गोष्टींचीही त्यास पर्वा राहत नाही. सामाजिक हिताच्या गोष्टींचाही तुला असाच छंद असावयास पाहिजे; परंतु तो तुला आहेसे दिसत नाही. यावरून त्या तुझ्या दृष्टीने अगदी क्षुल्लक असून, केल्या नाहीत तरी चालतील असे होत नाही काय? एरव्ही तुझे तनुमन त्या करण्यात अगदी निमग्न होऊन गेले असते.

२. जे मनोभाव उद्वेगकारक असून, अयोग्य असतात त्यांचा अवरोध व परिमार्जन करून तत्काळ शांती अंगिकारणे हे किती सुकर आहे बरे?

३. हर एक भाषण आणि कृती ही निसर्गानुसार असली म्हणजे ती तुला अनुरूप आहेत असा निश्चय कर आणि लोकापवाद भीतीने सन्मार्गच्युत होऊ नको. एखादी गोष्ट करणे किंवा बोलणे चांगले, असा निर्णय तुझ्या बुद्धीचा एक वेळ झाल्यावर मग ती आपणास लायक नाही असे मानू नको. निरनिराळ्या लोकांचे वर्तननियम निराळे असल्यामुळे त्यांचे आचरणही निराळे असते. तेव्हा त्यांच्या निंदा-स्तुतीकडे तू मुळीच लक्ष देऊ नको, तर तुला जो मार्ग कळला आहे त्याने नीट चाल; आणि स्वतःचा निसर्ग आणि अखिल विश्वाचा निसर्ग याच्या अनुरोधाने आपले आचरण ठेव. कारण उघडच आहे की, तुझा स्वतःचा निसर्ग आणि विश्वाचा निसर्ग हे अभिन्न आहेत.

४. निसर्गानुसार ज्या गोष्टी मजला घडत आहेत त्याचा अनुभव मी आयुष्य मर्यादा आहे तोपर्यंत शांत चित्ताने घेत राहीन आणि अंतसमय आला असता मी देह ठेवून अक्षय विश्रांती पावेन. ज्या तत्त्वांच्या साहाय्याने मी सतत श्वासोच्छ्वास करीत आहे, त्यात माझा श्वास सोडून देईन आणि हा देह पृथ्वीवर ठेवीन. या पृथ्वीची योग्यता काय आहे म्हणाल, तर सांगतो ऐका. या पृथ्वीपासून माझ्या पित्यास माझे बीज प्राप्त झाले; त्याचप्रमाणे माझ्या मातेचे रक्त व दाईचे दूध हीही या पृथ्वीपासूनच त्यास मिळाली होती. आज इतकी वर्षे मला लागलेले अन्नोदकही याच पृथ्वीपासून निर्माण झाले, या पृथ्वीस मी अहर्निश पायाखाली तुडवीत असता व इतर अनेक प्रकारे तिचा दुरुपयोग करीत असताना तिने माझा भार अद्यापि वाहिला.

५. लोक तुझ्या बुद्धीच्या कुशाग्रतेची वाखाणणी करीत नसल्यास काही चिंता नाही; परंतु दुसऱ्या अशा पुष्कळ गोष्टी आहेत की, ज्या करण्याकरिताच तुला निसर्गाने निर्माण केले आहे. तस्मात तुझ्या ठायी जे काही गुण असतील त्या सर्वांचा योग्य विनियोग कर. निष्कपटपणा, गंभीरपणा, श्रमसहिष्णुता, सुखोपभोगाविषयी तिटकारा, दैवानुसार प्राप्त झालेल्या अंशाने व अगदी थोड्या वस्तूंनी तृप्त असणे, परोपकारबुद्धी, ऐषआरामाविषयी अप्रीती, क्षुल्लक गोष्टीत मन न घालणे, मनाचे औदार्य इत्यादी सुवृत्तींचा विकास तुझ्या अंतःकरणात सहजी होण्यासारखा आहे. तुझ्या ठायी कोणत्याही प्रकारची नैसर्गिक अशक्तता किंवा उणीव असली तरी निष्कपटपणा आदी करून हवे ते सद्गुण तुला आपल्या

ठायी आणता येतील. असे असता तू आपण होऊन अजून नीच स्थितीमध्ये लोळत पडला आहेस. तू म्हणत असशील की, माझ्या ठायी काहीतरी नैसर्गिक वैगुण्य असल्याच्या योगाने मी प्राप्त स्थितीमध्ये असमाधान असून कृपण आहे. मला लोकांची हांजी हांजी करावीशी वाटते. या देहाच्या विद्यमान स्थितीस दोष देण्यास मी प्रवृत्त होतो. मोठा दिमाख मिरविण्यात व लोकांस संतुष्ट राखण्याचा यत्न करण्यात हित आहेसे मला वाटते आणि माझे चित्त अगदी अस्वस्थ असते. परंतु ही माझी भ्रांती आहे. मी प्रयत्न केला असता, तर या दोषांपासून कधीच मुक्त झालो असतो. आता जर कोणी मला फक्त बुद्धीच्या जडपणाविषयी दोष देत असतील तर ती आपल्या ठायीची उणीव मी काढून टाकण्याविषयी अवश्य यत्न करावा. त्याविषयी बेफिकीर राहू नये. अथवा अशी स्थिती असण्यात काही भूषण आहे असेही मानू नये.

६. एखादा मनुष्य दुसऱ्या कोणाच्या थोडाबहुत उपयोगी पडला असता आपण त्याजवर तो मोठा उपकार केला असून त्याची फेड त्याने करावी असे त्यास वाटत असते. दुसरा एखादा असा असतो की, तो आपण केलेला परोपकार मनात ठेवून ज्याच्यावर उपकार केला ज्यास आपला ऋणी समजतो, इतकेच. या उपकार करणाराचा आणखी असा एक वर्ग असतो की, तो काय करतो त्याचे त्याला स्वतःलाच भान नसते. द्राक्षवेलास जशी द्राक्षे लागतात मात्र, त्यांचे भक्षण कोणीही करो, त्याचे त्या वेलास मुळीच भान किंवा पर्वा नसते, अशीच त्याची स्थिती असते. घोडा चांगला धावला असता किंवा मधमाशांनी मोहोळ तयार केला असता जशी ती आपल्या करामतीचा लोकांत पुकारा करीत नाहीत, तद्वत आपल्या हातून काही सत्कृत्य घडले असता ते लोकांनी अवश्य पाहावे, अशा त्यास बिलकूल अपेक्षा नसते, तर वर सांगितलेला द्राक्षवेल जसा हंगामास पुन:पुन: द्राक्षे निपजवीत असतो तसा हा मनष्य आणखी आणखी सत्कृत्ये करीतच राहतो. दर एक मनुष्याची वृत्ती अशीच झाली पाहिजे; परंतु येथे कोणी असे म्हणेल की, समाज स्थितीत राहणाऱ्या मनुष्याचा हा धर्मच आहे की, आपले करणे समाजातील इतर व्यक्तीस कितपत जाचक किंवा सुखकर होईल याचा विचार त्याने अवश्य केला पाहिजे. तेव्हा त्याने आपल्या सत्कृत्याच्या परिणामाविषयी द्राक्षवेलाप्रमाणे केवळ उदासीन राहून कसे चालेल? ही शंका खरी आहे; परंतु अशी शंका घेणारास मी काय म्हणतो, हे चांगले कळत नाही. त्याचा जर तो चांगला विचार करील तर यास त्यात संशय घेण्यास काही एक जागा उरणार नाही, आणि अशा वृत्तीच्या मनुष्याच्या हातून सामाजिक हिताची कोणतीही गोष्ट होण्यास पंचाईत पडणार नाही.

७. कोणत्याही निसर्गप्राप्त गोष्टीविषयी प्रार्थना करण्याची मुळीच गरज नाही; परंतु ती करावी असे कोणास वाटल्यास अगदी साध्या सरळ व थोडक्या शब्दांनी करावी.

८. ज्याप्रमाणे एखादा वैद्य आपल्या निरनिराळ्या रोग्यांची प्रकृती पाहून त्यांस निरनिराळा औषधोपचार करतो आणि त्यास पथ्यापथ्यही निरनिराळे सांगतो, तद्वत निसर्गाने हर एक

मनुष्याला वेगवेगळ्या स्थितीत ठेवले आहे, असे समजावे. वैद्य जे पथ्यपाणी सांगतो ते रोग्याच्या रूजा जाऊन तो निरोगी व्हावा म्हणून, तसेच निसर्गानेही मनुष्यास जी निरनिराळी स्थिती लावून दिली आहे, ती त्याच्या दैवास अनुकूल अशीच आहे. आता प्राप्त स्थिती मनुष्यास अनुरूप अशीच आहे. असे म्हणण्याचा अर्थ इतकाच की, ज्याप्रमाणे गवंडी एखादी भिंत बांधताना तीत लागणारे दगड परस्परांस साजून सर्व भिंत नीटनेटकी व बळकट होईल असे करण्यासाठी प्रत्येक दगडाला योग्य असा आकार देतो, त्याचप्रमाणे सर्व विश्वाचा आणि आपला संबंध निसर्गाने जुळविलेला आहे. या विश्वातील सकल वस्तुजात परस्परांशी अगदी सुसंगत असे आहे. आणि जसे हे सारे विश्व तदंतर्गत एकंदर वस्तूंच्या मिलाफाने बनले आहे, त्याचप्रमाणे त्यातील एकंदर कारण संघाच्या संयोगामुळे दैव म्हणून जे म्हणतात ते अस्तित्वात आले असून, सर्व चराचराच्या स्थितीभेदास कारण झाले आहे. ही गोष्ट अत्यंत तत्त्वज्ञ असे जे जन त्यांस ही सहज समजणारी आहे. का म्हणाल तर या अमुक मनुष्यास अमुक एक स्थिती दैवानुसार प्राप्त झाली आहे, असे नेहमी म्हणत असतात. तेव्हा तात्पर्य काय की, वैद्याने सांगितलेले औषध वगैरे उपाय जसे आम्ही खुशीने करतो त्याचप्रमाणे निसर्गाने नेमलेल्या गोष्टींचाही आम्ही आनंदाने स्वीकार करावा. वैद्याची कित्येक औषधे अगदी कडू किंवा तलख असल्यामुळे आपणास ती आवडत नाहीत; परंतु ती रोगपरिहारार्थ म्हणून आम्ही घेतो. निसर्गास जे कल्याणप्रद वाटत आहे त्याप्रमाणे सर्व वस्तजातीचा परिपाक व प्रसिद्धी ही होत आहेत. तेव्हा ती तुला आपल्या आरोग्याप्रमाणेच इष्ट वाटावी. म्हणून तुला घडणारी हर एक गोष्ट कितीही प्रतिकूलशी वाटली तथापि तिचा त्वां स्वीकार करावा, कां की तिजमुळे अखिल विश्वाची सुस्थिती कायम राहून त्यास कल्याण व सौख्य ही प्राप्त होण्यासारखी असतात. निसर्गाने आम्हा मनुष्यास जे अस्तित्वात आणले आहे त्याचा हेतू केवळ एकंदर चराचराचे कल्याण व्हावे हा होय. या विश्वातील कोणत्याही वस्तूचा स्वभाव पाहिला तर तो एकंदर निसर्गास कदापि प्रतिकूल असा व्हावयाचा नाही. कारण या एकंदर निसर्गापासूनच ज्याचा उद्भव तो त्याशी विपरीत कसा असावा? तेव्हा तुजला जे काही घडत आहे त्यात समाधान मानून राहण्याची कारणे दोन झाली. एक असे की, तुला घडणाऱ्या गोष्टी तुजकारणे अगोदरच नेमून ठेवलेल्या होत्या, त्यांचा तुझा निकट संबंध असून, त्यांचा उद्भव अत्यंत पुरातन कार्यकारण परंपरेने झाला आहे; आणि ही कार्यकारण संगती तुझ्या दैवानुसार बनली आहे. दुसरे कारण अर्थात् असे की, जे जे काही हर एक मनुष्यास घडत आहे ते अखिल विश्वाची जी नियामक शक्ती तिच्या सौख्यास आणि उत्कर्षासच नव्हे, तर तिच्या सातत्यासही साधनीभूत होत आहे. कारण विश्वाच्या निरनिराळ्या भागांचा आणि तदंतर्गत कारणसंघाचा परस्पर संबंध अत्यंत निकट असून, सुव्यवस्थित असल्यामुळे त्यातील कोणताही अंश विलग करू गेल्यास समग्र विश्वाचे अंग छिन्नभिन्न केल्यासारखे

होते. आणि जेव्हा जेव्हा तू असंतोषी होऊन अनिष्टशा वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीचा अव्हेर करतोस तेव्हा तेव्हा तुझ्या हातून हे अनन्वित कर्म घडते.

९. प्रत्येक गोष्ट रास्त नियमानुसार करता न आली तरी त्वां नाउमेद होऊ नये किंवा त्रास आणि असंतोषही मनात उत्पन्न होऊ देऊ नयेस. तर एखाद्या गोष्टीत तुला अपयश आले असता तिचा नाद सोडून स्वस्थ हो आणि तुझ्या हातून घडणारी बहुतेक कृत्ये मनुष्य स्वभावास अनुसरून असल्यास त्यातच समाधान मान आणि जी पूर्वीची स्थिती असेल तिचा आवडीने पुन्हा स्वीकार कर. तत्त्वविचारात अगदीच गळून जाऊ नको. त्यांचा उपयोग आपले ज्ञानचक्षु उज्जल राखण्यापुरता कर. कसा तर ज्याप्रमाणे एखादा मनुष्य आपल्या चर्मचक्षूतील रोग जाण्याकरिता औषधादिकांचा काही वेळ उपयोग करतो, रोग बरा झाला की त्याची गरज तो ठेवीत नाही. अशा प्रकारे तत्त्वज्ञानाचे साहाय्य घेतल्याने तू निःसंशय विवेकानुसार वर्ते लागून शांतीचा अनुभव घेऊ लागशील. आणखी हे एक लक्षात ठेव की, तत्त्वज्ञानानुसार वर्तण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यांचा तुझ्या स्वभावाशी बिलकूल विरोध नसावयाचा; परंतु जे तुझ्या स्वभावानुसार नसते अशाचीच तुला केव्हा केव्हा अपेक्षा वाटते. उदाहरणार्थ असे पाहा की, एखादी गोष्ट तुला सुखावहशी वाटली म्हणजे तू म्हणतोस की, हिजहून विशेष स्पृहणीय ते काय राहिले? परंतु येथे तू असा विचार करीत नाहीस की, इंद्रिय सुखाचे जे विषय ते मनुष्यास असेच मोहात पाडीत असतात आणि औदार्य, विचारस्वातंत्र्य, साधेपणा, चित्ताची समता, धर्मशीलपणा इत्यादी सवृत्ती त्याहून विशेष सुखावह असतात. कारण ज्या ज्ञानाच्या व बुद्धिमत्तेच्या साहाय्याने सन्मार्गभ्रष्ट होण्याची भीती राहत नाही व हाती घेतलेल्या हर एक कामात यश येते, त्याहून विशेष सौख्यकारक ते काय आहे?

१०. या विश्वातील वस्तूंचे स्वरूप इतके गूढ आहे की, ते मोठमोठ्या तत्त्वज्ञांसही दुर्जेय वाटले आहे. फार काय स्टोइक तत्त्वज्ञांसदेखील ते समजणे मुष्किलीचे वाटते. यास्तव ज्या गोष्टी आपणास आज संमतशा वाटतात त्याच कालांतराने तशा वाटेनाशा होतात. अगदी ठाम मताचा मनुष्य मिळणे विरळा. तेव्हा या संसारात ज्या वस्तूंशी आपला प्रतिक्षणी संबंध घडणार त्यांचीच स्थिती कशी आहे ती पाहा. त्या अगदी क्षणभंगर व क्षल्लक असन. त्या एखाद्या अत्यंत नीच मनुष्याजवळ अथवा एखाद्या कुलटेजवळ अथवा एखाद्या चोराजवळदेखील असतात. ज्यांशी तुझे नित्य साहचर्य असते अशा माणसांची नीती कशी काय असते ती पाहा. त्यापैकी अतिशयीत चांगली माणसेदेखील मुळीच असावी तशी नसतात. फार काय सांगावे; पण मनुष्य आपले स्वतःचेच परीक्षण करील तर तो आपल्या ठायीही दोष पाहील. अशा या अज्ञान मतांत, अनिष्ट स्थितीत आणि विश्वांतर्गत पदार्थ, काल, शक्ती आणि गतीविशिष्ट वस्तू यांचे जे सतत प्रचलन होत आहे, त्यात अत्यंत अमोलिक मानण्यासारखे किंवा मोठ्या उत्साहाने प्राप्त करून घेण्यासारखे काही असेलसे मला मुळीच

वाटत नाही, तर अशा स्थितीत मनुष्याचे कर्तव्य म्हणून इतकेच दिसते की, त्याने चित्ताचे समाधान राखून निसर्गानुसार पंचत्वास पावण्याच्या समयाची प्रतीक्षा करीत राहावे. हा समय लवकर प्राप्त होत नाही, म्हणून विषाद मानू नये, तर पुढील तात्त्विक सिद्धांतांच्या मननाने चित्त स्वस्थ करावे. पहिला सिद्धांत असा की, अखिल विश्वाच्या निसर्गास प्रतिकूल असे मला काहीही घडावयाचे नाही: आणि दुसरा असा की. माझा देवाच्या आणि विवेकाच्या विरुद्ध वागण्याचे मला समूळ सांगता येईल, असे अयोग्य वर्तन माझ्या हातून घडविण्याची कोणत्याही मानवास ताकद नाही.

११. प्रति क्षणी मी आपणाशी असे प्रश्न विचारावे की, मी माझ्या आत्म्याचा सध्या काय विनियोग करीत आहे? माझ्या ठायीच्या ज्या शक्तीस नियामक अंश असे म्हणतात, त्याची सांप्रत कशी काय स्थिती आहे? माझ्या आत्म्याचे तूर्त कसे काय स्वरूप आहे? लहान बालक, तरुण स्त्री, निर्बल स्त्री, जुलमी राजा, पाळीव जनावर किंवा रानटी जनावर यापैकी कोणास साजेल असे माझ्या आत्म्याचे स्वरूप आहे?

१२. ज्या गोष्टी पुष्कळांस चांगल्या वाटतात त्या वस्तुतः कशा काय असतात, ते आपणास जाणणे अवश्य आहे. दीर्घदृष्टी, संयम, न्याय, धैर्य इत्यादी गोष्टी मनुष्यास एकदा खरोखर चांगल्या वाटल्या म्हणजे मग तो वास्तविक चांगुलपणास विरुद्ध अशा कोणत्याही गोष्टी मनास आणणार नाही. तेच पुष्कळांस चांगल्या वाटणाऱ्या गोष्टी मात्र चांगल्या असे त्याने एकदा मानले म्हणजे मग तो हव्या त्या गोष्टी प्रसंग पडेल त्याप्रमाणे, चांगल्या किंवा वाईट म्हणेल. म्हणूनच जगात आज वस्तुस्वरूपनिर्णयाच्या संबंधाने एवढा मतभेद माजून राहिला आहे.

१३. जेणेकरून विवक्षित आकार प्राप्त होतो ते चैतन्य आणि जड याचा मी बनलो आहे. ही उभय तत्त्वे नाश पावून अभावाप्रत जाणार नाहीत. माझ्या देहाचा प्रत्येक अंश पालटून विश्वाच्या ठायी रूपांतराने राहील. या रूपांतर पावलेल्या अंशात कालांतराने आणखी पालट होऊन त्यास दुसरेच एखादे रूप प्राप्त होईल. हा क्रम एकसारखा सतत चालू राहील. याच फेरफाराच्या अनुरोधाने मला जन्म देणारी माझी मातापितरे व मी अस्तित्वात आलो आहोत. आता या विश्वाची राहाटी काही नियमित कालचक्राप्रमाणे चालत असली, तरी आमच्या या वरील विचारास मुळीच बाधा येत नाही.

१४. विवेक व तो नीट चालविण्याचे साधन जे तत्त्वज्ञान ही दोन्ही स्वतः सिद्धशक्ती असून, कोणत्याही साहाय्यावाचून ती आपापले काम करण्यास समर्थ आहेत. ती स्वतःच्याच तत्त्वानुसार चालून स्वोद्देशाच्या सिद्धीप्रत पावतात.

१५. वस्तुत: पाहता, ज्या गोष्टी मनुष्य स्वभावानुसार नसतात त्या मनुष्यास आवश्यक आहेत असे कदापि म्हणू नये. त्यांची मनुष्यास कोणत्याही प्रकारे अपेक्षा नसून त्यांच्या साहाय्याने मनुष्याच्या ठायीच्या निसर्गाचा हेतू सिद्ध होत नाही. यावरून अर्थात हे उघड होते

की, मनुष्य जो अस्तित्वात आला आहे तो असल्या अनावश्यक गोष्टीच्या संपादनासाठी नव्हे. असल्या गोष्टी मनुष्य स्वभावास अनुसरून असत्या तर मग त्यांचा त्याने तिटकारा करणे किंवा त्यांच्या विरुद्ध वागणे रास्त झाले असते काय? जो मनुष्य अशा वास्तविकपणे चांगल्या मानलेल्या गोष्टींची आपणास अपेक्षा नाही, असे दाखवू जाईल, तो कदापि स्तुतीस पात्र होणार नाही. त्याचप्रमाणे अशा एखाद्या दुसऱ्या गोष्टीची त्याजवळ तुटपुंजी असल्यास तो निःसंशय चांगुलपणास अंतरेल; परंतु अनुभव असा आहे की, असल्या वस्तूंच्या जितका जितका तो जास्त परित्याग करतो किंवा दुसऱ्या कोणामुळे त्यास अंतरतो आणि हे नुकसान तो जितके अधिक धैर्याने सहन करतो तितका तो विशेष चांगला होत जातो.

१६. ज्या प्रकारचे तुझे नेहमीचे विचार असतील तद्नुसार तुझे चित्त बनलेले असेल. कारण विचारांच्या छटांचा लेप आत्म्यास निःसंशय व्हावयाचा. यास्तव पुढल्यासारख्या विचारांची त्याजवर एकसारखी पुटे चढू दे. जेथे म्हणून मनुष्यास प्राणधारण करून राहता येईल तेथे त्यास चांगल्या रीतीनेही राहता येईल. समजा, त्यास राजमंदिरात राहावे लागत आहे, तर तेथेही तो योग्य प्रकारे वर्तू शकेल. हर एक वस्तू ज्या हेतूने घडली आहे तो हेतू सिद्ध होण्यासाठीच तिचे व्यापार अहर्निश चालले असतात; आणि या हेतुसिद्धीतच त्या वस्तूचे कल्याण आणि चांगुलपणा ही आहेत. आता विवेकी प्राणी जो मनुष्य त्याचे कल्याण समाजस्थितीत आहे. कारण आम्ही समाज करून राहण्यासच निर्माण झालो आहोत. कनिष्ठ दर्जाच्या वस्तू श्रेष्ठ दर्जाच्या वस्तूंसाठीच अस्तित्वात आल्या आहेत, हे उघड आहे. आता ज्यास प्राण आहे त्या वस्तू निर्जीव वस्तूंपेक्षा श्रेष्ठ होत आणि सजीव प्राण्यात विवेकशील प्राणी श्रेष्ठ समजावयाचा.

१७. अशक्य गोष्टींची अपेक्षा करणे हे वेडेपण होय आणि वाईट लोकांकडून कुकर्म घडणार नाही, असे मानणे कदापि शक्य नव्हे.

१८. जे सहन करण्यास मनुष्यास निसर्गतः सामर्थ्य नाही असे काही एक त्यास घडावयाचे नाही. आपणास जशा काही गोष्टी घडतात तशाच त्या दुसऱ्यासही घडतात; परंतु हा दुसरा मनुष्य त्या मोठ्या धैर्याने सहन करून मुळीच इजा पावत नाही. याचे कारण एक तर असे की, त्याला त्या घडलेल्या गोष्टींचे भानच नसते किंवा त्यास आपली मर्दुमकी लोकांस दाखवावयाची असते. अज्ञान आणि अभिमान ही याप्रमाणे ज्ञानाहून बलवत्तर व्हावी हे मोठे लज्जास्पद होय.

१९. बाह्य वस्तूंचा आत्म्याशी बिलकूल संपर्क होत नाही. त्यांचा आत्म्यापर्यंत मुळी प्रवेशच होत नाही. त्यांच्याकडून आत्म्यास कोणत्याही प्रकारची गती किंवा चलनही प्राप्त होत नाहीत, तर आत्म्याचे व्यापार अगदी स्वतंत्रपणे चालतात. त्यास दुसऱ्या कशाचीही अपेक्षा नसते. असे आहे, तरी ज्या गोष्टी त्यास घडतात त्यांच्या बऱ्यावाईटाचा निर्णय जो त्याजकडून होतो तो त्याच्या ठायीच्या स्वउद्भूत कल्पनांप्रमाणे होय.

२०. एका दृष्टीने पाहता मनुष्यमात्राचा मजशी अगदी निकट संबंध आहे. यास्तव त्याचे कल्याण करण्यास म्यां झटावे व तो कसाही असला तरी त्याचा अव्हेर करू नये; परंतु काही मनुष्ये माझ्या योग्य कृत्यास अंतराय आणतात. सूर्य, वायू, वनपशू इत्यादी वस्तूंच्या संबंधाने जशी म्यां उदासीनत्वाची वृत्ती धारण केली पाहिजे तद्वतच अशा मनुष्यांशीही वर्तन ठेवले पाहिजे. आता एवढे खरे की, अशा वस्तूंपासून मला माझ्या सत्कृत्यात हरकत झाली तरी माझ्या वृत्ती आणि स्वभाव यास त्यापासून किमपिही प्रत्यवाय व्हावयाचा नाही. कारण त्यांचे व्यापार विवक्षित नियमानुसार होत असतात. मन जे आहे ते आपल्या व्यापारास होणाऱ्या प्रत्येक अंतरायास पालटून आपल्या इष्ट कार्यास तो साहाय्यभूत होईल, असे करतो आणि याचप्रमाणे जो आरंभी अंतरायसा वाटतो तोच पुढे इष्ट कार्याचा संपादक होतो.

२१. या विश्वाच्या ठायी जे काही अत्यंत उत्तम म्हणून असेल ते पूज्य मान. हा अत्युत्तम अंश कोणता म्हणशील तर जेणेकरून सर्व चराचर वस्तूंचा विनियोग व नियमनही होतात तो होय. त्याचप्रमाणे तुझ्या ठायीचा जो अत्युत्तम अंश आहे त्यासही पूज्य मान. हा अंश आणि सर्व विश्वांतर्गत जो नियामक अंश हे अभिन्न होत. कारण विश्वांतर्गत नियामक अंशाप्रमाणेच तुझ्या ठायींचा नियामक जो अंश तुजला प्राप्त होणाऱ्या हर एक वस्तूंचा विनियोग व नियमनही करीत आहे.

२२. जे राष्ट्राच्या अहितास कारण होत नाही ते त्यातील कोणत्याही व्यक्तीसही तसे होणार नाही. तेव्हा तुला एखादी गोष्ट नुकसानीशी वाटली असता त्वां असा विचार करावा की, ज्यापेक्षा त्या गोष्टीने राष्ट्राचे नुकसान होण्यासारखे नाही; त्यापेक्षा मलाही त्यापासून उपकार होईल असे मी मानू नये. परंतु एखाद्या मनुष्याच्या वर्तनामुळे राष्ट्रास अपाय घडला, तर त्या मनुष्यावर तू संतापू नको, तर त्याची चुकी त्यास दाखवून दे.

२३. या जगातील वस्तू किती जलद दृष्टिआड होणाऱ्या आहेत याचा वारंवार विचार कर. कारण विश्वांतर्गत जड पदार्थ जो आहे तो सतत वाहणाऱ्या नदीप्रमाणे चालत आहे, वस्तुमात्राचे व्यापार नेहमी पालटणारे आहेत; आणि ते ज्या कारणांच्या योगाने घडत आहेत ती कारणेही अनंत प्रकारची आहेत[२]. या विश्वातील कोणतीही वस्तू क्षणमात्र निश्चल राहणे नाही. ज्या या भूतभविष्यरूप परम अगाध गर्तेच्या ठायी सर्व वस्तू अदृश्य होत आहेत, ती तुझ्याही अगदी सन्निध आहे, हे ध्यानात आण. तेव्हा अशा या क्षणभंगुर वस्तूंच्या योगाने जो अगदी फुगून जातो किंवा विनाकारण त्रास पावून कष्टी होतो त्यास मूर्ख म्हणावयास काय प्रत्यवाय आहे? कारण तो नीट विचार करील, तर त्यास दिसून येईल की, त्यास जो वस्तुमात्राकडून त्रास पोहोचतो तो अल्पकालिक असतो.

२४. ज्या विश्वांतर्गत जड पदार्थाचा तू केवळ अत्यल्प अंश आहेस त्याचा विचार कर. त्याचप्रमाणे ज्या परमावधी कालाचा परम सूक्ष्म अंश तुझ्या वाट्यास आला आहे त्याचाही विचार मनात आण. आणखी असे पाहा की, ज्या महाप्रचंड दैवाने सर्व वस्तुजाताचे व्यापार व स्थिती ही नियत केली आहेत, त्यास तुझे नियमन अत्यंत क्षुल्लक आहे.

२५. दुसरा मला त्रास देत असल्यास त्यापासून मला वाईट मानण्याचे प्रयोजन नाही.[३] त्याने आपल्या वृत्तीप्रमाणे हे कृत्य केले. त्यात बरे-वाईट काय आहे ते त्याचे त्याने पाहावे. मला जे आता प्राप्त होत आहे ते निसर्गाच्या इच्छेप्रमाणे होत आहे; आणि जे मी आता करीत आहे तेही निसर्गाच्या प्रेरणेप्रमाणे करीत आहे.

२६. आत्म्याच्या ज्या अंशाकडून तुझे नियमन व प्रवर्तन होत आहे, त्यात देहाच्या सुखदुःखमूलक व्यापारापासून विकार होऊ देऊ नको. त्या व्यापाराशी तो एकरूप होऊन जाता उपयोगी नाही, तर तो त्यापासून सर्व प्रकारे अलग राहिला पाहिजे; परंतु या आत्म्याचा आणि देहाचा निसर्गत: निकट संबंध असल्यामुळे कित्येक वेळा देहाचे विकार इतके प्रबळ होतात की, त्यापासून चित्तास व्यामोह होतो, अशासमयी त्यास अवरोध करण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही; परंतु या नियामक अंशाने काही कारण नसता आपण होऊन अशा चित्तविकारास चांगले किंवा वाईट म्हणणे बरोबर नाही.

२७. आपण देवांच्या साहचर्याने राहावे आणि जो नेहमी देवास असे दर्शवितो की, आपल्या नशिबी जे काही आले आहे त्याने आपला आत्मा तृप्त आहे व निसर्गाने जो स्वत:चा अंश आपल्या संरक्षणार्थ व सत्पथदर्शनार्थ दिला आहे, तो सांगेल ते सर्व आपण करीत आहोत, तो देवांच्या साहचर्याने राहतो म्हणावयाचा. आता हा निसर्गाचा अंश कोणता म्हणाल, तर प्रत्येकाच्या व विवेक ही होत.

२८. ज्याच्या अंगास किंवा मुखास अतिशयीत घाण येत असते त्याचा तुला कदाचित राग येत असेल; परंतु या रागाचा काय बरे उपयोग? त्याचे अंग किंवा मुख तशा प्रकारचे आहे त्यास त्याने काय करावे? असल्या पदार्थास असा वास येणे साहजिक आहे. आता येथे कोणी असे म्हणेल की, त्या मनुष्यास विचार आहे आणि त्याने थोडीशी तसदी घेतली असती, तर आपण लोकांस कोणत्या गोष्टीत त्रास देत आहोत हे त्यास कळून येते. हे म्हणणे बरोबर आहे; पण आता असे पाहा की, तुला विवेक आहे की नाही? त्या विवेकाच्या साहाय्याने त्वा त्याचा विवेक जागृत केला पाहिजे, त्याची चुकी दाखवून त्याला त्वां बोध करावा. कारण तुझा बुद्धिवाद त्याने ऐकिल्यास तो आपल्या आंगचा दोष काढून टाकील आणि मग रागावण्याचे प्रयोजन मुळीच उरणार नाही.

२९. मरणोत्तर ज्या प्रकारे राहावे असे तू इच्छित आहेस त्याप्रमाणे तुला इहलोकीही राहण्याचे सामर्थ्य आहे; परंतु असे राहण्यास जर तुला इतर मनुष्यांकडून हरकत होऊ लागली, तर त्वां प्राणत्याग करावा; परंतु तो अशा रीतीने करावा की, तसे करण्यात आपणास मोठे दुःख भोगावे लागले असे कोणास दिसू नये. एखाद्या घरात धूर फार होतो म्हणून जसे ते सोडून जावयाचे, तद्वतच प्राणत्यागाची गोष्ट आहे. याबद्दल तुला संकट का वाटावे?[४] परंतु असा देहत्याग करण्याचे योग्य कारण जोपर्यंत उपस्थित झाले नाही तोपर्यंत तू स्वस्थपणे व स्वतंत्रपणे राहा. तुला आवडेल तसे करण्यास कोणाचीही हरकत होणार नाही. मात्र ही

आवड विवेकशील व समाज करून राहणाऱ्या प्राण्याच्या स्वभावानसार असावी म्हणजे झाले.

३०. विश्वांतर्गत ज्ञानतत्त्व हे संगमप्रिय असल्या कारणाने त्याने कनिष्ठ वस्तू श्रेष्ठ वस्तूच्या हितास्तव निर्माण केल्या आहेत आणि श्रेष्ठ वस्तू परस्परांस अनुरूप अशा केल्या आहेत. वस्तुमात्राचे उच्चनीचत्वाचे संबंध त्याने कसे सुंदर जुळविले आहेत, प्रत्येक वस्तूचा योग्य वाटा त्याने कसा नेमून दिला आहे आणि सर्व उत्तम वस्तूंचा परस्पर संबंध किती सुयंत्रपणे लावून दिला आहे या गोष्टी तू पाहतच आहेस..

३१. हा काळ पावेतो तू देव, मातापितरे, भाऊबंद, मुले, शिक्षक, बाळपणी तुझा सांभाळ करणारी माणसे, मित्र, नातलग, दास इत्यादिकांशी कसे वर्तन ठेवले आहेस याचा विचार कर. त्या सर्वांस त्वा कधी कृतीने किंवा शब्दाने दुखविले नाहीस, असे तुला म्हणता येईल काय? तुला आजपर्यंत किती गोष्टी घडल्या आहेत व त्यापैकी किती गोष्टी तुला सहन करता आल्या आहेत, याची आठवण कर. याकामी असे लक्षात आण की, तुझी प्राणयात्रा आता आटोपली असून, तुझे काम संपले आहे. त्याचप्रमाणे आपल्या आयुष्यक्रमात किती सुंदर वस्तू त्वा पाहिल्या आहेत, किती सुखदुःखास त्वा तुच्छ मानले आहे, किती भूषणप्रद अशा मानलेल्या वस्तूंचा त्वा अव्हेर केला आहे, किती दुष्ट मनुष्यांशी तू ममतेने वागला आहेस, याचा विचार कर.

३२. ज्या आत्म्याच्या ठायी कौशल्य व ज्ञान ही आहेत त्यास अकुशल आणि अज्ञ अशा आत्म्यांकडून का बरे त्रास पोहोचावा? आता आत्म्याच्या ठायी कौशल्य व ज्ञान ही आहेत असे केव्हा म्हणावयाचे सांगतो : ज्या आत्म्यास या विश्वाचा आदि आणि अंत कळत असतो आणि या विश्वातील समग्र पदार्थांत विद्यमान असणारा वा अखिल चराचर विश्वाचे सर्वकाळ नियमन करणारा जो विवेक, त्यास जो आळखतो त्या आत्म्याच्या ठायी हे दोन्ही गुण असतात.

३३. तू लवकरच पंचत्वाप्रत जाशील. तुझे नाव मागे कदाचित राहील किंवा राहणार नाही; परंतु नाव राहिले तरी ते केवळ ध्वनी आणि प्रतिध्वनी एतद्रूप होय. या संसारामध्ये मनुष्यास ज्या गोष्टी मोठ्या मोलवानशा वाटतात त्या केवळ असार, दोषमय आणि क्षुद्र अशा आहेत. एखाद्या खाद्यावस्तूच्या प्राप्तीसाठी कुत्री जशी परस्परांस चावू लागतात अथवा मुले एकमेकांशी भांडू लागतात किंवा एकदम रडू लागतात तद्वत् मनुष्ये अशा वस्तूंच्या संपादनार्थ झटताना दृष्टीस पडतात. विश्वास, विनय, न्याय आणि सत्य ही या जगातून लोपली आहेत. तेव्हा अशा या जगामध्ये अजून कशासाठी म्हणून प्राणधारण करून राहिला आहेस बरे? इंद्रियांचे विषय पाहिले, तर ते सहज पालटणारे असून, कधीही अचल नाहीत. ज्ञानप्राप्तीची इंद्रिये तर अत्यंत मंद असून, त्यांस असत्यभास सहजी होण्यासारखे असतात. खुद्द आत्मा पाहिला तरी तोही केवळ देहातील रुधिराची एक वाफ आहे. शिवाय अशा या

जगामध्ये मोठा लौकिक होण्यात तरी काही हशील आहे काय? तर तेही नाही. असे आहे तर मग आपल्या अंतकाळची तू का बरे शांतपणे प्रतीक्षा करीत राहत नाहीस? देहावसान झाल्यावर मग तुझा कोणताही अंश न राहिला किंवा तुला एखादी दुसरी स्थिती प्राप्त झाली तरी सारखेच. त्याविषयी चिंता करण्याचे तुला प्रयोजन नाही. हा अंतकाळ येईपर्यंत तू पुढील गोष्टी करीत राहिलास म्हणजे पुरे. देवास पूज्य मानून त्यास अहर्निश दुवा दे, लोकांवर उपकार कर, कोणी कसाही असला तरी त्याचा द्वेष करू नको, आत्मसंयमन कर; परंतु ज्या गोष्टी तुझ्या आटोक्याबाहेर आहेत त्या तुझ्या नसून तुजला प्राप्त होण्याची शक्यता नाही हे ध्यानात ठेव.

३४. तुला खऱ्या मार्गाने चालता येऊन स्वतःचे विचार व आचार शुद्ध ठेवता आल्याने आपले जीवित एकसारखे सुखात घालविता येईल. देव, मनुष्य आणि एकंदर विवेक प्राणी यांच्या आत्म्यांच्या ठायी पुढील दोन गुण आढळावयाचे. एक असा की, त्यांची एकमेकांस कधीही हरकत होत नाही. दुसरा असा की, न्यायाकडे प्रवृत्ती व तद्नुसार आचरण ठेवणे यातच खरा चांगुलपणा आहे, असा दृढ विश्वास धरून त्यांचे निर्मूलन त्यांच्याकडून व्हावयाचे.

३५. जर कोणतीही गोष्ट माझ्या वाईटपणामुळे उद्भवली नसून सार्वजनिक सुखास तिच्या योगाने अंतराय आला नसेल, तर मग तिजविषयी काय म्हणून विषाद मानावा?

३६. वस्तूंच्या बाह्य स्वरूपास अविचाराने भुलून जाऊ नको. आपल्या शक्तीप्रमाणे पात्रापात्र विचार करून लोकांस साहाय्य कर. त्या गोष्टीविषयी मनुष्याने उदासीन राहिले पाहिजे. अशा गोष्टींमुळे मनुष्यास तोटा झाला असल्यास ते त्याचे नुकसान आहे असे तू मानू नको. असे मानण्याची सवय हिताची नव्हे. उंच स्थानी उभे राहून कुणी लोकांस बोधपर व्याख्याने देत असता स्वतःच्या चित्तात नेहमी असा बोध वागीव की, जी ही लोकमान्यता इतकी मोहक वाटते, ती वास्तविक पाहता अगदी क्षुल्लक आहे. ती इतर लोकांस अत्यंत मोलाची वाटली तरी तुला ती तशी वाटू देऊ नये. कारण इतर लोक मूर्ख आहेत म्हणून आपणही तसेच का व्हावे? आणखी असे उमज की, तू कोठेही असलास तरी तत्काळ सुखी होण्याची शक्यता आहे. कारण जो आपल्या दैवाने प्राप्त झालेल्या स्थितीत समाधान मानतो तो सुखी समजावयाचा. सारांश काय की, सुख जे आहे ते विवेकाचा योग्य उपयोग करण्यात, सद्वासनांत व सदाचरणात आहे.

संदर्भ :

१. मनुष्याची कर्महीनता ही विश्वचक्रातील खीळ आहे.

२. स्टॉईकांवर विशेषतः मार्कस ऑरेलियसवर हेरॉक्लिटसचा प्रभाव जास्त प्रमाणामध्ये होता, हे सुस्पष्टपणे दिसून येते.

३. हा समज चुकीचा आहे. स्टोइक लोक तर उपदेश करतात की, निसर्गानुसार वागावे; परंतु कोणी त्रास दिला असता त्याबद्दल वाईट वाटणे निसर्गानुसारच आहे, तरी त्याबद्दल वाईट मानण्याचे प्रयोजन नाही हे म्हणणे त्यांच्याच उपदेशाला विरुद्ध आहे. वास्तविक पाहता कोणी त्रास दिला असता त्याबद्दल वाईट वाटलेच पाहिजे. तसे वाटणे हे स्वाभाविक असून ते योग्यच आहे. या कृत्याबद्दल मनुष्याने तिटकारा दाखवून त्याचा प्रतिकार केला पाहिजे. असे न केले तर जगात दुर्जनांची संख्या त्वरित वाढून सज्जनांचा ते समूळ नाश करतील आणि शेवटी परस्परांचा नाश करून सारी पृथ्वी निर्जन होऊन जाईल. याकरिता कोणी त्रास दिला असता वाईट वाटू देऊ नये, डाव्या गालावर मारले असता उजवा पुढे करावा, एक अंगरखा मागितला असता दुसराही ने म्हणावे, अशी खोटी नीती लोकांत सांगण्यात काही शहाणपणा नाही. असे कोणी वागू नये आणि वागतही नाहीत. येशू ख्रिस्तास स्टोइक लोकांच्या मतांचा चांगला संस्कार झाला होता, असे आम्ही एका ठिकाणी म्हटलेच आहे. त्याने या टिपेत दिल्याप्रमाणे व्यवहारास अनुपयुक्त असा उपदेश केला आहे, तो स्टोइक लोकांच्या मतांचा परिणाम होय.

४. आत्महत्येविषयीच्या स्टोइक लोकांच्या वेड्या समजाबद्दल उपोद्धात प्रकरणातील ५२ क्रमांकाच्या पृष्ठावरील ३९ व्या संदर्भ टिपेत सांगून तेथे त्याजवर टीका केलीच आहे.

सारांश टीप : नैसर्गिक प्रवाहाची कल्पना या पुस्तकात दिली आहे. निसर्ग प्रवाहानुरूप सारे काही बदलत जात असल्याने त्याचा स्वीकार आवश्यक करून विवेकयुक्त आचरण करावे, म्हणजे योग्य गती मिळते. वैराग्ययुक्त व साधे आचरण असावे. निसर्गाची प्रार्थना करावयाची झाल्यास तीही सरलपणे करावी.

❍❍❍

पुस्तक सहावे

१. सारे विश्व ज्या पदार्थांचे बनले आहे तो ज्ञानतत्त्वाचा (विवेकाचा) सर्वस्वी अंकित असून, त्याच्या अनुरोधाने वर्तणारा आहे. या नियामक ज्ञानतत्त्वाकडून काही एक अनिष्ट होण्यासारखे कारण संभवत नाही. कां की त्याच्या ठायी मत्सरादी दुर्वृत्तींचा अभाव आहे. तस्मात् ते कोणास अपाय करीत नाही आणि त्याजकडून कोणास अपाय होत नाही. या ज्ञानतत्त्वानुसार सर्व वस्तूंची घटना आणि परिपाक होत आहेत.

२. तू आपले कर्तव्य कर्म करीत जा, म्हणजे पुरे. मग तुला त्यापासून सुख होवो वा दुःख होवो. लोक तुझी निंदा करोत वा स्तुती करोत. मरण येवो किंवा दुसरे एखादे संकट येवो, त्याविषयी तू बेफिकीर राहा..

३. प्रत्येक गोष्ट नीट बारकाईने पाहा. तिचा एखादा विशेष गुण किंवा तिची वास्तविक योग्यता काय आहे, ते पाहिल्यावाचून राहू नको.

४. सर्व विद्यमान वस्तू लवकरच पालटून सर्वांची प्रकृती एकच असल्यास त्यास धूमावस्था प्राप्त होईल, नाही तर त्यांची वाताहत होऊन जाईल.

५. ज्या ज्ञानतत्त्वाकडून सर्व विश्वाचे नियमन होत आहे त्यास स्वत:चा स्वभाव कळत आहे. त्याचप्रमाणे आपण काय करीत आहोत व कोणत्या जड पदार्थावर आपले कार्य होत आहे हेही त्यास ठाऊक आहे.

६. कोणीही आपणास अपकार केला असता त्याचा सूड उगविण्याचा योग्य मार्ग म्हटला म्हणजे आपण त्याच्यासारखे वर्तन करू नये, हाच होय.

७. नेहमी काही ना काहीतरी सार्वजनिक हिताचे काम करीत राहण्यात आनंद मान. असे करताना देवाचा मात्र विसर पडू देऊ नको, म्हणजे झाले.

८. नियामक तत्त्व जे आहे ते स्वतःसिद्धपणे प्रोत्साहित होऊन पालटणारे आहे. ते स्वतःस वाटेल ते स्वरूप देण्यास समर्थ आहे. त्याचप्रमाणे हर एक घडणाऱ्या गोष्टीस इच्छेस येईल ते स्वरूपही त्यास देता येते.

९. प्रत्येक गोष्टीची संसिद्धी विश्वाच्या निसर्गानुसार होत आहे. ही संसिद्धी दुसऱ्या कोणत्याही निसर्गानुसार खास होणारी नव्हे. कारण वस्तुमात्राचे आकलन बाह्यतःच मात्र ज्या निसर्गास होण्यासारखे आहे किंवा जो निसर्ग विश्वाच्या निसर्गात अंतर्भूत होतो अथवा जो निसर्ग या सार्वत्रिक निसर्गापासून पर असून, त्याची स्वतंत्र वृत्ती असेल अशा कोणत्याही निसर्गाचा या विश्वांत घडणाऱ्या गोष्टींशी मुळीच संबंध नाही.

१०. हे विश्व एकतर काहीतरी यदृच्छेने घोटाळा होऊन वस्तूच्या परस्पर मिश्रणाने अस्तित्वात आले असून, त्याचा प्रलयही या एकवटलेल्या वस्तूंची पुन: वाताहत होऊन होणार आहे किंवा त्याची घटना सुसंगत, सुव्यवस्थित आणि योजनायुक्त अशी झाली आहे. जर पहिली कल्पना खरी असेल, तर मग अशा या घोटाळ्याच्या व यादृच्छिक वस्तुसंयोगाने उद्भवलेल्या जगामध्ये म्यां का बरे राहण्याची वासना धरावी? आणि मी एकदाचा मातीस कसा मिळून जाईन या चिंतेपलीकडे दुसऱ्या कशाचीही का अपेक्षा करावी? चित्तास विनाकारण तळमळ तरी का होऊ द्यावी? कारण काही केले तरी अंती मी पंचत्वास पावणारच; परंतु दुसरी कल्पना जर खरी असेल, तर मग ज्याच्या हातून विश्वाचे नियमन होत आहे त्या महाशक्तीस मी परमपूज्य मानीन आणि तिजवर मी पूर्ण भरवसा ठेवून स्वस्थ राहीन.

११. काही प्रसंगामळे तला थोडेबहत अस्वस्थ व्हावेच लागले, तर लवकरच पुन्हा शुद्धीवर ये. फार वेळ असा बेदील (अनभिज्ञ) राहू नको. असा चित्ताचा जय वारंवार करीत गेल्याने शांतीचा अनुभव तुला अधिकाधिक घडत जाईल.

१२. तुला एकाच वेळी जन्मदात्री आणि सापत्न अशा दोन माता असल्यास सापत्नमातेची शुश्रूषा तू अवश्य करशील; परंतु आपल्या खऱ्या मातेस तू कधीच विसंबणार नाहीस. आता दरबार ही तू आपली सापत्न माता समज आणि तत्त्वज्ञान जन्मदात्री माता मान. तू वेळोवेळी तत्त्वविचार करून शांत होत जा. या तत्त्वविचारांच्या योगाने दरबारात ज्या गोष्टींचा तुला अनुभव येत जाईल त्या तुला असह्यशा वाटणार नाहीत आणि तुझाही दरबारातील लोकांस तिटकारा येणार नाही.

१३. नाना प्रकारची मिष्टान्ने आणि पेये आपल्यापुढे मांडली असता ती पाहून आपण असा विचार करतो की, हे अमुक पक्वान्न मारलेल्या मत्स्याच्या किंवा पक्ष्याच्या मांसाचे आहे. हे अमुक मद्य केवळ थोड्याशा द्राक्षांचा रस होय. याप्रमाणे आपण प्रत्येक पदार्थाच्या अगदी मुळाशी जातो आणि तो कोणत्या वस्तूचा बनला आहे ते बारकाईने तपासून पाहतो. अशा रीतीने आपण आपल्या सर्व विषयक्रमात वर्तन ठेवले पाहिजे; आणि बाह्यात्कारी मोठ्या प्रशासकीय दिसणाऱ्या वस्तूंचे अंतःस्वरूप काय आहे ते नीट तपासून पाहिले म्हणजे

त्या तृणवत आहेत असे तुला वाटून त्यांना जे मोठमोठ्या विशेषणांनी गौरविलेले असते, त्यात काही एक अर्थ नाही, असे तुला कळेल. कारण वस्तूंचे बाह्य स्वरूप जे असते ते अधिक संभ्रमात पाडणारे असते. त्यातूनही आपण ज्या एखाद्या गोष्टीविषयी मेहनत करीत असतो ती त्या मेहनतीस लायक आहे, अशी आपली पक्की खात्री झालेली असली म्हणजे तर हा भ्रम विशेषच होतो.

१४. सामान्य लोक ज्या वस्तूची प्रशंसा करतात त्या बहुतेक साधारण प्रतीच्याच असतात. उदाहरणार्थ एखादा दगड, एखादे लाकूड, एखादे झाड किंवा एखादी वेल हेच त्यांच्या स्तुतीचे विषय होतात. आता जे लोक विशेष विचारी असतात ते जीवतत्त्वविशिष्ट वस्तूचीच तारीफ करतात. पशू-पक्ष्यांचे कळप पाहून त्यास नवल वाटते. जे कित्येक याहूनही अधिक शिकलेले असतात त्यांस विवेकशील आत्म्याने युक्त असे प्राणी प्रशंसनीय वाटतात; परंतु हा आत्मा काही विश्वात्मा नव्हे, तर त्याच्या ठायीचे ज्ञानतत्त्व एखाद्या कलेत किंवा दुसऱ्या कशात तरी नैपुण्य पावण्यापुरते समर्थ असते; परंतु जो कोणी समाजस्थितीस अनुरूप अशा विवेकशील विश्वात्म्यासच फक्त श्लाघ्य मानतो, तोच खरा धन्य. असा मनुष्य आपल्या आत्म्याचे व्यापार, विवेक आणि समाजस्थिती यास किमपिही विरोधी न व्हावे म्हणून त्यास योग्य ते स्वरूप देण्यास नेहमी तत्पर असतो. या इष्ट हेतूच्या सिद्ध्यर्थ तो आपल्यासारख्याच वृत्तीच्या मनुष्यांच्या सामलातीने प्रयत्न करतो.

१५. या विश्वामध्ये काही वस्तू भराभर अस्तित्वात येत आहेत व काही विलयाप्रत पावत आहेत. आणि ज्या अस्तित्वात येत आहेत त्यांच्याही काही अंशाचा विनाश होऊ लागला आहे. तेच तेच व्यापार व तेच तेच फेरबदल या जगात पुनःपुनः एकसारखे होत आहेत. त्याचप्रमाणे हे अमर्याद कालचक्रही तोच तोच युगक्रम पुनःपुनः अस्तित्वात आणत आहे. तेव्हा या अविरत प्रचंड प्रवाहापुढे कशाचाही टिकाव लागावयाचा नाही. असे असता त्यातून वाहणाऱ्या क्षुद्र वस्तूंच्या ठायी मोठी मातब्बरी मानण्यासारखे काय आहे बरे? एखादी जवळून उडणारी चिमणी आपणास मनोहर वाटत असता ती जशी क्षणार्धात दृष्टिआड व्हावी, तद्वत एकंदर ऐहिक पसाऱ्याची गत आहे. मनुष्याचे मुळी जीवितच क्षणभंगुर आहे. ते केवळ आपल्या देहातील रूधिराची वाफ व हवेतून घेतलेला श्वास एतद्रूप आहे. आपण जसा नेहमी श्वासोच्छवास करताना हवेतून आधी श्वास घेतो आणि मग तो उच्छवासाने बाहेर टाकतो तद्वतच जन्मकाळी जो हा श्वास आम्ही एक वेळ घेतला आहे तो ज्या तत्त्वातून घेतला आहे त्याच तत्त्वात पुनः एकदाचा सोडणार. यात विशेष ते काय आहे?

१६. वनस्पतीकोटी[१] व जीवकोटी यांचे श्वासोच्छवास, वस्तुदर्शनाने मनास होणाऱ्या भावना, वासनाभेदेकरून कृतीत पडणारा फरक, समूह करून राहण्याची बुद्धी, अन्नसेवनाने होणारे शरीर पोषण इत्यादी व्यापार मुळीच महत्त्वाचे नव्हेत, तर मग महत्त्वाचे तरी काय? कोणी म्हणतील लोकसमाजापुढे गेले असता लोकांनी टाळ्या वाजवून हर्ष प्रदर्शित करणे

महत्त्वाचे आहे. छे! हेही नाही. त्याचप्रमाणे लोकांची वाखाणणीही स्पृहणीय नव्हे. सारांश, कोणत्याही प्रकारच्या लौकिकाची अपेक्षा करण्यात काही एक अर्थ नाही, तर मग महत्त्व असे आहे तरी कशात, असा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो. याचे उत्तर माझ्या समजुतीने असे आहे की, तुझ्या घटनेस अनुरूप असे तुझे वर्तन असावे. तुझे सर्व उद्योग आणि कला यांची योजना या हेतूच्या सिद्ध्यर्थ व्हावी. कारण हर एक कलेचा उद्देश म्हणून इतकाच असतो की, तिच्या साहाय्याने एखादी वस्तू ज्या विवक्षित कामासाठी म्हणून तयार करावयाची त्या कामाच्या सिद्धीस ती योग्य अशी व्हावी. द्राक्षवेल लावणारा बागवान, घोडे शिकविणारा चाबूकस्वार वगैरे लोकांचा असाच उद्देश असतो. असे आहे तर तरुण जनांसही जे शिक्षण द्यावयाचे त्याचाही काही हेतू असावयास पाहिजे. हे शुद्ध हेतूपूर्वक झाल्यास मग आणखी काय हवे? याशिवाय आणखी कोणतीही गोष्ट त्वां महत्त्वाची मानल्यास तुझे स्वातंत्र्य जाऊन तुला पूर्ण सुखानुभव व्हावयाचा नाही आणि तुझे चित्त विकाररहित राहणार नाही. कारण ज्या वस्तू तू विकाररहित मानशील त्यांचे कोणी हरण केल्यास तुझ्या चित्तात त्यांच्याविषयी मत्सर, असूया, संशय इत्यादी वृत्ती अवश्य उत्पन्न व्हावयाच्या आणि ज्यापाशी या अपेक्षित वस्तू असतील त्यांच्या विरुद्ध कपटप्रबंध रचण्यास तू प्रवृत्त होशील. सारांश काय की, या वस्तूंची अपेक्षा ज्या मनुष्यास वाटेल त्याचे चित्त अगदी स्वस्थ होऊन जाईल आणि शिवाय तो क्षणोक्षणी देवास दोष देत राहील. दोष यास्तव तू स्वचित्त परमपूज्य व आदरणीय मान, म्हणजे तू आपल्या ठायी समाधान पावशील आणि समाजाशी आणि देवाशी तुझा अविरोध राहील. म्हणजे अर्थात् ज्यांच्या योजनेने तुला ही स्थिती प्राप्त झाली आहे, त्याची तू नेहमी स्तुतीच करशील.

१७. जिकडे पाहशील तिकडे तत्त्वांचे व्यापार चालू आहेत; परंतु नीतीची हालचाल यात कोठेही सापडावयाची नाही. नीती जी आहे तिच्यात दैवी अंश विशेष आहे. तिचा मार्ग क्वचितच कोणाच्या लक्षात येण्यासारखा असून, अत्यंत सुखावह असतो.

१८. मनुष्याची रीत काही चमत्कारिक आहे. जे लोक आपले समकालीन असून, आपल्या सन्निध राहणारे असतात त्यांस ते वाखाणीत नाहीत; परंतु आपल्या कधी दृष्टीस पडले नाहीत किंवा कधी पडावयाचेही नाहीत, असे जे आपले वंशज त्यांचा लौकिक गावा यातच त्यास मोठे भूषण वाटते. हे आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांनी आपली स्तुती केली नाही म्हणून विषाद मानण्यासारखेच, वेडेपणाचे होय.

१९. एखादी गोष्ट आपल्याकडून सिद्धीस जाणे मुष्कील असले तरी ती कोणाही मनुष्याकडून व्हावयाचीच नाही, असे मानू नये. परंतु एखादी गोष्ट मनुष्यास शक्य असून, त्याच्या निसर्गानुरोधाने होणारी असल्यास तिचे संपादन आपणासही करता येईल असे मान.

२०. अशी कल्पना कर की, तालीमखान्यामध्ये कुस्ती करता करता एखाद्याने तुला नखे लावली किंवा मस्तकावर धडक मारून तुला जखम केली, तर तू त्याच्याबद्दल खेद मानीत

नाहीस किंवा रागास चढत नाहीस. इतकेच नव्हे तर तो लबाड मनुष्य असावा, असे तुझ्या कधी मनातही येत नाही. असे आहे, तरी तू त्याच्याशी पुढे सावधगिरीने वागतोस व त्याच्या वाटेस सहसा जात नाहीस. हे म्हणजे तू त्याच्याविषयी मनात संशय किंवा शत्रुत्वाची बुद्धी येऊन करतोस असे नाही. अशाच प्रकारची वागणूक तुझी इतर आयुष्यक्रमातही असावी. लोकांनी केलेल्या पुष्कळ गोष्टी आपण तालीमखान्यातल्या प्रतिस्पर्ध्याच्या कृतीप्रमाणेच मानाव्यात. आणि वर सांगितल्याप्रमाणे अशा लोकांविषयी संशय किंवा द्वेष मनात न वागविता त्यांच्या वाटेस जाऊ नये म्हणजे झाले.

२१. माझे आचार किंवा विचार अयोग्य आहेत अशी माझी खात्री करून दिल्यास मी आपले वर्तन आनंदाने पालटीन. कारण जेणेकरून कधी कोणासही अपाय होण्यासारखा नाही असे जे सत्य त्याचा मी शोधक आहे. जो आपला भ्रम आणि अज्ञान यातच खितपत राहतो त्याचे नुकसान होते.

२२. मी आपले कर्तव्यकर्म करीत आहे. तस्मात् मला इतर वस्तूंपासून अंतराय[२] व्हावयाचा नाही. कारण त्या एक तर निर्जीव आहेत अथवा विवेकहीन आहेत अथवा त्या भ्रांत होऊन सत्पथच्युत आहेत.

२३. विवेकहीन प्राणिजात व इतर एकंदर वस्तू यांचा विनियोग त्वां औदार्याने व मोठ्या दिलदारपणाने करावा. कां की, तुझ्या ठायी विवेक आहे तो त्यांच्यात नाही. मानवी प्राण्यांच्या ठायी विवेक आहे याकरिता त्यांच्याशी सहचराच्या नात्याने वाग आणि सर्व प्रसंगी देवांचे साहाय्य माग. आता ही जी देवांची साहाय्यार्थ प्रार्थना करावयाची ती किती वेळपर्यंत केली म्हणजे पुरेल या विचाराच्या भानगडीत तू पडू नको. सरासरी दररोज तीन तास या कामाकडे घालविले म्हणजे पुरे.

२४. अलेक्झांडर बादशहा आणि त्याचा घोडेवाला हे देहावसानानंतर समान स्थितीप्रत पावले. कारण एक तर ते विश्वाच्या चालक शक्तीत लीन झाले असावे किंवा पंचत्वास पावले असावे.

२५. आपल्या ठायी किती गोष्टी एकाच वेळी घडत आहेत याचा विचार कर. यापैकी काही गोष्टींचा संबंध देहाशी असतो आणि काहींचा आत्म्याशी असतो. अशीच स्थिती अखिल चराचर जे विश्व त्याची आहे. तेव्हा त्यातही एकंदर व्यापार एकसमयावच्छेदेकरून घडताहेत, असे दिसून आल्याने तुला नवल वाटण्याची गरज नाही.

२६. कोणी तुला अमुक एक शब्द कसा लिहावा म्हणून प्रश्न केल्यास तू मोठ्या आवेशाने तो दाखवून देशील काय? नाही. तर तुला ठाऊक असल्यास मोठ्या शांतपणाने व विनयाने तो दाखवून देशील. बरे तुझे सांगणे लोकांस पसंत न होऊन ते तुजवर रागावले असता तूही त्याजवर रागावशील काय? नाही. तर आपले मत सांगून तू स्वस्थ बसशील. अशाच प्रकारे स्वकर्तव्याचा निर्णय करताना त्वां वर्तन ठेवले पाहिजे. प्रत्येक कर्तव्याचे काही भाग

असतात. हे भाग काय आहेत त्याचे चांगले बारकाईने अवलोकन करून आपल्या विवेकाने जो मार्ग योग्य वाटेल त्यांचे अवलंबन करावे आणि आपल्या जन्माचे सार्थक करावे, असे करताना कोणाचे मत आपल्याहन निराळे पडले तर उगीच संतापून त्याजवर चरफडू नये.

२७. ज्या गोष्टी लोकांस आपल्या निसर्गास अनुरूप व कल्याणप्रद अशा वाटतात त्यांच्या प्राप्तीस्तव त्यांस प्रयत्न करू न देणे हे किती निष्ठुरपणाचे काम आहे बरे? तरी तुजकडूनही असा निष्ठुरपणा वारंवार घडत आहे. तो कसा म्हणशील तर जेव्हा जेव्हा लोक गैरशिस्त मार्गाने वागतात म्हणून तुला वाईट वाटते, तेव्हा तेव्हा तू त्यांच्या वर्तनक्रमास काही ना काही प्रकारे हरकत आणतोस असे होते. कारण त्यांना विवक्षित गोष्टी आपल्या निसर्गास अनुरूप आणि हितावह वाटतात म्हणूनच ते त्या करण्यास प्रवृत्त होतात. तुला त्या तशा वाटत नसल्यास त्यांना बोध करून त्यांची चूक त्यांना न संतापता दाखीव.

२८. मनुष्यास[३] जो मृत्यू प्राप्त होतो त्याची वास्तविक मीमांसा अशी आहे की, तेणेकरून इंद्रियापासून होणारी ज्ञानप्राप्ती, निरनिराळ्या वासनांमुळे होणारे प्रोत्साहन, विचारांची स्वैर गती आणि देहाची शुश्रूषा ही विराम पावतात.

२९. देहावसानापूर्वीच बुद्धिभ्रंश होऊन आत्मघात व्हावा ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे.

३०. सीझर बादशहाप्रमाणे आपली वृत्ती न होऊ देण्याची खबरदारी ठेव. त्याच्या स्वभावाचा तुला गंधही लागू देऊ नको तर साधा, सुजन, शुद्ध, गंभीर, निर्दभ, न्यायाचा पक्षपाती, देवभक्त, ममताळू, स्नेहाळू, प्रयत्नशील व उद्योगी असा हो. सारांश, तत्त्वज्ञानास अभिमत अशी आपली वृत्ती ठेव आणि देवांची भक्ती कर व मानवास साहाय्य कर. आयुष्य अत्यल्प आहे. या भूलोकीच्या जीवितांचे साफल्य म्हणून एवढेच आहे की, वृत्ती धर्मशील ठेवावी आणि समाजहितवर्धक अशी कृत्ये करावीत. तू ॲन्टनिनसचा शिष्य आहेस, ही गोष्ट ध्यानात ठेवून काही करावयाचे ते कर. विवेकास अनुसरून असलेले प्रत्येक कृत्य तो कसा दृढ निश्चयाने करी आणि सर्व गोष्टींमध्ये त्याच्या चित्ताची समता कशी अढळ राही या गोष्टीची आठवण कर. त्याचप्रमाणे त्याच्या ठायीचा त्याचा वस्तुज्ञान या विषयीचा धर्मशीलपणा, त्याच्या वृत्तीचा गंभीरपणा, त्याच्या स्वभावाचा गोडपणा, त्याचा प्रयत्नशीलपणा याचे स्मरण ठेव. प्रत्येक गोष्टीचा काळजीपूर्वक तपास करून तिची पुरी माहिती करून घेतल्यावाचून तो राहत नसे. कोणी त्यास विनाकारण नाव ठेवले असता त्याचा त्यास राग येत नसे व तो उलट त्यास दोष देत नसे, कोणतीही गोष्ट तो घाईने करीत नसे, निंदकाचे म्हणणे ऐकत नसे, लोकांचे रीतीरिवाज आणि आचारविचार यांची पारख त्यास पुरी असे, लोकांस शिव्याशाप देणे त्यास आवडत नसे, तो भित्रा, संशयी किंवा वाक्छल करणारा नसे, राहण्याच्या जागा, निजावयाचे बिछाने, अंगावर घालावयाचे पोशाख, अन्नादी सेवनाचे पदार्थ, सेवा करणारे नोकर-चाकर इत्यादी सोयीच्या गोष्टी त्यास थोड्या पुरत, तो मोठा कष्टाळू असून, सोशीक

असे. त्याने एकदा कोणाशी मैत्री केली की, ती एकसारखी अकृत्रिम राहावयाची, ज्याची मते आपल्याहून भिन्न असत त्यास ती बोलून दाखविण्याची तो पूर्ण मोकळीक देई. कोणी एखादी चांगली गोष्ट दाखवून दिली असता त्यास मोठा संतोष वाटे, तो धर्मशील होता तरी भोळवट नव्हता. या त्याच्या ठायीच्या चांगल्या गोष्टींचे जिवेभावे तू अनुकरण कर, म्हणजे तुझे चित्त अंतसमयी त्याचप्रमाणे निर्लेप राहील. (पु. १, कलम १६ पाहा)

३१. मनुष्य झोपी गेला असता त्यास नाना प्रकारची भयंकर स्वप्ने पडून तो अगदी अस्वस्थ झाल्यासारखा होतो; परंतु तो जागा होऊन शुद्धीवर आला म्हणजे पाहतो की, आपल्या अस्वस्थतेचे कारण केवळ मिथ्या असून, आपणास जो अनुभव आला तो स्वप्नातला होता. अशीच वृत्ती त्वां जागृतावस्थेतही संसारातील गोष्टीविषयी धरावी. म्हणजे अर्थात हा सर्व पसारा त्वां स्वप्नवत मानावा.[४]

३२. हा लहानसा देह आणि आत्मा मिळून मी झालो आहे. देह जड असल्याकारणाने त्यास भोवतालच्या वस्तूंचा संपर्क झाला न झाला सारखाच; परंतु आत्मगत ज्ञानतत्त्वाची गोष्ट सर्वस्वी तशी नव्हे. ज्या गोष्टी या ज्ञानतत्त्वाच्या व्यापारामुळेच फक्त उत्पन्न होतात, त्याखेरीज इतर गोष्टींविषयी ते उदासीन असते. यात त्याच्या स्वतःच्या गोष्टी त्याच्या अगदी स्वाधीन असतात. आता हे खरे की, वर्तमान स्थितीमध्ये ज्या गोष्टी त्याजकडून घडत असतात, त्याजवरच फक्त त्याचा ताबा चालतो. भूतकाळी घडलेले किंवा भविष्यकाळी घडणारे मनाचे व्यापार त्याच्या आटोक्याबाहेरच असतात म्हणून त्याजविषयी ते उदासीनच असते.

३३. हस्तपादादिकांकडून होणारी कामे निसर्गास विरुद्ध नाहीत. मात्र, निरनिराळ्या अवयवांची कामे जी असतील ती त्यांजकडून घडली पाहिजेत, अशीच गोष्ट मनुष्याचीही आहे. तो जोपर्यंत मानवास उचित अशीच कामे करीत असतो, तोपर्यंत त्याचा उद्योग निसर्गाविरुद्ध नाही; आणि तो जर निसर्गाविरूद्ध नाही तर मग तो मनुष्यासही अनिष्ट नाही म्हणून समजावे.

३४. चोर, पितृघातक, जुलमी राजे इत्यादी जन चैनबाजी काय थोडी करताहेत?

३५. हस्तकौशल्याची कामे करणारे लोक आपल्या कलेत तादृश निपुण नसणाऱ्या मनुष्याचा बराच उपयोग करून घेतात, तरी पण ते आपल्या कलेत काही एक न्यून पडू देत नाहीत. किंवा तिचा त्यागही कदापि करू इच्छित नाहीत. अशी जर साधारण कारागीर, वैद्य वगैरे लोकांची स्थिती आहे, तर मग मनुष्याच्या ठायी आपल्या विवेकाविषयी इतका आदर नसावा हे मोठे चमत्कारिक दिसते.

३६. एशिया, युरोप इत्यादी खंडे विश्वव्यापारानुसार अस्तित्वात आली आहेत. हा सारा समुद्र विश्वाशी ताडून पाहता बिंदुवत आहे, मोठमोठे विशाल पर्वतही केवळ लहानशा ढेकळाप्रमाणे आहेत. सर्व वर्तमानकाळ अनंत काळाशी ताडून पाहता केवळ निमिषाप्रमाणे

आहे. सर्व वस्तू, क्षुद्र पालटणाऱ्या आणि विनाशी अशा आहेत. सकल वस्तूंचा उगम विश्वाच्या नियामक शक्तीपासून आहे, मग तो प्रत्यक्ष असो वा कार्यकारण परंपरेने असो. आणि म्हणूनच सिंहाचे भयंकर जबडे. सर्व विषारी जंतू, कंटककर्दमादी एकंदर उपायकारक वस्तू यांचा उद्भव या अत्यंत विशाल आणि सुंदर शक्तीत क्रमाक्रमाने झाला आहे. तेव्हा या साऱ्या वस्तू ज्यास तू परमपूज्य मानतोस त्याहून भिन्न जातीच्या नसून त्यातच त्यांचा उगम आहे, हे तू चांगला विचार करून उमज (पृ. ७ क. ५ पाहा).

३७. ज्याने विद्यमान स्थितीतील गोष्टींचे अवलोकन केले आहे, त्याने अनादिकालापासून घडत आलेल्या सगळ्या गोष्टी व पुढे अनंत कालावधी घडणाऱ्या एकंदर गोष्टी पाहिल्या म्हणून समजावे, कारण समग्र वस्तूंची जाती व आकार ही समान आहेत.

३८. साऱ्या वस्तूंचा विश्वाशी काय संबंध आहे व त्यांचा परस्पर संबंध काय आहे याचा वारंवार विचार कर. सर्व वस्तूंचा परस्पर संबंध कमी-जास्त मानाने निकट असल्यामुळे त्यांचा परस्पर स्नेह आहे. त्या एका मागून एक अस्तित्वात येत आहेत याचे कारण उघडच आहे की, त्यांची प्रकृती एकच असून, त्या ज्या शक्तीच्या व्यापारामुळे निरनिराळे आकार पावत आहेत, तीही एकच आहे.

३९. ज्या वस्तू तुझ्या दैवानुसार तुला प्राप्त झाल्या आहेत त्यास अनुरूप अशी आपली स्थिती ठेव. ज्या लोकांमध्ये तू निर्माण झाला आहेस त्यांजवर निष्कपट प्रेम कर.

४०. प्रत्येक हत्यार, विखण व भांडे ज्या कामासाठी केलेले असते ते त्याजकडून चांगल्या रीतीने होत असल्यास आपण त्यास चांगले म्हणतो; पण या वस्तू जो करतो तो त्यात असत नाही. ज्या नैसर्गिक वस्तूंची गोष्ट अशी नाही त्यास उत्पन्न करणारी शक्ती त्याच्या ठायी वसत असते. म्हणून या शक्तीस विशेष पूज्य मानले पाहिजे. या शक्तीच्या इच्छेप्रमाणे वर्तन ठेवले असता तुझे सर्व काही ज्ञानतत्त्वास म्हणजे निसर्गास अनुसरून राहील.

४१. ज्या कित्येक गोष्टी तुझ्या हातच्या नाहीत त्या तू इष्ट किंवा अनिष्ट मानल्याने असे अवश्य होणार की, काही वाईट मानलेल्या गोष्टी तुला घडल्या असता किंवा चांगल्या मानलेल्या गोष्टीस तू मुकला असता तू देवास दोष देशील व त्या अरिष्टास कारणशा वाटणाऱ्या मनुष्याचा द्वेष करशील. वास्तविक पाहता या साऱ्या गोष्टी अशा असतात की, त्यांजविषयी मनुष्यमात्राने उदासीनच असले पाहिजे. ही अशी वृत्ती त्या गोष्टीविषयी आपली नसल्यामुळे आपल्या हातून पुष्कळ अन्याय होतो; परंतु ज्या गोष्टी आपल्या हातच्या असतात त्याच्या बरेवाईटपणाचा आपण विचार केला असता देवास दोष द्यावयाला नको आणि मनुष्याशीही शत्रुत्व करावयास नको.

४२. आम्ही सर्व मानव एकाच हेतूच्या सिद्ध्यर्थ खपत आहोत. काही जणांना हा हेतू ज्ञात असून, ते तत्सिद्ध्यर्थ आपल्या कृत्यांची योजना करीत आहेत आणि काही जणांना आपण

काय करीत आहोत याचे भानही नाही. मला वाटते हेराक्लिटस याने कोठेसे असे म्हटले आहे की, मनुष्याकडून निद्रितावस्थेतही काम होत असून, विश्वात चाललेल्या घडामोडीस ती साहाय्य करतात. निरनिराळ्या मनुष्यांकडून निरनिराळ्या प्रकारे विश्वव्यापारास साहाय्य होत आहे. फार काय; पण जे घडणाऱ्या गोष्टीस दोष लावतात आणि त्यांच्या विरुद्ध खटपट करून त्या घडू न देण्याचा प्रयत्न करतात त्यांच्याकडूनही विश्वव्यापारास पुष्कळ साहाय्य होते. कारण विश्वास अशा मनुष्यांचीही अपेक्षा असते. तेव्हा स्वतःस कोणत्या प्रकारच्या उद्योग करणारांत गणावयाचे हे समजून घेण्याचे तुझ्या हाती आहे. कारण ज्याच्या हातून सर्व वस्तुजाताचे नियमन होत आहे तो तुझा सर्व योग्य उपयोग करून घेईल आणि अनन्य हेतूच्या सिद्धीस ज्यांचे श्रम कारणीभूत व्हावयाचे त्या सहकारी जनांच्या कोणत्या तरी एका वर्गात तो तुझा अंगीकार करीलच करील; परंतु कोणत्याही नीच किंवा निंद्य वर्गामध्ये तुझी गणना न होऊ देण्याविषयी तू खबरदारी ठेव.

४३. या विश्वामध्ये पाहशील तर प्रत्येक वस्तू आपापले काम करीत आहे असे तुला समजेल. उदाहरणार्थ पाऊस पाडावयाचे जे काम मेघाचे ते सूर्य कधी करीत नाही. फळे निर्माण करण्याचे पृथ्वीचे काम ते कधी वायू करीत नाही. आकाशात जे अनंत तारे दिसताहेत ते परस्परांपासून भिन्न असून, एकाच हेतूचे साधक आहेत.

४४. माझी स्थिती कशी काय असावी व मला कोणकोणत्या गोष्टी अवश्य घडावयाच्या याचा निश्चय देवांनी करून ठेवला असल्यास तो योग्यच आहे. कारण देवास पुढचा विचार नाही अशी कल्पनासुद्धा करवत नाही. आता त्यांनी मजविषयी जी योजना केली आहे ती माझ्या नुकसानीसाठी आहे अशी क्षणभर मानल्यास असे करण्यात त्यांचा काय बरे हेतू असावा? असे केल्याने त्यास किंवा अखिल विश्वास काय बरे फायदा होण्याचा संभव आहे? विश्वाचे कल्याण साधणे हा तर त्यांच्या साऱ्या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्या देवांनी माझ्या एकट्याची स्थिती ठरविली नाही असे क्षणभर मानले तरी निदान समग्र विश्वाच्या स्थितीचा निश्चय त्यांनी अवश्य केला आहे. तेव्हा या सर्वसाधारण अवस्थेमध्ये कार्यकारण संबंधाने ज्या ज्या गोष्टी मला घडतील त्यांचा स्वीकार मी आनंदाने करून अक्षेय समाधान मानले पाहिजे. परंतु देव आमच्या संबंधाच्या कोणत्याही गोष्टी करीत नाही असे मानले तरी मला स्वत:ला माझ्या स्थितीचा निश्चय करता येण्यासारखा असून, कोणती गोष्ट उपयुक्त आहे याचा मला तपास करता येईल. कोणत्याही गोष्टीच्या उपयुक्ततेची कसोटी मिळून इतकीच की, ती मनुष्यमात्राच्या घटनेस व स्वभावास अनुकूल व अनुरूप अशी असावी; परंतु माझा स्वभाव विवेकशील व सहवासप्रिय असा आहे. माझे राहण्याचे ठिकाण आणि देश अन्टोनिनस[५] या नात्याने पाहता रोम नगर आहे खरे, तरी मनुष्य या नात्याने पाहता ते सर्व जगत् होय. तेव्हा या उभय नगरास ज्या गोष्टी हितावह असतील त्याच फक्त मलाही कल्याणप्रद आहेत.

४५. प्रत्येक मनुष्यास जे जे काही घडत आहे, ते सारे विश्वकल्याणासाठी आहे असे मनात वागविले म्हणजे पुरे. खरे, तथापि दुसरी एक सर्वसाधारण सत्य गोष्ट तू नीट विचार करून पाहिल्यास तुझ्या नजरेस येईल ती हीच की, जे जे काही एका मनुष्यास हितावह असते ते दुसऱ्या मनुष्यासही तसेच असावयाचे. आता येथे हितावह या शब्दाचा अर्थ मात्र लोक सामान्यत: जो समजतात तो घेतला पाहिजे (स्टोइक तत्त्वज्ञांच्या मते या मध्यम प्रकारच्या वस्तू असून, त्यांच्या संपादनार्थ मनुष्यास यत्न करण्याची मोकळीक नाही).

४६. नाटकगृहासारख्या करमणुकीच्या स्थळी तीच तीच गोष्ट पुन्हा दृष्टीस पडल्याने तमाशा कंटाळवाणा जसा होतो, तद्वतच या आपल्या साऱ्या जीविताचे आहे. कारण खाली, वर व सभोवताली ज्या ज्या म्हणून वस्तू पाहाव्या त्या साऱ्या एकच असून, त्यांचा उगमही एकच आहे, तर मग अशा या जगामध्ये तू राहणार तरी किती दिवस?

४७. आजपर्यंत मनुष्य कोणत्याही जातीचे, धंद्याचे किंवा राष्ट्राचे असले तरी मृत्युमुखी पडले आहेत, हे तू निरंतर चित्तांत वागीव. आपलीही अखेरीस तीच गत आहे. हिरैक्लिटस, पायथागोरस, सॉक्रेटिस अशांसारखे मोठमोठे वक्ते आणि महामनस्क तत्त्ववेत्ते आज कोठे आहेत बरे? त्याचप्रमाणे मागल्या काळचे मोठमोठे नावाजलेले वीर, सेनापती आणि जुलमी राजे यांची काय वाट झाली? शिवाय आर्किमेडीज अशांसारखे महाबुद्धिमान व ज्ञानी पुरुष आज कोठे आहेत? हे सारे मनुष्य आजला धुळीस मिळून गेले आहेत ना? मग त्यांना मृत्यूची बाधा ती काय उरली? बरे, ज्यांची नावे आज सर्वस्वी अज्ञात झाली आहेत त्यांना तरी ती का व्हावी? असा पोक्त विचार करून तू नेहमी आपला आयुष्यक्रम सत्यास व न्यायास अनुसरून ठेव. तुझा स्वभाव परोपकारी असू दे. मग ज्याच्यावर उपकार करावयाचा तो अत्यंत लबाड किंवा अन्यायी मनुष्य असला तरी काही चिंता नाही. हा भेदाभेद त्वा सारा विसरावा.

४८. तुला आनंदानुभव झाला पाहिजे तर आपल्या सहचरांचे सद्गुण तेवढे मनात आण. उदाहरणार्थ, एकाच्या आंगची चपलता, तर दुसऱ्याचा विनय आणि तिसऱ्या एखाद्याचे औदार्य, असा ज्याच्या अंगी जो वाखाणण्यासारखा गुण असेल तोच फक्त पाहावा. कारण आपल्या साहचर्याने असणाऱ्या मनुष्याच्या आचरणात दिसणारे सद्गुण तेवढे आपल्यापुढे ठेवल्याने जसा आनंद होतो तसा दुसऱ्या कशानेही होत नाही. यास्तव त्यावरच आपली नेहमी दृष्टी असावी.

४९. आपल्या शरीराचे अमुक एकच वजन असून, वास्तविक अमुक असावयास पाहिजे होते असे समजून आले तरी तू जसा असंतोष पावत नाहीस, तसाच आपले आयुष्य अमकीच वर्षे आहे, जास्त नाही, हे समजल्याने तू खंती होऊ नये, कारण तुझ्या ठायीचा जडांश केवढाही असला तरी जसा तुला चालतो, तसेच नेमलेल्या आयुष्यमर्यादेनेही त्वां तृप्त असावे.

५०. लोकांस वाटेवर आणण्याचा प्रयत्न अवश्य करावा; परंतु त्यांची तसे करण्याची नाखुशी दिसून आल्यास आपण त्यांच्याशी सहसा अन्याय्य आचरण करू नये. एखाद्या मनुष्याने आडदांडपणाने तुला असे करताना व्यत्यय आणला, तर त्याजबद्दल तू वाईट मानून चित्ताची शांती व समाधानही ढळू देऊ नको आणि लोकांकडून होणाऱ्या असल्या व्यत्ययांचा त्वां असा विनियोग करावा की, तेणेकरून तुझ्या ठायीचा दुसरा एखादा सद्गुण विकास पावेल. आणखी येथे असे ध्यानात आण की, आपण जो लोकांस सुधारण्याचा प्रयत्न केला त्यास काहीतरी मर्यादा म्हणून होती आणि अशक्य गोष्टी करण्याचा आपला मानस नव्हता, तर आपला हेतू मिळून इतकाच होता, की आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करावयाचा. असा प्रयत्न आपल्याकडून झाला म्हणजे पुरे, मग त्यात यश येवो अगर न येवो.

५१. ज्याला कीर्तीची आवड असते तो दुसऱ्या मनुष्याचा काही विवक्षित व्यापार आपल्या कल्याणाचा आहे असे मानतो आणि ज्यास सुखाची लालसा असते त्यास आपल्या ज्ञानेंद्रियाचे व्यापार कल्याणप्रद वाटतात; परंतु ज्याचे ज्ञानचक्षू उघडलेले असतात तो आपली कृत्येच काय ती आपल्या कल्याणाची साधक आहेत असा विचार करतो.

५२. कोणत्या गोष्टीविषयी बरे-वाईट मत मनात वागवून आत्मा अस्वस्थ होऊ देणे किंवा न देणे हे आपल्या स्वाधीनचे आहे. कारण केवळ वस्तूंच्या ठायी आमच्या विचारात बरा-वाईट फेरफार करण्याचे निसर्गतः मुळीच सामर्थ्य नाही.

५३. दुसरा काय म्हणत आहे ते चित्त देऊन ऐकण्याची सवय कर आणि होता होई तोपर्यंत वक्त्याच्या मनाच्या स्थितीमध्ये आपणास कल्पिण्याची सवय कर.

५४. जे मधमाशांच्या कळपास कल्याणकारक नव्हे ते त्यातल्या एखाद्या मधमाशीस तसे नव्हे.

५५. खलाशांनी सुकाणू धरणाराशी किंवा रोग्यांनी वैद्याशी उच्छृंखलपणाचे आचरण केले असता ते दुसऱ्या कोणाच्या कह्यात राहतील बरे? अशा स्थितीमध्ये सुकर्णधारास तारवातील लोकांच्या सुरक्षितपणाचा किंवा वैद्यास आपल्या चिकित्सेत असणाऱ्या रोग्यांच्या आरोग्याचा जिम्मा कसा बरे घेता येईल.

५६. ज्यांच्या बरोबर मी या लोकी आलो त्यातल्या किती लोकांनी बरे आजपर्यंत येथून प्रयाण केले आहे?

५७. ज्यांना कावीळ नावाचा रोग होतो त्यास मध कडू लागतो[६] आणि ज्यास पिसाळलेल्या कुत्र्याचा दंश होतो त्यास पाण्याची भीती वाटते. लहान मुलांस चेंडू पाहिला म्हणजे मोठा हर्ष होतो. या गोष्टीचा जर तुला राग येणे उचित नाही, तर भ्रममूलक समजुतीचा मनुष्याच्या मनावर अमल होऊन त्याजकडून अनन्वित कर्मे घडली असता तू का बरे क्रोधाविष्ट व्हावे? एवढ्याशा पित्ताचा किंवा विषाचा जर देहावर असा विलक्षण परिणाम होतो, तर भ्रामक मतांचा चित्तावर का बरे कमी अंमल व्हावा?

५८. आपल्या नैसर्गिक विवेकानुसार वर्तन ठेवताना तुला कोणाही मनुष्याकडून अंतराय घडणार नाही[७], सार्वत्रिक निसर्गाच्या विवेकास विरुद्ध असे तुला काही एक घडणार नाही.

५९. मनुष्य ज्यांना खुश ठेवू इच्छितात ते लोक कसले आहेत व असे करण्यात त्यांचे हेतू तरी काय असतात व त्यास ते कोणत्या प्रकारच्या कृत्यांनी खुश करू पाहत आहेत, याचे नीट अवलोकन कर. सर्वभक्षक काळ किती लवकर सर्व वस्तूंचा नायनाट करून टाकील व आजपर्यंत त्याने किती वस्तू चटकाविल्या आहेत याचा विचार कर.

संदर्भ :

१. शुद्ध हेतूने कार्य केल्यास चित्र विकाररहित.
२. अंतराय हा शब्द लेखकाचा योगदर्शनाचा अभ्यास अधोरेखित करतो.
३. यात मृत्यूची शक्य तेवढी सुलभ व्याख्या दिली आहे.
४. हा समज सर्वथैव खोटा आहे. संसारातील सर्व प्रकार खोटे किंवा भासवत नव्हेत. ते खरोखर अस्तित्वात आहेत. असे असता भलतेच मानून घेणे म्हणजे आपल्या निरोगी मनास भ्रम लावून घेणे होय. असे मानल्याने व्यक्ती, कुटुंबे आणि राष्ट्रे जगातून नाहीतशी होतील. मार्कस ऑरेलियस जरी असे म्हणतो तरी तो स्वतः सारे व्यवहार पूर्णपणे करीत असे, इतकेच नव्हे तर लढाया करीत असे. तीन तीन, चार चार वर्षे शहराला वेढा घालून बसत असे. तेव्हा ही लक्षणे, जगातील सारा पसारा स्वप्नवत आहे असे मानणाऱ्याची नव्हेत. (ही मांडणी मायावादाप्रमाणे भासते. बेंजमीन यांनी शंकराचार्यांच्या मायावादासोबत याची तुलना केली असती तर बरे झाले असते.)
५. मार्कस ऑरेलियस बादशहा आपणास आपल्या दत्तक पित्याच्या नावावरून अन्टोनिनस असेही म्हणवीत असे.
६. कावीळ झालेल्या मनुष्यास सर्व पदार्थ पिवळ्या रंगाचे दिसतात. त्यास मध कडू लागत नाही.
७. पुष्कळ घडतील. घडणार नाहीत हे म्हणणे चूक आहे. तथापि योग्य असेल ते करावे आणि त्यात कोठूनही व कशाही अडचणी आल्या तरी त्या सतत श्रम करून दूर करण्यास झटावे.

सारांश टीप : अंतिम ज्ञानतत्त्व विवेकाधिष्ठित असल्याने त्याचेकडून अन्याय तर संभवत नाहीच. ज्ञानतत्त्व स्व-स्वभाव जाणते, तसेच स्व-कार्यही जाणते. मनुष्याने निरीक्षण सूक्ष्म ठेवून वर्तावे. प्रकृती एकच आहे. तीच विविध आकार धारण करते. ज्ञानपूर्ण कृती कर. श्रवण महत्त्वाचे!

❍❍❍

पुस्तक सातवे

१. ज्याला तू अहित असे म्हणतोस ते त्वां वारंवार अनुभवले आहे. यास्तव तुला जे काही घडेल त्याविषयी असा विचार मनात आण की, असल्या गोष्टीचा आपणास पुष्कळ परिचय आला आहे. ज्या गोष्टी आपणास आज नगरातून व गृहांतून भरपूर दिसताहेत, तशाच गोष्टी प्राचीन, मध्यम व अर्वाचीन कालच्या इतिहासात जिकडे तिकडे आढळतात. नवे असे काही एक नाही. सर्व वस्तू परिचित असून, क्षणभंगुर आहेत.

२. आपण ठरविलेले सिद्धांत नष्ट व्हावयाचे म्हटले म्हणजे ज्या विचारांवर ते अवलंबून असतात त्यांचा आधी लय झाला पाहिजे; परंतु हे विचार सदैव उज्ज्वल राखण्याचे तुझ्या हाती आहे. एखाद्या वस्तूविषयी तुझे वास्तविक जे मत व्हावयास पाहिजे तेच तुला करता येण्याजोगे आहे. असे आहे तर मग त्वां का अस्वस्थ व्हावे? ज्या वस्तू तुझ्या मनास बाह्य आहेत त्याचा त्याजशी मुळीच संबंध नाही. तुजवर वस्तुमात्राचे जे परिणाम घडत आहेत त्यांजविषयी तुझी अशी वृत्ती झाली असता तुला घोर नाहीसा होईल. तुझे व्यर्थ गेलेले जीवित पुनः मिळविण्याचे तुझ्या हाती आहे. ते कसे म्हणशील तर सांगतो ऐक. पूर्वी तू वस्तुमात्राकडे ज्या दृष्टीने पाहत असे त्याच दृष्टीने पुन्हा पाहू लाग.

३. भलभलते तमाशे, रंगभूमीवर होणारी नाटके, मेंढरांचे कळप, गुरांची खिल्लारे, भाल्यांची फेक, लहान कुत्र्यापुढे टाकलेले हाड, आत मासे आहेत अशा तलावात टाकलेला भाकरीचा तुकडा, मुंग्यांचा ओझी नेण्याचा उद्योग, घाबरलेल्या लहान उंदराची धावपळ, कळसूत्री बाहुल्यांची हालचाल, या व अशाच दुसऱ्या नाना प्रकारच्या गोष्टी वस्तुतः पाहता सारख्याच आहेत. अशा गोष्टींच्या दर्शनाने तू कधीही विषाद पावू नये, तर नेहमी आनंदवृत्ती असावे, हा तुझा धर्म आहे. आणखी असे मानावे की, असल्या गोष्टी करण्यात जो आपले मन घालतो त्याचीही योग्यता त्या गोष्टीइतकीच आहे.

४. तुझ्या कानी लोकांची जी जी भाषणे पडतील त्यात वक्त्यांचे म्हणणे काय आहे ते नीट लक्ष लावून ऐक. त्याचप्रमाणे जो जो व्यापार तुझ्या नजरेस पडेल त्यात वास्तविक काय घडत आहे चांगले बारकाईने पाहा. म्हणजे अर्थात् प्रत्येक भाषणाचा वास्तविक मतलब काय आहे आणि प्रत्येक हालचालीचा हेतू काय आहे हे त्वां पाहावे.

५. कोणतेही काम करावयास मला बुद्धीचे साहाय्य पाहिजे. ती माझ्या ठायी पुरेशी असल्यास तिचा मी योग्य विनियोग करीन. कां की ती निसर्गाने मला दिलेल्या हिताच्या साधनांपैकीच आहे असे मी समजतो; परंतु ती जर पुरेशी नसेल, तर मग ते का मी पत्करू नये; आणि जो कोणी ते करण्यास विशेष समर्थ असेल त्याला ते करू द्यावे; परंतु असे न करण्यास काही योग्य कारण असल्यास गोष्ट निराळी किंवा दुसऱ्या एखाद्या माणसाची मदत घेऊन मीच ते काम सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करावा. हे उचित दिसल्यास ज्या मनुष्याची ही अशी मदत घ्यावयाची त्याच्या ठायी माझ्या बुद्धीच्या साहाय्याने सार्वत्रिक कल्याण वाढविण्याची अजमत आहे किंवा नाही ते म्या नीट पाहिले पाहिजे. कारण मजकडून किंवा दुसऱ्या कोणाकडून जे काही घडेल त्याच्या योगाने समाजास काही ना काही तरी उपयोगच झाला पाहिजे. एरव्ही ते दूषणीय समजावे.

६. ज्याची जगामध्ये एके वेळी मोठी प्रसिद्धी झाली होती अशा हजारो लोकांची आठवण आज अगदी बुजून गेली आहे. त्याचप्रमाणे ज्यांनी इतर लोकांची कीर्ती मोठ्या आनंदाने गाइली तेही केव्हाच विनाश पावले आहेत.

७. दुसऱ्यांचे साहाय्य घ्यावयास तू लाजू नको. कारण एखाद्या नगरावर शत्रूचा हल्ला पडला असता प्रत्येक योद्ध्याने जसे इतरांच्या सामलातीने आपले काम केले पाहिजे, तद्वतच तू आपले कर्तव्य करण्यास उचित होय. अशी कल्पना कर की, तुला नगराच्या भिंतीवर चढायचे आहे; परंतु तू आहेस लंगडा, तर मग तुला दुसऱ्यांच्या साहाय्यावाचून कसे बरे वर चढता येईल?

८. पुढे आपणास काय गोष्टी घडतील हा विचार मनात आणून तू अस्वस्थ होऊ नको. कारण घडावयाच्या असल्यास तुला त्या घडतील आणि त्या घडत असता तुझा आजचाच विवेक कायम राहील.

९. सर्व वस्तूंचा परस्परांशी निकट संबंध असून, तो अत्यंत पवित्र आहे. परस्परांपासून विलग अशा या विश्वात कोणत्याही वस्तू नाहीत. कारण त्या एकत्र जुळून हे सुव्यवस्थित विश्व निर्माण झाले आहे. सर्व चराचर वस्तुमय असे हे एकच विश्व असून, त्यास व्यापून राहणारा देवही एकच आहे. ज्या पदार्थाचे ते बनले आहे तो पदार्थही एकच असून, ते एकाच नियमाने बद्ध आहे. त्याचप्रमाणे सर्व बुद्धिमान प्राण्यांच्या ठायीचा विवेकही समानच आहे आणि सत्यही एकच आहे. सजातीय उन्नतीही समानच असन. त्यांच्या ठायीचे ज्ञानतत्त्वही प्रसन्न आहे.

१०. प्रत्येक जड वस्तूचा लय विश्वप्रकृतीमध्ये झपाझप होत असतो आणि जे काही कार्य - कारणासंबंधाने अस्तित्वात आले आहे. तेही विश्वाच्या ज्ञानतत्त्वामध्ये अविलंबे लीन होत आहे आणि प्रत्येक वस्तूची स्मृतीही कालगतीने लवकरच लोपून जात आहे.

११. विवेकी प्राण्याच्या संबंधाने जी गोष्ट निसर्गास अनुसरून असते ती विवेकानुसारही असावयाची.

१२. होता होईतो आपल्या पायावर उभे राहण्यास शीक; परंतु हे जमत नसल्यास इतर जनांचे साहाय्य घेण्यास हरकत नाही.

१३. ज्याप्रमाणे देहातील निरनिराळे अवयव एकत्र जुळून त्याचे जीवन व्यापार चालले आहेत, त्याचप्रमाणे विवेकी प्राणी एकमेकांपासून विलग असताही त्या सर्वांच्या हातून होणाऱ्या परिश्रमाचे फल एकच आहे. हा विचार तुझ्या चित्तात नीट ठसण्यासाठी आपण विवेकी प्राण्याच्या समूहातील एक जण आहोत, असे नेहमी मनात वागीव; परंतु असे मानल्याने म्हणजे तू मनुष्य जातीवर मनापासून प्रेम करशीलच असे सांगवत नाही. परोपकृतीपासून होणाऱ्या स्वतःसिद्ध आनंदाचा अनुभव तुला अद्यापि घडू लागला नाही. तू जो आजपर्यंत परोपकार करीत आला आहेस तो केवळ तसे करणे वाजवी आहे अशा बुद्धीने. त्यात स्वतःचेच कल्याण आहे, असे तुला अद्यापि वाटू लागले नाही.

१४. बाह्योपाधींपासून होणारी पीडा देहाच्या भागात व्हावयाची त्यास ती होऊ दे, ज्यास पीडा होईल ते वाटल्यास कुरकुर करतील. कोणतीही घडणारी गोष्ट अनिष्ट आहे असे तू मानल्यावाचून तुला तिजपासून अपाय होत नाही आणि असे न मानण्याचे तुझ्या स्वाधीन आहे.[१]

१५. कोणी काही म्हणो, मला चांगले राहिले पाहिजे. सोने, पाचू इत्यादी सुंदर वस्तू नेहमी आपणाशी असे म्हणतातशा दिसतात की, लोक आपणास हवी ती नावे ठेवोत, आम्हाला आपला रंग व सौंदर्य राखले पाहिजे.

१६. आपल्या ठायीच्या नियामक शक्तीकडन स्वत:स काही एक त्रास पोचत नाही. म्हणजे अर्थात ती आपल्या स्वत:स भीतीचे किंवा द:खाचे कारण होत नाही; परंत दुसऱ्या कोणाकडून तीस असा त्रास होत असल्यास काही चिंता नाही. कारण ही शक्ती असल्या अपकाराविषयी अत्यंत उदासीन असल्याकारणाने त्यापासून तीस काही एक विकार व्हावयाचा नाही. देहाने पाहिजे, तर आपणास इजा न व्हावी म्हणून सावधगिरी ठेवावी आणि त्यास एखादा अपाय घडलाच, तर त्याने तो हवा तर बोलून दाखवावा; पण तो तर आहे जड. भीती, दुःख इत्यादी भावना आत्म्यासच होत असतात; परंतु त्यास या अनिष्ट गोष्टीविषयी वाटेल ते मत करण्याची शक्ती असल्याकारणाने त्यास त्यापासून काही एक विकार व्हावयाचा नाही. कारण जो त्याजविषयी असे प्रतिकूल मतच आपले होऊ देणार नाही. सारांश, नियामक तत्त्वास दुसऱ्या कशाचीही अपेक्षा नाही; आणि असलीच तर ती

त्याची त्यानेच उत्पन्न करून घेतलेली असावयाची. म्हणून ते सर्व उपाधीपासून मुक्त राहून त्याचे व्यापार अप्रतिहतपणे चालतात आणि त्यास कधी त्रास किंवा अवरोध घडलाच तर तो त्याच्या स्वतःकडूनच घडावयाचा..

१७. चांगुलपणा ही एक परमपूज्य देवताच आहे; परंतु तीस भासमय कल्पनांमुळे विरोध घडत आहे. यास्तव या भ्रामक कल्पनांचा निरास झाला पाहिजे. त्याशिवाय तुझ्याही अंगी चांगुलपणा यावयाचा नाही; परंतु या भ्रांतीमय कल्पना मनुष्यमात्राच्या हाडीमासी जशा काय अगदी खिळून गेल्या आहेत. तेव्हा त्याजविषयी व्यर्थ संतोष पावू नये, तर त्या हळूहळू प्रयत्नाने चित्तातून काढून टाकाव्यात.

१८. आपल्या स्थितीमध्ये केव्हा काय पालट होईल याविषयी कोणास भीती बाळगण्याची जरूरत नाही. या विश्वामध्ये नेहमी पालट होत आहे म्हणूनच निरनिराळ्या गोष्टी घडत आहेत. हा पालट होत नसता तर काही एक घडते ना. निसर्गास कल्याणप्रद व अनुरूप अशीच ही व्यवस्था आहे. उदाहरणार्थ- चुलीत घातलेल्या लाकडांत फेरफार झाला नसता, तर तुला ऊन पाण्याचे स्नान घडले असते काय? त्याचप्रमाणे अन्नामध्ये पालट होता ना, तर तुझे पोषण झाले असते काय? सारांश काय, की जेवढे म्हणून काही उपयुक्त आहे तू सारे काही ना काही फेरफार होऊन अस्तित्वात आले आहे. यावरून पाहता तुझ्यातही फेरफार होणे रास्त असून, निसर्गाच्या राहटीस आवश्यकही आहे, असे तुला वाटत नाही काय?

१९. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामध्ये सापडलेले पदार्थ जसे मोठ्या झपाट्याने लोटत जातात, तशीच विश्वप्रकृतीतील एकंदर वस्तूंची गत आहे. या वस्तूंचा स्वभावसिद्ध मिलाफ असून, एकंदर विश्वव्यापारास त्या साहाय्यभूत होतात. क्रिसियस, सॉक्रेटिस, एपिक्टेटस अशा महात्म्यांसारखे किती पुरुष आजपर्यंत काळाने गिळून टाकले आहेत बरे? हीच दशा हर एक विद्यमान वस्तूची व मनुष्याची व्हावयाची हे तू ध्यानात आण.

२०. मला फक्त एका गोष्टीची चिंता आहे. ती गोष्ट हीच की मानवी स्वभावास जे विरुद्ध आहे किंवा ज्या रीतीने अथवा ज्या काळी ते केले असता त्यास मानणार नाही असे काहीतरी माझ्या हातून कदाचित घडेल.

२१. सर्व वस्तूंचे विस्मरण लवकरच होण्यासारखे आहे व तुझी आठवण लोकांस फार वेळ राहणारी नव्हे.

२२. जे आपणास अपकार करतात त्यांच्यावर प्रेम करणे हा मनुष्याचा एक विशेष गुण आहे. त्याच्या हातून अनन्वित कर्म घडले असता तुझ्या मनात पुढील विचार यावेत. तुला वाटावे की, ते आपले भाऊबंद असून, त्यांच्या हातून जे हे अनुचित कर्म घडत आहे ते केवळ त्यांच्या अज्ञानामुळे, समजून उमजून नव्हे, शिवाय ते व आपणही लवकरच मृत्यू पावणारे आहोत; परंतु सर्वांत विशेष महत्त्वाचा विचार असा की, ज्याने तुझे नुकसान केले असे

वाटते, त्याच्या हातून वास्तविक पाहता तुला काही एक अपकार घडलेला नसतो, कारण त्याच्या पायी तुझ्या नियामक शक्तीवर कोणताही अनिष्ट परिणाम होऊन ती पूर्वीच्याहून बिघडलेली नसते.

२३. मनुष्य[२] जसा मेणाची हवी हवी ती चित्रे करून ती मोडतो आणि पुनः त्याच मेणाची दुसरी करतो, त्याप्रमाणे विश्व प्रकृतीपासून निसर्ग घटकेत एखादा घोडा बनवतो आणि अंमळशाने हा घोडा मोडून त्याचा एक वृक्ष उभा करतो, पुढे त्याच मसाल्याचा वाटल्यास मनुष्यही घडवितो. असा त्याचा क्रम एकसारखा चालू आहे. तेव्हा अस्तित्वात येणाऱ्या साऱ्या चिजा अल्पकाळपर्यंत राहणाऱ्या असल्यास काय नवल. वस्तुतः पाहता एखादे पात्र परमाणुसंघाने बनले असता जसे त्यात त्याचे काही एक नुकसान नाही, तसेच ते पुढे असताही त्याजवर संकट ओढवेल असे म्हणवत नाही. (पु. ८, क. ५०)

२४. रागाने भुवया चढविणे मुळीच अस्वाभाविक दिसते. अशी क्रोधमुद्रा धारण करण्याने मुखाचा सर्व सुरेखपणा नष्ट होतो आणि असे सारे वारंवार घडल्याने तो समूळ नाहीसा होऊन शेवटी कधीही तो प्राप्त होत नाही. याच एका गोष्टीवरून तू असा निर्णय कर की, क्रोधावश होणे हे विवेकास विरुद्ध आहे. आपल्या हातून कदाचित कर्म घडत आहे असे ज्यास वाटेनासेही होते, त्याने या जगात आणखी जिवंत राहण्याचे काय कारण आहे?

२५. सर्व विश्वाचा नियंता जो निसर्ग तो तुझ्या दृष्टीस पडत असलेल्या एकंदर वस्तूंस पालटून त्यांच्या मसाल्याच्या दुसऱ्या वस्तू वाढवील आणि पुढे कालांतराने या दुसऱ्या वस्तूपासून तिसऱ्याच प्रकारच्या वस्तू अस्तित्वात आणील. या सर्व क्रमाचा हेतू[३] एवढाच दिसतो की, जग नेहमी नवे राहावे (पु. १२, क. २३).

२६. एखाद्या मनुष्याने तुला अपकार केला असता तू लागलीच असा विचार कर की, त्याने जी ही गोष्ट केली ती चांगल्या-वाईटाविषयीच्या कोणत्या समजुतीप्रमाणे केली असावी? असा विचार तुजकडून झाला असता त्या मनुष्याची तुला कीव येऊन त्याचे नवल किंवा राग वाटणार नाही. कारण तुझाही समज त्याच्यासारखाच बहुतेक असतो. तेव्हा त्यास क्षमा करणे हा तुझा धर्मच आहे; परंतु जर करिता तुझा समज त्याच्यासारखा भ्रांतिमय नसेल, तर मग अशा भ्रांत मनुष्याविषयी तुझी बुद्धी विशेषच चांगली होईल.

२७. जे तुजपाशी नाही त्याजविषयी उगीच खंती होऊ नको, तर तुजपाशी ज्या वस्तू आहेत, त्यापैकी अत्युत्तम वस्तूंची निवड करून असा विचार कर की, त्या जर आपणापाशी नसत्या तर त्यांच्या संपादनार्थ किती उत्कंठेने आपण प्रयत्न केला असता? परंतु येथे अशी एक सावधगिरी ठेवली पाहिजे की, ज्या वस्तूविषयी असा संतोष प्रदर्शित करावयाचा त्याजविषयी वाजवीपेक्षा फाजील आवड आपल्या मनात उत्पन्न होऊ देऊ नको. का की असे झाल्याने त्या तुजपाशी कधी नसल्यास तू अस्वस्थ होशील.

२८. तू स्वतःच्या ठायी लीन हो. जे ज्ञानतत्त्व तुझे नियमन करीत आहे त्याचा स्वभावच आहे की, त्याच्याकडून न्यायाचरण होत असले म्हणजे ते समाधान पावून शांतीचा अनुभव घेऊ लागते.

२९. सर्व भासमय कल्पना चित्तातून बुजवून टाक, सर्व वासनांचा जय कर. वर्तमान स्थितीपुरताच[४] विचार कर. आपणास किंवा इतरांस घडणाऱ्या हर एक गोष्टीचे स्वरूप नीट ओळख. ज्या ज्या विषयांचा तू विचार करशील त्यांचा जडांश कोणता व चिदांश कोणता याची नीट शहानिशा कर. आपल्या अंत समयाचा विचार नित्य मनापुढे ठेव. एखाद्या मनुष्याने केलेला उपकार जेथल्या तेथे राहू दे (पु. ८, क. २९).

३०. कोणी काही बोलू लागला असता त्याच्या म्हणण्याकडे नीट लक्ष द्यावे. ज्या गोष्टी घडत असतील त्या व ज्या दुसऱ्या गोष्टीमुळे त्या घडत असतील त्या अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी बुद्धीच्या साहाय्याने समजून घ्याव्यात.

३१. साधेपणा व विनय अंगी असू दे. ज्या गोष्टीस सद्गुणही म्हणता येत नाही किंवा दुर्गुणही म्हणता येत नाही अशा गोष्टींविषयी उदासीन राहा. मनुष्यजातीवर प्रेम कर. देवांची आज्ञा पाळ. सर्व विश्वाचा कारभार नियमानुसार चालला आहे, हे तू चांगले लक्षात ठेव.

३२. मृत्यूविषयी म्हणशील, तर तो प्राप्त झाला असता एक तर देह ज्या निरनिराळ्या तत्त्वांचा बनला आहे, ती पुन्हा पृथक होऊन स्वस्वरूपी जातात किंवा विनाश पावतात.

३३. आता दुःखाचे स्वरूप काय आहे ते पाहू. जे दुःख अगदी असह्य असते तेणेकरून आपला देहान्तच होतो; परंतु जे दुःख पुष्कळ काळपर्यंत होत असते ते सह्य होऊन जाते[५] आणि चित्त स्वतःच्या ठायी लीन होत्साते स्वशांती कायम राखते. येणेकरून नियामक शक्तीस मुळीच विकार घडत नाही. असे आहे त्यापेक्षा देहाच्या ज्या भागास होत असेल त्यांनी शक्य असल्यास आपले त्याजविषयीचे मत सांगावे; पण हे सारे भाग जड आहेत.

३४. आता कीर्तीची तरी कितीशी मातब्बरी आहे ते पाहू. ज्यास कीर्तीची लालसा असते त्याच्या मनाची कशी काय स्थिती असते ती पाहा. ते कोणत्या प्रकारचे लोक असतात आणि ते कोणत्या गोष्टीचा अव्हेर करतात व कोणत्या गोष्टीच्या संपादनार्थ झटतात हे बारकाईने अवलोकन कर. ज्याप्रमाणे वाळूची एकावर एक रास केली असता खालची वाळू छपून जाते, तद्वतच आपल्या आयुष्यक्रमामध्ये पूर्वी घडलेल्या गोष्टीवर मागून घडलेल्या गोष्टीचे जणू काय आच्छादनच पडते.

३५. प्लेटो असे म्हणतो की, ज्या मनुष्याचे मन उन्नत झालेले असून, समग्र काळ व अखिल विश्वप्रकृती यांचे अवलोकन ज्यास घडते अशा मनुष्यास हे जीवित मोठे महत्त्वाचे असे वाटेल काय? कधीही वाटणार नाही. असा मनुष्य मरण ही काही अनिष्ट गोष्ट आहेसे नि:संशय मानणार नाही.[६]

३६. अन्टिस्थेनीस म्हणतो की, लोक आपणास अपकार करीत असले तरी, त्यांजवर उपकारच करीत राहणे हे मोठे भूषणावह होय.[७]

३७. मुखचर्या जशी मनाच्या अगदी स्वाधीन राहून ते सांगेल ती वृत्ती स्वतःवर प्रदर्शित करते किंवा अगदी शांत राहते, तसेच मनाकडून आपल्या स्वतःचे नियमन व शांती होऊ नये हे अगदी वाईट आहे.

३८. अनिष्ट गोष्टींच्या संबंधाने खिन्न होणे रास्त नव्हे. कारण तुझ्या या खेदाची त्यास पर्वा नसते.

३९. अमर देवांस आणि आम्हा मानवांस जेणेकरून प्रमोद होईल असे करीत जा.

४०. धान्याची कणसे परिपक्व झाली असता जशी ती खुडावयाची तद्वत आपल्या जीविताचे होणे उचित आहे. एक मनुष्य मरण पावतो आहे तो दुसरा जन्मतो आहे, असे हे विश्वाचे रहाटगाडगेच आहे.

४१. देवास माझी व माझ्या संततीची पर्वा नसल्यास त्याचे काहीतरी कारण आहे.

४२. देव माझ्या व न्यायी मनष्यांच्या अगदी सन्निध आहेत.

४३. कोणत्याही कारणाने दुसरे लोक दुःखाक्रोश करू लागले असता आपणही तसेच करू नये किंवा उद्वेग पावू नये.

४४. प्लेटो म्हणतो की, एखादा मनुष्य असे म्हणेल की, जो कोणी हर एक कृत्यांत आपल्या जिवास कितपत धोका आहे याचा नीट विचार करून सांभाळून वागेल त्याच्या हातून काहीतरी चांगले काम होण्यासारखे आहे; परंतु हे त्याचे म्हणणे नीट नव्हे. मनुष्य कोणतेही कर्म करीत असला तरी त्याने आपल्या जीविताचाच फक्त विचार करणे उपयोगी नाही, तर आपण जे करतो आहोत ते न्याय्य आहे की अन्याय्य आहे, नीतीचे आहे की अनीतीचे आहे याचा विचार त्याने अवश्य केला पाहिजे.

४५. तो आणखी म्हणतो : रणांगणामध्ये एखाद्या योद्ध्याने एकदा कोणतेही ठिकाण आपण होऊन पत्करले असता किंवा सेनापतीने त्याला ते नेमून दिले असता त्याने ते निश्चयाने धरून राहावे, कोणताही प्रसंग आला, तरी ते कदापि सोडून जाऊ नये. फार काय पण साक्षात् मृत्यूही आला तरी त्यास जुमानू नये. जो कोणी आपला जीव वाचविण्याकरिता ते ठिकाण सोडून पळून जाईल त्याची अत्यंत नीच मनुष्यात गणना करावयाची.

४६. तो आणखी म्हणतो, मित्रहो, आपण विचार कराल तर आपणास दिसून येईल की, आपला किंवा आपल्या शेजाऱ्यांचा जीव वाचविण्यातच केवळ मोठीशी नीती किंवा औदार्य आहे असे नाही. अमुक एक मनुष्य अमुक वर्षे जगला किंवा अमुक इतका वृद्ध झाला इत्यादी विचार केवळ व्यर्थ होत. नुसती जीविताची प्रीती असणे इष्ट नव्हे. या गोष्टीचा सर्व भार देवावर टाकून आपण स्वस्थ राहावे, आणखी असे पक्के समजावे की, भवितव्यता कधी कोणासही टाळता येण्यासारखी नाही, तर जे अल्पमात्र जीवित त्यास प्राप्त झाले आहे,

त्याचा उत्तम उपयोग त्यास कसा करता येईल, हाच विचार त्याच्या चित्तात नेहमी असावा.

४७. या नभोमंडळाकडे तू पाहशील तर ताऱ्यांच्या अचिंत्य गती तुझ्या नजरेस पडतील आणि वाटेल की. या प्रचंड भ्रमणात आपणही सापडलो आहोत. त्याचप्रमाणे तत्त्वामध्ये एकसारखा पालट होऊन त्यास निरनिराळी रूपे प्राप्त होत आहेत, याचाही विचार कर. अशा विचारांची चित्तास सवय लावल्याने भूलोकीच्या ह्या जीवितातील सर्व किल्मिष जाऊन ते शुद्ध होईल.

४८. प्लेटोचे आणखी एक असे सुंदर वचन आहे की, मानवांच्या स्थितिरीतीविषयी जो विवेचन करू जाईल, त्याने या लोकांच्या वस्तू उंच स्थानावरून आपण पाहत आहोत असे कल्पावे. म्हणजे अर्थात त्याने मानवाचे जमाव, लष्करे, कृषिकर्म, विवाह, तह, जन्म, मृत्यू, न्याय कचेऱ्यांची कलकल, निर्जन स्थळे, रानवट मनुष्याच्या निरनिराळ्या जाती, मौजा मारण्याच्या व शोक करण्याच्या पद्धती, बाजाराच्या जागा इत्यादी निरनिराळ्या व परस्पराहून अत्यंत विसदृश अशा गोष्टींचे मिश्रण व सुसंगत व्यवस्था नजरेखाली घातल्या पाहिजेत.

४९. गतकाळी घडलेल्या गोष्टींचे मनन कर. मागल्या काळी मोठमोठे राज्यविप्लव[८] होऊन अधिकारक्रांती झाल्या आहेत. यावरून पुढल्या काळी काय घडेल याचे तुला सहज अनुमान करता येईल. पुढे घडणारे मागल्यासारखेच असावयाचे, विद्यमान काळी जो निसर्गक्रम आहे तोही या उभय कालीच्या क्रमाहून किमपि भिन्न नसावयाचा. तेव्हा तुझे आयुष्य चाळीस वर्षांचे असले काय किंवा सहस्र वर्षांचे असले काय सारखेच. कारण या विश्वामध्ये त्याच महत्त्वाच्या गोष्टींची अनुवृत्ती पुनःपुनः होत असल्याकारणाने तुझे आयुष्य कितीही दीर्घ असले तरी तुझा अनुभव मुळीच वाढावयाचा नाही.[९]

५०. जे काही या पृथ्वीरूप तत्त्वापासून उद्भवले आहे ते पुनरपि त्या तत्त्वास जाऊन मिळणार आहे; परंतु जे स्वर्गस्थ बीजापासून निर्माण झाले आहे ते पुन्हा स्वर्गलोकाप्रत पावणार आहे. याप्रमाणे पाहता परमाणूंचा परस्पर संयोग घडून आकार पावलेल्या वस्तुजाताचे पुनः पृथक्करण व्हावयाचे अगर त्याचे निरनिराळे अवयव ज्या जड महाभूतांच्या सूर्यकिरणाने घडलेले आहेत त्यांची वाताहत व्हावयाची. मिळून परिणाम सारखाच.

५१. अन्नोदक व चांगल्या चांगल्या कला यांच्या साहाय्याने होता होईल तो अवगुण टाळून जीवमान राहावे. म्हणजे अर्थात स्वलोकापासून प्राप्त झालेला जो प्राण त्याचे धारण करून उद्योग करावा. उगीच कुरकुर करू नये.

५२. एखादा मनुष्य आपल्या शत्रूस चीत करण्यात मोठा कुशल असेल; परंतु तो विशेष सहवासप्रिय किंवा विनीत नसतो. शिवाय जे जे घडेल ते मुकाट्याने सोसण्याचा गुण त्याच्या ठायी विकास पावलेला नसतो आणि आपल्या शेजाऱ्याच्या अपराधांची गय करण्याचा स्वभाव त्याच्या ठायी वसत नाही.

५३. देवास आणि मानवास साधारण असा जो विवेक तद्नुसार कोणतेही कर्म घडत असले म्हणजे तेथे कशाचीही भीती बाळगण्याचे प्रयोजन नाही. कारण जेथे कोणताही उद्योग आपल्या ठायीच्या निसर्गानुसार होऊन फलप्राप्ती होत असते तेथे कोणताही अपाय होण्याचे भय नाही.

५४. कोणत्याही स्थळी आणि कोणत्याही प्रसंगी आपल्या प्राप्त स्थितीत आपणास सद्भावपूर्वक संतुष्ट राहता येईल. त्याचप्रमाणे आपल्या सभोवतालच्या लोकांशी न्यायाने वागता येईल आणि आपले जे आज विचार आहेत त्यामध्ये नवी भर घालताना प्रत्येक नवा विचार कितपत सत्य व विवेकशुद्ध आहे हे तुला नीट तपासून पाहता येईल.

५५. दुसऱ्याचे नियामक अंश[१०] कसे काय आहेत, हे पाहण्याच्या भानगडीत तू पडू नको, तर तुझे स्वतःचे प्रोत्साहन करणारा स्वभाव कसा काय आहे ते पाहा. हा स्वभाव अर्थात् दोन प्रकारे बनत चालला आहे. एक प्रकार असा की, ज्या गोष्टी तुला सतत घडत आहेत, त्यांच्या द्वारे सर्व विश्वाच्या निसर्गाचा तुजवर परिणाम होत आहे. दुसरा असा की, ज्या गोष्टी तुजकडून अवश्य घडल्या पाहिजेत त्या गोष्टींच्या द्वारे तुझा स्वतःचा निसर्ग तुजमध्ये फेरफार करीत[११] आहे. आता प्रत्येक प्राण्याने आपल्या प्रकृतीप्रमाणे वर्तले पाहिजे. विवेकहीन वस्तूंपैकी ज्या नीच असतात, त्या जशा श्रेष्ठ वस्तूंच्या उपयोगी पडतात, त्याचप्रमाणे विवेकी प्राण्यांच्या शुश्रूषेसाठी इतर प्राणी निर्माण झाले[१२] आहेत; परंतु विवेकी प्राणी परस्परांच्या उपयोगासाठीच अस्तित्वात आले आहेत.

मानवाच्या ठायीचे प्रधानत्व म्हटले म्हणजे संगमशीलता हे होय त्याच्या ठायी दुसरे एक असे तत्त्व आहे की, देहाच्या बंधनांनी बद्ध न होण्याची त्यास ताकद आहे. कारण त्याच्या ठायीच्या विवेकशक्तीचा असा एक धर्म आहे की, त्याच्या योगेकरून ती बाह्य उपाधीपासून निर्लेप राहू शकते आणि इंद्रियव्यापार आणि वासना यांचे काही एक चालू देत नाही. कारण उघडच आहे की, जी शक्ती निसर्गतः इतर सर्व वस्तूंचे नियमन करण्यास अस्तित्वात आली आहे तिजपुढे या गोष्टींची काय कथा? तिसरे एक तत्त्व या विवेकशील प्राण्याच्या ठायी असे आहे की, तो भ्रम किंवा मोह यापासून मुक्त असतो. या तिन्ही तत्त्वांच्या अनुरोधाने त्याचा नियामक अंश नीट चालल्यास त्याच्या अस्तित्वाचे साफल्य होईल.

५६. आपली प्राणयात्रा आज आटोपली असून, आपण केवळ मृतवत् आहोत असे मान; आणि शेष राहिलेले आयुष्य निसर्गानुसार वर्तण्यात घालीव.

५७. जे तुला दैवानुसार प्राप्त होईल त्याचा आवडीने स्वीकार कर. कारण त्याहून तुला दुसरे अनुरूप ते काय आहे?

५८. तुजवर एखादा प्रसंग आला असता असे पाहत जा की, असलाच प्रसंग पूर्वी ज्यावर आला होता त्यांना त्याबद्दल केवढा खेद वाटला व त्यांनी त्या गोष्टीस केवढा दोष लावला; पण अखेरीस ते या जगातून नाहीतसे झाले. त्यांच्या त्या खेदाचा व संतापाचा काही एक

उपयोग झाला नाही. असे असता तूही त्यांच्यासारखे वर्तन करण्यास का बरे प्रवृत्त व्हावे? मनास अस्वस्थ करणाऱ्या असल्या प्रकारांचा तू का बरे अव्हेर करीत नाहीस! या प्रकारांचा निसर्गाशी किंवा ते ज्यांच्या हातून घडतात त्यांशी व ज्यास त्यांचा अनुभव घडतो त्यांशी अर्थाअर्थी काही एक संबंध नसतो. ज्या गोष्टी तुला वेळोवेळी घडतील त्यांचा उपयोग योग्य प्रकारे करण्याची तुला का बरे बुद्धी होत नाही? असा त्यांचा योग्य उपयोग झाला असता त्यापासून तुझे काहीतरी हितच होईल. फक्त आपल्या आत्म्याचाच विचार मनापुढे ठेव आणि जे जे कृत्य तू करशील तेणेकरून आपल्या ठायीचा चांगुलपणा वाढविण्याचा दृढ निश्चय कर.

५९. आपल्या इच्छाशक्तीच्या ठायी लीन हो. सर्व चांगुलपणाचा उगम अंतर्यामी आहे, ही मनोभूमी तू सतत खणीत राहिल्यास चांगुलपणारूप निर्झर सदोदित वर येत राहील.

६०. आपला देह नीटनेटका असून, चालण्या वागण्यात अव्यवस्था नसावी. जसे मनाच्या स्थितीप्रमाणे मुखचर्येवर बुद्धिमत्ता, सभ्यता इत्यादी वृत्तीचे प्रदर्शन होते, तसेच सर्व शरीराचेही झाले पाहिजे; परंतु ही आपल्या देहाची इष्ट स्थिती राखताना वृथा डौल मात्र दाखवू नये.

६१. आयुष्यक्रमणाची कला कुस्तिगीराच्या कलेप्रमाणे आहे. कुस्तेगीरास जसे प्रतिपक्षाकडून होणाऱ्या आकस्मिक व अनपेक्षित डावपेचास एकसारखे सादर राहावे लागते, तसेच आपल्या आयुष्यात घडणाऱ्या अनेकविध प्रसंगांत आपण नेहमी सादर असले पाहिजे.

६२. ज्यांनी आपली वाहवा करावी असे तू इच्छितोस ते कोण लोक आहेत व त्यांचे नियामक अंश कोणत्या प्रकारचे आहेत या गोष्टींचे सतत अवलोकन कर. असे केलेस म्हणजे जे तुझी विनाकारण बेअदबी करतात त्यांस तू दोष देणार नाहीस किंवा त्यांच्या वाखाणणीची तू अपेक्षा करणार नाहीस. मात्र त्यांच्या मतांचा आणि वासनांचा उगम कोठे आहे याचे तुजकडून नीट अवलोकन घडले पाहिजे.

६३. प्रत्येक आत्मा त्यास न समजता सत्यभ्रष्ट होतो, त्याचप्रमाणे न्याय, संयम, परोपकारबुद्धी इत्यादी त्याच्या ठायीच्या सद्वृत्तींचा लोप होतो, हे त्वां अवश्य लक्षात वागवावे. कारण तुझा असा समज झाला असता तू सर्वांशी विशेष सौम्यपणे वर्तन ठेवशील.

६४. कोणत्याही प्रकारचे दुःख तुला प्राप्त झाले असता तुझ्या चित्तात असा विचार वागावा की, त्याच्या प्राप्तीत काही अप्रतिष्ठादायक नाही अथवा त्याच्या योगाने आपल्या ठायीचे नियामक ज्ञानतत्त्व बिघडण्यासारखे नसते. कारण या ज्ञानतत्त्वामध्ये विवेक आणि समाजप्रीतीही असल्यामुळे या बाह्योपाधीची बाधा त्यास होत नाही. बहुतेक प्रकारच्या दुःखाच्या संबंधाने एपिक्युरस काय म्हणत असे ते ध्यानात ठेवावे. तो म्हणत असे की, दुःख जे आहे ते असह्य नसून अक्षय राहणारे नव्हे. मात्र चित्तांत असे वागविले पाहिजे की, प्रत्येक

दुःखास काही मर्यादा म्हणून असते आणि त्याविषयी भलत्याच कल्पनांनी चित्त व्यग्र होऊ देता कामा नये. दुसरे आणखी असे लक्षात ठेवावे की, आपणास अप्रियशा वाटणाऱ्या पुष्कळ गोष्टी दुःखाच्याच वर्गातल्या असून, त्या आपणास जशा आहे तशा वाटत नाहीत. उदाहरणार्थ सुस्तपणा, अत्यंत जबर उष्मा, क्षुधामांद्या इत्यादी प्रकार दुःखाचेच आहेत असे समजले पाहिजे. तेव्हा असल्या गोष्टीविषयी जेव्हा जेव्हा तुझ्या चित्तात असमाधान उत्पन्न होत जाईल त्या वेळी आपल्या मनाशी असे म्हण की, आपण दुःखामुळे व्याकूळ होत आहोत, हे काही नीट नव्हे.

६५. निर्दय मनुष्ये इतर मनुष्याशी कितीही निष्ठुरपणाने वागली तरी अशा मनुष्यांविषयी तुझ्या मनात वाईट बुद्धी नसावी.

६६. टेलाजीस नामक एका मनुष्याची वर्तणूक सॉक्रेटिसापेक्षा चांगली नव्हती असे आपण कशावरून समजावे? सॉक्रेटिस विशेष शौर्याने मरण पावला किंवा त्याने आपल्या वेळच्या पंडितमान्य तार्किकांशी विशेष कौशल्याने वादविवाद केला किंवा एकदा मोठ्या कडाक्याच्या थंडीमध्ये रात्रभर राहण्याचा प्रसंग आला असता त्याने तो विशेष चांगला सहन केला. सालमिसच्या लिआन नामक वीराला त्यास पकडावयास सांगितले असता तो हुकूम न मानण्यातच विशेष भूषण आहे, असे त्यास वाटले इत्यादी त्याजविषयीच्या गोष्टी कळून पुरत नाहीत, तर सॉक्रेटिसाचा आत्मा कोणत्या प्रकारचा होता याची आपण चौकशी केली पाहिजे; आणि जर करता असे कळून आले की, मनुष्याशी न्यायाने वागून देवावर भाव ठेवण्यात त्यास समाधान वाटत असे, एखाद्या मनुष्याचे दुष्टत्व पाहून त्यास विनाकारण खेद वाटत नसे, कोणत्याही मनुष्याच्या अज्ञानाचा पगडा तो आपल्यावर बसू देत नसे, निसर्गत: जे त्याच्या वाट्यास आले होते त्याजविषयी त्याने कधीही अनादर दर्शविला नाही किंवा ते असह्य समजून राहिले नाही, या क्षुद्र देहाच्या मोहास तो वश झाला नाही, तरच त्यास श्रेष्ठ म्हणावयाचे.

६७. निसर्गाने जड देहाशी चैतन्याचा जो संयोग तुझ्या ठायी केला आहे तेणेकरून तुला सर्व बाह्योपाधीपासून दूर राहून ज्या गोष्टी केवळ स्वतःच्याच आहेत त्या आपल्या कह्यात ठेवण्यास मुळीच प्रत्यवाय होणार नाही. मनुष्यास देवासारखी योग्यता येऊनही तो तसा आहे असे कोणास वाटणारदेखील नाही, ही गोष्ट नेहमी मनात ठेव. आणखी एक गोष्ट अशी लक्षात वागविली पाहिजे की, आपले आयुष्य सुखात घालविण्यास अगदी थोड्या गोष्टींची आवश्यकता असते. मोठा वावदूक किंवा सृष्टिज्ञानप्रवीण होण्याचा प्रयत्न करून तुझी निराशा झाली असली तरी स्वतंत्र, विनयी, सहवासप्रिय व देवांची आज्ञा पाळणारा असा होण्याविषयीची उमेद त्वां सोडू नये. हे गुण तुझ्या ठायी प्रयत्नांती नि:संशय येतील.

६८. सर्व जरी तुजविरुद्ध वाटेल त्या रीतीने ओरडत असले किंवा वन्य पशुंनी हा तुझा हाडामांसाचा गोळा जरी फाडून छिन्नभिन्न केला तरी आपल्या चित्ताची शांती राखून

आपल्यावर कोणाचा कोणत्याही प्रकारचा जुलूम होऊ न देणे तुझ्या हाती आहे. कारण स्वतःची शांती राखण्यास आणि बाह्य वस्तूंचे वास्तव स्वरूप ओळखून प्राप्त झालेल्या विषयांचा योग्य विनियोग करण्यास मनाला कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय घडण्याची शक्यता नाही. वस्तूचे खरे स्वरूप एकदा कळले म्हणजे मग ती इतर मनुष्यास कशीही भासली तरी तिजविषयी त्यास भ्रम व्हावयाचा नाही आणि अशा मनुष्यास प्राप्त होणाऱ्या हर एक गोष्टीचा योग्य उपयोग त्याजकडून घडल्यामुळे कोणास असे वाटेल की, ती गोष्ट प्राप्त होण्याविषयी जणू काय तो प्रयत्नच करीत होता. कारण अशा गोष्टींचा तो आपल्या ठायीचा एखादा दुसरा सद्गुण वाढविण्याकडे उपयोग करील. दुसरे असे की, प्रत्येक घडणाऱ्या गोष्टींचा संबंध देवाशी अथवा मानवाशी असून, ती केवळ नवी नाही आणि तिचा उपयोग करणे मुष्किलीचेही बिलकूल नाही.

६९. आपल्या नित्याचरणाचा परिपाक, प्रत्येक दिवस शेवटचा समजून घालविण्यात व चित्त क्षुब्ध, निश्चल किंवा दंभयुक्त न होऊ देण्यात आहे.

७०. मनुष्ये कसलीही असली तरी त्यांस पुष्कळ काळपर्यंत सतत चालवून घ्यावे लागत असल्यामुळे अमर जे देव त्यांस मुळीच त्यांचा त्रास वाटत नाही. इतकेच नव्हे तर त्यांचा सर्व प्रकारे सांभाळच ते करीत आहेत; परंतु तू जो अल्पकाळातच मृत्यू पावणारा प्राणी त्या तुला दुष्ट मनुष्याचा दुष्टपणा सहन करून अगदी त्रास आला ना? या दुष्ट मनुष्यापैकी तूही एक आहेस हे विसरलास काय?

७१. आपल्या ठायीचा वाईटपणा काढून टाकणे शक्य असताही लोक तो काढण्याचा प्रयत्न करीत नाहीत आणि दुसऱ्याच्या वाईटपणाचा अव्हेर करणे शक्य नसताही त्यापासून ते दूर राहू पाहतात ही मोठी उपहासास्पद गोष्ट आहे.

७२. विवेकशील व संगमशील अशा आपल्या ठायीच्या चिच्छक्तीस जी गोष्ट निर्बुद्धपणाची किंवा संगमशीलतेस विरुद्ध अशी वाटेल ती त्या शक्तीस स्वतःहून नीचतर वाटणे वाजवी आहे.

७३. तू एखाद्यावर उपकार केला असता त्याचा त्याने स्वीकार केला म्हणजे पुरे. ते उपकार कृत्य केल्याबद्दल आपली कीर्ती व्हावी किंवा त्याची फेड त्या मनुष्याने करावी अशी अपेक्षा तू का म्हणून करतोस बरे?

७४. जे उपयोगाचे असते ते कितीही प्राप्त झाले तरी त्याचा मनुष्यास वीट येत नाही; परंतु निसर्गानुसार वागणे हेच उपयोगाचे आहे. तेव्हा दुसऱ्यावर उपकार करण्याचा तुला कधीही त्रास वाटू नये. कारण असे करण्यातच तुझे हित आहे.

७५. अखिल विश्वाचा जो निसर्ग तो प्रचोदित होऊन हे सारे चराचर निर्माण झाले आहे. जे जे काही घडत आहे ते सारे कार्यकारण संबंधाने बद्ध आहे. या गोष्टी तू ध्यानात ठेवशील तर तुला शांतीचा बराच अनुभव घडेल. (पु. ६, क . ४४, पु. ०९, क. २८)

संदर्भ :

१. पीडा घडली असता कुरकुर करण्याचा धर्म एकंदर जिवंत प्राण्यांचा आहे. ज्या अनेक अवयवांनी अथवा भागांनी देह बनला आहे त्या प्रत्येक भागाला कुरकुर करण्याचे सामर्थ्य नाही. एखादे यंत्र व्यवस्थितपणे जुळलेल्या स्थितीत असता त्यापासून जे कार्य घडते तेच कार्य त्याच्या वेगवेगळ्या भागांपासून घडेल म्हणणे खरे नव्हे. कोणतीही घडणारी गोष्ट इष्ट किंवा अनिष्ट असणे हे तिच्या बऱ्या-वाईट परिणामावर अवलंबून आहे आणि यामुळे इष्ट गोष्टींपासून लाभ व तसाच अनिष्ट गोष्टींपासून अपाय होणे हे साहजिकच आहे. ते मानण्यावर काही नाही.

२. एकंदर प्रकृती सारं काही वस्तुजात आहे. तीच विभिन्न पदार्थांमध्ये रूपांतरित होत जाते.

३. निसर्गाचा कोणताही व्यापार सहेतुक नाही. कारण तो निसर्ग सजीव प्राणी नसून त्याचे सारे व्यापार केवळ पदार्थांतर्गत गुणधर्मांनी चालले आहेत. यावरून पाहता सृष्टीत जे पदार्थाच्या ठायी नानाविध फेरफार घडत आहेत ते स्वाभाविक होत. ते कोणी मुद्दाम घडवीत नाही किंवा अस्तित्वात आणीत नाही. सारांश हा सृष्टिक्रम केवळ यदृच्छेने चालला आहे.

४. विचारी व दूरदृष्टी मनुष्याने पुढचाही विचार करावा हे योग्य होय.

५. अशी गोष्ट कदापि घडणे नाही. कित्येक शारीरिक वेदना अशा आहेत की, त्या कितीही काळ भोगाव्या लागल्या तरी मज्जातंतुव्यापार जोपर्यंत अविरत आहे तोपर्यंत त्या सहन करण्याचा अभ्यास मनुष्यास कदापि होणे नाही.

६. सद्य जीवन व मृत्यू यांना मूल्यहीन ठरवून विश्वप्रकृतीच्या अनुषंगाने अखंड जीवनप्रवाह व्यक्त करण्याची ही शैली प्लेटोची हे नक्की!

७. ॲन्टिस्थोनिसच्या उपेक्षावादाची सुधारित आवृत्ती म्हणून स्टॉइककडे पाहता येते.

८. विप्लव म्हणजे दोष - राज्यविप्लव - सदोष राज्यपद्धती! सहसा योगदर्शनात वापरला जाणारा शब्द इथे राज्यातील उलथापालथ.

९. हा समज निव्वळ चुकीचा आहे. मनुष्य सुज्ञपणाने अनुभव घेत राहिला तरी त्यास अल्पायुष्यात अल्पानुभव प्राप्त होऊन दीर्घायुष्यात दीर्घानुभव प्राप्त होईल. त्याचप्रमाणे सृष्टिक्रमाच्या गोष्टी त्याच त्याच घडत असल्या तरी त्यांच्या कोट्यंशाचे मनुष्यास अद्याप ज्ञान झालेले नाही. याचे एक मुख्य कारण मनुष्याचे अल्पायुष्य होय.

१०. इतरांच्या वर्तनातील विवेक पडताळून पाहू नये.

११. या परता अनुभव कशास म्हणावे? हाच अनुभव होय. यावरून पाहता ४९ कलमांत जे म्हटले आहे की, तुझे आयुष्य कितीही असले तरी तुझा अनुभव मुळीच वाढायचा नाही ते खोटे होय, हे सिद्ध होते.

१२. मनुष्याचा हा खोटा अभिमान होय. व्याघ्रादी हिंसक प्राण्यांस वाचा असती तर मनुष्ये आमच्या आहारासाठी निर्माण झाली आहेत असे ते म्हणते. इसापनीतीतील मनुष्यास मुरकुटाने काय सांगितले ते येथे लक्षात आणण्यासारखे आहे.

सारांश टीप : प्राकृतिक नियमनाचे तत्त्व हेच प्रकृतीतील सर्व घटक व मनुष्याचे सर्व निर्णय यांचे नियमन करते. म्हणून त्यानुसारच वर्तावे. भ्रांतीस्तव येणारी देहासक्ती दूर सारावी. सारे काही त्याचेच आहे, म्हणून कार्यकारण स्वीकार, मगच शांतीचा अनुभव येईल.

○○○

पुस्तक आठवे

१. आपले समग्र आयुष्य किंवा निदान तारुण्य प्राप्त झाल्यानंतरचे तरी आयुष्य तत्त्ववेत्त्याप्रमाणे क्रमण्याचे तुझ्या स्वाधीन नाही, हा विचार मनात येऊन तुझी पोकळ लौकिकाची वांछा नाहीशी होईल. तू खऱ्या तत्त्वज्ञानापासून किती दूर आहेस हे तुला स्वतःला आणि इतरालाही कळत आहे. तुझ्या सर्व स्थितीमध्ये चलबिचल झाली आहे. तस्मात् तुला तत्त्वज्ञाची कीर्ती प्राप्त होणे परम दुर्घट आहे; आणि तुझा एकंदर चरित्रक्रमही या गोष्टीस विरुद्धच आहे. यास्तव बाकीचे आयुष्य निसर्गानुसार घालविता आल्यानेच समाधान मान. लोकांना आपण कसे दिसू हा विचार सोडून दे. निसर्गाची इच्छा काय आहे ती नीट पाहून तद्नुसार वाग. चित्त दुसऱ्या कशानेही व्यग्र होऊ देऊ नको. कारण सुखाच्या अभिलाषेने तू पुष्कळ फिरला आहेस; पण ते तुला कोठेही प्राप्त झाले नाही. तार्किकता, धनाढ्यता, लौकिकता, ऐषआराम इत्यादी कोणत्याही गोष्टीत ते तुला आढळले नाही, तर ते आहे तरी कोठे, असा कोणी प्रश्न केल्यास त्याचे उत्तर असे आहे की, मनुष्याने आपला निसर्ग सांगेल तसे वर्तण्यात ते आहे; पण हे वर्तन मनुष्याकडून व्हावे कसे हा प्रश्न लागलीच उत्पन्न होतो. त्याचे समाधान असे आहे की, त्याचे विचार आणि आचार सत्य सिद्धांतानुसार असावे म्हणजे झाले. आता हे सत्यसिद्धांत तरी कोणते असे कोणी पुसल्यास त्याचे निरूपण थोडक्यात करता येण्यासारखे आहे. हे सिद्धांत बऱ्यावाईटाच्या संबंधाचे मुख्यतः असतात. जेणेकरून मनुष्य न्यायी, संयमी, शूर आणि स्वतंत्र होत नाही ते त्याच्या कल्याणाचे नव्हे आणि जेणेकरून या सद्गुणांचा लोप होण्यासारखा नसतो ते त्याच्या नुकसानाचे नव्हे.

२. प्रत्येक कृत्याला आरंभ करताना आपल्याशी असा विचार करावा की, या कृत्यामुळे आपणास काय हिताहित आहे? त्यामुळे आपणास पुढे पश्चात्ताप होईल काय? काही वेळाने मी तर मरण पावून सर्व काही आटोपेल. तस्मात् जे कृत्य मी आता करीत आहे

ते ज्ञानतत्त्वविशिष्ट व संगमशील अशा प्राण्यास उचित असले म्हणजे बस आहे. त्याच्या संबंधाने आणखी विचार तो कशास हवा?

३. **डाओजिनिस, हेराक्लिटस, सॉक्रेटिस** इत्यादी महापुरुषांपुढे **अलेक्झांडर, पॉम्पीअस** असलाले मोठमोठे वीर केवळ कस्पटासमान होत. कारण उघडच आहे की, या महाशय पुरुषांस वस्तूची कारणपरंपरा आणि घटना ज्ञात असून, त्यांचे आचरण आपल्या ठायीच्या नियामक अंशानुसार होते; परंतु वर सांगितलेल्या पराक्रमी पुरुषांच्या पाठीस हजारो प्रकारची दगदग असून, ते पुष्कळ गोष्टींचे केवळ दास बनून गेले होते...

४. तू कितीही भगीरथ प्रयत्न केलेस तरी लोक आपला क्रम सोडणार नाहीत.

५. मुख्य गोष्ट अशी आहे की, तू बिलकूल अस्वस्थ होऊ नये. सर्व काही विश्वाच्या निसर्गानुसार चालले आहे; आणि काही वेळाने तुझा विनाश होऊन तुझा येथून मुळीच नायनाट होईल. दुसरी गोष्ट अशी की, आपल्या कर्तव्याकडेच एकसारखी नजर ठेवून आणि आपण स्वतः चांगला मनुष्य होणे व निसर्गानुसार वागणे हेही आपले एक कर्तव्यच आहे असे पक्केपणी ध्यानात वागवून काय करावयाचे ते त्वां करावे. जे तुला न्याय्य आहे असे वाटेल ते त्वां बेलाशक बोलावे. मात्र, ते बोलताना सौजन्य, विनय आणि निष्कपटपणाही अंगी असावा.

६. विश्वाच्या निसर्गाचे काम इतकेच आहे की, एका ठिकाणच्या वस्तू नेऊन दुसऱ्या ठिकाणी ठेवाव्या व त्यांच्यात पालट करावा. सर्व वस्तू पूर्व वस्तूत रूपांतर होऊन झाल्या आहेत; परंतु एखादी अपूर्व वस्तू निर्माण होण्याची मुळीच भीती नाही, तर सर्व वस्तू आपल्या परिचयातल्याच आहेत आणि त्याची वाटणी ही पूर्वीप्रमाणेच राहणार.

७. निसर्ग कोणताही व्यत्यय न येता नीट आपल्या मार्गाने चालला म्हणजे तो आपल्याठायीच समाधान पावतो आणि विवेकशील निसर्ग तेव्हाच आपल्या मार्गाने सरळ जातो असे म्हणावयाचे, की जेव्हा तो असत्य व अनिश्चित अशा कोणत्याही गोष्टी मानीत नसून केवळ समाजहितवर्धक कृत्ये करण्याकडे आपल्या शक्तीचा विनियोग करतो आणि तो आपल्या आवाक्यातल्याच वस्तूची वांछा किंवा तिटकारा करून सार्वत्रिक निसर्गाने नेमून दिलेल्या हर एक गोष्टीत समाधान मानतो. व्यक्तिविशिष्ट निसर्ग या सार्वत्रिक निसर्गाचा अंश आहे. कसा तर ज्याप्रमाणे पानाचा निसर्ग हा वृक्षाच्या निसर्गाचा एक अंश आहे. भेद मिळून इतकाच की, पानाचा निसर्ग ज्या निसर्गाचा अंश आहे त्याच्या ठायी जाणीव आणि विवेकही नसून त्याच्या क्रमास व्यत्यय येण्यासारखा आहे; परंतु मनुष्याचा निसर्ग ज्या निसर्गाचा अंश आहे तो सर्व उपाधींपासून मुक्त नसून ज्ञानमय व न्यायी असा आहे. कारण तो सर्व वस्तूंस समप्रमाणाने व निरनिराळ्या वस्तूंच्या योग्यतेप्रमाणे त्यांच्या आयुर्मर्यादा, त्यांचा जडांश, त्याचा चिदांश व त्यांचे दैवही नेमून देतो. या गोष्टींचा प्रत्यय पाहणे असल्यास एका वस्तूचे निरनिराळे भाग दुसऱ्या वस्तूच्या निरनिराळ्या भागांशी ताडून न पाहता त्यांचे एकंदर भाग लक्षात घेऊन त्यांची तुलना केली पाहिजे.

८. तुला ग्रंथावलोकन करावयास फुरसद किंवा सामर्थ्य नसेल; परंतु गर्वाचे दमन करण्यास तुला अवकाश आहे. सुख-दुःखाची पर्वा न करण्याची तुला फुरसद आहे. लौकिकप्रीतीस चित्तांत थारा न देण्याचे व मूर्ख आणि कृतघ्न लोकांचे आचरण पाहून न त्रासण्याचे किंबहुना त्यांची पर्वाही न करण्याचे तुझ्या स्वाधीन आहे.

९. दरबाराच्या किंवा स्वतःच्या आयुष्यक्रमात दोष आहेत असे कोणाकडे तू कधीही म्हणू नको (पु. ५, क. १६).

१०. काहीतरी उपयुक्त काम करण्याची हयगय केल्याबद्दल आपण स्वतःस जो दोष देतो त्यास पश्चात्ताप असे म्हणतात आणि जे कल्याणप्रद असते तेच उपयुक्त समजावयाचे. जो पूर्ण नीतिमान मनुष्य असतो त्याला हा संबंध अवश्य दिसला पाहिजे. अशा मनुष्यास एखाद्या इंद्रियसुखाचा अव्हेर केल्याबद्दल अनुताप व्हावयाचा नाही. यास्तव सुख जे आहे जे कल्याणप्रदही नव्हे व उपयुक्तही नव्हे असे होते.

११. कोणत्याही वस्तूच्या स्वरूपाचा निश्चय करताना, तिचे स्वतःसिद्ध स्वरूप काय आहे, तिची घटना कशी काय आहे, तिची प्रकृती किंवा जडांश काय आहे, ती कोणत्या कारणाचा परिणाम आहे, तिचा जगाशी काय संबंध आहे आणि तिची आयुर्मर्यादा किती आहे इत्यादी गोष्टी पाहाव्यात.

१२. एखाद्या वेळी तुला आणखी काही वेळ निजावेसे वाटत असून, काही निकडीच्या कामामुळे उठावे लागले असता तू असा विचार करावा की, निद्रा जी आहे ती आपणास आणि विवेकहीन प्राण्यास समानच आहे; परंतु समाजसुखवर्धक कृत्ये करण्याचे सामर्थ्य आणि स्वभाव ही आपल्याच ठायी आहेत. जे प्रत्येक व्यक्तीच्या निसर्गास अनुसरून असते ते त्या निसर्गाचा एक विशेष धर्म असून त्यास अनुरूप आणि सुखकारक आहे.

१३. आत्म्यावर घडणाऱ्या प्रत्येक संस्काराच्या वेळी साधल्यास सृष्टिशास्त्र, नीतिशास्त्र व तर्कशास्त्र यांच्या सिद्धांताचा उपयोग करावा.

१४. ज्या ज्या मनुष्याशी तुझी गाठ पडेल त्याचे बऱ्यावाईटाविषयी काय समज आहेत ते नीट बारकाईने पाहा. कारण असे केल्याने सुख-दुःख आणि त्याची कारणे, कीर्ती आणि अपकीर्ती, मरण आणि जीवन इत्यादी गोष्टींविषयी त्याची कशी काय मते असतील ते कळून येईल आणि मग त्याच्या कोणत्याही कृत्याबद्दल तुला आश्चर्य वाटणार नाही आणि तू असे ध्यानात वागविशील की, असे करणे त्यास भागच पडत आहे. त्यास त्याचा इलाज नाही.

१५. अंजिराच्या वृक्षापासून अंजिरे उत्पन्न झाली असता विस्मय पावणे जसे हास्यास्पद आहे तद्वतच जगात अमूक अमूक वस्तू उत्पन्न झाल्या म्हणून विस्मित होणे हे आहे. त्याचप्रमाणे एखाद्या मनुष्यास ज्वर आला असता वैद्याने किंवा प्रतिकूल वारा लागला असता सुकर्णधाराने चकित होणे उपहासास्पद आहे याचे स्मरण ठेव.

१६. आपली कोणी चूक दाखवून दिली असता आपले पूर्वीचे मत बदलून त्याचे म्हणणे मान्य केल्याने आपल्या मतस्वातंत्र्यास काही एक बाधा येत नाही. हट्टाने आपले चुकीचे मतच धरून बसण्यात काही एक अर्थ नाही. भ्रमनिरास झाला असता सत्याचा स्वीकार करणे हे तुझ्या निसर्गानुसार चाललेल्या मनोव्यापारास आणि विवेकासही अनुरूपच आहे.

१७. कोणतीही गोष्ट तुझ्या आटोक्यातली नसल्यास ती तू का म्हणून करावी आणि मग खेद करीत बसावे? परंतु ती दुसऱ्याच्या हातातली असल्यास मग दोष कोणास देतोस? यदृच्छेने संयोग पावलेल्या परमाणूस की देवास? या दोघांसही दोष देणे मूर्खपणाचे आहे. त्वां दोष असा कोणासही देता कामा नये. कारण तुला सामर्थ्य असल्यास दोषांचे कारण काढून टाक; परंतु हे कारण तुला कळत नाही, तर निदान त्या कारणामुळे उत्पन्न झालेली जी गोष्ट तिच्यातला तरी दोष सामर्थ्य असल्यास काढून टाक; परंतु या दोन्ही गोष्टी तुझ्या हातून होण्यासारख्या नाहीत, तर मग त्यात दोष काढण्यात तरी काय हशील आहे? कारण कोणतीही गोष्ट करावयाची ती काही उद्देशाने केली पाहिजे आणि वृथा दोष देण्यात कोणताही उद्देश सिद्ध होत नाही हे उघडच आहे.

१८. जे आपणास विनाश पावलेसे दिसते ते या विश्वाबाहेर जात नाही, तर ते या विश्वातच राहून त्यात फेरफार होतो आणि त्याचे पृथक्करण होऊन त्याचे निरनिराळे भाग होतात. हे भाग कोणते म्हणाल तर स्वत: तू आणि हे सारे विश्व ज्या महातत्त्वांचे बनला आहात ती होत. या तत्त्वांचा निरनिराळी रूपे धारण करण्याचा स्वभावच आहे यास्तव व्यर्थ शीण पावू नको.

१९. या जगातील हर एक वस्तू काही ना काहीतरी हेतूने निर्माण झाली आहे. असे असता तू विनाकारण चकित का होतोस. नभोमंडळातील सूर्यचंद्रादी ज्योतिर्गण आणि देवसुद्धा अस्तित्वात असण्याचा काहीतरी हेतू आहे, तर मग तुझ्या अस्तित्वाचा काय बरे हेतू असावा? सुखोपभोग घेण्याचा काय? नाही. हा हेतू विवेकास पटत नाही.

२०. कोणत्याही गोष्टीच्या उत्पत्ती स्थितीप्रमाणेच तिचा लयही निसर्गास अनुसरून आहे. यास उदाहरण मनुष्य चेंडू फेकतो त्याचे. त्याने चेंडूस एकदा गती दिली म्हणजे तो काही वेळ उडून पुन्हा खाली पडावयाचा. तेव्हा चेंडूस वर गेल्याने काही सुख झाले किंवा खाली पडल्याने इजा झाली असे सहसा म्हणवत नाही. त्याचप्रमाणे पाण्यावरचा बुडबुडा काही वेळ तरंगून फुटला असता त्यास काय बरे सुख किंवा दुःख घडले? काही एक नाही. आणखी एखादा दाखला पाहिजे असल्यास दिव्याचा आहे.

२१. आपला हा जो देह आहे तो आतून बाहेरून कसा काय आहे तो पाहा. तो जरायुक्त झाला असता किंवा गतप्राण झाला असता त्याची दशा काय होते ती पाहा. ज्याची स्तुती होते तो व जो स्तुती करतो तो आणि त्याचप्रमाणे ज्याची आठवण लोकास राहते तो व जो आठवण करतो तो हे सर्व अल्पायू आहेत आणि हा सगळा व्यवहार जगाच्या अगदी लहानशा एका कोपऱ्यात कोठेतरी होत असतो. बरे, ही सारी पृथ्वी पाहिली तर या प्रचंड

विश्वापुढे ती केवळ एका लहानशा बिंदूप्रमाणे आहे. इतकेही करून ज्या लोकांमध्ये आपला लौकिक चालतो त्या सगळ्यांचे तरी मत सारखेच असते काय? नाही. त्यापैकी कित्येक आपली निंदाही करणारे असतात. बरे, आपले मन तरी आपणास ग्वाही देत असते म्हणावे, तर तेही नाही. कारण प्रत्येक लौकिकप्रिय मनुष्याने आपण लौकिकास पात्र आहोत किंवा कसे याचा आपल्या मनाशी विचार करून पाहिला असता त्याचे मन त्याला काय बरे सांगेल? तो विवेकी असल्यास आपण या मानास पात्र नाही असे त्याला वाटेल.

२२. तुझ्या पुढे जी जी गोष्ट येईल तिचा चित्त देऊन विचार कर. मग ती एखाद्या मताच्या, कृत्याच्या, शब्दाच्या किंवा दुसऱ्या कशाच्याही संबंधाची असो. तू जे काही दुःख आज भोगीत आहेस ते वाजवी आहे. कारण तू सदाचारी होण्याची गोष्ट दिरंगाईवर टाकत आहेस.

२३. मी जे जे काही करीन ते मनुष्य जातीच्या कल्याणासाठी करीन. मला काहीही झाले तरी त्याचा मी जीवेभावे स्वीकार करीन आणि ते देवापासून व सर्व वस्तूंचा उगम ज्या महाशक्तीत आहे तिजपासून प्राप्त झाले असे मानीन.

२४. आपण स्नान करताना एकंदरीने पाहिले तर अंगाचा मळ, घाम, ओशटपणा आणि त्यांनी झालेले घाणेरडे पाणी हीच दृष्टीस पडतात. तशीच गत आपल्या या जीविताची आणि हर एक दुसऱ्या वस्तूची आहे. ती सारी मलिन आहेत.

२५. या जगातील मनुष्ये एकामागून एक मरण पावत आहेत. मोठमोठे बादशहा, मोठमोठे प्रतापी वीर, ज्ञानाच्या गर्वाने ताठलेले मोठमोठे पंडित आज कोठे आहेत बरे? त्यातला कोणीतरी चिरंजीव झाला आहे काय? नाही, तर सारे मरणवश होऊन पार धुळीस मिळून गेले आहेत. काहीकांचे नाव मागे थोडा वेळसुद्धा राहिले नाही. काही जण कल्पित कथांचे नायक होऊन बसले आहेत आणि काही जणांच्या या कथांचाही लोप झाला आहे. तस्मात् तू हे ध्यानात ठेव की, हा जो तुझा हाडामांसाचा पुतळा बनला आहे त्याचे लवकरच विसर्जन होईल आणि तुझी प्राणज्योती निर्वाण पावेल किंवा येथून काढून दुसऱ्या कोठेतरी ठेवण्यात येईल.

२६. मनुष्यास योग्य अशी जी कर्तव्ये ती करण्यातच मनष्यास समाधान असते. आता मनुष्याची कर्तव्ये म्हटली म्हणजे आपल्या सजातीयांवर उपकार करणे, इंद्रियांच्या विषयास तुच्छ मानणे, वरवरून चांगल्या दिसणाऱ्या वस्तूंचे खरे स्वरूप ओळखणे आणि विश्वाच्या निसर्गाचे आणि त्याच्या ठायी घडणाऱ्या गोष्टींचे सूक्ष्म अवलोकन करणे ही होत.

२७. तुझा एकंदर विश्वाशी तीन प्रकारचा संबंध आहे. एक देहाचा सभोवतालच्या वस्तूंशी जो संबंध आहे तो, दुसरा ज्या आदिकारणापासून समग्र वस्तुजातास सर्व काही प्राप्त होत आहे त्यांशी आणि तिसरा जे तुझे सहचर आहेत त्यांशी.

२८. आपणास दुःख जे होत आहे त्याचा अनुभव एक तर देहास घडत आहे किंवा आत्म्यास घडत आहे. जर तो देहासच घडत असेल तर त्याजविषयी देहास काय वाटेल ते

बोलू दे. आता हा दुःखानुभव आत्म्यास होतो म्हणणे बरोबर नाही. कां की, आपली शुद्धता आणि शांती कायम राखून दुःख जे होत आहे ते काही अनिष्ट आहे, असे न मानण्याचे सामर्थ्य त्यास आहे. कारण सर्व विचारांची चलबिचल आणि रागद्वेषादी वृत्तींचा उगम अंतर्यामी आहे. तेथपर्यंत दुःखाचा मुळी प्रवेशच होत नाही.

२९. या आत्म्याच्या ठायी कोणताही अनिष्ट विचार, वासना किंवा व्यग्रता उत्पन्न होऊ न देण्याचे तुला सामर्थ्य आहे. प्रत्येक वस्तूकडे पाहशील तर तुला तिचा स्वभाव समजून येऊन तिच्या योग्यतेप्रमाणे तिचा तुला विनियोग करता येण्यासारखा आहे. हे निसर्गप्राप्त सामर्थ्य तुझ्या ठायी आहे याची आठवण ठेवून तू आपल्या चित्तातून सर्व भासमय कल्पना काढून टाक.

३०. दरबारातील अमीर-उमरावांशी किंवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्याशी टापटिपीने व साधेपणाने बोल. तुझी भाषाही साधी सरळ असावी.

३१. एवढा प्रतापी बादशहा **आगस्टस**; पण त्याचे कोणीच मागे उरले नाही. त्याचे सारे गणगोत व संबंधी जनही नाहीतशी झाली आहेत. फार काय: पण त्याच्या वेळच्या सर्व दरबारी लोकांचाही आज समूळ नायनाट झाला आहे. अशीच गत मोठमोठ्या वंशाचीही झाली आहे. कित्येक थडग्यांवर तर असे लेख आढळतात की, हा आपल्या वंशातला शेवटचा पुरुष. तेव्हा तात्पर्य काय की, आपल्या मागे आपले नाव किंवा गादी चालविण्यास कोणीतरी असावा अशी इच्छा धरून खटपट करणारांचा हेतू आजपर्यंत कितपत सिद्ध झाला आहे तो पाहा. आणखी असे की, एवढी खटपट करून मागे वंशजपरंपरा राहिली समजा; पण तिचा शेवट होण्यास कितीसा उशीर लागणार आहे? जेथे मनुष्याची एखादी जातची जात अल्पकालावधीत समूळ नष्ट होते तेथे एका कुटुंबाची काय कथा?

३२. प्रत्येक कृत्यात आपला जीवनक्रम नीट राखणे हे तुझे कर्तव्य आहे आणि केलेल्या कृत्याचा साधेल तेवढा उपयोग झाल्याने तू तृप्त व्हावे. हा उपयोग होण्यास कशाचीही अडचण पडावयाची नाही. न्यायाने गंभीरपणे आणि विचारपूर्वक वागण्यास तुला कशाचाही प्रत्यवाय घडणार नाही; परंतु कधी कधी असे घडेल की, तुझ्या आंगची एखादी विवक्षित शक्ती काहीतरी कारणामुळे चालेनाशी होईल. असे झाले असता दुसऱ्या एखाद्या शक्तीच्या योगाने होण्यासारख्या कामाच्या सिद्ध्यर्थ त्वां प्रयत्न करावा.

३३. ऐश्वर्य प्राप्त झाले असता गर्वाने फुगून जाऊ नको आणि ते गेले असता कष्टी होऊ नको.

३४. जो मनुष्य प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानून न राहता दुसऱ्या लोकांपासून तुटून राहतो किंवा एखादे समाजहितविघातक कृत्य करतो, त्याची हात, पाय किंवा डोके धडापासून तुटून जसे अलग होऊन पडावे तशी स्थिती होते. निसर्गतः तो विश्वाचा एक अंश असतो; परंतु अशा अनन्वित आचरणामुळे त्याचा विश्वाशी असलेला ऐक्यभाव नष्ट होऊन तो आपणास

त्यापासून भिन्न लेखतो. असे आहे तरी त्यास पुन्हा हे ऐक्य करून घेण्याचे सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य देवाने विश्वाच्या दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या अंशात ठेवले नाही. बाकीचे अंश विश्वापासून एकदा विलग झाले असता पुन्हा ते एकजीव होणे अशक्य. मनुष्यातच ही जी विशेष शक्ती देवांनी कृपा करून ठेवली आहे तिच्या योगाने तो कधी विश्वापासून विलग होणारच नाही आणि कधी तो विलग झालाच तर त्यास पुन्हा ऐक्याप्रत पावून पूर्वस्थिती प्राप्त करून घेता येते.

३५. प्रत्येक विवेकी प्राण्याच्या ठायी निसर्गाने आपल्या सर्व शक्ती ठेवल्या आहेत. आता आपणास असे ठाऊक आहे की, निसर्गास ज्या वस्तूपासून प्रत्यवाय घडतो तीत योग्य फेरफार करून तिला तिच्या पूर्वी नेमून दिलेल्या स्थानी पुन: नेऊन तो मुकरर करतो आणि मग ती वस्तू त्या निसर्गाची पुन्हा अंशरूप होते. ही जशी निसर्गाची शक्ती आहे तशीच विवेकी प्राण्याच्याही ठायी ती आहे. तिच्या योगाने त्यास प्रत्येक प्रत्यवायास आपणास अनुकूल असे रूप देता येऊन त्याचा योग्य उपयोग करून घेता येतो.

३६. आपल्या एकंदर आयुष्यक्रमाचा विचार मनात आणून तू अस्वस्थ होऊ नको. जी नानाविध संकटे आपणावर पुढे कधीकाळी येतीलशी तुला वाटत आहेत त्यांचा विचार आज कशास पाहिजे? कोणतेही संकट तुजवर आले असता तू असा आपल्याशीच प्रश्न कर की, यात असह्य किंवा दुर्वह असे काय आहे? आणखी असे ध्यानात ठेव की, भूत किंवा भविष्य यापासून तुला काही एक बाधा होत नसते, तर जे काही दुःख आहे ते वर्तमानकाळीच; परंतु याही दुःखाचे प्रमाण अगदी सूक्ष्म करता येण्यासारखे आहे. असे करावयाचे म्हटले म्हणजे प्रत्येक दुःखाचा प्रसंग निराळा पाहून खुद्द त्यातच दुःखाचा वास्तविक अंश कितीसा आहे ते पाहून एवढासा अंश मनास सहन होत नाही म्हणून त्यास दोष दिला पाहिजे.

३७. पितापुत्रांचा, स्त्री-पुरुषांचा परस्पर वियोग मरणामुळे होणे साहजिक आहे. तो झाला असता मृत मनुष्यासाठी कितीही शोक केला तरी तो व्यर्थ होय. समजा, कोणी आपल्या वियुक्त प्रिय जनांच्या थडग्यापाशी बसून रात्रंदिवस शोक केला तरी त्यापासून त्या मयतास काय उपयोग होणार आहे बरे? कारण ज्या कुडीतून मुळी प्राणच गेला त्यास बाहेर काय चालले आहे ते कोठून कळणार? बरे त्या प्रेतास आपल्या निकटसंबंधी जनांनी केलेला शोक कळत आहे असे जरी क्षणभर मानले तरी तो ऐकून त्यास आनंद होईल काय? बरे त्यास आनंद झाला असे कल्पिले तरी त्यामुळे तो मयत अमर होईल काय? नाही, तर मग हा एवढा अट्टहास करण्यात काय फायदा? जे आज आपल्या प्रियजनांच्या वियोगास्तव शोक करीत आहेत त्यांच्यावरच कदाचित नाही का मरणाची पाळी आधी आली असती? आणि जे आता मृत होऊन पडले आहेत ते जिवंत असून, त्यांच्यासाठी शोक करीत बसते? तेव्हा तात्पर्य काय की, हे जीवित क्षणभंगुर असून केव्हा आटपेल याचा नेम नाही.

३८. तुझी दृष्टी तीव्र असल्यास जे काही पाहशील ते नीट पाहून त्याचे खरे स्वरूप ओळख.

३९. विवेकी प्राण्याच्या एकंदर घटनेचा विचार करता त्याच्या ठायी असा कोणताही सद्गुण नाही की, जो न्यायास विरुद्ध असेल; परंतु सुखाभिलाषास विरुद्ध असा एक सद्गुण त्याच्या ठायी आढळतो. तो कोणता म्हणाल तर संयम हा होय.

४०. जेणेकरून तुला दुःख होते असे वाटत आहे, त्याजविषयीचा मिथ्या समज जर तू आपल्या चित्तातून दूर करशील तर तू अगदी सुरक्षित राहून तुला कशाचीही भीती उरणार नाही. कोणी म्हणेल की, दुःखाने देह अनेक प्रकारे धडधडीत विकार पावत असता सुरक्षित राहणार कोण? या प्रश्नाचे समाधान असे आहे की, मनुष्याच्या ठायी जे ज्ञानतत्त्व आहे ते सुरक्षित राहते; परंतु कोणी म्हणेल की, देहही माझाच आहे, यास असे उत्तर आहे की, या देहास जो दुःखानुभव होत आहे त्याचे त्यास पाहिजे ते वाटू द्या, ज्ञानतत्त्व विकारविरहित राहू द्या म्हणजे झाले. (पु. ६, क. १६)

४१. इंद्रियांचे जे विषय आहेत त्यांस हरकत झाली असता तेणेकरून आपल्या ठायीच्या पशुस्वभावास मात्र अपाय घडतो. त्याचप्रमाणे वासनांच्या तृप्तीस जेणेकरून प्रत्यवाय होतो तेही पशुस्वभावासच अपायकारक समजावे आणि जे ज्ञानशक्तीच्या व्यापारास अंतरायभूत होते तेच फक्त ज्ञानमय निसर्गास अनिष्ट आहे असे मानले पाहिजे. हे नियम स्वतःस लावून पाहशील तर इंद्रियास होणाऱ्या सुखाचा किंवा दुःखाचा तुझ्या आत्म्यास काही एक संपर्क घडत नाही, असे दिसून येईल. ज्या इंद्रियांस तो घडत आहे ती त्याचा पाहिजे तर विचार करतील. आता एखाद्या हेतूच्या सिद्धीसाठी तू प्रयत्न करीत असता तुला काही अडचण आल्यास त्या प्रसंगी असा विचार करावयाचा की, निसर्गाच्या क्रमाप्रमाणे पाहता यात काही एक अनिष्ट घडलेले नाही, असे होणे हे अगदी स्वाभाविक आहे. तेव्हा त्यापासून तुला अपाय किंवा हरकत ती कोठून झाली? कारण तू जसा निसर्गानुसार वागत आहेस त्याचप्रमाणे ज्याकडून तुला हरकत होत आहे, तोही आपल्या निसर्गानुसार वागत आहे.[१] आणि या उभय निसर्गाच्या व्यापाराचा परम हेतू एकच आहे. तथापि ज्या गोष्टीचा आपल्या ज्ञानतत्त्वाशीच फक्त संबंध असतो त्यास कोणाकडूनही प्रतिबंध होत नसतो. अग्नी, शस्त्रे, जुलमी राजा, निंदा इत्यादिकांचा तेथपर्यंत प्रवेशच मुळी होत नाही.

४२. मी आपण होऊन स्वतःस दुःखी करून घ्यावे हे योग्य नाही. कारण मी आजपर्यंत दुसऱ्या कोणासही जाणूनबुजून दुःख दिले नाही.

४३. निरनिराळे लोक निरनिराळ्या गोष्टींनी संतोष पावतात; परंतु मला माझी नियामक शक्ती शाबूत राखण्यातच आनंद वाटतो. ती तशी राहण्याकरिता मी कोणत्याही माणसाचा किंवा घडणाऱ्या गोष्टीचा तिटकारा करणार नाही; परंतु सर्वांचा मोठ्या आदराने स्वीकार करून त्यांच्या योग्यतेप्रमाणे मी त्यांचा उपयोग करून घेईन.

४४. आपल्या चालत्या काळाचा तू चांगला उपयोग कर. जे आपल्या मागे आपली कीर्ती राहावी म्हणून प्रयत्न करतात, त्यांच्या मनात असा विचार येत नाही की, सध्या जसे आपणास अगदी न आवडणारे लोक अस्तित्वात आहेत, तसलेच मनुष्य पुढेही निर्माण होणार आहेत आणि हे सर्व मनुष्य मर्त्य आहेत. बरे पुढे येणारे लोक त्यांच्या संबंधाने अमुक एक रीतीने बोलले किंवा त्यांचे त्याविषयी अमुक एक मत झाले तरी त्यापासून कीर्तिप्रिय लोकांचा फायदा काय होणार?

४५. मी कोठेही आणि कोणत्याही स्थितीत पडलो तरी माझ्या दैवी अंशास, निसर्गानुसार वागल्याने शांतीचा अनुभव अवश्य घडेल. अशा प्रकारे माझ्या स्थितीत पालट झाला असता माझा आत्मा पूर्वीपेक्षा विशेष असुखी आणि वाईट का बरे व्हावा? तो खिन्न, भयभीत किंवा कंपायमान होण्याचे प्रयोजन काही एक दिसत नाही.

४६. एखाद्या मनुष्यास, बैलास, द्राक्ष वेलास किंवा दगडास जे जे काही घडत असते ते त्याच्या त्याच्या निसर्गास अनुसरून असते. असे असताना तूच तेवढा का बरे नाखुश होतोस. हे तू निश्चयाने जाण की, तुला सहन करता येणार नाही, असे काहीही सार्वत्रिक निसर्गाकडून तुला प्राप्त होणार नाही.

४७. एखाद्या बाह्य वस्तूकडून तुला अपाय घडलासा वाटल्यास तो त्या वस्तूमुळे नव्हे, तर तुझी त्याजविषयीची जी भासमय कल्पना होते ती त्याचे कारण आहे आणि ही कल्पना चित्तातून काढून टाकण्याचे तुझ्या हाती आहे. तुझ्या स्वभावातीलच एखाद्या गोष्टीमुळे जर तुला हरकत होत असेल तर तिजविषयीचे तुझे मत बदलण्यास तुला कोणाची आडकाठी आहे? एखादी योग्य दिसणारी गोष्ट तुजकडून घडत नसल्याबद्दलही दुःख पावण्यात काही एक अर्थ नाही. तिच्या सिद्ध्यर्थ आपल्याकडून होईल तेवढा उद्योग करून स्वस्थ असावे. ती सिद्ध न झाली म्हणून खंती होऊ नये. एखादा अनिवार्य अडथळा योग्य कामात आला असता खिन्न होऊ नये. का की ते सिद्ध न होण्याचे कारण तुझ्या हातचे नाही. आता कधी कधी असे घडेल की, ते काम तुझ्या हातून न झाल्यास तुझे येथील जिणे केवळ निरर्थक आहे असे वाटेल. असे वाटल्यास मोठ्या संतोषाने देहत्याग कर[२]; परंतु मरेपर्यंत एकसारखा उद्योग करीत राहा आणि ज्या गोष्टी तुला अंतराय अशा वाटतात त्याजविषयी नाखुश होऊ नको.

४८. नियामक शक्ती कशासही हार जाणारी नव्हे हे ध्यानात ठेव. ती स्वतःच्या ठायीच तृप्त असते. जे तीस करणे पसंत वाटत नाही ते ती काही झाले तरी करीत नसते. तोपर्यंत ती स्वतःच्या ठायीच तृप्त असते. तिच्या तृप्तीस दुसऱ्या कशाचीही अपेक्षा नसते; परंतु आपल्या समजुती ती विवेकास अनुसरून ठेवील तर तिची योग्यता फारच वाढेल. कारण जे मन सर्व विकारांपासून मुक्त असते ते एखाद्या महा दुर्गाप्रमाणे आहे असे समजावे. मनुष्यास या दुर्गासारखे निर्भय आश्रयस्थान दुसरे कसले नाही. या मनोदुर्गाच्या आश्रयाने त्यास भावी

दुःखाचा लवलेशही लागत नाही. ही परम इष्ट स्थिती ज्यास कळत नाही तो खरा अज्ञानी; परंतु ज्यास कळत असनही तिचा आश्रय जो करीत नाही तो मात्र द:खी समजावा.

४९. कोणतीही गोष्ट तुला पहिल्याने जशी कळेल तशीच मनात राहू दे. तिजविषयी आणखी विचार करू नको. कल्पना कर की, कोणी तुला येऊन सांगितले की, अमुक अमुक मनुष्य तुझी निंदा करीत आहे, तर अशा प्रसंगी तू त्या गोष्टींचा आणखी विचार करून तीपासून आपणास अपाय घडला असे मानू नको. तुला अपाय घडला आहे असे तर कोणी येऊन सांगितले नाही ना? मग ती कल्पना तुझ्या मनात तू मुद्दाम आपण होऊन येऊ दिलीस असे नाही का होत? यास्तव जे काही तुला प्रथम दर्शनी दिसेल त्याजवर आणखी विचार करू नको. म्हणजे तुला काही एक बाधा घडावयाची नाही आणि त्याजविषयी विचार केलासच तर तो जगात घडणाऱ्या एकंदर गोष्टीचे स्वरूप जाणणाऱ्या पुरुषाप्रमाणे कर.

५०. काकडी कडू लागली असता जशी टाकून देतोस किंवा वाटेत काटेरी झाडे लागली असता ती सोडून जसा दुसऱ्या वाटेने जातोस तसा इतर बाबतीतही या जगात तू वागलास म्हणजे पुरे. असल्या वस्तूंचे जगामध्ये काय प्रयोजन आहे असा प्रश्न करू नको. कारण ज्यास सृष्टिशास्त्र अवगत आहे असा मनुष्य तुला हसेल. कसा तर ज्याप्रमाणे सुतारांनी किंवा चांभारांनी लाकडाचे किंवा चामड्याचे कापून तुकडे तुकडे केलेले पाहून तू त्यास दोष ठेवला असता ते तुझी हसून हसून फजिती करतील तसा. हे तुझ्या दृष्टीने दिसणारे तुकडे ते कारागीर काही ना काहीतरी उद्देशानेच करतात आणि त्यांची रचना ते योग्य प्रकारे करून इष्ट वस्तू सिद्ध करतात; परंतु कोणी असे म्हणेल की, या कारागीरास दुसऱ्या वस्तूंवर संस्कार करण्यास जसा अवकाश आहे तसा विश्व निसर्गास कोठे आहे? त्याच्या व्यतिरिक्त दुसरे काय आहे? तेव्हा त्यांची व्यवहारातील कारागीरांशी तुलना कशी करता येईल? या शंकेचे समाधान असे आहे की, जरी निसर्ग बाह्योपाधींपासून सर्वथा अलिप्त आहे, तथापि त्याच्या ठायी जे विनाश पावतसे दिसते किंवा जे जरठ होऊन निरूपयोगी झालेसे वाटते ते वस्तुतः पाहता रूपांतर पावत असते. या अशा पालटणाऱ्या वस्तूंपासून निसर्ग दुसऱ्या वस्तू घडवितो. यावरून पाहता हे उघड होते की, त्यास बाहेरून मालमसाला द्यावा लागत नाही किंवा अशा रीतीने तयार झालेल्या वस्तू ठेवण्यास जागेचीही जरूरत नसते. सर्व काही व्यवहार निसर्ग आतल्या आतच करतो. त्याला स्वतःचाच अवकाश, स्वतःचाच मालमसाला आणि स्वतःचीच कला या विश्वाच्या उत्पत्तीस्थितीलयास पुरते. त्याला दुसऱ्या कशाचीही अपेक्षा लागत नाही.

५१. तुझे वर्तन ढिलेपणाचे नसावे आणि तुझे भाषण गैरशिस्त नसावे. आपले विचार बहकू देऊ नको. चित्त अस्वस्थ होऊ देऊ नको. उद्दामपणा व आवेशीपणा सोडून दे. या संसारातील कृत्यात अगदी निमग्न होऊन न जाता काहीतरी विश्रांती घे.

अशी कल्पना कर की, लोकांनी तुला ठार मारून तुझे तुकडे तुकडे केले किंवा तुला शिव्याशाप दिले, तर या गोष्टींनी तुला आपले चित्त शुद्ध, बुद्ध, शांत व न्यायमुक्त ठेवण्यास काय हरकत घडेल बरे? उदाहरणार्थ असे पाहा की, एखाद्या मनुष्याने शुद्ध निर्मळ उदकाच्या झऱ्यावर उभे राहून त्यास शाप दिला तरी त्यातून प्राशनीय उदक निघण्याचे बंद होईल काय, त्यात त्याने एखादे चिखलाचे ढेकूळ टाकले तरी ते विरून जाऊन पुन्हा आतले पाणी जशाचे तसेच होईल. जरासुद्धा बिघडणार नाही, तर मग तुझा हा अविरत वाहणारा जीवनझरा त्वां कसा बरे राखला पाहिजे? अर्थात त्वा त्यास सर्व उपाधींपासून अलिप्त राखून शांती, आर्जव आणि विनय हे सद्गुण त्याच्या ठायी सतत राहतील असे करावे.

५२. या जगताचे स्वरूप ज्यास कळत नाही त्यास त्यात आपली स्थिती कोठे आहे हेही कळणे नाही. ज्यास जगताच्या अस्तित्वाचा हेतू समजत नाही त्यास आपण कोण आहोत हे कळणार नाही. अशा अज्ञ मनुष्यास आपले अस्तित्व तरी कशासाठी आहे हेही सांगता येणार नाही. तस्मात् आपण कोण आहोत व कोठे आहोत हे ज्यास कळत नाही अशा लोकांनी केलेल्या निंदास्तुतीची जो पर्वा करू जाईल त्यास काय म्हणावे?

५३. जो तासास तीन वेळा स्वतःस शिव्याशाप देतो त्याने तुझी स्तुती करावी असे वाटते काय? जो स्वतःशी संतोष पावत नाही त्यास तू संतुष्ट करू पाहतोस काय? जो मनुष्य आपण केलेल्या प्रत्येक कृत्याबद्दल पश्चात्ताप पावत आहे तो स्वतःच्या ठायी संतुष्ट आहे, असे कसे म्हणता येईल?

५४. जसा तुझा श्वासोच्छवास बाहेरील हवेच्या तंत्राने चालला आहे तद्वतच तुझ्या ठायीच्या ज्ञानतत्त्वाचा या सकळ चराचरास व्यापून राहणाऱ्या ज्ञानतत्त्वाशी अविरोध असावा. जसे हवेचे आपणास चोहोकडून वेष्टण असून, तीतून आपण श्वास घेतो, तसेच ज्ञानतत्त्व सर्व चराचरास व्यापून आहे. तेव्हा ते हवे त्यास प्राप्त होण्यासारखे आहे.

५५. साधारणतः पाहता दुष्टपणापासून विश्वास काही एक अपाय होत नाही. त्यातूनही विशेषतः एका मनुष्याचा दुष्टपणा दुसऱ्यास जाचत नाही. तो अपायकारक कोणाला, की ज्याच्या अंगी वाटेल तेव्हा त्यातून मुक्त होण्याचे सामर्थ्य आहे त्याला.

५६. माझा हा देह जसा माझ्या शेजाऱ्याच्या देहाहून भिन्न आहे तशीच माझ्या ठायीची प्रेरक बुद्धी त्याच्याहून भिन्न आहे. कारण आम्हा मानवास एकमेकांच्या उपयोगासाठीच जरी निर्माण केले आहे, तरी आमच्या ठायीच्या नियामक शक्तीचे काम व्यक्तिशः भिन्न आहे. असे नसते तर माझ्या शेजाऱ्याचा दुष्टपणा मला अपायकारक होता; परंतु माझ्या विपत्तीस दुसरा कोणी कारण होऊ नये म्हणून देवाने अशी योजना केलेली नाही.

५७. सूर्याचा जो प्रकाश आपणास मिळत आहे तो जसा काय खाली ओतल्याप्रमाणे दिसतो. त्याच्या किरणांचा फैलाव दशदिशांस होत आहे. तथापि तो वास्तविक उत्सर्ग पावत नाही. कारण किरणांचाच फैलाव होतो. म्हणजे अर्थात त्याचा एवढा विस्तार आहे.

किरण या शब्दाचाच मुळी विस्तार असा यौगिक अर्थ आहे. आता किरण हा कसा काय पदार्थ आहे हे ज्यास पाहणे असेल त्याने तो एखाद्या लहानशा भोकातून काळोख्या खोलीत पडताना पाहावा. म्हणजे असे दृष्टीस पडेल की, तो नेहमी सरळ रेषेने पडतो आणि मध्ये एखादे घनद्रव्य आले असता तो जसा काय दुभागतो; परंतु वास्तविक पाहता तो तेथेच स्थिर होऊन राहतो. पुढे सरकत नाही किंवा मागे हटत नाही. असाच व्यापार आपल्या ठायीच्या ज्ञानतत्त्वाचा चालला पाहिजे. त्याचा फक्त विस्तार होऊ द्यावा, उत्सर्ग होऊ देता कामा नये आणि जी प्रतिबंधके त्यास येतील त्याजशी त्यास विनाकारण झगडू देऊ नये. त्यास अढळ राखावे, ते पतित होऊ न देण्याची सावधगिरी ठेवावी आणि त्याचा अभियोग ज्यावर होईल त्याचे स्वरूप नीट पाहावे.

५८. जो मरणास भितो त्यास एकतर आपले इंद्रियज्ञान नष्ट होईल किंवा त्यात काहीतरी पालट होईल अशी भीती असते; परंतु जर मुळी तुझे इंद्रियज्ञानच नष्ट होईल तर मग तुला मरणमूलक दुःखानुभव तरी कसा होईल? आणि जर तुजला निराळ्या त-हेची ज्ञानेंद्रिये प्राप्त झाली तर तू निराळाच एखादा प्राणी होऊन जिवंत राहशील.[३]

५९. मनुष्ये एकमेकांच्या उपयोगासाठी अस्तित्वात आली आहेत. तस्मात् त्यांच्या ठायी तुला काही वैगुण्य दिसल्यास त्यांना उपदेश करून वाटेवर आण किंवा त्यास तशीच चालवून घे.

६०. मनाची गती बाणाच्या गतीहून भिन्न आहे. मनास वेळोवेळी सावध राहावे लागून चौकसपणा ठेवावा लागतो. म्हणून त्यास घुटमळावे लागून त्याची गती थोडीशी वक्र होते; परंतु हे त्याचे काम झाले म्हणजे त्याची गती सरळ राहून इष्ट हेतूसिद्धी हटकून होते.

६१. प्रत्येक मनुष्याच्या चित्तांत काय चालले आहे, त्याचे निरीक्षण नीट बारकाईने कर आणि लोकांनाही आपले चित्त साफ खुले करून दाखीव.

संदर्भ :

१. कोणी विघ्नसंतोषी एखाद्या सत्कृत्यास हरकती आणीत असला तरी त्यापासून काही हरकत किंवा अपाय नाही. कारण तो निसर्गानुसार वागत आहे, असे मानणे मोठे चमत्कारिक व चुकीचे होय.

२. असे कधी करू नये. हे फार अयोग्य होय. याबद्दल तत्त्वज्ञानात प्रकरण तिसरे, उपोद्धातातील टीप क्रमांक ३७ पहावे.

३. हा तत्त्वविचार काही विलक्षणच आहे. मरणापूर्वी किंवा मेल्यानंतर मनुष्यास निराळ्या तहेची ज्ञानेंद्रिये प्राप्त होऊन तो निराळाच एखादा प्राणी होतो असे कल्पिण्यास काही एक आधार नाही. आता मनुष्य किंवा कोणताही प्राणी मेल्यानंतर त्याचे शरीर कुजू दिले असता त्यात जे किडे पडतात त्यासच जर निराळा एखादा

प्राणी समजत असतील तर न कळे; परंतु प्रेतात असे किडे उत्पन्न झाले असता मनुष्य जिवंत राहिला असे म्हणणे म्हणजे विवेक सोडून काहीतरी म्हणण्यासारखे आहे; पण आत्मा देह सोडून दुसऱ्या कोठे जाऊन दुसरा देह धारण करतो म्हटले तर त्यास प्रमाण काय?

सारांश टीप : कृत्य ज्ञानतत्त्वविशिष्ट व संगमशील हवे. निसर्गानुरूप असेल तरच त्याचे समाधान होते, मगच गती मिळते. वस्तुस्वरूपाचा निश्चय करताना अनेक निकष लावावेत. भ्रम वा चुकीचे मत बदलणे म्हणजे मतस्वातंत्र्य गमावणं नव्हे. आपण चिरंजीव नाही, याचे अखंड स्मरण असावे. भूतकाळ व भविष्यकाळ सोडून वर्तमानाचा विचार करावा. चित्त शुद्ध ठेवावे.

❍❍❍

पुस्तक नववे

१. जो अन्यायाने वर्तन करतो तो अधार्मिक समजावा. कारण ज्याअर्थी विवेकी प्राण्यास निसर्गाने योग्यतेप्रमाणे एकमेकास साहाय्य करण्यासाठी निर्माण केले आहे. इजा करण्यासाठी नव्हे, त्याअर्थी त्याच्या त्या इच्छेविरुद्ध जो वागतो तो त्या अत्युच्च देवाशी भाविकपणे न वागल्याचा उघड उघड दोषी ठरतो. त्याचप्रमाणे जो असत्य बोलतो तोही अधार्मिक समजावा. कारण असे की, विश्वाचा निसर्ग म्हटला म्हणजे सर्व अस्तित्वात असलेल्या वस्तूंचा निसर्ग होय आणि ज्या वस्तू आज अस्तित्वात आहेत त्यांचा पुढे अस्तित्वात येणाऱ्या संपूर्ण वस्तूंशी निकट संबंध आहे. आणखी असे की, या निसर्गास सत्य हे नाव असून, सर्व सत्य वस्तूंचे आदिकारणही तोच आहे तस्मात् जो जाणूनबुजून असत्य बोलतो तो अधार्मिकपणाच्या दोषास पात्र होतो. जो न जाणता खोटे बोलतो तोही अधार्मिक ठरतो.[१] याचे कारण असे की, त्याचे ते बोलणे निसर्गानुसार नसून आणखी त्याचे आचरणही निसर्गास विरुद्ध असे होते. जो आपण होऊन असत्याचा अवलंब करतो तो निसर्गाविरुद्ध वागतो. का की, त्याला निसर्गाकडून सामर्थ्य प्राप्त झाले असता त्याचा उपयोग त्याला त्याच्या हयगयीमुळे सत्यासत्याची निवड करण्याकडे करता येत नाही. जो इंद्रियसुख कल्याणकारक समजून त्याच्या प्राप्तीस्तव झटतो आणि दुःख अनिष्ट समजून त्याचा अहेर करतो तो खरोखर अधार्मिकपणाबद्दल दोषी ठरतो.[२] कारण असा मनुष्य नेहमी निसर्गास दोष द्यावयाचा. या संसारामध्ये त्याच्या दृष्टीस असे वारंवार पडेल की, जे अनीतिमान असतात, त्यास सुखानुभव घडतो; परंतु जे नीतिमान असतात त्यांस वारंवार दुःख भोगावे लागते. हा निसर्गाचा त्यास आंधळा कारभार वाटेल.[३] आणखी असे की, जो दुःखास भितो त्याला जगात घडणाऱ्या कित्येक गोष्टीचे भय वाटेल. हा एक अधार्मिकपणाच आहे आणि जो सुखाच्या पाठीस लागलेला असतो तो अन्यायाचरणापासून दूर राहणार नाही, हा तर उघडच

अधार्मिकपणा आहे. आता वास्तविक पाहता ज्या गोष्टी निसर्गास सारख्याच वाटतात, नाही तर एरव्ही त्या त्याने निर्माणच केल्या नसत्या. त्याच्याविषयी निसर्गानुसार वागणारांची वृत्ती समानच असली पाहिजे. तेव्हा सुख आणि दुःख, मरण आणि जीवन, मान आणि अपमान यांचा निसर्गाकडून सारखाच विनियोग घडत असल्याकारणाने त्याजविषयी ज्यांची समबुद्धी होत नाही ते नि:संशय अधार्मिक होत. अशा परस्परविरुद्ध गोष्टीचा निसर्ग विनियोग करतो असे वर म्हटले आहे. ईश्वरी योजनेप्रमाणे जे लोक निरनिराळ्या काळी एकामागून एक निर्माण होत आहेत त्यास त्या सारख्याच घडतात असे म्हटले नाही. त्याच्या योजनेप्रमाणे आज जगामध्ये सर्व व्यवस्था सुरळीत चालली आहे. या जगचालक शक्तीने वस्तुमात्रास काही नियम लावून दिले आहेत. त्याचप्रमाणे त्यांची उत्पत्ती, स्थिती आणि लय ही व्यवस्थितपणे व्हावी म्हणून त्यांच्या ठायी तिने निरनिराळ्या शक्ती ठेवल्या आहेत (पु. ७, क. ५).

२. या मनुष्यजन्मास येऊन अनृत(खोटे), दंभ, सुखाभिलाष आणि अभिमान इत्यादी कुवृत्ती अंगी जडल्यावाचून देहावसान ज्याचे होईल तो अत्यंत धन्य समजावा; परंतु या कुवृत्तीचा ज्याच्या ठायी पूर्ण विकास झाला आहे त्याने एकदाचे डोळे झाकावे ते बरे. तू दुर्गुणाचा अगदी अंकित होऊन जाण्याचा निश्चयच केला आहेस काय? या महारोगापासून दूर पळण्याची बुद्धी तुझ्या ठायी आजपर्यंतच्या अनुभवाने उत्पन्न झाली नाही काय? दुर्गुणास महारोग म्हटले याचे कारण उघडच आहे की, जेणेकरून आपल्या ठायीच्या ज्ञानतत्त्वाचा नाश होतो, त्याच्या एवढा जबर रोग दुसरा कोणताही नाही. आपल्या या वातावरणात वगैरे काहीतरी फेरफार होऊन उत्पन्न होणारा महामारीसारखा भयंकर रोगही या दुर्गुणरूप रोगापुढे काहीच नाही. कारण महामारीपासून प्राण्यांचा जीवनाशच काय तो होतो; परंतु हा दुर्गुणरूप रोग विवेकी मनुष्याचा सर्वस्वी घात करतो.

३. मृत्यूचा तिटकारा करू नको. तो आला असता मोठ्या समाधानाने त्याचा स्वीकार कर. कारण निसर्गाने ज्या काही गोष्टी आम्हा मानवास नेमून ठेविल्या आहेत, त्यापैकीच मृत्यू ही एक होय. तारुण्यावस्था येणे, वृद्धापकाळ प्राप्त होणे, झराझर वाढत जाणे, ज्वानी प्राप्त होणे, दात आणि दाढी मिशी येणे, केस पिकणे, लेकरे होणे इत्यादी नानाविध व्यापार तुझ्या शरीरात आयुष्याच्या निरनिराळ्या काळी घडतात. तसेच देहावसान होणे हा एक त्या देहाचा शेवटला व्यापारच आहे. तेव्हा विवेकी मनुष्यास हे योग्यच आहे की, त्याने मृत्यूविषयी उपेक्षा, अधैर्य, तिरस्कार इत्यादी वृत्ती चित्तांत वागवू नयेत, तर तो एक निसर्गाचा व्यापारच आहे, असे मानून त्यास सादर असावे. ज्याप्रमाणे आपली स्त्री आसन्नप्रसवा झाली असता तिच्या गर्भाशयातून मूल बाहेर येण्याची मार्गप्रतीक्षा उत्कंठेने करतोस त्याप्रमाणेच तुझा आत्मा या देहाच्या बंधनातन मुक्त होण्याचा समय आला असता त्वां त्यास तयार असावे;[४] परंतु याहूनही हलक्या प्रतीचे समाधान तुला हवे असल्यास ज्या विषयास तू मुकणार आहेस त्या विषयाचे स्वरूप आणि ज्या माणसांच्या सहवासास तुझा आत्मा इतःपर राहणार नाही

त्यांची नीती ही कशी काय आहे याचा विचार कर, तरी पण मनुष्यांचा त्रास करणे रास्त नव्हे, तर त्यांचा आदर करून त्यांच्याशी सौम्यपणे वर्तन ठेवावे. आता ज्यांचे विचार तुझ्यासारखेच असतील त्यांच्याशी आपला वियोग त्वां करून घेऊ नये. अशा समान विचारांच्या लोकांच्या साहचर्याने राहता यावे म्हणूनच आपणास हे जीवित प्रिय वाटणे योग्य आहे. दुसरे जीवित प्रीतीचे योग्य कारण संभवत नाही; परंतु तू ज्यांच्या सहवासाने राहत असशील त्याचे परस्पर कलह व वैमनस्ये पाहून तुला जेव्हा फारच वाईट वाटेल तेव्हा आपणास मरण लवकर येईल, तर फार बरे असे तुझ्या मनात यावे हे साहजिक आहे. का की अशा मनुष्यांच्या सहवासाने कदाचित तुझा तुला विसर पडून तू त्यांच्यापैकीच एक बनशील.

४. जो अनीतीने वागतो तो त्यात स्वतःचेच अकल्याण करतो. उदाहरणार्थ, जो अन्यायाने वागतो तो स्वतःचाच अन्याय करतो. कारण तेणेकरून त्याचेच मन बिघडते.

५. एखादी गोष्ट मनुष्याकडून घडली असताच केवळ अन्याय होतो असे नाही, तर एखादी गोष्ट न करण्यातही कित्येक वेळा अन्याय होत असतो.

६. तुझे सध्याचे विचार विवेकशुद्ध, वर्तणूक समाजसुखवर्धक आणि वृत्ती प्राप्त स्थितीत समाधान मानून राहण्याजोगी असली म्हणजे पुरे.

७. मिथ्या कल्पना चित्तांतून काढून टाक. वासनांचे दमन कर, तृष्णांचे निर्मूलन कर, नियामक शक्तीचे सामर्थ्य कायम राख.

८. सगळ्या अविवेकी प्राण्यांच्या ठायीचे जीवतत्त्व समान असते; परंतु विवेकी जे प्राणी आहेत त्यांच्या ठायीचा ज्ञानतत्त्वयुक्त आत्माही समानच आहे. कसा म्हणाल तर ज्याप्रमाणे पार्थिव वस्तूचे सगळ्यांचे पृथ्वीरूप एकच तत्त्व असते आणि ज्यांच्या ठायी चक्षुरिंद्रिय आणि प्राणही असतात ते एकाच प्रकाशाने पाहू शकतात आणि एकाच हवेने श्वासोच्छ्वास करतात.

९. जी गोष्ट सर्व वस्तूंस साधारण असून ती त्यांची घटकांश बनते तिजप्रत त्या सर्व वस्तूंची गती असते. सर्व पार्थिव वस्तू पृथ्वीप्रत पावतात. सर्व उदकमय वस्तूंचा प्रवाह एकवट होतो. सर्व वायूरूप वस्तूंचीही गती अशीच होत असते. त्या ज्या अलग राहतात त्या काहीतरी बाह्य कारणांच्या जोरामुळे. अग्नी जो आहे तोही वर असलेल्या अग्नीतत्त्वास्तव वरतीच उफाळत असतो;[५] परंतु तो येथल्या इतर अग्नीशी मिळून पेटण्यास इतका तत्पर असतो की, त्यात साधारण वाळलेले सरपण टाकले असता तो ते सहज जाळन टाकतो. कारण उघडच आहे की, त्या सरपणात पेट घेण्यास हरकत करणारे काही एक फारसे नसते. यावरून पाहता ज्याच्या ठायी सर्वसाधारण ज्ञानतत्त्वांचा अंश असतो त्याचीही आपल्या ठायीच्या या समान तत्त्वांप्रत गती असते. किंबहुना ही गती इतर तत्त्वांच्या गतीहून जास्तही असते. कारण हे ज्ञानतत्त्व इतर सर्व वस्तूंपेक्षा श्रेष्ठ असल्यामुळे त्याचा संयोगही विशेष त्वरेने व्हावयाचा. म्हणूनच विवेकहीन प्राण्यांत आपण मधुमक्षिकांचे समूह, गुरांची खिल्लारे,

पक्ष्यांच्या पिलांचे पोषण आणि त्यांचे परस्पर प्रेमही पाहतो. कारण प्राण्यांच्या ठायीही आत्मा असून, त्यास एकत्र जुळविणारी जी एक शक्ती आहे तिचा व्यापार त्यांच्या संबंधाने विशेष चांगला दृष्टोत्पत्तीस येतो. ही शक्ती वृक्ष पाषाणादिकांमध्येही मुळीच दृष्टीस पडत नाही; परंतु विवेकी प्राणी जी मनुष्ये त्यांच्यात राजकीय संबंधाचे समाज, मित्रभाव, कुटुंब व्यवस्था आणि सभा ही दृष्टीस पडतात, त्यांच्या परस्पर लढाया झाल्या तरी त्यात तह वगैरे सामाचे प्रकार दिसतात; परंतु ज्या वस्तू याहूनही विशेष वरल्या पायरीच्या असतात त्या परस्परांहून विलग असल्या तरी त्यांचे परस्पर ऐक्य असते. यास उदाहरण आकाशातील ताऱ्यांचे आहे. यावरून असे ठरते की, जसजशा वस्तू वरच्या दर्जाच्या असतात, तसतसा त्यांचा परस्पर स्नेह विशेष असतो. मग त्या एकमेकांपासून कितीही दूर असल्या तरी चालते. आता आम्हा मानवांची स्थिती या नियमाच्या संबंधाने कशी काय आहे ती पाहा. आम्ही जे बुद्धिमान प्राणी त्यामध्येच फक्त या परस्पर स्नेहबद्धीचा विसर पडलेला दिसतो आणि एकजीव होऊन जाण्याचा जो नैसर्गिक धर्म त्याचा अभाव काय तो आम्हामध्येच नजरेस येतो. आता एवढे खरे की, जरी मनुष्ये हे ऐक्य टाळण्याचा प्रयत्न करीत असतात तरी ते त्यास सहसा सोडीत नाही. कारण निसर्ग फारच बलवान आहे. मनुष्याचे एकमेकांवाचून मुळी चालतच नाही.

१०. मनुष्य, देव आणि विश्व या सगळ्यांपासून फलनिष्पत्ती व्हावयाची आहे. भेद इतकाच की, त्यांच्या फलद्रूपतेच्या वेळा मात्र निरनिराळ्या आहेत. व्यवहारात द्राक्षवेलासारख्या वस्तूच फलद्रूप होतात असे म्हणतात; परंतु हा केवळ त्या फलोद्रमरूप व्यापाराचा संकुचित अर्थ घेतलेला असतो. वास्तविक पाहता विश्वातील एकंदर वस्तूस ही अवस्था आहे. विवेक जो आहे त्यापासून जे फल प्राप्त होते ते स्वत: व इतरांसही उपयोगाचे असते. भेद इतकाच की, विवेकापासून उत्पन्न होणाऱ्या वस्तू विवेकरूपच असतात.

११. तुझ्यात सामर्थ्य असल्यास जे गैरशिस्त रीतीने वागतात त्यांस उपदेश करून वाटेवर आण; परंतु हे सामर्थ्य तुला नसल्यास त्यांस वागवून घेण्याची शक्ती तुला दिलेली आहे तिचा उपयोग कर. देवसद्धा अशा मनष्यांचा तिरस्कार करीत नाही. फार काय पण अशा मनष्यास आरोग्य, धन, कीर्ती इत्यादिकांचे संपादन करण्यास ते साहाय्यही करतात इतके ते दयार्द्र असतात. तुलाही असे करण्याचे सामर्थ्य आहे.

१२. एखाद्या नीच, हतभाग्य मनुष्याप्रमाणे उद्योग करू नको किंवा तो करताना लोकांनी आपली कीव करावी किंवा वाखाणणी करावी अशी इच्छा धरू नको. आपल्या सर्व आचरणाचे धोरण असे ठेव की, तेणेकरून तुझी कोणतीही असवृत्ती उद्दाम न होता तुजकडून समाज सुखवर्धन व्हावे.

१३. आज मी सर्व दुःखांपासून मुक्त झालो आहे, असे म्हणण्यापेक्षा मी ते माझ्या ठायीचे काढून टाकले आहे असे म्हणणे विशेष युक्त दिसते. कारण माझ्या दुःखाचा उगम बाह्य

गोष्टीत नाही, तर तो अंतर्यामीच आहे. हा सर्व अनिष्ट अनुभव भासमय कल्पनांमुळे होतोसा वाटतो.

१४. समग्र वस्तूंचे स्वरूप एकच आहे. त्या दृढ परिचित, क्षणभंगुर आणि असार अशा आहेत. आमच्या पूर्वजांच्या वेळी जशी वस्तुस्थिती होती तशीच ती आताही आहे.

१५. या बाह्य पसाऱ्यातील एकंदर वस्तूंचा आपल्या आत्म्याशी काही एक संबंध नाही. या वस्तूस स्वतःचे ज्ञान नसून त्यात स्वतःविषयी बरे-वाईट मत देण्याचे सामर्थ्यही नाही, तर मग हे त्याजविषयीचे बरे-वाईट मत कोणाकडून होते म्हणाल, तर ते सर्व काम आपल्या ठायीच्या नियामक शक्तीचे आहे.

१६. विवेकी संयमशील प्राण्याचे कल्याण किंवा अकल्याण जे होत असते ते निश्चल राहण्याचे नव्हे, तर सतत उपयोग करण्यात त्याजकडून जे सदाचरण किंवा दुराचरण होत असते तेही स्वस्थ राहिल्याने होत नाही. ते होण्यास त्यास काही ना काही उद्योगच केला पाहिजे.

१७. दगड वर फेकला असता तो खाली येण्यात जसे काही अनिष्ट घडले असे म्हणता येत नाही तद्वतच आपले देहावसान होऊन वरती प्रयाण झाले असता काही एक बिघडत नाही. (पु. ८, क. २०)

१८. मनुष्यांच्या आचरणाचे नियमन साधारणतः कोणत्या तत्त्वाप्रमाणे होत असते, याचे नीट बारकाईने अवलोकन केले असता ज्यांच्या निंदास्तुतीची तू पर्वा करीत आहेस, ते कोणत्या प्रकारचे लोक आहेत हे तुला कळून येईल.

१९. सर्व वस्तूंत पालट होत आहे. तुझ्या स्वतःच्या ठायीही सतत पालट होत असून, तुझा थोडा थोडा लय होत चालला आहे. समग्र विश्वाचीही हीच स्थिती आहे.

२०. दुसऱ्याचे गैरशिस्त वर्तन जेथल्या तेथे राहू देणे हे तुझे कर्तव्य आहे.

२१. सर्व चालक शक्तीचा शेवट होणे आणि सर्व मनोव्यापार विराम पावणे किंवा एकाअर्थी विलय पावणे हे काही अनिष्ट नव्हे. आपल्या जीविताचे स्वरूप काय आहे याचा विचार कर. बाल्यावस्था, तारुण्य व वृद्धपण या ज्या अवस्था मनुष्यास क्रमाक्रमाने प्राप्त होत आहेत त्याचा पालट मृत्यूरूपच आहे. यात जसे काही भिण्यासारखे नाही, तसेच हे सारे जीवित क्षय पावून विराम व रूपांतर पावले असताही भिण्याचे कारण नाही.

२२. आपल्या स्वतःची, समग्र विश्वाची आणि आपल्या शेजाऱ्याची नियामक शक्ती कशी काय आहे ते नीट तपासून पाहा. तुझी स्वतःची नियामक शक्ती अशासाठी तपासून पाहा की, तेणेकरून ती तुला न्यायमुक्त राखता येईल. विश्वाची नियामक शक्ती पाहिल्याने तू कोणाचा अंश आहेस ते तुझ्या ध्यानात येईल आणि शेजाऱ्याच्या नियामक शक्तीचे स्वरूप कळले म्हणजे त्याने जी कोणती गोष्ट केली असेल ती अज्ञानामुळे केली आहे की

समजून उमजून केली आहे हे तुला कळेल. आणखी असेही तुझ्या लक्षात येईल की, त्याची नियामकशक्ती आपल्या नियामकशक्तीहून भिन्न नाही, तर त्या सजातीय आहेत.

२३. तू समाजातील एक व्यक्ती असल्याकारणाने तुझे आचरण समाजस्थितीस अनुकूल असे असावे. ज्या तुझ्या आचरणाचा उद्देश प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने असा नसेल तितक्यापुरता तू समाजाशी तुटून वागतोस असे म्हणावयाचे. फार काय पण तू समाजाचा तितक्यापुरता शत्रू होतोस. जसा लोकांचा काही उद्देशाने मोठा समाज एकत्र झाला असता त्यात एखादा माणूस आपल्या मनात येईल तसे वागू लागला म्हणजे त्या समाजात त्याची गणना होत नाही, तशीच त्याची स्थिती होते.[६]

२४. लहान मुलांचे कलह आणि क्रीडा जशा वाटतील तशा चालतात किंवा स्मशानातील भुते जशी पुरलेल्या प्रेताचे वाटेल ते करतात[७] तसाच बहुतेक हा मनुष्याचा संसार चालला आहे.

२५. एखाद्या वस्तूचे स्वरूप नीट तपासून पाहा आणि त्याच्या जडांशापासून त्याचा अगदी अलग विचार कर आणि मग अशा या वस्तूशी निसर्गत: मोठ्यात मोठी किती आयुर्मर्यादा आहे ती पाहा.

२६. तुझ्या ठायीची नियामक शक्ती निसर्गत: ज्या गोष्टी करण्यास समर्थ आहे त्या तिच्याकडून घडल्याने तू समाधान पावत नाहीस, म्हणून तुला अतोनात त्रास सोसावा लागत आहे. आता हा त्रास पुरे कर.

२७. एखाद्या मनुष्याने तुला दोष दिला किंवा तुझा द्वेष केला किंवा तुझी बेअब्रू केली असता त्याच्या आत्म्याकडे दृष्टी दे आणि त्याच्या अंतर्यामाचे परीक्षण करून तो कशा प्रकारचा मनुष्य आहे ते पाहा, म्हणजे तुला असे आढळून येईल की, असल्या मनुष्याचे आपल्याविषयी काहीही मत असले तरी त्याची पर्वा करू नये, तरी पण त्याच्याविषयी तुझ्या मनात वाईट बुद्धी वागू नये. कारण तो व तू निसर्गतः मित्रच आहात आणि देवसुद्धा असल्या मनुष्यास आपले इष्ट हेतू सिद्धीस नेण्यास नानाप्रकारे साहाय्य करीत असतात.

२८. या विश्वाचा क्रम युगानुयुग सारखाच चालला आहे. म्हणजे अर्थात् तीच ती स्थिती त्यास कालांतराने प्राप्त होत आहे आणि विश्वातील ज्ञानतत्त्व एक तर प्रत्येक निरनिराळ्या घडणाऱ्या गोष्टीस कारण होत आहे. असे असल्यास त्याच्या अशा व्यापारामुळे प्राप्त होणाऱ्या स्थितीत समाधान मानून राहा. नाही तर असे असेल की, या ज्ञानतत्त्वांकडून एक वेळ काय व्यापार घडला तो घडला. आता जे काही घडत आहे ते केवळ या आदिकारणापासून उद्भवलेल्या कार्यकारण परंपरेमुळे होय. असेही नसल्यास केवळ या महातत्त्वापासूनच सर्व चराचराचा उगम असावा. सारांश काय की. देव असल्यास सर्व काही ठीकच आहे. परंत हा सर्व विश्वाचा कारभार यदच्छेनेच होत असला, तर तू तरी त्या यदृच्छेच्या सपाट्यातून सूट (पु. ६, क. ४४, पु. ७, क. ७५).

आम्ही सर्व लवकरच मातीस मिळून जाऊ. बरे ही पृथ्वी तरी कायम राहील काय? नाही. तीही पालटून जाईल. असा हा सर्व वस्तूंचा पालट पुन्हा पुन्हा होत राहील. सारांश, हा सर्व संसार जलतरंगवत आहे. एक लाट येऊन किनाऱ्यास आदळते न आदळते तो दुसरी तिच्या मागून येऊन त्याच स्थितीप्रत पावते. असा क्रम अव्याहत चाललेला असतो, असा विचार तुझ्या मनात आल्याने या सर्व नश्वर वस्तूंचा तू तिरस्कार करशील (पु. १२, क. २१).

२९. विश्वातील व्यापार ज्या कारणाने घडत आहेत त्या कारणांचा वेग पाण्याच्या अत्यंत प्रचंड ओघाप्रमाणे आहे. त्याच्या लोटापुढे कोणतीही वस्तू टिकावयाची नाही. तेव्हा राजकीय संबंधामध्ये किंवा तत्त्वज्ञान संपादनाच्या खटपटीमध्ये गुंतलेले बिचारे लोक किती क्षुद्र आहेत! हे सारे मूढ आहेत. तर हे मनुष्या, तू निसर्गानुसार वाग. सामर्थ्य असल्यास आजपासूनच असे वर्तावयास लाग. कोणी आपणास पाहील काय, अशी आकांक्षा चित्तांत वागवू नको. प्लेटोने कल्पिलेली समाजस्थिती प्राप्त होण्याची आशा करू नको. अगदी लहानशी गोष्ट असली तरी ती चांगल्या प्रकारे चालल्यानेच समाधान मान. हे थोडे झाले असे समजू नको. कारण मनुष्याचे खोटे समज कोणाच्याने पालटवतील बरे? आणि खोटे समज पालटल्यावाचून त्यांजकडून इष्ट प्रकारचे वर्तन जुलमाने करविणे म्हणजे त्यास गुलाम करण्यासारखे आहे. जोपर्यंत त्याचे चित्त पालटले नाही तोपर्यंत असल्या जुलमीच्या रामरामीचा काही एक उपयोग नाही. अलेक्झांडरासारखे महावीर झाले, तरी त्यांनी आपले वर्तन निसर्गास अनुसरून ठेवले नाही. तेव्हा त्यांचे अनुकरण मी का म्हणून करावे? खऱ्या तत्त्वज्ञानास आर्जव आणि विनय ही पाहिजेत. म्हणून औद्धत्य आणि अभिमान यांच्या पायी तू त्यास मुकू नको.

३०. मनुष्याचे असंख्य समूह, त्यांच्या आचाराविचारांच्या अपरिमित तऱ्हा, त्यांची अत्यंत खवळलेल्या किंवा निश्चळ समुद्रातून होणारी नानाविध जलप्रयाणे आणि ज्यांचे जनन, स्थिती आणि मरणही होत आहेत, त्यांच्या ठायी दिसून येणारे भिन्न भाव याचे अवलोकन अगदी अलग राहून कर. त्याचप्रमाणे पुरातनकाळी लोकांची जीवनरीती कशी काय ती आणि पुढल्या काळी ती कशी होईल आणि सध्या रानटी राष्ट्रांमध्ये ती कशी काय आहे, या गोष्टींचा विचार कर. आणखी असे लक्षात आण की, तुझे नाव पुष्कळास ठाऊकसुद्धा नाही आणि ज्या कित्येकास ते ठाऊक आहे त्यातले पुष्कळ ते लवकरच विसरून जातील. जे तुझी आज स्तुती करीत आहेत ते काही वेळाने तुला कदाचित दोषही देऊ लागतील. तेव्हा देहत्यागानंतर आपले नाव मागे राहावे किंवा आपली मोठी कीर्ती व्हावी, असे इच्छिण्यात मुळीच अर्थ नाही.

३१. बायोपाधींनी उत्पन्न होणाऱ्या अस्वस्थतेपासून तुझे चित्त मुक्त राहू दे. तुझ्या प्रत्येक कृत्याचा रोख असा असावा की, तेणेकरून समाजाचे कल्याण व्हावे. कारण हे तुझ्या निसर्गास अनुसरून आहे.

३२. ज्या पुष्कळ निरूपयोगी गोष्टींपासून तुला त्रास पोहोचत आहे त्यांचा तो त्रास तुला चुकविता येण्यासारखा आहे. कारण त्यांचे अनिष्टत्व सर्वस्वी तुझ्या त्याविषयीच्या मिथ्या कल्पनांमुळे उद्भवले आहे. तू एकदा या भासमय कल्पना चित्तातून काढून टाकल्यास म्हणजे मग त्या चित्तास समग्र विश्वाचे आणि अनंत कालाचे आकलन सुकर होईल. त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तूचे झपाझप होणारे रूपांतर, तिच्या उत्पत्तीपासून विलयापर्यंतच्या अवकाशाचे अल्पत्व, तिच्या उत्पत्तीपूर्वीचा अमर्याद काळ आणि विलयानंतरचा अपरिमित काळ हीही तुझ्या ध्यानात येतील.

३३. जे काही तू पाहत आहेस ते सारे लवकरच विनाश पावेल आणि हा विनाश ज्याच्या नजरेसमोर घडेल त्याचाही लवकरच अंत होईल आणि जो अत्यंत वृद्ध होऊन मरण पावला त्याची आणि जो अकाली मरण पावला त्याची या उभयतांचीही स्थिती मरणोत्तर सारखीच होईल.

३४. लोकांचे आचरण कोणत्या तत्त्वांप्रमाणे आहे, त्यांचा उद्योग कोणत्या गोष्टीच्या संपादनार्थ चालला आहे, ते कोणावर प्रीती करतात किंवा कोणाचा आदर करतात, त्याची कारणे काय इत्यादी गोष्टी त्वां नीट बारकाईने पाहाव्यात. त्याचे हृद्गत होईल तेवढे जाणून घे. तुला दुःख देण्याच्या इराद्याने जर तुला त्यांनी दोष दिला किंवा सुख देण्याच्या हेतूने तुझी स्तुती केली, तर त्यांची ही कल्पना विलक्षण नव्हे काय?

३५. ज्यास आपण नाश म्हणतो तो वास्तविक नाश नव्हे, तर तो वस्तूचा पालट होय.[८] विश्वाच्या निसर्गाला वस्तुमात्राचा एकसारखा पालट करण्यातच आनंद वाटतो. त्याच्या योजनेप्रमाणे सर्व विश्वाचे व्यापार यथास्थित चालले आहेत, ते अनादिकालापासून असेच चालले आहेत आणि पुढेही अनंतकालपर्यंत असेच चालावयाचे. असे जर आहे तर सर्व वस्तू नेहमी वाईट स्थितीतच राहतील, त्या चांगल्या करण्याची शक्ती देवांच्याही अंगी नाही, सारांश, या जगाचा सर्व कारभार असाच वाईट प्रकारे चालत राहील, असे तुला वाटते काय? (पु. ४, क. ४५, पु. ७, क. १८)

३६. प्रत्येक वस्तूच्या मुळाशी निःसत्व जडांश आहे. उदक, मृत्तिका, अस्थी, श्लेष्मा यांचेच आधिक्य सर्वात आढळते. पुनः चांगले स्फटिक मणी केवळ दगड होत, सोन्या-रुप्यासारखे मौल्यवान धातू केवळ जमिनीतल्या थरात आढळणारे, मोठमोठाली उंची वस्त्रे केवळ पशुंच्या केसांचे तुकडे होत. अशीच स्थिती साऱ्या वस्तूंची आहे आणि प्राणासारखी मोठी महत्त्वाची वस्तू पाहिली असता ती केवळ श्वासरूप होय. तिचीही मातब्बरी इतर वस्तूंहून मुळीच नाही.

३७. या अशा असार जीविताविषयीचा असंतोष आणि वेडगळ चेष्टा पुरे कर. तू उगीच का बरे उद्वेग पावत आहेस? यात नवे ते काय आहे? जी वस्तू तुला अनिष्टशी वाटते तिचे अंत:स्वरूप काय ते तू ओळख. कदाचित त्या वस्तूच्या जडांशामुळे तुला पीडा होत असेल,

तर त्याचीही मातब्बरी काय आहे ती पाहून ठेव. त्या दोन अंशाखेरीज दुसरे तीत काही एक नसते. एकंदरीत देवाविषयी तुझी वृत्ती साधी व शुद्ध व्हावी. या जगातील गोष्टी आपण शेकडो वर्षे पाहत राहिलो काय आणि तीन वर्षे पाहत राहिलो काय सारखेच.

३८. कोणा मनुष्याकडून गैरशिस्त गोष्ट घडली, तर तिजमुळे त्याचे नुकसान होते; पण कधी कधी त्याच्याकडून अशी गोष्ट घडली असे वाटते खरे; परंतु वास्तविक पाहता ती त्याजकडून मुळी उघडलेलीच नसते.

३९. जर सर्व काही एका ज्ञानतत्त्वापासून उगम पावत आहे, तर मग सर्व विश्वाच्या कल्याणाच्या हेतूने जे घडत आहे त्यास त्याच्या एका अंशाने दोष देणे रास्त नव्हे; परंतु असे जर असेल की, हा सर्व विश्वाचा पसारा परमाणुसंघाने एकत्र झालेला असून, त्याचा प्रलय म्हणजे त्या परमाणूचे पृथक्करण होय; दुसरे काही नाही, तर मग तू मुळी अस्वस्थ तरी का व्हावे? आपली नियामक शक्ती निर्व्यापार किंवा भ्रष्ट होऊ देऊ नये. तिच्यात दंभ, पशुबुद्धी इत्यादिकांचा संचार होऊ देता उपयोगी नाही.

४०. देवांना एकतर सामर्थ्य असेल किंवा नसेल. जर त्यांस मुळी सामर्थ्यच नसेल तर मग त्यांची प्रार्थना करण्यात काय अर्थ? परंतु जर त्यांस सामर्थ्य असेल, तर तू त्याजपाशी असे माग की, 'ज्या गोष्टीविषयी मला भीती वाटत आहे त्यास न भिण्याची ताकद मला द्या. ज्या वस्तूंची मला आवड वाटत आहे, त्यांजविषयीची ती आवड मनातून काढून टाकण्याविषयीचे सामर्थ्य मला द्या. ज्या गोष्टींनी मला आज द:ख होत आहे त्यापासन द:ख होईनासे करा' अशा प्रकारची जर काही प्रार्थना केली तरच ते ती ऐकतील; परंतु कोणी असे म्हणेल की, देवांनी हे सामर्थ्य माझ्या ठायी ठेवले आहे. असे असल्यास त्या सामर्थ्याचा स्वतंत्र मनुष्याप्रमाणे उपयोग करणे हे जे आपल्या हातचे नाही त्याची अपेक्षा एखाद्या दीन नीच गुलामाप्रमाणे करण्यापेक्षा चांगले नव्हे काय? बरे जे तुझ्या स्वाधीनचे आहे, त्यातही देव मदत करीत नाहीत, असे तरी तुला कशावरून वाटते बरे? तर अशाही गोष्टीबद्दल प्रार्थना करावयास लाग. म्हणजे तिचे फळ तुला दिसून येईल.

४१. एपिक्युरस म्हणतो की, 'मी एकदा आजारी पडलो होतो, त्यावेळी माझे भाषण शरीरास ज्या पीडा होत असत त्याविषयी नसे. जे मला भेटावयास येत त्यांजपाशी मी त्याजबद्दल एक शब्दही काढीत नसे, तर वस्तूंच्या स्वरूपाविषयीचा संवाद मी पूर्वीप्रमाणेच चालविला होता. आपल्या चित्तास देहात होणाऱ्या फेरफारापासून विकार होत असताही ते अस्वस्थ होऊन आपल्या शांतीस कसे मुकणार नाही, हे दाखविण्याचा माझा मुख्य इरादा होता. मी आपल्या वैद्यांस कोणत्याही प्रकारे घाबरविले नाही किंवा त्यांस माझी अवस्था जड आहे असे भासविले नाही, तर उलटे त्यांस असे भासवीत असे की, माझी स्थिती चांगली असून, मला काही एक इजा होत नाही.' तूही अशीच वृत्ती आजारीपणात किंवा दुसऱ्या कोणत्याही संकटावस्थेत दाखीव. कोणताही प्रसंग आपल्यावर गुदरला असता

तत्त्वविचारास फाटा न देणे व निसर्गाविषयी अज्ञान अशा मनुष्याशी व्यर्थ कटकट करीत न बसणे हा नियम सर्व तत्त्वविचारी पुरुषांचा आहे. सारांश, जे तू काही सांप्रत करीत आहेस ते योग्य असल्यास त्यांजकडे आणि ज्या साधनाने ते सिद्ध करावयाचे त्यांजकडेच फक्त आपले सारे लक्ष ठेव.

४२. एखाद्या निर्लज्ज मनुष्याविषयी तुला त्रास आला असता लागलीच असा विचार मनात आण की, निर्लज्ज लोकांस या जगातून नाहीतसे करता येण्यासारखे आहे काय? असे होणे शक्य नाही. याकरिता अशा अशक्य गोष्टीची इच्छा धरू नको. असाच विचार लुच्चे, दगलबाज वगैरे लोकांविषयी त्वां करावा. अशा मनुष्यांचे जगातून निर्मूलन करणे अशक्य आहे हे लक्षात ठेवून तू त्यांच्याशी ममतेने वाग. प्रत्येक दुष्कर्माचा प्रतिकार करण्याजोगा कोणता सद्गुण मनुष्याच्या ठायी निसर्गाने ठेवला आहे हे जाणणे हिताचे आहे. कारण मूर्ख मनुष्याशी सौम्यपणाने वागण्याचे व इतर अशाच दुर्गुणी मनुष्यांशी सुवृत्तीने वागण्याचे सामर्थ्य मनुष्यास निसर्गाने दिले आहे आणि बहुतेक प्रसंगी तुला नीतिभ्रष्ट मनुष्यास बोध करून वाटेवर आणता येईल. शिवाय आणखी असे पाहा की, त्याच्या असद्वर्तनामुळे तुला वास्तविक अपाय असा कोणता घडतो बरे? कोणताही नाही. कारण ज्यांचा तुला राग येतो त्यांच्याकडून तुझे चित्त मुळीच बिघडत नाही; परंतु जे तुला अनिष्ट व उपायकारकसे वाटते त्याचा उगम फक्त तुझ्या चित्तातच आहे. आता अप्रबुद्ध मनुष्याकडून अप्रबुद्धपणाची कृत्ये घडल्यास त्यात अपाय किंवा नवल तरी कोणते? अशा मनुष्याकडून असले वर्तन व्हावयाचेच असा विचार तुझ्या मनात पूर्वीच न आला हा तुझाच दोष आहे. विवेकाच्या साहाय्याने तुला ही गोष्ट कळणारी असून, तिजविषयी तुला विस्मृती होऊन अचंबा वाटत आहे, दुसरे काही नाही; परंतु या सर्व विचारांपेक्षा विशेष महत्त्वाचा आणखी एक असा विचार आहे की, तू जो लोकांस त्याच्या दगलबाजपणाबद्दल किंवा कृतघ्नत्वाबद्दल दोष देत आहेस तो तूच आपले अंतर्याम तपासून पाहशील, तर तुला असे दिसून येईल की, अमुक एक मनुष्य आपले वचन पाळील असा भरवसा आपणास वाटला किंवा आपण जो परोपकार केला तो काही एक मोबदल्याची आशा न करता केला नाही किंवा ते परोपकाराचे कृत्य करण्यातच आपणास सर्व प्रकारे लाभ झाला असे मानले नाही, हा आपला मोठा दोष आहे. कारण एखाद्या मनुष्याचे त्वां हित केले असता त्यात तुला आणखी अपेक्षा ती कशाची असावी बरे? ही गोष्ट त्वां आपल्या निसर्गानुसार केली एवढ्यानेच तू तृप्त नाहीस का? त्याच्याबद्दल आणखी मोबदल्याची ती इच्छा कशास करावी? डोळ्यांनी पाहण्याचे किंवा पायांनी चालण्याचे काम केल्याबद्दल त्यांस कोणी इनाम दिले आहे काय? या अवयवांनी आपापली कामे करण्यातच जसे त्यास सुख आहे तसाच मनुष्यही परोपकाराची कृत्ये करण्यास निर्माण झाला आहे. तेव्हा त्याच्याकडून एखादे परोपकाराचे किंवा सार्वजनिक हिताचे कृत्य घडले असता त्याने आपल्या स्वभावानुरूप वर्तन केले असून, त्याचे फळ त्याला ते कृत्य करण्यातच प्राप्त झाले, असे समजावे.

संदर्भ :

१. नाही ठरत. समाजाच्या उलट बोलणे हे खोटे बोलणे होय. तेव्हा हे खोटे आहे असे ठाऊक नसता अर्थात हे खरे आहे असे समजून जर कोणी ते बोलला, तर त्याजकडे खोटे बोलण्याचा दोष येत नाही. अर्थात, तो अधार्मिक म्हणजे अनीतिमान नव्हे.

२. दुःख अनिष्टच असून, त्याचा अव्हेर करणे स्वाभाविक आहे. ते योग्य आहे. ते प्रत्येक शहाण्या मनुष्याचे कर्तव्य आहे. त्यात कसलाच दोष नाही.

३. वास्तविक पाहता तो आंधळाच खरा. त्याला न्यायान्याय काहीच दिसत नाही.

४. आत्मा देहाच्या बंधनातून सुटतो ही खोटी कल्पना आहे. तथापि, मरणाची भीती मनात सतत बाळगणे ठीक नव्हे. उलटे अशाने लवकर मरण येण्यास मात्र कारण होण्याचा संभव आहे. मरण टाळता येईल तितके टाळण्याकरिता आरोग्य रक्षणाचे सारे उपाय नित्य योजीत असून, सतत सदाचारात आपले आयुष्य घालवीत असावे. उगाच मृत्यूची वाट पाहत बसणे शहाणपणाचे नव्हे.

५. अग्नी जो वर जातो तो हवेपेक्षा हलका असल्याकारणाने होय. तो वर असलेल्या अग्नीतत्त्वास्तव नव्हे, हे आता कोणालाही सांगावयास नको.

६. यावरून आपल्या जातीत, समाजात वगैरे असलेल्या कोणत्याही अयोग्य व अनिष्टकारक रूढींचाही अंधपणे स्वीकार करून वागावे असे समजू नये, तर जगातील सकल जनांचा जो एक विस्तीर्ण समाज आहे त्यास अनुकूल असे आचरण-नित्याचरण असावे असा हेतू समजायचा. नाही तर वेश्यांचे, ठग लोकांचे वगैरे अनिष्ट प्रकारचे समाज व जाती आहेत. त्यांच्या स्थितीस अनुकूल असे वर्तन त्यातील व्यक्तींनी ठेवावे असे होईल; परंतु तसे मुळीच समजता कामा नये. समाजास भिऊन अनिष्ट प्रकारचे अवलंबन केल्यामुळे जगाचे आजदिन पावेतो अतोनात अकल्याण झाले आहे आणि जगाचे जे कल्याण म्हणून झाले आहे ते समाजातील गैरशिस्त चालीरीतीचा, समाजाचा व भोळेपणाचा परम सत्यशील अशा अनेक जनांनी मोठ्या धैर्याने धिक्कार करून सत्य वाटणाऱ्या प्रकारांचे अवलंबन केले त्यामुळे होय. अशी ही नीतिधैर्यशाली माणसेच मनुष्यमात्राची खरी कल्याण करणारी होत.

७. भुतांविषयीचा हा त्यांचा एक अत्यंत अज्ञानमूलक व भोळा समज होय.

८. हे किंचित गीतेतील तत्त्वज्ञानाप्रामणे भासते.

सारांश टीप : अविवेकी प्राण्यांच्या ठायीचे जीवतत्त्व समान असते; पण विवेकी प्राण्यांच्या ठायीचा ज्ञानतत्त्वयुक्त आत्माही समानच असतो. वस्तुजातामध्ये नित्य परिवर्तन होत असून तुझाही थोडा थोडा लय होत चालला आहे. बालपण, तारुण्य, वार्धक्य असे सारे क्रमशः आहे. यातून ते विराम पावले तरीही भिण्यासारखे काही नाही. थोडक्यात, जीवनाची कालबद्धता अधोरेखित केली आहे.

○○○

पुस्तक दहावे

१. हे माझ्या आत्म्या, तू निर्दोष, ऋजू, अविकारी, अपरिच्छिन्न होणार नाहीस काय? ज्या देहाचे तुज सभोवती वेष्टण आहे त्यातून तू मला विशेष प्रकट होणार नाहीस काय? प्रेम आणि समाधान या वृत्तीचा तुला कधीही अनुभव घडणार नाही काय? तुझी अगदी तृप्ती होऊन सर्व निवंतांपासून मुक्त तू कधीही होणार नाहीस काय? सुखोपभोगाची बळकट आशा धरून कोणत्याही सजीव किंवा निर्जीव वस्तूची अपेक्षा करण्याचे तू कधीही सोडून देणार नाहीस काय? आपणास दीर्घकाळपर्यंत सुखानुभव घडावा, आपले राहण्याचे ठिकाण विशेष प्रशस्त असावे, सुखकर हवा पुष्कळ काळपर्यंत चालावी, ज्या मंडळीच्या सहवासाने आपणास सुख होते तिचा समागम आपणास पुष्कळ काळपर्यंत व्हावा इत्यादी इच्छांचे दमन तू कधीही करणार नाहीस काय? आपल्या सांप्रतच्या स्थितीत तू समाधान मानून राहशील तर बरे नाही का होणार? तुला अवश्य तेवढे प्राप्त झाले असून, ते देवांपासून आल्यामुळे तुझ्या कल्याणाचे आणि विश्वाच्या परिपाकास आवश्यक असेच ते आहे असा तुझ्या बुद्धीचा पक्का निश्चय कधी होणार? हे विश्व परमात्मास्वरूप असून, न्यायी व सुंदर आहे. सर्व वस्तूंची उत्पत्ती आणि स्थिती त्याजपासून झाली आहे. ते सर्व वस्तूस आधार असून, त्यात समस्त वस्तूंचा समावेश होत आहे. या वस्तूचा विलयही त्याच्याच ठायी होऊन त्यापासून अन्य वस्तू निर्माण होतात. देव व मानव यांच्या समागमे राहून त्यास आपण कधीही दोष द्यावयाचा नाही किंवा त्यांच्या दृष्टीने आपण कधीही अपराधी ठरणार नाही, असा निर्धार तू कधी करणार?

२. तुझे नियमन केवळ निसर्गाकडून होत असल्याकारणाने तुझ्या निसर्गास कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे ते नीट पाहून त्या तू करू लाग. मात्र असे करताना आपण जिवंत प्राणी आहोत हे लक्षात ठेवून त्या स्थितीत अपाय होईल असे काही एक करू नको. जिवंत

प्राण्याच्या स्थितीस अनुरूप असा जो निसर्ग त्यास कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे ते पाहा. या गोष्टीत तू आपले मन घातल्यास चालेल. तथापि तुजसारख्या विवेकी प्राण्याच्या ठायी जो निसर्गविशेष आहे त्यास तेणेकरून काडीमात्रही धक्का पोहोचता कामा नये. येथे विवेकी प्राणी परस्परांच्या सहवासाने राहणारे आहेत, हेही त्वां ध्यानात ठेवून वागले पाहिजे. या आता सांगितलेल्या नियमांचे अवलंबन केले असता तुला दुसऱ्या कशाचीही पंचाईत करावयाला नको.

३. प्रत्येक गोष्ट जी घडत आहे ती अशी घडत आहे की, एक तर तू ती साहण्यास निसर्गतः समर्थ आहेस म्हणावयाचे, नाहीतर असमर्थ आहेस असे तरी म्हटले पाहिजे. जर तू ती साहण्यास समर्थ असलास, तर ती तू मुकाट्याने सहन कर. तिजविषयी कुरकुर करू नको; परंतु तू ती सोसण्यास असमर्थ असल्यास तिने तुझा अंत केल्यावर तीही लय पावेल. कोणतीही गोष्ट सहन करणे किंवा चालू देणे हे आपल्या हिताचे अथवा कर्तव्य आहे, असे मानून तिजविषयी प्रतिकूल मत न होऊ देण्याचे सामर्थ्य तुला असले म्हणजे निसर्गाने तुला ती गोष्ट सहन करण्यास लायक असे निर्माण केले आहे असे समजावे.

४. एखादा मनुष्य चुकला असता त्यास मोठ्या ममतेने बोध करून त्याची चुकी त्यास दाखवून द्यावी; परंतु असे करण्यास तू समर्थ नसल्यास त्याबद्दल स्वतःसच दोष दे, अगर स्वतःस तरी दोष देण्यात काय अर्थ आहे?

५. जे काही तुला घडत आहे ते सारे अगदी अनादिकालापासून तुला नेमून ठेवले आहे. तुझे अस्तित्व आणि तुला प्राप्त होणारी एकंदर स्थिती यांचा उद्भव अनादिकालापासून चालत आलेल्या कार्यकारण परंपरेने झाला आहे (प. ३.क. ११: प. ४.क. २६).

६. हे विश्व यदृच्छेने परमाणुसंघ होऊन बनलेले असो, अगर निसर्गसिद्ध व्यवस्थेने झालेले असो. इतके पाहिल्याने निश्चितपणे समजले पाहिजे की, निसर्गाकडून ज्याचे नियमन होत आहे अशा या अखिल विश्वाचा मी एक अंश आहे. दुसरे असे की, जे त्याचे दुसरे अंश मजसमान आहेत, त्यांशी माझा निकट संबंध आहे. या संपूर्ण विश्वाचा मी अंशभूत असल्याकारणाने त्यातूनच जे मला प्राप्त होत आहे त्याने मी असमाधान पावू नये. कारण जे समग्र विश्वाच्या हितासाठी असते ते त्याच्या एका अंशास अपकारक कसे होईल? आणखी असे, की विश्वाला जेणेकरून अपाय होईल असे काही एक त्यात नसावयाचे. निरनिराळ्या निसर्गामध्ये हे सर्वसाधारण तत्त्व प्रधानत्वे करून वसत असते आणि विश्वाच्या निसर्गात आणखी एक असे तत्त्व असते की, कोणत्याही बाह्य कारणामुळे त्याच्या ठायी त्यास अपायकारक असे काही उत्पन्न होत नाही. तेव्हा अशा या विश्वाचा मी अंश आहे. असे ध्यानात वागविल्यास जे काही घडेल त्यात मी संतुष्ट राहीन आणि ज्या सजातीय अंशाशी माझा निकट संबंध आहे त्याजशी मी कोणत्याही प्रकारचे दुर्वर्तन करणार नाही, तर माझ्या स्वभावात अनुरूप अशा गोष्टींकडे लक्ष देऊन सार्वजनिक हितास सर्व प्रकारे झटेन.

याप्रमाणे वर्तन ठेवल्यास आपले आयुष्य सुखाने जाईल. उदाहरणार्थ, जो मनुष्य आपल्या देशबांधवांच्या हितासाठी रात्रंदिवस झटत असून, त्यास त्याजकडून जो काही मोबदला प्राप्त होईल त्यात खुश राहतो त्या मनुष्याचे आयुष्य सुखात जाते.

७. विश्वांतर्गत सकल वस्तूंचा विनाश अवश्य व्हावयाचा; परंतु हा वस्तूंचा विनाश म्हटला म्हणजे त्या अभावाप्रत पावतात असा अर्थ समजू नये, तर त्यांचे जे रूपांतर होते त्यासच येथे विनाश म्हटले आहे, हे ध्यानात ठेवावे. आता हा जो विश्वाच्या निरनिराळ्या अंशांत अनेक प्रकारे फेरफार होत चालला आहे, तो जर निसर्गत: अनिष्ट असता तर विश्व अशा सुस्थितीत आज असते ना. येथे प्रश्न असा आहे की, निसर्गाच्या निरनिराळ्या अंशास दुःस्थिती जी प्राप्त झाली आहे ती एकतर निसर्गाच्या योजनेप्रमाणेच आहे किंवा ती तिला नकळत घडत आहे? वास्तविक पाहता या दोन्ही कल्पना खऱ्या नव्हेत. या कल्पनांमध्ये निसर्ग या पदाचा अर्थ जो सर्व समर्थशक्ती असा आहे तो एकीकडे ठेवून त्याचा स्वभाव असा अर्थ घेतला तरीसुद्धा त्यात दोष आहे. कारण असे पाहा की, या सर्व वस्तू स्वाभाविक आहेत, असे मानून विश्वाच्या एकंदर अंशांत अवश्य फेरफार झाला पाहिजे असे तर म्हणावयाचे आणि तो झाला असता विस्मित किंवा खिन्न व्हावयाचे, हे हास्यास्पद होय. हा विस्मय व खेद जेव्हा एका वस्तूचा विलय होऊन तिस दुसरे रूप प्राप्त होते तेव्हा विशेषतः दृष्टोत्पत्तीस येतो. लोकांना असे वाटतेसे दिसते की, हे सारे स्वभावाविरुद्ध आहे. वास्तविक पाहता या अशा वस्तूंच्या विनाशप्रसंगी एकतर त्या ज्या तत्त्वांच्या बनलेल्या असतात ती एकमेकांपासून अलग होतात, नाही तर त्यांचा जडांश पृथ्वी तत्त्वाप्रत पावतो आणि वायूरूप अंश वायू तत्त्वास जाऊन मिळतो आणि पुढे कालांतराने या महातत्त्वांचाही प्रलय सर्वसाक्षी ज्ञानतत्त्वामध्ये होतो. हे ज्ञानतत्त्व कल्पानुकल्प प्रलयाग्नीने भस्मसात होत असते किंवा अनादीसिद्ध परिवर्तनानुसार पुन: पूर्वस्वरूप पावते. तुझ्या ठायीचा जडांश आणि चिदांश हे तुजला जन्मकाळापासनच प्राप्त झाले आहेत असे मान नको. कारण ही जी तुझ्या अंशात भर पडली आहे ती अन्न आणि हवा यांचे जे तुजकडून कालपरवा सेवन घडले आहे त्यामुळे होय. अशा प्रकारे ज्या अंशांत भर पडत आहे त्याचाच फक्त पालट होत आहे. तुझ्या आईच्या उदरातून जो वास्तविक अंश आला आहे त्यात मुळीच भर पडत नाही किंवा तो पालटतही नाही, परंतु या तुझ्या निर्विकार अंशाचा विकारवश अंशाशी अत्यंत निकट संबंध आहे, असे म्हणण्याचा काही एक प्रत्यवाय नाही.

८. सौजन्य, विनय, सत्यशीलता, विवेक, समवृत्तिता, महामनस्क इत्यादी सद्गुणांचा उद्भव तुझ्या ठायी एक वेळ झाला असता त्यांत सत्त्वपालट होऊ देऊ नको आणि कधी पालट झालाच तर तो लवकर नाहीसा करून पूर्वस्थिती पाव. विवेक या पदाचा अर्थ निरनिराळ्या गोष्टींकडे तारतम्य दृष्टीने पाहणे व कोणत्याही विषयी गाफीलपणा नसणे, असा आहे. समवृत्तिता म्हणजे सार्वत्रिक निसर्गाने नेमून दिलेल्या गोष्टींचा मनापासून स्वीकार

करणे होय. देहादि मनस्कता म्हणजे देहास घडणारा सुख-दुःखानुभव, कीर्ती, मृत्यू आदी गोष्टींमुळे बुद्धीस व्यामोह होऊ न देणे होय, हे सद्गुण अंगी नाही त्याजबद्दल लोकांत आपली वाखाणणी होण्याची अपेक्षा केल्या नाहीस, तर तुझ्या स्थितीत पालट होऊन तुझा जीवनक्रम अंशाशी बदलेल; परंतु आजपर्यंत जी तुझ्या मनाची स्थिती आहे त्यामध्ये रखडत राहून भ्रष्ट व त्रस्त होऊन जाणे हे काम साधारण मनुष्याचे होय. आणखी यावरून असे दिसते की, तुला या जीविताची अतिशयित प्रीती आहे. हे काही हिताचे नव्हे, तर वर सांगितलेले सद्गुण आपल्या ठायी कायम राख; परंतु या गुणांचा तुझ्या ठायी ऱ्हास होण्याचा संभव दिसल्यास ते जेथे गेल्याने राखता येतील अशा एखाद्या एकांतस्थळी बेलाशक जा किंवा वाटल्यास देहत्यागही करावयास चुकू नको. मात्र असे करताना क्रोधद्वेषादी असद्वृत्तीचे प्रदर्शन करू नको, तर आर्जव, स्वातंत्र्य आणि विनय हीच शेवटपर्यंत दाखीव. सद्गुणांचाच तुझ्या अंगी चांगला विकास व्हावयाकरिता नित्य देवाचे स्मरण कर. देव स्तुतिप्रिय नाहीत. विवेकी प्राण्यांनी आपणांसारखे व्हावे अशीच त्यांची इच्छा आहे. आणखी असा विचार कर की, ज्याप्रमाणे अंजिराच्या वृक्षाचे काम जो वृक्ष करील त्यासच अंजिराचा वृक्ष म्हणतात किंवा मधमाशांचे काम जे करतील त्यासच मधमाशा म्हणतात. त्याचप्रमाणे मनुष्याचे जो करील त्यास मनुष्य म्हणावयाचे.

९. तमाशांची आणि युद्धप्रसंगांची आवड असणे, कोणत्याही अन्य गोष्टीने भयचकित होऊन जाणे, कसल्याही प्रकारच्या उद्योगाचा कंटाळा असणे, आपल्याहून वरचढ असतील त्याजशी दास वृत्तीने वर्तन करणे इत्यादी गोष्टींमुळे तुझ्या ठायीच्या सद्वृत्तींचा नित्य लोप होत आहे. निसर्गाचा अभ्यास केल्यावाचून किती गोष्टी तू कल्पनेच्या बळावर खऱ्या मानीत आहेस? आणि किती गोष्टींची तरी तुजकडून हेळसांड होत आहे? तुझे वास्तविक कर्तव्य पाहत असता त्वां प्रत्येक गोष्ट अशा दृष्टीने पाहावी व करावी की, प्राप्त होणाऱ्या हर एक गोष्टींच्या संबंधाने आपले जे योग्य असे वर्तन असावयास पाहिजे त्याचा तुझ्या ठायी विकास होऊन अंशाने वा पूर्ण उपयोग व्हावा आणि प्रत्येक वस्तूच्या वास्तव ज्ञानाने प्राप्त होणारी ती प्रगल्भता ती अंगी कायम राहावी. मात्र या ज्ञानाचा वृथा डौल मिरवू नये. तुझ्या ठायी आर्जव, गांभीर्य आणि प्रत्येक वस्तूच्या वास्तविक स्वरूपाचे ज्ञान होणार तरी कधी? वस्तूंचे वास्तविक स्वरूप जाणावयाचे म्हणजे तिची प्रकृती काय आहे, तिचा समग्र विश्वाशी संबंध कोणता आहे, तिची आयुर्मर्यादा किती आहे, तिचे घटकावयव काय आहेत, ती कोणाला मिळू शकते, ती देण्याचे किंवा हरण करण्याचे सामर्थ्य कोणास आहे इत्यादी गोष्टी जाणणे होय.

१०. कोळ्यास माशी सापडली असता तो आपणास धन्य समजतो. दुसरा एखादा प्राणी ससा सापडला असता हर्ष मानतो. धीवरास जाळ्यात मासे सापडले असता आनंद वाटतो. व्याधास रानडुकरांची पारध करावयास सापडली असता समाधान वाटते. कित्येकास

अस्वले पकडावयास मिळाली असता संतोष वाटतो. माझ्यासारख्यास तर एखादे राष्ट्र पादाक्रांत केल्याने धन्यता वाटते; परंतु हे सारे परस्वापहार करणारे चोर नव्हेत काय? अर्थात् ते तसेच होत.

११. सकल वस्तूंचा पालट होऊन त्यास भिन्न भिन्न रूपे कसकशी प्राप्त होत असतात याचे नीट मननपूर्वक अवलोकन करण्याची सवय कर. हा विचार नेहमी आपल्या चित्तापुढे ठेव. तत्त्वज्ञानाचा हा जो सृष्टिशास्त्रविषयक भाग त्याचा तू अभ्यास कर. कारण या अभ्यासासारखे मनात उत्पन्न होणारे दुसरे काहीही नाही. असा मनुष्य शारीरिक भोगांची किंचितही पर्वा करीत नाही. तर हा सर्व ऐहिक पसारा सोडून आपणास केव्हा जावे लागेल याचा नेम नाही, असे मनात वागवून तो आपल्या प्रत्येक कृत्यात पूर्ण न्यायाने वर्ततो आणि जे जे काही त्यास घडेल त्याचा सर्व भार तो विश्वाच्या निसर्गावर टाकतो. लोक आपणास काय म्हणतील याची तो मुळीच पर्वा करीत नाही, तर न्यायाने वर्तावे व प्राप्त स्थितीत तृप्त राहावे यातच त्यास समाधान वाटते. चित्तास व्यग्र व गुंग करून टाकणारे असे कोणतेही उद्योग तो करीत नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणे आपले वर्तन एकसारखे ठेवून देवाची आज्ञा मानण्यापलीकडे त्यास कशाचीही अपेक्षा नसते.

१२. आपले कर्तव्य काय आहे हे तुला समजून घेण्याचे सामर्थ्य असता तू व्यर्थ साशंक होऊन गांगरून का जावे? आणि जर तुला सन्मार्ग नीट दिसत आहे, तर त्याचे अवलंबून संतोषाने करावे. त्यापासून कदापि पराङ्मुख होऊ नये; परंतु हा मार्ग तुला साफ दिसत नसल्यास जरा थांब आणि कोणा चांगल्या जाणत्या माणसाकडे पुरा तपास कर; परंतु असली कोणतीही हरकत नसता दुसऱ्याच कोणत्या तरी गोष्टीचा जर तुला प्रत्यवाय घडत असला, तर आपल्या शक्तीप्रमाणे योग्य विचार करून वाग म्हणजे झाले. मात्र जेवढे न्याय्य दिसेल तेवढेच करीत जा. कारण आपला इष्ट उद्देश जो सन्मार्गानुवर्तनाचा तो सिद्धीस नेण्यास उत्तम उपाय दुसरा नाही. आता योग्य प्रयत्न करूनही हा उद्देश सिद्ध न झाला तर काही चिंता नाही. जो सर्व गोष्टीत विवेकाने वागतो तो शांत राहून उत्साही असतो व त्याचे मन आनंदयुक्त आणि स्थिर राहते.

१३. तू निजून उठल्याबरोबर आपल्याशी असा विचार कर की, दुसऱ्या मनुष्याने कोणतेही न्याय्य व रास्त कृत्य केले असता त्यापासून आपणास काय हरकत होणार आहे? काही एक होणार नाही (पु. ६, क. ३२, पु. ८, क. ५५).

जे दुसऱ्याची वाहवा किंवा निंदा मोठ्या डौलाने करतात त्यांची स्वत:ची चालचलणूक, आचारविचार व आवडनिवड ही कशी काय असतात हे तुझ्या ध्यानात आहेच. या अशा लोकांकडून परस्वापहारही होतो असे म्हटले असता चालेल. आत हा अपहार त्याजकडून हस्तपादादी बाह्येंद्रियांच्या योगाने झाला नाही तरी मनाने होतो. या चिदांशाची योग्यता वास्तविक अशी आहे की, त्यात निष्कपटत्व, विनय, सत्यशीलता, निसर्ग, नियमानुवर्तन, सौख्य इत्यादिकांचा उगम आहे (पु. ७, क. १७).

१४. जो अभिज्ञ आणि विनीत असतो तो आपणास जे जे काही प्राप्त होत आहे किंवा आपणाकडून जात आहे त्यास सर्वांस निसर्ग कारण आहे असे जाणून त्याच्या इच्छेवर सर्वस्वी अवलंबून राहतो; आणि या त्याच्या वृत्तीबद्दल त्यास मुळीच गर्व वाटत नाही, तर ती तो मोठ्या मिनतवारीने व संतोषाने धारण करतो.

१५. तुझे आयुष्य अगदी थोडे उरले आहे, तर ते आता एखाद्या गिरिकुहरात असल्याप्रमाणे काढ. कारण मनुष्य कोठेही राहत असला तरी सारखाच. इतके मात्र त्याने लक्षात ठेवावे की, आपण या जगातला रहिवासी असून, समाजस्थितीत राहणारा प्राणी आहे. खऱ्या मनुष्यास निसर्गाप्रमाणे कसे राहता येते ते त्याने लोकांस स्वाचरणाने दाखवावे. असल्या मनुष्याचा त्यास त्रास झाल्यास ते त्याचा हवा तर प्राणही घेवोत. कारण त्यांच्याप्रमाणे वागण्यापेक्षा प्राणनाश झालेला पुरवला.

१६. सदाचरणी मनुष्याचे लक्षण असे असावे, तसे असावे असे इतःपर फक्त बोलत न राहता तशा प्रकारे स्वतःचे आचरण ठेव.

१७. काल आणि विश्वप्रकृती ही किती विशाल आहेत याचे सतत चिंतन कर आणि एक एक वस्तू विश्वप्रकृतीशी लावून पाहता ती केवळ अंजिराच्या अत्यंत सूक्ष्म कणासारखी आहे आणि तिची आयुर्मर्यादा एकंदर काळाशी ताडून पाहता निमिषवत आहे, असे ध्यानात आण.

१८. तू नीट विचार करून पाहशील तर तुला असे दिसेल की, प्रत्येक अस्तित्वात असलेली वस्तू हळूहळू विलय आणि रूपांतर पावत आहे, ती क्रमाक्रमाने कुजून सडून नाहीशी होणार आहे. ती स्वभावतःच नश्वर आहे.

१९. आहार, निद्रा, प्रजोत्पादन इत्यादी कर्मात मनुष्य कसा वर्ततो त्याचे अवलोकन कर. त्याचप्रमाणे जे आपल्या उच्चपदास्तव गर्व, दिमाख, क्रोध, निर्भर्त्सना इत्यादिकांचे प्रदर्शन करतात त्यांची दृष्टी कशी काय आहे ती पाहा. हे असे लोक थोड्याच काळापूर्वी कोणत्या हेतूने किती जणांचे अगदी गुलाम होऊन गेले होते त्याजकडे दृष्टी दे आणि काही वेळाने यांची काय दशा होऊन जाईल याचाही विचार कर.

२०. जे जे निसर्गानुसार हर एक व्यक्तीस प्राप्त होत आहे ते तिच्या कल्याणासाठीच आहे आणि ज्या काळी ते प्राप्त होत आहे तो काळही अगदी योग्यच आहे असे समजावे.

२१. एक कवी असे म्हणतो की, पृथ्वी पावसावर प्रीती करते आणि आकाशाची पृथ्वीवर प्रीती आहे, तसेच ते विश्व सर्व काही घडणाऱ्या गोष्टी करण्यात आनंद मानते. यास्तव मी विश्वास असे म्हणतो की, जे तुला प्रिय तेच मलाही प्रिय.

२२. तू या भूलोकी जीवमान आहेस त्यापक्षी तुला येथल्या स्थितीची सवयच झाली आहे म्हणावयाचे; परंतु तू येथून जाऊ लागलास तर त्यातही काही वावगे झाले नाही, अशी तुझी इच्छाच होती. तू अगदी आसन्नमरण झाला असताही काही हरकत नाही. कारण तू आपले कर्तव्य करून चुकला आहेस, यास्तव सदा आनंदवृत्ती राहा.

२३. हे तू स्पष्टपणे उमज की, हा भूभाग इतरांसारखाच आहे आणि पर्वतांच्या शिखरावर किंवा समुद्राच्या तीरावर किंवा दुसऱ्या कोठेही तू राहण्याचे मनात आणलेस तरी तेथल्यासारखीच तेथेही स्थिती असावयाची. कारण प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे तू तटबंदी शहरात राहत असलास काय किंवा पर्वत शिखरावर धनगराच्या वाड्यात राहत असलास काय सारखेच..

२४. माझी नियामक शक्ती कशी काय आहे? माझ्या हल्लीच्या आचरणाने तिला कोणते स्वरूप प्राप्त होईल? तिचा मी सांप्रत कोणत्या गोष्टीकडे उपयोग करीत आहे? ती विवेकहीन झाली आहे काय? ती समाजस्थितीस नालायक झाली आहे काय? ती देहाशी तादात्म्य पावून देहाचे व्यापार तेच तिचे व्यापार होऊन चुकले आहेत काय?

२५. जो आपल्या धन्याशी दंगा करून पळून जातो त्यास पळपुट्या म्हणतात. सृष्टीनियम हा आपला धनी आहे, तेव्हा त्याचे जो उल्लंघन करतो त्यासही पळपुट्याच म्हणावयाचे. आता जो सर्व वस्तुजाताचे नियमन करतो आणि जो प्रत्यक्ष मनुष्यास त्याच्या योग्यतेप्रमाणे स्थिती नेमून देतो त्या जगन्नियत्याच्या व्यवस्थेसंबंधाने असंतोष, खेद, क्रोध किंवा भीती ज्यास वाटत असेल त्याच्याकडून हा सृष्टी नियमोल्लंघनाचा दोष घडतो आणि म्हणूनच अशा मनुष्यास पळपुट्या म्हणावे.

२६. मातेच्या गर्भाशयात जाऊन स्थिर झालेला बिंदू किती सूक्ष्म असतो? पण त्यावर पुढे क्रमाक्रमाने अनेक संस्कार होऊन त्याचे कालांतराने किती सुंदर बालक होते बरे! त्याचप्रमाणे पुढे जगात आल्यावर या बालकाच्या मुखावाटे पोटात उतरणाऱ्या हर एक प्रकारच्या अन्नावर किती चमत्कारिक परिणाम होतो तो पाहा. या अन्नाच्या योगाने त्याच्या ठायी सर्व ज्ञानेंद्रियांचा व कर्मेंद्रियांचा हळूहळू विकास होत जाऊन त्याचे जीवन व परिपोषण होते. हा तरी काय लहानसान चमत्कार! अशा गुप्त रीतीने उत्पन्न होणाऱ्या वस्तूचेही तू सूक्ष्म अवलोकन कर. वस्तूच्या बाह्य व्यापारात निसर्गाचे सामर्थ्य दृष्टीस पडते, तसेच ते या गूढ व्यापारातही दिसून येते. आता एवढे खरे की, हे दुसऱ्या प्रकारचे सामर्थ्य चर्मचक्षूस विषय होणारे नव्हे, तरी त्याचा अनुभव स्पष्टपणे येण्यास हरकत नसते.

२७. जी वस्तुस्थिती गतकाली होती तशीच ती विद्यमानकाली आहे आणि पुढल्या काळीही तशीच राहील, या सिद्धांताचे तू सतत मनन कर. तुझ्या स्वतःच्या अनुभवाने व इतिहासावलोकनाने जे ज्ञान तुला प्राप्त झाले आहे ते तू आपल्या डोळ्यांपुढे आणशील तर एकाच प्रकारच्या रंगभूमीवर एकाच प्रकारची नाटके आजपर्यंत होत आली आहेत असे तुला खास वाटेल. **हेड्रिअन, अन्टोनिनस, फिलिप, अलेक्झांडर** अशा मोठमोठ्या बादशहांचे दरबार हे केवळ प्रत्येकी नाटकप्रयोगच झाले म्हणावयाचे आणि हल्लीही तसेच होत आहेत. भेद इतकाच की, या प्रत्येक नाटक प्रयोगात निरनिराळ्या भूमिका घेऊन अभिनय करणारी पात्रे मात्र निराळी होती.

२८. जो मनुष्य कोणत्याही गोष्टीमुळेच दुःखी किंवा असमाधान होतो तो बळी देऊ काढलेला डुक्कर जसा लाथा झाडतो व केकावतो तसाच समजावा.

जो मनुष्य आपणास प्राप्त झालेल्या बंधनाविषयी स्वस्थ बिछान्यावर पडून शोक करतो त्यासही या डुकराचीच उपमा साजेल. तू असे ध्यानात ठेव की, प्राप्त स्थितीचा खुशीने स्वीकार करण्याचे सामर्थ्य फक्त विवेकी प्राण्यासच आहे.

२९. ज्या कोणत्याही ऐहिक हेतूच्या सिद्धीत तू गुंतला असशील त्याचे स्वरूप नीट ध्यानात आणून त्वा आपणाशी असा प्रश्न करावा की, मृत्यू जो आपणाला इतका भयंकर वाटत आहे तो या अशा हेतूच्या सिद्धीस आपण मुकू म्हणूनच काय?

३०. एखाद्या माणसाचा दोष पाहून तुला राग आला असल्यास लागलीच स्वतःचे आचरण तपासून पाहा आणि आपणाकडूनही अशाच चुका वारंवार कशा घडत असतात याचा विचार कर. उदाहरणार्थ द्रव्यलोभ, सुखेच्छा किंवा लौकिकप्राप्ती ही जशी त्याच्या ठायी असतात तशीच ती आपल्याही ठायी असतात. हा विचार तुझ्या चित्तात आल्याने तुझा राग नाहीसा होईल. आणखी असे पाहा की, त्याची ही अशी सदोषवृत्ती होणे त्याच्या मुळीच स्वाधीनचे नाही. अशा अस्वाधीन गोष्टीस तुझा काही इलाज चालत असल्यास करून पाहा; परंतु येथे मनुष्य प्रयत्न केवळ व्यर्थ होय.[१]

३१. आजपर्यंत जे मोठमोठे पुरुष होऊन गेले त्यांची वाट काय झाली बरे? ते बरे कोठे आहेत? एकतर ते कोठेही नाहीत किंवा ते कोठे गेले ते आपणास माहीत नाही. तेव्हा हा मानव संसार केवळ आभासवत आहे, असे सतत चित्तांत वागीव. आणखी असा विचार कर की, जे एक वेळ रूपांतर पावले ते अनंत काळपर्यंत अस्तित्वात राहणे नाही; परंतु तुझे जीवित तर किती अल्प आहे बरे? तर मग अत्यल्प आयुष्य त्वां का बरे व्यवस्थितपणे क्रमू नये? किती सुधारणेचे चांगले प्रसंग आणि गोष्टी तुजकडून टळत आहेत बरे? संसारात घडणाऱ्या सर्व गोष्टीत विवेकाचा उपयोग करता येण्यासारखा असतो. मात्र, या विवेकाकडून त्या गोष्टीचे नीट परीक्षण व स्वरूपनिर्णयही झाली पाहिजेत. हा क्रम तू त्या गोष्टी आपल्याशा होईपर्यंत एकसारखा चालीव. कसा तर आपल्या पक्वाशयाचा किंवा प्रज्वलित अग्नीचा व्यापार चालतो तसा. आपल्या पक्वाशयाची शक्ती वाढली असती म्हणजे त्यात गेलेला कोणताही पदार्थ पचतो. त्याचप्रमाणे प्रज्वलित झालेल्या अग्नीमध्ये काहीही टाकले तरी त्यास तो जाळून खाक करतो. अशीच स्थिती आपल्या विवेकाचीही झाली पाहिजे.

३२. तू साधा नाहीस किंवा सद्गुणी नाहीस असे म्हणण्यास त् कोणाला कधीही अवकाश देऊ नको. असा कोणाचा तुजविषयी समज झाल्यास तो चुकीचा आहे असे आपल्या आचरणाने दाखवून दे, असे करणे तुझ्या स्वाधीनचे आहे. कारण तुला सद्गुणी किंवा साधा होण्यास व्यत्यय करण्याची कोणालाही ताकद नाही. आपली अशी वृत्ती झाली तरच जिवंत राहावयाचे, नाही तर प्राणत्याग करावयाचा, असा दृढनिश्चय कर. कारण विवेकदृष्टीने पाहता तुझ्या ठायी अशी वृत्ती न उद्भवल्यास तू जिवंत राहण्यास लायकच नव्हेस.

३३. विवेकास जे अत्यंत अनुरूप असेल तेच तू करीत किंवा बोलत जा. असे करणे तुझ्या हातातले आहे. यास्तव दुसऱ्या कशाचा प्रत्यवाय घडल्याची व्यर्थ सबब सांगू नको. सुखोपभोगाचा नाद असलेल्या माणसास जशी एखादी ऐषआरामीची चीज सुखावह वाटते, तद्वतच हर एक बाबतीत आपल्या स्वभावानुरूप वागणे तुला वाटावे. कोठेही असलास तरी असे वागणे तुझ्या हातचे आहे. कोणत्याही निर्जीव किंवा विवेकरहित सजीव वस्तूस वाटेल तिकडे हिंडण्या-फिरण्याची मुळीच शक्ती नाही. कारण त्यांच्या व्यापारांना अवरोध करणाऱ्या पुष्कळ गोष्टी असतात; परंतु ज्ञान आणि विवेक यांची गोष्ट अशी नाही. ती प्रत्येक प्रतिबंधनातून सहज पार पडतात. त्यांच्या इच्छेस किंवा नैसर्गिक व्यापारास कशाचाही व्यत्यय येत नाही. अशी अग्नीची ज्वाळा जशी वरतीच जात असते किंवा वर फेकलेला दगड नियमाने खालीच पडतो तशीच गत विवेकाची आहे. त्यास कशाचीही हरकत होणे नाही, हे तत्त्व नेहमी डोळ्यापुढे ठेव. उगीच भ्रमजालात पडू नको. सर्व काही उपाधीची बाधा केवळ जड देहासच होते, दुसऱ्या कशासही होत नाही, आणि जी काही झालीशी वाटते ती केवळ आपल्या भासमय कल्पनांमुळे किंवा विवेकभ्रष्ट झाल्यामुळे. कारण असे आहे की, ज्यास ही बाधा घडावयाची त्यास काहीतरी विकृती उत्पन्न झालीच पाहिजे. काही विशेष प्रकृतीच्या वस्तूला कोणतीही बाधा झाली असता तेणेकरून त्या वस्तू बिघडतात; परंतु मनुष्याची गोष्ट मात्र तशी नाही. त्यास घडणाऱ्या अपकारक गोष्टींनी तो विशेष चांगला व स्तुत्यर्ह होतो. आणखी असे ध्यानात ठेव की, जे समाजास अपायकारक नसते तेणेकरून त्या समाजातील एका व्यक्तीसही निःसंशय अपाय घडावयाचा नाही. या व्यक्तीच्या अंगी खरे जानपदधर्म मात्र असले पाहिजेत. त्याचप्रमाणे नैसर्गिक व्यवस्था ज्या गोष्टीमुळे बिघडत नाही ती समाजासही अहितकर नव्हे. यावरून हे स्पष्ट झाले की, जेणेकरून निसर्गव्यवस्थेत हरकत घडत नाही ते एकंदर समाजास किंवा त्यातील एखाद्या व्यक्तीला अपायकारक होत नाही.

३४. ज्याच्या मनावर सत्यसिद्धांत चांगले ठसलेले असतात त्यास अत्यंत संक्षिप्त बोधवचनही पुरते. त्याचप्रमाणे सामान्य प्रचारातल्या एखाद्या वचनाच्या श्रवणानेही आपण खेद आणि भय यापासून मुक्त असले पाहिजे असे त्यास स्मरते. उदाहरणार्थ हे पढील होमरचे एक वचन पाहा. तो म्हणतो, 'वृक्षांच्या काही पल्लवांना वायू जसा भूमीवर इतस्ततः प्रसृत करतो, तद्वत् मनुष्य जातीचेही आहे.' म्हणजे अर्थात् कोणती मनुष्ये कोठे जन्मतील याचा काही नेम नाही. तुम्हास झालेली मुलेही या वृक्षपल्लवांसारखीच आहेत आणि जे आपण मानास पात्र आहो असे म्हणतात, जे दुसऱ्याची वाखाणणी करतात किंवा जे लोकांना उघड उघड शिव्याशाप देतात, जे गुप्तपणे दुसऱ्यास दोष देतात किंवा त्यांची अवहेलना करतात, ते सारे या पल्लवांसारखेच होत. त्याचप्रमाणे ज्याच्यामुळे एखाद्याची कीर्ती चोहोकडे पसरते किंवा त्याच्या पश्चात् राहते त्यांचीही स्थिती या पल्लवांसारखीच आहे. वसंत ऋतूमध्ये

वृक्षाला फुटलेली पालवी कालांतराने जून झाल्यावर वाऱ्यामुळे गळून पडते आणि तिच्या जागी पुनः दुसरी पालवी येते, अशीच गत सर्व वस्तूंची आहे. अल्पायुपणा हा सर्वास लागलेलाच आहे; परंतु तू जो कोणत्याही वस्तूचा अव्हेर किंवा पाठलाग करतोस त्यावरून असे भासते की, तू त्या अनंत कालावधीपर्यंत राहणाऱ्या आहेत असे मानतोस. तू केव्हा डोळे झाकशील याचा नेम नाही आणि जे तुला पुरून येतील त्याजविषयीही दुसऱ्यास लवकरच शोक करावा लागेल.

३५. ज्याची दृष्टी शाबूत असते त्याला वस्तू जशा आहेत तशा दिसावयाच्या. त्या आपणास हिरव्या दिसाव्या असे इच्छिणे योग्य नव्हे. कारण हे विकृत चक्षूशिवाय घडणे नाही. अशीच गोष्ट श्रोत्रघ्राणादी इतर इंद्रियांचीही आहे. त्याचे वास्तविक जे जे विषय आहेत, त्याचे त्यास ज्ञान झाले म्हणजे पुरे. त्याचप्रमाणे दाणे दळण्याच्या उद्देशाने केलेल्या चक्कीमध्ये घातलेले धान्य जसे भराभर दळून बाहेर पडते तशीच निरोगी पक्वाशयात गेलेल्या अन्नाचीही गत झाली पाहिजे. आता विकारविरहित ज्ञानतत्त्वही प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीचा स्वीकार करण्यास असे तत्पर असले पाहिजे; परंतु जो म्हणतो की, माझे मूल जगू द्या किंवा मी काहीही केले तरी माझी सर्व लोकांत कीर्ती होऊ द्या, त्याची गत वर सांगितलेल्या रुग्ण चक्षूसारखी झाली आहे असे समजावे.

३६. कोणी मनुष्य मेला असता त्याजबद्दल जसा कित्येकास शोक होतो, तसाच कित्येकास आनंदही होतो. ज्याच्या मरणाने कोणासही आनंद होणार नाही, असा भाग्यशाली मनुष्य विरळा. अशी कल्पना कर की, मरणारा मनुष्य मोठा नीतिमान व ज्ञानी होता, तर त्याच्या संबंधाने असे कोणीतरी म्हणणारा निघेल की, 'हा मेला बरे झाले, आमच्या पाठीची एक पीडा टळली. तो आमच्याशी कडकपणाने वागत नसे, तरी त्याचा धाक आम्हास फार होता.' ही झाली सज्जन पुरुषाची गोष्ट; पण आम्ही तर इतके दोषांनी भरलो आहोत की, आमच्या त्रासातून सुटण्यास किती लोक सदा इच्छित असतील बरे? तेव्हा तू देहांतसमयी हा विचार मनात आणून विशेष संतोषाने मरण्यास तयार हो. आणखी असे लक्षात आण की, या जीवितामध्ये ज्या माझ्या मित्रांच्या कल्याणासाठी मी इतका झटलो त्यास मी केव्हा मरेन असे झाले आहे. कारण माझ्या मृत्यूमुळे त्यास काहीतरी फायदा होण्याची थोडी-बहुत आशा असते. यास्तव अशा या स्थितीमध्ये आणखी जिवंत राहण्याची अपेक्षा त्वा का करावी बरे? असे आहे तरी त्यांच्यावर तू रुष्ट होऊन देहत्याग करू नको, तर आपला स्वभाव कायम राखून सर्वांशी शेवटपर्यंत मित्रभावाने व परोपकार बुद्धीने वर्तावे. जसा देहांताच्या वेळी तुझ्या कुडीतला प्राण कोणालाही न समजता सहज निघून जातो, तद्वतच तू या लोकांतून निघून जावे. कारण तुझा त्यांचा संबंध व सहवास निसर्गाकडून झाला असून, तोच तुझी त्यांची तुटातूट करीत आहे. यास्तव आपल्या नातलगाचा व आपला जसा काही कारणामुळे वियोग व्हावा तसा हा एक वियोगच आहे असे समजून त्यास तयार हो. हा आपल्यावर मोठा जुलूम होत आहे असे दर्शवू नको.

३७ कोणा मनष्याकडन एखादी गोष्ट घडत असता ती तो कोणत्या उद्देशाने करीत आहे. याचा आपल्याशीच विचार कर; परंतु असे काही करण्यापूर्वी स्वतःचेच चित्त कसे काय आहे ते आधी पाहा.

३८. ज्याच्या योगेकरून मनुष्याचे सर्व व्यापार चालत आहेत ती शक्ती अंतर्यामी गुप्त आहे. सर्व मनोव्यापाराचा उगम या शक्तीत आहे. ही केवळ जीवनरूप आहे. हिलाच मनुष्य म्हटल्यास चालेल. स्वतःविषयी चिंतन करताना तुला जे हे देहाचे वेष्टण आहे त्याचा आणि त्याला लागून असणाऱ्या इंद्रियांचा विचार एकीकडे ठेव. ही देहाची इंद्रिये तर कुऱ्हाडीसारखी आहेत. भेद इतकाच की, ती देहास लागून आहेत. त्यास कोणीतरी प्रेरक असल्यावाचून त्याचे व्यापार चालत नाहीत व एरव्ही त्यांचा काही उपयोगही नाही. उदाहरणार्थ, कोष्ट्याचे धोटे, कारकुनाची लेखणी, गाडीवानाचा चाबूक ही स्वत: काही करीत नाहीत व त्यांच्या योजकावाचून ती अगदी निरुपयोगी होत. या वस्तूंत आणि देहाच्या इंद्रियात काही एक म्हणण्यासारखी तफावत नाही.

संदर्भ

१. दुराचारी जनांस सुधारणे ही मनुष्य प्रयत्नास अशक्य गोष्ट नव्हे, तर नित्यादी शास्त्रांच्या साहाय्याने व इतर योग्य उपायांनी मनुष्यातील दुर्गुण घालविणे शक्य आहे.

सारांश टीप : आत्म्याने देहाचे वेष्टन सोडून निर्दोष, ऋजू, अविकारी, अपरिच्छिन्न स्वरूप व्हावे. त्यासाठी विवेकयुक्त आचार स्वीकारावा. मी हा या निसर्गनियमाचा अंश आहे, हे स्वीकारण्याने आत्मसंतुष्टता प्राप्त होते. विनाश म्हणजे अभाव नव्हे. विशाल असलेल्या काल व विश्वप्रकृतीच्या मानाने तू काहीच नाहीस. त्यामुळे उपाधीची बाधा जडदेहास होते हे जाणून विवेकयुक्त कर्म करावे

○○○

पुस्तक अकरावे

१. विवेकशील आत्म्याची लक्षणे येणेप्रमाणे आहेत :

तो स्वयंवेद्य आहे, स्वतःस पाहिजे ते स्वरूप देण्याचे त्याला सामर्थ्य आहे. स्वतःच्या व्यापाराच्या फलांचा अनुभव त्याचा त्यासच घडतो. इतर प्राण्यांपासून किंवा वृक्षादिकांपासून उत्पन्न होणाऱ्या फलांचा उपयोग दुसऱ्यास घडतो. आयुर्मर्यादा केवढीही असली तरी त्यास स्वोद्देश सिद्ध करता येतो. नर्तन गायनादिकांमध्ये सर्व साज असावा, तसा नसला तर जसे सर्व काही अपुरे व असिद्ध राहते तसा याचा प्रकार होत नाही. त्यास कसलाही प्रतिबंध घडला तरी ज्या हेतूने तो निर्माण झाला आहे तो त्याजकडून सिद्धीस जातो. काही एक पंचाईत पडत नाही. समग्र विश्व आणि त्याच्या आसमंतात भागींची पोकळी येथवर त्याची गती होते. विश्वस्वरूप त्याच्या ज्ञानचक्षुला विषय होते. अनंतकाल मर्यादेचे त्यांस आकलन घडते. सर्व वस्तूंस नियतकालिक पुनरावृत्ती आहे, या सत्याचे त्यास परिज्ञान होते. तो आणखी असे निश्चितपणे जाणतो की, जे आपल्या मागून येतील किंवा जे आपल्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांस नवे असे काही एक दिसणे नाही. एखाद्या मनुष्याचे वय सरासरी चाळीस वर्षांचे असून, त्याला थोडीशी बुद्धी असल्यास त्याला मागे झालेल्या व पढे होणाऱ्या एकंदर गोष्टींचा अनुभव आला आहे, असे म्हटले तरी चालेल. कारण उघडच आहे की, विश्वाचे सर्व व्यापार एकसारखे असून, नियमाने घडत असतात. विवेकशील आत्म्याचे आणखी एक असे लक्षण आहे की, त्याचा शेजारी, सत्य आणि विनय यांजविषयी त्याच्या चित्तात प्रेम वागत असून, स्वतःशिवाय त्यास आणखी काही एक थोर वाटत नाही. ही शेवटची वृत्ती सर्व विश्वाच्या नियामक शक्तीतही आढळून येते. या सर्व विचारावरून पाहता सद्विवेक आणि न्याय्य विवेक हे सर्वस्वी अभिन्न होत.

२. गायन, नर्तन, वादनादी मनोरंजक कलांत काही एक अर्थ नाही. उदाहरणार्थ गाणे म्हणणाऱ्यांच्या आलापांचे पृथक्करण करून एक एक ध्वनी निरनिराळा ऐक आणि मग

त्यातला कोणताही ध्वनी तुला मनोहर वाटतो की काय ते पाहा. एवढे पाहिलेस म्हणजे अशा ध्वनी समुच्चयास मी कसा मोहून गेलो याची तुझी तुलाच लाज वाटेल. असेच नाचणाऱ्या कलावंतीनींच्या पावलाचे व हावभावाचे पृथक्करण करून पाहा, म्हणजे तुला नर्तनातही काही तथ्य नाही असेच वाटेल. याप्रमाणे या संसारातील हर एक मोहक वस्तूचे भागशः अवलोकन करून तिचे वास्तविक स्वरूप व योग्यता लक्षात आण. असे केल्याने तिचे महत्त्व तुला वाटेनासे होईल. आपल्या समग्र जीविताचाही असाच विचार कर. मात्र सद्वर्तन आणि सत्कृत्ये यांस हा नियम सहसा लावू नको.

३. जो आत्मा पाहिजे तेव्हा देहत्याग करावयास सिद्ध असतो आणि पुढे काही अवस्था प्राप्त होणारी असो अगर निर्वाण किंवा विलय होवो, त्याची त्याला काही एक क्षिती नसते, त्या आत्म्याची योग्यता काय वर्णावी! आता ही मरणाविषयीची मनुष्याची सिद्धता विवेकाने झाली पाहिजे. खिस्ती लोकांप्रमाणे हठाग्रहाने होता उपयोगी नाही. हे काम मोठ्या विचाराने व गंभीरतेने झाले पाहिजे आणि त्याजमुळे लोक भयचकित न होता उलटी त्यासही तसे करण्याची बुद्धी व्हावी.

४. कोणतेही लोकहिताचे कृत्य तुझ्या हातून घडल्यास त्यातच तू समाधान मान, आणखी मोबदल्याची इच्छा धरू नको. हा विचार मनात नित्य वागवून तू सत्कृत्ये करीत जा.

५. सद्वर्तन हे तुझे परम कर्तव्य होय आणि हे नीटपणे सिद्ध होण्यास निसर्गविषयक व मनुष्य स्वभावविषयक काही सर्वसाधारण सिद्धांत अवगत असणे अवश्य होय.

६. शोकपर्यवसानी नाटके जी प्राचीनकाळी रंगभूमीवर करून दाखवीत त्यांचा मूळ उद्देश असा होता की, मनुष्यास या संसारात कोणकोणत्या गोष्टी घडण्यासारख्या आहेत व ज्या घडतात त्या निसर्गानुसार घडतात, या गोष्टी मनुष्याच्या लक्षात आणून द्याव्यात. रंगभूमीवरील नाटकप्रयोग पाहून जर लोकास मौजच वाटते, तर या विश्वरूप महाविशाल रंगभूमीवर घडणाऱ्या गोष्टींच्या अनुभवाने लोकांना विषाद तरी का वाटावा? आणखी असे की, या गोष्टी सर्वांसच घडावयाच्या. त्यातून कोणीही सुटलेला नाही. जी स्थिती दुसऱ्याची झाली तीच आपलीही कधीतरी होईल. नेम कोणी सांगावा, इत्यादी विचार असल्या नाटकांच्या अवलोकनाने मनुष्याच्या मनात येऊ लागतात. शिवाय कित्येक नाटके रचणाऱ्या कवींची वचनेही बरीच बोधपर असतात. त्यातली काही येथे मासल्यासाठी देतो : 'देवांनी माझी आणि माझ्या लेकरांची हेळसांड केल्यास त्याला काहीतरी कारण असेल.' 'जे काही घडत आहे तेणेकरून आपण दुःख किंवा संताप पावू नये.' 'गव्हाच्या परिपक्व झालेल्या ओंब्या जशा तू खुडतोस तद्वत या तुझ्या आयुष्याचा कर्तृत्वक्षम कालाचा योग्य उपयोग करून घे.'

शोकपर्यवसानी नाटकांनंतर जुन्या काळची हास्यरसप्रधान नाटके प्रचारात आली. त्यांच्याद्वारे कवी कोणासही न भिता वाटेल तसा लोकांस दोष लावीत असत व बोध करीत

असत. अशा स्पष्टवत्तेपणामुळे लोकांच्या उद्धताचरणास बराच आळा पडला; परंतु यानंतर जी नाटकांची तऱ्हा सुरू झाली तीत काही एक फारसा अर्थ नाही. आता अशा नाटक ग्रंथांतूनही निवडणारास बराच बोध सापडेल हे खरे आहे, तरी ते एकंदरीत कुचकामीच होत.

७. ज्या स्थितीमध्ये तू सांप्रत आहेस ती जशी तत्त्वविचार करण्यास अनुकूल आहे तशी दुसरी कोणतीही नाही, हे अगदी उघड आहे.

८. एक फांदी दुसऱ्या फांदीच्या शेजारून कापून काढली असता ती जशी एकंदर वृक्षापासून तुटून पडलीच पाहिजे, तसाच जो मनुष्य दुसऱ्या मनुष्यापासून तुटून वागतो तो एकंदर समाजास मुकलाच समजावा. आता वृक्षाची फांदी दुसरा कोणीतरी तोडतो; परंतु मनुष्य आपल्या स्वत:च्याच कृत्यांनी आपल्या शेजाऱ्यापासून वेगळा होतो. कारण त्यास कळत नाही की, दुसऱ्याचा द्वेष किंवा तिटकारा केला असता तो स्वतः समाजस्थितीपासून च्युत होतो; परंतु ज्या देवाने ही समाजस्थिती उत्पन्न केली आहे त्याच्याच कृपेने आपल्या ठायी अशी एक शक्ती आहे की, जेणेकरून आपणास आपली पूर्वस्थिती प्राप्त होऊन पुन्हा आपण समग्र विश्वाचे अंशरूप होऊन जातो, तरी पण अशा प्रकारच्या दुजाभावाचे वर्तन पुष्कळ वेळा घडले असताही पूर्वस्थिती प्राप्त होणे मोठे मुष्किलीचे होते. आणखी असा एक भेद येथे लक्षात वागविला पाहिजे की, जी फांदी वृक्षाला स्वभावतः येऊन खोडापासून कधीही न तुटता तेथेच वाढून राहिली असते, तिजपेक्षा कलम केलेली फांदी अगदी निराळी असते. ही दुसरी फांदी बाकीच्या झाडांबरोबर वाढते खरी; परंतु ती त्याशी एकजीवच आहे, असे म्हणता येत नाही.

९. तू विवेकाने चालत असता तुला एखाद्याकडून हरकत घडली, तरी तू सन्मार्गच्युत ज्या पक्षी होण्याची शक्यता नाही त्या पक्षी त्या मनुष्याविषयी तुझ्या ठायी अनादराची किंवा कठोरपणाची वृत्ती उद्भवणे नीट नव्हे, तर त्याचे आपल्याकडून होईल तितके बरे करण्यास सहसा मागे घेऊ नये. कारण त्याजकडून प्राप्त झालेल्या प्रत्यवायामुळे गांगरून जाऊन सन्मार्ग सोडणे, हे जसे आपल्या मानसिक दौर्बल्याचे द्योतक आहे तद्वतच त्या त्याच्या कर्माबद्दल त्याजवर दात, ओठ खाणे हेही आहे. कारण लोक भयमूलक सन्मार्गच्युती आणि निसर्गत: ज्यांशी आपले बंधुत्वाचे किंवा मित्रत्वाचे नाते त्यांजशी भेदभावाचे वर्तन ही ज्याच्या हातून घडतात ते सारखेच दोषी समजावे.

१०. मनुष्यनिर्मित कला निसर्गाहून कधीही श्रेष्ठ नसावयाची. कारण एकंदर कला वस्तूच्या निरनिराळ्या निसर्गाच्या अनुकरणाने सिद्ध केल्या आहेत. असे जर आहे तर या निसर्गाच्या अनुकरणाने पूर्ण स्वरूप व अत्यंत व्यापक असा जो विश्वनिसर्ग तो कोणत्याही कलाकुसरीहून कमी दर्जाचा असणे अगदी असंभाव्य होय. आता सर्व कलांचे काम म्हटले म्हणजे कमी दर्जाच्या वस्तू श्रेष्ठ दर्जाच्या वस्तूंच्या उपयोगी पडतील असे करण्याचे होय. विश्व निसर्गाचेही काम असेच आहे. म्हणूनच न्यायतत्त्वाची उत्पत्ती होऊन ते सर्व इतर सद्गुणांस

आधारभूत झाले आहे. कारण जर आपण मध्यम प्रतीच्या (ज्यांच्याविषयी मनुष्याने उदासीन असले पाहिजे अशा) वस्तू संपादण्यात गुंतून गेलो किंवा सहज रीतीने भ्रमात पडलो किंवा वेळोवेळी चित्तवृत्ती पालटू लागलो किंवा कोणतेही काम हलगर्जीपणाने करू लागलो, तर आपल्या हातून न्यायास अनुसरून वर्तन घडणे नाही (पु. ५, क. १६, ३०, पु. ७, क. ३५)..

११. कोणतीही वस्तू तुला सहज प्राप्त होत नसली किंवा तिची प्राप्ती करून घेण्यात किंवा तिचा अव्हेर करण्यात तुला कितीही त्रास झाला असला, तरी तुझे तिजशी सन्निधान कोणत्या ना कोणत्या प्रकारे होतच असते. तेव्हा तिजविषयीची तुझी वृत्ती स्थिर ठेव. तद्विषयक संपादन परित्यागादिकांच्या खटपटीत विनाकारण पडू नको.

१२. आत्मा जेव्हा एखाद्या वस्तूचे आकलन करीत नसतो किंवा अंतर्यामी संकोच पावत नसतो किंवा विलय किंवा नाश पावत नसतो, तर त्यास ज्या प्रकाशाच्या योगेकरून अखिल वस्तू स्वरूप व स्वस्वरूप ही दृश्य होतात त्या प्रकाशाने युक्त असा तो असतो. तेव्हा त्याचा आकार गोलरूप असतो (पु. ८:४१, ४५, पु. १२:३).

१३. कोणी माझा तिरस्कार करीत असला तर तो खुशाल करू द्या. मी आपल्याशी एवढे मात्र पाहीन की, अशा तिरस्कारास पात्र होण्यासारखे मजकडून काही घडले आहे किंवा कसे. कोणी माझा द्वेष केला तरीही काही चिंता नाही. मी आपला प्रत्येक मनुष्याशी सौम्यपणे व उपकारबुद्धीने वागेन; आणि जो माझा द्वेष करीत असेल त्यास ती त्याची चूक आहे असे दाखवून देईन. असे करताना त्याच्या त्या चुकीबद्दल त्यास मी दोष देणार नाही किंवा आपल्या ठायी मोठा सहनशीलपणा आहे असे दाखविणार नाही, तर ते मोठ्या दिलदारपणाने व प्रामाणिकपणाने करीन. कारण आपले अंतर्याम असे असावयास पाहिजे की, तेणेकरून देवांच्या दृष्टीस आपण कोणत्याही प्रकारे अतृप्त किंवा नाखूश आहोत असे पडता कामा नये. तू स्वनिसर्गानुसार वर्तत असून, विश्व निसर्गास अनुरूप अशा कोणत्याही गोष्टीने अतृप्त नसलास तर तुला कशाचीही भीती नाही. कारण तुज मानवाला विवक्षित स्थितीत जे ठेवले आहे त्याचा हेतू सार्वत्रिक कल्याणप्राप्ती व्हावी असा आहे.

१४. लोक एकमेकांचा तिरस्कार किंवा प्रशंसा करतात, एकमेकांवर वरचढ होण्याचा यत्न करतात किंवा एकमेकांच्या पायी लीन होतात.

१५. जो कोणी दुसऱ्यास म्हणतो की, मी तुजशी न्यायाने वर्तण्याचा निश्चय केला आहे तो असमंजस आणि कपटी होय. अशी त्यास अगाऊ सूचना देण्याची काय जरूरत आहे? काय मनात असेल ते लागलीच करून दाखवावे. आपल्या मुखचर्येवरूनच आपली वृत्ती त्यास कळावी. कारण मनुष्याच्या एकंदर स्वभावाची प्रतिमा मुखचर्येवर उमटलेली असते. एखाद्या माणसाच्या अंगाला जसा उग्रट वास यावा आणि तो जवळ आला म्हणजे जसा त्याच्या अंगाचा तो वास आपला हटकून यावयाचाच, तो न येवो असे इच्छून चालावयाचे नाही. तशीच गत प्रामाणिक आणि सज्जन मनुष्याची असावयास पाहिजे. साधेपणाचे वृथा

कोंग करणे हे वाकडी काठी सरळ करू जाण्यासारखे आहे. मानभावीपणाची मैत्रीही अशीच गर्दा होय. असला खोटेपणा आधी सोडून दे. सुजनता, आर्जव, परोपकारबुद्धी इत्यादी वृत्ती मनुष्याच्या नुसत्या डोळ्यांवरूनच उमगतात. त्यांच्याविषयी लपंडाव करावयास नको.

१६. ज्या वस्तूंविषयी मनुष्याने उदासीन राहिले पाहिजे त्यांजविषयी आत्मा उदासीन न राहिला, तर त्याच्या ठायी सन्मार्गाने वर्तन करण्याचे सामर्थ्य असेल. एकंदर वस्तूंकडे व्यक्तिश: व समुच्चयाने पाहून त्याने असे लक्षात ठेवावे की, या वस्तूंमुळे आपल्या मनात बऱ्या-वाईट कल्पना उत्पन्न होण्याची शक्यता नसून त्यांचा आपणास कधी संपर्क व्हावयाचा नाही. त्याने नेहमी अचल असून, त्यांजविषयीचे भलतेच समज आपण होऊन आपल्या मनात करून घेतो. म्हणून त्याचा आपल्या चित्तात प्रवेश होतो; परंतु त्या तेथे चांगल्या ठाम झाल्या नसल्यास त्या अगदी बुजवून टाकण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे आणि ही सर्व दगदग अगदी अल्पकाळापर्यंत राहणारी आहे. कारण थोड्याच वेळाने आपले येथील वास्तव्य आटपणार आहे. याप्रमाणे आत्म्याची एकदा वृत्ती झाली म्हणजे वर सांगितलेली वस्तुविषयक उदासीनता त्याच्या ठायी बाणली म्हणून समजावे. कारण या वस्तू जर निसर्गानुसार प्राप्त होत असतील, तर त्यात मनुष्याने आनंद मानला पाहिजे, अशाने त्यापासून त्यास त्रासच मुळी वाटावयाचा नाही. बरे, त्या निसर्गाविरुद्ध आल्या तर स्वतःच्या निसर्गाच्या प्राप्त होत असतील तर त्यात मनुष्याने आनंद मानला पाहिजे. अशाने त्यापासून त्यास त्रासच मुळी वाटावयाचा नाही. बरे, त्या निसर्गाविरुद्ध आल्या तर स्वतःच्या निसर्गास अनुसरून जे असेल त्याचा शोध करून ते प्रयत्नेकरून करीत जा. मग त्यांत कीर्ती होवो किंवा अपकीर्ती होवो. कारण प्रत्येकाने आपले कल्याण करून घेण्यास मुळीच हरकत नाही.

१७. प्रत्येक वस्तू कोठून येते, तिचे घटकावयव काय आहेत, तिचे रूपांतर कसे काय होते, असे रूपांतर पावल्यावर तिची स्थिती काय होईल; आणि हा सर्व व्यापार कसा कोणासही इजा न होता होत असतो इत्यादी गोष्टींचा विचार कर.

१८. कोणी तुझा अपमान केला असल्यास पहिल्याने असा विचार कर की, आपला इतर मनुष्याशी निकट संबंध असून, आपण सर्व मानव एकमेकांसाठी निर्माण झालो आहोत. दुसरा विचार असा मनात आण की, आपला इतर मानवांशी संबंध फार तर मेंढ्यांच्या कळपाशी त्यातल्या प्रमुख एडक्याचा जसा असतो, अगर गुराढोरांच्या खिल्लारांशी त्यातला अग्रेसर वृषभाचा जसा असतो तसा फार तर आहे. परंत हा सर्व संबंध सिद्धांतरूप प्रधानतत्त्वांच्या अनुरोधाने पाहिला असता असे ध्यानात येते की, सर्व वस्तू केवळ परमाणुसंघ यदृच्छायोगेकरून घडून अस्तित्वात येत नसल्यास निसर्गाकडून त्यांची उत्पत्ती व सुस्थिती होत आहे. असे असल्यास नीचतर वर्गातल्या वस्तू उच्चतर वस्तूंसाठी निर्माण केल्या आहेत; परंतु श्रेष्ठ वर्गातल्या वस्तू परस्परांच्या हितासाठी अस्तित्वात आल्या आहेत (पु. २, १, पु. ९:३९, पु. ५:१६, पु. ३-४).

दुसरा विचार असा की, उठणे, बसणे, खाणे, पिणे इत्यादी नित्य व्यवहारात लोक कोणत्या प्रकारे वर्ततात, त्यांच्या समजुती काय आहेत व प्रत्येक कर्मात ते कसकसा अभिमान प्रगट करतात इत्यादी गोष्टींचे मनन करावे.

तिसरा विचार असा की, लोक योग्य प्रकारे वर्तत असले, तर आपणास त्याजबद्दल असंतोष मानण्याचे काही एक कारण नाही; परंतु ते गैरशिस्तपणे वर्तत असले तर असे वर्तन त्यांच्या नाइलाजामुळे व अज्ञानामुळे होत आहे हे स्पष्ट आहे. कारण प्रत्येक आत्मा जो सत्याला मुकतो तो याची तशी मुळीच इच्छा नसता जसा मुकतो, त्याचप्रमाणे प्रत्येक माणसाशी त्याच्या योग्यतेप्रमाणे वागण्याच्या सामर्थ्यासही त्याची खुशी नसता तो मुकतो. म्हणूनच लोकांना अन्यायी, कृतघ्न, लोभी किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीने आपल्या शेजाऱ्यांशी वाईट वर्तन करणारे, असे म्हटले असता राग येतो (पु. ७:६२, ६३, पु. २:१, पु. ७:२६, पु. ८:२९).. चौथा विचार असा की, तुजकडून पुष्कळ गैरशिस्त गोष्टी घडत असून, तूही बाकीच्यांसारखाच मनुष्य आहेस; आणि जरी पुष्कळ सदोष गोष्टींपासून तू परावृत्त होत आहेस, तरी त्या करण्याकडे तुझी मूळची प्रवृत्ती होती. ही तुझ्या ठायीची प्रवृत्ती लोकमय, लौकिकप्रीती इत्यादी क्षुद्र कारणांनी कमी झालेली आहे (पु. १:१७).

पाचवा असा की, लोक जी कोणतीही गोष्ट करतात ती रास्त आहे किंवा गैररास्त आहे हे तुला निश्चयाने कळत नाही. कारण त्यांच्याकडून अशा पुष्कळ गोष्टी घडत असतात की, त्यांचा संबंध त्यास प्राप्त झालेल्या स्थितीशी अनेक प्रकारे असतो आणि दुसऱ्याचे आचरण नीट समजण्यास मनुष्यास पुष्कळ गोष्टी अवगत झाल्या पाहिजेत (पु. ९:३८, पु. ४:५१).

सहावा असा की, तुला अतिशयीत खेद किंवा दुःख झाले असता असे मनात आणले पाहिजे की, मनुष्याचे जीवित अगदी क्षणिक असून, अल्पकाळातच आपण सर्व मृत्युवश होऊ (पु. ७:५८, पु. ४:४८).

सातवा असा की, लोकांच्या कृत्यांनी आपणास काही एक त्रास पोहोचणे नाही. कारण त्यांचा उगम त्यांच्याच नियामक अंशात असतो. आम्हास जो त्रास होतो तो फक्त त्यांजविषयी आम्ही ज्या भासमय कल्पना मनात आणतो त्यामुळे होय. तेव्हा या कल्पना मनातून काढून या कृत्यांविषयी भलताच समज आपल्या मनाचा होऊ देऊ नको, म्हणजे तुझा राग जाईल. आता या कल्पनांचे निर्मूलन कसे करावे, असा प्रश्न सहजी उत्पन्न होतो. त्याचे उत्तर फारच थोडे आहे. असा नेहमी विचार करावा की, दुसऱ्याच्या कृत्यामुळे आपली फजिती होण्याचा संभव मुळीच नाही. कारण जेणेकरून आपली फजिती होते तेच फक्त वाईट नसते, तर तुजकडूनही पुष्कळ प्रकारचे गैरशिस्त वर्तन घडले असते (पु. ५:२५, पु. ७:१६).

आठवा विचार असा की, ज्या गोष्टीचा आपणास राग किंवा खेद वाटतो त्या गोष्टींपासून होणाऱ्या दुःखापेक्षा रागामुळे किंवा खेदामुळेच आपणास अधिक दुःख होते (पु. ४:३९,४५, पु. ७, २४).

नववा विचार असा की, मनुष्याच्या अंगी खरी सुजनता असली म्हणजे तिच्यावर कशाचाही पगडा चालावयाचा नाही. एखादा मनुष्य तुजशी कितीही दांडगाईने वर्तला असला तरी जोपर्यंत तू त्याजशी ममतेनेच वागत राहशील तोपर्यंत त्याजकडून तुला कोणताही अपाय घडणे नाही. आणखी असे की, तो तुला इजा करण्याचा प्रयत्न करीत असता त्या वेळी योग्य प्रसंग दिसल्यास जर तू त्याची सौम्यपणे समजूत घालून त्याची चुकी त्यास शांतपणे दाखवून देशील, तर पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. त्याची समजूत घालताना त्यास असे सांगावे की, 'बाळा असे करू नको, आपणास निसर्गाने निराळ्याच हेतूने निर्माण केले आहे. तुझ्या या कृतीमुळे मला तर काही एक अपाय घडणे नाही. तू मात्र स्वतःचे येणेकरून अहित करून घेत आहेस.' आणखी त्याला असे शांतपणे सांगावे की, 'मधमाशा वगैरे जे प्राणी संघ करून राहतात तेसुद्धा तुजप्रमाणे परस्परांशी वर्तन करीत नाहीत, मग तूच का बरे असे करावे?' हे सर्व काम करताना अगदी साधेपणाने वागून लोकांस असे भासवू नये की, आपण त्यास कोणत्याही प्रकारे दोष देत आहो, किंवा त्यांच्याविषयी आपल्याठायी राग किंवा द्वेषबुद्धी उत्पन्न झाली आहे. याचप्रमाणे त्यास मोठा बोध करण्याचाही डौल घालू नये, तर हे त्यास एकीकडे नेऊन हळूच सांगावे.

हे नऊ नियम लक्षात बाळगून या संसारामध्ये मनुष्यास उचित असे वर्तन ठेव. कोणाची खुशामत करू नको किंवा कोणाचा त्रासही करू नको. कारण या दोन्ही वृत्ती समाजस्थितीस प्रतिकूल आहेत. आणखी ज्या वेळी तू रागाने संतापून जाशील त्या वेळी तू हा एक सिद्धांत लक्षात आण की, क्रोधवश होण्यास मनुष्यपणा नाही. सौम्यपणा आणि शांतपणा या वृत्ती मानव निसर्गास विशेष अनुसरून असल्यामुळे त्यातच खरा मनुष्यपणा आहे. ज्याच्या अंगी या वृत्ती वास करीत असतात, त्याच्याच ठायी बळ, जोम, धैर्य वगैरे इष्ट गोष्टी असतात; परंतु जो क्रोधवश किंवा नाराज होतो त्याच्या ठायी त्यांचा अभाव असतो. कारण साधारणतः असा नियम आहे की, जितक्या मानाने एखाद्याचे चित्त असद्वृत्तीपासून मुक्त असते तितक्या मानाने ते बळकट असते आणि ज्याप्रमाणे दुःखाने विव्हळ होणे हे अशक्ततेचे एक चिन्ह होते, त्याप्रमाणे क्रोधाविष्ट होणे हेही एक तिचे चिन्हच होय. कारण जो दुःखवश होतो आणि जो क्रोधवश होतो ते दोघेही त्याने विद्ध होऊन लाचार होतात; परंतु वाईट मनुष्याकडून अनन्वित आचरण न घडण्याची अपेक्षा करणे हा शुद्ध वेडेपणा आहे. कारण ही गोष्ट अगदी अशक्य आहे; परंतु असल्या मनुष्यास इतराशी हवे तसे वर्तू देऊन स्वतःशी मात्र त्याने गैरशिस्त वर्तन करू नये असे इच्छिणे हे अगदी असमंजसपणाचे व जुलमीपणाचे दर्शक होय.

१९. आपल्या ठायीची श्रेष्ठ चिच्छक्ती भ्रांत होण्याचे मुख्य चार प्रकार आहेत, त्यांजविषयी तू सतत सावध राहून ते नजरेस येताच त्यांचा बीमोड कर. एक प्रकार अनावश्यक विचारांचा, दुसरा सामाजिक ऐक्यविघातक विचारांचा, तिसरा मनात एक व बाहेर एक असा दुटप्पी

भाषणांचा आणि चौथा प्रकार आपल्या हातून काही घडले असता स्वतःस दोष देण्याचा. कारण असे करण्याने एवढी गोष्ट सिद्ध होते की, विशेष योग्य नव्हे असा जो शरीररूप आपला नश्वर अंश त्याच्या उपाधींनी व जड सुखांनी आपल्या ठायींच्या दैवी अंशास व्यामोह घडला आहे (पु. ४, २४, पु. २:१६).

२०. तुझ्या देहांत संमिश्रित झालेले जे वाय्वंशी व तेजांश त्यांची निसर्गत: पाहता ऊर्ध्वगती आहे; परंतु विश्वयोजनेस्तव ते या देहात बद्ध होऊन गेले आहेत. त्याचप्रमाणे तुझ्या ठायीचा पार्थिव अंश व उदकाचा अंश यांची नैसर्गिक गती अधोमुख असून, ते विशेष वरल्या स्थितीमध्ये धरून ठेवले गेले आहेत. याप्रमाणे विश्वशक्तीचा ताबा एकंदर तत्त्वावर अव्याहत चालला आहे. ती त्यास जे स्थळ नेमून देते तेथेच त्यांना राहणे प्राप्त आहे आणि शेवटी ती निरनिराळी होऊन आपापल्या ठिकाणी जाण्याचाही इशारा त्याच शक्तीकडून त्यास मिळतो. तेव्हा तुझ्या बुद्धितत्त्वानेच तेवढे आपणास प्राप्त झालेल्या स्थितीबद्दल नाखुशी व असमाधान का व्हावे बरे? आणि तशात त्याजवर कोणत्याही प्रकारचा जुलूम होत आहे, अशातला काही अर्थ नाही. त्याला नेमून दिलेल्या गोष्टी त्याच्या निसर्गास अनुरूप अशाच आहेत. असे असता तो त्या करीत नाही, तद्विरुद्ध आचरण त्याजकडून होते. अन्याय, असंयम, क्रोध, खेद, भीती इत्यादिकांकडे ज्याची प्रवृत्ती होते तो निसर्गच्युत झाला म्हणून समजावे. कोणत्याही घडणाऱ्या गोष्टींविषयी नियामकशक्ती असमाधान दर्शवू लागली असता तीही स्वपदच्युत होते. कारण जशी न्यायबुद्धी त्याच्या ठायी विकास पावणे इष्ट आहे तसाच देवांविषयीचा भाव व पूज्यताबुद्धी हीही त्याच्या अंगी कायम राहणे उचित आहे. कारण या उभय वृत्तींचा अंतर्भाव समाधानरूप वृत्तीत होतो आणि मनुष्याच्या हातून न्याय्याचरण घडण्यास या वृत्ती त्याच्या अंगी आधी वसत असल्या पाहिजेत.

२१. कोणतातरी एकच हेतू डोळ्यांपुढे सतत ठेवून जो आपला आयुष्यक्रम चालवीत नाही, त्याच्या वृत्तीत वेळोवेळी पालट होत राहील. आता हा हेतू कोणता असावा हे येथे सांगितले पाहिजे. कारण ज्या गोष्टी बहुतेक लोकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे हिताच्या अशा वाटतात त्या सर्वांविषयी त्यांचे एक मत असत नाही; पण ज्या गोष्टी सार्वत्रिक हिताच्या असतात तेवढ्यांविषयी मात्र त्याचे एक मत असते. म्हणूनच ज्यात सार्वत्रिक व सामाजिक हिताचा संबंध आहे, असा एखादा हेतू आपण आपल्या नजरेपुढे ठेवून वर्तन केले पाहिजे, अशा हेतूच्या संपादनार्थ जो आपल्या सर्व प्रयत्नांचा अभियोग करील त्याची सर्व कृत्ये समान राहून त्याच्या वृत्तीतही पालट व्हावयाचा नाही.

२२. इसापनीतीतील[१] रानातला उंदीर व गावातला उंदीर यांची कल्पित कथा लक्षात जाणून गावात राहणाऱ्या उंदराला किती धास्ती व भय सतत असते याचा विचार कर.

२३. **सॉक्रेटिस** पुष्कळ लोकांच्या मताला मुलाला भिवविणाऱ्या बाऊची[२] उपमा देत असे.

२४. **लॉसिडेमोनियन** लोक प्रसिद्ध तमाशे करवू लागले म्हणजे नवख्या लोकांना बसण्याकरिता सावलीतल्या जागांची योजना करीत आणि स्वतः कोठेही बसत.

२५. **सॉक्रेटिसाला पर्डिकाने** आपल्या घरी बोलावले असता नाही येत म्हणून सांगितले. नाही म्हणण्याचे कारण त्याने असे सांगितले की, माझा अंत अत्यंत वाईट रीतीने व्हावा, अशी मला इच्छा नाही. म्हणजे अर्थात् कोणी आपणावर उपकार करावा आणि त्याची फेड करण्याचे आपणास सामर्थ्य कधीही नसावे, हे मला मुळीच आवडत नाही.

२६. पूर्वीच्या काळी जे सत्पुरुष सदाचरणाविषयी विख्यात असतील त्यातल्या एखाद्याच्या चरित्राचे सतत मनन करावे.

२७. **पायथागोरसाचे** अनुयायी असा बोध करीत असत की, आपण आकाशाकडे नेहमी पाहावे, म्हणजे अंतराळी असलेल्या प्रचंड गोलांकडून सतत तीच तीच परिश्रमणे होत असून, त्याचे ते कामही एकाच पद्धतीने होत आहे असे लक्षात येईल, त्याचप्रमाणे त्याचा शुद्धपणा व उघडेपणाही मनावर ठसेल.

२८. **सॉक्रेटिसाची** स्त्री जी झांटिपी ही एकदा त्याचा झगा घेऊन बाहेर गेली असता त्याने आपल्या अंगावर एक नुसते कातडे घातले. त्याच्या मित्रांना त्याचा तो पोशाख पाहून वाईट वाटून ते त्याच्या जवळ जाईनासे झाले. तेव्हा त्याने त्यांस बोध करून ताळ्यावर आणले. त्या सत्पुरुषाच्या या वागणुकीचा विचार कर..

२९. आपणास अवगत असलेल्या वाचनाच्या किंवा लेखनाच्या नियमाचा उपयोग स्वतःला करता आल्यावाचून ते दुसऱ्यास तुला सांगता येणार नाहीत. अशीच गोष्ट एकंदर आयुष्यक्रमाचीही आहे.

३०. तुझे वर्तन गुलामासारखे आहे म्हणून भाषण स्वातंत्र्य जे आहे ते तुजकरिता नव्हे.

३१. मनुष्य स्वपरीक्षण करील, तर त्याचे त्यालाच दोष दिसून येतील.

३२. लोक कठोर शब्दांनी सद्गुणांची विटंबना करतात.

३३. हिवाळ्यामध्ये अंजिराची उपेक्षा करणारा जसा वेडा समजावयाचा, तसाच जो आपल्या गत बालकाविषयी शोक करतो तोही समजावा.

३४. एपिक्टेटस म्हणे की, एखाद्या मनुष्याने आपल्या बालकाचे चुंबन केल्यावर लागलीच त्याने आपणाशी असे हळूच म्हणावे की, 'तू उद्या कदाचित मरण पावशील.' आता हे कोणी अभद्र शब्द म्हणतील; परंतु तो म्हणे की, ज्या शब्देकरून कोणत्याही नैसर्गिक व्यापाराचा बोध होतो तो शब्द अभद्र नव्हे.[३] नाही तर धान्याची कणसे तोडली, असे कोणी म्हटले असता तेही अभद्र मानावे लागेल.

३५. द्राक्षे कच्ची असणे, पुढे काही वेळाने ती पिकणे आणि नंतर ती वाळणे हे सर्व फेरफार आहेत. यांच्या योगाने मुळची वस्तू नष्ट तर होत नाहीच; परंतु तिला पुढे एखादे निराळेच रूप प्राप्त व्हावयाचे असते.

३६. आमचे इच्छास्वातंत्र्य कोणीही हिरावून नेऊ शकत नाही.

३७. **एपिक्टेटस** असे म्हणत असे की, कोणत्याही गोष्टीस योग्य संमती देता येण्यासाठी मनुष्याने एखादी कला शोधून काढावी. म्हणजे अर्थात् आपले सर्व विचार योग्य प्रकारे चालविता येण्यासाठी काही सर्वसाधारण व सत्य असे नियम प्रचारात आणावे. त्याचप्रमाणे त्याच्या हातून घडणाऱ्या व्यापाराच्या संबंधाने त्याने अशी सावधगिरी राखावी की, ते विद्यमान स्थितीत अनुकूल असे असून, सामाजिक हितास आड येणार नाहीत आणि त्याचा रोख प्रत्येक वस्तूच्या खऱ्या योग्यतेनुरूप असावा. इंद्रियांच्या गम्य विषयांपासून त्याने दूर राहावे आणि ज्या गोष्टी आपल्या हातच्या नव्हेत त्यांचा अव्हेर करण्याच्या भानगडीत पडू नये.

३८. एकंदरीत पाहता हा वाद काही एखाद्या क्षुल्लक गोष्टीबद्दल नव्हे, तर तो मनुष्याने वेडे व्हावे किंवा कसे या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधाने आहे.

३९. **सॉक्रेटीस** म्हणत असे की, तुम्हाला काय पाहिजे? विवेकी की अविवेकी मनुष्याचे आत्मे? विवेकी मनुष्याचे आत्मे हवे असतील तर कोणत्या विवेकी प्राण्याचे? सुविकसित की अविकसित? अर्थात सुविकसित. मग ते मिळविण्याच्या प्रयत्नास का लागत नाहीत? तुमच्या ठायी ते आधीच आहेत काय? तर मग तुम्ही कलह आणि वाद तरी कशाला करता?

संदर्भ :

१. बहुधा बागुलबुवा,
२. इसाप मार्कसपूर्व आहे. तो इसवीसन पूर्व सहाव्या शतकातील आहे.
३. ज्यावरून नैसर्गिक व्यापारांचा बोध होतो, असा कोणताही शब्द, वाक्य अथवा प्रकार अभद्र अथवा बीभत्स नव्हे असे समजणे फार चुकीचे आहे. आपल्या शरीराचे काही अवयव व व्यापार असे आहेत की, त्यांचा सभ्य रीतीच्या भाषणात उल्लेख करणे चांगले नहे.

सारांश टीप : विवेकशील आत्म्याची लक्षणे दिली आहेत. निष्काम कर्मयोग्याप्रमाणे वर्तन हवे. समाजसंघात असू द्यावा. अनायासे प्राप्त वस्तूंचा स्वीकार, न मिळाल्यास विषाद नको. वर्तन सहज व साधेपणाने हवे. वर्तनाचे नऊ नियम दिले आहेत, त्याप्रमाणे वाग. ठायीची चिदाक्ती भ्रांत होण्याचे चार मुख्य प्रकार दिले आहेत...अनावश्यक विचार, सामाजिक ऐक्य, विघटन विचार, दुटप्पी विचार, स्वतःस दोष देण्याची वृत्ती!

○○○

पुस्तक बारावे

१. ज्या गोष्टींच्या प्राप्तीसाठी तुझा एवढा अटाट चालला आहे त्या तुजला पाहिजे तेव्हा अगदी सोप्या उपायाने प्राप्त होण्यासारख्या आहेत. त्यांजविषयी तुला इच्छा मात्र असली पाहिजे. हा सोपा उपाय म्हटला म्हणजे असा की, भूतकालीन सर्व गोष्टींविषयी बेदरकार राहावे. पुढील सर्व गोष्टींचा भरिभार सत्य संकल्प देवावर टाकावा आणि विद्यमान कालाचा विनियोग धर्मशीलता आणि न्याय यास अनुसरून करावा, म्हणजे झाले. धर्मशीलतेस अनुसरून म्हटले याचा अर्थ असा की, जे काही तुला नेमून दिले असेल त्यात समाधान मानून राहावे. कारण निसर्गाने त्या स्थितीचा आणि तुझा अपरिहार्य संबंध जुळवून दिला आहे. न्यायानुसार वर्तन करावयाचे म्हणजे अर्थात् कोणाचीही भीती किंवा मुर्वत न धरता व कोणताही लपंडाव न करता काय असेल ते खरे बोलावे आणि प्रत्येक गोष्ट सृष्टिनियमास अनुसरून व प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे करीत जावी. दुसऱ्या मनुष्याचा दुष्टपणा, समज आणि बोलणे यांनी तुझ्या सद्धर्तनास अपाय होऊ देऊ नको. त्याचप्रमाणे तुझ्या आत्म्यास वेष्टून राहिलेल्या या देहाच्या उपाधींनी तू व्यग्र होऊ नको. जडदेहाचे भोग त्याचे तो पाहून घेईल. यास्तव तुझा मरणसमय केव्हाही यावयाचा असला तरी तू जर दुसऱ्या कशाचीही दरकार न करता आपल्या ठायीचा दैवी अंश आणि नियामक शक्ती यांसच फक्त पूज्य मानशील. जर तू आपणास कधीतरी मृत्यू येईल याजविषयी भीती बाळगणार नाहीस आणि आपण कधीही निसर्गानुसार वागण्यास सुरुवात केली नाही म्हणूनच जर तुला भय वाटत असेल तरच ज्या विश्वाने तुला निर्माण केले आहे त्यास तू लायक ठरशील; आणि या तुझ्या जन्मभूमीत तू नवख्याप्रमाणे वागणार नाहीस. या दुनियेत घडणाऱ्या गोष्टी अनपेक्षित समजून त्यांजविषयी आश्चर्य करण्याचे तू सोडून देशील आणि कोणत्याही गोष्टीवर अवलंबून राहणार नाहीस.

२. आम्हा मानवांच्या ठायीची चिच्छक्ती, देहाचे वेष्टण आणि तद्गत उपाधी यापासून व्यतिरिक्त अशी देवांस दिसत असते. कारण जो ज्ञानतत्त्वाचा अंश देवापासून उगम पावून आमच्या देहामध्ये प्रविष्ट झालेला असतो तोच फक्त त्यास आपल्या ठायीच्या ज्ञानतत्त्वाच्या योगाने अधिगम्य होतो; आणि तूही असाच क्रम धरल्यास बऱ्याच त्रासापासून मुक्त होशील. जो या देहाच्या लपेटण्याची पर्वा करणार नाही, त्यास वस्त्रप्रावरण, घरदार, नावलौकिक इत्यादी बाह्य गोष्टीत मन घातल्याने होणारा त्रास चुकेल.

३. शरीर, प्राण आणि ज्ञानतत्त्व अशा तीन अंशांच्या संमेलनाने तू बनलेला आहेस. यापैकी पहिल्या दोन अंशांची जेथवर निगा करणे हे तुझे कर्तव्य आहे तेथवर ते तुझे होत. वास्तविक पाहता खुद्द तुझा असा तिसराच अंश होय. तेव्हा अर्थात् या आपल्या स्वकीय अंशास इंद्रियद्वारा प्राप्त झालेले अनुभव, भूतकाळी घडलेल्या गोष्टी व भविष्यकाळी घडणाऱ्या गोष्टी यांपासून निर्मुक्त करून जर स्वानंदी स्थिर होशील आणि जर विद्यमान स्थितीचाच रोख पाहून वर्तन ठेवशील तर देहावसान होईपर्यंतचे आपले आयुष्य तू निर्धांतपणे उदात्तपणे व विवेकास अनुसरून घालविशील (पु. २:१३, १७, पु. ३:५, ६, पु. ११:१२). मग लोक तुला काहीही म्हणोत, तुझ्या हातून कोणतीही गोष्ट घडलेली असो, पुढे घडतील अशा वाटणाऱ्या गोष्टींनी तू कितीही व्यग्र झालेला अस, तुझ्या देहास अथवा देहाचा सहचारी जो प्राण त्यास लागून कितीही गोष्टी असोत. ज्ञानशक्ती दैवायत्त वस्तूंपासून विमुक्त होऊन तीस शुद्ध व स्वतंत्र स्थिती प्राप्त व्हावी आणि तिजकडून न्यायाचरण होऊन सत्यावलंब व्हावा म्हणून या विश्वासभोवती केवढाही महाविशाल आवर्त परिभ्रमण करीत असो, त्याजविषयी तू मुळीच दरकार करू नको.

४. प्रत्येक मनुष्य इतर सर्वांपेक्षा स्वतःवर जास्त प्रीती करीत असून, दुसऱ्याचा आपल्याविषयी काही अनुकूल अभिप्राय व्हावा, अशी इच्छा मात्र त्यासच फार असावी आणि आपल्याविषयी आपल्या स्वतःच्याच झालेल्या अभिप्रायाचे त्यास काहीच वाटू नये, हे मोठे नवल होय. एखाद्या देवाने किंवा मोठ्या गुरूने मनुष्यास येऊन सांगितले की, तू कशाचीही पर्वा न करता मनातील सर्व बेत व विचार बेलाशक बोलून दाखव, तर त्याप्रमाणे त्याचे वर्तन एक दिवससुद्धा चालावयाचे नाही. यावरून हे उघड होते की, स्वतःचे मन आपणास काय म्हणेल याची पर्वा मनुष्यास नसते, तर दुसरे लोक आपणास काय म्हणतील याजकडेच त्याचे लक्ष विशेष असते.

५. देवांनी या चराचराची अशी चांगली मानवजातीच्या हितासाठी व्यवस्था केली असता काही उत्तम मनुष्ये, की ज्याचे दैवी शक्तीशी अगदी तादात्म्य झाले आहे असे म्हटल्यास चालेल व ज्याच्या हातून मोठमोठाली धर्मकृत्ये व धर्माचार घडलेले असतात, अशा माणसास मरणोत्तर काही एक स्थिती नसावी, त्यांचा अगदी मागमूसही कोठे उरू नये, अशी त्या देवाकडून योजना झाली असावी, असे म्हणवत नाही; परंतु अशी स्थिती खरोखर

असल्यास तू निश्चयेकरून असे जाण की, एतद्विरुद्ध स्थिती असणे उचित दिसल्यास देवांनी ती अवश्य योजिली असती. कारण ती न्याय्य असल्यास संभाव्य असती आणि निसर्गानुसार असती, तर निसर्गाकडून घडलीही असती; परंतु मरणोत्तर स्थिती नाही ही गोष्ट खरीच असल्यास ती नसणे योग्य असे खात्रीपूर्वक जाण. आधी अशा प्रकारच्या चौकसपणाने आपण देवांशी वाद-प्रतिवाद करतो असे होते आणि देव अत्युत्तम आणि अत्यंत न्यायी असल्यावाचून त्यांच्याशी असा वाद करणे इष्ट नाही आणि ते खरोखर अत्यंत सुजन व न्यायी असल्यास अन्याय किंवा अविवेक यास वश होऊन हा विश्वाच्या व्यवस्थेत त्यांनी काही एक वैगुण्य राहू दिले नाही.

६. कित्येक इष्ट गोष्टी तुला सिद्ध होण्याची आशा नसली, तर त्या करण्याचा अभ्यास त्वां सतत ठेवावा. उदाहरणार्थ असे पाहा की, आपला डावा हात उजव्या हाताइतका वाकबगार नसताही अभ्यासाने त्यास घोड्याची लगाम उजव्या हातापेक्षा जास्त मजबूत धरता येते.

७. मरणसमयी मनुष्याने आपला देह आणि आत्मा यांची स्थिती कशी राखली पाहिजे याचा विचार कर. त्याचप्रमाणे हे जीवित अल्प आहे. भूतकाळ आणि भविष्यकाळ हे अगाध अपार अशा समुद्रवत् आहेत. सर्व जडांश निर्बल आहे, असे मनात आण.

८. वस्तूंच्या ठायी ज्या तत्त्वांच्या योगाने त्यास विवक्षित आकार प्राप्त झाला आहे त्यांचा विचार कर. त्याचप्रमाणे सर्व व्यापाराचे उद्देश काय आहेत, सुख, दुःख, मरण व कीर्ती यांचे वास्तविक स्वरूप काय आहे. कोण आपल्या स्वत:च्या अस्वस्थतेस कारण होतो. कोणाही मनुष्यास इतरांकडून कशी हरकत घडत नाही, आपण जे काही पाहत आहोत ते सारे कसे भासवत आहे इत्यादी गोष्टीचे मनन कर.

९. जे सिद्धांत तुला मान्य झाले आहेत त्यांची उपस्थिती तुला सतत असावी, त्यास तू क्षणभरसुद्धा विसंबू नको.

१०. हर एक वस्तूचा जडांश, चिदांश आणि उद्देश यांचे नीट अवलोकन करून तिचे वास्तविक स्वरूप ओळख.

११. देवास जे प्रिय होईल तेच करण्याचे व त्यांनी दिलेल्या सर्व वस्तूंचा अनन्यभावे स्वीकार करण्याचे मनुष्यास पुष्कळ सामर्थ्य आहे.

१२. जे निसर्गानुसार घडत असेल त्याजबद्दल आपण देवाला दोष देऊ नये. कारण त्यांच्याकडून मुद्दाम किंवा नाइलाजास्तव काही एक गैरास्त काम व्हावयाचे नाही, त्याचप्रमाणे लोकांनाही त्याजबद्दल ठपका देऊ नये. कारण त्याजकडून जे गैरवर्तन होते ते फक्त नाइलाजास्तव होते. एकंदरीत सारांश काय की, आपण कोणालाही दोष देणे उचित नव्हे. (पु. २:११, १२, १३, पु. ७:६२, पु. ८:१७)

१३. या संसारामध्ये घडणाऱ्या गोष्टींविषयी जो विस्मय पावतो तो केवळ उपहास्य व गैरवाकब समजावयाचा!

१४. या विश्वाच्या स्थितीसंबंधाने तीनच कल्पना संभवतात. एक तर कधी न फिरणारी व्यवस्था चोहोकडे असून, प्रत्येक वस्तूची नियती सर्व प्रकारे निश्चित झाली आहे. दुसरी कल्पना अशी की, हे सारे विश्व कोणातरी दयाळू महाशक्तीच्या योजनेने सद्य:स्थिती पावले आहे आणि तिसरी कल्पना अशी की, हा सारा पसारा केवळ यदृच्छेने अस्तित्वात आला असून, त्याचा कोणीही नियंता नाही (पु. ४:२७). आता जर चोहोकडे देवगतीचे अप्रतिहत सामराज्य चालावयाचे, तर मग तीस प्रत्यवाय करण्याचा प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे? परंतु कोणी योजक देवता असून, तिला प्रसन्न करून घेता येण्यासारखे असले, तर तिच्या साहाय्यास स्वतःला अनुरूप मात्र कर; परंतु साराच ब्रह्मघोटाळा असून, कोणी नियंता नसल्यास अशा प्रचंड वादळातही आपल्याठायी नियामक ज्ञानतत्त्व आहे. याजबद्दल समाधान मानून राहा. आणि या वादळांत तुझी इतिश्री झाली तरी फक्त हा जडदेह, हा क्षुद्र प्राण व इतर वस्तू यांसच फक्त तू मुकशील. तुझ्या ज्ञानतत्त्वाचा नाश कदापि व्हावयाचा नाही.

१५. दिव्याच्या ज्योतीचा प्रकाश जसा तो मालवीपर्यंत कायम राहतो, तसाच तुझ्या ठायीचे सत्य, न्याय, संयम इत्यादिकांचा देहावसान होईपर्यंत मुळीच लोप व्हावयाचा नाही.

१६. कोणाही मनुष्याने एखादा अपराध केला आहे असे दिसल्यावरूनच फक्त ते त्याचे कृत्य गैरशिस्त आहे, असे मला कळण्याला काय आधार आहे बरे? बरे त्याने खरोखरीच अपराध केला असला तरी त्याजबद्दल त्याने स्वत:ला दोष दिला नसेल, असे मानायला मजपाशी काय पुरावा आहे? वाईट मनुष्याकडून अनीतीचे आचरण होऊ नये अशी इच्छा जो धरतो तो अंजिराच्या फळात रस होऊ नये, मुलांनी रडू नये किंवा घोड्यांनी खिंकाळू नये इत्यादी गोष्टी इच्छिणाऱ्यांसारखाच वेडा समजावयाचा. कारण ज्याचा मुळी स्वभावच दुष्ट आहे त्याने काय करावे? त्याचे आचरण पाहून तुला त्याचा संताप येत असेल, तर त्याचा स्वभाव पालट.

१७. कोणतीही गोष्ट रास्त नसल्यास करू नको; सत्य नसल्यास बोलू नको.

१८. जी कोणतीही वस्तू तुझ्या इंद्रियाला गोचर होईल तिचे स्वरूप ओळख. तिचे पृथक्करण करून तिचा जडांश, चिदांश, उद्देश आणि आयुर्मर्यादा ही कशी काय आहेत ते पाहा.

१९. ज्या वस्तूंनी तुझ्या चित्तास व्यामोह होऊन त्याची ओढाताण होत आहे त्यांजपेक्षा विशेष चांगले आणि दैवी असे काहीतरी तुजमध्ये आहे असे तू जाण. भीती, आकांक्षा, वासना इत्यादिकांचा आपल्या चित्तात प्रवेश होऊ देऊ नको. (पु. ५:११)

२०. कोणतीही गोष्ट अविचाराने किंवा काहीतरी सद्धेतूवाचून करू नको. आपल्या सर्व कृत्याचा रोख समाजसुखवर्धनाकडे ठेव.

२१. थोड्याच वेळाने तू कोणी नव्हेस असे होऊन तुझा काही एक पत्ता उरणार नाही. तू जे आता पाहत आहेस त्यातले काहीही अक्षय राहणारे नव्हे. जी माणसे तू आता जिवंत पाहत आहेस ती सारी मृत्युपंथे जाणारी आहेत. कारण सर्व वस्तूंमध्ये फेरफार होऊन त्याचा विलय व्हावा आणि त्यांच्या जागी क्रमाक्रमाने दुसऱ्या वस्तू येत जाव्या असा निसर्गाचा स्पष्ट संकेत आहे (पु. ९:२८).

२२. लक्षात ठेव की, सर्व काही कल्पनांचा खेळ आहे आणि या कल्पना तर तुझ्या स्वाधीनच्या आहेत. तस्मात् तुला वाटेल तेव्हा या कल्पना स्वचित्तातून काढून टाक, म्हणजे तुझ्या या जीवित नौकेस संसारसागर शांत, स्थिर, निश्चल असा आढळेल.

२३. कोणताही व्यापार थांबावयाचा तेव्हा थांबला असता त्यास काही एक वावगे झाले असे समजू नये, तो व्यापार ज्याच्या हातून घडला त्यासही त्यात काही अनिष्ट नाही. हे जर खरे आहे तर सर्व व्यापारसमुच्चयरूप जे हे जीवित ते योग्य काळी विराम पावले असता काही एक अनिष्ट झाले असे म्हणता येत नाही; आणि ज्याचे ते आटपले असेल त्याचाही त्यात काही नाश झाला असेही होत नाही. आता निसर्गाने अशी सर्व वस्तूंची आयुर्मर्यादा नियत करण्याचा हेतू एवढाच की, त्यात वेळोवेळी फेरफार होऊन विश्व नित्य नवे आणि अविकलांग राहावे आणि जे काही समग्र विश्वास उपयोगी असते ते कल्याणप्रद आणि समयोचित समजावे. यास्तव मनुष्याच्या जीविताचा अंत होणे ही काही अनिष्ट गोष्ट नव्हे. कारण त्याचा इच्छेशी काही एक संबंध नसून सार्वत्रिक हितास ते विरुद्ध नसल्याकारणाने त्यात लज्जास्पद असे काही एक नाही; परंत ज्याअर्थी ते समयोचित असून, एकंदर विश्वास फायद्याचे व अविरुद्ध आहे, त्याअर्थी ते चांगलेच आहे. ज्याच्या आचरणाचा देवांच्या आचरणाशी विरोध नसून त्या देवांस संमत आहे अशा हेतूंचेच ते संपादक असते, तो देवाच्या इच्छेप्रमाणे वागतो असे समजावे.

२४. पुढे सांगतो त्या तीन सिद्धांतांची आपल्या चित्ताच्या ठायी नित्य उपस्थिती ठेवावी. पहिला सिद्धांत असा की, जे काही तू करशील ते अविचाराने करू नये, तर अत्यंत न्यायशुद्ध रीतीने करावे; परंतु बाह्य जगामध्ये जे काही तुजला घडेल ते एकतर यदृच्छेने घडते आहे किंवा कोणातरी योजक शक्तीच्या इच्छेनुरूप घडत आहे असे समज आणि यापैकी कशासही दोष देणे तुला उचित नव्हे. दुसरा सिद्धांत असा की, प्रत्येक जीवमान वस्तूची बीजरूप स्थितीपासून आत्मप्राप्तीपर्यंत कशी काय अवस्था असते आणि आत्मसंचारापासून आत्मविसर्जनापर्यंत तीत कोणता फेरफार होत असतो; त्याचप्रमाणे तिचे घटकावयव कोणते असून, अवसानी तिचा विलय कोणत्या तत्त्वात होतो इत्यादी गोष्टींचा विचार अवश्य करावा. तिसरा सिद्धांत असा की, या पृथ्वीतलावरून अंतराळात उंच वर उभा राहून जर तू हा मानव संसार पाहशील तर त्याचे विलक्षण वैचित्र्य तुझ्या नजरेत येईल. त्याचप्रमाणे आसमंतामागच्या हवेत व तिजहूनही विरल अशी जी ईथर[१] तिजमध्ये असंख्य प्राणी राहत आहेत, असे तुझ्या दृष्टीस

पडेल आणि हा सारा प्रकार तू केव्हाही पाहिलास तरी सारखाच दिसणारा आहे. म्हणजे अर्थात् हे असे अवलोकन कितीदा केले तरी वस्तुमात्राचे सदृशत्व आणि अल्पायुत्व हीच दृष्टोत्पत्तीस येतील. तेव्हा अशा या गोष्टीच्या संग्रहात धन्यता मानण्यासारखे काय आहे बरे?

२५. भासमय कल्पनांचा परित्याग कर, म्हणजे तुझे सर्व उपाधीपासून विमोचन होईल. तर या कल्पनांचे निर्मूलन होण्यास कोणाकडून प्रत्यवाय घडत आहे याचा विचार कर.

२६. कोणत्याही गोष्टीचा तुला त्रास वाटला असता एकंदर गोष्टी विश्वनिसर्गानुसार घडत असतात आणि कोणाही मनुष्याकडून घडलेल्या अनन्वित आचरणापासून तुला काही एक अपाय घडणे नाही, हे दोन सिद्धांत तू विसरलास म्हणून समजावे. त्याचप्रमाणे जे काही आज घडत आहे, तेच अनादिकाळापासून घडत आले असून, पुढेही तसेच अनंत कालावधी घडत राहील आणि सांप्रतही सर्वत्र तेच घडत आहे. आणखी मनुष्याचा एकंदर मानवजातीशी अत्यंत निकट संबंध आहे. हा संबंध फक्त केवळ हाडामांसापुरताच नव्हे, तर सर्वांच्या ठायी असणाऱ्या ज्ञानतत्त्वांचा आहे. प्रत्येकाचे ज्ञानतत्त्व ही एक स्वतंत्र देवता असून, त्याचा उगम देवापासून आहे. या संसारात मनुष्याचे असे काही एक नाही. त्याचे मूल, त्याचा देह, त्याचा आत्मा ही सारी त्यास देवाकडून प्राप्त झाली आहेत. सर्व काही भासमय आहे. मनुष्याचे जीवित काय ते विद्यमान कालापुरते आहे, असे समजले पाहिजे; आणि त्या जीवितास मुकणे म्हणजे विद्यमान स्थितीस मुकणे होय. या सर्व विचारांची तुला विस्मृती होता कामा नये.

२७. ज्यांनी आजपर्यंत या संसारातील अनिष्टशा वाटणाऱ्या गोष्टींविषयी पुष्कळपणी कुरकुर केली आहे, ज्यांची अतिशयीत कीर्ती झाली होती, ज्यांच्यावर मोठमोठे प्रसंग गुदरले होते, त्यांनी युद्धे, लढाया यांची चोहोंकडे गर्दीच करून सोडली होती. ज्यांच्या ऐश्वर्यास पारावार नव्हता, अशा लोकांची आज काय वाट झाली आहे बरे? ते पार धुळीस मिळून केवळ नामशेष होऊन राहिले आहेत; परंतु हे नावही कितीसा काळ मागे उरणार? हे विचार सतत मनात आण. एखाद्या गोष्टीचे संपादन अभिमानास गुंतून मोठ्या उत्कंठेने करणारांची परिणामी काय दशा होते याचा विचार कर. ज्या गोष्टींविषयी अशा अवडंबराचा प्रयत्न करावयाचा त्या किती क्षुद्र असतात बरे! प्रत्येक प्रसंगी न्यायाने व संयमाने वागून देवाच्या आज्ञेचा भंग करू नये आणि हे सारे अगदी साधेपणाच्या वृत्तीने करावे. कारण आपण निरभिमान आहोत, असे दाखविण्यातच ज्यास मोठा अभिमान वाटतो त्याची ती वृत्ती अत्यंत अक्षम्य होय. हे सारे ध्यानात ठेवून जो वर्तेल तोच खरा तत्त्वविचारी.

२८. तू देव कोठे पाहिले आहेस? व तू जो त्याची भक्ती करतोस त्या तुला त्यांच्या अस्तित्वाचे आकलन कसे काय होते? असे कोणी प्रश्न केल्यास त्याला उत्तर येणेप्रमाणे आहे : पहिले तर असे आहे की, ते पाहिजे त्याला डोळ्यांनी दिसणारे[२] आहेत. दुसरे असे की, मला माझा स्वतःचा आत्मा दिसत नसूनही मी त्यास परमपूज्य मानतो की नाही?

मग अशीच गोष्ट देवाचीही आहे. त्याच्या सामर्थ्याचा जो अनुभव मला सतत घडत आहे त्यावरून मला त्याच्या अस्तित्वाचे आकलन होऊन मी त्याची भक्ती करतो.

२९. तुझे जीवन निर्भयपणे व्हावयास पाहिजे असल्यास प्रत्येक वस्तूचे अंतर्बाह्य अवलोकन कर म्हणजे अर्थात् तिचे वास्तविक स्वरूप काय आहे व तिचा जडांश व चिदांश काय आहे याचा पूर्ण तपास कर आणि जिवेभावे न्यायाने वाग व सत्यावलंब कर. एकसारखे सदाचरण केल्याने जीवित सुखानंदात राहील, एरव्ही नाही.

३०. सूर्यप्रकाशाच्या आड भिंती, पर्वत व इतर असंख्य वस्तू आल्या तरी तो एकच आहे. विश्वाची जडप्रकृती नानागुणविशिष्ट असंख्य वस्तूत वाटली गेलेली असली तरी ती एकच आहे. आत्मा जरी असंख्य प्रकारच्या निसर्गात व्यक्तिशः भिन्न भिन्न रूपांनी प्रविष्ट झालेला असला, तरी तोही एकच आहे. त्याचप्रमाणे ज्ञानविशिष्ट आत्माही जरी खंड विखंड पावलेला दिसत आहे तरी तो एकच आहे. आता वस्तुमात्रांची दुसरी अंगे जी वायू, पृथ्वी वगैरे ती भानरहित असून, स्नेहहीन आहेत. तथापि हे अंशही ज्ञानतत्त्व व गुरुत्वाकर्षण यांच्या योगाने संयुक्त स्थितीमध्ये राहतात; परंतु ज्ञानतत्त्वाचा असा एक विशेष धर्म आहे की, त्याची सजातीय तत्त्वांकडे प्रवृत्ती असून, ते त्याशी एकजीव होऊन जाते. हा त्यांचा संयोग ज्या वृत्तीच्या अनुकूलतेने होत असतो त्यास कोणत्याही गोष्टीपासून व्यत्यय घडत नाही.

३१. तुला जिवंत राहण्याची इच्छा आहे काय? तर मग त्यातले तुला काय आवडते बरे? ज्ञानेंद्रियांचे किंवा कर्मेंद्रियांचे व्यापार आवडतात की, शरीराची बुद्धी आणि क्षय ही आवडतात किंवा वाक्यशक्तीचा व विचारशक्तीचा उपयोग करणे आवडते? या सर्व गोष्टीत इच्छिण्यासारखी कोणती गोष्ट आहे बरे? परंतु जर या गोष्टी तुला क्षुल्लकशा सहज वाटण्यासारख्या आहेत, तर मग बाकी राहिलेली गोष्ट जी विवेक आणि देव यांस अनुसरून वागण्याची, तिजकडेच विशेष लक्ष दे. परंतु असे करावयाचे म्हणजे अर्थात मृत्यू आला असता वर सांगितलेल्या बाकीच्या सर्व गोष्टींस आपण अंतरू म्हणून वाटणारा जो खेद तो अत्यंत अप्रयोजक आहे, असे होते. तात्पर्य काय की, विवेकानुसरण व मृत्युभय ही परस्परांशी अत्यंत विसंवादी होत.

३२. अमर्याद व अगाध कलांचा केवढा अत्यल्प अंश बरे मनुष्याच्या वाट्यास आला आहे? त्याचप्रमाणे समग्र विश्वप्रकृतीचा व विश्वात्म्याचा केवढासा अंश मनुष्यास प्राप्त झाला आहे बरे?

आणि त्याचा संचार तरी पृथ्वीच्या केवढ्याशा तुकड्यावर आहे? हे सारे ध्यानात आणून असे मान की, आपल्या निसर्गानुसार वर्तण्याव्यतिरिक्त काही एक महत्त्वाचे नाही आणि या विश्वाच्या राहटीस अनुसरून जे तुला प्राप्त होईल ते मुकाट्याने सहन कर.

३३. आपल्या नियामक शक्तीचा योग्य उपयोग करण्यातच सर्व काही आहे. इतर सर्व गोष्टी तुझ्या कह्यांतल्या असोत वा नसोत. त्या केवळ क्षुल्लक व जड होत.

३४. सुखानुभव इष्ट असून, दुःखानुभव अनिष्ट आहे असे मानणारे सुद्धा मृत्यूला मोजीत नाहीत, ही गोष्ट ध्यानात आणली असता आपणास मृत्यू म्हणजे काही मोठासा भाऊ आहे, असे वाटणार नाही.

३५. ज्यास जे काही योग्य काळी घडेल तेवढेच कल्याणप्रद वाटते, ज्यास आपल्या हातून विवेकास अनुसरून कमी किंवा जास्त कृत्य घडल्याचे काहीच वाटत नाही आणि ज्यास आपल्याकडून या विश्वाचे चिंतन अल्प किंवा दीर्घ काळपर्यंत झाले तरी सारखेच वाटते, अशा मनुष्यास मृत्यू भयंकर वाटणार नाही (पु. ३:७, पु. ६:२३, पु. १०:२०, पु. १२:२३).

३६. हे मानवा, या जगद्रूप महाविशाल राष्ट्रातला तू रहिवासी आहेस. तुझे येथले जिणे केवढेही असले म्हणून त्यात तुझे काय गेले? जे सृष्टीनियमानुसार असते ते सर्वांस योग्यच असले पाहिजे. तेव्हा एखाद्या जुलमी राजाकडून किंवा अन्यायी न्यायाधीशाकडून तुझा देहांत न होता ज्या निसर्गाने तुला अस्तित्वात आणले त्यांजकडूनच जर तू मृत्यू पावत असलास, तर त्यात तुला विपत्ती ती कसली वाटावी? या जगद्रूप महारंगभूमीवर ज्या निसर्गाने तुला आपला अभिनय करण्याकरिता पाठविले आहे त्याजकडून जर तुला निष्क्रमण करण्याची आज्ञा होत आहे, तर मग त्या संबंधाने कुरकुर करण्यात काय अर्थ आहे? माझा अभिनय पुरा झाला नाही अशी सबब त्या विश्वाच्या सूत्रधारीपुढे काय कामाची? तुला त्याच्या या अत्यंत गूढ नाटक रचनेची काहीतरी माहिती आहे काय? जर नाही तर माझा अभिनय अमुकच वेळ चालला पाहिजे हे सांगणारा तू कोण? एकंदरीत सारांश म्हणून इतकाच की, देहावसानसमयास पूर्ण समाधानाने सादर राहा. कारण समग्र विश्वाची सूत्रे जो वागवीत आहे त्याची इच्छाच अशी आहे.

ऑरेलियस बादशहाची बोधवचने समाप्त.

संदर्भ:

१. आपल्या या पृथ्वीच्या सभोवती जे वातावरण आहे त्याच्या पलीकडे ईथर या नावाचे काहीतरी विरल तत्त्व आहे, असे आधुनिक पदार्थ विज्ञान्यांचेही मत आहे; परंतु स्टोइक लोकांच्या मते ते काही अवकाशापुरते मात्र आहे.
२. या विधानाचा अर्थ असा की, स्टोइक लोकांच्या मते हे समग्र विश्वच देवरूप असून, नभोमंडळांतील एकंदर तारेही देवच आहेत.

सारांश टीप : शरीर, प्राण व ज्ञानतत्त्व या तिन्हीच्या एकत्रीकरणातून हे अस्तित्व बनलेले आहे. पहिल्या दोनची निगा होता होई तोवर करता येते; पण तिसरा अंश हेच स्वःचे अस्तित्व आहे. नैतिक नियमांचा अवलंब करून शुद्ध विवेकाने वर्तन करावे.

❍❍❍

परिशिष्ट

सूचना - मार्कस आरैलियस बादशहाच्या बोधवचनात ज्या प्रसिद्ध पुरुषांचा उल्लेख जागोजाग झाला आहे, त्यांची संक्षिप्त माहिती या परिशिष्टात वर्णानुक्रमाने दिली आहे.

ॲन्टिपेटर - हा मॅसिडोनचा रहिवासी असून, ॲरिस्टॉटलाचा शिष्य होता. हा मॅसिडोनचे महाप्रतापी बादशहा जे फिलिप व अलेक्झांडर यांचा मोठा विश्वासू मंत्री होता. अलेक्झांडर मुलूखगिरीवर गेला असता त्याने आपल्या राज्याची सर्व व्यवस्था याच्या हाती दिली होती. हा इ. स. पू. ३१९ वे वर्षी वारला.

ॲन्टिस्थेनिस - हा एक तत्त्ववेत्ता इसवीसनापूर्वी चौथ्या शतकात अथेन्स येथे होऊन गेला. हा सॉक्रेटिसाचा शिष्य असून, सिनिक मताचा मूळ प्रवर्तक होय. याच्या खटपटीमुळे सॉक्रेटिसाचा नाहक छळ करणारे जे मेलिटस आणि ॲनिटस यांचे चांगले पारिपत्य झाले. पहिल्यास तर देहान्त शासन दिले आणि दुसऱ्यास हद्दपार केले. याची काही त्रोटक नीतिवचने मात्र आजला उपलब्ध आहेत.

ॲरिस्टॉटल - (ज.ख्रि. श. पू. ३८४, मृ. ख्रि. श. पू. ३२२) हा अथेन्स येथील महाविख्यात तत्त्ववेत्ता होय. हा एका राजवैद्याचा पुत्र होता. याच्याही मनातून प्रारंभी आपल्या बापाचाच धंदा चालवावयाचा होता; परंतु पुढे त्याची प्लेटोशी गाठ पडून तो त्याचा शिष्य झाला आणि त्याने तत्त्वज्ञानाचा मोठ्या उत्साहाने अभ्यास केला. मॅसिडोनच्या फिलिप बादशहाने आपला पुत्र जो अलेक्झांडर त्यास शिकविण्याकरिता याला आपल्या दरबारात ठेवून घेतले. पुढे अलेक्झांडर मुलूखगिरीवर निघाला असता आपल्या या गुरूस बरोबर बोलावू लागला; परंतु त्याने नाही म्हणून त्यास सांगून अथेन्स येथे परत जाऊन आपले तत्त्वज्ञान शिकविण्यास आरंभ केला. त्याच्या मताच्या लोकांस पेरिप्याटेटिक असे म्हणतात. कारण तो लिसियम

येथील बागेत इकडून तिकडे फिरत आपल्या शिष्यास पढवीत असे. त्याने पुष्कळ ग्रंथ लिहिले असून, ते आजला बहुतेक उपलब्ध आहेत. त्याने अलंकार, काव्य, राजनीती, व्यवहारनीती, पदार्थविज्ञान, गणितशास्त्र, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर मोठमोठाले ग्रंथ लिहिले आहेत. युरोपियन राष्ट्रांतील लोकांच्या मनावर या तत्त्वज्ञाच्या लेखांचा जितका परिणाम झाला आहे तितका दुसऱ्या कोणाच्या लेखाचा झालेला नाही. तिकडे जे मोठमोठे बुद्धिवान पुरुष होऊन गेले त्या सर्वांच्या ज्ञानाचा उगम या महातत्वज्ञाच्या ग्रंथांतून झाला आहे.

अलेक्झांडर - (ज. ख्रि. श. पू. ३५६, मृ. ख्रि. श. पू. ३२३) हा ग्रीस देशाच्या उत्तरेस म्यासिडोन म्हणून एक संस्थान आहे तेथचा राजा. याच्या बापाचे नाव फिलिप असे होते आणि याचा गुरू प्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल हा होता. हा आपल्या बापाप्रमाणेच पराक्रमी व राज्यविस्तारलोभी होता. याने इराण, एशिआमायनर, इजिप्त देशांवर स्वाऱ्या करून ते देश बहुतेक काबीज केले होते. ख्रि. श. पू. ३२७ वे वर्षी हा आमच्या हिंदुस्थानावरही आला होता, हे इतिहासप्रसिद्धच आहे. याने केवळ अल्पवयात जितके पराक्रम व लढाया केल्या तितक्या दुसऱ्या कोणी कधीही केल्या नाहीत असे म्हणतात. याच्या मनातून तेव्हा ज्ञात असलेले सारे जग आपल्या सत्तेखाली आणण्याचे होते; परंतु आयुष्याची दोरी मध्येच तुटून तो आपल्या वयाच्या तेहतिसाव्या वर्षी बॉबिलॉन येथे मरण पावला. हा मोठा संशयी व आपढंगी होता. याला आपल्या अलौकिक बुद्धीचा व हातून घडणाऱ्या पराक्रमाचा इतका गर्व झाला होता की, तो आपणास देवाचा अवतार म्हणे आणि याप्रमाणे आपल्या लष्कराने आपणास म्हणावे असे त्यास फार आवडे. तो मोठा मातृभक्त होता. इराणचा बादशहा डरायस यास त्याने जिंकून त्याचे राज्य काबीज केले असता त्या बादशहाची आई व बायको ही त्याच्या हाती लागली. त्यांचा त्याने बहुमानपूर्वक प्रतिपाळ केला. डरायसच्या आईला तर त्याने आपल्या आईसारखाच केवळ मान दिला आणि त्याची बायको अप्रतिम रूपवती असता तिच्याविषयी त्याच्या मनात बिलकूल पाप-वासना उद्भवली नाही. एवढ्या तरुण वयातही त्याच्या ठायी अशी नीती कायम होण्यास कारण त्याच्या गुरूचे शिक्षण होय.

अगेथान - (ज. ख्रि. श. पू. ४४७) हा एक ग्रीस देशातला शोकपर्यवसानी नाटके रचणारा कवी. याला चांगली नाटके रचण्याबद्दल ऑलिम्पिकच्या ज्या प्रसिद्ध यात्रा भरत असत त्यातल्या एका यात्रेस बक्षीस मिळाले होते.

ऑगस्टस् - (ज. ख्रि. श. पू. ६३, मृ. इ. स. १४) हा रोमन लोकांचा दुसरा बादशहा. हा सीझराचा भाचा असून, त्यास त्याने दत्तक घेतले होते. सीझराची सर्व मालमत्ता पुढे यासच मिळाली. इतकेच नव्हे, तर ज्या गोष्टीसाठी सीझरच्या प्राणाची आहुती पडली होती ती गोष्ट म्हणजे राजवैभव ते त्याने एकसारखे पन्नास वर्षे अनुभविले. सीझरचा वध झाल्यावर

त्याचा मित्र जो ॲन्टनी याच्याशी एक होऊन त्याने सीझरच्या शत्रूचा नि:पात करून आपण लवकरच रोमचा बादशहा झाला. याच्या अमदानीत रोमन राज्यात जिकडे तिकडे बरीच शांतता होऊन लोक सुखी झाले. आपल्या प्रजेचे कल्याण करण्यास हा अगदी मनापासून झटे. याचेच नाव पुढे रोमन बादशहांनी चालविले.

आर्किमेडिस - हा ग्रीस देशातला मोठा गणिती. 'मला माझे यंत्रसाहित्य ठेवण्यास जागा सापडेल, तर मी पृथ्वी उचलीन,' असे तो म्हणत असे. त्याने केलेले पुष्कळ यांत्रिक शोध व युक्ती आधुनिक विद्वन्मान्य आहेत. त्याचे कित्येक ग्रंथ आजला उपलब्ध आहेत.

एपिक्टेटस - (ज. इ. स. ५०) हा एक रोमनगरीत राहणारा स्टोइक तत्त्वज्ञ होता. हा पूर्वी गुलाम होता. डॉमिशियन नामक रोमी बादशहाने त्यास रोम येथून हाकलून दिले होते; परंतु पुढे हेड्रिअन बादशहाच्या वेळी तो पुनः रोमनगरीत आला. हेड्रिअन व मार्कस ऑरेलियस हे त्याला फार मानीत. आत्मा अमर आहे व आत्महत्या करणे सर्वथा निषिद्ध आहे असे तो प्रतिपादित असे. त्याने 'एन्किरिडिअन' नामक एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात स्टोइक तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाचे निरूपण उत्कृष्ट केले आहे. या ग्रंथात पुष्कळ चांगल्या बोधाची वचने आहेत. मार्कस ऑरेलियस याने या तत्त्वज्ञाच्या लेखांपासून व भाषणांपासून आपणास पुष्कळ फायदा झाला व आपले स्वतःचे वर्तन व राज्याची व्यवस्था ही आपणास चांगली ठेवता आली म्हणून देवांचे आपल्या बोधवचनात आभार मानले आहेत.

एपिक्युरस् - (ज. ख्रि. श. पूर्वी ३४१, मृ. ख्रि. श. पू. २७०) हा एक ग्रीस देशातला महाप्रसिद्ध तत्त्ववेत्ता होता. त्याचे तत्त्वज्ञान पुष्कळ लोकांस आवडून त्याचे शिष्यही पुष्कळ झाले. हे सारे शिष्य एकत्र राहून आपली सर्व चीजवस्तू व मालमिळकत एकत्र ठेवीत व मोठ्या काटकसरीने खर्चवेच करीत. या तत्त्वज्ञाने कमीत कमी तीनशे ग्रंथ लिहिले होते असे म्हणतात. याच्या तत्त्वज्ञानाचा कल नास्तिक्याकडे बराच होता. सौख्यप्राप्ती हाच सर्व सदाचाराचा व ज्ञानाचा अंतिम हेतू असावा असे तो प्रतिपादन करी. या त्याच्या मताविषयी त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी लोकांत पष्कळ गैरसमज पसरविलेला आहे. त्याचे स्वतःचे वर्तन अत्यंत निर्मळ असन, खरे सख नित्याचरणातच आहे, असे तो म्हणे.

कॅमिलस् - (ज. ख्रि. श. पू. ३६५) हा रोमन लोकांत एक अतिविख्यात देशभक्त होऊन गेला. याने रोमन लोकांचे प्रजासत्ताक राज्य वाढविण्यास व सुरक्षित ठेवण्यास पुष्कळ श्रम केले. हा मोठा बुद्धिमान असून, नीतिमानही होता. याचे शौर्य फारच अलौकिक होते. यास सरकारी पैशाची अफरातफर केल्याच्या आरोपावरून हद्दपार केले असता गॉल लोकांनी रोम शहर अगदी उद्ध्वस्त करून टाकण्याच्या लागास आणले तेव्हा याने आपला खासगी द्वेष एकीकडे ठेवून त्या शहराच्या बचावासाठी कंबर बांधली आणि रोमचे प्रजासत्ताक राज्य आपल्या पराक्रमाने कायम राखले.

कपिल - याचे वृत्त साधार असे फारसे सापडत नाही. हा निरीश्वरसांख्यशास्त्राचा प्रणेता म्हणून प्रसिद्ध आहे. याच्या मते या विश्वाचा कोणी उत्पादक नसून परमाणूंची भूमिती श्रेढीने वृद्धी होऊन हे सर्व चराचर निर्माण झाले आहे. याच्या काळचे इतर सर्व आर्य लोक देवावर पूर्ण श्रद्धा ठेवणारे असता, असा स्वतंत्र बुद्धीचा व लोकाचारास न जुमानता स्वतःस सत्यसे वाटले त्याचा पुरस्कार करणारा मनुष्य त्या काळी निपजला हे मोठे नवल होय. यावरून पाहता हा मोठा सत्याभिमानी व स्पष्टवक्ता असावा असे दिसते.

क्रिसिपस् - हा स्टोइकतत्त्वज्ञ झिनोचा शिष्य जो क्लिअन्थीस याच्यामागून स्टोआ येथील मुख्य अध्यापक झाला. याने एपिक्युरिअन तत्त्वज्ञांशी वादविवाद करून त्याच्या मताचे खंडन व स्वमताचे मंडन उत्कृष्ट रीतीने केले अशी त्याची आख्या आहे. याचा व्यासंग व उद्योग प्रचंड होता. हा मोठा वावदूक असून, त्याने ७०५ ग्रंथ लिहिले होते, अशी दंतकथा आहे. त्यापैकी आता अगदी थोडे केवळ अंशरूपाने उपलब्ध आहेत. याचा जन्म खि. श. पूर्वी २८० व्यावर्षी झाला असून, तो खि. श. पू. २०७ या वर्षी मृत्यू पावला.

क्लिअन्थिस् - (ज. ख्रि. श. पू. ३००, मृत्यू ख्रि. श. पू. २२०) हा एक ग्रीस देशातला स्टोइक तत्त्ववेत्ता होय. हा स्टोइक मताचा प्रथम प्रवर्तक जो झिनो त्याचा शिष्य होता. हा तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असता केवळ हस्तश्रमाची कामे करून आपली उपजीविका करीत असे. झिनो वारल्यावर हा त्याच्या जागी अध्यापक झाला. त्याचे शिष्यत्व काही राजांनीसुद्धा पत्करले होते. त्यापैकी मासिडोनचा राजा ॲन्टिगोनस हा एक होता. त्याच्या इतर शिष्यांत क्रिसिपस हा प्रमुख होय. त्याने ग्रीक लोकांचा मुख्य देव जो झुअस त्याचे एक स्तोत्र लिहिले आहे. ही कविता ग्रीक भाषेतील अत्युत्तम कवितांमध्ये मोडते. त्याने आपल्या वयाच्या ८० व्यावर्षी अन्नपाणी वर्जून प्राणत्याग केला.

केटो - (ज. ख्रि. श. पू. ९५, मृ. अ. श. पू. ४६) हा एक स्टोइकमतानुयायी रोमन गृहस्थ होता. रोमन इतिहासामध्ये सिसरो, सीझर, पॉम्पी वगैरे ज्या प्रसिद्ध पुरुषांच्या खटपटी वर्णिल्या आहेत त्यामध्ये याचे अंग प्रमुखत्वाने होते. त्याचा स्वभाव फारच तलख होता. त्याचे सीझरशी मोठे हाडवैर होते. पुढे सीझर चोहोकडे विजयी होऊन आपला सूड उगविण्याकरिता आपल्यावर चालून येतो आहे असे ऐकून तो स्वस्थपणे आपल्या जावयाच्या खोलीत गेला आणि तेथे आत्म्याच्या अमरत्वावरील प्लेटो संवादरूप ग्रंथ वाचून त्याने आत्महत्या केली.

गेलन - (ज. इ. स. १०३, मृ. इ. स. १९३) हा ग्रीस येथील प्रसिद्ध वैद्य होता. त्याने आपल्या विद्येत निपण होण्यासाठी मिसर वगैरे देशात पष्कळ पर्यटन केले. पढे तो रोमनगरीत जाऊन राहिला होता. रोग बरे करण्याचे त्याचे सामर्थ्य पाहून सामान्य लोकांस परम विस्मय वाटे आणि ते सामर्थ्य त्यास मंत्रविद्येने साध्य झाले आहे, असे ते म्हणत. मार्कस ऑरेलियस

बादशहाशी याचे बरेच सख्य होते. या बादशहाच्या मरणानंतर हा रोम शहर सोडून गेला. हा महावैद्य ९० वर्षांचा होऊन मेला. याने तीनशे ग्रंथ लिहिले होते. ते सारे रोमनगरीत एका देवळात ठेवले असता त्या देवळास आग लावून त्यातले बहुतेक जळून गेले. या विद्वान पुरुषाचे पुष्कळ शोध अर्वाचीन वैद्यक ज्ञानात सामील झाले आहेत. यामुळे मनुष्यजातीवर त्याचे अक्षय उपकार झाले आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही.

जैमिनी - याचे वृत्त म्हणण्यासारखे काही एक उपलब्ध नाही. जे आहे ते अद्भुत कल्पित कथांनी अवगुंठित असे आहे. तेव्हा ते सप्रमाण म्हणून येथे देणे वाजवी नव्हे. हा पूर्व मीमांसेचा कर्ता होय. हा मोठा वावदूक असून, व्यास नामक दुसऱ्या एका मोठ्या ऋषीशी याचा वाद झाल्याची आख्या आहे.

झिनो - (ज. ख्रि. श. पूर्व ३५०, मृ. ख्रि. श. पू. २५२) भूमध्य समुद्रात सायप्रस नामे एक बेट आहे, तेथे सिशियन गावी याचा जन्म झाला. याचा बाप व्यापारी असून, यानेही हा उद्योग काही काळपर्यंत चालविला होता. एका प्रसंगी त्याच्या बापाने प्लेटो वगैरे साक्रेटिसाच्या अनुयायी जनांनी लिहिलेले काही ग्रंथ आथेन्स येथून आणले. झिनोने या ग्रंथाचे मोठ्या उत्साहाने व आस्थेने अध्ययन केले. या ग्रंथाच्या परिशीलनाने त्यास त्यातल्यासारखे ज्ञान आणखी प्राप्त करून घेण्याचा हव्यास लागून तो अथेन्स येथे आला. त्या वेळी त्याचे वय तीस वर्षांचे होते. त्याने या शहरी येताना बरोबर काही व्यापाराचा माल आणला होता. तो बंदरात तारू फुटून सगळ्याचा सगळा गमावला. याप्रमाणे अगदी कंगाल होऊन सदरील शहरी फिरत असता एके दिवशी तो एका पुस्तकवाल्याच्या दुकानात गेला आणि तेथे झिनोफनकृत मेमोरेब्लिया नावाचा ग्रंथ वाचून त्या दुकानवाल्यास पुसू लागला की, असले ग्रंथ लिहिणारे विद्वान पुरुष या शहरात आहेत म्हणतात ते कोठे? असा तो प्रश्न विचारीत आहे इतक्यात क्रेटीज नामक एक सिनिकमताचा तत्त्ववेत्ता त्या वाटेने जात होता. त्याजकडे बोट करून तो दुकानवाला म्हणाला, 'हा एक त्यापैकीच आहे. जा त्याचा अनुयायी हो.' झिनो त्याच्याकडे जाऊन त्याचा शिष्य झाला; परंतु त्याच्या मताची त्यास लवकरच किळस येऊन त्याने त्यास सोडले आणि तो दुसरा कोणीतरी गुरू पाहू लागला. मग त्याची स्टिल्पो म्हणून जो मग्यारिकमताचा मूळ प्रवर्तक त्याच्याशी गाठ पडली. त्याजपासून त्यास फारसे काही ज्ञान प्राप्त झाले नाही. मात्र या दुसऱ्या गुरूकडून त्यास वावदूकपणा चांगला शिकावयास मिळाला. या कलेचा त्याने आपल्या उत्तरवयी फारच नामी उपयोग केला, अशी त्याची आख्या आहे. यापुढे प्लेटोचे अनुयायी जे झिनो, क्रिटस आणि पॉलिमो यांची कास त्याने धरली. याही तत्त्ववेत्त्यांच्या बोधाने तो तृप्त झाला नाही. याप्रमाणे सुमारे वीस वर्षे निरनिराळ्या गुरूंपासून व मतवाद्यांपासून मोठ्या मेहनतीने ज्ञान प्राप्त करून घेऊन नंतर आपले स्वत:चे तत्त्वज्ञान त्याने शिकविण्यास आरंभ केला. तो स्टोआ नामक ठिकाणी

आपले तत्त्वज्ञान शिकवीत असे म्हणून त्याच्या मतानुयायीस स्टोइक म्हणत. हे मूळ उपोद्धातांत सांगितलेच आहे.

त्याची वृत्ती शेवटपर्यंत चांगली राहून त्याचे आचरण अत्यंत शुद्ध होते. त्याचे आहारविहार अत्यंत बेताबाताचे होते. त्याचे नित्याचे अन्न म्हटले म्हणजे भाकर, अंजिरे आणि मध ही असत. त्याची मुद्रा फार गंभीर व उग्र असे. आथेन्सकर त्याला एवढा मान देत असत की, आपल्या शहराच्या किल्ल्याच्या चाव्या ते त्याच्यापाशी ठेवीत आणि ते मरण पावल्यावर त्यांनी त्याचा पितळेचा पुतळा करून तो प्रसिद्ध ठिकाणी उभा करून ठेवला. त्याच्या मरणाचे वृत्त जरासे चमत्कारिक आहे म्हणून ते येथे सांगतो. तो अठ्याण्णव वर्षांचा झाला असता, एके दिवशी आपल्या शाळेतून बाहेर पडत होता, तो तो अडखळून खाली पडला आणि त्याचे बोट मोडले. हा आपला जरठपणा पाहून तो फारच खिन्न झाला आणि तत्काळ उठून जमिनीवर पाय आपटून मोठ्याने म्हणाला, 'जीवित सोडून येण्याचा असा हा आग्रह वारंवार कशास पाहिजे? हे पृथ्वी, तुझे बोलावणे मला मान्य आहे,' असे म्हणून तो घरी गेला आणि तेथे गळफास लावून देहत्याग करता झाला!!

ट्रेजन - हा एक रोमन बादशहा होता, यास निर्वा बादशहाने दत्तक घेतल्यावरून तो इ. स. ९८ साली रोमच्या गादीवर आला. याच्या कारकीर्दीत पुष्कळ मोठमोठाले पराक्रम रोमन लोकांनी केले. याने लोकांच्या सोयीचीही पुष्कळ कामे केली. याच्या वेळी खिस्ती लोकांचा अतिशयीत छळ झाला.

डायओजेनिस - (ज. ख्रि. श. पू. ४१४, मृ. ख्रि. श. पूर्वी ३२३) हा एक सिनिकमतानुयायी तत्त्ववेत्ता होता. या मतात जी विरक्तता प्रतिपादिली आहे, तिजप्रमाणे वर्तन ठेवले असे यानेच. तो लतकऱ्या पांघरून रस्त्यात कुठेतरी बसून किंवा पडून असे. केवळ प्राणधारण व्हावे म्हणून तो अगदी साधे अन्न खात असे. त्याचे एक पिंप असे. त्यात त्याचा सारा संसार असे आणि तो जिकडे जाई तिकडे ते डोईवर घेऊन जात असे. कारिन्थ येथे असता अलेक्झांडर बादशहाची आणि याची मुलाखत झाली. बादशहाने त्यास म्हटले, 'मी अलेक्झांडर बादशहा आहे.' तेव्हा हा म्हणाला, 'मी डायओजेनिस आहे.' त्यावर बादशहाने त्यास विचारले की, 'मी आपणास काही देऊ काय?' हा म्हणाला, 'होय, माझ्या आड तू उभा राहिल्यामुळे मजवर ऊन पडत नाही, याकरिता जरा एकीकडे हो, एवढेच तुजकडून मला पाहिजे.' बादशहा हा विरक्त पुरुषाचे निःसीम निरपेक्षत्व पाहून अगदी चकित झाला आणि म्हणाला की, 'मी जर बादशहा नसतो तर याची वृत्ती धारण करून स्वस्थ राहतो'. असे सांगतात की, हा साधू पुरुष रस्त्यात पडून शांतपणे मरण पावला. अथेन्सकरांनी त्याचा प्रेतसंस्कार मोठ्या थाटाने केला.

डायन् - हा एक प्लेटोचा शिष्य होता. तो सायरेक्यूज नामक सिसिलीमधील एका शहराचा रहिवासी होता. हा मोठा स्वदेशभक्त होता अशी त्याची ख्याती आहे.

डिमॉक्रि**टस् -** हा एक प्रख्यात ग्रीकतत्त्ववेत्ता ख्रि. श. पूर्वी दोन शतके होऊन गेला. त्याचा बाप मोठा संपत्तीवान होता; परंतु यास संपत्तीपेक्षा ज्ञानाची आवड विशेष असल्यामुळे त्याने आपल्या बापाचे सारे वित्त ज्ञानार्जनार्थ प्रवास करण्यात खर्चून टाकले. तो आपल्या वेळच्या पंडितांत अग्रगण्य होता आणि त्याचे आचरणही अत्यंत शुद्ध होते. त्याने पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील काही अंशतः आजला उपलब्ध आहेत. हे विश्व परमाणुसंघाच्या योगाने बनले आहे, असा तर्क पहिल्याने याच तत्त्ववेत्त्याने केला. प्रोफेसर टिन्डाल नामक इंग्लंडातील एका शास्त्रज्ञाने याच्या या परमाणुवादाचा उल्लेख केल्यामुळे त्याच्या तद्विषयक लेखाकडे तिकडील लोकांचे पुन्हा लक्ष गेले आहे.

थेलीज - (ज. ख्रि. पू. ६३६, मृ. ख्रि. पू. ५४५) हा ग्रीस देशांतला पहिला तत्त्ववेत्ता. याने ज्ञानार्जनार्थ पुष्कळ पर्यटन केले. मिसर देशात राहून तेथील विद्येचा पुष्कळ काळपर्यंत त्याने अभ्यास केला. तेथून परत येऊन त्याने अथेन्स येथे आपले तत्त्वज्ञान लोकांस शिकविण्यास सुरुवात केली. याने भूमितीत बरेच नवे शोध केले आहेत. पायथ्यागोरस नामक महाप्रख्यात गणित शास्त्रज्ञ याचा शिष्य होता. सोलन नामा ग्रीस देशातला प्रसिद्ध शहाणा पुरुष याचे काही वेळपर्यंत शिष्यत्व पत्करून होता. वर्षाचे दिवस ३६५ आहेत, असे पहिल्याने याने स्थापित केले, तसेच ग्रहणांची खरी उत्पत्ती प्रथमतः यानेच प्रवृत्त केली. याला ग्रीक तत्त्वज्ञानाचा जनक म्हणतात.

नीरो - (ज. इ. स. ३७, मृ. इ. स. ६८) हा रोमन लोकांचा सहावा बादशहा. यास क्लॉवडिअस बादशहाने इ. स. ५० मध्ये दत्तक घेतले असून, त्याच्यामागून तो चार वर्षांनी गादीवर आला. पहिल्या पहिल्याने त्याच्या आचरणावरून असे दिसले की, तो चांगला राज्यकर्ता निपजेल; परंतु हा सर्व बाह्यात्कारीचा प्रकार होता. त्याने पुढे लवकरच सारे चांगुलपणाचे ढोंग एकीकडे ठेवून शेकडो अनन्वित, घोर व राक्षसी कर्मे करून जगाच्या इतिहासात अत्यंत नीच, दुष्ट व क्रूर अधिपती अशी आपली दुष्कीर्ती करून घेतली. त्याच्या जुलमास व अत्यंत घोर दुराचारास त्रासून शेवटी रोमन लोक त्याच्यावर उठले आणि त्यास त्यांनी ठार मारून टाकले.

पर्डिकास - हा एक म्यासिडोनिआचा राजा जो अलेक्झांडर याचा सेनापती होता. हा राजा मेल्यावर याने त्याच्या गादीवर बसण्याचा प्रयत्न केला; परंतु तो सफल झाला नाही. टालेमी वगैरे दुसऱ्या सरदारांनी त्याच्याशी लढून त्याचा नाश केला. मार्कस ऑरेलियस याची ही एक चूक आहे. सॉक्रेटीस यास या सरदाराने बोलावले नव्हते, तर त्याचा मुलगा जो आर्किलॉज याने त्यास बोलावले होते.

पॉम्पी - हे एक इटालीतील अति जुनाट नगर होते. हे वेसुविअस नामक ज्वालामुखी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले असून, इ. स. ७९ साली त्या पर्वताचा एकाएकी स्फोट

झाल्यामुळे त्याच्या पोटातून बाहेर पडलेली राख, दगड, धातूंचा रस यांच्या ढिगाराखाली ते पुरून गेले. इ. स. १७५५ मध्ये हा ढिगारा खणून त्याच्या मूळच्या त्या वेळच्या शहरातील घरेदारे, सामानसुमान वगैरे बाहेर काढले. ते आता हवे त्यास पाहावयास मिळण्याची सोय करून ठेवली आहे. ज्या वेळी हे शहर याप्रमाणे नाशाप्रत पावले त्या वेळी त्यात २०,००० वस्ती होती म्हणतात.

पॉम्पिअस - (ज. ख्रि. श. पू. १०६, मृ. ख्रि. श. पू. ४८) हा रोमन लोकांचा एक मोठा योद्धा होता. याने पुष्कळ लढाया लढून रोमन लोकांचा राज्यविस्तार व सत्ता ही बरीच वाढविली. याचा आणि सीझरनामक दुसऱ्या एका रोमन सरदाराचा विरोध उत्पन्न होऊन त्या दोघांचा यद्धप्रसंग झाला. त्यात त्याचा मोड होऊन तो मिसर देशाकडे पळत असता वाटेत त्यास कोणी ठार मारले. त्याचे शिर त्या मारेकऱ्याने सीझरकडे आणले असता सीझरने त्यास काही एक इनाम न देता उलटे त्यास ठार मारण्याचा हुकूम केला.

पायथागोरस - (ज. ख्रि. श. पू. ५८०, मृ. ख्रि. श. पू. ५००) हा एक ग्रीक तत्त्ववेत्ता होता. याने प्रथमतः मिसर देशात पुष्कळ दिवसांपर्यंत विद्याभ्यास करून मग आशियामध्ये बरेच पर्यटन केले होते. त्याने आपले तत्त्वज्ञान इटलीमध्ये लोकांना शिकवले. त्याच्या विद्वत्तेची ख्याती एवढी झाली होती की, त्याच्यापासून ज्ञानप्राप्ती व्हावी म्हणून दूरदूरचे लोक त्याच्याकडे येऊन राहिले होते. कोणीही शिष्य त्याजकडे शिकावयास आला असता त्यास तो पाच वर्षांपर्यंत मुके राहण्यास सांगत असे. पुढे मग त्याने आपले सारे वित्त सार्वत्रिक संग्रहात सामील करावे. याप्रमाणे त्याच्यापाशी तीनशे शिष्यांचा समुदाय जमला होता. ते सारे एकत्र राहून परस्परांशी केवळ बंधूच्या नात्याने वागत असत. पृथ्वी सर्व विश्वाचा मध्य असून, सूर्य तिजभोवती फिरत आहे असे तो म्हणे. त्याचा पुनर्जन्माच्या कल्पनेवर भरवसा होता. तो मांसभक्षण निषिद्ध मानीत असे. त्याचे लेख आज मुळीच उपलब्ध नाहीत.

प्लुटार्क - हा मूळचा ग्रीस देशातला रहिवासी असून, पुढे रोमनगरीत जाऊन राहिला होता. तेथे तो तत्त्वज्ञानावर ग्रीक भाषेत लोकांना व्याख्याने देत असे. हा त्या वेळच्या नीतिशास्त्र प्रर्वतकांपैकी एक असून, रोमनगरीतील मोठमोठ्या लोकांत त्याचे वजन होते. त्याने 'प्रसिद्ध पुरुषांची चरित्रे' या नावाचा एक उत्कृष्ट ग्रंथ केला आहे. या ग्रंथाची सर्व युरोपभर मोठी प्रसिद्धी आहे. याचा एक नीतीवरही ग्रंथ आहे; परंतु उतारवयात तो आपल्या जन्मभूमीस परत गेला होता. त्याचा जन्म इसवी सन ५० साली झाला असून, तो इसवी सन १२० साली मरण पावला.

प्लेटो - (ज. ख्रि. श. पू. ४२९, मृ. ख्रि. श. पू. ३४७) ग्रीस देशामध्ये जे मोठमोठे तत्त्ववेत्ते होऊन गेले त्यातला हा एक होय. त्याला प्रथमत: गायनादी ललित कलांचा फार शोक असून, त्याने काही मनोरंजक कविताही केल्या होत्या; परंतु पुढे त्याने सॉक्रेटिसाचे एक

वेळी एक बोधपर व्याख्यान ऐकल्यावर त्या कविता जाळून टाकून तो त्याचा शिष्य झाला. सॉक्रेटिसाचे अंतेवासित्व त्यास अवघे दहा वर्षे घडले. पुढे हा महागुरू मरण पावल्यावर त्याने ज्ञानप्रीत्यर्थ देशाटन केले. हे झाल्यावर तो अथेन्स येथे राहून आपले तत्त्वज्ञान लोकांस शिकवीत असे. त्यास पुष्कळ मोठमोठे अनुयायी मिळाले होते. सर्वांमध्ये ॲरिस्टॉटल नामक महापंडित मुख्य होता. आत्मा, ईश्वर, परलोक, नीती, राजनीती इत्यादी विषयांवरील त्याचे विचार फारच उदात्त आहेत म्हणून समजतात. त्याने पुष्कळसे ग्रंथ संवादरूपच केले आहेत.

फलारिस - हा सिसिली नामक बेटांत आग्रिजेन्टम म्हणून जे एक शहर आहे तेथचा जुलमी, क्रूर व अत्यंत दुष्टहृदयी राजा होता. याने हे शहर ख्रि. श. पूर्वी ५७० व्या वर्षी घेतले होते. याने आपल्याविरुद्ध उठणाऱ्या मनुष्यांचे प्राण घेण्याची निरनिराळी साधने उत्पन्न केली, अशी याची अपकीर्ती आहे. अशा मनुष्यवधाच्या त्याने काढलेल्या एका यंत्रात खुद्द त्यालाच घालून त्या शहराच्या लोकांनी पुढे त्याचा सूड उगविला.

फिलिप - हे नाव मॅसिडोन देशाच्या राजपरंपरेचे होते. तीत दुसरा फिलिप, जो अलेक्झांडरचा बाप तो महाविख्यात होऊन गेला, याने सगळा ग्रीस देश काबीज करून इराणवर स्वारी करण्याचा घाट घातला होता. सगळी तयारी होऊन त्या मोहिमेस तो निघणार तो त्यास एका खिजमतीस असलेल्या मनुष्याने ठार मारले, हा त्याचा बेत त्याचा मुलगा अलेक्झांडर याने शेवटास नेला. याच्याच नावावरून डिमॉस्थेनिस नामक अथेन्स येथील एका अत्यंत प्रसिद्ध वक्त्याच्या भाषणास फिलिपिक हे नाव मिळाले होते. ही भाषणे स्वदेशाभिमानी पुरुषाने फिलिपाविरुद्ध आपल्या देशबांधवांची उठावणी करण्याकरिता केली. त्याचे पहिल्यापहिल्याने बरेच चीज झाले; परंतु फिलिप राजाचे लष्कर व लाचलुचपतीने अथेन्सकरांत फाटाफूट करण्याचे त्याचे उपाय यापुढे त्यांचे काही एक चालले नाही.

ब्रूटस् - हा इसवी सनापूर्वी पाचव्या शतकात रोमनगरीत एक वीर पुरुष होऊन गेला. त्याचा वृत्तांत चांगलासा सापडत नाही. जो काही उपलब्ध आहे, त्यात काल्पनिक भाग बराच आहे. त्याने रोमनगरीतील टार्किन नामक एका प्राचीन राजास हाकलून देऊन व त्याच्या वंशजांचा संहार करून रोमनगरीत प्रजासत्ताक राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. याप्रमाणे लोकांच्या स्वातंत्र्यासाठी लढत असताना शेवटी तो रणात पडून मरण पावला. त्याचे प्रेत रोमनगरीत वाजत गाजत आणून त्याच्या प्रेतासंबंधाचे संस्कार सर्व लोकांनी मिळून केले. त्याच्या मृत्यूबद्दल रोमनगरीतील पोक्त स्त्रियांनी एक वर्षपर्यंत शोक केला. त्याला प्रजासत्ताक राज्याचा जनक म्हणतात.

सॅल्यामिस - ग्रीस देशाजवळ एक लहानसे बेट आहे. येथे थेमिस्टाक्लिस याने इराणी लोकांचा ख्रि. श. पू. ४८० मध्ये पराभव केला.

सॉक्रेटीस - (ज. ख्रि. श. पू. ४६९; मृत्यू ख्रि. श. पू. ३९९) या महातत्त्वज्ञ व साधू पुरुषाचे चरित्र आमच्या मराठी वाचकांस थोडेबहुत माहीत आहेच. हा अथेन्स येथील राहणारा असून, त्याच्या बापाचा व काही वेळपर्यंत याचाही धंदा मूर्तिकाराचा होता. त्या वेळच्या जानपदधर्माप्रमाणे तो युद्धकलेतही निष्णात असून, स्वदेशरक्षणार्थ परकीयांशी कित्येक वेळा युद्धप्रसंग झाले असता त्यात त्याने चांगला नावलौकिक मिळविला. त्याच्या वेळच्या सर्व लोकांहून त्याचा पोशाख व खाणेपिणेही अगदी साधे असे. त्याच्या तत्त्वज्ञानविषयक बोधाचा मुख्य रोख नित्याचरणाची आवश्यकता स्थापित करण्याकडे असे. आपल्या वेळच्या तरुण जनास त्याने चांगला बोध करून सन्मार्गवर्ती केले. त्याचे मतस्वातंत्र्य व अलौकिक वक्तृत्व पाहून जसे पुष्कळ विचारी जन त्याचे अनुयायी झाले, तसेच त्याला या गुणास्तव कित्येक शत्रूही उत्पन्न झाले. त्यात मेलिटस आणि ॲनिटस हे प्रमुख होते. त्यांनी त्याच्यावर तरुण जनांची मने बिघडविल्याचा, धर्मात फेरफार करण्याचा प्रयत्न केल्याचा व देवांची निंदा केल्याचा खोटाच आरोप रचला आणि त्यास पाचशे न्यायाधीशांच्या कचेरीपुढे आणून त्याची चौकशी केली. या चौकशीत तो बहुमते दोषी ठरला आणि त्यास मरणाची शिक्षा झाली; परंतु त्या वेळी ग्रीक लोकांचा कोणतासा एक सण होता, म्हणून त्याची ती शिक्षा एक महिना तहकूब केली. हा एवढा अवकाश त्याने आपल्या अनुयायांबरोबर मोठमोठ्या महत्त्वाच्या विषयांवर संभाषण करण्यात घालविला. त्यावेळी त्याला कोणी पळून जाण्याविषयीही आग्रह केला; परंतु त्याने मोठ्या दिलदारपणे असे म्हटले की, 'मी कोठेही गेलो तरी मला मरण हे कधीतरी येणारच. मग येथेच का मरू नये?' त्याने शेवटी शांतपणे विष प्राशन करून देहत्याग केला. त्याची बोधवचने झिनोफन व प्लेटो या दोन प्रख्यात पुरुषांच्या परिश्रमाने आज पुष्कळ उपलब्ध आहेत. सत्य संशोधनाची व कोणाच्याही मनात असलेल्या भ्रामक मतांचे निर्मूलन करण्याची संवादरूप पद्धत त्यानेच पहिल्याने प्रचारात आणली. त्याच्या बोधास इतका मान देतात की, त्याने स्वर्गाचे नीतिशास्त्र भूलोकी आणले अशी त्याची आख्या आहे.

सिनिक - या नावाचे ग्रीस देशामध्ये तत्त्ववेत्ते होऊन गेले. हे जगातील संपत्ती, वैभव वगैरे सुखसाधने सर्व तुच्छ मानून अत्यंत विरक्ततेत आयुष्य घालवीत असत. लोकांतील सर्व व्यवहार व शहाणपणा यांचा ते उघड उघड तिरस्कार करीत. त्यांना जे हे नाव पडले ते या त्यांच्या वृत्तीवरूनच. 'सिनिक' याचा अर्थ 'कुत्र्यासारखा' असा होतो. या मताचा मूळ प्रवर्तक ॲन्टिस्थेनीस हा होता. या मताच्या लोकांत डायओजेनस हा अत्यंत विख्यात आहे.

सिपिओ - (ज. ख्रि. श. पू. २३५, मृ. ख्रि. श. पू. १८३) हा एक रोमन लोकांचा सेनापती होता. केनीच्या लढाईनंतर रोमन लोक अगदी हताश व हतवीर्य होऊन बहुतेक रोमन लष्करी अंमलदार आपापल्या नोकऱ्या सोडून जाण्याच्या बेतात असताना याने त्यास तसे करू

दिले नाही. त्यास स्वदेशाभिमानाच्या व स्वातंत्र्याच्या दोन गोष्टी सांगून त्यांच्या अंगात नवा दम आणला. पुढे रोमचे शत्रू जे कार्थेजचे संस्थान त्याच्याशी लढून याने झामाच्या लढाईत त्यास अगदी वठणीस आणले. रोमन लोक त्यास या पराक्रमाबद्दल फार मान देऊ लागले. हा त्याचा उत्कर्ष कित्येकांस सहन न होऊन त्यांनी त्यांच्यावर लाच घेतल्याचा खोटा आरोप आणला असता लोकांच्या आपल्यावर होणाऱ्या क्षोभांचे निवारण त्याने त्यास आपल्या झामा येथील पराक्रमाची आठवण देऊन केले. तो मोठा शूर, दयाळू व नीतिमान होता.

सीझर - (ज. ख्रि. श. पूर्वी १००, मृ. ख्रि. श. पू. ४४) हा रोमन लोकांतला अतिशयीत प्रख्यात व पराक्रमी सेनापती, वक्ता व ग्रंथकार होता. याने आपल्या संस्थानातले बहुतेक मोठमोठे हुद्दे वहिवाटून हा अगदी श्रेष्ठ पदास चढला होता. याने गॉलदेश (ज्यास हल्ली फ्रान्स म्हणतात) खालसा करून तेथे रोमन लोकांची सत्ता कायम केली. ग्रेट ब्रिटनचा शोध लावून यानेच पहिल्याने त्यात प्रवेश केला. याच्या मनातून रोमन लोकांचा बादशहा होण्याचे आले होते; परंतु तसे त्याच्या शत्रंनी त्यास करू दिले नाही. त्याचा हा बेत कळल्यावर एके दिवशी तो दरबारात बसला असता ब्रुटस वगैरे कित्येक स्वतंत्रताप्रिय पुरुषांनी त्याचा खून केला. हा सरदार मोठा क्रूर व आवेशी होता. यास आत्मवैभववृद्धीचा अतोनात हव्यास होता. याच वृत्तीस तो शेवटी बळी पडला. याच्या नावावरून रूस देशाच्या बादशहास हल्ली झार असे म्हणतात आणि आमच्या महाराणी साहेबांस १८७७ साली बडा दरबार करून जो बादशाही किताब दिला त्यात तरी याच्याच नावाचा अपभ्रंश आहे. केसर-इ-हिंद यात केसर म्हणजे सीझर होय.

सेन्ट पॉल - हा एक पूर्वी यहुदी असून, त्याने खिस्ती लोकांचा प्रारंभी फारच छळ केला; परंतु पुढे एकाएकी त्या धर्मावर त्याची श्रद्धा बसून त्याच्या प्रसारार्थ त्याने पुष्कळ खटपट केली. त्याचे लेख फार चांगले आहेत असे म्हणतात. याचा रोम शहरी खून झाला अशी दंतकथा आहे. हा इ. स. ६७ साली मेला.

सेनिका - (ज. ख्रि. श. पूर्वी ३, मृ. इ. सन ६५). हा एक रोमनगरीतील स्टोइक मतानुयायी तत्त्ववेत्ता होता. हा निरोनामक रोमन बादशहाच्या वेळी प्रसिद्धीस आला. हा या बादशहाचा लहानपणीचा गुरू होता. निरो राज्यपदारूढ झाल्यावर सैनिकाला त्याचा लोभी स्वभाव ठाऊक असल्यामुळे त्याने आपले स्वकष्टार्जित सारे वित्त त्याच्या हवाली करण्याचे योजिले; परंतु निरोने त्यास रुकार दिला नाही. पुढे लवकरच या कृतघ्न शिष्याने आपल्या गुरूचा घात केला. आपल्या विरुद्ध चाललेल्या एका कटात तो सामील आहे असा नसता आरोप त्याच्यावर ठेवून त्यास आत्महत्या करण्याचा हुकूम पाठविला. सेनेकाने मुकाट्याने विष प्राशन केले; पण त्याचा काही एक उपयोग झाला नाही. तेव्हा त्याने आपल्या साऱ्या शिरा फाडून घेतल्या. याप्रमाणे आपल्या देहाचे हालहाल करून त्याने प्राणत्याग केला!

हिपार्कस - हा ग्रीस देशातला महाप्रसिद्ध ज्योतिषशास्त्रवेत्ता होय. हा इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात होऊन गेला. आधुनिक ज्योतिषशास्त्र पद्धतीचा प्रथम प्रवर्तक हाच होय. आकाशातील गोलांच्या ज्ञानास शास्त्रीय स्वरूप प्रथमतः यानेच दिले

हिपोक्रेटिस - (ज. ख्रि. श. पू. ४६०, मृ. ख्रि. पू. ३५७). हा ग्रीक वैद्यशास्त्राचा मूळ प्रवर्तक. याच्यापूर्वी रोग चिकित्सा हे एक जादूचे काम समजत आणि धर्मोपाध्याय काहीतरी छांछू करून रोगी लोकांपासून पैसे उपटीत. रोगाचा उगम व विकास बारकाईने पाहून त्याच्या चिकित्सेचा निर्णय करण्याची आवश्यकता पहिल्याने यानेच दाखवून दिली. त्याचप्रमाणे पोटात प्यावयाच्या औषधाबरोबर पथ्यपाणीही सांभाळले पाहिजे, असेही यानेच आरंभी सिद्ध केले. त्याचा औषधोपचार अगदी साध्या प्रतीचा असून, लोकांस विलक्षण गुणकारी होत असे. हा शस्त्रक्रियेचाही थोडा थोडा उपयोग करीत असे; परंतु याच्या काळी प्रेतांविषयी ग्रीक लोकांत वेड्या समजुती असल्यामुळे त्यास या विषयाचे ज्ञान फारसे झाले नाही. याने वैद्यकावर पुष्कळ ग्रंथ लिहिले होते म्हणून सांगतात.

हिरॉक्लिटस - हा एक एशिआमायनर येथील तत्त्ववेत्ता होता. त्याला एकांतवासाची फार आवड असे. तो मनुष्याच्या मौर्ष्याबद्दल व दुराचाराबद्दल अहर्निश शोक करीत असे. म्हणून त्याला 'शोक करणारा' म्हणत. तो पक्का दैववादी होता. हे सर्व विश्व अग्नीचे बनले आहे, असे तो प्रतिपादित असे. तो अग्नीचा उपासक होता. हा खि. श. पू. पाचव्या शतकात होऊन गेला.

❍❍❍

कठीण शब्दांचा कोश

अ

अखिल - सर्व

अग्निरूप - विस्तवच, विस्तवाच्या स्वरूपाचे

अग्रेसर - पुढारी

अट्टहास - खटपट, आग्रह

अजमत - सामर्थ्य

अंतर्भाव - समावेश

अंतराय - अडथळा

अंतस्थ - आतल्या

अंतर्गर्भ - अगदी आतील ठिकाण

अंतिम - शेवटला

अंतेवासित्व - शिष्यत्व

अर्थाअर्थी - कोणत्याही अर्थी, वास्तविक पाहता

अद्वितीय - एकच

अध्यापक - गुरू, शिक्षक

अधिकारत्रयात्मक - सामान्य लोक, बडे लोक व राजा या तिघांच्या सत्ता जेथे चालतात ती

अधिष्ठान - ठिकाण

अनन्यभावेकरून - एकाच भावाने

अनन्वित कर्मे - वाईट, अयोग्य कर्मे

अनपेक्षित - न इच्छिलेले

अनादिकाल - ज्या कालास आरंभ नाही तो

अनाद्यनंत - ज्यास आदि व अंत नाही असा.

अनिरुद्धपणे - अडथळ्यावाचून, मोकळ्या रीतीने

अनुरूप - अनुसरून, लागून, योग्य

अनुषंगाने - धोरणाने, संगतीने

अनुताप - पश्चात्ताप

अनुवर्तन - प्रमाणे, वागणे

अनुग्रह - उपकार

अनुज्ञा - हुकूम

अनुकूळ कारण घटना - अवश्यकारणे जुळवून आणणे

अन्योन्य - परस्पर

अपलाप - छपवाछपवी

अप्रतिहत - ज्यास अटकाव होत नाही असा

अप्रबुद्ध - अज्ञान, बुद्धी न वाढलेला

अपूर्व - पूर्वी न घडलेली

अपेक्षणीय - इच्छिण्याजोगी

अपेक्षा - इच्छा

अबाह्य - आतील

अभावरूप - जो नाही असा

अभ्याससातत्य - नेहमी सवय करणे

अभ्यासप्राप्त सदाचारप्रवृत्ती - सवयीने आलेला चांगले वागण्याविषयीचा मनाचा कल

अभिन्न - वेगळे नाही असे

अभिमत - मान्य

अभिज्ञ - विशेष जाणत्या

अभिधान - नाव

अभिनय - प्रयोग, खेळ

अभेद - भेद नाही असा

अलौकिक - विलक्षण

अवकाश - जागा

अवयवी - ज्यास अवयव आहेत ते

अवशेष - भाग, अंश
अविकलांग - निर्विकार
अविलंबे - वेळ न लाविता
अविरतपणे - न थांबता
अंशरूप - थोडासा, काही
असवृत्ती - खोटी भावना
अस्मार्त - अनादि, आठवण नाही असा.
अहर्निश - रात्रंदिवस

आ

आकांक्षा - इच्छा
आकाशस्थ - आकाशात असणारे
आजन्म - जन्मभर
आत्मनिग्रह - मन स्वाधीन ठेवणे
आर्द्रत्वाची - ओलाव्याची
आदिशक्ती - विश्व उत्पन्न जिच्यापासून झाले ती शक्ती
आदिकारण - मूळ कारण
आद्य - मूळचे
आधुनिक तत्त्वज्ञ दृष्टीने - नव्या हल्लीच्या तत्त्वज्ञांच्या दृष्टीने
आप - पाणी
आवर्त परिभ्रमण - भोवऱ्याचे फिरणे
आसन्न मरण - मरायास टेकलेला
आस्वाद - चव घेणे
आहुती - नाश करून घेणे
आरोपित करणे - लागू करणे

इ

इच्छा स्वातंत्र्य - इच्छेप्रमाणे वागण्याची मोकळीक
इतिश्री - समाप्ती
इतिहासवेत्ते - इतिहास जाणणारे
इत्यर्थ - सारांश
इंद्रियविज्ञान - शरीराच्या इंद्रियांची ज्यात माहिती आहे ते
ईश्वरस्वरूप बोध - ईश्वर कसा आहे ते कळणे
इथर - एक प्रकारचा हवेहूनही पातळ वायू आहे

उ

उज्ज्वल - अत्यंत शुद्ध

उत्पत्तिविनाश - उत्पन्न होणे व नाश पावणे

उत्पादकत्व - उत्पन्न करण्याचे सामर्थ्य

उत्क्रांतिमतवाद - लहानापासून थोरापर्यंत सर्व प्राणी रूपांतर पावले आहेत असे दर्शविणारे शास्त्र

उद्धत - उद्धट

उदासीन - दुःखी, बेपर्वा

उदात्त - मोठी, उंच, थोर बुद्धीची

उद्धार - सुटणे

उपग्रह - लहान ग्रह

उद्भिजकोटी - वनस्पतीवर्ग

उद्भव - उत्पत्ती

उत्सर्ग पावणे - टाकले जाणे

ऊहापोह - निरूपण, वाटाघाट

उद्भूत होणे - उत्पन्न होणे

ए

एकरूप - सारखे,

एकच एकस्वरूप - दोन नव्हेत ते, सारखेच

एकीकरण - मिलाफ करणे, एक करणे

एतद्विषयक - यासंबंधी

एतद्रूप - या प्रकारची

औ

औद्धत्य - उद्धटपणा

क

कोंग - ढोंग

कटाक्ष - रोख

कंठरवाने - आग्रहपूर्वक

कृतकर्म - केलेले काम

कर्तव्यबुद्धी - जे करणे योग्य आहे ते करण्याविषयी इच्छा

कर्तृत्वप्रेरक इच्छा - हातून व्यापार घडविणारी इच्छा
चरित्रनायक - ज्याचे चरित्र लिहावयाचे तो
च्युत - भ्रष्ट, सुटलेला
चैतन्यविशिष्ट - ज्यात चैतन्य आहे असा

ज

जगदुत्पत्तीक्रम - जगाच्या उत्पत्तीचा क्रम
जड पदार्थस्वरूप - आकार ज्यांस आहे अशा पदार्थांचे स्वरूप
जर्जर - निर्बल
जडवाद - जड पदार्थांसंबंधी मत
जरठपणा - म्हातारपणा
जय्यत - तयार
जाणीव - जाणण्याची शक्ती
जातीने - स्वत: आपण
जानपद - देशातला राहणारा
जीवनक्रम - जगणे
जिज्ञासा - जाणण्याची इच्छा

त

तत्कालीन - त्या वेळच्या
तद्गतव्यापार - त्यात असणारे व्यापार
तादात्म्य पावणे - तसचे होऊन जाणे
तद्रुपच - त्याच प्रकारचा
तत्त्वविचारपद्धती - तत्त्वज्ञानाचा प्रकार
तत्त्वज्ञान - सृष्टीची व मनुष्याची उत्पत्ती, स्वरूप व शेवट यांची माहिती
तत्प्रेरित - त्याने प्रेरणा केलेली अथवा सुचविलेली
तरंग - लहरी, लाटा
तस्मात - त्याअर्थी, त्याकरिता
तत्त्वे - मूळ पदार्थ
तात्त्विक - तत्त्वसंबंधी
तारकरूप सूर्य - तारे हेच कोणी सूर्य
तारतम्यभाव - सारासार विचार
त्याज्य - टाकण्यास योग्य

त्याव्यतिरिक्त - त्याखेरीज
तुलनादर्शकशारीर - निरनिराळ्या प्राण्यांच्या शरीराची तुलना ज्यात असते ते शास्त्र
तेज - प्रताप, अग्नी
तेज:पुंज - तेजाने भरलेला
त्रोटक - तुटक तुटक, थोडेसे

द

दमन करणे - दाबात ठेवणे
दृष्टोत्यत्तीस - दिसण्यात
दिकप्रदर्शन - थोडेसे सांगणे
दिग्दर्शन - दाखविणे
द्विरुक्ती - दोन वेळा बोलणे
दुर्ग - किल्ला
दुर्वह - सहन करण्यास कठीण
दुजाभाव - मी व तू ही बुद्धी
दुराचारमग्नता - वाईट आचरणात गळून जाणे
देहावसान - मरण
द्वैतभाव - वेगळेपणा, दुजाभाव, मी तू-पण
दैवी स्वरूप - देवाचे रूप
दैवावलंब - नशिबावर भरवसा ठेवून राहणे
देदीप्यमान - चकचकीत
दैवायत्त - देवाच्या स्वाधीन

ध

धन्य - कृतकृत्य, सुखी
धमन्या - शुद्ध रक्त नेणाऱ्या
धमक - जोम
धर्म - गुण
धूमकेतू - शेंडे नक्षत्र
धूमपुंजसमूह - धुराच्या गोळ्यांचा जमाव
धूममय - धुराचे

न

नष्टचर्य - वाईट स्थिती

नाप्राप्त - भाग पडलेले

नानाकल्पनातरंग - निरनिराळ्या कल्पनांच्या लाटा

नीतिमत्तारूप - सदाचारीपणा हेच

निकोप - निरोगी

नीतिप्रवणता - नीतीकडे मनाचा कल

नीतिमार्गानुवर्ती - नीतीच्या मार्गाने जाणारे

नीत्यभ्यास - नीतीचा अभ्यास

नीत्याचरण - नीतीचे आचरण

नीतिशास्त्रप्रणेते - नीतिशास्त्राचे ज्ञान प्रचारात आणणारे

निर्देश करणे - दाखविणे

नियत - पूर्वीचे ठरलेले, नशीब

नियंता - व्यवस्था ठेवणारा

नियमन - व्यवस्था

नियामक - व्यवस्थितपणे चालविणारा

निर्दाळण - नाहीसा करणे

निरपेक्ष - निरीच्छ

निरास - नाहीसे होणे, जाणे

निर्मुक्त - अगदी सुटलेला

निसर्गाधीनता - सृष्टिक्रमाच्या स्वाधीन होणे

निरीक्षण - बारकाईने पाहणे

निर्माण - उत्पन्न

नि:शेषपणे - समूळ, काही न उरता

निसर्गानुसार जीवितक्रम - निसर्गाप्रमाणे वर्तण्याचा क्रम

नि:सीमनिरपेक्षत्व - पराकाष्ठेची निरीच्छा

निश्चित - ठरलेले

नैसर्गिक - स्वाभाविक

प

परस्परसदृश - एकमेकांसारखे

परवशतारूप - पराधीनतारूप

परमाणुसंघ - कणांचा जमाव

पदार्थविज्ञान - पदार्थाचे गुणधर्म कळण्याचे शास्त्र
परमाणुगत - परमाणूत असणारी
परमावधी - हद्द, शेवट
पराङ्मुख - मागे फिरणे
परावृत्त - मागे फिरणे
परिज्ञान - विशेष ज्ञान
परिशिष्ट - शेष
परिभ्रमण - फिरणे
परिणामानभव - परिणामांचा अनुभव
परिवर्तनानुसारे - पुनःपुनः तोच तोच जगाचा उद्भव होणार आहे त्याप्रमाणे
पार्थिव - मातीचा
पीठ - ठिकाण
पुरस्कार - उत्तेजन
पुंज - झुबके, जमाव
पुनरुद्भव - पुन्हा उत्पन्न होणे
पूर्वपरंपरा - पूर्वी चालत आलेली व्यवस्था
पूर्णस्वरूप - ज्याचे स्वरूप पूर्ण आहे असा, निर्दोष
पूर्वात्य - पूर्वेकडील
प्रभाव - महिमा, मोठेपण
प्रकट - उघड
प्रचलित - चालू
प्रजासत्ताक - ज्यावर प्रजेची सत्ता असते असे
प्रगल्भता - प्रौढपणा
प्रविष्ट केले - प्रवेश करून दिला
प्रसाद - कृपा
प्रलयाग्नी - मोठा नाश करणारा अग्नी, जगाचा नाश करणारा अग्नी
प्रसंगोपात्त - प्रसंग पडेल तसा
प्रवर्तक - प्रसार करणारा
प्रसृत होणे - पसरणे
प्रकृती - पदार्थ
प्रवृत्ती - ओढा, कल
प्रधानत्वेकरून - मुख्यत्वे करून

प्राणवायू - ऑक्सिजन
प्राणिदेहव्यतिरिक्त - प्राण्याच्या देहाशिवाय
प्राणयात्रा - जगणे
प्राणिकोटी - जीवांचा वर्ग
प्रादुर्भाव - उत्पन्न होणे
प्रासंगिक - कधी कधी उत्पन्न होणारी
प्रेरणा - स्फूर्ती, सूचना
प्रौढ - प्रगल्भ, थोर

ब

बहुभाषी - पुष्कळ बोलणारा
ब्रह्मचर्य - स्त्री समागमावाचून राहणे
बालिश - मूर्ख
बाष्पीभवन - वाफ होणे
बाणलेला - ठसलेला
बाह्योपाधी - बाहेरील त्रास
बाह्यपृष्ठभागापर्यंत - बाहेरील भागापर्यंत
बीजावस्था - बीजरूपाने असणे
बुद्धिभ्रंश - बुद्धीला भ्रम पडणे
बूज - चीज

भ

भवितव्यता - दैव, जे होणारे ते
भस्मसात - राखेसारखे
भाषाभिज्ञ - भाषा जाणणारे
भासमय - वरवरून खरे वाटणारे
भावरूप - जो आहे असा
भूमिका - सोंग, वेश
भ्रममूलक - चुकीचे किंवा खोटे समज उत्पन्न करणारी गोष्ट, मोह घालणारी
भ्रमजाल - चुकीचे समज, भ्रमांचे जाळे

म

महामुनी - मोठे ऋषी
महाभूते - पृथ्वी, आप, तेज, वायू ही चार महाभूते

मंडन करणे - खरे आहे असे ठरविणे
मग्न होणे - गळून जाणे, तल्लीन होणे
महर्गता - महागायी
मर्दुमकी - शूरपणा
महाजन - मोठे लोक
मध्योत्सारिणी - एखाद्या वस्तूतील परमाणूंची एकमेकांस लोटण्याची शक्ती
मध्याभिगामिनी - परमाणूस एकमेकांकडे ओढण्याची शक्ती
मनोनिग्रहाभाव - मन स्वाधीन न ठेवणे
मज्जा - मेंदू, ज्ञानतंतू
मनोव्यापाररूप - मनाचे व्यापार हाच
महामनस्कता - मोठा उदारपणा
मानवी निसर्ग - मनुष्याचा स्वभाव
मानवेतर - मनुष्याशिवाय इतर
मानसिक - मनाचे, मनासंबंधी
मीमांसा - स्पष्टीकरण
मूलभूत सिद्धांत - मूळचा आधारादाखल सिद्धांत
मुखश्री - तोंडवळा
मृगया - शिकार
मेटाकुटीस येणे - बेजार होणे, डबघाईस येणे
मोहीम - स्वारी

य

यथाक्रम - अनुक्रमे, क्रमाप्रमाणे
यज्ञयाग - यज्ञ वगैरे

र

रहसाळीचे - सलोख्याचे
रज्जुसर्पवत् - दोरीला साप मानण्याप्रमाणे
राजर्षी - उत्तम गुणांचा राजा
राज्यसूत्रे - राज्य चालविण्याचा अधिकार
राज्यविप्लव - राज्यक्रांती
राज्यकार्यदक्ष - राज्यकारभारात चतुर
राष्ट्रविशेषास - कोणा एकाच

राष्ट्रास रुक्ष - कोरडी, गोडी जीस नाही अशी
रुजा - रोग
रुग्णचक्षू - रोग झालेले डोळे
रुधिर - रक्त

ल

लक्तया - चिंध्या
लपंडाव - फसवाफसवीचा प्रकार
लवमात्र - थोडेसुद्धा, केसाइतकेसुद्धा
लोकाराधना - लोकांस संतुष्ट राखणे
लालसा - इच्छा
लीन होणे - त्यात जाऊन मिळणे
लोलुप - नादास लागलेला

व

वस्तुजात - वस्तूंचा समुदाय
वर्तनहेतू - वागणुकीचा हेतू
वश होणे - भरिभार टाकणे
वठणीस - हारीस
व्यक्तिनिष्ठत्व - मनुष्याचा वेगवेगळेपणा
व्यतिरिक्त - शिवाय
व्यग्र - उदास, दुःखी
वातावरण - पृथ्वीभोवतालचे वायूचे वेष्टण
वास्तवज्ञान - खरे ज्ञान
वावदूक - वाद करण्यात पटाईत
वायूप्रवाह - वाऱ्याचे लोट
व्यापार - क्रिया
व्याप्ती - प्रसार
व्याघात - अडथळा
विकासणे - वाढणे, फुलणे
विद्युत्पात - वीज पडणे
विविक्त - स्पष्ट, उघड
विगलित - गळलेला

विधाता - सृष्टिकर्ता, ब्रह्मदेव
विषाद - दुःख, वाईट
विलय - नाश
विवेकशुद्ध - विचारास जुळेल असा
विवेचन - स्पष्टीकरण, विवरण
विवरण - खुलासा
विधान - म्हणणे
विश्व - जग, सृष्टी
विरलत्व - पातळपणा
विभाज्यता - भागविभाग होण्याची योग्यता
विभूती - अंश, अवतार
विद्यमान - सध्याची, चालू
विश्वात्मा - विश्वाचा आत्मा
विवक्षित - अमुक एक
विप्रकृष्ट - अलग, निराळा, भिन्न
विमुक्त - निराळा होणे, अलग
विचारदोष - विचारांतील दोष
विसदृश - भिन्न, वेगळा
विषम - सारखी नाही अशी, अडचणीची
विरक्तता - संसारत्याग
विलग - वेगळे
विश्वाची रहाटी - विश्वाचा क्रम
विसंगतपणा - मागलापुढला संबंध जेथे नीट नाही असे
विरोध - एकमेकांशी न जमणे
विसंबणे - विसरणे
विहित - योग्य चांगले
विशिष्टगुरुत्व - वस्तूचे स्वतःचे वजन
विराम पावणे - थांबणे
विधिनिषेधरूप - करावे काय व न करावे काय या प्रकारचे
वृत्ती - मनाचा कल
व्यवसायप्रीत्यर्थ - रोजगारासाठी
वैय्याकरण - व्याकरणात हुशार

व्रतस्थ - नेम पाळणारा
वृत्तिचतुष्ट्याचे - चार वृत्तीचे
व्युत्पत्ती - अमका शब्द कोणत्या धातूपासून उत्पन्न झाला आहे ते सांगणे
वेदादी - वेद इत्यादी ग्रंथ

श

शक्तिद्वय - दोन शक्ती
शारीर - शरीराचे
शास्त्रीयज्ञानाभाव - शास्त्राचे ज्ञान नसणे
शाश्वती - पुष्कळ काळ टिकण्याविषयीचा भरवसा
शिरा - अशुद्ध रक्त नेणाऱ्या
शिथिल - ढिले
शिरसावंद्य - सर्व प्रकारे मान्य
षड्दर्शने - सहा प्रकारची तत्त्वज्ञाने
षट्शास्त्रो - सहा शास्त्रे

स

सदाचारप्रवृत्ती - चांगल्या प्रकारे वागण्याचा मनाचा कल
सहचर - आपल्या बरोबर वागणारे
सढळ - उदार
सदैव - एकसारखे
समवृत्तिता - सर्वांविषयी सारखेपणा
सर्वसाधारण - सर्वांस सारखा लागणारा
सर्वगामी - सर्व ठिकाणी असणारा
समानाधिकरण्य - एके ठिकाणी असणे
संयोगसाधक - जोडणारा
संघटित - एकमेकांच्या संयोगाने झालेला
संघायक - संबंध जुळविणारा
संसर्ग - संबंध
संमेलन - मिश्रण, एकत्र होणे
संदेहात्मक - ज्याविषयी संशय आहे असा
संपादक - मिळविणारे
संभवले आहे - झाले आहे

संकल्प - निश्चय
संलग्न - लागून असलेला
संगमशीलता - सहवासप्रीती असणे
स्वत:सिद्ध - आपोआप झालेली
स्पृहा - इच्छा
स्वयंप्रकाश - ज्यास स्वतःचा प्रकाश आहे तो
स्वयंवेद्य - स्वत: जाणणारे
सृष्टिशास्त्र - ज्याच्या योगाने सृष्टीची व्यवस्था, रचना वगैरे कशी आहे ते समजते ते
साम्य - सारखेपणा
सामान्यस्वरूप - साधारण रूप
सार्वत्रिक - सर्व ठिकाणी आढळणारे
साधनीभूत - कारण होणारी
साक्षात - केवळ, प्रत्यक्ष
सात्त्विक - सत्त्वशील, चांगला
साहचर्य - सहवास
स्वतउद्भूतप्रेरणावादीस - आपोआप स्फूर्ती होते असे मानणाऱ्यास
सामलातीने - साहाय्याने
सामराज्य - मोठी राजसत्ता
सिद्धांत - ठरलेली गोष्ट
स्तिमित होतात - येऊन राहतात, थांबतात
स्थित होणे - असणे
स्थिरस्थावर - शांतता
सुविकासित - पूर्ण झालेले
सुखदुःखविषयक वृत्ती - ज्यांशी सुखदुःखाचा संबंध आहे अशा
सुयंत्रपणे - सुरळीतपणे
सुखपरिणामी - ज्यापासून सुख होते अशी
सूत्ररूप - संक्षिप्त
स्नेहाकर्षण - परमाणू एकात एक मिळून त्यापासून दुसराच पदार्थ होण्याचा गुण
स्टोइक तत्त्वज्ञानस्वरूप - स्टोइक लोकांच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप
स्तोम - डौल, प्रस्थ
स्फोट होणे - फुटणे

ह

हतवीर्य - नि:शक्त

हताश - उदास, निराश

हव्यास - सवय

हृदयस्थ - हृदयात असणारे

क्ष

क्षम्यवृत्ती - ज्या वृत्ती असल्या तर चालतील त्या

क्षमावृत्ती - सहनशीलता

क्षिती - काळजी

ज्ञ

ज्ञेय - जाणता येते ते

ज्ञानवाहक - स्पर्श इत्यादी ज्ञानाचा भास करणारे.

❍❍❍

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा उदय वैदिक परंपरेपेक्षा उशिरा असला तरीही ते भौतिक वास्तवाशी निगडित असल्याने व आधुनिक विज्ञान संशोधनामुळे त्याचे मूल्य वाढले आहे. अर्थात त्यामुळे विज्ञान स्तरावर पराकोटीचे संशोधन झाले असले तरी भारतामध्ये विज्ञान नव्हतेच असे मात्र नाही, तर केवळ त्या पद्धतीने विचार करण्याची पद्धत रूढ नव्हती. मनुष्य व भोवताल यांचा सुसंबंध शोधताना भौतिक विचारधारा केवळ मानवी अस्तित्वकेंद्री झाली. तत्त्वज्ञानासोबत नीतिशास्त्राची पुनर्रचना झाली तरीही आधुनिक विज्ञानाने मानवी प्रश्न हाताळताना सुखवाद व उपयुक्ततावाद यांचा अतिरेकी अर्थ लावल्याने भौतिकवाद बोकाळला. दुसरीकडे भौतिकतेकडे पाठ फिरवण्याच्या वृत्तीमुळे म्हणा, भारतीय दर्शने परलोकवासी, गूढार्थ शोधणारी व आत्मतत्त्वाकडे वळणारी ठरली. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने अनुभूतीच्या प्रांगणातून पाय काढून घेत केवळ बौद्धिक तत्त्वचिंतन महत्त्वाचे ठरवत भारतीय तत्त्वविचार हे धार्मिक व श्रद्धा-अंधश्रद्धेचा खेळ ठरवला.

पाश्चात्त्य परंपरेमध्ये सॉक्रेटिसच्या सद्‌गुण प्रतिपादनातून ॲन्टिस्थेनिसच्या परमवैराग्य असलेल्या उपेक्षावादाचा (Cynicism) उदय झाला. उपेक्षावादाची (Cynicism) सुधारित आवृत्ती म्हणून आपण झेनोच्या स्टॉईक विचारांकडे बघू शकतो. उपेक्षावादी (Cynicism) आणि सुखवादी (Cyrainicism) हे परस्परविरोधी विचारप्रवाह सॉक्रेटिसनंतर निर्माण झाले. एपिक्युरियन पंथ हा स्टॉईक विचार आणि सुखवाद (Cyrainicism) यांची सुधारित आवृत्ती मानली जातो. सॉक्रेटिसचे उत्तरकालीन म्हणून या विविध पंथांकडे बघावे लागते.

पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन त्यागून तत्त्वज्ञान व नीतिशास्त्राकडे बघणे आणि सर्वकल्याणकारक असा विचारप्रवाह पुढे घेऊन जाणे हीच या अभ्यासामागची प्रस्तुतता आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे